मराठी-स्त्री

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निवडी
ग्र. नं. १०८३

– डॉ. दु. का. संत

REFBK-0009272

स्कूल व कालेज बुक स्टॉल, कोल्हापूर.

- मराठी साहित्यांतील स्त्री-जीवनाची चिकित्सक पाहणी करण्याचा आणि ब्रिटिश राजवटींत स्त्री-जीवनविषयक प्रगतीची सर्वंकष समीक्षा करण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे.

- प्रमुख समाज-सुधारक व विचारवंत यांनीं स्त्री-जीवनविषयक प्रगतीस जो हातभार लावला आहे त्याचें विवेचन विविध सामाजिक चळवळींच्या, कार्यांच्या व लेखनाच्या आधारानें केलें आहे.

- सामाजिक प्रगतीबरोबर स्त्रीच्या अंतरंगांत जो बदल होत होता त्याचा मागोवा या ठिकाणीं कादंबरी वाङ्मयाच्या आधारानें घेतला आहे.

- मराठी स्त्रीच्या आधुनिक कालांतील उद्बोधनाची पाहणी करणारा हा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रयत्न आहे असें म्हणतां येईल.

मराठी-स्त्री

मराठी साहित्यांतील स्त्री-जीवन

(ब्रिटिश राजवट)



लेखक :

डॉ. दु. का. संत,

एम्. ए., पीएच्. डी.

संगमेश्वर कॉलेज, सोलापूर.



स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.

प्रकाशक :

दा. ना. मोघे, बी. ए.
स्कूल व कॉलेज बुकस्टॉल,
गुजरी नाका, कोल्हापूर.

प्रथमावृत्ति : एप्रिल १९५७

सर्व हक्क स्वाधीन

किंमत १० रुपये

: मुद्रक :

खंड १ ला

बा. ना. ठकार,
श्री सिद्धेश्वर प्रिंटिंग प्रेस,
२६२९ ए. कोल्हापूर.

खंड २ रा

सी. एच्. गांधी,
हिंदुस्थान प्रिंटिंग प्रेस,
३५८ नारायण पेठ, पुणें २.

अनुक्रम २१८०८ वि. निबं...
क्रमांक ... १०८३ ... नों: दि: ...

निवेदन

प्रस्तुत ग्रंथासंबंधीः—

मुंबई विद्यापीठाच्या पीएच्, डी. पदवीसाठी प्रस्तुत प्रबंध चार वर्षांपूर्वीं लिहिला. तो आज प्रकाशांत येत आहे त्याबद्दल आनंद होत आहे. मूळ प्रबंधांत थोडें मागेपुढे करून हा ग्रंथ छापला आहे. प्रबंधांतील विवेचन कालखंडानुसारी होतें. प्रस्तुत ग्रंथ छापतांना मात्र विचारप्रधान वाङ्मयाचा (की जें समकालीन सामाजिक वैचारिक आंदोलनांतून निर्माण झालें त्याचा) उहापोह करणारीं प्रकरणें एकत्र आणून प्रथम खंडाची उभारणी केलेली आहे. दुसऱ्या खंडांत ललित साहित्यावरील विवेचन संग्रहित केलेलें आहे. या ग्रंथांत फक्त कादंबरी या वाङ्मयप्रकारांतील स्त्रीजीवनाच्या पाहणीचा समावेश केलेला आहे. मूळ प्रबंधांत याशिवाय काव्य, नाट्य–वाङ्मय व लघुकथा ह्यांतील स्त्रीजीवनाची चिकित्सा केलेली आहे. परंतु ग्रंथाचा विस्तार फार वाढूं लागला म्हणून जवळ जवळ त्या १४० पृष्ठें मजकुराचा समावेश येथे करण्यांत आलेला नाही. शेवटच्या समालोचनाच्या प्रकरणांत प्रमुख निष्कर्षांचा व तदनुषंगिक विचारांचा ऊहापोह केला आहे.

उद्देश व भूमिका

प्रबंधाचा उद्देश **ब्रिटिश राजवटींत निर्माण झालेल्या मराठी साहित्यांत स्त्रीजीवनाच्या** विविध अंगोपांगांचा ऊहापोह झाला, त्याची विचिकित्सक पाहणी करावयाची हा आहे. ती पाहणी करतांना ललित व ललितेतर असें दोन्ही प्रकारचें साहित्य विचारांत घेतलें आहे. हीं साहित्यांगें परस्परांना पूरक आहेत असें लेखकास वाटतें. एक वगळून

दुसऱ्यांतील विशिष्ट गोष्टीची चिकित्सा करणें हें विवेचनाच्या दृष्टीने तितकें समर्पक नाही. ललित साहित्यांत ज्या कांही गोष्टींना महत्त्व प्राप्त होत असतें, त्यांचीं बीजें ललितेतर वा वैचारिक साहित्यांत असतात. म्हणून चिकित्सक पाहणी करतांना ललित व ललितेतर असें दोन्ही प्रकारचें साहित्य आधारास घेतलें आहे. ललित व ललितेतर (विशेषतः वैचारिक) हीं वाङ्मयांगें परस्परांपासून भिन्न आहेत असें मानणें सयुक्तिक नाही असें लेखकास वाटतें व म्हणूनच ह्या संशोधनाचें स्वरूप इतकें व्यापक करून घेतलें आहे.

ही पाहणी करतांना ब्रिटिश राजवटीच्याच कालखंडांतील वाङ्मय विचारांत घेतलें त्याला कांही कारणें आहेत. पहिलें कारण असें की, ही राजवट परकी राजवट होती. तिला आधुनिक इतिहासांत वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. ब्रिटिशांनी अनेक नवे विचार, नव्या कल्पना आणल्या. ज्या कल्पना किंवा जे विचार आले त्यांचा स्वीकार वा परित्याग करावा याबाबत खूपच मतभेद झाले आहेत. आज त्या मतभेदांचें स्वरूप अधिक निर्लेप वृत्तीने पाहणें शक्य आहे.

दुसरें कारण, या राजवटींत प्रामुख्याने समाजसुधारणेचा विचार हा सर्वसंमत झाला. 'सुधारणा' या शब्दाबाबत मतभेद झाले आहेत. कांही वेळां सुधारणांऐवजीं 'उद्धारा'च्या वा क्रांतीच्या कल्पनेला सुद्धा महत्त्व आलें आहे. अलीकडे तोच आशय समाजवाद, सर्वोदय या शब्दांनी व्यक्त केला जातो. ह्या समाजसुधारणेचा केंद्रबिंदु प्रारंभी स्त्री होती व आजहि नाही असें म्हणतां येणार नाही. तेव्हा स्त्रीला केंद्रस्थानीं कल्पून ब्रि. राजवटींत झालेल्या समाजसुधारणेच्या यत्नाचें साहित्यांत जें प्रतिबिंब पडलेलें आहे त्याची पाहणी करणें हें निश्चितपणें मोलाचें गणलें जावें, असें वाटतें.

तिसरें कारण म्हणजे ह्या कालांत निर्माण झालेलें वाङ्मय हें ब्रि. वाङ्मयाच्या आधारें वाढलें आहे. त्या योगाने त्यांच्यांतलें स्वयंभूपण वेगळें झालें आहे.

परकीय राजवटीने अनेक नवे विचार आणले, आणि आधुनिक विचारवंतांनी विचारमंथन करून नवीं मूल्यें भारतीय समाजास दिलीं. व्यक्तिवाद, बुद्धिवाद हीं आणि लोकसत्तावाद व त्यांतून उत्क्रांत झालेला मानवतावाद हीं प्रमुख मूल्यें होत. ह्या सर्वांत अतीव महत्त्वाचें मूल्य व्यक्तित्व हेंच होय. आपण व्यक्तित्वाधिष्ठित लोकशाही समाजपद्धति स्वीकृत केलेली आहे. आणि मानवताधिष्ठित समाजवादी समाजपद्धतीकडे राष्ट्राचें तोंड गेल्या दहा वर्षांत वळविलें आहे. या सर्व वाटचालींत व्यक्तित्वाला मोलाचें स्थान राहणार आहे. व्यक्तिवादाचें भारतीय जीवनांत बीजारोपण करणें हें ब्रि. राजवटीचें प्रमुख वैचारिक व मूल्यात्मक कार्य होय. ह्याबाबत दुमत होईलसें वाटत नाही. व्यक्तिवाद हा ह्यापुढे ह्या देशातील मानवी कर्तृत्वाचा पाया, सामाजिक जीवनाचें प्राथमिक मूल्य म्हणून राहणार आहे असें स्पष्टपणें दिसतें.

भारतीय समाजांतील पुरुष वर्गाने ह्या व्यक्तिवादाचा स्वीकार थोड्याफार तत्परतेने केला. तथापि भारतीय स्त्रियांची परिस्थिति वेगळ्या प्रकारची होती. आज वा यापुढे आपल्या समाजांत स्त्री व पुरुष यांना समान अधिकार, संधी उपलब्ध राहाणार आहेत. [राज्यघटनेंतील १४, १५ व १६ हीं कलमें या दृष्टीने महत्त्वाचीं आहेत.] म्हणजे स्त्री व पुरुष हे समान भूमिकांवर आहेत असें गृहित धरलें आहे तें सामान्यतः खरें आहे. तथापि, ब्रि. राज्यकर्ते जेव्हा येथे आले तेव्हा स्त्री व पुरुष यांच्यांत फार तफावत होती. त्यांच्या जीवनाचीं ध्येयें, कर्तृत्वकक्षा या भिन्न होत्या. त्यांत महदंतर होतें. पुरुष स्त्रीपेक्षा पुष्कळच अधिकारसंपन्न होता. स्त्री पराधीन होती. याचा अर्थ ब्रिटिशांचें राज्य आल्याने भारतीय पुरुषांच्या जीवनांत जितकी क्रांति झाली त्यापेक्षा भारतीय स्त्रियांच्या जीवनांत अधिक आमूलाग्र झाली. व्यक्तिवादाचा स्वीकार करतांना पुरुषापुढे व्यापक जीवन उपलब्ध होतें. स्त्रीपुढे तें नव्हतें. तें उपलब्ध करून घेणें व घेतां घेतां दास्यशृंखलांचा परित्याग करून पुरुषांच्या समान भूमिकेवर येणें हा फार अवघड टप्प

स्त्रियांना गाठावयाचा होता. सामान्यतः स्त्रियांनी तो गाठला आहे असें म्हणतां येतें.

म्हणजे स्त्रीजीवनाच्या दृष्टीने पाहतां स्त्रीच्या ठिकाणीं व्यक्तित्वाचा नवा अंकुर फुटणें हें फार मोठें कार्य त्रि. राजवटीने केलें आहे. तिच्या ठायीं व्यक्तित्वाची जाणीव निर्माण होण्यापूर्वी समाजांत 'व्यक्ति' म्हणून जे अधिकार असतात त्यांना मानसिक, सांस्कृतिक व वैचारिक, दृष्ट्या पात्र होणें असें दुहेरी कार्य स्त्रीपुढे होतें. तें कितपत पार पडलें आहे याचा साहित्याचा आधार घेऊन ऊहापोह करावयाचा आहे. केवळ वाङ्मयीन दृष्टीने पाहिलें, तरी व्यक्तित्वाच्या साधनेचा हा प्रयत्न किती मूलगामी स्वरूपाचा आहे, हें स्पष्ट होईल.

समाज व साहित्य ह्यांचा संबंध बिंब-प्रतिबिंब स्वरूपाचा असतो. याचा अर्थ समाजाच्या विद्यमान् जीवितमूल्यांचें वा ध्येयांचें प्रतिबिंब साहित्यांत पडतें असाच घ्यावा लागतो. मग कधी तें वास्तवाचें स्वरूप प्राप्त करून घेईल, कधी अभिव्यक्तींत आदर्शवादाचा अवलंब केला जाईल, तर कधी प्रतीकात्मक वा अन्य मार्गाचा त्याला स्वीकार करावासा वाटेल. कोणत्या जीवनमूल्यांविषयी समाजाला किती चाड होती हें साहित्य वा कला या क्षेत्रांविना अन्यत्र कोठे स्पष्ट होत नाही. लेखकाच्या साहित्याकडे पाहण्याच्या ह्या विशिष्ट दृष्टीचें अधिक विस्तारपूर्वक विवेचन लेखकाच्या 'साहित्य आणि संस्कृति' व 'कला नीतिवाद' ह्या पुस्तकांतून आलें आहे. तें येथील विवेचनांत अध्याहृत धरलें आहे. ह्या निवेदनावरून प्रस्तुत प्रबंधामागील लेखकाच्या भूमिकेविषयी व त्याच्या उद्दिष्टाविषयी योग्य कल्पना येऊं शकेल असें वाटतें.

भूमिकेमागील दृष्टिकोनाबाबत येवढें स्पष्टीकरण केल्यानंतर **अवलंबिलेल्या पद्धतीविषयी** थोडासा खुलासा करणें आवश्यक आहे. लेखनांत सामान्यतः महत्त्वाचे कालखंड आधारास घेतले असले तरी प्रत्यक्ष विवेचन करतांना प्रमुख व्यक्ति व त्यांच्या वैचारिक कार्यास अधिक प्राधान्य दिलेलें आहे. तसें केल्याविना स्त्रीजीवनविषयक वैचारिक प्रगतीचा आलेख बरोबर

उतरला नसता असें वाटतें. ललित वाङ्मयाच्या विवेचनांतहि हीच दृष्टि वापरली आहे. त्यायोगें प्रमुख लेखकांच्या कृतींचा ऊहापोह करण्यापूर्वी त्या त्या लेखकाची विशिष्ट भूमिका वा मनोवृत्ति याबाबत विवरण केलेलें आहे. समालोचनाच्या प्रकरणांत त्रि. राजवटींत स्त्रीजीवनविषयक विचारांचा वा जागतिक, सामाजिक व वैचारिक फलश्रुति काय हें पाहण्याचा उपक्रम केलेला आहे.

स्वीकारलेल्या दृष्टिकोनामुळे व अंगीकारलेल्या पद्धतीमुळे प्रस्तुत प्रबंधाचें स्वरूप अपरिहार्यपणें बरेंच व्यापक व सर्वंकष झालेलें आहे असें आढळून येईल. साहजिकपणेंच प्रस्तुत प्रयत्न हा केवळ वाङ्मयीन समीक्षेच्या स्वरूपाचा न राहतां सामाजिक व वैचारिक प्रगतीची पाहणी करण्याचा भाष्यरूप यत्न झालेला आहे. त्या पाहणीची मर्यादा परकीय राजवटीपुरती मर्यादित ठेवल्याने ह्या उपक्रमास एक ऐतिहासिक महत्त्व प्राप्त व्हावें असें वाटतें. त्यांतील भूमिका व विवेचन हें केवळ विद्वज्जड (academic) न ठेवतां त्याच्यामागे कांही वैचारिक, सामाजिक साक्षेप बाळगला आहे. अर्थात् हें धोरण कित्येकांना स्वीकार्य वाटलें तरी कित्येकांच्या टीकेचा विषय होईल याची लेखकास जाणीव आहे. त्यायोगें कांही उणीवाहि आलेल्या असतील.

वाङ्मयीन टीकात्मक ग्रंथांत प्रस्तुत प्रबंधाचें कोणतें स्थान राहणार असेल तें राहो. प्रस्तुत ग्रंथ हा खऱ्या अर्थाने एक प्रबंध (थेसीस्) आहे. त्यांत एक विवक्षित सूत्र (Thesis) अनुस्यूत धरलें आहे. पहिल्या प्रकरणांत त्या सूत्राची मांडणी केलेली आहे. नंतरच्या प्रकरणांतून त्याचें अवलंबन कसें होतें तें दर्शविलें आहे. ललित वाङ्मयाच्या विवेचनाबाबत कित्येकांशी मतभेद होणें संभवनीय आहे. कित्येकांना साहित्याच्या परीक्षणाची ही भूमिकाहि आक्षेपार्ह वाटेल. तथापि साहित्याचें–व त्यांत ललित साहित्यहि आलें–समाजाच्या मूल्यात्मक व वैचारिक जीवनांत अतिशय महत्त्वाचें स्थान आहे हें मान्य केलें, व श्रेष्ठ ललित साहित्यकृति ह्या समाजाचें मन आपणांकडे कलात्मक आकर्षणांपेक्षा इतर गुणांनी आकर्षून घेत असतात हें जर लक्षांत धरलें तर साहित्याची ही परीक्षा अस्थानीं वाटण्याचें कारण

नाही. श्रेष्ठ ललित साहित्यकृती ह्या श्रेष्ठ कलाकृती म्हणून मान्यता पावतातच; पण त्यापेक्षाहि त्यांचें मोठेंपण अधिक असतें. इतर ललितकला व साहित्य यांच्या कलात्मक स्वरूपांमध्ये हाच मोठा फरक आहे.

ब्रिटिश राजवटीचा कालखंड या अभ्यासास घेतल्यामुळे विद्यमान लेखक व कादंबरीकार यांच्या कृतींबाबत बरेंच मतप्रदर्शन करावें लागलेलें आहे. तें विवाद्यतेचा विषय होऊं शकेल. तथापि, त्या विशिष्ट मतप्रदर्शनामागे एक तात्त्विक भूमिका आहे ही गोष्ट या ठिकाणीं नमूद करणें आवश्यक आहे. हें विवेचन कोणत्याहि प्रकारच्या व्यक्तिगत पूर्वग्रहापासून मुक्त आहे. येथील टीका ही वैचारिक आपलेपणा वा दुरावा ह्यामधूनच निर्माण झालेली आहे. व्यक्तिगत आपलेपणाचा वा दुराव्याचा या ठिकाणीं कांहीहि संबंध नाही. टीकाविषय झालेल्या व्यक्ति ह्या लेखकास आदरणीयच वाटत आहेत.

आज साहित्याकडे थोड्या वेगळ्या दृष्टीने पाहिलें जातें. साहित्यांत मानवी मनाच्या विविध जाणीवांचें प्रतिबिंब पडतें, हा विचार रूढ होत आहे असें दिसतें. या विचारसरणीप्रमाणे टीकाकाराने ह्या जाणीवांतील संगति शोधावयाची असते. तथापि हा विचार स्वातंत्र्यकालांतला आहे हें लक्षांत घेतलें पाहिजे. ह्या जाणीवांना घनता प्राप्त होण्यासाठी व्यक्तित्व जाणीव व सामाजिक जाणीव यांनी पार्श्वभूमि निर्माण झालेली असावी लागते. साहित्यांतील अंतरंगाच्या ह्या दोन बाजू (dimensions) आहेत. आधुनिक मराठी साहित्याने त्या त्रि. राजवटींत संपादन केल्या आहेत. त्याही दृष्टीने ह्या प्रयत्नाचें साभिप्रायत्व पटेल.

आणि आभार—

प्रबंधाची उभारणी होत असतांना इतक्या लोकांचें विविध प्रकारचें साहाय्य झालें आहे की त्याचा उल्लेख करणें अशक्य आहे. ह्यांत मित्र आहेत, हितचिंतक आहेत, सहकारी आहेत व अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनीहि आहेत. तथापि, कांहींचा उल्लेख करणें हें माझें कर्तव्य आहे. गुरुवर्य डॉ. वाटवे यांचें

मार्गदर्शन या प्रबंधास लाभलें आहे. गुरुवर्यांचा व माझा गुरु-शिष्यसंबंध एक तपावरचा आहे. प्रबंधप्रकाशनाच्या वेळीं डॉ. वाटवे यांचा आशीर्वाद असावा असें वाटलें. त्याप्रमाणे त्यांना तें कळवितांच त्यांनी अनेक व्यवधानें बाजूस सारून मला 'आशीर्वाद' दिला. त्यांच्या आशीर्वादाने माझे मन इतकें भरून गेलें आहे की मला त्यांचे आभार कसे मानावेत हें समजेनासें झालें आहे. गुरुवर्यांनी उत्तेजन दिलें नसतें तर हें काम पुरें झालें असतें असें मला वाटत नाही. माझ्यावरचें ऋण हें कधीच न फिटण्यासारखें आहे. त्यानंतर, माझे मित्र प्रा. गो. म. कुलकर्णी, एम्. ए., प्राध्यापक, विजय कॉलेज, विजापूर यांचा उल्लेख करणें जरूर आहे. मित्रवर्य गोविंदरावांचा व माझा परिचयही एक तपाच्या वरचा. त्यांनी आस्थेवाईकपणें माझें सर्व हस्त-लिखित बारकाईने पाहून दिलें व अत्यंत उपयुक्त व मौलिक सूचना केल्या त्याबद्दल त्यांचे आभार मानणें हें कृत्रिमपणाचें ठरेल, म्हणून कृतज्ञतापूर्वक उल्लेख करतों. प्रबंधाचें लेखन रत्नागिरींत असतांना (१९५२ मध्ये) झालें. त्या वेळीं तेथील नगर वाचनालयाचे ग्रंथपाल श्री. श्री. ज. मुळे यांनी हवीं तितकीं पुस्तकें एके वेळीं नेण्याची सवलत दिली. त्यांचे व व्यवस्थापकांचे आभार मानतों. अनेक ग्रंथकारांचें साह्य झालें आहे, त्यांचे आभार मान-ण्यास मजजवळ शब्दच नाहीत. त्यांचा मी ऋणी आहें.

बाहेरच्या मित्रमंडळीप्रमाणे घरच्या लोकांचें पण अमोल साहाय्य मला झालें आहे. माझे बंधु ती. दादा यांनी चांगलें मलपृष्ठ तयार करून दिलें. आणखी एका व्यक्तीचा उल्लेख करणें आवश्यक आहे. ह्या प्रबंधाचें लेखन अतिशय अस्वस्थ मनःस्थितींत झालें. व्यावसायिक अडचणींमुळे ही अस्वस्थता निर्माण झाली होती. त्या अवस्थेंत धीर देऊन प्रबंधाचें लेखन जवळजवळ करवून घेणें, व पहिली प्रत झाल्यानंतर विद्यापीठाकडे पाठवावयाची दुसरी प्रत तयार करण्याचें काम करणें ह्या सर्व गोष्टी माझी पत्नी सौ. मीरा हिने केल्या. मराठी स्त्री-जीवनावरच्या ह्या भाष्यांत एका स्त्रीचा अशा प्रकारें विशेष जवळचा संबंध असावा, ही एक औचित्यपूर्ण घटना आहे असें मी मानतों.

प्रकाशनाची जबाबदारी स्कूल व कॉलेज बुकस्टॉलचे श्री. दामुअण्णा मोघे यांनी स्वीकारली याबद्दल त्यांचे, तसेच ज्या छापखान्यांत हा ग्रंथ छापला त्या छापखान्यांचे व्यवस्थापक व कामगार, यांचे आभार मानतों.

अशाप्रकारचें लेखन जिल्हागांवांसारख्या ठिकाणी राहून करावयाचें म्हणजे अनेक अडचणी असतात. ग्रंथ मिळत नाहींत ही एक अडचण झालीच. छापण्याच्या वेळीहि प्रकाशक एका गांवीं, छापखाना दुसऱ्या गांवीं व स्वतःचें वास्तव्य तिसऱ्या गांवीं. त्यायोगें कांही अपुरेपणा वा उणीवा राहून गेल्या आहेत. मुद्रणांतहि कांही चुका राहून गेल्या आहेत. त्याबद्दल वाचकांची क्षमा मागतों. त्या उणीवा ह्या लेखकाच्या प्रवृत्तींतून झाल्या असण्यापेक्षा परिस्थितींतून झाल्या आहेत, ह्या वस्तुस्थितीकडे अंगुलीनिर्देश करतों.

'साहित्य आणि संस्कृति'नंतर सहासात वर्षांनी हा प्रबंध बाहेर येत आहे; त्यांतील उणीवांची व अन्य दोषांची जाणीव लेखकास पुरेपूर आहे. इतर कोणाचें कांहींहि मत होवो ! आपली बाजू येथे बरोबर मांडली गेली आहे असें आजच्या मराठी स्त्रीला वाटलें तरी आपल्या श्रमांचें चीज झालें असें मी समजेन.

संगमेश्वर कॉलेज,
सोलापूर.

—दु. का. संत



आशीर्वाद

माझे शिष्यमित्र डॉ. दु. का. संत यांच्या बौद्धिक जीवनाशीं माझा निकटचा संबंध बऱ्याच वर्षांचा आहे. तीव्रबुद्धीचे, चिंतनशील, अबोल पण विश्वविद्यालयीन परीक्षांत गाजणारे विद्यार्थी, 'कलानीतिवाद' 'साहित्य आणि संस्कृति' इत्यादी प्रबंधांच्या निर्मितीनें ग्रंथलेखनाच्या प्रांतांत आत्मविश्वासानें पावलें टाकणारे होतकरू लेखक आणि 'मराठी-स्त्री' या सहाशें पृष्ठांच्या विचारपरिप्लुत ग्रंथाचे निर्माते या त्यांच्या बौद्धिक-जीवन-विकासाच्या तीन अवस्था मी मोठ्या आनंदानें आणि अभिमानानें अगदीं जवळून पाहिल्या आहेत. मी त्यांचा विद्यालयीन अध्यापक व मार्गदर्शक होतों. पण डॉ. संतांच्या प्रज्ञाशालित्वाचें श्रेय या व बाह्य कारणांना नसून तें त्यांच्या नैसर्गिक मनोरचनेला व त्यांच्या व्यासंगाला आहे.

'मराठी-स्त्री' या प्रकृत ग्रंथात डॉ. संतांचे सर्व बुद्धिगुण आणि त्यांचा गाढ व्यासंग यांची प्रतीति पानोपानीं येते. प्राचीन काळापासून आज पावेतों स्त्रीजीवनाचा आढावा घेऊन त्याच्या उत्कर्षापकर्षाची मीमांसा करणें व त्याच्या भविष्यकालीन प्रगतीची दिशा दाखविणें हें मोठें जोखमीचें काम डॉ. संतांनीं या ग्रंथांत हातीं घेतलें आहे. या कामीं मतमतांतरें, नीति-अनीति, धर्म-अधर्म, रूढि, प्रस्थापित हितसंबंध अशीं शेंकडों मोठीं गुंता-गुंतीचीं कोडीं नाजुक हातानें पण निर्धारानें त्यांना उकलावीं लागलीं आहेत. त्यांत डॉ. संतांशीं कोणाचा कांहीं मतभेद होईलहि. पण एवढी गोष्ट येथें नमूद करावीशी वाटते कीं या जटिल व नाजुक विषयांवरील आपली भूमिका भावना आणि विचार डॉ. संतांनीं फार संयमानें, व्यासंगानें आणि गाढ सहानुभूतीनें मांडले आहेत. सदर ग्रंथ हा एक स्त्री-जीवनविषयक विचारकोशच झाला असून त्यानें मराठींतील वैचारिक वाङ्मयांत मोलाची भर घातली आहे. डॉ. संतांच्या हातून याच तोलाचे अनेक ग्रंथ निर्माण होवोत व त्यामुळें मराठी समृद्ध होवो हाच माझा डॉ. संतांना प्रेमळ आशीर्वाद आहे.

राणी पार्वतीदेवी कॉलेज,
टळक वाडी, बेळगांव.
११-३-५७

के. ना. वाटवे

अनुक्रमणिका

खंड १ ला : वैचारिक साहित्य

प्रकरणाचें नांव	पृष्ठें
स्त्री आणि संस्कृति	१
प्राचीन मराठी साहित्यांतील स्त्रीजीवन	६२
अव्वल इंग्रजी व लोकहितवादींचा काल	११३
आगरकर व त्यांचें युगमान	१४६
पहिल्या महायुद्धानंतरचा काल	२०६
समाजवादी विचारांचा प्रसार	२३१

खंड २ रा : ललित साहित्य : कादंबरी

हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवन	३
वामनराव जोशी व डॉ. केतकर	४५
प्रो. फडके, खांडेकर व माडखोलकर	१२७
वरेरकर व इतर कादंबरीकार	२१३
समालोचन	२७४
साधनग्रंथ	३४८



मराठी-स्त्रीचे प्रमुख उद्धारकर्ते

श्रि. गोपाळराव आगरकर

आणि

महात्मा ज्योतिराव फुले

ह्यांच्या

पुण्य स्मृतीस—

मराठी-स्त्री

खंड पहिला

(वैचारिक साहित्य)

अक्रा. २१९०९ वि. निवं.
क्रमांक ९०८३ नोंः दिः २५।५।५

स्त्री आणि संस्कृति

साहित्याच्या समीक्षेच्या अनेक भूमिका संभवतात. समकालीन समाज-प्रगतीस साहित्याचा हातभार कसा लागला आहे हें पाहणें हीहि एक महत्त्वाची भूमिका होऊं शकते. आधुनिक समाजप्रगतींत स्त्रीला आणि तिच्या जीवनाशीं निगडित असणाऱ्या विविध प्रश्नांना विशेष महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें आहे. साहित्यांत स्त्रीजीवनाचें प्रतिबिंब कसें पडलें आहे याची पाहणी करणें हें या प्रबंधाचें प्रमुख उद्दिष्ट आहे. ही पाहणी करतांना स्त्रीजीवनाचा व तज्जन्य प्रमुख समस्यांचा विचार मामुली सामाजिक दृष्टीने न होतां अधिक बारकाईने अवलोकन करून सांस्कृतिक प्रगतीची दिशा ध्यातांत घेणें अवश्य आहे. ती लक्षांत आल्यानंतरच ब्रिटिश राजवटींतला स्त्रीजीवन विषय जागृतीचें नेमकें स्वरूप अधिक स्पष्टपणें दृग्गोचर होईल. या दृष्टीने या प्रकरणांत मानवी संस्कृतींतील स्त्री सहकार्याचें स्वरूप विशद केलें आहे. लेखकाचा दृष्टिकोन कळण्याच्या दृष्टीने व प्रबंधांतील विवेचनाचा रोख समजण्यास हें विवेचन आवश्यक आहे असें वाटतें.

'संस्कृति' शब्दासंबंधीः—संस्कृति या शब्दाच्या व्याखेसंबंधी व त्या शब्दाने प्रतीत होत असलेल्या संकेतासंबंधी वा आशयासंबंधी पुष्कळ विवेचन करतां येणें शक्य आहे. तरीपण विशिष्ट विवेचनांत संस्कृतीच्या व्याप्तीची कल्पना मर्यादित करून घ्यावी लागते. संस्कृतीचें स्वरूप (सर्वसाधारण संकेतानुसार जो अर्थ प्रतीत होतो त्या अर्थाने) इतकें बहुविध आहे कीं, त्या स्वरूपाचा विचार संकलनात्मक रीतीने न करतां पृथगात्म पद्धतीने करावा लागतो. मनुष्याने आतापर्यंत सुधारणेचा जो टप्पा गाठला आहे त्याला संस्कृति म्हणतां येईल व म्हटलें जातेंहि. ह्या ठिकाणीं संस्कृति

हा शब्द प्रामुख्याने ह्याच अर्थाने वापरला आहे. (लेखकाच्या 'साहित्य आणि संस्कृति' ह्या ग्रंथांतहि लेखकाने हाच अर्थ आधारास घेतला आहे.) ही संस्कृतीची साधना करतांना विशिष्ट कालांत वा परिस्थितींत तिचें स्वरूप आत्मोन्नयना (कल्चर) सारखें असेल, उलटपक्षी दुसऱ्या एखाद्या काल-खंडात निसर्गावर विजय मिळवून ज्ञानाची जोपासना करून वा इतर साधनांनीं जीवनाची समृद्धता (सिव्हिलिझेशन) निर्माण करण्याचें असेल, तर कधी कधी सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेचा प्रश्नहि अतीव मोलाचा वाटला असेल. ह्या तीनहि गोष्टींचा समावेश 'संस्कृतींत' होतो असें येथे गृहित धरलेलें आहे. संस्कृति ह्या शब्दांत तेवढी व्यापकता सामावूं शकते.

संस्कृतीच्या धारणेंतील सर्वसंग्राहकता:—आजच्या सुसंस्कृत अवस्थेप्रत येण्यास मानवसमाजास त्याच्याच एका अवयवाचें—स्त्रीयांचें—साहाय्य झालेलें आहे. संस्कृति हा ठेवा सर्व समाजाचा असतो. संस्कृतीच्या ठेव्याचा गाभा म्हणजे सांस्कृतिक मूल्यें. तीं सर्वसमाजासाठी निर्माण होत असतात. वरवर पाहिलें असतां त्यांत प्रामुख्याने (निदान आतापर्यंत तरी) कांही वर्ग व व्यक्ती यांना प्राधान्य आहे असें दिसून येत असलें तरी संस्कृ-तीच्या साधनेचें सर्व श्रेय केवळ त्या व्यक्तींना वा गटांनाच देतां येईल असें नाही. संस्कृतीचें परिरक्षण व परिवर्धन करण्यांत अनेकांचा हात असतो. संस्कृतीच्या श्रेयाचे अनेक वांटेकरीहि असतात. अशा अज्ञात वांटेकऱ्यांमध्ये प्रमुख 'स्त्री' ही एक आहे. तिने मानव समाजाच्या सांस्कृतिक साधनेंत कोणती मदत केली आहे, ती करीत असतांना तिचें स्थान कोणतें राहात आलें आहे व आजपर्यंत झालेल्या साहाय्याच्या अनुषंगाने तिचा वाटा या पुढे कोणता राहणार आहे, ह्याचा थोडा उलगडा होण्याचा संभव आहे. या पुढील कालांत तिचें कोणतें स्थान राहणार आहे तें स्पष्ट होण्यासाठी अशा प्रकारची पाहणी करणें आवश्यक आहे अशी लेखकाची समजूत आहे.

स्त्रीचा वाटा:—आजपर्यंतचा जगाचा वा कोणत्याहि देशाचा जो सांस्कृतिक इतिहास आहे त्याची धारणा सामान्यतः 'पुरुषी' आहे,

(मॅस्क्युलाइन). ह्याचें कारण समाजरचनाच तशी आहे. कायदा व शास्त्र ह्यांत 'मनुष्य (मॅन) ह्या शब्दांत–की जो शब्द पुल्लिंगी आहे–स्त्रियांचा समावेश होतो, असें गृहित धरलें जातें. आपलीं जीवितमूल्यें हीं 'पौरुषा'वर आधारलेलीं आहेत. दृष्टिकोणहि तसाच आहे, उदारमतवादी लेखकहि त्यापासून अलिप्त नाहींत.[1] थोडक्यांत पुरुषांचा प्रश्न निघाला कीं त्याचा विश्वाशी कोणता संबंध आहे, येथपर्यंत आपली मजल जाते; उलटपक्षी स्त्रियांचा प्रश्न निघाला कीं, त्यांच्या प्रश्नांची मजल मात्र पुरुष आणि स्त्री यांमधलें संबंध कसे असावेत येथपर्यंतच येऊन आपण थांबतों. [Man's problem is his relationship to the Universe, Woman's, they suggest, her relationship to man.[2]] ही स्थिति आतां बदलायला पाहिजे. स्त्रियांना खरोखर यापुढे खरें मानाचें व कर्तृत्वयोग्य असें स्थान मिळालें तर–व तें मिळत आहे असें दिसतें–यापुढची मानवी संस्कृति ही केवळ पुरुषी न राहतां, ती एकांगी, अपूर्ण न राहतां वास्तव अर्थानें अधिक मानवी (human) होईल, अशी व्यवस्था केली पाहिजे. तेव्हां मानवी समाजानें संस्कृतिसाधनेंतील स्त्रियांच्या साहाय्याबद्दल त्यांना योग्य तें श्रेय देऊन त्यांवर जे अन्याय झालेले आहेत, त्यांचें समर्थन कांहीहि कारणें देऊन करतां आलें तरी यापुढे मात्र ते न होऊं देण्याविषयींची–व झालेल्या अन्यायांचें परिमार्जन करण्याची, प्रामाणिक इच्छा व्यक्त केली गेली पाहिजे. कारण यापुढे जी कांही संस्कृतीची वाढ व्हावयाची आहे तिच्यांत स्त्री व पुरुष या दोघांचा वाटा सन्मान्य असला तरच त्या संस्कृतीचा एकमेकांस अभिमान वाटणार आहे.

आजपर्यंत हें जें स्त्रियांचें साहाय्य झालें त्याचें स्वरूप तीन प्रकारचें आहे. कधी सक्तीनें घेतलें आहे; कधी मोठेपणा देऊन, गुणांची खैरात करून घेतले आहे, तर कधी योग्य तो मान देऊन घेतले आहे. आजपर्यंतच्या इतिहासांत ह्या तीन प्रकारांची गल्लत झालेली आहे.

१,२ वेल्सच्या 'इतिहासाची रूपरेषा'ची सुरवात पाहिली तरी ती वृत्ति कशी आहे हें स्पष्ट होईल असें 'Women & Changing Civilization by Winitred Holtby, P. 4" या ग्रंथांत म्हटलें आहे.

आजची समानतेची अवस्था प्राप्त होईपर्यंत स्त्री व पुरुष यांचे संबंध कसे होते, व त्यांच्यावर आधारलेल्या कुटुंब, मालमत्ता, नीति, धर्म, राष्ट्र इत्यादि समाजसंस्थांचीं स्वरूपें कशीं बदलत आलीं आहेत तें पाहणें उद्बोधक होईल. एका अर्थाने आजच्या संमिश्र अशा मानव समाजांत त्याच्या बालपणींच्या स्वभावाचे धागेदोरे कसे गुंतले आहेत, हें पाहात असतां पुष्कळच नवनवीन गोष्टींचा उलगडा होईल.

संस्कृतिविकासांतील प्रमुख टप्पेः— मानवसमाजाने आजपर्यंत प्रगतीचा जो पल्ला गाठला आहे, तो साधारणपणें टप्प्याटप्प्यानें गाठला आहे असें म्हणतां येईल. एकंदर मानवी—सांस्कृतिक विकासाचा आढावा घेतांना तीन चार अवस्थांचा विचार करावा लागतो. त्या अवस्थांना [१] कृषि–पूर्व संस्कृति (वन्यावस्थेतील अवस्था व शेतीचा शोध लागून मोठमोठ्या नद्यांच्या खोऱ्यांत शेतीला स्थैर्य आलें तोंपर्यंतचा काल;) [२] कृषि–संस्कृति (साधारणपणें लिखित इतिहासापासून तों इसवी सनाच्या पंधराव्या-सोळाव्या शतकापर्यंतचा काल;) [३] उद्योग संस्कृति–(गेलीं ४।५ शतकें विज्ञानाचीं व समाजशास्त्रांचीं अविरत वाढ होत आहे तो कालखंड;) आणि गेल्या एक दोन दशकांत सामाजिक न्याय जीवनांत प्रस्थापित करण्याचा एक प्रयत्न होत आहे असें म्हणतां येईल ती अवस्था. * अर्थात् हें कालखंड विवेचनाचे सोयीसाठींच आहेत. पण त्यांची योजना ही बरीच अन्वर्थक आहे असें म्हणतां येईल. आजच्या जगांत निरनिराळ्या अवस्थेंत असणारे समाजगट आहेत. पण व्यापक दृष्टीनें आजच्या संस्कृतीच्या अग्रलक्षणाची कल्पना येण्यास विचारी लोकांचा ओढा कोणीकडे आहे हें लक्षांत घ्यावयास हवें. त्या आधारेंच आजच्या संस्कृतीचें लक्षण ठरविणें उचित होईल. संस्कृतीची जी विकास–क्षम कल्पना ह्या ठिकाणीं गृहित धरली आहे त्या कल्पनेतील विकासाचें स्वरूप स्पष्ट होण्याच्या दृष्टीनें ह्या अवस्था अन्वर्थक आहेत असें आढळून येईल.

---

* लेखकाच्या 'साहित्य आणि संस्कृति' ह्या ग्रंथांत ह्या संज्ञा लेखकानें वापरल्या असून शेवटच्या टप्प्यास "संयोजन संस्कृति" असें नांव दिलें आहे.

स्त्रीजीवनविषयक उत्क्रांतीचा व स्त्रियांच्या समाजांतील स्थानाचा विचार करतां या वेगवेगळ्या अवस्थांतील अलगपणा स्पष्ट होईल स्त्री-जीवनविषयक आचारविचार कसे बदलले, सर्व कालखंडभर सामान्यतः सर्वदूर कशी एकाच प्रकारचीं मूल्यें रूढ होतीं ह्याचा पण उलगडा होईल.

मानवी विकासाच्या पहिल्या अवस्थेस 'वन्य-संस्कृति' म्हणणें योग्य होईल. ह्या अवस्थेतलें जीवन अगदीं अप्रगत असलें तरी ऐतिहासिक-दृष्ट्या ती एक 'संस्कृति' अवस्था आहे असें म्हणतां येईल. कारण पशू-पेक्षां हें जीवन निश्चितपणें उन्नत आहे. त्यांत मानवी बुद्धीचा उपयोग करून घ्यावयास सुरवात झालेली असते. बुद्धि व हात ह्यांचा संयोग 'शस्त्रां'त होतो. तेथूनच संस्कृतीस सुरवात होते. ह्या वन्यावस्थेचे सुद्धा तीन चार प्रकार विचारांत घ्यावे लागतात. पहिली फलसंचयावस्था, दुसरी पारध, मासे पकडणें, इ. * ह्यांतहि कांहीं क्रम लावतां येणें शक्य आहे. पण सर्वसाधारणपणें संस्कृति विवेचनांत ह्या तीनहि अवस्थांचा एकत्रित विचार करणें अयोग्य होणार नाहीं. कारण जीवनाचे हे निरनिराळे नमुने असले तरी त्यांची 'सांस्कृतिक अवस्था' सामान्यतः एकच आहे. हे जे प्रकार आहेत त्यांच्या मुळाशी भौगोलिक परिस्थिति आहे व तिच्या अनुषंगानें त्यांत फरक पडलेला आहे.

कृषिपूर्व अवस्थाः—स्वतःच्या उदरभरणासाठीं खाद्य व पेय वस्तू मिळविणें हाच प्राथमिक अवस्थेतील सर्व समाजाचा प्रमुख उद्योग. ही गोष्ट बरीच अवघड व अनिश्चित असल्याने माणसाचा सर्व काल व शक्ति याच विवंचनेंत व परिश्रमांत खर्च होणें शक्य आहे. साहजिकच उच्च वा कांही मोठा असा बौद्धिक वा मानसिक विकास होणें ही गोष्ट ह्या अवस्थेंत संभवत नाहीं. समाज टोळ्याटोळ्यांनी रहात व फिरत असल्याने विशिष्ट टोळी हाच समाज, हेंच जग, कुटुंब, 'राष्ट्र' इ. सर्व कांहीं टोळीच. ह्या टोळीचाच आपल्याकडील सूचक शब्द म्हणजे 'गोत्र'. प्रतिकूल परिस्थितींत

* डॉ. वा. का. किर्लोस्कर यांच्या 'विवाह संस्थेचा इतिहास' ह्या पुस्तकांत ह्या अवस्थांना जंगली अवस्था (Savagery), रानटी अवस्था (Barbarism), इ. नांवें दिलीं आहेत. रसेलच्या विवाह विषयक पुस्तकांतहि तशाच अवस्था कल्पिल्या आहेत. उ. 'रसेल नीति पृ. १०.

ह्या टोळीने संघटितपणें संकटांस तोंड देणें आवश्यक असतें. त्यामुळें ह्या समाजांत स्त्री व पुरुषांत एक प्रकारची समानत्वाची भावना संभवते.[१] श्रमविभागाच्या दृष्टीनें अधिक कष्टाचीं, शक्तीचीं पण किचकट नसलेलीं कामें पुरुषवर्गानें आपलेकडे घेतलीं व या मुख्य व्यवसायाशिवाय (पारध, मासे मारणें इ.) बाकी सर्व कामें स्त्रियांनाच करावीं लागत. म्हणजे मुलांची निगा, स्वयंपाक, शिवण, टिपण, घर बांधणें.....इ. इ. याहि पण क्रिया वन्य पार्श्वभूमीवरूनच विचारांत घ्यावयास हव्यात.

या अवस्थेंतील स्त्रीचें स्थानः — ह्या वन्य अवस्थेंत जी कांहीं 'संस्कृति' म्हणून म्हणतां येईल ती केवळ स्त्रियांच्याच कर्तृत्वाचा भाग आहे असें आढळून आलें आहे. सामाजिक संस्थांचें या अवस्थेंतलें स्वरूप प्रायः स्त्रीप्रणित आहे असें म्हणतां येईल. त्या दृष्टीनें ही केवळ स्त्री–कर्तृत्वप्रधान संस्कृति होय असें म्हणावें लागेल. कारण पुरुषाने फक्त एखादा पशू तेवढा ठार मारावयाचा. मग तो पशू त्या स्थानापासून वस्तीपर्यंत आणण्यापासून तों त्याचें मांस कापून भाजण्यापर्यंत व हाडां-कातड्याचें वेगळे जिन्नस करण्यापर्यंत सर्व गोष्टी स्त्रियांनाच कराव्या लागत. विल् ड्यूरंटचें मतें तर धान्य पेरण्याचा शोध सुद्धा स्त्रीलाच प्रथम लागला आहे.[२]

प्राथमिक अवस्थेंत स्त्रियांची मदत संस्कृतिवर्धनांत किति विविध प्रकारची झाली आहे, याचें साधार विवेचन ओ. टी. मेसन यांच्या 'वूमन्स शेअर इन् प्रिमिटिव्ह कल्चर' ह्या पुस्तकांत खुलासेवार केलेलें आढळतें. जीवनावश्यक प्रत्येक गोष्टींत स्त्रीनेच प्रामुख्याने कशा सुबुद्ध 'सुधारणा' घडवून आणल्या याचें दिग्दर्शन त्यावरून होतें. धान्य जमा करणें, तें सांठविण्यासाठीं कोठारें करणें, तें दळणें, कुटणें, शिजविणें— या क्रियांसाठीं तीं तीं उपकरणें तयार करणें, मांस शिजविणें, कातडीं कमावणें, मांडीं घडणें, त्यांवर नक्षी काढणें, टोपल्या करणें, इत्यादि सर्व कामें करून शिवाय निसर्गनियमित जबाबदारी पार पाडणें, व ह्याशिवाय भ्रमणशील

---

१ आधार : Woman & Civilization–by E. M. White, Ch. II P. 17.

२ Will–Durant : Story of Civilization, 1st Chatper.

अवस्थेंत इकडचें सर्व सामान तिकडे नेणें, हीं सर्व कामें स्त्रियांचींच कशीं असत यांचें मजेदार वर्णन ह्या पुस्तकांत आढळतें.[1] विल ड्यूरंटने एक उदाहरण दिलें आहे. गोरे लोक जेव्हां ऑस्ट्रेलियांत घोड्यासारख्या जनावरावरून इकडून तिकडे सामान नेऊं लागत तेव्हां तेथील वन्य लोकांस आश्चर्य वाटे. ते म्हणत "ह्यांच्या जवळ बायका असतांना यांना घोडे, खेचरें लागतात कशाला ?"

ह्या प्राथमिक जीवनावश्यक सोयींच्या तरतुदीपासून जरा उच्च अशा सांस्कृतिक विकासाकडे लक्ष दिलें तरी हेंच आढळतें. भांडीं घडवूनच केवळ स्त्री थांबली नाहीं तर त्यांवर चित्रें काढण्यास सुद्धां तिनेंच प्रारंभ केला. त्याचप्रमाणें भाषा निर्माण करण्यांत, ती मुलांना शिकविण्यांत स्त्रियांचा बराच भाग आहे. एवढेंच नव्हे तर समाजधारणा व धर्म यासारख्या गोष्टींत स्त्रियांचाच प्रारंभीं बराच भाग होता. प्राथमिक अवस्थेंत कुटुंबांतहि स्त्री हीच प्रमुख गणली जात असे. व पुरुषास अगदी दुय्यम स्थान असे. ह्या 'दरिद्री' अवस्थेंत जी कांहीं 'समृद्धि' आणली गेली ती सर्व स्त्रियांनी आणली होती. आजच्या 'संस्कृत' अवस्थेतल्या गृहोपयोगी बहुसंख्य वस्तू स्त्रियांच्या निर्मितीच्या साक्षी होत. आणखीहि एका समाजशास्त्रज्ञाचें वचन उध्दृत करण्यासारखें आहे.

"Fortunately for Civilization, Woman in earlier stage was from the social standpoint rather more important (than man); since the family was moulded into a social' group through her influence. She developed her language and the home, multiplied the comforts of life through her ingenuity, and by her knowledge of edible vegitables. She supplied her family with foods, served as their physician in times of illness; and was even their interpreter in the mysteries of the supernatural..."[2]

समाजजीवनाचा केंद्रबिंदू 'स्त्री' होयः— ह्या विवेचनावरून ह्या अवस्थेंतील सांस्कृतिक जीवनाचा केंद्रबिंदू स्त्री हा कसा होता हें स्पष्ट

1 O.T. Mason : Woman's share in Primitive Culture.

2 James Quayta Dealey : "Family in its Sociological Aspect."

होईल. परंतु टोळ्याटोळ्यांत होणाऱ्या युद्धांत निसर्गाने लादलेल्या मातृत्वाच्या जबाबदारीनें स्त्रियांना दुय्यम स्थान स्वीकारावें लागलें असें दिसतें. युद्ध्यमान अवस्थेंत पुरुषाला तिच्या ठायींचें हें 'दौर्बल्य' अधिक प्रतिकूल वाटलें असेल. तसेंच गरोदरावस्थेंत व नंतर स्त्रियांना संरक्षणाची विशेष आवश्यकता आहे असें प्रत्ययास आल्यानंतर स्त्रीकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोण बदलला असला पाहिजे. त्याच्यापासून होणाऱ्या संततीचे फायदे जरी त्याला दिसत असले तरी द्याव्या लागणाऱ्या 'संरक्षणां'ची मानसिक प्रतिक्रिया बरीच गंमतीची झाली असली पाहिजे.[1]

ह्या समाजावस्थेंत स्त्रियांचें स्थान पुरुषांच्या बरोबरीचें आहे असें म्हणतां येईल. स्त्री व पुरुष ह्या दोघांच्याहि सांस्कृतिक जीवनाची पातळी कमालीची खाली आलेली असते, जीवनाचा प्रश्न अत्यंत बिकट असतो, युद्धाची व आक्रमणाची भीति नेहमींच असते. अशा अवस्थेंत टोळ्याटोळ्यांमधून वैमनस्याची भावना साहाजिक आहे. माणसास, जीवनाकडे सहानुभूतीने पाहावयास लावणारा 'धर्म' विचार निर्माण होण्यापूर्वीचा हा काल होय. युद्ध्यमान अवस्थेमध्यें आताच उल्लेखिल्या प्रमाणें स्त्रियांची 'अडगळ' वाटणें शक्य आहे. अर्थात् ह्या अवस्थेंतल्या स्त्रिया पण पुरुषाशी बरोबरीनें सहकार्यास तयार असल्याने व पुरुषांच्या ठायींहि त्यांच्याकडे हीनतेने पाहण्याची दृष्टि निर्माण झालेली नसल्याने

---

1 "It is obvious that while women were pregnant or nursing their children, they became physically handicapped in a society where agility, muscular strength and endurance were at a premium." Yet, just at the time when they were least able to hunt or fight, they would be making the special contribution, to the group without which it could not continue the gift of new life. It would therefore be necessary to protect the creature-necessary yet tiresome. It seems that... with necessity of protection first arose the element of contempt in men for women.-of that patronage which is bred from solicitude. — From "Women & Changing Civilization" by W. Holtby.

एक प्रकारची समानता संभवते. तथापि जीवनकलह इतका भेसूर असतो, ज्ञानाचें क्षितिज इतकें संकुचित असतें की, ही समानता केवळ आपापतः आलेली असते. तिचें महत्त्व कोणाच्या ध्यानांत येत नाहीं. आज तुलनात्मक रीतीनें पाहतां आपणास मात्र ती समानता मोलाची वाटते. या समानतेच्या अवस्थेलाच वन्यसाम्यवाद (प्रिमिटिव्ह कम्युनिझम्) असें संबोधण्याची पद्धति आहे.

संस्कृतिधारणेवर तिचा ठसा:— सामाजिक जीवनाची कल्पना प्रथम स्त्रीनेच प्रसृत केली असल्याने सामाजिक व्यवहाराचा केंद्रबिन्दू ती असणें संभवते. समाजाची एकंदर धारणा किती प्राथमिक असते ह्याचा उल्लेख आलेलाच आहे. विवाहसंस्था वा तत्सम व्यवहार सुरू होण्यापूर्वीचा हा काल. विवाहविषयक कल्पना कशा बदलत आलेल्या आहेत व पितृत्वाच्या महान् शोधाच्यापूर्वी एकंदर मानवी समाजाचें लैंगिक जीवन कसें होतें ह्याचें वर्णन रसेलच्या विवाह व नीतिविषयक ग्रंथांत आढळतें. पितृत्वाच्या प्रमुख अज्ञानामुळें मातृसावर्ण्य प्रस्थापित असणें अपरिहार्य ठरतें. कारण मातृत्व हें निसर्गसिद्ध व दृग्गोचर असल्याने समाजघटकाच्या धारणेंत त्यालाच प्रमुख स्थान मिळणें अपरिहार्य होतें. अशा समाजांत लैंगिक शिथिलता असल्याने सामाजिक नीतिनियमांचें स्वरूपहि अगदी प्रारंभिकच असणार. हिंदी लेखक पंडित राहुल सांकृत्यायन ह्यांच्या 'होल्गा ते गंगा' ह्या कथासंग्रहांत अशा अवस्थेंतील जीवन कसें असेल ह्याचें दिग्दर्शन होऊं शकतें. पितृत्वाच्या वास्तव स्वरूपाची जाणीव नसल्याने कशा विचित्र कल्पना प्रचलित असत ह्यांचीं विविध उदाहरणें सांपडतात. ड्यूरंटने एक मौजेचें उदाहरण दिलेलें आहे. ऑस्ट्रेलियांतील एका टोळींत असा समज रूढ आहे की, "बलोमा" नांवाचा कोणी तरी अज्ञात प्राणी स्त्री स्नान करीत असता तिला चावतो व त्यायोगेंच ती गरोदर होते. शिथिल चारित्र्य असणाऱ्या स्त्रीला हा 'बलोमा' अधिक त्रास देतो, अशी पण एक शक्कल लढविली आहे. मनुष्याला हें पितृत्वाचें कोडें उलगडण्यात किती प्रयास पडले, याची कल्पना रसेलच्या पुस्तकावरून येते. कित्येक जमातींना हें न कळल्यानें दीर्घकाल मातृसावर्ण्यच प्रचलित राहतें. पुढें सुसंस्कृत अवस्था आली तरी तें

तसेंच टिकून राहतें. आपल्याकडे मलबारांत अद्यापहि स्त्रीवंशपद्धति तुरळक प्रचारांत आहे.[1] एकेकाळीं ही पद्धति सर्वत्र रूढ होती असें जवळ जवळ सर्व मानसशास्त्रज्ञांचें मत आहे.

मातृसावर्ण्यः — स्त्रीच्या स्थानाच्या तपासणीच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा म्हणून ह्या अवस्थेकडे सम्यक्दृष्टीनें पाहणें निश्चितपणें उद्बोधक ठरेल. प्राथमिक साम्यवादाचा हा काल. विवाहसंस्थेचा जन्महि होण्याच्या पूर्वीचा हा टप्पा. कोणतेहि राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक...व्यापक जीवन नसल्याने आणि मनुष्य निसर्गाचा व स्वतःचाहि पण दास असल्याने कोणतीहि भरीव प्रगति होणें अशक्य होतें. अशाहि अवस्थेंत जर 'संस्कृती'चा आढावा घेऊं लागलों तर पुरुषांच्या नांवावर कोणकोणत्या गोष्टींचा 'शोध' लावण्याचें श्रेय देतां येईल हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. स्वतःच्या पितृत्वाचाहि पत्ता नसलेला असा पुरुष इतर बाबतींत कितीसा पुढें असणार? तथापि युद्धव्यापन अवस्थेच्या अपरिहार्यतेमुळे पुरुषाचा एकमेव गुण म्हणजे लढाऊ वृत्ति असें समजलें जाऊं लागलें. त्या वृत्तीच्या आधाराने मातृसावर्ण्य व्यवस्थेंतसुद्धा कुटुंबप्रमुखाचें काम पुरुषाला करावें लागे. म्हणजे कुटुंबांत (वा गटांत) वयाने जी श्रेष्ठ स्त्री असेल तिचा भाऊ तो कुटुंबप्रमुख. अर्थात कुटुंबांतील धाकट्या सर्व लोकांचा तो मामा. आपल्याकडेहि पितृसावर्ण्यापूर्वी मातृसावर्ण्य असावें असें दिसतें. महाभारतांत 'काका सापडत नाही पण मामा सापडतो' असें इरावतीबाई कर्वे म्हणतात.[2] आजहि उच्चवर्णीयांच्या व्रतबंध वा विवाहप्रसंगी बटूच्या वा वधूवरांच्या मागे उभे राहण्यासाठी 'मामा'ची जरुरी भासते. या चालीवरून 'मामा'चा मानसिक दबदबा किती खोल गेला आहे, ह्याची कल्पना येते. सासऱ्याला सुद्धा 'मामंजी' हें अभिधान आपल्याकडे सर्वदूर लावलें जात आहे हेंहि एक गमक देतां येईल. सोडमुंजीचे वेळीहि

---

१ बर्ट्रंड रसेल : मॅरेज व मॉरल्स अ. काणेकरकृत अनुवाद. पृ. १९ ड्यूरंट— Story of Civilization, ch. I
Mason : Woman's Share in Primitive Culture.

२ मराठी लोकांची संस्कृति; रसेल-नीति पृ. १७.

स्त्री आणि संस्कृति 29808 विः निबं
क्रमांक 9063 नोंः दिः 25/4/

मामा आपली कन्या मुलाला देण्याचे आमिष देतो, इ. गोष्टी पाहिल्या तर मातृसावर्ण्याचे धागेदोरे आपल्याहि समाजांत आपणांस दिसून येतात. याचाच अर्थ आपलाहि समाज ह्या अवस्थेंमधून गेलेला आहे असें दिसतें. तथापि ह्या कालानंतर 'कृषि-संस्कृती'चा कालखंड आला. त्यानें 'समाजां'त आमूलाग्र उलथापालथ घडवून आणली. त्या घडामोडीकडे लक्ष देणें जरूर आहे. तथापि त्या अवस्थेंत जाण्यापूर्वी काय परिस्थिति होती ह्याची खूणगांठ बांधून घेणें आवश्यक आहे.

कृषिवलावस्थेकडे : प्रमुख मूलगामी शोधः— वन्यसंस्कृतीच्या मानाने कृषि-संस्कृति हा खूपच पुढला टप्पा आहे. वन्यसंस्कृतींत माणसाची प्रगति फारच मंद होती. म्हणजे दहाहजार[1] वर्षांच्या अवधीनंतर त्याला दगडाचीं हत्यारें जरा बरीं करतां येऊं लागली. ह्या दृष्टीने पाहिलें तर कृषिवलावस्था ही विलक्षण प्रगतिशील अवस्था गणली पाहिजे. या अवस्थेंत येण्यापूर्वीं माणसाने आपल्या जीवनांत कांही महत्त्वाचे शोध लावून खूपच क्रांति घडवून आणली. मनुष्यास ह्या गोष्टी केव्हां व कशा कळल्या ह्यांचा उलगडा होणें हें केवळ अशक्य आहे. साधारणपणें असें गृहित धरावें लागतें की, शेतकीअवस्थेप्रत येईपर्यंत माणसाने जे शोध लावले होते त्यांत अग्नीची निर्मिती व उपयोग, गुरांना माणसाळणें व त्यांचें दूध काढणें, घरें बांधणें, घरें बांधण्याचा प्रयत्न व हत्यारांचा उपयोग महत्त्वाचे होत. हे कोणत्या क्रमाने लागले ते समजण्यास मार्ग नाहीं. पण साधारणपणें ह्या शोधांनी निसर्गावर बरेंच प्रभुत्व निर्माण केल्यानंतर माणसाने कृषिअवस्थेंत प्रवेश केला.

ही प्रक्रिया कसकशी होत गेली असेल हें पाहणें उद्बोधक आहे. उदाहरणार्थ अग्नीचा उपयोग जितक्या चटकन व व्यापक रीतीने आज आपण करतों तसा कांही प्राथमिक अवस्थेंतल्या माणसाला करतां आला नसेल, पण अग्नीचा उपयोग अन्न शिजविण्याचें कामी जेव्हां करावयाला तो शिकला असेल तेव्हां त्याला खूपच आनंद झाला असेल. वाटेल तीं फळें इ. उकडून खातां येऊं लागल्याने, व तीं अल्पसायास पचूं लागल्याने

---

१ आधार : Will Durant : " Story of Civilization. "

श्वापदांवरला ताण खूप कमी झाला असेल. त्याप्रमाणें प्राथमिक अवस्थेतला प्रमुख शत्रु म्हणजे अंधार. त्याच्यावर विजय मिळविण्यासहि अग्नीच कारणीभूत झाला व त्या अग्नीच्या उपकारांमुळे त्या मानवास अग्नि हाच परमेश्वर वाटला तर त्यांत नवल तें काय ?

अग्नीपेक्षां स्त्रियांच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचा शोध म्हणजे जनावरांना माणसाळवण्याचा. प्रथम एखादी मादी मारल्यानंतर तिचीं पिलें स्वतःच्या फायद्यासाठी सांभाळावीं असें सुचलें असेल व त्यांतूनच पुढे दुधाचा उपयोग करण्याची कल्पना निघाली असेल. स्त्रीच्या दृष्टीने हा फारच महत्त्वाचा ' शोध '. कारण लहान मूल जे दीर्घकाल अंगावर पीत असे तें आता पशूच्या दुधावर पोसणें शक्य झालें व त्या दृष्टीने पशूच्या मांसापेक्षां तिच्या दुधाची महति तिला अधिक वाटली असणें शक्य आहे. तिच्यावरचा भार कमी करणारा शोध म्हणून ह्या शोधाचें स्त्रीच्या जीवनाच्या दृष्टीने अधिक महत्व आहे.

पण या सर्वांत महत्त्वाचा शोध म्हणजे धान्याच्या लागवडीचा. हा शोध फारच महत्त्वाचा असल्याने ह्या शोधावर आधारलेल्या जीवनावस्थेलाच येथे कृषिसंस्कृति असें नांव दिलें आहे. मानवी संस्कृतीच्या साधनेंत हा टप्पा बराच महत्त्वाचा आहे. हा शोध क्रांतिकारक खराच. कारण त्याचें ह्या शोधाने जसें भौतिक जीवन बदललें तसें आंतरिकहि. त्याच्या मनाची ठेवण बदलावी अशी परिस्थिति निर्माण झाली. त्याच्या संवयी बदलल्या, आवडीनिवडी बदलल्या, दृष्टिकोण बदलला, थोडक्यांत त्याची येथपर्यंतची सांस्कृतिक धारणाच बदलली. धान्याची लागवड करण्याची कल्पनाहि प्रथम स्त्रीलाच सुचली असें ड्यूयंटचें मत आहे असा उल्लेख यापूर्वी आलाच आहे. रानांत इतस्ततः पडलेलें धान्य घरीं आणतांना तें रस्त्यांत सांडलें असेल, त्याच ठिकाणीं आलेल्या समान वनस्पतींपासून स्त्रीला धान्य पेरण्याची कल्पना प्रथम सुचली असेल असा त्याचा अंदाज आहे. शेतीच्या शोधाने माणूस ज्या नवनवीन गोष्टी शिकला त्यांच्या योगाने त्याच्या ठिकाणचा आत्मविश्वास वाढला, एक प्रकारच्या अहंमन्यतेचा उदय झाला. स्त्रीजीवनाच्या दृष्टीने मात्र ह्या सर्व प्रक्रियेचा परिणाम प्रतिकूल झाला. स्त्री–दास्याच्या कल्पनेचा उदय झाला.

कृषिवलावस्थेने वाढीला लावलेली विधायकता:— अग्नीच्या शोधानंतर शेतीच्या शोधाने माणसाच्या मागची भुकेची वणवण कमी केली. हंगामांत भरपूर धान्य आल्याने त्याच्या मागची टंचाईची भीति कमी झाली व सुखाचे चार क्षण त्याच्या आयुष्यांत प्रथमच निर्माण झाले; जीवनविषयक सुखाची प्रथमच कल्पना आली. आतापर्यंत त्याच्या कृती प्रामुख्याने निसर्गप्रेरित (इन्स्टिंग्टिव्ह) असत, त्या यापुढें अधिकाधिक हेतुपूरक (परपजिव्) होऊं लागल्या. यामुळेच त्याचा स्वतःच्यावरला विश्वास अतिशयच वाढला. शेतीपूर्वीचें खाद्य हें मांस स्वरूपाचें प्रायः असल्याने तें शक्यतों लवकर खपवून टाकण्याची जरुरी भासे. नाही तर तें कुजून नासून निरुपयोगी होण्याची भीति असे. शेतीमुळे आलेलें उत्पन्न मात्र दीर्घकाल टिकणें शक्य झालें, तें साठवून ठेवणें आवश्यक झालें. त्या दृष्टीने त्याचे यत्न सुरू झाले. भविष्यकालाच्या तरतुदीची शक्यता निर्माण झाली, कांही काल तरी निर्धास्तपणें (खाण्यापिण्याच्या-बाबतींत) राहतां येणें शक्य झालें. त्यामुळें इतर गोष्टींकडे, सृष्टिव्यवहारांकडे त्याचें लक्ष जाऊं लागलें. एकंदरीने माणसाच्या जीवनाच्या धारणेंत व त्यायोगें दृष्टिकोणांत आमुलाग्र बदल होण्याची क्रिमया कृषिविषयक शोधाने केली. आणि त्याच दृष्टीने माणसाने नव्या संस्कृति–अवस्थेंत प्रवेश केला की जिला ' कृषि–संस्कृति ' असें नांव देणें युक्त होईल.

शेतीच्या शोधाने मानवजातीने कांही उच्च गुणांची पण पैदास केली. सर्वांत पहिला व महत्त्वाचा कोणता गुण असेल तर तो म्हणजे चिकाटी. पूर्व अवस्थेंत पशू इ. ठार मारल्यावर ताबडतोब तो खाण्यास उपयोगी पडे. उलटपक्षीं, धान्य वाटविण्याच्या क्रियेंत बीं पेरल्यानंतर त्यापासून नवें धान्य हातांत पडेपर्यंत २।४ महिने तरी लागत. हा जो ' वाट पहाण्यास ' लावण्याचा काल आहे त्यानेच माणसास चिकाटीचें महत्त्व शिकविलें. कारण या कालांत जरी उत्पन्न मिळत नसलें तरी पुढे केव्हां तरी निश्चितपणें मिळणार ह्या आशेनें परिस्थितिनुरूप कांहीतरी कष्ट करावेच लागत ह्या सर्व क्रियेची मानसिक धारणेवर जी प्रक्रिया झाली, ती एकंदरीने पुढील विकासास पोषक झाली. शेतीनंतर माणसास ' घरा 'ची जरुरी भासली; त्यांत वेळ घालविण्यास स्थैर्यहि लाभलें.

सर्वांच्या सहकार्यांची निकड भासूं लागली. हत्येचें एकंदर प्रमाण कमी झालें व तिच्या शिवायहि जीवन जगतां येणें शक्य झाल्याने जीवनाची विधायकता प्रत्ययास यावी वा वाढीला लागावी अशी परिस्थिति निर्माण झाली. त्यामुळेंच म्हणजे शेतीच्या अनुषंगानेच प्रेम, दया, सहानुभूति इ. कोमल भावनांचा त्याच्या अंतरंगांत उद्भव झाला. थोडक्यांत आज आपण सत्प्रवृत्त माणसाची कल्पना करतो तो मानव ही शेतीची क्रिया आहे असें म्हणतां येईल.

हे (अग्नीचा उपयोग, घरें बांधणें, गुरें माणसाळवणें इत्यादि) जे शोध मनुष्याने लावले ते शेतीच्या अवस्थेंत येण्यापूर्वी वा येत असतांना. कारण कृषिवलावस्था ही सर्वच दृष्टींनी चांगली वाटली, तिने वर निर्दिष्ट केलेल्या गुणांची परिवृद्धि व्हावी अशी परिस्थिति निर्माण केली तरीहि पण ही गुणांची पैदास मानवजातीने विशिष्ट अवस्थेंत आल्यानंतरच केली आहे. शेतीचें क्षेत्र प्रारंभीं संकुचित होतें. चांगल्या जमीनीच्या शोधांत त्याला खूप काल राहावें लागलें आहे. जेव्हां जगांतील प्रसिद्ध व मोठ्या नद्यांच्या खोऱ्यांत माणसाने प्रवेश केला तेव्हांच शेतीच्या व्यवसायाला खरें महत्त्व प्राप्त झालें, व त्यानंतरच खरी विधायक गुणसंपदा निर्माण झाली आहे. मोठ्या नद्यांच्या जागीं स्थायिक झाल्यानंतरच कृषिसंस्कृतीच्या विविध दर्शनांस * मूर्त स्वरूप आलें. ह्या गुणांबरोबरच माणसाचे ठायीं प्रगतीला पोषक नसणाऱ्या कांही अवगुणांचाहि प्रादुर्भाव शेती अवस्थेबरोबर निर्माण झाला. व तो म्हणजे 'दैववाद.' शेती ही प्रामुख्यानें नद्यांच्या व मेघांच्या पाण्यावर अवलंबून असल्यानें ह्या दोन निसर्गशक्तींच्या हातांतलें खेळणें मनुष्य बनला. ह्या शक्तींवर प्रभुत्व मिळवावें ही गोष्ट शक्य कोटींतली (कल्पनेच्या दृष्टीनेहि) नव्हती तेथपावेतों हा दैववादाचा पगडा मानवी मनावर जबरदस्त होता. कृषि अवस्थेंत तर समाजजीवनाचें तो एक महत्त्वाचें अंग होऊन बसला होता. शेती व्यवसायावर आधारलेलें जीवन हें पूर्व अवस्थेशी तुलना करतांना कसें नवें होतें व शेतीने नवी संस्कृति कशी निर्माण केली हें येथपर्यंतच्या विवेचनावरून स्पष्ट होईल. विशेषतः शेतीने जी मानसिक घडण घडविली आहे ती

* 'साहित्य आणि संस्कृति' पृ. ७, ८.

सांस्कृतिक इतिहासांत फार महत्त्वाची आहे. 'दैववाद' हा आज जरी प्रतिग्रामी असला तरी ह्या अवस्थेंत तो तसा* नव्हता. कारण निसर्गशक्तींवर सत्ता प्रस्थापित करण्याची शक्यता नसल्याने त्या शक्तींची 'उपासना' करणें हेंच शक्य होतें. असो. शेतीअवस्थेनंतर स्त्रीकडे व स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा माणसाचा दृष्टिकोन बदलला. तो आमूलाग्र बदलला जावा या गोष्टीचीं बीजें कृषिअवस्थेंत कशीं होतीं हें विवेचन थोडें विस्तृतपणें केलें.

पितृत्वाच्या जाणिवेचें ज्ञान व त्याचे दूरगामी परिणाम:—ह्या कृषिसंस्कृतीकडे स्त्रीजीवनाच्या प्रगतीच्या दृष्टीने पाहिलें तर मात्र भलतीच निराशा पदरांत घ्यावी लागते. यार्चे कारण शेतीने ही जशी प्रगति झाली तशी आणखी एक घडामोड घडून आली व ती म्हणजे पुरुष व स्त्री यांचे संबंध कोणते असावे ह्याबद्दल एक प्रकारचा विवाद निर्माण झाला. त्याबरोबर एक प्रकारची सुप्त स्पर्धाच सुरू झाली असें म्हणतां येईल. त्या स्पर्धेंत या खेपेस पुरुषाने विजय मिळविला ही एकप्रकारची मोठी प्रक्रिया आहे. तेव्ह तिचें स्वरूप थोड्या खोलांत शिरून लक्षांत घेणें जरूर आहे.

याच कालांत जसे सामाजिक ज्ञानाचे दृष्टीने निरनिराळ्या गोष्टींचे शोध लागले तसाच आणखी एक महत्त्वाचा शोध लागला. पुरुषाला तो-वेळपावेतों अज्ञात असलेली त्याच्या स्वतःसंबंधीची एक मोठी गोष्ट कळून आली व ती म्हणजे स्त्रीला होत असलेल्या मुलांचे जन्मदाते आपण आहोतें ही होय. या विचाराने त्याच्या जीवनांत—जीवनविषयक दृष्टिकोनांत-आमूलाग्र अशी क्रांति झालेली असणें शक्य आहे. नव्हे, ती तशी झालेली आहे. इतर शोधांनी त्याच्या ठायींची जी आत्मविश्वासाची वा स्वत्वाची भावना वाढीस लागत होती त्या जाणिवेला ह्या नव्या जाणिवेने एक नवीनच धार आली. 'अहं'त्वाचा साक्षात्कार पुरुषांत प्रथमच झाला. मग प्रत्येक गोष्टीवर आपल्या वैशिष्ट्याचा शिक्का उठवावा अशी ओढ त्याला लागणें कांही अशक्य नव्हतें. ह्यांतूनच मातृसावर्ण्याऐवजीं पितृसावर्ण्य सर्वत्र रूढ करण्याचा यत्न पुरुषाने केला.

---

* संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुति : सरदार

त्यांत त्याला अपूर्व असें यशहि प्राप्त झालें. ह्याच कारणाने कृषिपूर्व संस्कृति ही जर स्त्री–प्रधान संस्कृति असेल–तशी ती आहे असें आपणांस आढळून आलें आहे. तर कृषिसंस्कृति ही निश्चितपणें पुरुष–प्रधानच नव्हे तर पुरुष-वर्चस्व–प्रधान संस्कृति आहे असें म्हणावें लागेल.

कार्यकक्षा रेखीव झाल्या:—कृषिअवस्थेंत प्रवेश केल्यानंतर निरनिराळ्या सुखसोयींच्या वा शोधांच्या आधारें मानवसमाजाची जी नव्याने वसाव्रस झाली, तींत स्त्रीचा दर्जा काय राहिला हें पाहणें आवश्यक आहे. गुरें पाळण्याच्या कल्पनेने तिच्या जीवनांत कसा बदल झाला याचें वर्णन मागे आलें आहेच. शेतीच्या अनुषंगाने जो नवा जीवनक्रम समाजांत रूढ होऊं लागला, त्याचें वैशिष्ट्य असें की, स्त्रीच्या कर्तृत्वाचें क्षेत्र संकुचित होऊं लागलें. शेतीच्या पूर्वी तिला घराबाहेर बरीच कामें असत, पण शेतीने जी समृद्धि आणली तिचें स्वरूप बरेंच स्थायी असल्याने तिला नवसमृद्ध घराची व्यवस्था लावण्याचें काम बरेंच पडूं लागलें. त्या कामाचीच व्याप्ति मोठी झाली. शेतीमुळे स्त्री व पुरुष यांच्या कार्यकक्षा अधिक रेखीव झाल्या. त्याबरोबर समाजसंस्था पण कांही आहे वा असावी, असें प्रत्ययास येऊं लागलें. या समाजसंस्थेंत स्त्रीचा भाग कोणता असा पण शोध झाला. व त्याचें पर्यवसान स्त्रीचें कार्यक्षेत्र गृहव्यवस्थेपुरतें मर्यादित झालें, ती गृहिणी झाली.

तें तसें करण्यास निसर्गानेहि पुरुषाला मदत केली ! कारण निसर्गाने प्रजोत्पादनाचें कार्य स्त्रियांनाच दिलें. घराच्या व्यवस्थेंत संततीचें संगोपन हें प्रामुख्याने येऊं लागलें व तें पुरुषांवर लादणें कोणासच शक्य नव्हतें. नव्या शोधांनी व शेतीने पुरुषाचें सामर्थ्य अमर्याद वाढलें होतें. त्याचा अहंभाव वाढत होता. आपल्या मालमत्तेप्रमाणे संततीहि 'आपली' असावी, असा त्याचा आग्रह असणें अगदी शक्य होतें व त्याचा परिणाम असा झाला कीं, लैंगिक व्यवहारांत एक प्रकारची शिस्त आली. आतापर्यंतची त्या क्षेत्रांतली शिथिलता भंग पावली. ही 'शिस्त' पुरुषाने स्वतःच्या दृष्टीने लावली असल्याने ह्या शिस्तपालनांत त्याने स्वतःकडे कमींत कमी जबाबदारी व स्वतःवर कमींत कमी बंधनें लादून घेणें अपरिहार्य होतें. अशा प्रकारें कृषिअवस्थेंत मानवी समाजाची एकंदरीने प्रगति

झाली असें म्हणतां आलें तरी स्त्रीच्या दृष्टीने पाहतां ही 'प्रगति' तिला पोषक झाली असें म्हणतां येणार नाहीं. थोडक्यांत म्हणजे तिचें कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' असेंच झालें. तिच्या जीवनाला अधिक एकटेपणा येऊं लागला.

पितृसावर्ण्याचे परिणाम:— ही एक व्यापक स्वरूपाची प्रक्रिया होती. त्यामुळे तींत देवाण घेवाण स्वरूपाचा भाग असणें शक्य आहे. पुरुषाने समाजांत स्त्रीच्या स्थानाला असा धक्का लावला, तें गृहापुरतें मर्यादित केलें, त्याची भरपायी एका निराळ्या तऱ्हेने केली गेली. तिचें कार्यक्षेत्र मर्यादित झाल्याने तिच्यावरला संतत्युत्पादनाचा भार अधिक वाढला. कारण शेतीमुळे कष्ट करण्याला माणसांची चणचण भासूं लागली. ती दूर करणें केवळ स्त्रियांनाच शक्य होतें. पुरुषाचा समाजांतील दर्जा त्याला किती औरस संतति आहे यावर ठरूं लागला.[1] या सर्वांचा परिणाम स्त्रीजीवनावर प्रतिकूल झाला. तथापि पुरुषांनी स्त्रीने कुरकूर करूं नये म्हणून तिला प्रेमाची, वात्सल्याची, विनयाची मूर्ति केलें. ती सौंदर्य-मूर्ति पण झाली. ती जेथे रमेल तेथे देवतांना वास्तव्य करणें आवडतें असें पण त्यांना वाटूं लागलें. पुरुषांच्या दृष्टीने तिचे शुद्धशीलत्व व पातिव्रत्य हे गुण अतीव महत्त्वाचे गणले जाऊं लागले.[2]

पितृसावर्ण्य हें पुरुषाने वर्चस्व भावनेने निर्माण केलें तरी तें द्वेष भावनेने केलें नाहीं, हें ह्या गुणांच्या यादीवरून स्पष्ट होईल. नव्या सांस्कृतिक अवस्थेबरोबर जें नवें जीवन आलें त्याचा तो एक अटळ परिणाम होता. नवीन गरजांतून नव्यानव्या समाजसंस्था निर्माण होऊं लागल्या होत्या, त्यांचा उपयोग पितृसावर्ण्य पक्कें करण्यांत-होण्यांत झाला. शुद्ध सामाजिक दृष्टीने पहातां वन्यजीवनांतून नागरजीवन-वा ग्रामजीवन-उत्क्रांत होत होतें. समाजांतलें कर्तृत्व, शक्ति, बुद्धि, यांना नवें आवाहन पोहोंचलें होतें. ह्यांच्या वापराच्या आधाराने नवा समाज

---

१ आधार 'रसेल नीति' पृ. ३७. 'अष्टपुत्रा' या आशीर्वादामागे हीच मनोवृत्ति आहे.

२ आधार: Feminine Character मधील वा मनु. इ. तील वचनें ह्या वस्तुस्थितीची साक्ष देतात.

अवयवबद्ध होत होता. आजपर्यंतचा टोळींतला प्रमुख हा जसजसा नागरजीवनाचा प्रमुख होऊं लागला तसतसें त्याच्या कर्तृत्वाचें, सत्तेचें क्षेत्र, व्यापक होऊं लागलें. नुसती पाशवी शक्ति ही उपयोगाची ठरेना. त्यासाठीं बौद्धिक, मानसिक इ. शक्तींचीहि आवश्यकता होती. हा समाज 'राजसंस्थे'साठी चाचपडत होता; धडपडत होता. त्यासाठीं त्याची वाटचाल चालू होती. शेवटीं ह्या समाजाला 'राजा' सापडला. तो सापडल्याबरोबर ह्या समाजाने आपलें सर्व जीवित त्याच्या ठायीं समर्पण केलें, जीवननिष्ठा ह्याहि पण त्याच्याच ठायीं केंद्रित झाल्या. अर्थात् हा राजा बराच सामर्थ्यशाली झाला. लोकांना त्याची वैचारिकदृष्ट्या आवश्यकता होती, तशी सुरक्षिततेच्या दृष्टीनेहि होती. ह्या प्रक्रियेंतून मानवी इतिहासांत 'मालमत्ता' ही संस्था अस्तित्वांत आली. ह्या मालमत्तेंत स्त्रियांचा पण समावेश होऊं लागला ! मालमत्तेविषयीं अभिलाषा निर्माण होण्याचें कारण म्हणजे 'मालमत्ता' या संज्ञेस प्राप्त होईल अशा गोष्टी वा वस्तू माणसास उपलब्ध होऊं लागल्या. त्यांची पैदास वाढूं लागली हें होय. ह्या मालमत्तेच्या नाण्याची दुसरी बाजू म्हणजे मालकी हक्क. मालकी हक्काच्या जाणिवेने मानवी मनास नवी प्रेरणा मिळाली आहे; कर्तृत्वास नवें आवाहन मिळालें आहे. या मालमत्तेचें वा मालकी हक्कांचें स्वरूप जों पावेतों स्थावर–जंगम होतें तों पावेतों सर्व ठीक होतें. तथापि संपत्ति ही प्रामुख्याने मानवी कष्टांतून निर्माण होते ही गोष्ट ह्या लोकांच्या चांगली परिचयाची होती. सहाजिकच जिंदगींत स्थावर–जंगम वा गुरांढोरां-प्रमाणें बुद्धीचें देणें असलेले कांहीं मानवहि असावेत असेंहि जागृत मनास वाटलें व त्यांतून 'गुलामगिरी' ह्या सामाजिक संस्थेचा उदय झाला. स्त्रीच्या स्थानावर ह्या नव्या संस्थेचा परिणाम खोल झाला आहे.

गुलामगिरीचें आगमन नि अपरिहार्यता:– सामाजिक जीवनाच्या उत्क्रांतीबरोबर स्त्रियांचें स्थान कसकसें बदलत आलें हें ह्या ठिकाणीं पहावयाचें आहे. हें स्थान ठरण्यांत मुख्यत: मालमत्ता, मालकीहक्क, गुलामगिरी ह्या संस्थांचा स्त्री-जीवनावर खोलवर परिणाम झाला आहे व म्हणूनच हें विवेचन येथें आवश्यक वाटलें. सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने त्या अवस्थेंत गुलामगिरी ही अत्यावश्यक होती व अपरिहार्यहि होती.

अत्यावश्यक असावयाचें कारण–म्हणजे शेतीच्या एकंदर क्रियेंत विविध प्रकारचीं कष्टाचीं व किचकट कामें (नांगरणें, निंदणें, खुरपणें इ.) करावीं लागतात, हें होय. तीं स्वखुषीने कोणी करील हें फारसें शक्य नव्हतें. त्यासाठीं विशिष्ट प्रमाणांत दंडशक्ति वा सक्ति वापरली जाणें अपरिहार्य होतें. तसें झालें नसतें तर मानवी प्रगतीच अशक्य झाली असती. अपरिहार्य म्हणावयाचें कारण म्हणजे गुलामगिरी ही तावेदारी आहे, वाईट आहे, हें कळण्याइतकें वा लक्षांत येण्याइतकें मानवी मनच प्रगत झालें नव्हतें, हें होय. गुलामगिरीचा निषेध हा व्यक्तिस्वातंत्र्याच्या भूमिकेवरूनच करतां येतो, व्यक्तिस्वातंत्र्य हा विचार कृषि–संस्कृति–अवस्थेंत निर्माणच झाला नाहीं. त्यामुळें कृषि–संस्कृतीच्या कालांत सर्व जगांत ह्या ना त्या स्वरूपाची गुलामगिरी अस्तित्वांत होतीच.

तथापि केवळ सक्तीच्या जोरावर मोठीं कामें होतात असें नव्हे. मनुष्य हा प्रेरणावादी प्राणी आहे. तेव्हां कोणतीहि गोष्ट करण्यास त्याला सक्ति केली जाण्यापेक्षा प्रेरणेस आवाहन केलें तर तें काम बिनतक्रार होतें. व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार जरी तत्कालीन मानवास सुचला नसेल तरी त्याचें काम कोणत्यातरी प्रेरणांनी चालू होतें. नव्या जीवनानुसार नवी व्यवस्था अपरिहार्य कशी आहे, सर्वांना सुखदायी कशी आहे, हें पटवून देऊन ती व्यवस्था टिकवून धरणें आवश्यक कसें आहे व तेंच आपलें कर्तव्य कसें आहे हें सर्वसाधारण समाजास पटवून देणारा व त्यांना प्रेरणा देणारा वर्गहि समाजांत निर्माण होत होता. सर्व साधारण माणसाची मनोवृत्ति पण जरा पलीकडे पहावें अशी होती. कारण शेतीचें शांतता-प्रधान जीवन त्याच्याहि पण अंगीं पडत होतें. अशा दुहेरी आवश्यकतेंतून प्राथमिक अवस्थेंतील समाजाचें नियमन करणारी प्राथमिक अवस्थेंतील 'धर्म' संस्था निर्माण झाली.

'कुटुंब' व 'राज्य' संस्थांचा उदयः—अशा प्रकारें पितृसावर्ण्य, मालमत्ता, मालकीहक्क, गुलामगिरी, धर्म ह्या संस्था समाजजीवनांत स्थानापन्न होत होत्या, ह्याच अवस्थेंत मनुष्याला स्वास्थ्य व स्थैर्य प्राप्त झालें. त्यामुळें ह्या संस्थांचें स्वरूप अधिक रेखीव व अवयवबद्ध होऊं लागलें. शेतीचें क्षेत्र जसजसें विस्तृत होत गेलें तसतसा संपत्तीचा प्रावह

जोरांत सुरू झाला. आणखी अनेक संस्थांची निर्मिति होऊं लागली. समाजजीवन अधिक संबद्ध, गुंतागुंतीचें होऊं लागलें. ह्या व्यवस्थेचा कर्ता 'पुरुष' होता. त्यामुळे व निसर्गतःच त्यांना फटिंगपणें वागतां येणें शक्य होतें. टोळीची व्याप्ति जसजशी व्यापक होत गेली तसतशी तिची एकता नष्ट होऊं लागली. तिचे आणखी विभाग होऊं लागले. त्या विभागांचे संबंध वेगळे होऊं लागले. विभागाचें प्रमुखत्व शेवटी कोणातरी एका कर्तबगार 'पुरुषा'कडे आलें. त्याला आपलें संस्करण अधिक दृढ व्हावें असें वाटूं लागलें. यांतून **कुटुंब संस्था** निर्माण झाली. अशा अनेक कुटुंबांचे परस्पर संबंध नियंत्रित करण्यासाठीं पण राजा ह्या संस्थेचा उपयोग झाला. राज्य साकार झालें. कृषिसंस्कृतीचीं कुटुंब व राजा ही चार महत्त्वाचीं अशीं समाजअंगें आहेत. प्राथमिक गट वा टोळीवजा समाजजीवनांतून राजा व कुटुंब ह्या संस्था निर्माण होण्याच्या कालापर्यंत मानव समाजाची जी वाटचाल आहे ती महत्त्वाची आहे. कृषि-पूर्व जीवनाचें केंद्र गट होतें. कृषिउत्तर कालांत तें केंद्र द्विविभागित झालें. राजा (वा राज्य) हे मोठें व कुटुंब हें छोटें अशीं दोन अंगें प्रस्थापित झालीं.

भारतीय समाजविकास त्याच रीतीनें:—मानवी समाजाची प्रगति ही सामान्यतः ह्याच टप्प्याटप्प्यांनी झाली असें दिसतें. आपल्याकडील उदाहरण घेतलें तरी आपली एकंदर संस्कृतिपरंपरा ह्या सर्व क्रियेस अपवादभूत आहे असें म्हणतां येत नाहीं. आपल्याकडील रामायण महाभारताच्या थोडें पूर्वीपासूनचा काल हा कृषि-संस्कृतीच्या अवस्थेचा काल. ह्या कालापूर्वी आर्यलोक गंगासिंधूपर्यंत आले नव्हते. गंगा, सिंधु यांच्या खोऱ्यांतच त्यांना स्थैर्य लाभलें व तेथेंच कृषिसंस्कृतीला विशिष्ट घाट येईल असें जीवन अवतीर्ण झालें. वैदिक काल हा कृषिपूर्व अवस्थेतील दिसतो. म्हणजे कृषीचा शोध लागलेला होता, पण अद्याप संपन्न नद्यांचीं खोरीं सांपडलीं नव्हतीं. वैदिक कालीन सामाजिक जीवनाचें केंद्र (युनिट) गोत्र हें दिसतें. निरनिराळे ऋषी निरनिराळ्या गोत्रांचें आहेत. गोत्र ह्या शब्दाचा अर्थ व संकेत हा छोटीशी शेतीची वसाहत[१]

---

१ आळतेकर : Position of Woman, under Hindu Civilization.

असाच घेतां येतो. पुढे उपनिषद्‌कालीं दोन संस्कृतींचा संधिकाल झाला. त्यांतून पुढे स्थैर्यशील अशी कृषि–संस्कृति बद्धमूल झाली. गोत्रांचें महत्त्व कमी झालें; 'कुला'चे महत्त्व वाढलें. मोठमोठे राजपुरुष श्रेष्ठ गोत्रांतले म्हणून न गणले जातां विशिष्ट कुलांतले म्हणून गणले जाऊं लागले. समाजधारणेच्या अनुषंगाने जीवनधारणेंत हा जो फरक पडलेला दिसतो तो नव्या अवस्थेचा द्योतक होय. थोडक्यांत पूर्वी जें 'गणगोता'ला महत्त्व होतें तें 'कुलशीला'ला आलें. पाश्चिमात्य समाजाच्या प्रगतीचा रोखहि सामान्यतः असाच दिसतो.[1]

कुलाचें हें महत्त्व कृषिसंस्कृतीच्या कालांत महत्त्वाचें आहे. राम हा रविकुलोत्पन्न म्हणून प्रसिद्ध. कृष्णाचाहि प्रकार तसाच आहे. कुलाचें महत्त्व हें प्रायः समाजाचें विविध प्रकारचें कर्तृत्व विविध दिशांनी वाढीला लागावें या दृष्टीने प्रस्थापित झालें होतें. व त्यांत अयोग्य असें (त्या कालाच्या दृष्टीने) फारसें कांही नव्हते. तथापि कुटुंबाच्या बरोबर आणि राजसंस्थेबरोबर एक नवी नीति जन्मास आली. ती नीति मात्र पूर्वकालीन संस्कृती–अवस्थेपासून पूर्णपणें भिन्न होती. ती तयार करण्यांत प्रामुख्यानें पुरुषाचा भाग होता हें ध्यानांत घेणें आवश्यक आहे.

कृषिसंस्कृतींत कुटुंबाचें स्थान व कार्य:— कुटुंबसंस्था ही कृषिसंस्कृतींत सामाजिक जीवनांत अत्यंत महत्त्वाची अशी संस्था आहे. आजच्या समाजव्यवस्थेंत जें व्यक्तित्वाला स्थान आहे तें कृषि–संस्कृतींत कुटुंबाला आहे. समाजजीवनांत तिला आर्थिक, राजकीय सांस्कृतिक, वैचारिक, इ. सर्व दृष्टींनी एकप्रकारचें घटकत्व प्राप्त झालें होतें. समाजव्यवस्थेंत कुटुंब हा एक स्वयंपूर्ण अवयव (यूनिट) म्हणून गणला गेला. राजा व्यक्तीकडून कर इ. वसूल न करतां कुटुंबाकडून करी.[2] ह्यावरून आर्थिक व्यवस्थेंत तिला स्थान होतें हें स्पष्ट आहे. इनाम इ. स्थावर मिळकत ही व्यक्तीला मिळण्याऐवजी कुटुंबाला मिळे. सरकारी कामगारांची

---

१ कालिदासाची शकुंतला 'दुष्यंताला कोणत्या कुलांतले आपण' इ. प्रश्न विचारते. असे अनेक उल्लेख प्राचीन वाङ्मयांतून दाखवून देतां येतील.

२ पेशवाईच्या सांवलींत.

तरतूद ही सुद्धा वंशपरंपरागत असे. असे निरानिराळ्या (पाटील, कुलकर्णी, देशमुख, जागले, वेसकर इ.) वतनांवरून स्पष्ट दिसतें. यावरून समाज-जीवनांत तिला (कुटुंब–कुलसंस्थेला) मानाचें स्थान होतें असें स्पष्ट होतें. काव्य–नाटकांतून व्यक्तीचे उद्गार पाहिले तरी हेंच आढळतें. व्यक्तिही अमुक गोष्ट चांगली किंवा वाईट हें ठरविण्यांत कुलाचा विचार करी. 'माझ्या कुलाला ही गोष्ट भूषणावह वा दूषणावह आहे म्हणून ती मी करतो वा तिचा त्याग करतो' अशी भाषा व्यक्तींच्या मुखांतून बाहेर पडे.[1] ह्यावरून वैचारिक निष्ठांच्या क्षेत्रांत कुटुंबसंस्थेला किती मानाचें स्थान होतें हें स्पष्टपणें कळून येतें. आजहि आपल्यांत 'कुलदीपक' 'कुलकलंक' हे शब्द ह्या संस्थेमागलें सांस्कृतिक अधिष्ठान सूचित करतात.

समाजाच्या वा संस्कृतीच्या दृष्टीने हें होणें एकापरीने पाहतां अपरिहार्यच होतें. व्यक्तीच्या कर्तृत्वाची परंपरा सतत अखंड राहील अशी योजना वा व्यवस्था ह्या समाजव्यवस्थेंत नव्हतीच. ती परंपरा टिकविण्याचे दृष्टीने वंशपरंपरागतत्वाचा अवलंब समाजाच्या विविध क्षेत्रांत व्हावा हें एका दृष्टीने योग्यच झालें. कुटुंब–संस्थेच्या आधारें खरोखर कृषिसंस्कृतींत राज्य, ज्ञान, कला, कसब, इ. विविध कर्तृत्वशाखांत प्रगति होऊं शकली. सहाजिकच राजानंतर कुटुंबाच्याच ठायीं सर्व निष्ठा केंद्रित व्हाव्यात हें अपरिहार्य होतें.

कृषिसंस्कृति जों जों बद्धमूल झाली तों तों ही अवस्थाहि अधिकाधिक काटेकोर होत गेली. शेवटीं असा परिणाम झाला कीं, ती परमेश्वर प्रणितच वाटूं लागली.[2] जीवनांतली गतिशीलता नष्ट झाल्याने हें सारें अटळ होतें.

अशा गतिशून्य अवस्थेंत माणसाने शतकानुशतकें काढलीं आहेत. कोणताहि बदल न करतां वर्षानुवर्षें सुखानें व समाधानानें कालक्रमणा करतां येणें शक्य झालें. ही सर्व शेतीची किमया होती. ह्या सर्व

---

१ प्राचीन संस्कृत कवींच्या काव्यांतून असे उल्लेख कितीतरी आढळून येतात.

२ "चातुर्वर्ण्यं मया सृष्टं" हे उद्गार या दृष्टीने सूचक आहेत.

गोष्टींचा परिणाम मानवी मनावर असा झाला कीं तें कमालीचें गतानुगतिक वा परंपरावादी बनलें. नवीन गोष्टींकडे साशंकतेनें पहाण्याची वृत्ति त्याचे ठायीं निर्माण झाली. नाविन्याची ओढ ही नव्या संस्कृतीची द्योतक आहे. प्राचीन संस्कृतीचा एकमेव संदेश म्हणजे 'सनातनत्व' होय.[1] धर्मांचें मोठेंपणसुद्धा 'एषः धर्मः सनातनः' असा सनातनत्वाचा आधार घेऊन होऊं लागलें.

राजकीय आकांक्षांसाठीं माणसांतल्या मातबर वा समर्थ लोकांनी राजेपण मिळविलें. पण तेंहि कुलाच्याच नांवावर. हे निरनिराळे राजे प्रत्यक्षांत आपापसांत लढलेहि. पण सामान्यतः समाजाची धारणा ही अशीच राहिली. तिच्यांत महत्त्वाचा फरक (वैचारिकदृष्ट्या) १६ व्या शतकापर्यंत होऊं शकला नाहीं.

स्त्रीच्या स्थानाची पाहणीः— ह्या सर्व समाजव्यवस्थेंत स्त्रियांचें स्थान कोणतें असेल हें पाहणें बरेंच उद्बोधक आहे. कुटुंब, पितृसावर्ण्य, ह्यांनी स्त्रीजीवनावर फार खोल परिणाम केले आहेत. तथापि कृषिसंस्कृतीच्या पहिल्या अवस्थेंत स्त्रियांच्या स्थानाला धक्का बसला नाहीं. समाजांतलें त्यांचें स्थान व अधिकार पूर्वकालांत होते तसेंच राहिले असें दिसतें. वेदकालांत सुलभा, लोपामुद्रा, गार्गी, मैत्रेयी, घोषा, वाचक्नवी इ. स्त्रिया विदूषी म्हणून गाजल्या. ह्यावरून स्त्रियांना सर्व समाजांत व व्यवहारांत पुरुषांच्या बरोबरीनें मान व स्थान असे.[2] वैदिक कालाशीं सांस्कृतिक साम्य असलेल्या इजिप्त-संस्कृतीच्या बाबतींतहि आपणांस हीच गोष्ट आढळते. तेथेहि स्त्रियांना पुरुषाबरोबरचें स्थान होतें. तथापि पुढें फरक फार झपाट्यानें पडत चालला. स्त्री व पुरुष यांच्यांतली समानता नष्ट झाली. पुरुष हा 'कुलप्रमुख' असे. त्याला सामाजिक, राजकीय हक्क असत. मान सन्मान मिळे. कुटुंबांत मात्र त्याची सत्ता अप्रतिहत असे. कुटुंबांतला तो राजाच. अशा परिस्थितींत त्याच्याशिवाय कर्तबगार पुरुष निघाला तर त्यानें नशिब

---

१ सावरकर 'यंत्रः शाप की वरदान' या लेखांत हा विचार विस्तारानें मांडला आहे.

२ 'स्त्रीजीवनविषयक प्रश्न' टिळक पृ. ३. तसेंच "Feminine Character" च्या एका प्रकरणांतहि हा विचार आला आहे.

काढावें, वेगळें व्हावें. म्हणजे तेथे त्याला सार्वभौमत्वाचे अधिकार मिळत. पण कर्तबगार स्त्रीला तसा वाव ठेवणें एकंदरीत धोक्याचें वाटलें असावें, कारण समाजधारणा पुरुषप्रधान होत होती. नीति पण त्यांनीच ठरविली. तेव्हां अशा परिस्थितींत अशा स्त्रीचें 'कुल' वा 'कुटुंब' हें समाजमान्य कसें ठरविणार ? कारण समाजाचा ओढा पितृसावर्ण्य प्रस्थापित करण्याकडे होता. त्यांचें कर्तृत्वक्षेत्र हें अधिक मर्यादित करण्यांत आलें; त्यामुळे स्त्री व पुरुष यांतलें अंतर अधिकच वाढलें. केवळ वंशवृद्धीला आवश्यक म्हणून तिच्या संबंध जीवनाकडे पाहिलें जाऊं लागलें. कुटुंबधारणा ही पुरुषानुसार होऊं लागल्याने व कुटुंबप्रमुख पुरुषालाच विविध अधिकार असल्याने स्त्रीला कोणत्याहि प्रकारचे अधिकार शिल्लक राहिले नाहींत. तिचें जीवन केवळ कवडीमोलाचें झालें.[1] कुलप्रमुखाची इतर कुटुंबियांवर किती विविध प्रकारची सत्ता चाले ह्याचें उत्कृष्ट गमक म्हणजे महाभारतांतील धर्मराज होय. स्वतः द्युतांत हरल्यानंतरहि त्याची कुटुंबियांवरली सत्ता अबाधित राहिली. कोणीहि त्याला विरोध करूं शकलें नाहीं. द्रौपदीने मात्र तो (विरोध) करण्याचा यत्न केला, तिने अत्यंत मार्मिक असे प्रश्न भीष्म, द्रोण, कृप इ. आचार्यांना विचारले; त्यांच्या निर्णयानुसार वागण्याची तयारीहि दर्शविली. पण कोणीहि समाधानकारक उत्तर देऊं शकला नाहीं. ह्यावरून महाभारतकालीं व्यक्ति या नात्याने स्त्रीचें जीवन कोणत्या पातळीवर होतें ह्याची कल्पना येते.

स्त्रीदास्य बद्धमूल झालें:— ह्यावरून मागें कृषिसंस्कृतींत स्त्रियांच्या नशिबीं दास्य कसें आलें ह्याची कल्पना येऊं शकेल. स्त्रियांचें क्षेत्र पूर्णपणें घर हेंच ठरलें गेलें. "चूल व मूल" ह्याच त्यांच्या कर्तबगारीच्या कक्षा आंखल्या गेल्या.[2] त्यांना कोणत्याहि प्रकारचे हक्क नाहींत ह्याची कोणासहि खंत वाटली नाही. व्यक्तिस्वातंत्र्याचा उदय झाला नव्हता अशा कालांत ती वाटणेंहि अशक्य होतें. स्त्रियांची खरेदी विक्री सर्रास सर्वत्र होत असे. पेशवाईंत तर ती राजरोसपणें होई.[3] इंग्लंडमध्येहि ती पद्धति १८१५ पर्यंत रुढ होती असें दिसतें. त्यावर्षी एका पुरुषाने आपली

१ '— न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' — मनु.
2 Woman and Civilization by E. M. White P. 21
३ पेशवाईच्या सांवलींत : चापेकर.

पत्नी दुसऱ्यास विकत दिली व खरेदी-खत करून दिलें. तें आजहि पाहावयास मिळतें.[1] यावरून सर्व जगांतच कृषिकालांत स्त्रियांचें स्थान कनिष्टपणाचें होतें असें स्पष्ट दिसतें.

स्त्रीपुरुषांच्या जीवनध्येयांतहि भिन्नता आली:— स्त्रीपुरुष यांचें जीवन कृषिसंस्कृति अवस्थेंत कसें बदललें व त्यांचे परस्पर संबंध हे बदलून त्यांत उच्चनीचत्वाच्या भावनेचा कसा उद्भव झाला हें पाहिलें. ह्या सर्व घडामोडींचा दोघांच्याहि जीविनविषयक ध्येयांवर कसा परिणाम झाला हें पाहणें आवश्यक आहे. त्याखेरीज कृषि-संस्कृतींतील स्त्री जीवनाचे दिग्दर्शन पूर्ण होणार नाहीं. स्त्री व पुरुष यांच्या कार्यकक्षा जशा परस्परांपासून अलग झाल्या तशी जीवनध्येयेंहि पण. पुरुषांच्या कर्तृत्वास विशाल क्षेत्र उपलब्ध झालें, त्यासाठीं धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे "पुरुषार्थ" पण उपलब्ध झाले. राजनिष्ठा व कुल-परंपरेबावतची अतीव निष्ठा ह्या पुरुषाच्या जीवननिष्ठा ठरल्या गेल्या. अशा रीतीने पुरुषाच्या कर्तृत्वाचे क्षेत्र किती व्यापक राहिलें ह्याची कल्पना येते. स्त्रियांचें कार्यक्षेत्र संकुचित झालें. त्यामुळे अर्थात त्यांना येवढीं व्यापक जीवनध्येयें उपलब्ध राहण्याचें कारण नव्हतें. म्हणून पुरुषांनी त्यांच्यासाठी व स्त्रियांनी प्राप्त परिस्थितींत दुसरा मार्गच उपलब्ध नव्हता म्हणून असेल, स्वत:साठी 'पातिव्रत्य' हें जीवनध्येय मुक्रर केलें. स्त्रीच्या सर्व बौद्धिक, आत्मिक, अध्यात्मिक आकांक्षा कोठे विलीन व्हावयाच्या असतील तर त्या एकाच गोष्टींत—पातिव्रत्यांत. पातिव्रत्य हें कृषिप्रधान संस्कृतींत स्त्रियांसाठीं निर्माण झालेलें जीवनध्येय आहे. कृषि-संस्कृति कालांतल्या स्त्रियांनी आपल्यापुढे कोणता आदर्श ठेवला असेल तर तो म्हणजे 'आदर्श पतिव्रता' होण्याचा होय. ह्या ध्येयाप्रत जाणारीं अहल्या, द्रौपदी, सीता, तारादि स्त्रीरत्नें हीं स्त्रियांना व पुरुषांनाहि 'प्रातःस्मरणीय' व 'वंद्य ठरली' आहेत. ह्या पातिव्रत्याचीं स्तुतिस्तोत्रें आजपर्यंत गाइलीं गेलींत. पण ज्या समाजव्यवस्थेंत तें निर्माण झालें त्या समाजरचनेची धारणा कशा प्रकारची होती, हें ह्या विवेचनावरून स्पष्ट व्हावें. सीता, सावित्री आदि 'पतिव्रता' स्त्रिया ह्या आजपर्यंत भारतीय

1 Feminine Character.

स्त्रीचा आदर्श होत्या. जोपर्यंत व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेचा उदय झाला नव्हता, तोपर्यंत तो आदर्श तसाच राहिला. पण व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेबरोबर मात्र ह्या आदर्शास तडा गेलेला आहे असें आढळून येईल. पातिव्रत्याच्या कल्पनेविषयी या ठिकाणी प्रतिकूल लिहावयाचे नाही, पण कृषिसंस्कृतींत स्त्रीजीवनावर जें पद्धतशीर आक्रमण होत होतें त्याचें पर्यवसान शेवटीं 'पातिव्रत्य' हें केवळ स्त्रियांनीच अवलंबावें असें जीवितमूल्य निर्माण होण्यांत झालें हीच गोष्ट लक्षांत घ्यावयाची आहे. अर्थात् तें पुरुषांनी लादलें का स्त्रियांनी स्वीकारलें हा महत्त्वाचा मुद्दा नाही. कृषिसंस्कृतीअवस्थेंत असलेल्या जवळजवळ सर्व समाजांत हें असेंच घडलें गेलें आहे. इंग्लंडमध्येहि हेंच झालें, स्त्री व पुरुष यांचीं जीवनध्येयें एका वाक्यांत एका ठिकाणीं उध्दृत केलीं आहेत. He for God, She for God in him. [1] त्यांतून मध्यवर्ति आशय व्यक्त होतो तो असाच आहे.

पातिव्रत्याचा उगम पितृसावर्ण्याबाबतच्या आग्रहांत व मालकी-हक्काच्या कल्पनेंत आहे हें स्पष्ट आहे. ह्याच कल्पनेची दुसरी एक विशेषत: आजच्या कल्पनेप्रमाणे अत्यंत (हीन) उपहासास्पद परिणति म्हणजे 'सती' त्वाची चाल ही होय. सतीच्या चालीने स्त्रियांवर किती विविध प्रकारचे अन्याय झाले आहेत हें कल्पनेने जाणणें केवळ अशक्य आहे. जीवितावर अधिक सत्ता मिळविण्याचे दुसरे कोणतेहि मार्ग सतीच्या पद्धतीपुढें एकदम थिटे पडतात!! सतीची चाल विशेषत्वाने भारतांतच प्रचलित होती.

थोडी तुलनात्मक पाहणी:— कृषि–पूर्व–संस्कृति कालांत जी स्त्री सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या पुरुषांच्या 'पुढें' होती, कृषिसंस्कृतीच्या पूर्व कालांत जिनें पुरुषांच्या बरोबरीने कर्तबगारी केली, तीच स्त्री कृषि-संस्कृतीच्या उत्तर कालांत दास्यत्वाच्या अवस्थेप्रत कशी आली, ह्याचा उलगडा ह्या विवेचनाने होईल. जगांतील सर्वच समाजांत कोणत्या ना कोणत्या कालांत स्त्रियांना दास्यांत रहावें लागलें असें दिसतें. आपणाकडे मात्र त्याची परमावधि झाली. त्यांना वेदश्रवणासारखे साधे

1 Milton's "Paradise Lost."

शिक्षणाचे अधिकार राहिले नाहीत. कोणत्याहि जीवनध्येयांत वाव ठेवला गेला नाही. येवढेंच नव्हे तर स्थावर, जंगम व स्वकष्टार्जित मिळकतीवरहि त्यांचा कोणत्याहि प्रकारचा हक्क ठेविला नाहीं. त्यांना स्वातंत्र्यास अपात्र ठरविलें.[1] अध्यात्मिक जीवनांतहि त्यांची अडचण भासूं लागली. मुमूक्षूंना तर केवळ त्या दुर्गुणांच्या, लोभ–मोहाच्या पुतळ्या दिसल्या. अशा प्रकारें कृषिसंस्कृतीच्या सुदीर्घ अशा काल-खंडांत स्त्रियांची विटंबना फटफट मात्र झाली ! !

स्त्रीविशिष्ट सद्गुणांचा बडिवार:— अर्थात हें सगळें होत असतांना त्यांच्यावर एके ठिकाणीं वर उल्लेखिल्याप्रमाणें पुरुषांनी विशिष्ट गुणांची पण खैरात केली. कविकुलगुरु कालिदास गृहिणीला 'सचिवः सखी मिथः प्रियशिष्या '...इ. संबोधतो. स्त्रिया कवींच्या दृष्टीनें सौंदर्य मार्दव, सौकुमार्य, लीनता, शील, प्रेम ह्यांच्या पुतळ्या बनल्या. स्त्रीच्या स्वभावाचें अवलोकन करावयाचें म्हणजे हे विविध गुण तिच्या ठायीं कसे आहेत हें पाहणें एवढेंच ठरलें. हे सर्व गुण 'लादतांना' स्वतःकडे कोणताहि कमीपणा येत नाहीं अशी काळजी पुरुषांनी घेतली. कारण 'पातिव्रत्य' ह्या जीवन–मूल्याला हे सारे गुण पोषकच आहेत. ह्या गुणांबरोबरच तिच्या ठायींच्या मातृत्वाचा इतका उदोउदो करण्यांत आला कीं, तो ऐकून तिचें भान हरपून जावें, व आपल्यावरील सर्व अन्यायाचा तिला विसर पडावा. सौंदर्य, मार्दव, इ. गुणांच्या बाबतींत व्हायोला क्लीन ह्या लेखिकेनें आपल्या 'फेमिनिन कॅरेक्टर' ह्या ग्रंथांत मोठें उद्बोधक वर्णन केलें आहे. समाजांत स्त्री व पुरुष यांपैकीं ज्याचें वर्चस्व ('डॉमिनंट सेक्स') असेल तो घटक, दुसऱ्या लिंगाच्या व्यक्तींच्या ठायीं या गुणांची खैरात करतो. असें निरनिराळ्या काळांतील निरनिराळ्या ऐतिहासिक आधारांनीं स्पष्ट केलें. म्हणजे हे सारे गुण जर स्त्री–प्रधान समाज असला तर त्या समाजांतल्या स्त्रिया पुरुषांवर लादतात–अगदी सौंदर्य, मार्दव सुद्धा.[2] स्त्रीच्या मातृत्वाप्रमाणें त्याहि पुरुषाच्या ठायींच्या

---

१ न स्त्री स्वातंत्र्यमर्हति.

2 Feminine Character, chapter XII "The Dominent Sex."

पुरुषत्वाची अमाप स्तुति करतात. ह्यावरून ह्या गुणांत 'वस्तुनिष्ठ सत्य' किती असावें ह्याची कल्पना येईल.

अशाप्रकारच्या दास्यांत मानवजातीनें (स्त्रियांनी विशेषतः) बराच काल कंठला असल्यानें ह्या सर्व परिस्थितीचा परिणाम त्यांच्या (स्त्रियांच्या) मनोधारणेवरहि कांहीं झालेला असणें शक्य आहे. ही गोष्ट दृष्टीआड करणें बरोबर होणार नाहीं. कृषि-संस्कृतींत स्त्रीदास्याचा जो जन्म झाला, त्याचीं बीजें कशीं पेरलीं गेलीं, उत्पत्ति, वाढ, व पर्यवसान कसें झालें हें या विवेचनावरून स्पष्ट व्हावें. ब्रिटिश पूर्व कालांत आपल्या देशांतील स्त्रिया या अवस्थेंत होत्या. येवढेंच नव्हे तर व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचारांचा उदय झाला नसता तर या जीवननिष्ठांत कांहीं चूक आहे असें कोणास वाटलेंहि नसतें. व खरोखरी तसें झालेलेंहि आहे. नाहीतर सतीच्या रूढीची चिकित्सा पूर्वीच झाली असती.

कृषि-संस्कृतींतील स्त्रीपुरुषहक्कमीमांसाः— कृषिसंस्कृतीच्या कालखंडांत स्त्री व पुरुष यांचे परस्पर संबंध कसे होते हें पाहिलें कीं एक गोष्ट लक्षांत आल्याविना राहात नाहीं व ती म्हणजे स्त्री व पुरुष ह्यांच्यांत निरनिराळ्या तऱ्हांनी निर्माण झालेलें अंतर ही होय. या अंतराचा एक भाग असा की पुरुषाचें जीवन व्यापक होतें, विविध सामाजिक व्यवहारांत तो पुढे असे, स्त्री मात्र ह्या दृष्टीने मागें मागें राहिली. सामाजिक हक्क–कर्तव्यांच्या परिभाषेंत असें म्हणतां येईल कीं, कालसापेक्ष असे जे व्यक्तित्वाचे वा नागरिकत्वाचे अधिकार होते ते सर्व पुरुषाला उपलब्ध होते. (आता गुलामगिरीसारख्या संस्थेच्या अस्तित्वामुळें कांही पुरुषहि त्यांना मुकले होते हा भाग वेगळा.) पण सामान्यतः, पुरुषाला ते उपलब्ध होते असें म्हणणें अयोग्य होणार नाहीं. स्त्रीला मात्र कृषिसंस्कृतींत व्यक्तित्वाचे व नागरिकत्वाचे कोणतेच महत्वाचे अधिकार नव्हते. त्यामुळे पुढे समाजांत जेव्हां व्यक्तिस्वातंत्र्यासारखा नवा विचार आला तेव्हां पुरुषांमधला एक तरी गट हा व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचाराचें स्वागत करण्यास पुढे आला. त्यांच्या व्यक्तित्वाच्या कक्षा तितक्या तरी रुंदावलेल्या होत्या. स्त्रियांच्या बाबतींत तर तशीहि परिस्थिति नव्हती. सारा स्त्रीवर्गच समाज–प्रगतीच्या अगदी खालच्या पायरीवर होता. पुरुष हा व्यक्ति

म्हणून तरी ओळखला जाई. स्त्रीला तर तसेंहि ओळखलें जात नव्हतें.[1] तेव्हा पुरुषांना नवकल्पनेप्रमाणे व्यक्तिस्वातंत्र्याच्या पायावर उभें राहून नागरीक हक्कांसाठी भांडावयाचें होतें. समाजांत घटकत्वाचें स्थान मिळविणें हा एक भाग, व हा टप्पा गाठल्यानंतर वा ही गोष्ट पदरांत पडल्यानंतर नागरिकत्वाच्या हक्कांसाठी झगडणें हा दुसरा भाग. या दोनहि प्रकारचे, लढे स्त्रियांना एकसमयावच्छेदेंकरून द्यावयाचे होते. त्यामुळे त्यांचा झगडा हा सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने अधिक नेत्रदीपक व स्पृहणीय असा झाला आहे. निसर्गाने पक्षपात करून त्यांची बाजू आणखी उभी करून ठेविली होती. या तीनहि प्रकारच्या अडचणींना तोंड देऊन स्त्रियांनी प्रगति केली आहे. आज सामान्यतः सर्व जगभर स्त्री व पुरुष समान भूमिकेवर उभे आहेत. कार्यक्षेत्रें व जीवन-मूल्यें यांत स्त्री व पुरुष यांत समानता असावी असा विचार सर्वत्र रुढ झालेला आहे. कांही राष्ट्रांत कदाचित् ह्या दृष्टीने परिस्थिति भिन्न असेल पण, आजचे 'मानवी' हक्क हे दोघांनाहि उपलब्ध आहेत. जगाच्या इतिहासांत हा लढा गेल्या २।३ शतकें चालू आहे. आपणाकडे ती परिस्थिति म्हणजे ह्या नव्या स्वरूपाच्या झगड्याला सुरवात-ब्रिटिश राजवटीबरोबर झाली. ब्रिटिश राजवट संपतांना त्याहि झगड्याचें एक मोठें पर्व संपलें असें म्हणतां येईल. स्त्री व पुरुष यांच्यांत कृषिसंस्कृतींत असलेलें अंतर कमी होऊन दोघेहि समान भूमिकेवर येण्याची जी प्रक्रिया आहे ती बरीच संमिश्र आहे. तिच्या विविध अवस्थांचें परिशीलन स्त्रीप्रगतीचे दृष्टीने येथें करावयाचें आहे.

कृषिपूर्व अवस्थेशी तुलना:— कृषिसंस्कृतींत स्त्रियांना विविध प्रकारचें दास्य कसें आलें, याचें विवेचन केलें. ही दास्याची अवस्था जवळ जवळ अठराव्या शतकापर्यंत टिकली.-आपल्याकडे ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत टिकली. पुढें पुढें मात्र स्त्री-पुरुष-संबंध ताणले जाऊं लागले, त्यांच्यांत एक प्रकारचा विरोध होऊं लागला. ह्या विरोधाचीं बीजें बाह्य घटनांमध्यें व त्यांनीं बदललेल्या जीवनांत होतीं. त्यांचें परिशीलन करणें आवश्यक आहे.

---

१ विज्ञानप्रणीत समाजरचना पृ. ७२. 'अभिरुचि' दिवाळी अंक १९४८. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा लेख.

पुढील सांस्कृतिक अवस्थेकडे वळण्यापूर्वी कृषिपूर्व कालांतील स्त्री-जीवन व तिचें समाजांत वा कुटुंबांत स्थान आणि कृषि–उत्तर अवस्थेंत तिचें स्थान ह्यांतील फरक ध्यानांत घेणें आवश्यक आहे. कृषि–पूर्व संस्कृति ही पूर्णपणें स्त्रीप्रधान संस्कृति म्हणतां आली तर कृषि–संस्कृति ही पूर्णपणें पुरुष–प्रधान संस्कृति होय. पहिल्या संस्कृतींत स्त्री सार्वभौम होती. दुसऱ्या अवस्थेंत ती साधी दासी झाली. सर्वच क्षेत्रांत पुरुष पुढे आला व त्या सर्वच क्षेत्रांतून स्त्री निवृत्त झाली. ही एक मोठी सामाजिक प्रक्रिया होती. सांस्कृतिक अवस्थेच्या दृष्टीने हें सारें अपरिहार्य वा कदाचित् समर्थनीयसुद्धा असूं शकेल. तसें समर्थन सर्वच गोष्टींचें (सामाजिकदृष्ट्या हीनतर रूढीचेंहि) करतां येईल. पण समर्थनाच्या वा खंडणाच्या भूमिकेपेक्षां शुद्ध ऐतिहासिक दृष्टीने पाहाणी करून वस्तुस्थितीचें दर्शन घेणें वा घडविणें हीच महत्त्वाची भूमिका असते. तीच या ठिकाणीं स्वीकारली आहे. त्या भूमिकेवरून पाहतां हें विवेचन सामान्यतः मतभेदातीत आहे असें मान्य होण्यास प्रत्यवाय नसावा.

अंधार युगांतून पलीकडे:— कृषिसंस्कृति जगांत पंधराव्या शतकापर्यंत टिकली. शेवटीं शेवटीं तर जीवन इतकें गतिहीन झालें की निरनिराळ्या प्रकारचें अज्ञान, दैन्य, यांनी तें व्यापून गेलें. समाजाचें सर्वच वर्ग अशा रीतीनें थोड्या फार अज्ञानी अवस्थेंत रहात होते. ह्या अज्ञानामुळें व जीवनाच्या गतिहीनतेमुळें ह्या कालास (कृषिसंस्कृतीच्या उत्तर कालास) अंधार युगें म्हणण्याची पद्धति आहे, अर्थात वास्तव अर्थानें ह्या कालखंडास मध्य युगें म्हटलें जातें. पण मध्ययुग व मागासलेपण हे दोन्ही शब्द समान अर्थानें रूढ झाले आहेत. या मध्य–युगांतून खरें सांगावयाचें तर ज्ञानाचा सुप्त प्रवाह वाहात होता.[1] निरनिराळे लोक विज्ञानशास्त्रांत प्रगति व्हावी म्हणून प्रयत्न करीत होते. नवनवे विचार समाजांतील विचारवंत लोकांना सुचत होते, पण एकंदरीने प्रगतीचा शोध सुप्तच होता. तथापि ह्या सर्व जीवनधारणेचा शेवट व्हावा, तिला जबरदस्त धक्का बसावा अशी परिस्थिति निर्माण झाली.

---

1 Woman and Civilization P. 22.

नव संस्कृतीची दिशा ठरविणारे नवे शोधः—कृषि अवस्थेंत प्रवेश करण्यापूर्वी ज्याप्रमाणें अग्नि निर्माण करणें, गुरांना माणसाळवणें, त्यांचें दूध काढणें, घरें बांधणें, धान्य पेरणें, इ. महत्त्वाचे शोध मनुष्याला लागले. त्या शोधांनी ज्याप्रमाणें नवीन संस्कृतीला अभिमत असणारें जीवन घडविलें. तसाच प्रकार ह्याहि पण काळांत झाला. मानवी जीवनांत परत आमूलाग्र क्रांति होईल असें कांही महत्त्वाचे शोध चौदाव्या पंधराव्या शतकांचे सुमारास लागले. त्यांत प्रमुख म्हणजे, होकायंत्राचा, गुरुत्वाकर्षणाचा, बंदुकीच्या दारूचा, मुद्रणाचा, वाफेच्या उपयोगाचा इ. इ. होत. ह्या शोधांनी नवें जीवन निर्माण केलें. आपल्या दृष्टिकोणाप्रमाणें विज्ञानसाधनेचीं बीजें ह्या शोधांत आहेत असें दिसतें. तेव्हां ह्या शोधांनी माणसास एका नव्याच सांस्कृतिक अवस्थेंत आणून सोडलें ह्या बद्दल दुमत होईल असें वाटत नाही. ह्या सांस्कृतिक अवस्थेचें मुख्य लक्षण उद्योग आहे. मध्ययुगीन आळसटपणा, निष्क्रियपणा निरनिराळ्या कारणांमुळें त्याला त्याज्य वाटला व विविधप्रकारच्या उद्योगशीलतेवर आधारलेली नवी संस्कृति अस्तित्वांत आली की जिला आपण उद्योग-संस्कृति म्हणूं या. समाजाची भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक वैचारिक धारणा बदलावी अशी परिस्थिति निर्माण झाली.

जीवनांत येऊं घातलेली गतिशीलताः— शेतीच्या शोधाने ज्याप्रमाणें प्रचंड प्रमाणांत (तत्पूर्व अवस्थेशीं तूलना करतां) सामाजिक उलथापालथ झाली यापेक्षा किती तरी अधिक प्रमाणांत प्रचंड स्वरूपाचे फेरफार ह्या नव्या शोधांनीं घडवून आणले. माणसाच्या भौतिक जीवनांत क्रांतिकारक सुधारणा, सुखसोयी होऊं लागल्या. आजपर्यंत मनुष्यप्राणी म्हणजे पंचमहाभूतांच्या हातांतलें एक खेळणें बनला होता. माणसाचें दुर्बलत्व येवढें होतें की, त्याला ह्या पंचमहाभूतांचें हें वर्चस्व कधी कमी करतां येईल असें वाटलें नव्हतें. वर उल्लेखिलेल्या व त्यासारख्या कांहीं शोधांनी हें मानसिक दडपण कमी करतां येणें शक्य आहे याची कल्पना आली. विज्ञानाची आराधना व त्याच्या आधारावर विविध सुखसोयी निर्माण करून ऐहिक जीवनांत सुख व समाधान निर्माण होईल असे यत्न सुरू झाले. त्या आधारें ऐहिक जीवनाबद्दल एक प्रकारची आस्था

निर्माण झाली. कृषिप्रधान संस्कृतीच्या कालांत ऐहिक जीवनांत कांही मोठा फरक करून तें सुखी करतां येणें शक्य आहे, अशी कल्पनाच माणसास सुचली नाही, इतका तो दुर्बल होता. ह्या नव्या शोधांनी ऐहिक जीवन सुधारणें शक्य आहे असें प्रत्ययास आल्यानें त्या जीवनाकडे कृषि-संस्कृतीच्या कालांत ज्या तिरस्काराने पाहिलें जात असें तो तिरस्कार कायम राहाण्याचें कांहींच प्रयोजन राहिलें नाही. ऐहिक जीवनाकडे पाहण्याचा हा नवा दृष्टिकोण आला आहे. त्याचे मानवी जीवनावर सामाजिक सांस्कृतिक, वैचारिक.....असे विविध प्रकारचे परिणाम झाले आहेत. त्याची जीवनधारणा, विचारधारणा बदलली तशी जीवनाच्या मूल्यांत पण क्रांतिकारक फरक झाला. कृषिसंस्कृतीपेक्षां वेगळ्या व तिला पूर्णपणें अपरिचित अनोळखी असणाऱ्या अशा नवीन कळा मानवी अंतःकरणाला लागल्या. ह्या त्याच्या जीवनांतील क्रांतिकारक फरकामुळें स्त्रियांच्या समाजांतील स्थानावर व स्त्री व पुरुष यांच्या समाजांतर्गत संबंधावरहि फार खोलवर परिणाम झाले. मानवी जीवनाबरोबर स्त्रियांच्या जीवनेतिहासाचें एक नवें संघर्षपूर्ण असें पर्व सरूं झालें. गतकालीन जीवन-संस्कृति इ. बद्दल निरनिराळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया होऊं लागल्या, त्यांतून नव्या विचारसरणी निर्माण झाल्या. त्यांचें स्वरूप पाहिलें असतां स्त्रीजीवनावर त्यांचे परिमाण कसे झाले हें विशद होऊं शकेल. कृषिप्रधान संस्कृतीच्या पलीकडे जाऊन उद्योगप्रधानतेवर आधारलेली नवी सांस्कृतिक-अवस्था सुरू झाली. 'उद्योग संस्कृति' हा शब्द प्रयोग 'इन्डास्ट्रियल सिव्हिलिझेशन' ह्या अर्थानें सामान्यतः वापरला जातो. या ठिकाणीं त्याची योजना बऱ्याच व्यापक अर्थानें केली आहे.

बदललेला दृष्टिकोण : बुद्धिवादाचा उगम—नव्या शोधांनी जी परिस्थिती निर्माण झाली तिचा परिणाम मुख्यतः मनुष्यांच्या जीवन-विषयक दृष्टिकोणावर झाला. त्यांत ऐहिक जीवनाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोण बदलला, त्याच्याकडे तिरस्कारानें पाहण्याची त्याची वृत्ति बदलली हा उल्लेख वर आलेलाच आहे. या दृष्टिकोणाचे वैचारिक क्षेत्रावर दोन, तीन परिणाम झाले. राजकीय विचारसंपदेवरहि पहिला परिणाम असा की, माणसाच्या अंतःकरणांत जी धर्मविषयक व परमेश्वर

विषयक असीम श्रद्धा होती तिला जबरदस्त धक्का बसला. धर्मग्रंथांतून लिहिलेलें ज्ञान हें परमेश्वरानें स्वतः लिहिलें आहे व म्हणून तें खरें आहे असें माणसें आतापर्यंत मानीत होतीं. ह्या त्यांच्या समजुतीला इतका धक्का बसला कीं, धर्माकडे यापुढे जरा साशंकतेनें पाहण्याची वृत्ति निर्माण झाली. अर्थात धर्मग्रंथांत लिहिलेलें खोटें आहे, तें टाकलें पाहिजे इतकी मजल या पहिल्या अवस्थेंत आली नाहीं, तरी पण माणसाच्या मनावर अध्यात्मिक जीवनाचा जो ठसा बसविला होता तो मात्र पूर्णपणें पुसटला जाऊं लागला.

दुसरा परिणाम असा की, हें सर्व भौतिक जग एक प्रकारच्या कार्य-कारण संबंधाने परस्परांशी निगडित झालें आहे. हें कार्य-कारण स्वरूप शोधून काढणें जरूर आहे असें माणसांना वाटूं लागलें. विज्ञानाच्या प्रगतीचीं बीजें ह्या वाटूं लागण्यांत आहेत हें लक्षांत यावयास वेळ लागणार नाही. ह्या कार्यकारणांचें स्वरूप जर यथातथ्य रीतीने पारखावयाचे असेल तर आपली वा मानवी बुद्धि ही प्रमाण मानली पाहिजे. म्हणजे धर्म-ग्रंथांत ज्या गोष्टी केवळ श्रद्धेने खऱ्या मानाव्या लागतात तशी कोणतीहि गोष्ट (ज्ञानक्षेत्रांत) श्रद्धेवर आधारलेली नसावी, हा विचार फार मोठा आहे. गेल्या कांही शतकांत मोठमोठ्या माणसांचीं मनें ह्या विचाराने विलक्षण भारून गेलीं होतीं. धर्म म्हणजे ज्ञान असें पूर्वीचें समीकरण होतें तें जाऊन धर्म म्हणजे अज्ञान असा नवा पर्याय सर्वरूढ होऊं लागला. ह्या अज्ञानांतून बाहेर काढण्याचें कार्य विज्ञान-साधनेने करावयास हवें असा फार मोठा विचार सर्वसंमत होऊं लागला. वैचारिक क्षेत्रांत ह्याच विचारास बुद्धिवाद म्हणतां येईल. ह्या बुद्धिवादाचा उगम झाल्या-वर धर्मक्षेत्रांत व जीवनांत तोंपावेतों अतिशय महत्त्वाचा गणला जाणारा अध्यात्मवाद वा आत्मवाद हा झपाट्यानें मागे पडत चालला. मानवी जीवनांतल्या मूल्यविषयक प्रगतीच्या दृष्टीने हा बदल महत्त्वाचा आहे. चिकित्सक वृत्तीची वाढ व धर्मभावनेचा ओसर हीं एकाच नाण्याचीं दोन अंगें होत. जेव्हां ज्ञानाच्या क्षेत्रापलीकडे जाऊन समाजरचनेकडे ह्या नव्या दृष्टीनें माणसें पाहूं लागलीं तेव्हां तेथेहि पण त्यांना कित्येक अनिष्ट गोष्टी आढळून येऊं लागल्या, त्याहि गोष्टींविरुद्ध लढा द्यावयास हवा असें पण

त्यांना वाटावयाला लागलें. राजकीय क्षेत्रांत या विचारसरणीचें एक एक प्रतिबिंब म्हणजे राजाविषयींच्या आदरभावनेस धक्का बसला हें होय. म्हणजे आतापर्यंत माणसांची अशी समजूत होती की, राजा हा परमेश्वरी अंश आहे,[1] व त्या दृष्टीनें धर्मावरहि त्याचीच सत्ता असावी ह्या ठाम समजुतीस तडा गेला. धर्मसत्ता व राजसत्ता ह्यांचा परस्पर विरोध आला व त्यांत राजसत्ता विजयी झाली हें ह्या विचारसरणीचें एक यश होय.

ऐहिक जीवनाकडे आस्थेनें पाहिलें जाऊं लागलें:—अशा प्रकारें आधुनिक कालांतील संघर्षमय जीविताची जी परंपरा सुरू झाली तिचा पहिला परिपाक म्हणजे धर्मसत्ता व राजसत्ता यांमध्यें सार्वभौमत्वाबद्दल झालेला झगडा होय. त्यांत राजसत्तेचा विजय झाला हें समजण्यासारखें आहे. तथापि ऐहिक जीवनाकडे जेव्हां आस्थेनें लोक पाहूं लागले तेव्हां त्यांना तें कमालीचें दरिद्री दिसलें. त्याला समृद्ध करण्याची शक्ति राजसत्तेंत आहे हेंहि पण माणसांना पटूं लागलें. पण राजा या संस्थेकडे पाहतां ती ही जबाबदारी पार पाडील असें वाटेना व म्हणून राजसत्तेविरुद्ध जोराचा झगडा आहे. त्याचे अधिकार कमी कमी होण्याची क्रिया सुरूं झाली. ह्या क्रियेंतून लोकसत्तेच्या विचारांचा उदय होऊन ते वाढीला लागले.

धर्मग्रंथाची व राजाची सार्वभौमता मानवी मनावरून नष्ट झाली. राजकीय व सामाजिक क्षेत्रांत त्याचा परिणाम असा झाला की, व्यक्ति व तिचें स्वातंत्र्य हीं फार महत्त्वाचीं अंगें आहेत; राजा व धर्म ह्यांनी तिला आजपावेतों अध्यात्मिक व राजकीय दास्यांत ठेविलें होतें; तें दास्य प्रथम नष्ट झालें पाहिजे हा विचार वाढूं लागला. धर्माच्या कल्पनेबाबत जरी माणसाचा भ्रमनिरास झाला होता, तरी त्याचें मनावर दडपण जबरदस्त होतें व त्यामुळें धर्मसुधारणेची व अनुषंगाने समाजसुधारणेची चळवळ सुरूं झाली, वाढूं लागली. ऐहिक जीवनाकडे आस्थेनें पाहूं लागल्यावर व्यक्तिकडे तिच्या जीवनाकडे लक्ष जावें हें अगदी साहजिक होतें. अशा प्रकारें कृषिसंस्कृतींत महत्त्व पावलेल्या निष्ठाहि बदलूं लागल्या.

व्यक्तिस्वातंत्र्यादि नवमूल्यांचा उदय:—मानवी जीवनविषयक मूल्यांत फरक होत होत माणसें व्यक्ति हें अंतिम मूल्य आहे असें मानूं

१ 'ना विष्णु: पृथ्वीपति:, किंवा Divine Right of King.

लागलीं. तिचें स्वातंत्र्य हें अपरिमित महत्त्वाचें गणलें जाऊं लागलें. परंतु समाजांत विशिष्ट राजकीय परिस्थितींत ह्या व्यक्तीला कोणतेंहि स्वातंत्र्य नव्हतें. तें देण्यासाठी तिच्या हक्कांचा विचार माणसांना महत्त्वाचा वाटला. व व्यक्तीच्या सामाजिक हक्कांसाठी चळवळ होऊन शेवटीं समता, स्वातंत्र्य, बंधुभाव ह्या गोष्टींना मानवी जीवनांत मोलाचें स्थान प्राप्त झालें. आधुनिक संस्कृतीने हीं नवीं मूल्यें प्रमाण मानलीं.

आधुनिक कालांत प्रारंभीं नवनवे यांत्रिक स्वरूपाचे शोध लागून मानवी जीवनाची भौतिक धारणा बदलली. तिच्या बरोबर वैचारिक व मूल्य-विषयक दृष्टिकोणहि बदलला व व्यक्तीच्या हक्कांच्या जाणिवेचा उदय होऊन नवीं मूल्यें निर्माण झालीं. ह्या अवस्थेपर्यंतचें ओझरतें दिग्दर्शन आतापावेतों केलें. आधुनिक कालांतील स्त्रीजीवनाचा विचार करतांनाहि वरील सर्व घडा-मोडींकडे लक्ष देणें भाग आहे. ही एक प्रदीर्घ व गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. दोन, तीन शतकें ही प्रक्रिया प्रामुख्याने प्रथम युरोपांत सुरू झाली. प्रारंभिक वैज्ञानिक शोध १५ व्या शतकांत लागले व १७७९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या सुमारास व्यक्ति-स्वातंत्र्य विषयक विचारांना स्थैर्य येऊन वर उल्लेखिलेलीं नवीं मूल्यें निर्माण झालीं. ह्या सर्व कालखंडांत राजकीय स्वरूपाच्या, आर्थिक स्वरूपाच्या प्रचंड घडामोडी घडत होत्या. नवीं (नव्या प्रकारचीं) साम्राज्यें अस्तित्वांत येत होतीं. त्या घटनांचे पडसाद सर्वत्र उमटत होते.

नवी-त्रिवर्ग समाजरचना-व तिच्यांतील परस्परान्विताः— कृषिसंस्कृतीच्या कालापासून ह्या कालापर्यंत हा जो फरक होत होता त्याचें असें वर्णन करतां येईल की, व्यक्ति ही अध्यात्मिक गुलामगिरींतून बाहेर पडून समाजांत 'व्यक्ति' ह्या नात्याने जन्म घेत होती व तिचे ठायीं व्यक्तित्वाचा उदय निर्माण होऊन तिने नागरिकत्वाच्या हक्कासाठी चंग बांधला होता. म्हणजे ह्या प्रक्रियेचे दोन टप्पे संभवतात, एक व्यक्ति म्हणून जागृत होऊन स्थान पटकावणें व दुसरें म्हणजे 'नागरिक' म्हणून मान्यता मिळविणें व त्यासाठी विशिष्ट हक्कांचा पुरस्कार करणें. व्यक्ति ही व्यक्तित्वाच्या जाणिवेने युक्त होण्यासाठी धर्मग्रंथांच्या दास्यांतून मुक्त होणें हें फार महत्त्वाचें काम प्रथम व्हावयास हवें होतें तें बुद्धिवादाने केलें. व नंतर

व्यक्तीच्या महत्त्वाच्या नागरीक हक्कांच्या मान्यतेचा कालखंड सुरू झाला. या बाबतचें थोडें दिग्दर्शन "व्यक्तित्वाचा उदय" ह्या परिच्छेदांत ('पितापुत्र संबंध' य. रा. दाते. पृ. २१) केलें आहे.

स्त्रीजीवनाच्या विकासाच्या दृष्टीने पाहूं लागलें तर असें आढळून येतें की, स्त्रीदास्य–विमोचनाची एकंदर प्रक्रिया व दलितांच्या हक्कांसाठी जी चळवळ झाली तींत साम्य बरेंच आहे. वर ज्या व्यक्तित्वाच्या व नागरिकत्वाच्या हक्कांचा उल्लेख केला ते हक्क संपादन करण्याची क्रिया वर्गावर्गांनी झालेली आहे. समाजांतला जो मध्यम वर्ग होता किंवा नव-जीवनाबरोबर निर्माण झाला–त्याने ह्या दोन्ही प्रकारच्या हक्कांची संपादणी केली. कृषिसंस्कृतींत जो ज्येष्ठ वा श्रेष्ठ वर्ग होता त्याच्या आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक दास्यांत सर्व समाजच खितपत पडला होता. व्यक्ति-स्वातंत्र्याच्या व बुद्धिवादाच्या पायावर उभें राहून सर्व समाजास वरील घोषणांनी आवाहन करून वरिष्ठ वर्गाच्या दास्यांतून मुक्त केलें. हा फार महत्त्वाचा टप्पा होता यांत शंकाच नाही.

नवनवीन शोधांनी समाजाची उत्पादनक्षमता खूप वाढली होती. ती अधिक वाढण्यासाठी अधिक माणसांची आवश्यकता होती. त्यांत स्त्रिया व इतर कनिष्ठ वर्गीय लोक ह्यांचाहि पण समावेश होता. हा सारा समाज तर वरिष्ठ वर्गाच्या दास्यांत असलेला. त्याला त्या वैचारिक...इ. दास्यांतून मुक्त केल्याविना त्याचा उपयोग नव्या समाजरचनेला पोषक असा होणें शक्य नव्हतें. तेव्हा कृषि–संस्कृतीची वैचारिक...इ चौकट मोडण्याचें हें पहिलें काम होतें. राजकीय क्षेत्रांत ह्या संघर्षाचें स्वरूप धर्म–सत्ता विरुद्ध राज–सत्ता असें होतें. धर्मसत्ता पूर्व कालाची प्रतीक होती, राज-सत्ता नवकालाची.

अशा रीतीने व्यक्तिस्वातंत्र्याचा आधार घेऊन वरिष्ठ वर्गाच्या विविध प्रकारच्या दास्यांतून सर्व समाजाला सोडविणें हें पहिलें कार्य झालें. त्याचा एक परिणाम असा झाला की, एकाद्या संरंजामशहाच्या शेतावर केवळ पोटार्थी रहाणारा शेतकरी हा गिरणी कारखान्यांत कामगार झाला. ह्यांत स्त्रिया पण आल्या. व्यक्ति–स्वातंत्र्याच्या विचाराचा परिणाम ह्या नव्या वर्गावरहि झाला व त्याने आपल्या नागरिक हक्कांसाठी जेव्हा जाग-

रूकता दाखविली, तेव्हा ते हक्क त्या वर्गास बहाल करण्यास मात्र ह्या मध्यम वर्गाकडून सक्त विरोध होऊं लागला. त्याचें कारण त्याच्या हातीं राजसत्ता व अर्थसत्ता इतकी विलक्षण प्रमाणांत आलेली होती, मनुष्याच्या भौतिक जीवनावर व निसर्गावरहि त्याचें इतकें प्रभुत्व वाढलें होतें की, त्या सामर्थ्याच्या आधारें आपण ही नवी चळवळ दडपून काढूं, असें ह्या वर्गास वाटणें शक्य होतें. तसें वाटलें, व म्हणूनच संघर्षणशीलता अधिकच वाढली.

स्त्रीदास्यनिषेधाची सुरवात – मेरी वुल्स्टन क्रॅफ्टः— ह्या संघर्षांत स्त्रियांचें स्थान दलित वर्गात होतें. दलितांच्या हक्कांच्या लढ्याचें स्वरूप एकापरीने स्पष्ट होतें, पण स्त्रियांची गोष्ट तशी नव्हती. दलित वर्गास आर्थिक इ. दृष्टीने वरिष्ठ वर्गाविरुद्ध लढा उघडपणें पुकारणें शक्य होतें. पण स्त्रियांना मात्र कोणत्याहि प्रकारें फटकून वागणें शक्य नव्हतें, याच कारणाने त्यांच्या विमुक्ततेच्या चळवळीला होणारा विरोध अधिक कडक व प्रभावी होता. व्यक्ति वा नागरीक म्हणून हक्क संपादन करतांना माता, पत्नी, भगिनी इ. नात्यांनी जीं कर्तव्यें प्राप्त झालीं होतीं तीं पार पाडून हक्क संपादण्याचें कार्य साधावयाचें होतें. सहाजिकपणें हा सर्व झगडा विविध विरोधांनी भरलेला असावा हें क्रमप्राप्त ठरतें. त्या शिवाय कृषि-संस्कृतीने त्यांचें जीवनक्षेत्र व जीवनमूल्य हें पुरुषांपासून इतकें भिन्न केलें होतें व पुरुषांशीच त्यांना त्यावाबतींत इतकें निगडित केलें होतें कीं त्यांच्या ठायीं व्यक्तित्वभावना शिल्लकच उरली नव्हती. कृषिसंस्कृतीप्रणित-जीवन-मूल्यांच्या दास्यांतून बाहेर पडणें ही अत्यंत महत्त्वाची व पहिली पायरी होती.

आधुनिक राजकीय व वैचारिक इतिहासांत फ्रेंच राज्यक्रांतीचें महत्त्व वा स्थान हें केवळ अनन्य साधारण आहे. कृषिसंस्कृतीप्रणित मूल्यें पूर्णतया धुळीस मिळाल्याचें तें गमक आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या विशाल चळवळीचें एक पर्व पुरें होतें व दुसरें सुरू होतें. ह्या दोन कालखंडांच्या सीमेवर फ्रेंच राज्यक्रांति वसते. स्त्रियांच्या चळवळीचें बीजारोपण पण याच कालांत झालें. इ. स. १७९० तच मेरी वुल्स्टन क्रॅफ्ट ह्या बाईनी आपलें क्रांतिकारक पुस्तक " Vindication of Rights of Women " हें प्रसिद्ध केलें. हें

पुस्तक म्हणजे स्त्रियांच्या विविध प्रकारच्या हक्कांचा जाहीरनामाच होय. कोणत्याहि आद्य-प्रवर्तकांच्या भूमिकेला शोभण्यासारखी ह्या बाईंची भूमिका ह्या पुस्तकांत आहे.[1] स्त्रियांवर होत असलेल्या विविध प्रकारच्या अन्यायांचें विषदीकरण अत्यंत तडफेने पण पूर्णतया विनयपूर्वक असें येथे झालें आहे, की, कोणत्याहि माणसास त्यांतील प्रतिपादनाचें महत्त्व पटावें. स्त्रियांच्या हक्कांच्या चळवळीची मुहूर्तमेढ आधुनिक कालांत ह्या पुस्तकाने रोविली आहे. एकोणीसाव्या शतकांत मिलचें प्रसिद्ध पुस्तक "Subjection of Women" प्रसिद्ध होण्यापूर्वीचें अत्यंत महत्त्वाचें पुस्तक म्हणून या क्रांतिकारक ग्रंथाचा उल्लेख करावा लागतो.

१७८९ चे सुमारास सुरू झालेल्या ह्या चळवळीचा पहिला टप्पा १९१८ चे सुमारास संपतो. म्हणजे त्या वर्षी ब्रि. पार्लमेंटनें कायदा करून स्त्रियांना सर्रास मतदानाचा अधिकार दिला, व तेव्हांपासून स्त्री व पुरुष यांच्यांत ज्या विरोधाच्या भिंती होत्या त्या भराभर ढासळून पडत आहेत. दोघेहि व्यक्ति व नागरिक ह्या नात्यानें समान भूमिकेवर आलेले आहेत. इतर देशांतील लोकांपुढें हा आदर्श आहे व त्या देशांत त्या दृष्टीनें स्त्रियांच्या चळवळीची पाउलें पडत आहेत.

समाजाचा प्राथमिक घटक कुटुंब न राहतां व्यक्ति झाली:— उद्योगसंस्कृति व कृषिसंस्कृति ह्यांच्यांतला मूलभूत फरक लक्षांत घेणें आवश्यक आहे. कृषिसंस्कृतींत सामाजिक जीवनाचा अंतिम घटक 'राज्य' (किंगडम्) हा होता.[2] उलटपक्षीं उद्योगसंस्कृतींत त्याची जागा, 'लोकराज्य' (रिपब्लिक) व 'राष्ट्र' (नेशन) ह्या कल्पनेने घेतली आहे. सामाजिक जीवनाच्या अंतिम घटकांत हा जो फरक पडला तो वरवरचा नसून मूलगामी आहे. दुसरा फरक असा कीं, कृषिसंस्कृतींत प्रारंभिक घटक 'कुटुंब' हा होता. त्या कुटुंब प्रमुखासच काय तें राजकीय इ. अधिकार असत. उद्योगसंस्कृतींत प्राथमिक घटक कुटुंब न होऊं लागतां 'व्यक्ति'

---

१ Wolston Craft: Vindication of Rights of Women.

२ रोमन 'रिपब्लिक' होतें. तरी राजकीय अधिकार तेथें इतक्या थोड्या लोकांना असत की आजच्या कालांत त्याला लोकराज्य म्हणतां येणार नाहीं.

होऊं लागली. ह्या गोष्टीची जाणीव जसजशी तीव्र होत गेली तसतशी दलितांच्या आत्मोद्धाराची चळवळ फोफावत गेली. मध्यमवर्गानें व्यक्तिवादाचा आश्रय घेऊन कृषिसंस्कृतींतील वरिष्ठ वर्गास आव्हान दिलें व यशहि मिळविलें. तथापि त्याच आधारावर सर्व साधारण व्यक्तीस (वर्ण व वर्ग निरपेक्षतया) राजकीय अधिकार स्त्रियांना देण्याची या वर्गांची तयारी नव्हती. ह्या सर्व विवेचनावरून स्त्रियांच्या उद्धाराच्या चळवळींत व दलितोद्धार चळवळींत साम्य कसें आहे हें स्पष्ट होईल. अर्थात् हें साम्य बरेंच उशीरा लक्षांत आलें. समाजवादी विचारसरणीच्या प्रसारानंतरच या दोन चळवळी समान पायावर आल्या.

तथापि दलितांच्यापेक्षां स्त्रियांची परिस्थिति कशी कठिण होती ह्याचें थोडें दिग्दर्शन वर आलेंच आहे. दलित वर्गाला आर्थिक स्वातंत्र्य थोडसें तरी होतें. स्त्रियांना मात्र तें अजिबात नव्हतें. यंत्रयुग आलें तेव्हां भांडवलदारांना स्त्रीकामगारांची जरूरी भासली. पण त्यांना पुरुषांइतका पगार कधीच मिळत नसे. त्या पगारावर त्यांचा अधिकार नसे. स्त्रियांचें आर्थिक परदास्य कोणत्या पराकोटीला पोहोंचलें होतें ह्याची यावरून कल्पना येते.

स्त्रीदास्याची निर्घृण विविधता:— नुसतेंच आर्थिक स्वातंत्र्य नव्हतें असें नव्हे, तर सबंध समाजव्यवस्थेने व्यक्ति म्हणून स्त्रियांची दखलगिरीच घेतली नव्हती. स्त्रियांची खरेदी विक्री कायदेशीरपणें सर्वत्र चाले ह्याचा उल्लेख मागे एका ठिकाणीं आलाच आहे.[1] निरनिराळ्या देशांतील समाज व्यवस्थांचा कौल याबाबत सामान्यत: सारखा आहे असें दिसून येतें. स्वत:च्या अर्जित संपत्तीवर त्यांची सत्ता नव्हती. त्यांना झालेल्या मुलांवर स्त्रीचा कोणताहि हक्क नसे. विवाह ठरविण्यांत कोणतेंच स्वातंत्र्य नसें, ह्या गोष्टी आपल्याला व पाश्चात्य देशांना नवीन नाहीत. आपल्याकडे तर पुनर्विवाहाची परवानगी नसे व आणखीहि विविध प्रकारच्या घृणास्पद रूढींचा उल्लेख करतां येईल. यांवरून हें स्पष्ट होईल की, त्यांना समाजव्यवस्थेने हक्क मुळीच ठेविले नव्हते. कर्तव्याची मात्र सतत जाणीव दिली जात असे. त्या कर्तव्यांचें क्षेत्र हें सुद्धा समाजापेक्षा कुटुंबापुरतेंच मर्यादित केलें होतें; ही गोष्ट वेगळी.

---

१ 'Feminine Character' मध्ये असें एक पत्र उध्दृत केलें आहे.

व्यक्ति म्हणून कोणतेहि अधिकार नसल्याने नागरिक म्हणून कोणतेहि अधिकार असणें संभवत नाही. त्यांना शिक्षणाची जरूरी नाही असें मागेच ठरविण्यांत आलें. आपल्या संस्कृतीने त्यांना वेदपठण करण्यास अपात्र ठरविलें. मतदानाचा हक्क, वारसा हक्क इ. आधुनिक जीवनांत महत्त्वाचे ठरले गेलेले 'हक्क' त्यांना दीर्घकाल नाकारले जावे हें सहज प्राप्त होतें.[1] ब्रिटिश स्त्रियांना किती काल झगडावें लागलें या साध्या हक्कासाठीं हें प्रसिद्ध आहे.

वास्तविक नव्या (उद्योग) संस्कृतींचा पाया व्यक्तिवाद झाल्यानंतर व्यक्तिस्वातंत्र्याचा उद्घोष मोठ्या कंठरवाने होत असतांना साधे व्यक्तित्वाचे प्राथमिक अधिकार स्त्रियांना एवढ्या दीर्घकाल का नाकारले जावे हा खरोखर मोठा प्रश्न आहे. हे अधिकार नाकारले जाण्याचें एक कारण म्हणजे त्यांना असलेलें 'आर्थिक पारतंत्र्य' होय. ही गोष्ट स्त्रीउद्धारकांच्या जेव्हा ध्यानांत आली तेव्हा स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर अतिरिक्त भर दिला जावा हें क्रमप्राप्त होतें. तथापि आर्थिक स्वातंत्र्यापेक्षा स्त्री–जीवनविषयक एका फार मोठ्या समस्येचा निकाल लागावयाचा होता. ती मूलभूत महत्त्वाची समस्या असल्या कारणाने तिच्यावर अधिक खल होणें हेंहि पण एकापरीने अपरिहार्य होतें. तिच्याविषयीं थोडा उहापोह करणें आवश्यक आहे.

नवी समस्या:— ही समस्या म्हणजे स्त्रियांचें वास्तव कार्यक्षेत्र कोणतें? ह्या बाबत झालेला खल होय. कृषिपूर्व–संस्कृति ही प्रामुख्यानें स्त्री–प्रधान संस्कृति होती हें आपण पाहिलें. त्यानंतर कृषिसंस्कृतींत स्त्रियांवर दास्य कसें आलें हेंहि पण निरीक्षितां आलें. या कालांत स्त्री व पुरुष ह्यांची कार्यक्षेत्रें इतकीं विभिन्न झालीं की दोघांचीं जीवनध्येयें हींहि विभिन्न झालीं, हा उल्लेख मागे आलाच आहे. ही परिस्थिति दीर्घकाल टिकली. स्त्रियांना घरांतील कामाशिवाय व निसर्गदत्त कर्तव्यांशिवाय कोणतें सामाजिक कार्यच समाजव्यवस्थेने ठेविलें नव्हतें. हा प्रकार दीर्घकाल टिकल्याने ही परिस्थिति

---

१ 'स्त्रियांचे हक्क व सुधारणा, 'वा. वि. जोशी.' व 'हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा' या ग्रंथांत याबाबतचें विवेचन आलें आहे.

ही 'सनातन' आहे असें मानवी मनास वाटूं लागलें. त्यामुळे व्यक्ति हें जरी समाजव्यवस्थेचें प्राथमिक अंग झालें तरी स्त्रियांना व्यक्तित्वाचे अधिकार देण्याचें नाकारतांना त्यांच्या निसर्गसिद्ध मातृत्वाकडे व तदनुषंगिक 'कर्तव्यांकडे बोट दाखवितां आलें. तसेंच समाजाच्या सातत्याकरितां हें कार्य अत्यंत महत्त्वाचें होतें, अर्थात स्त्रियांकडे त्याबाबतींत निसर्गानेच कर्तव्यवाटणी केल्याने त्यांचें कर्तृत्व फक्त गृह व मातृत्व इतकेंच मर्यादित रहावें, तेंच समाजपोषक होईल असें वाटलें. अशा परिस्थितींत व्यक्ति म्हणून विविध नागरिक हक्कांचा प्रश्नच संभवत नाही, असा एक युक्तिवाद पुढे आला.

तिची उकल-जीवनध्येयें एक होऊं लागलीं:—तथापि उद्योगसंस्कृतीने मानवी जीवितांत जी क्रांति घडवून आणली ती बरीच मूलभूत स्वरूपाची होती. जीविताची एकंदर धारणा बदलली ह्याचें विवेचन यापूर्वी आलें आहेच. जीवनविषयक दृष्टिकोणांत फरक पडला. मानवी जीवनाच्या ऐहिक अंगाकडे अधिक आस्थेने पाहण्याची प्रवृत्ति निर्माण झाली. हा पण उल्लेख आलेलाच आहे. ह्या सर्व गोष्टींचा व समाजजीवनाचें केंद्र व्यक्ति हें झालें, ह्या घटनेचा स्त्रियांच्या जीवनविषयक दृष्टिकोणावर फार खोल परिणाम झाला. नव्या आर्थिक रचनेने स्त्री व पुरुष यांच्या कार्यक्षेत्रांतील विभिन्नतेची भिंत छिन्नविच्छिन्न केली. म्हणजे कारखान्यांतल्या कामासाठी स्त्रियांच्या कष्टाची पण जरुरी भासली. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की स्त्री व पुरुष ह्यांच्या जीवनविषयक मूल्यांत जें अंतर होतें तें नष्ट झालें. तीं एक झालीं. जीवनविषयक मूल्यांत समानता निर्माण होण्याचें कारण कार्यक्षेत्रांत समानता निर्माण झाली; हें होय. अशी समान कार्यकक्षा निर्माण होणें ही आर्थिक बदलाची किमया होती.

कृषिसंस्कृतींत स्त्रीजीवनाचें ध्येय पातिव्रत्य व पुरुषांचें कार्यक्षेत्र मात्र अमर्याद होतें. He for God and She for God in him, असा मूल्यविषयक फरक स्त्री व पुरुष यांत होता तो नष्ट झाला व दोघांचीहि जीवितमूल्यें एकच झालीं. म्हणजे पूर्वसंस्कृतिसंमत, धर्म, अर्थ, काम, मोक्ष... हीं जर पुरुषांचीं ध्येयें झालीं तर स्त्रियांना पण तीं स्वीकार्य कां असूं नयेत? असा प्रश्न विचारण्याइतकी तयारी व्हावी इतकी जागृति झाली. स्त्रीजाग-

तीची जी चळवळ आहे तिच्या मुळाशी ध्येयांत समानता हेंच कारण आहे. स्त्रियांसाठी व्यक्तित्वाचे हक्क व नागरिकत्वाचे हक्क संपादण्याच्या मुळाशीं ही महत्त्वाची गोष्ट अध्याहृत धरलेली आहे व त्यांतच आधुनिक कालाच्या स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोणाचें वैशिष्ट्य आहे. स्त्री व पुरुष यांचीं जीवन-ध्येयें हीं एकच वा समान आहेत व समाजरचनेंत त्यांना व्यक्ति व नागरिक म्हणून जे जे अधिकार पुरुषांना उपलब्ध आहेत ते त्यांना उपलब्ध असावयास पाहिजेत या गोष्टीस सर्वमान्यता मिळाली आहे. स्त्रियांचें कार्यक्षेत्र कोणतें असावें ह्या समस्येचा निकाल कोणत्या तऱ्हेने लागला आहे हें पहावयाचें असेल तर इतिहासाने हा जो कौल दिला आहे तो लक्षांत घ्यावा लागेल. १९४७ त संयुक्त राष्ट्रांनी जी मानवी हक्कांची सनद संमत केलेली आहे ती स्त्री व पुरुष यांच्या कार्यक्षेत्राबाबतचा वाद संपल्याचें गमक होय.[1] अर्थात हा वाद प्रायः तात्त्विकक्षेत्रांत संपला आहे. प्रत्यक्षांत परिस्थिति वेगळी आहे.

स्त्रीदास्यविमोचन–एक ओजस्वी लढा:—तथापि ही एक मोठी थोरली प्रक्रिया होती, व तो झगडा प्रामुख्याने हक्कांसाठी असल्यानें ती बरीच घर्षणशील होती, त्याचप्रमाणे राष्ट्रांराष्ट्रांतलें सामाजिक जीवन निरनिराळ्या प्रकारचें होतें, तसेंच कांही प्रगत राष्ट्रें होतीं, तर कांही मागासलेली, कांही स्वतंत्र तर कांही परतंत्र, कांहींत कृषिसंस्कृतीला अभिप्रेत असणारें जीवन तर कांहींत औद्योगिक प्रगति होत असलेलें व त्यायोगें समाजाच्या विविध थरांत एकप्रकारची जागृति होत असलेलें जीवन ह्या सर्व कारणांनी देशादेशांत ह्या स्त्रीजीवनविषयक चळवळीस वेगळें वेगळें स्वरूप प्राप्त झालें. तरी सर्व रोख हा एकंदरीने एकाच दिशेने होता हें सम्यक दृष्टीने पाहिलें असतां लक्षांत भरतें. नवजागृत राष्ट्रांत सामाजिक व राजकीय अशी दोनही प्रकारची क्रांति एकदम सुरू झाल्याने चळवळीची दिशा व मार्ग हे थोडे गुंतागुंतीचे झाले आहेत.

स्त्रियांच्या हक्कांच्या चळवळींत त्यांनी मतदानाचा हक्क मिळविला, हें एक तेजस्वी पर्व आहे. विवाहविषयक, वारसाविषयक...वा इतर सामाजिक स्वरूपाचे विविध हक्क हे फारशी चळवळ न करतां दिले गेले. पण

---

१ आचार्य दादा धर्माधिकारी यांचा लेख : निबंध परिमल.

मतदानाच्या राजकीय हक्कांसाठी मात्र पुरुष वर्गाचा अत्यंत कडवा विरोध झाला. पहिल्या महायुद्धासारख्या संकटाने स्त्रियांना हात दिला, त्यांच्या विविध प्रकारच्या शक्तींची कसोटी लागली. त्यांतून त्या तावून सुलाखून निघाल्या तेव्हांच त्यांना तो अधिकार मिळाला. इंग्लंड आदि युरोपीय देशांत हा जो मतदान स्वातंत्र्यासाठीं लढा झाला त्याचा इतिहास इतका रोमहर्षणकारक आहे की, त्याची तुलना कोणत्याहि देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या झगड्याशींच करतां येईल. १८३२ मध्यें सुरू झालेल्या ह्या चळवळीचें उद्दिष्ट १९१८ मध्यें व नंतर १९२५ त सफल झालें.[1] ह्यावरून पाश्चिमात्य देशांत स्त्रियांना किती तीव्र लढा द्यावा लागला ह्याची कल्पना येईल. स्त्री व पुरुष यांच्यांतील जीवनध्येयविषयक जो फरक होता तो ह्या चळवळीनें व ह्या चळवळीच्या निरनिराळ्या देशांतील पडसादांनी समूळ मोडून काढला. आपल्याकडेहि आपल्या स्वातंत्र्य-लढ्यांत स्त्रियांचें साहाय्य झालें तें त्याच्या इतिहासकारांनी आदरपूर्वक नमूद केलें आहे.[2] तिकडे जर लक्ष दिलें तर स्त्री-जीवनविषयक दृष्टिकोणांत सर्व जगांत जो फरक पडला आहे त्यांत आपणहि सहभागी आहोंत हें स्पष्ट होईल. स्त्रियांचे कार्यक्षेत्र आपल्या भगिनींनी गृहापुरतें मर्यादित मानलें असतें तर स्वातंत्र्य लढ्यांत हें जें साहाय्य झालें तें होण्याचें कारणच नव्हतें. आपल्या कडील राष्ट्रीय पुढाऱ्यांनी त्याबद्दल स्त्रियांना धन्यवाद दिले आहेत.

पुरुषद्वेष्टेपणाची छटाः— स्त्रीदास्यविमोचनाच्या चळवळींत ज्या विविधप्रकारच्या लाटा निर्माण झाल्या त्यांत महत्त्वाची लाट म्हणजे पुरुषद्वेष्टेपणाची होय. स्त्रीस्वातंत्र्यवादिनींच्या वृत्तींत ही छटा दिसून येई. कित्येक वेळां अतिरिक्तपणानें ती चेष्टेचा विषयहि होई. ही पुरुषद्वेष्टेपणाची लाट आता ओसरली आहे. ऐतिहासिक दृष्टीनें पाहिलें असतां ती एक अपरिहार्य प्रतिक्रिया होती, असें आढळून येईल. स्त्रियांच्या मतदानाविषयक हक्कांच्या चळवळीची ही एक प्रतिक्रिया होय. मतदान हक्क हा प्रामुख्यानें 'राजकीय' हक्क होता. तो पुरुषांकडून अमान्य केला जात होता. (सर्वत्र राजकीय चळवळी प्रामुख्यानें घर्षणशील असतात.) परंतु ह्या चळवळी-

1 Neharu : Glimpses of the World History.

२ स्त्रियांचे हक्क व सुधारणा : जोशी वा. गं. पृ. १७.

बरोबर दलितांचा स्वहक्कांसाठीं लढा निर्माण झाला. नंतर, नंतर ह्या दोन लढ्यांत साम्य आहे, असें आढळून आलें व ते लढे एकमेकांत विलीन झाले. अर्थात ही क्रिया समाजवादी विचाराच्या उदयानंतरची आहे. मानवजातींतल। एक गटच राजकीय इ. हक्कांना पूर्णपणें मुकला आहे. ह्या राजकीय हक्कांला मुकण्याचें कारण आर्थिक-विषमता आहे हें जेव्हां विचारवंतांच्या ध्यानांत आलें तेव्हा सर्वच चळवळी समाजवादाच्या दिशेने जाऊं लागल्या. स्त्रीदास्यविमोचन चळवळीला ही जी कलाटणी मिळाली तिचा एक अनुकूल परिणाम म्हणजे ह्या चळवळींतला पुरुषद्वेष्टेपणाचा भाग नष्ट झाला. खऱ्या समानतेवर नवी समाजरचना आधारायची आहे हा विचार-महत्त्वाचा विचार–दृढमूल होत गेला. स्त्रियांच्या चळवळींची पण दिशा पूर्ण बदलली. यापुढे स्त्रियांची चळवळ ही मूठभर मध्यमवर्गीय स्त्रियांची दिखावू हक्कांकरिताची चळवळ राहिली नाही. ती सर्वसामान्य स्त्रीची तिच्या न्याय्य हक्कांसाठीची चळवळ झाली.

आधुनिक कालांत जी उद्योगसंस्कृति अवतीर्ण झाली आहे, तिच्या कालखंडांत स्त्रीजीवनांत, आमूलाग्र क्रांति कशी झाली व सर्व समाजाचा स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोण कसा बदलला ह्याचें येथवर विवेचन केलें. व्यक्ति या नात्याने आवश्यक असणारे व नागरिक म्हणून मिळणारे असे दोन्ही प्रकारचे अधिकार स्त्रियांना मिळण्याची पार्श्वभूमि कशी तयार झाली ह्याची कल्पना ह्या विवेचनावरून होऊं शकेल. हे अधिकार मिळवीत असतां त्यांच्या ठायीं नवी जाणीव, नवा व्यक्तिवाद, नवें कर्तृत्व निर्माण होत होतें व त्याच्या आधारावरच आधुनिक साहित्याची इमारत उभारलेली आहे. हें नवें व्यक्तित्व निर्माण होण्याची एक प्रक्रिया आहे व तिचें स्वरूप अधिक स्पष्टपणें साहित्यांतून दृग्गोचर होणार आहे. हें साहित्य विचारप्रधान व ललित अशा दोन्ही प्रकारचें होय.

समानता प्रस्थापनेची सुरवात:—मानवी संस्कृतीच्या विविध अंगोपांगांचा विकास होत असतां तिच्या ओघाबरोबर स्त्रियांचें स्थान कसें बदललें व नव्या समाजवादी संस्कृतींत स्त्री व पुरुष यांच्यांत एकप्रकारची समता कशी अभिप्रेत धरलेली आहे ह्याची कल्पना येईल. समाजरचनेचा प्राथमिक घटक व्यक्ति आहे, हें उद्योगसंस्कृतीने गृहित धरलें वा मान्य

केलें. या व्यक्तीच्या राजकीय हक्कांकडेहि तिचें लक्ष गेलें. पण आर्थिक महत्त्वाच्या अधिकाराकडे तिचें दुर्लक्ष झालें व नेमक्या ह्याच गोष्टीकडे समाजवादी संस्कृति लक्ष वेधूं इच्छिते. संस्कृतींत स्त्रियांचें स्थान पुरुषांच्या बरोबरीचें राहणार आहे. स्त्रियांच्या कर्तृत्वाचा व स्थानाचा विचार करतांना समानता अध्याहृत धरली आहे, पण स्त्रियांच्याकडे निसर्गाने लादलेलें कार्य आहे, त्याकडे ह्या नव्या भूमिकेने दुर्लक्ष्य होणार नाहीं का? अशी शंका येणें साहजिक आहे व असें दुर्लक्ष झालें तर मानवी संस्कृतीचा अंतकाल जवळ आला आहे, असेंहि ग्रथित होऊं शकते. तेव्हा त्याबद्दल थोडें विवेचन आवश्यक आहे. कारण हा थोडा गंभीर स्वरूपाचा प्रश्न आहे. त्यांत मानवी भागापेक्षा नैसर्गिक अंश अधिक आहे.

मातृत्व हा शाप की वर:— निसर्गाने संतति निर्माण करण्याचें कार्य (जन्म देण्याचें कार्य) स्त्रियांवर सोपविलें आहे. जोंपर्यंत मानवजात राहाणार तों पावतों हीच वस्तुस्थिति राहणार आहे असें दिसतें. तथापि मातृत्वाच्या ह्या मुद्यावर व्यक्ति म्हणून वा नागरीक म्हणून हक्क नाकारता येतील असें वाटत नाही. वा त्या हक्कांच्या अंमलबजावणींत मातृत्व आड येईल, हें शक्य नाही. तथापि अधिक बारकाईनें पाहूं लागलें तर मातृत्वामुळे स्त्रीदास्य आलें आहे; असें आढळून येईल. कृषिसंस्कृतींत प्रवेश केल्यानंतर माणसांची कष्टांसाठी आवश्यकता होती. त्या दृष्टीने स्त्रियांचें कार्यक्षेत्र मर्यादित झालें असणें शक्य आहे. कृषिसंस्कृतींत स्त्रीच्या आयुष्याचीं उमेदीचीं वर्षें केवळ संततीला जन्म देण्यांत व तिची निगा राखण्यांत जात असे, हें जर लक्षांत घेतलें तर हें ओझें किती वाढलें होतें याची कल्पना येईल. आयुष्याचा महत्त्वाचा काल ह्याच गोष्टींत व कर्तृत्व याच कारणी लागल्याने त्यांच्या भोवतालच्या दास्याच्या शृंखला फार त्वरेने नकळत, आवळल्या गेल्या. त्या दृष्टीने मातृत्व हें शापदायक झालें असें म्हणतां येईल. निदान पुरुषांना दास्य लादण्यास हें निसर्गाने दिलेलें कारण सापडलें!

ह्याच प्रकारची परिस्थिति आणखीहि एका गोष्टीने निर्माण झाली. कृषिसंस्कृतीच्या कालांत समृद्ध जीवन लाभलें तरी लढाया इ. संकटें थांबलीं होतीं असें नव्हे. ह्या लढाईत 'वीर' म्हणून उपयोग होण्यास लोक

हवे होते. अर्थातच स्त्रियांवरला बोजा परत वाढलाच असणें शक्य आहे. दुसरा परिणाम असा की, गरोदरावस्थेंत व मूल लहान असतां तिला विशिष्ट संरक्षणाची जरूरी भासे, याच गोष्टीमुळें ती प्रत्यक्ष लढण्याच्या कामांत मदत करण्यास असमर्थ ठरली होती, व तिला द्याव्या लागण्याऱ्या संरक्षणामुळे तिच्याकडे पहाण्याचा पुरुषाचा दृष्टिकोन तिरस्कारपूर्ण व थोडा अवहेलनेचा झालेला असणें शक्य आहे. एकंदरीने कृषिसंस्कृतीच्या अवस्थेंत दास्य येण्यास मातृत्व हें एक मोठें कारण आहे हें मान्य करावें लागेल. या पुढेंहि समाजांत स्त्रीचें स्थान कोणतें राहणार आहे तें ठरवितांनाहि ह्या वस्तुस्थितीचा विचार करावा लागेल.

उद्योगसंस्कृतीचे आगमन झाल्यानंतरहि नेमकें हेंच घडलें आहे. उद्योगसंस्कृतीने माणसाचें सामर्थ्य खूपच वाढविलें, निसर्गावरलें त्याचें प्रभुत्वहि वाढविलें. त्या वाढलेल्या सामर्थ्याला विरोध करणें स्त्रियांना जड गेलें त्याचें कारणहि मातृत्वच. कारण शेती ऐवजी कारखान्यांत वा अन्यत्र मनुष्य बळाची आवश्यकता निर्माण झाली होती. मालाचें उत्पादन स्वस्त व सतत राहण्यास मजुरांचा पुरवठाहि तसाच हवा होता. ह्याचाच अर्थ स्त्रियांवरला ह्याबाबतचा भार कमी व्हावा अशी शक्यता नव्हती. स्त्रीदास्यविमोचनाच्या चळवळींत प्रारंभीं जी पुरुषद्वेषीवृत्ति दृग्गोचर होत होती त्याचें कारण त्या स्त्रियांना मातृत्वानें आपणास दास्य आलेलें आहे ही गोष्ट पटली होती व म्हणून बऱ्याच स्त्रीस्वातंत्र्यवादिनींनी अविवाहित राहण्याचें ठरविलें होतें. स्त्री व पुरुष यांच्यांत समता निर्माण करण्याच्या बेळींहि स्त्रियांच्या मातृत्वप्रधान समाजकार्याने त्यांना पुरुषांप्रमाणें अखंड नोकरी इ. व्यवसाय करतां येणें शक्य नाहीं इ. गोष्टी गृहित धरलेल्या असत. म्हणजे उद्योगसंस्कृतींत समाजाचें उत्पादन वाढलें, समाजाची समृद्धि वाढली, परंतु स्त्रियांवरलें हें ओझें कमी होऊं शकलें नाही. उलटपक्षी पुरुषांच्या बरोबरीनें गृहेतर कार्यकक्षांत हिरीरीने प्रवेश करावा लागल्याने ती जबाबदारी स्वीकारावी लागली, व शिवाय निसर्गाने दिलेलें कार्य करावें लागलें म्हणजे ह्याहि अवस्थेंत मातृत्वानेंच प्रगतीला अडथळा केला असें दिसतें. आणि ही अशी परिस्थिति यापुढे सदैव रहाणार असेल तर ही समतेची जाणीव वा हा समतेचा विचार कितपत दृढमूल होईल ही शंकाच आहे. मातृत्व स्त्रियांना

परत दास्यांत टाकूं शकेल, असें हीं दोन उदाहरणें पाहिलीं तर वाटूं लागतें. त्याशिवाय हें मातृत्व निसर्गाने लादलेलें असल्याने एकंदर परिस्थिति अधिकच विकट होते.

मातृत्वाला 'वर' ठरविणारी चळवळः—तथापि अगदी अलीकडे या बाबतची परिस्थिति थोडी बदलली आहे. संतति निर्माण करण्याचें स्त्रियांवर जें अतिरिक्त ओझें पडत असे तें कमी होण्याची शक्यता आज निर्माण झाली आहे असें दिसतें. व ह्या शक्यतेमुळे त्यांना व्यक्ति व नागरिक म्हणून उपलब्ध होणाऱ्या अधिकारांचा उपयोग करतां येईल. ऐन उत्साहाचीं व उमेदीचीं वर्षें जी केवळ ह्या कार्यांत खर्ची पडत त्या बाबतीत कांही काल सूट मिळण्याची शक्यता झालेली आहे. ही शक्यता ज्या चळवळीने झाली ती चळवळ म्हणजे संतती–संयोजनाची चळवळ होय. मातृत्वाच्या जबाबदारींतून नव्हे, पण अनैच्छिक मातृत्वापासून थोडें संरक्षण देणारी ही चळवळ आहे.

संततिसंयोजनाच्या चळवळीचा उल्लेख या ठिकाणीं एकंदर स्त्रीजीवनांत आमूलाग्र फरक घडवून आणणारी चळवळ म्हणून करावयाचा आहे. लोकसंख्या वाढण्याचें प्रमाण फार आहे तें कमी व्हावयास हवें, इ. उपायांचा वा आर्थिक कारणांचा येथे संबंध नाही. संततीचें संयोजन करतां येणें शक्य आहे हा विचार स्त्रीच्या दृष्टीने फारच मोलाचा आहे. ह्या संततिप्रतिबंधक साधनांचा प्रसार हेंहि एक मोठें पोषक कारण घडत आहे असें दिसतें. स्त्रीदास्याचें स्वरूप या नव्या शक्यतेनें आमूलाग्र बदललें जावें अशी परिस्थिति निर्माण झालेली आहे.

संतति संयोजनाचे मूलगामी व दीर्घगामी परिणामः—संततीचें संयोजन ही एक अत्यंत क्रांतिकारक घटना आहे. ही शक्यता जों जों वाढत जाईल तों तों माणसाचा माणसाकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलेल. माणसें एकमेकांकडे अधिक आस्थेने पाहून मानवी जीविताची एकंदर उंची वाढावी अशीं बीजें या घटनेंत आहेत हें नक्की. ह्या घटनेमुळे यापुढचें समाजजीवन या पूर्वीच्या समाजजीवनापेक्षा पूर्णतया वेगळे राहणार आहे. प्रसिद्ध संस्कृतिसमीक्षक रँडाल आपल्या 'क्रिएटिव्ह सेंचरीज' या ग्रंथांत म्हणतो.[1]

1 R. A. Randall "Creative Centuries".

" Possibly, however, the future historians may turn aside from these spectacular inventions and see the essential change effected in our age, not in them, but in a movement that affects the whole structure of the society from inside. That movement is birth control. Until the present time, except for such drastic contrivances as abortion or infunticide, man has multiplied without visible control in the same way as every other living creature, and the checks upon his indefinite multiplication have been in the main the natural or " Malthusian " checks. Birth control has changed this basically and fundamentally. A sosiety that can determine its own existence or extinction, differs in its entire structure from a sosiety in which these things are in no way controlled. A condition of this kind has never occured before, and its effects cannot be predicted, they must inevitably be profound. "

या उद्गारांवरून संततीचें संयोजन करण्याची जी शक्यता आज निर्माण झालेली आहे तिच्यामुळे स्त्रीजीवनांत फार मोठा (मूलभूत) क्रांतिकारक बदल कसा होणार आहे हें स्पष्ट होईल. स्त्रीच्या कर्तृत्वाच्या आड या पुढे मातृत्व येणार नाही, असें साधार वाटावयास लागलें आहे. व म्हणूनच स्त्री व पुरुष यांच्यांतली समता अधिक चिरजीवि ठरण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. विवाहाकडे पाहण्याचा आधुनिक स्त्रीचा दृष्टिकोणहि बदलावयास ही शक्यताच कारणीभूत झालेली आहे. तिला विवाहाचा बागुलबोवा वाटण्याचें कारण राहिलें नाही. डॉ. कमलाबाई देशपांडे 'नवा महाराष्ट्र' या पुस्तकांतील आपल्या लेखांत म्हणतात तेंहि ह्या विचारास पोषक आहे. त्या म्हणतात.

' आज कॉलेजांतली मुलगी मी आजन्म अविवाहित राहून देशकार्य करणार असं सहसा म्हणणार नाही. देशसेवा करूं पण लग्नाची संधि येतांच लग्नहि करूं असं ती सांगते. बदलत्या परिस्थितिमुळं तिला कळून चुकलं आहे की, लग्न हा पूर्वीप्रमाणे कोंडवाडा नाही. संतति नियमनाच्या ज्ञानाचा प्रसार, त्याची चर्चा ऐकून स्वतःचा संसार आपल्याला झेपेल एवढाच

वाढविणं शक्य आहे ही गोष्ट तिला समजते. निदान या चर्चेचा अप्रत्यक्षपणें तिच्या मनावर परिणाम झाला आहे, हें कां नाकारतां?... " या सर्व गोष्टींमुळें लग्न करणें ही अथांग भवसागरांत उडी घेणं नाही; त्यांत जीवितसंरक्षक अशीं कांहीं दीपगृहं आहेत असं दिसून लग्नाबद्दलची भीति मोडून त्याची जागा मानवसुलभ अशा उत्सुकतेनें घेतली..."[1]

लेख संवाद पद्धतीनें लिहिलेला आहे. त्यांत एका व्यक्तीच्या (स्त्रीच्या) मुखीं हे उद्गार घातलेले आहेत. पण ते वस्तुस्थितिनिदर्शक नाहीत असें म्हणतां येणार नाहीं, किंबहुना लेखिकेचें मत तशा प्रकारचें असावें असें स्पष्ट दिसतें.[2]

'मानवी' दृष्टिकोण वि. 'पुरुषी' दृष्टिकोण:— स्त्री व पुरुष ह्यांतील समानतेबाबत थोडें स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे. ह्या ठिकाणीं जो दृष्टिकोण मानला त्याच्या आधारें हें स्पष्ट होईल की, स्त्री व पुरुष ह्यांचीं जीवन-ध्येयें या पुढील कालांत एक रहाणार आहेत. स्त्रियांसाठी पातिव्रत्यासारखेंच व 'चूलमूल' सारखें 'ध्येय' व पुरुषांसाठी मात्र (जुन्या संकेतांत) धर्म, अर्थ, काम... इ. 'पुरुषार्थ' असा भेदभाव या पुढे चालणार नाही. जीवन-ध्येयांत एकता वा समानता निर्माण झाल्याखेरीज स्त्रियांच्या कर्तृत्वाला पुरेसें आवाहन पोहोचणार नाही. तें पोचविण्याची शक्ति या ध्येय-निश्चितींत आहे. एवढाच या ठिकाणीं समतेचा अर्थ अभिप्रेत आहे. स्त्री व पुरुष यांत परस्परपूरकता आहे हें स्पष्ट आहे. स्त्री व पुरुष यांच्याकडे पाहण्याचा आजचा दृष्टिकोण प्रामुख्याने 'पुरुषी' आहे. (कारण आजच्या समाजाची धारणाच तशी आहे) तो 'मानवी' व्हावयास हवा. 'पुरुषी' दृष्टिकोणांतून पाहिलें असतां स्त्री 'दुबळी' वाटते; शारीरिक दणकटपणांत पुरुषाबरोबर न टिकणारी अशी वाटते. स्त्री व पुरुष जेथे एकत्र कामें, नोकरी इ. करतात तेथे स्त्री-जीवनाकडे केवळ या प्रकारच्या पुरुषी दृष्टिकोणाने पाहिलें जातें, पुरुषांच्याबरोबरीने वागवा अशा त्यांच्या विनंतीचा पूर्णतया उपहास वा विपर्यास केला जातो; त्यामुळे स्त्रियांची फरफट निघते, त्यांना माणुसकीने वागविलें जात नाही. याची

१ नवा महाराष्ट्र खंड १ : कमलाबाई देशपांडे यांचा लेख पृ. ७०.

२ बर्ट्रॉण्ड रसेल यांनीहि हा उल्लेख केला आहे. 'वि. प्र. स. र.' पृ. ७२.

प्रतिक्रिया त्यांच्यावर "घर बरें!" असें मानण्याकडे होते. यासाठी 'मानवी' दृष्टिकोणांतून– 'पुरुषी' नव्हे—मानवी जीवनाकडे व स्त्री–जीवनाकडे पाहावयास शिकलें पाहिजे. 'पुरुषी' दृष्टिकोणांतून पाहिलें असतां त्या 'दुबळ्या' वाटतात, पण हा दोष खरा त्यांचा नव्हे. पुरुषांनी त्यांना कमींत कमी तीन चार हजार वर्षे एका विशिष्ट परिस्थितींत वागविलें व त्याचाहि हा परिणाम असेल. कांही जमातींकडे पाहिलें तर असें आढळून येतें की, त्यांच्या स्त्रिया अधिक शूर, धीट, कर्तबगार असतात, त्या मानाने त्या जमातींतले पुरुष अगदी निष्प्रभ वाटतात. ह्याचें कारण स्त्रियांच्या कर्तृत्वाच्या वापराला त्या समाजांत पूर्ण वाव आहे म्हणून ते गुण तेथे विकसित झाले आहेत. स्त्रियांच्या व्यापक कर्तृत्वाला आजपावेतों कोणताच वाव ठेविला गेला नसल्याने त्यांच्या अंगीं पुरुषी दृष्टीला दिसून येत असलेला 'दुबळे'पणा आलेला असणें शक्य आहे. तेव्हा स्त्रियांकडे 'मानवी' दृष्टीने पाहणें आवश्यक आहे, केवळ सहानुभूति, करुण, स्त्री-दाक्षिण्य इ. नी भरलेल्या दृष्टीने नव्हे.

मानवी संस्कृतीच्या प्रगतीबरोबर स्त्रियांच्या समाजांतील स्थानांत, त्यांच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोणांत कसा बदल होत आला आहे, ह्याचा आढावा घेतला. त्यावरून आजच्या व उद्यांच्या समाजव्यवस्थेंत स्त्रियांचें स्थान कोणतें राहणार आहे याची कल्पना येऊं शकेल. संततीच्या संयोजनाची शक्यता आज दृष्टिक्षेपांत आल्यासारखी भासते. ती किती महत्त्वाची घटना आहे हें स्पष्ट होण्यासाठी मुद्दाम कांही उतारे घेतले. स्त्रीच्याठायीं स्वत्वाची जागृति केवळ झाली असती व ह्या बाबत जर अशी कांही प्रगति झाली नसती तर स्त्रियांच्या मागलें 'दास्य' सुटलें असतें असें म्हणतां येत नाही. पण ही जी नवी शक्यता झाली आहे तिचे परिणाम फार दूरवर होणार आहेत. माणसांचे जन्मच एकदां संयोजनपूर्ण व्हावयास लागले की, त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण पार बदलून जाईल. आणि आंतरराष्ट्रीय राज्यकारभारापर्यंत स्त्रीचा जो प्रवेश झाला आहे त्या आधारावर व एकंदर ह्या नवीन चळवळीने होऊं घातलेला फरक लक्षांत घेऊन असें स्पष्ट म्हणावेसें वाटतें की आजच्या मानवीसंस्कृतीचा युद्धखोरपणा हा कदाचित् संपुष्टांत येऊं शकेल; अर्थात् ही अवस्था खूप दूरची आहे.

E7612

नागरिकत्वाचे अधिकार हवेतः— स्त्री व पुरुष यांच्या कार्यक्षेत्रांतील वेगळेपणा नष्ट झाल्याने, व दोघांचीं जीवनमूल्यें समान झाल्याने आजच्या स्त्रींत व्यक्तित्वाचा एक निराळाच आविष्कार पाहावयास मिळतो. हें व्यक्तित्व निर्माण होण्याला प्रामुख्याने कारणीभूत झालेल्या कांही विचारसरणींचा उल्लेख आतापर्यंतच्या विवेचनांत आलेला आहे. आजच्या स्त्रींत जी व्यक्तित्वाची जाणीव दिसते, नागरिकत्वाचे व व्यक्तित्वाचे सर्व अधिकार प्राप्त करून घेण्यांत तिचा जो साक्षेप दिसतो, तो सांस्कृतिक इतिहासांत एकंदरीने नवा आहे असें म्हणतां येईल. सहाजिकच स्त्रीजीवनाशीं निगडित असलेल्या कुटुंब, मालमत्ता, विवाह,... इ. विविध संस्था आपणास पारखून घ्याव्या लागतील. ह्या सर्वांत सर्वसाधारण स्त्रीच्या दृष्टीने, समाजाच्या दृष्टीने, अतिशय महत्त्वाची असलेली संस्था म्हणजे कुटुंब ही होय. ह्या संस्थेपुरतें स्त्रियांचें कार्यक्षेत्र आजपावेतों मर्यादित झालें होतें. व स्त्रीजीवनांत हा जो क्रांतिकारक फरक होऊं घातलेला आहे त्याचे परिणाम कुटुंब संस्थेवर कसे होणार आहेत, तिचें एकंदरीने भवितव्य कोणतें ह्या बाबत थोडा उहापोह करणें आवश्यक आहे असें वाटतें. या ठिकाणीं आलेल्या विवेचनाशी तो विसंगत वाटणार नाही असें गृहित धरतां येतें.

कुटुंबसंस्थेचें भवितव्यः—स्त्रीजीवनाला हीं जी कलाटणी मिळाली आहे त्यायोगें कुटुंबसंस्थेच्या धारणेंत फरक पडला आहे यांत शंका नाहीं. आजपर्यंतच्या कुटुंबसंस्थेचा पाया प्रामुख्यानें स्त्री होती. तिचें क्षेत्र पातिव्रत्याच्या जीवनमूल्याच्या आधारावर कुटुंबसंस्थेच्या कक्षेंत सामावलेलें होतें. नव्या परिस्थितींत जे फरक झाले आहेत. त्यांच्या अनुषंगानें पाहतां कुटुंबसंस्थेचें एक महत्त्वाची सामाजिक संस्था म्हणून महत्त्व थोडें कमी झालें आहे असें निश्चितपणें म्हणतां येतें, निदान त्या संस्थेच्या स्वरूपांत मूलभूत स्वरूपाचा बदल झालेला आहे.

सामाजिक उत्क्रांतीच्या दृष्टीने पाहतां असें म्हणतां येईल की यापुढील समाजजीवनांत कुटुंबसंस्थेला कोणतेंच विधायक वा विशिष्ट कार्य उरलें नाही तिचें कार्य संपलें आहे. तिला भवितव्य नाहीं. वास्तविक हा फरक उद्योगसंस्कृतीच्या प्रारंभापासूनच होऊं घातला आहे. समाजाचा प्राथमिक घटक कुटुंब जाऊन, व्यक्ति हा समाजव्यवस्थेचा प्राथमिक घटक होण्याची

प्रतिक्रिया जेव्हा सुरू झाली तेव्हाच ह्या महत्त्वाच्या--कुटुंबसंस्थेच्या अस्तित्वाला तडा गेला असें म्हणतां येईल. तथापि या विचाराचें जरा खोलांत जाऊन परिशीलन करणें आवश्यक आहे. कारण कुटुंबसंस्थेविषयीं सर्वसाधारण समाजाला व विशेषतः मध्यमवर्गाला इतका जिव्हाळा वाटत आहे; त्यांच्या मतें ह्या संस्थेला इतकें पावित्र्य आहे की तिचें कार्य संपलें आहे असें म्हणणें मानवी संस्कृतीच्या अवनतीचे डोहाळे सुचावे इतकें अभद्र आहे, असें कित्येकांना प्रामाणिकपणें वाटेल, तथापि ज्या बुद्धिवादी व मानवतावादी दृष्टिकोणांतून जीवनाकडे येथे पाहिलें तोच दृष्टिकोण स्वीकारला असतां हा विचार फारसा धक्का देणारा आहे, असें वाटणार नाहीं. संकुचितपणावर आधारलेल्या कांही कल्पना फोल ठरतील एवढेंच.

कृषिबलावस्थेंतली कुटुंबसंस्था:—कुटुंबसंस्थेला महत्त्व आहे असें केव्हां म्हणतां येईल? जेव्हां विशिष्ट समाजरचनेंत ह्या संस्थेला आर्थिक, सामाजिक, वैचारिक, सांस्कृतिक, शिक्षणविषयक इतक्या विविध प्रकारचें कार्य असेल व ती तें कार्य पूर्णपणें पार पाडीत असेल, तसें पार पाडण्याची तिची कुवत असेल तेव्हां. या निकषावरून आजच्या कुटुंबसंस्थेकडे पाहिलें तर काय आढळून येतें तें पाहणें महत्त्वाचें आहे. त्याच दृष्टीने तिच्याकडे अधिक लक्ष देऊन पाहावयास हवें.

वस्तुतः कुटुंब ही संस्था कृषिसंस्कृतींत अस्तित्वांत आली, व तींत तिला उपरिनिर्दिष्ट विविध क्षेत्रांत विशिष्ट कार्य होतें याचें विवेचन ह्यापूर्वीच आलें आहे.[1]

राजकीय व आर्थिक क्षेत्रांत तिला एका स्वयंपूर्ण घटकांचें (यूनिट) स्वरूप कसें आलें होतें हें पाहिलें. त्याच समाजव्यवस्थेंत शैक्षणिक, धार्मिक इ. पण कांहीं कार्य होतें. शिक्षण हें पूर्वसंस्कृतींत सार्वत्रिक असें कधीच नव्हतें. त्यामुळें कुलाला वा कुटुंबालाच आवश्यक तें शिक्षण त्यांतील व्यक्तीला द्यावें लागे. कोणतें शिक्षण द्यावयाचें हें कुलाच्या वा कुटुंबाच्या परंपरा असत त्याप्रमाणें ठरे, म्हणजे विशिष्ट जमातीकडे विशिष्ट प्रकारच्या कलांचा, कौशल्याचा, ज्ञानाचा वारसा आला असे वाटे, व तो ह्या संस्थेमार्फत टिकविला जाई. विशिष्ट कुटुंबाच्या विशिष्ट परंपरा असत, त्या

१ सदर निबंध पृ. २१.

सांभाळणें, त्यांची बूज राखणें, हें काम प्रामुख्याने कुटुंबीयांकडून होई व कुटुंबाचे एकंदर संस्कार ह्याला परिपोषक असत; त्याद्वारें हें काम होई. त्याप्रमाणें विशिष्ट हक्कहि 'कुटुंबाचे' असत, व्यक्तीचे नसत. पोळ्याच्या मिरवणुकींत पहिला बैल कोणाचा? (म्हणजे कोणत्या कुटुंबाचा?) दसऱ्याला शमीची पूजा कोणी करावयाची? (म्हणजे कोणत्या कुटुंबाकडे, तो अधिकार आहे?) इ. उदाहरणें पाहिलीं तर कृषिसंस्कृतीच्या कालांत कुटुंब हीं संस्था सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक जीवनाचा गुरुत्वमध्य होती. त्या अर्थानें ती जिवंत होती, असें म्हणतां येईल. समाजाचा गाडा चालू राहण्यास तिची विशिष्ट व भरीव मदत होत असे.

'कुटुंब' कालपक्व झालें आहे:— आज सामाजिक जीवनाचें केंद्र व्यक्ति आहे. विशिष्ट अधिकार व्यक्तीला आहेत, कुटुंबाला नव्हेत. कर्तृत्वाला आवाहन व्यक्तीच्या आहे; कुलाच्या, कुटुंबाच्या नव्हे. सांस्कृतिक प्रगतीबरोबर शिक्षणसंस्था ही स्वतंत्रपणानें विकसित झाली आहे. तें (शिक्षण) सर्व व्यक्तींना मोकळें आहे. तें राष्ट्रीय (सरकारी वा सामाजिक) संस्थांकडून चालविलें जातें. परंपराहि कुलाच्या नाहीत, राष्ट्राच्या, समाजाच्या. कारण व्यक्तीनंतर मोठा सांस्कृतिक घटक म्हणजे राष्ट्रच. ह्या राष्ट्राच्याठायीं आपल्या युगानुसार उच्चतर सामाजिक निष्ठा ह्या एकत्रित झालेल्या आहेत. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, वैचारिक—वैज्ञानिक इ. सांस्कृतिक क्षेत्रांत व्यक्तीनंतर राष्ट्राला विशिष्ट परंपरा इ. असूं शकतात. कुटुंबाला वा कुलाला नव्हे. ह्या परंपरा वा एकंदर धोरण राज्यसंस्था ही व्यक्तींच्या द्वारां—कुटुंबांच्या नव्हे—अमलांत आणण्याचा प्रयत्न करते. ह्या विवेचनावरून कुटुंब ही संस्था आज कालपक्व झाली आहे असें म्हणतां येतें. म्हणजे आजच्या समाजरचनेने तिच्याकडे विशिष्ट कार्य ठेविलेलें नाहीं. पूर्वकालीन कुटुंबसंस्थेचा अवशेष म्हणून ती अस्तित्वांत आहे. आपलीं मनें थोडीं तशींच आहेत, त्यांना ती 'जिवंत' वाटते.

नव्या अर्थव्यवस्थेने कुटुंबास गेलेले तडे:— ज्यावेळीं उद्योगसंस्कृतीला अभिप्रेत असणारी अर्थव्यवस्था बद्धमूल होऊं लागली तेव्हा ह्या परिस्थितींत फरक होऊं लागला. ह्या फरकाची एक गति म्हणजे कर्तृत्वाचें वा नागरीक जीवनाचें केंद्र कुटुंबाकडून व्यक्तीकडे सरकूं लागलें ही होय.

दळणवळणाचीं साधनें वाढलीं, तसतशा बाजारपेठा दूर दूर व व्यापक होऊं लागल्या. ह्या परिस्थितींत जें धान्य घरांत पडून राहिलें असतें तें दूर गांवीं नेऊन त्याचे पैसे बँकेंत ठेवण्याची शक्यता निर्माण झाली. सहाजिकच आतापर्यंत घरोब्याने राहात असलेलें कुटुंब तसेंच राहणें अशक्य झालें. जोंपर्यंत शेतीचें उत्पन्न घरच्या घरीं खपवावें लागे तोंपावेतों घरांत चार दोन माणसें अधिक असलीं तरी फारसें बिघडत नसें, पण धनसंचयाचा हा जो नवा मार्ग व प्रकार उपलब्ध झाला त्याच्या योगाने आतापर्यंत 'आपुलकीने' राहणारे कुटुंबीय हे "आयते खाऊ..." झाले. कारण संपत्ति कुटुंबाची न राहतां व्यक्तीची झाली. कुटुंब–प्रमुखाची झाली. घरांत कोणी कर्ते सवरते पुरुष असले तर त्यांनाहि नोकरी धंदा इ. करणें जरूर भासूं लागलें. ते वेगळें राहूं लागले, त्या प्रमाणांत स्त्रियांची पण वाटणी झाली. कुटुंबांतल्या लोकांना वाटलें कीं एकत्र–मोठ्या–कुटुंबांत आपल्या व्यक्तिगत आवडीनिवडीला इ. कांहीच वाव राहात नाही. अशा रीतीने उद्योगप्रधान व अर्थप्रधान जीवनधारणा सुरू झाल्याबरोबर जुन्या कुटुंबाची 'एकता' मोडली, उद्योगसंस्कृतीला अभिप्रेत असणारें नवें सुटसुटीत कुटुंब अस्तित्वांत आलें. आपल्याकडे ही प्रक्रिया ब्रि. राजकर्त्यांच्या आगमनापासून सुरू झाली.

मध्यंतरीचें 'नवें' कुटुंबः—असें छोटेखानी कुटुंब कांहीं काल मोठें आदर्श मानलें जाई. एकाने–पुरुषाने–मिळवावें व त्याच्या अगदीं जवळच्या नात्याच्या लोकांनी त्यांत रहावें, खावें हें मोठें गंमतीचें वाटूं लागलें कांही काल. पण हें 'नवें कुटुंब' म्हणजे ऐतिहासिक 'कुटुंबसंस्थे'चें प्रातिनिधिक नव्हे. नव्या आर्थिक रचनेप्रमाणे अस्तित्वांत आलेला तो एक प्रायः 'आर्थिक घटक' होता. ह्या कुटुंबाला ह्या आर्थिक कारणाव्यतिरिक्त, सामाजिक, वैचारिक, सांस्कृतिक इ. क्षेत्रांत कांहीहि विशिष्ट कामगिरी नव्हती. ती कामगिरी पार पाडण्यासाठीं नव्या संस्था–शिक्षण, सहकारी व्यवसाय इ. नव्या स्वरूपांत अस्तित्वांत आल्या, व त्यांनी कुटुंबसंस्थेला कांही कामच ठेविलें नाही. पण रक्ताच्या नात्याचें लोक एकत्र रहात असल्याने ह्या कुटुंबांत मुलांचें संगोपन बरें होत असे. पण हा केवळ अनुषंगाने आलेला फायदा होता. आर्थिक रचनेच्या आधारेंच हें कुटुंब अस्तित्वांत आलें

असल्याने कुटुंबाच्या कर्त्या पुरुषांचें बरें वाईट झालें की ह्या कुटुंबाची धूळधाण होई. मागे राहिलेल्या लोकांत जे कोणी कर्तबगार, समंजस असेल तें ह्या उध्वस्त जीवनाचो बसाबस करण्याचा यत्न करी वा करतें. याचा अर्थच असा की ह्या कुटुंबाला समाजांत स्थान नाही, विशिष्ट कार्य नाही, केवळ आर्थिक सोयीच्या अनुषंगाने तें अस्तित्वांत आलें आहे. हें कुटुंब म्हणजे एक आदर्श समाजसंस्था म्हणून अभिमान बाळगण्यासारखी गोष्ट नव्हे. आज ह्या कुटुंबाची आणखीच वाताहत झालेली आहे. आर्थिक जीवन इतकें जिकीरीचें झालें आहे, की एका माणसाच्या मिळकतीवर सर्व कुटुंबाचा निर्वाह होणें हें कठीण झालें आहे. अशा परिस्थितींत स्त्रीलाहि बाहर पडणें व कर्त्यापुरुषाला आर्थिक साहाय्य करणें—म्हणजेच नोकरी इ. व्यवसाय करणें हें आवश्यक झालें आहे. ह्या नव्या परिस्थितींतलें कुटुंब हें 'कुटुंब' ह्या संज्ञेला दूरान्वयानेहि पात्र होईल की नाही याची शंका आहे. समाजशास्त्रदृष्ट्या तर हें 'कुटुंब' निश्चितपणें म्हणतां येणार नाहीं. याच दृष्टीने कुटुंबसंस्था जिवंत नाही असें वर म्हटलें आहे.

परंतु कुटुंबाबद्दलचें आकर्षण सांस्कृतिक, शैक्षणिक इ. आहे. विशिष्ट कुटुंबपरंपरेने मुलांचीं मनें चांगल्या रीतीने पोपिलीं जातात, संस्कारी होतात व हें काम प्रामुख्याने स्त्रीच्या योगाने होतें. तेव्हा आजच्या समाजरचनेंत मुलांच्या संगोपनाच्या वा संस्काराच्या, शिक्षणाच्या दृष्टीने असें कुटुंब हें आवश्यक आहे, उपयुक्त आहे असेंहि म्हणतां येईल. असा एक युक्तिवाद करतां येईल वा पुष्कळ लोक करतातहि त्याची छाननी केली पाहिजे.

कुटुंबास विशिष्ट कार्य आहे काय !:— शिक्षणाच्या—विशेषतः लहान मुलांच्या—दृष्टीने हें कुटुंब वा कुटुंबसंस्था आवश्यक आहे-हें म्हणणें पूर्णत्वाने खरें नव्हे. शिक्षणाची जबाबदारी आज कुटुंबाची जबाबदारी नव्हे, राष्ट्राची आहे. राष्ट्रें ही जबाबदारी ओळखीत आहेत, प्राथमिक शिक्षण राष्ट्राने द्यावें असा विचार सर्व जगांत मान्य झालेला आहे. त्या दृष्टीने कुटुंबसंस्थेचें शैक्षणिक कार्य कमी झालें आहे. पूर्व प्राथमिक शिक्षणाकडेहि राष्ट्रांचें लक्ष जात आहे; नव्हे तें लवकर गेलें पाहिजे. थोड्या कालांत तें जाईल व मग सहाजिकपणें 'कुटुंबसंस्थे' वरला तो भार आणखी कमी

होईल. दुसरें असें की, जीवनाच्या सर्व शाखांचें विशिष्टीकरण (स्पेशलायझेशन) होत आहे, प्रत्येक गोष्टीसाठी 'तज्ज्ञा' ची जरुरी भासत आहे. या गोष्टींत शिशुशिक्षणाचा प्रवेश मागेच झाला आहे. आणि मुलांना शिक्षण–तज्ज्ञाचें द्वारें शिक्षण दिलें जाणें शक्य आहे. नवनवें मानसशास्त्रीय ज्ञान व नवनवीं शिक्षणार्चीं साधनें व्यक्तीच्या वा कुटुंबाच्या विकत घेण्याच्या वा प्राप्त करण्याच्या कक्षेच्या पलीकडे जात आहेत. मुलाच्या ज्ञानाच्या वृद्धीच्या दृष्टीनेहि त्याच्या वाढीला कितीहि शिक्षित माता-पिता असोत, ते अपुरे पडूं लागले आहेत. अशा परिस्थितींत जर कांही करतां येण्यासारखें असेल तर त्या स्त्रीला व्यक्तिगत विविध प्रकारचें स्वास्थ लाभेल असें जीवन निर्माण करणें–म्हणजेच सर्व समाजाचें जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न करणें होय. आणि आजच्या सर्व सामाजिक, राजकीय, आर्थिक... चळवळींचा रोख तिकडेच आहे. त्या बाबतची कर्तव्यें व्यक्तीचीं आहेत कुटुंबाचीं नव्हेत.

आजच्या एकंदर पुरुषांच्या जबाबदाऱ्या राज्यसंस्थेने घेतल्या आहेत.[1] हें क्षेत्र अधिकाधिक वाढत आहे. उदाहरणार्थ कुटुंबाचें संरक्षण करणें ही कुटुंबप्रमुखाची जबाबदारी. पण तें काम आता राज्यसंस्थेने घेतलें आहे असें म्हणतां येईल. कुटुंबीयांना पोसण्याची पण त्याचीच जबाबदारी, हीहि जबाबदारी राज्यसंस्थेने स्वीकारावी असा विचार सर्वदूर रुढ होत आहे व त्यासाठीच समाजवादाचा पुरस्कार केला जातो. शिक्षणाच्याहि बाबतींत तसेंच म्हणतां येईल. प्राथमिक शिक्षण राज्यसंस्थेने घेऊन पुरुषांना साहाय्य केलें आहे. पुरुषप्रधान समाजरचना असल्याने हें झालेलें आहे. ह्या समाजरचनेंत स्त्रियांना प्राधान्य असतें तर प्राथमिक शिक्षण सक्तीचें करण्यापूर्वी, ज्या मातृत्वाचा उदोउदो केला जातो, त्या मातृत्वाचें मूळ म्हणजे प्रसूति–तीबाबत कांही विशिष्ट सवलत देणें योग्य ठरलें असतें. उदा. प्रत्येक स्त्रीच्या प्रसूतीचा खर्च सरकारने सोसावयास हवा इ. पण आजची समाजरचना इतकी पुरुषी आहे की या कल्पनेचा उपहास वा टिंगलच केली जाईल. असो.

ह्या सर्व विवेचनावरून हें स्पष्ट होईल की, कुटुंबसंस्थेला आज जी

१ 'रसेलनीतीं'त या विचाराचें अधिक विवेचन आलें आहे.

अवस्था प्राप्त झाली आहे ती प्रामुख्याने आर्थिक घडामोडीच्या योगाने झालेली आहे. किंबहुना त्यामुळेच स्त्रीला अर्थोत्पादनाची गरज भासली आहे. आणि त्यामुळे कुटुंबसंस्थेला नवें स्वरूप प्राप्त झालें आहे. हें कितपत विलोभनीय आहे हा ज्याच्या त्याच्या दृष्टिकोणाचा प्रश्न असला तरी तें अपरिहार्य आहे हें मात्र लक्षांत येतें. आणि मग अर्थातच कुटुंबसंस्थेला कांहीहि भवितव्य ह्या पुढच्या कालांत नाही, हा निष्कर्ष मान्य करावा लागतो.

सोयीसाठी, सुरक्षितेसाठी, सामाजिक मान्यतेसाठी, रक्ताच्या व प्रेमाच्या नात्याचीं माणसें एकत्र राहतात व राहतीलहि. आजपर्यंतच्या कुटुंबसंस्थेचा पाया केवळ 'स्त्री' होता. तो तसा ह्यापुढे राहणें अशक्य आहे. आजपर्यंत कुटुंबांतहि स्त्री–प्रधान व्यवहार व पुरुषप्रधान व्यवहार अशी कोटकोरपणे विभागणी झालेली असे. पहिल्याशी पुरुषाचा संबंध नाही, व दुसऱ्याशी स्त्रियांचा नाही. पण अशाप्रकारें केवळ एकत्र राहणें म्हणजे 'कुटुंब' संस्था जिवंत असणें नव्हे.

भावी सहकार्याचें स्वरूपः— स्त्रीचें मानवीसंस्कृतीबरोबर समाजांतलें स्थान कसकसें बदललें व व्यक्तिदृष्ट्याहि तिच्या जीवनांत आंतर्बाह्य फरक कसकसें होत गेले ह्याचें एका विशिष्ट दृष्टींतून हें विवेचन केलें. शेवटीं स्त्रीशी संबंधित असलेल्या कुटुंबसंस्थेच्या भवितव्याचा विचार केला. स्त्री व पुरुष यांचे सामाजिक संबंध यापुढें खऱ्या समतेवर कसे आधारले जाणार आहेत याचें दिग्दर्शन केलें. नीतीच्या क्षेत्रांतहि स्त्रीपुरुष संबंधांनाच महत्व असतें, ते संबंध कसकसे बदलत आले हें खोलांत जाऊन दाखविणें ह्या ठिकाणीं उद्दिष्ट नव्हतें. पण हें स्पष्ट आहे की, यापुढें स्त्रियांना एका प्रकारचीं नीतितत्त्वें लावणें, व पुरुषांना दुसरीं असें चालेल असें वाटत नाही. कित्येकजण नेमकें ह्याच गोष्टीकडे बोट ठेवून स्वैराचारी प्रवृत्ति वाढतील असें म्हणूं शकतील, पण तें म्हणणें चूक आहे. पुरुषांवर बंधनें कमी आहेत म्हणून ते दुराचारी आहेत, असें नव्हे. तेव्हां स्त्रियांच्या बाबतींतहि असा अविश्वास दाखविण्याचें कारण नाहीं.

शॉची एक कल्पनाः— स्वतंत्र भारतांत स्त्रियांचें स्थान मानाचें रहाणार! प्रारंभीं भारतीय राज्यघटनेंतील उल्लेख केला, त्यावरून हें स्पष्ट

होईल. स्त्रियांचे कैवारी पंडित नेहरू हे आज फार मोठ्या अधिकाराच्या जागेवर आहेत. आणि ते ह्या दृष्टीनें प्रयत्नहि करीत आहेत. त्यांचे मतें तर विधिमंडळांत निवडून आलेल्यापैकी निम्म्यातरी स्त्रिया हव्यात. आज हें सर्वथा अशक्य वाटत असेल तरी पुढे मागे तें शक्य व्हावयाचें असेल तर दोघांच्यामध्यें जी समान भूमिका निर्माण व्हावयास हवी वा आज झालेली दिसते, ही समान भूमिका कसकशी निर्माण होत आली, त्या प्रक्रियेचें एका विशिष्ट दृष्टींतून विवेचन केलें. स्त्री व पुरुष यांचें सामाजिक सहकार्य कसें राहणार आहे व त्याचा आदर्श कसा असेल हें आज खरोखर कांहीं सांगतां येत नाही. त्याबाबत नुसत्या तर्कावर विसंबून रहावें लागणार आहे. समाजजीवनाचा आदर्श कसा असेल ह्या बाबत शॉच्या एका विचाराचा उल्लेख येथें करणें उचित होईल असें वाटतें. नेहरूंच्या वरील अपेक्षेप्रमाणें शॉची कल्पनाहि आज अशक्यांतच जमा होईल. तथापि ह्या ठिकाणीं जो दृष्टिकोण वापरला आहे त्याला परिपोषक ती कल्पना आहे व म्हणून तिच्या उल्लेखाने प्रस्तुत निबंधांतील दृष्टिकोण अधिक विशद होईल असें वाटतें. शिवाय जगांतल्या एका श्रेष्ठ विचारवंताचे विचार कळण्यास मदत होईल, म्हणून त्याचा उल्लेख करणें योग्य होईल असें वाटतें–तो म्हणतो की, राष्ट्रांतील (वा जगांतीलहि) सार्वजनिक जीवनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा ज्या जागा वा अधिकारपदें (उ. मंत्रिपदें, अध्यक्षपदें, सेनापति इ. इ.) असतात, त्या ठिकाणीं आज एकच व्यक्ति (स्त्री वा पुरुष) असते. त्याऐवजीं एक स्त्री व एक पुरुष ह्या दोघांनी विभूषित केलेली तो जागा असावी, दोघांना एक मत असावें व दोघांनी विचारविनिमय करून निर्णय घ्यावेत. ही प्रक्रिया इतकी पुढें न्यावी की, मतें देतांनाहि, एका व्यक्तीला एक मत न देतां, एक स्त्री व एक पुरुष या दोघांनी मिळून एक संयुक्त (कपल व्होट) मत असावें. आज ही योजना अवलंबून कांही विशेष वेगळें निष्पन्न होईल असें नव्हे. पण कोणी तरी राष्ट्राने वा इतर ठिकाणीं हा प्रयोग करून पाहण्यासारखा आहे खास.

स्त्री व पुरुष यांचें समाजांत कोणतें स्थान असणार आहे व स्त्रियांना सर्वत्र समान अधिकार इ. दिले असतां कोणतें पर्यवसान होईल हे जरी ज्याच्या त्याच्या विचारावर सोडून दिलें तरी, ह्या सर्वच प्रश्नाकडे

आदराने व सहानुभूतीने पाहणाराला ह्या कल्पनेचें महत्त्व वाटेल. तसें कांही झाल्याखेरीज मानवी संस्कृतीला आज प्राप्त झालेलें 'पुरुषी' स्वरूप नष्ट होणार नाही व दोघांनाहि (स्त्री व पुरुष ह्यांना) एकमेकांकडे अधिक सहानुभूतीने पाहण्याची संवय लागणार नाहीं.[1]

नवी दृष्टिः—मानवी संस्कृतीच्या विकासाबरोबर स्त्रीचें साहाय्य कसें झालेलें आहे व तिचें स्थान कसें बदलत आलें आहे ह्याचा उलगडा येथपर्यंत केला. यापुढें स्त्रीपुरुषांचे संबंध कसे राहणार आहेत या प्रश्नाकडेहि अंगुलिनिर्देश केला. स्त्रीविषयक आपल्या ज्या विविध समजुती आहेत त्या प्रामुख्याने कृषि-संस्कृतीच्या कालांत निर्माण झालेल्या आहेत. उद्योग-संस्कृतीबरोबर जो बुद्धिवाद आला तो व मानवी व्यापक सहानुभूति हीं एकंदरीने आपणांस परकी होतीं. आणि शेदीडशे वर्षांच्या परकीय राजवटीच्या कालांत अनेक नवनवीन विचार, कल्पना आल्या असल्या तरी त्यांच्या मूळाशी असणाऱ्या ह्या गोष्टी मात्र आपणांस अद्यापहि परक्याच आहेत.

स्त्रीविषयक विचारकल्पनांतहि ही गोष्ट स्पष्ट होते. स्त्री विषयीं पहिली समजूत त्या अबला आहेत, त्यांना एकंदरीनें घर हेंच ठीक आहे, बाहेरच्या जीवनाची दगदग त्यांना होणें शक्य नाही इ. प्रकारच्या विषयाने आलेली आहे. आपलें हें मत (ही समजूत) खरें आहे असें भासावें म्हणून निसर्गाचीहि साक्ष काढली जाते. आणि स्त्रीच्या मनाचे धर्मच वेगळे आहेत असाहि युक्तिवाद केला जातो. तथापि आतापर्यंत जें विवेचन आलें त्याच्या अनुषंगाने ह्या विविध कल्पना ह्या केवळ गैरसमजुतीवर आधारल्या आहेत, असें स्पष्ट होईल. त्या समजुती म्हणजे पूर्वकालीन समाजांतील स्त्रीजीवनाचा वैचारिक परिपाक होत. मनाने आपण बहुसंख्य लोक त्याच युगांत असल्याने त्या समजुतींचें भलेपण आपणांस आजहि प्रतीत होतें. पण जे कांही थोडे लोक याबाबतींत विचार करतात, त्यांचे विचार येथल्या विवेचनाच्या दिशेशी पोषक आहेत. अशा लोकांत आचार्य दादा धर्माधिकारी हे प्रमुख होत. ते आपल्या स्त्रीविषयक निबंधांत म्हणतात 'आपण म्हणाल... स्त्रियांचा दुबळेपणा नैसर्गिक आहे...

[1] ह्याच प्रकारचे विचार (या निबंधांतील) आचार्य दादा धर्माधिकारी ह्यांनी अलीकडे व्यक्त केले आहेत. साधना...जून १९५२.

पण स्त्रीची ही प्रकृति नव्हे— हा परंपरागत संस्कार आहे, एवढें मात्र निश्चित सांगूं इच्छितो. त्यांत निसर्गाला बोल लावणें चुकीचें आहे. शिवाय दुबळेपणा हा शरीराचा धर्म असला तरी मनाचा धर्म होतां कामा नये. मन कमकुवत नसलें म्हणजे झालें. या बाबतींत स्त्रियांना पुरुषांवर सरशी करतां येईल. ज्याचें मन दुबळें आहे त्याची उन्नति होणें शक्य नाही. फार काय दुबळ्या मनांत कोमल भावनाहि राहूं शकत नाही.' [१]

पण सामान्यतः याच विशिष्ट समजुतींच्या समुच्चयाच्या आधारावर आपले स्त्रीजीवनविषयक विचार स्थीर झालेले आहेत. त्यांचा त्याग करून व्यक्ति म्हणून पाहण्याचा दृष्टिकोण अधिकाधिक प्रसृत झाला पाहिजे. स्त्रियांचे नैसर्गिक मनोधर्म पुरुषांहून भिन्न असतात हीहि एक अशीच असत्य समजूत आहे. कृषिसंस्कृतींतील स्त्रीपुरुष यांच्या जीवनांत जी भिन्नता आली होती तिला 'शास्त्रीय' स्वरूप देण्याचा तो एक यत्न आहे. प्रत्यक्षांत स्त्री व पुरुष यांचे मनोधर्म सारखेच असतात. एकाच मानव्याचीं हीं दोन अंगें आहेत. त्यांच्यांतील परस्परपूरकता ही प्रायः शारीरिक आहे, इतर बाबतींत समानता आहे. मिसेस् व्हायोला क्लीन (Viola Clein) ह्या बाईनी आपल्या 'Feminine Character' या प्रबंधांत याच विषयाचें शास्त्रीय दृष्टीने साधार विवेचन करून दोघांचे मनोधर्म, आशाआकांक्षा इ. समान असतात असा निष्कर्ष काढला आहे. या निबंधांत त्यांच्या मतांचा मधून मधून उल्लेख केला आहेच. एका स्त्रीने काढलेला हा निष्कर्ष म्हणून तो अधिकच महत्त्वाचा आहे.

सरतेशेवटीं एकंदर विवेचनाचा समारोप करावयाचा. या पुढील समाजव्यवस्थेंत स्त्री व पुरुष यांच्यांत सर्व क्षेत्रांत समानतेची भावना इ. प्रभावी राहील. मातृत्व व शिशुसंगोपन आणि शिशुशिक्षण हीं स्त्रीकडे निसर्गानें थोड्या प्रमाणांत व मनुष्यांनी मोठ्या प्रमाणांत सोपविलेलीं कामें होत. तीं या पुढें व्यक्तिगतदृष्ट्या एकट्या स्त्रीवर सोपविणें हें चूक आहे. राज्यसंस्थेने त्यांची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर आपणांकडे घेतली पाहिजे. बालकांचीं मनें संस्कारी बनविणें, त्यांना विविध प्रकारच्या उदात्त भावनांचें शिक्षण देणें, ही राष्ट्राची जबाबदारी आहे. स्त्रीची व्यक्तिगत किंवा कुटुंबाची

१. 'निबंध परिमल' पृ. १०७.

नव्हे. या दिशेनें अधिक साक्षेपी स्वरूपाचे प्रयत्न व्हावयास हवेत. समानसंधि उपलब्ध करण्याचा तो पहिला टप्पा आहे.

सर्व क्षेत्रांत समानता हा परवलीचा शब्दः— त्याप्रमाणें सर्वच क्षेत्रांत समानत्वाची भावना पोसिली गेली पाहिजे. आर्थिक, सांपत्तिक (मालत्तेच्या वारसा प्रश्नाबाबत) या क्षेत्रांत जशी ही दृष्टि अधिकाधिक प्रमाणांत वापरावयास हवी, तद्वतच नैतिक वा व्यक्तिगत क्षेत्रांत आज आपल्या नैतिक कल्पना पुरुष पक्षपाती आहेत. स्त्री व पुरुष यांच्या हातून समान सामाजिकदृष्ट्या असंमत (वा अनैतिक) कृत्य घडलें तर पुरुषापेक्षा स्त्री ही अधिक दोषी धरली जाते, तिला समाजांत तशी वागणूकहि मिळते. समाजाची नीति ही स्त्रियांवर अवलंबून असते असें म्हणण्यापर्यंत कित्येकांची मजल जाते. त्याद्दृष्टीने तिची अतिरिक्त स्तुति, पूजा हीहि केली जाते. 'कुपुत्रो जायेत क्वचिदपि कुमाता न भवति' असेंहि म्हटलें जातें. पण ही भावना केवळ वरवरची आहे. प्रत्यक्षांत तिला समाजांत अधिकार नाहीत, नव्हते हें पाहिलें. तसा एकांगीपणा यापुढें राहतां कामा नये.

मानवतेचें, मानवजातीचें भवितव्य उज्ज्वलतेने रेखाटण्याचा पुरुषांकडून प्रयत्न होत असतो. त्यांना ती उत्कंठा लागलेली दिसते. पण पुरुषाप्रमाणें स्त्रीलाहि मानवतेचें भवितव्य घडवावयाचें आहे, ह्या गोष्टीकडे आपलें सामान्यतः दुर्लक्ष होतें. किंबहुना तिच्या या बाबतच्या विचारांची दखलगिरी घेतली जात नाहीं. तिचेंहि कांहीं याबाबत म्हणणें आहे, असेल ही गोष्ट विचारांतहि घेतली जात नाही. आजपर्यंत काय झालें असेल तें होवो, पण या पुढच्या कालांत मानवतेचा हा दीप स्त्री व पुरुष या दोघांनीहि हातांत धरावयाचा आहे, तेवता ठेवावयाचा आहे. ती कोणा एकाची जबाबदारी वा मक्तेगिरी नाहीं. यापुढच्या कालांत ही नवी स्त्री पुढे येणार आहे. पुरुषापेक्षा तिचा झगडा अधिक उज्ज्वल आहे, तो मातृत्वानें, वात्सल्याने भरलेला आहे. तिचाच पूर्णपणें विजय होणार आहे. मग पुरुष हें ओळखो अगर न ओळखो.

—o—

प्राचीन मराठी साहित्यांतील स्त्रीजीवन

आधुनिक मराठी वाङ्मयांतील स्त्रीजीवनाचें जें प्रतिबिंब पडलेलें आहे त्याची चिकित्सा करतांना पूर्वसूत्र म्हणून प्राचीन मराठी साहित्यांत स्त्रीजीवनाचें जें प्रतिबिंब पडलें आहे त्याची दखलगिरी घेणें आवश्यक आहे. आधुनिक काल किंवा वर्तमान हा प्राचीन वा भूतकालांतून उत्क्रांत झालेला असतो आणि त्याचेबरोबर जीवन आणि संस्कृति हीहि पण. सहाजिकच ऐतिहासिक दृष्टीने विचार करतां पूर्व कालाचा उल्लेख करणें आवश्यक ठरतें. आधुनिक मराठी वाङ्मयास प्राचीन मराठी वाङ्मयाची व संस्कृत वाङ्मयाची व्यापक पार्श्वभूमि आहे. म्हणूनच आधुनिक वाङ्मयांतील स्त्रीजीवनाचा विचार करण्यापूर्वी पूर्व कालीन साहित्यांतील आधारभूत स्त्रीजीवनाचा विचार करणें आवश्यक आहे असें वाटतें.

साहित्यांतील वास्तव व आदर्श:—ह्या प्रबंधामागील लेखकाची भूमिका ही केवळ वाङ्मयसमीक्षकाची नाही. पूर्वकालीन साहित्यांत ज्या स्त्रीभूमिका आल्या आहेत त्यांचें स्वभावलेखनात्मक दिग्दर्शन करणें हें याठिकाणीं उद्दिष्ट नाही. तर त्या स्वभावचित्रांतून वा इतर उल्लेखांवरून तत्कालीन समाजांतील स्त्रीजीवनविषयक मूल्यांचें, ध्येयांचें कसें दिग्दर्शन होतें, व हीं चित्रें रंगवितांना (तत्कालीन समजुतीप्रमाणें) आदर्श व वास्तव असें दोनही प्रकारचें जीवितदर्शन कसें होतें ह्याचें परीक्षण करणें हें आहे. अक्षर साहित्यांतील स्वभावचित्रें वा तत्सम उल्लेख हे त्रिकालातीत असतात, स्थलकाल बंधनाच्या पलीकडे असतात.[१] असें म्हटलें जातें. त्या साहित्यांत सर्वकालीन लोकांना मोहित करील असे गुण असतात, अशीहि समजूत सर्वदूर रूढ आहे.[२] प्राचीन वा पूर्वकालीन साहित्यांत अत्यंत

---

१ प्रो. फडके : साहित्य आणि संसार

२ ,, ,, ,, ,, ,,

आकर्षक चित्रें, प्रसंग, व्यक्ति, इ. चें चित्रण झालेलें असतें हें खरें आहे. साहित्याच्या श्रेष्ठपणाचें तें एक महत्त्वाचें गमक आहे हेंहि मान्य आहे, तथापि ह्याच विचाराची दुसरीहि एक बाजू तितकीच महत्त्वाची आहे. व ती म्हणजे मानवी संस्कृतीबरोबर मानवांतर्गत रसिक वृत्तीचाहि विकास झालेला आहे. आणि आज आपणांस तीं चित्रें त्रिकालातीत भासतात ह्याचें कारण खरोखर ती त्रिकालातीत असतात असें नव्हे तर आपल्या रसिकतेच्या जोरावर तशीं तीं आपण मानून घेतों. अक्षर वाङ्मयांतील स्वभावचित्रें हीं मूलभूत मानवी भावनांना आवाहन करणारीं असतात. व म्हणून तीं सदैव चित्ताकर्षक राहतील असाहि कित्येकांचा कयास आहे.[1] तथापि अशा चिरंतन मानवी भावना आहेत काय व असल्यास त्या कोणत्या हे प्रश्न विवाद्य आहेत. लेखकाचे मतें मानवी भावना ह्या प्रायः कालसापेक्ष असतात. विवक्षित काळीं जीं जीवितमूल्यें असतात त्यांचा मानवी मनावर खोल परिणाम होतो, त्या आधारें विशिष्ट मानवी भावनांना महत्त्व येतें. व ह्याच मानवी भावना ह्या साहित्याचा विषय होत.[2] उ. पूर्वकालांत राजा, परमेश्वर, नीति, धर्म हीं मूल्यें मानवांस प्रमाण वाटत होतीं. त्या आधारें साहित्यांत, भक्ति, इ. रस महत्त्व पावले. आज आपण व्यक्तिस्वातंत्र्य, राष्ट्रप्रेम, मानवप्रेम, कलाप्रेम इ. मूल्यें मानतों. त्या आधारें विशिष्ट मानवी भावनांना साहित्यांत स्थान मिळतें. ह्याच दृष्टिकोणाचा अवलंब करून पूर्वकालीन साहित्यांतील स्त्रीजीवनविषयक प्रतिबिंबाचें व विविध उल्लेखांचें विहंगमदृष्टीने समालोचन करण्याचें ठरविलें आहे. पूर्वसूत्र वा पार्श्वभूमी म्हणून त्याला महत्त्व आहे असें वाटतें.

पूर्व काळांतील साहित्यांतील स्त्रीजीवनाचें परिशीलन करावयाचें म्हणजे प्राचीन मराठी साहित्यांतील तद्विषयक उल्लेखांचा वा प्रतिबिंबाचा उल्लेख करावयाचा. परंतु प्राचीन मराठी कवींची जीवनविषयक एकंदर भूमिका ही संस्कृत वाङ्मयाच्या वा तत्त्वज्ञानाच्या आधारें निश्चित झाली आहे. काव्य व साहित्य या बाबतींत त्यांनी आदर्श संस्कृतचेच पुढे ठेविले

---

१ फडकेः साहित्य आणि संसार.

२ अधिक विवेचन ' कलानीतिवाद ', ' साहित्य आणि संस्कृति.'

आहेत असें दिसतें.[१] ह्याचाच अर्थ असा कीं त्यांच्या भोवतालची परिस्थिति ही संस्कृत काव्यप्रणित आदर्श त्यांना स्वीकार्य वाटावा अशी होती. तेव्हां प्राचीन मराठी साहित्यांतील विवक्षित गोष्टींचें परिशीलन करतांना संस्कृत साहित्याकडे वा त्यांतील विवक्षित गोष्टींकडे लक्ष द्यावें लागतें व म्हणूनच प्रथम अत्यंत स्थूलमानाने संस्कृत साहित्यांतून स्त्रीविषयक जें प्रतिबिंब आढळतें त्याचें परिशीलन करणें आवश्यक आहे.

प्राचीन कालांतील कलाकृतींचा रोख एकंदरीने आदर्श गोष्टी रंगविण्याकडे आहे. चित्र वा शिल्पकलेंतील कांही गोष्टींकडे लक्ष दिलें तरी आपणांस हेंच आढळतें.[२] बुद्धाच्या मूर्तीचें अवलोकन केलें तरी हीच गोष्ट प्रतीत होते. बुद्धाची मुद्रा जशी प्रसन्न दाखविण्याचा प्रयत्न शिल्पकाराने केलेला दिसतो तशी बुद्धाची शरीरयष्टी पण. साहित्यांत सुद्धा आपणांस हेंच आढळून येतें. आदर्श अशा राजपुरुषांचीं व स्त्रियांचीं चरित्रें रंगविणें व त्या द्वारां सर्वसाधारण समाजास सत्पवृत्त करणें हा एकंदरीने कवींचा उद्देश दिसतो.[३] आणि व्यापकतेने पाहतां तत्कालीन समाजाची साहित्याकडे इ. पाहण्याची दृष्टि पण तशीच होती. वास्तव चित्रण साहित्यांत वा चित्र इ. कलांतून असावें हा आग्रह एकंदरीने आधुनिक व विशेषतः पाश्चात्य वाङ्मयाच्या परिशीलनाने वा त्यांतील कांही समालोचकांच्या मतांवरून आलेला दिसतो.[४] विशेषतः ॲरिस्टॉटल् ह्या ग्रीक विचारवंताच्या मतांतून ह्या विचाराचा उद्गम दिसतो. प्राचीन कालांत आपलेकडे हा विचार निर्माणच झाला नाही. यांचें कारण सर्वसाधारणपणें भौतिक परिस्थिति कमालीची प्रतिकूल असावी. इतकी कीं तिच्यांत कांही सुधारणा होणें शक्य आहे हा विचारच शिवला नसावा. एकंदरीने वास्तवाकडे जो आजच्या साहित्याचा ओढा आहे तो बराच आधुनिक आहे असें म्हणतां येईल.

यामुळेंच प्राचीन साहित्यांत समकालीन परिस्थितीचें प्रतिबिंब फारच पुसट रीतीने पडलेलें आढळतें. समकालीन गोष्टींचा कोठेना कोठेतरी स्पष्ट

१ आधार: तसे उल्लेख प्रमुख प्राचीन कवींच्या काव्यारंभीं आढळतात.

२ दाभाडे: कलाविषयक निबंध.

३ जावडेकर: प्रस्तावना, ज. स. करंदी. रामायण समालोचना प्रस्ता. इ.

४ आधार: ॲरिस्टॉटल्चें मत.

उल्लेख असावा ही कल्पना आजची आहे. प्राचीन कवींपुढे हा प्रश्न निर्माणच झालेला नव्हता. त्यामुळे त्यांनी विषय निवडतांना त्यांच्या प्राचीन साहित्यांतील आदर्श व्यक्ति इ. चें चरित्र रंगविणारे विषय निवडले. त्यामुळे सहाजिकच समकालीन उल्लेख आणखी दुर्मिळ होतात. अशा परिस्थितींत कांही ठराविक गोष्टींत फक्त ओझरते समकालीन उल्लेख सापडूं शकतात. उ. लग्नविधींत निरनिराळ्या गोष्टींचा क्रम इ., राजांचीं नांवे, हत्यारें वाद्यें इ. चीं नावें, नायिकेच्या अंगावरले अलंकार, वृक्ष, घोडे, जेवावयास केलेलीं पक्वानें, वस्त्रें व त्यांच्या पेठा इ. चा उल्लेख इ. यांतील कांही उल्लेख कवीने बुद्धिपुरस्सर काल विपर्यासाचा दोष पत्करूनच केलेले असतात. प्राचीन काव्यांत समकालीन घटना इ. चा उल्लेख नाही म्हणूनच तें काव्य कित्येक टीकाकारांना कमी प्रतीचें वाटतें.[1] उलटपक्षी तसं उल्लेख आहेत असाहि कित्येकांचा दावा असतो. व मग कर्णार्जुनांची लढाई वर्णन करतांना मोरोपंतांपुढे अमक्या लढाईचें चित्र पुढे उभें असेल,[2] व सामाराजाच्या काव्यांतील विशिष्ट उल्लेख वा वर्णन हें मराठ्यांच्या इतिहासांतील विशिष्ट प्रसंगावरून सुचलें असावें[3] इ. अंदाज करावे लागतात.

स्त्रीजीवनाचा विचार करतांनाहि ह्या अडचणींचा विचार करावा लागतो. प्राचीन मराठी वा संस्कृत साहित्यांत स्त्रीजीवनविषयक उल्लेख फारच त्रोटक, ओझरते, संदिग्ध अतएव अपुरे आहेत. आधारास असलेला प्रसंग हा पुराण इ. तील असल्याने तर समकालीन उल्लेखांचें क्षेत्र तर अधिकच संकुचित होतें. मग अलंकार, वस्त्रें, केशरचना, वस्त्र वापरण्याची शैली इ. मामुली स्वरूपाच्या गोष्टीच विचारांत घ्याव्या लागतात. सशोधनांतहि त्याच गोष्टींना महत्त्व प्राप्त होतें. पण ह्या बाह्य गोष्टी होत.

असें असलें तरी, साहित्याचें मोठेंपण वा अव्वलपण हें वादातीत आहे. कोणताहि कलाकार संपूर्णतया वास्तव वा संपूर्णतया आदर्श असें चित्र वा चरित्र रंगवूंच शकत नाही. आदर्श रंगवितांना त्याला वास्तवाचा आधार घ्यावा लागतो, व वास्तव आकर्षक वाटण्याकरिता, विशुद्ध वास्तवास थोडी मुरड घालून भडकपणाचें रंग फिके करावे लागतात तेव्हाच ते वाच-

---

१ आधारः राजवाडे, भावे, डॉ. सहस्रबुद्धे यांचीं मतें.

२, ३ आधारः पंगू, पांगारकर, भावे इ.

कांना 'वास्तव' वाटतें. ह्या न्यायाने प्राचीन कवींनी जरी आदर्श चित्रें रंगविलीं तरी त्यांतून त्यांच्या कालच्या वास्तव जीवनाच्या मर्यादा कोणत्या असाव्यात याची कल्पना येते. उलटपक्षी, एकादा आधुनिक लेखक अस्सल वास्तव उल्लेखांचा आधार घेऊन एकादा आदर्श भावानंद, अगर एखादा धोंडोपंत बर्वे निर्माण करूं शकतो.

ह्या दृष्टीने पूर्वकालीन साहित्यांतील स्त्रीजीवनविषयक चित्रांचें परिशीलन करूं लागलों तर प्राचीन साहित्यांतून पार्थिव जीवनाचें नयनरम्य दर्शन होत नसलें तरी वास्तवाच्या मर्यादा मात्र स्पष्टपणें दिसून येतात, व ह्या मर्यादावरून कांही एक निश्चित स्वरूपाचे निर्णय काढतां येणें शक्य आहे.

प्राचीन साहित्याचा विचार करतांना दोन प्रकारांचें साहित्यचित्रण विचारांत घ्यावयास हवें. सामान्यतः प्राचीन मराठी (वा संस्कृत) साहित्यांतील व्यक्ति ह्या रामायण महाभारत यांतून घेतलेल्या आहेत. परंतु अशा प्रकारें व्यक्ती ह्या जरी, रामायण भारतांतून घेतल्या असल्या तरी, त्यांचें रामायण भारतांतील चित्र व चरित्र आणि विशिष्ट कवीच्या काव्यांतील चित्र व चरित्र यांत फरक आहे. हा फरक कालामुळे पडलेला आहे, तसेंच त्या कालाबरोबर कवींचा दृष्टिकोण बदलला आहे. जीवनाचें आदर्शहि बदललें आहे, त्याप्रमाणेच मूळ कवींना साहित्य गुणांची जाणीव नाही, ती अनुवाद कर्त्याला तीव्र आहे, ह्या सर्व कारणांनी, मूळ चित्र व कवीने रंगविलेलें चित्र ह्यांत फरक पडला आहे. ह्याच कारणांमुळे वाल्मिकींची सीता व इतर कवींनी निर्माण केलेली सीता, व्यासांची द्रौपदी, वा शकुंतला व इतर कवींचीं हींच पात्रें ह्यांत बराच फरक पडलेला दिसून येईल. व तो प्रामुख्याने आदर्शविषयक कल्पनांत बदल झाल्यानेच झाला असला पाहिजे. व तसा झालेला आहे.

आणखी एका दृष्टीनें पाहतां ह्या दोन चित्रांमधला एक फरक स्पष्ट होईल. वाल्मिकी आणि व्यास ह्यांनी रचलेले ग्रंथ हे 'इतिहास' ग्रंथ आहेत. ते काव्यमय म्हणून महाकाव्यवजा असले तरी तीं 'आर्ष महाकाव्यें'[१] आहेत, म्हणजे त्यांतील चित्रण हें एकदम 'वास्तव' धरावें लागतें. उलटपक्षी इतर कवींनी अनुकृती करतांना हीं चित्रें 'आदर्श' मानलीं आहेत.

---

१ 'रामायण–समालोचना' प्रस्तावना.

हाहि फरक कालामुळेच झालेला आहे. तथापि या ठिकाणीं प्रथम व्यास वाल्मिकींच्या स्त्रीजीवनविषयक आदर्शांचा विचार करणें प्रथम युक्त होईल. सहाजिकच नंतर त्यांच्या अनुकृतींचा विचार संभवतो.

पूर्वकालांतील साहित्यांतील स्त्रीजीवनाची पहाणी करतांना प्रामुख्यानें प्राचीन साहित्यांतील नायिकांत रामायणाची नायिका सीता, व महाभारताची नायिका द्रौपदी ह्यांचींच चित्रें व चरित्रें ठळकपणें दृष्टीपुढे येतात. ह्या दोन स्त्रियांच्या चारित्र्याचा आदर्श आजपावेतों भारतीय स्त्रियांपुढें राहात आलेला आहे. आजच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या कालांत त्यांचा 'आदर्श' मानावयाचा काय हा मतभेदाचा प्रश्न होईल. तथापि सर्वसाधारण भारतीय व्यक्तींच्या अंतरंगांत या दोन स्त्रियांबद्दल गाढ आदर आहे व तो तसाच दीर्घकालपर्यंत राहील असें म्हणावयास हरकत नाहीं. भारतीय समाजानें प्रातःस्मरणीय आदर्श म्हणून ज्या स्त्रियांचें पंचक[1] मानलें आहे त्या पंचकांतल्या प्रमुख म्हणजे सीता व द्रौपदी ह्याच दोघीजणी होत. शिवाय त्या पंचकांतील इतर तिघींपेक्षा ह्यांच्या जीवनाविषयीची अधिक माहिती उपलब्ध आहे. त्या माहितींत परिस्थिति सापेक्षता अधिक आहे. व म्हणूनच टीकेचा विषय ती झाली आहे.

प्राचीन भारतीय जीवन व स्त्रीः—संस्कृत व प्राचीन मराठी काव्य ज्या कालांत निर्माण झालें तो काल म्हणजे या प्रबंधाच्या 'परिशिष्टां'त व पहिल्या प्रकरणांत उल्लेखिलेला "कृषिसंस्कृती" चा कालखंड होय. या कालांत स्त्रियांचें जीवन कशा प्रकारचें होतें ह्याचें दिग्दर्शन त्या विभागांत झालेलें आहे. ब्रि. पूर्व कालांत स्त्रियांना समाजांत व्यक्ति म्हणून स्थान नव्हतें असा उल्लेख तेथें केलाच आहे. साहित्यांतील विविध उल्लेखांतूनहि तीच परिस्थिति कशी व्यक्त होते तें येथे पाहावयाचें आहे.

वेदकालांत स्त्रीला बरोबरीचे अधिकार होते. पुढे त्यांचे 'अधिकार' कमी कमी होत गेले. पहिलें बंधन म्हणजे त्यांचा वेदाध्ययनाचा अधिकार कमी झाला. वेदकालांत पत्नीला पतीच्या बरोबरीने यज्ञयागांत अधिकार होते. पण ते तिचे अधिकार काढले गेले. संध्याबलि देण्याची परवानगी तिला असे. पण तीहि अमंत्रक देण्याची.

---

१ अहल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी ॥

सायमन्नस्य पक्वस्य पत्न्यमंत्रं बलिं हरेत् ।–मनुस्मृति ॥

पुढे स्त्रियांच्या उपनयनाचा अधिकार गेला. तिचा विवाह हेंच तिचें उपनयन. कारण पतिसेवा ही गुरुसेवेसारखीच. व घरकाम हें यज्ञकृत्य मानलें जाऊं लागलें. उ.

वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः ।
पतिसेवा गुरौ वासो गृहार्थोऽग्नि परिक्रिया । – मनु.

वेदसूक्तें रचणारी, ब्रह्मवादिनी म्हणून गौरविली जाणारी स्त्री स्मृतिकारांच्या मतें 'अविद्या' ठरली गेली.[1]

अर्थातच या कालांत स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला. ती मोक्षमार्गांतील अडचण झाली, शारीरिक सुखांचा मोह पाडणारी, व संसाराच्या जंजाळांत पकडूं पाहणारी स्त्री 'नरकमार्गस्य दीपिका' (योगशास्त्र) समजली जाऊं लागली. वेदांती पुरुषांचा स्त्रियांकडे तिरस्कारानें पाहण्याचा जो दृष्टिकोण आहे तो ह्याच कालांत निर्माण झाला.

यदि जिह्वा सहस्रंस्याज्जीवेच्च शरदा शतम् ।
अनन्य कर्मा स्त्रीदोषाननुक्त्वा निधनं प्रजेत् ।

अशी महाभारतकारांनी व

शय्यासनमलंकारं कामं क्रोधमनार्जवम् ।
द्रोहभावं कुचर्यां च स्त्रीभ्यो मनुरकल्पयत् ॥

अशी मनूने स्त्रियांची नालस्ती केली. मनूची तर स्त्रियांबद्दलच्या सहानुभूतिशून्य दृष्टिकोणाबद्दल प्रसिद्धीच आहे. मनुस्मृतींतील—

१ मात्रा स्वस्रा दुहित्रा वा न विविक्तासनभाग्भवेत् ।
बलवानिन्द्रियग्रामो विद्वांसमपि कर्षति ॥

२ पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने ।
रक्षन्ति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ॥

हीं वचनें मनूचा दृष्टिकोण किति कलुषित होता, ह्याची साक्ष देतात.

विशीलः कामवृत्तो वा गुणैर्वा परिवर्जितः ।
उपचर्यः स्त्रिया साध्व्या सततं देववत्पतिः ॥

अशा तऱ्हेनें पति हाच तिचा देव, पतीच्या मध्यस्थीवाचून तिला

---

१ टिळकः स्त्री जी. वि. प्रश्न पृ. ७.

पारलौकिक हिताचा रस्ताच नाहीं. पति हा कसाहि असला तरी त्याल देव म्हणून पूजिलें पाहिजे असे दण्डक स्त्रियांवर घालण्यांत आले.

मनु हा स्मृतिकारांचा प्रमुख आहे असें म्हणतां येईल. व सारे स्मृतिकार हे समाजशास्त्रज्ञ आहेत अशी सर्व सामान्य समजूत आहे. आणि ती सामान्यतः मान्य करावयास प्रत्यवाय नाही. मनूचें मत वा शास्त्रकारांचें मत आज मान्य करावें का नाही हा भाग वेगळा. पण तें मनूच्या व स्मृतिकाळीं सर्वसंमत होतें. ह्याचाच अर्थ असा की त्याकाळची परिस्थिति हीं असलीं मतें वा बंधनें आवश्यक आहेत असें माणसांस वाटावें अशी होती. म्हणजे ह्या कालांतील समाजशास्त्रज्ञाच्या मतांचा मागोवा घेतला तर त्यांना स्त्रीच्या व्यक्तित्वाच्या हक्कांची जाणीव होती असें दिसत नाही. वास्तविक व्यक्तित्वाची जाणीव हीच त्या कालांत परकी होती. मग तें पुरुषांचें असो अगर स्त्रियांचें असो. परंतु समाजरचना ही पुरुषप्रधान असल्याने पुरुषांचें फारसें बिघडलें नाही. तथापि स्त्रियांवर मात्र बरेच अन्याय झाले आहेत. अर्थात् 'अन्याय' ही कल्पना आपली आहे. त्यावेळच्या परिस्थितीच्या व ज्ञानाच्या दृष्टीने हें सर्व अपरिहार्य होतें.

सर्वसामान्यपणें अशी परिस्थिति असल्याने स्त्रियांचा एकमेव आधार म्हणजे पति होय. व त्याच्याशी तिच्या साऱ्या निष्ठा एकत्रित झालेल्या आहेत. शास्त्रकारांचें सांगणेंहि तसेंच आहे. त्यांचा परिणाम त्यांच्याहि मनावर झालेला आहे, त्यांतून 'पातिव्रत्या' सारखें जीवनमूल्य उत्क्रांत झालें आहे.

स्मृतिकारांच्या विचारांचा मागोवा घेतला असतां स्त्रियांची परिस्थिति किती परावलंबी होती हें स्पष्ट होतें. मग त्या परावलंबित्वाची शास्त्राच्या आधारें कितीहि बाजू मांडतां येवो[1] वा तिचें समर्थन करतां येवो.

रामायण व महाभारत-यांची साक्षः— रामायण महाभारतादि काव्यग्रंथांतून आलेल्या स्त्रीजीवनाचें परिशीलन केलें तरी आपणांस हेंच आढळून येते.

गतिरेका पतिर्नार्या द्वितीया गतिरात्मजः ।
तृतीया ज्ञातयो राजंश्चतुर्थी नैव विद्यते ॥ रामायण, २, ६१, ४४.

---

१ चापेकरः गच्चीवरील गप्पा "न स्त्री..."
व दा. म. निमकरः हिंदुलग्नसंस्था. प्र. ४ थें.

ह्या वचनांत म्हटल्याप्रमाणे स्त्रीला, पति पुत्र व ज्ञाति ह्या तीन गतींशिवाय चवथी गति नव्हती. आणि याच कारणावर कौसल्येने सीतेने रामाबरोबर वनांत जावें असें मत दिलें. सीता आदि श्रेष्ठ व उदात्तवृत्ति व्यक्तिलेखांचें चित्रण वाल्मिकी व्यास यांनी अत्यंत सहानुभूतीने केलें आहे ह्यांत शंका नाही. तथापि जातां जातां करून ठेविलेल्या उल्लेखांवरून व एकंदर त्यांच्या जीवनचरित्राची जी चित्रणा आपणांपुढे कवींनी ठेविली आहे तिच्याकडे लक्ष दिलें तर स्त्रीजीवनाचें परावलंबित्व कोणत्या थराला गेलें होतें तें स्पष्ट होते.

सीतेचें जीवनचरित्र पाहिलें तर काय आढळतें? आदर्श समाजरचनेचा एक नमूना म्हणून 'रामराज्या' कडे बोट दाखविलें जातें. व रामायणकालीं वा रामकालीं 'आदर्श' प्रकारचे संबंध स्त्री–पुरुषांत व मानवांमानवांत होतें असेंहि म्हटलें जातें. त्याचप्रमाणे समाजाची प्रवृत्ति धर्मानुकुल होती व अन्यायाकडे प्रवृत्ति होत नसे इ. इ.[1] तथापि हें मत बाजूला सारलें व केवळ सीतेच्या जीवनचरित्राकडे व्यक्तिची लोकयात्रा या दृष्टीने पाहाण्याचा प्रयत्न केला तर त्या पार्श्वभूमीवर रामायण कालांत जीवनाचें जें दिग्दर्शन होतें, तें, कदाचित् रामकालीन लोकांना 'आदर्श' वाटलें असेल पण आपणांस तें कमालीचें निर्जीव वाटेल. सीतेसारख्या सम्राज्ञीच्या, सत्प्रवृत्त,... सर्व गुणांनीं युक्त अशा स्त्रीच्या सुद्धा व्यक्तित्वाला रामराज्यांत काडीचेंहि स्थान नव्हतें. सीतेने शेवटीं भूमीला प्रार्थना करून आपल्या जीवनाचा शेवट केला आहे. याचाच अर्थ असा की रामकालीन समाजरचनेने सीतेला व तदनुषंगाने स्त्रीजीवनाला "दे माय धरणी ठाय" करून सोडलें होतें.

हें विधान थोडें जहाल वाटेल पण तें फारसें अतिशयोक्त नाही. तिचा कोणताहि अपराध नसतां रामाने तिचा परित्याग केला ही गोष्ट काय दर्शविते? हा परित्याग करतांना वा तो निर्णय घेतांना त्याने तिची कोणत्याहि प्रकारची संमति घेतली होती असा उल्लेख नाही. सीता ही महाराज्ञीपणास पात्र होती ह्याबद्दल कांही शंका व्यक्त करतां येईल असें वाटत नाही.

---

१ रामायण-समालोचना, भाग २रा.— हरदासः रामायणावरील व्याख्यानें.

तेव्हा तिची संमति राहूं द्या-पण विचारपूस करणें ही गोष्ट अशक्य नव्हती. पण रामाला त्या गोष्टीची जरुरी वाटली नाही. कारण तिच्या संमतीची इ. आवश्यकता आहे अशी कल्पनाच कोणाला येणें शक्य नव्हतें. त्याचप्रमाणे तिचा परित्याग केला तरी अज्ञात अशा अरण्यांत पोचविण्याचें काय प्रयोजन होतें; तें समजत नाही. नैतिक मूल्याच्या परिपालनासाठीं तिचा परित्याग करणें ही गोष्ट समजण्यासारखी आहे, पण तिचा अपराध नसतांना तिला एखाद्या अपराध्याप्रमाणें शासन होईल असें जीवन कंठावयास लावणें ही गोष्ट मानवी सहानुभूति किती खालच्या अवस्थेप्रत होती हें दाखविते. रामायणकालचे प्रजाजन रामावर प्रेम करणारे, त्यांनाहि सीतात्याग पसंत असेल असें नाही. पण त्यांनीहि आपल्या सम्राज्ञीचें काय झालें हें पाहण्याचा यत्न केला नाही.

बारकाईने पाहिलें तर रामाच्या मनांत तिच्याविषयी कांही तरी किंतू असावा असें दिसतें. 'रामायण–समालोचना' कारांच्या ध्यानांत ही गोष्ट आली आहे. 'सीता परगृहीं' फार दिवस राहिल्याने तिचा स्वीकार आपण करणार नाही असें रामाने ठरविलेलें असतें. सीतेनें रावण वधानंतर जें दिव्य केलें त्यापूर्वीचा हा प्रसंग आहे. रामाने आपला हा मनोदय सर्वांस व्यक्त केला होता. "सीतेच्या पावित्र्याविषयी वास्तविक रामाला पूर्ण विश्वास होता, व पूर्वीचें भाषण हें केवळ अपकीर्ति निवारणार्थ केलें हें सर्व प्रसिद्ध आहे व तसें रामाने बोलूनहि दाखविलें आहे (रामा. ६।११८।१६). या प्रसंगीं रामाने जें प्रथम भाषण केलें त्यांत सीतेला शेवटीं राम म्हणतो "हे भद्रे, मनाचा निश्चय करून तुला ही गोष्ट मी सांगितली आहे. आता तुझी इच्छा असल्यास लक्ष्मणापाशी अगर भरतापाशी–जेथे तुला वाटेल तेथे राहा. अथवा हे सीते, शत्रुघ्न, सुग्रीव अथवा राक्षस बिभीषण या पैकी कोणाजवळ किंवा तुला वाटेल तेथें तूं राहा" (रामा. ६।११५। २२–२३), [1] रामासारख्या पुरुषाने सीतेला हा उपदेश करावा ही गोष्ट खरोखर चमत्कारिक वाटते. त्यांत लक्ष्मण, शत्रुघ्न यांच्याबरोबर, सुग्रीव बिभीषणांचा उल्लेख केलेला आहे. कोणत्याहि स्वाभिमानी, निष्कलंक व पतिप्रेमी स्त्रीला हे उद्गार सहन होतील असें

१ रामायण–समालोचना, भाग १० वा. पृ. २९०.

वाटत नाही. व सीतेने शेवटीं अग्निदिव्य करून दाखविलें त्यामुळे रामाची भ्रमनिवृत्ति झाली असेल. पण अंतरंगांत कुठेतरी रोष असावा असें मानण्यास जागा ठेवणारे हे उद्गार आहेत.

ह्याहि प्रसंगाचें परिशीलन केलें तर हेंच आढळून येईल की सीतेच्या व्यक्तित्वाची अवहेलना होईल असे इतके प्रसंग आहेत की, त्यायोगें रामायण कालांत व्यक्तीला विशेषतः–स्त्रीला–स्त्री म्हणून वा व्यक्ति म्हणून स्थान होतें असें म्हणतां येणार नाही. सीतेसारख्या महाराणीची ही परिस्थिति तर सर्वसामान्य स्त्रीची काय असेल हें सांगतां येणें कठिण आहे. रामाच्या पित्याचा दशरथाचा ३५३० स्त्रियांचा 'जनाना' होता, ह्या एकाच गोष्टीवरून स्त्रीजीवनाला कोणती किंमत होती तें स्पष्ट होतें.

'रामायणा' ची 'खोड' काढण्यासाठी वा केवळ धक्के देण्यासाठी हें विवेचन नाही. लेखकाच्या मतें ब्रि. पूर्व कालांत व्यक्तित्व ही गोष्ट आस्तित्वांत नव्हती. व्यक्तीला समाजांत फारच कमी स्थान होतें. आणि स्त्रियांचें जीवन तर आणखीच परावलंबी होतें. मनू इ. स्मृतिकारांच्या आधारांनी समाजाची जी परिस्थिति अभिव्यक्त होते तिचेंच प्रतिबिंब रामायण भारतांत कसें पडलें आहे हें दर्शविणें हें उद्दिष्ट होतें. रामायणाची 'आदर्श' नायिका सीता हिच्या जीवनचरित्रावरून तत्कालीन व्यक्तिजीवनाची जी उंची कळते तिच्या आधारें तर आणखी आग्रहानें व आधाराने म्हणतां येतें की स्त्रीला व्यक्ति म्हणून या समाजांत स्थान नव्हतें.

रामायणाकडून महाभारताकडे वळलें तरी तेंच आढळतें. रामायण व भारतकालांत थोडा फरक आहे. रामायणकालीन वर्णव्यवस्था एका निराळ्याच अवस्थेंत आहे. निरनिराळ्या कारणासाठी समाजांत नियोगाची चाल पडली असावी असें दिसतें. कुंतीला नियोगाची परवानगी होती असें दिसतें. 'स्त्रीजीवनविषयक' दृष्टीने ही प्रगति दिसते. पण ती तशी नव्हती. कारण "वंशहानि टाळण्यासाठी नियोगाची योजना होती,"[१] तिच्यांत स्त्रीच्या संमतीचा भाग नव्हता. कुंती नियोगास तयार नव्हती पण पंडूने तिला तयार केलें. तसेंच "नियोगासाठी विधवेला (स्त्रीला) स्वातंत्र्य दिलेलें नाही. नियोगार्थ पुरुषाची निवड विधवेला स्वतःला करतां

१ हिंदुलग्नसंस्था पृ. ११२ [निमकरकृत].

येत नाही. " [१] ह्या वरून नियोगाची चालहि केवळ पुरुषांच्या सोयीसाठी आलेली आहे.

रामायणांत 'सती'चा उल्लेख नाही. विरहव्याप्त झालेली कौसल्या फक्त सती जाण्याची इच्छा व्यक्त करते. पण प्रत्यक्षांत तसें कांही घडत नाही. उलट महाभारतांत माद्री ही स्वत: पंडूबरोबर सती जाते. यावरून भारतीय सांस्कृतिक जीवनांतील हा 'मोठा' टप्पा ह्या कालांत स्त्रियांनीं गाठला होता असें म्हणतां येतें. सतीची कल्पना उज्ज्वल आहे हें खरें पण व्यक्तिस्वातंत्र्याच्या निकषावर ती घासली तर तिचें उज्ज्वलत्व एकदम लुप्त पावतें. तिला एकदम निरपराध स्त्रियांच्या हत्येचें स्वरूप प्राप्त होतें. भारतकालांत स्त्रीजीवनाची उंची किती होती हें यावरून कळून येतें.

द्रौपदीच्या चरित्राकडे लक्ष दिलें तरी काय आढळतें ! सीतेपेक्षां वेगळे निष्कर्ष हातीं येतात असें नव्हे. महाभारतांत पांच पती करण्याचें तिचें एकटीचेंच उदाहरण आहे. त्याहि गोष्टीची छाननी केली तर काय दिसतें ? स्वयंवरांत अर्जुनाला ती प्राप्त झाली होती. तथापि पांच पतींची पत्नी होण्याचें जें तें ताट तिच्यापुढें वाढले होतें त्यांत तिच्या संमतीची कोणाला जरुरी भासली आहे असें दिसत नाही. किंबहुना तिची संमति नव्हती म्हणून कांही अडलें आहे वा कांही अडचणी आल्या आहेत असेंहि नाही यावरून येवढेंच स्पष्ट होतें की, व्यक्तित्वाची कल्पना त्या काळाला परकी होती.

रामायण व महाभारत ह्या आद्यतम ग्रंथांतील प्रमुख स्त्रियांच्या जीवनवृत्तांतावरून त्याकाळीं स्त्रीजीवन कोणत्या प्रकारच्या परिस्थितींत होतें तें कळतें. रामायण व भारत ह्या ग्रंथांतून ज्या जीवितमूल्यांचा अविष्कार केला तींच जीवितमूल्यें समाजाने यापुढील कालांत मान्य केली. त्यामुळे हेच ग्रंथ यापुढील कालांत आदर्श व स्फूर्तिदाते ठरले आहेत. व ह्याच काव्यग्रंथांतून कवींनी आपले विषय घेतले आहेत. व ह्याच ग्रंथांतील विविध स्वभावलेखांच्या आधारावर आपलें वाङ्मय सजवलें. सहाजिकपणें ह्या काव्यांत जे 'जीवनाचे आदर्श' रंगविले आहेत त्यांचें परिशीलन प्रथम करणें आवश्यक वाटलें. ह्या काव्यांतील प्रमुख स्त्रीव्यक्तिरेखांचें अवलोकन

१ रामायण–समालोचना.

करतांना कोणते निष्कर्ष निघतात ह्याचा येथपर्यंत उहापोह केला. ह्या विवेचनांत समाजव्यवस्थेंत व्यक्तीला (विशेषतः स्त्रीला) कोणते स्थान होतें हें पाहावयाचें होतें. रामायण भारतकारांनी, ज्या सहानुभूतीने ही चित्रें रंगविलीं आहेत त्यावरून त्यांच्या महानुभावत्वाची साक्ष पटते व अधिकच आदर वाटावयास लागतो.

ह्या दोन महान् ऋषींनी ज्या मोकळेपणाने हीं चित्रें रंगविलीं आहेत तीं पाहिलीं की, ह्या महानुभाव ऋषींना व्यक्ति व तिच्या व्यक्तित्वाची कल्पना होती असें वाटतें. त्यांच्यापुढे असलेले व काव्यांत अंतर्भूत झालेले नैतिक प्रश्न जरी वेगळे असले तरी कवींची महानुभाव प्रज्ञा त्यांच्याजवळ असल्याने त्यांनी असल्या गोष्टींकडे दुर्लक्ष केलें नाही.

रामायण व महाभारत ह्या आर्षकाव्यांत सार्वकालिक भाग बराच आहे. आतापर्यंत निरनिराळ्या लेखकांनी जी चर्चा केली ती प्रामुख्याने त्या व त्याचा आधार असणाऱ्या तत्त्वज्ञानावर केली आहे. तथापि त्यांत सार्वकालिक भागाप्रमाणेच तात्कालिक भागहि कांही आहे.[1] समकालीन स्त्रीजीवनविषयक परिस्थितीविषयींचें जें दिङ्मर्शन होतें तें प्रामुख्याने येथे पाहावयाचें होतें. वाङ्मयांत वास्तव व आदर्श यांचें संमिश्र आविष्करण झालेलें असतें, त्यांपैकी 'वास्तवा'चें दिग्दर्शन रामायण महाभारतासारख्या 'आदर्श' काव्यांतून कसें होतें त्याची कल्पना या विवेचनाने येऊं शकेल.

तथापि स्त्रीजीवनाची ही सामाजिक बाजू झाली. ह्या सामाजिक पार्श्वभूमीवर जें 'आदर्श' अशाप्रकारचें स्त्रीजीवन अवतीर्ण झालें व कवींनी रंगविलें तें लोकांच्या आदराचा विषय व्हावा यांत कांहीच आश्चर्य नाही. सीता आणि द्रौपदी यांची पतिभक्ति ही संशयातीत आहे. पातिव्रत्य हें मूल्य स्त्रियांसाठी त्या कालांत उपलब्ध झालेलें होतें व त्या मूल्याचें परिपालन ह्या व्यक्तींनी अगदी प्राणपणाने केलेलें आहे. तें करीत असतांना व्यक्ति म्हणून जगण्याचा त्यांचा यत्न होता. कवीच्या चिकित्सक दृष्टीतून तो सुटलेला नाही. कवींनी ज्या सहानुभूतीने तो दर्शविला आहे ती सहानुभूति लक्षांत घेतली तर असें म्हणतां येतें की, व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार

१ संस्कृत काव्याचे पंचप्राण प्रस्ता. २५.

त्या काळीं समाजमान्य नसेल पण कवींच्या प्रतिभेलाहि त्याचा स्पर्श झाला नव्हता असें नव्हे. किंबहुना तसा झाला होता असें दिसतें, व म्हणून त्यांच्या व्यक्तिरेखा ह्या जिवंत वाटतात. वर उल्लेखिलेलाच प्रसंग आहे. रामाने तिचा स्वीकार करावयाचा नाही असा त्याचा मनोदय जेव्हा झाला त्यावेळीं तिने त्याला स्पष्ट बजावलें व विचारलें– "हे राजा ज्या वेळीं महावीर हनुमान् माझ्या शोधाकरितां पाठविलात, त्यावेळीं मी लंकेमध्ये होतें; तेव्हांच आपण "मी तुझा त्याग केला आहे" असें का कळविलें नाही? हे वीरा, या वानरानें मला तसें कळतिलें असतें तर आपण माझा त्याग केल्याचें कळतांक्षणींच मी जीविताचा त्याग केल असता; म्हणजे मग जीव धोक्यांत घालून आपल्यांला युद्धसंबंधी व्यर्थ-श्रम करावे लागले नसते व आपल्या सुहृज्जनानांहि निष्कारण क्लेश झाले नसते." (रामा. ६।११।११-१४).[1] हें तिचें उत्तर पाहिलें की, तिच्या जिवंत व्यक्तित्वाची साक्ष पटते. तिच्यावर जो असामान्य प्रसंग आला होता, त्या प्रसंगाला तोंड देतांना तिच्या विविध प्रकारच्या शक्ती नि निष्ठा कसास लागल्या पण ती त्या सर्वांस उतरली.

तथापि तिचा अंत हे अत्यंत शोकमय प्रकरण आहे. वाल्मिकींच्या बरोबर ती रामाकडे आली, त्यावेळींहि रामाने तिचा स्वीकार न करतां पुन्हा 'दिव्या'ची अट घातली. आणि तें पहातांच तिच्या मानवी भावनेस वेदना झाल्या. तिने इतर कोणत्याहि दिव्यापेक्षां मृत्यूचें दिव्य पत्करलें! सीतेसारख्या तेजस्वी स्त्रीचें चित्र वाल्मिकींनी ज्या सहानुभूतीनें रंगविलें आहे तें पाहिलें कीं दोघांबद्दलहि अतीव आदर वाटतो. पण इतक्या तेजस्वी व स्वाभिमानी स्त्रीला मानानें जिवंत राहूं देण्याइतपतहि त्या समाजरचनेंत लवचिकपणा वा कुवत नव्हती हें सिद्ध होत नाही काय? व्यक्तिगतदृष्टीने पाहूं गेलें तर सीतेचें स्वभावरेखाटन अत्यंत उर्जस्वल नि आदरणीय झालेलें आहे, पण त्या स्वभावचित्राची पार्श्वभूमि जी समाजस्थिति आहे ती मात्र आदरणीय वाटत नाही.

सीतेकडून द्रौपदीकडे वळलें तरी तेंच आढळून येतें. तिच्यावर आलेला दारुण प्रसंग कोणत्याहि समाजरचनेस व मानवतेस कलंक लावणारा

१ रामायण–समालोचना भाग १० पृ. ३१७.

असा आहे. अशाहि प्रसंगीं तिचें व्यक्तित्व जागृत होतें. धर्मराजाने द्यूतांत हरल्यानंतर तिला पणास लावलें असतें त्यावेळीं तेथील सभाजनांना व निरनिराळ्या आचार्यांना उद्देशून ती जे प्रश्न करते ते पाहिलें कीं तिच्या तेजस्वितेची साक्ष पटते. "स्वतः द्यूतांत हरलेल्या (धर्मराजाची) व्यक्तीची सत्ता त्याच्या कुटुंबियांवर राहते काय?" असा तिचा प्रश्न असतो व तिला भीष्मद्रोणादि आचार्यांचा निर्णय हवा असतो. पण त्यापैकीं कोणीहि तिच्या प्रश्नाचें उत्तर देऊं शकत नाही आणि निमूटपणें तिला पुढील अपमानास्पद जीवनास तोंड द्यावें लागतें! द्रौपदीचा प्रश्न हा महाभारतकालीन समाजरचना कोणत्या प्रकारची होती ह्याचें दिग्दर्शन घडवितो, आणि तिला जी वागणूक मिळाली ती स्त्रियांना त्या समाजांत कोणता 'मान' होता हें दर्शविते.

प्राचीन मराठी काव्यः – प्राचीन मराठी काव्यांत ज्या विविध नायिकांचें स्वभावचित्रण व त्याच्या अनुषंगाने स्त्रीजीवनाचें आविष्करण होतें त्याला रामायण महाभारत यांतील कथांची व स्वभावचित्रणाची पार्श्वभूमि आहे. सीता व द्रौपदी ह्यांनी भारतीय स्त्रियापुढे संस्कृतीला अभिप्रेत असणारे 'आदर्श' ठेविले आहेत. त्यांचें उल्लंघन करावेसें कोणास वाटलें नाही. काव्यांत ह्याच 'आदर्शां'चें स्थलकालसापेक्ष आविष्करण झालें. त्या आविष्करणांत व मूळ महाभारत यांतील आविष्करणांत थोडा फरक आहे. तो फरक परिस्थितींत बदल झाल्याने आहे हें सामान्यतः खरें असलें तरी विचारांत फरक झालेला नाही. सामान्यतः जीवनध्येयें तींच राहिलीं आहेत. त्या वाङ्मयांतील स्त्रीजीवनाचें प्रतिबिंब कसें पडलें हें पाहण्यापूर्वी प्राचीन भारतीय सांस्कृतिक प्रगतीचे प्रमुख गुण आणि दोष ह्यांची ओझरती कल्पना असणें आवश्यक आहे.

रामायण भारत कालानंतर समाज जीवनाला स्थैर्य प्राप्त झालें. व कृषिसंस्कृतीचें एक अंग संपून दुसऱ्या अंगास सुरवात झाली. सांस्कृतिक प्रगती झाली होती, तिला दार्ढ्य आलें. समाजजीवनाला आवश्यक असणारा लवचिकपणा कमी कमी होऊं लागला. प्राचीनकालांत भारतांत निरनिराळ्या शास्त्रांत, कलांत आश्चर्यकारक प्रगति झालेली होती. समाजव्यवहारशास्त्र, राज्यशास्त्र वा अर्थशास्त्र, इ. समाजव्यवहाराचा विचार करणारी शास्त्रें जशीं

वृद्धिंगत झालीं होतीं, तद्वतच, इतरहि शास्त्रांची 'शास्त्र' म्हणून प्रगति झाली होती. आगरकरांनी आपल्या "भारतीय कलांचें पुराणत्व"[१] ह्या लेखांत ह्या प्रगतीचें थोडें विवेचन केलें आहे त्या आधारें व इतर उल्लेखावरून एकंदर कल्पना येते. ह्या समाजोपयोगी शास्त्रांबरोबरच, इतर शास्त्रांचा विचार झालेला होता. उ. ज्योतिषशास्त्र, कामशास्त्र, अर्थशास्त्र, नाट्यशास्त्र, अलंकारशास्त्र, काव्यशास्त्र, अध्यात्मशास्त्र, नीतिशास्त्र, इ. विविध शास्त्रांतहि प्रगति झालेली होती.

ही सगळीं 'शास्त्रें' विकासाच्या एका मोठ्या टप्प्याप्रत आलीं होतीं असें दिसतें. भौतिक परिस्थिति प्रतिकूल असतांहि ह्या विविध शास्त्रांत जी प्रगति झाली ती पाहिली कीं भारतीय प्रज्ञेचें व प्रतिभेचें कौतुक करावेसें वाटतें.

रामायण भारत कालापूर्वीपासून ही प्रगति सुरू झाली होती. रामायण भारतकालीं त्यांचा व जीवनाचा संबंध तुटलेला नव्हता. पण पुढें मात्र तो तुटला. ह्या सगळ्या शास्त्रांच्या माऱ्यांत सापडलेलें मानवी जीवन इतकें हतबल, झालें कीं नियतीच्या व दैववादाच्या विचाराविना कोणताहि नवा विचार ह्या प्रदीर्घ कालांत मार्गदर्शक होऊं शकला नाही. जीवनाच्या सर्व व्यवहाराला अत्यंत साचेबंद स्वरूप प्राप्त झालें. उ. विवाह हा विषय घेऊं. दोन व्यक्तींचा विवाह व्हायचा हें ठरल्यानंतर त्या दोन व्यक्ती कोणत्या असाव्यात तर तें स्मृतींनी ठरवून दिलें असेल त्याप्रमाणें. प्रत्यक्ष विवाह कसा व्हायचा तें धर्मशास्त्राने ठरवून दिलेल्या मार्गाने. कोणत्या दोन व्यक्तींनी विवाहित व्हायचें हें वास्तविक आईबापांनी ठरवायचें. (कारण बालपणीं विवाह व्हावयास हवा असें स्मृतींनी अगोदरच ठरवून टाकलें होतें.) पण आईबापांना तरी 'स्वातंत्र्य होतें काय?' तेंहि नव्हतें. कारण त्यासाठी ज्योतिषशास्त्र विकसित झालें होतें. त्याला संमत असेल त्याप्रमाणेच सर्व झालें पाहिजे, अर्थात पत्रिका पाहण्याविना कोणता मार्ग आहे वा होता?[२]

---

१ आगरकर—लेख भाग २.

२ व्रतें वैकल्यें इ. चें प्राबल्य ह्याच कालांतलें. त्याचें विवेचन राजवाड्यांच्या व्रतविषयक ग्रंथाच्या चिकित्सेंत दिसून येतें.

काव्याचें उदाहरण घेतलें तरी हेंच आढळतें. काव्य म्हटल्यानंतर विषय कोणते ? रामायण भारतांतले. ध्येय कोणतें–चार पुरुषार्थांचें प्रतिपादन. काव्याची पद्धति कोणती ? काव्यशास्त्राला अलंकार–शास्त्राला संमत अशी. अशातऱ्हेने मानवी 'स्वतंत्र' तर्चे क्षेत्र मर्यादित, संकुचित झालें. सारें जीवन जसें परंपरावादी तसें काव्यहि.

प्राचीन मराठी काव्य लिहिलें गेलें तें अशा परंपरावादाने आक्रमलेल्या परिस्थितींत. ह्याचा परिणाम असा दिसून येतो की, रामायण भारतांतील मूळ चित्रांत जो जिवंतपणा दिसून येतो तो प्राचीन मराठी काव्यांत अत्यंत विरळत्वाने आढळून येतो. सर्वत्र संकेत बोजडता दिसून येते.

अशा प्रकारच्या समाजपरिस्थितींत प्राचीन मराठी काव्य निर्माण झालें आहे. महानुभावांचें काव्य हें कालगणनेनुसार प्राचीन मराठी काव्यांत आरंभीं झालें आहे. महानुभावांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण बराच सहानुभूतीचा होता.[1] त्या सहानुभूतींत दयेचा भाग अधिक होता. आदर्शाच्या बाबतींत मात्र इतर पंथियांपेक्षां इतर फरक कोणताहि नव्हता. महानुभावांच्या काव्यांत नरेंद्रांचें 'रुक्मिणीस्वयंवर' व भास्करकवींचें 'शिशुपालवध' हीं काव्यें प्रसिद्ध आहेत. पण ह्या दोन्ही काव्यांचा घाट व एकंदर शैली ही संस्कृत पंचमहाकाव्याला शोभण्यासारखी आहे. त्यामुळें एकंदर काव्यांतून कल्पकतेच्या विविध आविष्काराशिवाय वेगळें असें कांही आढळत नाही. ह्या दोनहि काव्यातील नायिकेचें वर्णन हेंहि ह्या गोष्टी केवळ मराठी भाषेंत आहेत, यापेक्षां मोठें अंतर संस्कृत काव्यांत व त्यांच्यांत नाही.

महानुभावीय साहित्यानंतर भक्तिपंथाची चळवळ सुरू झाली. स्त्री-

---

१ महानुभाव पंथांत स्त्रियांना घेतलें जात असे. त्यांना मज्जाव नव्हता. महदंबा आदि कवियित्रींची आठवण या संबंधांत होण्यासारखी आहे. रुढ हिंदुधर्माने स्त्रियांना मोक्षप्राप्ती करून घेण्याचा मार्ग उपलब्ध नव्हता. पण महानुभाव तत्त्वज्ञानाचा त्याला विरोध नव्हता. केवळ लिंगभिन्न म्हणून मोक्षप्राप्ती नाही असें नाही. महानुभावपंथी स्त्रियांच्या रजोदर्शन कालांत स्पर्शास्पर्श भेद मानीत नसत. त्यामुळे त्यांच्या विरुद्ध मत तयार झालें होतें. अशाप्रकारें महानुभावांचा दृष्टिकोण थोडा वेगळा होता हें खरें.

जीवनविषयक दृष्टिकोण भक्तिपंथीयांचा थोडा वेगळा आहे. त्याचें विवेचन करण्यापूर्वी इतर 'कथाकाव्य' आहे त्याचा विचार प्रथम करणें समुचित होईल. कारण ह्या कथाकाव्यांवर वर उल्लेखिलेल्या परिस्थितीचा परिणाम अधिक झालेला आहे. कवीच्या वेगळेपणाचा ठसा एकंदरीनें अल्प आहे.

कथाकाव्याच्या परंपरेंत महानुभावांनंतर एकनाथांच्या काव्यांचा विचार करावा लागतो. एकनाथांचीं प्रमुख काव्यें म्हणजे रुक्मिणीस्वयंवर व रामायण हीं होत. मराठी कवींचा स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण संस्कृत कवींपेक्षा विशेष भिन्न होता. विशेषतः स्त्रियांच्या सामाजिक स्थानाबद्दल वेगळें मत द्यावयाचे होतें असें म्हणतां येत नाहीं. त्या अभावी इतर प्रकारची भिन्नता मात्र आलेली आहे. उदाहरणार्थ एकनाथांच्या काव्यांत सीता व रुक्मिणी यांचें व्यक्ति म्हणून फारसें चित्रणच नाही. कवीच्या तत्त्वज्ञानात्मक भूमिकेच्या योगानें ह्या स्त्रियांना मायेचें स्थान प्राप्त झालें आहे. 'जिवा शिवा होतसे लग्न' हीच त्यांची भूमिका. श्रीकृष्ण वा राम हा शिव, व रुक्मिणी वा सीता हा जीव. दागिन्यांच्या व इतर वर्णनांतूनहि नाथांनीं आपली तत्त्वज्ञानात्मक भूमिका रेसभरहि ढळूं दिलेली नाहीं. हें त्यांचें मोठेपण आहे. पवढेंच.

एकनाथांनंतर त्यांचे नातू मुक्तेश्वर यांनी चांगल्या प्रकारची रचना केली आहे. प्राचीन मराठी काव्यांत मुक्तेश्वराचें स्थान बरेंच वरचें आहे ह्यांत शंका नाहीं. त्यांची पांच पर्वें प्रसिद्ध आहेत व संबंध भारतावर त्यांची रचना झाली असावी असाहि कांहींचा कयास आहे. त्यांच्या विविध काव्यांतून (पर्वांतून) शकुंतला, द्रौपदी, दमयंती इ. स्त्रियांचीं चित्रें आलेलीं आहेत. व्यक्तिगत दृष्ट्या पाहूं लागलें तर तीं चित्रें आकर्षकहि झालेलीं आहेत. पण स्त्रीजीवितविषयक दृष्टिकोण मात्र एकच आहे. निरनिराळे पंडित वा आख्यानक कवी आहेत त्यांच्या बाबतहि असेंच म्हणतां येईल.

ह्या कालखंडांतील साहित्यांत स्त्रीजीवनाचें जें आविष्करण झालें त्याचें स्वरूप लक्षांत घेण्यासाठीं कृषि संस्कृतींत स्त्रीजीवनाकडे पाहण्याच्या एका दृष्टिकोणाचा विचार करणें आवश्यक आहे. स्त्रियांना व्यक्ति म्हणून मानाचें स्थान नसलें तरी ही गोष्ट विशेष कोणाच्या लक्षांत आली नाही. साहित्य, कलावंत वा लेखक, कवि ह्याला अपवाद होते असें म्हणतां येत

नाही. तथापि त्यांच्या प्रतिभेच्या साहाय्याने ते स्त्रीजीवनाकडे सहानुभूतीने, भावनासुलभ दृष्टिकोणांतून पाहात होते. मानवी दृष्टींतून मानवी जीवनाकडे पाहणें हेंच साहित्यिकांचें वैशिष्ट्य. सर्वसामान्य समाजाच्या अगीं रूढ जीवन इतकें मुरून जातें की त्याच्या जीवनांत कांही अगतिकता आहे, कांही अन्याय आहे, कांही उणें आहे, ही गोष्टच ध्यानांत येत नाही. प्रतिभावंतांच्या दृष्टीस मात्र ती गोष्ट बरोबर दिसते, तें शल्य त्यांना बोचतें व जीवनांतली ही बोचणी काढून टाकून समाजाला उन्नत मनोभावनेप्रत न्यावें असा साहित्यिकांचा, कलावंतांचा यत्न असतो. ह्या कलावंतांच्या मोठेपणानेंच मानवी जीवनात उज्ज्वलपणा आलेला आहे.

स्त्रीजीवनाचें चित्रण करतांना ही दृष्टि कशी वापरली आहे हें पाहणें उद्बोधक होईल. समाजांत व्यक्ति म्हणून स्त्रीला कायदेशीर स्थान नव्हतें तरी साहित्यांत कलावंतांनी तें करून दिलें. स्त्रियांच्या ठिकाणीं असणाऱ्या उच्च नैतिक गुणांकडे कलावंतांचें, कवींचें लक्ष गेलें व त्यांनी त्या दृष्टीनें स्त्रीपात्रांचें वा एकंदर स्त्रीजीवनाचें चित्रण केलें. व्यवहारांत अगतिक, दुर्लक्षित झालेली स्त्री साहित्यांत सौंदर्याची खाणी, विनयशीलतेची, प्रेमाची मूर्ति बनली गेली. तिचा त्याग कलावंतांना दिसला. त्यांना तें त्यागपूर्ण जीवन अत्यंत नेत्रदीपक वाटलें व तें त्यांनी रंगविलें.

पंडित वा कलाकवींच्या काव्यांतील स्त्रीजीवनाची पाहणी करतांना कांही संकेत लक्षांत घेणें आवश्यक आहे. कलाकवींपुढे संस्कृत महाकाव्याचा आदर्श होता. या आदर्शाप्रमाणें पाहतां काव्य हें प्रायः कल्पना वा कल्पकता प्रधान असावें अशी समजूत सर्वत्र रूढ झालेली दिसते. या समजुतीप्रमाणें, काव्यांतील वर्णनांत कल्पकतेला व तिच्या पोटीं झालेल्या सौंदर्याला काव्यांत अगत्य महत्त्व असावे असें ठरतें. म्हणजेच काव्यांत रूपक दृष्टांत उत्प्रेक्षादि अलंकारांना अधिक महत्त्व असावें असें ओघानेच येतें. स्त्रीजीवनविषयक उल्लेखांची पाहणी करतांना ही वस्तुस्थिति ध्यानांत ध्यावी लागते. काव्याविषयीच्या या कल्पनेमुळे असें झालें आहे कीं बहुसंख्य कवींनी स्वयंवरात्मक काव्यें लिहिलीं आहेत. स्वयंवरात्मक काव्य हें घटनाप्रधान असतें. त्यांत स्वभावलेखनाला व व्यापक जीवन स्पर्शित्वाला वाव अल्प असतो. त्याशिवाय कवीचें धोरण हें प्रायः आशिर्वच मंगलगान

करण्याकडे असतें. त्यामुळें कवीच्या दृष्टिकोणासंबंधी अधिक महत्त्वाचे कयास काढणें चुकीचें ठरतें.

पंडीतकवींच्या काव्यांतहि ह्या सर्व गोष्टींचा प्रत्यय आल्याविना राहात नाही. पंडितकवींनी जीं नायिकांचीं वर्णनें केलीं आहेत तीं ठराविक कल्पनांनी युक्त अशींच आहेत. त्यांत शारीरिक सौंदर्य हें आदर्श धरलें आहे. नायिकेचे सर्वच अवयव अत्यंत सुंदर आहेत असें गृहित धरलेलें असतें. कवीच्या वेगळेपणाचा भाग म्हणजे त्यांत उत्प्रेक्षादि अलंकारांच्या योजनेने आलेलें सौष्टव होय. अशा परिस्थितींत प्राचीन मराठी कवींच्या काव्यावरून कवींच्या जीवनविषयक (विशेषतः स्त्रीजीवनविषयक) वेगळ असे निष्कर्ष काढतां येतील असें वाटत नाही. स्त्रीविषयी सर्वांची कल्पना सारखीच आहे. व ती कृषिसंस्कृतिअवस्थेतील स्त्रीजीवनविषयक कल्पनांना जुळती अशी आहे. त्याशिवाय त्रुटक वा स्फुट काव्यांतून विशेष लक्षांत येईल असा वेगळेपणा कमी. ज्यांनी—अगदी थोड्या कवींनी-सर्व महाकाव्य रचण्याचा प्रयत्न केला त्यांच्या काव्यांतून एतद्विषयक अधिक विस्तृत स्वरूपाचें उल्लेख असणें शक्य आहे. त्यांच्याहि बाबतींत असें आढळून येतें को, रामायण अगर महाभारत यांनी घालून दिलेल्या रेषाबाहेर जाण्याचा प्रयत्नच त्यांनी केला नाही. केवळ अनुषंगाने व अपरिहार्यतेने जर कांही फरक पडला असेल तर तो त्यांच्या काव्यांत आलेला असणें शक्य आहे. त्यापैकी एक भाग म्हणजे भक्तीचा पुरस्कार. संस्कृत पंचकाव्यांत वा रामायण महाभारतांत भक्तीचा भाव अभिप्रेत आहे असें वाटत नाही. उलटपक्षी मराठी कवींची भूमिका ही प्रामुख्याने भक्तिपर गुणगान करण्याची आहे. ही भूमिका असण्याचें कारण भक्तिमार्गाच्य संप्रदायाचा प्रसार हेंच होय.

ज्यांनी रामायण महाभारतांतील प्रसंगांवर विस्तृत रचना केली आहे अशा कवींत प्रामुख्याने मुक्तेश्वर, मोरोपंत, वामनपंडित, श्रीधर यांचाच उल्लेख करावा लागेल. यांच्याहि बाबतींत बारकाईने पाहतां रामायण महाभारत यांची संगति न सोडण्याचा त्यांचा प्रयत्न स्पष्टपणें दिसून येतो. ' सांडूनि व्यासाची संगति । चालों नये आणिके पंथीं । ऐसे जाणोनेया श्रोतीं । व्यर्थ विस्तार न मानावा । ' अशी मुक्तेश्वराची मनीषा

आहे. इतर कवींची मनोवृत्ति यापेक्षा वेगळी आहे असें म्हणतां येणार नाही. प्राचीन कवींच्या काव्य कृतींची पाहणी करतांना केवळ आधुनिक टीका वा परीक्षण शास्त्राचे निकष उपयोगांत आणणें हें विशेष समर्पक नाही. आधुनिक परीक्षणदृष्टि ही कलाकृतींचें सम्यक्दर्शन घेण्याचा व घडविण्याचा प्रयत्न करते. पूर्वकालीन कवींना व टीकाकारांनाहि ही दृष्टि अभिप्रेत नव्हती. त्यामुळे त्यांच्या टीका ह्या प्रामुख्याने स्पष्टीकरणाच्या (अर्थ व अलंकार यांचें स्पष्टीकरण करणाऱ्या अशा) स्वरूपाच्या झाल्या आहेत. कलाकृतींचें सर्वंकष दर्शन घेण्याचा व त्यादृष्टीने तिची पाहणी करण्याचा प्रयत्न हा एकंदरीने आधुनिक आहे. ह्या सम्यक् दृष्टींत स्वभाव-लेखनाचाहि समावेश होतो. आज आपण प्रत्येक व्यक्तीचा पिंड वेगळा आहे, मनोधर्म, संस्कार, इ. वेगळे आहेत असें गृहित धरून मग स्वभा-वाची पाहणी करतों. व्यक्तिवैशिष्ट्याची जाणीवही आपणांजवळ प्रभावी असते. पूर्वकालीन लेखक, कवि यांना ती जाणीव तीव्र नव्हती. त्यांच्या कल्पनेप्रमाणे मनुष्य स्वभावाचे सत्त्व, रज, तम, असे तीन प्रकार आहेत. या प्रत्येकाचे गुणधर्म वेगळे आहेत. नाट्य वा काव्यकृतींत स्वभाव-विश्लेषण करतांना विशिष्ट पात्र हें कोणत्या प्रकारांत पडतें, हें लक्षांत घेऊन त्याचें स्वभावविश्लेषण झालें आहे. या नियमाला अपवादभूत कोण असतील तर ते स्वतः रामायण व महाभारतकारच.

स्त्रीस्वभावलेखनाची पाहणी करतांना तर असें आढळून येतें कीं, त्यांच्यांत कवि लेखकांनी दोनच प्रकार कल्पिले आहेत. एक सत्त्वगुणी व दुसऱ्या तमोगुणी. सीता शकुंतला आदि बहुसंख्य नायिका ह्या सत्त्वगुणी आहेत, तर हिडींबा, शूर्पणखा, आदि अधम व ' अनार्य ' पात्रें हीं तमोगुणी वर्णिलीं आहेत. माणसांचे स्वभाव हे परिस्थिती, संस्कार, या-नुरूप ठरतात अशी आपली समजूत आहे, तर प्राचीन कवींच्या कल्पने प्रमाणे ते तसे ठरण्यास नियति वा दैव हेंच करणीभूत होतें. या समजुतीं-तल्या भिन्नपणामुळे स्वभावविश्लेषणांत (प्राचीन काव्यांत) विविधता एकंदरीने कमी आहे. कवींचा ओढा हा प्रामुख्याने नीतिवादित्वाकडे आहे. तें सूत्र सुटूं नये असा त्यांचा साक्षेपी प्रयत्न आहे. अर्था-तच विनय, लज्जा, सौंदर्य, पातिव्रत्य इ. गुणांचें आविष्करण प्राचीन

कवींच्या काव्यनाटकांतून स्त्रीस्वभावरेखा चित्रित करतांना झालें आहे.

या धोरणामुळेच प्राचीन कवींच्या काव्यांत स्त्रीस्वभावाच्या लेखनांत कविपरत्वें थोडासा भेद दिसून येत असला तरी तो महत्त्वाचा दृष्टिकोणात्मक भेद नाही. त्यांत व्यक्तिसोपेक्षत्व थोडें असलें तरी कालसापेक्षत्व एकंदरीन कमी आहे. मोरोपंतांची शकुंतला वा द्रौपदी आणि मुक्तेश्वराची शकुंतला वा द्रौपदी यांत दोघींत महत्त्वाचा असा भेद सांपडणें कठिण आहे. मुक्तेश्वराची द्रौपदी वस्त्रहरणप्रसंगीं अधिक कडक भाषा प्रत्यक्षांत वापरील तर मोरोपंत प्रसंगाचें वर्णन करतांना द्रौपदीने धर्माची हजेरी घेतली असा उल्लेख करून पुढचा भाग वर्णितील. कारण त्या प्रसंगाचें वर्णन करतांना द्रौपदीपेक्षा कृष्णाच्या साहाय्याचें अलौकिकत्व हेंच दोघांनाहि वर्णावयाचें असतें, आणि त्या धोरणाच्या अनुषंगानेच सर्व प्रसंगाचें दिग्दर्शन होत असत.

शकुंतला व दुष्यंत यांचा गांधर्वपद्धतीने विवाह झाल्याचें कण्वास कळतांच तो तिला राजाकडे पाठविण्याची व्यवस्था करतो. कारण शकुंतला गर्भवती असते. याच एका प्रसंगावर विविध मराठी कवींच्या प्रतिक्रिया पाहण्यासारख्या आहेत. कालिदास या निमित्त 'सतीमपिज्ञातिकुलैकसंश्रयां जनोऽन्यथा भर्तृमतीं विशंकते।' असें म्हणतो, तर मुक्तेश्वराचें म्हणणें 'सुंदर प्रौढ समर्थ वनिता। चिरकाल पितृगृहीं वसतां। लोकनिंदेचा अवचिता। पाषाण पडे मस्तकीं॥ (आदि. १६-९२). कुलवती कन्येला कोणत्या आचरणाने दूषण लागतें याचें दिग्दर्शन 'स्वयें नर्तन गायन। गीतनृत्य अवलोकन। शृंगारकामकथाश्रवण। हें कुलक्षण कुलवंते॥ परघर अटण। परघर वस्ती॥ असें केलें आहे. आणि 'उपेक्षून पतिईश्वरू। आणिक महानुभाव करी गुरु'॥ या प्रकाराचा कवीने निषेध केला आहे. मोरोपंतांनी याच प्रसगीं 'जा पतिगृहासि, शोभे शोभे स्त्रीजन पतिच्याच राहिला भुवनीं'॥ एवढाच साधा उद्गार कण्वाच्या तोंडीं घातला आहे. श्रीधराने मात्र 'वनिता सुंदर तरुण। पितृगृहि वसतां अनुदिन। लोकनिंदेचे वाग्बाण। हृदयीं पूर्ण खोचतीं'॥ [पांडवप्रताप अ. ४-२०] असें मुक्तेश्वराचे अनुवादन करून स्त्रियांची अप्रासंगिक निंदा केली आहे. अशा प्रकारें या छोट्या प्रसंगाच्या आधारें कवींच्या प्रतिक्रिया ह्या त्यांच्या प्रकृतिधर्मानुसार

जरी भिन्न असल्या तरी, स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा सामान्यतः सारखाच आहे असें आढळून येईल. पतिव्रताधर्माचें मोठेंपण सर्वच कवींना मान्य आहे. त्याप्रमाणे स्त्रियांचे प्रमुख गुण म्हणजे सौंदर्य, विनयशालित्व, वागण्यांत सौम्यपणा, वडिलाविषयी अतिशय आदर, त्यांच्या सेवेविषयीं तत्परता, पतिभक्ति इ. होत. या गुणांची महति विविध स्त्रीपात्रांच्या द्वारां प्राचीन कवींनी वर्णिली आहे. दमयंतीला अरण्यांत एकटे सोडून जात असतां नळराजा आपली समजूत 'हे पवित्रता निर्दोष । स्पर्शो न शके परका पुरुष' । अशी करून घेतो. त्याहि प्रसंगीं त्याच्या मनांत दमयंतीच्या संरक्षणापेक्षा (की जें कठिण होतें) तिच्या परपुरुषस्पर्शाचा विचार त्याच्या मनांत येतो, ही अत्यंत सूचक अशी घटना आहे.

आतापर्यंत केलेल्या विवेचनाच्या आधारें प्राचीन मराठी (विशेषतः कलाकारांच्या) काव्यांतील स्त्रीजीवनविषयक चित्रणाचें वैशिष्ठ्य पुढीलप्रमाणें सांगतां येईल.

१. प्रमुख पंडितकवींची काव्यरचना भक्तिसंप्रदायाच्या चळवळीनंतर झाली असल्याने त्यांचा स्त्रीविषयक दृष्टिकोण हा सामान्यतः सहानुभूतीचा असा आहे.

२. त्यांनी आपली रचना रामायण महाभारताच्या आधाराने केली असल्याने त्याच काव्यांतील स्त्रीरेखांचा अनुवाद त्यांनी सहानुभूतीने केला आहे. मूळाची संगति न सोडण्याचें त्यांचें धोरण आहे.

३. काव्यरचना करतांना नैतिक गुणांचा उत्कर्ष दाखविणें हें त्यांचें कालसंमत असें उद्दिष्ट होतें. सहाजिकच त्यांनी नीति, चारित्र्य (पातिव्रत्य) धर्म, परमेश्वर इ. नैतिक मूल्यें प्रमाण मानलीं. जीवनचित्रणावर त्यांचें बंधन मानलें.

४. भक्तिसंप्रदायाचा आणखी एक परिणाम म्हणजे, काव्यलेखनांत भक्ति हें एक उद्दिष्ट गणलें गेलें. प्रमुख नायिकांचें यशोगान करतांना त्या 'आदिशक्ति' 'आदिमाया' आहेत, त्या आदर्श देवता आहेत अशी भूमिका अध्याहृत असल्याने त्यांचें चित्रण हें आदर्शवादाकडे झुकणारें असें झालें आहे.

५. कुलवती व कुलस्त्रियांचें गुणगान करण्याच्या धोरणामुळे कुलटा,

वा अधःपतितांकडे अधिक्षेपांच्या दृष्टीने पाहिलें जाणें अपरिहार्य ठरतें. या अनुषंगानेच स्त्रियांची निंदा पण मधून मधून आलेली आहे.

६. संस्कृत काव्याचा परिणाम म्हणून स्त्रीसौंदर्याचें सुश्लिष्ट व मनोहारी वर्णन प्रत्येक कवीने आपापल्या परीने केलें आहे. तें तसें वर्णन करणें हें स्त्रीस्वभावचित्रणाचें एक महत्त्वाचें अंग आहे अशी त्यांची समजूत आहे. स्वभावाशी त्याचा संबध नसल्यानें ह्या विवेचनांत त्याला महत्त्वाचें स्थान दिलेलें नाही.

७. सर्वांत महत्त्वाचा भाग असा की, या कवींना स्त्रियांच्या स्वतंत्र व्यक्तित्वाची जाणीव नाही. व्यक्तिवादाचा उगम होण्यापूर्वीचा हा काल असल्याने असें होणें सहाजिक होतें. ही जाणीव नसल्याने स्वभावचित्रणांत व्यक्तिवैशिष्ट्य अल्प आहे. त्याचा दुसरा परिणाम असा की, स्त्री ही प्रायः एक भोग्य वस्तु आहे अशा दृष्टीने त्यांच्याकडे पाहिलें जात असे. व्यक्तित्वाची जाणीव नसल्याने तें अपरिहार्य होतें.

८. त्यामुळेच या कवींचें प्रेमहि प्रायः शारीरिक असेंच आहे. प्रेमाचा व मनाचा कांही दृढतर संबंध आहे ही जाणीव नाही. रुक्मिणी, सीता या सारख्या सात्त्विक वृत्तीच्या स्त्रियाहि विरहव्याकुल होऊन प्रियकराच्या शारिरिक मीलनासाठी आतुर झालेल्या अशा दाखविल्या आहेत.

९. सहाजिकपणें स्त्रियांवर सामाजिक दृष्टीने कांही अन्याय होत आहेत, त्यांच्या जीवनांत एकप्रकारची अगतिकता आली आहे, अशी जाणीव नाही. कृषिसंस्कृतीच्या अवनत अवस्थेतील स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोणाचे हेच प्रमुख विशेष होत.

पंडितकवींच्या काव्यांत स्त्रीजीवनाच्या आविष्करणाचा मोठा भाग कोणता असेल तर तो म्हणजे स्त्रियांचें सौंदर्यवर्णन हा होय. ह्या सौंदर्यवर्णनांत कवीचें मोठेपण वा वेगळेपण सामावलेलें असतें. कृषि-संस्कृतीच्या कालखंडांत स्त्रियांना व्यक्ति म्हणून स्थान नसलें तरी काव्यांत त्यांना सौंदर्यसम्राज्ञीचें स्थान मिळालें आहे; कवींनी दिलें आहे. मुक्तेश्वर, मोरोपंत, सामराज इ. कवी हे सौंदर्यप्रेमी होते. त्यांनी आपल्या काव्यांतून ह्या सौंदर्याचें आविष्करण करणें हें अपरिहार्य होतें.

मुक्तेश्वरांनी शकुंतलेचें वर्णन करतांना 'कनकलतिका सौदामिनी।

की चंद्रकळा तनुधारिणी। सुवर्णकेतकी पत्रवर्णी। सुगंधखाणी हरिणाक्षी'॥ असें केलें आहे. त्यांतील कल्पनाविलास हा हृद्य आहे, यावद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं. 'स्वयंवरकाव्यां'त ह्या असल्या वर्णनांनाच अधिक महत्त्व प्राप्त होऊं लागलें. नागेश, विठ्ठल, रघुनाथपंडित, सामराज, इ. कवींनी आपल्या काव्यांतून असलीं सौंदर्यवर्णनें बरींच केलीं आहेत. तीं कवीच्या कल्पकतेचा विलास दर्शवितात. स्त्रीजीवनविषयक पाहणीच्या दृष्टीनें त्यांत सौंदर्य दिग्दर्शनाशिवाय इतर कांही आढळत नाहीं.

पुढे पुढे हींहि सौंदर्यवर्णनें अत्यंत संकेतबोजड होत गेलीं. त्यांतील काव्यत्व नष्ट झालें. विठ्ठलकवीनें आपल्या 'सीतास्वयंवरां'त मंदोदरी व रावण यांचा संवाद घातला आहे. रावण आपण एक पेटी आणून ती देव्हाऱ्यांत ठेविली असें सांगतो. ती अत्यंत उत्सुकतेनें (व अर्थात घाईनें) ती पेटी कसली आहे तें पाहण्यास जाते. पण याहिवेळीं कवीला मात्र तिच्या जाण्याचें वर्णन 'चाललीं मंद चाली' असें करावेसें वाटलें. तशा प्रकारचीं संकेतप्राधान्याचीं उदाहरणें आणखीहि दाखवितां येतील.

या सौंदर्यवर्णनानंतर आणखी कोणता महत्त्वाचा भाग प्राचीन काव्यांत येत असेल तर नायिकेवर आलेल्या संकटांचा, व तिच्या विरहव्यथांचा. द्रौपदीवस्त्रहरणाचा प्रसंग, सावित्री-आख्यान, दमयंति-स्वयंवर, इ. कथा-भागांत हे असले संकटांचे प्रसंगच उठावदारपणें कवींनी वर्णिले आहेत. नायिका आपल्या 'सतीत्वा'च्या जोरावर कशा पार पडतात हेंच कवींना व त्यांच्या वाचकांना महत्त्वाचें वाटतें.

याशिवाय पातिव्रत्य, विनयादि गुणांच्या संसर्गानें कांहीं 'नागरगुण' पण नायिकांत आलेले आहेत. उ. संभाषणचातुर्य, विनोदवृत्ति, नाट्य, चित्र, संगीत इ. ललित कलांत प्राविण्य, आदरातिथ्यशीलता, इ. इ. अर्थात असे फक्त उल्लेखच असतात. म्हणजे या कौशल्यांगांत तिचें चातुर्य कसें प्रकट होतें हें स्पष्ट करण्याची जबाबदारी कवीला वाटत नाही. यावरून असें स्पष्टपणें दिसून येतें की, प्रत्यक्ष व्यवहारांत काडीचेंहि महत्त्व नसणारी स्त्री साहित्याच्या व काव्याच्या क्षेत्रांत, सर्वगुणसंपन्न व सम्राज्ञी अशी झाली. अर्थात याहि क्षेत्रांत पुरुषप्राधान्याचा कवीला विसर पडला आहे असें मात्र नव्हे.

ह्या विवेचनावरून प्राचीन साहित्यांत स्त्रीजीवनाचें आविष्करण कोणत्या प्रकारें झालें आहे, वास्तवाशी त्याचा कोणत्या प्रकारचा संबंध आहे ह्याची कल्पना येऊं शकेल.

प्राचीन मराठी साहित्यांतील कथानक–कवींच्या काव्यांतील स्त्री-जीवनविषयक आविष्काराचें हें विवेचन केलें. ह्या कवींचें संस्कृत कवींशी निरनिराळ्या कारणांनी जवळचें नातें आहे. प्राचीन संस्कृत काव्याचा त्यांच्या काव्यावर अधिक परिणाम झालेला आहे. म्हणून त्यांच्या काव्याचा विचार प्रथम केला. परंतु प्राचीन मराठी काव्यांतील महत्त्वाचें जें भक्ति-काव्य त्यांतील स्त्रीजीवनाविष्काराचें स्वरूप कसें आहे तें पाहणें आवश्यक आहे.

रामायण भारत कालानंतर परिस्थिति बदलली. या बदलत्या अवस्थेंत स्त्रियांचें आर्थिक संपादनांतील सहकार्य कमी होत गेल्यामुळे, त्यांच्या सामाजिक प्रतिष्ठेतहि फरक पडला...समाजाचा एक स्वतंत्र घटक म्हणून तिला मिळणारी मान्यता कमी झाली. यामुळेच आर्थिक, धार्मिक, बौद्धिक, आध्यात्मिक, क्षेत्रांत तिच्या आवडीनिवडी आकांक्षा यांना स्वतंत्र स्थान नाहींसें झालें...परावलंबन अबलत्व यांचे शिक्के लागून बौद्धिक क्षेत्रांप्रमाणें आध्यात्मिक उन्नतीच्या बाबतींतहि ती अनधिकारी ठरली.[1] स्त्रियांना स्वतंत्र मन, बुध्दि, आत्मा नाही अशा तऱ्हेची विचारसरणी निर्माण झाली. वैदिकधर्माच्या पुनरुज्जीवनांत बुध्दधर्मगत भिक्षुभिक्षुणींच्या स्वैर-व्यवहाराने स्त्रियांबद्दलची अनुदार दृष्टि कायम राहिली.[2]

ह्या परिस्थितींतून मार्ग काढण्याच्या दृष्टीने ज्या सांस्कृतिक, सामाजिक चळवळी या देशांत या कालांत झाल्या त्यांत भागवत–धर्माची अर्थात भक्तिमार्ग–प्रवर्तनाची चळवळ ही प्रमुख होय.

भक्तिमार्ग व स्त्रीः— ख्रि. पूर्व कालांत आपल्या देशाच्या जीवनांत भक्तिवादाची मोठी थोरली चळवळ झालेली आहे. ती सांस्कृतिक आणि सामाजिक स्वरूपाची चळवळ होती. सहाजिकच तिचे पडसाद साहित्यांतच पडले आहेत. प्राचीन मराठी काव्यांत भक्तिसंप्रदायी काव्य हें अत्यंत महत्त्वाचें ठरलें आहे. ह्या भागवतधर्मी कवींची स्त्रियांविषयी

---

१ सुवर्णमहोत्सवग्रंथ. पृ. २१९. २ कित्ता.

कोणती भूमिका होती, व त्यांनी निर्माण केलेल्या काव्यांतून स्त्रीजीवनाच्या कोणत्या अंगाचें दर्शन होतें तें पाहाणें आवश्यक आहे.

भागवतधर्म वा भक्तिसंप्रदाय हा सामान्यतः ज्ञानदेवांपासून अधिक भरभराटीस आला असें म्हणावयास हरकत नाही. प्रत्यक्ष वैष्णवधर्म जरी ज्ञानेश्वरांपेक्षा प्राचीन असला तरी [१] त्याला ज्ञानेश्वरांच्या कार्यानें व जीविताने एक प्रकारची कलाटणी मिळालेली आहे हें निश्चित. सातव्या आठव्या शतकापासूनच दक्षिणेत एकप्रकारच्या सांस्कृतिक उत्थापनाची पार्श्वभूमि निर्माण झाली होती. मोठमोठे विचारवंत समाजशास्त्रज्ञ यांचा या दिशेने विचार चालू झाला होता असें दिसतें. [२]

कृषिसंस्कृतीच्या कालखंडाच्या शेवटच्या भागांत जीवनाला साचेबंदपणा आला होता. धर्महि 'सनातन' झाला होता. समाजपरिस्थिति एकंदरीने फारशी हितावह नव्हती याची जाणीव कांहीना होऊं लागली. त्या जाणिवेंतून महानुभाव, जैन, लिंगायत, वैष्णव, इ. धर्मपंथ उदयास आले. वैष्णवधर्मवादी लोकांची भूमिका अधिक व्यापक, धोरण अधिक सहिष्णु, चाणाक्ष, सर्वंकष, व त्याचे अध्वर्यू अधिक ज्ञानी, निष्ठावंत, लोकसंग्रही होते. त्यायोगें त्याला लोकप्रियता प्राप्त झाली. ही चळवळ एकप्रकारें सुधारणेची व एकप्रकारें पुनरुज्जीवनाची अशी होती. धर्मांत व समाजव्यवहारांत कर्मकाण्डाचा प्रादुर्भाव फार झाला होता; "यज्ञयाग, जपजाप्य, व्रतवैकल्यें एवढ्या पुरतेंच धर्मभावनेचें क्षेत्र आकुंचित बनलें होतें...नैतिकमूल्यांची चाड राहिली नव्हती [३]..." बहुजनसमाज तर बोलूनचालून मूढ व अज्ञानी होता; पशुतुल्य जीवन कंठण्यापलीकडे त्याला गति उरली नव्हती."

अशा बहुजनसमाजाकडे ज्यांचें लक्ष गेलें त्या वर उल्लेखिलेल्या पंथांत वारकरी वा भागवतधर्मीय पंथ प्रमुख होय. ह्या पंथाने आपली भूमिका बहुजनसमाजासाठीं बहुजनसमाजाच्या भाषेतून सांगावयास सुरवात केली, आणि ह्या उपक्रमानेच मराठी भाषा वाङ्मयाने समृद्ध झाली हें आतां सर्वश्रुत व सर्वसंमत आहे. ह्या भाषेच्या द्वारें जो धर्मप्रसार झाला

---

१ पांगारकर: मराठी वाङ्मयाचा इतिहास.

२ संतवाङ्मयाची फलश्रुति.

३ " " "

त्याचा एक मोठा मूल्यात्मक फरक असा झाला की सर्वसामान्य समाज व श्रेष्ठ-वर्ग (ब्राह्मणवर्ग) ह्यांच्यांत जीवनमूल्यांबाबतचा भेद नष्ट झाला. म्हणजे धर्म, परमेश्वर, मोक्ष हीं ध्येयें जर ब्राह्मण वा श्रेष्ठतर वर्गाला स्वीकार्य असतील तर तींच सर्वसाधारण समाजालाहि स्वीकार्य असावयास कांहीच प्रत्यवाद नसावा, त्याबाबत भेदभाव नको. असा विचार हलके हलके समाजांत रुजला व त्याला कालाबरोबर सर्वांची मान्यता पण मिळाली. परमेश्वरभक्तीचा हा अधिकार वा कालसापेक्ष 'हक्क' प्रस्थापित करण्यासाठीं बहुजनसमाज किती हिरीरीने पुढे आला हें समाजाच्या सर्व थरांतून 'संत' पुढे आले ह्या घटनेवरून स्पष्ट होईल. या दृष्टीने हा 'धर्मसुधारणे'चा यत्न होय असें म्हणतां येतें.

या 'धर्मसुधारणे'चा पाया भूतदया हा होता. रूढ धर्मांतल्या ज्या गोष्टी ह्या भूतदयेच्या अगदींच विरुद्ध होत्या त्याच गोष्टींबाबत विरोधी मत ह्या भागवतधर्मीय सुधारकांनी व्यक्त केलें. मूळ जी विचारपरंपरा वा समाजरचना-की जी धर्मसंमत होती-तिच्याविरुद्ध मात्र यांचा रोख नव्हता. त्या धर्मविचारांचें अधिष्ठान 'अद्वैतमत' होतें. त्याबाबत हे लोक आग्रही होते, व ह्या दृष्टीने त्यांना पुनरुज्जीवनवादी म्हणतां येईल.

स्त्रीजीवनावर व स्त्रियांकडे पाहण्याच्या दृष्टिकोणावर ह्या चळवळीचा काय परिणाम झाला व त्याचें साहित्यांत कसें प्रतिबिंब उमटलें हें पाहणें आवश्यक आहे.

'सनातन' धर्माच्या नियमांनुसार स्त्रियांना शूद्राच्या पंक्तींतच बसविलें होतें. किंबहुना श्रीकृष्णांच्या (व्यासांच्या) लक्षांत ही गोष्ट आली होती, व त्यांनी त्यांना मोक्षाची सवलत दिली होती.

"स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम्"

ह्या वचनांत गीतेंतच वास्तविक शूद्रांना व स्त्रियांना अधिक अधिकार दिले होते (स्त्री व शूद्र यांचा एकत्र उल्लेख होणें ही गोष्ट फार महत्त्वाची व वैशिष्ट्यपूर्ण आहे.) त्यांचा आधार भागवतधर्मीय प्रवर्तकांनी घेऊन 'पुनरुज्जीवना'ची पार्श्वभूमि आपल्या चळवळीला दिली. स्त्रीजीवनाचे दृष्टीने पाहतां ही फारच मोठी उडी होती. भूतदयेचा आधार घेऊन ह्या पंथाने ह्या बाबतींत एक मोठी क्रांति केली आहे.

कृषिसंस्कृतींतील स्त्रीजीवनाचा विचार करतांना संस्कृतीच्या काल-खंडांत स्त्री व पुरुष यांचीं जीवनध्येयें भिन्न झालीं असल्याचा उल्लेख परिशिष्टांत आला आहे. ही जीवनध्येयभिन्नता लक्षांत घेतली तर ह्या पंथानें स्त्रियांच्या बाबतींत केलेलें कार्य कसें क्रांतिकारक होतें हें स्पष्ट होईल. पुरुषाचें ध्येय धर्म, परमेश्वर, मोक्ष, होतें पण स्त्रियांचा मोक्ष म्हणजे 'पति;' त्याविना त्यांना अन्य गति नाही. मोक्षाचें द्वार त्यांना उघडें नव्हतें. तें उघडें होण्यासाठीं पतिभक्तीच्या किल्लीची आवश्यकता होती. वैष्णवपंथानें आपल्या कार्यानें धर्म, परमेश्वर, मोक्ष हीं ध्येयें जशीं शूद्रांना उपलब्ध करून दिलीं तशीं स्त्रियांना पण ह्या पंथानें स्त्रियांच्या जीवनध्येयांत फरक घडवून आणला ही फार मोठी क्रांति होय. आधुनिक कालांत स्त्रीपुरुषांची एकध्येयता ही सामाजिक...क्षेत्राबाबत आहे. त्यापूर्वीची अवस्था म्हणून अध्यात्मिक एकध्येयता ही मोठी क्रांति होय.

सहाजिकपणें बहुजनसमाजाप्रमाणें 'मोक्ष' 'परमेश्वर–भक्ति' हीं स्त्रियांची पण ध्येयें झालीं. स्त्रिया पण ह्या 'हक्कांच्या' बजावणीसाठीं पुढें आल्या. मुक्ताबाई, जनाबाई, महदंबा, बहिणाबाई, वेणाबाई, इ. अनेक स्त्रीभक्त हा आपला ध्येयविषयक हक्क पदरांत पाडण्यासाठीं पुढे आल्या. त्यांनी काव्यहि केलें.

तथापि ह्याहि बाबतींत भागवतधर्माची समन्वयवादी वृत्ति उघड दिसते. वारकरी पंथाने अध्यात्मिक समता प्रस्थापित केली. सामाजिक समता त्यांना अभिप्रेत नव्हती. त्यांच्या दृष्टीला फक्त अध्यात्मिक क्षेत्रांतली विषमता दिसली. त्या विषमतेच्या मुळाशी असलेली चातुर्वर्ण्य–समाज-रचना त्यांना मान्य होती, तिला त्यांचा विरोध नव्हता. स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोणाचे बाबतींतहि तसें म्हणतां येतें. 'या लागीं पापयोनी ही अर्जुना। कां वैश्य शूद्र अंगना। मातें भजतां सदना। माझिया येती॥ ज्ञाने.९।३७

अशाप्रकारचा निर्णय ज्ञानेश्वरांनी दिला असला तरी, त्यांना पाति-व्रत्य अमान्य होतें असें बिलकूल नव्हे. ज्ञानेश्वरांनी पतिव्रता स्त्रीची स्तुति व तिच्या पातिव्रत्याचें मोठेंपण जागोजाग व्यक्त केलें आहे. तुकारामांनी सुद्धा

सडा संमार्जन तुळसी वृंदावन। अतीत पूजन ब्राम्हणांचें।
वैष्णवांची दासी। होई सर्वभावें। मुखी नाम घ्यावें। विठोबाचें॥

अशाप्रकारें स्त्रीजीवनाच्या आदर्शाचें दिद्दर्शन केलें आहे.

यावरून भागवतधर्मीयांची वृत्ति ही स्त्रियांच्या बाबतींत सहानुभूतीची होती हें स्पष्ट होईल. स्त्रियांना उपलब्ध झालेलें हें नवें ध्येय स्त्रियांनीहि मिळविलें. महदंबा, जनाबाई, मुक्ताबाई, वेणाबाई. इ. स्त्रियांनी जी वाङ्मयसेवा केली ती लक्षांत घेतली की ध्येयभिन्नतेचा प्रश्न हा कसा निकालांत निघाला होता हें कळून येतें. पूर्वविचारसरणी जर कायम राहती तर अशी निरनिराळीं परमेश्वरभक्तिप्रचुर काव्यें लिहिण्याची संमति होती असें वाटत नाही. तथापि भक्तिपंथपुरस्कारकांना पातिव्रत्य हें ध्येय अमान्य होतें असें नव्हे. त्यांच्या एकंदर समन्वयवादी भूमिकेला साजेसें हें सर्व होतें.

भक्तिपंथीय साहित्यांतून स्त्रियांबाबत जो दृष्टिकोण व्यक्त झालेला आहे त्याचें आणखी एक अंग आहे. त्याचें दिद्दर्शन केल्याविना हें विवेचन पूर्ण होणार नाही. भागवतधर्मी लोकांनी आपल्या पंथांत स्त्रियांना जरी प्रवेश ठेवला असला तरी त्यांची तत्वज्ञानात्मक भूमिका वेगळी होती असें स्पष्टपणें दिसतें. हे सारे कवी प्रामुख्याने 'संत' व परमार्थाच्या मागे लागलेले 'मुमुक्षू' होते. त्यांना परमार्थप्राप्तीविषयी किती आर्तता होती ह्याचें दिद्दर्शन ह्या काव्यांत वारंवार होतें. ही 'मुमुक्षू'ची भूमिका स्त्रियांना फारशी पोषक नाही. कारण मनुष्याने संसारांतून लक्ष काढून घेणें ही फार मोठी गोष्ट साधकाला आत्मसात् करावी लागते. व त्याला त्या प्रयत्नांत वास्तविक संसारप्रेमामुळे अडचणी येतात. मनाची ओढाताण फार होते. फार झगडावें लागतें. ह्या सर्वांचें मूळ 'मुमुक्षू'नी 'स्त्री' असें ठरवून टाकलें आहे. अर्थात तिचा निषेध केल्याविना या बाबतची तपस्या फलद्रूप होऊं शकत नाही. ह्या प्रकारें स्त्रियांची मनसोक्त नालस्ती वा निंदा ह्या कवींकडून झालेली आहे.

तुकारामासारखा "जें कां रंजलें, गांजलें, त्यासी म्हणे जो आपलें.–" म्हणणारा विरक्त कवी सुद्धा "स्त्रियांचा तो संग नको नारायणा" असें म्हणतो. तसेंच ते केव्हा "स्त्रिया धन वा हें खोटें। नागवले मोठे॥
सर्व दुःखाशी कारण। हीच दोन्हीची प्रमाण"॥
असे उद्गार काढतील तर केव्हा––
किती सांगोतरी नाइकति बटकीचे। पुढे सिंदळीचे रडतील।
नका नका करूं रांडेची संगति। नेवोनी आघोगती घालील यम।

असे उपहासगर्भ उद्‌गार काढतील.— असे किती तरी उल्लेख तुकारामाच्या अभंगांतून आढळून येतात.

ज्ञानेश्वर तर 'ज्ञानीयांचे राजे' ना. पण त्यांचीहि मनःशांति स्त्रियांचें नांव काढलें की बिघडते. त्यांच्याहि काव्यांतून असेच उद्‌गार निघतात.

उ. जन्मतेनि प्रसंगें । स्त्रीदेह शिवणें आंगें । तेथूनि जन्म आघवें । सोवळे कीजे ॥ अशा प्रकारें ज्ञानेश्वरांना जन्मकालच्या स्त्रीदेहस्पर्शाचा पश्चात्ताप होतो.

एकनाथांनी स्त्रियांच्या सात्विक शालीनतेची तरफदारी करीत असतां 'भागवतां' त स्त्रीसंगाचा निषेध केला आहे. ते म्हणतातः

"स्त्रीभोगाचें जें सुख । तें जाण पां केवळ दुःख ।
तोंडीं घालतां मधुर विख । परिपाकीं देख प्राणांतू ॥ ८, ७३ ॥
दीप रूपाचेनि कोडें । पतंग जळोनि स्नेही बुडे ।
तेवीं स्त्रीसंगे अवश्य घडे । पतन रोकडे अंधतमीं ॥ ७७. ॥

तर ज्ञानेश्वरांच्या वरील ओवींत मातृत्व हाच स्त्रियांचा पहिला व शेवटचा स्पर्श असावा असें विशद केलें आहे.

'पूर्वपरंपरेचें कठिण घोरण ज्ञानेश्वर एकनाथ तुकारामादिकांनी स्वीकारलें नसलें तरी या विचारसरणीची छाया त्यांच्या तत्त्वज्ञानांत कायम आहे. स्त्रियांचा सहवास, स्त्रीसंग, विषयलालसेच्या अनुरोधाने स्त्रीसमाज याबद्दल साऱ्या संतांनी परमार्थ विषयांत प्रतिकूलताच व्यक्त केली आहे.[1]

स्त्री ही जगांतील दुःखरूप शृंखला आहे अशा प्रकारचे विचार जवळ जवळ प्रत्येक श्रेष्ठ प्राचीन कवीच्या काव्यांतून आढळून येतात. यावरून कित्येक संतकवींनी स्त्रियांच्या परमार्थ साधनास मान्यता दिली ती केवळ विचारापुरती होती असें म्हटलें तर तें विशेष अयुक्त होणार नाही. कदाचित् कालाचा ओघहि ओळखून त्यांना ती द्यावी लागली असेल, असेंहि शक्य आहे.

भागवतधर्माच्या उद्दिष्टाच्या मागें असलेली स्त्रिया व शूद्र ह्यांच्या उद्धाराची कल्पना पाहिली व हे असल्याप्रकारचें स्त्रियांबाबतचे त्यांच्याच

१ सुवर्णमहोत्सवग्रंथ (सत्कार्योत्तेजक सभा धुळें) पृ. २२२.

काव्यांतून आलेले अनुदारपणाचे उद्गार पाहिले की थोडा अचंबा वाटतो. ह्या परस्पर विरोधी प्रवृत्तींत खरी कोणती असा संभ्रम निर्माण होतो. तथापि दोन्हीहि खऱ्या आहेत. कारण तसे सबळ पुरावे त्यांच्यांच काव्यांत सापडतात. सामान्यतः दुसऱ्या प्रकारचे उद्गार हे मुमूक्षूच्या भूमिकेवरून काव्य करीत असतांना येतात. त्यांच्यांत खरें सांगायचें तर त्यांना स्त्रियांची सहेतुक टिंगल वा नालस्ती करावयाची नसते. भागवतधर्माची भूमिकाच तशी नाहीं. तथापि ज्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार त्यांना करावयाचा आहे त्या तत्त्वज्ञानाच्या भूमिकेंत ही असली ऐहिकजीवनद्वेषी वृत्ति अध्याहृत आहे. ह्या वा असल्या उद्गारांतून त्यांना स्त्रियांची निर्भर्त्सना करावयाची नसते तर ऐहिक जीवनप्रेमाची. व ऐहिक जीवनप्रेमाचें प्रतीक त्यांनी स्त्रीला कल्पिलें आहे. अर्थात् ऐहिक जीवनाभिलषेची प्रतीकात्मक टीका स्त्रीच्या माध्यमाने त्यांनी केलेली आहे. तेव्हा विरोध वा टीका करायचीच असेल तर ती त्यांच्या ऐहिक जीवनाचा निषेध करण्याच्या प्रवृत्तीवरच. त्या प्रवृत्तीचें केवळ एक उपांग म्हणून असले उल्लेख आलेले आहेत. त्या उद्गारांतून स्त्रियांचा उपहास होतो असें म्हणण्यापेक्षा ऐहिक जीवनाचा अधिक्षेप व्यक्त होतो. त्या अधिक्षेपासाठी स्त्री हें एक प्रतीक म्हणून वापरलें आहे.

याचे आणखीहि एक गमक देतां येईल. स्त्रियांचा त्यांना खरोखर निषेध करावयाचा असता तर त्यांनी संन्यासमार्गाचा मुक्तपणें प्रचार केला असता. पण अशा प्रकारचा 'संन्यास' वाद हा भागवतधर्माच्या आचारप्रणालींत बसत नाहीं. भक्तिपंथीय लोकांनी संसार करून मोक्षाची उपासना केली. हें पाहिलें तर त्यांचा हा स्त्रियांचा निषेध हा प्रतीकात्मक आहे हें म्हणणें मान्य व्हावयास अडचण येणार नाहीं. भागवतधर्माच्या स्त्रीविषयक दृष्टिकोणांत हा जो विरोध आहे तो समन्वयाच्या भूमिकेच्या योगानें आलेला आहे, असें म्हणतां येईल. हें लक्षांत घेतलें तर भक्तिसंप्रदायाने स्त्रीयांच्या जीवनध्येयविषयक जी क्रांति केली असें वर म्हटलें आहे तें चूक आहे असें म्हणण्याचें कारण नाहीं.

रामदासांचें वेगळेपणः— ह्या सर्व संतकवींचा दृष्टिकोण हा सामान्यतः समान असला तरी त्यांत व्यक्तितः थोडा फरक आहे. विशे-

यत: रामदासांचा स्त्रीजीवनाकडे पाहाण्याचा दृष्टिकोण हा इतर संतांहून थोडा भिन्न आहे; असें दिसतें. तो स्त्रियांना अधिक अनुकूल आहे असें दिसतें. वास्तविक बहुजनसमाजाकडे पाहण्याचा इतर संतांचा दृष्टिकोण अधिक सहानुभूतिशील आहे. रामदासांच्या कार्यांत ब्राह्मण्याचा आविष्कार अधिक प्रभावीपणें व्यक्त होतो. व स्त्री आणि शूद्र यांची जी सांगड घातली जाते त्या दृष्टीने पाहतां रामदासांचा दृष्टिकोण स्त्रियांविषयी अधिक सहानुभूतिशील नसावा असें वाटतें. पण प्रत्यक्षांतली परिस्थिति थोडी भिन्न आहे. रामदासांनी सर्वदेशभर पर्यटण केलें व त्यामुळे त्यांना समाजाची ओळख अधिक व्यापकपणें झाली होती. विशेषत: सर्व देशभर स्त्रियांवर (विशेषत: परकीयांचे) जे अत्याचार होत होते त्यांचें दर्शन झालें, व त्यांच्या सहानुभूतीचा ओघ त्यांच्याकडे अधिक प्रमाणांत असावा हें नैसर्गिक आहे.

'वेदांतांत व पूर्वपरंपरेंत रुजलेली अनुदारता समर्थांच्या ग्रंथांत कोठेहि आढळत नाही. स्त्रियांबद्दलचे अवाच्य उद्‌गार त्यांनी कोठेहि काढलेले नाहीत. दासबोधांत स्त्रैणांची निंदा मूर्खांच्या लक्षणांत असली, तरी इतरत्र व येथेहि अवाच्यता नाही. स्त्रियांची अध्यात्मिक योग्यता त्यांनी पूर्णपणें ओळखली आहे.' [१]

नाना पुरुषांचे जीव। नाना स्त्रियांचे जीव। येकची परी देहस्वभाव। वेगळालें॥ १७–२०. असा त्यांचा निर्वाळा आहे. स्त्रियांच्या नैसर्गिक शक्तीचें मोल त्यांनी ज्या शिष्यिणी ठेविल्या त्यांच्या कामगिरीवरून स्पष्ट होईल. इतर स्त्रियांनी भक्तिमार्गाचा स्वीकार केल्याचें आढळतें पण 'ज्ञानेश्वर एकनाथांनी स्वकुटुंबियांव्यतिरिक्त इतर स्त्रियांना उद्धरल्याचें ऐकिवांत नाही.' [१] तथापि समर्थांच्या ठिकाणीं ही असलेली उदारमतवादी दृष्टि त्यांच्या पश्चात् त्यांच्या अनुयायांनी स्वीकारली नाही. ही त्यांतल्यात्यांत करुणाजनक गोष्ट आहे. तरी स्वत: समर्थांची दृष्टि मात्र उदार होती असें दिसतें. समर्थांनी आपल्या मठव्यवस्थेंत स्त्रियांना (शिष्यिणींना) पुरुषांइतकेंच अधिकार दिलेले आहेत. हा मार्ग समर्थांनाच शोभून दिसला, इतर सांप्रदायिकांना तें सूत्र पुढे चालविणें कठिण होतें व म्हणून त्यांच्यांतली उदारवृत्ति नष्ट झाली.

---

१ सुवर्णमहोत्सवग्रंथ पृ. २२३.

अशाप्रकारें व्यक्तिदृष्ट्या पाहतां समर्थांची स्त्रियांकडे पाहण्याची दृष्टि ही उदार असली, तरी त्यांच्या संप्रदायांत त्या उदारवृत्तीचा लोप झाला. त्यायोगेंच त्या संप्रदायाचें याबाबत कांही ठसठशित कार्य दिसत नाही. परंतु स्त्रीविषयक दृष्टिकोणाची पाहणी करतांना रामदासांचा वेगळेपणा नमूद करून ठेवणें आवश्यक आहे असें वाटतें.

शाहिरी वाङ्मयांतील स्त्रीजीवनः– प्राचीन मराठी काव्यापैकी भक्तिकाव्य व कथाकाव्य या दोन प्रकारच्या काव्यांतील स्त्रीजीवनाविषयक उल्लेखांचें व पडलेल्या प्रतिबिंबाचें परिशीलन केलें. त्यानंतर प्राचीन मराठी काव्यांतच समाविष्ट होत असलेल्या आणखी एका वाङ्मय–विभागाचा विचार करावयाचा आहे. हा विभाग म्हणजे पोवाडे व लावण्या या स्वरूपांत मराठी शाहीरांनी जी काव्यरचना केली तो होय.

हें शाहिरी वाङ्मय संतकाव्यापासून–कथाकाव्यापासून पूर्णतया भिन्न आहे. खऱ्या मराठी मनाचें आविष्करण याच वाङ्मयांत होतें व म्हणून मराठीचें खरें वाङ्मय म्हणजे शाहीरांचें वाङ्मय होय, अशा प्रकारचे विचार श्री. वि. ल. भावे, अच्युतराव कोल्हटकर इ. नी [१] व्यक्त केले आहेत. राष्ट्रीय अभिमानाच्या आंदोलनाच्या कालांत या वाङ्मयाकडे लोकांचे लक्ष गेलें. त्याचे संग्रह प्रसिद्ध झाले. काव्य इ. दृष्टींनी मोजमाप करण्याचा उपक्रम झालेला आहे.[२]

या काव्यांत पोवाड्यांचा भाग आहे त्यांत प्रामुख्याने पुरुष–पराक्रमाचें वर्णन असतें. ऐतिहासिक दृष्ट्या मोठमोठे प्रसंग, त्या प्रसंगांतून पुरुषाच्या ठिकाणच्या निरनिराळ्या शक्ती कशा कसास लागल्या ह्याचें प्रामुख्याने आविष्करण वा वर्णन असतें. सामान्यतः लढाईचा प्रसंग हा महत्त्वाचा व मध्यवर्ति गणला जाणें सहाजिक आहे. तथापि नारायणराव पेशव्यांचा खून, सवाई माधवरावांचा मृत्यू इ. प्रसंगहि पोवाड्यांचे विषय झालेले आहेत. ह्या पोवाड्यांत प्रमुख व्यक्तीच्या गुणांचें वर्णन व त्याच्यावर आलेल्या आपत्तींचें वर्णन हेंच उद्दिष्ट असतें. स्त्रीविषयक उल्लेख अर्थातच

१. श्री. म. वर्दे यांचें पुस्तक, य. न. केळकरांचे ग्रंथ.

२. अ. ब. कोल्हटकर : मराठी काव्याची प्रभात, भावे : महाराष्ट्र-सारस्वत भाग २.

अल्प प्रमाणांत असणें सहाजिक आहे. तथापि जेथे जेथे संबंध येईल तेथे तेथे स्त्रियांविषयीं सामान्यत: सहानुभूति शाहिरांनी व्यक्त केली आहे. स्त्री-विषयक मोह वाटून जर नायकाच्या चरित्रास कलंक लागला असेल तर मात्र शाहीराच्या तोंडून स्त्रीविषयक अनुदारपणाचे उद्गार निघतात. पण त्याचा रोख प्रामुख्याने पौरुषाचें गुणदिद्दर्शन करणें ह्या गोष्टीकडे असतो. तेव्हां ह्या असल्या त्रोटक उल्लेखांवरून कांही निष्कर्ष काढणें चुकीचें होईल. एकंदरीने पोवाड्यांतून स्त्रियांचा उल्लेख अल्प आलेला आहे.

ह्याच काव्याचा दुसरा भाग म्हणजे लावण्या. वास्तविक लावण्या हा वाङ्मयप्रकारहि पोवाड्याप्रमाणेंच पौरुषाचें आविष्करण करण्याच्या यत्नांतून निर्माण झालेला आहे. शौर्य धैर्यादि गुणांचें आविष्करण पोवाड्यांतून झालेलें आहे. उलटपक्षी शृंगाराचें आविष्करण लावण्यांतून झालेलें आहे. शृंगार हाहि एक पौरुष भावनेचाच आविष्कार होय. परंतु वरील शौर्य-धैर्यादि भावनांप्रमाणें तो स्त्रीनिरपेक्ष नाहीं तर प्रामुख्यानें स्त्रीसंबंधित आहे. सहाजिकच ह्या काव्यांतून स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोणाचें दिग्दर्शन व्हावें हें ओघानेच येतें.

ह्या लावण्यांचे दोन प्रकार आहेत. कांही पौराणिक विषयांवरील व कांही सामाजिक जीवनावरील. पौराणिक विषयांवरील लावण्यांतून स्त्री-जीवनविषयक जें आविष्करण झालेलें आहे तें पंडितकवींच्या काव्याला साजेसें आहे. फक्त पंडितकवींपेक्षा उत्तानपण अधिक आहे. सुसंस्कृततेचा, नागरपणाचा संस्कार शाहिरांच्या प्रज्ञेवर एकंदरीने अल्प झाला असल्यानें त्यांच्या काव्यांत उत्तानपणा, भडकपणा, इ. गोष्टी अधिक प्रमाणांत आल्या आहेत. संयम कमी तथापि ह्यावरून शाहीरांचा दृष्टिकोण वेगळा होता असें नव्हे. ज्या समाजाचे पंडितकवी वा संतकवी हे अवयव होते त्याच समाजाचे शाहीरकवीहि होते. समाजाला जीं मूल्यें संमत होतीं तीं तिघांनाहि मान्य होतीं. भेद पडला आहे तो केवळ प्रवृत्तिभेदामुळें पडलेला आहे. संतकवी व पंडितकवींचा ओढा नागरतेकडे अधिक आहे. शाहीरांचें काव्य हें बोलून चालून बहुजनसमाजासाठीं असल्यानें त्या काव्यांत बहुजन-समाजाच्या संस्कृतीचें प्रतिबिंब पडावें हें अपरिहार्य आहे. स्त्रीविषयक दृष्टिकोणांतहि तसा मूलभूत फरक नाहीं. संतकवींना, वा पंडितकवींना

स्त्रियांचे पातिव्रत्य, विनयशीलता, सौंदर्यशालित्व इ. गुण दिसले होते ते शाहीरांना पण मान्य होते. त्यांना त्याबाबत वेगळें असें कांही म्हणावयाचें नव्हतें. संतकवी प्रामुख्यानें निवृत्तिवादी होते, पंडितकवी हे कलावादी होते, तर शाहीरकवींचा ओढा दोघांपेक्षा प्रवृत्तिवादाकडे अधिक होता. पण हा केवळ प्रवृत्तींतला फरक आहे, मूलभूत फरक नव्हे.

शाहीरांचें काव्य हें सामाजिक आशयाच्या दृष्टीने संतकवींच्या काव्यापेक्षा व पंडितकवींच्या काव्यापेक्षा निश्चितपणें निराळें झालेलें आहे. संतकवींची दृष्टि ही प्रायः नीति व अध्यात्मवादी आहे; पंडितकवींसमोर जुन्या संस्कृत कवींचे आदर्श आहेत, शाहिरांच्या काव्यावर या दोनही प्रवृत्तींचे संस्कार झाले आहेत, पण त्याचें वैशिष्ट्य हें त्या संस्काराच्याहि पलीकडे आहे. सर्वसाधारणतः शाहीरी काव्याचा ओढा हा लौकिक विषयांकडे आहे ही गोष्ट सर्वप्रसिद्ध आहे. त्यामुळेंच एकेकाळीं ह्या काव्यालाच खरें 'राष्ट्रीय' काव्य म्हटलें जात होतें. वाङ्मयीन दृष्टीने पाहतां शाहीरांचा ओढा हा वास्तवाकडे अधिक आहे असें आढळून येईल. पोवाड्यांतल्या वर्णनांत थोडी अद्‌भुतता असली तरी पण प्रसंग घडले आहेत तसें वर्णन करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. लावण्या व विशेषतः सामाजिक लावण्या ह्या तर वास्तववादी प्रवृत्तीच्या प्रतीक आहेत. या दृष्टीने पाहतां शाहीरांच्या काव्यांत लोकस्थितीचे पडसाद अधिक स्पष्टपणें पडलेले आढळून येतात.

स्त्रीजीवनाच्या प्रतिबिंबाच्या पाहाणीच्या दृष्टीने विचार करतांना पोवाडे हे वगळावे लागतात. पोवाड्यांत प्रामुख्याने वीररसप्रधान कृतींना प्राधान्य मिळालें आहे. अहिल्याबाईसारख्या राज्यकर्तीच्या कर्तृत्वाची दखलगिरी घेणारा एकादा दुसरा पोवाडा असला तरी तो अपवादभूतच म्हणावयास हरकत नाही. शाहीर हे मनाने संत वा पंडितकवींच्यापेक्षा वेगळे नव्हते हें असल्या पोवाड्यांवरून स्पष्ट होतें. अहिल्याबाईच्या राज्यकर्तृत्वापेक्षां त्यांचे मातृत्व, भूतदया आदि स्त्रीप्रधान गुणच आलेले आहेत; 'किति सूर्यग्रहणसंधींत तुला केल्या। कधीं कनक रौप्य कधीं गुळाच्या भेल्या। संभाळ करुन काशीस यात्रा नेल्या। कावडी शतावधी रामेश्वरीं गेल्या। संसारीं असुन वासना जिच्या गेल्या। तिजपुढे सहज मग मुक्ति उभ्या

ठेल्या' ॥ (प्रभा. ला. पृ. ७५). अशाप्रकारें अहिल्याबाईंचें वर्णन शाहीरास करावें असें वाटलें आहे.

लावण्यांपैकी पौराणिक लावण्यांत हीच प्रवृत्ति दिसून येते. बहुसंख्य पौराणिक लावण्या ह्या कृष्णावर आहेत. त्यांतून राधाकृष्णांच्या प्रेमाला प्राधान्य मिळालें आहे. द्रौपदीवस्त्रहरणासारखे अद्भुतरम्य प्रसंगहि शाहीरांचे आवडते झाले आहेत. तथापि स्त्रीजीवनाच्या दृष्टीने पाहतां या प्रकारच्या लावण्यांतून नव्या दृष्टिकोणाचा प्रत्यय येत नाही. कृष्णावरल्या लावण्यांत कृष्ण हाच वर्ण्यविषय असतो, तर इतर लावण्यांतून प्रायः सतीत्व व त्याचा प्रभाव यांचें यशोगान करावयाचें असतें. सतीत्वाची पातिव्रत्य ही एक बाजू आहे. स्त्रीचरित्र वा कर्तृत्व रंगविण्यास त्यावर अधिक भर दिलेला असतो. सुलोचनेसारख्या सतीवर त्याच कारणांमुळें लावण्या रचल्या गेल्या आहेत.

ह्या शाहीरकवींत भिन्नभिन्न प्रवृत्तीचे कवि आहेत. रामजोशांसारखे पंडितकवींच्या वळणावर जाणारे कवि आहेत तर परशुरामासारखा अत्यंत सात्विकवृत्तीचा कवि आहे. प्रभाकराच्या काव्यांत उत्तानपणा अधिक आहे तर आनंदफंदीचा ओढा उपदेशपरतेकडे अधिक आहे. या भिन्नपणामुळे शाहीरांचें काव्य वाटतें तितकें एकस्वरूपी नाही. त्यांत कविपरत्वें भिन्नताच अधिक आहे.

साऱ्याच शाहीरकवींचा ओढा शृंगाररस खुलवून सांगण्याकडे अधिक आहे; निदान लावणीवाळ्यायाचा तोच प्राण आहे असें म्हटलें असतां चालेल. पण साऱ्यांचा आशय सारखा नाही. रामजोशींच्या लावण्यांतून सामाजिकदृष्ट्या पोषक उल्लेख अत्यंत कमी आहेत. स्त्रीदेहाचीं वर्णनें शास्त्रीबुवांनी केलीं आहेत. पण त्यांत काव्यमयता वा कल्पनामयता अधिक आहे. रामजोशी वृत्तीने कलावादीच कवि पण केवळ लौकिक विषयांवर त्यांनी काव्यरचना केली आहे एवढेंच. त्याचप्रमाणे त्यांनी शेवटी उपदेशपर कलाटणी देण्याचें धोरण स्वीकारलें आहे. तें शास्त्रीबोवांच्या दृष्टिकोणाचें द्योतक आहे. शास्त्रीबोवांच्या काव्यांतून कामिनीचे व प्रेमिकाचे प्रणयोत्सुक उद्गार आहेत. त्यांत उत्तानपणा नाही असें नाही. पण एकंदरीने सामाजिक आशय कमी आहे. प्रियकर प्रेयसीसाठी वा प्रेयसी प्रियकरासाठी उत्सुक झाली आहेत असा भाग अधिक.

आनंदफंदीच्या लावण्यांतहि अशीच विविधता आढळून येत नाही. फंदीबुवांच्या देशस्थितीवर लावण्या, पोवाडे, फटके, अशी रचना बरीच आहे. तींत वर्णनाचा भाग अधिक आहे. स्त्रीजीवनास अर्थातच त्यांत विशेष स्थान नाही.

सामाजिक आशयाच्या दृष्टीने होनाजीबाळा, रामजोशी व परशुराम यांच्या लावण्या अधिक महत्त्वाच्या आहेत. होनाजीने मुशाफिरांवर बऱ्याच लावण्या रचल्या. एका लावणींत वंध्या स्त्रीचें दुःख आहे (मीच आहे पतिची वैरिण ! असे ती म्हणते.) तर परस्त्रीगमन करणारे पती आहेत. बहुपत्नीत्वाची चाल रूढ असल्याचे उल्लेख अनेक आहेत. एक नवरा सवतीसवतींत भांडणें लावून देतो, पण त्यांना हें समजतांच त्या एक होतात व त्यालाच उपदेश करतात. प्रियकराची भेट व्हावी म्हणून भूतबाधेचें ढोंग करणारी प्रणयिनी आहे, अर्थात भूत काढणारा मांत्रिक प्रियकर आहे. गरोदरावस्थेत आपणांस त्रास देऊं नका अशी विनवणी करणारी एक स्त्री आहे, तर बाहेरख्यालीपणा सोडण्याबद्दल एक सती पतीस विनंती करते. याशिवाय प्रियकर प्रेयसीना लागणाऱ्या ओढीचें वर्णन करणाऱ्या लावण्या आहेतच. रामजोशींच्या खालोखाल होनाजीवर संस्कृत साहित्याचा संस्कार झालेला आहे. क्वचित प्रसंगीं उत्तानपणा आहे, पण त्यांत कल्पकतेचा व शब्दविभ्रमाचा भाग अधिक आहे. स्त्रीविषयक दृष्टीने पाहतां हे प्रसंग केवळ विविधतेच्या पोटीं आलेले आहेत. त्यांत साभिप्रायत्व नाही.

लावणीकारांत प्रभाकराचें स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. वास्तविक पाहतां प्रभाकर हा जन्माने ब्राह्मण. पण ब्राह्मण्याचे संस्कार त्याच्या काव्यावर तशी फारसे खोलवर उमटलेले दिसत नाहींत. रचनाकौशल्याच्या बाबतींत प्रभाकर हा रामजोशी अगर होनाजी यांच्यापेक्षा कमी सौष्ठवपूर्ण असें काव्य करतो. त्याच प्रमाणें शृंगारांत सर्व लावणीकारांत त्याचा हात कोणी धरील असें वाटत नाहीं. पण सामाजिक आशयाच्या दृष्टीनें प्रभाकराच्या लावण्यांत विविधता बरीच आहे. प्रणयासच प्राधान्य असलें तरी त्याच्या आधाराने जे विविध सामाजिक उल्लेख आले आहेत ते महत्त्वाचे आहेत. नागपंचमीवर कांही लावण्या आहेत. विरहोत्सुक युवती लढाईस गेलेल्या

पतीची ह्या दिवशीं वाट पाहात आहे. लढाईवर गेलेल्या प्रियकराची आठवण काढणाऱ्या विरहिणी आहेत. तर मुशाफरावर फिदा झालेली स्त्री एका लावणींत त्याला बोलावते आहे. माहेरीं आलें आहे तेव्हां पंधरा दिवस रोज तुम्ही येत जा असें प्रियकरास विनवणी करणारी युवती एका ठिकाणीं वर्णिली आहे. तर 'दुधखुळा बुढा पति आवडेना ह्या जीवा'। म्हणून प्रियकराला आवाहन करणारी स्त्री आहे. एका ठिकाणीं विवाहित स्त्री प्रियकरास प्रेम ठेवा पण अतिप्रसंग करूं नका म्हणून विनविते आहे. गरोदरपणांत त्रास देणाऱ्या पतीला विनवणी करणाऱ्या, परस्त्रीगमनाबद्दल पतीची हजेरी घेणाऱ्या अशाहि स्त्रिया आहेत. अशा प्रकारें प्रभाकराच्या लावण्यांतून तत्कालीन स्त्रीजीवनाची कल्पना येऊं शकते. कवीचा ओढा नीतिवादाकडे अल्प आहे व म्हणूनच हे असले उल्लेख येथें आलेले आहेत. या सर्व वर्णनांत उच्छृंखलपणा, उत्तानपणा बराच आहे. पण एवढे विविध उल्लेख एकट्या परशुरामाशिवाय इतर कवींच्या काव्यांत आढळत नाहींत.

या सर्व कवींत परशराम हा बऱ्याच वेगळ्या प्रकारचा कवि दिसतो. वृत्तीने अधिक सात्त्विक, मनाने अधिक सामाजिक व कल्पकतेनें अधिक विनोदी असा हा कवि आहे काव्यरचना अल्प आहे पण गुणांनी ती अधिक आहे. इतर कवींप्रमाणें त्याच्या पौराणिक लावण्या आहेतच, पण त्या शिवाय, पंढरपूर, नेवासें इ. स्थलवर्णनपरहि कांही लावण्या आहेत. सामाजिक लावण्यांतूनहि सामाजिक परिस्थितीचे उल्लेख अधिक विपुल व वास्तव आहेत. सवतीसवतींचीं भांडणें त्याने वर्णिलीं आहेत. पतीच्या अवयवांची वाटणी करून घेऊन त्याच्या दोन्ही बाजूस निजणाऱ्या सवतींचें वर्णन आहे. झोपेंत चुकून एकीच्या वाटणीचा पाय दुसरीच्या बाजूस येतो म्हणून तो मोडून टाकणाऱ्या, आणि अशाप्रकारें दोन्ही पाय मोडून लंगडें करून टाकणाऱ्या सवतींचें भांडण आलें आहे. तर इतर ठिकाणीं इतर प्रकारचीं सवतींचीं भांडणें व नवऱ्याचें हाल ह्यांचें दिग्दर्शन आलें आहे. आयतेखाऊ, काम न करणाऱ्या पुरुषाबद्दलचा त्वेष एक दोन लावण्यांत व्यक्त झाला आहे, तर आईबापांपासून वेगळे निघा असा सल्ला देणाऱ्या स्त्रीची कारवाई एका ठिकाणीं वर्णिली आहे. नवरा त्याप्रमाणे वेगळें निघतो, व त्याचे हालच होतात इ.

भाग येणें क्रमप्राप्तच ठरतें. कारण कवीची मनोभूमिका सर्वसाधारण समाजांतील व्यक्तीच्या मनोभूमिकेशी जुळती अशीच आहे. लढाईवर गेलेल्या पतीची प्रतीक्षा करणाऱ्या स्त्रियांच्या वांच्छा बऱ्याच लावण्यांत अभिव्यक्त झाल्या आहेत. एका ठिकाणीं तर नायिका प्रियकराकडे जासूद पाठवून लवकर या असा निरोप पाठविते. या शिवाय स्त्रीजीवनविषयक विशिष्ट भावना म्हणजे मातृत्वप्राप्तीची मनीषा, गरोदरपणांत स्त्रीची होणारी विशिष्ट मनस्थिति, मूल होण्यासाठी निरनिराळे नवस सायास करणारी स्त्री हिचेंहि वर्णन आलें आहे. नवसांच्या निमित्ताने भारतांतील सर्वच प्रसिद्ध क्षेत्रांचे उल्लेख आहेत. कवीचा पातिव्रत्याच्या सामर्थ्यावर अतिरिक्त विश्वास आहे. त्याचा प्रभाव अत्यंत कल्पकतेने एक दोन लावण्यांत उत्साहाने कवीने वर्णिला आहे. ही स्त्री आपल्या पातिव्रत्याच्या (आणि अर्थातच चातुर्याच्या) जोरावर आपला पती परगांवी (राजाबरोबर) गेला असतां, त्याने घातलेल्या अटींनुसार पैसा खर्चल्याविना एक बंगला व बाग, एक दुसरी स्त्री, व एक 'पतिविरहित झालेलें' मूल अशा गोष्टी संपादन करून आपल्या पातिव्रत्याचा प्रभाव प्रत्ययास आणून देते. या उलट एक तरुण आपल्या पत्नीला आपल्या प्रेमाची महति म्हणून 'तूं मेलीस तर मी सती निघेन' असें आश्वासन देतो. ती त्याची परीक्षा पाहण्यासाठी मृत्यूचें सोंग घेते. त्यावेळीं मात्र हा आपलें आश्वासन विसरून तिच्या (खोट्या) प्रेतावर जबरी करण्याचा प्रयत्न करतो. लष्करांतील व लढाईचे विविध अनुभव बायकोस सांगणाऱ्या, व 'वीर' आहोंत असें भासविणारा तरुण लष्करांत प्रत्यक्ष पाणक्या कसा आहे ह्याचें पण चित्रण (विनोदी) एका लावणींत आलें आहे. त्याशिवाय इंग्रजी राज्य, त्याने आणलेली नवी रीत इ. चें पण दिग्दर्शन कांही लावण्यांत आलें आहे.

परशुरामाचा स्त्रीविषयक दृष्टिकोण हा अधिक सहानुभूतिशील आहे असें दिसतें. केवळ पतीच्या भेटीसाठी व त्याच्या शारीरिक मीलनासाठी उत्सुक असलेल्या स्त्रियांचीं चित्रें इतर शाहीरांच्या मानाने फारच कमी आहेत. त्यांच्यांतहि उत्तानपणा कमी आहे. अर्थात स्त्रीविषयक दृष्टिकोण आमूलाग्र वेगळा आहे असें नव्हे. व तो तसा असणेंच शक्य नव्हतें. वेगळें निघण्याचा हट्ट बायकोने धरला असतां वेगळें निघण्याचा 'मूर्खपणा'

करणाऱ्या तरुणाची फजीति झाली आहे असें दाखविलें आहे. 'बायकोच्या अकलेने झाली थोराथोरांची दशा। दोर वेगळे सोडून निघती मायबापाची आशा।' असें कवीला म्हणावयाचें आहे. एकंदर रोख 'स्त्रीबुद्धिः प्रलयंगता' या सुभाषितांतील आशय सत्य आहे असें दाखविण्याकडेच आहे. हा भाग सोडला तर परशुराम शाहीराच्या लावण्यांत समाजस्थितीचें बरेंच व्यापक दर्शन होतें असें म्हणावयास हरकत नाही. अर्थात लावण्या म्हटल्याबरोबर जो शृंगाराचा भाग अभावितपणें डोळ्यांपुढे उभा राहतो तो भाग परशुरामाच्या लावण्यांत आहेच. त्याच्या लावण्या ह्या लावण्याच आहेत.

अशाप्रकारचें प्रमुख शाहीरांच्या काव्यांतील सामाजिक व स्त्रीजीवन-विषयक उल्लेखांचें स्वरूप आहे. संतकवींच्या किंवा पंडितकवींच्या काव्याशी तुलना करतां हे उल्लेख अधिक समाजस्पर्शी आहेत, ही गोष्ट सर्वसंमत होण्यासारखी आहे. शाहीरांच्या या समाजस्पर्शित्वामुळेच पुष्कळ टीकाकारांनी त्यांचेंच काव्य हें खरे 'राष्ट्रीय' आहे असें भासविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रसिद्ध वाङ्मयेतिहासकार वि. ल. भावे यांचें मत तसेंच आहे. त्याचप्रमाणें अ. ब. कोल्हटकरांनी आपल्या 'मराठी काव्याची प्रभात' या निबंधांत तेंच मत विस्तारशः मांडलें आहे. राष्ट्रीयत्वाच्या विचाराच्या प्राथमिक उर्मीच्या जोरांत तसें वाटावें हें अगदी सहाजिक होतें. पण अधिक बारकाईनें पाहिलें असतां इतकें अवास्तव मोठेंपण या काव्याला देणें आवश्यक आहे असें वाटत नाही. कारण तथाकथित 'राष्ट्रीयत्वा'चा आविष्कार या कवींच्या पोवाड्यांतूनच काय तो प्रभावीपणें होतो असें दिसून येईल. लावण्यांना 'राष्ट्रीय' साहित्याच्या संग्रहांत कोणी स्थान देईल असें वाटत नाहीं. विशुद्ध सामाजिक दृष्टीने पाहतां लावण्याच अधिक महत्वाच्या गणाव्या लागतात. कारण पोवाड्यांत अद्भुत व वीर या रसांचें आविष्करण प्रभावीपणें झालेलें असतें.

तसें म्हटलें तर सामाजिक दृष्टीने पाहणी करतांहि या लावण्यांतून वास्तवापेक्षा संकेतबोजडपणा दिसून येतो. एकजात नायिका ह्या बारा वा तेरा वर्षांच्या आहेत, व त्या वयांत त्यांच्या अंगीं उन्मादक तारुण्याचा संचार झालेला आहे. या अनुषंगाने पाहतां २५व्या वर्षी वृद्धत्व येणें अटळ

होतें. व तसा उल्लेख एका ठिकाणीं आहेहि.[1] तसेंच वर्णनेंहि रूढ प्रकारचीं आहेत. एकजात सर्व प्रियकर आणि प्रेयसी ह्या शारीरिक मीलनासाठी आतुर आहेत. याशिवाय व्यापक अशी प्रेमाची वा उदात्तपणाची जाणीव त्यांना दिसत नाही.

असें असलें तरी स्त्रीमनाच्या ज्या वांच्छा, आकांक्षा, इ. आहेत त्यांचें अधिकाधिक स्पष्टपणाने अविष्करण झालेलें आहे. इतकेहि संत वा पंडितकवींच्या काव्यांतून आढळून येत नाही. त्या कवींचें काव्य पाहिलें तर बहुपत्निकत्वाची चाल होती किंवा नाही याचाहि उलगडा होत नाही. त्याप्रमाणेच कौटुंबिक कलहाच्या स्वरूपाचासुद्धां पत्ता लागत नाही. व अशा उल्लेखांच्या अभावीं ह्या कालांतले लोक अत्यंत नीतिमान, चारित्र्यवान असावेत असा ग्रह होतो. त्याचेंच विशदीकरण भडकपणाने कित्येकदां होतेंहि. पण शाहीरांचें काव्य वा त्यांच्या सामाजिक लावण्या इ. पाहिल्या की, सामाजिक परिस्थितीची कल्पना येते, तो एक मोठा दुवा हातीं लागतो. स्त्रीजीवन हें विविध प्रकारच्या सांकेतिक व प्रत्यक्ष बंधनांनीयुक्त होतें. समाजजीवनाप्रमाणें त्यावरहि एकप्रकारची अगतिकता आली होती.

ब्रिटिश राजवटींतील साहित्यांतील स्त्रीजीवनाची पाहणी करण्याचें पूर्वसूत्र म्हणून हीं ब्रिटिशपूर्व कालांतील साहित्यांतील स्त्रीजीवनाची पाहणी केली आहे. ती करीत असतां जे निष्कर्ष निघाले आहेत ते अत्यंत महत्वाचे आहेत. पूर्वकालांत स्त्रीजीवनाचें स्वरूप कसें होतें ह्याचें व्यापक सांस्कृतिक पार्श्वभूमीवरूनचें अवलोकन पहिल्या प्रकरणांत केलें आहे. या प्रकरणांत त्या स्त्रीजीवनाच्या साहित्यांतील प्रतिबिंबाची पाहणी केली. ती करीत असतां असें निदर्शनास आलें आहे की, त्या कालांत साहित्य व जीवन यांत बिंब-प्रतिबिंबाचा संबंध नव्हता. त्या कालाची साहित्याकडे पाहण्याची दृष्टीच वेगळी होती. लोकांच्या साहित्यापासूनच्या अपेक्षा पण वेगळ्या होत्या. साहित्याकडे प्रचलित वा समकालीन जीवनाच्या प्रतिबिंबाच्या दृष्टीनें पाहाण्याचा प्रयत्न हा परकीय विचारांचा परिणाम आहे. साहित्याकडे ह्या दृष्टिकोणांतून जेव्हा पाहण्याचा प्रयत्न कांही टीकाकारांनी केला तेव्हां आपल्या साहित्याबाबत त्यांची बरीच निराशा झाली. व त्यांनीं त्याप्रमाणें पूर्वकालीन

---

१. रामजोशी लावण्या.

साहित्याचा अधिक्षेपहि केला. अशा टीकाकारांत इतिहासाचार्य वि. का. राजवाडे, वाङ्मयेतिहासकार वि. ल. भावे व आजच्या पिढींतील टीकाकार डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे इ. लोक प्रमुख आहेत.

वस्तुस्थिति अशी आहे की, साहित्याचा व जीवनाचा निकटवर्ति असा संबंध असतो असें म्हटलें जात असलें तरी तें जीवन म्हणजे व्यवहारांतलें भौतिक जीवन नसून समाजाचें नैतिक वा नीतिमूल्यात्मक जीवन होय. ही वस्तुस्थिति लक्षांत घेणें आवश्यक आहे. विज्ञानानें भौतिक जीवनांत असा मूलभूत फरक घडवून आणला आहे की, त्या जीवनाकडे आस्थेवाईकपणानें व सुधारणेच्या दृष्टीने आपण पाहूं लागलों आहोंत. विज्ञानपूर्वयुगांत भौतिक जीवन हें इतकें निसर्गावलंबी व अगतिक होतें कीं, त्याच्या धारणेंत कांही सुधारणा घडवून आणणें शक्य आहे हा विचारच माणसांच्या विचारकक्षेत येणें शक्य नव्हतें. अशा परिस्थितींत मानवी श्रेष्ठतर विचार आध्यात्मिक व विशुद्ध नैतिक मूल्यांवर केंद्रित व्हावेत हें अपरिहार्य होतें व तसेंच झालें आहे. प्रत्यक्षांत स्त्रीला अगर शूद्राला कोणतेहि अधिकार नव्हते, हें खरें, पण ह्या अधिकारांपेक्षां त्यांना आध्यात्मिक अधिकार देणें महत्त्वाचे वाटले. कारण प्रत्यक्ष व्यावहारिक वा आर्थिक इ. अधिकारांनीं समाजधारणेंत कांहीं अनुकूल फरक पडण्यापेक्षा प्रतिकूल फरक पडेल हीच विचारवंतांना भीति होती. म्हणूनच त्यांना सामाजिक वा भौतिक हक्कांचा विचारच करावासा वाटला नाहीं.

ब्रिटिश राजवटीच्या आगमनानें आपल्या समाजाच्या भौतिक धारणेंत फरक पडला व त्यानंतरच मानसिक ठेवणींत वा दृष्टिकोनांत फरक पडलेला आहे. ज्या समाजाच्या भौतिक, सामाजिक व मानसिक धारणेंत फरक होऊं घातला होता त्या समाजाची भौतिक, सामाजिक व नैतिक धारणा कशा प्रकारची होती त्याचें दिग्दर्शन ह्या दोन प्रकरणांतील विवेचनाने होऊं शकेल. ब्रिटिशांच्या आगमनानंतर आपल्या देशांत दोन्ही गोष्टी एकदमच आल्या. एक म्हणजे ब्रिटिशांच्या राज्याबरोबर नवी समाज वा अर्थव्यवस्था, आणि सर्वथैव नवी अशी राज्यव्यवस्था सुरू झाली. आणि तो सुरू होत असतांना आयते नवे विचार पण आले. या दुहेरी फरकांमुळे समाजाचें जीवन बदलूं लागलें. या फरकाचे परिणाम सुशिक्षित वर्गावर

प्रथम झाले. या वर्गास राज्यकर्त्यांनी जवळ केलें. प्रारंभीं हा सुशिक्षित वर्ग एकावयवी होता. पण जसजशी त्याची व्याप्ति वाढत गेली तसतसे त्याच्यांतहि वेगळे गट निर्माण होऊं लागले. त्यांत विरोधहि येऊं लागला. या वैचारिक विरोधांतूनच आधुनिक विचारसरणी निर्माण झाल्या.

तथापि परस्परविरोधी असणाऱ्या विचारसरणींना ब्रि. राटबटीने एक समान पाया दिला व तो म्हणजे व्यक्तिवादाचा होय. ह्या व्यक्तिवादाचा स्वीकार करण्याची पुरुषाची प्रक्रिया व स्त्रीची प्रक्रिया यांत अंतर होतें. हें अंतर कशा स्वरूपाचें होतें हें पाहणें अत्यंत महत्त्वाचें होतें. कारण तें समजून घेतल्यानंतरच एकमेकांच्या प्रतिक्रिया समजणें शक्य आहे व तें कसें झालें वा होत आलें तें पडताळणें शक्य आहे.

ह्या प्रबंधाच्या या पहिल्या दोन प्रकरणांतून ब्रि. राजकर्त्यांच्या आगमनापूर्वी या समाजाचे स्त्रीपुरुषसंबंध कसे होते व त्यांना कशाप्रकारचें वळण लागणें शक्य होतें हें पाहण्याचा उपक्रम केला आहे. पुढील व प्रबंधाच्या मूलभूत विवेचनाच्या आकलनासाठी हें विवेचन पार्श्वभूमिस्वरूप म्हणून महत्त्वाचें ठरेल असें वाटतें. जीवनाच्या अनुषंगाने साहित्याच्या धारणेंत, विचारांत, मूल्यांत फरक पडला आहे. स्त्रीजीवनाच्या स्वरूपाच्या दृष्टीने त्याचें विवेचन या दोन प्रकरणांत केलें आहे.

निष्कर्षाच्या दृष्टीने पाहतां असें म्हणतां येतें कीं, स्त्रीला ब्रि. पूर्वकालांत काडीचेंहि महत्त्व नव्हतें. "स्त्री ही या जगांत स्वतः करितां अस्तित्वांत नाहीं ती पुरुषाकरितां अस्तित्वांत आहे. तिचें व्यक्तित्व पुरुषांत समर्पित आहे. या तत्त्वाचाच पडसाद हिंदूंच्या सर्व प्रकारच्या स्त्रीजीवनावर त्याकाळीं पडलेला होता. स्त्रीला बालपणींच अज्ञान अवस्थेंत विवाहबंधनाने बद्ध व्हावें लागे. तिला स्वतंत्र वारसाहक्क पुरुषाच्या बरोबरीनें भोगण्याची कायद्यानें व धर्मानें मना केली होती. तिला स्वतंत्र व्यवसायाची व्यवहारांत बंदी होती. ह्या व्यवस्थेंत ती पिता, श्वशूर, सासू, पति यांच्या संपूर्ण आधीन असे. पांढरपेशा वर्गांत विधवाविवाहास बंदी होती. बालविधवासुद्धा सक्तीने सती जात, किंवा संन्यास धर्मानें घरांत विषण्णपणें आयुष्य घालवीत. अशारीतीनें माणूस या नात्यानें त्यांचें स्वतंत्र अस्तित्वच समाजास अमान्य होतें." (अभिरुचि दिवाळी अंक

१९४८. लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा लेख-भारतीयांचें सामाजिक परिवर्तन पृ. ३९५).

तथापि व्यवहारांत अशाप्रकारे कोणतेहि हक्क नसलेल्या स्त्रीस भागवतधर्माने परमार्थ साधनाचा हक्क प्राप्त करून दिला होता. हें ध्यानांत धरणें जरूर आहे.

ब्रि. राजवटीच्या आगमनानें जी परिस्थिती निर्माण झाली तींत भौतिक समृद्धतेची जाणीव होऊं लागली. एका बाजूने व्यक्तिवादी विचारहि आले. ह्या दोन गोष्टींचा परिणाम सुशिक्षित माणसाच्या मनावर झाला व तो आपल्या सहचारिणीकडे–स्त्रीकडे त्यादृष्टीने पाहूं लागला, तेव्हा त्याला काय आढळलें? तर ती आपल्या खूपच वर्षे मागे आहे. ही जाणीव प्रथम पुरुषाला झाली, त्याचे त्याप्रमाणे स्त्रीला दास्यविमुक्त करण्याचे प्रयत्न सुरू झाले, नंतर स्त्रीला झाली. ती आपली ध्येयें इ. ठरविण्यास पुढे येऊं लागली. पुरुषांतील कांहींची तिला मदत झाली. कांहींचा विरोध झाला. ह्या सर्व क्रिया प्रतिक्रिया ब्रि. राजवटीनंतर सुरू झाल्या.

त्याप्रमाणे नवीन राजवटीबरोबर साहित्याची कल्पना पण बदलली. नव्या समाजाची नीति–धारणा ही प्रायः भौतिक विचारांवर स्थिर होऊं लागली. पूर्वी 'धर्म' 'व्यवहारशास्त्रा' विरुद्ध बोलणें कठिण होतें. ती परिस्थिति बदलली. समाजाचे नीतिविचार व्यक्तिस्वातंत्र्याच्या भूमिकेवरून परीक्षिले जाऊं लागले, व त्या विचार–चर्चांनी साहित्य समृद्ध झालें. ह्या नव्या विचारदोहनांतील मूल्यस्वरूपाचें जें नवनीत निघालें तेंच ललित साहित्याने आपल्या पोषणास उपयोगांत आणलें. अशारीतीनें भारतीय समाजाच्या इतिहासांत सर्वच दृष्टीने नवा व अपूर्व असा हा जमाना सुरू झाला. त्याच्या पूर्वी कसला जमाना होता ह्याची कल्पना येण्यासाठी हें विवेचन केलें.

———

वि. १ परिशिष्ट : लोकवाङ्मय व स्त्री

ब्रिटिशपूर्वकालखंडांतील विविध ग्रंथबद्ध साहित्यांतील स्त्रीजीवनाचें स्वरूप पाहिलें. शेवटीं याच कालांत जें असंख्य अलिखित वाङ्मय रचलें गेलें त्यांतील स्त्रीजीवनाची पाहणी करणें आवश्यक आहे असें वाटतें. हल्लीचा कालखंड लोकोद्धाराचा कालखंड आहे. बहुविध अशा लोकजीवनाकडे आज निरनिराळ्या लोकांचें लक्ष जात आहे. त्याच्याकडे (लोकजीवनाकडे) हेटाळणीच्या दृष्टीने न पाहतां आदरभावाने वा आपुलकीच्या दृष्टीनें पाहिलें जात आहे. साहित्यक्षेत्रांत एक महत्त्वाची चळवळ सुरू झाली व ती म्हणजे लोकवाङ्मयाचें संग्रथन करणें व त्याचें मोठेपण लोकांना खुलवून सांगणें. आतापर्यंत बेंरंच 'लोकसाहित्य' उजेडांत आलें आहे. सानेगुरुजींचे 'स्त्रीजीवना'चे दोन भाग, डॉ. कमलाबाई देशपांडे यांचे 'स्त्रीगीतें' वा 'अपौरुषेय वाङ्मय' महादेवशास्त्री जोशी यांचें 'गोड स्त्रीगीतें' हें प्रमुख ग्रंथ होत. याशिवाय इतर अनेकांनीं संग्रह करण्याचें काम चालू केलें आहे. त्यांचे संग्रह पण प्रसिद्ध होत आहेत. ज्याप्रमाणें काव्याचें संग्रथन सुरू झालें आहे त्याचप्रमाणे 'लोककथा' पण पुढे येत आहेत. शं. ग. दाते यांनीं व वि. ग. भिडे यांनी कांही संग्रह प्रसिद्ध केले आहेत. भिड्यांच्या संग्रहांस शेजवलकर व म. म. पोतदार यांच्या प्रस्तावना पण आहेत. अशाप्रकारें मराठींत लोकवाङ्मयाचें हें दालन समृद्ध होत आहे. शालेय अभ्यासक्रमांत पण त्याचा समावेश झालेला आहे. टीकाकारांचें त्याच्याकडे लक्ष जात आहे. ह्या ठिकाणीं त्याच्यांतील स्त्रीजीवनाच्या वैशिष्ट्याची पाहणी करावयाची आहे.

या वाङ्मयाचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या साहित्यास 'स्त्रियांचें' वा 'अपौरुषेय वाङ्मय' असें म्हटलें जातें. बहुसंख्य ओव्या, कथा इ. या स्त्रियांकडूनच रचल्या गेल्या असाव्या असें मत सर्वदूर संमत झालें आहे. बेंरंचसें वाङ्मय स्त्रियांच्या पाठांतरांत होतें व त्यांच्याजवळून संग्राहकांनी उतरून घेतलें आहे. अशा प्रकारे स्त्रियांनी स्वत: रचलेल्या या

वाङ्मयांत त्यांचें अंतरंग ओतप्रोत भरलेलें असावें हें क्रमप्राप्तच होतें. त्याचबरोबर हें सर्व वाङ्मय इंग्रजी अमदानीच्या पूर्वी केव्हांतरी लिहिलें गेलें. सानेगुरुजींनी उधृत केलेल्या व डॉ. कमलाबाईंनी जमविलेल्या कांही ओव्यांत जरी आगगाडी, मोटार इ. चा उल्लेख येत असला तरी बहुसंख्य साहित्य हें ब्रि. पूर्वकालीन आहे ह्यांत शंका नाही. अशा वाङ्मयाची पाहणी पण करण्याचा प्रयत्न कांहीनी केला आहे.

हें वाङ्मय ज्या कालांत लिहिलें त्या कालांतील स्त्रीजीवनाचें स्वरूप कसें होतें याचें विवेचन यापूर्वी आलेंच आहे. या वाङ्मयाकडे पाहिलें असतां कोणती गोष्ट प्रथम ध्यानांत येत असेल तर त्यांतील प्रसन्न व सोज्ज्वल वातावरण ही होय. समाजपरिस्थिति ही इतकी गतिहीन होती की तिच्यांत कांही फरक पडणें शक्य आहे हा विचारच त्यांच्या (स्त्रियांच्या) लक्षांत आलेला नाही. मानव्याच्या मोठेपणाची एक खूण म्हणजे परिस्थितीशी तादात्म्य पावणें वा जुळवून घेणें ही होय. वाङ्मयाचें परिशीलन करतांना ही गोष्ट ध्यानांत आल्याविना राहात नाही की, स्त्रियांनी मानव्याचें हें लक्षण पूर्णपणें आविष्कृत केलें आहे. पुरुषांनी वा समाजरचनेने लादलेल्या जीवनाशी त्या बिचाऱ्या इतक्या समरस झाल्या आहेत की, त्या समाजसत्तेच्या पोटीं त्यांनी आपलें भावजीवन फुलविलें आहे. त्या त्या भावजीवनांत इतक्या तल्लीन झाल्या की त्यांनी आपणाला व पुरुषालाहि आपल्या अगतिक जीवनाची जाणीव होऊं दिलेली नाही.

ज्या कालांत त्यांनी हें वाङ्मय लिहिलें त्या कालांत त्यांचें जीवन केवळ घराच्या व कुटुंबाच्या चार भिंतींत सामावलेलें होतें. सहाजिकपणें त्यांच्या साऱ्या भावना ह्या जीवनांतील विविध अवयवांशी निगडित होणें अपरिहार्य होतें. ह्या जीवनांतले प्रमुख अवयव म्हणजे भाऊ, बहिण, माता, पिता, पति, सासू, सासरा, दीर, नणंद, जाऊ, मुलगामुलगी, इ. व्यक्ती होत. तसेंच ह्या जीवनांतले प्रमुख प्रसंग म्हणजे, विवाह, अपत्यागम, भाऊबहिण इ. चे विवाह व अपत्यागम, माहेरवास, सासरवास इ. होत. या सर्व जीवनांत स्त्री ही केवळ कारुण्याची मूर्ति झाली होती. तिच्या भावनाहि पण सहाजिकपणेंच कारुण्यजनक अशाच आहेत. भाऊ, बहिण, आई, सासू, पति इ. सर्व जवळच्या व्यक्तींवर निरागसपणें प्रेम करणाऱ्या,

त्यांच्या हितांतच स्वतःचें हित पाहणाऱ्या, स्त्रीची खरी करुण कहाणी कोणती असेल तर तिला बिचारीला जीवनांत स्वतंत्र स्थान नव्हतेंच. तिच्या कोणत्याहि भावनांची दखलगिरी घेतली जात नव्हती हीच होय.

अशाप्रकारे जीवनांतील व्यापकतेला ही स्त्री इतकी मुकली होती, ती इतकी भावनाप्रधान वा हळवी झाली होती की, तिच्यांत स्वतःच्या जीवनांतील दुःखांकडे डोळे उघडून पाहण्याचें सामर्थ्यच उरलें नव्हतें. स्वतःच्या जीवनांतील खऱ्या करुण प्रसंगांकडे घटनांकडे डोळे उघडे ठेवून पाहणेंच तिला अशक्य होतें. कारण त्या प्रसंगांशी अशुभत्व जमा झालेलें होतें. व त्या अशुभत्वाचें गायन कसें करायचें? कारण रूढ समजुतीप्रमाणें शुभाचेंच तेवढें गायन करावयाचें, अशुभाचें गायन निषिद्ध गणलें जाई. आता विवाहासारख्या शुभ प्रसंगांशीच जर पितृगृहत्यागासारखा करुण प्रसंग उद्भवला तर त्याला हरकत नाही. या संकेतप्राधान्यामुळे असें आढळून येतें की, बालविवाहाच्या प्रथेमुळे बहुसंख्य विधवा असणाऱ्या स्त्रियांच्या तोंडी सीता, सावित्री, पार्वती आदि पतिव्रतांची गाणीं असत. कारण स्त्रीजीवनाचें तें उद्दिष्ट होतें. (महादेवशास्त्री जोशांच्या पुस्तकांत अशा व्रतांवरील गीतें संग्रहित केलीं आहेत.)

या सर्व विवेचनावरून ही गोष्ट स्पष्ट होईल की, ह्या साहित्यांतलें भावनाविष्करण हें अव्वल दर्जाचें असलें तरी तें समाजपरिस्थिति सापेक्ष आहे. स्त्रियांच्या काव्याचे विषय हे अत्यंत मर्यादित आहेत. त्यांत व्यापकता कमी आहे कारण ती त्यांच्या जीवनांतच नव्हती. साने गुरुजींनी तीर्थें, स्थळें, राष्ट्रीय प्रसंग इ. वरली कांहीं रचना उधृत केली असली तरी ती अगदी थोडी आहे व आधुनिकहि आहे.

अर्थात् या काव्याच्या मोठेपणाबद्दल आशंका व्यक्त करावयाची नाही, त्याचें भावनात्मक मोठेंपण इतक्या थोर थोर व्यक्तींनी वर्णिलें आहे की, तें वर्णिण्यांत, वा त्यांतील आशय अमान्य करण्यांत कांहीहि औचित्य नाही. या काव्यांतून स्त्रीजीवनाचें प्रतिबिंब कोणतें आहे त्याची पाहणी करतांना वेगळ्या दृष्टीने ह्या साहित्याचें अवलोकन करणें आवश्यक आहे असें वाटलें व म्हणून तें येथे केलें आहे.

शिवाचें व शुभाचें गायन करणें हेंच काव्याचें उद्दिष्ट होतें, आणि

जीवन हें इतकें अगतिक होतें की, त्यांतील भयानक वास्तवतेकडे (grim reality) डोळे उघडे ठेवून पाहणें शक्य नव्हेत. हा उल्लेख वर आला आहेच. सहाजिकच स्त्रीजीवनांतील खेर करुण प्रसंग या काव्यांत आले आहेत असें म्हणतां येत नाही. तथापि आपल्या जीवनाच्या अगतिकत्वाची जाणीव कांही कवियित्रींना झाली होती असें दिसतें. साने गुरुजींनी आपल्या 'स्त्रीजीवना' च्या 'मुलगी' या प्रकरणांतून अशा प्रकारचे कांही उल्लेख उधृत केले आहेत. त्याटष्टीने पाहतां हें सारें प्रकरण बारकाईने परीक्षिण्यासारखें आहे. त्यांतून आतापर्यंत जे विचार मांडले आहेत त्यांना परिपोषक अशी उदाहरणें सांपडूं शकतील.

मुलगी होणें हें दुर्भाग्याचें लक्षण आहे अशी समाजाची समजूत होती. पण स्वत: स्त्री तसें कसें मानील? म्हणून ती म्हणते—

कन्या झाली म्हणून नको करूं हेळसांड ।
गोपूबाळाच्या शेजारी । उषाताईचा पाट मांड ।
कन्या झाली म्हणून । नको घालू खाली मान ।
घडेल कन्यादान । काकारायांना ।
कन्यादान करूनी । कन्या एकीकडे
पृथ्वीदान घडे । काकारायांना ॥

स्त्रीला लग्न हें अत्यावश्यक आहे असें मानण्यासाठी हें आमिष होतें. मुलीची सासरीं कशी परिस्थिति असते त्याचें वर्णन असें आहे.

सासरचे बोल । कडू विषाचे ग प्याले
तुझ्यासाठी गोड केले । मायबाई
सासूचा सासुरवास । रडवीतो पदोपदीं
लेक थोराची बोलेना । कोणाशी परी कधी ।
सासरचे बोल । जसे निवडुंगाचे घोस
शीलवंताच्या मुली सोस । उषाताई ।

आवाने जर सासरच्या माणसांचे शब्द ऐकले तर काय होईल याचें वर्णन

'सासरचे बोल । भाऊ ऐकतो चोरोनी ।
नेत्र येतात भरोनी । भाईरायाचे ॥,' असें केलें आहे.

सासरीं सारींच बोलणार. सासुसासरे, दीरनणंदा, सर्वांचाच बोल-

ण्याचा अधिकार. पहाटेपासून प्रहरभर रात्र होईपर्यंत राबराब राबावें. भारतीय स्त्रिया काय म्हणतात तें ऐका—

सासुरवाशिणी । तूं ग वाड्यांतला बैल
कधी रिकामी होशील । उषाताई
स्त्रियांचा हा जन्म । नको घालूं सख्या हरी
रात्र ना दिवस । परक्याची ताबेदारी.
नाचण्यांचा कोंडा । नाही कशाच्या कामकाजा
मुलगीचा जन्म रामा । देऊं नये

आपण किती म्हटलें की, स्त्रियांना आम्ही देवतांप्रमाणे वागवितों तरी स्त्रियांचा अभिप्राय तोच खरा. या भारतांत स्त्रियांचा जन्म नको असें आपण म्हणावयास लावलें याची लाज भारतीय पुरुषांना वाटली पाहिजे. सासरच्या मंडळींस वाटली पाहिजे असें पू. साने गुरुजीच आपल्या स्त्री-जीवनाच्या १३१व्या पृष्ठावर म्हणतात.

त्याचप्रमाणे

सासूचा सासरवास । सारा मनांत गिळीते ।
कंथाशी हासते । उषाताई.
होवो माझे कांही । नाही मला त्याचें दुःख
माझ्या कुंकवाला । मिळूं दे परी सुख.

ह्या ओळींत भारतीय स्त्रीचा मुख्य भाव आविष्कृत झाला आहे. तथापि एका भगिनीस काय अनुभव येतो तो पाहण्यासारखा आहे.

जीवाला देते जीव जीव देऊन पाहिला
पाण्यांत पाषाण अंतीं कोरडा राहिला
फोडीलें चंदन त्याच्या केल्या बारा फोडी
स्त्रियांची जात वेडी पुरुषांना माया थोडी।

(पृ. १४३ ' स्त्रीजीवन ')

अशाप्रकारचे हे उल्लेख अल्प असले तरी त्यांत प्रातिनिधिकता नाही, असें म्हणतां येणार नाही. बहुसंख्य ओव्यांतून व गीतांतून स्त्रीच्या कौटुंबिक जीवनांतल्या भावनांना वाट मिळाली आहे. काव्यदृष्ट्या वा भावनाविष्करणाच्या दृष्टीने त्यांचें मोठेपण हें वादातीत आहे. पण त्यांतील

भावनाशीलत्व हें ज्या समाजव्यवस्थेच्या अनुषंगाने अवतरलें आहे, त्या समाजजीवनाची चौकट कशी होती हें त्या जीवनाच्या पार्श्वभूमीवरून पाहावयाचें होतें. साहित्याचें परिशीलनहि त्याच दृष्टीने करावयाचें होतें. तें येथें केलें आहे. स्त्रीजीवनांत ज्या विशिष्ट–मातृसुलभ–भावना महत्त्वाच्या होत्या त्यांचें आविष्करण काव्यांतून झालें आहे.

लोककथा हा या वाङ्मयाचा एक भाग आहे. लोककथांतून व्यापकता अधिक प्रमाणांत दिसून येते. केवळ भावनागर्भतेपेक्षां कल्पकता, बुद्धिचातुर्य इ. चा अधिक उपयोग करून घेतलेला आढळतो. त्याचप्रमाणें लोककथांचा रोख कोणता तरी बोध उपदेश देण्याकडे आहे असें आढळून येतें. स्त्रीजीवनाच्या आविष्करणाच्या दृष्टीने या कथांतून विशेष ठसठशित असें कांही हातीं लागत नाही. राणीचें कौशल्य, कष्टाळूपणा इ. गुण तसेंच लोभीपणा, हावरेपणा इ. सारखे दुर्गुण यांची योजना स्त्रीपात्राची सजावट करतांना केलेली आढळते. लेखकाला वा गोष्ट जुळवणाऱ्याला बुद्धिगम्य क्लृप्तिप्रधान असा आनंद द्यावयाचा आहे. कारण ही लोककथा प्रामुख्याने 'सांगितली' जावयाची आहे. सांगणारा आपल्या कुवतीनुसार वर्णन संवाद इ. योजील पण मध्यवर्ति धागा हा अधिक चमत्कृतीपूर्ण, नवलपूर्ण असावयास हवा. नीतिकथांप्रमाणे लोककथांत बोधहि महत्त्वाचा असतो. कष्टांचें महत्त्व पटविणें, सत्प्रवृत्तीची थोरवी पटविणें इ. उद्देशांनी मुद्धां कथा रचलेल्या असतात. ज्या कालांत त्या रचल्या गेल्या त्या कालांतल्या जीवनाची ठेवण पाहतां कथांतून जीवनसापेक्षता प्रतीत होत नाही. मानवी कल्पकतेचे नमुने म्हणूनच त्या संग्राह्य वाटतील. ह्यापलीकडे जीवनसाक्षेप एकंदरीने कमीच.

———

अव्वल इंग्रजी व लोकहितवादींचा काल

ब्रिटीशांची राजवट सामान्यतः महाराष्ट्रांत १८१८ पासून सुरू झाली असें म्हणावयास प्रत्यवाय नाही. कै. तात्यासाहेब केळकरांनी "मराठे व इंग्रज" या ग्रंथांत प्रारंभीं या संबंधी चर्चा केली. त्या चर्चेनुसारहि हेंच वर्ष सामान्यतः मुक्कर करावयास हरकत नाही. त्यानंतर सुरू होणारा हा कालखंड १९४७ मध्ये संपतो. त्याचा पहिला टप्पा १८७४ च्या सुमारास संपतो असें म्हणतां येईल. १८७४ मधल्या दोन प्रमुख घटनांचा उल्लेख करतां येईल. पहिली न्या. मू. रानड्यांनी ब्रि. पार्लमेंटकडे सादर केलेला जबाबदार राज्यपद्धतीचा अर्ज; व दुसरी घटना म्हणजे 'निबंधमाला' ह्या राष्ट्रीय विचारांचा प्रसार करणाऱ्या मासिकाची सुरवात. ह्या दोन घटना कांही दृष्टीने युगनिदर्शक म्हणून गणतां येतील म्हणून हा पहिला कालखंड येथील विवेचनासाठी मुक्कर केला आहे.

'इ. स. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाल्यापासून प्राचीन व मध्ययुगीन भारताचा अंत झाला. आधुनिक भारताचा इतिहास अथवा भारताचा आधुनिक इतिहास सुरू झाला.'[1] ही वस्तुस्थिति अविवाद्य आहे.

हिंदुस्थानांत ब्रिटिशांचें राज्य प्रस्थापित झालें तो प्रकार, व तें राज्य प्रस्थापित झाल्यानंतर नवीन राज्यकर्त्यांबरोबर जें नवें समाजजीवन ह्या मोठ्या राष्ट्रांत प्रस्थापित झालें तें पुष्कळ दृष्टींनी केवळ अपूर्व होतें. 'ब्रिटिशांनी हिंदुस्थान जिंकला ही घडामोड परकीय देश जिंकून घेण्याच्या परराष्ट्रीय राजकारणाच्या सदरांत पडत नसून हिंदी समाजांतील एका वर्गाने दुसऱ्या वर्गाचा पाडाव करावा व एका वर्गाच्या हातची सत्ता दुसऱ्या वर्गाच्या हातीं द्यावी अशा स्वरूपाची अंतर्गत क्रांतीची होतीं' असें विवेचन सर जॉन सीले याने आपल्या 'इंग्लंडचा विस्तार'[2] या

---

१ आधुनिक भारत पृ. ३०, जावडेकरकृत.

२ The Expansion of England-J. R. Sealy.

ग्रंथांत केलें आहे व आचार्य जावडेकर यांनी आपल्या 'आधुनिक भारतां'त तें विवेचन निदान कारकीर्दीच्या प्रथमार्धाला तरी लागूं पडतें असें मान्य केलें आहे.[१]

ब्रि. राजवट ज्या वेळीं हिंदुस्थानांत प्रस्थापित झाली त्यावेळेला समाजाची स्थिति अत्यंत खालावली होती. जीर्ण परंपरावादी विचारांचा समाजावर विलक्षण पगडा पडला होता. 'हिंदीसमाज अगदी विस्कळित झाला होता. निरनिराळे सरदार व त्यांच्या बतनवाड्या यांमुळे समाजाचे असंख्य विभाग पडले होते. त्यांच्या आपापसांतील भांडणांमुळे सबंध समाज हादरून निघाला होता.'[२] उलट इंग्रज येथे आले तेव्हा त्यांची समाज-स्थिति पहा. युरोपांत इतर कुठल्याहि देशांत न आढळणारी राजकीय प्रगति इंग्रजांना सांस्कृतिक विकासाने लाभली होती.[३] याचाच अर्थ 'मराठ्यांची संस्कृति ब्रिटिशांच्या संस्कृतीहून राष्ट्रीयत्व आणि लोकशाही या दोन्ही तत्त्वांच्या दृष्टीने मागासलेली दिसते.'[३]

उत्तर पेशवाईचा वारसा:— सामाजिक परिस्थिति विस्कळीत होती, त्याचा परिणाम स्त्रियांवर फारच प्रतिकूल झाला. स्त्रीजीवनाला अक्षरशः काडीचीहि किंमत नव्हती. "स्त्रियांच्या बाबतींत पाळल्या जाणाऱ्या धर्मविधीला कोठेच खळ नव्हता. 'चितामीं' त किंवा थडग्याच्या खड्ड्यांत जशी चाल असेल त्याप्रमाणे, पतिलोकीं जाण्यासाठी स्त्रिया बेलाशक उड्या टाकून प्राणत्याग करीत होत्या. 'ब्राह्मणांच्या स्त्रियांना आणखी एक देहांताचा मार्ग मोकळा होता तो म्हणजे सती जाण्याचा."[४] १७७३ मध्ये माधवराव पेशव्यांच्या बरोबर रमाबाई पेशवे सती गेल्या ह्या प्रख्यात उदाहरणावरून ह्या चालीस राजमान्यताहि कशी मिळाली होती हें स्पष्ट होतें. १८०० मध्ये प्रसिद्ध मराठी मुत्सद्दी नाना फडणवीस वारले. त्यांनी ९ लग्नें केलीं व शेवटची पत्नी त्यांच्या मृत्यूसमयीं अवघी ९ वर्षांची

---

१ आधुनिक भारत पृ. २३ व ३३, जावडेकरकृत.

२ आजकालचा महाराष्ट्र पृ. ६०७.

३ आधुनिक भारत पृ. ५.

४ न्या. मू. रानडेचरित्र–फाटक. पृ. १११.

होती. [१] 'बायकांची खरेदी–विक्री, फार मोठ्या प्रमाणावर होई. पुरुषांचीहि क्वचित् होई.'[२] थोडक्यांत तो काल म्हणजे "दंगेधोपे, लढाया, दानधर्म, हव्य कव्य यांच्या दंगलीचा काळ असें म्हणतां येईल. [३] ज्योतिषावर लोकांचा बराच विश्वास असे. स्त्रियांचें वैधव्य हें त्यांच्या पूर्वजन्मींच्या पापाचें फल असें समजण्यांत येई.[३] इं. अंमलापूर्वी वा तो अंमल सुरू होण्याच्या सुमारास इ. स. १८२५ मध्ये एकट्या बंगालमध्ये एका वर्षांत ११५ इतक्या स्त्रिया सती गेल्या. [४] स्त्रियांना साक्षर करणें महापाप समजण्यांत येत असे. मुलगी आठ वर्षांची झाली रे झाली की तिचा विवाह केलाच पाहिजे असा संभावित रिवाज होता. केला नाही तर आईबापांना नि सग्यासोयऱ्यांना समाजांत उजळ माथ्याने वावरण्याची पंचाईत. आठ वर्षांच्या मुलीचा नवरा किती वयाचा असावा याचाहि घरबंध नसे. चाळीस वर्षांचा बाप्याहि चालायचा. तशांत दुर्दैवाने एखादी बाला विधवा झाली तर तिचे सासरीं माहेरीं भयंकर हालहाल व्हायचे. तिचा केशकलाप न्हाव्याकडून भादरून विरूप करायचे, उपाशी ठेवायचे, मारहाण करायचे, भाजायचे, लासायचे, 'अवदसा, पांढऱ्या पायाची, हिने नवऱ्याला खाल्ला, राक्षसीण आहे ही.' असे शिव्याशाप तिला बिचारीला दररोज खावे लागत. कधी कधी तिला घराबाहेरहि हाकलून देण्यांत येत असे. शिक्षण नाही, कसली विद्या नाहीं, समाजांत कोठे स्थान नाही, काय करायचें तिने? कोणाच्या घरीं आचारीण, मोलकरीण म्हणून मरण येईतोंवर जगावें किंवा तळीविहिरीचा ठाव घ्यावा...पन्नास वर्षांपूर्वीपर्यंत संभावित म्हणविणाऱ्या पांढरपेशा हिंदु जमातींत अशी स्त्रियांची अवस्था होती...[५]" उतारा जरा मोठा असला तरी त्यावरून सामाजिक परिस्थितीची व स्त्रीजीवनविषयक परिस्थितीची योग्य कल्पना येऊं शकल. ही परिस्थिति जर ह्या शतकाच्या प्रारंभापर्यंतहि होती तर त्यापूर्वी कसलें दैन्यवाणें जीवन स्त्रियांच्या

---

१ शतपत्रें–प्रस्तवना.

२ पेशवाईच्या सावलींत : चाफेकर.

३ 'शतपत्रें.' पृ. ३६८.

४ India Today : Palme Dutt.

५ के. सी. ठाकरे: 'पंडिता रमाबाई' पृ. १, २.

वांट्यास आलें असेल ह्याची कल्पना येऊं शकते. सर्व हिंदुस्थानांत अशा प्रकारची परिस्थिति होती. कोणताहि प्रांत ह्या परिस्थितीला अपवाद होता असें नव्हे.

तथापि बंगालमध्ये ब्रिटिशांचा अंमल जरा लवकर प्रस्थापित झाला.[१] व तेथील लोकांना ब्रि. राज्याचा वेगळेपणा लवकर प्रतीत झाला. सामाजिक जागृतीहि तेथे प्रथम झाली. १८००त लॉर्ड वेलस्लींनी सनदी नोकरांसाठी फोर्ट विल्यम कॉलेज काढलें.[२] ह्या जागृतीचें प्रतीक म्हणजे पहिलें सुधारक राजा राममोहन रॉय हे होत. हिंदु संस्कृतविद्येचा व्यासंग या गृहस्थांनी केला, बौद्धधर्माचा तिबेटांत जाऊन अभ्यास केला. त्यांना पर्शियनहि चांगलें येत होतें. पण शेवटीं त्यांना इंग्रजी शिक्षणाविना ह्या देशाचें पाऊल पुढें पडणार नाही असें कळून आलें. स्त्रीजीवनविषयक निर्घृण रूढी म्हणजे सती तिच्याविरुद्ध ह्यांनी प्रथम प्रयत्न केले. व १८२९त कायदा करवून घेतला.

पण ह्याच वेळीं महाराष्ट्रांतली परिस्थिति कमालीची खालावली होती. समाज कृतिशून्य कसा झाला होता याचें वर्णन 'न्या. मू. रानडे' यांच्या मृत्यूलेखांत लो. टिळकांनीं 'महाराष्ट्र हा त्यावेळीं थंड गोळा होऊन पडला होता,' अशा शब्दांत केलें आहे.

'अनेक धर्मांच्या व जातींच्या लोकांत राष्ट्रीयत्व कसें निर्माण करावें आणि सरंजामशाही मोडून लोकशाही कशी स्थापन करावी हे दोन धडे भारतीयांना युरोपीयांपासून त्या वेळीं शिकावयाचे होतें.'[३] ह्या दोन धड्यांची स्पष्ट जाणीव इ. १८७४ चे सुमारास झाली. व तिचे निदर्शक असे दोन प्रसंग याच प्रकरणांत प्रारंभीं उल्लेखिले. (आज हे दोन्ही धडे आत्मसात केले आहेत असें मान्य करावयास हरकत नाही.) तथापि ही अवस्था (१८७४) बरीच दूरची आहे. सामान्यतः राष्ट्रीय दृष्टीने विचार करतांना ही प्रक्रिया दृग्गोचर होत असली तरी स्त्रीजीवनाचा विचार करतांना ती तितकी स्पष्टपणें दृग्गोचर होत नाही. तथापि ब्रिटीश राजवटींत

---

१ आजकालचा महाराष्ट्र : पृ. ५०.

२ तेथें बंगालीभाषेचा अभ्यास होऊं लागला. अ. म. ग. पू. पी. –गं. बा. सरदार.

३ आधुनिक भारत. पृ. ३०.

पुरुषांच्या विचारांत, ध्येयांत...मूलगामी फरक पडूं लागला होता. त्यांच्या ठायीं ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या सहवासाच्या अनुषंगाने नवें कर्तृत्व निर्माण होत होतें. नवी दृष्टि निर्माण होत होती. ह्या नव्या दृष्टीला प्रथम जर कोणती गोष्ट दिसली असेल तर ती म्हणजे स्त्रियांची अवहेलनात्मक स्थिति. १८७४ पर्यंतचा काल हा प्रामुख्याने सामाजिक चळवळीचा काल होय. नवी राजकीय चळवळ ज्या व्यापक पायावर उभी राहणें आवश्यक होतें तो पाया तयार करण्यासाठी योग्य प्रकारची मनोभूमिका व समाजभूमिका निर्माण करण्याचें मोठें काम ह्या कालांतील लोकहितवादी, ज्योतीराव फुले, विष्णुशास्त्री पंडित, विष्णुबुवा ब्रह्मचारी, कृष्णशास्त्री चिपळूणकर, भांडारकर, रानडे, दादोबा पांडुरंग, बाबा पदमनजी आदि धुरंधर समाजसेवकांनी केलें. तें काम करीत असतां स्त्रियांच्या जीवनावर कोणते कोणते दूरगामी परिणाम झाले, व ते कसकसे झाले हें पाहणें आवश्यक आहे.

ब्रि. राज्याचें वेगळेंपणः—ब्रिटीशांचें या देशांत प्रस्थापित झालेलें राज्य अनेक दृष्टींनी वेगळें होतें, हीं गोष्ट तें राज्य सर्वदूर रूढ झाल्यावर ज्या नव्या नव्या सुधारणा ब्रिटाशांनी येथे सुरू केल्या त्या लक्षांत घेतल्या असतां स्पष्ट होते. ह्या सुधारणांनी जीवनांत इतकी आमूलाग्र क्रांति घडवून आणली की नवा दृष्टिकोण निर्माण झाला. पहिले सर्वांगीण सुधारक लोकहितवादी ह्यांच्या विचारांकडे पाहिलें तर ह्या दृष्टिकोणाची कल्पना पटते व हा दृष्टिकोण ब्रिटीशांच्या राजवटीमुळे प्रामुख्यानें निर्माण झाला होता ही वस्तुस्थिति प्रत्ययास येते.

ब्रिटीशांच्या प्राथमिक सुधारणांत रस्ते बांधणें, टपालाची सार्वत्रिक व्यवस्था करणें ह्या जशा मूलभूत परंतु सर्वसामान्य समाजास आदर वाटावयास लावणाऱ्या सुधारणा आहेत; त्याप्रमाणे रेल्वेसारख्या आश्चर्य वाटावयास लावणाऱ्या सुधारणाहि आहेत. तथापि ब्रिटीशांनी लोकांचीं मनें कशाने जिंकलीं असतील तर तीं त्यांच्या न्यायशीलतेमुळें.[1] "इंग्रजी राज्याची चोहोंकडील कायदेबंद व्यवस्था हेंच लोकांना विचार करायला लावणारें एक सामर्थ्य होतें. इंग्रज राज्यकर्ते कोणतेंहि नवें काम करण्यापूर्वी त्या संबंधाचा एक कायदा ठरवून टाकीत असत... हिंदुस्थानांत वेळोवेळीं

१ आधुनिक भारत पृ. ४०.

राज्यव्यवहारांत व लोकव्यवहारांत जे फेरबदल घडत तेहि प्रथम कायदा नंतर फेरबदल अशा क्रमाने लोकांच्या अनुभवास येत"[१] लोकमान्य टिळकांचा सुद्धां ब्रिटीशांच्या न्यायशीलतेवर विश्वास होता असें स्पष्ट दिसतें. स्वतःविरुद्ध केलेल्या राजद्रोहाचे आक्षेप ब्रिटिशप्रणित कायद्याचा आधार घेऊन खोडून काढण्याचा त्यांनी यत्न केला आहे. यावरून इंग्रज राज्यकर्त्यांच्या कायदेबंद राज्याचा ठसा सुशिक्षितांच्या मनावर किती खोल उमटला होता हें प्रत्ययास येतें.

त्याचप्रमाणें ब्रिटिशांनी आधुनिक कालास शोभेल अशा प्रकारचें सुरक्षित व शांततापधान जीवन प्रथमच निर्माण केलें. लोकहितवादींच्या कित्येक पत्रांतून पेशवाईतलें जीवन कसें होतें ह्याचें दर्शन होतें, त्यावरून तत्कालीन समाजाला स्थैर्य व स्वास्थ्य यांचा कसा लाभ झाला असेल व ब्रि. राज्यकर्त्यांबद्दल आदर निर्माण झाला असेल हें पटतें. शांततापधानजीवनाबरोबरच त्यांनी समाजजीवनाला अपरिपोषक, अमानुष असे निरनिराळे प्रकार रूढिरूपानें रूळून गेले होते ते खडाखड कायद्याने बंद केले. उ० ठगांचा बंदोबस्त, सतीजाण्याची बंदी, नरबलि देण्याची बंदी, क्षेत्र वा पुण्यस्थानीं विविध मार्गाने आत्मत्याग करण्यास बंदी[२] इ. विविध प्रकारच्या अमानुष रूढींचा नायनाट करून मानवी जीवनाची उंची एकंदरीने वाढविली.

तिसरा महत्त्वाचा फरक म्हणजे शिक्षणास सुरवात. 'इंग्रजांनी सरकारी खर्चाने लोकांना विद्या प्राप्त करून घेण्याची जी व्यवस्था केली, तिचें विशिष्ट रूप भारतीय इतिहासाला अगदी अपरिचित होतें. लोकांना सज्ञान करण्याची जबाबदारी सरकारची आहे हें तत्त्व प्राचीन भारतीय संस्कृतींत अप्रत्यक्ष होतें तें इंग्रजी राज्यांत प्रत्यक्षावस्थेस आणलें.'[३] विशेष म्हणजे हें शिक्षण सार्वत्रिक होतें.

ह्या सर्व सुधारणांच्या जोडीला ब्रिटीशांचे तत्कालीन राज्यकर्ते-म्हणजे एल्फिन्स्टन्, मन्रो, माल्कम हे गव्हर्नर्स व बेंटिंक हा गव्हर्नर जनरल ह्यांचें धोरण हेंहि एकंदरीने पोषक होतें. " या सर्वांनी हिंदी लोकांना शिक्षण

---

१ अर्वाचीन महाराष्ट्रांतील ६ थोर पुरुष: फाटक.

२ न्या. मू. रानडे चरित्र: फाटक.

३ सहा थोर पुरुष– फाटक पृ. ८१.

द्यावें, त्यांचा हळुहळू राज्यकारभारांत अधिकाधिक प्रवेश करून द्यावा, आणि कालांतराने ते स्वतंत्र होण्यास लायक बनतील तेव्हा आपला व्यापार व आपण स्थापलेल्या संस्था सुरक्षित राहतील अशी दक्षता घेऊन त्यांना स्वतंत्रहि होऊं द्यावे असे विचार व्यक्त केलेले आहेत."[१] १८१९ ते १८२७ पर्यंत मुंबईचा गव्हर्नर असलेला एल्फिन्स्टन् व मद्रासचा गव्हर्नर (१८२० ते १८२७) सर टॉमस मन्रो " यांनी ब्रिटिश राजवटीला एक उदार धोरण लावून दिलें किंवा दाखवून दिलें, आणि तें जाहीर करून एतद्देशिय कांही लोकांचीं मनें आकर्षण करून घेतलीं " [२] हें आकर्षण १८५० पर्यंत तसेंच होतें. ' आमच्या लोकांच्या रीति अगदी बदलल्याशिवाय ह्या देशाचें हित होणार नाही. व या लोकांस स्वतां राज्य चालविण्याचें सामर्थ्य आल्याखेरीज इंग्रज लोक ह्या देशांतून गेले तरी उपयोग होणार नाही. पुन्हा गर्दी होईल, व बेबंदी, अंदाधुंदी, भालेराई, होळकरी गर्दी व पेंढारी अशा गोष्टी पुनरपि होतील. कोणाचा जीव व घरदारहि निर्भय राहणार नाही "[३] अव्वल इंग्रजींतील अव्वल दर्जाच्या सुधारकाचे हे विचार पूर्वग्रहदुषित दृष्टींतून पाहिलें नाही तर इंग्रजांनी कसल्या प्रकारचें जीवन निर्माण केलें व कसल्या प्रकारचें आकर्षण लोकमनांत निर्माण केलें ह्याची साक्ष देतात. इंग्रज देश सोडून गेल्यानंतरहि जेव्हा शास्त्रीय बुद्धिवादी दृष्टीने विचार करण्याचा प्रयत्न होतो; तेव्हा इंग्रजी राजवटीनें आणलेल्या नव्या नव्या गोष्टी मान्य कराव्या लागतात. ' अभिरुचि ' मासिकाचा १९४८ चा ' दिवाळी अंक ' ' गोऱ्या साबलींतील महाराष्ट्र ' असा आहे. त्यांत विविध अधिकारी लेखकांनी गोऱ्या राज्यकर्त्यांनी ज्या नव्या गोष्टी आणल्या त्याचें विवेचन केलें आहे.

अशाप्रकारें ब्रिटीश राज्यकर्त्यांनी आपल्या आगमनाबरोबर ह्या देशाच्या इतिहासांत नवें युग निर्माण केलें. पहिल्या पन्नास साठ वर्षांत विविध सुधारणा होत होत्या,[४] शैक्षणिक, सांस्कृतिक संस्था अस्तित्वांत येत

---

१ आधुनिक भारत. पृ. ४१.

२ आधुनिक भारत पृ. ३७.

३ लोकहितवादी : शतपत्रें. प. नं. ८९. २० जाने. १८५०

४ अनेक यांत्रिक सुधारणा.

होत्या,[१] लोकांतहि जागृती होऊन त्यांच्या क्रिया–प्रतिक्रियांचे पडसाद उठत होते. सामान्यतः १८४० पर्यंतचा काल केवळ परकीय राज्यकर्त्यांची ओळख होण्यांत गेला. १८३२ च्या सुमारास 'दर्पण' हें वृत्तपत्र निघालें असलें तरी ह्या क्षेत्रांत १८४१ त निघालेल्या 'प्रभाकरा'नें खरें नवें युग निर्माण केलें असें म्हणतां येतें. त्याच पत्रांत प्रसिद्ध झालेलीं 'शतपत्रें' (लोकहितवादींचीं) आज त्या कालच्या घडामोडींची कल्पना देण्यास सिद्ध आहेत. सर्वप्रकारच्या सुधारणांचें केंद्र प्रारंभीं मुंबई हेंच शहर होतें. १८५९ त खंडाळ्याच्या घाटांतून आगगाडीचा रस्ता झाला व पुणें मुंबई यांत रहदारी सुरू झाली. सहाजिकच सांस्कृतिक पुढारीपण त्यानंतर दोन्ही शहरांस आलें. हीं दोन शहरें व कलकत्ता ह्या शहरांविना सर्वत्र अंधकार पसरला होता.[२]

ह्या कालांतील सामाजिक घडामोडींचें अवलोकन करण्यासाठीं दोन तीन सूत्रें विचारांत घ्यावीं लागतात. ब्रि. राज्यकर्त्यांचें धोरण, त्यांच्या विविध कृती, त्यांवर समाजाची प्रतिक्रिया हें पहिलें सूत्र. सुधारक लोक त्यांचे विचार, यत्न व चळवळी हें दुसरें सूत्र व ब्रि. राज्यकर्त्यांच्या संमतीने पण सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांत आपापल्या परीने काम करणारे ख्रिस्ती मिशनरी व त्यांचें कार्य हें तिसरें सूत्र. ह्या तीन सूत्रांचा परस्परांशी संयोग होऊन व सामाजिक, राजकीय, आर्थिक...जीवनाचे विविध धागे त्यांत मिसळून सांस्कृतिक जीवनाचा विविधरंगी गोफ विणला गेला आहे. ह्या सर्व सूत्रांचा परिणाम स्त्रीजीवनावर ह्या ना त्या रूपाने झाला आहे.

ब्रि. राजवट ही एतद्देशीय पूर्व राजवटींच्या मानाने प्रगमनशील राजवट होती तरी तें परकीय लोकांचें राज्य होतें. ही जाणीव ब्रि. राज्यकर्ते विसरूं शकत नव्हते. विशुद्ध सामाजिक सुधारणा करतांनाहि त्यांना ह्या जाणीवेमुळें विचार करावा लागे. सतीची चाल ही धडधडीत अन्यायाची दिसत असून ती झटकन बंद करणें त्यांना शक्य झालें नाही. राममोहनांना त्या कायद्यासाठीं बरीच खटपट करावी लागली. ही चाल बंद करण्याचा कायदा केल्यास कांही सामाजिक असंतोष निर्माण होणार नाही अशी त्यांना

---

१ उ. ग्रंथालयें, वक्तृत्वोत्तेजक सभा इ.

२ 'महाराष्ट्र महोदय': चाफेकर ना. गो. लेख.

ग्वाही द्यावी लागली होती. शेवटीं १८२९ त नुसता सतीबंदीचा सरकारी ठराव झाला. त्यानंतर जुन्या विचारांच्या लोकांनी त्याविरुद्ध प्रिव्ही कौन्सिलांत (अपील करून) दाद मागितली. आपली बाजू मांडण्यासाठीं राममोहनांना विलायतेस जावें लागलें. व जेव्हा तेथील न्यायाधिशांची खात्री पटली तेव्हा १८३३ मध्ये त्या खटल्याचा प्रतिकूल निकाल लागून नंतर खरा कायदा झाला.[1] त्याचप्रमाणें हाच कायदा करतांना पूर्व वचनांचें व सती जाण्याच्या पद्धतीचें बारकाईने अवलोकन ब्रिटीशांचें चालू होतें.[2] ह्या परिस्थितीमुळे सहाजिकच ब्रिटीशांचें धोरण सामाजिक सुधारणांच्या बाबत उदासीन राहिलें. त्यासाठी ते लोकमतास आवाहन करीत.[3]

त्यांचें राज्य आर्थिक पिळवणुकीवर आधारलेलें साम्राज्य होतें व ती पिळवणूक लोकांच्या नजरेस येणें त्यांना फारसें हितावह नव्हतें. कारण तें त्यांचें खरें वैगुण्य होतें. १८५७ च्या बंडानंतर राणीच्या जाहीरनाम्याने ब्रि. सरकारने धार्मिक, सामाजिक बाबतींत ढवळाढवळ न करण्याचें आश्वासन दिलें त्याचें बीज आर्थिक पिळवणुकीचें गौप्यस्फोटन होऊं नये ह्याबाबत घेतल्या जाणाऱ्या काळजींत आहे हें स्पष्ट आहे. त्यांना दुसरी भीति एतद्देशीय राजेरजवाडे ह्यांची होती. १८५७ चा भडका उडाला तो असंतुष्ट वर्गाचा एकाकी यत्न असला, तरी त्याने ब्रि. राज्यकर्त्यांच्या चित्तांत असुरक्षतेची जाणीव सतत ठेविली. शिवाय त्यांना ६००० मैलांवरून राज्य करावयाचें होतें...या सर्व प्रकारांमुळें पहिले मन्रो, एल्फिन्स्टन सारखे अधिकारी सोडल्यास ब्रि. राज्यकर्ते सामाजिक बाबतींत उदासीनच राहिले.

मिशनरी लोकांच्या चळवळींना सुद्धां ह्या धोरणानें आळा बसला. १८२४ त दोन मिशनरी पुण्याकडे धर्मप्रसारासाठी आले. त्यांना सरकारने

---

१ राजा राममोहनराय चरित्र : फडके.

२ केसरी रविवार, य. न. केळकर लेख.

३ उ. सतीच्या चालीबाबत लोकमत आपल्या बाजूने होण्यासाठीं, त्यावेळच्या सरकारी अधिकाऱ्यांनी शास्त्रीपंडितांची सभा घेतली. त्यांना उद्देशून लिहिलेलें एक पत्र उपलब्ध आहे. त्यावरून किति अजीजीची भूमिका राज्यकर्त्यांची याबाबत प्रारंभीं होती हें स्पष्ट होतें. विशेष म्हणजे हें पत्र मराठी आहे. तें 'ऐति. पत्रबोधांत' सापडतें.

प्रतिबंध केला. त्यांनी ऐकलें नाही तर त्यांना अटक केली. १८२८ त संग-माचा वेलस्ली (पुणें) पूल बांधला त्यावेळीं खिस्ती राज्यकर्त्यांनी ब्राह्मणांस दक्षणा वाटून खूष केले.[1] या उदाहरणांवरून त्यांच्या संमतीनें होणाऱ्या अप्रत्यक्ष 'सुधारणां'ना सुद्धां त्यांचें साहाय्य होऊं शकलें नाही हें स्पष्ट होतें. स्त्रियांच्या सुधारणेच्या बाबत ब्रि. राज्यकर्त्यांचा तत्त्वतः पाठिंबा असून ह्या परिस्थितीमुळें त्यांचे हातून त्याबाबत विशेष जोराचे प्रयत्न झाले नाहीत.

शिक्षणाचा नवा मनुः—तथापि खिस्ती धर्मप्रसाराचे बाबतींत सरकारने जी उदासीनता धारण केली ती प्रामुख्याने १८५७ नंतर. त्या वर्षाच्या प्रमुख प्रसिद्ध घटनेने सरकार अधिक सावध झालें. सामाजिक सुधारणेबाबत सामान्यतः तटस्थ राहिलें. १८५४ मध्ये वूड साहेबांचा शिक्षणविषयक खलिता प्रसिद्ध झाला. त्यांत माध्यमिक शिक्षणास महत्व दिलें होतें. प्राथमिक शिक्षण जवळ जवळ खि. धर्मप्रसारकांचें हातीं दिलें होतें. " १८५० ते १८८० पर्यंत शिक्षण–क्षेत्रांत मिशनऱ्यांच्याच काय त्या खाजगी शाळा होत्या. खाजगी शाळांना प्रोत्साहन देण्याच्या ऐवजीं त्यांचा निरुत्साह करण्यांत आला. मिशनरी लोकांवर शिक्षणाचें काम पूर्ण-त्वाने सोपविण्यास सरकारास धैर्य होईना कारण मिशनचा उद्देश शिक्षणा-पेक्षा खिस्ती धर्माचा प्रसार हा होता. १८५७ च्या बंडाने सरकारास कळून चुकलें की, हिंदी लोकांच्या बाबतींत सरकारने संशयित वर्तन ठेवणें धोक्याचें आहे. याचा परिणाम असा झाला की शिक्षणक्षेत्रांत बिन सर-कारी कार्य करणाऱ्या संस्था मिशनऱ्यांच्या असल्या व त्याबद्दल सरकारास जरी आपुलकी वाटत असली तरी त्यांना सरकारकडून पूर्ण मदत मिळाली नाही.[2] १८५४ नंतर प्रत्येक प्रांतांत शिक्षणखातें स्थापन झालें व सरकारी धोरणास अधिक मूर्त स्वरूप येत गेलें. १८५७ त मुंबई, मद्रास, कलकत्ता येथील विद्यापीठें स्थापन झालीं. व त्यांतून आधुनिक वैज्ञानिक, समाज–शास्त्रीय इ. विविधप्रकारचें उच्च शिक्षण पद्धतशीरपणें दिलें जाऊं लागलें. ह्याच खलित्यांत स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केलेला आहे. " स्त्रियांचे शिक्षणाचे

---

१ न्या. मू. रानडेचरित्र.

२ M. R. Paranjpe : Source Book of Indian Edu. Introduction.

बाबतींत जे प्रयत्न केले जातात त्यांस आमचें पूर्ण पाठबळ आहे. गव्हर्नर जनरलांनी बंगालचे गव्हर्नरास असें कळविलें आहे की, हिंदुस्थानांत स्त्री-शिक्षणास मुक्तहस्ताने मदत केली पाहिजे. या सूचनेस आमचा पूर्ण पाठिंबा आहे. अमदाबादेस रा. ब. मगनभाई करमचंद ह्यांनी दोन मुलींच्या शाळा स्थापन करण्यासाठी वीस हजार रुपये दिल्याबद्दल त्यांचा जो बहुमान करण्यांत आला तो आम्हांस पूर्ण मान्य आहे. स्त्रीशिक्षणाचा प्रसार व्हावा अशी आमची इच्छा आहे. या प्रसारास अशा मदतीने प्रोत्साहन मिळणार आहे."[1] महाराष्ट्रांत ज्योतीराव फुल्यांनी मुलींच्या शिक्षणासाठी शाळा काढली व विरोधास न जुमानतां आपलें काम चालू ठेविलें ह्याबद्दल २०० रु. बक्षीस व एक शालजोडी असें बहुमानद्रव्य सरकारकडून मिळालें, ही गोष्ट ह्याच धोरणाची निदर्शक आहे.

सामाजिक चळवळी व त्यांची दिशा कोणती हें पाहण्यापूर्वी ब्रि. राज्यकर्त्यांचें सामाजिक सुधारणाविषयक कोणतें धोरण होतें तें लक्षांत घेणें आवश्यक होतें व म्हणून हें विवेचन केलें. शिक्षणविषयक घडामोडींच्या विस्तारांत खोलांत शिरण्याचें कारण नाही. ब्रि. राजवटींत सुशिक्षित लोकांचा वर्ग पुढे आला. त्याला शिक्षण कोणतें व कसें मिळालें होतें हें कळल्यानंतरच त्याचे विचार इ. कसे बनले हें कळण्यास मदत होणार आहे. १८६०-७० पर्यंत ब्रिटीशांचें शिक्षणविषयक धोरणहि धरसोडीचें होतें. त्या धोरणावर तत्कालीन इंग्लंडमधील तत्सम चळवळींचा परिणाम होत होता. १८४६ ते १८७० ह्या कालांत इंग्लंडमध्यें प्राथमिक शिक्षण सरकारी असावें का खाजगी संस्थांकडे असावे असा वाद चालू होता. त्यांत खाजगी शिक्षणसंस्थांचे बाजूने बहुमत होतें. त्याचा परिणाम येथलें शिक्षणहि तसेंच असावें असें धोरण पुरस्कारण्यांत झाला. पण येथले अधिकारी हे विरुद्ध होते. त्यामुळें त्या निर्णयाच्या अंमलबजावणींत ढिलेपणा राहणें अपरिहार्य होते.[2] तशांत येथे शिक्षण कोणतें द्यावें हा प्रश्न १८४० पर्यंत विवाद्य होता. इंग्रजी व शास्त्रें यांच्या अभ्यासावर भर

१ नाईक-नुरुल्ला : भारतीय शिक्षणाचा इतिहास. 'वूड खलित्यांतील भाग.'

२ नाईक–नुरुल्ला : भा. शि. इतिहास.

द्यावा असें ठरलें तरी माध्यम कोणतें असावें हा वाद पुन्हा निर्माण झाला होता. विद्यापीठें स्थापन झाल्यानंतरहि हा वाद कायम होता. प्रारंभीं विद्यापीठांतून प्रादेशिक भाषांना महत्त्वाचें स्थान होतें. इ. स. १८६८ पासून विद्यापीठांतून मराठीआदि भाषांचें उच्चाटण झालें. सर्वत्र इंग्रजीचें साम्राज्य सुरू झालें. रा. ब. न्या. मू. रानड्यांनाहि नंतर यश आलें नाही. सहाजिकपणें १८७४–७५ पासून वैचारिक दृष्टीने नवा कालखंड सुरू होतो. त्या पूर्वीच्या कालांत सरकारी धोरणांत अनिश्चितपणा होता. राज्यकर्ते लोकक्षोभास भीत होते. राज्यकर्त्यांची आक्रमक व स्वतःच्या पाशवी सामर्थ्याचा उपयोग करून विविध चळवळी दडपून टाकण्याची वृत्ति निर्माण झालेली नव्हती. ही सर्व पार्श्वभूमि तत्कालीन सुधारकांच्या विचारधारणेच्या मागे आहे. तिचें दर्शन घेतल्याविना समाजसुधारकांच्या विचारांचा अन्वय बरोबर समजणार नाही व म्हणूनच हें विवेचन केलें. स्त्रियांच्या जीवनविषयक प्रश्नांचें स्वरूप कळण्यासहि ही परिस्थिति माहीत असणें आवश्यक आहे.

ब्रिटीश राजवटीचे गुण व वैगुण्यें यथातथ्यपणें कोणाच्या बरोबर ध्यानांत आलीं असतील तर ती लोकहितवादींच्याच होत. त्यांच्या चरित्राचें व कामगिरीचें निरीक्षण केलें तर त्यांच्या 'लोकहितवादी' या अभिधानाची सार्थता प्रत्ययास येते. त्यांचे हे निरनिराळ्या बाबतींतले विचार हे केवळ निरीक्षण व चिंतन यांनी तयार झाले असावेत असें दिसतें. कारण इंग्रजी राज्याची बसाबस होत होती, शिक्षणाला घाट आला नव्हता अशा काळांत त्यांचें कर्तृत्व निदर्शनांत आलें. ग्रंथसंपदा, वर्तमानपत्रें, वाचनालयें इ. द्वारें ज्ञानाचा प्रसार करण्याची तळमळ, इ. गोष्टी ध्यानांत घेतल्या की त्यांची वास्तव उंची ध्यानांत आल्याविना राहात नाही. स्त्रियांच्या प्रश्नांना सुद्धां जोराची चालना लोकहितवादींनीच प्रामुख्याने दिली असें म्हणावयास हरकत नाही. लोकहितवादींनी स्त्रियांची बाजू अत्यंत तडफेने मांडली आहे. विरोधी लोकांचें व इतर सुधारकांचें ह्या सुधारणांना शास्त्राधार आहे कां नाही याबाबतचें विवेचन, चिंतन चालू होतें. पण लोकहितवादींचें वैशिष्ट्य असें की त्यांनी ह्या बाबीस फारसें महत्त्व दिलें नाही. तें पाहिलें की इंग्रजी सुधारणेचा गाभा त्यांना समजला होता असें म्हणतां येतें. असो. लोकहितवादींच्या व इतर सुधारकांच्या स्त्रीजीवनविषयक सुधारणा–विचारांची

छाननी करण्यापूर्वी ब्रि. राजवटीने स्त्रीजीवनांत प्रत्यक्ष कोणते बदल घडवून आणले तें पाहणें आवश्यक आहे.

कांहीं प्रमुख सामाजिक घटना, इ.:—इंग्रजी राजवट प्रस्थापित झाल्यानंतर स्त्रियांच्या जीवनांत सुधारणा करणारा कोणता कायदा झाला असेल तर तो १८३९ चा सतीचा कायदा होता. हा कायदा कोणत्या तऱ्हेने संमत झाला ह्याचा उल्लेख यापूर्वी आला आहेच. खि. मिशनऱ्यांचें स्वधर्म-प्रसाराचें कार्य चालू होतें. त्याला हातभार लावण्यासाठी १८३२त धर्मांतर करणारांना पूर्वधर्मांतील आप्तस्वकीयांच्या इस्टेटीचा हिस्सा मिळावा असा कायदा झाला. स्त्रियांच्या विषयींच्या निर्बंधांविरुद्ध हालचाल सुरू झाली होती. 'दर्पण' पाक्षिकांत बाळशास्त्री जांभेकर यांनी ह्याबाबत लेख लिहिले. '१८४० ते १८६०' हीं वर्षें बरींच घामधुमीचीं गेलीं. 'खिस्ती मिशन-ऱ्यांच्या उपदेशांना भर आला होता. बाजार, जत्रा, इ. ठिकाणीं त्यांचीं व्याख्यानें होत, जागोजाग शाळा, वृत्तपत्रें इ. निघत होती.[1] १८४२ त 'प्रभाकर' वृत्तपत्रांत दोन ब्राह्मण बालविधवांचे पुनर्विवाह झाल्याची बातमी आहे. तेव्हापासून विधवांच्या प्रश्नाला जोराची चालना मिळाली. १८४५ चे सुमारास ज्योतिराव फुल्यांनी मुलींच्या शाळा घालण्याचा उप-क्रम सुरू केला. व स्त्रीशिक्षणाचा नवा मनू महाराष्ट्रांत सुरू झाला. त्यांचा ब्राह्मणविधवांच्या पुनर्विवाहास पाठिंबा होता. व त्यांच्या सहाय्याने एका शेणवी जातींतील पुनर्विवाह घडून आला.[2] त्याशिवाय पुण्यांत एक पुन-र्विवाह ह्याच सुमारास झाला. मध्यंतरीच्या कालांत इ. १८४८ च्या सुमा-रास लोकहितवादींनी 'शतपत्रें' या सदरांतून स्त्रीविषयक विविध प्रश्नांना चालना दिली. १८५६ मध्ये पुनर्विवाहाला कायदेशीर ठरविणारा कायदा झाला. १५ जून १८६९ ला मोरोबा कान्होबा यांच्या वाड्यांत गाजलेला पुनर्विवाह झाला. १८६२ त 'इंदुप्रकाश' मधून विष्णुशास्त्री पंडित यांनी विधवाविवाह समर्थनपर अतिशय जोरदार लेख लिहिले.

पण ह्या सर्व घटनांत महत्त्वाची घटना कोणती असेल तर ती म्हणजे १८७० च्या मार्च महिन्यांत पुण्यास शंकराचार्यांच्या समोर 'पुनर्विवाह

---

१ न्या. मू. रानडेचरित्र: फाटक पृ. २०५.

२ आधुनिक भारत– हा विवाह १८६४ त घडून आला.

सशास्त्र की अशास्त्र' या विषयावर झालेला, ९ दिवस चाललेला वादविवाद ही होय. ह्या घटनेस विविध दृष्टींनी महत्त्व आहे. महाराष्ट्रांत स्त्रीजीवनाकडे लोकांचें लक्ष प्रामुख्याने कसें केंद्रित झालें होतें हें या घटनेने निदर्शनास येतें. ह्या कालांत सर्वांत महत्त्वाचा स्त्रीजीवनविषयक प्रश्न म्हणजे पुनर्विवाह होय असें म्हणतां येतें. विशेषतः ह्या वादाने जें स्पष्टपणें निदर्शनास येतें तें हें की महाराष्ट्रांतल्या सर्व विचारांच्या मोठमोठ्या लोकांचें लक्ष इकडे लागलें होतें. शंकराचार्यांसारख्या धर्मपीठादि अध्यक्षापासून तों रानड्यांसारख्या न्यायपीठीय प्रमुखापर्यंत सर्व सूज्ञ व सुशिक्षित लोकांचा, विद्वानांचा ह्या वादाशी संबंध आहे. त्यांत विठोबाअण्णा दप्तरदारांसारखे सनातनी आहेत तसे कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुशास्त्री पंडित, माधवराव रानडे, डॉ. भांडारकर, इ तत्कालिन सर्व बुद्धिमंतहि आहेत. ह्यावरून सामाजिक जीवनाचा ह्या काळांतील मुख्य प्रश्न विधवांचा पुनर्विवाह हा असावा ह्या निष्कर्षाप्रत यावें लागतें. ह्या प्रश्नाची वैचारिक चिकित्सा करण्यापूर्वी स्त्रीविषयक सुधारणांच्या एक दोन गोष्टींचा उल्लेख करणें जरूर आहे. ज्योतिबा फुल्यांनी १८६३त बालहत्त्या प्रतिबंधक गृह उघडलें. १८७८त पंढरपूर येथील प्रसिद्ध 'अनाथ बालकाश्रम' सुरूं झालें. नाशिक येथे लोकहितवादींनी तशीच संस्था काढण्याचें ठरविलें होतें. इ.स. १८६८त पुनर्विवाहमंडळ स्थापन झालें.

पुनर्विवाहाचे अनुषंगाने स्त्रीजीवनविषयक आणखी प्रश्न पुढे आले व ते म्हणजे स्त्रीशिक्षण, बालावृद्धविवाह, विधवांचे केशवपन, प्रौढविवाह इ. होत. सामाजिक प्रश्न म्हणून प्रामुख्याने ह्याच गोष्टींचा विचार करावा लागतो. राजकीय प्रश्न तर ह्या कालांत नव्हतेच असें म्हणतां येईल. स्वराज्य नुकतेंच गेलें होतें. "'गेलें' ह्या दृष्टीचा स्वराज्य शब्द लोकांना माहीत होता; 'मिळवावयाचें' ह्या दृष्टीचा स्वराज्य शब्द कोणाच्या तोंडींच काय पण मनांतहि त्या वेळीं येत नव्हता."[1] इंग्रजी विद्येचें पद्धतशीर अध्ययन सुरू व्हावयाचें होतें. नुकतीच कोठे सुरवात झाली होती. ब्रि. राजवटीने देशाच्या आर्थिक दारिद्र्यास सुरवात झाली आहे ही गोष्ट लोकहितवादी सारख्या एखाद्या दुसऱ्या पुढाऱ्याच्याच लक्षांत आली होती.[2]

१ टिळकचरित्र : केळकर (समग्र). पृ. ९३.

२ शतपत्रें: लोकहितवादी.

अनुक्रम 29500 वि: 101.01
क्रमांक 9083 नों: दि: १.२७.... २५१६

धार्मिक प्रश्नांबाबतची परिस्थिति तर चमत्कारिकच होती. " अशिक्षितांना सेवावृत्तीने जिंकावें व सुशिक्षितांना युक्तिवादाने कुंठित करावें असा ख्रिस्ती धर्मोपदेशकांचा दुहेरी डाव होता. "[1] व त्यास दोनही वर्गांचे लोक बळी पडत होते. या सर्व परिस्थितीचा सर्वसामान्य सुबुद्ध व्यक्तीच्या मनावर जो परिणाम झाला त्याचा परिपाक असा झाला की त्याला वाटूं लागलें की समाजांत कांही तरी चुकलें आहे, कांही बिघडलें आहे. ही चूक वा हा बिघाड दुरुस्त करण्याचे मार्ग विविध लोकांनी आपल्या परिस्थितीप्रमाणे, संस्कारांप्रमाणे काढले. आपापल्या समजुतीप्रमाणे प्रत्येक जण यत्न करूं लागला.

स्त्रीजीवनविषयक प्रश्नांचें वैशिष्ट्य असें की स्त्रियांवर अन्याय होत आहे ही गोष्ट प्रामुख्याने शिक्षितांना पटली होती. ब्रि. राज्यकर्त्यांनी प्रथम कायद्यांनी समाजांतले सगळे अनन्वित नि अमानुष प्रकार थांबवले. 'पीनल कोड' सारखे व्यक्तिगत अत्याचारांविरुद्ध दाद देणारें कायदेसूत्र तयार केलें. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला की जीवनांतील विविध प्रकारांकडे माणसें त्या दृष्टीने पाहूं लागलीं. व्यक्तीच्या जीवनाचें मोल रूढीपेक्षा अधिक आहे ही गोष्ट कायद्यांनीच निदर्शनास आणली व या नव्या चाणाक्ष दृष्टीला समाजाकडे पाहतांना प्रथम कोणती गोष्ट दिसली असेल तर ती म्हणजे स्त्रियांवर रूढीने लादलेलीं अमानुष बंधनें ही होय. १८६५ त 'विधवाविवाह–खंडण' ह्या नांवाचा ग्रंथ बाळकृष्ण लक्ष्मणशास्त्री बापट यांनी छापला. त्याच्या प्रस्तावनेंत ते म्हणतात " ह्या ग्रंथाच्या नांवावरून ग्रंथकाराचा आशय पुनर्विवाहाविरुद्ध आहे अशी शंका येईल; परंतु त्याचा अभिप्राय तसा नाही. तर तो उभयपक्षीच्या अडचणी पाहून लेखक उदासीन आहे.[2] या उल्लेखावरून विरोधीपक्षाच्या मनांतहि या विषयाबाबत सहानुभूति होती असें दिसतें. विधवाविवाहाला अनुकूल अशीं शास्त्रवचनें फारच अल्प असतां ह्याविषयीच्या प्रसिद्ध वादांत अवघ्या दोन मतांनी विरोधकांची बाजू सबळ झाली असली तरी लोकांची सर्वसामान्य सहानुभूति ही पुरस्कर्त्यांच्या बाजूने होती. व तीच पुढे वाढत गेली.

तथापि ह्या विषयाचा एकंदरीने बराच कसोशीने खल झाला हें

---

१ महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी पृ. ८०.

२ अ. म. ग. पू. पी.– सरदार पृ. १७५.

खरें. लक्षांत घेण्यासारखी गोष्ट अशी की ह्या सर्व वादांत स्त्रिया कुठेच नव्हत्या. त्या बिचाऱ्या इतक्या अज्ञानी होत्या, की त्यांचें मत प्रकट होणेंच अशक्य होतें. हा वादविवाद येवढ्या हिरीरीनें कां झाला तें समजून घेतलें की ह्या कालाची वैचारिक प्रगति कोठपर्यंत झाली होती हें लक्षांत येतें.

१८४० मध्ये एक पुस्तक प्रसिद्ध झालें.[१] त्यांत पुनर्विवाह हा शास्त्रसंमत आहे असें प्रतिपादलें होतें. पुढे १८६५ त एकदा शंकराचार्य रत्नागिरीस गेले असतां त्यांना विवाहास अनुकूल असणाऱ्या लोकांनी हा प्रश्न विचारला व निर्णयाची मागणी केली. आचार्यांनी उत्तर स्पष्ट न देतां टाळाटाळ केली.[२] व त्यांतून पुढे ह्या वादाचे उभयपक्ष निर्माण झाले व १८७० त प्रत्यक्ष वादविवाद झाला. वैचारिक दृष्टीने पाहतां असें म्हणतां येतें की, ह्या कालांत व्यक्तिवाद व बुद्धिप्रामाण्य ह्या कसोट्या निर्माण झाल्या नव्हत्या. ह्या दोनही गोष्टींचे खरे पहिले (व शेवटचेच म्हणतां येईल) पुरस्कर्ते म्हणजे आचार्य आगरकर. त्यांचा उदय अद्याप व्हावयाचा होता. बुद्धिप्रामाण्याचा उदय होण्यापूर्वी (म्हणजेच विज्ञान-युगापूर्वी) माणसांचें व्यक्तिगत व सामाजिक जीवन धर्माने बांधून दिलेलें होतें. माणसें विनातक्रार तें मान्य करीत. ब्रिटिशांच्या देशांत ह्या दोन्ही गोष्टींचा विकास झाला होता. त्यांनी येथे राज्य स्थापल्यावर जे कायदे केले त्यांना ह्या दोन गोष्टींचा आधार होता. येथल्या समाजाला ह्या निकषांची ओझरती कल्पना येत होती. पण नव्या विचाराने त्यांची जुनी धर्मनिष्ठा मात्र हादरून निघाली. तिला सावरून धरण्याचा हा एक उपक्रम होता. पण हें सावरून धरणें केवळ तात्कालिक होतें. कालाचा विचारच बदलला होता. मौज अशी की समर्थन करणारांजवळहि नवी वैचारिक भूमिका नव्हती. त्यांचा युक्तिवाद जर पाहूं लागलों तर ही गोष्ट अधिक स्पष्टपणें प्रतीत होते.

पुनर्विवाहाचे कट्टे पुरस्कर्ते म्हणजे विष्णु परशरामशास्त्री पंडित हे होत. ह्या गृहस्थांनी विधवाविवाहाच्या बाजूने खूपच लिहिलें आहे.

---

१ विष्णुशास्त्री बापट यांचें 'पुनर्विवाह प्रकरण.' महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी पृ. १६८.

२ न्या. मू. रानडेचरित्र, न. र. फाटककृत पृ. १३८.

विष्णुशास्त्री हे गाढे विद्वान् होते, त्यांनी श्रुति, स्मृति आदी पूर्वकालीन ग्रंथांचें मोठ्या चिकित्सेने अध्ययन करून पुनर्विवाहाला अनुकूल असे उल्लेख होते त्यांच्यावर आपल्या मतांची इमारत उभारली. ह्यांचा प्रयत्न अर्थात्च विधवाविवाह हा धर्मशास्त्रसंमत आहे हें सिद्ध करण्याचा होता. त्याच्या अनुषंगाने जुन्या लोकांची संमति ह्या चळवळीला मिळविण्याचा उपक्रम होता. विष्णुशास्त्री पंडितांनीं स्वतः पुनर्विवाह करून आपल्या सुधारकवृत्तीला कर्तेपणाची जोड दिली. त्यायोगें सुधारकांचा पक्ष प्रबल झाला. १८७० च्या प्रसिद्ध वादांत याच गृहस्थांनी पुढाकार घेतला होता. वैचारिक दृष्टीने पाहतां असें दिसतें की पंडितांच्या न्यायबुद्धीला पुनर्विवाहाचें न्यायपूर्णत्व पटलें पण त्यांच्या मनावर जुन्या धर्मविचारांचा संस्कार तितकाच खोल असल्याने ही नवी चळवळ त्याला (धर्मशास्त्राला) संमत आहे असें दाखवावेसें वाटलें. धर्म हा मनुष्याच्या कल्याणाकरितां अस्तित्वांत आला ही एकदा श्रद्धा असल्यानंतर धर्मतत्त्वांतील व विचारांतील अनुकूल गोष्टींचा उपयोग आपल्या बाजूने करून घेणें हें केवळ अपरिहार्य होतें.

रानडे, भांडारकर, डॉ. भाऊ दाजी इ. विद्वानांची वृत्ति सुद्धां अशीच होती. ह्या सर्वांना प्राचीन भारतीय संस्कृति-परंपरेचा एवढा अभिमान[1] होता की, आधुनिक कालास सुसंगत असणारे विचार प्राचीनकालीन विचारपरंपरेस अविरोधी आहेत असें सिद्ध करण्याचा त्यांचा यत्न दिसतो. "नुसत्या बुद्धिवादानें लोकांचीं मनें वळवीत बसण्यापेक्षा शास्त्रवचनांच्या आधाराने कोणत्याहि सुधारणेचें समर्थन केल्यास ती समाजाच्या त्वरित पचनीं पडेल अशा भावनेने (ह्या) पंडितांनी प्राचीन धर्मग्रंथाचें परिशीलन केलें."[2] अशी यांची प्रवृत्ति होण्यास व्यक्तिवादाचा व बुद्धिवादाचा विकास झाला नव्हता हें जसें कारण आहे तसें आणखीहि एक कारण आहे व तें म्हणजे ख्रिस्ती मिशनऱ्यांचा चाललेला यत्न हें होय. इंग्रजांच्या धोरणाने आर्थिक व सामाजिक (जुनी) घडी कोसळून पडत होती. ती पाहून लोकांचीं मनें भांबावलेलीं होतीं. त्या भांबावलेल्या मनांस निरनिराळ्या प्रयुक्त्यांनी मिशनरी लोक आपणांकडे ओढीत होते. आणि तत्कालीन विचारवंतांस हें संकट

१ आधुनिक भारत पृ. १३८.

२ महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी पृ. १६८.

अधिक भयावह वाटलें असणें शक्य आहे. ख्रि. धर्मसुधारकांच्या हिंदु-धर्मावर केल्या जाणाऱ्या हल्ल्याची प्रतिक्रिया म्हणून ही विचारसरणी निर्माण झालेली असणें शक्य आहे.

परंतु युक्तिवादाचे दृष्टीने पाहूं गेलें असतां लोकहितवादी व ज्योतिराव फुले ह्यांनी जो युक्तिवाद केला त्याची प्रत वेगळी आहे असें म्हणावें लागतें. लोकहितवादींना नवनवें ज्ञान लोकांना येवढें द्यावयाचें होतें की, तें मिळविण्याच्या व देण्याच्या कामापुढे प्राचीन हिंदुधर्मशास्त्रीय ग्रंथांचा चिकित्सक अभ्यास करण्यास वेळ सांपडणें कठिण होतें. त्यांना त्याबद्दल आस्थाहि वाटत नसावी. प्राचीन वाङ्मयांतील बरीच वचनें (सुधारणेला) प्रतिकूल आहेत ही गोष्ट त्यांना विदित होती. म्हणून त्यांनी युक्तिवाद केला तो अगदी समर्पक होता. 'मनूचें वचन असो. याज्ञवल्क्याचें असो, कोणाचेंही असो, ब्रह्मदेवाचें का असेना, 'बुद्धिरेव बलीयसी,' असें आहे.[१] "शास्त्र यद्यापि असेल की, स्त्रीचा पुनर्विवाह करूं नये, तर शास्त्र हे कायदे आहेत; व जे अनहितकारक कायदे असतील ते सोडून दुसरे करण्यास कांही चिंता नाही."[२] लोकहितवादींची ही बुद्धिवाद–संमत भूमिका त्या समाजाला एकंदरीने झेपण्यासारखी नव्हती. पण लोकहितवादीनी ती शेवटपर्यंत सोडली नाही हें मात्र निःसंशय.

तथापि लोकहितवादींचे हे विचार केवळ अपवादभूत आहेत. त्यांनी सुद्धा सर्वसामान्य कारणें दिलीं आहेत तीं म्हणजे 'पुनर्विवाह केल्यामुळे व्यभिचार कमी होईल, व्यवस्था चांगली राहील,"[३] ह्यावरून त्यांना समाजव्यवस्थाच सुधारावयाची होती. केवळ व्यक्तिस्वातंत्र्यावर त्यांचा भर नव्हता.

लोकहितवादीप्रमाणेच ज्योतिबांची पण विचारसरणी शास्त्राधारापेक्षा इतर गोष्टींवर अधिष्ठित होती. परंतु ख्रि. धर्मसुधारकांच्या प्रचारामुळे त्यांचे विचार शास्त्रीय राहिले नाहीत. त्यांत पूर्वग्रह दूषिततेचा बराच भाग

---

१ शतपत्रें. शतपत्र क्र. ७०.

२ शतपत्रें. क्र. १६.

३ शतपत्रें. पत्र क्र. १०४.

आला. तथापि त्यांचें स्त्रीसुधारणाविषयक जें कार्य आहे तें कोणत्याहि अर्थाने कमी मोलाचें नाही.

पुनर्विवाहाबरोबर इतर महत्त्वाचे सामाजिक प्रश्न म्हणजे स्त्रीशिक्षण, बालविवाह, बाला–वृद्ध–विवाह, इ. होत. ह्या प्रश्नांचा संबंध ह्या ना त्या रूपाने पुनर्विवाहाशी आहे असें आढळून येईल. स्त्रियांच्या शिक्षणाबाबत तर असें म्हणतां येते की, तोंवेळपावेतों स्त्रीशिक्षण म्हणजे प्राथमिक शिक्षण असाच अर्थ करतां येईल. पुरुषांच्या शिक्षणांत जिथे प्राथमिक, माध्यमिक, उच्च इ. साचेबंद व्यवस्था निर्माण झालेली नव्हती तेथे स्त्रियांच्या शिक्षणांत कोठून ह्या गोष्टींचा समावेश होणार? बालविवाह हा महत्त्वाचा सामाजिक प्रश्न आहे. पण त्याला अधिक महत्त्व १८८० नंतर आलें. त्या कालाचा तो मोठा प्रश्न दिसतो. जरठ–कुमारी–विवाह हा एक सामाजिक प्रश्न असला तरी त्याचें स्वरूप व्यक्तिगत अधिक होतें. कायदेशीररीत्या त्याबाबत कांही करतां येणें शक्य नव्हतें. अशाप्रकारे ह्या कालांतल्या स्त्रीजीवनविषयक विविध प्रश्नांची परिस्थिति होती.

ह्या कालांत सामाजिक प्रश्नांची चर्चा करणारीं २५ पुस्तकें निघालीं.[1] त्या पैकी १९ पुस्तकें स्त्रीविषयक प्रश्नांवर आहेत. यांत १५ पुस्तकें विधवाविवाहावर उलट सुलट मतें मांडणारीं आहेत. ह्यावरून ह्या कालचा प्रमुख सामाजिक प्रश्न विधवाविवाह हाच होय अशा निर्णयाप्रत यावें लागतें. १८७५ ते १८८० हीं वर्षें महाराष्ट्राला एकंदरीने फार कठिण गेलीं. 'दुष्काळाने देश व्यापला होता. महाराष्ट्रांत शेतकऱ्यांनी तीनचार जिल्ह्यांमध्ये सावकारांना लुटण्याचा, त्यांचीं घरें जाळण्याचा व नाकें कापण्याचा धुमाकूळ आरंभला'[2] १८७७ त दिल्ली दरबार भरला. तो, दुष्काळ चालू असतांना भरला त्यामुळे असंतोष अधिक निर्माण झाला. १८७९ त वुधवार व विश्रामबाग हे वाडे जळाले, १८८१ मध्ये टिळक आगरकर चिपळूणकर यांनी 'केसरी मराठा' हीं पत्रें काढलीं. व महाराष्ट्राच्या वैचारिक क्षेत्रांत नवीन युगाचा उदय झाला.

लोकहितवादी व स्त्रियांचे प्रश्न:—स्त्रीजीवनविषयक सुधारणांना

---

१ अ. ग. पू. पी. सरदार. पृ. १८५–८७.

२ सहा थोर पुरुष फाटक पृ. ३८.

ज्यांचा बराच हातभार लागला आहे असे या कालांतले पहिल्या प्रकारचे विचारवंत वा सुधारक लोकहितवादी हेच होत. त्यांच्या स्त्रीजीवनविषयक विचारांची पाहणी करणें योग्य होईल. लोकहितवादींनी बालविवाह, पुनर्विवाह व स्त्रीशिक्षण ह्यांचा प्रामुख्यानें पाठपुरावा केला आहे. बालविवाहाने अनेक प्रकारचे तोटे होतात. पूर्वीचे लोक सशक्त व त्यांची नीति चांगली होती उलट अलिकडचे लोक प्रकृतीने खालावलेले. त्यांची नीति बिघडलेली, लोकहितवादींच्या मतें ह्या ऱ्हासास बालविवाहच कारणीभूत आहे. कारण बालविवाहामुळें शिक्षणाकडे व बलसंरक्षणाकडे दुर्लक्ष होतें. 'जो विद्या करण्याचा काल, व ज्या वयांत शरीर बळकट व्हावयाचें त्यासमयीं पुत्र संसारी व मुलाबाळांचा धनी होतो. मग त्याची विद्या तरी कशी संपूर्ण होईल ? आणि शरीरांत जोम कसा होईल ?"[१]

'लवकर लग्न केल्याने स्त्रीविषय लुब्ध झाल्याने त्यास दुर्गुण आणि अपौरुष प्राप्त होतें. आणि जन्माचें सार्थक होत नाहीं.'

बालविवाह पद्धतीनें बापास लग्न करून द्यावें लागतें. लोकहितवादींच्या मतें ही गोष्ट अनिष्ट आहे. " लग्न बापानें केलें त्यांत काय मोक्ष साधन आहे ? ज्याचा तो आपले पराक्रमानें करील, तर फार चांगलें आणि मोठेपणीं लग्न झालें म्हणजे लग्नासंबंधी शपथा वचनें साक्षीनिशीं व ईश्वरास स्मरून घ्यावीं लागतात. तीं पुरुषाचे मनांत सार्थ बाणतील, आणि त्याप्रमाणे तो वर्तेल."[२]

बालविवाहाइतकाच लोकहितवादींचा विषम विवाहावर कटाक्ष आहे. " पन्नास साठ वर्षांचे पुरुष मरणोन्मुख झाले तरी तरुण स्त्री करावयाची इच्छा करतात." इ. उल्लेख करून या लोकांचा धिक्कार केला आहे.... " ज्यांच्या तोंडांत एकही दांत राहिलेला नाही. डोळ्याने न्याहाळवत नाही, अंगावर सुरकुत्या पडल्या आहेत, असे वयस्कर लोक आपल्या तरुण स्त्रिया नऊ दहा वर्षांच्या करतात, हा केवढा चमत्कार आहे !... तेव्हां या चालीने फार वाईट होतें. व जें विद्या करण्याचें वय तें सासऱ्यास राहण्यांत व हाल सोसण्यांत जातें. व लवकर लग्नाचा संबंध झाल्यामुळे सुखावह होत नाहीं."

---

१. शतपत्रें पृ. ३६२.

२. कित्ता पृ. ३६५.

विषम विवाहाचे अनुषंगाने लोकहितवादींनी, ज्योतिष इ. पाहण्याच्या संबंधीवरहि कोरडे ओढले आहेत. "ज्योतिषी यांस लग्नसंबंधी कांही एक पुसूं नये. गणमैत्री खडाष्टक आणि मुहूर्त हे पाहण्याची कांही गरज नाही. येणें करून फार अकल्याण होईल..." या आपल्या म्हणण्याच्या समर्थनार्थ ते बिनतोड पुरावा देतात "आजपर्यंत ब्राह्मणांनी जोशांचे अनुमताने लग्नें केलीं तरी बहुत स्त्रिया विधवा झाल्या आहेत, विघ्नें आलीं आहेत. तेव्हां परिणाम पाहातां या फुकट अडचणी बंडेपणाच्या आहेत. जोशांचे नादी लागून लोकांनी आपला घात करूं नये."

त्याशिवाय हुंड्यांची पद्धत, ब्राह्मणांत पोटजातींत विवाह न होण्याची रूढी, या सर्वांविरूद्ध लोकहितवादींनी आपली तक्रार नोंदविली आहे.

या सर्व प्रश्नांपेक्षा लोकहितवादींना सर्वांत महत्त्वाचा प्रश्न कोणता असेल तर तो म्हणजे विधवांच्या पुनर्विवाहाचा. ह्या प्रश्नाचें विवेचन लोकहितवादींनी निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या पद्धतीने निरनिराळ्या दृष्टिकोणांतून केलें आहे. ह्या प्रश्नावर त्यांनी बरेंच लिहिलें असल्याने तेच तेच मुद्दे पुनरुक्त होणें अगदी सहाजिकच आहे. लोकहितवादींचा पुनर्विवाहाचा पुरस्कार दोनतीन कारणांसाठीं आहे. पुनर्विवाह रूढ होण्याचें कारण स्त्रियां अशिक्षित आहेत हें होय. "पांच वर्षांपासून पंधरा वर्षेपर्यंत कन्येचा पुनर्विवाह करावा म्हणून शास्त्राज्ञा आहे. परंतु ती देखील मानीत नाहीत, शास्त्राज्ञा आहे ती झांकून ठेवतात हा केवढा अनर्थ आहे." ही शास्त्राज्ञा जर ज्ञान देऊन स्त्रियांना कळली तर त्या पुनर्विवाहास पुढे येतील. "आपल्या देशांत दहा विद्वान् स्त्रिया असत्या आणि त्या जर विधवा झाल्या असत्या तर त्यांनी आपला पुनर्विवाह करण्याचें ठरविलें असतें. आणि दुष्ट ब्राह्मणांचें तंत्रांत त्या कधी राहिल्या नसत्या ह्यांत संशय नाही."..."परंतु आजपर्यंत ब्राह्मणांनी मोठी सावधगिरी केली. विद्या कन्यांस शिकविली नाही..." हा युक्तिवाद अगदी फोल आहे असें आजहि म्हणतां येत नाही. स्त्रियांना "जर थोडेंसें ज्ञान असतें तर त्यांनी त्याचा विचार काढून जे पुनर्विवाह करूं नये असें म्हणतात त्यांचे श्रीमुखांत दिली असती; यांत संशय नाही. परंतु अज्ञान भोळसरपणामुळे सर्वत्र जुलूम चालतो."

पुनर्विवाहाविरुद्ध म्हणून जे आक्षेप घेतात त्यांची प्रवृत्ति प्रामुख्याने शास्त्रग्रंथांवर बोट ठेवण्याची असते. लोकहितवादी ह्या शास्त्रज्ञांचें प्रमाणपत्रच मुळी काढून घेतात. "शास्त्र यद्यपि असेल की स्त्रीचा पुनर्विवाह करूं नये तर शास्त्र हे कायदे आहेत. व जे हितकारक कायदे असतील ते सोडून दुसरे करण्यास कांहीं चिंता नाहीं." "मनूचें वचन असो याज्ञवल्क्याचें असो. कोणाचेंहि असो ब्रम्हदेवाचें का असेना; 'बुद्धिरेव बलीयसी' असें आहे...शास्त्रास एकीकडे ठेवा. आपली बुद्धि चालवा. विचार करून पहा. घातक वचनांवर हरताळ लावा..." "नवे ग्रंथ केले तर आपण ऋषि होऊं. कायदे करणें हे तर राष्ट्राचें काम आहे; प्रत्येक काळीं जे जे शहाणे लोक असतील, त्यांनीं शास्त्र करावें हें उचित आहे" "देवो दुर्बल घातकः याप्रमाणे हे शास्त्रार्थ जाणावेत. देशकाल वर्तमान पाहून त्यांस मागे ठेवावें. जसे इतर बहुत रद्द आहेत तसे हेहि समजावे... सारासार विचार करावा. चांगली गोष्ट विचाराने दिसेल ती अंगीकारावी" अशा प्रकारें अत्यंत समर्पक असा युक्तिवाद करून लोकहितवादींनी पुनर्विवाहाचा पुरस्कार केलेला आहे.

परंतु ह्या शास्त्राधाराच्या खण्डणापेक्षा लोकहितवादींच्या विचारांचें खरें वैशिष्ट्य जर कोणतें असेल तर, त्यांना कोणत्या विचाराबाबत अधिक धाडस दाखवावें लागलें असेल तर तो विचार म्हणजे स्त्री व पुरुष या दोघांना समाजव्यवस्थेंत सारख्याच सवलती असाव्यात, त्यांना सारख्याच नियमांचें बंधन असावें हा विचार होय. लोकहितवादींनी हा विचार अनेकदां मांडला आहे. "जसे पुरुष तशा स्त्रिया आहेत असें आंधळ्या हिंदू लोकांस समजो अशी माझी अतिशय इच्छा आहे." "स्त्रियांस पुरुषासारखे अधिकार आहेत असें ठरवा आणि हा धर्म चालू करा. स्त्रियांनी विद्या करावी. जाणतेपणीं पुरुषाचें व स्त्रीचें लग्न व्हावें हें चांगलें...आणि जिचा नवरा मरेल तिने खुशी असल्यास दुसरा नवरा करावा, म्हणजे तुम्ही फार सुखी व्हाल". "जो अधिकार संसारसंबंधी व सुखाविषयीं पुरुषास आहे, तोच स्त्रियांस असावा. जर पुरुषास पुनर्विवाह करण्यास चिंता नाही; तर स्त्रियांस देखील नाही..." "मी जर एक कायदा केला की, पुरुषाची स्त्री मेली तर त्यास श्मश्रू करून लागलाच संन्यास द्यावा.

घराबाहेर काढून द्यावा. त्या दिवसापासून त्याचा रोजगार व्यापार सर्व बंद. त्यांनीं गंध देखील लावूं नये. आणि हा कायदा चालू करण्याचें मला सामर्थ्य असतें तर पुरुषांनी काय म्हटलें असतें ?"

तथापि लोकहितवादींना युक्तिवाद जरी करतां आला, तो निरुत्तर करणारा असला तरी, त्याने काम भागण्यासारखें नव्हतें. लोकहितवादींना विधवा स्त्रियांस जगावें लागणारें जीवन पाहून अगदी चीड आलेली आहे. आणि अशा चीड आलेल्या मनःस्थितींत त्यांनी वरींच विधानें केलीं आहेत. त्यांची भाषा आज थोडी अ-नागर वाटली तरी त्यांच्या कालची परिस्थिति जर ध्यानांत घेतली तर अशा प्रकारची भाषा ही केवळ क्षम्य नव्हे तर समर्थनीय आहे असेंहि म्हणतां येईल. ब्राह्मण हिंदु विधवेला नुसतीच पुनर्विवाहाची बंदी केली होती असें नव्हे. तर त्यानुसार अपरिहार्यपेंण इतर अनेक ओंगळ आणि अमानुष गोष्टींचा स्त्री-जीवनांत प्रादुर्भाव झाला. आधीच पराधीन हतबुद्ध झालेलें स्त्रीजीवन अधिकच केविलवाणें झालें ! " मला तर असें वाटतें की, स्त्रियांचें दुःख इतकें भारी आहे की त्याची स्मृति झाली तर रोमांच उभे राहातात. " " बारा, पंधरा, वीस, तीस वर्षांच्या पोरींचे गळे कापतात. हें पाहून अंतः-करण खवळून न जावें काय ?..." " पोरें आणि बाळें घेऊन पतीशिवाय काय काय उपासतापास, दुःखें ह्या विधवा भोगतात ? भले हिंदुलोकहो ! धन्य तुमची. तुम्हीच आपल्या मुलींचे खाटीक स्वस्थपणाने होतां..." भोळे-पणाचा काळ होता तेव्हा पंडितांनी सांगितलें, व लोक " विधवा स्त्रियांचीं लेणीं वगैरे घेऊन त्यांची हजामत करूं लागले. फार काय परंतु त्यांचा अशुभ प्रश्न दर्शनेंकरून होतो, त्यांस एकदा जेवण द्यावें व हाल करावे म्हणून जे प्रतिपादन करतात ते कलियुगांतील राक्षस, माणसें खाणारेच समजावे. " सर्व माणसें विधवा स्त्रीस काम जास्ती सांगतात आणि हाल करितात. आणि तिला कोणी मालक नाही, म्हणून निराश्रित होत्साती सर्वांचे दुष्ट शब्द तिला सहन करावे लागतात. दागिन्यांवर वांच्छा जातां कामास नये. चोळी घालतां कामास नये. काळें लुगडें नेसतां कामास नये. कुंकू व नहाण करतां कामास नये. फार काय, दुसऱ्याने जेवावयास बसली, तर लोक हासतात व उपहास करतात. याकरितां एकपोटी, एकवादी

जेवण करावें लागतें. कार्यप्रयोजनांत जातां नये, मंगल कार्यास अपशकून होतो; तोंड पाहिलें तर बाईट शकून झाला म्हणतात. म्हणून लज्जेने दूर राहावें लागतें. असा दुःखांत जन्म काढावा लागतो." अशी परिस्थिति पाहून आईबापांना जांवयाविषयीं, 'हा कोणी–इचा पूर्वजन्मींचा वैरी होता; तो इचा छळ करण्याकरतां जन्मास येऊन इच्याशी लग्न करून मेला" असे उद्गार काढणें सहाजिक आहे. विधवा स्त्रीला "तिकडून सासरा, दीर, सासू, जावा यांनी म्हणावें की, 'करंटी अवदसा नवरा मारून तोंड कशास दाखवतेस! बाप आपले घरीं का ठेवीना? बरें इकडे माहेरी यावें तों भाऊ बहिणी म्हणतात, 'आमचे घरीं तुझें काय आहे? एथें कशास येतेस? बरें, रस्त्यांत फिरलें तर लोक म्हणतात कीं, बोडकी पुढे आली. आता पुढे पाऊल कसें टाकावें? याप्रमाणे त्या पोरीने आपलीं तिन्ही वयें काढावीं लागतात"... "आतां पुरे करा. आजपर्यंत विधवा जाळिल्या तितक्या पुरे करा. तुम्ही म्हणाल इंग्रज लोकांनी जशी सती बंदी केली तसेंच हेंहि करावें. परंतु विधवांचीं लग्नें करावयास इंग्रज इकडे आले नाहीत. तुमची तुम्हांस खबर नाही मग त्यास कशास असावी! ते दूरचे लोक...हें ध्यानांत धरा." ह्या सर्व कंविलवाण्या परिस्थितीमुळे लोकहितवादींना चीड येणें सहाजिक आहे. ते म्हणतात 'अहो, नवरा मरणें हें कोणाचे स्वाधीन नाहीं तें ईश्वराधीन आणि स्त्री व नवरा ह्यांचा संबंध संसारा पुरता आहे. तेव्हां एखाद्या ब्राह्मणास मी सांगितलें की तुम्ही यज्ञोपवीत घेतलें आहे हें तुमचें अखेरीचे आहे. हें जर तुमचे अंगावर तुटलें तर त्या दिवशी तुम्हांस जाळून ध्यावे लागेल किंवा आम्ही तुमचे पांच पाट काढून तुम्हांस विद्रूप करून जन्मपर्यंत तुमचे हाल करूं व बोडकीप्रमाणे तुम्हांस ठेवूं तर त्या ब्राह्मणास तें आवडेल काय?..." असा भेदक सवाल केलेला आहे. वा सर्व युक्तिवादांत लोकहितवादींना कोणाचा उपहास वा उतराई करायची नाही. त्यांचें अंतःकरण स्त्रियांची हीन दीन अवस्था पाहून अगदीं तिळतिळ तुटतें आहे. आणि अशा सात्विक संतापाच्या उर्मीत त्यांचे तोडून किंचित उग्र वाटणारे उद्गार निघालेले आहेत. लोकहितवादींचे सर्वच विचार सामान्यतः बरोबर होते, असें आज शंभर वर्षांनंतर म्हणण्याची पाळी आली आहे. आचार्य जावडेकरांनी आपल्या 'आधुनिक

भारतां'त तसें म्हटलें आहे. अव्वल इंग्रजीतल्या ह्या एकमेव मोठ्या सुधारकाचे विचार विस्ताराने पाहावेसें वाटलें. इतरांनी इतक्या विस्तृतपणें व साक्षेपाने स्त्रीजीवनाविषयीं इतकें लिहिलेलें नाहीं.

लोकहितवादींच्या कालापर्यंत म्हणजे सामान्यतः स. १८८० पर्यंत स्त्रीजीवनविषयक सर्वक्षेत्रीय उत्क्रांतीचें विवेचन केलें. त्याद्वारें कांही निष्कर्ष काढणेंहि शक्य आहे. ह्या कालचे स्त्रीजीवनविषयक प्रश्न म्हणजे स्त्री-शिक्षण, बालविवाह, बालावृद्धविवाह, पुनर्विवाह, विधवांना संन्यासाश्रम-समान वागणूक देण्याची पद्धति हे होत. ह्या प्रत्येक बाबतींत लोकहितवादींनी आपले सुधारणापोषक विचार मांडले आहेत. मागे एके ठिकाणीं म्हटल्याप्रमाणें ह्या प्रश्नांकडे पाहण्याची भूमिका ही प्रामुख्याने भूतदयावादी आहे. स्त्री व पुरुष यांना सारख्या नियमांचें बंधन असावें असें लोकहितवादींनी पुरस्कारलें आहे पण त्या तुलनेचा उद्देश प्रामुख्यानें पुनर्विवाहाचें समर्थन करणें हाच आहे. आगरकरांनी जेव्हा हाच विचार मांडला तेव्हा त्यांची भूमिका व्यक्तिवादाच्या समर्थनाची होती. लोकहितवादींच्या विचारांनी ते व्यक्तिवादास जवळचे आहेत हें खरें तथापि हा व्यक्तिवाद आगरकरांप्रमाणें निरंकुश नव्हता. त्याचा पाया भूतदया हाच होता. अर्थात हा फरक थोडासा सूक्ष्म आहे पण फरक आहे हें खरें. लोकहितवादींच्या राजकीय विचारांची झेप पार्लमेंटपर्यंत गेलेली आहे. ह्या विचारांमुळें ते द्रष्टे झाले आहेत. त्या द्रष्टेपणाच्या भूमिकेला परिपोषक अशीं त्यांचीं स्त्रीजीवनविषयक मतें आहेत. ह्या मतांनी समाजाला धक्के बसले आहेत यांत शंका नाही. पण हीं सारीं मतें एकप्रकारची प्रतिक्रियारूप होतीं. आपलीं सर्व मतें आपल्याच हयातींत चिपळूणकरांनीं निबंधमालेंतून खोडून काढलेलीं त्यांना पाहावीं लागलीं. परंतु त्यांनी चिपळूणकरांच्या टीकेबद्दल विषाद न मानतां * He is the Prince among the graduates असें मालाकार चिपळूणकरांचें गौरवपूर्ण वर्णन केलें. ही अत्यंत महत्त्वाची घटना आहे. त्यांना देशाच्या उद्धाराची तीव्र तळमळ होती. कोणत्याही मार्गाने

* ही पदवी सर्वसामान्यपणें न्या. मू. रानड्यांस लाविली जाते. पण याठिकाणीं आलेल्या संदर्भात तीं लोकहितवादींनीं चिपळूणकरांना लावली तशी लोकहितवादींची एक आठवण प्रसिद्ध आहे.

कां होईना देशाचा उद्धार व्हावा असें त्यांना वाटत असे. ब्राह्मणांवर टीका केल्यामुळें ब्राह्मणांतलें ब्राह्मण्य जागृत होत आहे. नव्या कर्तृत्वानें तें पुढें येत आहेत हें पाहून त्यांच्या अंतरात्म्याला समाधान झालें. व त्याचे द्योतक हे उद्गार आहेत. त्याचाच अर्थ असा की त्यांचे विचार हे केवळ प्रतिक्रियारूप होते. कर्तृत्वाची वाट निराळ्या दिशेने देशांत होत असेल तर माझे विचार मागे पडले तरी चालतील अशी एकंदरीने त्यांची भूमिका असावी असें दिसतें. त्यांच्या विचारांची आज चिकित्सा करतांना ही त्यांची मनोभूमिका लक्षांत घेणें आवश्यक आहे असें वाटतें.

———

'वि. ३ परिशिष्ट : ललितवाङ्मय व स्त्री'

ललित साहित्य:—सामाजिक जीवनांत अशी घडामोड होत असतांना नाटक–कथा–स्वरूपाचें ललित वाङ्मयहि तयार होत होतें त्याचें स्वरूप पाहिलें असतां समाजाचें मन वास्तवाधिष्ठित झालें नव्हतें असें दिसतें. कादंबरीच्या क्षेत्रांत 'मुक्तमाला मंजुघोषा' यांचें युग चालूं होतें. जीवनाचा व ह्या वाङ्मयाचा तसा कोणताहि जवळचा संबंध होता असें म्हणतां येत नाही. ह्या वाङ्मयांत कलात्मकताहि नाही व जीवनक्षमताहि नाही, एकंदरींत हें पूर्वतयारी स्वरूपाचेंच वाङ्मय होतें. त्यांतल्यात्यांत जे बऱ्यापैकी लेखक होते त्यांच्यावर इंग्रजी व संस्कृत साहित्याच्या मोठेपणाचा ठसा पडला होता व त्यांचे विविध संस्कृत व इंग्रजीवृत्तीचे भाषांतर करण्यांचे यत्न सुरू होते. या प्रमुख प्रवृत्तीमुळें ह्या कालखंडाला वाङ्मयीन क्षेत्रांत 'भाषांतर–युग' असें साभिप्रायतेने म्हटलें जातें. समाजाची प्रज्ञा सामाजिक, धार्मिक प्रश्नांकडे खर्च होत होती. प्रज्ञावंत वा प्रतिभावंत लेखकाचें लक्ष इकडे जावें असें युगमान निर्माण व्हावयास अवकाश होता. पुरुषवर्ग नुकताच जागृत होत होता. नवीन राजवटींत जें नवें जीवन निर्माण झालें होतें त्याच्याशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत होता. त्याच्या मनांत निरनिराळीं वादळें निर्माण होत होतीं. सर्वसामान्य समाज अज्ञानावस्थेंतच घोरत पडला होता. ज्योतिराव फुल्यांचे त्याला जागृत करण्याचे यत्न चालू होते. जातिभेदावर टीका व्हावयास सुरवात झाली होती, पण सामाजिक प्रश्नांत त्याला अग्रस्थान प्राप्त झालेलें नव्हतें. सर्वसामान्य समाजाबरोबरच स्त्रियाहि होत्या. बालविवाहाने व बहुपत्नी पद्धतीने समाजांत विधवांची संख्या बरीच होती. पेशवाई तच हें विधवांचें प्रमाण फार वाढलें असावें असें दिसतें 'पानशे, हे तो फ खान्यावरील सरदार होते. त्यांचे घरी सत्तावन बोडक्या होत्या'[१] हा लोकहितवादींनी केलेला उल्लेख या वस्तुस्थितिवर प्रकाश पाडतो. सहाजीकपणें समाजविचारवंतांचें लक्ष ह्या प्रश्नांकडे जावें हें अपरिहार्य होतें. कारण स्त्रियांच्या परिस्थितींत फरक नव्हता.

---

१ शतपत्रें पत्र क्र. १५.

कांही कादंबऱ्याः—वाङ्मयीन उल्लेखांत दोन तीन कादंबऱ्यांचा उल्लेख न करणें चुकीचें होईल. या कालांत यमुनापर्यटण (१८५७) ही पद्मनजी ह्यांची व 'रत्नप्रभा' ही लक्ष्मणशास्त्री हळबे ह्या दोन स्त्री-जीवनविषयक कादंबऱ्यांचा उल्लेख करावा लागेल. 'यमुनापर्यटण' ही ख्रिस्ती धर्माकडे आकृष्ट झालेल्या एका स्त्रीची कहाणी आहे हिंदुधर्मांत स्त्रियांचे जे अनन्वित हाल होत होते त्यांना कंटाळून ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केलेल्या स्त्रीची ही हकिकत आहे. दुसरी कादंबरी 'रत्नप्रभा' ही मात्र पुनर्विवाहाचा पुरस्कार करणारी अशी एकमेव कादंबरी आहे. न्या. मू. रानड्यांनी हिचे परिशीलन केलें आहे. ह्या कादंबरींत विधवा–विवाहाच्या अनुषंगाने प्रथमविवाहाचाहि पुरस्कार आला आहे. तो प्रकार समाजाला अगदीच नवा होता व म्हणून रानड्यांना ह्या विषयाची चिकित्सा करा-वीशी वाटली. हा प्रकार नवा असल्याने 'कादंबऱ्यांतून हा विषय अतिशय सावधपणानें उपयोगांत आणला पाहिजे नाहीतर नीतीमत्तेला धोका बसून घोटाळे माजतील."[१] असा इषारा लेखकास त्यांनी दिला आहे...या परिक्षणांत पाश्चात्य व एतद्देशीय वाङ्मयाची छाननी केली आहे. 'आरबी भाषेतील...गोष्टी किंवा तसल्या घाटणीच्या संस्कृत गोष्टी. हेंच काय तें आमचें कथात्मक वाङ्मय. त्यांची गोडी आम्हांस वंशपरंपरेने लागलेली. राजा, राणी, प्रधान यांच्या विषयींच्या पाणचट पाल्हाळिक किंवा विनोदी कथांनीं आमची आजपर्यंतची कथाभिरुचि सिद्ध झालेली आहे...निर-निराळ्या परिस्थितींत व प्रसंगांत मानवसमाजाची कोणत्या प्रकारें हालचाल सुरू असते याचें विश्वसनीय व अस्सलबरहुकूम बेमालूम चित्र पाहावयास सापडावें, अशी आमची कथात्मकवाङ्मयाची रचना नसल्यानें या वाङ्म-याचा आस्वाद घेतांना तसल्या चित्राची अपेक्षा कोणीच करीत नाही..."[२] ह्यानंतर प्रेम ह्या विषयाला आपल्या कादंबऱ्यांत स्थान नाही म्हणून न्या. मू. नी खेदहि व्यक्त केला आहे. या उताऱ्यावरून ह्या कालांतलें वाङ्मय कसें होतें ह्याची कल्पना येऊं शकते. ह्या कादंबऱ्याशिवाय एकदोन सामा-जिक नाटकहि ह्या कालांत लिहिलीं गेलीं आहेत. 'मनोरमा' हें महादेव

१ न्या मू रानडे : फाटक पृ. ७२.
२ न्या. मू. रानडे : फाटक पृ. ७२.

बाळकृष्ण चितळे यांचें, व 'प्रबोध विद्युत अथवा स्वैरसकेशा' हें रघुनाथ शंकरशास्त्री अभ्यंकर यांचें. 'मनोरमा' ह्या नाटकाची भाषा अश्लील आहे. त्यावर विविधज्ञानविस्तारांत टीकाहि झाली. तथापि "स्वतंत्र सामाजिक नाटक या दृष्टीने ह्या पुस्तकाची त्या काळांतील उत्तम ग्रंथांत गणना करणें भाग आहे."[3] असा प्रा. सरदारांचा अभिप्राय आहे. 'स्वैरसकेशा' नाटकांत बालावृद्ध विवाहाचा प्रश्न हाताळून गतभर्तृकांची करुणास्पद अवस्था दर्शविण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि ह्या नाटकावरचा अभिप्राय फार प्रतिकूल दिसतो. पण सामाजिक प्रश्नांवर नाटकें लिहिण्याचा यत्न ह्या दृष्टीने ह्या कृतींचा उल्लेख करावासा वाटतो.

ललित साहित्यांतील स्त्रीजीवनचित्रण:— ह्या कालांतील ललित-वाङ्मय विशेषतः कादंबऱ्या, गोष्टी व त्यांतून प्रतीत होणारें स्त्रीजीवन कशाप्रकारचें होतें, त्याचा व आतापर्यंत विवेचिलेल्या वैचारिक जीवनाचा कोणता संबंध होता इ. गोष्टींबाबत थोडेसें विवेचन करणें आवश्यक आहे असें वाटतें.

ललित वाङ्मयापैकी सामाजिक स्वरूपाचें वाङ्मय फारच अल्प-प्रमाणांत निर्माण झालें व जें झालें त्याचा उल्लेख ह्यापूर्वीच्या विवेचनांत आलेला आहे. ह्या काळांतल्या कादंबऱ्या ह्या अद्भुतरसप्रधान आहेत. प्रत्यक्ष घटना, जीवन, स्वभावचित्रण ह्या सर्वच दृष्टीनी त्या पूर्णपणें ढगांत आहेत. या संदर्भात अनेक उदाहरणें देतां येतील.

'वसंत कोकिला' ह्या कथेंतील नायक—नायिकांना अनेक सिद्धी वश आहेत. तीं माणसांचे पक्षी करतात त्यांच्या फिरून मगरी सुसरी करतात त्यांना फिरून मानवरूप देतात. मंजुघोषेंतील वसंत माधवाजवळ एक कळीचें विमान आहे. त्याला डॉन नांवाच्या माणसाने विमानविद्या शिकवली व विमानहि त्यानेच दिलें... 'सत्यविजय' नांवाच्या नाट्य-कथेंत नायकाला मंत्रविद्या अवगत आहे. तो स्वतः पुरून ठेवली भाजी-भाकरी आठ दहा महिने तशीच टिकवूं शकतो. 'विश्वासराव' या कादंबरी-तल्या नायकाने गमतीगमतीच्या गोष्टी केल्या आहेत.

या वाङ्मयांतील स्त्रियाहि औरच आहेत. त्या लाजल्याची वर्णनें लेखकांनी केलीं आहेत. पण लज्जा, विनय, किंवा संकोच यांचा संपर्कहि

त्यांना असल्याचें त्यांच्या वर्तणुकीवरून वाटत नाहीं. 'विश्वासराव'मधील मधुमालती मैत्रिणीला म्हणते "ही ज्याची तसबीर आहे त्याची माझी भेट करून देशील तर हवें तें बक्षीस देईन...ध्यानीं मनीं मला त्या सुकुमाराचा ध्यास लागला आहे." मंजुघोषेंत नायिका म्हणते "उदयीक सर्वसिद्धांत– त्रयोदशी माझ्या अंगिकारार्थ युक्त आहे." मुक्तामाला, शृंगारलहरी, इंदिरा ह्या आपणहूनच पुरुषांशी लगट करतात. विदग्ध स्त्रीचरित्रांतील तर स्त्रिया याच खऱ्या भोक्त्या आहेत व गांवांतील सुंदर तरुण पुरुष हे त्यांचे विषय आहेत.

नायिकांच्या स्वभावचित्रणाकडें जरी लक्ष दिलें तरी हेंच आढळतें. मंजुघोषा, मुक्तामाला, पद्मतनया, शशिकला, शृंगारलहरी, कलावती, मधुमालती ह्या सर्व कन्या स्वभावाने तर सारख्या आहेत. पण त्यांची रूपसंपदाहि सारखी आहे. भिन्न भिन्न लेखकांनी रंगविलेलीं हीं चित्रें अगदी ठराविक साच्याचीं आहेत. त्यांचा पति त्यांच्या आहारीं जाऊन त्याने प्रथम अपत्याचा छळ करायचा हें ठरलेलें आहे. व शेवटीं पश्चात्ताप होऊन त्याने ह्या बाईलाच हाकून लावावयाचें हेंहि पण ठरलेलें आहे. भाषेच्या बाबतींतहि तोच प्रकार. विशिष्ट शब्द सर्वत्र सारखे येतात.— 'हं, असल्या छपवणीने मी कांही ऐकायची नाही." 'आम्ही आपल्या वेड्या म्हणून विचारायला येतो.' 'व्यर्थ रे देवा जलम आम्हां बायकांचा'... इ. ठराविक प्रकाराचीं वाक्यें प्रत्येक कादंबरींत असतातच.— स्थलकाळ– निदर्शक असें कोणतेंच लक्षण ह्या पात्रांना बंधयुक्त करूं शकत नाही.

या सर्व उदाहणांवरून या कालांतील साहित्यांत कसल्या प्रकारचें स्त्रीजीवन प्रतिबिंबित झालें आहे तें स्पष्ट होईल. "स्त्रिया तेवढ्या साच्या रतीच्या "पुतळ्या" असें स्त्रियांचें वर्णन ह्या कादंबऱ्यांतील स्त्रियांच्या बाबत करतां येईल. मानवी भावनांचे बाबतींतहि तोच प्रकार. अतिशय आनंद अतिशय दुःख ह्याशिवाय कोणतेच प्रसंग लेखकाला रंगवावेसे वाटत नाहीत.

अशाप्रकारचें जीवनचित्रण कादंबरींत ह्या कालांत कां असावें. जीवनाशी त्याचा कोणत्याहि प्रकारचा संबंध नसावा असें का? लोकहितवादी, ज्योतिबा, विष्णुबुवा ब्रह्मचारी, जांभेकर, छत्रे, इ. इ. लेखक ज्यावेळीं आपल्या लेखण्या विविधविषयांवर— सामाजिक, राजकीय— चालवीत

होते. त्यावेळीं ह्या कादंबरी लेखकांना असें दूर राहावेसें वाटावें. हा खरोखर एक प्रश्न आहे. आणि त्याचें पूर्णतया समाधानकारक उत्तर मिळणें कठिण आहे.

ह्याच्या एका कारणाचा ओझरता उल्लेख आलाच आहे की, खरे बुद्धिवंत, प्रतिभावंत लोक ह्या क्षेत्राकडे वळलेच नाहीत. त्यांना सामाजिक, राजकीय, वृत्तपत्रें.. इ. क्षेत्रेंच पुरून उरतील अशीं होतीं. जे नवीन विद्वान् तयार होत होते त्यांचा संस्कृत इंग्रजी ग्रंथाच्या भाषांतराचा यत्न चालला होता. त्यांना 'रस' वाटावा असें जीवन अद्याप निर्माण व्हावयाचे होतें. ती प्रक्रिया सुरू होती. ह्या कादंबऱ्या ज्यांनी लिहिल्या ते लोक मनाने मध्ययुगांतच वावरत होते असें दिसतें. त्यांना वास्तवाकडे डोळे उघडून पाहण्याचें धाडसच नाही. मानवी स्वभावांतील विविध रंगी आंदोलनाचीहि त्यांना कल्पना नाही. हें खरें विस्मृति–वाङ्मय आहे. ह्याच्या ठायीं बाल–वाङ्मयाचे बरेच गुण केंद्रित झालेले आहेत असें दिसतें.

प्रत्यक्षांत हिंदू स्त्रीचें लग्न लहानपणींच उरकायचें. पण या ठिकाणच्या स्त्रिया या नुसत्या तरुण तर नव्हेतच प्रौढ आहेत. प्रत्यक्षांत हिंदू स्त्रीची नवऱ्याशी बोलण्याची प्राज्ञा नव्हती. पण ह्या कादंबऱ्यांतील हीं स्त्री–पात्रें आपले भाव अगदी परखडपणें बोलून दाखवीत आहेत....ह्या साऱ्या चित्रणांतून पलायनवाद, स्वप्नवाद दिसून येतो. प्रत्यक्षांत न अनुभवावयास मिळणाऱ्या गोष्टी स्वप्नांत अनुभवावयास द्याव्यात त्यापैकीच हा प्रकार आहे. तथापि ललितसाहित्यांत आविष्कृत झालेलें मध्ययुगीन मत हें झिजायला लागलें आहे. इंग्रजी, संस्कृत साहित्यांतील श्रेष्ठ कृतींच्या परिशीलनाने सुशिक्षित रसिकांना वा वाचकांना ह्या गोष्टींत कोणताहि रस वाटेना. त्यांच्या गरजेला हें साहित्य उतरेना. त्यांनी प्रारंभीं भाषांतराचा पांगुळगाडा घेतला. पुढे ऐतिहासिक, पौराणिक कथानकांच्या द्वारें वास्तवाकडे येण्याची वाट मोकळी होऊं लागली. ही सर्वांगीण प्रक्रिया होती. तिचा वेग हलके हलके वर्धमान होत होता. स्वप्नवादाचा वा अद्भूतवादाचा फुगा निबंधमालाकारांच्या टाचणीने फटकन् फुटला. अद्भुताचें युग संपलें. अगदी चटकन संपलें. एकाद्याच ठिकाणीं अधिक पाऊस पडावा व तेथलें गवत माजावें इतरत्र सर्वदूर खुरटेपणा असावा तशापैकी हा प्रकार होता. इंग्रजी राजवटीच्या

आगमनाने कांहीं लेखकांच्या प्रतिभेला आवाहन मिळालें. साहित्यनिर्मितीला पोषक अशी परिस्थिति निर्माण झाली. त्या परिस्थितींत हें वाङ्मय निर्माण झालें. पण त्यांत अनुभूती नव्हती. नव विचारांची टाकी घेऊन समाजावर नवे संस्कार करण्याचें कार्य लोकहितवादीं आदी सुधारकांनी सुरू केलें होतें. त्यांच्या आंदोलनाच्या लाटा या क्षेत्राप्रत अद्याप यावयाच्या होत्या. त्या संधिकालांतलें हें साहित्य ललितरूपत्व पावलें. बाह्य स्वरूपाविना लालित्याला अभिप्रेत असणारा कोणताही उच्च गुण त्यांत नव्हता. स्त्रीजीवनाच्या आविष्काराच्या दृष्टीने तर ह्या साहित्याकडे अंगुलिनिर्देशहि करणें योग्य होणार नाही. तथापि ह्या कालाची सरहद्द बदलली. निबंधमालाकार चिपळूणकरांच्या रूपाने सर्वच साहित्यक्षेत्रांत एक नवा मनू निर्माण झाला. अशा कालापर्यंत आलों आहोंत.

नाट्यवाङ्मयः—ह्या सुधारणाविरोधी प्रवृत्तीचें चित्रण वा आविष्करण जरी निबंध वा तत्सम वैचारिक साहित्यांतून दृग्गोचर होत नसलें तरी अन्य प्रकारांतून तें आविष्कृत होतें व हा वाङ्मयप्रकार म्हणजे नाटक होय. या कालांत कादंबरींत जीवनसाक्षेप नव्हता याचें दिङ्मूढ यापूर्वी आलेंच आहे. कादंबरी हा वाङ्मयप्रकारच मुळी नवा होता. नाटकाचें तसें नव्हतें. नाटक हा कृषिसंस्कृतींतील एक अत्यंत महत्त्वाचा व प्रभावी असा वाङ्मयप्रकार आहे. नवीन जीवनाबरोबर जुळतें घेणें हें त्याला अधिक सोपें गेलें. शेक्स्पीअर सारख्याच्या महान् नाट्यकृतींचा विद्यालयांतून अभ्यास होऊं लागला होता. संस्कृत नाटकांकडेहि कांही काल लक्ष गेलें. पण सामाजिक विचार नाटकांतून लवकर पुढे येऊं लागले.

या कालांत ज्या अनेक प्रकारच्या सांस्कृतिक चळवळी सुरू झाल्या होत्या त्यांत आधुनिक रंगभूमीची सिद्धता होण्याची प्रक्रिया ही एक चळवळच म्हणावी लागेल. विष्णुदास भाव्यांचे प्रयत्न १८४३ पासून जरी सुरू झाले होते तरी रंगभूमीला खरें स्वरूप विद्यापीठाच्या प्रतिस्थापनेनंतरच आलें. कारण त्यानंतर इंग्रजी व संस्कृत नाट्यकृतींचा अभ्यास होऊं लागला. वाङ्मयीन गुणांचे दृष्टीने श्रेष्ठ अशीं नाटकें जरी पुढे होऊ लागलीं तरी सामाजिक विषयांवर प्रहसनें, नाटिका इत्यादि प्रकारची रचना होऊं लागली होती.

या कालांतले प्रमुख सामाजिक प्रश्न म्हणजे स्त्रीशिक्षण, पुनर्विवाह, बालावृद्धविवाह इ. होत. ह्या प्रश्नांचे अनुषंगाने सुशिक्षित स्त्रीची टिंगल करणें, पुनर्विवाहेच्छू स्त्रीचा उपहास करणें, इत्यादि प्रकार सुधारणाविरोधी नाटकांतून आढळल्यास नवल नाही. उलटपक्षी सुधारणावादी नाट्यकृतींतून ह्या विरुद्ध मतप्रदर्शन, वैधव्याचीं दुःखें, बालावृद्धविवाहांतील अमानुषता इ. भाग असे. त्या दृष्टीने कांही प्रमुख नाट्यकृतींचा उल्लेख करावा लागेल. रघुनाथ शंकरशास्त्री अभ्यंकरकृत 'स्वैरसकेशा', महादेव बाळकृष्ण चितळेकृत 'मनोरमा', कार्लेकर–जोगळेकरकृत 'वैदिकी हिंसाधर्मतत्त्व-प्रहसन' हीं अनुक्रमें १८७१, १८७१ व १८८३ या वर्षी प्रसिद्ध झालीं. १८८० च्या पूर्वी झालेलीं हीं दोनच प्रमुख सामाजिक 'नाटकें' होत. 'स्वैरकसेशां' त सकेशा सावित्री हिच्या स्वैर वर्तनाची करुण कहाणी आली आहे, तर 'मनोरमें' त कुंटिणीच्या नादीं लागलेल्या बालविधवेचें चित्र रंगविण्यांत आलें आहे. 'वै. हिं. ध.' या नाटकांत एका बंगाली पात्राच्या मुखाने पुनर्विवाहसमर्थक विचार मांडण्यांत आले आहेत. यापुढे सनातनी–सुधारक विग्रह अधिकाधिक तीव्र होत गेला असें दिसतें. कारण या पुढच्या ८।१० वर्षांत समाजसुधारणेवर बरींच नाटकें रचलीं गेलीं. विशेष असें की तीं बहुतेक सुधारणाविरोधी आहेत. जनमताचा कौल तीं दाखवितात.

———

आगरकर व त्यांचें युगमान.

अव्वल इंग्रजींत म्हणजे ब्रिटिश राजवटीच्या पहिल्या प्रहरांत येथील समाजाच्या धारणेंत व विचारांत कसकसा फरक पडत गेला, व त्या फरकानुसार वाङ्मयाच्या स्वरूपांत कसा फरक पडला ह्याचें विवेचन मागील विभागांत केलें. त्यानंतरच्या व १९२० पर्यंतच्या कालखंडांत समाजजीवन आणि साहित्य यांत फरक कसकसे पडले; समाजजीवनाच्या अनुषंगाने स्त्रीजीवनांत कसा व कोणता फरक पडला व त्याचें साहित्यांत कसें प्रतिबिंब पडलें इ. गोष्टींचा उहापोह या विभागात करावयाचा आहे.

'पेशवाईच्या समाप्तीबरोबर हिंदुस्थानांतील मध्ययुगाचा शेवट झाला व आधुनिक कालाचा जन्म झाला' या आशयाचें एक वाक्य मागील प्रकरणांत आलें आहे. त्याचप्रमाणें 'लोकशाही राष्ट्रीयत्व व बुद्धिवाद' यांची स्थापना हें ब्रि. राजवटींत मोठें कार्य झालें. त्याचा पण उल्लेख आलेला आहेच. मध्ययुगीन विचारांतून आधुनिक कालांत येण्याची इतिहाससिद्ध क्रिया आहे तिचें दिग्दर्शन यूरपच्या इतिहासांत अधिक स्पष्टतेने प्रतीत होतें. तेथें ती अधिकाधिक स्वाभाविक पद्धतीने उत्क्रांत झाली आहे. आपल्या देशांत परकीय राजसत्तेच्या आगमनाने ह्या क्रियेस वेगळीच कलाटणी मिळाली. ब्रिटिशांचें आगमन झालें नसतें तर आधुनिक कालाप्रत आपण कसे आलों असतों हें सांगतां येणें कठीण आहे व अनावश्यक आहे. परंतु वारकरी संप्रदायाची जी एक मोठी चळवळ आपल्याकडे झाली तिच्यांत पुनरुज्जीवनवादी विचार व धर्मसुधारणापर विचार या दोहोंचेंही संमिश्र प्रतिबिंब पडलें आहे.[1] तथापि ह्या संमिश्रतेंतून आधुनिक कालाचा उदय झाला असताच असें म्हणतां येत नाहीं. कारण 'पुनरुज्जीवनांच्या (रिनेसन्स) चळवळीचें एक वैशिष्ट्य म्हणजे चिकित्सावृत्तीची (स्पिरिट ऑफ इन्क्वायरी) पद्धतशीर वाढ हें आहे. व ही चिकित्सावृत्ती मात्र पूर्वकालीन लेखकां-

१ अधिक विवेचन "साहित्य आणि संस्कृति" मध्यें पाहाणें

पैकीं कोणाच्याच लिखाणांतून बीजरूपाने कां होईना आढळत नाही. हिंदुस्थानांत मुद्रणकलेचा प्रवेश १५५६ साली गोव्यांत झाला व तेथें फ्रेंच, लॅटिन ग्रंथ छापावयास सुरवात झाली होती.[१] शिवाजीनेही एक छापखाना घातला होता पण तो त्याला चालवितां न आल्याने विकावा लागला असाहि एक प्रवाद आहे.[२] पेशव्यांनाहि वेळोवेळीं इंग्रज व्यापाऱ्यांकडून फोटो, घड्याळ, पृथ्वीचा गोल (ग्लोब) इ. वस्तू नजराणा म्हणून मिळाल्याचा उल्लेख आढळतो. पेशव्यांचा स्वत:चा वैद्य नव्हता. मिशनरी डॉक्टरांचा प्रवेश झाला होता. डॉक्टरांचीं औषधें अधिक गुणकारी, असा अनुभवहि त्यावेळीं यावयास लागला होता. थोरल्या माधवरावांसाठीं निजाम दरबारी असलेल्या डॉ. स्टुअर्ट या वैद्यास बोलाविलें होतें. पेशव्यांच्या घरांत देवी टोचवल्याचीसुद्धा नोंद आहे. पण त्यांना त्याचा प्रसार करावेसें वाटलें नाहीं.[३] या उल्लेखावरून चिकित्सक वृत्तीची आवश्यकता कोणासच भासली नाही. व ह्या वस्तुस्थितीच्या योगानेच राष्ट्रीय वृत्तीचा उदय होऊं शकला नाही.

इंग्रजी राज्याच्या आगमनाने ह्या देशांतील परिस्थितींत कसा फरक पडला इ. चें विवेचन मागील विभागांत आलें आहे. १८८० च्या सुमारास सर्व देशांत पुनरुज्जीवनाच्या विचाराची लाट पसरल्यासारखी दिसते. तों वेळपर्यंत त्या लाटेला अनुकूल अशी परिस्थिति निर्माण होत होती. लोकहितवादी, ज्योतीराव फुले, विष्णुबुवा ब्रह्मचारी ह्यांच्या विचारांतून खेरं सांगायचें झालें तर पुनरुज्जीवनाच्या कांही वैशिष्ट्यांचे पडसाद आपल्या कानांवर पडतात. आताच उल्लेखिलेली चिकित्सावृत्ति, (स्पिरिट ऑफ् इनक्वायरी), व्यापक अशी मानवतावादी वृत्ति (ह्युमॅनिझम्) व मध्ययुगीन शबल विचारांचा त्याग, (मेडिइव्हल् आय्डिआज्) हीं पुनरुज्जीवना (रिनेसन्स) च्या चळवळीचीं कांही लक्षणें होत. लोकहितवादींच्या लिखाणांत आपणांस चिकित्सावृत्तीचा आढळ होतो. त्यांच्या

---

१ पंचारति–प्रस्तावना. अ. का. प्रि.

२ पंचारति, प्रस्तावना–प्रियोळकर.

३ पेशवेकालीन महाराष्ट्र–वा. कृ. भावे.

सामाजिक व स्त्रीविषयक विचारांना मानवतावादाची व्यापक पार्श्वभूमि आहे. (तिलाच मागील विभागांत भूतदयावाद म्हटलें आहे.) पेशवाईतील विविध गोष्टींचा व ब्राह्मणी विचाराचारांचा लोकहितवादींनी जो वेळोवेळीं अधिक्षेप केला आहे तो त्यांच्या ठायीं असलेल्या मध्ययुगीन समजुतींबद्दलच्या तिरस्काराचा द्योतक आहे. विष्णुबुवा ब्रह्मचारी ह्यांच्या 'वेदोक्त धर्मप्रकाशां' तील कित्येक विचारांवर साम्यवादाची छाया पडल्यासारखी दिसतें हें सर्वमान्य आहे.[1] त्याचें बीज 'मानवतावाद' वा ह्यूमॅनिझममध्येच आहे. लोकहितवादी, विष्णुबुवा यांनी, फलज्योतिषावर विश्वास व लोकभ्रम ह्यांचाहि अधिक्षेप वारंवार केला आहे. ज्योतिबांच्या सर्वच कार्याचा पाया 'मानवतावाद' आहे. यावरून १८८० च्या सुमारास जी लाट उसळली तिची पूर्वतयारी तत्पूर्वीच्या ५०।६० वर्षांच्या काळांत होत होती असें दिसतें.

परंतु पुनरुज्जीवनाच्या चळवळीचा गाभा राष्ट्रीयत्व हा आहे. आणि त्या राष्ट्रीयत्वाचा उदय मात्र १८८० पर्यंत झालेला नव्हता. राष्ट्रीयत्वाचा उदय व्हावा अशी पूर्वतयारी चालू होती. या पुनरुज्जीवनाच्या कल्पनेचा उदय निरनिराळ्या प्रांतांत कसकशा स्वरूपांत झाला तें प्रथम पाहणें आवश्यक आहे.

बंगालमध्ये पहिले पुढारी राममोहनराय हे निर्माण झाले. त्यांना हिंदी समाजांत एक सर्वांगीण क्रांति घडवून आणावयाची होती. ती क्रांति घडवून आणण्यास आपल्या धर्मविचारांत व धर्माचारांत प्रथम क्रांति झाली पाहिजे अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. पहिली धर्मसुधारणा, दुसरी समाजसुधारणा व तिसरी राजकीय सुधारणा अशी प्रतवारी त्यांनी आपल्या अंतःकरणाशी निश्चित केली होती.[2] डॉ. भांडारकरांचे मतें "प्रथम आत्म्याची उन्नति झाली पाहिजे."[3] 'समाज हा त्यावेळीं मध्ययुगीन युरोपीय समाजासारखा होता. त्याच्या सर्व व्यवहारांवर धर्माची सत्ता अप्रतिहत नसली तरी

---

१ जावडेकर: आधुनिक भारत, व प्रा. माटे यांचा लेख दिवाळी अंक १९५१ लोकसत्ता.

२. आधुनिक भारत पृ. ६१.

३. डॉ. भांडारकर: लेख व भाषणें पृ. ३४२--४३.

तत्त्वतः चालत होती.'[१] गेल्या विभागांत सुधारकांचा सुधारणेला 'शास्त्राधार' शोधण्याचा जो प्रयत्न उल्लेखिला आहे त्याचें मूळ ह्याच वस्तुस्थितींत आहे "अशा समाजाची सुधारणा करूं इच्छिणारांनी धार्मिक आचार-विचार भावनांच्या सुधारणेला आद्य स्थान द्यावें असें सुधारकांना वाटणें अगदी सहाजिक आहे."[१] राममोहनरायांच्या एकंदर सुधारणेच्या विचारांचें स्वरूप आपल्याकडील लोकहितवादींप्रमाणें आहे. लोकहितवादीपुढे खिस्ती धर्माचें आक्रमण नव्हतें (तें बंगालमध्ये होतें) म्हणून धार्मिक विचारांबाबत त्यांनी विशेष लिहिलें नाहीं. लोकहितवादी ज्याप्रमाणे इंग्रजी विद्येचे पुरस्कर्ते होते तसे राममोहनहि. 'इंग्रजी का प्राच्यभाषा' या प्रकारचा जो वाद शिक्षणक्षेत्रांत झाला त्यांत राममोहनांनी इंग्रजीची बाजू घेतली होती. सती जाण्याची रूढि मोडण्याचे त्यांनीं प्रत्यक्ष प्रयत्न केले ह्यांवरून ब्रि. अंमलाची बंगाल व महाराष्ट्र या दोन्ही प्रांतांवर प्रतिक्रिया सारखीच झाली असें प्रत्ययास येतें. ज्योतिबा, विष्णुबुवा ह्यांच्याप्रमाणे केशवचंद्र सेन, देवेंद्रनाथ ठाकूर हे दोन पुढारी ह्याच वेळीं बंगालमध्ये झाले.

१८७५ पासून १८८५ पर्यंतच्या काळांत सर्व भारतवर्षांत एकप्रकारचें नवचैतन्य निर्माण होत होतें. की ज्याच्यामध्यें पुनरूज्जीवनचा साक्षेपी आविष्कार होत होता. राष्ट्रीय उत्थापनाचा विचार विचारवंताना भुरळ पाडूं लागला. व ह्या नव्या विचारांतून आधुनिक भारतीय राष्ट्रवाद निर्माण झाला आहे. ह्या राष्ट्रवादाचें एक अंग म्हणजे भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठपणाचा अभिमान हें होय "महाराष्ट्र, बंगाल, पंजाब व मद्रास ह्या चार प्रांतांत आपल्या भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाचा अभिमान वाढविणाऱ्या चळवळी ह्या काळांत झाल्या आहेत. महाराष्ट्रांत ह्या चळवळीचें स्वरूप थोडक्यांत 'महाराष्ट्र धर्माचें पुनरूज्जीवन" या नांवाने सांगतां येईल. बंगालमध्यें रामकृष्ण परमहंसांच्या शिष्याने-स्वामी विवेकानंद यांनीं-याच वेळीं भारतीय वेदांताची पताका जगभर पसरविण्यासाठीं संन्यास–दीक्षा घेतली व पुढें रामकृष्ण मिशनची स्थापना केली. पंजाबांत स्वामी दयानंद यांनीं स्थापन केलेल्या आर्यसमाजाची शाखा १८७७ सालीं लाहोर येथे रुजली व तिनेंच पंजाबांत नवजीवन निर्माण केलें. मद्रासमध्ये याच सुमा-

१. डॉ. भांडारकर : लेख व भाषणें पृ. ६२.

रास थिऑसफीचा विशेष प्रचार झाला आणि त्या प्रांतांत राष्ट्रीय स्वाभिमान जागृत करण्याचें कार्य थिऑसफीने केलें. अशा प्रकारें महाराष्ट्रधर्म रामकृष्ण मिशन, आर्यसमाज आणि थिऑसफी यांच्या आधारें महाराष्ट्र, बंगाल, पंजाब, आणि मद्रास ह्या चार प्रांतांत राष्ट्रीय स्वाभिमानाचें युग ह्या वेळीं प्रवर्तित होत होतें.[1]

अशा प्रकारें १८८० च्या सुमारास सर्व राष्ट्रांत नव्या युगाच्या पताका कशा फडकावयास लागल्या होत्या त्याचें दिग्दर्शन होतें. आपल्या महाराष्ट्रांत ह्या पुनरूज्जीवनाने अत्यंत वेगळें व वैशिष्ट्यपूर्ण असें स्वरूप प्राप्त करून घेतलें. इतर प्रांतांतली आंदोलनें हीं प्राय: सांस्कृतिक वा धार्मिक होतीं. पण महाराष्ट्रांतलें आंदोलन हें प्रामुख्यानें राष्ट्रीय–राजकीय होतें. त्यायोगें तें अधिक जीवनस्पर्शी व जिवंत होतें. " चिपळूणकर आणि टिळक यांनी महाराष्ट्राच्या निकट भूतकालीन इतिहासाच्या आधारें स्वराज्यस्थापनेच्या कामास आमची संस्कृति पूर्णपणे लायक आहे असा जो आत्मविश्वास लोकात निर्माण केला त्या आत्मविश्वासाच्या आधारावरच हिंदुस्थानांतील राजकारण प्रथम महाराष्ट्रांतील व नंतर इतर प्रांतांतील सुशिक्षित मध्यम वर्गांत रुजलें. "[2]

ह्या सांस्कृतिक राष्ट्रीयत्वाची सुद्धा महाराष्ट्रांतच अधिक चिकित्सक पाहाणी झालेली आहे असें दिसतें. 'महाराष्ट्रांत मराठी साम्राज्याची कल्पना जिवंत असल्याने महाराष्ट्र धर्माच्या नांवाने स्वधर्माला अगर स्वसंस्कृतीला स्वराज्याची आवश्यकता आहे ही भावना जागृत करतां येणें शक्य आहे व तेंच कार्य लोकमान्य टिळक आणि इतिहासाचार्य राजवाडे यांनीं आपापल्या क्षेत्रांत केलें. लोकहितवादी, न्या. मू. रानडे किंवा आगरकर या सर्वच महाराष्ट्रीय पुढाऱ्यांकडे पाहिलें तर असें आढळून येई की, त्यांपैकी कोणीहि पुढारी केवळ संस्कृतिसुधारणेवर किंवा धर्मसुधारणेवर भर देऊन थांबत नसून प्रत्येकाला स्वराज्याची व राजकीय सुधारणेची विशेष आवश्यकता पटलेली होती."[3] नव्या युगाचा विचार राष्ट्रभक्ति हा होता. ह्या विचा-

१ आधुनिक भारत पृ. २०७.

२ कित्ता पृ. २७६.

३. आधुनिक भारत पृ. २७८.

याचें विश्लेषण चिपळूणकर, आगरकर, रानडे, टिळक, राजवाडे या सर्वच विचारवंतांनी आपापल्या परीने करण्याचा यत्न केला आहे. व अगदी वेगळे वेगळे विचार व्यक्त केले आहेत. त्या सर्वांच्या विचाराची व राष्ट्रभावनेची चिकित्सा येथे आवश्यक नाही. राष्ट्रभक्तीचा हा विचार १८८० नंतर निर्माण झाला तो सांस्कृतिक ऐतिहासिक परंपरेच्या अभिमानावर आधारलेला होता, व लोकांचीं मनें आकृष्ट करणारा, त्यांना कार्यप्रवृत्त करणारा एक प्रभावी विचार होता हें लक्षांत घेणें आवश्यक आहे. महाराष्ट्रांत त्या विचारामागे विशिष्ट राजकीय ध्येयवादाची सांगड घातली गेली होती हेंच महाराष्ट्रीय विचाराचें वैशिष्ट्य होय ही गोष्ट लक्षांत आली की पुरे. हा राष्ट्रवादी विचार १९२० पर्यंतच्या (ह्या टिकाणीं विचारांत घेतलेल्या) कालखंडांतला अत्यंत प्रबल विचार होय. लोकमान्य टिळक, राजवाडे, शि. म. परांजपे, न. चिं. केळकर, कृ. प्र. खाडीलकर, शि. म. गोळे, इ. विचारवंत व धुरंधर लेखकांनी ह्याच विचारांची कास धरली आहे. प्रत्येकाच्या विचारांत व्यक्तिगत दृष्टीने जेवढा फरक असावयास हवा तेवढा असला तरी हे सारे लेखक राष्ट्रवादी विचारपरंपरेचे कट्टे पुरस्कर्ते आहेत. ह्यांच्या विविध लेखनांतून ह्याच विचाराचा प्रामुख्याने प्रचार झालेला आहे. आणि त्याचा परिणाम सर्वसाधारण समाजावर झाला आहे. व त्यांच्या कर्तृत्वास वेगळें वळण लागलें आहे. १८८०नंतर महत्त्वाचा युगप्रवर्तक विचार म्हणजे राष्ट्राभिमानावर आधारलेला ध्येयवाद होय. त्याचें विवेचन करणें आवश्यक वाटलें कारण साहित्यांत त्याचें प्रतिबिंब पडलें आहे.

आधुनिक कालास जेव्हा एखाद्या देशांत सुरवात होते तेव्हा स्वसंस्कृतीच्या व स्वपरंपरेच्या प्रेमाचें भरते येतें. त्यांत भावी कालाच्या कर्तृत्वाचीं आणि विचारांचीं बीजें असतात. मानवांतर्गत सुप्त कर्तृत्वशक्तीला भलतेंच आवाहन पोचतें आणि नव्या विचारांनी भारलेलीं माणसें प्रत्येक क्षेत्रांत भराभर पुढें येतात. १८८० नंतर आपल्या देशाचा जो इतिहास उपलब्ध आहे त्याचे आधारें असें म्हणतां येतें की, असें पुनरुज्जीवन आपल्या राष्ट्रांत १८८० च्या आसपास सुरू झालें. पुनरुज्जीवनाची चळवळ ही आधुनिक कालखंड सुरू होण्याच्या सुमारास होणारी एक अपरिहार्य खळबळ वा चळवळ दिसते. आधुनिक भारतांत ह्या पुनरुज्जीविनाच्या

चळवळीचें प्रणेतेपद निबंधमालाकार चिपळूणकर यांचेकडे जातें. १८७४ मध्ये त्यांनी आपली 'निबंधमाला' सुरू केली व १८८० मध्ये बंद केली. ती बंद करतांना आपलें उद्दिष्ट सफल झालें अशी कबुलीहि त्यांनी दिली आहे.[१] याचा अर्थच असा की पुनरुज्जीवनाचा विचार येथे रुजला आहे हें त्यांना पटलें.

चिपळूणकरांनी तत्कालीन सुधारकांच्या चळवळीचा आपल्या लेखनांतून वेळोवेळीं अधिक्षेप केलेला आहे व तो करतांना त्यांना परभृत ठरविलें आहे. चिपळूणकरांचे कैवारी विचारवंतहि पूर्व सुधारकांना 'परधार्जिणे' असेंच ठरवितात.[२] पण जितके हे सुधारकांचे मार्ग परभृत होते तितके चिपळूणकरांना प्रिय असलेले राष्ट्राभिमानाचे वा स्वसंस्कृति–अभिमानाचे विचार हेहि परभृतच होते. भारतीयांचें ब्रिटिशपूर्व कालात आपल्या धर्मावर प्रेम असलें तरी राष्ट्रीय संस्कृतीच्या कल्पनेचा विचार हा निश्चितपणें इंग्रजी शिक्षणाचाच परिणाम आहे. विशेषतः चिपळूणकरांच्या विचारांत जो एकप्रकारचा उत्थापनवाद (रिव्हायव्हॅलिझम्) तो निश्चितपणें परविचाराचा परिणाम होता असें म्हणतां येतें. तथापि रिनेसन्स वा संस्कृति-प्रेमावर आधारलेला उत्थापनवाद हा स्वकीय का परकीय हा महत्वाचा मुद्दा नाही. त्याचीं प्रमुख लक्षणें विचारांत घेतलीं तर त्याचें युरोपीयन पुनरुज्जीवनाच्या चळवळीशीं, विचारार्शी असलेलें साम्य स्पष्ट होतें. स्वतःच्या संस्कृतीचा (समाजरचना, धर्म, तत्त्वज्ञान, इ. चा) अतीव अभिमान व नवकालांत तिचीच निर्मिति आम्हांस परत करावयाची आहे हा विचार; राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा स्वीकार, पूर्वकालीन विद्येबद्दल आदराची भावना, व राष्ट्रीय भाषेचें प्रेम, हीं पुनरुज्जीवनवादी विचारार्ची प्रमुख लक्षणें होत. व त्यांचें अस्तित्व आपणांस चिपळूणकरांच्या विचारांत प्रतीत होतें.

या लक्षणांबरोबरच भेदक अशी चिकित्सावृत्ति, त्या दृष्टीतून सर्व जीवनाचें परिशीलन करण्याची प्रवृत्ति, व्यापक अशी मानवी सहानुभूति (ह्यूमॅनिझम्) व विचारांत आचारांत एकप्रकारची धर्मभेदातीत वृत्ति

१ निबंधमाला
२ चिपळूणकर: द्विविधदर्शन: भाग १.

(सिक्यूलॅरिझम्) (की जिच्यावर नवें राष्ट्रीयत्व आधारलेलें असतें,–) पूर्व संस्कृतींतील घृणास्पद गोष्टींबद्दल तिरस्कार हीहि पण रिनेसान्स व पुनरुज्जीवनाच्या चळवळींचीं लक्षणें होत. त्यांचा प्रत्यय आपणांस प्रामुख्याने आगरकरांच्या लेखनांत येतो.

ह्या विचाराच्या आधारेंच स्त्रीजीवनाकडे लक्ष जाणें शक्य आहे. विशेषतः पुनरुज्जीवनाच्या कल्पनेंत जो मानवतावाद आहे तोच स्त्रीजीवनाकडे सहानुभूतीने पाहावयास लावणारा विचार आहे. तथापि आपल्या देशांतील परिस्थितीमुळे ह्या मानवतावादी विचारास उठाव मिळाला नाही. परकीय सत्तेच्या स्तित्वाच्या योगाने व तिच्या अधिकाधिक आक्रमक धोरणामुळे आमच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळींतला चिकित्सावाद व मानवतावाद हा लोप पावला व ब्रिटिशांना कडवा विरोध करणारा राष्ट्रीयवादी विचार तेवढा वाढला. त्या योगे पुनरुज्जीवनाच्या चळवळीने अर्धेंच काम येथे केलें व अर्धें काम तसेंच राहिलें. सर्व ब्रि. राजवटीच्या कालखंडांत अशी स्थिति होती. १८८० ते १९२० ह्या कालांत अत्यंत प्रबल विचार म्हणजे राष्ट्रवादी विचार हाच होता. तोच समाजांत मान्यता पावला होता व त्याच्या अनुषंगाने सामाजिक विचारास 'भूमिगत' व्हावें लागलें. म्हणजे या कालखंडांत मराठींत जें विचारप्रधान वाङ्मय निर्माण झालें तें प्रामुख्याने राष्ट्रीय, संस्कृतिवादी, परंपरा इ.चा विचार करणारें होतें.[1] तर ललित साहित्यांत त्याला महत्त्वाचें स्थान नव्हतें. त्यांत प्रामुख्याने सामाजिक विचारांचा अंमल झालेला आहे. १९२० नंतर गांधीजींच्या कर्तृत्वाच्या आधारें सामाजिक जीवनाकडे जरी लक्ष दिलें गेलें तरी हा पुनरुज्जीवनाचा विचार मागें पडला नाहीं. 'रामराज्याच्या कल्पनेच्या आधारें याच विचाराचा प्रामुख्याने पुरस्कार झालेला आहे. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, राष्ट्रनिष्ठा हें नवें मूल्य पुनरुज्जीवनाच्या चळवळीने निर्माण केलें व पूर्वकालांत रूढ असलेला धर्म, देव, भक्ति, इ. मूल्याचा समावेश त्यांतच झाला.

यूरपमध्ये पुनरुज्जीवनाच्या चळवळीबरोबर धर्मसुधारणेची (रेफ-

१. राजवाडे, चिं. वि. वैद्य, म. शि. गोळे, इ. लेखकांचे विचार हें उदाहरणादाखल देतां येतील.

मेंशन) थोड्या अंतराने सुरू झाली आहे. तिकडे पुनरूज्जीवनाची चळवळ प्रथम झाली तिने राष्ट्रीय संस्कृतीची जाणीव निर्माण केली व नंतर त्याच चळवळींतील मानवतावादाचा आधार घेऊन धर्मसुधारणेची चळवळ झाली. आपल्याकडे ही प्रक्रिया थोडी उलटी झाली आहे. व ह्याचें कारण परकीय राजसत्तचा प्रादुर्भाव हेंच असावें. ब्रिटिशांनी अमानुष चालींना कायद्याने बंदी केली व एकंदर मानवी सहानुभूतीचें वातावरण निर्माण केलें त्याचा परिणाम सुशिक्षितांच्या मनांवर होऊन ते धर्मसुधारणेचा विचार करूं लागले. त्याप्रमाणे प्रार्थनासमाज, आर्यसमाज, ब्रह्मोसमाज इ. पंथ अस्तित्वांत येऊं लागले, पण युरोपांत धर्मसुधारणेच्या चळवळीमागे राष्ट्रीय उत्थापनाची भावना होती तशी येथे नव्हती. त्यामुळे ह्या विविध प्रयत्नांना यावें तसें यश आलें नाही. राष्ट्रीय अभिमानाचा विचार हाच प्रेरक ठरला. आणि त्याचेंच आकर्षण मध्यमवर्गाला विशेष वाटलें. असें असलें तरी ऐतिहासिक दृष्टीने विचार करतांना ह्या प्रयत्नांचें महत्त्व कमी गणणें चूक होईल. कारण स्वदेशाच्या उद्धाराची तळमळ जितकी पुनरुज्जीवनवादी लोकांची तीव्र होती तितकी ह्याहि पण लोकांची होती. व प्राचीन भारतीय संस्कृतीच्या परंपरेचा अभिमान जितका इतरांना होता तितकाच ह्याहि पण लोकाना होता. विरोध जर कोठे असेल तर तो उत्थापनाच्या कल्पनेला. पुनरुज्जीवनाच्या चळवळीचे पुरस्कर्ते जसे चिपळूणकर तसे ह्या चळवळीचे पुरस्कर्ते न्या. मू. रानडे होते. त्यांनी एका व्याख्यानांत तर पुनरुज्जीवनाच्या कल्पनेचा उपहास केला आहे. ते म्हणतात—"पुनरुज्जीवन कशाचें करणार? सतीच्या चालीचें करणार? कां बालहत्येचें करणार, का बहुपत्नीकत्व अथवा बहुपतित्वाचें करणार? पूर्वी अभक्ष भक्षणाचा प्रचार होता त्याचें करणार; लग्नाच्या आसुर पैशाचादि प्रकारांचें करणार का नियोग पद्धतीचें करणार, कित्येक प्राचीन ऋषींनी बायकांच्या बाबतींत जे स्वेच्छाचार केले त्याचें का पुनरुज्जीवन करणार?"[1] ह्याचा अर्थच असा की समाजांत एक प्रकारचें नवें आंदोलन सुरू झालें होतें. निरनिराळे विचार प्रसृत होऊन त्यांच्या एकप्रकारच्या सांचेबंद प्रणाली निर्माण होण्याचें काम सुरू होतें. त्यांच्या संघर्षांतून नवीं मूल्यें निर्माण होत होतीं.

१ फाटक : रानडे चरित्र पृ. ५३२.

स्त्रीजीवनविषयक परिणामाच्या दृष्टीने ह्या विचारधारेकडे पाहिलें तर निराळेच निष्कर्ष हातीं येतात. या विचारधारेची स्त्रीजीवनाकडे अत्यंत सहानुभूतीने पाहण्याची प्रवृत्ति होती. तथापि त्या प्रवृत्तीमागे जो एक-प्रकारचा अभिनिवेश हवा तो ह्या विचारसरणींतच नव्हता. पुनर्विवाहाला आपली वैचारिक संमति असतांहि न्या. मू. रानड्यांकडून प्रत्यक्ष समय येतांच तसें वर्तन झालें नाही, ह्याचें कारण त्यांची विशिष्ट ध्येयात्मक भूमिका हीच आहे. युरोपीय धर्मसुधारकांना पुनरुज्जीवनाच्या विचारांनी अभिनिवेश दिला होता. तसा येथे ह्या विचारसरणीमागे नव्हता. व तसा असावयास नको अशी काळजी न्या. मू. रानड्यांनी घेतली होती. तसेंच आपल्याकडील संतांचें समाजाला न दुखावण्याचें धोरण त्यांना स्वीकार्य वाटलें व म्हणूनच अशा कांही विसंगत गोष्टी त्यांच्या जीवनांत दिसून येतात. चहाग्रामण्य प्रकरणांत न्या. मू नी प्रायश्चित्त घेतलें, गोविंदराव कानिटकरांनाहि घ्यायला सांगितलें.[1] याचें कारण तरी हेंच. रानड्यांना आधुनिक राष्ट्रवादाचे जनक म्हटलें जातें, पण तें अत्यंत व्यापक अर्थाने खरें आहे. त्यांना आपल्या देशाची सुधारणा कशी होईल ह्या गोष्टीची विवंचना लागली होती, आपल्या राष्ट्राचा उद्धार कसा होईल ही गोष्ट तितकी तीव्रतेने प्रतीत झाली नव्हती.

अशा प्रकारें पुनरुज्जीवनवादी व सुधारणावादी अशा दोन परस्पर विरोधी विचारप्रणाली ह्या कालखंडांत प्रचलित होत्या. प्रत्येक विचारसरणीचे धुरंधर पुरस्कर्ते ह्या कालखंडांत कार्य करीत होते. तथापि ह्या दोहोशी संबंधित असणारी पण ह्या दोन्हीपेक्षा कित्येक बाबतींत वेगळी असणारी एक विचारसरणी ह्या कालांत निर्माण झाली व ती म्हणजे आगरकरांची विचारसरणी होय. दुर्दैवाने महाराष्ट्रांत समाजवादी विचाराचा उदय होईपर्यंत आगरकरांच्या विचारसरणीचा साक्षेपाने पुरस्कार करणारा लेखक निघाला नाही. परंतु आगरकरांचे एकट्याचें मोठेंपण इतकें प्रभावी होतें की त्यांच्या विचारांच्या सावलींत महाराष्ट्राचें ललित व ललितेतर वाङ्मय १९३५ पर्यंत निर्वेधपणें चाललें होतें. आगरकरांच्या लेखनांत पुनरुज्जीवनाचा अभिनिवेश आहेच. शिवाय आधुनिक बुद्धिवादाचे तेच प्रणेते

१ केळकर: टिळक चरित्र-- वेणुबाई पानसे--आपटे चरित्र.

आहेत. त्यांची ही जी मजल गेली आहे, त्याबाबतींत मात्र त्यांची बरोबरी करायला इतर कोणीहि लेखक झाला नाही.

धर्मसुधारणेची युरोपमध्ये जी चळवळ झाली त्याच चळवळीशी आपल्या इतिहासांतील भक्तिसंप्रदायी चळवळीचें साम्य आहे. त्या चळवळीने शिवाजी महाराजांच्या राजकीय कार्याची पार्श्वभूमि तयार केली असे विचार न्या. मू रानड्यांचे आहेत. अर्थात् मध्ययुगीन संतांनी केलेलेंच कार्य करण्यासाठी प्रार्थना समाजाची आवश्यकता त्यांनी प्रतिपादिली आहे. आर्यसमाज, ब्राह्मसमाज व प्रार्थनासमाज हे प्रयत्न धर्मसुधारणेचे यत्न होत असें सामान्यतः समजलें जातें. पण न्या. मू. रानड्यांची जी भूमिका आहे तींत व आर्यसमाज, ब्राह्मसमाजाच्या पायाभूत भूमिकेंत फरक आहे. भारतीय संस्कृतीचें श्रेष्ठत्व, वेदान्तविचाराचें माहात्म्य, वर्णाश्रमधर्माच्या कल्पनेंतील समाजधारणेस उपयुक्त असणारीं अंगें, यांना प्राधान्य या गोष्टी आर्यसमाज व ब्राह्मसमाज ह्यांना मान्य होत्या. रामकृष्ण मिशनच्याद्वारें तर ह्या प्रयत्नांना एक प्रकारच्या पुनरुज्जीवनाच्या विचाराचेंहि अधिष्ठान होतें. पण रानड्यांना ही गोष्ट संमत नव्हती. प्रार्थनासमाज व ब्राह्मोसमाज यांचें एकत्रीकरण करावें अशी एक कल्पना १८८० च्या सुमारास निघाली होती. पण माधवराव रानड्यांनीच ती हाणून पाडली.[1] याचें कारण मूलभूत भूमिकेंतील फरक हाच होय. त्यांचा प्रार्थनासमाजाचें नांव बदलण्यालाहि विरोध होता. सारांश युरोपांत धर्मसुधारणेची चळवळ झाली तशा प्रकारची चळवळ इकडे झाली पाहिजे व तें कार्य आपल्या परीने प्रार्थना समाजाने करावें अशी विशुद्ध धर्म सुधारणेची भूमिका न्या. मू. रानड्यांची आहे पुनरुज्जीवनाच्या विचारांना विरोध करणारा असा हा विचारप्रवाह आहे. तो १८८० ते १९२० ह्या कालखंडांत जिवंत असणारा एक विचार प्रवाह आहे. ह्या विचाराचे पुरस्कर्ते तेलंग, भांडारकर हेच निघाले. नामदार गोखले हे ह्याच सुधारणावादी परंपरेंतले असें म्हटलें जातें. पण त्यांची भूमिका समाजसुधारकाची नव्हती. इंग्लंडमधील प्रागतिक पक्षाचा आदर्श त्यांच्या पुढे होता. त्या विचारास न्या. मू रानडे हे सर्वांत जवळचे होत. राजकीय क्षेत्रांत न्या. मू. रानड्यांनी प्रागतिक पक्षाचा आदर्श ठेवला तर

१ फाटक : न्या. मू. रानडे चरित्र.

सामाजिक बाबतींत धर्मसुधारकांचा आदर्श ठेवला. तथापि पुनरुज्जीवनाचा विचार अधिक आकर्षक नि प्रभावी होता. व त्याच्यापुढे ह्या विचाराला पाहिजे तितका उठाव मिळाला नाही. असें असलें तरी ह्या कालांत हा एक प्रभावी विचार होता हें विसरून चालणार नाही.

पुनरुज्जीवनाच्या चळवळीने युरोपांत राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उदय झाला. धर्मसुधारणेच्या चळवळीने त्यानंतर समाजांत क्रांति घडवून आण-ण्याचा यत्न केला. आणि त्यानंतर युरोपांत विवेकवादाचे युग (एज् ऑफ् रीजन्) आलें. समाजशास्त्रीय व राज्यशास्त्रीय विचार वाढीला लागले; दलित वर्गाच्या जागृतीची नवप्रभात झाली व १७८९त फ्रेंच राज्यक्रांतीने एक नवाच कालखंड जगाच्या इतिहासांत निर्माण केला. धर्मसुधारणेच्या व राष्ट्रीयत्वाच्या विचाराच्या अनुषंगाने व्यक्तित्वाची बूज राखली जाऊं लागली. पण व्यक्तीला अद्याप सामाजिक हक्क प्राप्त झाले नव्हते. ते हक्क मिळवून देण्याचें कार्य फ्रेंच राज्यक्रांतीने केलें आहे. तिने व्यक्तित्व हें नवें मूल्य जागतिक संस्कृतिसाधनेस दिलें. व त्याचा परिणाम नंतरच्या कालांत विचारक्षेत्रावर फार झाला आहे. ब्रिटिश लोक ज्यावेळीं येथे राज्यकर्ते झाले त्यावेळीं त्यांचा देश ह्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या लाटांच्या मारांतून राजकीय-दृष्ट्या वाचला होता, पण इंग्रजी विचारवंतांनी ह्या विचारमंथनांतून निघा-लेलें अमृततत्त्व स्वीकृत केलें. केवळ पुनरुज्जीवनाच्या विचारांशी चिपळूण-कर, टिळक थांबले; केवळ धर्मसुधारणेपाशी वा समाजसुधारणेपाशी न्या. मू. रानडे थांबले; आगरकर मात्र पुढे गेले व आधुनिक युरोपीय संस्कृतीचें आद्य मूल्य जें व्यक्तित्व त्याचें दर्शन घेऊन आपल्या समाजापुढें स्वीकारा-साठी त्यांनीं तें अत्यंत अभिनिवेशानें ठेवलें. त्यांच्या ह्या ध्येयात्मक वेगळे-पणानें ते खेर द्रष्टे होऊं शकले, व ह्या ठिकाणच्या विवेचनाच्या आधारें म्हणायचें झालें तर स्त्रियांचे कट्टे उद्धारक होऊं शकले. इतर कोणी विचार-वंत त्या टप्प्याप्रत येऊं शकत नाही.

तसें म्हटलें तर फ्रेंच राज्यक्रांतीची आठवण लोकहितवादींनाहि झालेली होती. आणि टिळक चिपळूणकरांपासूनहि ती कोणी कांही लपवून ठेविली नव्हती. पण त्या राज्यक्रांतीचें वैचारिक कार्य काय हें त्यांना समजून घ्यावेसें वाटलें नाही. टिळकांनी समजून घेण्याचा यत्न केला पण त्यांचा ह्या क्रांतीने

आणलेल्या गोष्टींना मूळांतच विरोध होता. हिंदुसमाजास संमत असलेली 'वर्णव्यवस्था' मोडून सर्व समाज पाश्चिमात्य समाजाप्रमाणे कराराच्या पायावर उभारला जाईल. ही स्थिति सर्वांशी इष्ट आहे की नाही ह्याबद्दल बोल्शव्हिकांच्या उदयामुळे आतां थोडी शंका येऊं लागली आहे.[१] ह्या उल्लेखावरून 'व्यक्ति स्वातंत्र्यावर समाज गेला तरी पुढे बोल्शेव्हिझम होतो तेव्हा तें इष्ट आहे की नाही याबद्दल शंकाच आहे' असें त्यांचें मत आहे. यावरून टिळकांचा व्यक्तिवादाला मूळांतच विरोध होता हें स्पष्ट आहे. त्या उलट आगरकरांच्या विचारांत पुनरुज्जीवनाचा (Renascence) साक्षेपी आविष्कार आहे. 'मूळप्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सोडतां[२] या पश्चिमात्य... कल्पनांचा योग्य रीतीने आम्ही अंगीकार करीत गेलों-तरच आमचा निभाव लागणार आहे. "या विधानांतील" भारतीय आर्यत्व इ. उल्लेखांतून जो आशय व्यक्त होतो तो भूतकालीन भारतीय सांस्कृतिक प्रगतिबद्दल आदर दर्शविणारा आहे. परंतु विशुद्ध पुनरुज्जीवन-वादी विचारास (Revivalism) कट्टा विरोध आहे. व्यक्तिवादाचा हिरी-रीने पुरस्कार आगरकराव्यतिरिक्त इतरांनी कोणीच केला नाही. विशेष म्हणजे ह्या व्यक्तित्वाचें अत्यंत तर्कशुद्ध आविष्करण आगरकरांनी केलें व तेंहि अत्यंत तडफेने. 'सर्व मानवप्राणी जन्मतः सारख्या योग्यतेचे असून त्यांचे हक्कहि एकसारखे असतात; व ती योग्यता व ते हक्क त्यांच्याकडे राहणें हें केवळ कमी अधिक बुद्धिविकासावर व उद्योगशीलतेवर अवलंबून आहे. या श्रेष्ठ तत्त्वाची या जगांत प्रस्थापना करण्याच्या कार्यी सर्वकालीन व सर्वदेशीय सुधारकांनी आजपर्यंत अनेक दिशांनी प्रयत्न केले आहेत, व त्या प्रयत्नांस उत्तरोत्तर सिद्धीहि मिळत चालली आहे... सुधारणेची विजयपताका अव्याहत फडकत राहण्यास या निर्दिष्ट केलेल्या श्रेष्ठनीति-प्रणित तत्त्वाचेंच साम्राज्य झालें पाहिजे.[३] व्यक्तिवादावर आधारलेल्या आदर्श समाजाचें चित्र त्यांनी एका ठिकाणीं सहजगत्या रंगविलेलें आहे. ते म्हणतात—" हिंदुस्थानांतील एकूण एक प्रौढ स्त्रीपुरुषांस लिहितां

१. लो. हि. के. ले. भा. ३. पृ. ४५३–५८.
२. आगरकर नि. संग्रह लेख. पृ. ६ ते ९.
३. कित्ता ३, १८०.

वाचतां आलें पाहिजे; तसेंच प्रत्येक व्यक्तीला चरितार्थ चालविण्यासारखा एखादा तरी धंदा येत असला पाहिजे. सारांश, वयांत आलेल्या कोणत्याहि व्यक्तीस आपल्या उदरनिर्वाहासाठी दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची पाळी येऊं नये. इतकेंच नाही तर सहजगत्या उदर पोषण करतां येऊन दिवसाचा कांहीं काल आत्मचिंतनाकडे, आवडत्या शास्त्राच्या अभ्यासाकडे किंवा विश्रांतीकडे लावता आला पाहिजे "[१] हें स्वप्न इतक्या दूरच्या काळचें होतें की त्याची कल्पना त्यावेळीं कोणासच येणें शक्य नव्हतें व हें ओळखूनच तावडतोब ते म्हणतात " या सर्व गोष्टी घडून येण्यास किती शतकें लागतील तें सांगतां येत नाही. "[१]

आगरकरांच्या ठायीं असणाऱ्या ह्या व्यक्तिवादावरच्या विश्वासामुळेच ते भारतांतील स्त्रीजातीचे पहिले उद्धारकर्ते झाले आहेत. व्यक्ति म्हणून स्त्रियांना पुरुषांबरोबरचे अधिकार हवेत हें त्यांचें म्हणणें सर्वविश्रुत आहे. त्यांनीं तें अनेक ठिकाणीं मांडलें आहे. रानडे व लोकहितवादी ह्यांची दृष्टि स्त्रियांकडे सहानुभूतीनें पाहण्याची होती. तिच्यांत भूतदयेचा भाग बराच होता. स्त्रीदास्याची जाणीव त्यांना तीव्र नव्हती. किंबहुना तशी ती व्हावी असा योग आला नव्हता, अथवा त्यांना इतर अनेक गोष्टींत लक्ष घालायचें होतें, व ह्या बाबीकडे ह्यापेक्षां अधिक लक्ष घालतां आलें नाहीं असें म्हणतां येईल.

१८८० नंतर महाराष्ट्रांत ज्या दोन तीन परंपरा निर्माण झाल्या त्यांचें हें दिग्दर्शन येथे केलें. स्त्रीजीवनाच्या ध्येयांत, निष्ठेंत आमूलाग्र फरक घडवून आणणाऱ्या ह्या चळवळी आहेत व म्हणून त्यांचें विवेचन करावेसें वाटलें. जेव्हा सर्व समाजाच्या जीवनांत फरक होतो तेव्हां स्त्रीजीवनांतहि होतो, तथापि हा दृष्टिकोण आपल्याकडे (वा इतरत्रहि) फारसा कोणी स्वीकारलेला नाही. स्त्री व पुरुष ह्यांच्या जीवनाकडे पाहण्याचा सर्वसामान्य लोकांचा समज असा आहे.:— " Man it appears, is concerned with the world he inhabits, its geological structure, with his own existence and with his study of these affairs. His problem is his relationship to the Universe..... The historians of woman take it for granted that she is primarily concerned,

१ आगरकर नि. संग्रह भा. १ पृ. १७९ ते ८०

not with geography; but with biology, not with philosophy, but with personal morality and ideal character. Man's problem is his relationship to the Universe, woman's they suggest, her relationship with man... 'He for God; she for God in him.'[1] हा दृष्टिकोन लेखकास मूलतः अमान्य आहे. ब्रि. राजवटींत जे सर्व प्रकारचे फरक झाले, चळवळी झाल्या...ते फरक, त्या चळवळी राजकीय, सामाजिक, ..कोणत्याहि स्वरूपाच्या असोत त्यांचे परिणाम केवळ पुरुषांवर झालेत असें नव्हे, तर स्त्रियांवरहि झाले आहेत. देशांत चालूं असलेले ध्येयविषयक मंथन हें केवळ पुरुषांसाठी होतें असें नव्हे तर स्त्रियांसाठीहि होतें, व म्हणूनच ह्या विवेचनांत ह्या बाह्यतः वैचारिक व रूढ समजुतीप्रमाणें स्त्रीजीवनाशी संबंधित नसलेल्या वा केवळ दूरान्वयाने संबंधित असलेल्या प्रमुख विचारधारांचा उल्लेख केला. महाराष्ट्रांत स्त्रीजीवनावर ह्या तीन विचारधारांचा परिणाम झालेला आहे. स्त्रियांचे प्रश्न जेव्हां समाजापुढे विचारासाठीं आले तेव्हा ह्या विचारप्रणालींच्या अनुषंगाने पक्षोपपक्ष झाले.

सामाजिक ध्येयात्मक दृष्टीने पाहिलें असतांहि ह्या तीन विचारधारांत महत्त्वाचे फरक आहेत. न्या. मू. रानडे हे भारतीय राष्ट्रवादाचे पहिले जनक खरे, पण त्यांची उडी केवळ सुराज्यापर्यंतच गेली. "ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हिंदी लोकांना समानतेने वागवावें आणि हिंदी लोकांनी ब्रि. साम्राज्याशी एकनिष्ठ राहावें असें त्यांचें राजकीय तत्त्वज्ञान होतें. मनुष्य-मनुष्यांतील सर्व व्यवहारांत न्याय प्रस्थापित व्हावा आणि वंशभेद किंवा श्रद्धाभेद (धर्मभेद) लक्षांत न घेतां सर्वांना समान दर्जा प्राप्त व्हावा, ह्या तत्त्वासच ते प्रागतिक तत्त्व (Spirit of liberalism) असें मानतात"[2] ह्या तत्त्वानुसार "आपणांस ब्रि. जनांप्रमाणे, प्रातिनिधिक राज्यपद्धतीहि प्राप्त झाली पाहिजे आणि हिंदुस्थानला ब्रि. छत्राखाली मांडलिकी स्वराज्य मिळालें पाहिजे असें न्यायमूर्तींचें अंतिम राजकीय ध्येय होतें"[3] हिंदुस्थानांत ब्रि. अंमलांत जी प्रागतिक विचारसरणी होती तिचें अंतिम ध्येय

1. Women & Changing Civilization: W. Holtby, p.4.
२ आ. भारत पृ. १८३.
३ कित्ता १८४.

ह्याच विचारांशी सुसंगत होतें. ह्यावरून रानड्यांच्या सुधारणावादी विचारांची अंतिम मर्यादा काय होती ह्याची कल्पना येते.

उलटपक्षी टिळक चिपळूणकर आगरकर ह्यांपैकी एकासहि "हें मांडलिकी स्वराज्याचें अंतिम ध्येय उत्साहवर्धक वाटत नव्हतें. तत्कालीन कार्याच्या दृष्टीने तें पुरेसें वाटलें तरी अंतिमदृष्ट्या ह्या कोणासहि तें मान्य नव्हतें"[१] चिपळूणकरांवर आगरकरांनी १८८२ त मृत्युलेख लिहिला त्यांत ते म्हणतात "एकाद्या वेळेस त्यांचा कल्पनाविहंग पूर्ण पंख पसरून भराऱ्या मारूं लागला म्हणजे त्याला हिंदुस्थानदेश स्वतंत्र होऊन प्रजासत्ताक राज्याखाली सुखाने नांदत आहे असें दिसे"[२] ह्यावरून आगरकर व चिपळूणकर ह्या दोघांची ध्येयाविषयी काय कल्पना होती हें व्यक्त होतें. न्या. मू. रानड्यांना हिंदी लोक व इंग्रज यांचें सख्य घडवून आणता येईल असें वाटत होतें. आगरकरांच्या केसरीला ही गोष्ट भ्रामक वाटत होती. 'युरोपियन व नेटिव्ह यांचें परम सख्य कधीहि बनायचें नाही.' असा त्यांचा ठाम विश्वास होता. एवढेंच नव्हे तर, "राज्यशास्त्राप्रमाणे व ऐतिहासिक अनुभवाप्रमाणे हिंदुस्थानच्या लोकांची अक्कल आणि ताकद दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत जाऊन, इंग्रजांची व त्यांची अधिकाधिक फाटाफूट होत जाऊन शेवटीं घरची मंडळी आगांतुकांना धुडकावून लावणार"[३] असें भविष्य आगरकरांनी १८८० सुमारास वर्तविलें आहे. न्या. मू. रानडे इंग्रजी राज्याकडे परमेश्वरी प्रसादाच्या दृष्टींतून पाहात होते. व त्या दृष्टिकोणावरच त्यांचें स्वराज्याचें ध्येय आधारलेलें होतें. उलटपक्षी वरील उताऱ्यांत इतिहास व राज्यशास्त्र यांचा उल्लेख आहे त्यावरून असें स्पष्ट होतें की, "इतिहास व राज्यशास्त्र यांच्याकडे परमेश्वरी प्रसादाच्या भाविक चष्म्यांतून बघण्याचें युग संपलें असून तिकडे शुद्ध भौतिक व बौद्धिक दृष्टीने बघण्याचें युग आता महाराष्ट्रांत सुरू झालें असल्याचें...लक्षांत येईल"[४].

अशा प्रकारें पुनरुज्जीवनवादी लोकांचें ध्येय व सुधारणावादी लोकांचें

---

१ कित्ता पृ. १८४.

२ के. नि. निबंध १.

३ के. नि. नि. पृ. १५८–६०

४ आधु. भारत पृ. २१३.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्र
अनुक्रम ..... वि: .....
क्रमांक ..... नों: दि: .....

अंतिम ध्येय यांत तत्त्वतः फरक होता. ही गोष्ट त्या त्या विचारसरणीमागे जी सामाजिक प्रतिक्रिया झाली त्या दृष्टीने महत्त्वाची आहे. टिळक व आगरकर यांच्या ध्येयांत प्रारंभी साम्य होतें असें केसरीतील लेखांवरून स्पष्ट होतें. परंतु आगरकर व टिळक यांचे विचार पाहिले व राष्ट्राच्या ध्येया-विषयीचा त्यांचा दृष्टिकोण पाहिला तर त्यांतहि फरक आहे असें मान्य करावें लागेल. आगरकरांचे विचार व्यक्तिवादावर आधारलेले होते. व त्या आधा-रावरच त्यांनी वर उधृत केलेलें समाजाचें आदर्श चित्र पुढे ठेविलें. आगर-करांना जसें कित्येक शतकें तें अस्तित्वांत येईल की नाही असें वाटलें, तसें आज आगरकरांनंतर ५०।६० वर्षांनी आपणांस वाटतें. आगरकरांच्या व्यक्तिवादी विचारसरणीला टिळकांचा विरोध होता. "प्राच्य व पाश्चात्य, अध्यात्मिक व अधिभौतिक अथवा वर्णव्यवस्थांकित व यदृच्छाचारप्रवर्तक अशा नव्या जुन्या सुधारणांचा संयोग झाल्यानें जुन्या समाजरचनेच्या तत्त्वांत कांहीतरी फेरफार झाला पाहिजे व होईल, हें म्हणणें कोणासहि मान्य करावें लागेल...वाद काय तो एवढाच आहे की, वर ज्या दोन तऱ्हेच्या सुधारणा सांगितल्या, त्यांपैकीं एकीचा लोप करून दुसरी स्थापन करा-वयाची का जुन्या संस्थेंतच योग्य असें फेरफार करून तिचें पुनरुज्जीवन करावयाचें ?...युरोपांतील समाज रचनेचें तत्त्व आम्ही सर्वांशीं घेऊं म्हटलें तर आमच्या प्रयत्नांस यश येण्याची फारशी आशा नको. वर्णव्यवस्थेमुळेच हजारों वर्षें आम्ही आपलेपणा कायम राखून एकसारखे स्वतंत्र नाही तरी जिवंत राहिलों आहों. हा आपलेपणा सोडून द्या म्हणजे आमचेजवळ आहे तें आम्ही गमावून बसूं."[1] ह्या वरून लो. टिळकांच्या विचारांची कक्षा दिसून येते. पुनरुज्जीवनाच्या विचारापाशीच ते थांबलेले दिसतात. लो. टिळकांची राजकीय व्यवहारबुद्धि त्यांना आगरकरांच्या मतांपासून दूर लोटीत होती हेंहि कांही खोटें नाही. आगरकरांचीं मतें इतर सुधारकांहून अधिक तर्कशुद्ध आणि सर्वांगीण क्रांतिवादी आहेत हें त्यांना माहीत होतें[2]

तेव्हा लो. टिळकांना रानड्यांच्या मांडलिकी स्वराज्याचें ध्येय मान्य नव्हतें पण त्यांचें अंतिम ध्येय केवळ 'स्वराज्य' च राहिलें. हें स्वराज्य

१ लो. टि. के. नि. ४. १८८ ते ९०.

२ आधु. भारत. पृ. ३१९.

कशाप्रकारचें, त्यांत पौर्वात्य व पाश्चात्य कोणत्या गोष्टींचा समन्वय वा परित्याग होणार हें टिळकांनी कोठेहि स्पष्ट केलेलें नाही. व्यक्तिस्वातंत्र्याला त्यांचा विरोध होता, त्यावर आधारलेला प्रजासत्ताकाचें ध्येय त्यांच्या कक्षेंत येत असलें तरी त्याचा पुरस्कार त्यांनी केलेला नाही. त्यांना वर्णाश्रमप्रधान धर्माचा अभिमान सुटत नव्हता. ह्यावरून लो. टिळकांनी प्रत्यक्ष राजकीय क्षेत्रांत या देशाची अतुल कामगिरी करून दृष्टींत भरेल इतकी प्रगती केली, तरी सामाजिक ध्येयाबाबत त्यांनी एकप्रकारची संदिग्धताच धारण केली आहे.[1] असें म्हणणें प्राप्त होतें.

आगरकरांच्या विचारांची कक्षा खूपच विस्तृत आहे. 'आगरकरांचा बुद्धिवाद ही भारतीय संस्कृति धनांतली अमोल अशी वस्तु आहे. आगरकरांचा बुद्धिवाद जसा टिळकांना पुढे पटेनासा झाला त्याप्रमाणे रानड्यांना तो प्रथमपासूनच मान्य नव्हता... आगरकरांची स्वतंत्र बुद्धि परंपरा व राजशासन, ह्या दोहोंचेहि प्रसंगीं उल्लंघन करून आपली सत्यनिष्ठा कायम ठेवावी ह्या मताचा पुरस्कार करीत होती. याच त्यांच्या स्वतंत्र बुद्धीमुळे त्यांनी जहाल राजकारण व जहाल समाजकारण, यांची मुहूर्तमेढ महाराष्ट्रांत रोविली आणि आपल्या संस्कृतीच्या गुणानुवादांत तिचे दोष विसरूं नका व जगांतील इतर राष्ट्रांतील यशस्वी सामाजिक व राजकीय तत्त्वांचा आनंदाने स्वीकार करा, असा उपदेश महाराष्ट्रीयांना त्यांनी केला.[2]

" समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास जेवढीं अपरिहार्य बंधनें आहेत तेवढीं कायम ठेवून बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका द्यावयाचा हें अर्वाचीन पाश्चिमात्य समाजाचें आद्य तत्त्व आहे, व हें ज्याच्या अंतःकरणावर बिंबलें असेल त्यांना आमच्या समाजव्यवस्थेंतील अनेक दोषस्थलें दिसणार आहेत, हें उघड आहे. हीं दोषस्थळे वारंवार लोकांच्या नजरेस आणावी, तीं दूर करण्याचें उपाय सुचवालें आणि युरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखे काय काय आहे तें पुनः

१ कित्ता पृ. २८९.
२ आधु. भारत पृ. २६७.

पुनः दाखवावें ह्यासाठीं हें सुधारक पत्र काढलें आहे."[१] आगरकरांच्या मताविषयी आचार्य जावडेकर म्हणतात. 'आपल्या समाजांत मनुष्याला त्याच्या जीवितांतील बहुतेक महत्त्वाच्या बाबतींत स्वातंत्र्य उपभोगतां न येतां दास्य करावें लागतें. त्याचे धार्मिक व सामाजिक आचार हजारो वर्षांच्या परंपरागत रूढींच्या रूपांनी त्याला जडशृंखलांप्रमाणें बांधून टाकितात, स्त्रीपुरुषांचा विवाह बालपणींच होत असल्याने त्या बाबतींतहि त्यांना स्वातंत्र्य उपभोगितां येत नाही, आणि चातुर्वर्ण्य जन्मसिद्ध असलें तर वृत्तीच्या व धंद्याच्या बाबतींतहि त्याला स्वातंत्र्य लाभत नाही. तात्पर्य विचारस्वातंत्र्य, विवाहस्वातंत्र्य, व व्यवसाय–स्वातंत्र्य ह्या बाबतींत हिंदु संस्कृतींतली व्यक्ति सर्व बाजूंनी बांधलेली असते. विचार, विवाह आणि व्यवसाय या बाबतींत व्यक्तीला स्वातंत्र्य असल्याखेरीज व्यक्तीचा विकास होऊन त्याला सुख लागणार नाही हें जितकें खरें आहे तितकेंच त्याखेरीज अशा समाजाची उन्नतीहि होणार नाही व तो समाज प्रगतिपर राहणार नाही असें आगरकरांचें मत होतें. मनुष्यजीवनांतील तीन प्रमुख पुरुषार्थ म्हणजे धर्म, अर्थ व काम हे होत. या बाबतींत ज्या समाजांतील व्यक्ति केवळ परंपरेचा अवलंब करतात तो समाज प्रगतिपर होणें शक्य नाहीं. त्या समाजांतील प्रत्येक व्यक्ति प्रत्येक महत्त्वाच्या बाबतींत आपल्या कर्तृत्वापेक्षां पूर्वीच्या पिढीकडेच पाहणार आणि तिची दृष्टि पुढे न राहतां मागे वळलेली राहणार... [२]

आगरकरांच्या विचारकक्षेचें हें विवेचन पूर्ण कल्पना येण्यासाठीं मुद्दाम विस्तारानें केलें. आगरकर हे बुद्धिप्रामाण्यवादी होते, जहाल समाजसुधारक व जहाल राजकीय–सुधारक (उद्धारक) होते ही गोष्टहि सामान्यतः सर्वमान्य आहे. स्त्रियांच्या सुधारणेबाबत तर आगरकरांइतका प्रभावी पुरस्कर्ता १९ व्या शतकांत झाला नाहीं हें सर्वविश्रुत आहे. तथापि आगरकरांचें तत्कालीन अशा एकंदर विचारप्रणालींत कोणतें स्थान आहे हें स्पष्ट करणें आवश्यक होतें. आगरकरांनी समाजापुढे व्यक्तिस्वातंत्र्याच्या पायावर आधारलेलें प्रजासत्ताकाचें ध्येय ठेविलें. भारतीय समाजास त्या ध्येयाचें

१ आगरकर लेख, भाग १ ला.

२ आधुनिक भारत.

आकलन १९३० पर्यंत झालें नाहीं. सहाजिकपणें ह्या कालांत आगरकरांची विस्मृति झाली आहे. व समाजवादी विचारांचा उद्भव ह्या देशांत होऊं लागल्यानंतर आगरकरांकडे महाराष्ट्राचे लक्ष जाऊं लागलें, तथापि आगरकरांचें खरें मोठेंपण वा त्यांच्या कार्याचें खरें मूल्यमापन अद्यापपावेतों झालें असें म्हणतां येत नाहीं.

१८९० ते १९२० ह्या कालांत जे तीन महापुरुष आपल्या कर्तृत्वाने चमकले त्यांच्या विचारसरणींतील ध्येयात्मक फरक स्पष्ट करणें जरूर होतें. वैचारिकदृष्ट्या हा कालखंड पुनरुज्जीवनवादी विचाराचा होता. (त्याला कारण ब्रिटिशांचें धोरण असेल, पण आमचें परंपरावादीत्व नाहीच असें म्हणतां येणार नाही) त्यामुळे टिळकांच्या विचारसरणीचे दोन पुरस्कर्ते राजवाडे व शि. म. परांजपे ह्या कालांत होऊन गेले. आगरकरांची जहाल विचारधारा सुप्तच होती. तिचा प्रवाह ललित व इतर वाङ्मयांतून अत्यंत सुप्तपणें समाजाच्या खालच्या थराप्रत जात होता. समाजाला जो व्यक्तिवादी घाट जोराने यावयास लागला होता, त्या दृष्टीने आगरकरांचें मोठेंपण समाजाला पटूं लागलें. व्यक्तिवादाच्या पुरस्काराने समाजाचें लक्ष स्त्रियांकडे अधिकाधिक जाऊं लागलें व केवळ भूतदयेच्या दृष्टीने न पाहतां व्यक्ति म्हणून त्यांच्याकडे लक्ष जाऊं लागलें. त्यांच्याहि ठिकाणीं नवी जागृती होऊं लागली आगरकरांनीं पाडलेल्या प्रकाशकिरणांच्या आधारें रूढीच्या अंधारांतून सुधारणेचा आणि व्यक्तित्वाचा मागोवा घेत घेत महाराष्ट्रीय स्त्री १९३५ पर्यंत वाटचाल करीत होती. १९२० पर्यंत ललित व इतर विचारप्रधान साहित्यांतून ती कोठपर्यंत आली तें पाहावयाचें आहे.

ह्या सर्व विवेचनावरून हें स्पष्ट होईल कीं १८८० नंतर महाराष्ट्रांत ध्येयवादाचा जन्म झाला त्या अनुषंगाने तीन विचारसरणी वा तीन ध्येयवादी प्रणाली अस्तित्वांत आल्या. न्या. मू. रानड्यांनी पुरस्कारलेली सुधारणावादाची, चिपळूणकर टिळकांची राष्ट्रीय पुनरुज्जीवनाची व आगरकरांची सर्वांगीण व्यक्तिवादी समाजसुधारकाची विचार करणारे, कर्तृत्व संपादू इच्छिणारे असे जे कोणी ह्या कालांत झाले त्यांना यापैकी एक किंवा दोन ध्येयवादांचा अवलंब करावा लागलेला आहे. कित्येकवेळां ह्या विचारसरणींचा विरोध आला आहे. त्या संघर्षांतून इतिहास विकसित झाला आहे. दुर्दै-

वाने आगरकर लवकरच दिवंगत झाले! त्यांची विचारसरणी लुप्तच झाली. दोन उरलेल्या विचारांचा मात्र संघर्ष आला.

स्त्रीजीवनविषयक प्रगतीच्या दृष्टीने पाहिलें तर असें आढळून येतें कीं, पुनरुज्जीवनवादी विचारसरणी ही स्त्री–जीवनाकडे एकंदरीने सहानुभूतीनें पाहात नाही. टिळकांनी अधिकृतरीतीनें समाजसुधारणेबाबत उदासीन वा तटस्थ वृत्ति धारण केली. पण त्याचा परिणाम सुधारणाविरोधी विचारांना उत्तेजन देण्यांत झाला. समाजसुधारणा ह्याचा अर्थ ह्या कालांत केवळ स्त्रीजीवनविषयक सहानुभूतीचा दृष्टिकोण बाळगणें व त्यानुसार कांही घृणास्पद रूढींचा अधिक्षेप करणें एवढाच होता. जातिभेदाचा प्रश्न समाजसुधारणेंत जमा होत असे. पण ज्योतिराव फुल्यांनी 'सत्यशोधक' समाज काढून त्याला राजकीय स्वरूप दिलें. पण तो प्रश्नहि १९२० नंतरच लोकांपुढें आलेला आहे. ह्यावरून स्त्रीजीवनविषयक कांहीं मामुली गोष्टी करणें म्हणजे समाजसुधारणा करणें असा समाजसुधारणेचा अर्थ झाला होता. तरीहि पण पुनरुज्जीवनवादी विचारवंतांचा त्याहि सुधारणेस पूर्ण विरोध होता. चिपळूणकरांचे तर "आमच्या देशास म्हणण्यासारखें कांहीं एक झालेलें नाहीं"[1] अशा अर्थाचे उद्गार प्रसिद्ध आहेत. शि. म. परांजपे व वि. का. राजवाडे यांनीहि समाजसुधारणेबाबत मधूनमधून अत्यंत अनुदार उद्गार काढले आहेत.[2] ह्याचा अर्थच असा की पुनरुज्जीवनाची चळवळ ही स्त्रियांना पोषक नव्हती. पुरुषाच्या कार्यकक्षा व ध्येयकक्षा ह्या लोकांनीं खूप विस्तृत केल्या. पण इतिहासाकडे बोट दाखवून स्त्रियांच्या परिस्थितीत कांहीहि बदल करण्याची विशेष जरूरी नाही असे विचार त्यांनी व्यक्त केले आहेत.

ह्याचा परिणाम असा झाला कीं स्त्रियांच्या सुधारणाबाबत विविध प्रकारचे यत्न करण्याचें कार्य एकट्या सुधारणवादी लोकांवर येऊन पडलें, आणि तेंहि पुनरुज्जीवनवादी लोकांच्या आक्रमक विरोधाला, उपहासाला तोंड देऊन. आगरकरांच्या उज्ज्वल ध्येयवादाचा व शास्त्रशुद्ध बुद्धिवादाचा स्मृतिमात्र पाठिंबा ह्या स्त्रियांच्या चळवळीला नसता तर आज झाली आहे इतकीहि प्रगति झाली नसती. महाराष्ट्र इतर प्रांतांपैकीं एक

१. चिं. नि. माला : आ. दे. स्थिति.
२. काळांतील लेख खंड. ४.

मागासलेला प्रांत राहाता. परंतु असें झालें नाहीं ह्याचें कारण त्या विचार-सरणीमागे उज्ज्वल ध्येयवाद होता, आणि कालास अनुरूप अशी विचार-सरणी ती होती हें होय.

आणखीहि एक कारण असें आहे कीं, ब्रिटीश सरकारचें धोरण १८९७ पासून अधिकाधिक आक्रमक होत गेलें. तें अगदीं पहिल्या महा-युद्धापर्यंत. दुष्काळ, कर्झनशाही, बंगालफाळणी, क्रांतिकारकांचे विविध यत्न, इ. विविध प्रकारच्या घटनांनी समाजाचें राजकीय वातावरण या सर्व कालखंडांत इतकें तापलेलें होतें कीं त्या क्षेत्रांतच कर्तृत्ववान माणसांचें सारें कर्तृत्व कामास आलें. आपल्या उज्ज्वल ध्येयवादाच्या पाठिंब्यावर पुनरु-ज्जीवनवादी विचारसरणी ब्रिटीश सरकारशी यशस्वीपणें मुकाबला करूं शकली, हें खरें आहे आणि देशाचें राजकीय जीवन जिवंत ठेवण्याचें, ती ज्योत तेवत ठेवण्याचें महत्त्वाचें कार्य त्या विचारसरणीला करावें लागलें व तें तिनें सामान्यतः केलें आहे. तथापि ह्या सर्व घडामोडींचा परिणाम सामाजिक दृष्टीनें व विशेषतः स्त्रियांचे दृष्टीनें अत्यंत प्रतिकूल झाला आहे हेंहि अमान्य करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. राजकीय परिस्थिति कदाचित् निवळली असती तर पुनरुज्जीवनाचा ध्यास घेतलेल्या लोकांना आत्मपरी-क्षण करायला थोडी तरी सवड मिळाली असती असें म्हणतां येतें. पण याहि म्हणण्याला मर्यादित अर्थ आहे. हे लोक पुनरुज्जीवनाच्या विचाराने पुरे भारलें होते असेंच म्हणावें लागतें. कारण टिळकांना तुरुंगवासाच्या निमित्तानें आत्मपरीक्षण करण्यास खूपच अवसर मिळाला होता. परंतु त्यांना व्यक्तिवाद पूर्णपणें वर्ज्य असल्यानें त्यांच्या मनाच्या उर्मी अध्यात्मा-कडे वाहावत गेल्या आणि गीतारहस्यासारखें पुस्तक लिहून ते बाहेर पडले ही सगळी क्रिया स्त्रीजीवनाच्या दृष्टीने फारशी पोषक नव्हती. गंमत अशी कीं व्यक्तिवादाचा मनांतून राग करणाऱ्या लोकमान्य टिळकांना आपल्या जीविताच्या कार्याची ग्वाही व्यक्तिवादाच्याच परिभाषेचा अवलंब करून द्यावी लागली. कारण युगाचा विचारच होता तो. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे.' हें टिळकांचें जीवितकार्यदर्शक वाक्य सुप्रसिद्ध आहे. ह्या वाक्यांत 'जन्मसिद्ध हक्क' हे जे शब्द आहेत त्यांचा अर्थ व्यक्तिवादाच्या आधारेंच लावतां येतो. नाहींतर स्वराज्य हा माझा

अध्यत्ममोक्ष आहे असें त्यांनी म्हणणें योग्य झालें असतें, पण युगाची भाषा व्यक्तिगत हक्काची होती आणि टिळकांचें मोठेंपण हेंच कीं त्यांनी व्यक्तिगत हक्कांच्या कक्षेंत 'स्वराज्य' आणून सोडलें.

रानड्यांनी प्रस्तुत केलेल्या सुधारणावादाच्या आधाराने स्त्रियांनी आपली प्रगति करून घेणें हें क्रमप्राप्त ठरतें व तसेंच झालेलें आहे. रानड्यांचें राजकीय ध्येय जरी पुनरुज्जीवनवाद्यांच्या अलीकडचें असेल तरी त्यांच्या विचारांत भूतदयेचा, सन्मवयाचा स्पर्श होता. तो एकंदरीने सामाजिक–विशेषत: तत्कालीन स्त्रीविषयक सुधारणेला परिपोषकच झाला आहे असें म्हणतां येईल.

स्त्रियांच्या शिक्षणाबाबतही त्यानाच पुढाकार घ्यावा लागला व पुण्यांतलें पहिलें प्रसिद्ध 'हुजूरपागा' मुलींचें विद्यालय त्यांच्या प्रयत्नाने अस्तित्वांत आलें. टिळकांचा तत्त्वत: स्त्रीशिक्षणाला विरोध नव्हता तथापि पांडिता रमाबाईवर लेख लिहितांना पर्यायाने टिळकांनीं स्त्रीशिक्षणाचा उपहास केलेला आहे. टिळकांचे स्वत:चे स्त्रीजीवनविषयक विचार आगरकराहून फारसे विरोधी नव्हते. परंतु त्यांच्या राजकीय धोरणाच्या अनुषंगाने समाजांत ज्या दोन परस्परविरुद्ध विचारसरणी निर्माण झाल्या त्यांत केसरीने समाजसुधारणाविरोधी विचारसरणीच्या गटाला पाठिंबा दिला. अर्थात् ह्या वस्तुस्थितिमुळे टिळकांचीं व्यक्तिगत मतें सुधारलेली होतीं ह्या गोष्टीला कांहींच महत्त्व राहात नाहीं. राजकीय जागृतीचें शिक्षण देत असताना समाजसुधारणेकडे म्हणजे प्रामुख्याने स्त्रीजीवनविषयक सुधारणांकडे त्यांना दुर्लक्ष करावें लागलें आहे. 'समाज सुधारणा मुंगीच्या पावलानें होते' ह्या सूत्राचा अवलंब करून त्याबाबत तटस्थ राहावयाचें असें पुनरुज्जीवनवादी लोकाचे धोरण होतें. ह्याचा परिणाम असा झाला कीं, समाजसुधारणेचें हें काम सामान्यत: न्या. मू. रानड्यांच्या विचारसरणीच्या आधाराने झालें आहे 'सेवासदन' सारखी, संस्था वर उल्लेखलेली मुलींची शाळा इ. प्रकारचे प्रयत्न प्रामुख्याने रानड्यांच्या मताभिमानी लोकांनीं कळकळीने केलेले आहेत. त्या दृष्टीने महाराष्ट्रात स्त्रीविषयक सुधारणांचें श्रेय रानडे व आगरकर यांच्या अनुयायांना द्यावें लागेल. १९१६ मध्ये डॉ. धों. के. कर्वे यांनीं स्त्रियांसाठीं नवें विद्यापीठ स्थापन केलें. आधुनिक भारताच्या इतिहासांतील स्त्रीशिक्षणाच्या दृष्टीने ही घटना अत्यंत मह-

त्वाची आहे. ह्या चळवळीचे प्रवर्तक डॉ. अण्णासाहेब कर्वे हे आगरकर–रानडे ह्यांच्या विचारधारेचे पुरस्कर्ते आहेत. ह्यावरून असें स्पष्ट होईल की, पुनरुज्जीवनवादी विचारसरणी स्त्रीजीवनविषयक सुधारणेला पोषक तर नव्हतीच; पण तटस्थतेच्या नांवाखाली विरोध मात्र करीत होती. शिवाजी-उत्सव, गणेशोत्सव या सारखे मोठे राष्ट्रीय स्वरूपाचे उत्सव पुनरुज्जीवनवादी लोकांनीं सुरू केले, वाढविले. ते उत्सव म्हणजे लोकजागृतीचे यत्न होत. तथापि त्या उत्सवांत (विशेषतः गणेशोत्सवांत) परकीय सरकारबरोबर सामाजिक सुधारणावाद्यांच्या प्रयत्नांची टिंगल होत असे. 'लोकजागृतीं'त हा धागा होता हें लक्षांत घेतलें तर तिचें स्वरूप कसें होतें हें स्पष्ट होईल.

या सर्व विवेचनाचा निष्कर्ष असा की, पुनरुज्जीवनवादी विचारधारा ही तात्विक दृष्ट्या समाजसुधारणेला अनुकूल होतीं असें सामान्यतः म्हटलें जात असलें तरी वास्तवांत तटस्थ वा विरोधी होती. स्त्रीजीवनविषयक सांस्कृतिक चळवळींना उत्तेजन देण्याचें धोरण हें वरवर होतें. स्वतः त्या बाबतींत पुनरुज्जीवनवाद्यांना कांही करावेसें वाटलें नाही. याचा अर्थ सांस्कृतिक चळवळी इ. प्रकारचे उपक्रम या विचारधारेकडून झाले नाहीत असें नव्हे. त्या क्षेत्रांतहि हे लोक उतरले पण एकंदरीने या बाबतीत विरोधाचीच भूमिका होती हेंच खरें आहे. रानड्यांनीं काढलेल्या 'फीमेल हायस्कूला'ने मुलींना योग्य शिक्षण दिलें जात नाही अशी तक्रार करणारे व आपल्या मताने गृहशिक्षणास महत्त्व कसें अधिक देणें आवश्यक आहे असें प्रतिपादणारे लेख टिळकांनीं केसरींत लिहिले. उलटपक्षी आगरकरांनी मुलांमुलींना सारखें शिक्षण द्यावें असें प्रतिपादलें. एकंदरीने मतभेदांचें क्षेत्र वाढलें. पण शिक्षणाचे बाबतींत सरकारची वृत्ति तटस्थ होती त्यामुळे आगरकरांच्या विचाराला पोषक अशी पद्धति सामान्यतः अवलंबिली गेली. माध्यमिक शाळांच्या पुढे जाऊन विद्यापीठीय शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला. त्याबाबत कर्व्यांचें नांव चटकन पुढे येतें.

या कालातली मोठी घटना म्हणजे डॉ. अण्णासाहेब कर्वे यांच्या विविध संस्थांची स्थापना व त्यांच्या कार्याची सुरवात होय. यापुढें त्यांच्या सारखा थोर समाजसेवक– केवळ स्त्रियांच्या उन्नतीला वाहून घेणारा समाज सेवक–लाभला आणि महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनांत आशावादाचे एक नवें

पर्व सुरू झालें. डॉ. कर्व्यांच्या विविध प्रयत्नांची खुलासेवार हकिकत येथें देण्याची आवश्यकता आहे असें वाटत नाहीं. स्त्रीजीवनविषयक सुधारणेची दिशा कोणत्या मार्गानें गेली हें दर्शविण्यासाठीं हा एवढा अंगुलीनिर्देश पुरे आहे असें वाटतें.

सामाजिक, राजकीयदृष्टीनें अनेक महत्त्वाचे प्रसंग, घटना ह्या कालांत घडलेल्या आहेत. ब्राह्मण अब्राह्मण चळवळ ही त्यांत प्रमुख आहे. त्या चळवळीच्या ओघालाच स्त्रियांची चळवळ जाऊन मिळते. कारण त्या चळवळीचें स्वरूप पतितोद्धाराच्या चळवळीसारखे आहे व स्त्रियांच्या सुधारणेची दिशाहि तीच आहे. तथापि १९२० पर्यंतच्या कालांत ह्या सर्व चळवळी अलग अलगपणेंच चालू होत्या. त्या चळवळींना एका सामान्य पातळीवर आणण्याचें कार्य १९३३ नंतर फोफावलेल्या समाजवादी विचार-सरणीनें केलें आहे. अर्थात् ती प्रक्रिया या प्रकरणांतील विवेचनाच्या कक्षेच्या बाहेर पडते.

ह्या संबंधांत आणखी एका सामाजिक चळवळीचा उल्लेख करणें आवश्यक आहे. त्या चळवळीचे वा वादाचे परिणाम महाराष्ट्राला दीर्घ-काल भोगावें लागले आहेत. आज त्या वादाचा फोलपणा स्पष्टपणान प्रतीत होतो. तथापि तत्कालीन समाजविचारांची दिशा त्या वादाच्या अनुषंगानें स्पष्ट होते. हा वाद म्हणजे आधी राजकीय सुधारणा का सामाजिक सुधारणा हा वाद होय. आगरकर हे एकच असे विचारवंत दिसतात कीं ज्यांच्या विचारसरणींत दोन्ही सुधारणांचा पुरस्कार झालेला आढळतो परंतु आगरकर हे अल्पायु ठरले ते जगले असते तर त्यांचें धोरण काय राहिलें असतें हें अजमावणें कठीण आहे. पण त्यांच्या अभावी महाराष्ट्रांत परस्परविरोधी पक्ष निर्माण झाले. १९२५–३० पर्यंत वाद तशीच झाली. गमत अशी कीं, दोन्ही प्रकारच्या सुधारणा व्हावयास हव्यात याबद्दल दोन्ही पक्षांचे तात्त्विक ऐक्य होतें. तथापि एक पक्ष मनांतून सुधारणेस विरोधी होता.

ज्या पक्षाने राजकीय सुधारणांचा अवलंब करून सामाजिक अप्रीति टाळली, तो पक्ष सुधारणाविरोधी बनला. दुसऱ्या पक्षास राजकीय हक्कां-बाबत फारसा आग्रह धरतां येत नसे. कारण सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने आपला समाज इतका मागासलेला होता की, अशा मागासलेल्या समाजास

आधुनिक संकेतांनुसार राज्य चालविणेंच झेपलें नसतें, हें त्याला स्पष्ट दिसत होतें. आजचें राज्य कसें आहे, आपणहि तें कसें करणार आहोंत इ. बाबत ह्या पक्षाजवळ कांही निश्चित कल्पना होत्या. किमानपक्षी पाश्चिमात्य जीवनातील चांगल्या गोष्टी भराभर स्वीकारायला त्याचा विरोध नव्हता. अशा परिस्थितींत सुधारणावादी पक्षाने राजकीय सुधारणांपेक्षा सामाजिक जागृतिवर आधारलेल्या सुधारणांची कास धरणें अपरिहार्य होतें. उलटपक्षी राष्ट्रीय म्हणविणारा पक्ष हा आपण कशा प्रकारें राज्य करणार आहोंत, लोकशाही राबवणार आहोंत का नाही, असल्यास कशी, कोठपर्यंत, आपल्या संस्कृतीच्या कोणत्या गोष्टींचा स्वीकार वा परित्याग करणार आहोंत इ. बाबतींत ह्या विचारसरणीच्या पुरस्कर्त्या लोकांनीं मौन धारण केलें व नुसत्या स्वातंत्र्य, स्वराज्य इ. कल्पनांवर भर देऊन आपलें कर्तृत्व उभें केलें. त्यानें सर्वसाधारण समाजाला तत्कालीन समजुतीप्रमाणे जरी बरें वाटलें तरी एकंदरींने त्यांनी समाजाचें नुकसान केलें. व ह्या दृष्टीने आगरकरांनी 'असे लोकाग्रणी लोकांना खड्ड्यांत नेऊन टाकतील' अशा अर्थाचा इशारा दिला तो पूर्णपणाने शहाणपणाचा द्योतक आहे. स्त्रीजीवनावर ह्या संघर्षणाचा परिणाम झाला आहे. त्याचें विवेचन वेगळ्यासंबंधांत पण ह्याच प्रकरणांत येऊन गेलें आहे. तेव्हा त्याची पुनरुक्ति नलगे. 'सामाजिक विरुद्ध राजकीय ह्या दोन पक्षांपैकीं 'सामाजिक' सुधारणांच्या क्षेत्रांत फक्त पुनर्विवाह–बाल विवाहबंदी, स्त्रीशिक्षण इ. गोष्टींचाच समावेश होत होता. स्त्रीजीवनाचा नैतिक कल्पनांशी घनिष्ट संबंध असल्याने ह्या सुधारणांच्या अवलंबनानें रूढ नैतिक कल्पनांना धक्का बसेल असें त्यांना वाटत होतें. सहाजिकपणें सनातनी लोकांना कोणतीच स्थित्यंतरें नको होती. धार्मिक श्रद्धा ढासळेल व रूढ नीतिकल्पनांत बदल होईल अशी त्यांना भीति वाटत होती. दुर्दैवाची गोष्ट अशी की राष्ट्रीय पुढारी म्हणविणाऱ्यांनी त्यांचा पाठपुरावा केला आहे.

इ. स. १८८० ते १९२० ह्या कालखंडांतील प्रमुख विचारसरणींचा परिचय करून घेतल्यानंतर प्रमुख सामाजिक चळवळीचें व त्या अनुषंगानें स्त्रियांच्या सुधारणेचें लोण ह्या कालखंडांत कोठवर पोचलें तें ध्यानांत घेणें आवश्यक आहे. पुनरुज्जीवनवादी विचारसरणी ह्या कालखंडांत एकंदरीनें

अत्यंत प्रभावी अशी विचारसरणी होती. तिच्यापुढे समाजसुधारणेचा व स्त्रीजीवनविषयक सुधारणेचा विचार अगदी फिका पडला हें खरें. पण समाजाच्या अंतरंगांतून सुप्तपणें आगरकरांच्या विचारांचा प्रवाह वाहात होता. त्याचें स्वरूप तितकेसें स्पष्ट नसलें तरी त्याचें अस्तित्व लक्षांत घेणें जरूर आहे.

मागील कालखंडांत इ. १८७० त प्रसिद्ध 'पुनर्विवाह सशास्त्र कीं अशास्त्र' या विषयावर कडाक्यांचा वाद झाला. त्या अनुषंगानें बरीच जागृति झाली. विधवा–विवाह मंडळें स्थापन होऊं लागलीं. वादविवादांत जरी प्रत्यक्षपणें पुनर्विवाहाच्या पुरस्कर्त्यांचा पराभव झाला होता तरी तो अवघ्या एक दोन मतांनी झाला असल्याने पुनर्विवाहाची बाजू इतकी कच्ची नाहीं, तो अगदीच अशास्त्र नाहीं असें सर्वसाधारण समाजाला पटलें. त्या दृष्टीने पाहतां वादविवादाने एकदरीने फायदाच झाला. यानंतर हा प्रश्न विवाद्य जरी राहिला तरी त्याच्या मागलें समाजाच्या अमान्यतेचें अधिष्ठान एकंदरीनें खिळखिळें झालें. आगरकरांनी आपल्या लेखांनी अत्यंत तडफदार रीतीने ह्या प्रश्नाला चालना दिली. विद्वानांचें लक्षहि इकडे गेलें, जाऊं लागलें. तरुण पिढीलाहि त्याबाबत विशष विरोध करावा असें वाटलें नाही. ह्याचा अर्थ सामाजिक दृष्ट्या हा प्रश्न निकालांत निघाला असें नव्हे. पण तो सामाजिक 'जिवंत' प्रश्न न राहतां केवळ चर्चारूपानें टिकून राहिला. विधवा–विवाहाचा कायदाहि या वेळेस झाल्याने कायद्याच्या दृष्टीनेहि तो प्रश्न निकालांत निघाला.

ह्या कालखंडांत समाजाचें लक्ष बाल–विवाहावर केंद्रित झालें होतें असें दिसतें. ह्या प्रश्नाचे बाबतींत अद्यापपावेतो कायद्याने प्रवेश केलेला नव्हता. ब्रि. सरकारची वृत्ती व धोरण हें सामान्यतः तटस्थपणाचें होतें. हिंदूत विवाह हा एक संस्कार गणला जात असल्याने व संस्कार ही धार्मिक बाब असल्याने सरकारने ह्याबाबत ढवळाढवळ करूं नये असें सामान्यतः सनातनी लोकांचें मत होतें. तथापि हिंदू समाजांतच सुधारणेच्या विचारांची जी वाढ होत होती त्या वाढीच्या अनुषंगाने समाजांतील सुबुद्ध लोकांचें लक्ष ह्या प्रश्नाकडे लागलें होतें. त्याच्यामतें ह्या सुधारणेसाठी सरकारचे साहाय्य ध्यावें. त्या दृष्टीने कांहीं यत्न झाले. व ह्या सर्व यत्नांत सर्वत्र

गाजलेला प्रश्न म्हणजे संमतिवयाचा वाद होय. हा वाद १८९१च्या सुमारास संबंध हिंदुस्थानांत–व विशेषतः महाराष्ट्रांत सर्वत्र गाजला. सुबुद्ध सुविचार लोकांचें लक्ष या वादाकडे खेचलें गेलें. स्त्रीजीवनविषयक घटनांचा व चळवळींचा विचार करतांना ह्या वादाकडे लक्ष देणें आवश्यक आहे.

इ. स. १८९०–९१ च्या सुमारास हा वाद झाला. आज ह्या वादाचें स्वरूप पाहिलें की मौज वाटते. कायदा, भूतदया इत्यादि दृष्टींनी ह्या वादासारखा वाद का व्हावा व त्यास एवढें महत्व कां प्राप्त व्हावें हें समजत नाहीं. न्या. मू. रानडे, लो. टिळक, आगरकर इ. तत्कालिन प्रसिद्ध पुढाऱ्यांना ह्या वादांत उलटसुलट रीतीने भाग घ्यावा लागला आहे. ह्यावरून ह्या प्रकरणाचें ऐतिहासिक महत्व मान्य करावें लागतें. स्त्रियांच्या बाबत सर्वसाधारण समाजाची वृत्ति किती अनुदार होती ह्याची कल्पना ह्या प्रकरणावरून येते. मलबारी ह्या पारशी गृहस्थांनीं १८८५च्या सुमारास "बालविवाह व सक्तीचें वैधव्य" या विषयावर टिपणें प्रसिद्ध केलीं व तीं वाचून याबाबत कांहीं कायदा करावयास हवा अशी जाणीव विलायतेंतील लोकांत निर्माण करण्याचा यत्न केला. तीं टिपणें नंतर इकडे पण प्रसिद्ध झालीं. माधवरावांनी ह्या मलबारी शेटजींच्या मताचा पुरस्कार हिरीरीनें केला. परंतु कायदा करण्याचे कार्य थोडें दिरंगाईवर पडलें. दरम्यान रखमाबाई व फुलमानी ही दोन प्रकरणें झालीं. रखमाबाई या स्त्रीचें लग्न ती लहान असतां एका अर्धवट इसमाबरोबर लावलें गेलें. तिचे पालक (तिच्या आईचे पुनर्विवाहित पति) डॉ. सखाराम अर्जुन हे होते. रखमाबाईने पुढे वयांत आल्यावर नवऱ्याकडे जाण्याचें नाकारलें. नवरा आपला पतीपणाचा हक्क सांगूं लागला. तिचें म्हणणें मी अज्ञानी असतां झालेलें हें लग्न मला संमत नाही. हें प्रकरण कोर्टात गेलें. खालच्या कोर्टाने रखमाबाईचें म्हणणें मान्य केलें. वरच्या कोर्टाने नवऱ्याचें म्हणणें मान्य केलें. या वादांत आगरकरांनी, रानड्यांनी रखमाबाईची बाजू उचलून धरली, तर टिळकांनीं आणि सनातनी लोकांनीं रखमाबाईच्या नवऱ्याची. तत्कालीन हिंदु स्त्रीच्या परिस्थितीवर प्रकाश टाकणारी ही एक प्रातिनिधिक घटना आहे असें म्हणतां येईल. ह्या प्रकरणाच्या अनुषंगाने जे पक्ष निर्माण झाले ते सुधारणेचें कार्य एकंदरीनें कसें चालले होतें ह्याची कल्पना देतात. ह्या-

नंतर थोडे दिवसांनी फुलमानी प्रकरण झालें. फुलमानी ह्या बंगाली अल्पवयी विवाहित मुलीशी तिच्या वयाच्या दहाव्या वर्षी तिच्या पतीने लैंगिक जबरदस्ती केली व तिच्या मृत्युस ती कारणीभूत झाली. ह्याहि प्रकरणाने समाजाचें लक्ष बालविवाहाच्या प्रश्नाकडे वळलें. व या बाबतींत कांही कायदेशीर उपाययोजना जरूर आहे असें विचारी लोकांस–सुधारकांस–वाटूं लागलें. मलबारींच्या टिपणांवर चर्चा चालूच होती. शेवटी सरकारने संमतिवयाचें बिल आणलें, तें संमत होईपर्यंत सर्व देशभर खळबळ उडाली. त्या बिलाचें स्वरूप अगदी साधें होतें. ज्या बाबींवर एवढें रण माजलें ती बाब म्हणजे जबरीच्या संभोगाच्या बाबतींत कायद्यांत नवरा बायकोच्या व्यवहाराविषयी जो अपवाद दिला तो रद्द करावयाचा. म्हणजे बारा वर्षांच्या आंत कोणतीहि स्त्री कोणत्याहि कृत्यास अनुमोदन देण्यास लायक नाहीं असें गृहित धरावयाचें; एवढीच होती. पण त्या साध्या सुधारणेला टिळक, जिनसीवाले, खापर्डे आदि सनातनी विचारांच्या लोकांचा विरोध होता. त्या विरोधाचा पाया राणीच्या जाहीरनाम्यांतील कांही आश्वासनें हा होता. हें कारण सरकारला देण्यासाठी होतें. स्वकीयांसाठी दुसरा युक्तिवाद होता. तो म्हणजे परकें सरकार आहे. त्याला आपल्या व्यवहारांत अधिकाधिक ढवळाढवळ करण्याची संधि देऊं नये हा, एकंदरीनें सुधारणेला विरोध हाच आंतरिक हेतू. हा वाद भरास आला असतांना निरनिराळ्या ठिकाणीं दोन्ही पक्षातर्फे सभा होत होत्या. सुधारकांतर्फे, सरकारतर्फे कायद्याच्या आवश्यकतेबद्दल अर्ज जात होते व बिल संमत झाल्याने त्याच पक्षाची सरशी झाली.

स्त्रीजीवनविषयक जागृतीच्या आढाव्यांत या वादाचें महत्त्व मानावें लागतें. किती साध्या सुधारणेला किती तीव्र विरोध, व तोहि किती शिकलेल्या व लोकहितपरायण लोकांकडून होतो हें लक्षांत घ्यावें लागतें. आणि स्त्रीजीवनविषयक सुधारणा अगदीं मुंगीच्या पावलाने का झाली हें ध्यानांत येतें. सरकारचा ह्या प्रकरणांत आलेला संबंध हाहि महत्वाचा भाग आहे. सुधारकांच्या मतें सामाजिक सुधारणेस कायद्याचा आधार घ्यावयास हरकत नाही. तर सनातनी पक्षपाती लोकांचें मत परकीय सरकारला ती सवलत देऊं नये. याचा अर्थ असा कीं, सुधारणा व्हायला पाहिजे याबद्दल दोघांत एकमत होतें. खरी वस्तुस्थिति अशी कीं, सनातनी लोकांना

सुधारणाच मान्य नव्हती. परंतु स्वतःच्या भूमिकेचें समर्थन करावयास कोणताहि युक्तिवाद नव्हता व मग सरकारचें परकेपण हेंच कारण मिळालें.

असो ह्या प्रकरणामुळे कायदेशीर रीतीने सुधारणा करण्याचा मार्ग उपलब्ध झाला. बालविवाहाला थोडासा परिणामकारक पायबंद घालणारा कायदा (सारडा) १९२९त झाला. स्त्रियांच्या दृष्टीने जागृती होऊं लागली. त्यांना कायदेशीर हक्क कोणते आहेत इकडेहि सुशिक्षित समाजाचें लक्ष जाऊं लागलें. स्त्रियांच्या चळवळींना अधिकाधिक जोम येऊं लागला. स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी संस्था निर्माण होऊं लागल्या.[1] निरनिराळीं वृत्तपत्रें या बाबतींत पुढें येऊं लागलीं. हरिभाऊंचें 'करमणुक', 'मनोरंजन', 'निबंधचंद्रिका', इ. प्रकारचे प्रयत्न ह्याच जागृतीचे द्योतक आहेत. संमतिवयाच्या वादाची चळवळ व ह्या सुशील (गाजावाजा न करतां) जागृति करण्यास बद्धपरिकर झालेल्या संस्था यांचेद्वारां समाज व विशेषत स्त्रीविषयक जागृतीचें काम चालू होतें.

या कालखंडांतलें आणखी एक प्रकरण म्हणजे पंडिता रमाबाईचें शारदासदन व त्याच्या अनुषंगाने झालेली चळवळ हें होय. पंडिता रमाबाई ह्या आधुनिक महाराष्ट्रांत ज्या थोर स्त्रिया होऊन गेल्या त्यांपैकीं एक होत. आज निर्लेप वृत्तीने पंडिताबाईंच्या कार्याचें मूल्यमापन करावयास लागलें तर त्यांचें मोठेंपण प्रतीत होतें. स्त्रियांना मदत करण्यासाठीं, त्यांना शिक्षण इ. देऊन सज्ञान करण्यासाठी एक स्वतंत्र संस्था—शारदासदन—काढली ही एक अपूर्व घटना होय. रानडे, आगरकर, इ. समाजधुरीण पुढारी त्यांच्या यत्नास अनुकूल होते, रानडे, भांडारकर तर नियामक मंडळावर होते. केसरी प्रारंभापासून संशयी होता. कर्मधर्मसंयोगानें पं. रमाबाईनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला. त्यांच्या सदनांतील कांहीं मुलींनी पण तोच मार्ग स्वीकारला. एवढ्या ह्या घटनेने पंडिता रमाबाईवर सनातनी व सर्वच लोकांची झोड उठली. त्यिच्या गुणांचें व कर्तृत्वाचें मोल कोणालाच करावेंसें वाटलें नाहीं. शेवटी रमाबाईना आपलें 'सदन' केडगांवला नेऊन 'मुक्तिसदन' असें त्याचें नामाभिधान करावें लागलें. हिंदुसमाजांत स्त्रियांना जी वागणूक मिळत होती ती जर लक्षांत घेतली तर पंडिताबाईंचें

१ २ पुनर्विवाह मंडळें, त्यांचीं संमेलनें, अ. भा. महिला परिषद् इ.

करणें विशेष गहंणीय होतें असें आज वाटत नाहीं. कांही असलें तरी स्त्रीजीवनविषयक जागृतीच्या आढाव्यांत पंडिता रमाबाईच्या स्मृतीवर थांबून त्यांना आदरानें अभिवादन करणें योग्य आहे.

न्या. मू. रानडे व स्त्री-जीवनसुधारणाः — १८८० ते १९२० ह्या कालांत स्त्री-जीवनावर परिणाम करणाऱ्या सामाजिक इ. विविध चळवळींचा उहापोह केल्यानंतर ह्या कालखंडांत जे श्रेष्ठ विचारवंत झाले आहेत, ज्यांनी स्त्रीजीवनविषयक विचार प्रकट केले आहेत त्यांच्या विचारांच्या आधाराने महाराष्ट्राची स्त्रीजीवनविषयक वैचारिकनिष्ठा निर्माण झालेली आहे अशा विचारवंतांत न्या. मू रानडे, आगरकर, लो. टिळक व चिं. वि. वैद्य हे प्रमुख होत. ह्या शिवाय इतरांनीहि आपापल्या लेखांतून वा ग्रंथांतून स्त्रीजीवनाचा विचार केला आहे. त्या विवेचनाचें दिग्दर्शन करून घेणें आवश्यक आहे. प्रथम न्या. मू. रानड्यांच्या स्त्रीजीवनविषयक विचारांची दिशा पाहणें योग्य होईल.

न्या. मू. रानडे हे लोकहितवादी नंतरचे प्रमुख समाजसुधारक होत. लोकहितवादींच्या नंतर जी सामाजिक प्रगती झाली तींत सामाजिक प्रश्न व राजकीय प्रश्न एकमेकांपासून स्पष्टतया अलग होऊं लागले. लोकहितवादींच्या वेळीं राजकीय प्रश्न निर्माणच झाले नव्हते. इंग्रज हे इतके पुढारलेले होते, त्यांचें राज्य इतक्या व्यवस्थितपणें स्थिरावलें होतें कीं तें उखडून काढण्याचा विचार सुचणें वा त्याला मूळ धरणें शक्य नव्हतें. रानड्यांच्या वेळीं परिस्थिति बदलली, रानड्यांनी ब्रि. संरक्षणाखालील स्वराज्याचें ध्येय निश्चित करून त्या दिशेने त्यांनी राजकीय हालचाल करावयास सुरवात केली. चिपळूणकर आगरकरांच्या पिढीला स्वराज्यांचीं स्वप्नें पडूं लागलीं. त्या दृष्टीने राजकीय प्रश्नांची निकड त्यांना अधिक भासूं लागली. पण ह्या दोन विचारसरणींत झगडा झाला. त्याचा उल्लेख पूर्वी आलाच आहे. न्या. मू. नी स्त्रीजीवित सुधारण्याचे फार यत्न केले, मुलींची शाळा, पंडिता रमाबाईआश्रम इ. संस्थांच्या उभारणींत त्यांचा हातभार होता. संमतिवयाच्या व त्याच्या अनुषंगाने निर्माण झालेलीं रखमाबाई आदि प्रकरणें इ. च्या निमित्ताने माधवरावजींनी स्त्रीजीवनविषयक मत वेळोवेळीं प्रकट केलें आहे. न्या. मू. रानड्यांनीं स्त्रीजीवन-

सुधारणापर विचारांचा उल्लेख कोठे एकत्र केलेला नाही. त्यांचीं धर्मविषयक व्याख्यानें प्रसिद्ध झालीं आहेत. बाकीचें सर्व लिखाण प्रामुख्याने इंग्रजींतून आहे. तथापि वेळोवेळीं स्त्रीजीवनविषयक विचार प्रकट केलेले त्यांच्या चरित्रांत [1] प्रसंगोपात उधृत केलेले आहेत त्यांचा परामर्श घेणें आवश्यक आहे. त्यांच्या आधारें न्या. मू. रानड्यांच्या (या विषयावरील) विचारांची ओळख होणार आहे.

१८४० ते १८६० या कालांत बालविवाहावर चर्चा होण्यास सुरवात झाली. या कालखंडांत मिशनरी लोकांचा प्रचार जोरांत होता. त्यांचा हिंदुसमाजावर जोरांत हल्ला सुरूं होता. त्या हल्ल्यांत बालविवाह व पुनर्विवाहबंदी ह्याबद्दल कांहीं समर्थन करणें शक्य नव्हतें. सुधारकांनीं ह्या दोन सुधारणांवर आपलें चित्त प्रामुख्यानें केंद्रित केलें. विधवाविवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा १८५६त संमत झाला. त्यानंतर १८७०त प्रसिद्ध वाद झाला. त्या प्रसंगीं विधवाविवाहाच्या समर्थनाच्या बाजूने रानड्यांनीं साहाय्य केलें होतें. त्याप्रमाणे मोरोबा कान्होबा यांनी केलेल्या गाजलेल्या विवाहास माधवरावांनी सक्रिय साहाय्य केलें होतें ह्याबद्दल समाजाने त्यांना बहिष्काराचाहि प्रसाद दिला. पण माधवरावांनीं धीराने सर्व संकटांस तोंड देऊन विविध पुनर्विवाह घडवून आणले. या निमित्ताने माधवरावांनी पुनर्विवाहावर एक निबंध लिहिला आहे. "वेद, स्मृति, पुराणें आणि इतिहास हीं चारीं साधनें हातांत घेऊन पुनर्विवाहाचा प्रश्न अनुकूल दिशेनें सोडविला आहे." [2]

परंतु माधवरावांनी प्रसंग येतांच स्वत: मात्र विधवा स्त्रीशी विवाह न करतां रूढपद्धतीचा मार्ग अवलंबिला. ही एकच घटना त्यांच्या या विषयीच्या मतांना पुष्टि देणारी नाही. तिच्यावर सगळीकडून टीकाहि झाली. उत्तरें देण्याचाहि पण प्रयत्न अनेकांनीं केलेला आहे. आज एवढेंच म्हणतां येतें कीं, त्यांचे विचार हे निश्चित होते. पण त्यांचा आचरणांत अवलंब करण्यास आवश्यक तें मनोधैर्य त्यांच्याजवळ नव्हतें. इतकेंच फारतर म्हणतां येईल.

---

१ न्या. मू. रानडेचरित्र : फाटककृत.

२ न्या. मू. रानडे : फाटक पृ. १५६.

ही जर चूक त्यांच्याकडून झाली नसती तर महाराष्ट्रांत सुधारणेचा पक्ष हा फार प्रबल झाला असता. असो.

१८७० पासून स्त्रियांच्या अंगीं निरनिराळे आधुनिक नागर गुण येण्यासाठीं एक स्त्री विचारवती संस्था त्यांनीं स्थापन केली. तिचें कार्य सुरू केलें.

तथापि १८८५ ते १८९०त झालेल्या वादांत त्यांनीं बऱ्याच हिरीरीने भाग घेतला. हा वाद एकंदर स्त्रीजीवनविषयक दृष्टीने अधिक महत्त्वाचा होता. विधवाविवाहामागे फक्त सहानुभूतीची भूमिका पुरेशी होती. बालविवाहाच्याबाबत सामाजिक अनाचाराकडे अंगुलिनिर्देश करतां येत होता. परंतु रखमाबाई प्रकरणाने स्त्रियांच्या हक्कासंबंधीचा अत्यंत नाजुक मुद्दा पुढे आला. लहानपणीं आईबापांनी केलेलें लग्न हें पुढे सज्ञान झाल्यानंतर स्त्रीला अमान्य करतां येतें काय? तसा तिला हक्क असावा काय? याचाच अर्थ नवरेपणाच्या हक्कास कांहीं प्रतिबंध असावा काय हा महत्त्वाचा व नैतिक महत्त्वाचा मुद्दा होता.

स्त्रीजीवनविषयक विचारांतील प्रगतीच्या दृष्टीने ही पायरी फार मोठी महत्त्वाची आहे. आजपर्यंत स्त्रियांच्या प्रश्नाकडे पाहतांना केवळ भूतदयावादी व सामाजिक अनाचारावर आधारलेला युक्तिवाद करून भागत असे. ह्या 'वादा'ने स्त्रीच्या नागरिक वा व्यक्तिगत हक्कांचा प्रश्न पुढे आला. मलबारी शेटजींनी 'बालविवाह व सक्तीचें वैधव्य' ह्या विषयांवरील टिपणें विलायतेंतील लोकांच्या विचारांसाठीं प्रसिद्ध केलीं. तीं पुढें इकडेहि प्रसिद्ध झालीं. त्या टिपणांचा उद्देश याबाबत कांही तरी कायदा व्हावा असा होता. महाराष्ट्रांत जेव्हा ही चर्चा सुरू झाली तेव्हां माधवरावांनी कायद्याच्या बाजूने मत दिलें, प्रचार चालविला. आगरकरांच्या सुधारकाने तर अत्यंत तडफेने कायद्याची तरफदारी चालविली. माधवरावांनी आपल्या स्त्रीसंस्थेतर्फे कायदा असावा असा अर्ज करून त्यावर सह्या जमविण्यासहि सुरवात केली. या सबंध वादांत माधवराव व आगरकर यांची भूमिका तर्कशुद्ध होती. टिळकांची भूमिका घरसोडीची होती. तिचें विवेचन टिळकांचे स्त्रीजीवनविषयक विचार पाहातांना करतां येईल. माधवरावांनी 'स्त्रियांचे हक्क' या विषयावर विवेचन केलें आहे.—व एक निबंध लिहिला आहे. वैद्य

नांवाच्या गृहस्थांनी विधवाविवाहविषयक वाङ्मय गोळा करून एक संदर्भ ग्रंथ लिहिला. त्याला माधवरावांनी प्रस्तावना लिहिली तो हा निबंध; असें त्यांचे चरित्रकार फाटक म्हणतात. या वादाच्या निमित्ताने वास्तविक राजकीय का सामाजिक हा प्रश्न पुढे आला. या बाबत माधवरावांचा तेलंगांशीच मतभेद आला. असो. तत्पूर्वी मलबारींच्या टिपणांवर त्यांनी म्हटलेलें ध्यानांत घेणें जरूर आहे. मलबारींच्या टिपणांवर त्यांनी अनुकूल मत दिलें. "हल्ली प्रचारांत असलेल्या विवाहसंबंधाच्या सर्व चाली सशास्त्र, युक्तिविरुद्ध व नीतिस अनुसरून आहेत यांत दोष देण्यासारखे नाहींत असें आपण कदापि म्हणणार नाही. व त्यांपासून मि. मलबारी म्हणतात त्या मानाने नाहीं पण कांही मानाने अनर्थ व अन्याय होत नाही असें आपण कदापि म्हणणार नाही...दोष कोणते व किती प्रमाणाने आहेत, याविषयी मतभेद असूं शकेल. दुरुस्ती होण्यास मार्ग कोणते या बाबतींत बंदोबस्त कोणत्या प्रकारें व्हावा ह्या विषयीं भिन्न अभिप्राय होतील. याहून अधिक प्रकारचा फरक आपल्या व मि. मलबारी यांनीं प्रसिद्ध केलेल्या अभिप्रायांत व लेखांत नाहीं."[१]

यानंतर माधवरावांनी विविध प्रकारच्या विवाहप्रकारांचा (हिंदूत रूढ असलेल्या) उल्लेख करून...सुधारणा सुचविली जाते तो अभिप्राय कोणाचा आहे, एका व्यक्तीचा आहे किंवा बहुत समाजाचा आहे यावर विशेष कटाक्ष न ठेवतां अभिप्राय यथा न्याय सशास्त्र व सत्य आहे कीं नाही एवढेंच पाहणें रास्त होईल. धर्माचारांमुळे श्रुतिस्मृति प्रणित आचार लोपले आहेत. माधवरावांचे मताप्रमाणे हिंदुधर्मांत आत्मनियंत्रणाची शक्ति (Self-regulating Power) नाही. त्यामुळे बरेच घोटाळे झाले आहेत. तेव्हा नियम करण्याची सत्ता आहे त्या सत्तेचा उपयोग करून बंदोबस्त झाला पाहिजे. संमतिवयवादानिमित्ताने विवाह विधीचें स्वातंत्र्य जातें असाहि मुद्दा पुढे आला होता. पण माधवरावांनी स्पष्ट उत्तर दिलें आहे कीं— "हल्ली विवाहसंबंधाने मुळीच कायदा नाही अशी आपली समजूत असल्यास ती सयुक्तिक नाही. ज्या नियमांचा अंमल कोडतांतून होतो तो कायदा. शास्त्र नियमांचा अंमल कोडतांतून होतो, तितक्या मानाने त्या

१ न. र. फाटक: रानडेचरित्र पृ. ३९३.

बाबतींत कायदा हल्ली आहे असेंच समजलें पाहिजे."[1] ह्या वादांत स्त्रियांवर दुर्वृत्त असतात, स्वैराचारिणी असतात इ. आरोप अनेकांनी केले होते. माधवराव म्हणतात "स्त्रियांवर जे आरोप करण्यांत आले ते सर्वथैव मिथ्या आहेत...पूर्वकालीन जे ग्रंथ आहेत त्यांस आपण शास्त्र म्हणतों. त्यांत स्त्री जातीचें सदैव संरक्षण त्यांच्या पुरुष आप्तांनी करावें. स्त्रिया सेव्य आहेत, पूज्य आहेत, स्त्रिया सन्मान्य आहेत इत्यादी वचनें आपण पहातों त्यांची आठवण पुरुषांनी विसरावी हें मोठें दुर्भाग्य आहे. स्त्री जातीचे जे दोष आपण वर्णन करतों, त्यावेळीं ते दोष आपण आपल्या मातेवर, कन्येवर वा भगिनींवरहि आरोपितों, हें लक्षांत राहूं नये हें आश्चर्य वाटतें... आपला पुरुषार्थ आता स्त्रियांपुरताच राहिला आहे हें आपण तोंडानींच म्हणून घेणें, याहून दुसरें लाजीरवाणें कृत्य कोणाच्याहि हातून घडणार नाही..." या वादाच्या निमित्ताने माधवरावांनी सबंध पूर्व कालीन वाङ्मय तपासलें व आपलीं मतें निश्चित केलीं. या संबंधांत एक इंग्रजीत लेखहि त्यांनी तयार केला व तो 'हिंदुस्थानांतील स्त्रियांची स्थिति' ह्या मलबारींचे चरित्रकार दयाराम गिडुमल यांनी तयार केलेल्या ग्रंथांत समाविष्ट केला. या निबंधांत माधवरावांनी पूर्व कालीन विविध प्रयत्नांचा आढावा घेऊना क्रांति व प्रतिक्रांति यांच्या लाटा कशा उठल्या आहेत हें व्यक्त केलें. "जुन्य परंपरेस अनुसरून फेरफार करा, अस सांगण्यांत सुधारकांचा मनसोक्त क्रांति घडवून आणण्याचा उद्देश नसून धर्माच्या जुनाट वृक्षावर जी बांडगुळें उत्पन्न झालेलीं आहेत तीं कापून काढण्याचा त्यांचा उद्देश आहे." प्रत्यक्ष वादविवादाच्या रणधुमाळींत माधवरावांनी निरनिराळे युक्तिवाद केले. त्यांच्या समाजसुधारणेच्या संस्थेने त्या वेळपर्यंत १५००–१७०० सह्या जमविल्या होत्या. त्यांचें पृथःकरण माधवरावांनी केलें व विरोधकांची नांगी मोडली. तें पृथःकरण असें—'...बंधनाची चळवळ अलीकडे पांच सहा वर्षें चालली आहे. १५००–१७०० लोकांनी सह्या केल्या आहेत; ज्यांना जेवढीं तत्त्वें मान्य, त्यांचीं त्या त्या तत्त्वांपुरतीं वेगळीं मंडळें स्थापन करण्याचा विचार आहे, या प्रश्नाचा निकाल येत्या सामाजिक परिषदेंत लागेल. १५०० माणसांपैकीं १० वर्षांच्या आंत मुलीचें लग्न करूं नये असें

१ रानडेचरित्र : फाटक. पृ. ३९५.

म्हणणारें १२००–१३०० लोक आहेत. १२ वर्षांच्या खाली करूं नये असें म्हणणारें सारे शंभर दीडशे सांपडतात. १४ वर्षांची लग्न–मर्यादा पाळूं इच्छिणारे अवघे १५–२० आहेत. मुलाचे १६ वर्षांखाली लग्न करूं नये म्हणणारे ११००–१२०० आहेत. १८ वर्षांखाली लग्न करूं नये म्हणणारे २००–३०० हून जास्त नाहीत. आणि २० वर्षांखाली म्हणणारे शंभराच्या घरांत आहेत." [१] या आंकडेवारीवरून तत्कालीन समाजाच्या विचारांचा ओघ कोणत्या दिशेने होता याची कल्पना येते.

माधवरावांनी ह्या विषयावर तसेंच एका ठिकाणी एकत्र कुटुंब पद्धतीवरहि आपले विचार प्रदर्शित केले आहेत. ते म्हणतात 'एकत्र राहाण्याची चाल सोडा असें म्हणणें म्हणजे परक्या चाली उचलणें असा आग्रह धरल्यासारखें होत नाही. स्मृतिकालानंतरचे ग्रंथ अविभक्त कुटुंबपद्धतीला विरुद्ध आहेत. मालमत्तेंत स्त्रियांना हिस्सा ठेवल्याचें आढळतें. एकत्र राहाण्याची चाल मोडण्याचा प्रयत्न जुनाच आहे. पण ही चाल मात्र मोडली नाही...अविभक्त कुटुंबपद्धतीने निरुद्योगीपणा व आळस वाढतो. दुसऱ्याच्या कमाईवर टपून बसण्याची संवय लागते. वाटणीच्या पायीं शेकडो कुटुंबें दीनावस्थेस पोंचलीं आहेत...संचित द्रव्याचे तुकडे तुकडे होऊन... त्याचा उपयोग समाजास अगर व्यक्तीस होत नाही. या व अशा अनेक कारणांकरितां एकत्र राहण्याच्या चालींत फेरफार केल्या पाहिजे...." [२]

मलबारींच्या टिपणांवरून माधवरावांनी कांही सूचना केला होत्या. त्या अशा—

(१) अमूक वयाच्या आंत मुलामुलींची लग्नें होऊ नयेत असा कायदा सरकारने करावा.

(२) वयाची मर्यादा मुलाची १६ किंवा १८, मुलीच्या बाबतींत १० किंवा १२ असावी. ही वयें पाहण्याचें काम लोकलबोर्डे वा म्युनिसिपालिटी यांकडे अंमलांत आणण्यासाठीं सोंपवावें.

(३) विद्यापीठांनी अविवाहित विद्यार्थ्यांनाच पदव्या द्याव्यात, अधिक सवलती द्याव्यात.

---

१ रानडे चरित्र पृ. ४३६.

२ कित्ता पृ. ३७३.

(४) समागम–संमतीचें वय १४ वर्षें असावें.

(५) ४५ च्यावर असणारांनी अल्पवयस्क कुमारिकांशी लग्न करूं नये.

(६) एक बायको जिवंत असतांना दुसरी बायको करावयाची झाल्यास शास्त्रांत कांही निर्बंध आहेत, त्या निर्बंधाचें सरकारने पुनरुज्जीवन करावें.

सामाजिक सुधारणाकडे दुर्लक्ष होऊं नये अशी न्या.मू.ची फार इच्छा होती. तेलंगांच्या मतांतून या बाबतींत 'सबूरी'चा पडसाद उमटला होता. फार प्रतिकार होत असेल तर सामाजिक सुधारणेचा विशेष आग्रह धरूं नये असा सूर होता. रानड्यांनी त्या युक्तिवादाला कडाडून विरोध केला. संमतिवयाचा कायदा १८९१ त संमत झाला व हा वाद मिटला. तथापि स्त्रीजीवनविषयक प्रगतीच्या दृष्टीने ह्या वादाचें महत्त्व फार आहे. माधवरावांचे एकंदर विचार येथे दिले आहेत. ते कृतीने, प्रवृत्तीने सुधारक होते. राजकीय बाबतींत त्यांनी इंग्लंडमधील प्रागतिक पक्षाचा आदर्श पुढे ठेविला होता. तथापि सामाजिक बाबतींत त्यांचे विचार बरेच पुढे गेले होते. सामाजिक परिषदेच्याद्वारां सामाजिक सुधारणेच्या यत्नांना अधिक जोर यावयास हवा ह्याबद्दल त्यांचे विविध यत्न चालूं होते. त्याचप्रमाणे केवळ तात्त्विक चर्चा करून स्वस्थ न बसतां विविध चळवळींचा अवलंब करून समाजसुधारणेचें लोण पुढे रेटलें आहे.

स्त्रीजीवनविषयक विचारांच्या दृष्टीनें पाहतां लोकहितवादींच्या पुढची पायरी आहे असें स्पष्ट होतें. या कालांत स्त्रीसुधारणा सशास्त्र कीं अशास्त्र याबाबत बराच वाद झाला. 'शास्त्रां'ची चाकोरी समाजांतील विचारवंतांनाहि टाकावीशी वाटली नाही. त्यादृष्टीने रानड्यांचे यत्न अतिशय महत्त्वाचे आहेत. जुन्या विचारमंथनाचा आधार घेऊन त्यांनीं आपले सुधारणाविषयक विचार व्यक्त केले आहेत. स्त्रीच्या व्यक्तित्वाचा व व्यक्तिविषयक हक्कांचा विचार त्यांनी प्रथम केला. या दृष्टीने प्रगतीची दिशा कळूं शकते. तथापि स्त्रियांचे त्या दृष्टीने खरे कैवारी आगरकर होत. त्यांनी सर्वांगीण पाहाणी नव्याने केली. रानड्यांचे प्रयत्न प्राथमिक व प्रात्यक्षिक स्वरूपाचे होते. तथापि स्त्रीजीवनविषयक सुधारणेची एक अवस्था रानड्यांपाशी संपते.

आगरकर व मराठी-स्त्री—महाराष्ट्रीय व भारतीय स्त्रीच्या जीवनाची चिकित्सा अगदी नवीन दृष्टिकोणांतून करण्याचा ज्या लोकांनी यत्न केला त्या सर्वांत आगरकर हे अग्रगण्य होत. लोकहितवादी व न्या. मू. रानडे या दोन थोर विचारवंतांच्या स्त्रीजीवनविषयक विचारांचा व कामगिरीचा उल्लेख यापूर्वीच आलेला आहे. त्यांच्या पुढचा फार मोठा टप्पा आचार्य आगरकरांनी गांठलेला आहे. त्यांनी आपल्या लेखनाने स्त्रीजीवनाच्या सर्वांगीण प्रगतीला परिपोषक अशी वैचारिक पार्श्वभूमि निर्माण केली; की जी वैचारिक पार्श्वभूमि महाराष्ट्राला आतापर्यंत उपयोगी पडली आहे व यापुढेहि दीर्घकाल पडणार आहे. आगरकरांनी जसा नवा पाया घातला तशा आणखीहि अनेक गोष्टी केल्या. स्त्रीजीवनाच्या विविध अंगोपांगांचा बारकाईने विचार प्रथम आगरकरांनीच केला व तोहि शास्त्रीय आणि व्यक्तिवादाच्या भूमिकेवरून. स्त्रीचे व्यक्ति म्हणून हक्क व नागरिक म्हणून हक्क ह्या दोहोंचाहि विचार त्यांनी केला आहे. लोकहितवादी व रानडे यांनी कांहीं विशिष्ट अंगांचाच विचार केला. लोकहितवादींच्या भूमिकेंत अन्यायाची जाणीव होऊन आलेली चीड स्पष्टपणें दिसते. रानड्यांचा यत्न सुधारणेचा होता. त्यांची दृष्टि सुधारणावादाची होती. त्यांना पूर्वकालीन संस्कृतिबद्दल गाढ आदर होता, प्रेम होतें. समकालीन जीवनांत फारशी ढवळाढवळ न करतां भक्तिमार्गी लोकांनी जी कामगिरी केली, जी 'सुधारणा' केली ती त्यांनी आदर्श मानली व आपले प्रयत्न त्या दृष्टीने केले. लोकांच्या मनाला फारसे धक्के न देतां त्यांना समाजसुधारणा करावयाची होती व म्हणून त्यांची सारी खटाटोप कशासाठीं असेल तर नवीन सुधारणा पूर्वकालीन संस्कृति-विचारांत बसवून लोकांचें सहकार्य जिंकणें, या साठीं होय. संस्कृतीचें दडपण त्यांच्या मनावर फार होतें व त्यामुळे त्यांनी त्या संस्कृतीच्या परिभाषेंत आपले नवे विचार सांगावयास सुरवात केली. त्यासाठीं पूर्वकालीन ग्रंथांचें आलोडण पण त्यांनी केलें. पण त्यांचा भर एकंदरीने पूर्वकालीन संस्कृति-थोरवीवर असल्याने स्त्रीजीवनविषयक प्रश्नांचा तार्किक व व्यक्तिवादी दृष्टीने विचार करणें त्यांना शक्य झालें नाही. हेंच त्यांच्या या क्षेत्रांतील कार्याचें वैगुण्य होय. आगरकर हे त्या दृष्टीने बरेच पुढे होते त्यांनी आपल्या बुद्धिवादी तर्कशुद्ध व शास्त्रीय दृष्टीनें स्त्रीजीवनविषयक विचार-चिकित्सेला नवेंच वळण दिलें. सहाजिकपणेंच आगरकरांच्या

ह्या विषयींच्या विचारांचा परामर्श घेणें आवश्यक आहे असें वाटतें.

आगरकर हे 'सुधारक'कार आगरकर म्हणून प्रसिद्ध आहेत. पण 'सुधारक'कार आगरकरांपूर्वी 'केसरी'कार आगरकर महाराष्ट्रापुढे आले आहेत. आधुनिक कालांत सरकारी गैरमर्जी संपादून तुरुंगवासाचा पहिला घडा आगरकरांनी महाराष्ट्राला व हिंदुस्थानला दिला. 'केसरी'कार आगरकर हे राजकीय व सामाजिक दोन्ही प्रकारच्या सुधारणांविषयी जशीं जहाल मतें धारण करणार आहेत तसे 'सुधारक'कार आगरकरहि आहेत. आगरकरांचें हें विशिष्टत्व महाराष्ट्राच्या आधुनिक इतिहासांत केवळ अपूर्व आहे.

आगरकरांची विचारसरणी प्रारंभापासून अखेरपर्यंत सर्व बाबतींत तर्कशुद्ध, बुद्धिवादी व व्यक्तिस्वातंत्र्यवादी आहे. समाजाला शक्यतों दुखवूं नये, म्हणणारे रानडे संमतिवयाच्या वादांत तेलंगांनी जेव्हा कमींतकमी प्रतिकाराच्या रेषे (Line of least resistance) चा मुद्दा काढला तेव्हा, अत्यंत चिडले. व आपली भूमिका क्षणभर सोडून सामाजिक सुधारणेचा पुरस्कार केला. संमतिवयवादांत रानडे आगरकरांच्या बाजूस होते. उलट पक्षी डेक्कन कॉलेजांतील एका व्याख्यानांत भांडारकर रानड्यांनी धार्मिक शिक्षणाची आवश्यकतेचा पुरस्कार करतांच व तरफदारी करतांच आगरकरांनी रानड्यांना तत्क्षणीं विरोध केला. गंमत अशी की ह्यावेळीं टिळकांनी आगरकरांची बाजू घेतली. व रानड्यांना जोराचा विरोध केला.[1] डॉ. ॲनी बेझंट यांनी आपली भूमिका एका भाषणांत मांडली. तिला आगरकरांच्या 'केसरी'ने तत्क्षणीं विरोध केला. अर्थात टिळक आगरकरांसमवेत होते.[2] आगरकरांच्या विचारांत जी सूत्रबद्धता दिसते तिचें कारण त्यांचे विचार अत्यंत तर्कशुद्ध असत. तर्कशुद्धतेला व्यक्तिस्वातंत्र्याच्या पुरस्काराने मानवतेचें एक अद्भुत वलय त्यांच्या विचारसरणी भोवती पडलेलें होते. "आगरकर हे पक्के स्वराज्यवादी होते" अशी ग्वाही वा आठवण लो. टिळकांनी आगरकरांच्या कैवारी सुधारकांना १९१६ त जेव्हा आगरकरांची पुण्यतिथि पहिल्याने साजरी करण्याची कल्पना निघाली तेव्हा दिली. स्त्रीजीवनाच्या

---

१ न्या. मू. रानडे चरित्र पा. १

२ आधुनिक भारत.

ह्या निघड्या आणि कट्टया सुधारकाचे स्त्रीजीवनविषयक विचार समजून घ्यावयाचे आहेत.

आगरकरांच्या व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचारांचा प्रथम परिचय करून घेतला पाहिजे. "समाजाचें कुशल राहून त्यास अधिकाधिक उन्नतावस्था येण्यास, जेवढीं बंधनें अपरिहार्य आहेत, तेवढीं कायम ठेऊन बाकी सर्व गोष्टींत व्यक्तिमात्रास (पुरुषास व स्त्रीस) जितक्या स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येईल तितका द्यावयाचा, हें अर्वाचीन पाश्चिमात्य सुधारणेचें मुख्य तत्व आहे; व हें ज्यांच्या अंतःकरणांत बिंबलें असेल, त्यांना आमच्या समाजव्यवस्थेंत अनेक दोषस्थलें दिसणार आहेत, हें उघड आहे. हीं दोषस्थलें वारंवार लोकांच्या नजरेस आणावीं, तीं दूर करण्याचे उपाय सुचवावे आणि युरोपीय सुधारणेंत अनुकरण करण्यासारखे काय काय आहे, तें पुनः पुनः दाखवावें, यास्तव हें सुधारक पत्र काढलें आहे."[1] ही त्यांची एतद्विषयक भूमिका त्यांनी आपल्या 'सुधारक' काढण्याच्या हेतूंत विशद केली आहे. ते ह्या भूमिकेला पूर्णपणें चिकटून आहेत. पाश्चात्य सुधारणेंतील समाज सुधारणेइतकी राजकीय व वैचारिक सुधारणा त्यांना प्रिय आहे, तथापि भारतीय संस्कृति धनाबद्दल त्यांना अनादर आहे असें नव्हे त्यामुळें याच लेखांत "मूळ प्रकृति म्हणजे भारतीय आर्यत्व न सोडतां या पाश्चिमात्य नवीन शिक्षणाचा, व त्याबरोबर ज्या नवीन कल्पना येत आहेत त्यांचा आम्ही योग्य रीतीनें अंगीकार करीत गेलों तरच आमचा निभाव लागणार आहे" असें इशारावजा आश्वासनहि दिलें आहे.

विषय कोणताहि असो आगरकर त्या विषयाचें अत्यंत शास्त्रशुद्ध व ऐतिहासिक दृष्टींतून विवेचन करतात. विवाहपद्धतीविषयीं लिहितांना ते म्हणतात "सांप्रतकालीं या देशांतील उंच जातींतल्या स्त्रीपुरुषांचे जे संबंध आहेत ते फार समाधानकारक नाहींत...त्यांत सुधारणा करण्यास पुष्कळ अवकाश आहे" असें म्हणून त्यांना साहजिकपणें यूरप अमेरिकेतील समाजपद्धति सुधारलेली वाटते पण तावडतोब त्यांच्यांतला शास्त्रज्ञ जागृत होतो. ते म्हणतात, "येवढ्यावरून असें कोणी समजूं नये कीं युरोपीय विवाहपद्धति पूर्णावस्थेप्रत पावली आहे. विवाहपद्धतिचशी काय, मनुष्यांच्या

---

१ आगरकर निबंधसंग्रह भाग १ ला.

संस्थांपैकीं कोणतींच संस्था अजून सुष्ठुतेच्या पूर्णत्वास गेली नाहीं असें आम्हांस वाटतें."[1] कुटुंबाचा विचार करतांहि ते कुटुंब व्यवस्थेची समाजशास्त्रीय बाजू विचारांत घेतात. भारतीय कुटुंबपद्धति श्रेष्ठ आहे किंवा कनिष्ट आहे असें ठरवून विवेचन करीत नाहीत. व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचारांना ही जी तर्कशुद्ध व ऐतिहासिक दृष्टीची जोड आहे ती अपूर्व आहे.

या दोन मूलभूत गोष्टींमुळे आगरकरांना स्त्रीजीवनविषयक प्रश्न अत्यंत निर्भिडपणें मांडतां येतात. पुनर्विवाहाचा विचार या वेळेपर्यंत जुना झाला होता. आगरकरांना त्याच्यावर अतिरिक्त भर द्यावासा वाटला नाही. पुनर्विवाहाच्या प्रत्यक्ष पुरस्कारासंबंधीं त्यांनीं फार थोडें लिहिलें आहे. कारण कायदा व रूढि यांनीं तो प्रश्न विवाद्य राहिला नव्हता. त्यांना युक्तिवाद करण्याइतका मोठा तो प्रश्नच नव्हता. पण पुनर्विवाहाच्या पुरस्कारापेक्षांहि अतीव तडफेने त्यांनी घटस्फोटाबाबतचे आपले विचार मांडले आहेत. 'विवाह निराकरण' असा नवा शब्द योजून ह्या कल्पनेची जोरदार तडफदारी केली आहे. सर्व विवाहपद्धति सदोष आहेत. त्यांच्या मतें 'स्वयंवरा'त तो दोष अत्यल्प आहे आगरकरांनी याबाबत कायदा करावा असा आग्रह धरला आहे. विवाह वगैरे बाबत सरकार कायदे करीत नाही याचा अर्थ सरकारला तसा अधिकार नाहीं असा नव्हे. सरकारने जर तसा कायदा केला तर "आमचे लोक शुष्क वल्गनेहून विशेष कांहीं करूं शकतील काय?" संमतिवयाच्या वादाच्या दिवसांत हे विचार व्यक्त केले आहेत. अगोदर विवाहाची मर्यादा वाढवून घेतल्यावर मग हा प्रश्न आणावा तेथपर्यंत आमची मजल आली नसतां स्वयंवराच्या–घटस्फोटाच्या वादांत पडणें इष्ट नव्हे असा युक्तिवाद करणारांचा आगरकरांनीं उपहास केला आहे. त्यांच्या मतें "सभ्यपणाची मर्यादा न सोडतां, समाजाच्या हितास्तव ज्याला जी गोष्ट बरी वाटेल ती त्यानें उघडपणें बोलून दाखविणें यांतच खरें कल्याण आहे. शिवाय, ज्या मतांस आपण तऱ्हेवाईक म्हणतों तीं त्यांच्या नवीनत्वामुळें बहुधा तऱ्हेवाईक वाटतात. तीं पुनःपुनः कानांवर पडूं लागलीं म्हणजे त्यांचा धाक वाटेनासा होऊन हळूंहळूं त्यांतील गुणावगुणांचा विचार करण्याची बुद्धि होते आणि अखेरीस जीं पसंत पडतील

१ कित्ता.

तीं अंगिकारण्याची इच्छा होतें." [1] या भूमिकेवरून त्यांनी हिंदुमनाला न झेपणारा घटस्फोटाच्या आवश्यकतेचा विचार स्पष्टपणें बोलून दाखविला आहे. हा विचार अगदी नवा आहे. याची जाणीव त्यांना आहे. 'दहा आणि बारा ह्या दोन आंकड्यांच्या दरम्यानच जोंपर्यंत आम्ही भटकत आहोंत तोंपर्यंत प्रौढवयास वधुवरांनीं स्व-संमतीने एकमेकांस वरल्यास होणाऱ्या गृहस्थावस्थेंतील अनुपमेय सुखाचा लाभ, आणि त्यामुळे समाजाच्या सविस्तर घटनेवर होणारे हितकारक परिणाम यांचा प्रादुर्भाव येथें कसा होऊं लागणार!'...[2] इ. युक्तिवाद करून फक्त घटस्फोटासंबंधीं तात्त्विक विवेचन आहे हें स्पष्ट केलें आहे.

घटस्फोटाच्या इतकाच 'स्वयंवरा'चा पुरस्कार आगरकरांनी हिरीरीने केलेला आहे. "बालविवाहाचें पूर्ण निर्मूलन आणि स्वयंवराची प्रस्थापना ह्यांच्या दरम्यान बराच धर्मवाद उत्पन्न होणार आहे." असा उल्लेख करून आगरकरांनी आपली विशुद्ध, बुद्धिवादी भूमिका चालवून पूर्वकालीन आचार्यांइतकाच आम्हांला आमच्या जीवनांत बदल करण्याचा अधिकार आहे असें स्पष्ट केलें आहे. स्वतःचें लग्न स्वतः जमविणें म्हणजे स्वयंवर असा आगरकरांचा विश्वास आहे. या दृष्टीने जीं स्वयंवरें नाहींत "त्यासर्वांस आम्ही बालविवाह समजतों." असा त्यांचा स्पष्ट निर्णय आहे. सामाजिकसुधारणापरिषदेकडे बालविवाहाबाबत निर्णय देण्याचें काम सोपवावें असें म्हणणाऱ्यांचा त्यांनी उपहास केला आहे. आगरकरांच्या मतें बालविवाह बंद होण्यास मानसिक क्रांतीची जरुरी आहे. ऋतुमती कन्या विवाहाशिवाय ठेवावी तर तें धर्मशास्त्राच्या विरुद्ध होतें. माणसांनी आपल्या मतांतच फरक केला तरच तें शक्य आहे.

स्वयंवरच्या कल्पनेचीं दोन अंगें म्हणून आगरकरांनी 'वल्लभोपासना' व 'प्रियाराधन' ह्या नव्या सामाजिक मानसिक गोष्टींचा पुरस्कार केला आहे. आगरकरांच्या विशिष्ट पद्धतीनुसार ह्या विषयाचें विवेचन करतांना त्यांनी मनुष्येतर प्राण्यांपासून सुरवात करून त्यांच्या गरजा इ. चे उल्लेख केले आहेत. बालविवाहांत या बाबत जी अनास्था होते तिहून "स्त्रीपुरुषांच्या

---

१ निबंध संग्रह १ : पृ. ९

२ कित्ता.

रतिसुखाचा भंडवडा आणि मोतेरं करण्याची अधिक मूर्खपणाची रीत शक्य किंवा कल्पनीय असेल काय?" [१] असा त्यांनी प्रश्न केला आहे. प्रियाराधनाची दुसरी बाजू वल्लभोपासना तिचा उहापोह करतांना विविध समाजांतील चालीरीतीचे दाखले दिले आहेत. यूरोपीय समाजांत स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य आहे–पण त्यायोगेंच त्या स्त्रियांचें नैतिक जीवन कमी प्रकारचें आहे असा एक आक्षेप (प्रतिपक्षाचा) विचारांत घेऊन आगरकरांनीं जें निराकरण केलें आहे तें बिनतोड आहे. बंगाल प्रांतीय व मुसलमान स्त्रियांपेक्षां महाराष्ट्रीय स्त्रीला स्वातंत्र्य थोडें अधिक आहे हें खरें पण त्यामुळें बंगाली अगर मुसलमान स्त्रियांपेक्षा महाराष्ट्रीय स्त्रिया नीतिदृष्ट्या हीन आहेत असें म्हणता येईल काय! असा त्यांचा निरुत्तर करणारा सवाल आहे.

बालविवाह खण्डनार्थ आगरकरांनी खूपच लिहिलें आहे. बालविवाहासारखी रूढी अज्ञानामुळे प्रसृत होते. लोकांस ज्ञान झालें व तें वाढलें कीं ती कमी होईल या म्हणण्याचा आगरकरांनी उपहास केला आहे. त्यांच्या मतें केवळ शिक्षणाने ह्या गोष्टी सुटणार नाहींत. अज्ञानी व मूर्ख–शतानुगतिक लोकांवर थोडी सक्ति करावीच लागते. व त्यासाठीच कायद्याची जरूरी त्यांना भासते.

आगरकरांना कायद्याने सामाजिक सुधारणा लवकर होईल असें वाटतें. परकी सरकार आहे पण सामाजिक बाबतींतलें त्याचें धोरण आपणांस विशेष अनुकूल नसलें तरी प्रतिकूल तरी नाही. आगरकरांचें मत याबाबत अत्यंत असंदिग्ध व स्पष्ट आहे. "जे लोक राजकीय प्रकरणांत स्वतंत्र असतात ते सामाजिक व धार्मिक प्रकरणांतच स्वतंत्र असतात असा नियम नाही. किंवा राजकीय स्वातंत्र्य असूनहि धार्मिक व सामाजिक गोष्टींत तीव्र दास्यपाशाने सर्व प्रकारें जखडलेले असे अनेक लोक असतात." आधी राजकीय कां सामाजिक ह्या वादांत आगरकरांची ही भूमिका फार महत्वाची आहे. या दृष्टीनेच हा परकीय राज्याचा काल सामाजिक सुधारणेस अत्यंत अनुकूल आहे असें ते म्हणतात. "सरकार परकी आहे त्या योगें तें तटस्थ तरी राहूं शकतें. आमच्या प्रयत्नांस त्याच्याकडून तरी अडथळा होत नाही.

१ निबंधसंग्रह १ : पृ. १०१

स्वकीय सरकार असून जर समाजसुधारणाविरोधी मतांचें असेल तर सुधारणेच्या प्रयत्नांत सरकार व लोक या दोहोंचा विरोध होणार व ती अशक्य प्राय होणार." ही भूमिका चूक होती असें म्हणतां येणार नाही. त्यांच्या मतें "व्यक्ति स्वातंत्र्य व समाजबंधन यांच्या ज्या योग्य मर्यादा आहेत त्यांचा अतिक्रम होतो की काय, एवढ्याच धोरणाने कायदा असावा की नाही हें ठरविलें पाहिजे"[१] "बालविवाहाची चाल घातक आहे असा जरी पुष्कळांचा समज झालेला आहे तथापि इतरांचाहि तसा झाला आहे किंवा नाही याविषयी साशंक असल्यामुळे, व आपल्या मुलाबाळांचें हिताहित पाहणें विशेष महत्त्वाचें कर्तव्य असल्यामुळे त्या विचारांचा आचारावर परिणाम घडण्यास जी एक मोठी अडचण आहे ती ह्या कायद्याने दूर होण्यासारखी आहे."[२] कायद्याने सर्वांचींच लग्नें विशिष्ट वयोमर्यादेपुढे होऊं लागतील व 'आपलें एकतरी पाऊल खात्रीने पुढे पडलें असें[१] म्हणतां येईल.

संमतिवयाच्या प्रकरणाने दोन तीन प्रकारचे सामाजिक प्रश्न निर्माण झाले. जो सगळ्यांत गाजला तो प्रश्न म्हणजे संभोगकाल कोणता धरावा ह्या बाबतचा. जुन्या लोकांचें चर्वितचर्वण त्याच प्रश्नावर सुरु राहिलें. टिळकांनीहि त्याच मुद्याचें विच्छेदन फार बारकाईने केलें. त्याबाबत सुधारकांचा जय झाला. पण आगरकरांच्या सारख्यांना तो 'जय' कधीच स्पृहणीय वाटणें शक्य नव्हतें. आगरकरांनी सर्वसामान्य लोकांत चर्चेचा विषय झालेला मुद्दा सोडून दिला. त्याचें वैयर्थकत्व आगरकरांना केवळ स्पष्टपणें दिसत होतें. या वादाच्या अनुषंगाने त्यांनी अगदीं मुळाशीं जाऊन बालविवाह बेकायदेशीर ठरवावा असें पुरस्करिलें आहे. ही खरी शास्त्रशुद्ध भूमिका होय. बालविवाह अनिष्ट म्हटला कीं त्याने ज्या लोकांवर अन्याय केला असेल त्या लोकांस न्याय मिळाला पाहिजे हें क्रमप्राप्त ठरतें. आगरकरांनी त्यासाठी 'विवाह निराकरणा'चा विचार पुढे मांडला होता. बालविवाह बंद झाले कीं मानवी जीवितांत मनुष्यपण येण्याच्या दृष्टीने 'स्वयंवर' 'वल्लभोपासना' 'प्रियाराधन' असल्या गोष्टींचा त्यांनीं

१ निबंधसंग्रह २ : पृ. ७७.

२ कित्ता.

पुरस्कार केला आहे. यावरून इतर पुढाऱ्यांहून आगरकरांचें वेगळेंपण सिद्ध व्हावयास प्रत्यवाय नसावा. रानड्यांनी पूर्वकालीन शास्त्राच्या मान्यतेच्या भूमिकेवरून ह्या विषयाची मांडणी केली. आगरकर "दहा व बारा ह्याच्या दरम्यान निर्माण झालेली अटक कशी आम्ही ओलांडणार?" असा प्रश्न करतात. त्यांच्या दृष्टीने ही मर्यादा १५।१६ पर्यंत जावयास हवी होती. अशा प्रकारें संमतिवयाच्या प्रकरणावरून आगरकरांना दोन तीन मूलगामी विचार मांडावेसे वाटले. ते समाजाला अपरिचित आहेत त्यांची हेटाळणी होणार हें जाणून त्यांनीं शास्त्रीय दृष्टीने ते मांडण्याचें धाडस दाखविलें आहे.

या वादावरून सर्वांत महत्त्वाचा वाद निघाला असेल तर तो म्हणजे सामाजिक सुधारणेस कायद्याचें साहाय्य घ्यावें कीं नाहीं ह्या बाबत. रानड्यांनी कायदा असावयास हरकत नाहीं असें मत दिलें. लो. टिळकांनी हा मुद्दा महत्त्वाचा मानून परकीय सरकारला ह्या आपल्या घरगुती बाबतींत प्रवेश करावयास वाव देऊं नये इ. युक्तिवाद केला. आगरकरांनी ह्या बाबत अत्यंत शास्त्रशुद्ध व ठाम भूमिका घेतली. त्यांच्या मतें सरकार सार्वभौम असतें; त्याला कायदा करायचा तर तें करणारच. सामाजिक बाबतींत सरकारचें धोरण पडखाऊ आहे म्हणूनच हा प्रश्न निर्माण होतो. आगरकरांना सरकारचें परकेपण हें समाजसुधारणेच्या प्रयत्नांना एकंदरीने परिपोषक वाटतें. सरकार नेहमी समाजसुधारणेला अनुकूल असतें असें नव्हे इ. उल्लेख वर आलेलाच आहे.

लोकहितवादीपासून आगरकरांपर्यंत जी प्रगति झाली ती लक्षांत घेण्यासारखी आहे. आगरकरांनी मूलभूत मुद्दे निर्माण करून त्यांची शास्त्रीय व बुद्धिवादी दृष्टीने चिकित्सा केली. लोकहितवादी व रानडे यांच्या पुढली व फार पुढली ती पायरी होती. तथापि आणखीहि कांहीं बाबतींत आगरकरांनी आपले विचार मांडले आहेत. स्त्रियांच्या शिक्षणाचा उपक्रम सुरूं झाला होता. वेगळ्या शाळा मुलींसाठीं निघूं लागल्या होत्या. त्यांत प्रगति झाली होती, व नंतर आतां असा प्रश्न निर्माण झाला होता कीं, स्त्री व पुरुष यांना कोणतें शिक्षण द्यावें. दोघांना एकच द्यावें का वेगळें द्यावें इ. आगरकरांनी या वादाला तोंड फोडलें.

प्राथमिक शिक्षणाबाबत सरकारने जबाबदारी घेऊन सक्तीचें शिक्षण करावें व हें "मुलगे व मुली या उभयतांच्या शिक्षणाविषयीं म्हटलें आहे" असा खुलासा त्यांना करावासा वाटला. "सरकारने लहान मुलांच्या शिक्षणाबाबत जितकी सक्ति केली पाहिजे तितकी मुलींच्या शिक्षणाबद्दलहि केली पाहिजे. किंबहुना मुलींच्या शिक्षणाबद्दल थोडी अधिक केली पाहिजे."[१] त्यांच्यापुढे विद्यापीठीय शिक्षणाचा प्रश्न नव्हता. प्राथमिक शिक्षणाचा प्रमुख प्रश्न होता. आगरकरांनी मुलींना शिक्षण प्रथम द्यावें असें प्रतिपादिलें व त्यासाठीं यूरोपीय व आपणांकडील इतिहासांतील अनेक उदाहरणें दिली व आपलें मत मांडलें. पुढे मुलींना–स्त्रियांस–वरिष्ठ प्रकारचें शिक्षण द्यावें कां नाहीं असा वाद निघाला. तेव्हां आगरकरांनी परत शंका घेतली. मतलबी भेकड लोक मुलींना वरिष्ठ शिक्षण देऊं नये असें म्हणतील पण त्यांना सख्त विरोध केला पाहिजे असा आग्रह त्यांनीं धरला आहे. "ज्याप्रमाणे प्रत्येक मुलास व मुलीस आईबापांनी किंवा बापाने प्राथमिक शिक्षण दिलें पाहिजे असें अलीकडे लोकमत सर्वत्र झालें आहे, त्याप्रमाणेच स्त्रियांनी व पुरुषांनी पाहिजे तो धंदा स्वतंत्रपणें करावा, पाहिजे तितकी विद्या हवी तितकी संपादावी; पाहिजे त्या परीक्षा द्याव्या आणि पदव्या मिळवाव्या; आणि पाहिजे तेव्हा लग्नें करून हवा तसा संसार करावा अशी मोकळीक कालांतराने सर्वांस मिळणार आहे, याची आम्हांस शंका नाहीं."[२] त्यांच्या मतें वाटेल तितकें शिकावें पण "मुलींकडून असल्या परीक्षांचा अभ्यास होण्यास त्या परीक्षा आटपतपर्यंत त्या अविवाहित राहिल्या पाहिजेत, किंवा विवाहित असून त्यास अविवाहितासारखे त्यांच्या नवऱ्यांनी व सासूसासऱ्यांनी राहूं दिलें पाहिजे... पण या पिढींत हें होणें शक्य दिसत नाही"[३] अशा प्रकारें आगरकरांनी स्त्रियांच्या शिक्षणाची जोरदार तरफदारी केली आहे. इतकेंच नव्हे तर स्त्री-पुरुषांना एकच शिक्षण द्यावें व तेंहि एकत्र द्यावें, असा त्यांचा आग्रह आहे. याबाबत त्यांचा मूळ मुद्दा असा कीं पुरुषास पाहिजे ती विद्या शिकण्याची परवानगी आहे स्त्रियांस नाही. त्यामुळे

१ निबंधसंग्रह : पृ. २११
२ कित्ता : पृ. २२८.
३ कित्ता.

"स्त्रियांवर पुरुषांचे वर्चस्व स्थापण्यांत आलें आहे." पुरुषांना वर्चस्वाची गोडी लागली आहे व म्हणून तें वर्चस्व कमी न होऊं देण्याचा त्यांचा आटोकाट प्रयत्न राहणार! आगरकरांना स्त्री व पुरुषांत बौद्धिक दृष्टीने फरक वाटत नाहीं. "सध्या पुष्कळ स्त्रियांच्या बुद्धिमत्तेची विनाकारण नासाडी होत आहे. ज्या कामास जे पुरुष बुद्धिसामर्थ्याने योग्य नाहीत त्यांच्याकडून तीं कामें होत असल्यामुळे व स्त्रियांस तीं करण्याची परवानगी नसल्यामुळे एकंदरींत तीं कामें व्हावीं तशीं होत नाहींत. व मनुष्य जातीच्या सुखास चट्टा बसत आहे. हरएक शास्त्रांत, कलेंत व धंद्यांत स्त्री-पुरुषांची चढाओढ लागून ज्याच्या त्याच्या व जिच्या तिच्या योग्यतेनुरूप व्यवस्था लागली पाहिजे. शास्त्राभ्यास किंवा कलाभ्यास करण्यास स्त्रिया असमर्थ असतील तर त्या तशा ठरतील. पण अनुभवानें तसें ठरेपर्यंत त्यांना कोणत्याहि प्रकारचा प्रतिबंध करणें हा शुद्ध मुलतानी दांडगेपणा होय."[१] एकच प्रकारच्या शिक्षणाचें असें समर्थन केल्यावर सहाजिकपणें 'एकत्र द्यावें' हा विचार त्यांना स्पष्ट करावा लागला आहे. त्यांच्या मतें "मुलांमुलींना एकत्र शिक्षण दिल्याने त्यांना एकमेकांची ओळख पडते... एरवी शिक्षणांत निःसत्वता व एकदेशीयता व्यक्त होते. मुलगे व मुली एकत्र वागल्याने त्यांच्या विषयवासनांवर अपायकारक परिणाम न घडतां उलट त्या शांत-गंभीर होतात, आणि उभयतांच्या मैत्रीचा पाया कोणत्याहि बाह्यांगांवर न घालतां अंतरंगाची चांगली परीक्षा करून त्यावर तो घालण्याचा त्यांचा कल होतो."[२]

आगरकरांच्या स्त्रीजीवनविषयक प्रमुख विचारांचा येथ पावेतों आढावा घेतला. आतापर्यंत आलेल्या प्रश्नाशिवाय आगरकरांनी पुनर्विवाहावरहि लिहिलें आहे. पुनर्विवाहापेक्षा त्यांचा विधवा स्त्रियांना जें लाजिरवाणें जीवन कंठावें लागतें त्यावर फार कटाक्ष आहे. त्यांच्यासारख्या कट्ट्या व्यक्तिस्वातंत्र्यवाद्याला ह्या सक्तीच्या संन्यासाबद्दल चीड यावी व तिरस्कार वाटावा हें साहजिक आहे. लोकहितवादींप्रमाणे त्यांनी पुरुषांची व स्त्रियांची तुलना केली. ते विचारतात, "बायको मेल्याची वार्ता येतांच बेशुद्ध होऊन परलोकवासी झालेल्या भार्यारतांचीं उदाहरणें कधी तरी ऐक-

१ निबंधसंग्रह २ : पृ. २३३.

२ कित्ता पृ. २३८.

अनुक्रमांक 27002 वि. नि. कं.
क्रमांक 5023 नों: दि: १९३

ण्यांत येतात काय ?" तथापि या विषयावर त्यांनी केवळ चिडून लिहिलें व अधिक गंभीर व मूलभूत स्वरूपाचे जे प्रश्न होते त्यांची ऐतिहासिक दृष्टिकोणांतून शास्त्रशुद्ध चिकित्सा केली. आगरकरांच्या इतकी स्त्रीजीवनाच्या विविध अंगोपांगांची शास्त्रशुद्ध चिकित्सा १९२० पर्यंतच काय पण आतापावेतो कोणी केलेली नाहीं. स्त्रियांची बाजू तितक्या सडेतोडपणें आणि तडफेने स्त्रिया मांडूं शकतील तितक्या सडेतोडपणे तडफेने व पोटतिडीकेने आगरकरांनी मांडली आहे. आगरकरांच्या स्त्रीजीवनविषयक प्रमुख विचारांचें दिग्दर्शन करविल्यानंतर त्यांनी त्याबाबत जी महनीय कामगिरी केली तिचें समालोचन करणें जरूर आहे. पण तत्पूर्वी त्यांचे सहकारी व महाराष्ट्राचे श्रेष्ठ विचारवंत लोकमान्य टिळक यांच्या विचारांचा मागोवा घेणें प्राप्त आहे नंतरच आगरकरांचें तौलनिक मोठेपण स्पष्ट होईल.

लो. टिळक व स्त्रियांचे प्रश्न

लोकमान्य टिळकांचे सामाजिक सुधारणेबाबतचे विचार प्रारंभी आगरकरांशी बरेचसे जुळते होते असें दिसतें. १९१६ मध्ये आगरकरांच्या मृत्यूनंतर २१ वर्षांनी जेव्हा आगरकरांची पुण्यतिथि पहिल्याने साजरी झाली तेव्हा टिळकांनी ही गोष्ट स्पष्ट केली आहे. "टिळक आणि आगरकर यांचा जो मतभेद झाला तो राजकीय बाबतींत नाही आणि शिक्षणाच्या बाबतींतहि नाही... मतभेद धार्मिक आणि सामाजिक बाबतींत उत्पन्न झाला होता."[१] "आगरकर धर्मदृष्ट्या केवळ बौद्धिकवादी होते. आणि तोच पंथ सामाजिक बाबतींतहि निदानपक्षी आपल्या लेखांत त्यांनी स्वीकारला होता..." "समाजावर तार्किक हल्ले करणें म्हणणे केवळ पाडापाडीचें काम करणें होय. त्याने समाजाचीं बंधनें मात्र शिथिल होतात पण नवीं मात्र निर्माण होत नाहीत..."[२] असें टिळकांचें म्हणणें आहे. टिळक आणि आगरकर ह्या दोन महापुरुषांच्या विचारांत जो भेद होता तो टिळकांच्याच शब्दांत वर आलेला आहे. आगरकरांची भूमिका टिळकांनी निश्चितपणें चांगली मांडली आहे.

---

१ लो. टि. के. ले. ४ : पृ. ५३५

२ कित्ता.

सामाजिक बाबतींत आगरकरांचीं मतें टिळकांना सामान्यतः मान्य होतीं. संमतिवयाच्या वादांत टिकळांनी आगरकरांविरुद्ध भूमिका घेतली तरी त्यांनी समाजसुधारणेचा प्रश्न अवमानला नाही. समाजसुधारणेबाबत एक शपथपत्रक तयार करून त्याच्याशी सह्या करणारांनी एकनिष्ठ राहावें असा एक मार्ग काढून टिळकांनी स्वतः सुद्धा सही केली होती. त्यांत मुलीचा १६ व्या वर्षापूर्वी विवाह करूं नये असें एक कलम होतें. त्यावर थोड्या लोकांनी सह्या केल्या. पुढे हा मार्ग मागे पडला. पण टिळकांची समाज व विशेषतः स्त्रीजीवनविषयक सुधारेणेची आस्था हा प्रयत्न दर्शवितो. धार्मिक शिक्षण शाळांतून सक्तीचें असावें असें न्या. मू. रानडे, भांडारकरांनी पुरस्कारिलें त्याला आगरकरांनी विरोध केला. त्यावेळी टिळकांनी आगरकरांना साहाय्य केलें. पुनर्विवाह प्रकरणीं केसरींत टिळकांनी लेख लिहिले. " पुनर्विवाहाचें नांव काढल्याबरोबर मार्थे फिरून जाणाऱ्या व अंधपरंपरेने प्राचीन स्मृत्यादि ग्रंथांचे गोडवे गाणाऱ्या धर्माभिमान्यांच्या लक्षांतून शास्त्रनिषिद्ध असून अलिकडे बोकाळलेला हा पुरुषपुनर्विवाह कसा अजिबात गळाला ह्याचें आम्हांस आश्चर्य वाटतें. " [१] यावरून पुनर्विवाहावरहि टिळकांनी मत व्यक्त केलें आहे. टिळक व आगरकर यांचे सामाजिक सुधारणेबाबत मूलभूत मतभेद होते असें पुढेपुढे स्पष्ट झालें आहे.

ह्या मतभेदांचें स्वरूप पाहूं—पुनर्विवाह हा प्रश्न घेतला तरी काय आढळतें ? आगरकर, लोकहितवादी, रानडे आदि सुधारकांनीं स्त्रियांना पुनर्विवाहाची परवानगी असावी असें प्रतिपादले तर टिळकांनीं काय प्रतिपादिलें ? टिळकांनीं स्त्रियांची परवानगी मान्य केली नाहींच पण पुरुषांना जी पुनर्विवाहाची सवलत रूढीने दिली आहे तीहि काढून घ्यावी असा सल्ला देऊन विधुरावस्थेत देशसेवेला आयुष्य देण्याचा सल्ला टिळकांनीं दिला आहे. [२] यावरून लोकमान्यांना रानडे लोकहितवादींची मानवता प्रधान दृष्टीहि मान्य नाहीं तर आगरकरांची व्यक्तिस्वातंत्र्यवादी दृष्टि कशी संमत होणार ?

---

१ लो. टि. के. ले. ४. : पृ. १३०–१४०.

२ लो. टि. के. ले. ४ : पृ. १३०–१४०.

समाज-बंधनाच्याबाबतहि तसेंच. आगरकर म्हणतात कीं, व्यक्ति-मात्रावर जितकीं कमीतकमी बंधनें असतील, जितकें जास्तींत जास्त स्वातंत्र्य उपभोगतां येईल तितकें इष्ट, तर टिळक वर उधृत केलेल्या वचनांत समाज-बंधनें (तार्किक हल्ल्याने) कमी होतात व नवी निर्माण होत नाहीत म्हणून इळहळ व्यक्त करतात.

संमतिवयाच्या वादांतहि असेंच दिसून येतें. टिळकांचा कायद्यांत कोणतेंहि कलम घालण्यास विरोध होता. त्यासाठीं त्यांनीं जो युक्तिवाद केला तो केवळ अपूर्वच होता. आपखुशीने मुलीच्या वयाची मर्यादा १६ वर्षें ठेवावी अशी संमति देणाऱ्या टिळकांनीं कायद्यांत संभोगसंमतीचें वय १० वरून १२ वर नेण्यास विरोध केला आहे! संमतिवयाच्या वादांत त्यांची भूमिका समर्थनीय वाटत नाहीं. न्या. मृ. रानड्यांच्या युक्तिवादाचें टिळकांनीं सविस्तर खंडन केलें आहे. त्यानें काय साधलें? सुधारणा–विरोध फक्त वाढला. वस्तुतः पूर्वकालीन साहित्यांतील उल्लेख हे परस्परविरोधी आहेत. आपलें मत असेल त्याप्रमाणें अनुकूल प्रतिकूल उल्लेखांचा उपयोग करावयाचा असतो, हें स्पष्ट असतांना त्यांनीं संमतिवयाला जो विरोध केला तो समर्थनीय वाटत नाहीं.

संमतिवयाच्या वादाच्या अनुषंगाने कायदा व सामाजिक सुधारणा असा प्रश्न निघाला तेव्हांहि टिळकांनी कायद्याचा अवलंब करूं नये असें म्हटलें आहे. त्यांच्या मतें "समाज सुधारणेचा प्रश्न जितका प्रचंड व घोटाळ्याचा तितका नाजूकहि आहे. सामाजिक सुधारणा म्हणजे हिंदु-समाजाच्या पूर्वपरंपरेचें निर्मूलन करणें नसून नवीन परिस्थितीस योग्य असें तिला स्वरूप देणें होय. समाजसुधारणा म्हटली की एकदम सुरुंग लावून जुन्या समाजाचा धुव्वा उडवणें नव्हे..."[१] 'समाजदोष हा आत्मदोष व राजकीय दोष हा परदोष होय'... इ. विधानांवरून असें स्पष्ट दिसतें की टिळकांना समाजसुधारणेची निकड नाहीं. निकड नसल्याने कायद्याचें साहाय्य घेण्याचा प्रश्नच उद्भवत नाहीं. "सारांश आपल्या व्यवहाराची व सामाजिक रीतीभातींची सुधारणा करणें असल्यास, ती आपली आपणांसच केली पाहिजे.....व तसें करण्यासहि मुख्य साधन म्हटलें म्हणजे...

१ केसरीप्रबोध : पृ. २

स्त्रिया व मध्यम प्रतीचे लोक यांच्यांत या गोष्टीची विशेष चळवळ सुरू केली पाहिजे, हें होय... बहुमत आपल्या बाजूचें झाल्याखेरीज हल्लीच्या काळांत कोणासहि कोणत्याहि प्रकरणीं यश येण्याची आशा राहिली नाहीं."[१] याचा अर्थ सामाजिक सुधारणा बहुजनसमाजास नको आहे–वा नको होती–म्हणून ती टिळकांना नको होती. हलके हलके सबूरी सबूरीने ती होणें जरूर होतें. सुधारक लोक सरकारचा आश्रय घेतात व लोकांस नको असलेली 'सुधारणा' त्यांच्यावर लादतात अशी टिळकांची तक्रार आहे. संमतिवयाच्या वादांत तीच स्पष्ट होते. असें असलें तरी टिळकांना सामाजिक सुधारणा–स्त्रीजीवनविषयक सुधारणा–तत्त्वतः अमान्य आहे असें नाही. पण त्यांचा रोख आपल्या जुन्या परंपरागत विचारांना ती धरून असावी.

या भूमिकेंतून दोन तीन मुद्दे पुढे येतात. पहिला तत्त्वतः त्यांना कांही सुधारणा मान्य आहेत. पण त्याहि पूर्वपरंपरेस धरून असाव्या असा त्यांचा आग्रह आहे. सुधारणा व पूर्वपरंपरा यांत विरोध आला की टिळक पूर्वपरंपरेला चिकटून बसणार. आगरकरांपुढे असा प्रश्न आला की आगरकर पूर्वपरंपरेला धुडकावून लावणार हा दोघांच्या विचारांत मूलभूत फरक आहे त्याचें तात्विक स्वरूप ध्यानांत घेणें जरूर आहे. आगरकर व्यक्तिस्वातंत्र्यवादी व बुद्धिवादी असल्याने त्यांना त्या निकषावर घासलेली कोणतीहि गोष्ट– मग ती कितीहि धक्का देणारी असो– स्वीकार्य आहे. टिळकांना हीं दोन्ही मूल्यें मान्य नाहींत. त्यांना पूर्वकालीन समाजरचना ही 'शास्त्रशुद्ध' आहे असें वाटतें. त्या विचारांत कांही समाजपोषक बंधनें आहेत त्यांचा परित्याग होता उपयोगीं नाही. तसें झालें तर समाजरचना उध्वस्त होईल अशी त्यांना भीति वाटते, व म्हणून ते व्यक्तिस्वातंत्र्यप्रधान समाजरचनेमुळेच सोसावीं लागणारीं दुःखें ह्याबाबत सहानुभूति बाळगूं शकत नाहींत. सुधारकांच्या सुधारणांनी समाजबंधनें कमी होतात अशी त्यांची तक्रार आहे. 'पुनर्विवाहा' बाबत लिहितांना त्यांनी स्त्रियांच्या पुनर्विवाहाबद्दल एक शब्दहि न लिहितां पुरुषांनीच पुनर्विवाह करण्याचें स्वातंत्र्य टाकून न करण्याचें बंधन पत्करावें. सुधारणावादी विचारांची ही मजेशीर प्रतिक्रिया आहे. या भूमिकेमुळेच समाजसुधारणेबाबत टिळक उदासीन आहेत.

---

२. लो. टि. के. ले. ४. पृ. १०९.

जेव्हां जेव्हां ह्या बाबत प्रश्न निर्माण झाला तेव्हां तेव्हां त्यांनीं जुन्या शास्त्रांतील परंपरावर्धक गोष्टीवर भर दिला व सुधारणेस विरोध केला आहे.[1]

परकीय सरकार व लोकविरोध हीं कारणें त्यांना समर्थनपर होतीं. सुधारक लोक परकीयसरकारच्या लोकविरोधी गोष्टीसाठीं आश्रय घेतात असा त्यांचा गंभीर आक्षेप आहे. या युक्तिवादास आगरकरांनी समर्पक उत्तरें दिलीं आहेत व आजहि तीं समर्पक वाटतात. लोकांच्या मतांसाठी अवलंबून राहिलो तर सुधारणा करण्यासाठीं कल्पांतापर्यंत थांबावें लागेल. टिळकांची थांबायला तयारी आहे. आगरकरांना " कोणी तरी अस्तित्वांत असलेल्या लोकमतांतील दोषस्थलें दाखविण्याचें व समाजांतील बहुतेक लोकांस अप्रिय परंतु पथ्यकारक असे विचार त्यांच्यापुढें आणण्याचें अनभिमत काम करावयास तयार झालेंच पाहिजे. असें करण्यास लागणारें धैर्य ज्या समाजांतील कांही व्यक्तींच्यासुद्धा अंगीं नसेल त्या समाजांनीं वर डोकें काढण्याची आशा कधीहि धरूं नये[2] असें बजावावेसें वाटतें. आगरकरांच्या विचारांना निश्चित तार्किक बैठक आहे, टिळकांच्या विचारांना पारंपारिक विचारांची आहे यामुळे ते सुधारणाविरोधी आहेत.

परकीय सरकारच्या परकीपणाबद्दलहि असाच मतभेद आहे. आगरकरांचे विचार यापूर्वी आलेच आहेत. टिळकांना परकी सरकारला 'घरगुती' गोष्टींत हात घालण्याची संधि द्यायला नको आहे असें वरपांगीं वाटतें. पण हा दावा सरकारच्या " सार्वभौमत्वा "च्या पूर्णपणें विरुद्ध आहे. कोणतेंहि सरकार असलें बंधन मान्य करणार नाहीं. टिळकांना सुधारणा तत्वतः नको असल्याने हें एक कारण त्यांना पोषक मिळालें एवढेंच. आगरकरांना सरकारचें सामाजिक बाबतींतलें उदासीनपण ती सुधारणा करून घेण्याच्या दृष्टीने पोषक वाटते. उलट टिळकांना सरकारचें परकीपण सामाजिक परंपरा टिकवून धरण्यास पोषक असावें असें वाटतें. दोघांमधला हा विरोध मूलगामी आहे.

स्त्रीशिक्षणाच्या बाबतहि तसेंच. आगरकरांना पुरुषांना व स्त्रियांना

---

१. नि. सं. १ पृ. ६.

२. संमितीवयाच्या वादांत रानड्यांचा अर्थवाद त्यांनीं याच भूमिकेवरून खोडून काढला.

सारखें व एकत्र शिक्षण द्यावें असें वाटतें. तर टिळकांचा शिक्षण-पद्धतीला व आज दिलें जाणाऱ्या शिक्षणालाच विरोध आहे. आगरकरांना स्त्रियांना चरितार्थ संपादन करण्याचें शिक्षण द्यावयास हवें आहे तर टिळकांची मजल ज्याला व्यापक अर्थानें 'गृहशिक्षण' म्हणतां येईल त्याच्या पलीकडे जात नाही. केसरींत त्यांनी स्त्रीशिक्षणाच्या ह्या स्वरूपावर आक्षेप घेणारे पांच सहा लेख लिहिले आहेत. त्यांच्याप्रमाणें पुरुष शिकून नोकऱ्या करतात व नोकऱ्या करणें म्हणजे परक्यांच्या लाथा खाणें. म्हणून ते म्हणतात, "स्त्रीजातीचा ज्यास यत्किंचित् अभिमान आहे तो आमच्या प्रमाणे परकीय प्रभूंच्या लाथा खाण्यास आमच्या स्त्रियांनी तयार व्हावें असें कदापि म्हणणार नाही."[१] स्त्रियांनी व्यवसाय करण्यासारखी परिस्थिति आपल्याकडे कित्येक शतकेंपर्यंत येणार नाही. बी. ए., एम्. ए. स्त्रिया झाल्या तरी एकंदर स्त्रीसमूहाची सुधारणा व्हावयाची नाहीं. "करितां एकंदर स्त्रीसमूहास संसारोपयोगी शिक्षण देण्याची व्यवस्था जर फीमेल हायस्कुलाकडून होणार नाही तर तें असून नसून सारखेंच आहे."[२] असा निःसंदिग्ध इशारा त्यांनी दिला आहे. टिळकांच्या भूमिकेशी हे विचार सुसंगत आहेत. त्यांना स्पष्ट दिसत होतें की स्त्रिया शिकल्या कीं व्यक्तित्वाची जाणीव निर्माण होणार. ती निर्माण झाली कीं समाजाने त्यांच्यावर लादलेलीं बंधनें कमी करण्याचा प्रश्न येणार. बंधनें कमी झालीं की समाजरचना शिथिल होणार. व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार मान्य नसल्याने, व बुद्धिप्रामाण्याच्या ऐवजी पूर्वकालीन 'शास्त्रकारां'चे विचार प्रमाण मानायची प्रवृत्ति असल्याने हे सारे विचार केवळ सुसंगत ठरतात.

आधुनिक कालांतले प्रमुख 'राष्ट्रसुधारक' म्हणून टिळकांच्या स्त्री-विषयक विचारांचा उहापोह येथे केला. त्यावरून टिळकांची भूमिका स्पष्ट होईल. टिळकांनी समाजसुधारणेंत 'रस' का घेतला नाही ह्याचा पण उलगडा होईल.

तथापि टिळकांनी आपली 'विधायक' दृष्टि मांडल्याचें एक अस्पष्ट उदाहरण आहे. 'केसरी'तले कांही लेख हे त्या दृष्टीने त्यांतल्या त्यांत

---

१. लो. टि. के. ले. ४ पृ. ७७.

२. कित्ता पृ. ८२.

परिपोषक आहेत. पण ह्या लेखांतून ज्या विचारांचा पुरस्कार टिळकांनी केला ते विचार स्वतः टिळकांचे नाहीत. व त्या विचारांची कक्षा पण फार मोठी नाही.

भारताचार्य वैद्य व भारतीय 'अबला'

'भारताचार्य' म्हणून विख्यात असलेले कै. चिंतामण विनायक वैद्य यांनी "अबलोन्नति लेखमाला" लिहिली. तिचे कांही लेखांक त्यांनी केसरीबरोबर स्वतंत्रपणें वाटण्याची व्यवस्था केली. सर्व लेखमाला लिहून झाल्यावर टिळकांनी तिला पोषक असें लिहिलेंहि आहे. ह्या लेखमालेंत स्त्रीजीवितविषयक विवाद्य प्रश्नांपैकी (तत्कालीन) बालविवाह व पुनर्विवाह या दोन प्रश्नांचा उहापोह केलेला आहे. त्यांत बालविवाहाला वैद्यांनी 'अशास्त्र' ठरविलें आहे व केवळ अज्ञानाने ती प्रथा टिकली आहे असा त्यांच्या लेखनाचा मतितार्थ आहे. त्यांनी बालविवाहापासून होणारे तोटे पण सविस्तरपणें विवेचिले आहेत. केसरीने ह्या पुस्तकांचा (कारण केसरी अंकाबरोबर ही स्वतंत्र पुस्तकेंच वाटलीं होतीं) अभ्यास करावा व मध्यमप्रतीच्या लोकांनी ह्या दृष्टीने विचार करावा असा सल्ला दिला आहे. तथापि बालविवाहाच्या बाबतींत 'केसरी' चें मत "ऋतुकाळापूर्वी दोन तीन वर्षें विवाह करण्याची पद्धत निदान अडीच हजार वर्षांपासून तरी या देशांत चालत आहे... भवभूति, कालिदास, यांनी आपल्या नायिका मोठ्या कल्पिल्या म्हणून त्या वेळचा तसा प्रघात होता असें म्हणणें प्रशस्त नाही."[1] असें आहे. या प्रकरणांत बालविवाहाने संततिवर प्रतिकूल परिणाम होतो हें वैद्यांचें म्हणणें टिळकांनी खोडून काढलें आहे. टिळकांचें मत सुधारणेला विशेष अनुकूल नाही पण लेखक एक प्राचीन शास्त्रांत गाढा विद्वान् व मित्र असल्याने त्यांनी एकंदरीने उत्तेजनपर लिहिलें आहे असें दिसतें.

ह्याच लेखमालेंत वैद्यांनी असंमत वैधव्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यांच्या मतें ज्या स्त्रिया अगदीच लहानपणी विधवा झाल्या त्यांचे विवाह करावा. "स्मृतींचा अभिप्राय फक्त अप्राप्त मैथुना विधवेचे

---

१ लो. टि. के. ले. पृ. ११६

विवाह वेदोक्त संस्काराने होऊं शकतो असाच आहे" [1] वैद्यांच्या मतें प्राप्त मैथुना विधवांचा विवाह हा अशास्त्र आहे पण अप्राप्त मैथुना विवाह रुढ करावयाला कांही शास्त्राची हरकत नाही. 'अबलोन्नति लेखमाला' हें ह्या कालखंडांत स्त्रीजीवनावर स्वतंत्रपणें लिहिलेलें सर्वांत मोठें पुस्तक होय. वैद्य स्वत: वृत्तीने शास्त्रप्रामाण्यवादी आहेत. पूर्वकालीन शास्त्रांचें आलोडन करून त्यांनी दोन सुधारणा शास्त्रसंमत ठरविण्याचा यत्न केला. पहिली बाललिवाहविरोध ही होय. वैद्यांच्या मतें पूर्वी बालविवाह नव्हता. पुढे केव्हातरी (सूत्र कालानंतर) तो अंमलांत आला. टिळकांची प्रतिक्रिया वर दिलीच आहे. दुसरी सुधारणा म्हणजे ज्या स्त्रियांना अगदी बाळपणीं वैधव्य प्राप्त झालें आहे त्यांना मोकळीक ठेवणें ही.

स्त्रीजीवनविषयक सुधारणेच्या दृष्टीने ह्या सुधारणा वास्तविक कांहीं फारशा मोठ्या नव्हत पण लेखक हे शास्त्रमतप्रामाण्यवादी असल्याने त्यांच्या मतावरून जुन्या मतांच्या विचारांतहि कशी जागृति होत होती, त्यांनाहि एकंदर परिस्थिति बदलावयास हवी व शास्त्राचा आधार त्यासाठी कोठवर घेतां येईल असें वाटूं लागलें होतें हें स्पष्ट होतें. त्या दृष्टीने वैद्यांच्या प्रयत्नांचा विचार करावा लागतो.

१८८० ते १९२० ह्या कालखंडांतील प्रमुख विचारवंत म्हणजे न्या. मू. रानडे, लो. टिळक व आचार्य आगरकर हे होत. ह्या तिघांच्या स्त्रीजीवनविषयक विचारांचें स्वरूप कोणतें होतें त्याचा उहापोह आतापर्यंत केला. रानडे, आगरकर व टिळक यांच्या विचारांतील फरक त्यांनी ज्या विशिष्ट ध्येयप्रणालींचा अवलंब केला त्या द्वारेंच होऊं शकतो. व म्हणून विचारसरणींतील तात्त्विक फरक प्रारंभीं विवेचकतेने दर्शविला आहे. त्या विचारप्रणालींच्या आधारें त्यांचे स्त्रीजीवितविषयक विचार निश्चित झाले आहेत. त्यांचें दिग्दर्शन आतापर्यंत झालें. स्त्रीजीवनाच्या दृष्टीने सामान्यत: दोनच परस्परविरोधी पक्ष दृष्टीपुढे येतात. रानडे, आगरकर हे या बाबतींत एकाच पक्षांत गणावे लागतात. तथापि त्यांच्या तात्त्विक भूमिकेंत बराच फरक आहे ही गोष्ट दृष्टिआड करणें श्रेयस्कर होणार नाही. लोकमान्य टिळकांचा व त्यांच्यासारखे विचार धारण करणाऱ्यांचा दुसरा पक्ष आहे.

---

१ अबलोन्नति लेखमाला पृ. ३८३.

ह्या पक्षांतील प्रमुख लेखक म्हणून चिं. वि. वैद्य यांचा उल्लेख करावयास हवा. महाराष्ट्रांत राजकीय स्वातंत्र्याचा आग्रह धरणारे विविध पुढारी व लेखक सामाजिक बाबतींत सामान्यतः उदासीन राहिले आहेत. इतिहासाचार्य राजवाडे, शि. म. परांजपे ह्यांचीं नांवें ह्या संबंधांत आठवणीत येतात. या पैकी कोणी ह्या विषयावर जाणून बुजून मतप्रदर्शन केलें नाहीं, पण मधून मधून केलें तें उपरोध व विरोध यांनी परिप्लुत असें. शिवरामपंतांच्या लेखनांतील कांहीं स्थलांचा उल्लेख वर आलेलाच आहे. या बाजूचें एक नांव लक्षांत ध्यावयास हवें व तें म्हणजे प्रि. महादेव शिवराम गोळे यांचें. त्यांनी आपल्या 'हिंदुधर्म आणि सुधारणा' ह्या ग्रंथांत सामाजिक सुधारणेच्या सर्व प्रकारच्या प्रयत्नांचा कथा माध्यमाद्वारें पद्धतशीर उपहास केला आहे. तार्किक युक्तिवादाचा अवलंब न करतांना एका कल्पित कथेच्या आधारें सुधारणाविरोधी विचार अभिव्यक्त केले आहेत. स्त्रीजीवनविषयक सुधारणेस किती तीव्र विरोध कांही लोकांचा होता ह्याची कल्पना ह्या पुस्तकावरून चांगली येते.

सुधारणेस विरोध करणारे विचार जसे प्रसृत होत होते तसे सुधारणेचा पुरस्कार करणारेहि. पण विरोधकांचें प्रमुख वृत्तपत्र 'केसरी' हेंच झालें. समाजसुधारणेचा पुरस्कार करणारें 'सुधारक' पत्र आगरकरानंतर थोडे दिवस चालविण्याचा प्रयत्न झाला. पण तें बंद पडलें. त्यानंतर 'करमणुकी'च्याद्वारां हरिभाऊंनी मनोरंजनाच्याद्वारां सुधारणाविचार जिवंत ठेवण्याचा यत्न केला. निबंधचंद्रिका व मनोरंजन हा एक उपक्रम लक्षांत घेण्यासारखा आहे. त्या नियतकालिकांत 'स्त्री व पुरुष' यांतील साम्य व भेद यांचा चिकित्सक विचार करणारी एक प्रदीर्घ लेखमाला येऊन गेली. पुढें समाजसुधारणेला व विशेषतः स्त्रीविषयक सुधारणाविचारांचा पुरस्कार करणारें "मासिक मनोरंजन" हेंच ह्या बाबतींत महत्त्वाचें मुखपत्र होय. महाराष्ट्रांतील स्त्रीसुधारणावादी लोकांनीं प्रामुख्याने ह्याच मासिकाद्वारें आपले विचार समाजापुढें मांडले आहेत.

समाज-सुधारणेच्या व विशेषतः स्त्रीविषयक सुधारणा करण्यांत ज्या लोकांचा मोठा हातभार लागला आहे त्यांत राजाराम रामकृष्ण ऊर्फ राजारामशास्त्री भागवत ह्यांचा आवर्जून उल्लेख करावयास हवा. राजाराम-

शास्त्री हे समाजसुधारक म्हणून प्रसिद्ध आहेत. स्त्रियांच्या विषयींच्या त्यांच्या मतांत पुढें फरक पडून ते सुधारक झाले. प्रसिद्ध वादाच्या बाबतींत त्यांनीं विधवाविवाहास अशास्त्र ठरविलें होतें व हें त्यांचें मत पाहून सुधारक लोकांस आश्चर्य वाटणें साहजिकच होतें. बरेंच दिवस त्यांचें मत तसें होतें. पण पुढे पुढे अधिक अनुभवाने व चिंतनाने त्यांचें ह्या बाबतचें मत बदललें व विवाहास तें अनुकूल झालें. त्यांनीं त्याला सशास्त्र ठरविलें. विधवासाठीं गृह पाहिजे, प्रत्येक जमातीने तशीं गृहें बांधावीं इ. कल्पना बोलून दाखविल्या. स्त्रियांच्या शिक्षणाबाबतींतहि त्यांना सहानुभूति होती. स्त्रियास शिक्षणाची जरूरी आहे. " गायत्री मंत्र हा स्त्रीला व पुरुषाला त्याचप्रमाणें ब्राह्मणाला व शूद्राला मिळण्याचा सारखाच अधिकार आहे." असें ते मानीत.[1]

सुधारणेच्या बाजूनें ह्या कालखंडांत तयार झालेला मोठा ग्रंथ म्हणजे " स्त्रियांची परवशता " हा होय. हा ग्रंथ श्री. गोविंदराव कानिटकर यांनीं लिहिला व तो मिल् ह्या प्रख्यात इंग्रजी लेखकाच्या " सबजेक्शन ऑफ् वुमेन " ह्या ग्रंथाचें भाषांतर आहे. सुधारणावादी लोकांत दोन प्रकार होते. केवळ स्त्रियांच्यावरील विविध अन्यायाची जाणीव होऊन सहानुभूतिशील झालेले. ह्यांच्यापैकीच कांहींनी ह्या चळवळीस वा सुधारणांस समाजमान्यता मिळावी अशा बुद्धीने समाजसुधारणेचीं तत्त्वें पूर्वशास्त्रास संमत आहेत असे सिद्ध करण्याचा यत्न केला. पूर्वकालीन लोकांबद्दल अतिशय आदर असल्याने या लोकांना असें वाटलें की अशा अमानुष चालींना वा रूढींना शास्त्रकार मान्यता देतील तरी कशी? त्या दृष्टीने त्यांनी यत्न केला. त्यांना अनुकूल उल्लेख असणेंहि अपरिहार्य होतें व त्यांच्या आधारावर त्यांनी आपला युक्तिवाद आधारला. दुसरे कांही व्यक्तिस्वातंत्र्यवादी व बुद्धिप्रामाण्यवादी होते. त्यांना हा विचार परकीय आहे हें पटलें व त्या दृष्टीने त्याचें त्या ग्रंथकारांच्या आधारेंच स्पष्टीकरण करून घ्यावयास हवें हेहि समजलें. अशा पाश्चात्य ग्रंथकारांत जॉन् मिल् हा प्रमुख होय. त्याचा आताच उल्लेखिलेला सुप्रसिद्ध ग्रंथ तत्कालीन सुधारणावादी लोकांच्या वाचण्यांत होता. त्या योगें त्याचा अनुवाद करण्याचा प्रयत्न झाला. महाराष्ट्रांतील स्त्री–

१. राजारामशास्त्री भागवत : दुर्गा भागवत पृ. २२.

जीवनविषयक वाङ्मयांत १९२० पर्यंतच्या कालांत ह्या ग्रंथाचें स्थान महत्त्वाचें आहे. मिल् हा पूर्णपणें व्यक्तिस्वातंत्र्यवादी असल्याने त्याने स्त्रियांच्या विविध प्रश्नांबद्दल चर्चा केली आहे. वस्तुस्थिति अशी होती कीं, त्याचें सर्व विवेचन प्रामुख्यानें ब्रिटीश स्त्रीला उद्देशून आहे. इंग्लिश स्त्रीचा आपल्याला मतदानासारखा राजकीय व नागरिक हक्क मिळावा ह्यासाठी लढा गेल्या शतकाच्या मध्यापासून (त्यापूर्वीच १८३२ पासून) सुरू झाला होता. स्त्रियांना तिकडेहि विशेषसे हक्क नव्हते. ते हक्क मिळविण्यासाठी त्यांची धडपड होती. त्या वादांत स्त्रियांची बाजू मांडण्यासाठी हा ग्रंथ मूळ ग्रंथकाराने लिहिला. आपल्या देशांत जेव्हा समान परिस्थिति निर्माण झाली तेव्हां लोकांचें साहजिकपणेंच ह्या ग्रंथाकडे लक्ष जाऊं लागलें. ह्या ग्रंथांत स्त्रियांच्या शिक्षणाची व हक्कांची तरफदारी व्यक्तिस्वातंत्र्याच्या व मानवी भूमिकेंतून केली आहे. 'व्यावहारिक, राजकीय, सामाजिक व गृहविषयक अशा सर्व संबंधांत स्त्रिया व पुरुष यांची समता मानिली पाहिजे. म्हणजे, उभयांस हक्क सारखे ठेवून हल्लींचा त्यांचा सेव्यसेवक संबंध मोडून नवा समानाधिकारयुक्त असा संबंध प्रस्थापित केला पाहिजे. अत्यंत उपयुक्ततेच्या दृष्टीनें हें समतेचें तत्त्व मान्य करणें आवश्यक आहे...समाजांतील सर्व व्यक्ती न्याय दृष्टीला सारख्या मानल्या पाहिजेत...' बळी तो कान पिळी' या तत्त्वाचा इतर सर्व बाबतींत किंवा संबंधांत ज्याअर्थी त्याग करण्यांत आला आहे; त्याअर्थी तें तत्त्व स्त्रीपुरुषांच्या संबंधापुरतें तेवढेंच कायम ठेवणें योग्य होणार नाहीं."[१] असे विचार या पुस्तकांत आले आहेत. साहाजिकच एक नवी दृष्टि व नवा पाया स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोणाला मिळाला आहे. हरिभाऊंच्या कादंबरीतील गणपतराव, मिल्च्या या पुस्तकास साक्ष ठेवून शपथ घेतो तें अत्यंत महत्त्वाचें व अर्थपूर्ण आहे. स्त्रीजीवनविषयक प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांत ह्या ग्रंथांस अग्रस्थान द्यावें लागेल.

१८८० ते १९२० ह्या कालांत झालेल्या स्त्रीजीवनाविषयक प्रश्नांची चिकित्सा करणाऱ्या प्रमुख ग्रंथांचा इ. उल्लेख केला. त्या वरून ह्या बाबत जे दोन पक्ष निर्माण झाले होते त्या दोनही पक्षांचे आपापल्या बाजूचा प्रचार करण्याचे प्रयत्न चालू होते ह्याची कल्पना येईल. ह्या शिवाय निरनिराळ्या

१. 'स्त्रियांची परवशता' कानिटकर: प्रस्ता. पृ. ९

लेखकांनी लिहिलेलीं ५०।६० पुस्तकें ह्या कालांत प्रसिद्ध झालीं. त्यांची नोंद शं. ग. दाते ह्यांच्या 'ग्रंथसूचि' मध्ये आढळते. त्यापैकी बहुतेक पुस्तकें आकाराने लहान आहेत. व आंतील प्रश्नांचें स्वरूपहि प्रायः प्रासंगिक आहे. स्त्री–शिक्षण, विधवाविवाह, बालविवाह, केशवपन इ. प्रमुख विषयांवर हे सारे ग्रंथ आहेत. त्यांच्यांत प्रतिबिंबित झालेली विचार-सरणी त्या त्या पक्षाच्या भूमिकेला साजेशी अशी आहे. प्रवर्तकांच्या विचार-सरणींचें थोडें कमजास्त करून लेखकांनी अनुकरण केलें आहे. नांव घेण्या-सारख्या कृतींचा उल्लेख येथे आवश्यक त्या विस्तृतपणें केलेलाच आहे.

ह्या पुस्तकांच्या प्रसिद्धि कालाकडे लक्ष दिलें असतां असें आढळून येते कीं, त्या पैकी बहुसंख्य ग्रंथ हे १८९० च्या सुमारास म्हणजे संमति-वयाचा वाद ज्या वेळीं जोरांत होता त्यावेळीं लिहिले आहेत.[1] त्यांचे विषयविवेचन अर्थातच प्रासंगिक आहे. सामान्यतः असें दिसून येतें की, १९०५ नंतर राजकीय प्रश्नांना प्राधान्य मिळालेलें आहे. लो. टिळकांचे 'केसरी' तील लेख पाहिले तरी हेंच आढळतें. स्त्रियांचा प्रश्न १९०५ नंतर मागे पडूं लागला. राष्ट्रीय पुनरुज्जीवनाचा विचार जोरावला. महाराष्ट्राच्या व हिंदुस्थानच्या इतिहासाकडे लोक स्फूर्तिस्थान म्हणून पाहूं लागले, परकीय सरकारचें धोरण अधिक कडवें होत होतें. रानडे, आगरकर यांच्या वेळीं त्यांची जी थोडी सुधारणावादी वृत्ति होती ती साफ नष्ट झाली. त्या बाबत तें (परकें सरकार) उदासीन बनलें. सहाजिकपणें कायद्याने सुधारणा करण्याचा प्रश्नच उद्भवला नाही. शिवाजी, गणपति उत्सव, बंगालची फाळणी, कर्झनची कारकीर्द, बहिष्कार, स्वदेशी चळवळी, जपानचा रशियाविरुद्ध विजय... इ. विविध घटनांनी लोकमत राजकीय, दृष्ट्या जागृत होत होतें. राष्ट्रीयत्वाचे संस्कार त्याच्या मनावर होण्याचें काम चालू होतें. व ज्या पुढाऱ्यांनी हें लोकमताचें संस्करण चालविलें होतें, ते पुढारी सामाजिक व विशेषतः स्त्रियांचे सुधारणेच्या बाबतींत पूर्णपणें प्रतिकूल असल्याने त्यांचें ह्या गोष्टीकडे लक्षच वेधलें नाही. त्यांना तें वेधावेसें वाटलें नाही. सत्यशोधक समाजाच्या चळवळीच्या अनुषंगाने

१. बहुसंख्य ग्रंथ विधवाविवाहाच्या १८७० व संमत्तीवयाच्या १८८५ वादाच्या वावटळींत लिहिलेले आहेत.

वेदोक्त प्रकरणासारखीं प्रकरणें निघत होतीं पण १९२० पर्यंत त्या चळवळीसहि फारसा जोर चढला नाहीं. १९१४–१९२० कालांत युद्धामुळे सर्वच बाबींना एक प्रकारचें स्थितिशीलत्व प्राप्त झालें होतें.

प्रकटपणें जरी सुधारणावादी विचार बळावत नव्हता असें दिसतें तरी सुप्तपणें आगरकरांची विचारधारा समाजांत दूरवर जात होती. स्त्रियांचें शिक्षण सर्रास सुरू झालें होतें. पूर्वीचा विरोध कोलमडून पडला होता. शाळांत व (क्वचित् कॉलेजांत) जाणाऱ्या स्त्रियांची (मुलांची) संख्या वाढत होती. त्यांना पुरुषांसारखें शिक्षण देण्याचा उपक्रम सुरू झाला होता. ' सुशिक्षित स्त्री ' हा प्रकार समाजाच्या परिचयाचा व्हावा अशी परिस्थिति निर्माण झाली होती. विधवा, पतित स्त्रियांच्या उद्धारांचे डॉ. कर्व्यांचे यत्न सुरू झाले होते. ते समाजांत मूळ धरीत होते. १९१६ त त्या प्रयत्नांस मूर्त स्वरूप आलें व स्त्रियांच्यासाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना झाली. महाराष्ट्रीय स्त्रियांच्या जीवनांत स्त्रियांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन होणें ही निश्चितपणें अत्यंत महत्त्वाची घटना होय. असें दिसतें कीं, या सुमारास पुन्हा स्त्रियांच्या प्रश्नाकडे लोकांचें लक्ष जाऊं लागलें. आगरकरांची पुण्यतिथि साजरी करण्याची कल्पना निघाली. महाराष्ट्रांत त्या कल्पनेचें उत्साहाने स्वागत झालें. आगरकरांच्या मृत्यूनंतर एकवीस वर्षांनी त्यांची पहिली पुण्यतिथि साजरी होण्याचा अपूर्व योग आला. समाजाला त्या थोर पुरुषाचें महत्त्व पटलें असें वाटूं लागलें. सुशिक्षित वर्गाकडून फार मोठ्या प्रमाणावर त्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास सुरू झाला. तथापि विवेचनाच्या दृष्टीने हा कालखंड १९२० पर्यंत ध्यावयास हरकत नाही. त्यावर्षी आगरकरांचे खरे सामाजिक विचारांचे प्रतिस्पर्धी टिळक मृत्यू पावले. व समाज आणि स्त्रीजीवनविषयक सुधारणेस विरोध करणारी विचारधारा एकदम लुप्त झाली. तिच्यांतला प्रभावीपणा नष्ट झाला. अशाप्रकारें आपण १९२० पर्यंतच्या कालाप्रत येऊन पोंचलों.

—•—

पहिल्या महायुद्धानंतरचा काल

[१९२० ते १९३५]

आतापर्यंतच्या विवेचनांत १९२०पर्यंतच्या कालांतील निर्माण झालेल्या स्त्रीजीवनविषयक प्रश्नांचा उहापोह कसा झाला ह्या बाबतचें विवेचन केलें. १८८० हें जसें एक कालनिदर्शक वर्ष आहे तसें १९२० हेंहि पण. वैचारिक जीवनांत जो बदल झाला वा होत होता त्याचीं गमक अशी हीं वर्षें आहेत. १८७४ त विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं आपली 'निबंधमाला' सुरूं केली. १८८५ त राष्ट्रसभा स्थापन झाली. त्याच सुमारास हरिभाऊ आपटे, केशवसुत ह्या नवीन लोकांनीं आपली वाङ्मयसेवा सुरूं केली. त्यांच्या साहित्यांत दिसून येत असलेला विचारांचा वेगळेपणा हा जरी मूर्त स्वरूपांत त्यावेळीं स्पष्टपणाने या लेखकांच्या कृतींतून बाहेर पडला तरी त्याची तयारी ह्या वर्षांच्या पूर्वीपासून झाली असली पाहिजे. त्या दृष्टीने अलीकडचे टोक १८७४ पाशीं येऊन पोचतें. ह्या वर्षीं चिपळूणकरांनीं आपला संप्रदाय सुरूं केला तरी त्या विचाराला थोडी समाजमान्यता येण्यास ५।६ वर्षें पुढें घालावी लागतात. म्हणजेच १८८० हें वर्ष येतें, म्हणून वैचारिकदृष्टीने पाहतां १८८० पाशीं थांबलें वा तेथून नवा कालखंड मोजावयास सुरवात केली तर फारसें बिघडतें असें नव्हे. म्हणजेच १८८० पासून नवा कालखंड सुरूं होतो असें म्हणावयास हरकत नाहीं. रानडे, लोकहितवादी ह्यांचे समाजसुधारणेचे यत्न सुरूं झाले होते. त्यांची एक अवस्था संपून दुसऱ्या अवस्थेस सुरवात १८८० चे सुमारास होते असें म्हणतां येईल.

१९२० व १९३५ ह्या वर्षांबद्दलहि तसेंच म्हणतां येईल. १८८० पासून सुरूं झालेला कालखंड वैचारिकदृष्ट्या १९२० चे सुमारास संपतो. राजकीय दृष्टीने हा काल राष्ट्रवादाच्या विचाराचा प्रसार होण्याचा काल धरावा लागतो. १९२० पर्यंत राष्ट्रवादी विचारसरणीने एक अवस्था पूर्ण केली व दुसऱ्या अवस्थेस त्यानंतर सुरवात झाली. १९२० पर्यंत राष्ट्रवादी विचाराची संरक्षक अवस्था होती. स्वत्वाची जागृति होणें व तो स्फुल्लिंग

चेतविणें, परकीय वा अन्य आघातांपुढे वा झंझावातापुढे तें हतप्रभ होऊं न देण्याची काळजी ह्या कालखंडांत फार घ्यावी लागली. टिळकांनी 'स्वराज्या'चा नैसर्गिक "हक्का"त समावेश करून घेतला. त्यांच्या कार्यामुळे ती गोष्ट साध्य झाली असें म्हणतां येईल. १९२० नंतर राष्ट्रवादी विचारसरणीने संरक्षणप्रधान धोरण टाकून आक्रमकतेचें धोरण अवलंबिलें. ह्या विशुद्ध आक्रमणाच्या धोरणास १९३५ चे सुमारास धक्का बसला. तोवेळ पर्यंत राष्ट्रवाद हा प्रामुख्याने राष्ट्रीय वा राजकीय क्षेत्रापुरताच मर्यादित होता. तदनंतर राष्ट्रधारणेच्या दृष्टीने त्याचें विधायक स्वरूप काय असावें ह्या गोष्टीचा पुन्हां जोरानें खल होऊं लागला. सर्वाधिकारशाहीचें कांही देशांत आगमन, त्यामुळे निर्माण झालेली लोकशाहीच्या भवितव्याबाबतची काळजी इ. विविध आंतरराष्ट्रीय घटनांमुळे नवे विचार येऊं लागले. त्यांचा परिणाम १९३५ चे दरम्यान प्रामुख्याने दृग्गोचर होऊं लागला. १९३७ त पहिलीं नव्या कायद्यानें अंमलांत येणारीं मंत्रिमंडळें आलीं. व स्वातंत्र्य आतां फार दूर राहिलें नाही ही गोष्ट स्पष्ट झाली. अशा प्रकारें १९३५ नंतरचा काल हा स्वातंत्र्यपूर्व घडामोडींचा काल असें म्हणतां येईल.

ह्यावरून हें स्पष्ट होईल की येथे कल्पिलेले कालखंड हे वैचारिक एकात्मतेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. प्रत्येक कालखंडाच्या पूर्वी नवा विचार येत होता. सर्व कालखंडभर त्या विचाराला प्रामुख्य प्राप्त झालें व कालखंडाच्या शेवटीं ती एकात्मता नष्ट होऊन नवीन कालखंडास अनुस्यूत असलेले विचार येऊं लागले. निरनिराळ्या दृष्टींनी हे कालखंड वैचारिक-दृष्ट्या एकात्म आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.

मागील विवेचनांत प्रारंभिक विवेचनांत ज्या नव्या दोनतीन विचार धारा सुरू झाल्या त्यांचा उहापोह केला. १९२० नंतर त्या विचारधारांचें महत्त्व नष्ट झालें त्यांची जागा नव्या विचारधारांनी घेतली. किंवा त्यांचें मूल स्वरूप बदललें व नवकालास अनुसरून त्यांनी नवें रूप धारण केलें. त्याचप्रमाणें आणखीहि एक गोष्ट निदर्शनास येते. ती म्हणजे तोपर्यंत कर्तृत्व गाजवलेली पिढी झपाट्यानें अस्तंगत होऊं लागली. नवनवे लोक पुढे येऊं लागले. कांहींचें कर्तत्व जरी पूर्वकालांत लोकांच्या निदर्शनास येऊं लागले होतें तरी त्यास खरा बहर ह्या नंतरच्या कालांतच आलेला आहे.

'दरेक पिढीच्या कल्पना, आवडीनिवडी व ध्येयें वेगळीं वेगळीं असतात.' या नियमाच्या आधारानें कालाच्या विचारांत व ध्येयांत फरक पडलेला असतो. १९२० नंतर तीच परिस्थिति निर्माण झाली आहे. पण ह्या सर्वांपेक्षा अत्यंत प्रबल कारण कोणतें असेल तर तें 'पहिलें महायुद्ध' होय. पहिल्या महायुद्धानें सर्वच प्रकारच्या लोकांना जोराजोरानें विचार करावयास लावलें. पाश्चात्य राष्ट्रांत हा विचारसंघर्ष प्रभावी होता. त्याचे पडसाद आपणांकडे पडावयास थोडा फार उशीर लागणे शक्य आहे. त्या योगेंच १९३५ नंतर आपणांकडे हा वैचारिक संघर्ष तीव्रतर झालेला दिसतो.

परंतु १९३५ च्या सुमारास नवी कलाटणी जरी मिळाली असली तरी नवें युगमान सुरू झालें असें म्हणतां येणार नाही. कारण १९२० ते १९३५ हा कालखंड फारच अल्प आहे. एका पिढीच्या कर्तृत्वासहि तो अल्प आहे. लेखकांची वा विचारवंतांची तीच पिढी होती. त्यामुळे त्या पिढीचे विचार अगोदर ठरून गेलेले होते. त्यांचा नव्या विचारांशी संघर्ष येणें अपरिहार्य होतें. कित्येकांना नव्या विचारांच्या बाजूने जाणें व कित्येकांनी त्याला विरोध करणें हें अपरिहार्य ठरतें. अशा प्रकारें १९२० ते १९४७ ह्या कालाची वैचारिक पहाणी करतांना असें आढळून येतें की १९३५ च्या सुमारास त्याचा पूर्वभाग संपतो व तदनंतरचा काल हा उत्तरभाग म्हणावयास हरकत नाही. ज्या प्रमाणे १९२० हें एक वर्ष वैचारिकदृष्ट्या निश्चितपणें महत्त्वाचें गणावें लागतें तसें १९३५ ह्याहि वर्षाचें आहे. राजकीय दृष्ट्या त्यावर्षी प्रसिद्ध 'सुधारणे' चा कायदा ब्रि. पार्लमेंटने संमत केला. राष्ट्रीयदृष्ट्या राष्ट्रसभेच्या स्थापनेस पन्नास वर्षें झालीं. नेहरूंनी अधिकृतरीत्या समाजवादाचा पुरस्कार काँग्रेस व्यासपीठावरून केला. व काँग्रेस समाजवादी पक्षाचें पहिलें अधिवेशन ह्याच वर्षी भरलें.[1] गांधीजींनीहि याच सुमारास राजकारणाकडे थोडें दुर्लक्ष करून ग्रामोद्धार, अस्पृश्यतानिवारण इ. विविध चळवळींवर लक्ष केंद्रित केलें. राष्ट्रीय सभेनें विधिमंडळांत जाण्याचें ठरविलें. राष्ट्रीय सभेचीं अधिवेशनें प्रमुख शहरांत न भरतां खेडेगांवांत भरवण्याची कल्पना संमत झाली. व पहिला मान फैजपूर ह्या महाराष्ट्रांतील खेड्यास मिळाला. साहित्यक्षेत्रांतहि आपणांस तेंच

१. आजकालचा महाराष्ट्र : कालगणना

आढळतें. साहित्य संमेलनाचें अध्यक्षपद हें १९३५ सालीं औंधकर पंतप्रतिनिधींस मिळालें. पण ह्यानंतर याबाबत चर्चा झाली. व १९३६ ला माधवराव पटवर्धनांना तो मान मिळाला. तेथून पुढे 'आधुनिक' विद्वानांची त्या उच्चस्थानासाठी वर्णी लागली. हा फरक कालमानांत पडलेल्या फरकाचा द्योतक होता. थोडक्यांत साहित्यक्षेत्रीय दृष्टीने विचार करतांहि हा फरक स्पष्टपणें जाणवतो. १९२० ते १९४० ह्या कालखंडाचा विचार करतांना १९३५ च्या सुमारास जें नवें युगमान सुरू झालें; त्याचें स्वरूप पाहणें जरूर आहे. व म्हणूनच तें वर्ष सामान्यतः महत्त्वाचें धरलें आहे. प्रथम १९२०–३५ ह्या कालखंडांतील विचारधारा व त्यांचा स्त्रीजीवनविषयक विचारांवर, कल्पनांवर झालेला परिणाम ह्या गोष्टींचें अवलोकन करणें आवश्यक आहे.

वैचारिक वा ध्येयात्मक दृष्टीने पहातां सर्वांत महत्त्वाचा कोणता प्रश्न असेल तर तो राष्ट्रीय ध्येयाबाबतचा होय. '१९०५ मध्ये ना. गोखल्यांनी 'वसाहतीचें स्वराज्य' हें ध्येय लोकांसमोर मांडले.'[1] न्या. मू. रानड्यांनी ज्या ध्येयाची पूजा केली होती त्याला प्रत्यक्षांत पुढे मांडण्याचा काळ ह्या वेळपर्यंत आला होता असें म्हणतां येत नाही. लो. टिळकांनी 'स्वराज्य' हेंच ध्येय वारंवार लोकांपुढे ठेविलें. राजकीय प्रश्नांचा विचार करतांना 'स्वातंत्र्य' ही कल्पना फार जहाल होती असें दिसते. शिवराम-पंतांच्या लेखांतून स्वातंत्र्य शब्दाचा उपयोग विपुलतेने केलेला आढळतो. पण १९२८ पर्यंत 'स्वातंत्र्य' ह्या कल्पनेतील आशय 'स्वराज्य' ह्या शब्दानेच व्यक्त केला जाई. १९२८ नंतर मात्र हा ध्येयाबाबतचा प्रश्न महत्त्वाचा झाला.[2] तरुण लोकांचें मत 'स्वातंत्र्या'च्या बाजूनें झुकूं लागलें. पण राजकीय वा राष्ट्रीय मान्यता त्याच्या मागे तों वेळपर्यंत नव्हती. १९२८ सालीं कलकत्त्यास काँग्रेसने ब्रिटिश राज्यकर्त्यांना जो निर्वाणीचा आदेश दिला, त्यांत वसाहतीचें स्वराज्य एका वर्षाच्या आंत द्या, हाच आमिप्राय आहे. १९३० साली 'स्वातंत्र्य' म्हणजे 'संपूर्ण स्वराज्य' अशी व्याख्या अस्तित्वांत आली.[3] ह्यानंतर मात्र स्वराज्य शब्द झपाट्याने मागे

१ न. र. फाटकः राष्ट्रवादाचा विकास पृ. २७.

२ कित्ता. ३ याबाबत नेहरूरिपोर्टाकडे वोट दाखवितां येईल.

पडला. १९३० त पहिला 'स्वातंत्र्यदिन' साजरा झाला. त्या शब्दामागें नवें वलय निर्माण झालें. नव ध्येयाची प्रचीति होऊं लागली. हें 'स्वातंत्र्य' कशा प्रकारचें ह्या संबंधी चर्चा होऊं लागली. त्याच सुमारास आलेल्या समाजवादी विचारांनी हें स्वातंत्र्याचें ध्येय अधिक 'मूर्त' करण्यास मदत केली त्या नव्या विचारांनी राष्ट्रांतील विचारवंतांस नवी दृष्टि दिली. कर्तृत्वास नवें आवाहन मिळालें. विशेषतः तरुण वर्ग ह्या ध्येयाकडे फार जोराने आकर्षिला जाऊं लागला.

१८८० ते १९२० ह्या कालखंडांत टिळकांची अभ्युत्थानवादी व रानड्यांची सुधारणावादी अशा दोन विचारसरणी प्रामुख्याने प्रचलित होत्या याचा उल्लेख यापूर्वी आला आहेच. राजकीय परिस्थितीमुळे राष्ट्रीय जागृति होत गेली. राष्ट्रीय पुनरुत्थानवादी विचारसरणी बाह्यतः विजयी होत आहे असा भास होत गेला. पण सुधारणावादी विचारसरणी लुप्त वा नष्ट झाली होती असें नव्हे. तिचा ओघ सुप्तपणें चालू होता. १९२० नंतर अशी परिस्थिति निर्माण झाली की राजकीय सुधारणावादी दृष्टीचा एकांगीपणा, फोलपणा, सिद्ध व्हावा. १९१७ च्या कायद्याने राखीव सोपीव अशीं खात्यांची विभागणी करून अल्प असें सत्तादान (त्याचा देखावा म्हणूं हवें तर) राज्यकर्त्यांनी केलें. पण तेवढेंहि मर्यादित कार्य यशस्वीरीतीने करण्याची कुवत समाजाजवळ होती कोठे ? असहकाराच्या चळवळीने राष्ट्रीय विचारांना एक वेगळीच कलाटणी मिळाली. १९२८ पर्यंतची वर्षें राजकीय विचारदृष्ट्या अत्यंत अस्थिरतेचीं गेलीं. त्यावर्षीं सायमन कमिशनची नियुक्ति बाहेर पडली व ह्या घटनेने राष्ट्रीय विचारांच्या लोकांत फूट पडली होती ती सांधली गेली. राजकीयदृष्ट्या नवीच कलाटणी मिळाली. नंतर १९३० व १९३२ ची मिठाच्या सत्याग्रहाची व कायदेभंगाची चळवळ झाली. तुरुंगांत बरेच लोक गेले. पुढारीहि तुरुंगांत गेले. तेथून ते १९३५ च्या सुमारास जे बाहेर पडले ते बहुतेक विचारवंत समाजवादाकडे झुकणारे म्हणूनच. १९३५ नंतर स्वातंत्र्य हें 'साधन' झालें. समाजवादविचाराधिष्ठित विळणूकरहित समाजरचना हें ध्येय झालें.[1] ह्या ध्येयाच्या दृष्टीने विचारवंत लोक विचार करूं लागले. जीवनाच्या सर्वच अंगांचें नव्या

१ काँग्रेस निवडणूक जाहिरनामा १९३५.

दृष्टींतून परिशीलन करण्याची आवश्यकता सर्वांनाच वाटूं लागली. त्या दृष्टीने उलट सुलट विचार पुढे येऊं लागले.

१९२० नंतर शिक्षणाचें खातें आपणांकडे आलें. शिक्षणाचें प्रमाण हळुहळू वाढत होतें. त्यावेळीं दिलेल्या 'सुधारणां' त १०।१० वर्षांनी द्याव-याच्या 'हप्त्यां'ची योजना होती. असहकारितेच्या चळवळीनें एकंदरीने सरकारच्या सामर्थ्याची चांगलीच प्रचीति आली. सरकारहि अधिक सावध होऊ लागलें. ह्या सर्व गोष्टींचा परिणाम असा झाला कीं, राष्ट्रीय वा राजकीय जागृति थोडीबहुत झाली असूनहि लोकांना राजकीय दृष्ट्या मार्ग दिसेना. कारण 'स्वराज्य' हें ध्येय सरकारनेंच मान्य केलें. व तें हते-बंदीने देण्याची कबूलीहि दर्शविली. अशा प्रकारें राजकीय क्षेत्रांत चम-त्कारिक परिस्थिति निर्माण झाली होती. जो विचारवादी गट राजकीय क्षेत्रांत त्या वेळपावेतों जहाल ठरला होता; तोच विचारवादी गट सामाजिक बाबतींत पूर्णपणें अनुदार होता. ह्या अनुदारपणाचें दिग्दर्शन अधिक प्रभावी-पणानें झालें. व त्याचा परिणाम असा झाला की राष्ट्रीय वृत्तीच्या विचारी माणसांसहि सामाजिक सुधारणेच्या बाबत इतकें प्रतिगामी राहण्याची जरूर नाही ही गोष्ट निदर्शनास आली. वामनराव जोशी व तात्यासाहेब केळकर हे टिळकांनंतरच्या महाराष्ट्रांतील दोन प्रसिद्ध लेखक. पण त्यांचें वैशिष्ट्य समन्वयावर आधारलेलें आहे. हा समन्वयवाद हा त्या कालाचा परिपाक होय. अशा प्रकारें पूर्व कालांतील विशुद्ध राजकीय व विशुद्ध सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करणाऱ्या परस्पर विरोधी विचारसरणींतून ही नवी समन्वयवादी विचारसरणी ह्या कालांत उदित झाली. हा समन्वयवाद निर्माण होण्याचें कारण दोन्ही विचारसरणी आपापल्या परीने पराभूत झाल्या होत्या हें होय. समाजसुधारणेची ही सर्वमान्यता स्त्रीजीव-नाच्या प्रगतीस पोषक झाली. अर्थात् विशुद्ध राजकीय सुधारणांचा पुरस्कार व सामाजिक बाबतींत पूर्णपणें अनुदारपणा दर्शविणें, व ह्या उलट ह्या दोन्ही विचारसरणी पूर्णतया लुप्त झाल्या असें नव्हे. पण समाजजीवनांत त्यांना फारसें स्थान राहिलें नाही हें खरे. असे एकांगी सुधारणांचा पुरस्कार करणारे लोक झपाट्याने लोकप्रियता गमावूं लागले. कारण त्यांच्या विचारां-मागलें नैतिक अधिष्ठान संपुष्टांत आलें.

लो. टिळकांनी आपल्या 'गीतारहस्या' द्वारें एक नवाच प्रयत्न केला. ह्या ग्रंथाद्वारें त्यांनी आपल्या जीवितकार्याला एक तात्त्विक अधिष्ठान निर्माण करण्याचा यत्न केला. गीतेंतील 'कर्मयोगा'च्या पुरस्काराच्या द्वारें तें अधिष्ठान त्यांनी संपादलें. हा प्रयत्न टिळकांच्या मनोभूमिकेचा द्योतक आहे. मनाने ते तत्वज्ञानी व जुन्या काळांत राहात होते असें स्पष्ट होतें. नाहीतर स्वतःच्या राजकीय विचारांना एवढें तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान जोडण्याची कांही जरूरी होती असें नव्हें. तें अधिष्ठान श्रोतांनाहि त्यांची भूमिका प्रामुख्याने पंडिताची आहे. पूर्वकालीन जीवितमूल्यांबाबतचा आदर हाच त्यांतून प्रतीत होतो. ह्याचा अर्थच असा की, लोकमान्यांना नवकालाचीं समता स्वातंत्र्यादि जीवितमूल्यें बिलकुल मान्य नव्हती. आध्यात्मिक मूल्यांपासून मुक्तता करूं पाहणाऱ्या व सामाजिक भौतिक जीवनांत रस घेणाऱ्या आधुनिक भारतीय मनास पुन्हा पूर्वकालीन मूल्यांच्या सान्निध्यांत नेण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. सर्वसामान्य समाजाच्या ठिकाणीं जी गतानुगतिकता होती तिला एक नवें अधिष्ठान मिळालें त्यामुळे टिळकांना लोकप्रियता अमाप मिळाली.

तथापि हा सर्व विचार इतका जीर्ण होता की एवढा जाडा अभ्यासपूर्ण ग्रंथ एवढ्या मोठ्या कार्यकर्त्याने निर्माण केला तरी त्याच्या आधारावर एकहि नवी विचारधारा निर्माण होऊं शकली नाही.[1] व तसें होणें अपरिहार्य होतें. ह्या ग्रंथाने पुन्हा एकदा भारतीय संस्कृतीच्या अभिमानाची लाट पसरली. तात्त्विक चिंतनाचें एक छोटेसें युगमान निर्माण झालें. वामनराव जोशी व तात्यासाहेब केळकर यांचें लिखाण पाहिलें तर ही गोष्ट प्रतीत होईल. अशाप्रकारें पूर्वकालीन विचारसरणींची नव्या परिस्थितींत वजाबाट होऊन नवी विचारसरणी अंमलांत येत होती.

राष्ट्रवादी विचारसरणींतील (पूर्वकालांतील) जहालपणाचा वारसा

---

१ या संबंधांत 'ज्ञानेश्वरी' ची आठवण होण्यासारखी आहे. त्या ग्रंथाने महाराष्ट्रांत एक नवी विचारसरणी निर्माण केली की जी कित्येक शतकें पुढे टिकली. कारण ज्ञानेश्वरांचा विचार कालास पोषक होता. टिळकांचा ग्रंथ विचारसरणी निर्माण करूं शकला नाही याचें कारण विचारच कालास पोषक नव्हता.

प्रामुख्याने गांधीजींच्याकडे आला. व त्यांच्या कर्तृत्वाच्या आधाराने तो वाढूं लागला. गांधीजींनी त्यांत आक्रमकपणा भरपूर ओतला. तो विचार निश्चितपणें अधिक सचेतन केला. पण १९३४ च्या सुमारास त्यांना सामाजिक व दलितोद्धाराच्या चळवळींकडे वळावें लागलें आहे.

या सर्व विवेचनावरून ह्या कालखंडांतील प्रमुख विचारधारांचें आकलन होईल. टिळकांच्या राष्ट्रवादी विचारसरणींतील 'आक्रमक' त्वाचा वारसा गांधीजींकडे आला. अशाप्रकारें राष्ट्रवादी विचारसरणीला कलाटणी मिळाली. रानड्यांच्या सुधारणावादी विचारसरणींतील स्वीकार्य व टिळकांच्या राष्ट्रीय विचारांतील अनाक्रमक भाग ह्यांच्या अवलंबनाने समन्वयवादी विचारसरणी रूढ होऊं लागली.

राजकीय क्षेत्रांत परिस्थिति फारशी आशादायक नव्हती. विचारवंत लोकांपैकी कांहीजण गांधीजींच्या मार्गाने गेले. बहुसंख्य महाराष्ट्रीय विचारवंताचे लक्ष इतर क्षेत्रांकडे गेलें. संशोधन, साहित्य, समाजसुधारणा, अर्थकारण, शिक्षण, इत्यादि विविध ज्ञानशाखीय विभागांकडे आतापर्यंत दुर्लक्ष झालें होतें. तिकडे चांगल्या माणसांचें लक्ष जाऊं लागलें. व ह्या प्रत्येक क्षेत्राकडे माणसें जीवितकार्य म्हणून पाहूं लागलीं. डॉ. केतकरांनी, संशोधन व ज्ञानप्रसार यांसाठी जीवित वेचलें. डॉ. कर्व्यांनी समाजसुधारणेसाठी. संशोधनांत राजवाड्यांची परंपरा टिकवून धरण्याचे यत्न झाले. साहित्य क्षेत्रांत तर तेजस्वी परंपरा निर्माण झाली तिचें परिवर्धन झालें. राष्ट्रीय, सामाजिक, सांस्कृतिक, क्षेत्रांत प्रगति करण्याचें काम साहित्यानेच केलें आहे. अशाप्रकारें ज्ञानाच्या व कर्तृत्वाच्या अनेक शाखांकडे कर्तृत्वान पुरुषांचें लक्ष जात होतें. त्या त्या क्षेत्राला स्वयंपूर्णता मान्य व्हावी असाहि यत्न सुरू झाला. थोडक्यांत ह्या काळांत ह्या सर्व जीवनशाखांची प्रायोगिक व उपयुक्ततेची अवस्था संपून शास्त्रीय अवस्थेत त्यांनी प्रवेश केला.

ह्या सर्व घडामोडींत स्त्रीचें स्थान कोठे होतें हा येथील विवेचनाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. १९०५ ते १९२० या कालांत राजकीय चळवळीला व तत्क्षेत्रीय घडामोडींना अतिरिक्त महत्त्व प्राप्त झालें होतें. स्त्रियांच्या प्रश्नांकडे प्रायः दुर्लक्ष झालें होतें. १९२० नंतर परिस्थिति

पालटली. सामाजिक सुधारणा व स्त्रियांची सुधारणा हें एक कर्तृत्व क्षेत्र मानण्याइतकें महत्त्व कांही लोकांना वाटलें. ह्या वरून स्त्रियांच्या प्रश्नाला प्रमुखत्व प्राप्त झालें हें स्पष्ट होईल. राष्ट्रीय विचारसरणींच्या लोकांचा विरोध यापुढे होणें कठिण होतें. त्यांच्या पैकीच कांहींनी समन्वयवादाचा अंगिकार केला. त्यामुळे समन्वयवादी विचारसरणी ही प्रामुख्याने स्त्रियांच्या चळवळींकडे सहानुभूतीने पाहणारी विचारसरणी आहे. तात्यासाहेब केळकरांनी कर्व्यांच्या प्रयत्नांस मनःपूर्वक साहाय्य केलें आहे तें वैचारिक आत्मीयतेमुळे होय. पूर्व कालांत राष्ट्रवादी विचारसरणी ही स्त्रियांबाबतच्या सुधारणांस प्राय: विरोधी–निदान तटस्थ– असे. गांधीजींच्या आधारानें ह्या काल खंडांत ह्या राष्ट्रवादी विचारसरणीस जें वळण लागलें त्यांत ती विचारसरणी स्त्रियांच्या बाबतींत प्रतिकूल राहिली नाही. गांधीजींनी निरनिराळ्या राष्ट्रीय चळवळींत भाग घेण्याबद्दल स्त्रियांना आवाहन केलें. स्त्रियांनी पण त्या हाकेस ओ दिली. व भारतीय स्त्रियांच्या जीवनांत नवें युग सुरू झालें. अशा प्रकारे ह्या कालांत स्त्रियांच्या विविध प्रश्नांकडे उपेक्षेनें वा तुच्छतेने न पाहतां एक राष्ट्रीय वा सामाजिक प्रश्न म्हणून पाहिलें जाऊं लागलें. त्यांच्या विविध प्रश्नांचा बारकाईने अभ्यास करण्याची प्रवृत्ति निर्माण होऊं लागली.

हें सर्व चालूं असतांना शिक्षणाचा प्रसार स्त्रियांत होत होता. स्त्रिया शिक्षण घेऊन बाहेर पडत होत्या. शिक्षणाच्या योगाने त्यांच्यांत नवी जाणीव आली. त्या जाणिवेंत अस्मितेची भावना पण आली. पाश्चात्य पद्धतीचें शिक्षण त्यांना मिळाल्याने स्त्रियांच्या स्वजीवनविषयक दृष्टिकोणावर पाश्चात्य दृष्टिकोणाची छाप पडूं लागली. अशी स्त्री ही प्रामुख्याने ललित वाङ्मयांतून अवतीर्ण होऊं लागली. समाजांत आणि वाङ्मयांत तिच्यावर उलट सुलट प्रतिक्रिया उमटूं लागल्या. सामाजिक हक्कांचा प्रश्न निर्माण होऊं लागला, पण त्याचे व्यक्तिगत अस्तित्व लक्षांत येणें जरूर आहे अशी प्रवृत्ति उत्पन्न होऊं लागली. १९३५ नंतर ह्या सर्व चळवळीस नवा पाया आला. त्याचें आकलन करून घेण्यापूर्वी इतर सामाजिक इत्यादि चळवळीचें स्वरूप पाहणें आवश्यक आहे.

या दहा बारा वर्षांत झालेल्या सामाजिक व सांस्कृतिक प्रगतींत जर कोणती गोष्ट स्पष्टत्वाने प्रतीत होत असेल तर ती म्हणजे शिक्षणाचा प्रसार

व त्यायोगाने वर्धमान होऊं लागलेली सुशिक्षितांची संख्या ही होय. ही सुशिक्षित (इंग्रजी पद्धतीने) लोकांची संख्या जसजशी वाढूं लागली तसतसें मध्यमवर्गाचें क्षेत्र व व्याप्ति वाढत गेली. ब्रिटीशांचें शिक्षणविषयक धोरण प्रायः उदार होतें. तथापि प्रारंभी त्यांना राज्यकारभार चालविण्यासाठी योग्य माणसें हवी होतीं. त्यासाठीच त्यांनी प्रामुख्याने शिक्षणाचा अवलंब केला. 'ब्रिटिशप्रणित शिक्षणकक्षांतून बाहेर पडलेले लोक हे केवळ जन्माने हिंदी, बाकी विचार, आचार, संस्कृति, दृष्टिकोण, इत्यादींनी ब्रिटिश असावेत' असें ध्येय मेकॉलेने आपल्या प्रसिद्ध खलित्याने ब्रिटीश राज्यकर्त्यांपुढे स्वीकारासाठी ठेवलें होतें. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी तत्परतेने त्याचा अवलंब केला. त्या शिक्षण यंत्रांतून आतापर्यंत बरेच लोक बाहेर पडले होते. ब्रिटिश राज्ययंत्राचा गाडा ढकलण्यासाठी त्यापैकी बहुसंख्य वर्गाने आपली श्रमशक्ति लावली हें प्रसिद्ध आहे. आतापावेतो ह्या शिक्षणाच्या यंत्रांतून जो सुशिक्षित वर्ग बाहेर पडला तो सामान्यतः उच्च शिक्षणाचे संस्कार [पूर्व कालांत] झालेला असाच बाहेर पडला. या वर्गास ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या धोरणामुळे व एकंदर समाजपद्धतीने थोडी सुस्थिति लाभली होती. अशाप्रकारें आतापर्यंत (१९२० पर्यंत) बाहेर पडलेला सुशिक्षित वर्ग 'उच्च मध्यम वर्ग' असें म्हणतां येईल. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून ह्याच वर्गाचें जीवन प्रतिबिंबित झालें आहे. 'हरिभाऊ स्वतः उच्च मध्यम वर्ग (Highest Middle-class) पैकी असल्याने त्याच वर्गातील लोकांच्या आयुष्याची, सुखदुःखांची व आकांक्षांची त्यांस पूर्ण कल्पना होती. या वर्गाबद्दल त्यांच्या अंतःकरणांत सहाजिकच जिव्हाळ्याची सहानुभूति होती. व याच समाजाच्या पुढील सामाजिक, राजकीय, औद्योगिक व आध्यात्मिक प्रश्न सोडवून त्याची उन्नति करण्याचें कार्य त्यांनी आपल्या कादंबऱ्यांच्या द्वारें केलें'[1] अशी कबुली त्यांच्या चरित्र लेखिकेने दिली आहे. ती महत्त्वाची आहे. सामान्यतः या वेळपर्यंत झालेला मध्यमवर्ग हा विचार, इत्यादि दृष्टींनी एकात्म होता. राजकीय सामाजिक विचारांच्या बाबत जरी त्याच्यांत थोडा मतभेद असला तरी आर्थिकदृष्ट्या ज्या थरांतून तो आला होता तो थर एकच असल्याने वैचारिक मतभेदांपलीकडे

१ आपटेचरित्रः वेणूबाई पानसे. पृ. १७७.

कडे त्याच्या जीवननिष्ठांचें अधिष्ठान समान होतें. आगरकरांच्या प्रखर जीवननिष्ठांपासून ह्या उच्चमध्यमवर्गाने अलिप्त राहाण्याचें धोरण ठेवलें होतें तें ध्यानांत धरण्यासारखें आहे. आगरकरांचे विचार ह्या कालांतील मध्यमवर्गास न रुचण्याचें कारण त्यांचा व ह्या लोकांचा जीवननिष्ठांबाबतचा हाच महत्त्वाचा भेद होय.

१९२० नंतर शिक्षितांच्या वर्गाची एकात्मता नष्ट पावली. आतापर्यंत प्रामुख्याने ब्राह्मणवर्गच पुढे आला होता. त्यांत इतर जमातींच्या सुशिक्षित लोकांची भर पडूं लागली. आतापर्यंतचा हा मध्यम वर्ग फक्त 'उच्च मध्यम वर्ग' होता. त्याच्या जोडीला ह्या कालांत नवे शिक्षितलोक बसू लागून कनिष्ठ मध्यम वर्गाची धारणा (Lower Middle Class) साकार होऊं लागली. सहाजिकपणें ह्या दोन प्रकारच्या वर्गांत एकप्रकारचा विरोध आला. त्या विरोधाबरोबर संघर्षहि होणें अपरिहार्य होतें. राजकारणांत प्रागतिक विरुद्ध जहाल ह्या वादाच्या मुळाशी हा वर्गभेद होता. १९२० नंतर ह्या वादाने सामाजिक क्षेत्रांतहि पदार्पण केलें. महाराष्ट्रांतला ह्या वादाचा आविष्कार ब्राह्मण अब्राह्मण वादाच्या रूपाने झालेला आहे. वास्तविक ज्योतिबा फुल्यांनी १८७० चे सुमारास 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली होती. पण त्या चळवळीला विशिष्ट 'जातीय विरोधांचें' स्वरूप ह्या कालांत प्रामुख्याने आलें. हा प्रामुख्याने उच्च मध्यम वर्ग व व खालचा मध्यम वर्ग ह्यांच्यांतील संघर्ष होता. त्याला ह्या देशांतील विशिष्ट परिस्थितीप्रमाणे ब्राह्मण–अब्राह्मण असें स्वरूप प्राप्त झालें. ब्रिटीश सरकारच्या धोरणाच्या दृष्टीने मध्यमवर्ग हा असा विभाजित राहून आपापसांत झगडत राहणें हें सोयीचें होतें. अर्थात् या आर्थिक विरोधाबरोबर निरनिराळे सांस्कृतिक विरोधहि होते. पण मूळाशी हा आर्थिक विरोध होता हें महत्त्वाचें आहे. जोंपर्यंत राजकारणाचें क्षेत्र मध्यमवर्गापुरतेंच मर्यादित होतें तोंपावेतों ह्या वादास तीव्र स्वरूप प्राप्त होणें अपरिहार्य होतें. पण १९३० नंतर गांधीजींच्या घोरणाने राजकीय चळवळीचें क्षेत्र खूपच विस्तृत झालें. ती चळवळ सर्वसाधारण समाजाच्या जीवनमरणाशी निगडित झाली. ह्या घटनेने ह्या वादास नवीच कलाटणी मिळाली. त्याचें जातीय स्वरूप नष्ट झालें. पुढे दलितांच्या उद्धाराच्या

चळवळीची तात्त्विक भूमिका ह्या वादांतील खालच्या मध्यमवर्गाने-अब्राह्मण समाजाने-संमत केली. ह्या नव्या भूमिकेमुळे ह्या सर्व चळवळीच 'जातीय' स्वरूप बदललें. म्हणजे 'जातीय वैमनस्या' चा तिखटपणा थोडा कमी झाला. पण हा सर्व प्रकार प्रामुख्याने १९३५ नंतर अधिक परिणामकारी झाला.

वर ह्या कालांत प्रभावी विचारसरणी म्हणून समन्वयवादी विचार-सरणीचा उल्लेख केलेला आहे. ह्या समन्वयवादी वृत्तीचीं बीजें आर्थिक परिस्थितींत कशी लपलीं होतीं हें स्पष्ट होईल. हा समन्वयवाद अर्थातच एकजिनसी स्वरूपाचा नसणें अपरिहार्य होतें. उदाहरणच द्यायचें तर म्हणतां येईल, वर या संबंधांत वामनराव जोशी व तात्यासाहेब केळकर यांचा उल्लेख केला. त्यांच्या बाबतींत या विवेचनाच्या आधारें असें म्हणतां येईल की, दोघेहि समन्वयवादी खरे पण तात्यासाहेबांची सहानुभूति उच्च मध्यमवर्गाकडे; तर वामनरावांची खालचा मध्यमवर्ग व त्याच्या आकांक्षा ह्यांच्याकडे.

स्त्रीजीवनावर ह्या सर्व घडामोडींचा कोणता परिणाम झाला हें पाहूं लागलों तरी आपणांस हेंच आढळून येईल की यापुढील कालांतली स्त्री ही केवळ उच्च वर्गांतली न राहतां खालच्या मध्यमवर्गातील स्त्री हीहि पुढे येत होती. तिचें पण आगमन विचारांच्या व साहित्याच्या क्षेत्रांत होत होतें. पण स्त्रियांचा प्रश्न या पुढे एकंदरीत प्रमुख सामाजिक प्रश्न राहिला नाही म्हणजे स्त्रीजीवनविषयक प्रमुख सुधारणांना मान्यता मिळाली होती. तात्त्विक, नैतिक वा वैचारिक असा कोणताहि 'वाद' त्याबाबत निर्माण झालेला नव्हता. त्या बाबतच्या सुधारणा हलके हलके होणार हें आता स्पष्ट झालें होतें. डॉ. कर्व्यांच्या प्रयत्नांना मूर्त स्वरूप आलें होतें, समाजाची सहानु-भूति त्यांच्याकडे वळत होती इत्यादि उल्लेख मागे आलेलेच आहेत. स्त्रियांचे कायदेशीर हक्क कोणते असावे ह्याहि बाबत गंभीरपणाने चर्चा होऊं लागली. 'मनोरंजन' या मासिकाने ह्या बाबतींत ह्या कालखंडांत महत्त्वाचें कार्य केलें. 'हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा' हे श्री. गोखले ह्यांचें पुस्तक ह्या संबं-धांत फार महत्त्वाचें आहे. हिंदु स्त्रीच्या कायदेशीर हक्कांची पाहणी करावी इतकी सहनुभूति ह्या कालांत सर्व साधारण सुशिक्षितांच्या मनांत निर्माण

झाली होती. ह्याचा अर्थ असा की हिंदुसमाजाची स्त्रियांकडे पाहण्याची अनुदारपणाची वृत्ति कमी झाली. तो साध्या भूतदयाधिष्ठित सहानुभूतीच्या पलीकडे जाऊन 'व्यक्ति' म्हणून स्त्रीकडे पाहण्यास तयार होत होता, व व्यक्ति म्हणून स्त्रीच्या विविध हक्कांची विचारपूस करावी अशी बुद्धि त्याच्या ठायीं निर्माण झाली होती. ही प्रवृत्ति निश्चितपणें एक टप्पा दर्शवित्ते. कायदेप्रांतांतील घडामोडीच्या दृष्टीनेही या कालांत महत्त्वाच्या घटना घडल्या आहेत. १९२९ त बालविवाह प्रतिबंधक (सारडा) कायदा संमत झाला. १९३० मध्ये विद्याधनाचा कायदा संमत झाला. म्हणजे अविभक्त कुटुंबाच्या खर्चाने जरी विद्या संपादन केली तरी ती संपादन केल्यानंतर जें धन वा संपत्ति तो मनुष्य स्वतंत्रपणें कमावील, ती संपत्ति अविभक्त कुटुंबाच्या मालकीची नव्हे तर व्यक्तीच्या मालकीची होय. अशी तरतूद करणारा कायदा संमत झाला. याचा परिणाम स्त्रीजीवनावर होणें सहाजिक होते. पूर्वकालांत सुरू झालेल्या शिक्षणक्षेत्रीय व सांस्कृतिक संस्थांची भरभराट सारखी होत होती. समाजांत सुशिक्षित स्त्रियांचें परिप्रमाण हळकें हळकें वाढत होतें. हायस्कूलपलीकडे उच्च शिक्षणाच्या क्षेत्रांतहि त्यांचें पदार्पण होऊं लागलेलें होतें. अशा प्रकारची परिस्थिति सामान्यतः १९३५ पर्यंत होती. त्या वर्षाच्या दरम्यान सुरू झालेल्या समाजवादी विचाराने सर्व जीवन क्षेत्रांत नवीन लाट उसळली. स्त्रियांचा प्रश्न पण त्या विचारसरणीच्या टप्प्यांतून सुटला नाही. स्त्रीजीवनाचें आमूलाग्र पुनर्मांपन करण्याचा यत्न ह्या विचारधारेने केलेला आहे. तथापि तो सर्व विचार १९३५ नंतरच्या कालाच्या विवेचनांत करावयाचा आहे. तेथपर्यंत समाजस्थितीबरोबर स्त्री कशी आली तेंच येथे पाहावयाचें होतें.

प्रो. वा. म. जोशी हे ह्या विचारसरणीचे पुरस्कर्ते म्हणून उल्लेख आला आहे. त्यांची भूमिका आंतरिक दृष्टीने वेगळी होती. पण बाह्यतः ती एकच होती. म्हणजे, आगरकरांची व्यक्तिस्वातंत्र्याधिष्ठित तात्त्विक भूमिका त्यांना मान्य आहे, पण त्या भूमिकेचा अपरिहार्य भाग म्हणून ज्या सामाजिक सुधारणा पुढे येत त्यांची त्यांना तितकी निकड नाही. म्हणजे कादंबऱ्यांतून रागिणी, सुशीला, उत्तरा, यांसारख्या स्त्रीभूमिका निर्माण करणारे वामनराव जेव्हा स्त्रियांच्या हक्कांविषयी बोलतात तेव्हा

त्यांना स्त्रीजातीच्या वास्तव मागण्यासुद्धा स्वीकाराव्याशा वाटत नाहीत. प्रचलित कायद्यांनी स्त्रियांची जी असहाय परिस्थिति केली आहे ती त्यांना 'योग्य' वाटते. या त्यांच्या विचारांची अधिक चिकित्सा या प्रबंधांत पुढे येणारच आहे. पण समन्वयवादाची बीजें त्यांच्या विचार-सरणींत कशी आहेत तेंच येथे पाहावयाचें होतें.

एका दृष्टीने पाहतां ही समन्वयवादी विचारसरणी म्हणजे ब्रिटीश राज्य-कर्त्यांनी ह्या देशांत जी उदारमतवादी (Liberal) शिक्षण पद्धति सुरू केली तिचा परिपाक होय. ब्रिटीश प्रणित शिक्षणाचें ध्येय उदारमतवाद हें होतें. विशिष्ट परिस्थिति असल्याने १९२० पर्यंत हा विचार वाढीला लागला नाही. प्रागतिक पक्षाच्या विचारसरणीमागें वास्तविक पाहातां हा उदार-मतवादच होता. पण या देशाच्या विशिष्ट परिस्थितीमुळे त्याला केवळ 'सुधारणावादा'चें स्वरूप प्राप्त झालें होतें. इंग्लंडांत उदारमतवाद प्रभावी होत होता त्याचें कारण बुद्धिवादाचा व व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचारांचा प्रसार त्या ठिकाणीं दोन तीन शतकें होत होता. येथे तें झालें नाही. या 'उदारमतवादा'ला १९२० नंतरच्या बदलत्या परिस्थितींत असें समन्वय-वादाचें स्वरूप प्राप्त झालें होतें. १९३५ पर्यंतच्या पूर्वीच्या दहा पंधरा वर्षांतील प्रमुख विचारसरणीचें स्वरूप हें असें आहे. स्त्रीजीवनविषयक सुधारणाविचारांवर त्यांचा परिणाम झाला आहे. त्याचें स्वरूप असें कीं, पूर्वकालीन सुधारकांनी पुरस्कारलेल्या सुधारणा त्यांच्या मागील तात्त्विक भूमिकेचा विचार न करतां तडजोड म्हणून स्वीकारल्या गेल्या. त्या तशा ज्या विचारसरणीच्या अनुरोधाने स्वीकारल्या गेल्या त्या विचारसरणीची सामाजिक व वैचारिक चिकित्सा केली असतां जी वस्तुस्थिति दृग्गोचर होतें तिचें विशदीकरण येथे केलें आहे.

ह्या कालांतली प्रमुख विचारसरणी म्हणून समन्वयवादी विचार-सरणीचा उल्लेख वर आलेलाच आहे. त्या विचारधारेबद्दल थोडें विस्तार-पूर्वक विवेचन करणें आवश्यक आहे. ह्या विचारसरणीचा ह्या कालांत जी स्त्रीजीवनविषयक प्रगति झाली तिला महत्त्वाचा हातभार लागलेला आहे. वैचारिकदृष्टीने पाहतां ही विचारसरणी स्वयंनिष्ठ अशी नाहीं, तर तिच्या नांवाप्रमाणे समन्वय करणारी अशी आहे. ब्रिटीश राजवटींत जो

राष्ट्रवादी विचार १८८० च्या सुमारास वाढीला लागला तो प्रारंभी पुनरुज्जीवनवादाच्या भूमिकेवर आधारलेला होता हें मागे एका प्रकरणांत विशद केलें आहे. हा उत्थानवाद ही एक महत्त्वाची विचारधारा १९२० पर्यंतच्या कालांत प्रभावी होती. हा उल्लेखहि मागे आलेलाच आहे. या विचारसरणीची तात्त्विक भूमिका ह्या समन्वयवादी विचारसरणीने घेतली. तात्यासाहेब केळकर हे या विचारधारेचे प्रमुख पुरस्कर्ते; त्यांच्या सर्व लिखाणांत लो. टिळक व चिपळूणकर ह्यांच्या पुनरुत्थानवादी राष्ट्रवादाची तात्त्विक पार्श्वभूमि आहे हें स्पष्टपणें दिसून येतें. ह्याच गोष्टीमुळे आगरकरांची तत्वनिष्ठ बुद्धिप्रामण्यवादी विचारसरणी त्यांना तितकीशी जवळची वाटत नाहीं. परंतु चिपळूणकरांच्या विचारांचा अपरिहार्य भाग म्हणून जो जहालवाद आला त्याचें स्वरूप १९२० नंतर बरेंच पालटलें. राज्यकर्त्यांच्या धोरणामुळे हा फरक झालेला होता. सहाजिक वैचारिकनिष्ठा बदलण्यापेक्षा नव्या परिस्थितीच्या अनुषंगाने जुळवाजुळव करण्याची प्रवृत्ति निर्माण होणें अपरिहार्य होतें. जुळवाजुळव म्हणण्याचें कारण असें की, नव्या परिस्थितीच्या मूळाशी ज्या समता स्वातंत्र्यादि निष्ठा होत्या त्यांचा स्वीकार न करतां त्यांच्यावर आधारलेला बाह्य बदल स्वीकृत व पुरस्कृत करणें. म्हणजे सामाजिक सुधारणांचा अवलंब, पण त्यांच्या मागे असलेल्या तात्त्विक सुधारणांविषयक भूमिकेचा इन्कार, अशी समन्वयवादाची तात्त्विक उभारणी आहे. तात्यासाहेबांनी कर्व्यांच्या स्त्रीशिक्षणसंस्थांना पोषक असें धोरण स्वीकारलें. पण प्रत्यक्षांत तात्त्विक भूमिका मांडली ती मात्र पुनरूज्जीवनवादास पोषक अशी. त्यांनी 'स्त्रियांचें कल्याण' या पुस्तकास जी प्रस्तावना लिहिली आहे तिच्यावरून ही भूमिका स्पष्ट होते. (त्या प्रस्तावनेंतील कांही भाग ह्या ग्रंथांत मागे एका ठिकाणी उधृत केला आहे.)

या कालांत वाङ्मयीन क्षेत्रांत महत्वाचे फेरबदल होत होते. वाङ्मय हें उपयुक्ततेचें प्राथमिक स्तवक ओलांडून शास्त्रीय स्तवकांत पदार्पण करीत होतें. त्या क्षेत्राला स्वयंभूपण यावयास लागलें होतें. तथापि त्या क्षेत्रांतील विविध चळवळीकडे वा घडामोडीकडे वळण्यापूर्वी या कालांत स्त्रीजीवनविषयक जें विविध ग्रंथ निर्माण झाले, त्यांचे अवलोकन करून या कालाचें तें अंग ध्यानांत घेणें आवश्यक आहे.

ग्रंथांची साक्ष

दात्यांच्या 'मराठी ग्रंथसूचि' वरून पाहतां असें आढळतें कीं १९२० ते १९३५ ह्या कालखंडांत स्त्रियांच्या प्रश्नांवर विविध १५।१६ पुस्तकें लिहिलीं गेलीं आहेत. पूर्वीच्या कालखंडांत स्त्रियांच्या प्रश्नावर ह्यापेक्षां अधिक लेखन झालें आहे. पूर्वकालांत पुनर्विवाहाच्या सशास्त्रते-बाबतचा व संमतिवयाचा या दोन वादांच्या अनुषंगाने बरेंच लेखन झालें आहे, या कालखंडांत एकंदरीनें असें दिसतें कीं, कोणताही 'वाद' माजला नाहीं. 'विभावरी' साहित्याच्या निमित्तानें ह्याबाबत उलट सुलट विविध चर्चा झाली आहे हें खरें पण तिचें स्वरूप ललित वाङ्मयाची पाहणी करतांना लक्षांत घेणें योग्य होईल. विशुद्ध शास्त्रीय स्वरूपाची चर्चा करणारे असे एवढेच ग्रंथ झाले आहेत. त्यापैकीं कांहीं फारच लहान आहेत म्हणजे त्यांची मर्यादा १६ ते २० पृष्ठें एवढीच आहे. उदा. १९२५ तलें बाळकृष्ण गोपाळ बाळ ह्यांचे ८ पानांचे पुस्तक 'विधवा संकट निवारण' असें आहे व त्यांत स्त्रीनापितांची योजना वपनासाठीं असावी असा विचार मांडला आहे. विधवांच्या प्रश्नांविषयी द. ल. सहस्रबुद्धे,[1] महादेव शास्त्री दिवेकर,[2] विश्वेवर यांचे हिंदुसमाज व पतित स्त्रियांची सुधारणा १९३१ पृ. २०हीं पुस्तकें निघालीं. त्या नंतर स्त्री-शिक्षणावर गिरीजाबाई केळकर यांचें पुस्तक १९२५ त झालें आहे. त्यांत स्त्रीशिक्षणाचा साधकबाधक रीतीने बिचार केला आहे. स्त्रियांना सन्मार्गोपदेश करणारीं पाध्ये[3] व पुराणिक[4] यांचीं पुस्तकें झालीं. स्त्रियांच्या प्रश्नांवर ढापरे ज. ना. (१९३५) व प्रज्ञानेश्वर यति (१९३५, १५) यांचीं लहान लहान पुस्तकें झाली. पुस्तकांच्या निर्देशा-वरून स्त्रियांच्या प्रश्नास ह्या कालांत कोणतें स्वरूप प्राप्त झालें होतें ह्याची

(१) विधवाविवाह—द. ल. सहस्रबुद्धे. तरुण विधवांनी पुनः विवाह न करतां नर्सिंग वैगेरे धंद्यांत पडून दिवस घालवणें त्या पेक्षां कमीपणाचे आहे कीं कसें ? १९२५ पृ. ४४

(२) दिवेकर महादेवशास्त्री—हिंदुविधवांचा धर्म १९२३ पृ. ३०

३ पाध्ये. अ. गो.—आर्यविवाहदर्पण. (पौराणिक स्त्रियांची उदाहरणें घेऊन लिहिलेले निबंध) पृ. ६७. १९३९.

४ परचुरे पुराणिक— स्त्रियांचा स्वर्ग १९२१. (संवादात्मक...)

कल्पना येईल. तथापि ह्या कालांत कांही महत्त्वाचीं पुस्तकें झालीं आहेत त्यांतून कालाच्या विचाराची अधिक सुस्पष्ट कल्पना आपणांस होऊं शकेल. त्यापकीं पहिले म्हणजे द. वा. निमकर यांचें १९२८ त प्रसिद्ध झालेलें 'हिंदु लग्न संस्था' हें पुस्तक होय. ह्या पुस्तकांत हिंदूंच्या लग्नसंस्काराचें आधारपूर्वक विवेचन करून सर्व जगांतील लग्नसंस्थेत तीच कशी श्रेष्ठ आहे हें दर्शविलें आहे. ग्रंथकारांची हिंदुविवाह संस्थेकडे पाहाण्याची दृष्टि शास्त्रीय म्हणण्यापेक्षा अतिरिक्त कैवाराची आहे. पूर्वकालीन शास्त्रीय प्रगतीवर बोट ठेवून तिचाच पुरस्कार ग्रंथकारांनी केलेला आहे. लेखकाचा आधुनिक सुशिक्षित दृष्टिकोणावरच कटाक्ष आहे. त्यास अनुसरून सर्व लेखन झालेलें आहे. इतर राज्यांत झालेल्या सर्वच सुधारणा ह्या 'सुधारकां' च्या व 'नवमतवाद्यां' च्या प्रयत्नाने पाश्चत्य-अनुकरणाने झालेल्या आहेत. आपल्या हिंदु धर्मशास्त्रास त्या संमत नाही. अर्थात् निमकर हे बालविवाह, विधवाविवाह, इत्यादि सर्व प्रश्नांबाबत सनातनी मतें प्रतिपादतात व त्या समर्थनासाठी पूर्वकालीन लोकांनी जी 'शास्त्रीय' चिकित्सा व प्रगति केली तिच्यावर बोट ठेवतात. ह्या पुस्तकावरून समाजसुधारणाविरोधी वृत्ति ही जीव धरून आहे असें दिसून येतें.

तथापि स्त्रीसुधारणांचा सहानुभूतीने विचार करणारीं पुस्तकेंहि झालीं आहेत व तींहि विचारांत घेणें आवश्यक आहे. श्री. कृ. के. गोखले यांचें 'हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा' हें १९२२ त प्रसिद्ध झालेलें पुस्तक फार महत्त्वाचें आहे. ह्या पुस्तकांत हिंदु स्त्रीच्या कायदेशीर हक्कांची सोपपत्तिक छाननी करून याबाबत स्त्रीवर किति विविध प्रकारच अन्याय होत आहे हें स्पष्ट केलें आहे. लेखक सुधारणावादी असल्याने सर्व पुस्तक अत्यंत तळमळीने लिहिलें आहे. विविध स्त्रीजीवनविषयक कायदे व्हावेत व त्यासाठी स्त्रियांनी स्वतः जागृत व्हावें असें त्यांना लेखकाने मोठ्या कळकळीने आवाहन केलें आहे. याच प्रकारचीं आणखी एक दोन पुस्तकें उल्लेखण्यासारखीं आहेत. पहिलें श्री. का. न. केळकर व बाळूताई खरे यांचें 'स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा' हें आहे. ह्यांत ऐतिहासिक दृष्टीने स्त्रीच्या हक्कांचें विवेचन केलें आहे व हक्कांची मागणीहि केली आहे. दुसरें 'हिंदु स्त्रियांच्या कायदेशीर हक्क विस्ताराची योजना' असें वा. वि. जोशी यांचे आहे. त्यांनी

आपली योजना ह्या छोट्या पुस्तकांत विशद केली आहे. वा. वि. जोशी ह्यांनी नंतर जें विविध प्रकारचें लेखन केलें त्यांत स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधीचा जिव्हाळा दिसून येतो. त्याचेंच दिग्दर्शन या पुस्तकांत घडतें. या शिवाय माधवराव बागलांचे "लग्न बंधन की तुरुंगवास' ह्या पुस्तकांत घट-स्फोटाच्या कायद्याच्या व सवलतीच्या आवश्यकतेचा पुरस्कार केला आहे. 'हिंदी स्त्रीचें राजकीय स्थान' ह्या विषयावरहि एक छोटें पुस्तक इंदिरा केळकर या लेखिकेनें ह्या कालाच्या थोडें पूर्वी (१९१९) प्रसिद्ध केलें आहे. १९३१ त निरनिराळ्या लेखिकांनी 'पातिव्रत्यविचार' या नांवाचें पुस्तक लिहिलें. त्यांतील पातिव्रत्याच्या कल्पनेचें केलेलें समर्थन पाहून गंमत वाटते. हिंदु स्त्रीच्या जीवनांत सुधारणा होऊं घातली असली तरी पूर्वकालीन स्त्रीजीवितमूल्य "पातिव्रत्य" ह्याचा परित्याग करण्यास स्त्री अद्याप मनाने तयार झालेली नाही, असें स्पष्ट होतें.

अशा प्रकारें प्रमुख ग्रंथांची पाहणी केली. सम्यकृदृष्टीने पाहिलें असतांना असें आढळतें की, विधवांचा प्रश्न हा निकालांत निघाल्यासारखा झाला होता. आर्थिक व इतर कारणांनी बालविवाहाच्या रूढीवर घाला आला. विधवांचा प्रश्न हा पूर्वकालांत प्रामुख्याने बालविवाहाच्या अनुषंगाने अस्तित्वांत आला होता. दुसरी कोणती गोष्ट निदर्शनास येत असेल तर ती ही की, स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या हक्कांची मोजदाद करण्याची आवश्यकता समाजास वाटूं लागली. त्यादृष्टीनें ती पाहणी करण्यास लेखक प्रवृत्त होत आहेत. हे हक्क व्यक्तिगत आहेत तसे राजकीयहि आहेत. हक्क प्रस्थापनेच्या मार्गांत स्त्री व पुरुष यांची समानता अध्याहृत धरली आहे.

जुन्या रूढींचा पुरस्कार करण्याची प्रवृत्ति नष्ट झाली आहे असें नव्हे तर तिनेहि 'शास्त्रीय' स्वरूप परिधान केलें आहे. निमकरांचे 'हिंदू लग्न-संस्था' म्हणजे गोळ्यांच्या 'हिंदु धर्म आणि सुधारणे'ची सुधारून वाढविलेली आवृत्ति वाटते. दोघांच्या भूमिका, दृष्टि इत्यादि समान आहेत. विवेचनांत साम्यहि बरेंच आहे. गोळ्यांनी संवादात्मक पद्धतीचा अवलंब करून कादंबरीचा आभास निर्माण केला आहे. निमकरांचें पुस्तक मात्र पूर्णपणें 'शास्त्रीय' आहे. तथापि एकंदरीने ही प्रवृत्ति नष्ट झाली नसली तरी अप्रभावी झाली आहे. 'पातिव्रत्यविचार,' व 'विधवांचा धर्म' इ. पुस्तकांतून

स्त्रीपुढे पूर्वकालीन ध्येये ठेवण्याचा व ती चिरंतन आहेत असें दर्शविण्याचा यत्न झालेला आहे तोहि ह्या रूढिपुरस्कारवादी विचारसरणीचा एक आविष्कार आहे.

आतापर्यंतच्या विवेचनावरून सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, ज्ञानविषयक इ. क्षेत्रांत १९२० ते १९३५ या कालखंडांत विविध घडामोडी, चळवळी कशा घडत होत्या व स्त्रीजीवनावर त्यांचा कोणता परिणाम झाला हें स्पष्ट होईल. आतां वाङ्मयीन क्षेत्रांतील विविध घडामोडी, चळवळी संप्रदाय इ. चा परिचय करून घेणें आवश्यक आहे. ललित साहित्यांतील स्त्रीजीवनाचें आविष्करण कसें झालें आहे हें पाहण्यापूर्वी वाङ्मय क्षेत्राचें स्वरूप या काळांत कोणतें होतें व तें कसकसें बनत होतें हें पाहणें जरूर आहे असें वाटतें.

१९२० नंतर वाङ्मय क्षेत्रास स्वयंभूषण प्राप्त झालें हा उल्लेख मागें एके ठिकाणीं आला आहेच. ह्या वेळपर्यंत 'साहित्य' जें निर्माण झालें तें प्रामुख्याने सामाजिक वा राजकीय सुधारणांचा वा विचारांचा आविष्कार वा प्रसार करण्याचें माध्यम म्हणून. त्याला स्वयंभूषण प्राप्त झालें नव्हतें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी आपल्या 'निबंधमाले'च्या द्वारें साहित्यक्षेत्रीय कामगिरीचा आदर्श पुढे ठेविला होता. तो आदर्श ठेवतांना चिपळूणकरांना प्रामुख्याने पुनरुज्जीवनवादी विचाराचा प्रसार करावयाचा होता. 'निबंधमाला' हा साहित्यदृष्टीने केलेला आधुनिक कालांतला पहिला यत्न होय. पण त्याच्या मागची भूमिका ही प्रामुख्याने नवविचार प्रचाराची होती, ही गोष्ट दृष्टीआड करतां येत नाही. या वरून हें स्पष्ट होईल कीं, १९२० पर्यंत जरी विविध साहित्य निर्माण झालें तरी तें कशाचें तरी 'साधन' म्हणून. या कालांत मात्र साहित्याला 'साधन' म्हणून न मानतां 'साध्य' म्हणून मानण्याची प्रवृत्ति निर्माण झाली व ती चांगलीच वाढीला लागली. साहित्य क्षेत्रास जें स्वयंभूषण वा जी स्वायत्तता प्राप्त होत होती ती पाहण्याच्या दृष्टीने हा फरक ध्यानांत घेण्यासारखा आहे.

ह्या साहित्यविषयक स्वायत्ततेचें पहिलें दिग्दर्शन १९२० मध्ये होतें. ह्या वर्षी तात्यासाहेब केळकर हे बडोदें येथे झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यांचें त्या वर्षीचें अध्यक्षपदीय भाषण म्हणजे

साहित्यक्षेत्रांतील एक महत्त्वाचा मैलाचा दगड होय. हें भाषण अनेक परीने वेगळें आहे. त्यांनी त्या भाषणांत कितीतरी नवनवीन विचार मांडले. 'कलेमागे हेतु शोधनाचा गुप्त पोलीस लावूं नये' हें मत याच भाषणांत मांडलें. साहित्यक्षेत्रांत नवें युग म्हणण्याचें कारण म्हणजे विशुद्ध साहित्य शास्त्रीय टीकेचें नवें युगमान ह्या भाषणाने सुरू केलें. ह्यापुढे ह्या कालांत साहित्यविषयक चर्चा खूप जोराने झालेली आहे.

अशा प्रकारें साहित्यशास्त्रीय व टीकाशास्त्रीय विविध प्रकारची चर्चा सुरू होणें हें महत्त्वाचें आहे. ह्या फरकाच्या मूळाशी लेखकाच्या मनोवृत्तींत-दृष्टिकोणांत-झालेला फरक आहे हें लक्षांत घेणें जरूर आहे. या पूर्वीच्या कालांत लेखकांतला 'लेखक' हा 'लेखक' म्हणून जागृत नसे, तर लेखन करतांना त्यांतला 'समाजसुधारक', 'राजकीय सुधारक', इत्यादि कोणीतरी अन्य जागृत असे. व 'लेखक' हा प्रामुख्याने ह्या 'अन्या' ला मार्गदर्शन करी. या पुढच्या कालांत लेखकांतला 'लेखक' हा जागृत झाला. व तो जागृत 'लेखक' आत्माविष्कारासाठी क्षेत्र वा माध्यम शोधूं लागला. त्याला 'साहित्य' हें क्षेत्र जवळचें वाटलें. पण त्या दृष्टीने तो जेव्हा त्या क्षेत्राकडे पाहूं लागला तेव्हा त्याला असें आढळून आलें की, तें अगोदरच निरनिराळ्या प्रकारच्या इतर प्राण्यांनीच व्यापून टाकलें आहे. आत्मजागृत झालेल्या ह्या लेखकास हें त्या क्षेत्रांतील इतरांचें आस्तित्व खुपलें. व त्यांना काढून टाकण्याचें कार्य त्याने सुरू केलें. साहित्याचें कार्य कोणतें ह्या प्रश्नाबाबत ह्या कालांत साहित्यक्षेत्रांत जो वादविवाद झाला त्याचें खरें कारण ह्या लेखकाच्या आत्मजागृतींत आहे. व्यक्तित्वाच्या आविष्कारासाठी त्याने दोन गोष्टींचा पुरस्कार केला. पहिली म्हणजे साहित्य हें स्वतंत्र कर्तृत्वक्षेत्र आहे ह्या जाणिवेचा; या क्षेत्रांत प्रामुख्याने कोणाचीं बंधनें बंधनकारक मानावयाचीं असतील तर तीं ह्या क्षेत्रास अभिमत, संमत, व योग्य आहेत अशीच असा आग्रह ह्या जाणिवेच्या पोटीं आला. दुसरी गोष्ट म्हणजे साहित्याचें क्षेत्र हें केवळ आत्माविष्कारासाठी आहे ही होय. आत्मजागृतीची ही जाणीव सुप्त असल्याने तिचें स्वरूपावलोकन स्पष्टत्वाने झालें नाही. सहाजिकपणें साहित्य क्षेत्रांत ह्या आत्माविष्कार जागृतीने 'कले' चें आवरण घेतलें. अशाप्रकारें साहित्यक्षेत्रांत

ज्या घडामोडी होत होत्या त्यांत साहित्यक्षेत्राचें स्वयंभूपण ही पहिली व लेखकाच्या ठायीं 'लेखकत्वा' ची तीव्र जाणीव ही दुसरी, ह्या दोन प्रमुख होत. म्हणजे यापुढच्या कालांत साहित्य हें केवळ प्रचाराचें साधन न राहातां आत्माविष्काराचें झालें. (ह्या विवेचनांत साहित्य हा शब्द ललित वाङ्मय ह्याच अर्थाने वापरलेला आहे) अर्थात् हा आत्माविष्कार लेखकाच्या प्रवृत्तीवर अवलंबून असणें सहाजिक होतें. केळकर, फडके, इत्यादींच्या बाबतीत तो कलायुक्त, कलाप्रधान असेल, तर वामनरावांच्या बाबतींत तो चिंतनप्रधान असेल.

ह्या कालखंडांत लेखकाच्या ठिकाणीं ही जी 'लेखकत्वा'ची जाणीव निर्माण झाली ही एका फार मोठ्या सामाजिक प्रक्रियेचा परिपाक होय. ब्रिटिशांनी ह्या देशांत जें शिक्षण सुरूं केलें तें प्रामुख्याने व्यक्तित्वविचार प्रधान होतें. व्यक्तित्वाची जाणीव निर्माण होणें हें मोठें कार्य ह्या शिक्षणाच्या द्वारें होणें आवश्यक होतें. तथापि तें व्यक्तित्व या कालापर्यंत निर्माण झालें नव्हतें. तें निर्माण होऊं लागल्याची चाहूल वाङ्मयप्रांतांत प्रथम लागली. साहित्याचें तेंच मोठेपण होय. वैचारिकदृष्ट्या आधुनिक कालांतले पहिले राष्ट्रीय पुढारी म्हणजे गांधीजी हेच होत. व्यक्तित्वाच्या विचाराचा पुरस्कार करणारे आगरकर हे पहिले विचारवंत होत. परंतु त्यांनी व्यक्तित्वाचा पुरस्कार केला असला तरी ते खरे पहिले व्यक्तिवादी लेखक नव्हत. कारण त्यांनी आपलें व्यक्तित्व नवविचारांत विलीन करून टाकलें. महाराष्ट्रांतले पहिले व्यक्तिवादी लेखक म्हणून प्रो. फडक्यांकडे बोट दर्शवितां येईल.

व्यक्तित्वाच्या आविष्काराचें प्रमुख लक्षण म्हणजे व्यक्तीने पूर्वकालीन व अन्य स्वरूपाच्या बंधनाच्या दास्यांतून मुक्त व्हायचें ठरविलें पाहिजे. रूढ नीतीचीं, बोधाचीं इ. कोणतींहि बंधनें साहित्याच्या क्षेत्रांत कलावंताला नको. ती त्याच्या व्यक्तित्वाचा वा कलात्मकतेचा कोंडमारा करतील हा त्यांचा युक्तिवाद व्यक्तित्वाच्या निर्मितीची साक्ष देऊं शकतो. हा व्यक्तिवाद साहित्येतर क्षेत्रांत जीवनांत निर्माण होत होता त्याचें साहित्यक्षेत्रांत जें प्रतिबिंब पडलें तें ह्या स्वरूपांत.

ह्या कालखंडांतल्या लेखकाच्या कृतींतून ह्या ना त्या स्वरूपांत ह्या व्यक्तित्वाचा आविष्कार झालेला दिसून येतो. आत्माविष्काराची ही

जाणीव पुढे पुढे–व कांही लेखकांच्या बाबतींत आत्मकेंद्रियत्वांत विलीन पावली. लेखकांतला 'लेखक' वा कलावंत हा 'समाजजागृत' वा समाज-संमुख न राहतां आत्मसंमुख झाला, ह्या आत्मसंमुखतेपायी एक प्रकारची समाज–तिरस्काराची भावनाहि त्याच्याठायीं निर्माण झाली. त्याच्या कृतींतून एकप्रकारचा रडवेपणा व्यक्त होऊं लागला. आत्मत्वाची ही जाणीव तिचा उद्भव व तिला आलेलें हें एक प्रकारें विकृत स्वरूप हीं सारीं ह्या कालखंडांतील साहित्यांत प्रतीत झालीं आहेत. समाजक्षेत्रीय विचार व साहित्यक्षेत्रांतील त्यांचा पडसाद ह्यांचें हें परस्परावलंबित्व ध्यानांत घेणें जरूर आहे.

स्त्रीजीवनविषयक दृष्टीनेहि ह्या प्रक्रियेचा थोडा उहापोह करावा लागेल. पुरुषांच्या ठिकाणीं व्यक्तित्वाची जाणीव निर्माण झाली होती. तशी स्त्रियांच्या, विशेषतः सुशिक्षित स्त्रियांच्याहि पण– कारण त्यांच्या मनावर ब्रिटिश प्रणित व्यक्तित्व जाणिवेचा परिणाम होणें अपरिहार्य होतें. नव्या जाणिवेने स्वतःच्या जातीच्या (स्त्रियांच्या) पूर्वकालीन व स्वकालीन परावलंबित्वाची जाणीव निर्माण होऊन तीं बंधनें तडातड तोडून टाकण्याची इच्छा व प्रवृत्ति होणें अपरिहार्य होतें. अशा विविध प्रकारच्या बंधनांच्या पलीकडे जाण्याच्या क्रियेस पुरुषवर्गाचाहि पण विरोध होणें अपरिहार्य होतें. त्याविरोधाचें स्वरूप पाहातांच अशा 'स्वातंत्र्यवादिनी' स्त्रीच्या मनांत पुरुषाविषयी एकप्रकारची तेढ, एकप्रकारचा त्वेष निर्माण होणें अगदी अपरिहार्य होतें. हाहि लढा पुनः मध्यमवर्गाच्या दोन गटांच्या आपापसांतील झगड्याप्रमाणेच होता. (ही जाणीवहि प्रामुख्याने सुशिक्षित स्त्रीच्या बाबतींत निर्माण झालेली असणें अपरिहार्य होतें.) पुरुष हा उच्चमध्यमवर्गाचा प्रतिनिधि, तर स्त्री ही खालच्या वर्गाचें प्रातिनिधिकत्व करूं पाहणारी. तिच्या स्वहक्कांविषयीच्या जाणिवेने पुरुषाच्या मालकीहक्काच्या कल्पनेस धक्का बसणें सहाजिक होतें. या कालांत ह्या सर्व प्रक्रियेचें दिग्दर्शन झालेलें दिसून येतें. सुशिक्षित स्त्रियांत 'स्वातंत्र्यवादिनीं'चीं संख्या मोठी असणें अपरिहार्य होतें. या स्वातंत्र्यवादिनींच्या मनाची सर्वसाधारण समाजास ओळख न पटल्याने व त्यांच्या एकदर कल्पना विचार इत्यादि त्याच्या रूढ कल्पना विचारांस धक्का देणारे असल्याने, सर्वसाधारण

समाजांतील व्यक्तीच्या मनांत सुशिक्षित स्त्रीबाबत तेढीची वा प्रतिकूलतेची भावना जागृत होणें सहाजिक होतें. समाजाची गोष्ट राहूं द्या, पण सुशिक्षितवर्गहि त्यांच्या ह्या नवशिक्षित भगिनींच्या आशाआकांक्षांकडे सहानुभुतीने पाहण्यास तयार नव्हता. कारण त्यांचे विचार, कल्पना त्याच्या विचार कल्पनासहि धक्के देणारे असत. सुशिक्षित पुरुषवर्गाच्या ठायींची ही वृत्ति पाहून नवशिक्षित स्त्रीच्या मनांतील पुरुषद्वेषाची भावना अधिक तीव्र व्हावी ह्यांत नवल नाही. सर्वच पुरुष असे होते वा सर्वच सुशिक्षित स्त्रिया अशा होत्या हें खरें नव्हे. पण इंग्रजी शिक्षणाची स्त्रीच्या मनावर ही पहिली प्रतिक्रिया अशा स्वरूपाची होती हें ध्यानांत धरणें आवश्यक आहे. ह्या कालखंडांत ही प्रक्रिया समाजांत साकार रूप घेत होती. कांही पुरुषांची वृत्ति थोड्या कालांत सहानुभूतीची होऊं लागली कारण आगरकरांच्या विचारसरणींचें आकलन त्याला होत होतें. त्या योगाने द्वेषाची भावनाहि तेवढ्यापुरती दबल्यासारखी भासे. स्त्री जागृत झाल्यानंतर तिला स्वभगिनींची करुणास्पद अवस्था पाहून ती अवस्था लादणाऱ्या वर्गाविरुद्ध म्हणजे पुरुषवर्गाविरुद्ध त्वेषाची भावना तिच्या मनांत अत्यंत जोरानें निर्माण होणें हें केवळ अपरिहार्य होतें. मिल् सारखे स्त्री–कैवारी पुरुष आहेत हें पाहून किंचित् काल विरंगुळाहि वाटलेला असणें शक्य आहे. तथापि अधिक बारकाईनें पाहतांना ह्या सर्व हलाखीचें मूळ मातृत्वांत आहे व तें मातृत्व स्त्रीवर लादण्यांत निसर्गाने पुरुषांना मदत केली आहे हे लक्षांत येऊन मातृत्व भावनेविरुद्धहि जोराची प्रतिक्रिया होणें संभवनीय होतें. तसें झालेलें आहे. या दोन वृत्तींचा परिपाक होऊन विवाहबद्ध होण्याच्या क्रियेबद्दल एक प्रकारची घृणास्पदता वाटणें हेंहि शक्य होतें. ह्या साऱ्या गोष्टींचें दिग्दर्शन आपणांकडे १९२० ते ३५ या कालखंडांत झालेलें आहे. स्त्रियांच्या शिक्षणाचें प्रमाण अल्प असल्याने सामाजिक दृष्ट्या ह्या प्रक्षोभास फारसें तीव्र स्वरूप प्राप्त झालें नाहीं ही गोष्ट वेगळी. पण स्त्रीजीवनांतील विविध घडामोडींचें आकलन करून घेत असतां ह्या कालांत स्त्रीच्या ठायीं जी व्यक्तित्वाची जाणीव निर्माण होऊं घातली होती तिचे व्यक्तिगत व सामाजिक जीवनावर कसे पडसाद उमटत होते, तें माहीत करून घेणें आवश्यक होतें. ही वस्तुस्थिति जर

आपण ध्यानांत घेऊं शकलों नाहीं, तर ह्या कालखंडांतील साहित्यांतील स्त्रीजीवनाच्या प्रतिबिंबाचें आकलन पूर्णत्वाने होणार नाहीं.

१९३५ नंतर ह्या सर्वच चळवळीस कलाटणी मिळाली आहे. समाजवादी विचारांच्या आधाराने स्त्रियांची चळवळ ही दलित वर्गाच्या स्वोद्धाराच्या चळवळीचा एक भाग आहे असें मत सर्वश्रुत झालें. ह्या नव्या भूमिकेच्या आधारें स्त्री व पुरुष ह्यांत समानत्व आहे हें गृहित धरलें गेलें. त्यांना राजकीय सामाजिक हक्क पुरुषांबरोबरीने हवेत असेंहि सर्वमान्य झालें. या सर्व गोष्टींमुळें स्त्रियांच्या चळवळीस एक वेगळीच कलाटणी मिळाली. स्त्रीपुरुष विरोधाची नांगीच मोडली गेली. व सर्व सामान्य जनतेच्या व्यापक स्वोद्धाराच्या चळवळीशीं समरूप होण्याची व त्या चळवळीच्या यशाच्या द्वारेंच स्वोद्धार साधूं पाहण्याची इच्छा व शक्यता स्त्रियांत होऊं लागली. स्त्रियांच्या चळवळीला नवें वळण मिळालें तथापि हें सर्व पुढें घडलें आहे. तों पावेतों जी वस्तुस्थिति होती तिचें स्वरुप हें असें होतें. तें दृष्टिआड करणें योग्य होणार नाहीं.

गांधीजींच्या स्त्रीजीवनविषयक विचारांचा, व त्याबाबतींत समाजवादी विचारसरणीचा दृष्टिकोण यांचा परिचय करून घेतल्यानंतर या कालांत स्त्रीजीवनाला विशिष्ट दिशा लावणाऱ्या प्रवाहांची ओळख होऊं शकेल. परंतु या कालांतील आणखी एका महत्त्वाच्या विचारसरणीचा स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोण लक्षांत घेणें जरूर आहे. कारण भारतीय स्त्रीजीवनावर त्याहि विचारसरणीचा परिणाम होत होता. ही विचारसरणी म्हणजे सर्वाधिकारशाहीचा जयजयकार करणारी होय.

समाजसत्तावाद हे जसें एक आंतरराष्ट्रीय स्वरूपाचें विचारांदोलन आहे. तसें हें तत्त्वज्ञान पण. विशेष म्हणजे ह्या तत्त्वज्ञानाचा उदय आणि अवतार हा समाजसत्तावादी बिचारसरणी नेस्तनाबूद करण्यासाठी झाला. पण प्रत्यक्षांत त्या दृष्टीने फारसें यश या लोकांच्या पदरांत पडलें नाहीं. तथापि स्त्रीजीवनविषयक दृष्टीने पाहतां या विचारधारेच्या त्या विचारांकडे दुर्लक्ष करणें इष्ट नाही.

ही विचारसरणी व्यक्तिवादाला विरोधी आहे. ती स्त्रियांना परत दास्यांत ठेवूं इच्छिते. स्त्रीपुढे कृषिसंस्कृतिप्रणीत, शुद्धशीलत्व, पातिव्रत्य,

मातृत्व, इ. मूल्यें ठेविलीं जातात. तिच्या आर्थिक स्वातंत्र्याचाहि हक्क अमान्य केला जातो. परत तिला 'घरा'च्या संकुचित वातावरणांत ढकलण्याचा प्रयत्न होतो. स्त्रीपुरुषसमताही ह्या विचारप्रणालीला सुतराम असंमत आहे. अशाप्रकारें एकप्रकारच्या मध्ययुगीन पुनरुज्जीवनवादाच्या कल्पनेवर ही विचारधारा आधारलेली आहे. आपणांकडे ह्या कालांत ही विचारसरणी आली. बाह्यतः ती पराभूत झाली. पण हिंदु समाजाचें मत हें ह्या विचारप्रणालीचा स्वीकार करण्याइतकें मध्ययुगीन आहे. त्यायोगें त्याच्यावर या विचारांचा परिणाम होत होता हें न विसरणें श्रेयस्कर.

तथापि इतर प्रयत्नांत कसूर नव्हती. व्यक्तिवादाच्या भूमिकेवरून स्त्री व पुरुष यांत एकनीति मान्य असावी असे पुरस्कारणारे र. धों. कर्वे, आपल्या विशिष्ट (स्त्री) मासिकांतून स्त्रियांना जागृतीची वाट दाखविणारे शं. वा. किर्लोस्कर, इ. चे प्रयत्न अधिक आस्थेवाईकपणें होत होते. त्या प्रमाणांत ह्या प्रतिरोधी विचारधारेची पिछेहाट होत होती.

—०—

समाजवादी विचारांचा प्रसार

[१९३५ ते १९४७]

महाराष्ट्राच्या व भारताच्या आधुनिक कालांतील वैचारिक आंदोलनाचें परिशीलन करतांना १९२० ह्या वर्षास निरनिराळ्या रीतीने महत्त्व प्राप्त झालें आहे. त्याचें विवेचन ह्या प्रकरणाच्या प्रथमार्धात केलें आहे. त्यानंतर १९३५ या वर्षास महत्त्व द्यावयास हवें असा उल्लेख ह्या पूर्वीच आला आहे. १९३५ हें तसें विशेष महत्त्वाचें वर्ष नाहीं पण सामान्यतः १९३१-३२ नंतर समाजांत वैचारिक मंथन व्हावयास सुरुवात झाली होती. पाहिल्या महायुद्धाने जगास सर्व दृष्टीने मोठा धक्का दिला. जीवनाची धारणा इतकी बदलली कीं जीवनाच्या सर्वच अंगांचें पुन्हां एकदा नव्यानें परिशीलन वा मूल्यमापन करावयास हवें अशी जाणीव युरोपांतील विचारवंतांस झाली होती. जाणिवेचे पडसाद आपल्याकडेहि उमटूं लागले. पण त्याला ८।१० वर्षें लागलीं. परिश्रमेंतील विचारांचें मंथन आपल्याकडे १९३५ च्या सुमारास सुरू झालें व म्हणून हें वर्ष विवेचनाच्या सोयीसाठीं केवळ आधारास घेतलें आहे. खरा कालखंड १९२०-४७ असाच आहे पण केवळ विवेचनांत अधिक सुटसुटितपणा यावा म्हणून हे विभाग कल्पिले आहेत. वास्तविक १९३० ते १९३८ या सात आठ वर्षांपैकीं कोणते तरी वर्ष हें विचारांत होऊं घातलेल्या बदलाचें प्रतीक म्हणून धरलें तरी चालेल पण असें एकादे वर्ष महत्त्वाचें धरणें मात्र आवश्यक आहे. अधिक बारकाईनें पाहावयास लागलों तर १९२० ते १९३०, १९३० ते १९३९ व १९३९ ते १९४७ अशीहि रचना करावयास हरकत नाहीं. परंतु तितकी करणें हें विशेष सोयीचें नाहीं.

आधुनिक कालांतील विचारांचें उत्क्रांतिकरण कसकसें झालें हें पाहातांना समाजवादी विचार हा एक महत्त्वाचा टप्पा गणावा लागतो. किंबहुना असेंहि म्हणावयास हरकत नाहीं, कीं मानवी जीवनांत धर्म-विचारानंतर जर खरा कोणता मूलभूत महत्त्वाचा विचार असेल तर तो

म्हणजे समाजवादी विचारच होय. संबंध मानवजातीला कांहीं एक विधायक मार्गदर्शन करण्याची कुवत धर्मविचारांतच होती. व त्यानंतर समाजवादी विचारांतच आहे. धर्मविचार जेव्हा रूढ झाला तेव्हां मानवी समाज बराच अप्रगत होता. त्याच्या जीवनाला व्यापकत्व आलेलें नव्हतें. त्यानें पूर्वकालीन समाजव्यवस्थेंत कोणते कोणते उत्पात घडवून आणले तें कळणें केवळ अशक्य आहे. तथापि त्याने दीर्घ काल स्वीकार्य वाटतील अशा जीवननिष्ठा मनुष्यास दिल्या हें मान्य करावयास हरकत नाहीं. त्यानंतर समाजवादी विचारांच्या आगमनापर्यंत जे विविध प्रयत्न झाले त्यांना धर्मविचाराहून श्रेष्ठतर व्यापक वा उच्चतर असें अधिष्ठान होतेंच असें म्हणतां येत नाहीं. माणसाच्या ठायींच्या सत्प्रवृत्तीने निरनिराळे प्रयोग व उपक्रम केले. धर्म सुधारणेचा व राष्ट्रवादाच्या वाढीचा उपक्रम वा प्रयोग हा अशापैकींच आहे. पण केवळ बुद्धिनिष्ठ बनून मानवी समतेचा आधार घेऊन अखिल मानवी जीवनाचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न समाजवादानेच केलेला आहे. मानवी समतेची व बुद्धिनिष्ठ अशी पार्श्वभूमि ह्या विचाराला मार्क्सने दिली व म्हणून समाजशास्त्रीय विचार हा मार्क्सनंतर 'शास्त्रीय' बनला, केवळ कल्पनागम्य (Utopion) असा तो राहिला नाही. अशा 'शास्त्रीय' विचाराचें धर्मविचाराशीं भांडण यावें हें साहजिक आहे–होतें. कारण तो वेळपावतों 'शास्त्री' य त्वाचा मक्ता केवळ धर्माला–धर्मविचाराला–दिला होता. त्याच्या पलीकडे जाऊन माणसें विचार करूं शकत नव्हतीं. तसा विचार करण्यास योग्य अशी भौतिक परिस्थितीच निर्माण झाली नव्हती.

हा समाजवादी विचार आपल्या देशांत १९३५ च्या आसपास आला व ह्या वर्षानंतर तो चांगलाच बद्धमूल झालेला दिसला. सहाजिकच तेथून नवा कालखंड निर्माण झाला असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. अगदी स्त्रीजीवनाच्या दृष्टीनें पाहिल तरी समाजवादी विचारानेच स्त्री व पुरुष यांत खरी समता नांदणें शक्य आहे अशी हमी दिली. व ती देतांना शास्त्रीयदृष्ट्या विचार करून निसर्गाची व इतिहासकालीन परिस्थितीची सबब सांगितलेली नाही. किंबहुना स्त्री व पुरुष यांच्यांत जास्तीत जास्त आपलेपणाचे संबंध केवळ समाजवादी विचारच प्रस्थापित करूं शकतो असें

सिद्ध करून दिलें. सहाजिकच स्त्रियांची व त्यांच्या जीवनाकडे सहानुभूतीने पाहाण्याची प्रवृत्ति व्हावी हें क्रमप्राप्त होतें. समाजवादी विचाराच्या ह्या सर्वंकषतेमुळेंच तो विचार जेव्हा समाजांत मान्यता पावूं लागला तेव्हां पासून आपल्या देशांत नवें युगमान सुरू झालें. राष्ट्रीय जागृतीला व सर्वच क्षेत्रांतील विविध चळवळींना एक नवेंच ध्येयदर्शन झालें. त्यायोगें त्यांच्या मार्गक्रमणाची दिशा बदलली आहे. विचारवंतांना विचार करतांना हा विचार टाळतां येणें अशक्य झालें. ह्या सर्व कारणांमुळे हा विचार सामान्यतः लोकसंमत होण्याचें वर्ष १९३५ हें धरलें आहे व तेथून नवा कालखंड सुरू झाला असें म्हणतां येतें.

हा विचार आपणांकडे आला त्यावेळची इकडची परिस्थिति कशी होती तें थोडक्यांत पाहणें आवश्यक आहे. १९२९ मध्ये राष्ट्रीय सभेने संपूर्ण स्वातंत्र्य हें देशाचें ध्येय अधिकृतरीतीने ठरविलें. विचारवंत लोक परदास्याच्या कालांत प्रामुख्याने राजकीय परिस्थितीकडे वळत. इतर क्षेत्राकडे त्यामानाने बुद्धिवंत लोकांचें दुर्लक्ष झालें होतें असें म्हणतां येतें. स्वातंत्र्याच्या लढ्यांत ह्याच वर्गास तुरुंगवास भोगावा लागला होता. सहाजिकपणें स्वातंत्र्य हें ध्येय ठरविल्यानंतर स्वातंत्र्य मिळविल्यानंतर आपण ह्या देशांत कशाप्रकारचें जीवन सुरू करणार ह्या गोष्टीचा विचार होणें क्रमप्राप्त होतें. राष्ट्रीयसभेने स्वातंत्र्याचा ठराव केल्यानंतर तिला तावडतोब लढ्यास तोंड द्यावें लागलें. तिचे अनुयायी अर्थातच तुरुंगांत गेले. १९४२ नंतर परिस्थिति निवळली. त्या नंतर जे मोठमोठे पुढारी तुरुंगांतून बाहेर आले ते समाजवादाकडे एकमुखाने वोट दाखवावयास लागले. १९३४ मध्ये नेहरूंनी काँग्रेस समाजवादी पक्षाची राष्ट्रीय सभेच्या अंतरंगांतला पक्ष म्हणून स्थापना केली. व ह्या देशांतील विचारला एक नवीच कलाटणी मिळाली.

ही जी कलाटणी मिळाली ती मूलभूत महत्त्वाची आणि सर्वंकष अशी होती. कोणतेंहि क्षेत्र तिने सोडलें नव्हतें. त्यामुळे ह्या कलाटणीनंतर नवीन विचारप्रणाली निर्माण झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्याचें स्वरूप, तंत्र व तत्त्वज्ञान ठरविणारे गांधीजी हे ह्या कालांतले सर्वश्रेष्ठ पुरुष होत. त्यांच्या मनावर धर्मविचाराचा संस्कार खोल उमटला होता. त्यांनी आपल्या

कर्तृत्वाने समाजवादी विचाराचें एक 'नवें दर्शन' करण्याचा प्रयत्न केला. तोच त्यांच्या नांवावर मोडला जाऊं लागला. अशाप्रकारें राष्ट्रीय सभेंतच समाजवादी व गांधीवादी विचारसरणी उत्पन्न झाल्या. समाजवादी विचारसरणी ही देशांत जोराने वाढीला लागली. त्याशिवाय राष्ट्रीय सभेंत धनिकांचे हितसंबंध रक्षण व्हावयास हवें असें म्हणणारा व त्या आशेने राष्ट्रीय सभेकडे पाहणारा हिंदी भांडवलवाल्यांचा वर्ग होता. त्याला स्वतःचें असें स्वतंत्र तत्त्वज्ञान नव्हतें. स्वतःचे हितसंबंध संरक्षिणें, व त्यासाठी विविध यत्न करणें हेंच त्याचें कार्य. पण हा वर्ग राष्ट्रीय सभेवर वजन मारून होता. व त्याच्या हितसंबंधाचें बरेंचसें संरक्षण गांधीजींच्या प्रयत्नांनी होत होतें.

अशाप्रकारें ह्या कालानंतर वैचारिक जीवनास एक नवाच घाट आला असें आढळून येईल. जुन्या विचारप्रणाली नामोहरम झाल्या; मागे पडल्या. नव्यांनी त्यांची जागा घेतली. तथापि नव्या विचारसरणींचें वैशिष्ट्य पाहण्यापूर्वी जुन्या कालांतील विचारसरणींचें विलीनीकरण नवीन कालाच्या विचारसरणींत कसें झालें तें पाहणें आवश्यक आहे.

१९२० ते १९३५ ह्या कालांतील विचारसरणींचें अवलोकन करीत असतां समन्वयवादी विचारसरणीचा उल्लेख आला आहे. वास्तविक समन्वयवाद ही एक स्वतंत्र विचारसरणी नाही तिला विशिष्ट तत्वज्ञान इ. नाही. ती केवळ एक प्रवृत्ति आहे. सुधारणावादी विचारसरणीचें वास्तविक तें एक अंग आहे. पण १९२० नंतरच्या ८।१० वर्षांत कोणत्याहि राजकीय ठळक ध्येयाच्या अभावीं त्या प्रवृत्तीस विचारसरणींचें स्वरूप प्राप्त झालें होतें. सांस्कृतिक राष्ट्रवादी विचारसरणी व सुधारणावादी विचारसरणी ह्या समन्वयवादाच्या आधारानेच जिवंत होत्या. त्यांच्यांत सामाजिक उत्थापनाचें सामर्थ्य उरलें नव्हतें. समाजवादी विचारांनी समन्वयवादास जोराचा धक्का दिला. विशेषतः समाजवादाच्या तत्वज्ञानाचा एक भाग म्हणजे वर्गविग्रह–त्याने समन्वयवाद हा अशक्यच करून टाकला. व्यवहारतः समन्वयाचें कार्य गांधीजींच्या विचारांच्या आधाराने झालें; पण गांधीजी वृत्तीने समन्वयवादी नव्हते.

पूर्वकालांतील विचारसरणींचा व नवकालांतील विचारसरणींचा कसा

समन्वय झाला हें पाहण्यापूर्वी आणखी एका वैचारिक घटनासूत्राकडे लक्ष देणें आवश्यक आहे. समाजवाद ही एक आंतरराष्ट्रीय विचारसरणी आहे. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत ह्या कालखंडांत ज्या वैचारिक घडामोडी होत होत्या त्यांचे पडसाद आपल्या देशांतील वैचारिक जीवनावर उमटल्याविना राहिले नाहीत. आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत–विशेषतः युरोपांत–फॅसिझम ही विचारधारा निर्माण होऊन चांगलीच वाढूं लागली होती. जर्मनी, इटली ह्या राष्ट्रांतील राजसत्तांनी आपलें तत्त्वज्ञानहि त्या विचारसरणीच्या आधारें निर्माण केलें होतें. त्याचेंहि पण आक्रमण आपणांकडे होत होतें. पूर्वकालांतील समन्वयवादी विचारसरणीचा कांही (बराच) भाग समाजवादी विचारांकडे, गांधीवादी विचारांकडे वळला. व उरलेला अल्पसंख्य गट होता त्याने आंतरराष्ट्रीय फॅसिझमपासून स्फूर्ति घेऊन सांस्कृतिक राष्ट्रवादाला पुन्हा जिवंत करण्याचा उपक्रम केला.

याशिवाय या कालांत युरोपमध्ये विशेषतः इंग्लंडच्या पुढारीपणाने घटनात्मक लोकशाहीचा विचार पुरस्कारला जात होता. कारण इंग्लंडने समाजवादाचा स्वीकार केलेला नव्हता. इंग्लंडची राज्यसत्ता ही समाजवादी विचारांबाबत तटस्थ होती. वैचारिकदृष्टीने तिने 'फॅसिझम' ची बाजू घेतली नाही. तिला तें घेणें शक्य नव्हतें. कारण इंग्लंडच्या लोकशाहींत व्यक्तिस्वातंत्र्याला नैतिक महत्त्व होतें, फॅसिझममध्ये तें नव्हतें. तथापि ह्या कालांत इंग्लंडांत सनदशीर लोकशाही विचारांला महत्व प्राप्त झालें होतें. भारतीय विचारवंतांनी ध्येय म्हणून नव्हे पण धोरण म्हणून घटनात्मक लोकशाहीचा विचार मान्य केला. येथल्या अल्पसंख्य धनिक लोकांस तो विचार मान्य असण्यासारखा होता. त्यामुळें त्यांची सहानुभूति त्या विचाराकडे होती.

व्यशाप्रकारें १९३५ नंतर जी नवी वैचारिक परिस्थिति निर्माण झाली तिच्या आधारें नवीन विचारसरणी सुरू झाल्या. आज जग हें विचारांनी जवळ जवळ येत असल्याने विचारसरणी ह्याहि राष्ट्रीय न ठरतां आंतरराष्ट्रीय झाल्या आहेत. पूर्वकालीन विचारसरणींचा संबंधच पाहायचा तर असें म्हणतां येईल, की टिळकांची राष्ट्रसुधारणावादी विचारसरणी ही फॅसिझमच्या आधारें वाढणाऱ्या सांस्कृतिक राष्ट्रवादी विचारसरणीशी समरस झाली. रानड्यांचा सुधारणावाद हा कालशेष झाला असें म्हणतां आलें

नाही तरी तो सनदशीर लोकशाहीच्या विचाराशी एकात्म पावला. व आगरकरांचा क्रांतिवादी राष्ट्रवाद होता, जो त्यांच्या मृत्यूनंतर ह्या कालांत जवळ जवळ सुप्त होता; तो राष्ट्रवाद समाजवादी विचारांच्या आधारें पल्लवित झाला. व तो वाढीला लागला. १९४७ पर्यंत सामान्यतः हीच वैचारिक परिस्थिति अस्तित्वांत होती. त्यानंतर स्वातंत्र्याच्या कालखंडांत महत्त्वाचे फरक झालेले आहेत, होऊं लागले आहेत. त्यांचें स्वरूप येथे पाहणें आवश्यक नाही.

ह्या सर्वांचा विचारसंक्रमणाचा स्त्रीजीवनाशी निकटवर्ती संबंध आहे. या विचारसरणी म्हणजे केवळ दृष्टिकोण नसून त्यांना विशिष्ट जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे. त्या दृष्टीने ह्या विचारसरणीचें स्त्रीजीवनपर कांहीना कांही भाष्य आहे. त्याचा स्त्रीजीवनावर परिणाम झालेला आहे. त्याचें स्वरूप पाहण्यापूर्वी या कालांत आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत व इतरत्र जो जीवन-मूल्यांच्या बाबत संघर्ष झाला त्याचें स्वरूप पाहणें जरूर आहे.

१९३५ ते १९४७ या कालखंडांत समाजसत्तावादी विचार रूढ होऊं लागल्यानंतर या देशांतील वैचारिक जीवनास नवा घाट कसा आला व पूर्वकालीन विचारसरणींचा व नवीन विचारसरणीचा समन्वय वा विरोध कसा आला हें पाहिलें. हा काल सर्व जगाच्या इतिहासांतच अत्यंत महत्त्वाचा काल होय. आपल्या देशांत तर या कालांत स्वातंत्र्यप्राप्तीचा लढा अत्यंत तीव्र स्वरूप धारण करीत होता. स्वातंत्र्य लढ्यांत एक वेगळीच प्रत निर्माण करण्याचा यत्न गांधीजीच्या प्रयत्नाने व त्यामागे असलेल्या तत्त्वज्ञानाने झालेला आहे. जागतिक दुसरें महायुद्ध या कालांत आलें व संपलें. पण विचारवंतांना त्याने इतकें आत्मप्रवण केलें आहे की कोणता निश्चित स्वरूपाचा मार्ग जगासमोर आहे असें म्हणतां येत नाही. १९२० ते १९३५ या कालांतील विचारसरणी इ. ची पाहाणी करतांना असें आढळून आलें आहे की त्या कालांत विविध क्षेत्रांत 'शास्त्रीय' तेचें युगमान सुरू झालें. साहित्य क्षेत्रांतसुद्धा शास्त्रीय दृष्टि वाढत गेली. रसपरिपोष इ. चे शास्त्रीय नियम कोणते ह्याचा अधिकाधिक खल होऊं लागला. १९३५ चे पुढील कालांत ह्या 'शास्त्रीय' तेच्या पुढची अवस्था गाठण्याचा प्रयत्न सुरू झाला व ती म्हणजे 'मानवी' (Human) अवस्था होय. जगाच्या

विचारक्षेत्रांतच ही वृत्ति वाढीला लागत होती. म्हणजे आतापर्यंत विविध परदास्यांतल्या लोकांचे जे स्वातंत्र्य लढे होते ते प्रामुख्याने 'राष्ट्रीय' होते. ह्यापुढे ते 'राष्ट्रीय' राहिलेच पण व्यापकतेने पाहणारांना मानवी मताची स्वातंत्र्याकडे जाण्याची जी दुर्दम्य मनीषा आहे तिचा विविध देशांतील आविष्कार म्हणजे हे लढे होत. ही जी नवी 'मानवी' दृष्टि आहे ही फारच महत्त्वाची आहे. ह्या 'मानवी' अधिष्ठानाने भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न हा अखिल मानवजातीच्या स्वातंत्र्य लढ्याचा एक भाग गणला गेला. गांधीजींनी आपलें तंत्र आणि तत्त्वज्ञान प्रामुख्याने राष्ट्रीय उद्दिष्ट पुढे ठेऊन निर्माण केलें. पण त्याला हें 'मानवी' अधिष्ठान कोणी दिलें असेल तर तें पंडित नेहरूंनी होय. ही मानवी दृष्टि वास्तविक समाजसत्तावादी विचाराचा एक भाग होती. पण समाजसत्तावादी विचार हा ह्या देशांत आला पण त्याने ह्या देशांतील विशिष्ट परिस्थितीप्रमाणे सांप्रदायिक स्वरूप प्राप्त करून घेतलें. ह्या विचाराच्या सांप्रदायिकतेकडे लक्ष न देतां त्याच्या 'मानवी' अंगाकडे जनतेचे लक्ष वारंवार कोणी ओढलें असेल तर तें पंडित नेहरूंनीच होय. कॉंग्रेसचे राष्ट्रीय धोरण प्रामुख्याने गांधीजींनी ठरविलें पण त्याला आंतरराष्ट्रीय व 'मानवी' लढ्याचें पंडित नेहरूंनी जें स्वरूप दिलें तें फार महत्त्वाचें आहे. ह्या कालखंडांचा विचार करतांना जीवनाच्या प्रत्येक शाखेंतील समस्येचा विचार 'मानवी' दृष्टींतून होऊं लागला ही घटना फार महत्त्वाची आहे.

१९४५ त दुसरें महायुद्ध संपलें. त्यानंतर आंतरराष्ट्रीय संघटना अस्तित्वांत आली. त्या संघटनेने 'मानवी स्वातंत्र्या' ची सनद संमत केली ही गोष्ट जागतिक विचारांचा ओघ कोणीकडे आहे हें दर्शविते. आपल्या देशांत ह्या कालखंडांत गांधीवादी विचारसरणी व समाजसत्तावादी विचार-सरणी या दोन्हीहि विचारसरणी सारख्याच प्रकर्षाने वर्धमान होत होत्या. त्यांच्या आधारें जीवितमूल्यांचा प्रश्नहि महत्त्वाचा झालेला आहे. जीवनांत इतके मूलभूत व क्रांतिकारक बदल झालेले आहेत की, आजच्या अवस्थेंत कोणतीं जीवितमूल्यें प्रमाण मानायची व त्यांचा अवलंब कसा करायचा हा महत्त्वाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. अर्थात् त्याला अधिक तीव्रतर स्वरूप राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आलेलें आहे.

ह्या कालांतल्या राजकीय व सामाजिक चळवळींपैकी महत्त्वाची चळवळ म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ होय. ह्या कालांत ही चळवळ एकावयवी न राहतां अनेकावयवी झाली. समाजसत्तावादी विचार आल्यानंतर असा महत्त्वाचा वैचारिक बदल झाला की, 'राष्ट्रीय स्वातंत्र्यप्राप्ती' ही गोष्ट ध्येयस्वरूप न राहतां 'साधन' म्हणून झाली. खरें उद्दिष्ट म्हणजे जीवनांत समता, न्याय, बंधुभाव निर्माण करणें हें. ह्या गोष्टी साध्य करण्यासाठीची किमान पहिली पायरी म्हणजे राजकीय स्वातंत्र्य, असा विचार सर्वत्र फैलावूं लागला. त्याचा परिणाम म्हणजे स्वातंत्र्याच्या लढ्याचें स्वरूप द्विविध झालें. परकीय सत्ताधाऱ्यांबरोबर लढा देतां देतां स्वकीय धनिकांचे दास्यांतूनहि मुक्त व्हावयास हवें अशी जाणीव निर्माण झाली. मजूर व शेतकरी वर्गांत त्यासाठी जागृतीचे यत्न सुरू झाले. ब्रिटीश राज्यकर्त्यांबरोबर द्यावयाचा लढा अधिक व्यापक होऊं लागला. दलित व पतित वर्ग व त्याच्या उद्धाराची चळवळ हाहि एक राष्ट्रीय चळवळीचा अवयव झाला. स्त्रियांची चळवळहि त्यांतच समाविष्ट होऊं लागली. अशा या कालांतली प्रमुख चळवळ म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ, तिचें स्वरूप अधिक व्यापक, अधिक सर्वंकष अधिक ध्येयगामी होत गेलें. पण ब्रिटिशांनी मुत्सद्देगिरीने आपणांवरचा रोख बदलून टाकला. सत्तादान केलें व राजकीय, वैचारिक, सामाजिक, इतर विविध दृष्टीने आपली, राज्यकारभार आपल्या हातीं घेण्याची तयारी होण्यापूर्वीच आपण आपल्या देशाचे मालक झालोंत. ह्या अनाचक सत्तादानामुळे परिस्थिति बदलली. अद्यापहि ती स्थिर झाली आहे असें नव्हे.

तथापि राष्ट्रीय चळवळीच्या अनुषंगाने नव्या राष्ट्रीय संस्कृतीचा बनाव होऊं घातला होता. राष्ट्रभाषा, राष्ट्रध्वज, राष्ट्रचिन्ह, राष्ट्रीय गीत,.....इ. सांस्कृतिक महत्त्वाच्या 'राष्ट्रीय' संकेतांची निश्चिति हळूहळू होत होती. पण स्वातंत्र्यदानाने ह्या सर्वच गोष्टी जराशा निकडीने ठरवाव्या लागल्या. ला दृष्टीने पाहिलें तर हिंदुस्थानला पारतंत्र्य जितक्या अचानकतेने तितक्याच अचानकतेने त्याला स्वातंत्र्य आलें असें म्हटलें असतां फारसें चूक होणार नाहीं.

ह्या सर्व चळवळींत स्त्रीचें स्थान काय होतें हा महत्त्वाचा प्रश्न

आहे. ह्या कालापर्यंत स्त्रियांचा प्रश्न हा प्रामुख्यानें सामाजिक प्रश्न होता. पण राष्ट्रीय चळवळीच्या कालांत तो 'राष्ट्रीय' प्रश्न झाला व शेवटच्या कालांत 'मानवी' झाला. 'राष्ट्रीय होण्याचें मुख्य गमक म्हणजे स्त्रियांनी स्वातंत्र्याच्या लढ्यांत अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली हें होय. राष्ट्रीय जागृतीच्या काळांत, लाठी हल्ले, गोळीबार, तुरुंगवास,···हीं जीं दिव्यें सर्वसाधारण जनतेला अनुभवावीं लागत त्यांत पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियाहि भागीदार झाल्या. साहजिकपणें स्त्रियांच्या प्रश्नांकडे पाहण्याची एक व्यापक मनोवृत्ति निर्माण होत गेली. आणखीहि एका दृष्टीने स्त्रियांच्या ह्या हातभारास महत्त्व आहे. स्त्री व पुरुष यांच्यांत एकध्येयता प्रस्थापित झाल्याचें तें महत्त्वाचें गमक आहे. स्त्रियांच्या स्वातंत्र्य लढ्यांत झालेल्या अमोल साहाय्याबद्दल गांधीजी, नेहरू इ. राष्ट्रीय पुढाऱ्यांनी अत्यंत आदराचे उद्गार काढले आहेत.

ह्या राष्ट्रीय जागृती बरोबर शिक्षणाचा प्रसारहि मोठ्या प्रमाणावर होत होता. सुशिक्षत स्त्रियांची संख्या वाढत होती. समाजांत एक प्रकारची सुप्त क्रांति होऊं घातली होती. शिक्षणाबरोबर व्यक्तित्वाची जाणिव आली होती. आर्थिक स्वातंत्र्यासाठी लढा आला, सर्व ठिकाणीं समानसंधि असावी अशी मागणी आली, नागरीक म्हणून सर्व हक्क असावेत असा साक्षेपी आग्रह सुरू झाला. पूर्वकालीन अन्याय्य कायदे बदलावयास हवेत असा प्रयत्नही होऊ लागला पण या सर्व बाबतींत ब्रिटिश राजवटीच्या शेवटच्या अवस्थेंत विशेष कांहीच होऊं शकलें नाही. कारण समाजापुढे मोठे राजकीय व आर्थिक प्रश्न उभे राहिले. त्यामानाने ह्या प्रश्नांकडे लक्ष गेलेलें नाहीं. तथापि एक मोठी मानसिक क्रांति झाली. ब्रिटिश राजवटीनेच ती केली व ती म्हणजे नैतिक, तांत्रिकदृष्ट्या ह्या सर्व गोष्टी समर्थनीय आहेत, हें प्रस्थापित करणें ही होय. त्या प्रत्यक्ष पदरांत पडणें हा फक्त कांही कालाचा प्रश्न आहे. स्त्रीजीवनविषयक वैचारिक उत्क्रांतीच्या दृष्टीने हा विचार फार महत्त्वाचा आहे.

स्त्रियांच्या हक्कांसंबंधी व कर्तव्यांसंबंधी या कालांत बरीच प्रगति झाली असें म्हणतां येईल. द्विभार्याप्रतिबंधक कायदा कांही प्रांतांत संमत झाला. प्रांतीय विधिमंडळांनी स्त्रियांना कांही हक्क देण्याचीहि तरतूद केली.

१९३८ त मिळकतींत स्त्रियांना अधिक अधिकार देणारा देशमूख कायदा संमत झाला. अद्यापि अखिल भारतीय स्वरूपांत हिंदु–स्त्रियांना सर्वप्रकारचे कायदेशीर अधिकार मिळाले आहेत असें म्हणतां येणार नाही. त्या दृष्टीने सर्वत्र गाजलेल्या हिंदु–कोड–बिलाची दुर्दशा लक्षांत घेण्याइतकी स्पष्ट आहे. मिळकतींत व विवाहविषयक बंधनाच्या परिपालनाबाबत कांही अधिकार वा सवलती दिल्याविना खरी समतेची व कायदेशीरहि प्रस्थापना झाली असें म्हणतां येणार नाही. तसे अधिकार मिळेपर्यंत विविधप्रकारची चळवळ ही अपरिहार्य आहे. तसे अधिकार पदरांत पडल्यानंतर मात्र स्त्रियांच्या वेगळ्या प्रकारच्या संघटना हव्यात की काय हा प्रश्न निर्माण होऊं शकतो. खेदाची गोष्ट अशी कीं स्वातंत्र्यानंतरच्या पांचवर्षांत ह्याबाबत कांहीं तरतूद होऊं शकली नाही!

तथापि एक मोठा टप्पा गाठला आहे व तो म्हणजे नैतिक पाया तयार होणें. त्याबाबत मात्र यापुढे स्त्रियांच्या अधिकारप्राप्तीचा प्रश्न हा कालाचा प्रश्न आहे असें म्हणतां येतें. यापुढे नैतिकदृष्ट्या तसे अधिकार द्यावयास नकोतच असें कोणी सूज्ञपणे म्हणेल असें नाही. देशांत पुराणमताभिमानी लोकांचा गट आहे पण तो अत्यल्प व अग्रभावी. तसेंच आणखीहि एका गोष्टीचा विचार करावयास हवा. स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी अखिल भारतीय स्वरूपाची संस्था स्थापन झाली होती. तिच्या कार्याचा व्याप या काळांत बराच वाढला असें म्हणतां येतें. राष्ट्रीय जागृतीच्या चळवळीबरोबर तीहि चळवळ हळके हळके होत आहे. १९३९ चे सुमारास राष्ट्रीय सभेने जी नियोजत समिति नियुक्त केली तिने आणखी अनेकविध उपसमित्या नेमल्या त्यांत एक समिति केवळ स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार करण्यासाठी व नियोजित व्यवस्थेंत स्त्रियांच्या कोणत्या कोणत्या हक्कांचा समावेश व्हावा यासाठी नेमली गेली. त्या समितीने आपला अहवाल "Woman's role in a Planned Economy" या नांवाने प्रसिद्ध केला आहे. ह्या समितींत सर्व स्त्रिया होत्या ही ध्यानांत धरण्यासारखी गोष्ट आहे. ह्या समितीने शिक्षण, वैद्यकीय साहाय्य इत्यादि विविधप्रकारचें साहाय्य स्त्रियांना मिळावें व स्त्रीपुरुष यांत खरी समता निर्माण व्हावी असें मत दिग्दर्शित केलें. स्त्री व पुरुष यांच्यांतला

परस्परसंबंध दर्शविणारें संकेतचिन्हहि बदलावें असें सुचविलें. यापूर्वी पुरुष पुढे उभा व स्त्री मुलास हातांत घेऊन त्याला अनुसरते असें प्रतीकात्मक चित्र वा चिन्ह मान्य झालें होतें तें बदलून दोघेही सारख्याच उत्साहाने प्रगतीचा मार्ग अवलंबित आहेत व मुलाला दोघांनीहि हात दिला आहे असें प्रतीक चिन्ह असावें अशी सूचना एकमताने केलेली आहे व हा मूलभूत कल्पनेंतला फरक फार अन्वर्थक आहे असें म्हणावें लागेल. ह्या अहवालांना महत्त्व आहे. कारण ही नियोजन समिति राष्ट्रीय सभेने नेमलेली होती. पंडित नेहरू हे तिचे अध्यक्ष होते. स्वदेशी सरकार स्थापन झाल्यावर जी नियोजन समिति नियुक्त झालेली आहे तिच्या एकंदर कार्याची दिशा ह्या विविध उपसमित्यांच्या अहवालाच्या आधारें ठरली जाणार आहे. ह्या सर्व विवेचनावरून ह्या कालखंडांत स्त्री व पुरुष ह्यांच्यांत सर्वच बाबतींत समता निर्माण होण्याच्या दृष्टीनें कसे प्रयत्न होत होते ह्याची कल्पना येऊं शकेल. त्यावरून असें स्पष्ट होईल कीं, स्त्री व पुरुष ह्यांच्यांत तात्त्विक, व नैतिक स्वरूपाची समता प्रस्थापित झाली आहे. प्रत्यक्षांत ह्या परिस्थितीचें रूपांतर होण्यांत कायद्याची मदत अधिक व्हावयास हवी. ती मात्र जरा सावकाशच होणार असें दिसतें.

स्त्रियांचें कार्यक्षेत्रहि व्यापक होत आहे. ह्या कालापूर्वी प्रामुख्यानें शिक्षण व वैद्यकीय व्यवसाय ह्याच व्यवसायांत स्त्रियांचा प्रवेश झाला होता. स्त्रियांची पात्रता प्रामुख्यानें त्याच क्षेत्रापुरती मर्यादित असावी असें कित्येकांचें मत असावें असें दिसतें. तथापि महायुद्धाने ह्याबाबत बरीच मदत केली आहे. लष्करी हालचालींच्या अनुषंगाने विविध क्षेत्रें स्त्री व पुरुष ह्या दोघांनाहि उपलब्ध होत होती. त्या त्या नवनिर्मित क्षेत्रांत दोघांचाहि प्रवेश झाला. निरनिराळ्या सरकारी व निमसरकारी कार्यालयांत (ऑफिसांत) माणसांची चणचण भासूं लगली. सुशिक्षित स्त्रियांची संख्या वाढत होती. त्यांनी ही चणचण अंशतः भरून काढली व आपला प्रवेश त्या त्या विविधप्रकारच्या कार्यक्षेत्रांत करून घेतला. एका दृष्टीने स्त्रियांचें कार्यक्षेत्र विस्तृत, व्यापक झालें. विमान व्यवसाय, गृहसंरक्षक दलें, इत्यादि विविध क्षेत्रांतहि स्त्रियांचा प्रवेश झाला व तीं तीं क्षेत्रें त्यांच्या कार्यास मोकळीं झालीं. कायदेशीर प्रगति जरी फारशी नाही तरी ही जी

सामाजिक स्वरूपाची हालचाल सुप्तपणें होत होती ती महत्त्वाची होती. तिने स्त्रियांसंबंधीच्या विविध सांकेतिक कल्पना नष्ट होऊं लागल्या. स्त्रियांसहि आपल्या कर्तृत्वाबद्दल एकप्रकारचा आत्मविश्वास निर्माण होऊं लागला. अशाप्रकारें स्त्री व पुरुष ह्यांच्या कर्तृत्वक्षेत्रांतील अंतर कमी झालें. व्यक्ति म्हणून त्यांना कायदेशीर स्थानहि थोडेंबहुत प्राप्त झालें. वडिलोपार्जित नव्हे पण तिने कमावलेल्या पैशावर जो तिच्या पालकाचा वा विवाहित असल्यास, पतीचा कायदेशीर अधिकार होता, तो तिला मिळाला. अशा प्रकारें समाजजीवनाचीं विविध क्षेत्रें तिला उपलब्ध होत होतीं, व्यक्ति म्हणून कायदेशीर अधिकार प्राप्त झाले. नागरिकत्वाचे प्रमुख (मतदान इत्यादि) अधिकार मिळाले. विवाहविच्छेदन व मिळकतीतला वाटा ह्या बाबत मात्र अद्याप अधिकार प्राप्तो झाली नाही. पण त्यांची नैतिक पार्श्वभूमि तयार झाली आहे असें सामान्यतः मान्य करावयास हरकत नाही.

१९३५ ते १९४७ या कालांत सामाजिक जागृतीची व स्त्रीहक्क संपादनाची चळवळ कशी वर्धमान होत होती ह्याची कल्पना आतापर्यंतच्या विवेचनावरून होऊ शकेल. ह्याकालांत स्त्रियांच्या विषयी जे विविध प्रकारचें वाङ्मय निर्माण झालें त्याचा परामर्श घेणें आवश्यक आहे. ह्या वाङ्मयाच्या पहाणीपूर्वी एका महत्त्वाच्या वैचारिक संक्रमणाचा उल्लेख करणें जरूर आहे. पूर्वकालांच्या मानाने ह्या कालखंडांत केवळ स्त्रीजीवनविषयक चर्चा करणारे ग्रंथ एकंदरीने कमी निर्माण झालेले आहेत. ह्याचा अर्थ स्त्रीजीवनविषयक प्रश्न संपले होते वा त्यांना समाजांत महत्त्व नव्हतें असें नव्हे, तर या चळवळीला एक नवेंच वळण प्राप्त होत होतें. आजपर्यंत स्त्रियांचा प्रश्न हा स्वतंत्र सामाजिक प्रश्न आहे अशा दृष्टीने ह्या प्रश्नाकडे पाहिलें जात होतें. ह्यापुढे ती दृष्टि बदलली. या कालांत जो समाजसत्तावादी विचार बद्धमूल होऊं घातला होता ह्या विचारप्रणालीची स्त्रीजीवनाकडे पाहण्याची दृष्टि वैशिष्ट्यपूर्ण व अत्यंत शास्त्रीय अशी आहे. तिचा परिणाम स्त्रियांच्या चळवळींवर होणें अगदी साहजिक आहे व तसा झालाहि. ह्या विचार प्रणालीची स्त्रीजीवनविषयक जी भूमिका आहे ती ह्या विचारधारेचा प्रमुख प्रवर्तक ' एंगेल्स ' त्याच्या " Origin of the Family " ह्या

प्रबंधांत विशद केली आहे. ह्या प्रबंधांत प्रामुख्याने आर्थिक घडा-मोडींचा स्त्रीजीवनावर जो परिणाम झाला आहे त्याचें विवेचन केलें आहे. व ही आर्थिक घडी जसजशी बदलेल तसतशा स्त्री व पुरुष ह्यांच्या स्त्रीजीवनविषयक भूमिका व दृष्टिकोण बदलतील असें उद्घोषित केलें. स्त्री व पुरुष ह्यांच्यांत खरी समता ही समाजसत्तावादी समाजरचनेंतच होणें शक्य आहे असा विचार मांडला. सहाजिकपणें ही विचारसरणी जसजशी बद्धमूल होऊं लागली तसतशी स्त्रीजीवितविषयक भूमिका हीहि बदलली जाऊं लागली. ह्या कालखंडांत अशाप्रकारें भूमिका बदलली गेली. त्याचा परिणाम असा झाला की स्त्रियांचे प्रश्न हे सामाजिक न राहतां आर्थिक गणले गेले. पंडित नेहरूंच्या विचारधारणेवर ह्या विचारसरणीचा ठसा खोल उमटला असल्याने स्त्री व पुरुष ह्यांच्यांत खरी सर्वगामी समता स्थापन होण्याचे जे प्रयत्न झाले त्यांत पंडित नेहरूंचा प्रामुख्याने फार मोठा भाग आहे. आगरकरांनंतर अखिलभारतीय स्वरूपाचा स्त्रियांच्या सुधारणेचा खरा पुरस्कर्ता कोणी असेल तर ते पंडित नेहरू होत. त्यांच्या यत्नानेच ह्या दिशेने भारतीय स्त्री थोडीबहुत प्रगति करूं शकली. ह्या कालखंडांतील स्त्रीजीवनविषयक पुस्तकांचा विचार करतांना समाजसत्तावादाची चर्चा करणाऱ्या ग्रंथांकडे नुसता अंगुलिनिर्देश करणें आवश्यक आहे. हा बदल जर ध्यानांत घेतला तर स्त्रीजीवनविषयक प्रश्नांची चर्चा करणारीं पुस्तकें कमी का ह्या गोष्टीचा उलगडा होऊं शकेल.

एंगेल्सच्या वर उधृत केलेल्या पुस्तकाच्या आधारें डॉ. वा. का. किर्लोस्कर ह्यांनी 'विवाह संस्थेचा इतिहास' हें पुस्तक १९३७ त प्रसिद्ध केलें. वर केलेल्या विवेचनावरून ह्या पुस्तकाचें महत्त्व किती आहे याची कल्पना येऊं शकेल. ह्या पुढच्या कालांत स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा एक आधुनिक नि नवा दृष्टिकोण महाराष्ट्र भूमीत प्रसृत करण्याचें श्रेय ह्या ग्रंथास निःसंशयपणें द्यावयास हवें. त्या नंतरचें महत्त्वाचें पुस्तक म्हणजे सौ. कमलाबाई टिळक ह्यांचें "स्त्रीजीवनविषयक कांही प्रश्न" हे होय. हें पुस्तक १९४० त प्रसिद्ध झालें. ह्या ग्रंथांत स्त्रीजीवनविषयक प्रमुख प्रश्नांचा उहापोह साधक बाधक प्रमाणें विचारांत घेऊन केला आहे. लेखिका सुशिक्षित स्त्री असल्याने स्त्रियांची बाजू तिने अत्यंत साक्षेपाने

मांडली आहे. ह्या कालापर्यंत जे प्रश्न चर्चिले गेले होते त्यांत बालविवाह, गतभर्तृकांचा प्रश्न, बालविवाहाचा प्रश्न, स्त्रीशिक्षण, संततिनियमन, विवाह-विच्छेद, स्त्रियांचे कायदेशीर हक्क, स्त्रिया व नीतिमत्ता इ. विविध प्रश्न प्रमुख होते. ह्या सर्वांचा उहापोह या ग्रंथांत केला आहे. पाश्चिमात्य स्त्रीच्या जागृतीची पण पाहणी केली आहे. व आपल्या देशांतील पूर्व-कालीन समाजांतील स्त्रीजीवनाचेंहि दिग्दर्शन केलें आहे. ग्रंथ अत्यंत विवेचक असल्याने व त्यांतील प्रतिपादन साधार झालें असल्याने त्याला मराठींत श्रेष्ठ स्थान प्राप्त झालें आहे. स्त्रीजीवनविषयक आतापर्यंत झालेल्या ग्रंथांत हा ग्रंथ सर्वश्रेष्ठ आहे असें म्हणावयास हरकत नाही. या ग्रंथास मुंबई विद्यापीठाने आपलें तर्खडकर प्रबंध पारितोषक देऊन त्याचा यथोचित गौरव केला हें महत्वाचें आहे. या ग्रंथानंतर स्त्रियांच्या प्रश्नावर फारसें स्वतंत्रपणें लेखन झालेलें दिसत नाही. वृत्तपत्रांतून मधूनमधून विविध विषयांवर लेखमाला आलेल्या आहेत. त्यांत सौ. मनोरमाबाई खरे यांची लेखमाला महत्वाची आहे. ती 'केसरींत' आली व पुढे ती पुस्तक स्वरूपांतहि बाहेर आली आहे. पुस्तकाचें नांव "आदर्श स्त्रीजीवन" असें आहे. ह्या लेखमालेंत स्त्रीजीवनविषयक कांही निर्बंधांची तरफदारी केली आहे. लेखिकेच्या मतें स्त्रियांची चळवळ ही पाश्चिमात्य देशांतील स्त्रीचळवळीच्या वळणावर जात आहे. तेव्हां पाश्चात्य समाजांतील अनेक दोष आपल्या समाजव्यवस्थेंत येणें अपरिहार्य ठरतें. ते दोष येणें एकंदरीने चांगलें नव्हे व म्हणूनच सुधारणांच्या कांही बाबींना तिचा विरोध आहे. उदा. बालविवाहनिषेध चालू आहे तो तितका श्रेयस्कर नाही. संततिनियमन हेंहि स्पृहणीय नाही. संततिनियमन करूं पाहणें म्हणजे मातृत्वाचा अवमान होय. तसेंच आर्थिक स्वातंत्र्यहि स्त्रियांना फारसें हितावह नाही. ह्या वरून लेखिकेच्या विचारांचा रोख स्पष्ट होतो. पुस्तक १९३९ त प्रसिद्ध झालेलें आहे. त्यांतील विचारसरणी ही सामान्यतः जुन्या मताकडे वळणारी आहे असें दिसतें.

ह्या नंतर प्रसिद्ध झालेलें महत्वाचें पुस्तक म्हणजे राजरत्न वा. वि. जोशी ह्यांचें "स्त्रियांचें हक्क व सुधारणा" हें छोटेसें पुस्तक म्हणजे स्त्रियांच्या हक्कांचा जाहीरनामाच होय. विविध परिस्थितींतील स्त्रियांच्या

हक्कांचें विवेचन लेखकाने ऐतिहासिक व तुलनात्मक रीतीने केलेलें आहे. व स्त्रियांना पुरुषांबरोबरचे व्यक्ति म्हणून सर्व अधिकार द्यावयास हवेत असें अत्यंत शास्त्रशुद्ध रीतीने पुरस्कारिलें आहे. सदर पुस्तक वाचल्यानंतर स्त्रियांच्या हक्कासंबंधीचा प्रश्न विवाद्य कां राहावा हें समजत नाहीं. विवाहविच्छेद, मिळकतींत वारसा, इ. विविध कायदेहक्कांची चिकित्सा लेखकाने केलेली आहे. लेखकाची भूमिका स्त्रीकैवाराची आहे तरी विवेचन अत्यंत तर्कशुद्ध आहे.

ह्या नंतर श्री. रा. के. रानडे व श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांच्या पुस्तकांचा उल्लेख करावा लागेल. रानड्यांचीं 'हिंदु विवाहाचा कायदा' अर्थात 'मालतीमाधव' व 'हिंदु स्त्रीधनाचा कायदा' ही त्या त्या कायद्यांच्या अनुषंगाने चर्चा करणारीं पुस्तकें आहेत. लेखक, न्यायाधीश असल्याने विवेचन अत्यंत साधार झालें आहे. विचारसरणीहि समतोल आहे. श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांचीं कायद्यांच्या अनुषंगाने लिहिलेलीं 'हिंदु कायदा सुधारणा', 'बालविवाह प्रतिबंध' व 'विशिष्टविशिष्ट विवाहाचा कायदा' हीं पुस्तकें महत्वाचीं आहेत. त्या पुस्तकांतून ते ते कायदे जेव्हा विधिमंडळांत चर्चेसाठी आले होते त्यावेळीं त्यांची आवश्यकता पुरस्कारणारीं अशीं हीं पुस्तकें आहेत. ह्या सर्व पुस्तकांत संबंधी कायदा आवश्यक का, त्याचें उद्दिष्ट कोणतें व त्यायोगें कोणती सुधारणा होईल या बाबतची चर्चा केलेली आहे. पण ह्या विषयावरचें ह्या कालखंडांतील एक श्रेष्ठ पुस्तक म्हणजे श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांचें "हिंदुकायद्यांत स्त्रियांचें स्थान" हें १९४४ साली प्रसिद्ध झालेलें पुस्तक होय. ह्या ग्रंथांत आता उल्लेखिलेल्या कायद्यांच्या संबंधाने लिहिलेल्या सर्व ग्रंथांचा विचार करून त्यांतील सुधारणांचा, ग्राह्यभागाचा, पुरस्कार केलेला आहे. लेखनांत स्त्रीजीवनाशी निगडित असलेल्या विविध प्रश्नांचा कायद्याच्या दृष्टीने व ऐतिहासिक दृष्टीने उहापोह केला आहे. लेखकाचा कल सुधारणांकडे आहे तथापि विवेचन अत्यंत साधार व तर्कशुद्ध झालें आहे. शेवटीं लेखकाने हिंदुकायद्यांत सुधारणा करूं नये असें म्हणणाऱ्या पक्षाच्या म्हणण्याच्या आशयाचा विचार केला आहे. व त्यांचें म्हणणें कसें आग्रही व तर्कबुद्धीस न पटणारें आहे हें विवेचकतेने स्पष्ट केलें आहे.

अशाप्रकारें १९३५ ते ४७ या कालखंडांतील प्रमुख स्त्रीजीवनविषयक प्रश्नांची चर्चा चिकित्सा करणाऱ्या पुस्तकांचें स्वरूप आहे. १९४७ त एक छोटें पुस्तक प्रसिद्ध झालें. त्या पुस्तकाचें नांव "स्त्रियांचें कल्याण" असें असून तें श्री. सौ. रमाबाई पटवर्धन ह्या इंदूरच्या लेखिकेने लिहिलेलें आहे. त्या पुस्तकांतील विचारांचा रोख सौ. मनोरमाबाई थत्ते यांच्याप्रमाणें आहे. म्हणजे लेखिकेला स्त्रियांच्या सुधारण्याचे विविध प्रयत्न आहेत हे पाश्चात्य शिक्षण घेतलेल्यांनी केलेले वा चालविलेले आहेत असें वाटतें. ते अयोग्य दिशेने होत आहेत असें तिचें मत आहे. लेखिकेने स्त्रीशिक्षण, प्रौढ कुमारिकांचा प्रश्न इ. प्रश्नांचा उहापोह केला आहे. तिच्या मतें 'स्त्रीस्वातंत्र्या' ची चळवळ हीच चूक आहे. भारतीय स्त्रिया कोणत्याहि प्रकारें परदास्यांत नव्हत्या. व कांही थोडी फार सुधारणा व्हावयास हवी हें खरें पण ती हलके हलके होणें इष्ट. पुस्तकाला श्री. तात्यासाहेब केळकर ह्यांची छोटी प्रस्तावना पण आहे. त्यांनीहि व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली स्त्रीस्वातंत्र्याची कल्पना आपल्या समाजास हितकर नाही असें आपलें मत दिलें आहे. "मुलें प्रसविणारी, मुलांचें संगोपन-संवर्धन हेंच मुख्य कर्तव्य मानणारी, संसारमंदिर जागतें व सुदृढ ठेवूं इच्छिणारी आणि असें असूनहि स्त्रियांची सर्वोत्तम स्थिति कोणती ह्याविषयीं विचार–जागृति ठेवणारी, अशी जी स्त्री तीच नमुनेदार स्त्री म्हणून आपल्या डोळ्यांपुढें असते. आणि स्त्रीविषयक चर्चाहि ती समर्पक करूं शकते" असें प्रस्तावनाकारांचें मत आहे. अर्थात् लेखिकेशी ते बऱ्याच प्रमाणांत सहमत आहेत. अशा प्रकारें या कालांतील महत्वाच्या पुस्तकांचें स्वरूप आहे. या शिवाय विविध वृत्तपत्रांतून व विविध संघटीं संस्थांतर्फे स्त्रीजीवितविषयक निरनिराळ्या प्रश्नांची चर्चा सुरू होती. वामनरावांच्या कादंबऱ्यांतून "स्त्री ही पुरुषाच्या मार्गातील धोंड आहे काय?" अशा स्वरूपाचा प्रश्न, तसेच विभावरी वाङ्मयांतून प्रतिबिंबित होत असणाऱ्या विविध समस्यांची चर्चा, चिकित्सा ह्या कालखंडांत चालू होती. भारतीय महिलापरिषदेचें कार्य जोराने सुरू होतेंच. या बरोबरच आणखी एक महत्वाची चळवळ सुरू होती. ती म्हणजे वर उल्लेखलेली राष्ट्रस्वातंत्र्याची चळवळ होय. ह्या चळवळीला स्त्रीवर्गाचा पाठिंबा मिळत होता. तथापि तो पाठिंबा अधिक

डोळस असावा असा त्या चळवळीचे पुरस्कर्ते गांधीजी यांचा कटाक्ष होता. त्यांनी आपल्या 'यंग इंडिया' व 'हरिजन' ह्या वृत्तपत्रांतून या प्रश्नाविषयीं बरेंच लेखन व मार्गदर्शन केलें आहे. गांधीजींच्या चळवळीचें तंत्र व तत्वज्ञान हीं केवळ स्वयंप्रेरित होती. कोणत्याहि धर्मग्रंथांचा वा पूर्वकालीन विचारांचा आधार त्यांनी घेतलेला नाही. रामराज्याच्या कल्पनेचा त्यांनी पुरस्कार केला पण त्यांचे रामराज्याचें उदाहरण हें केवळ नैतिक आदर्शापुरतें होतें. रामराज्याकडे भाविक अंधश्रद्धेने पाहणाऱ्या माणसाच्या मनांतील सनातनत्वाचा गांधीजींच्या मनांत मागमूसहि नव्हता. ह्याच अर्थाने गांधीजींना आधुनिक भारतांतील पहिले व्यक्तिवादी पुढारी म्हणून वर एके ठिकाणी संबोधिलें आहे. गांधीजींची स्त्रीजीवनविषयक दृष्टिसुध्दा अशी स्वयंप्रेरित होती. ती पूर्वकालीन विचारांना पूर्णपणें मान्यता देणारी नव्हती. त्याचप्रमाणे आधुनिक विचारसरणींतील सर्वच गोष्टी त्यांना पूर्णतया मान्य नव्हत्या. असो. गांधीजींच्या स्त्रीजीवनविषयक विचारांची पाहणी करण्यापूर्वी ह्या कालखंडांतील एतद्विषयक पुस्तकांसंबंधीचे विवेचन पूर्ण करावयास हवें. गांधीजींचे विचार जरी त्यांच्या मतपत्रांतून प्रसिद्ध होत होते तरी ते ग्रंथनिविष्ट होण्याइतके महत्त्वाचें होते. त्याप्रमाणें गांधीजींच्या स्त्रीजीवनविषयक मतांचें दर्शन घडविणारे काही लेखसंग्रह ह्या कालांत प्रसिद्ध झालेलें आहेत. त्यापैकीच 'गांधीजींचें स्त्रियांशी हितगुज' हें १९४४ मध्यें प्रसिद्ध झालेलें व "तेजस्वी तरुणी" आणि "स्त्रिया व सामाजिक अन्याय" हे होत. ह्या पुस्तकातून गांधीजींचें लेख आले आहेत. हीं पुस्तकें महत्त्वाचीं होत. या कालांतील स्त्रीविषयक ग्रंथांचा विचार करतांना गांधीजींच्या ह्या ग्रंथसंपदेचा आस्थापूर्वक उल्लेख करणें आवश्यक आहे.

ह्या कालांतील ग्रंथांकडे समालोचनात्मक, दृष्टिकोण ठाकला तर दोन तीन वैशिष्ट्यें दृष्टोत्पत्तीस येतात. पूर्वकालीन ग्रंथाशी तुलना करतांना ह्या कालांतील ग्रंथाचे स्वरूप अधिक शास्त्रीय, तर्कसिद्ध व मूलभूतदृष्टीने चर्चा करणारें असें आहे. एकांगीपणापेक्षां एकंदरीने साधकबाधकतेवर अधिक भर आहे. पूर्वकालांत लिहिलेल्या पुस्तकांत शास्त्रीयपणा नाहीं असें नाहीं. निमकरांचें "हिंदु लग्नसंस्था," किंवा गोखले यांचें "हिंदु स्त्रियांची

कायदेशीर दुर्दशा" हीं पुस्तकें शास्त्रीय व अभ्यासपूर्वक नाहींत असें कसें म्हणतां येईल? तथापि त्यांतील भूमिका ही एका बाजूकडे झुकणारी अशी आहे. व कोणत्यातरी बाजूचें (स्वीकारलेल्या) आपणांस पूर्णतया समर्थन करावयाचें आहे असा एकांगीपणा त्या त्या पुस्तकांतील भूमिकेंत आहे. ह्या कालांतील महत्त्वाचीं पुस्तकें लिहिणारे लेखक हे विद्वान आहेत. विशेष म्हणजे स्त्रीलेखिकांची भर महत्त्वाची आहे. लेखिकांनी केलेली चर्चा ही केवळ कैवाराची वा पूर्वकालीन रूढीचें कसेबसें समर्थन करावयाची नाहीं तर साधक बाधक दृष्टीने विचार करतां पूर्वकालांतील सर्वच गोष्टी त्याज्य नाहींत असें कांहीं लेखिकांना म्हणावयाचें आहे. तथापि मतभेद हे आहेतच. ते प्रामुख्याने व्यक्तिस्वातंत्र्याच्या मुद्यावरच व मूलभूत स्वरूपाचे आहेत असें वाटतें. न्यायालयीन क्षेत्रांतील कायदेपंडितांनी कायद्यांच्या निर्मितीच्या दृष्टीने स्त्रीजीवनविषयक सामाजिक समस्यांची चर्चा केली व ती करतांना कायद्यांची आवश्यकता प्रतिपादली आहे. ही घटना फार महत्त्वाची आहे. लेखक हे कायदेतज्ज्ञ असल्याने त्यांचें विवेचन शक्य तितकें निरभिनिवेशपूर्ण आहे. आणि तार्किक व्यक्तिगत हक्कांच्या दृष्टीने त्यांनी विशिष्ट सुधारणांचा पुरस्कार केलेला आहे. म्हणजे, आता असें स्पष्ट दिसतें की एकोणीसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकांत समाज वा स्त्रीजीवनसुधारणेस कायद्याचें साहाय्य घ्यावें की नाही हा प्रश्न निकालांत निघाला. म्हणजे स्त्रियांच्या जीवनांत कांही सुधारणा घडवून आणावयाच्या असतील तर कायद्याचें साधन वर्ज्य मानण्याचें कांही कारण नाही असें मत सर्वसंमत झालें. सरकारची परकीयता हा मुद्दा महत्त्वाचा राहिला नाही. अर्थात् हिंदुकायदा हा श्रुतिस्मृतीसारख्या पवित्र धर्मग्रंथांवर आधारलेला असल्याने त्या विरुद्ध जाण्याचा अधिकार कोणालाच नाही असा एक युक्तिवाद पुढे आला, नाही असें नाही. या युक्तिवादाचें समर्थन स्मृतिग्रंथ हे समाजशास्त्राचा विचार व अभ्यास करून केलेले ग्रंथ आहेत, असाहि एक दावा मांडला गेला. पण बदलेल्या परिस्थितींत ही विचारसरणी मान्य होणें केवळ अशक्य होतें. समाजाची न्यायविषयक धारणा व्यक्तिविषयक अधिकारांवर होत होती ही गोष्ट न्यायाधीशांच्या दृष्टींतून सुटली नाही. व त्यांनी त्या दृष्टीने स्त्रियांच्या न्याय्य हक्कांचा पुरस्कार केलेला आहे. सर्वसाधारण समाजाच्या सुबुद्ध वर्गाच्या

न्यायबुद्धीस स्त्रीजीवनविषयक सुधारणा ही अपरिहार्य वाटूं लागली. ही फार मोठी गोष्ट ह्या ग्रंथांकडे विहंगमात्मक दृष्टीक्षेप टाकला असतां स्पष्ट होते. अशाप्रकारें नैतिक व न्यायविषयक दृष्टीने स्त्री व पुरुष यांच्यांतील समानतेची पार्श्वभूमि निश्चितपणें तयार झाली. गांधीजींचे विचार हे एकंदरीने सुधारणेला परिपोषकच आहेत.

स्त्रियांच्या जीवनात सुधारणा व्हावी ह्या मतास विरोध अजिबात नाही असें मात्र नव्हे. पण जो विरोध आहे तो प्रामुख्याने जुन्या विचारांच्या लोकांचा दिसतो. अर्थात त्यांची संख्या ही एकंदरीने झपाट्यानें कमी होणार. विरोधकांच्या दृष्टींत आणखी एका गोष्टीची गफलत झालेली आहे. स्त्रीजीवन-विषयक सुधारणेला कांही आर्थिक कारणें आहेत व त्यांचें निर्मूलन अधिक मूलभूतरीतीने करावयास हवें ही गोष्ट विरोधकांना पटलेली नाही. आर्थिक परिस्थितीच्या योगाने अनेक लक्षांत न आलेल्या 'सुधारणा' झालेल्या आहेत. दुसरा गैरसमज म्हणजे शिक्षणाविषयीं. शिक्षण हें परकीय सरकारने सुरू केलें तें एकंदरीने परिपोषक नाहीं असा एक गैरसमज खोलवर आहे, त्यायोगें सुशिक्षित स्त्रीकडे आदराने पाहण्याची भावना निर्माण होत नाही. अर्थात् ह्याहि बाबतींत विरोधकांनी दृष्टि बदलल्याशिवाय कांही होणार नाही. तिसरा मुद्दा अधिक महत्त्वाचा आहे व तो मूलभूत मूल्याबाबतचा. 'व्यक्ति-स्वातंत्र्य' हे मूल्यच ह्या विरोधकांना अमान्य आहे. त्यासाठींच पूर्वकालीन श्रुति-स्मृती आदि ग्रंथांचे मोठेपण विनाकारण प्रतिपादलें जातें. तेव्हा विरोधकांचे कांही युक्तिवाद अज्ञानावर, कांही पूर्वग्रहावर आधारलेले आहेत. त्या बाबतींत त्यांनाच पड घ्यावी लागणार आहे. जेथे मूलभूत तात्विक विरोध आहे, तें तत्त्वहि कालगत झालेलें आहे. सहाजिकपणें नैतिक व न्यायिक दृष्टीने पाहतांना, आणि स्त्रियांनी कांही क्षेत्रांत जी कामगिरी केली आहे आणि इतर क्षेत्रांत जो प्रवेश करवून घेतला आहे तो लक्षांत घेतां ह्या प्रबंधांत जी भूमिका गृहित धरली आहे ती सामान्यतः बरोबर आहे असें म्हणावयास हरकत नाही. म्हणजे ह्या कालांतील स्त्रीजीवनविषयक प्रश्नांची चर्चा करणारीं पुस्तकें पाहिलीं तरी विशिष्ट प्रमाणांत व मूलभूतदृष्ट्या स्त्री व पुरुष ह्यांच्या जीवनास कांही समान अधिष्ठान आहे, समान पातळी आहे, व समान ध्येय आहे ही गोष्ट मान्य होण्याइतपत आपली प्रगति झाली

आहे. व ब्रिटिश राजवटींत ती झाली असें मान्य करावयास प्रत्यवाय नाही.

या कालांतील प्रमुख ग्रंथांचा विचार केल्यानंतर स्त्रीविषयक विचारांवर ज्यांच्या विचारसरणीचा परिणाम झालेला आहे त्यांच्या विचारांचा परामर्ष घेणें आवश्यक आहे. ह्या कालखंडांत ह्या दृष्टीने एक दोन व्यक्तींचाच विचार करावा लागेल. ललित लेखकांच्या दृष्टिकोणाचा उहापोह त्यांच्या साहित्याचा परामर्थ घेण्याचेवेळीं करणें योग्य होईल. इतर क्षेत्रीय विचारवंतांपैकी ह्या कालांत ज्यांच्या विचारांचा भारतीय स्त्रीच्या जीवनावर स्पष्टपणें ठसा उमटला आहे असे पुढारी दोनच होत. एक पंडित नेहरू व दुसरे गांधीजी. पैकी नेहरूंची विचारसरणी ही समाज-सत्तावादी विचारांस जुळती आहे. स्त्री आणि पुरुष ह्यांत कोठेंहि भेदभाव नसावा. हक्क, कायदे, इ. च्या सवलती वा बंधनें हीं दोघांसहि समानतेनें मुक्त वा बंधनकारक असावींत असा त्यांचा आग्रह आहे. त्या बाबतींत ते साक्षेपीहि आहेत. स्त्रियांच्या सुधारणेचा कायदेशीर मार्ग बराच खुला व्हावा म्हणून हिंदुकोड बिलाचा पाठपुरावा त्यांनी केलेला आहे. त्यांच्या ह्या प्रयत्नास कितपत यश आलें हा महत्त्वाचा प्रश्न नाही. लोकशाही समाजव्यवस्थेंत अशा गोष्टी होण्यास विलंब लागतो. हें गृहित धरणें आवश्यक आहे. तेव्हा पंडित नेहरूंच्या स्त्रीजीवनाविषयक भूमिकेचा सविस्तर उहापोह या ठिकाणीं करण्याचें कारण नाहीं. त्यांची भूमिका ही सामान्यतः सहानुभूतीची व समान हक्क कर्तव्यांच्या पायावर उभी आहे.

गांधीजींचा विचारसरणी मात्र निश्चितपणें वेगळी आहे. ती कोणत्याहि विशिष्ट धर्मग्रंथांवर वा विचारप्रणालीवर आधारलेली नाहीं. ती पूर्णतया 'भारतीय' आहे असें म्हणतां येईल. पण तिच्यावर गांधींच्या व्यक्तित्वाची इतकी छाप पडली आहे की त्याच्याशिवाय इतरांपैकीं फार थोड्यांना ती तशीच्या तशी संमत होणें शक्य आहे. गांधीजी हे व्यक्ति-वादी पुढारी होते, अर्थात् त्यांच्या ह्या मनोधारणेला साजेसी अशी त्यांची एतद्विषयक भूमिका आहे.

अर्थात् ही गोष्ट ध्यानांत धरणें आवश्यक आहे कीं, गांधीजी हे कोणत्याच दृष्टीने सनातनी नव्हत. ते सुधारणावादी नव्हेत तर क्रांतिवादी

आहेत. परंतु त्यांच्या क्रांतीचें स्वरूप प्रायः नैतिक आहे. गांधीजींचा मनुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोणच वेगळा होता. "मनुष्य हा कांही निव्वळ स्थितिकिंकर नाहीं. परिस्थिति जशी बदलेल तसें माणसाने स्वतःला बदललें पाहिजे हें जसें खरें आहे तसेंच मनुष्यहि आपल्या वर्तणुकींत स्वतःच्या इच्छाशक्तीच्या जोरावर बदल करूं शकतो असा त्यांचा अनुभवसिद्ध निर्वाळा आहे...मनुष्य स्वभाव खात्रीने बदलूं शकतो, तसा तो आजपर्यंत बदलत आला आहे, आणि ज्या प्रेरणा आपण मूलभूत समजतों त्या मूलभूत असल्या तरीहि कधींत न राहणाऱ्या आहेत असेंहि नाहीं..."[१] अशी त्यांची जीवनविषयक दृष्टि आहे.

स्त्रीविषयक गांधीजींची विचारसरणी पाहतांना दोन तीन विशेषांचा उल्लेख करावयास हवा. "स्त्री अधिक बलशाली आहे (Stronger sex) असें ते आग्रहपूर्वक सांगतात. त्याचप्रमाणें ती एक स्वतंत्र, स्वयंसिद्ध आणि स्वशक्तिमान अशी आहे. अर्थात् ती पुरुषांच्याबरोबरीने कार्य करणारी, समान दर्जाची स्वामिनी आहे. आणि ती अहिंसामूर्ति आहे; त्यागमूर्ति आहे."[२] "अधिक बलशाली कोण? स्त्रियां कीं पुरुष—या प्रश्नांचे बरबरचें उत्तर जरी पुरुष असें वाटलें तरी थोड्या खोल विचारांतीं असें आढळून येईल कीं.....संयम, सहनशक्ति, चिकाटी, त्याग, कष्टाळूपणा, प्रेम इ. बाबतींत त्यांचा क्रम स्त्रियांच्या खालीच लागणार"[३]

स्त्रीपुरुषांची समानता ही त्यांनी आग्रहानें सांगितलेली दुसरी गोष्ट. या समानतेचा अर्थ आपण नीट समजून घेतला पाहिजे. समानता म्हणजे सारखेपणा नव्हे...स्त्री ही पुरुषाबरोबरीने प्रत्येक कार्यांत भाग घेते म्हणून ती पुरुषाच्या बरोबरची आहे असें नसून तिचीं अशीं कांहीं क्षेत्रें आहेत कीं जी पुरुषाला अशक्य आहेत; जीं तिच्या जीवनाला सफलता आणतात, जीं तिच्या सर्वांगीण उन्नतीला पोषक ठरतात...या वरून स्त्री ही स्वतंत्र अस्तित्व असणारी आहे. ती अनुकरण करणारी गुलाम नव्हे, स्वतंत्र आहे, स्वयंसिद्ध आहे; स्वशक्तिमान् आहे."

गांधीजींच्या भूमिकेंतील तिसरा भाग म्हणजे "स्त्री ही त्यागमूर्ति होय. स्त्री जितका त्याग करूं शकते, अगदी सहज मनोधर्म म्हणून करूं

---

१ स्त्रियांशी हितगूज, प्र. ३. २ कित्ता– ३ कित्ता.

शकते तितकी सहजासहजी पुरुषांच्या हातून होत नाही... उद्यांच्या जगांत प्रभावशाली ठरणाऱ्या स्त्रियाच असणार हें ह्यावरून निर्विवाद होय. त्यांच्या अंगीं जो त्याग आहे, जी प्रीतिभावना आहे, जे अपत्यवात्सल्य आहे त्यांतून युद्धासारख्या घोर आपत्तींना देखील पुष्कळ प्रतिकार होईल. मात्र स्त्रीने आपली ताकद ओळखली पाहिजे." [१]

अशाप्रकारें गांधीजींची स्त्रीजीवनविषयक दृष्टि आहे. विविधप्रकारच्या सुधारणा ज्या पुरस्कारल्या जात होत्या त्याबद्दल गांधीजींचें निश्चित मत आहे व तें अनुकूल आहे. "आजच्या भारतीय जीवनांत आता पडदा, बालविवाह, विधवाधिवाह, विवाहाची वयोमर्यादा, सती, देशकार्यांतील स्त्रियांच्या भाग, वैगरे प्रश्नांवरील गांधीजींचीं उत्तरें पूर्ण बिंबून गेलीं आहेत. आता कोणी स्त्रियांच्या स्वातंत्र्याविरुद्ध उठेल व मनुस्मृतीची आठवण करून देऊं म्हणेल तर तें निव्वळ सनातनीपणाचें नव्हे तर मूढपणाचें होईल."

ह्या जुन्या प्रश्नांबरोबर नवीन प्रश्नांवर सुद्धा गांधीजींनी मत प्रदर्शन केलेलें आहे. हे नवे प्रश्न म्हणजे स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य, विवाह व संततिनियमन हे होत. ह्या तीनहि प्रश्नांवरचे गांधीजींचे विचार वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आर्थिक स्वातंत्र्याच्या बाबतींत "गांधीजींचे विचार जरी रशियन पद्धतीचे नसले तरी त्याला त्यांचा विरोध नाही.[२] मात्र ह्या आर्थिक स्वातंत्र्यामुळे कुटुंबपद्धति नष्ट होऊं नये एवढीच काळजी घेतली पाहिजे. नैसर्गिक विशिष्टता लक्षांत घेऊन जी श्रमविभागणी झाली असेल ती सामान्यतः मान्य करावयास हरकत नाही. "आर्थिक स्वातंत्र्यांतील 'स्वातंत्र्य' या शब्दामुळे त्यांनी हुरळून न जातां जरूर त्या वेळीं त्यांना अनुरूप असे व्यवसाय निवडण्याला कोणतीच हरकत येणार नाही. या स्वातंत्र्यामुळे त्यांची पत्नी बनून पुरुषाची स्वामिनि व माता बनून भविष्यकाळाची जननी होण्याची महत्त्वाची कामगिरी मात्र त्यांनी डावलूं नये." [३] अशाप्रकारें गांधीजींचे आर्थिकस्वातंत्र्याचे विचार समतोल व स्वीकार्य आहेत.

विवाहाच्या बाबतींत असें दिसतें की," विवाहाच्या संस्कारामागली

---

१ स्त्रियांशी हितगुज पृ. ६. २, कित्ता. ३, कित्ता.

उच्च भूमिका आपणांला दिसली पाहिजे. ती न दिसल्याने पुष्कळसे विवाह स्त्री व पुरुष दोघांनाहि आणि विशेषतः स्त्रियांना अधिक जाचक होऊन राहणारे खोडे बनतात्... विवाहामुळे पुरुषांना स्त्रियांचे स्वामी बनतां येतें. तसेंच स्त्रियांनाहि स्वामिनी बनण्याचा अधिकार आहे. दोघांचे अधिकार समानपणें चालले पाहिजेत.[1] "विवाह दोन आवश्यकतांतून निर्माण झालेला आहे. एक व्यक्तीच्या प्रचंड शक्तींना विकासमार्ग मिळावा ही, व दुसरी समाजस्थैर्य लाभावें यासाठी लागणारी नियमबद्धता. अर्थातच ह्या दोहोंचा सुंदर समन्वय साधण्यासाठी विवाहाचें पावित्र्य सतत आपल्या अंतःकरणांत सांठविलेलें असावें. या दोन आवश्यकता परस्परविरोधी भासतात, परंतु त्या तशा विरोधीच झाल्या पाहिजेत असें नाही. जी व्यक्तिप्रेरणा विवाह मागते ती अगदी स्वैर आहे असेंहि नाही, व जी सामाजिक नियमबद्धता आड येते असें आपणांस वाटते तीहि अयोग्य नाही. व्यक्तिप्रेरणा जशी यासाठी निरोधी पाहिजे तशीच सामाजिक नीति देखील जीर्ण असूं नये. आजच्या युगाला साजेशी पाहिजे,[2] म्हणजे विवाह सुखावह होतील व त्यांतून परस्परांच्या हिताप्रमाणे राष्ट्राचें कल्याण होईल. अशा प्रकारें गांधीजीचे विवाहविषयक विचारहि समजून घेणें आवश्यक आहे. गांधीजींच्या कोणत्याहि विचारांत नैतिक कर्तव्यनिष्ठेला व त्यागाला अधिक महत्त्व आहे. लोकांच्या नैतिक भावनांना आवाहन करून कार्यप्रवृत्त करणारा इतर कोणीहि पुढारी आधुनिक भारतांत त्यांच्याशिवाय दुसरा झाला नाही.

संततीनियमनावरचे गांधीजींचे विचार याच कारणाने सर्व साधारण माणसास न झेपण्यासारखे आहेत. गांधीजींना अप्रतिहत होणारी संतति निश्चितपणें नको आहे. तिचा स्त्रियांच्या प्रकृतीवर व अन्यत्र अनिष्ट परिणाम होतो हे त्यांना मान्य आहे. त्याप्रमाणें ते संततिनियमनाचें पुरस्कर्ते आहेत. पण त्यांचा आग्रह साधनांबाबत आहे. संततिसंयमन हा शब्द त्यांना अधिक जवळचा वाटतो. कामाविषयक लालसेचें महत्त्व ते ओळखतात, पण "कामविषयक तृष्णा हीच मानवाची एकमेव तृष्णा नव्हे. अर्थातच अनैसर्गिकपणें न वागतां देखील जर आपण सुजाण रीतींनी वागूं लागलों तर आदर्श संयमाला पोचणें कठिण नाही."[2] अशाप्रकारें ते

१ कित्ता. २ स्त्रियांशी हितगुज : प्रस्तावना.

संयमावर अधिक भर देतात. "वैवाहिक जीवनांतील हा संयमाचा आदर्श जड असेल म्हणून कांही तो आपण नाहींसा करून त्या ऐवजी लालसा-प्रियता वाढविणारा, आणि म्हणूनच एकापरीने स्त्रियांचा दर्जा निव्वळ भोगवस्तु बनवून टाकणारा संततिनियमनाचा आदर्श उच्च राहूं शकत नाही." असें त्यांचें मत आहे.

गांधीजींच्या स्त्रीजीवनविचारांत हा सर्वांत मोठा व सर्वसामान्य माणसाला प्रतिकूल वाटणारा विचार आहे. पण आपला ह्या बाबतचा आग्रह गांधीजी सोडण्यास तयार नाहीत. कारण तसें करणें म्हणजे नैतिक उच्च भूमिकेवरून खाली उतरणें होय. मिसेस सँगर नांवाच्या बाई या बाबतींत गांधी-जींची मुलाखत घ्यावयास आल्या होत्या. सदर बाई संततिनियमनाचा पुरस्कार करणाऱ्या प्रचारक होत्या. त्यांनी गांधीजींचे विचार ऐकले. "पण सर्वसाधारण माणसाला तुमच्या मार्गाने जाणें अशक्य आहे. व तुम्ही इतर कांही मार्ग काढा असें सांगितलें." सँगर बाईंची विलक्षण कळकळ पाहून गांधीजींनी आपल्याला पटणारा एक उपाय सांगितला व तो म्हणजे "असुरक्षित काळांत समागम टाळणें, व महिन्यांतून दहा दिवस जो 'सुरक्षित' काल मानला आहे त्या कालापुरताच समागम करणें. यामध्ये सुरक्षित कालांत पाळा-वयाचा कांहीना कांही संयम तरी आहे..." या उदाहरणावरून हें स्पष्ट होईल की गांधीजींची एकंदर विचारसरणी ही सहानुभूतिशीलतेवर आधार-लेली होती. तरी आपली नैतिक भूमिका सोडण्यास ते कधीहि तयार नसत.

गांधीजी हे १९३५ ते १९४७ ह्या कालांतील स्त्रियांचे फार मोठे कैवारी आहेत. किंबहुना आगरकरांच्यानंतर समाजवादी विचारसरणीचा स्वीकार साक्षेपाने केलेले लोक सोडले तर गांधीजी इतका स्त्रियांचा कैवारी गांधीजीविना इतर कोणी झाला नाही असें म्हणतां येईल. बालविवाह, पुनर्विवाह इत्यादि सुधारणांबाबत त्यांनी सुधारकांच्या सर्व सुधारणांचा पुरस्कार केला. एवढेंच नव्हे तर कालाबरोबर जे नवे नवे स्त्रीजीवनविषयक प्रश्न निर्माण होत होते त्यांवर आपलें विचार व्यक्त करून मार्गदर्शन केलें. स्त्रियांच्या कर्तृत्वाविषयी अतिरिक्त आदराची भावना त्यांच्या हृदयांत होती. स्त्रियांवर समाजाने ज्या अन्याय्य रूढी लादल्या त्यांचा त्यांनी

कडक्कडून निषेध केला. परंतु गांधीजींचें वैशिष्ट्य असे की त्यांनी ह्या रूढींचा केवळ रुढपद्धतीने निषेध केला नाही. या रुढी अन्याय खऱ्या. पण त्या पाळतांना स्त्रियांना अतिशय त्यागपूर्ण असें जीवन जगावें लागलेलें आहे. या त्यागपूर्ण जीवानामुळे स्त्रियांच्या अंगीं श्रेष्ठ असें आत्मिक व नैतिक सामर्थ्य निर्माण झालेलें आहे. हें जें सामर्थ्य हा एक श्रेष्ठ नैतिक ठेवा आहे आणि रुढींचा निषेध वा परित्याग करीत असतांहि हें सामर्थ्य तसेंच जतन करण्याची कळकळीची विनंती त्यांनी स्त्रीवर्गाला केली आहे. ह्या आत्मिक सामर्थ्यामुळे स्त्रीला ते सर्वस्वतंत्र व शक्तिमान मानतात. आणि याबाबत पुरुषांनी स्त्रियांचें अनुकरण करण्यासारखें आहे असा एकदरीने त्यांच्या विचारांचा रोख आहे. समाजनिर्मित बंधनांना गांधीजींचा विरोध होता. पण तो विरोध दिङ्मूर्शित असतांहि त्यांची जागा आत्मनिर्मित बंधनांनी घेतली पाहिजे. अर्थात् त्या बंधनाकडे 'बंधनें' म्हणून न पाहतां आत्माविष्काराचे घडे अशा दृष्टीने पाहिले पाहिजे असें त्यांचे म्हणणें आहे.

येथवरच्या विवेचनावरून गांधीजींच्या स्त्रीजीवनविषयक विचारांची व त्यांच्या वैशिष्ट्याची कल्पना येऊं शकेल. गांधीजींचे विचार हे कांहीं बाबतींत सर्वसामान्य व्यक्तीला स्वीकार्य वा आचरणीय नसले तरी त्यांच्या विचारांचा गाभा आत्मसंयम ह्याचें जर आपण महत्त्व ओळखूं शकलों तर त्यांच्या विचारांचें मर्म समजलें असें सामान्यतः म्हणावयास हरकत नाहीं.

१९३५ ते १९४७ या कालांत आपल्या विशिष्ट विचारसरणीने ज्यांनी कांही एक कार्य केलें त्यांपैकीं गांधीजी हे एक होत व म्हणून त्यांच्या विचारांचें दिङ्मूर्शन थोड्या विस्ताराने केले. या कालांत आगरकरांच्या विचारसरणीचा अवलंब एका नव्या पातळीवरून सुरू झाला. व ती पातळी म्हणजे 'शास्त्रीय' तेची होय. आगरकरांच्या विचारसरणींत स्त्रीला व्यक्ति म्हणून अधिकार व हक्क प्राप्त झाले पाहिजेत हा महत्वाचा भाग होता. त्या दृष्टीने कायदेतज्ज्ञ लोक ह्या विचारसरणीचा कायदेक्षेत्रांत कसा अवलंब करतां येईल या दृष्टीने प्रयत्न करीत होते. व विविध सरकारांचें लक्षहि तिकडे गेले. अशा तऱ्हेने स्त्रीजीवनविषयक जुन्या

प्रश्नांच्या कायमच्या सोडवणुकीकरतां कायद्यांकडे लक्ष गेले. विविध स्त्री-सुधारणापोषक संस्थांचे व अनुकूल असणाऱ्या व्यक्तींचे प्रयत्न सुरू झाले.

ह्या कालांत समाजसत्तावादी विचारसरणी प्रसृत व बद्धमूल होत होती तिची स्त्रीजीवनविषयक भूमिका काय आहे ह्या गोष्टीचे थोडक्यांत दिग्दर्शन करणें आवश्यक आहे. ही विचारसरणी स्त्रियांना खरी समता देऊं इच्छिते, नव्हे ती देण्यास ती बद्धपरिकर झालेली आहे. ह्या विचार-धारेच्या अन्वयें स्त्रियांच्यावर होणाऱ्या अन्यायाचें मूळ हें प्रायः आर्थिक दास्यांत आहे. त्यांना आर्थिक स्वातंत्र्य कायदेशीरपणें मिळालें कीं हलके-हलके खरी समता प्रस्थापित होईल. अर्थात् कोणतींहि क्षेत्रें स्त्रियांना प्रति-बंधित नाहींत. राजकीय, सामाजिक, बौद्धिक, वैज्ञानिक, लष्करी, सर्व क्षेत्रांत समान स्थान व संधि स्त्रियांना द्यावयास हवी असें ही विचारधारा गृहित धरते. संततिनियमनाच्या बाबतींतहि ही विचारसरणी सबलत देणारी आहे. मूल होऊं देणें, न देणें हा स्त्रीचा हक्क आहे. या पलीकडे जाऊन गर्भपात करण्यालाहि ह्या विचारसरणीचा कायदेशीर वा तत्वतः विरोध नाहीं. स्त्रीला होणाऱ्या संततीचें पालन पोषण करणें ही माता व पिता यांची संयुक्त जबाबदारी मान्य केली आहे. ही जबाबदारी स्वीकारली तर विवा-हाची आवश्यकता आहेच असें नाही. विवाह हा एक करार आहे व तो प्रामुख्याने सामाजिक व विशेषतः मुलांच्या संगोपनाच्या दृष्टीनें आस्ति-त्वांत आलेला आहे. अर्थात् एका विवक्षित मुदतीनंतर पोषणाची, शिक्ष-णाची जबाबदारी सरकार घेतें. सहाजिकच वैवाहिक बंधनांचें प्रमाण अगदी कमी आहे. अशा परिस्थितींत स्वैराचाराकडे अधिक प्रवृत्ति असेल तर तें मात्र चूक आहे. कारण समाजांत खरी समता व मोकळेपणा वावरत असल्याने कामाविषयक आकांक्षेचा बाऊ वा तिरस्कार केला जात नाही. पण सर्व समाजाच्या नैतिक कल्पना ह्या श्रेष्ठ असल्याने सहाजिकच नैतिक दृष्ट्या ही समाजरचना स्त्रियांना अधिक पोषक व सोयीस्कर असावी यांत नवल नाही. अर्थात लिंगविषयक अतिरिक्त पिपासा भांडवली समाजांत दिसून येते ती एक विकृति आहे. व्यक्तीच्या इतर शक्तींना वाव न देतां त्या समाजव्यवस्थेंत त्याच गोष्टीकडे अतिरिक्त लक्ष वेधलें जातें व त्याचा परिणाम म्हणजे लिंग-पिपासा वाढीस लागते. समाजवादी जीवनांत ह्या सर्व

गोष्टीस आळा बसतो. त्यांच्या मुळाशी असलेलें आर्थिक आसन बदललें जातें आणि कांही व्यक्ती जर खरोखर अनिष्टचें वागावयास लागल्या तर ज्या समाजांत त्या वावरतात त्या समाजाकडें त्यांच्या या वागण्याकडे लक्ष वेधून ह्या व्यक्तीविरुद्ध समाजाची भावना जागृत करणें व ही भावना जागृत झालेली दिसूं लागली की सहाजिकपणें त्यांच्यावर बंधन येऊं शकतें.

वेश्याव्यवसायास ही समाजरचना मान्यता देत नाही. कारण ह्या व्यवसायाचें आधिष्ठान हें प्रामुख्याने आर्थिक आहे. वैश्याव्यवसाय करणाऱ्या स्त्रियांना जर अन्य व्यवसाय उपस्थित करून दिले, व समाजांत सन्मानाचें स्थान दिलें तर हा व्यवसाय समाजव्यवस्थेस आवश्यक आहे असें म्हणतां येत नाही.

ह्या विचारसरणीला पूर्णपणें संमत असणारें जीवन जगांत कोणत्या एका देशांत असेल असें नव्हे. कारण समाजसत्तावादही तसल्याप्रकारच्या जागतिक समाजरचनेवर आधारलेली विचारसरणी आहे. त्यामुळे जगांतील बहुसंख्य देशांत जेव्हा समाजसत्तावादी जीवनसरणी कायदेशीर रीतीने प्रस्थापित होईल तेव्हा त्या विचारसरणीस अभिप्रेत असलेलें नैतिक वातावरण होईल. व तें वातावरण निर्माण झालें की मग त्याचे जीवनावर खोलवर परिणाम होतील. नवी दृष्टि प्राप्त होईल. आज रशिया अगर चीन ह्या देशांत ह्या विचारसरणीच्या आधारें कांही प्रयोग होत आहेत. परंतु ह्या विचारसरणीचा पुरस्कार करणाऱ्या सरकारांना आज 'राष्ट्रीय' व्हावें लागलें आहे. सहाजिक 'राष्ट्रा' च्या गरजांना व संरक्षणविषयक प्रश्नाला प्राधान्य द्यावें लागत आहे. व तें देत असतांना समाजसत्तावाद प्रस्थापित करण्याचा प्रयोग करावा लागत आहे. अर्थात् या विचारसरणीला अभिप्रेत असणाऱ्या कांही अंगाचेंच दिग्दर्शन तेथे होतें, सर्व नाही.

या सर्व विवेचनावरून ब्रिटिश राजवटीच्या शेवटच्या कालांत आपण समाजसत्तावादाभिमुखी अवस्थेप्रत कसे आलों आहोंत ह्याची कल्पना येऊं शकेल. गांधीजींचा ह्या आदर्शाला विरोध नाही. फरक एवढाच की जें काम ही विचारसरणी एकप्रकारचें वैशिष्ट्यपूर्ण नैतिक वातावरण निर्माण करून करूं इच्छिते, तेंच काम गांधीजी व्यक्ती-व्यक्तीच्या ठायींचें अत्युच्च नैतिक व आत्मिक सामर्थ्य जागृत करून

करूं इच्छितात. पण गांधीजी सामाजिक बदलाला विरोधी आहेत असें नव्हे. त्यांच्या विचारसरणींत समन्वयाला स्थान नाहीं. त्याचप्रमाणे नवीन विचारांचा अधिक्षेप ते करावयास तयार नाहींत. असो. स्त्रीजीवनविषयक भूमिकेचा विचार केला असतां गांधीजींची विचारसरणी व समाजवादी विचारसरणी ही स्त्रीला एकाच दिशेकडे तोंड करून उभी करूं इच्छिते. फरक एवढाच कीं, गांधीजींचें आवाहन स्त्री व पुरुष यांच्यांतल्या नैतिक व्यक्तित्वाला आहे, तर समाजवादी विचारसणींचें आवाहन व्यक्तीतील सामाजिकतेला आहे. दोघेहि क्रांतिवादीच आहेत, एका दृष्टीने परस्परांना पूरक आहेत असेंहि म्हणतां येईल. या परस्पर पूरकतेचे एकमेव गमक म्हणजे कट्ट समाजसत्तावादी पंडित नेहरू हे गांधीजींच्या विचारसरणीचेहि चहाते आहेत हें होय. स्त्रीजीवनाच्या उत्क्रांतीच्या दृष्टीने पाहतां ब्रिटिश राजवटींत ही जी वैचारिक मजल गांठली गेली ती एका महत्त्वाच्या टप्प्याची निदर्शक आहे. ती कशी गांठली हें येथील विवेचनावरून स्पष्ट होईल अशी अपेक्षा आहे.

—०—

मराठी-स्त्री

खंड दुसरा

(ललित साहित्य)

अनुक्रम २१९०९ वि: ...
क्रमांक ...
१०८३ २५/६/५

हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांतील स्त्री-जीवन

मराठी स्त्रीची ब्रिटिश राजवटीच्या कालांत जी जागृति होत होती तिच्या वैचारिक अंगाचा उहापोह पहिल्या खंडांत केला. नव्या राजवटीच्या वैचारिक वैशिष्ट्याबरोबर व्यक्तित्वाची नवी जाणीवही झाली. ही जाणीव प्रामुख्याने ललित साहित्यांतून व्यक्त झालेली दिसून येते. मराठी स्त्रीच्या आधुनिक कालांतील उद्बोधनांचें चित्र ललित वाङ्मयांतील झालेल्या तिच्या जीवनचित्रणाच्या पाहणीशिवाय पूर्ण होऊं शकणार नाही. या दृष्टीने ह्या खंडांत ललित वाङ्मयांतील स्त्रीजीवित चित्रणाची पाहणी करावयाची आहे. ही पाहणी लेखकनिष्ठ ठेवणें इष्ट होईल. प्रथम हरिभाऊंच्या कादंबरी विश्वाचा विचार करणें युक्त होईल.

ललित वाङ्मयाचा कादंबरी हा विभागच प्रथम विचारांत घेणें इष्ट आहे. कादंबऱ्यांतून व्यक्त झालेल्या जीवनांत सभोंवतालच्या जीवनाचें सामान्यतः प्रतिबिंब पडलेलें असतें. सामान्यतः म्हणण्याचें कारण कीं, लेखकाची दृष्टि, भूमिका कधी कधी वेगळी असते. कधी कधी इतिहासकालीन जीवनांत रमवायचें तो ठरवितो तर कधी कलात्मकतेच्या आविष्कारासाठी त्याची धडपड चालू असते. ह्या विभिन्न भूमिकांन्वयें त्या वाङ्मयाचा समाजाशीं असलेला संबंध दुरावतो. तथापि एक गोष्ट खरी आहे कीं, लेखक समकालीन समाजध्येयांपासून दूर जाऊं शकत नाही. त्या दृष्टीनेच वाङ्मय हें समाजजीवनाचें प्रातिनिधिक ठरतें. लेखक हा स्वतःच्या स्वभाव विभिन्नतेमुळे जरी समाजापासून दूर दूर जाऊं शकत असला तरी समकालीन ध्येयांपासून वा ध्येयप्रणालींपासून दूर जाऊं शकत नाही. आणि ह्या अर्थानेच तो समकालीन समाजाचा प्रतिनिधि ठरतो. इ. स. १८८० ते १९२० ह्या कालांत समाज-जीवनांत ज्या विचारसरणींना विशेष प्राधान्य लाभलें होतें त्यांचें दिग्दर्शन मागील खंडांत आलें आहे. ललित साहित्यांतून त्याच प्रणालींचा परस्पर समन्वय वा संग्राम झाला त्याचें दिग्दर्शन होऊं शकतें, आणि तेंहि कादंबरीकाराने निर्माण केलेल्या पात्रांमधून. सुदैवाने हरिभाऊंसारखा अत्यंत

श्रेष्ठ ग्रंथकार या कालाचा प्रतिनिधि म्हणून आपणांपुढे उपलब्ध आहे. त्यांतहि हरिभाऊंची दृष्टि प्रायः सामाजिक आहे. त्यायोगें त्यांच्या कादंबऱ्या ह्या अधिकच विश्वसनीय झाल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांतील विविध स्वरूपार्चे दिग्दर्शन करवून घेण्यापूर्वी ह्या विचारसरणींचा हरिभाऊंच्या मनोभूमिकेवर, विचारांवर कोणता परिणाम झाला होता, त्या परिणामांच्या आधारें त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन कसा बनला होता हें समजून घेणें आवश्यक आहे.

हरिभाऊ आपटे हे आगरकरांच्या विचारसरणीचे पुरस्कर्ते आहेत, व आगरकरांनी निबंधरूपाने जे विचार वा ज्या सुधारणा समाजासमोर मांडल्या त्या हरिभाऊंनी आपल्या कादंबऱ्यांच्या द्वारें समाजाच्या गळीं उतरविल्या असें सर्वसामान्य मत प्रचलित आहे. आगरकरांचे विचार कादंबऱ्याद्वारें मांडण्याचें महत्कार्य त्यांनी केलें म्हणून त्यांचें मोठेंपण परिवर्धित झालें आहे असेंहि पण सामान्यतः सर्वमान्य झालेलें आहे; वस्तुस्थिति अशी आहे कीं, हरिभाऊंच्या मनावर चिपळूणकरांच्या शिकवणीचे संस्कार अधिक खोल उमटले आहेत. हरिभाऊ हे चिपळूणकरांचे शिष्य. त्यांच्या लेखनाचा व बाणेदारपणाचा हरिभाऊंच्या मनावर इतका विलक्षण परिणाम झाला होता कीं, विष्णुशास्त्र्यांप्रमाणे आपण उत्तम लेखक व्हावें असें त्यांनी आपल्या मनाशीं ठरविलें. व " हायस्कुलांत प्रवेश करतांच (हें) पहिलें ध्येय लयास जाऊन त्याच्या जागीं उत्तम ग्रंथकार होण्याचें ध्येय आलें."[१] त्याचप्रमाणे, त्यांच्या शिकवणुकीमुळे सरकारी नोकरीबद्दलचा तिरस्कार ते उघड उघड करूं लागले. 'सरकारी नोकरीची गुलामगिरी न पतकरतां शास्त्रीबुवा, टिळक, आगरकर यांच्याप्रमाणे मी स्वतंत्र व्यवसाय करणार,' असें हरिभाऊ आपल्या मित्रांस बोलून सुद्धां दाखवीत.[२] विष्णुशास्त्री चिपळूणकर जेव्हा वारले तेव्हा हरिभाऊंना अत्यंत दुःख झालें, हरिभाऊंनी स्मशानांत भाषण केलें; " हरिभाऊ खिन्नमनःस्थितींत स्मशानांतून घरीं गेले, परंतु त्यांना बिलकुल चैन पडेना ! त्याच दिवशीं त्यांच्या दुःखाने खवळलेल्या चित्तसागरांतून 'शिष्यजन विलाप' ह्या काव्य रत्नाचा जन्म झाला."[३]

१. आपटेचरित्र : वेणुबाई पानसे, पृ.२९; २. कित्ता पृ. १४; ३. पृ.३७

ह्या काव्याची आगरकरांनीही स्तुति केली होती. आगरकर-टिळकांवर कोल्हापूर प्रकरणीं खटला भरला होता त्यावेळीं हरिभाऊंनी फंड जमविण्याचें काम केलें. ह्या सर्व उल्लेखांवरून हें स्पष्ट होईल कीं हरिभाऊंच्या मनावर चिपळूणकरांच्या शिकवणीचा संस्कार झाला होता. त्यांचा आदर्श त्यांच्या पुढे होता. 'यशवंतराव' मधील श्रीधरस्वामी हें पात्र म्हणजे चिपळूणकरांची प्रतिमा वाटते, असे त्यांच्या चरित्रकर्तींनी म्हटलें आहे. ह्यावरून हरिभाऊंच्या मनावर चिपळूणकरी पुनरुज्जीवनवादी विचारांचा ठसा खोलवर उमटलेला असला पाहिजे हें स्पष्ट आहे.

ह्या पुनरुज्जीवनवादी विचारांचा परिणाम त्यांच्या कादंबऱ्यांवर कोणता झाला तें पाहण्यापूर्वी आगरकर व हरिभाऊ यांचे वैचारिक संबंध कसे होते तें पाहणें आवश्यक आहे. आगरकरांच्या नवीन सुधारणावादी सामाजिक संप्रदायास हरिभाऊ तितकेसे अनुकूल नव्हते. आगरकरांच्या मतांवर टीका करतांना एकदां हरिभाऊंनी लिहिले."...गेल्या दोनशें वर्षांमागें आमचे रीतिरिवाज काय होते, ते आमच्या विद्वान् ग्रंथकर्त्यांच्या लक्षांत अगदींच नाही काय? अभिज्ञान शाकुंतल, उत्तररामचरित,....इत्यादि नाटकांत वर्णिलेले रीतिरिवाज आमचे नव्हतेच काय? आम्ही आमचे रीतिरिवाज सोडून चाललों आहोंत हें दाखविणें चांगले कीं, दुसऱ्यांचे चांगले आहेत हें दाखविणें चांगलें?[४] " ह्या उल्लेखावरून त्यांचे आगरकरांविषयीं काय मत होतें तें स्पष्ट होतें. गोविंदराव कानिटकर ह्या हरिभाऊंच्या स्नेह्यांच्या परिचयामुळे हरिभाऊंचे विचार बदलले व पुढे हरिभाऊंच्या समाजविषयक विचारांत क्रांति झाली आणि ते आगरकरांच्या संप्रदायास जाऊन मिळाले. ह्यावरून हें स्पष्ट होईल की, हरिभाऊंच्या विचारांत वर उल्लेखिलेल्या दोन्ही विचारसरणींचा मिलाफ झाला आहे. आगरकर अकालीं मरण पावल्यामुळे त्यांची विचारसरणी सामान्य समजुतीप्रमाणे गोखल्यांच्या (रानड्यांच्या शिष्याच्या) विचारसरणींत विलीन पावली व कै. गोखले हे हरिभाऊंचे अत्यंत निकटवर्ति मित्र होते.

---

४. पानसेः आपटे चरित्र पृ. ७५.

ह्यापैकी चिपळूणकरांच्या विचारांचे पडसाद हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून कसे उमटले आहेत ते प्रथम पाहूं. चिपळूणकरांच्या राष्ट्रवादांत स्वभाषा प्रेमाला अग्रस्थान आहे. हरिभाऊंनी तो भाग त्यांच्या विचारसरणीपासून उचलला. त्याशिवाय हरिभाऊंनी ह्या राष्ट्रवादी विचारांचा उपहास कोठेहि केलेला नाही. उलटपक्षी सुधारक लोकांच्या सामाजिक आचारशिथिलतेकडे त्यांचें लक्ष जाऊन त्याच्यावरच त्यांनी आपली पहिली कादंबरी 'मधली स्थिति' ही रचली आहे. गोविंदराव कानिटकरांसारखा कट्टर सुधारणा कैवारी मित्र जर हरिभाऊंना लाभला नसता तर त्यांच्या कादंबऱ्या कशा झाल्या असत्या ह्याचें एक गमक ह्या कादंबरीच्याद्वारें पाहावयास मिळतें. अर्थात् ही कादंबरी पुर्णे वैभव ह्या वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाली व तिने त्यांना चांगलीच लोकप्रियता प्राप्त करून दिली ही गोष्ट निराळी.

चिपळूणकरांच्या विचारांचा दुसरा धागा म्हणजे राष्ट्र व संस्कृति-प्रेम. हरिभाऊंनी बारा ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या व दहा सामाजिक. ह्यावरून त्यांना चिपळूणकरांचा उज्जीवनवाद हा मनापासून आवडत असावा असें दिसतें. उलटपक्षी सामाजिक कादंबऱ्यांतून राजकीय जीवनाचें चित्रण रंगवितांनाहि हरिभाऊंना उज्जीवनवादाचें विस्मरण झालें नाही. भावानंद स्वामींचा आश्रम, हें याचें उत्कृष्ट गमक आहे. अशा प्रकारचे 'आश्रम' देशभक्तांनी काढावे व समाजसेवेचें कार्य चालू ठेवावें हा विचार, ही कल्पना उज्जीवन वादाच्या कल्पनेशी सुसंगत आहे. विवेकानंदांनी 'रामकृष्ण मिशन' ही संस्था काढली तिचे महाराष्ट्रावर उमटलेले हे वैचारिक पडसाद आहेत. व विवेकानंदांची विचारसरणी ही एक प्रकारच्या उज्जीवन वादावर आधारलेली होती. त्यावरून सामाजिक कादंबऱ्या लिहितांनाहि त्यांना ह्या विचारांचा विसर पडत नाही असें स्पष्ट दिसतें. अनेक कादंबऱ्यांत हे उल्लेख आले आहेत.

मग हरिभाऊंच्या सामाजिक सुधारणा पुरस्कारांचें कारण काय असावें? त्यांनी ते विचार वा त्या सुधारणा व्यक्त केल्याने लोकप्रियता लाभेल अशीहि परिस्थिति नव्हती. मग आगरकरांची विचारसरणी त्यांना का जवळ

वाटावी ? मित्रांनी जरी सांगितलें असलें तरी त्यांच्या मनाला विशिष्ट सामाजिक सुधारणाचें महत्त्व पटल्याखेरीज त्यांच्या साहित्यांत पुरस्कार होणें कठीण आहे, हरिभाऊंच्या आगरकरांबाबतच्या विचार साटष्याचें इंगित कोणतें ? असा प्रश्न सहाजिकपणें निर्माण होणें शक्य आहे. त्याचें उत्तर काय मिळतें तें पाहूं.

उज्जीवनवादी विचारांत एकप्रकारची चेतना निर्माण करण्याचें सामर्थ्य असलें तरी उत्कृट ललित वाङ्मय निर्माण होण्याच्या दृष्टीने कांही वैगुण्यें त्या विचारसरणींत आहेत तिचा अवलंब करून निर्माण झालेलें अधिकाअधिक तेजस्वी साहित्य म्हणजे निबंधमालाकार चिपळूणकरांचे व काळकर्ते शि. म. परांजपे यांचें. ती आक्रमक विचारसरणी होती. एक प्रकारच्या द्वेषावर-द्वेष-भावनेवर-ती आधारलेली होती.ह्या द्वेष भावनेच्या अपरिहार्यतेमुळेच चिपळूण-करांची लो. हि. वा. वरील टीका व शि. म. परांजपे यांनी सुधारकांवर व सुधारणांवर अधून मधून केलेली टीका निष्कारण जहाल, व त्या त्या पक्षांना अन्याय करणारी झाली आहे. ह्यांचें कारण ह्या लोकांचा द्वेष नव्हे तर त्यांनी स्वीकारलेली विचारसरणीच द्वेषाधिष्ठित होती. हरिभाऊंचा एकंदर मनोकंद हा प्रेमळ व भावनाशील होता. त्यांत द्वेष भावनेला स्थान नव्हतें. साहित्य निर्मितीला त्यांची वृत्ति पोषक होती.

याशिवाय अभिजात लेखकाचें एक वैशिष्ट्य म्हणजे त्याचें मानवता प्रेम. ह्या मानवता प्रेमाशिवाय उत्कृष्ट कलाकृति निर्माण होणें सर्वथा अशक्य आहे. हरिभाऊंची मनोधारणा मानवताप्रेमाला अनुकूल होती. आगरकरांची विचारसरणी ज्या व्यक्तिवादावर आधारलेली होती त्या व्यक्तिवादांतच हरिभाऊंतल्या लेखकाला मानवतेचीं बीजें आढळून आलीं असणें शक्य आहे. सहाजिकपणें ह्या विचारसरणीचें आकर्षण त्यांच्यामधील लेखकाला वाटणें शक्य होतें. आगरकरांची विचारसरणी तर्काधिष्ठित होती. तिच्या पाठीमागे पाश्चात्य नवविचारांचें अमृतमंथन होतें. तिचें तोंड मानवता वादाकडे झुकलेलें होतें. सहाजिकपणेच साहित्याच्या समृद्धीला केवळ तिचाच आधार वाटणें व साहाय्य होणें शक्य होतें. उलटपक्षी पुनरुज्जीवनवादी

विचारसरणीने भूतकालीन विचारांत वा तात्त्विक अवगुंठणांतून एखाद्या 'गीता रहस्या'कडे नेऊन सोडलें असतें. साहित्य दृष्टीने–ती गोष्ट बिलकुल पोषक ठरली नसती.

हरिभाऊंच्यामधील लेखक जेव्हा जागृत झाला असेल तेव्हा त्याच्यापुढे क्षणकाल असा संग्राम झाला असेल व त्याला आगरकरांची व्यक्तिवादी विचार-सरणी जवळची वाटली असेल, दिवसेंदिवस तिच्याविषयीं वाटणारी आपुलकी परिवर्धित झाली असेल. उजीवनवादी लोकांची स्त्री-जीवनाकडे पाहाण्याची दृष्टि तत्कालीन साहित्यांतून व्यक्त होते. तिच्या आधारें असें म्हणतां येतें की, असल्या विचारसरणीच्या आधारें श्रेष्ठ व चिरंजीव ललित-साहित्य बिलकुल निर्माण झालें नसतें. या सर्व विवेचनावरून हें स्पष्ट होईल कीं, हरिभाऊंच्या विचारसरणीवर उत्स्फूर्त संस्कार जरी चिपळूणकरांचे असले तरी आगरकरांच्या चिंतनशील संस्कारांनी तिला अधिक सर्वस्पर्शी केलें. तिचें तोंड मानवतेकडे केलें. व म्हणूनच असें उत्कृष्ट साहित्य ते लिहूं शकले.

तथापि असें आढळून येईल की, हरिभाऊ आगरकरांच्या सांगातीं दीर्घ काल वाटचाल करूं शकले नाहींत. पूर्वसंस्कार मधे आले हेंच खरें. त्यांनी नवजागृत स्त्री रंगविली, पण आगरकरांच्या उज्ज्वल प्रतिमेला ज्या स्त्रीचें दर्शन झालें तेथपर्यंत हरिभाऊंची नजर पोचूं शकली नाही. आगरकर समाजाच्या खूपच पुढे होते त्यामुळे असें झालें. हरिभाऊंचा तो दोष नव्हे.

हरिभाऊंचा स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन कोणता होता त्याचें स्पष्ट दिग्दर्शन त्यांनी जीं विविध स्त्री पात्रें निर्माण केलीं त्यांच्या द्वारें व्यक्त होऊं शकतें. स्त्रियांकडे पाहण्याची त्यांची दृष्टि अतीव सहानुभूतिशील होती. हिंदु स्त्रीचा समाजांत जो पदोपदीं अपमान होत होता त्याचें भेदक दिग्दर्शन करून समाजाची सहानुभूति जागृत करणें एवढेंच उद्दिष्ट त्यांच्या पुढे होतें असें दिसतें. ह्याच कारणांमुळे त्यांनी कोणत्याही प्रकारचे ताशेरे झाडलेले नाहीत. त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रिया ह्या सामान्यतः मूक वृत्तीने सारे

अन्याय सहन करणाऱ्या आहेत. त्यांच्या ह्या सहनशील वृत्तीकडे लक्ष वेधून समाजाचा दृष्टिकोन बदलावा, त्यांच्या मनांत स्त्रीजीवनाबद्दल व्यापक सहानुभूति निर्माण व्हावी हाच उद्देश पुढे ठेविलेला दिसतो. कारण त्यावेळी हिंदुसमाजाची स्त्रीजीवनाकडे पाहण्याची दृष्टीच अत्यंत कठोर वा निष्ठुर अशी होती. त्याच्या दृष्टींत बदल होणें हें महत्त्वाचें कार्य साध्य झाल्यानंतर स्त्रियांच्या ठायीं असलेल्या व्यक्तिवैशेष्ट्याचें महत्त्व समाजाच्या डोळ्यांत भरणें शक्य होतें.

त्यांची दृष्टि सहानुभूतिशील असली तरी त्या वृत्तीच्या आहारीं जाऊन स्त्रियांना केवळ सद्गुणांच्या पुतळ्या असें रंगविले नाही तर स्त्रीच्या ठिकाणीं गुणांबरोबर दोष आहेत. सुष्ट व दुष्ट भावनांचें संमिश्रण पुरुषांप्रमाणे स्त्रियांच्याहि स्वभावांत झालेलें असतें. व ही गोष्ट लक्षांत घेऊन त्यांनी कजाग, जहांबाज स्त्रियांचीं चित्रें रंगविलीं. हीं चित्रें रंगवितांना त्यांनीं मानवतेचा सुवर्णस्पर्श ह्या चित्रांना करविला आहे.त्यांच्या ठिकाणीं असलेल्या ह्या रचनाकौशल्याचे योगाने त्यांची सृष्टि म्हणजे एक जिवंत सृष्टि वाटते.

हरिभाऊंचें सारें लेखन प्रामुख्याने हेतुप्रधान आहे. ललित लेखनहि हेतुप्रधान असावें असें मतहि त्यांनी कांही ठिकाणीं आवेशाने मांडलें आहे. त्यांच्या दृष्टीने त्यांच्या कादंबऱ्याचें परिशीलन करतांना कोणता हेतु पुढे होता व विशिष्ट कादंबरींत तो कितपत सिद्धीस गेला हेंहि पण पाहणें उद्बोधक ठरेल. स्त्रीजीवनाच्या दृष्टीने पाहतां असें आढळून येतें की, त्यांच्या कालांत एकत्र कुटुंब पद्धति आस्तित्वांत होती. व नव्या राजवटीबरोबर जें नवें जीवन आलें त्याचा परिणाम म्हणजे त्या कुटुंब पद्धतीस तडे गेले. ती अगोदरच जायबंदी झाली होती. एकत्र कुटुंबांत सर्वच व्यक्तींच्या व्यक्तित्वाची कशी गळचेपी होते, ह्याचें भेदक दिग्दर्शन हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून अत्यंत प्रभावी रीतीने केलेलें आढळतें. असो, त्यांच्यी कादंबऱ्यांतून स्त्रीजीवनविषयक कोणते प्रश्न आले ते पाहण्यापूर्वी त्यांनीं निर्माण केलेली स्त्री-सृष्टि कशी आहे तें पाहणें आवश्यक आहे.

'मधली स्थिति' ही हरिभाऊंची पहिली कादंबरी. तिने हरिभाऊंना उदंड प्रसिद्धि कीर्ति मिळवून दिली त्याबरोबर वास्तववादी कादंबऱ्यांचें नवें युगमान निर्माण केलें. 'मुक्तामाला मंजुघोषाचें जुनें अद्भुतरम्य युग अस्तंगत झालें' लेखकाची ही पहिलीच कादंबरी असल्याने तिच्यांत स्वभाव चित्रणादि उच्च साहित्यगुणांचा आढळ जितका स्पष्टपणाने व्हावा तितका होत नाहीं. गोविंदराव, विनायकराव आदि सुशिक्षित तरुण मद्यपानादि व्यसनांच्या आहारीं कसे जातात व त्यांच्या पशुतुल्य वर्तनाने स्त्रियांना कसा त्रास होतो हें प्रामुख्याने ह्या कथेंत लेखकाला दाखवावयाचें आहे. लेखकाला स्त्री-जीवनाबद्दल अथांग सहानुभूति वाटते, तिचें दिग्दर्शन सरस्वती, दुर्गा, जानकीबाई, अंबूताई आदि स्त्रियांच्या चित्रणाच्या द्वारें जसें केलें तसें प्रत्यक्ष करुणाजनक उद्गार व्यक्त करून केलें आहे.[५] ह्या सुशील स्त्रियांबरोबर काकूबाई, सगुणाबाई, आदि दुष्प्रवृत्त स्त्रियांचें स्वभाव चित्रण आलें आहे. या कथेंत मध्यवर्ति-पात्र असें नाही. सरस्वतीवरील विविध संकटांची माहिती लेखकाने बऱ्याच विस्ताराने वर्णन केली आहे. लेखकाला कोणत्याहि एका पात्राचें स्वभाव विश्लेषण स्पष्टपणे न करतां 'सुधारकां'च्या विविध प्रकारच्या कारवाया व कारस्थानें ह्यांवर प्रकाश पाडावयाचा आहे असे दिसतें. सरस्वतीवर येणाऱ्या आपत्तींना तिचा बिचारीचा इलाज नाही. गोविंदरावासारख्या दुष्ट पात्राच्या विविध कारवायांना ती बळी पडते. पण दुर्गावर जो प्रसंग येतो त्याच्या मुळाशी तिचा दागिन्यांबाबतचा लोभ आहे. त्यामुळे तो ओढवला आहे. जानकीबाई, अंबूताई यांच्या द्वारा लेखकाने मध्यमवयीन स्त्रियांचें जीवनहि किती केविलवाणें झालें आहे हें दर्शविलें आहे. एकंदरीने हरिभाऊंची ही पहिली कादंबरी असली, तरी तिच्यांत हरिभाऊंच्या पुढे आविष्कृत झालेल्या उज्जवल प्रतिभाविलासाचीं प्रसाद चिन्हें दिसतात. ह्या कथेंतील स्त्रिया व्यसनाधीन झालेल्या आपल्या पुरुष कुटुंबियांच्या दुष्प्रवृत्त आचारविचारांना बळी पडतात. त्यांच्या ठिकाणीं लिहिण्यावाचण्याचें प्रेम निर्माण व्हावें अशी स्थिति निर्माण झाली नव्हती.

५. मधली स्थिति पृ. ७३, ७५, १०७, २०१, २६५ इ.

२१९०९ निबं
क्रमांक ....१०८३.... नों. दि. २५/

तशी परिस्थिति निर्माण होण्यास पुरुषांची वृति थोडीतरी निवळली जाणें आवश्यक होतें. त्यांच्या ठिकाणीं थोडीतरी विचारशीलता निर्माण होणें जरूर होतें. इंग्रजी शिक्षणाने पुरुषांच्या जीवनांत सुखासीनता शिरली, पण स्त्रियांचे जीवन अधिकच केविलवाणें झालें. स्त्रीजीवनाच्या पराधीनतेचें व निराधारतेचें जें दिग्दर्शन या कादंबरींत होतें त्यायोगे पुरुषांची वृत्ति थोडी तरी आत्माभिमुख झाली असेल असें म्हणता येईल.

'मधली स्थिति' नंतर हरिभाऊंची 'गणपतराव' ही कादंबरी प्रसिद्ध झाली. ह्या कादंबरीचें वैशिष्ठ्य अनेकपरींनी आहे. गणपतराव हा नायक स्त्री-उद्धारासाठी कांहीतरी प्रत्यक्षांत करावें अशा विचारांचा आहे. त्याच्या विचारांवर मिल् स्पेन्सर यांचा विलक्षण परिणाम झाला आहे. मिल्चें 'स्त्रियांची परवशता' हें पुस्तक पुढें ठेवून आपण स्त्रियांच्या उद्धारासाठीं झटूं अशी शपथ घेतो.[६] त्याचा मित्र नाना याची बहीण गोदावरी हिचे सासरी होत असलेले हाल पाहून त्याचें अंतःकरण तिळतिळ तुटतें. स्वतःच्या पत्नीला शिकविणार असा निश्चयहि तो मित्राजवळ करतो.[७] तो फार उतावळा आहे, सर्व सुधारणा झटपट व्हाव्या असें त्याला वाटतें. त्याचे समाज सुधारणेचे विचार मिल् स्पेन्सर यांच्या वळणावर गेले आहेत. खऱ्या प्रेमावर आधारलेले विवाह —प्रेम विवाह— आपल्याकडे कधी बरें व्हावयास लागतील अशी त्यास तळमळ आहे.[८]

स्त्री-जीवनाच्या दृष्टीने पाहतां स्त्रियांची उन्नति व्हावी म्हणून बद्धपरिकर होणारा तरुण गणपतराव हेंच ह्या कादंबरीचें वैशिष्ठ्य. त्या स्वभावचित्रणाद्वारें हरिभाऊंनी स्त्री-जीवनविषयक कोणता एक प्रश्न न मांडतां सर्वांगीण उन्नति व्हावयास पाहिजे असें दिग्दर्शित केलें आहे.[९] या कादंबरींतील गोदावरी व सरस्वती ह्या तरुण मुली आहेत. गोदावरीला खाष्ट सासू व दुष्ट पति मिळाल्याने बिचारीचें जीवन अत्यंत पराधीन झालें आहे. विशेष लक्षांत

---

६ 'गणपतराव' पृ. १०२. ७ कित्ता पृ. ४. ८ पृ. ८, ९ ९पृ. ७९.

भरण्यासारखी गोष्ट म्हणजे तिला स्वतःची सासू रखमाबाई व चुलती सीताकाकू ह्या दोन्ही स्त्रियांच्या जाचांत जन्म कंठावा लागतो. सासर आणि माहेर दोन्ही ठिकाणीं दुःखच तिच्या वांट्यास आलें आहे. तिचा भाऊ व त्याचा गणपतराव हा मित्र ह्यांना कल्पना असून ते कांही करूं शकत नाहीत. सरस्वती चांगला पति व सासूसासरे समंजस मिळाल्यानें सुखांत आहे. आपण पतीच्या म्हणण्याप्रमाणे लिहिण्यावाचण्यास शिकावें असें ती ठरविते तसें आश्वासनहि देते, व प्रयत्नहि करते. वयस्कर (स्त्रियांच्या) पिढींत रखमाबाई सीताकाकू, गोपिकाबाई (गोदावरी व नाना यांची आई) हीं प्रमुख पात्रें आहेत. त्यांपैकी गोपिकाबाई अत्यंत गरीब, कष्टाळू, पराधीन आहे, तर रखमाबाई व सिताकाकू ह्या अत्यंत आग्रही आहेत. एकत्र कुटुंबांत आढळून येणारे स्वभाव वैविध्य व स्वभाव संघर्ष ही दोन्ही उत्कृष्ट रीतीने प्रतीत होतात. कादंबरीचे नायक, उपनायक सुशिक्षित ध्येयवादी आहेत. त्यांच्या ध्येयांत प्रामुख्यानें स्त्री-सुधारणा आहे. पुनर्विवाहाची चाल आपल्याकडे असती तर किती चांगलें झालें असतें असाहि एके ठिकाणीं उल्लेख आहे.[१०] विष्णु व लक्ष्मी हें आदर्श सुधारक दांपत्य त्यांची सदा सहाय्यक प्रवृत्ति नजरेस भरते. स्त्रीजीवनविषयक सहानुभूति व्यक्त करणारी पहिलीच कादंबरी ह्या दृष्टीने कादंबरीचें महत्त्व आजहि आहे. कादंबरी अपूर्ण असल्याने द्वारकीचें पुढे काय झाले तें स्पष्ट होत नाही.

'गणपतराव' ह्या कादंबरीचा उत्तरार्ध म्हणजे 'कर्मयोग' ही कादंबरी होय. उत्तरार्ध म्हणण्याचें कारण असें दिसतें की 'गणपराव' मधील गणपतराव व सरस्वतीबाई ह्या दांपत्याचा मुलगा चंद्रशेखर हा या कादंबरीचा नायक आहे. तो एम्. ए. झालेला आहे व पुढे देशकार्याचा कोणता मार्ग स्वीकारावा ह्या विचाराने त्याच्या मनांत खळबळ माजली आहे. कादंबरी अपूर्ण असल्याने पुढे चंद्रशेखरने कोणता मार्ग स्वीकारला हें कळण्यास मार्ग नाही. बारकाईने पाहिलें तर विषयदृष्ट्या ही कादंबरी 'गणपतराव' या कथेचा

१० पृ. ५७.

उत्तरार्ध नव्हे. त्या कादंबरीत स्त्री-जीवनाविषयीं जी व्यापक सहानुभूति निर्माण केली आहे. मिल स्पेन्सर आदि विचारांच्या अनुरोधाने समाजांत नव्या विचारांचे लोक बहुसंख्येने असावेत इ. चित्रण पहिल्या कादंबरींत आहे. पण त्या विचारांचें परिणत स्वरूप ह्या कादंबरींत पाहावयास सांपडत नाही. किंबहुना नायक चंद्रशेखर हा देशोद्धाराच्या इतरच मार्गाकडे आकर्षित झालेला दिसतो. पुनर्विवाहाच्या दृष्टीने गणपतरावांची पत्नी सरस्वती ही 'पुनरूढा' म्हणजे पुनर्विवाहित आहे एवढीच प्रगति दिसून येते. त्याचप्रमाणे 'मी' मधील भावानंदाच्या आश्रमाचें दर्शन होतें व त्यांत पतित स्त्रियांची राहाण्याची इ. सोय केलेली असते एवढाच भाग काय तो विषयदृष्टीने 'गणपतराव' कादंबरीशी संबद्ध आहे.

कादंबरीचा नायक चंद्रशेखर हा एका आधुनिक संन्यासीबुवाकडे आकर्षित होतो. तो घरच्या संस्कारांनी, अभ्यासाने नास्तिकवादी असतो. पण स्वामींच्या गूढ श्रद्धावादाकडे फार झपाट्याने ओढला जातो. त्या स्वामींनाहि शेवटीं भावानंदाच्या आश्रमाच्या रूपांत आपल्या कार्याची परिपूर्ति झालेली पाहावयास सांपडते. –त्यांच्या "....मला पुनः पुनः देह देऊन हिंदुस्थानांत जन्माला घाल आणि त्याच्या उद्धारार्थ श्रम करण्याची बुद्धि दे" [११] या उद्गारांचा त्यांच्या मनावर खोल ठसा उमटतो. देशाच्या उद्धाराचे निरनिराळे मार्ग, यत्न दाखविले आहेत. त्यांत भावानंदाच्या आश्रमाचे रूपाने समाज सुधारणेच्या मार्गाचें स्पष्टीकरण केलें आहे. ही कादंबरी लिहितांना समाज-सुधारणेपेक्षा पुनरुज्जीवनवादी राष्ट्रसुधारकांच्या प्रयत्नांचा ठसा लेखकावर अधिक झाला आहे असें स्पष्ट दिसतें. 'कर्म योग' हें कादंबरीचें नांव त्यादृष्टीनेच सूचक आहे.

स्त्रीजीवनाच्या आविष्करणाच्या दृष्टीने पाहतां लिली, नर्मदा, हीं दोन तरुण मुलींचीं स्वभावचित्रें व पंडिताबाई, सरस्वती हीं मध्यमवयीन स्त्रियांचीं पात्रें होत. चंद्री हें ८।९ वर्षांच्या मुलीचें पात्रही मनोज्ञ रीतीने रंगविलें

११; कर्मयोग पृ. ४७

आहे. लिली ही अत्यंत बुद्धिमान, स्वभावाने स्पष्टवक्ती, धीट व तरुण मुलगी आहे. तिचें स्वभावचित्रही लेखकाने सहानुभूतिपूर्वक रंगविलें आहे. तिला देशोद्धाराच्या विविध प्रयत्नांबद्दल विशेषसा आदर नसतो, परंतु ताई-बद्दल मात्र तिचें मत फारच चांगलें असतें व तें पाहून चंद्रशेखराला अचंबा वाटतो. तो अंतर्मुख होऊन विचार करावयास लागतो. लिली ही नव्या पिढीची प्रातिनिधिक स्त्री हरिभाऊंना दाखवावयाची आहे. हरिभाऊंनी लिलीचें पात्र रंगवितांना खूप कौशल्य दाखविलें आहे. हरिभाऊंच्या मनावर पुनरुज्जीवनवादी विचारांचें दडपण नसतें तर, आणि आगरकरांच्या व्यक्ति-स्वातंत्र्यावादी विचारांशीं ते अधिक समरस झाले असते तर, हें लिलीचें पात्र म्हणजे स्त्री-स्वातंत्र्यवादिनी स्त्रीचें पात्र असें रंगवून त्यांनी तें अजरामर करून ठेविलें असतें. परंतु आहे ह्या स्वरूपांत लिली ही केवळ ताईची एकनिष्ठ शिष्या झालेली आहे. स्त्रियांच्या दोन पिढ्यांच्या विचारांत जो नैसर्गिक रीतीने फरक पडलेला दाखवावयास हवा तो नीट रीतीने दाखवितां आला नाही असें वाटतें, याचें कारण लेखकाच्या मनोवृत्तींत आहे.

नर्मदा ह्या पात्राच्या द्वाराने हरिभाऊंनी एका विधवा स्त्रीच्या असहायतेचें दिग्दर्शन केलें आहे. पण लेखकाच्या मनाची खरी सहानुभूति देशोद्धाराच्या अन्यविचारांकडे आहे. त्यामुळे नर्मदेचें पात्र व चरित्र हें कादंबरीच्या अंतरंगांतून उफाळून आलें असें वाटत नाही. तें चिकटविलेलें वाटतें. चंद्र-शेखरला तिजबद्दल वाटणारी करुणा, विक्रमशीलाचे एकेक प्रताप इ. दर्शवितांना हरिभाऊंची वास्तव दृष्टि बरीच शिथिल झाली आहे असें वाटतें. हरिभाऊंची दृष्टि बदलण्याचें दुसरें उदाहरण म्हणजे पंडिताबाईचें पात्र. पंडिताबाई या सीताकाकू (गणपतराव) यमुनेची सासू राधाबाई (पण लक्षांत...) इ. पात्राप्रमाणें जहांबाज नाहीत. त्यांचा स्वभाव बराच मानवी आहे. त्यांच्याकडून नर्मदेला विशेष त्रास होत आहे असें नव्हे. विक्रमशील हा बाहेरचा उपटसुंभ मनुष्य, तो भाऊबहेनींच्या घरांत शिरजोर होतो व नर्मदेला दुर्वृत्त करतो हें सारें चित्रण अस्वाभाविक वाटतें.

अशा रीतीने स्त्रीजीवनविषयक चित्रणाचे दृष्टीने वा तद्विषयक विशिष्ट प्रश्नाच्या आविष्कारणाच्या दृष्टीने ही कादंबरी विशेष उल्लेखण्यासारखी नाहीं.

आणि ह्याच मनोवृत्तींत हरिभाऊंनीं 'आजच' ही कादंबरी लिहिलेली दिसते. या कादंबरींत समाज सुधारणेच्या विविध प्रयत्नांचें दिग्दर्शन केलें आहे. 'समाज सुधारणा' ही प्रामुख्याने राष्ट्र सुधारणा आहे. काँग्रेसच्या अधिवेशनाहून गणपतराव येतांना त्यांना स्वामींची पण ओळख होते. स्वामींचा मार्ग हा हरिभाऊंचा आवडता मार्ग दिसतो. ह्या मार्गाचें चित्रण हरिभाऊ फार सहानुभूतीने करतात. औद्योगिक प्रगति करण्यासाठी यंत्र विद्या हस्तगत करण्याकरितां तरुण विलायतेला जाताहेत, (प्रभाकर, गोपाळ) गिरण्या आदि कारखाने काढावे असें म्हणून त्याप्रमाणे लटपटपंची करणारे कृष्णराव आहेत. समाजसुधारणेचे गणपतराव आदि सुधारकांचे मार्ग तर चालूच आहेत. जीर्णोद्धारकांचे "सनातन धर्मरक्षिणी सभा" काढण्याचेहि प्रयत्न चालू आहेत. भावानंदासारख्या संस्था काढण्याचा मार्ग काढावा असेंहि कित्येक म्हणतात. अशाप्रकारें राष्ट्र सेवेच्या विविध मार्गांचें दिग्दर्शन होतें, होत नाहीं तें स्त्रीजीवनाचेंच.

ह्या कादंबरींत अवघें एक महत्त्वाचें पात्र आहे. तें म्हणजे कमलेचें. त्याशिवाय वारूताईची हकीकत एकदोन प्रकरणांत आली आहे. इतकाच स्त्रीजीवनाचा संबंध निरनिराळ्या पात्रांच्या तोंडीं स्त्रियांबद्दल सहानुभूतीपर विचार आले आहेत. त्यांवरच समाधान मानून घ्यावें लागतें. देशभक्तीच्या या अनेकविधमार्गांच्या पसाऱ्यांत स्त्री-जीवनाच्या कोणत्याहि एका अंगाचें सुस्पष्ट चित्रण करण्यास लेखकाला अवसरच मिळाला नाही असें दिसतें.

'मायेचा बाजार' ही कथा (कादंबरी) लिहितांना लेखकाचें लक्ष निश्चितपणें स्त्री-जीवनाकडेच होतें असें दिसतें. पद्मा ही या कादंबरीची नायिका कारुण्याची मूर्ति आहे. बाळासाहेबांसारखा नराधम पति मिळाल्याने तिच्या जन्माचें नुकसान झालें असेंच लेखकाला दाखवावयाचें आहे असें वाटतें. विरोधाचे दृष्टीने मालतीचें पात्र मुद्दाम रंगविलें आहे. स्त्रीचें जीवन

पतीवर कसें अवलंबून आहे हें स्पष्ट होतें. पद्मेला चांगला पति नाहीं म्हणून दुःख, मथुरा बिचारी तर पतिहीन जीवन कंठणारी,तेव्हां तिच्या कारुण्याला वारावार नसावा हें क्रमप्राप्त आहे. कोणाही साध्या माणसाच्या कारवायांना बळी पडावें असें तिचें जीवन आहे. बगुताई ही एक शेजारीण पण तिचा नवरा दिगंबरपंत हा दुष्ट, त्यामुळे बगुताईचें जीवनहि असेंच दुःखांनी भरलेलें. पद्मेच्या आईचें जीवनपण पद्मावतीच्या वडिलांच्या लहरीपणाने वाया गेलेलें. अशीं विविध प्रकारचीं चित्रें हरिभाऊंनीं रंगविलेलीं आहेत. मध्यवर्ती चित्र अर्थात पद्मेचें आहे, व वसंतरावांच्या अविवाहित राहण्याच्या निर्णयाने, कथेला एकप्रकारच्या प्रेमकथेची छटा प्राप्त झालेली आहे. डॉक्टर भगवंतराव व मथुरा हे दोघेहि आहे त्याच अवस्थेत राहातात हें दाखवून लेखकाने सर्व जीवनचित्रणांतला उदात्तपणा टिकविलेला आहे. कादंबरींत पद्मेचें चित्र अतीव कौशल्याने दाखविलेलें आहे. मालती ही तिची जिवलग मैत्रिण तिचे यजमान येण्याच्या आनंदांत ती सहभागी होते. वास्तविक तत्पूर्वीच आपलें स्वतःचें वैवाहिक जीवन उध्वस्त झालें ह्या गोष्टीची कल्पना तिला असते. वडिलांच्या मृत्यूचा विपरीत प्रसंग येतो त्याला ती धैर्याने तोंड देते. त्यानंतर बाळासाहेबांचें पत्र येतें तेव्हा तिचें अक्षरशः भान हरपतें. लेखकाने मोठ्या कौशल्याने बाळासाहेबांचें पहिल्या पत्राप्रमाणे आगमन झालें नाही हें दर्शविलें आहे. पुढे बाळासाहेब घरीं राहावयास येतात. त्यांचें तें जीवन, ते डावपेंच सुरू होतात, बिचारीचे सारे मनोरथ कोसळून पडतात. मालती नसल्याने मथुरेकडे ती अधिकाधिक आकृष्ट होते. व तसें होणें अगदीं सहाजिक आहे. शेवटीं सहीचा प्रश्न निर्माण होतो. तिला वस्तुस्थिति उमगते, ती आपापल्यापरी झगडते, पण आजाराने तिचा शेवट लवकर होतो. त्यावेळीही मृत्युपत्र करण्यांत तिने कौशल्य प्रकट केलें आहे. एकंदरीने पद्मा हें पात्र रंगवून हरिभाऊंनी स्वकालीन तेजस्वी स्त्रीचें जीवन कसें मातीमोल झालें आहे हें रंगविलें आहे. ह्या चित्रणाला उठाव देण्यासाठींच मथुरा व बगुताई यांचीं चित्रें आलीं आहेत असें दिसतें व

आपापल्या परीने तीं रम्य आहेत. पद्मेची आई ही एक सामान्य स्त्री आहे. ह्या कादंबरींत जहांबाज स्त्रियांचीं पात्रें नाहींत. यांचें कारण परिस्थितींत फरक पडला आहे. स्त्रियांच्या अंगचा जहांबाजपणा व पुरुषांच्या अंगचा दुष्टपणा हा प्रामुख्याने एकत्र कुटुंब पद्धतीचा परिपाक होता. येथे एकत्र कुटुंबाचें एकहि उदाहरण नाही. जहांबाज स्त्रीच्या व्यक्तित्वांत जी बुद्धिमत्ता असते, ती चांगल्या अर्थाने पद्मेच्या ठायीं आहे. त्याचप्रमाणे बाळासाहेब हा दुष्टतेचा पुतळा आहे. त्याला पश्चात्ताप होतो असें दाखविलें. पण त्याचा स्वभाव एकंदरीने अशा पश्चात्तापाच्या पलीकडचा आहे. पद्मेच्या खालोखाल या कथेंतलें आकर्षक चित्र म्हणजे मथुरेचें. बिचारी नौकरी करून आपल्या भावांचें शिक्षण करतें. स्त्रीला स्वतःच्या कमाईने पोटहि भरूं देण्याची समाजाची तयारी कशी नाही, दिगंबरपंतासारखे दुष्ट लोक तऱ्हातऱ्हांनी तिला कसें छळतात तें सुरेख दर्शविलें आहे. कृष्णरावाच्या पांचव्या बायकोचा मृत्यु व सहाव्या बायकोचें लग्न ह्या दोन घटना एकसमयावच्छेदेंकरून दाखविण्यांत लेखकाने स्त्रीजीवन-विषयक समाजाच्या सहानुभूतिशून्यतेचें ओझरतें पण चटका लावणारें दिग्दर्शन केलें आहे. एकंदरींत स्त्रीजीवनाविषयक आविष्करणांत ही कादंबरी बरीच वरच्या दर्जाची आहे. तिच्यांतील पद्मा व मथुरा हीं पात्रें फारच उत्कृष्टपणें रंगविलीं गेलीं आहेत.

"जग हें असें आहे" ह्या कादंबरींतील स्त्रीजीवनाचा विचार करतांना फक्त दोनच प्रमुख पात्रें दृष्टीपुढें उभीं राहतात. तीं म्हणजे राधाबाई व स्वरस्वती ही होत. राधाबाई ही सासू व तिच्या सावत्र मुलाची बायको सरस्वती असें त्यांचें नातें आहे. पण सासू इतकी गरीब आहे व सून इतकी पाताळयंत्री स्त्री आहे कीं, नवऱ्याची गडगंज संपत्ति असून बिचाऱ्या राधाबाईला दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहून स्वतःच्या मुलांचा निर्वाह करावा लागतो. चिंतोपंत व सरस्वती हें जोडपेंच ह्या कादंबरींत खलपात्रांचें कार्य करतें. राधाबाईवर कोसळलेली संकटाची परंपरा पाहून तिच्याबद्दल अतीव करुणा वाटूं लागते. तिच्यावर आलेलीं संकटें निसर्गनिर्मित व मानवनिर्मित अशीं

दोनहि प्रकारचीं आहेत व दोनहि प्रकारच्या संकटांस ती अत्यंत धीराने तोंड देते. स्त्रीजीवनाचे दृष्टीनें ह्या कादंबरींत सापत्न संबंधाच्या योगाने होणारे हाल हरिभाऊंना वर्णन करावयाचे होते असें दिसतें. राधाबाईवर एवढी संकटपरंपरा येण्याचें कारण तिला सावत्र मुलगा व सून हीं दोघें असतात. तिच्या चांगुलपणाचा फायदा घेऊन दोघेहि तिला लाजिरवाणें जीवन जगावयास लावतात. एकत्र कुटुंबपद्धतीशीं व बालविवाहाशीं निगडित असलेला सापत्न-भावाचा हा प्रश्न कादंबरींत कौशल्यानें दाखविण्याचा यत्न लेखकांनी केला आहे. इतर कादंबऱ्यांतून हरिभाऊंनी ह्या प्रश्नाचें दिग्दर्शन केलें आहे. 'मी', 'पण लक्षांत कोण घेतो' इत्यादि कादंबऱ्यांत ह्या प्रश्नाला ओझरती वाचा फुटली आहे. परंतु इतर कोणत्याहि मोठ्या सामाजिक प्रश्नांचे अभावी ह्याच प्रश्नाला महत्त्व प्राप्त झालें आहे. सापत्न संबंधांत दुसरी पत्नी व तिचीं मुलें ह्यांचे फार हाल होतात असें त्यांना दाखवावयाचें आहे असें दिसतें. ह्या एका प्रश्नाशिवाय वैधव्यावस्थेंत भोगावयास लावणाऱ्या यातनांचें चित्रण आलें आहे. त्या दोन गोष्टींशिवाय स्त्रीजीवन-विषयक अन्य समस्येचा उल्लेख ह्या कादंबरींत नाही.

ह्या सर्व कादंबऱ्यांपेक्षा 'मी' आणि 'पण लक्षांत कोण घेतो' ह्या दोन कादंबऱ्या स्त्रीजीवनाचे दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. किंबहुना ह्या दोन कादंबऱ्या लिहिल्या नसत्या तर हरिभाऊंना स्त्रियांचे कैवारी कादंबरीकार म्हणून उल्लेखितां आलें असतें की नाही ह्याचीहि शंका वाटते. आपली स्त्रीजीवन-विषयक भूमिका ह्या कादंबऱ्यांतून हरिभाऊंनी अतिशय सहानुभूतीने व कौशल्यानें व्यक्त केली आहे, तसेंच ह्या कादंबऱ्या लिहीत असतांना त्यांच्या मनांत स्त्रियांच्याविषयीं अथांग सहानुभूति असावी असें वाटते. आणि स्त्रियांचा प्रश्न हाच खरा सामाजिक प्रश्न असेंहि वाटत असावें. 'गणपतराव' ह्या कादंबरींतल्या नायकाने मिल् साहेबांना साक्ष ठेवून घेतलेली शपथ ताजी होती, त्या शपथेनुसार कांहीतरी दिग्दर्शन करणें हें त्यांना आवश्यक वाटलें असावें. १८९५ त झालेल्या आगरकरांच्या मृत्यूची आठवण ताजी असावी. आगरकरांनी एवढे मोठे विचार मांडले त्याच्या अनुषंगाने त्या दिशेनें आपण

कांहीं करावें अशी उर्मीहि प्रबळ असणें शक्य आहे आणि ह्या सर्व परिस्थितीचा परिपाक त्यांच्या ह्या दोन प्रमुख कादंबऱ्यांत उतरलेला आपणांस पाहावयास सापडतो.

'मी' ह्या कादंबरीच्या आधाराने हरिभाऊंनी तत्कालीन अनेक स्त्रीजीवनविषयक प्रश्न हाताळले आहेत. या सर्वांत एक वेगळेंपण आहे. या कादंबरीचें तत्कालीन स्त्रीजीवनाचें एक करुणाजनक अंग म्हणजे वैधव्य, त्या वैधव्यावस्थेत पिचत जीवन कंठणाऱ्या स्त्रीचें जीवन ह्या कथेंत पाहावयास मिळत नाहीं. कदाचित असेंहि असेल की 'पण लक्षांत...' सारखी त्याच प्रश्नाला वाहिलेली कथा नुकतीच त्यांनीं हातावेगळी केली होती. तेव्हां त्या दृष्टीने त्या प्रश्नाचें आवश्यक तितकें भडक व परिणामकारक दिग्दर्शन झालेलें होतें. तथापि भावानंदाची (भाऊची) बहिण ताई हिच्या द्वारें वैधव्यावस्थेंतील एक निराळाच आदर्श हरिभाऊंनी ठेविलेला आहे. तिकडे लक्ष दिलें तर ह्या प्रश्नाकडे त्यांचें दुर्लक्ष झालें नाहीं, उलट त्यांनी ह्या प्रश्नाकडे विधायकतेने पाहिलें आहे, असेंच म्हणावें लागेल. एकंदरींत ह्या कादंबरीचें वैशिष्ट्य म्हणजे स्त्रीजीवनाचें विघातक विदीर्ण जीवन न दर्शवितां विधायक दर्शन घडविणें हें होय.

सामाजिक दृष्टीनें कादंबरींत आलेला पहिला प्रश्न म्हणजे स्त्रीशिक्षणाचा होय. शिवरामपंत हे आदर्श सुधारक दाखविले आहेत, व त्यांचें सुधारकपण कशांत प्रामुख्यानें व्यक्त होत असेल तर आपल्या स्वतःच्या मुलीला शिक्षण देण्यांत व तिला विवाहाशिवाय ठेवण्यांत. तत्कालीन समाजाचे दृष्टीने ह्या दोन मोठ्याच उड्या होत. सुंदरीच्या नादानेच ताईला पण शिकण्याची गोडी लागते. त्याप्रमाणें ती शिकते, शिक्षणामुळें तिच्या ठायीं स्वतःच्या नवऱ्यापासून वेगळें राहाण्याचें धैर्य येतें. व नवऱ्याच्या मृत्यूनंतरहि तिला एक नवा मार्ग उपलब्ध होतो. तिचें जीवन अधिक समाजोपयोगी, तेजस्वी होतें. शिवरामपंतांच्या घरांत शिक्षणाच्या सुपरिणामानेच अत्यंत सोज्वल व उदात्त वातावरण निर्माण होतें. भावानंदासारख्याला त्यांच्या-

पासून समाजसेवेची स्फूर्ति मिळते. ताईचा नवरा व रावबा ह्यांच्या स्वभावांत बरेंच साम्य आहे. विशेषतः पत्नीला त्रास देण्याच्या बाबतींत दोघेजण खरे सासरे जावई आहेत. पण शिक्षणाच्या संस्कारांनीं ताईचें मन अधिक व्यापक झालें आहे. उलटपक्षी ताईची आई संतापून चिडून आपलें जीवन व आपल्या मुलांचें जीवन दुःखी करण्याविना कांहीं करूं शकत नाही. स्वभावाने ती बाणेदार असते. पण शिक्षणाच्या अभावीं तिचें जीवन वाया जातें असें हरिभाऊंनी दाखविलें आहे.

स्त्रीजीवनविषयक दुसरा प्रश्न ह्या कादंबरींत कोणता असेल तर तो म्हणजे बालविवाहाचा. ताईचें लग्न बालविवाहाच्या पद्धतिनुसार लवकर होतें. त्यायोगें तिचें जीवन अधिकच दुःखी झालेलें आहे. बालविवाहाच्या परिणामांत पुरुष बाहेरख्याली होतात असा एक परिणाम सामान्यतः दर्शविला जातो. त्यानुसार ताईचा नवरा हरिभाऊंनी दाखविला आहे. शिवरामपंतांची मुलगी सुंदरी हिचा विवाह ते लहानपणीं करीत नाहीत, व पुढे त्याबाबत भाऊने नकार देतांच तिला अविवाहित राहण्याची परवानगी देतात. त्या अवस्थेंत तिला कमी त्रास होतो. बालविवाहाची अपरिहार्य बाजू म्हणजे विषम विवाह होय. या कादंबरींत ह्या प्रश्नाचें दिग्दर्शन म्हणजे ताईचें जीवन होय. ताईला आईने अट्टाहासाने बिजवरांला दिलेली असते. सहाजिकपणें विषम विवाहाचे सारे दुष्परिणाम तिला सहन करावे लागतात. वास्तविक तिलाहि हें लग्न पसंत नसतें-पण तिचें कांहीं चालणें शक्य नसतें. ती म्हणते 'बाबारे आम्ही मुली म्हणजे घरांत बांधलेलीं मुकीं जनावरें' ह्या अत्यंत अर्थपूर्ण व हृदयभेदक शब्दांनी ती आपलें मनोगत व्यक्त करते. स्त्रियांची-मुलींची-स्थिति किती असहाय व केविलवाणी होती हें या एका वाक्याच्या द्वारें चांगलेंच सूचित होतें.

स्त्रीजीवनविषयक विविध समस्यांचें उत्तर म्हणून ह्याच कादंबरींत हरिभाऊंनी सर्वांगीण समाजसुधारणा करणाऱ्या एका अभिनव संस्थेची प्रस्थापना केलेली आहे. त्यांच प्रमाणे अविवाहित राहून किंवा वैधव्यावस्थेंत

समाजसेवेचा उज्ज्वल मार्ग दर्शवून मानवी जीवनांत त्यायोगें कसें उदात्तपण प्राप्त होतें तेंहि दिग्दर्शित केलें आहे. प्रामुख्याने राजकीय (सर्वांगीण) सुधारणा पुरस्कारणाऱ्या ह्या कादंबरींत आलेलें हें स्त्रीजीवनाचें विवेचन त्या प्रश्नाच्या अनुषंगाने होत असलें तरी तें वैशिष्ट्यपूर्ण आहे.

या कादंबरींत आलेल्या प्रमुख स्त्रीपात्रांत ताई, सुंदरी, भाऊची आई, सुंदरीची आई इ. होत. ह्या सर्वच स्त्रिया आपापल्या परीने वैशिष्ट्यपूर्ण होत. भाऊची आई व सुंदरीची आई ह्या दोन वडिलधाऱ्या पिढींतल्या आहेत. त्या पिढींतल्या सर्वसामान्य स्त्रीचें जीवन भाऊच्या आईच्या द्वारां हरिभाऊंनी रंगविलें आहे. उलट पक्षी शिवरामपंतांच्या पत्नीच्या जीवनाद्वारें तें कसें सुंदर होईल हें दिग्दर्शित केलें आहे. भाऊची आई करारी आहे, तेजस्वी आहे, "मी सांगतें कीं दहा रुपये, पांच रुपये मिळवून आणा, मी लोकांच्या इथे काबाड कष्ट करीन, काय पहिजे तें करीन, पण ऐटीने संसार करून दाखवीन...बोवा व्हायला जाता ना, जा, मी बायकोमाणूस आहे असं नका समजूं, मी कोणाला कुठे भ्यायची नाही." असें नवऱ्याला बजावण्याचें धैर्य तिच्याजवळ आहे. कर्तृत्वहि आहे. पण नवऱ्याच्या कर्तृत्वशून्यतेमुळें तिच्या वाट्यास कसलें जीवन आलें आहे! इंग्रजी अंमलानंतर आलेली नवी परिस्थिति. तींत पुरुषांना मिळवून आणून उदरनिर्वाह करण्याची आवश्यकता निर्माण झाली होती. कालास अभिप्रेत असलेलें हें कार्य पुरुषांनी टाकल्याने कर्तृत्ववान् स्त्रीच्या जीवनाचें कसें मातेरें झालें हें फार भेदक रीतीने वर्णिलें आहे.

तरूण पिढीच्या प्रतिनिधी म्हणून ताई, सुंदरी, यांचीं चित्रें ह्या कादंबरींत आलीं आहेत. ताई अधिक कर्तृत्वशाली आहे, नवऱ्याच्या जाचाला त्रासून वेगळें राहण्याची धमक तिच्यांत आहे. सुंदरीला तिच्या वडिलांच्या भाषेंत लतेप्रमाणे आधाराची जरूरी आहे. तथापि अशा स्त्रीचेंहि एकाकी जीवन हें तत्कालीन समाजाभिप्रेत सहजीवनापेक्षां अधिक चांगलें आहे असें लेखकाला दर्शवावयाचें आहे. तत्कालीन स्त्रीजीवनावर किती ही विदारक

टीका ! अशा प्रकारें 'मी' ह्या प्रख्यात कादंबरींतील स्त्रीजीवनविषयक प्रश्नाचें व व्यक्तिरेखांचें स्वरूप दृगोच्चर होतें.

हरिभाऊंच्या सर्व कादंबऱ्यांत स्त्रीजीवनाच्या आविष्काराचे दृष्टीने सर्वश्रेष्ठ अशी कोणती कादंबरी असेल तर ती म्हणजे 'पण लक्षांत कोण घेतो' ही होय. ह्या कादंबरींत स्त्रीजीवनाचें जितकें, व्यापक व सर्वस्पर्शी आविष्करण होतें तितकें त्यांच्या इतर कोणत्याहि कादंबरींत होत नाही. मराठींत ह्या कादंबरीचें स्थान केवळ अढळ आहे.

हरिभाऊंची खरी स्त्रीजीवनविषयक कादंबरी म्हणजे 'पण लक्षांत कोण घेतो' हीच होय. स्त्रीजीवनाच्या विविध अंगोपांगांचें, विविध अवस्थांचें, विविध मनोवृत्तींचें, विविध प्रश्नांचें जें दिग्दर्शन होतें तें केवळ अपूर्व आहे. १०।१२ स्त्रियांचे स्वभाव ह्या कादंबरींत हरिभाऊंनीं रंगविले आहेत. पतिप्रेम, पत्नीप्रेम, मातृवात्सल्य, मातृप्रेम, असूया, द्वेष, इ. विविध विशेषांनीं भरलेलीं ह्या कादंबरींतलीं विविध पात्रें व त्यांच्या विविध कृती पाहूं लागलों की एक नवी सृष्टीच पाहातों असें वाटूं लागतें. कादंबरीची नायिका स्वतःचें आत्मकथन करते ह्या भूमिकेमुळें स्त्रीजीवनाला उठाव मिळावा हें साहजिक आहे. तसेंच पुरुषपात्रांचे स्वभाव हे त्या मानाने ह्या कादंबरींत इतर कादंबऱ्यांइतक्या विविधतेनें दर्शविले नाहींत. दादा, रघुनाथराव, शंकरमामंजी, यमूचे वडील हीं चार पांचच पुरुषपात्रें महत्त्वाचीं आहेत. म्हणजे इतर कादंबऱ्यांत पुरुषपात्रें व त्यांच्या विविध हालचाली ह्यांना महत्त्व असतें तर ह्या कादंबरींत तें स्त्रियांच्या जीवनाला आलेलें आहे.

ह्या कादंबरीचा आणखी एक विशेष म्हणजे लेखकाचें स्त्रीजीवितविषयक तत्त्वज्ञान ह्या कादंबरीत जितक्या स्पष्टतेनें प्रतीत होतें तितकें इतर कृतीत होत नाहीं. स्त्रीजीवनाविषयीची सहानुभूति अगदीं शिगेस पोचली आहे. व (स्त्री जीवनाचें) दैन्य व कारुण्य पाहून लेखकांचें अंतःकरण अगदीं हेलावून गेलें आहे. किती तरी वाक्यें अशीं आलेलीं आहेत. उ० (१) "मुख आणि बायका यांची कधीं भेट होणार नाहीं." (पृ. २८) (२)

"बायका म्हणजे घरांतल्या काम करणाऱ्या मोलकरणी, आणि बाहेर आपली संपत्ति दाखविणाऱ्या चालत्या बोलत्या तावदानी पेट्या."

(३) "सर्व प्राण्यांत अत्यंत सहनशील कोणी असूं तर त्या आम्ही स्त्रिया."

(४) "आम्हां मुलींचीं लग्नें झालीं की, मग आपल्या बहिणीची माठ घेऊं म्हटलें तर अशक्य." "एक नवरा धड नसला म्हणजे सगळें व्यर्थ असें आम्हीं म्हणत असतो तें यत्किंचित् तरी खोटें आहे कां?" "हे नवरे कसले मेले! जन्माचे दावेदार," (पृ. १९९) "लहानपणापासून पुढे लग्न वगैरे होऊन संसार करायला लागून मरेपर्यंत आम्हां बायकांची स्थिति किती विलक्षण, किती परस्वाधीन, किती दुःखकष्टमय असते!" (पृ.१८९) "बायकांचा जन्म लहानपणीं बापाच्या, तरुणपणीं नवऱ्याच्या व वृद्धपणीं मुलांच्या सुखाकरतां, आपला जन्म आपल्या सुखाकरतां नव्हे." (पृ. २८) इत्यादि वाक्यांतून जणूं लेखक आपले स्त्रीजीवनविषयक तत्त्वज्ञान स्पष्टपणें सांगत आहे असें वाटतें. इतक्या स्पष्टपणाने आपले विचार हरिभाऊंनीं अन्यत्र आपल्या कादंबरीत व्यक्त केलेले दिसत नाहींत; व ह्याहि कादंबरीत जरी ते आलेले आहेत, तरी कथनाच्या ओघांत लेखक स्वतः एका शब्दानें बोलत नाहीं. त्यायोगें हीं विधानें अधिकच बोचक झालीं आहेत. याशिवाय "कोणाचा होऊं नये चाकर व कोणाची होऊं नये बायको," "साप म्हणूं नये बापडा व नवरा म्हणूं नये आपला," "पावसानें झोडलं न् नवऱ्यानं मारलं तर जायचं कुणीकडे?" इ. म्हणीहि अत्यंत सहजरीत्या प्रसंगोपात् लेखकाच्या लेखणींतून उतरल्या आहेत. हे सारे उल्लेख करीत असतांना लेखकाला ह्या गोष्टींमागील वस्तुस्थितिमागे लक्ष वेधायचें आहे असें प्रत्ययास येतें. साहजिकच हे सारे उल्लेख अत्यंत मनोवेधक झालेले आहेत.

स्त्रीजीवनविषयक प्रश्नांचे दृष्टीनेहि या कादंबरीचें स्थान मराठी वाङ्मयांत केवळ अपूर्व आहे. केशवपनाचा हृदयभेदक प्रसंग शेवटीं घालून

सर्व करूण प्रसंगांवर कळस चढविला आहे. तो प्रसंग शेवटीं घातलेला पाहून कित्येकांची अशी समजूत झालेली दिसते की ही कादंबरी विधवाकेशवपन चाल किती घृणास्पद आहे हें दर्शविण्यासाठींच लिहिली आहे.[१५] पण स्त्रीजीवनविषयक अनेक प्रसंगांपैकी तो केवळ एक प्रसंग आहे, असें आढळून येईल. कादंबरीचें एकमेव उद्दिष्ट तें नव्हे. त्यानंतरचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे वैधव्यावस्थेंतील जीवन. ह्या प्रश्नाची हरिभाऊंनी येथें अगदी वेगळ्याच दृष्टिकोणांतून मांडणी केली आहे. त्यामुळें हा प्रश्न कथेंत अनुस्यूत झाला आहे हें लक्षांतहि येत नाहीं. नायिका वैधव्य प्राप्त झाल्यावर आसन्नमरणावस्थेंत असतांना आपलें चरित्र लिहीत आहे ही भूमिकाच किती करुणास्पद आहे !

ह्या शिवाय बालविवाह व विषमविवाह हे प्रश्नहि आले आहेत. यमू व दुर्गी यांचे बालपणींच विवाह होतात, दोघींना सुख लागत नाहीं. दुर्गीला प्रत्यक्ष नवऱ्याकडून अनन्वित छळ सोसावा लागतो, तर यमूला इतरांकडून विषमविवाहाच्या दृष्टीनें. शंकरमामंजींचें लग्न, यमूच्या वडिलांचें लग्न हे प्रसंग ध्यानांत धरण्यासारखे आहेत. ह्या दोनहि स्त्रिया आपल्या सासरीं येतात, तेथल्या परिस्थितींत अनुकूल बदल न घडवून आणतां केवळ प्रतिकूल आणतात. ह्याला कारण हरिभाऊंचें विशिष्ट मत हें आहे. विषमविवाहाचे दुष्परिणाम त्यांना भडकपणाने मांडावयाचे आहेत असें स्पष्ट दिसतें. विषमविवाहानंतर स्त्रीशिक्षणाचा प्रश्न आहे. बहुतेक साऱ्या स्त्रिया अशिक्षित आहेत. त्यांचीं मतेंहि तशीच आहेत. यमुना नवऱ्याजवळ शिकते, त्याचें फल म्हणजेच हें आत्मचरित्र होय. या कादंबरींत आणखी एक महत्त्वाचा प्रश्न आहे, व तो म्हणजे परित्यक्त स्त्रियांचा. बनूबन्सं ह्या परित्यक्त आहेत. आणि स्वतःचा संसार करण्याची संधि मिळाली नसल्याने त्यांच्या मनांत दुष्टपणाचा प्रादुर्भाव झालेला आहे. त्याचा परिणाम असा की त्यांचें स्वतःचें जीवन तर खडतर होतेंच. पण इतरांच्याहि जीवनांत त्या निष्कारण अडचणी

१५ पानसे; आपटे चरित्र.

संकटें प्राप्त करून घेतात. अशा प्रकारें ह्या कादंबरींत तत्कालीन स्त्रीजीवनाचे जवळ जवळ सर्व प्रश्न ह्या ना त्या स्वरूपांत आले आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.

ह्या संदर्भात आणखी एका मोठ्या सामाजिक प्रश्नाचा उल्लेख करावा लागेल व तो प्रश्न म्हणजे एकत्र कुटुंबपद्धतीचा. हिंदुसमाजाचें एक लक्षण म्हणजे अविभक्त कुटुंब. हें अविभक्त कुटुंब आजच नव्हे तर हरिभाऊंच्या काळींहि 'काल पक्व' झालेलें होते. तें टिकवून धरण्याने कोणताच फायदा होणार नव्हता, उलट माणसांच्या मनोरचनेप्रमाणें हें कुटुंब म्हणजे दुःख अडचणी, वैमनस्य, हेवेदावे ह्यांचे माहेरघर असें बनलें होतें. तसेंच तें हरिभाऊंनीं येथें दर्शविलें आहे. एका ठिकाणीं ह्या कादंबरींत याबाबत थोडें मतदिग्दर्शनहि आलें आहे. लेखकाचें मत म्हणून तें तसें घ्यावयास हरकत नाहीं. "एके ठिकाणीं सगळ्यांनीं डोकें खुपसून राहावयाचें ह्यांत फार नुकसान आहे. नवरा बायकोची प्रीति जितकी वाढत जावी तितकी वाढत नाहीं...इतकेंच नव्हे तर कित्येक बायका आपली दुखणीं सर्वांपासून चोरून ठेवतात...ह्या मर्यादेच्या फाजील थोतांडापासून किती नुकसान होतें आहे, बायकांच्या प्राणाची हानी किती होते आहे, हें तर लक्षांत घेतलें पाहिजे ना ! पण लक्षांत कोण घेतो !" यानंतर ह्याच संबंधांत नायिकेच्या तोंडून लेखकानें आर्थिक उसन्नाच्या बाबतींत व्यक्ती व्यक्तींत फरक पडल्यानें एकत्र कुटुंबव्यवस्थेंत घरांत कशी दुही, वैमनस्य, द्वेष, वाढत जातो ह्याचें फार सुरेख वर्णन केलें आहे. (पृष्ठ १९९) त्यावरून असें स्पष्ट होतें की, हरिभाऊंना ह्या कादंबरींत प्रामुख्यानें एकत्र कुटुंबपद्धतींत व्यक्तीचा--विशेषतः स्त्रीचा--होणारा कोंडमारा किती भयंकर व विदारक असतो. स्त्रीजीवनाच्या अनुषंगानें एका सामाजिक समस्येचें केलेलें हें विवेचन निश्चितपणें लेखकाच्या मतांवर प्रकाश पाडण्याइतकें स्पष्ट आहे. विभक्त कुटुंबपद्धतींत जीवन कसें सुखदायी प्रगत असतें तें मुंबईतल्या जीवनाच्या आधाराने त्यांनीं व्यक्त केलें आहे. तेथलें विष्णु व लक्ष्मी ह्यांचें जोडपें त्यांचें नवें--त्या परिस्थितींतील--आदर्श जीवन

पाहून नायिकेच्या ठायीं निराळें व्यक्तित्व जागृत होतें. पण तिच्या नशिबीं दुःख असतें. तिला पुन्हा अविभक्त कुटुंबपद्धतीच्या रौरवांत येऊन कुजक्या, कटु जीवनाचा अनुभव घ्यावा लागतो. त्यांतच तिची जीवनसमाप्ति होते!!

स्त्रीजीवनविषयक प्रश्नांकडून ह्या कादंबरींतील स्त्रीपात्रसृष्टीकडे पाहिलें तरी हरिभाऊंच्या मनांत ही कादंबरी प्रामुख्यानें स्त्रीजीवनावर लिहावयाची होती असें ध्यानांत आल्याविना राहात नाहीं. यमुना, तिची आई, 'वहिनी', तिची मैत्रीण दुर्गी, सावत्र आई माईसाहेब, तिची मुंबईची मैत्रीण लक्ष्मीबाई हीं नायिकेच्या माहेरशी संबंध असलेलीं स्त्रीपात्रें, सासरकडील मंडळींत राधासासूबाई, उमासासूबाई, सासूबाई, बनूबन्सं ह्या प्रमुख होत. ह्या सर्व पात्रांचे स्वभाव अगदी वैशिष्ट्यपूर्ण होत. विशेष म्हणजे प्रत्येक पात्राच्या अनुरोधाने कोणत्या तरी स्त्रीजीवनविषयक प्रश्नाचें दिग्दर्शन केलें आहे. तरुण मुलींपैकीं यमुनेची मैत्रिण दुर्गी हिचें पात्र कारुण्य भावना जागृत करतें. दुर्गीला अत्यंत दुष्ट नवरा मिळाला असतो. बिचारीचे जन्मभर हाल होतात. त्या हालांना मर्यादा नसते, विशेष म्हणजे ते हाल 'सौभाग्यावस्थें'-तले आहेत. तिच्या मनांत जे विलक्षण विचार येतात, त्यांच्या पोटीं, ती आत्मत्यागाचा विचार करतेच, पण पतीच्या मृत्यूचीहि इच्छा व्यक्त करते. 'पति' हें दैवत असणाऱ्या हिंदू स्त्रीच्या तोंडून असे विचार ऐकावयास मिळावेत म्हणून नायिकाहि प्रथम थक्क होते. पण नंतर तिच्या परिस्थितीकडे पाहून असे विचार क्षम्य आहेत अशी तिची खात्री होते. मृत्यूचे विचार करणारीं दुर्गी अपत्य प्राप्तिनंतर नवीं नवीं आशादायक चित्रें उभी करते, ही सारी कलाटणी हरिभाऊंनी फारच हळुवारपणें दिली आहे. दुष्ट नवरा मिळाला असतां तत्कालीन स्त्रीचें जीवन कसें होत असे याची कल्पना दुर्गीवरून येते. दुर्गी, अत्यंत साल्स, कष्टाळू, आहे तिच्याविषयीं सहानुभूति वाटते.

दुर्गीसारखें जीवन कितीतरी स्त्रियांच्या वाट्याला येत होतें. अशा जीवनाचीं चित्रें हरीभाऊंच्या कादंबऱ्यांत अनेक आहेत. भावानंदांची आई,

(मी) पद्मा (मायेचा बाजार), गोदावरी (गणपतराव) इ. या प्रकारचीं उदाहरणें होत. ह्याच कादंबरींत अशा प्रकारचें जीवन कंठणारीं पात्रें म्हणजे, यमुनेची आई, उमासासूबाई, हीं होत. यमुनेच्या आईला नवऱ्याकडून सहानुभूतीची वर्तणूक मिळत नाहीं. तीच स्थिति उमासासूबाईची. या स्त्रियांचें जीवन त्यांना जर सामान्य प्रतीचा आणि सहानुभूतीने वागविणारा पति मिळाला असता तर सुखकर झालें असतें. बहुसंख्य स्त्रियांच्या वाट्याला हें असलें जीवन आलेलें असे. त्याचीं कारणें कोणतींहि असोत एकत्र कुटुंबपद्धतीच्या योगाने हे हाल अधिक वाढत असत असें जें हरिभाऊंनी दाखविलें आहे तें बरेंच वस्तुस्थितिनिदर्शक आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. समाजाच्या पिढ्यान्‌पिढ्या असें जीवन कंठित आल्या आहेत, असें या कादंबरींत दाखविलें आहे. यमूच्या आजीची सुद्धा तीच स्थिति होती. पण थोडा फरक झाला असेल एवढेंच. एकदां यमूच्या आजीची व आजोबाची कांहीं एका कौटुंबिक बाबतींत बोलाचाली झाली. त्या प्रसंगीं त्या वृद्ध गृहस्थाने आपल्या समवयीन पत्नीच्या श्रीमुखांत भडकाविली. यमुना म्हणते, 'अहो, बरोबरीची बायको ! तिचीं नातवंडें तिथें जवळ उभीं !—अन् त्या साठपासष्ट वर्षांच्या म्हाताऱ्याने सत्तावन अठ्ठावन वर्षांच्या आपल्या बायकोच्या फाडकन् तोंडांत मारली ! याचा अर्थ तरी काय ?...' (पृ. ४५) ह्याचा अर्थ एवढाच की महाराष्ट्रीय स्त्रिया असलें जीवन पिढ्यान् पिढ्या जगत आल्या होत्या. व ह्या साऱ्या गोष्टी रोजच्याच परिचयाच्या झाल्याने कोणालाच कांहीं त्याचें वाटेनासें झालें होतें[१७].

ह्या प्रश्नाची आणखी एक बाजूहि मांडली आहे. माईसाहेब एकनिराळ्याच प्रश्नाचें दिग्दर्शक पात्र आहे. या असल्या दुसरेपणावर वा तिसरेपणावर दिलेल्या मुली त्यांच्या हातांत एकदम सत्ता आल्याने शेफारून जात. सहाजिक आहे. त्यांना सत्तेचीं माणसें हाताखालीं मिळत. माणसाचें मोठेंपण कळण्याची अक्कल मात्र आलेली नसे. दुसऱ्या उमासासूबाईचीहि हीच परिस्थिति होती. पण त्या गोष्टीचें आविष्करण करण्यास अधिक

अवसर या कादंबरींत नव्हता. दादा (गणपतराव) व यमुना या दोन प्रमुख पात्रांना ह्या सापत्नभावाचा त्रास सोसावा लागतो. तो एकंदरीने तत्कालीन समाजजीवनाचा प्रतीकात्मक आहे असें दिसतें. दुसऱ्या बायकोशीं पुरुष जितक्या सौम्यपणाने वागतात किंवहुना तिच्या मुठींत असतात तितक्या कठोरतेने सर्वजण जरी नाही तरी बरेच जण पाहिल्या बायकोशीं वागतात असा साधारणतः पुष्कळांचा अनुभव आहे. (पृ. १८२) हें विधान विवाद्य असेल असें वाटत नाहीं. अशाप्रकारें अनेक स्त्रीविषयक प्रश्नांपैकी तत्कालीन समाजप्रश्नांपैकी हा प्रश्न ह्या कादंबरींत मांडला आहे.

बनूवन्संच्या रूपाने हरीभाऊंनी परित्यक्त स्त्रियांच्या प्रश्नाला वाचा फोडली आहे. ह्या प्रश्नाच्या दृष्टीने बनूवन्संचं स्वभावचित्रण जसं हवं होतं तसं आलेलं नाही हें खरं. कारण एकंदरीने त्यांचा स्वभाव आळ्यताखोर अहंमन्य दिसतो. पण टाकून देण्याचें खरें कारण त्यांचें कुरूपपण असावें असें दिसतें. अर्थात् सर्वच बाजूंनीं परिस्थिति अशी असल्याने त्यांचा स्वभावहि तसा झालेला आहे.

१७ उमासामूबाईना शंकरमामंजींनीहि मुलांच्या देखत मारलेलें असतें व एवढ्या थोरल्या त्या पोक्त, त्यांना लहान लहान कारट्यांच्या देखत खरोखरी आणून आईच्या पाया पडावयास लावलें.' यमुना पुढे लिहिते, "माझ्या अंगावर नुसता काटा उभा राहिला आहे. आणखी काय हा बायकांचा जन्म असें वाटून क्षणभर मी लेखणी दूर ठेवून स्वस्थ बसलें आहे' पृ. १९६ ती पहिल्या पासून-दुष्ट, वाईट मनाची आहेच, पण आता अधिक झाली असेल. काय करील बिचारी ? तिला कांही सुख आहे का ? ...' मलाहि सर्वथा तें म्हणणें पटलें, कारण तिला बिचारीला नवऱ्याने टाकल्यासारखेंच होतें, बरें पुस्तकें वगैरे वाचून आपलें मन रिझवील, तर तें साधन नाहीं, आणखी लहानपणापासून तसा मोकाच नसल्यामुळें तशी कधी इच्छाहि नाहीं' (पृ. १९७) अशा प्रकारें बनूवन्संच्या दुष्ट स्वभावाबद्दलचं स्पष्टीकरण देतांना पाठीमागची पार्श्वभूमि व्यक्त केली आहे.

अशा प्रकारें या कादंबरींतील पात्रांद्वारें हरिभाऊंनी किती विविध प्रकारचे स्त्रीजीवनविषयक प्रश्न मांडले व एकंदर परिस्थितीच्या आधारें माणसांचे स्वभाव कसे बनले आहेत हें दिग्दर्शित केलें आहे. यमुना हें या कादंबरींतलें मध्यवर्ति पात्र. तिच्या द्वारें हरिभाऊंनी स्त्रीजीवनाचा वास्तव व आदर्श हीं दोन्हीहि अभिव्यक्त केलीं आहेत. तिच्या पूर्वायुष्यांत म्हणजे जवळ जवळ मुंबईला जाऊन स्वतंत्र बिऱ्हाड करावयाच्या कालापर्यंत जे जे प्रसंग घडतात ते ते वास्तवाचें आविष्करण म्हणून रंगविलेले आहेत. आतांपर्यंत जीं विविध पात्रें त्यांच्या द्वारें समाज जीवनाचें जें चित्रण अभिव्यक्त होतें तें ह्या कालांतलें होय. यमूला पति फार समंजस प्रेमळ लाभला आहे-होता. त्याच्या सहवासांत तिचें सर्व जीवन अगदीं वेगळ्या प्रकारचें झालें असतें. मुंबईला आल्यानंतर तिच्या जीवनाला एक नवीन कलाटणी मिळाली होती. विष्णुपंत व लक्ष्मीबाई यांचा आदर्श तिच्यापुढें होता. ती तत्कालीन पद्धतीप्रमाणे विविध सांस्कृतिक प्रसंगांत भाग घ्यावयालाहि लागली होती. यमुनेच्या जीवनांत ही क्रांति होत होती ही सर्वस्वी अपूर्व होती, व केवळ अपवादभूत होती. या जीवनादर्शाच्या आधाराने हरिभाऊंनी आपली आदर्श जीवनाबाबतची कल्पना समाजापुढें मांडली आहे. यमुनेवर सर्व संस्कार पूर्वरूढ समाजसंकेतांनुसार होतात. लग्नापूर्वीचें पहाणें, प्रत्यक्ष लग्न, लग्नानंतरचें विधि इ. इ. सर्व ठराविक पद्धतीनें होतात. त्याद्दष्टीनें ती तत्कालीन समाजाची पूर्णपणें प्रातिनिधि आहे. परंतु पतीच्या सहवासांत तिला एक नवीच आशा दिसते, नवा प्रकाश दिसतो. एक क्षण तिचें जीवन प्रकाशमान होतें. एक दोन क्षणच-अल्पकाळ-पण दुर्दैवाने तो प्रकाश चटकन् नाश पावतो. पुन्हा तिच्या जीवनांत अंधार पसरतो. पुन्हा सर्वसामान्य महाराष्ट्रीय स्त्रीप्रमाणें तिचें जीवन, परावलंबी, रूढ चाकोरींतलें लाजीरवाणें व्हावयास लागतें. शेवटच्या प्रसंगाने ह्या सर्वांवर कळस होतो ! पुन्हा ती सर्वसाधारण स्त्रीजातीची प्रतिनिधि होते. तथापि सुशिक्षणाचा, सुसहवासाचा, प्रकाश तिला अल्पकाळ मिळालेला असतो, तो वाया जातो काय ? त्याचा परिणाम

काय होतो तिच्या जीवनावर ? तिला एक नवी दृष्टि प्राप्त होते. महाराष्ट्रीय स्त्री कसल्याप्रकारचें लाजीरवाणें जीवन कंठित आहे हें त्या प्रकाशांत तिला दिसतें. त्या प्रकाशांत तो ओंगळवाणा जीवन प्रवाह पाहून तिचें मन हतबुद्ध होतें. पण एकच क्षण. त्या प्रकाशाचा किरण तिच्या अंतरंगांत खोल गेलेला असतो. त्याच्या आधारावर ती पुन्हा एक छोटासा दिवा लावते, महाराष्टीय स्त्रीला दाखवते-तो दिवा म्हणजे हें आत्मचरित्र नव्हे काय ? हरीभाऊंनी स्त्रीजीवनाचे वास्तव आणि आदर्श ह्यांचें इतकें परिणामकारक चित्रण इतरत्र केलेलें नाहीं. मराठी साहित्यसृष्टींतहि तें आलेलें असेल असें वाटत नाहीं. आपलें लग्न झाल्यानंतर यमुनेने उद्गार काढलेले आहेत ते तत्कालीन स्त्रीजीवनाचें निदर्शक आहेत. ते येथे उधृत करण्याचा मोह आवरत नाहीं.

" मुलगी होणें हें पापाचें फळ असा आमच्यांत समज आहे की नाही असा प्रश्न करून जर कोणी वादाला उठेल तर आज किती लोक "तसं नाही, आमच्यांत मुलीला आणि त्यांतून कन्यादानाला—फार महत्त्व दिलं आहे; कन्यादानासारखं दुसरं पुण्य नाही. " असा वितंडवाद घालीत सुटतील...पण मुलगी जन्मल्या दिवसापासून तों मरेपर्यंत का म्हणाना निरनिराळ्या प्रसंगीं जे सर्वांचे उद्गार निघतात, ते सारे एकत्र वाचले तर मुलगी हें पापाचें फल की पुण्याचें मानलें आहे याचा तेव्हाच निकाल होईल. साधारणतः मी आठ वर्षांची झालें तेव्हापासून 'अहो ह्या पोरी नव्हेत, कट्यारी आहेत' 'नीटपणीं एकदा घरांतून जातील तेव्हा खऱ्या' 'या देण्या आहेत;' 'कर्जदारिणी आहेत' 'जेव्हा एकदा शें-दोनशें चारशें रुपये घरांतून काढतील तेव्हा निघतील.' 'ह्या झारेकरिणी, घर धुवून न्यायच्या ' असे अनेक तऱ्हेचे उद्गार कांही रागाच्या, कांही लोभाच्या वेळीं निघत असतात, त्यांत अर्थ एकच असतो. तो हा की, पोरी पदरीं असणें म्हणजे महत्पाप पदरीं आहे म्हणून समजावें...एकादी दुसरी मुलगी जास्त झाली की तिला 'कारटी' हें शोभिवंत नांव कधीच मिळाल्याखेरीज

राहावयाचें नाही." (पृ. ११४) हे सर्व उद्गार तत्कालीन परिस्थितीचे वाचक नव्हेत असें कोण म्हणेल? दादा आणि वहिनी ह्या दांपत्याच्या चित्रणद्वारें हरिभाऊंनी आपली वास्तव दृष्टि अधिकच सर्वस्पर्शी केली आहे. पति योग्य वा चांगला मिळाला नाही को पत्नीचें जीवन केविलवाणें होतें तद्वत पत्नी योग्य मिळाली नाही तरी पुरुषाचें जीवनांत एक प्रकारचे वैगुण्य राहातें, ही वस्तुस्थिति ह्या जोडण्याचें द्वारें हरीभाऊंनी दर्शविली आहे. वास्तविक दादा हा स्वभावाने सुशील, समंजस, मन उदार असलेला, असा आहे, पण त्याच्या बायकोचें मन कांही शुद्ध नाही. हा जो विरोध आहे तो बऱ्याच वेगळ्या प्रकारच्या मनोवृत्तीचा निदर्शक आहे. माहेरीं जर अत्यंत संस्कारहीन अशा प्रकारची परिस्थिति असेल तर सासरीं नवरा व इतर माणसें कितीहि चांगलीं मिळालीं तरी स्वभावांत बदल होत नाही व असा स्वभाव इतरांचें जीवन मात्र असुखी करण्यास कारणीभूत होतो.

हरिभाऊ आपट्यांची 'पण लक्षांत कोण घेतो' ही स्त्रीजीवन विषयक महत्त्वाची कादंबरी आहे. तिच्यांत स्त्रीजीविताच्या जितक्या विविध अंगोपांगांचा विचार हरिभाऊंनी केला आहे तितका इतरत्र तो केलेला नाही. स्त्रीजीवनाविषयी लेखकाला वाटत असलेली सहानुभूति अगदी शिगेस पोचली होती. त्यामुळें हें असें अतीव उत्कृष्ट असें चित्रण अवतरलें. ह्या पुढील कादंबऱ्यांत हरिभाऊंनी स्त्रीजीवितविषयक विविध प्रश्नांचें दिग्दर्शन केलेलें असलें तरी या कादंबरींत जी व्यापकता आहे ती इतरत्र नाही. ह्याच कारणांनी ह्या कादंबरींतील स्त्रीजीवनाचें परीक्षण अधिक विस्ताराने या ठिकाणीं केलें आहे. विषयाच्या विवेचनाच्या अनुषंगाने तें केवळ आवश्यक आहे असें म्हटलें असतां तें फारसें असयुक्तिक होणार नाही.

हरिभाऊंच्या प्रमुख सामाजिक कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनविषयक प्रश्नांचें व व्यक्तिचित्रांचें स्वरूप पाहिल्यानंतर स्त्रीजीवनाचे-कादंबरी माध्यमांतून आविष्कार करणारे--भाष्यकार म्हणून हरिभाऊंच्या एतद्विषयक यत्नांचें मूल्यमापन करणें आवश्यक आहे.

सामाजिक संघर्षाचे अनुरोधाने स्त्रीशिक्षण, बालविवाह, विषम-विवाह, गृहशिक्षण, पुनर्विवाह, केशवपनादि हीन रूढि हे प्रमुख प्रश्न समाजजीवनांत महत्त्व पावलेले होते. त्यांचें आविष्करण कादंबरीद्वारां हरिभाऊंनी केलेलें आहे. त्या बाबतींत ते इतके यशस्वी झाले आहेत कीं त्यांनी आपल्या उदाहरणाने साहित्य व समाजजीवन ह्यांचा संबंध किती निकटवर्ति असावा ह्या बाबतचा एक आदर्श निर्माण करून ठेविला आहे. इतका समाजाभिमुख ललित लेखक त्या कालात निर्माण व्हावा हें त्या कालाला जसें भूषणावह आहे तसें लेखकालाहि आहे. हरिभाऊंच्या पूर्वी कादंबरी तंत्र, जीवन वा कला ह्या तिन्ही दृष्टींनी केवळ अंतराळांत होती. तिचा व जीवनाचा संबंध निकटवर्ति नव्हता. हरिभाऊंनी तिला अभ्दुतरम्यतेच्या ढगांतून ओढून आणून पृथ्वीवर उभे केलें, व तिच्या ठायीं जीवनाभिमुखता व जीवनसाक्षेपत्व निर्माण केलें. ह्या दृष्टीने हरिभाऊंचें थोरपण केवळ विवादातीत आहे.

हरिभाऊंच्या मनावर चिपळूणकर व आगरकर यांच्या विचारसरणीचे परिणाम कसे झाले आहेत त्याचें दिग्दर्शन यापूर्वी केलेलेंच आहे. त्यांच्या सामाजिक कादंबऱ्या १९०० च्या पूर्वी लिहिलेल्या आहेत. याचा अर्थ असा की नंतर त्यांचें लक्ष सामाजिक प्रश्नांपेक्षा इतर प्रश्नांकडे लागलें. असा त्यांच्या मनोवृत्तीत का फरक व्हावा हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याचें उत्तर त्यांचे चरित्रकार आंबेकर असें देतात.

'या काळांत सुधारणा कांहीशा लोकांच्या अंगवळणीं पडत चालल्या. अर्थात् सामाजिक चळवळीचा तितका जोर कमी झाला...पण साधारणतः असें दिसतें कीं, समाजांतील विद्यमान व पुढील दहावीस वर्षांच्या काळांतील विचारपरिवर्तन त्यांनी आपल्या १९०० च्या पूर्वीच्या कादंबऱ्यांत चित्रित केलें...'[१८] यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की सामाजिक सुधारणेची उर्मी प्रारंभी तितकी तीव्र होती जितकी पुढे राहिली नाहीं. १९०० च्या

१८ आंबेकर कृत आपटे चरित्र.

पुढील दहावीस वर्षांच्या काळांतील स्त्रीजीवन त्यांच्या कादंबऱ्यांत आलें की काय हा प्रश्न आहे. तथापि 'कर्मयोग' कादंबरीतील स्त्रीजीवनविषयक आविष्करणाचा विचार करतांना या बाबत थोडें स्पष्टीकरण याच प्रकरणांत मागे केलें आहे तेंच बरेंच वास्तवदर्शी आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. हरिभाऊंच्या मनावर मालाकार चिपळूणकरांच्या विचारसरणीचा परिणाम अधिक सखोल झाला होता. गोविंदराव कानिटकरांसारख्या मित्रांच्या सानिध्याने आगरकरांच्या व त्यांच्या अनुषंगाने मिल् आदि पाश्चात्य विचारवंतांच्या विचारांकडे त्यांचें लक्ष गेलें. त्या विचार-सरणीचा त्यांना मोह वाटला तरी तो सामान्यतः तात्कालिक होता. पुढच्या-पुढच्या सामाजिक कादंबऱ्यांतून भावानंद यांनीं काढलेल्या आश्रमासारखे आश्रम निघाले पाहिजेत, असा विचार अधिक धिटाईनें मांडला आहे. तिकडे लक्ष देतां सामाजिक सुधारणाविचारांबाबतची त्यांची मर्यादा लक्षांत आल्या-विना राहात नाही. आगरकरांच्या विचारांतील व्यक्तिवादापेक्षा चिपळूण-करांच्या व त्यांच्या अनुयायांतील रामदासीवृत्तीचा पुरस्कार त्यांना अधिक जवळचा वाटला, असें स्पष्टपणें दिसून देतें. 'कर्मयोग' मधील लिली ही नव्या पिढीची प्रतीक अशी दर्शविण्याचा त्यांचा मानस होता. परंतु आहे त्या परिस्थितींत ती भावानंदाच्या बहिणीची--ताईची--शिष्या आहे. याचा अर्थच असा की हरिभाऊ स्त्रीजीवनविषयक विचारांच्या बाबतींत ताईजवळच थांबले. आगरकरांचें वैचारिक सांनिध्य त्यांना पतकरलें नाही. महाराष्ट्राच्या अव्वल दर्जाच्या व स्त्रीकैवारी म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या कादंबरीकाराच्या मनोभावनेचें विश्लेषण करतांना त्याची एकंदर झेप कुठपर्यंत आली होती हें पाहिलें की थोडा धक्का बसतो, हें खरें आहे. पण स्त्रीजीवनविषयक विचा-रांच्या आविष्काराचें परिशीलन करीत असतांना त्यांच्या कादंबऱ्यांतून दिसून येणारें हें दृश्य स्पष्टपणें मांडणें आवश्यक आहे असें वाटतें. हरिभाऊंनी रंगविलेलीं कादंबऱ्यांतील स्त्रीचित्रें महाराष्ट्रीय समाजाला आतापर्यंत मोहिनी घालीत आहेत हें खरें आहे. त्याबाबत मतभेदाचा प्रश्न संभवत नाही. प्रश्न

आहे तो हाच की, स्त्रीजीवनविषयक सहानुभूति जी लेखकाच्या अंतरंगांत उद्भूत झाली तिच्या विकासाचा कोणता टप्पा त्या कादंबऱ्यांतून पाहावयास मिळतो? या प्रश्नाचें उत्तर शोधतांना असें आढळून येतें की, प्रारंभींची सहानुभूति शेवटपर्यंत आहे. पण विचारांचा वा तद्विषयक कल्पनांचा विकास मात्र आढळून येत नाही. हरिभाऊंना आगरकरी विचारांपेक्षा रानड्यांचे विचार अधिक जवळचे वाटले आहेत. व रानड्यांच्या सहिष्णु सुधारणावादाचा परिणाम त्यांच्या मनावर अधिक झालेला आहे. त्याच्या इतकाच खोल संस्कार चिपळूणकरांच्या उज्जीवनवादी विचारांचा झालेला आहे.

ह्या विधानाची प्रतीति आपल्याला त्यांच्या कादंबऱ्यांचें अवलोकन करतांना पदोपदीं दिसून येते. पुनर्विवाहाचा विषय घेऊन त्याचा पुरस्कार त्यांनी कोणत्याहि कादंबरींत केलेला नाही. 'कर्मयोग' मधील गणपराव-सरस्वतीबाई हें दांपत्य पुनर्विवाहित आहे. परंतु त्यांचा पुनर्विवाह कादंबरीकाराने सांगितलें म्हणूनच ग्रहित धरायचा--'भयंकर दिव्य' मधील कमलेलाहि समाजाकडून त्रास होतो. पण त्याहि ठिकाणीं पुरस्कार असा स्पष्टपणाने केलेला नाही. आगरकरांनी विवाहविच्छेदावरहि कडक लेखन केलें आहे. हरिभाऊंनी आपल्या कादंबऱ्यांत प्रसंगोपात् फक्त सूचित केलें आहे की घटस्फोटाची चाल आपल्या समाजांत जर रूढ झाली तर किती चांगलें होईल. प्रत्यक्ष विशिष्ट चित्रणाच्या आधारें तसें कोठे दर्शविलें नाही. विजोड जोडप्यांची किती मोठी मालिका त्यांच्या कादंबऱ्यांतून दिसून येते. तथापि हें सारें चित्रण वस्तुस्थितीचें दिग्दर्शन म्हणूनच त्यांनी केलें आहे, आगरकरांच्या विचारांच्या सांगातीं त्यांनी खरोखर दीर्घकाल प्रवास केला असता, तर असें झालें असतें असें वाटत नाही. असें झालें ह्याचें कारण हेंच की रानड्यांच्या विचारसरणीचें आकर्षण होय. समाजाला कोणत्याहि प्रकारें न दुखवितां हलके हलके त्याच्या विचारांत बदल घडवून आणण्याचा यत्न करायचा ह्या विचारसणीचा परिपाक म्हणजे हरिभाऊंनी रंगविलेलें चित्रण होय. आगरकरांचा व्यक्तिवाद त्यांना थोडा जरी पसंत असता तरी त्यांनी

अधिक भेदक वास्तवता कादंबऱ्यांत आणली असती. इतिहासकालाकडे त्यांचें जें लक्ष लागलें तें थोडेंतरी कमी झालें असतें. सामाजिक व विशेषतः स्त्रीजीवनाच्या आविष्करणाच्या दृष्टीने ही घटना अधिक परिपोषक झाली असती.

स्त्रीजीवनविषयक आदर्शाच्या दृष्टीने पाहिले तरी हेंच लक्षांत येतें. रूढ समाजपरिस्थितींत स्त्रियांवर जे अनन्वित अत्याचार होतात त्यांनाच फक्त त्यांचा विरोध आहे. त्या अत्याचारांमुळें स्त्रियांचें जीवन अत्यंत दुःखमय झालें आहे, असें त्यांनी रंगविलें आहे. पण त्यांत साऱ्या स्त्रिया या प्रामुख्याने मुक्या आहेत. महाराष्ट्रीय स्त्रीच त्यावेळी अशी होती असें एक उत्तर ह्या आक्षेपाला देतां येईल. पण याबाबत येवढेंच म्हणायचें आहे की, तिच्या अंतरंगांत ह्या परिस्थितीची जाणीव निर्माण झाली आहे, तिने ती मैत्रिणीजवळ बोलून दाखविली आहे, असेंहि कुठे झालेलें नाही. म्हणायला एक अपवाद आहे.' पण लक्षांत कोण घेतो ' मध्यें दुर्गा आपल्या पतीचा मृत्यू होईल तर बरे होईल असे विचार यमूजवळ बोलून दाखविते. तिने यमूला ह्या उद्गारांनी अंतर्मुख केलें आहे. अशाच प्रकारचे विचार जर दुःख सोसणाऱ्या आपल्या विविध पात्रांकरवी बोलून दाखविले असते तरी महाराष्ट्रीय स्त्री जागृत झाली आहे असें म्हणतां आलें असतें. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून कोणती गोष्ट व्यक्त होत असेल तर ती ही की, महाराष्ट्रीय स्त्री ही जागृत झालेली नाहीं. महाराष्ट्रीय पुरुष जागृत झालेला आहे. त्याची दीर्घ निद्रा संपली आहे आणि नवजागृत पुरुष आपल्या सहचरीकडे पाहात आहे. त्याला तिचीं दुःखें, तिला भोगाव्या लागणाऱ्या हाल अपेष्टा दिसतात, त्याला पश्चात्ताप होतो, वाईट वाटते. अशा प्रकारचें चित्रण कादंबऱ्यांतून आलेलें आहे. ही केवळ एक जरा वरच्या दर्जाची भूतदयावादी वृत्ति आहे, सहिष्णु वृत्ति आहे. पुरुषाने हें सर्व दैन्य, दास्य लक्षांत घेऊन रूढींच्या अंगभूत असलेली अमानुषता कमी करावी, स्त्रियांना जरा सहानुभूतीने वागवावें, थोडें शिकवावें, शहाणे करावें, इ-इ...

असें का व्हावें ? यांचीं कारणें दोन. एक स्त्रीजीवनविषयक ध्येय आहे तें तसेंच कायम आहे, म्हणजे हरिभाऊंना अद्यापहि पूर्वकालीन स्त्रीरत्नें आदर्श वाटतात. त्या आदर्शाप्रत जाण्यास रूढीचा जो अडथळा होतो तो फक्त दूर करावयाचा आहे. या भूमिकेमुळे घटस्फोटाचा धडाडीने पुरस्कार त्यांना करावासा वाटत नाही. ह्याच कारणाने, स्त्रियांच्या ठायीं चीड निर्माण झालेली आहे असें त्यांना दाखवावेसें वाटत नाही. याच कारणाने त्यांच्या कादंबऱ्यांतील आदर्श संसारांतील पुरुष लोक गप्पा मारतात, स्त्रिया केवळ श्रोत्याची भूमिका करतात. यमूने सभेंत बोलण्याचें धाडस केलें हें खरें, पण हा प्रसंग केवळ अपवादभूत आहे. मागे एका ठिकाणीं या प्रबंधांत हरिभाऊंनी आगरकरांवर टीका केलेल्या एका परिच्छेदांतील वाक्यें उधृत केलीं आहेत. त्यांत त्यांनी उत्तररामचरित्र, मृच्छकटिक, शाकुंतल इ. काव्यांतील (नाट्यकृतींतील) जीवनाचा उल्लेख करून त्यांचा पुरस्कार केलेला आहे. दुसरें कारण ह्या मनोभूमिकेच्या द्वारें निर्माण झालेलें आहे. व तें म्हणजे व्यक्तिवादाचा परित्याग हें होय. ह्या बाबत आवश्यक तें विवेचन ह्यापूर्वी आलेलें आहेच.

हरिभाऊ हे मराठींतले श्रेष्ठ ग्रंथकार आहेत. श्रेष्ठ कादंबरीकार आहेत. ह्याबद्दल लेखकाला आदर आहे. त्याबद्दल दुमत नाही. ते स्त्रियांचे कैवारी कादंबरीकार आहेत हेंहि खरें आहे. स्त्रीसमाजसुधारणेचा, व स्त्रीजीवनविषयक सुधारणांचा पुरस्कार त्यांनी जोराने केला हेंहि मत मान्य आहे. पण त्या पलीकडे स्त्रीजीवनविषयक विचारांचा विकास व्हावयाला पाहिजे होता, तो मात्र झालेला दिसत नाही. त्याची कारणमीमांसा शोधण्याचा प्रयत्न केला.

प्रस्तुत निबंधांत ब्रिटिश राजवटींत स्त्रीच्या ठायीं व्यक्तित्वाची जाणीव निर्माण झाली. ही जाणीव निर्माण होण्याची व व्यक्तित्वाचा ठराविक मर्यादेप्रत विकास होण्याची प्रक्रिया घडत आलेली आहे, असें गृहित धरलें आहे. त्या प्रक्रियेचें वैचारिक व ललित साहित्यांतून कसें दिग्दर्शन होतें तें

पाहावयाचें आहे. हरिभाऊंच्या कालापर्यंत विचारदृष्ट्या कोणती अवस्था आली ह्याचा विचार ह्याच प्रकरणाच्या पूर्वभागांत केला. ह्या भागांत हरिभाऊंच्या कादंबरीवाङ्मयांतून ह्या प्रक्रियेचें दिङ्मात्र दर्शन कसें होतें तें पाहिलें. त्याद्वारें अशा निष्कर्षाप्रत यावें लागलें आहे की, हरिभाऊंच्या कालापर्यंत स्त्रीच्या ठिकाणीं व्यक्तित्वाची जाणीव निर्माण झाली नव्हती. तिच्याभोवतीं विविध पाशांचा वेढा पडला आहे, ते पाश सैल व्हावयास हवेत, असे पुरुषवर्गास वाटलें. पुरुषवर्गाच्या ठायीं तेवढी जागृति झाली. तिचें आविष्करण हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून केलेलें आढळतें. ह्या वस्तुस्थितीचें एक महत्त्वाचें गमक म्हणजे ह्या सर्व कादंबरीविश्वांत एकाहि व्यक्तीच्या ठिकाणीं प्रेमाची भावना निर्माण झालेली नाही. एकहि प्रेयसी नाही वा एकहि प्रेमिक नाही. ह्याचाच अर्थ असा की प्रेमभावना निर्माण होण्यापूर्वीची (व्यक्तित्वाची जाणीव निर्माण होण्यापूर्वीची) ही अवस्था आहे. 'मायेचा बाजार' ह्या कथेंतला वसंतराव ह्याच्या ठिकाणीं ती भावना असावी, असें दिसतें. तो अविवाहित राहतो त्याला हें कारण आहे. तो अपवाद खरा, पण तो पुरुष आहे. पुरुषाच्या ठिकाणीं व्यक्तित्वाची जाणीव निर्माण होत होती, असा उल्लेख वारंवार येथें आलेला आहेच. त्या व्यक्तित्वाचें एक गमक म्हणजे ही अस्फुट स्वरूपाची प्रेमभावना होय.

कालाच्या दृष्टीने व लेखकाच्या विचारसरणीच्या योगाने ह्या मर्यादा पडलेल्या असल्या तरी त्या मर्यादांच्या परिसरांत हरिभाऊंनी निर्माण केलेल्या स्त्रीसृष्टीचें जें दिङ्मात्र दर्शन केलें आहे, तें कमी मोलाचें आहे असें नाही. त्या दृष्टीने हरिभाऊंच्या स्त्रीसृष्टीचें परिशीलन करणें आवश्यक आहे.

हरिभाऊंनी विविधप्रकारचीं स्त्रीपात्रें निर्माण केलीं आहेत. पण तीं सारीं त्यावेळच्या श्रेष्ठ मध्यम वर्गातलीं होत. मध्यम वर्ग हा भांडवली संस्कृतींत पुढे येतो. कर्तृत्वाचें--विविध क्षेत्रातील--पुढारीपण त्याच्याकडे येत असतें. तेव्हा अशा नवजागृत मध्यमवर्गाचें स्वतःच्या वर्गाकडे प्रथम लक्ष जावें हें क्रमप्राप्त आहे. त्याबद्दल लेखकाला फारसा दोष देतां येईल, असें

वाटत नाही. लेखकाच्या कल्पनेप्रमाणे हा मध्यमवर्ग राजकर्त्यांच्या आश्रयाने आपलें जीवन कंठित आहे. त्याच्या विचारांत क्रांति होत आहे, एकप्रकारची खळबळ चालू आहे. त्याचें स्त्रीजीवनाकडे लक्ष जातें ह्याचें कारण पूर्वकालांत स्त्रीवर बंधनें फारच लादलीं होतीं हें आहे. अशा बंधनांनीं जखडलेली स्त्री त्याला कोणत्याहि प्रकारचें सहकार्य करणार नाही. उलटपक्षी त्याच्या मार्गांत केवळ अडचणी मात्र निर्माण होतील. तेव्हा तिला रुढीच्या दास्यांतून मुक्त करावयाला हवें, अशा कल्पनेनें हा मध्यमवर्ग आपलें समाजकर्तव्य करण्यास बद्धपरिकर होत आहे.

याची सहचारिणी कशी आहे? राधाबाई (जग हें असें आहे) सारखी आपल्या सावत्र मुलाच्या व सुनेच्या कारवायांस बळी पडून लाजीरवाणें जीवन जगत आहे. इतरांच्या आधारांनी ती मुलांचें शिक्षण करीत आहे. दुर्गी (पण लक्षांत...) सारखीं स्त्री दुष्ट व्यसनी नवऱ्याच्या जाचास कंटाळून वैतागून गेलेली आहे. यमू (पण लक्षांत...) सारखी एकत्र कुटुंबजीवन कंठून आलेल्या भोगास सादर होत आहे. पद्मे (मायेचा बाजार) सारखी श्रीमंत पतीची राणी व्हावयाची अशी जिची स्थिति, ती नवऱ्याच्या स्वार्थी व लोभीपणास अक्षरशः बळी पडते. मथुरे (मायेचा बाजार) सारखी विधवा, आपल्या कष्टावर आपल्या भावंडांचें शिक्षणपोषण करावें अशी उभारी धरते. पण तिचे मनोरथ विफल व्हावेत अशी परिस्थिति निर्माण होण्याचा समय प्राप्त झालेला आहे. नर्मदे (आजच) सारखी निराश्रित स्त्री दुसऱ्याच्या मायावी लोभसपणाला बळी पडते. ही झाली तरुण स्त्रियांची अवस्था.

वडीलधाऱ्या पिढीतली स्त्री कसलें जीवन अनुभवते आहे? भाऊची आई (मी), यमूची आई, यमूची आजी, उमा सासूबाई, (पण लक्षांत...) बगुताई (मा. बा.) या बिचाऱ्या सुवासिनी स्त्रिया, पण त्यांच्या जन्मांत एकहि दिवस आनंदाचा उगवला आहे असें दिसत नाहीं. परिस्थितीने कांही गरीब व लाचार बनल्यात, कांहीं रागीट झाल्यात, कांहीं निमूटपणें तसेंच जगत आहेत. ही सारी सृष्टि केवळ वास्तव आहे.

ह्या वास्तव दैन्यवाण्या स्थितीतून स्त्री कसा मार्ग काढीत आहे पहा. भाऊची बहीण थोडें फार शिक्षण घेऊन भाऊच्या आश्रमाच्या कार्याला वाहून घेते आहे. तिला लिलीप्रमाणे नवीन पिढींतील तरुणीहि शिष्या म्हणून लाभलेली दिसत आहे. यमुना आपल्या आसन्न--मरणावस्थेंत आत्मचरित्र लिहिण्याचा उपक्रम करून महाराष्ट्रीय स्त्रियांपुढें वेगळाच आदर्श निर्माण करीत आहे. मुंबईच्या परिसरांत राहणाऱ्या लक्ष्मीबाई, गणपतरावांची द्वितीय पत्नी सरस्वतीबाई, शिवरामपंतांची पत्नी मालती ह्या आपापल्या परीने समाजकार्य करीत आहेत, पतीला आपापल्या परी सहाय्य करीत आहेत. आपल्या अपेष्टामय भगिनीबद्दल त्यांना अतीव सहानुभूति वाटत आहे. ह्या पतीबरोबर स्वतंत्रपणानें राहात आहेत. गृहकृत्यांत दक्ष आहेत. एकत्र कुटुंबातल्या हेव्यादाव्यापासून, आप्पलपोटेपणापासून अलिप्त आहेत. आपल्या भगिनींच्या जीवनांत सुखाचे क्षण निर्माण व्हावेत, असा त्यांचा प्रामाणिक यत्न आहे. ह्या स्त्रियांच्या जीवनद्वारां हरिभाऊंनी आपली आदर्श कल्पना आविर्भूत केली आहे. त्यांच्या या जगांत स्त्रीला मान आहे. घरांत तिचें राज्य आहे. पुरुष समंजसपणाने, आपलेपणाने, प्रेमळपणाने वागत आहे, तिच्या भावनांची विचारपूस करतो आहे, असें हें आदर्शजीवन आहे. वास्तवांतून तें इतक्या सहजतेने निर्माण झालेले दर्शविलें आहे. आदर्शाची पातळी इतकी खोल आहे की, वास्तवाचा एक आविष्कार म्हणूनच तें अस्तित्वांत आलें असें वाटतें. पण तें खरें तसें नव्हे. लेखकाच्या मनः-सृष्टींतून कादंबरीजगांतच तें अवतीर्ण झालेलें आहे.

ह्या आदर्शीतून हरिभाऊंनी ज्ञातां जातां, यमूसारखी आदर्श बहिण, आदर्श पत्नी, लक्ष्मीसारखी आदर्श सहचरी, ताईसारखी आदर्श समाज सेविका, मालतीसारखी आदर्श मैत्रिण, इत्यादि विविध प्रकारचे आदर्श रंगविले आहेत.

आदर्श चित्रणाबरोबर स्त्री जीवनाच्या संकुचितपणाकडेहि ते दुर्लक्ष करूं शकले नाहीत. राधासासुबाई, माईसाहेब, पंडिताबाई, सरस्वति, यांच्या-

सारख्या कजाग स्त्रिया आहेत, त्यांचे स्वभाव परिस्थितीमुळें निर्माण झालेले आहेत.

अशा प्रकारें हरिभाऊंची स्त्रीसृष्टी विविधस्वरूपी व विविधगुणी आहे. ह्या स्त्रिया आपल्या पिढीच्या व वर्गाच्या प्रतिनिधी असल्या तरी त्या मानवी व्यक्ती आहेत. मानवी गुण व दुर्गुण ह्यांचें संमिश्र रसायन त्यांच्या अंतरंगांत निर्माण झालेलें आहे.

हरिभाऊंनी निर्माण केलेल्या स्त्रीसृष्टीचें परिशीलन केल्यानंतर त्यांचें मोठेपण लक्षांत येतें. वर विवेचनांत कांही दोषांचा उल्लेख असला तरी ते दोष व्यक्तीचे नव्हेत. विचारसरणीच्या अवलंबनाने आलेले आहेत, असें दर्शविलें आहे. हरिभाऊंच्या मोठेपणाबद्दल प्रश्नच नाही. त्यांनी स्त्री-जीवनविषयक चित्रण जर केलें नसतें तर महाराष्ट्रीय पुरुष व स्त्री दोघेहि इतके जागृत झाले नसते. पुरुषाची स्त्रीकडे पाहण्याची दृष्टि अत्यंत कलुषित झालेली होती. हरिभाऊंनी ह्यापेक्षां थोडें अधिक धाडस दाखविलें असतें तर त्यांच्या विरुद्ध जोराची प्रतिक्रिया झाली असती हें खरें आहे. पण स्पष्ट करावयाचा मुद्दा हा की त्यांनी आगरकरी विचारांचा गाभा आत्मसात केला असता, तर तसें धाडस त्यांना आले असतें. व त्यांची समर्थ लेखणी त्या दृष्टीने अधिक भव्य कार्य करूं शकली असती. कोणता तरी विशिष्ट हेतु हा साहित्य निर्मितीमागे जरूर असावा असें त्यांचें मत आहे.[२०] त्याच निकषावरून त्यांच्या कादंबऱ्या घासून पाहाणें हें चूक नव्हे. त्यांचीं स्वभाव-चित्रें अतिशय मानवी, वास्तविक,...अशीं आहेत. त्या दृष्टीनें मराठी वाङ्मयक्षेत्रांत त्यांची कामगिरी केवळ अपूर्व होय. येथल्या दृष्टिकोणाच्या आधारें पाहतां त्यांत व्यक्तित्वाचा आविष्कार प्रभावी रीतीने व्हावा लागतो तसा झालेला आढळत नाही. कदाचित् स्त्रीजीवनांत ती अवस्था तो पावेतो आलेलीहि नसेल. कांही असलें तरी हरिभाऊंच्या प्रस्थापित मोठेपणास धक्का न देतां हें विवेचन केले आहे. दिलेल्या उदाहरणांवरून तें पटावें, असें वाटतें.

---

२० आपटे चरित्र : पानसे

शेवटीं या प्रबंधासागे जी भूमिका आहे त्या भूमिकेच्या द्वारें ह्या कालखंडांत स्त्रीजीवनविषयक प्रगतीचा कोणता टप्पा गाठला होता हें पाहणें आवश्यक आहे. पुरुष व स्त्री यांच्यांत समान ध्येयत्व निर्माण होणें ही एक मोठी प्रक्रिया आहे व त्रि. राजवटींत ती घडत होती. त्रि. राजवटीच्या शेवटीं तात्त्विक दृष्ट्या हें समानध्येयत्व प्रस्थापित झाले असें येथें गृहित धरलें आहे.* ह्या ठिकाणीं जो कालखंड विचारांत घेतला आहे त्या कालखंडाचा विचार करतांना असें आढळून येतें कीं, शैक्षणिक बाबतींत ह्या ध्येयाचा प्रवेश झाला होता. तें होणेंच अधिक महत्त्वाचें होतें. आगरकरांनी 'स्त्रियांना चरितार्थ संपादणारें शिक्षण द्यावयास हवें' असें जेव्हां पुरस्कारले तेव्हां त्यांना स्त्री व पुरुष यांच्या जीवनांत एकध्येयता असावी असें अभिप्रेत आहे. उलट टिळकांची टीका पाहिली तर असें दिसतें की त्यांचा ह्या एकध्येयत्वाकडे नेणाऱ्या प्रक्रियेलाच विरोध आहे. सामाजिक दृष्टीने आगरकरांची विचारसरणी ही सरकारी धोरणास (ह्या क्षेत्रांतील) जवळची होती. कारण इंग्लंडांतच मतदानाच्या हक्कांसाठी स्त्रियांचा लढा चालू होता. लोकशाही हें ध्येय मानल्यावर ह्या प्रयत्नांस विरोध करतां येत नाही.

त्यामुळेच इंग्लंडमधील चळवळ जोर धरीत होती. त्याचा परिणाम येथील राज्यकर्त्यांच्या विचारांवर झाला नसेल असें म्हणतां येत नाही. दुसरेंहि कारण असें कीं, ह्या देशांत शिक्षण हा प्रकारच नवा होता. त्याचें ध्येय त्रि. धोरणांतून ठरलें जात होतें. स्त्रिया तर कमालीच्या अशिक्षित होत्या. त्यांना प्रथम साक्षर करणें हाच पहिला भाग होता. वेगळेंपणानें शिक्षण देण्याचा विचार करण्याला एकंदरींत काल सोयीस्कर नव्हता. टिळकांसारख्या चलाख गृहस्थाच्या लक्षांत ह्या प्रक्रियेचा ओघ कोणीकडे जातो हें चटकन् आलें व त्यांनीं त्याप्रमाणें प्रारंभींच विरोध केला. डॉ. कर्व्यांचा वेगळें विद्यापीठ काढण्याचा प्रयत्न हा एकंदरीनें टिळकांच्या

* भूमिकाः—प्रस्तुत प्रबंध

विचारसरणीस पोषक आहे व म्हणूनच जेव्हां कर्व्यांचें विद्यापीठ स्थापन झालें तेव्हां केसरीने आनंद प्रदर्शित केला. * आगरकरांना हा यत्न कितपत मान्य झाला असता ह्याची शंकाच आहे. सरकारचें एकंदरीने तटस्थतेचें धोरण असल्याने असे परस्परविरोधी यत्न उत्तेजिले गेले. तेव्हां शैक्षणिक बाबतींत हा जो प्रयोग झाला त्यांत हा ध्येयात्मक भाग आहे. तथापि महाराष्ट्रीय स्त्रीच्या ठिकाणी जीवनांत जाणीव निर्माण होत होती त्यामुळें तिला हा प्रयोग फारसा पटला नाही. कारण ह्या शैक्षणिक प्रयोगाला शिक्षणदृष्ट्या यश आलें असें म्हणतां येत नाही. डॉ. कर्व्यांचे यत्न हे एकंदरीने सद्धेतुमूलक आहेत व होते, त्या दृष्टीने समाजाची व स्त्रीवर्गाची सहानुभूति त्यांच्याकडे आहे व होतीहि. तथापि ध्येयात्मक फरक दुर्लक्षित झाला नाही, हें ध्यानांत ठेवण्यासारखे आहे. अशाप्रकारे या कालखंडांत एकध्येयता निर्माण करणारे प्रमुख साधन जें शिक्षण, त्यांत एकप्रकारचा संघर्ष होता असें दिसतें.

शिक्षणाचें प्रमाण कमी असल्याने शिक्षित स्त्री ही निर्माण झाली नव्हती. वामनराव जोशांच्या कादंबऱ्यांच्या द्वारें तिची निर्मिती होण्याची पूर्वतयारी सुरू झाली होती. हरिभाऊंना तिचें दर्शन पूर्णत्वाने झालें नाही, व तें कां झालें नाही याचें विवेचन मागे आलेंच आहे. तथापि हरिभाऊंनी ताई व सुंदरी ह्यांच्या द्वारां एकध्येयाची कल्पना आदर्श स्वरूपांत समाजापुढे मांडली होती, व ही गोष्ट हरिभाऊंना व त्यांच्या ठिकाणी असलेल्या ध्येयदृष्टीला भूषणावह आहे. या दोन पात्रांच्या द्वारां हरिभाऊंनी स्त्रियांपुढे समाजसेवेचें क्षेत्र उपलब्ध करून ठेविलें. त्या दृष्टीने विवाह न झाल्यामुळें झुरत न बसतां समाजसेवेचें ध्येय डोळ्यापुढें ठेवून जीवनाचें सार्थकत्व मिळवूं पाहणारी 'लता स्वभावी' सुंदरी ही निश्चितपणें नवीन आहे. रूढ मार्गाने जाणाऱ्या असंख्य स्त्रियापेक्षां हा जो नवा मार्ग तिला दिसला ह्याचें कारण स्त्री व पुरुष ह्यांच्या एकध्येयत्वाची पुसटशी कल्पना तिला आली होती

* केसरी प्रबोध.

हें आहे. त्यापेक्षां ताईचें स्वभावचित्र अधिक रम्योज्वल आहे. ताईने तर दोन तीन प्रकारच्या स्त्रियांना मार्ग दाखविला आहे. वैधव्य प्राप्त झाल्यानंतर तिने हा जो मार्ग स्वीकारला तो तत्सम बहुसंख्य स्त्रियांना अवलंबिण्यासारखा होता व ही गोष्ट समाजापुढे हरिभाऊंनीं मांडली. तिने नवऱ्याच्या त्रासाला कंटाळून त्याचा परित्याग केला. त्याच्याकडे जाण्याचें नाकारलें. त्या परिस्थितींत व स्वतंत्रपणाने जगण्याचा यत्न केला. केवळ भावाला भारभूत म्हणून ती जगली नाही. तशाप्रकारचें जीवन जगत असलेल्या स्त्रियांना हा मार्ग निश्चितपणें स्वीकार्य होता. नवरा आजारी असतां ती शुश्रूषेला त्याच्याकडे जाते, ह्याचा अर्थ तिच्यांतलें मानव्य जागृत आहे असाच करावा लागतो.

एकंदरीने एकध्येयत्वाच्या दिशेने जी वाटचाल झाली त्याबाबत असें म्हणतां येईल कीं, ह्या काळखंडांत पुरुषांच्या मधील एका विचारसरणीच्या गटास ही प्रक्रिया आकलन झाली होती. त्याचा यत्न नवजागृत स्त्रीचें तोंड त्या दिशेला करावें असा होता. कांहींचा तत्त्वतः विरोध होता, कांहींचा इतर दृष्टीनें. त्या दृष्टीनें त्यांचा प्रतिकार होत होता. ह्या सर्व यत्नांत स्त्री ही अद्याप जागृत झालेली नव्हती. तिच्या ठिकाणीं व्यक्तित्व निर्माण झालेलें नव्हतें, तें निर्माण व्हावें इतकें शिक्षण तिला मिळालेलें नव्हतें. समाजाने लादलेलीं अमानुष बंधनें **तत्त्वतः** निखळून पडत होतीं. समाजाचें कर्तृत्व प्रामुख्यानें राजकीय क्षेत्रास कामीं येत होतें व स्त्रियांचा प्रश्न फक्त शैक्षणिक क्षेत्राइतकाच मर्यादित होता. इतर क्षेत्रें त्यांच्या कक्षेंत यावयास अवकाश होता. हरिभाऊंना स्वातंत्र्यवादिनी स्त्रीची पुसट चाहूल लागली. पण तेथपर्यंत ते विचाराने पोचले नव्हते, अर्थात ती चाहूल तितकीच राहिली.

या सर्व विवेचनावरून हें स्पष्ट होईल की, एकध्येयता निर्माण होण्यासाठीं जी पूर्वतयारी व्हावी लागते ती या कालांत झाली होती. म्हणजे शैक्षणिक क्षेत्रांत एकध्येयतेचा अवलंब झाला होता. कालाला

अनुसरून असा तो प्रयत्न असल्यानें त्याला विरोध जरी होत होता, तरी एकंदरीने प्रयत्नास यश येत होतें. इतर क्षेत्रांपैकीं समाजसेवा हें ध्येय स्त्रियांपुढे ह्या प्रख्यात कादंबरीकाराने ठेविलें आहे. व्रतवैकल्यें, उपासतापास ह्यांच्या दुष्ट वर्तुलांतून स्त्रीने बाहेर पडावें असा पुरुषांचा प्रयत्न होऊं लागला होता. त्याला प्रतिसाथ देण्याइतकी जागृति स्त्रीवर्गात झालेली नव्हती. पण स्त्रीचें तोंड मात्र त्या दिशेकडेच होतें. व ह्या मार्गानें वाटचाल करण्यासाठीं तिने कंबर बांधावयास सुरवात केली होती.

वामनराव जोशी व डॉ. केतकर

१९२० ते १९३५ या कालखंडांतले प्रमुख लेखक व कादंबरीकार म्हणजे वामनराव जोशी हे होत. त्यांच्या पांच कादंबऱ्यांतून निश्चितपणें स्त्री-जीवनाच्या विविध प्रश्नांचा उहापोह त्यांनी केला आहे. स्वभावचित्रांच्या बाबतहि हरिभाऊंच्या नंतर त्यांचेंच नांव घ्यावें लागतें. सहाजिक त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनविषयक प्रश्नांचा विचार करणें आवश्यक आहे. तत्पूर्वी वामन मल्हार जोशांची स्त्रीजीवनविषयक दृष्टी काय होती तिचा परिचय करून घेणें आवश्यक आहे. ही पाहात असतां त्यांच्या जीवन-विषयक तत्त्वज्ञानाचा परिचय करून घ्यावा लागेल.

वामनरावांच्या विचारसरणीवर समत्ववादाची छटा पडली आहे. समन्वयवादी विचारसरणी ह्या कालांत बरीच प्रसृत झाली होती. किंबहुना, त्या विचारसरणीचे एक प्रमुख पुरस्कर्ते म्हणून वामनरावांच्या विचारसरणीकडे बोट दाखवितां येईल. पण वामनरावांची ही विचारसरणी स्वयंनिष्ठ असेल. "प्रत्यक्ष माझ्या लेखनाबरती कुठल्याहि लेखकाचा विशेष परिणाम झालेला नाही. जर झालेला असेल तर इंग्रजी लेखकांचा झाला आहे" [१] अशी कबुली त्यांनी दिलेली आहे. तथापि प्रत्यक्ष लेखनांवर म्हणजे लेखनशैलीवर जरी परिणाम झालेला नसला, तरी विचारसरणीवर मात्र झालेला नसेल असें म्हणवत नाहीं. वामनरावांच्या कालांत निरनिराळ्या विचारसरणींचा संघर्ष झाला. "मी लहान असतांना टिळक विरुद्ध आगरकर किंवा गोखले वाद पुष्कळ जोरांत होते" [२] अशी त्यांनीच कबूली दिली आहे. ह्या विचारसंघर्षाचा परिणाम त्यांच्यावर कोणता झाला तें त्यांच्या लेखनांतून स्पष्ट होतें. प्रो. विजापूरकरांच्या 'विश्ववृत्तां'त व समर्थविद्यालयांत काम करण्याची त्यांची तयारी टिळकांच्या राष्ट्रीय विचारसरणीचा परिणाम दर्शविते. थोपि सामा-

१ विचारलहरी पृ. १०२. २ कित्ता

जिक बाबतींतलें त्यांचें धोरण हें टिळकांप्रमाणें नव्हतें, तर ते आगरकरांप्रमाणें होतें. स्त्रियांच्या त्यांनीं ज्या विविध भूमिका तन्मयतेने रंगविल्या आहेत त्या आगरकरांचीं मतें आत्मसात न करतां रंगवितां आल्या असत्या कीं नाहीं याची शंका वाटते. पुढे टिळकांच्या विचारसरणीचा गांधीजींच्या विचारसरणीशी विरोध आला, तेथेहि वामनरावांनी गांधीजींच्या विचारांतील विधायक भाग बरोबर आत्मसात केला व आपलें प्रसिद्ध विनायकराव भोळे हें पात्र रंगविलें. नंतर गांधीजींच्या विचारसरणीचा व नव्या समाजवादी विचारांचा संघर्ष त्यांना पाहावयास सांपडला, त्याहि वेळीं त्यांनीं आपली सहानुभूति पुनः समाजवादी वा नवमतवादी विचाराकडे वळविली. नवीन विचारांतील विधायक भाग चिकित्सकवृत्तीने हेरून त्याचा पाठपुरावा करावयाचा हें वामनरावांचें धोरण शेवटपर्यंत कायम होतें व त्यामुळेंच त्यांना बरीच लोकप्रियता शेवटपर्यंत मिळत गेली. अशारीतीनें वामनरावांचा समन्वयवाद हा खरा समन्वयवाद वाटतो. तो तडजोडवादापासून अलिप्त आहे. प्रत्येक विचारसणींतलें विधायक तेवढें घेऊन त्यांचा खराखुरा समन्वय करण्याचा यत्न त्यांनी केला.

वामनराव हे प्रवृत्तीने तत्त्वजिज्ञासु होते. तत्त्वज्ञानाचा व नीतिशास्त्राचा नुसताच त्यांचा अभ्यास झाला नव्हता तर जीवनावर व जीवनविषयक दृष्टिकोणावर खोल परिणाम झाला होता. ह्या परिणामामुळेंच ते हा समन्वय यशस्वी रीतीने करूं शकले. नीतिशास्त्राच्या अभ्यासाच्या योगाने त्यांना एक नवीनच दृष्टि प्राप्त झाली होती. तिच्या आधारें जीवनांतील लहानलहान तंट्यांपासून त्यांना स्वतःला अलिप्त ठेवतां आले. राजकीय व अन्य मतभेदांकडे ते ह्याच दृष्टीनें पाहूं शकले. त्यांची दृष्टि खूप दूरवर पोचूं शकली. "अलीअलीकडे तर...विचारांच्या दृष्टीनेंच मी जेव्हां पाहूं लागतो, तेव्हां एकत्र कुटुंबपद्धतिच काय, पण साक्षात कुटुंबपद्धतिच नष्ट होणार व नष्ट व्हावी असें मला वाटूं लागलें आहे."[४] तथापि ह्या-

४ विचारलहरी पृ. १०३; ४ कित्ता.

बाबत लक्षांत ठेवण्याची गोष्ट अशी कीं, ह्या तर्ककर्कश विचारांना वामनरावांनीं आपल्या नीतिविषयक निष्ठेच्या पाहाऱ्यांत ठेविलें. त्यायोगेंच मानवतावादाप्रत ते पोचूं शकले आहेत. या त्यांच्या दृष्टिकोणामुळेंच वामनरावांचें व्यक्तिवैशिष्ट्य समन्वयवादाचा अवलंब करूनहि शिल्लक राहूं शकलें.

ह्या त्यांच्या वैशिष्ट्यामुळेंच वामनराव एका बाजूनें 'आगरकरी पंथांतले विवेकवादी'[५] झाले, तर दुसऱ्या बाजूने लो. टिळकांच्या 'गीतारहस्याचे ते चाहते झाले. पण टिळकांच्या विवेचनांतील त्यांना खटकणाऱ्या गोष्टीहि ते लपवूं शकले नाहींत. तथापि त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानावर गीतारहस्याचा परिणाम झाला आहे असें आढळून येईल. गांधीजींच्या विचारांतील व कृतींतील मोठेंपण त्यांना मान्य होतें, तर नवमतवादाविषयीहि सहानुभूति होती. ह्याचें कारण त्यांचा मनुष्याच्या सद्धेतूमूलकतेवर विश्वास होता. "एक महत्त्वाची गोष्ट मला सांगावीशी वाटते...जग हें वाईट माणसांनीं भरलेलें आहे असा माझा अनुभव नाहीं. माझे अनेक ठिकाणचे अनुभव सांगतात कीं, जगांत दुष्टपणापेक्षां अज्ञान व गैरसमज यांनीं हरतऱ्हेच्या आपत्ती ओढवतात...दुःखें जगांत आहेतच, दुष्टपणा पण आहे. परंतु प्रयत्न केला तर जग पुष्कळ सुधारेल अशी माझी कल्पना आहे"[६] वामनरावांच्या ठिकाणीं हा जो विश्वास आहे तो त्यांच्या जीवन-विषयक दृष्टिकोणाचाच समन्वयवादी वृत्तीचा गाभा आहे.

वामनरावांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान व दृष्टिकोण ह्यांचा परिचय करून घेतल्यानंतर त्यांच्या स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोणाचीं पाहणी करणें आवश्यक आहे. वामनराव हे आगरकरी पंथांतले विवेकवादी आहेत हा उल्लेख वर आलेला आहे. त्यावरून वामनरावांनी स्त्रीजीवनविषयक सहानुभूति आगरकरांपासून घेतली होती, असें म्हटलें तर तें फारसें चूक होईल असें नव्हे.

स्त्रियांच्या विषयीची वामनरावांची दृष्टि बरीच उदार आहे. त्यांना स्त्री व पुरुष यांत खरेंखुरें सख्य व समानत्व प्रस्थापित व्हावें असें वाटतें.

---

५ वामन मल्हार : वाङ्मयदर्शन पृ. १४७. ६ विचारलहरी पृ. १०५

त्या दृष्टीनें त्यांनी आपल्या 'आश्रमहरिणीं' त एका स्त्रीने दोन पती करावयास हरकत नाहीं असा विचारहि मांडला आहे. त्यांची स्त्रीजीवन-विषयक दृष्टि किती व्यापक आहे व तिला किती विशालता प्राप्त झाली हें पाहण्याचे दृष्टीनें हा उल्लेख निश्चितपणें महत्त्वाचा आहे. स्त्रियांच्या कर्तृत्व-कक्षेचें क्षेत्र त्यांनी खूप अमर्याद करून ठेविलें आहे.

तथापि याहि बाबतींत वामनरावांचे वैशिष्ट्य म्हणजे समन्वयवाद हेंहि प्रतीत होतें. ज्या वामनरावांनी श्रेष्ठ व कर्तृत्वशालिनी स्त्रिया व नायिका आपल्या कादंबऱ्यांत निर्माण केल्या तेच वामनराव स्त्रियांच्या हक्कांविषयी बोलूं लागले की म्हणतात, 'स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे हक्क दिले नाहीत तें योग्य आहे. आज पुरुषाच्या मागें त्याच्या पत्नीला त्याच्या इस्टेटीचा वारसा मिळत नाही. माझ्या मतें ही गोष्ट फार चांगली आहे.'[७] पूर्वीच्या काळीं अनिष्ट रूढि होत्या त्याबद्दलहि ते असेंच म्हणतील. "कारण त्या काळीं त्या गोष्टी इष्ट अशा वाटत होत्या"[८] स्त्रियांच्या बाबतच्या सुधारणांचा पुरस्कारहि आम्ही पुरुषांनींच केला आहे. अशीहि फुशारकी ते मिरवतील. पण हें सारें करीत असतानांच त्यांना ह्या विचारांत व इतरत्र आपण व्यक्त केलेल्या विचारांत विरोध आहे ह्याहि गोष्टीची जाणीव होईल. व ह्या विरोधाचा परिहार "तुमची सुधारणा तुम्ही करायला पाहिजे" असें बजावतील, व "प्रेमाशिवाय—'हक्का'ची भाषा बोलून कोणताही प्रश्न सुटणार नाही" असेंहि सांगून ठेवतील. हा जो विरोध आहे याचें कारण तत्त्वतः व व्यवहारतः असा ते फरक करतात, व तो योग्य आहे. तत्त्वतः स्त्रियांना सर्व क्षेत्रें उपलब्ध असावीं, त्यांना आडकाठी नसावी, इ. भाग त्यांना मान्य आहे. पण व्यवहारदृष्टीनें कांहीं व्यक्तींनी आपल्या मर्यादा लक्षांत घेऊन जर ह्या ध्येयवादाला मुरड घातली, तर त्याला त्यांचा विरोध नाहीं. किंबहुना, तशी घालावी असें ते म्हणतील.

अशाप्रकारें ध्येयदृष्ट्या त्यांना स्त्री व पुरुष यांत खरी समता हवी आहे. किंबहुना, त्याद्दृष्टीनें त्यांचे विचार कुटुंबसंस्थेच्या विनाशापर्यंत गेले

७ विचारविहार. ८ कित्ता.

आहेत. पण व्यवहारतः निरनिराळीं बंधनें आवश्यक आहेत हें मान्य करून त्या प्रमाणांत मर्यादाहि ते सुचवितील.

ह्याचा अर्थ त्यांना जुन्या रूढि मान्य होत्या असा नव्हे. त्यांच्यावेळीं खरें सांगायचें तर जुने प्रश्न इतिहासगत झाले होते. पुनर्विवाह, केशवपन, स्त्रीशिक्षण, इ. बाबत समाजाचा तात्त्विक इ. विरोध नव्हता. परिस्थिति बदललीं होती. तिच्या योगाने वास्तविक स्त्रीजीवनविषयक नवे प्रश्न निर्माण झाले होते; होत होते. त्यापैकीं एक म्हणजे कुटुंबकर्तव्यें व समाजकर्तव्यें ह्यांच्यांत विरोध आला तर काय करावयाचें? वामनरावांच्या कालापर्यंत स्त्रियांचीं कुटुंबकर्तव्यें हींच समाजकर्तव्यें असत. पण स्त्री सुशिक्षित झाल्यानंतर तिच्यापुढे जें व्यापक व विस्तृत असें समाजसेवेचें दालन उघडलें गेलें त्याच्या अनुषंगाने हा प्रश्न निर्माण झाला होता. वामनरावांनी ह्या दोहोंतला विरोध शक्य तितका कमी करून तसें दिग्दर्शन आपल्या कृतींतून केलें. एका लेखांत ते म्हणतात, "अगदीं खरं बोलायचं म्हणजे विवाहित स्त्रियांनी आधीं घर आणि मग समाज ही वृत्ति सामान्यतः स्वीकारावी, असं माझं मत आहे. पति प्रतिकूल असला तर सामाजिक कार्याच्या फंदांत सामान्यतः विवाहित स्त्रियांनीं पडूं नये."[९] हें सारं थोडं आपल्या उदारवृत्तिवादाला विरोधी आहे हें त्यांच्या लक्षांत येतें व ते म्हणतात, "सुशिक्षित स्त्रियांनीं सार्वजनिक कार्य करूं नये असं मला म्हणायचं नाहीं. विलायतेतील मिस्टर आणि मिसेस् वेब् यांच्यासारख्यांचं जीवन ज्याला माहित आहे तो असें कसें म्हणेल?"[१०] अशा प्रकारें स्त्रीच्या जीवनांत जेव्हां पेचप्रसंग निर्माण होतो तेव्हा वामनराव तिला अधिक धाडस न करतां 'खऱ्या सुखासाठी' रूढ मार्गाचा अवलंब करावयास सांगतात. 'इंदु काळे'ला विनायकरावांनी जो उपदेश केला आहे तो तेथे खरा विसंगत आहे. विनायकरावांचा त्यांत पराभव आहे. पण त्याचें बीज वामनरावांच्या ह्या दृष्टिकोणांत आहे.

(९) विचारलहरी पृ. ४४, (१०) कित्ता पृ. ४५.

तथापि उच्चतम दृष्टीने ज्यांच्या जवळ तेवढी अंतःप्रेरणा आहे त्यांनी समाज कार्य करावयास हरकत नाही, असेंहि ते स्त्रियांना बजावतील. अंतः प्रेरणेचा अर्थहि त्यांनी अगदीं स्पष्टपणें विशद केला आहे. "गृह-सौख्य नष्ट झालें, मुलांबाळांची हेळसांड आणि ताटातूट झाली तरी देखिल प्रत्यक्ष समाजकार्य केलंच पाहिजे असें जिला वाटत असेल, आणि ही एवढी मोठी किंमत देण्याची जिची तयारी असेल आणि पुन्हा ही किंमत देण्या-मध्ये आपण कांहीं चुकत आहोंत असें मनःशल्य जिच्या मनाला बोचत नसेल, तिला प्रत्यक्ष समाजकार्य करण्याची तेवढी अंतःप्रेरणा आहे असें मी मानीन" [११] अशा प्रकारें स्त्रियांच्या पुढे जेव्हा असा पेचप्रसंग निर्माण होईल तेव्हां कसें वागावें ह्याचें त्यांनी दिग्दर्शन केलें आहे. त्यांतून त्यांचा स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोण व्यक्त होत आहे. अशा प्रकारचे आणखीहि संघर्ष वामनरावांनी आपल्या कादंबऱ्यांत दिग्दर्शित केले आहेत. त्यांचें विवेचन त्या त्या ठिकाणीं करणें योग्य होईल.

वामनरावांच्या स्त्रीजीवन विषयक दृष्टिकोणाच्या आणखी एका अंगाचा विचार करणें आवश्यक आहे. वामनरावांना स्त्रियांच्या व्यक्तित्वाची जाणीव झालेली आहे, व वामनरावांचीं सारीं पात्रें व्यक्तिवैशिष्ट्याने विनटलीं आहेत. अर्थात् ह्याहि बाबतीत त्यांची तत्त्वजीगीषु वृत्ति जागृत होते. डॉ. सहस्रबुद्धे यांनी आपल्या 'स्वभाव लेखनां'त वर्णन केलेल्या '**प्रतिमारेखा**'पाशीच ते थांबतात. ते स्वतःच तशी कबुली देतात." माझीं बहुतेक पात्रें कल्पनानिर्मित आहेत, तीं थोडीशीं प्रतीकें आहेत, रागिणी ही एका विशिष्ट मनोरचनेच्या स्त्रियांचं प्रतीक आहे. उत्तरा निराळ्या वृत्तीच्या स्त्रियांचं प्रतीक.....विनायकराव हा कर्मयोग्याचं प्रतीक होता..... कारण लिहितां लिहितां हें प्रतीकात्मक स्वरूप जाऊन त्यांना व्यक्तिमत्व व जिवंतपणा येऊं लागतो" [१२] कारण ते तत्त्वजीगिषु जरी असले तरी मानस-शास्त्रज्ञहि आहेत. व या दोन वृत्तींचा संगम त्यांच्या लेखनांत होऊन विशिष्ट

११ विचारलहरी पृ. ४७. १२ कित्ता, पृ. ५३.

मनोवृत्तीचीं व विशिष्ट जीवनध्येयें अंगीं बाणलेलीं पात्रें निर्माण होतात. वामनरावांना स्त्रियांच्या व्यक्तिमत्वाची ही जी स्पष्ट कल्पना आली तेंच त्यांचें वैशिष्ट्य होय. मागील प्रकरणांत हरिभाऊंच्या कालापर्यंत स्त्रियांच्या ठायीं व्यक्तिवैशिष्ट्य निर्माण झालेलें नव्हतें, स्त्री ही त्या कालांत अबोल होती. पुरुषांचे तिला बोलकी करण्याचे यत्न चालू झाले होते. वामनरावांच्या कालापर्यंत शिक्षणाचा परिणाम होत होता. स्त्रियांची मजल विद्यालय व महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत गेली होती. त्या शिक्षणाच्या आधारें स्त्री बोलकी झाली होती. वामनरावांनी अशी सुशिक्षित स्त्रीच आपलें माध्यम मानली व तिच्या द्वारें तत्कालीन स्त्रीजीवनविषयक सामाजिक व व्यक्तिगत प्रश्नांचें विशदीकरण केलें. त्याचें अधिक बारकाईने अवलोकन करण्यापूर्वी लेखकाची स्त्रीजीवनविषयक दृष्टि कोणती होती तें परिचित करून घेणें आवश्यक होतें, व म्हणूनच हें विवेचन केलें.

वामनराव जोशांची पहिली कादंबरी ' रागिणी ' इ. स. १९१५ मध्यें प्रकाशित झाली.

तिचा उल्लेख वास्तविक १९२० पूर्वीच्या कालाच्या वाङ्मयाच्या चर्चेत व्हावयास हवा होता.

पण याप्रबंधातले कालखंड हे काटेकोरपणें घेतलेले नाहीत, **वैचारिक फरकाच्या अनुरोधाने मुख्यतः घेतले आहेत.** कालदृष्ट्या ' रागिणी ' ही जरी हरिभाऊंच्या युगांत जाते तरी विचार व इतर दृष्टीने ती तशी नाही. व म्हणूनच तिचा विचार नंतरच्या वाङ्मयाच्या चर्चेच्या वेळीं करणें अधिक समर्पक होईल. दुसरें असें की ह्या ठिकाणीं केवळ ग्रंथांना महत्त्व न देतां त्यांच्या ग्रंथकर्त्यांना देणें अधिक युक्त वाटलें. ग्रंथकर्त्याच्या भरभराटीचा वा लेखनदृष्ट्या भरीचा काल हा महत्त्वाचा धरला आहे. वामनरावांचा काल हा त्यादृष्टीने १९२० ते १९३५ असा स्थूलमानाने व्यावयास हरकत नाही. त्यांची शेवटची कादंबरी ' इंदु काळे ... ' ही १९३४ त प्रकाशित झाली. त्या दृष्टीने ह्या कालखंडांतच त्यांचा समावेश करणें योग्य होय.

वामनरावांची 'रागिणी' ही त्यांची पहिली 'कादंबरी' म्हणून प्रसिद्ध असली तरी ती लिहितांना लेखकाची भूमिका प्रामुख्याने 'काव्य-शास्त्र-विनोद' पर लेखन करण्याची होती. तसें विचारप्रधान लेखन करतांना कल्पित कथेचा आधार घ्यावयाचा व जीवनाचा आभास निर्माण करण्याचा उपक्रम गोळे यांच्या 'हिंदु धर्म आणि सुधारणा' या पुस्तकाने केला होता. त्याचा परिणाम 'रागिणी'च्या कर्त्यावर होऊन त्यांनीं काव्य-शास्त्र-विनोद-प्रधान चर्चा करतांना केवळ आधार म्हणून कांहीं कथानक निर्माण केलें. 'हिंदु धर्म आणि सुधारणे' पेक्षा वामनरावांची दृष्टि पुष्कळच व्यापक, सखोल, जीवनसाक्षेपी अशी होती. त्यामुळे त्यांच्या हातून काव्य-शास्त्र-विनोद-पर लेखन करतां करतां एक उत्कृष्ट कथा--कादंबरी--निर्माण झाली. रसिकांनी व टीकाकारांनी तिचें परीक्षण वा परिशीलन 'कादंबरी' म्हणून केलें, त्या दृष्टीनेंहि ती कृति सरस वठली असली तरी लेखकाची ही भूमिका लक्षांत घेतल्याशिवाय तिच्यांतील कित्येक गोष्टींचा व उल्लेखांचा उलगडा होणार नाही. काव्य-शास्त्र-विनोदपर लेखन करण्याची भूमिका प्रारंभापासून अखेरपर्यंत सारख्याच कटाक्षाने लेखकाने अवलंबिली आहे. 'कादंबरी' व कथा स्वरूप पुढें पुढें अधिक साकार होऊं लागलें तरी लेखकाला या मूळ भूमिकेचा विसर पडलेला नाहीं, हें त्यांचें वैशिष्ट्य होय. ह्या विशिष्ट भूमिकेमुळेच ह्या 'कादंबरी'त अनेक विषयांवर तात्विकचर्चा बरीच आली आहे. उदा. 'बुद्धि आणि श्रद्धा यांत श्रेष्ठ कोण? अंतःप्रेरणा म्हणजे काय? मनुस्मृतींत स्त्रियांची निंदा केली आहे की स्तुति? मनूने घातलेल्या निर्बंधाची कारणमीमांसा, स्त्रीस्वातंत्र्य; (पृ. २८५) धर्म खरा की भौतिक शास्त्रें खरीं? ब्रह्म निर्गुण की सगुण? बुद्धिपासून फायदे की तोटे? सत्य आणि नीति; अंतःस्फूर्तज्ञान वि० तर्कसिद्धज्ञान, (२६३.) ईश्वराचें अस्तित्व; सृष्टीचा धर्म स्वार्थ की स्वार्थत्याग; जग आनंदमय की प्रेममय?, दुःखमय की कलहमय? म्हणजेच संसार आनंददायक की दुःख-कारक? दुःख निर्माण करण्यांत ईश्वराचा हेतु काय असावा? जगांत

अन्यायाचें वास्तव्य आहे का ? [illegible]नीतीचा उगम; पुनर्विवाह (स्त्रियांनीं) करणें योग्य की अयोग्य. (२०२) स्त्रियांचे हक्क (३२१). पुरुषांचे व स्त्रियांचे हक्क यांचे परस्पर संबंध कसे ? (२२७-२२९).' इ. इ. हे विविध प्रश्न व त्यांचें स्वरूप पाहिलें की लेखकाला 'कादंबरी' हा वाङ्मय-प्रकार, त्याचें कलात्मक स्वरूप, व काव्य--शास्त्र विनोदचर्चा ह्यापैकीं कोणत्या गोष्टींचें आकर्षण होतें तें स्पष्ट होतें. निरानिराळ्या प्रसंगांच्या अनुरोधाने निरानिराळ्या प्रकारची चर्चा त्यांनी केली आहे. ती बरीच उद्बोकहि उतरली आहे. ती करतांना विविध संस्कृत, इंग्रजी अवतरणेंहि लेखकाने घातलीं आहेत. प्रकरणाच्या प्रारंभींहि अशीं सुभाषितें उधृत केलीं आहेत. पुढे पुढे कथानकालाच गति प्राप्त झाली आहे व ही प्रवृत्ति आपाततःच कमी पडलेली आहे. पण कमी झाली असली तरी नष्ट झालेली नाहीं. विजयगांवकर मंडळी हिमालयांत रानटी लोकांच्या तावडींत सांपडतात तेथे त्यांच्यावर जीवनमरणाचा प्रसंग कोसळतो. त्याहि प्रसंगीं त्या लोकांत तत्त्वचर्चा चालली आहे. एका दृष्टीने--कथेच्या व कलेच्या दृष्टीने--पाहिलें असतां ती अस्थानींहि वाटते, पण लेखकाच्या भूमिकेशी ती सुसंगत आहे.

ह्या वस्तुस्थितीमुळे या कादंबरीच्या प्रतिपादनांत विचाराच्या दृष्टीने एकात्मतेचा पूर्णपणें अभाव आहे. लेखकाची पाहिलीच कृति असल्यानें असें होणें सहाजिक होतें. शिवाय वामनरावांतींल कलावंत हा ह्यावेळीं जागृत झालाच नव्हता, त्यामुळे असें होणें स्वाभाविक होतें. लेखकाची भूमिका ही प्रायः तत्त्वजिगीषूची होती, हें कादंबरी वाचून संपविल्यानंतरहि लक्षांत येतें.

स्त्रीजीवनाच्या आविष्काराच्या दृष्टीने पाहिलें तरी हेंच आढळतें. ह्या कादंबरींत स्त्रीजीवनविषयक कांही प्रश्नांची चर्चा आलेली असली तरी ती केवळ अनुषंगाने होय. जे अनेक विषय लेखकापुढे चर्चेसाठी होते त्यापैकीं कांही स्त्रीजीवनविषयक होते एवढेंच. त्या प्रश्नांबाबतहि उलट सुलट मतें मांडलीं आहेत. आग्रहाने कोणतींहि प्रतिपादलेलीं नाहीत. स्त्रियांचीं कर्तव्यें व हक्क, यांचा समाजांत कोणता दर्जा असावा, स्त्रीस्वातंत्र्य देणें इष्ट

आहे की नाही, मनुस्मृतींत स्त्रियांची अवहेलना केली आहे ती खरी कीं खोटी, स्त्रीला विवाह करणें हें आवश्यकच आहे काय? इ. अनेकविध स्त्रीजीवनविषयक प्रश्न विवेचनाच्या ओघांत आले आहेत. पण विशिष्ट प्राधान्य असें नाही. अशाप्रकारें कोणत्याहि एका प्रश्नास प्राधान्य न मिळण्याचें कारण लेखकाची भूमिका हेंच आहे. तथापि ह्या कादंबरींत स्त्रीजीवनविषयक, त्यांतल्या त्यांत महत्त्वाचा असा कोणता प्रश्न असेल तर तो स्त्रियांच्या हक्कासंबंधींचा होय. वामनरावांनी रागिणी आणि उत्तरा ह्या दोन व्यक्तिचित्रांच्या आधाराने ह्या प्रश्नासंबंधी बरेंच असंदिग्ध मत व्यक्त केलें आहे. पण त्यांना नानासाहेबांनी एका काल्पनिक समाजाचें उदाहरण घेऊन निरुत्तर केलें आहे. ह्या समाजांत सर्व लोक हक्कांविषयी अतिरिक्त जागृत आहेत. पण अतिरिक्त जागृतीमुळे समाजाचे व्यवहार सुरळित न चालतां त्यांत विविध अडथळे मात्र निर्माण होतात, असें दाखवून 'कर्तव्याच्या जाणिवेशिवाय हक्कांची भाषा फोल आहे' असें मत दिद्दर्शित केलें आहे. 'रागिणी' कादंबरींत "मी हेंच सांगितलें आहे की, प्रेमाशिवाय 'हक्का'ची भाषा बोलून कोणताहि प्रश्न सुटणार नाही"[१२] ही त्यांची कबुली महत्त्वाची आहे. त्यांच्या तत्त्वजीगीषु मनोभूमिकेशी ती सुसंगत आहे. स्त्रीस्वातंत्र्याबाबतच्या चर्चेंतहि असेच विचार आलेले आहेत. "स्त्रियांना हल्लीपेक्षां अधिक शिक्षण, अधिक स्वातंत्र्य दिलें पाहिजे, हीं सामान्य तत्त्वें ठीकच आहेत....." असा उल्लेख करून रागिणीचे वडील "स्त्रियांच्या मनांत कोणत्यावेळीं कोणता विचार येईल हें सांगवत नाही; स्त्रियांच्या मनाची खात्री कोणाला देतां यायची नाही" असें म्हणतात. त्याला नानासाहेब 'पुरुषजातीने केलेली स्त्रीजातीची ही निंदा आहे." अशा शब्दांत विरोध करतात.[१३] ही सारी चर्चा बरीच वरच्या पातळीची व उलट सुलट आहे. वामनरावांना स्त्रीस्वातंत्र्य अमान्य आहे असें नव्हे. पण 'बुद्धिबरोबर व ज्ञानाबरोबर प्राप्त होणारें दुःख सोसण्याला (मनुष्य प्राण्यानें) तयार असलें पाहिजे.[१४] असा त्यांचा निष्कर्ष आहे.

(१२) विचार विहार : स्त्रियांच्या हक्कासंबंधी (१३) रागिणी पृष्ठें २६८-२३९. (१४) रागिणी २६९.

यावरून ' रागिणी'तला स्त्रीजीवन विषयक प्रमुख प्रश्न म्हणजे त्यांचे हक्क, कर्तव्ये, यांतला विरोध हाच होय. ह्याच प्रश्नाच्या अनुरोधाने स्त्री-स्वातंत्र्य, मनूने स्त्रियांची केलेली नालस्ती, इ. प्रश्न आलेले आहेत. ही कादंबरी लिहितांना वामनरावांना स्त्रीजीवन विषयक प्रमुख प्रश्नांची कल्पना आली होती असें दिसतें. पण त्याची भूमिका अद्याप ' काव्यशास्त्रविनोद ' तात्त्विक चर्चा करणाराची होती. ह्यापुढे त्यांनी अधिक खोलांत शिरून त्यांनी स्त्रीजीवनाचें अवलोकन केलें. त्याचें आविष्करण त्यांच्या इतर कृतींतून आलें आहे. या ठिकाणीं त्यांची भूमिका ही केवळ तत्त्वचिंतकाची होती. तिच्यांत विशेषसा आग्रह नव्हता.

असें असलें तरी ह्या कादंबरीने वामनरावांना स्त्रीजीवनाचे भाष्यकार म्हणून बरीच लोकप्रियता मिळाली. त्यांच्या समन्वयवादी वृत्तीमुळे ते सनातनी व सुधारक दोन्ही पक्षाच्या लोकांत स्वतःविषयी आदराची भावना निर्माण करूं शकले. ह्याचें इंगित त्यांनी केलेल्या तात्विक विवेचनांत नसून स्त्रीजीवनाच्या प्रातिनिधिक अशा ज्या नन्या व्यक्तिरेखा त्यानी या कादंबरींत तयार केल्या त्यांत आहे. स्त्रीजीवनविषयक आदर्श त्यांनी ह्या नव्या व्यक्तिचित्रांच्या द्वारें समाजापुढे ठेविले व तेंच त्यांचें वैशिष्ठ्य होय. ' काव्य शास्त्र विनोदा'वर चर्चेची भूमिका न सोडतां त्यांनी हीं जी व्यक्तिचित्रें निर्माण केलीं त्यायोगाने ते खूप लोकप्रिय झाले, त्या व्यक्तिचित्रांचें अवलोकन करणें आवश्यक आहे.

हरिभाऊंच्या नंतर वामनरावांनी महाराष्ट्रीय स्त्रीच्या विविध समस्यांचें दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न केला. हरिभाऊ ज्यावेळीं आपल्या ऐतिहासिक कादंबऱ्या लिहित होते त्यावेळीं महाराष्ट्रीय समाजांत शिक्षणाचा प्रसार होत होता. एक नवी स्त्री किंवा महाराष्ट्रीय स्त्रीचें व्यक्तित्व नव्याने जन्मास येत होतें. ह्या नव्या स्त्रीकडे हरिभाऊंचे लक्ष गेलें होतें. ' कर्मयोग ' मधील लिलीच्या द्वारें त्यांना तिच्या अंतरंगाचें दर्शन व्हावयास लागलें होतें असें दिसतें. तथापि त्यांना तिचें अधिक सखोल आविष्करण करावेसें वाटलें नाहीं. तें काम

इतरांकरतां त्यांनी ठेविलें असावें असें वाटतें. अशा 'इतरां'त पहिला क्रम वामनरावांनी पटकावला. नव्या स्त्रीचें अंतरंग महाराष्ट्रासमोर वामनरावांनी रागिणी व उत्तरा यांच्या चित्रणाद्वारें उघडे केलें. तों वेळपर्यंत "इंग्रजी शिक्षणाच्या अर्ध्या हळकुंडाने पिवळ्या होऊं पाहणाऱ्या तरुणी, गर्विष्ट, फाजील, वडिलांचा मान न ठेवणाऱ्या, उर्मट व थिल्लर होतात, अशी समजूत सर्व साधारणपणें रूढ झाली होती. त्या वेळच्या या समजुतीला वामनरावांच्या रागिणीनें व उत्तरेने आळा घालून समाजास स्त्रीशिक्षणाची महति उत्तम रीतीने पटवून दिली"[१६] थोडक्यांत सुशिक्षित स्त्रीच्या ठिकाणचें व्यक्तित्व त्यांना उत्कटत्वानें प्रतीत झालें. त्या व्यक्तित्वाच्या लोलकांतून आपल्या दृष्टीकोणाची प्रकाशशलाका घालवून स्त्रीजीवनविषयक आविष्करणाचें विविधरंगीं इंद्रधनुष्य त्यांनी समाजाला दर्शविलें. रागिणी आणि उत्तरा ह्या वामनरावांच्या पहिल्या मानसकन्या होत. त्यांच्या द्वारें वामनरावांनी समाजापुढे व सुशिक्षित स्त्रियांपुढे दोन वेगळाले आदर्श ठेविले आहेत. 'काव्य शास्त्र विनोद' प्रधान दृष्टीला दिसणारी उत्तरा ही 'हिंदु सफ्रेजेट' आहे. स्वातंत्र्यवादिनी प्रवृत्तीची ती प्रतीक आहे. तिला मनू याज्ञवल्क्य आदि जुन्या स्मृतीकारांचें नांव काढलें की तिटकारा येतो. पुरुषांच्याबद्दल सहाजिकपणें एकप्रकारची आढी तिच्या मनांत आहे. 'मी फार मानी, भांडखोर, कजाग आहे. मी कोणाच्या अंकित राहावयाची नाही. माझें कोणाशी पटावयाचें नाही. मी कधीं लग्न करीन असें मला वाटत नाही, रागिणी, हें नुसतें विनोदाचें लिहिणें नाहीं. यांत सत्याचा अंश आहे." [१७] अशा प्रकारची तिची कैफियत आहे. तिला अनुसरून तिचें स्वभावचित्रणहि झालेलें आहे. स्वातंत्र्यवादिनी स्त्रीचे स्वभावविशेष अशा प्रकारें उत्तरेंत एकत्रित झाले आहेत. ती त्या दृष्टीने त्या विचारांच्या स्त्रियांची प्रतिक आहे. "जिचें मन शुद्ध, निष्कपट आणि प्रेमळ होतें, परंतु शिक्षणामुळे जिचे विचार बरेचसे बदलले होते व जिच्यामध्ये विलक्षण बावदूकता आली होती...सर्व पुरुष जातीने स्त्रीवर्गाला खाली

१६ अ. म. साहित्य सं. नेने पृ. ९९ (मराठी कादंबरी)
१७ रागिणी पृ. १७४.

दडवण्यासाठी प्रयत्न केला व अजूनहि तसा प्रयत्न पुरुष वर्गाकडून होत आहे, असें जी उघडउघड प्रतिपादन करीत असे. " अशा प्रकारची उत्तरा होती. तथापि वामनरावांना तिच्या व्यक्तित्वाची जाणीव झाली व नंतर ती केवळ प्रतीक न ठरतां तिचें व्यक्तीत्वपूर्ण स्वभावचित्र अवतीर्ण झालें. आपल्याच विचारांशी तिचा संघर्ष येतो. तिच्या मनाचीं विविध आंदोलनें व तिच्या विविध कृती ह्यांचें दिग्दर्शन लेखकाने इतक्या सहानुभूतीने केलें आहे की शेवटीं तिचें विचारपरिवर्तन होतें तें विसंगत न वाटतां सुसंगत वाटतें. तत्त्वशोधक वामनरावांवर व्यक्तिचित्रणकार वामनरावांनी विजय मिळविला आहे. उत्तरेच्या स्वभांवांत हा जो बदल झालेला दाखविला आहे. तो सामाजिक दृष्टीने फार महत्त्वाचा आहे. त्याच्या योगाने स्वातंत्र्यवादिनी स्त्रियांचे विचार, ध्येयें, इत्यादि बद्दल समाजाचे मनांत जी विकृत भावना होती तिच्याऐवजी आदराची भावना निर्माण झालेली असणें शक्य आहे. अशाप्रकारें उत्तरा ही मराठी वाङ्मयातील पहिली वैशिष्ट्यपूर्ण अशी स्वातंत्र्यवादिनी स्त्री होय. वामनरावांनी तिच्या द्वारें सुशिक्षित स्त्रीयांचें अंतरंग अत्यंत हळुवारपणें समाजाला उघडें करून दाखविलें आहे.

उत्तरेप्रमाणे रागिणी हीहि वामनरावांची प्रसिद्ध मानसकन्या आहे. प्रवृत्तीने ती खरी वामनरावांची मानसकन्या शोभते. उत्तरेच्या द्वारें वामनरावांनी सुसंस्कृत मुलीवर स्त्रीशिक्षणाचा परिणाम काय होणें शक्य आहे हें दाखविलें तर रागिणीच्या द्वारें समन्वयाचा नवाच नमुना-समाजापुढे त्यांनीं ठेविला आहे. तिचें एकंदर चित्रण वामनरावांनीं अधिक आपले पणाने केलें आहे. वामनरावांना ती अधिक जवळची वाटत असावी असें कादंबरीस दिलेल्या नांवावरून सूचित होतें.

उत्तरा करारी, आत्मप्रत्ययी, आग्रही आहे, तर रागिणी 'नव्याजुन्याचा समंजसपणें मेळ घालू पाहणारी, 'उच्चत्तम पावित्र्य व श्रेष्ठ धारिष्ट्य आणि आनंदयुक्त शांतता हाच जिचा स्वभाव होता. सामान्य सुखलालसा, लोकनिंदेची भिती व औदासीन्य, ही जिची केवळ क्षणिक

विकृति होती " [१८] अशी आहे. उत्तरेपेक्षा तिचें जीवन थोडें वेगळें आहे. उत्तरा अविवाहित आहे व आनंदरावावर आपलें व आनंदरावांचें आपणावर प्रेम आहे कीं नाही, ह्याबद्दल तिच्या मनांत संघर्ष चालू आहे. तिची प्रीति-भावना व तिची आत्मभावना त्यांच्यांतला तो झगडा आहे. उलटपक्षी रागिणीचा विवाह झालेला आहे व आध्यात्मिक ध्येय-पूर्तीच्या अनिवार लालसेने तिच्या पतीने संसाराचा परित्याग केलेला आहे. किंबहुना ती काशीकडे गेली असतां तिला चमत्कारिक रीतीनें आपल्या पतीच्या मृत्यूच्या वार्तेलाहि तोंड द्यावें लागलें आहे. तिचे वडील व इतर लोक पुनर्विवाहाचाहि आग्रह करतात. तिची पण प्रवृत्ति त्या विचाराला अनुकुल झाली होती. हेंहि एकदां लेखकाने कौशल्याने दर्शाविलें आहे. अशा रीतीने रागिणीच्या जीवनांत वेगळ्याच प्रकारचा संघर्ष चालू आहे. भय्यासाहेबांच्या उपस्थितीमुळे तिच्या जीवनाला एक नवीच कलाटणी मिळाली आहे व तें आनंदमय झालें आहे. हा भाग वेगळा. उत्तरेपेक्षा तिचें जीवन अधिक संकटमय असतें. त्या योगें तिच्या विषयीं अधिक सहानुभूति वाटते. तिच्या पतीच्या विचाराचें परिवर्तन झालेलें पाहून एकंदरीनें वाचकास समाधान प्राप्त होतें. ती अत्यंत कर्तव्यनिष्ठ आहे. गोष्टी, कादंबरी लिहिण्याइतकी ती बुद्धिमानहि आहे. तिच्या अंगांच्या ह्या विविध गुणामुळेंच तिच्याबद्दल आपलेपणा वाटूं लागतो. तथापि तिच्या गुणसंचयापेक्षां आत्मप्रत्ययवादी उत्तरा अधिक वैशिष्ट्यपूर्ण व आकर्षक वाटते. वामनरावांच्या दृष्टीला सत्‌वृत्त स्त्रीचें दर्शन झालें तें रागिणीच्या द्वारें त्यांनी सर्वसाधारण समाजाला घडविलें आहे.

अशा प्रकारें 'रागिणी' ह्या कादंबरीत वामनरावांनी रागिणी व उत्तरा हीं दोन सुशिक्षित स्त्रियांची स्वभावचित्रें रंगविलीं आहेत. त्यांच्या द्वारें स्वच्या आधुनिक मराठी स्त्रीच्या जीवनांत जरी नसला तरी मराठी साहित्यांत संचार सुरू झाला. हीं दोनहि पात्रें तत्कालीन समाजाला फार

१८ वामन मल्हार वाङ्मय दर्शनः पृ. ३७

आवडलीं. रागिणीकर्ते म्हणून वामनराव ओळखिले जाऊं लागले. आधुनिक महाराष्ट्रीय सुशिक्षित स्त्रीचें मन त्यांना व्यक्त करतां येईल अशा दृष्टीने लोक त्यांच्याकडे पाहूं लागले. लोकांच्या त्या अपेक्षा त्यांनी कशा पुऱ्या केल्या तें पुढील कथांद्वारें पाहावयाचें आहे.

'रागिणी' नंतर वामनरावांनीं 'आश्रम हरिणी' ही कादंबरी लिहिली. हीहि कादंबरी १९१६ साली प्रसिद्ध झाली. म्हणजे तीहि १९२१ च्या पूर्व कालांतीलच आहे. हा कादंबरी अत्यंत लहान आहे. पण वैशिष्ट्यपूर्ण आहे. स्त्रीजीवनाचे दृष्टीने ह्या कादंबरीचे स्थान बरेंच महत्त्वाचें आहे. तत्कालीन सामाजिक जीवनावरून आपलें लक्ष काढून वामनरावांनी पूर्वकालीन ऋषींच्या आश्रमांत प्रवेश करून तेथल्या जीवनाचें दर्शन घडविलें आहे. आश्रमीय जीवनांतील शुचिता, साधेपणा, इत्यादि या ठिकाणीं प्रत्यय येतो. कादंबरीला पूर्वकालीन एका संस्कृत पोथीच्या भाषांतरांचें रूप दिलें आहे. मधून मधून योग्य ते उल्लेख करून उदा. प्रारंभीचे श्लोक असलेला कागद कसरीने खाल्लेला आहे. वर्णन पाल्हाळिक आहे पण तें महत्त्वाचें नाहीं. इ. योग्य प्रकारचा आभास निर्माण केला आहे. आश्रमीय वातावरणाची शुचिता इ. नष्ट होईल असेंहि फारसें कांही नाही. धौम्य व गभस्तीगती हे शिष्य असतात त्यांचें दोघांचें सुलोचना नांवाच्या गुरुच्या नातीवर प्रेम असतें. ती आश्रमाच्या पवित्र वातावरणांत वाढलेली असते, पुढे धौम्याशी तिचा विवाह होतो. पण त्याचेवर राजप्रकोप होतो. तो परागंदा होतो. त्याला ठार मारण्याबद्दल राजाची आज्ञा असते. पण ते त्याला सोडून देतात. कांही तरी बनावें करून राजाची खात्री पटवितात. (एका दुसऱ्याच माणसाचें प्रेत राजापुढें करतात व राजा ते आश्रमांत पाठवितो.) त्यामुळे धौम्य हा मृत झाला असें सिद्ध होतें. सुलोचनेवर वैधव्य प्रसंग येतो. पण तिला तिचे आजोबा पुनर्विवाह करण्यास सांगतात. ती गभस्तीगतीशी पुनर्विवाह करते. कर्मधर्मसंयोगाने धौम्य परत आश्रमांत येतो. त्यांच्यांत काय करावें हा प्रश्न निर्माण होतो. दोघेहि एकत्र राहातात असें वामनरावांनीं दाखविलें

आहे. गुरुही त्यांना पांडवांचें उदाहरण देऊन तसें करण्यास हरकत नाही इ. सांगतात.

ह्या कथेवरून ही कादंबरी जरी पूर्वकालीन जीवनासंबंधी असली तरी तिच्यांतला जो प्रसंग आहे वा प्रश्न आहे तो पूर्वकालीन वाटत नाही. स्त्रीजीवनविषयक हा जो नवाच प्रश्न त्यांनी ह्या कादंबरीत निर्माण केला आहे तो निश्चितपणें अपूर्व आहे. व त्या प्रश्नामुळेच ह्या कादंबरीला महत्त्व प्राप्त झालें आहे. वामनरावांनीं जो निष्कर्ष समाजापुढे मांडला आहे तो समाजाला फारसा नापसंत पडूं नये म्हणून त्यांनी आश्रमीय पवित्र वातावरण निर्माण केलें आहे कीं जेथे थिल्लरपणा, छचोरपणा, अनीतिमयता इ. ना वाव नाही. आधुनिक जीवनाच्या पार्श्वभूमीवर असा प्रश्न निर्माण करणें व मांडणें फारच कठीण होतें. त्या दृष्टीने इतिहासकालीन जीवन आधारास घेतलें आहे तें योग्य झालें असें म्हणतां येईल.

अर्थात हा प्रश्न इतका अपवादभूत होता कीं समाजाची विचाराने मजल तेथपर्यंत गेली नव्हती. अशा परिस्थितींत लेखकावरहि कांहीं मर्यादा पडल्या होत्या. पहिल्या आवृत्तींतून त्यांनीं ह्या प्रसंगांतून सुटका करून घेण्यासाठीं गभस्तीगती व सुलोचना ह्यांना सर्पदंशाने अकल्पितपणें मृत्यु येतो असें दर्शविलें होतें. त्यायोगें द्विपतिकत्वाचा प्रश्न टळण्याचा यत्न त्यांनीं केला होता. तथापि नंतरच्या आवृत्तींत वाचकांच्या रूढ समजुतीना जबरदस्त धक्का देण्यासारखा प्रश्न व प्रसंग विचित्र केला. त्यावरून वामनरावांचें स्त्रीजीवनविषयक विचार किती तरी किती पुढे गेले होते हें स्पष्ट होतें.

'आश्रम हरिणीची' कल्पना टेनिसनच्या Enoch Arden वरून सुचली असावी असें अनेक टीकाकारांचें मत आहे. त्यांत ग्राह्यांशाचा भाग आहे हें वामनरावहि कबूल करतात. तथापि आपल्या निष्कर्षांत क्रांतिकारकपणा आहे त्याची त्यांनाहि कल्पना आहे. त्यासाठी त्यांनीं इशारा दिला आहे तो महत्त्वाचा आहे. जें झालें तें अपवादात्मक खरें, पण सृष्टि-

क्रमाला धरून झालें. आमचें अनुकरण इतरांनीं करावें किंवा नाहीं हें मी काय सांगू ? द्विपतिकत्वाचें अनुकरण न केलेलें बरें, पण पुनर्विवाहाबद्दल मी निश्चित सांगूं शकेन की, पुष्कळ वेळां तो आत्मोन्नतिकारक होऊं शकेल.''[१९]

हें असल्या प्रकारचें समर्थन लेखकाने कितीहि केलें असलें तरी प्रतिपाद्य विषयाला पोषक अशी पार्श्वभूमि या कादंबरींत नव्हतीं. आपला निष्कर्ष समाजाला फारसा अस्वीकार्य वाटूं नये म्हणून ती पार्श्वभूमि जरी लेखकाला स्वीकारावीशी वाटली तरी तें वातावरण व विषय-(प्रतिपादन) ह्यांत जमीन अस्मानाचें अंतर होतें--त्याद्दष्टीने '' पुस्तकांतील स्थल, काल, व्यक्ति, वातावरण व त्यांतील प्रतिपाद्य विषय लक्षांत घेतला म्हणजे मुग-ड्यांत गुपचुपपणें बांधलेली अंडीं घरीं जाऊन भक्षण करणाऱ्या एखाद्या धर्ममार्तंडाला पाहून जी मौज वाटेल ती वाटल्याशिवाय राहात नाहीं'' [२०] हे वि. ह. कुलकर्णी यांचे उद्गार सार्थ वाटूं लागतात. प्रेम ही भावना तिला आलेलें व्यक्तित्व आकर्षणाचें स्वरुप हीं आधुनिक आहेत. पूर्वकालांत 'प्रेमा'ला फक्त 'कामा'चें स्वरूप दिलेलें असे. तो एक 'विकार' आहे अशा दृष्टीने त्याच्याकडे पाहिलें जाई. व्यक्तित्वाच्या आविष्काराशीं त्याचा कांहीं संबंध आहे ही कल्पना त्या कालांत संमत नव्हती. त्या दृष्टीने वामनरावांच्या हातून कालविपर्यासाच्या (भावनात्मक दृष्टीने पाहतां) दोष झालेला आहे. पुनर्विवाहाच्या पुरस्कारासंबंधीहि तसेंच म्हणतां येईल. स्त्रियांकडे सहानुभूतीने पाहाण्याची वृत्ति ही आधुनिक आहे. स्मृतिकारांपैकीं अत्यल्प स्मृतीकारांनी स्त्रियांना पुनर्विवाहाची सवलत दिली आहे. इतर स्मृतिकार व समाज हे त्याबाबत पूर्णपणें अनुदार होते. तेव्हा ऐतिहासिककथा म्हणून पाहतांना ह्या प्रकारचा काल विपर्यासाचा दोष झालेला आहे हें मान्य करावें लागेल. तथापि ही कथा लिहितांना 'वामनरावांचा मूळ उद्देश, सुलोचना ही शेवटीं धौम्य आणि गभस्थिगति या दोघांशीहि पत्नी या नात्याने राहते, हें दाख-

१९ आश्रमहरिणी पृ. ८४ २७ अर्वाचीन म. साहित्य सं. नेने पृ. ९९ (कादं. विभाग)

विण्याचा होता'[२१] ही गोष्ट उघड आहे. तथापि त्यांना आपलें मन स्पष्टपणें मांडण्याचें धाडस प्रथम झालें नाहीं. नंतर मात्र तें मनोधैर्य त्यांनी दर्शविलें.

ह्या 'कादंबरिकें'तला हा जो स्त्रीजीवनविषयक प्रश्न आंहे तो फार महत्त्वाचा आहे. 'रागिणी' नंतर वामनरावांनीं विचारदृष्ट्या किती प्रगति करून घेतली होती ह्या गोष्टीचा प्रत्यय ह्या प्रश्नावरून येतो. अर्थात् या प्रश्नाचें स्वरूप हें विवाद्यच राहणार. निकटवर्ति भविष्यकाळांत ही शक्यता प्रत्यक्षांत उतरेल असें वाटत नाही. स्त्री व पुरुष यांच्या हक्कांत समानता आहे या भूमिकेवरून ही प्रतिक्रिया संभवलेली आहे. पुरुषांना अनेक स्त्रिया पत्नि म्हणून स्वीकारतां येत होत्या. तेव्हा तेंच स्वातंत्र्य अपवादरूपाने कां होईना स्त्रियांना द्यावयास काय हरकत आहे? अशा प्रकारचा युक्तिवाद ह्या द्विपतिकत्वाच्या पुरस्कारार्थ करतां येणें शक्य होतें. पण आज प्रत्यक्ष समाजांत एका वेळीं एक पुरुष व एकच स्त्री यांनी पतिपत्नि म्हणून राहावें ही कल्पना सर्वसंमत झाल्यासारखी दिसते. व दोन्ही प्रकारच्या इतर शक्यता ह्या आजतरी--तात्पुरत्या म्हणावें हवेंतर,--लुप्त झाल्या आहेत. शिवाय व्यक्ति-स्वातंत्र्याच्या कल्पनेशीं तें कितपत सुसंगत होईल याची शंकाच आहे. वामनरावांनीच म्हटल्याप्रमाणे अपवादात्मक म्हणून असें एखादें उदाहरण असावयास तत्त्वतः हरकत नाही. व्यवहारांत तें अशक्य आहे. आज समाज रचनाहि प्रायः पुरुषप्रधान आहे. पुरुषाला कुटुंबांत कांही स्थान आहे, अधिकार आहेत, त्यादृष्टीने ह्या पद्धतीने अनेक घोटाळे मात्र निर्माण होतील. अनेक स्त्रिया करण्याची पद्धति हिंदुसमाजांत असली तरी स्त्रीला कांही हक्कच नव्हते, म्हणून त्या पद्धतीने कोणताहि सामाजिक प्रश्न निर्माण होऊं शकला नाही. तसें ह्या प्रश्नाचें नव्हे. मुलांच्या प्रश्नावरून संघर्ष सुरू होणार. त्याहि दृष्टीने ही कल्पना स्वीकार्य होईल असें वाटत नाही. विचारांच्या दृष्टीने जे लोक आज पुढे आहेत ते कुटुंब संस्थेच्याच पलीकडे गेले आहेत. असो.

---

२१ अ. म. साहित्य, नेने, पृ. ९९.

वामनरावांनी निर्माण केलेल्या प्रश्नाबाबत जरी उलट सुलट मतें प्रदर्शित होऊं शकलीं तरी त्यांनीं ह्या स्वरूपांत हा जो प्रश्न समाजापुढे मांडला तो निश्चितपणें कौतुकाई आहे. लोकांना विचार करावयास भरपूर अवसर त्यांनीं ह्या प्रश्नाच्या प्रतिपादनाने करून दिला. 'आश्रमहरिणी'चें तेंच वैशिष्ट्य.

'आश्रम हरिणी' ह्या वामनरावांच्या कादंबरींतला हा विशिष्ट स्त्रीजीवनविषयक प्रश्नच महत्त्वाचा आहे. ज्या स्त्रीच्या व्यक्तित्वाची चुणूक वामनरावांनी 'रागिणीं'त दाखविली. तिच्या जीवनाकडे विविध दृष्टीने पाहिलें असतां कशा प्रकारच्या विकट समस्या निर्माण होणें शक्य आहे ह्या गोष्टीकडे या कादंबरीच्या द्वारां त्यांनीं अंगुलिनिर्देश केला आहे. प्रत्यक्ष व्यक्तिचित्रणाच्या दृष्टीने या कादंबरींत 'सुलोचना' हें एवढेंच व्यक्तिचित्र आलें आहे. ती एक आश्रमस्थ कन्यका आहे. आश्रमाच्या निरागस उदात्त वातावरणांत ती वाढली आहे. तिच्या मनांत वेळोवेळीं भावनांचे कल्लोळ उठतात. विवाहाचा प्रश्न निघतांच ती म्हणते "आजोबा. मी तुम्हांला सोडून जावयाची नाही. हा आश्रम आणि तुमचें हें उटज सोडून न जातां मला विवाह करतां आला, तरच मी विवाह करीन" [२२] व आजोबांच्या सांगण्यावरून ती विवाहबद्ध होते. विवाहोत्तर ती आश्रमांतच राहते व इतर शिष्यांकडून 'आई' हें अभिधान प्राप्त करून घेते. परंतु पतिनिधनानंतर तिच्या मनांत प्राणत्याग करण्याचा विचार येतो. त्यावेळीं कुलपतीच्या सांगण्यावरून ती आत्मत्याग न करतां पुनर्विवाह करते. शेवटीं जेव्हा धौम्य परत येतो तेव्हां तिच्या आयुष्यांत परत संघर्ष होतो. परंतु कुलपतीचा निर्णय तिला मानावा लागतो, असें दिसतें. अर्थात या प्रसंगाची तिच्या मनावर काय प्रतिक्रिया होते हें लेखकाने दिद्दर्शित केलें नाही. अशा प्रकारें सुलोचना ही एक अबोल व धर्माचाराप्रमाणे वर्तन करणारी, नागरजीवनापासून दूर राहणारी अशी आश्रमकन्या आहे. पण कोणाही नागर आणि आधुनिक

२२ आश्रमहरिणी पृ. ५०.

स्त्रीच्या जीवनांत निर्माण होणार नाहीत असे प्रश्न तिच्या जीवनांत निर्माण झालेले आहेत. आश्रमवासी स्त्री असल्याने कुलपतीची आज्ञा प्रमाण मानणें हेंच तिचें कर्तव्य. वामनरावांनी तिचें स्वभावचित्र त्यादृष्टीने कौशल्याने रंगविलें आहे. एखाद्या लेखकाला तिला बोलकी करून विविध विचार तिच्या कडून वदविण्याचा मोह झाला असता. पण वामनरावांनी तो टाळला आहे आणि हें कलेच्या व स्वभावचित्रणाच्या दृष्टीने अत्यंत समुचित झालें आहे. वामनरावांच्या विविध विवादपट्ट स्त्रियांत अबोल व मूकपणाने जीवन जगणारी आश्रमहरीणी 'सुलोचना' ही एक रमणीय स्वभावकृति आहे असें म्हणतां येईल. पुनरुद्वाहास पवृत्त करतांना 'आत्मप्राप्तिची' खरी इच्छा असेल तर' अशी अट घालावी लागली, तसेंच 'पुनर्विवाह हा आत्मोन्नति-कारक आहे' असें पटवून द्यावें लागतें. 'आत्मोन्नति'च्या ह्या उल्लेखांनी कालसापेक्षतेची जाणीव अधिक तीव्र होते. त्यायोगें तिचें चित्रण अधिक स्वाभाविक झालें आहे.

वामनरावांची 'नलिनी' ही कादंबरी बऱ्याच टीकाकारांच्या मतें त्यांच्या इतर कादंबऱ्यांच्या मानाने बरीच अल्पगुणी आहे. सामान्यत: तें खरें आहे. कादंबरींत राजकीय विषयास प्राधान्य देण्याचा लेखकाचा प्रयत्न दिसतो. कादंबरींतील निरानिराळ्या पात्रांना आपल्या कार्यांत अपयश प्राप्त होतें. तरुणांची पण दिशाभूल होते. या गोष्टीचें स्पष्टीकरण लेखकाने 'देश विपरीत परिस्थितींत असला म्हणजे अशा गोष्टी व्हावयाच्याच" [२२] असें एखाद्या पात्राच्या मुखाने वदविलें आहे. जहाल, मवाळ, क्रांतिकारक इ. पक्ष गुप्त पोलीसांच्या कारवाया इ. ना कादंबरींत बराच वाव मिळाला आहे. '१९०८ च्या सुमारास कांहीं भावनावश तरुणांच्या उत्कट देशभक्तीला जे निरानिराळे फाटे फुटूं लागले होते त्यांचें अस्पष्ट, अपूर्ण व असमाधान-कारक प्रतिबिंब या कादंबरींत पाहावयास सांपडतें...ही कादंबरी तात्विक स्वरूपाची नसून रहस्यमय व कथानकप्रधान आहे...त्यांना जें कांही

२२ 'नलिनी' पृ. २८०.

सांगावयाचें होतें तें स्पष्टपणें न सांगतां आल्यामुळें ही रागिणीची छोटी बहिण नकटी ठरणें क्रमप्राप्त होतें " [२३] हा एका टीकाकारांचा अभिप्राय ध्यानांत धरण्यासारखा आहे.

नांवावरून तरी लेखकाला नायिकेच्या स्वभाव वा जीवनाचित्रणाला प्राधान्य द्यावयाचें असावें. पण प्रत्यक्षांत तसें घडलेलें दिसत नाही. या कादंबरींत वामनरावांनी प्रौढ अविवाहित कुमारिकांचा प्रश्न अस्पष्टपणें मांडण्याचा यत्न केला आहे. कमला व नलिनी ह्या दोघीजणी बहिणी आहेत. दोघीजणी 'सुशिक्षित' आहेत. त्यांच्या विवाहाचा योगायोग येत नाहीं. व यांचें कारण 'देश विपरीत अवस्थेंत असला म्हणजे गुण हे दुर्गुण होतात. सज्जनांना दुर्जनांप्रमाणे वागविण्यांत येतें; एकंदरींत सगळ्याच गोष्टी विपरीत होऊं लागतात...' [२४] लेखकाचे मतें नलिनीला वसंतरावांशी विवाह करतां येऊं नये यांचें कारण समाजस्थिती, पारतंत्र्यच. वामनरावांनी कोणत्यातरी अस्थिर मनःस्थितींत ही कादंबरी लिहिली असावी. कारण एकंदरीने कादंबरींत संदिग्धता बरीच आहे. पण स्थूलमानाने वामनरावांना प्रौढ सुशिक्षित कुमारीकांच्या विवाहाचा प्रश्न मांडावयाचा होता असें दिसतें. कमलेचा विवाह होऊं न शकल्याने तिच्या मनांत मोहवशतेचा प्रादुर्भाव झाला. त्यांतून तिच्यावर संकट परंपरा कोसळली, व तिला प्राणास मुकावें लागलें. हा प्रसंग ह्या प्रश्नाचें स्वरूप भडकपणे दर्शविण्याकरितांच योजला असावा असें वाटतें. त्या प्रसंगाच्या अनुषंगाने वामनरावांनी बरेच मूलगामी विचार प्रकट केले आहेत. " स्त्रियांचें पाऊल वांकडें पडलें किंवा वाकडें पडण्याच्या बेतांत होतें एवढें जरी कळलें तरी ती समाजाच्या आदराला आणि प्रेमाला पुरी मुकते. इतकी की तिचा पश्चात्ताप, तिचे इतर सद्गुण, तिचा पुढचा स्वार्थत्याग, हीं सर्व मातीमोल होतात, आणि आपण मेलेलें बरें असें तिला व तिच्या...आईबापांनाहि वाटूं लागतें! " [२५] असे

२३ अ. म. सा. (नेने) पृ. १००.

२४ नलिनी पृ. २४१. २५ नलिनी पृ. १३१.

सहानुभूतीचे उद्गार काढून समाजास स्त्रियांच्या बाबत अधिक उदार होण्या-ण्यासाठी आवाहन केलें आहे. स्त्रियांची नीतिमत्ता व पुरुषांची नीतिमत्ता यांकडे पाहतांना अशी भिन्न दृष्टि कां बरें असावी ? स्त्रियांची पापवृत्ति जोखतांना सोन्याचा नाजूक काटा आणि पुरुषांची पापवृत्ति जोखतांना कोळ-शांचा ओबड धोबड कां बरें वापरण्यांत येतो." [२६] इ. प्रश्न उपस्थित करून त्यांनीं आपले विचार विस्तृपणें व्यक्त केले आहेत. " स्त्रियांच्या निर्दोषतेवर पुरुषांपेक्षा अधिक करडी नजर जी ठेवण्यांत येते, त्यांत न्यायाचा किंवा नीतीच्या अंशापेक्षा कमी अधिक आर्थिक स्वातंत्र्याचा, कमी अधिक प्रबल-तेचा व कमी अधिक हेव्याचा अंश अधिक आहे असें प्रथमदर्शनी दिसतें. व मला तरी निदान द्वितीय दर्शनी देखील तेंच दिसतें. " [२७] ह्या उल्लेखां-करून सदर कादंबरी लिहितांना वामनरावांचे स्त्री-जीविषयक प्रश्नाकडे दुर्लक्ष झालें होतें असें नव्हे. पण त्याला आवश्यक तेवढा उठाव मिळाला नाही हें मात्र खरें.

क्षिक्षणाच्या बाबतींतहि तसेंच आहे. शिक्षण योग्य कोणतें याबाबत नलिनी व वसंतराव यांत संवाद होतो. वसंतरावाचा काल राष्ट्रीय शिक्षणाकडे अधिक आहे. नलिनीचा व्यापक शिक्षणावर आहे. शिक्षणावर उलट सुलट विचार त्यांच्या संवादातून व्यक्त केले आहेत. लेखकाच्या समन्वयवादी दृष्टीला सर्व साजेसे आहेत. कारण दोहींतही ग्राह्य भाग लेखकाला पुढे ठेवावासा वाटतो. अशाप्रकारें या कादंबरींत प्रौढ कुमारिकांच्या विवाहाचा प्रश्न, पतित स्त्रीकडे सहानुभूतीने पाहाण्याची जरुरी, शिक्षण कसें असावें इ. विचार वा प्रश्न मधून मधून आले आहेत. पण एकंदरीने चित्रण ठसठशींत नाहीं. साक्षेप ही कमी.

ह्या कारणानेच ह्या कादंबरींतील स्त्री चित्रें प्रभावी वा आकर्षक राहिलीं नाहींत. नलिनी, कमला, आवडी, हीं प्रमुख चित्रें आहेत. नलिनी व कमला अविवाहित आहेत. कमला मोहवश होते व दिवाणजीच्या भुलाव-

२६ नलिनी पृ. १३२. २७ कित्ता पृ. २३५. १३६.

णीला वळी पडते. प्रौढ कुमारिकांचा प्रश्न दर्शवितांना हें जें अधःपतन दाखविलें आहे तें विषयाच्या दृष्टीने परिपोषक आहे. नलिनी ही अधिक समंजस, अधिक बुद्धिवान असली तरी चुकीच्या मूल्यांना महत्व देणारी अशी मुलगी आहे. त्या दृष्टीने विचार करतां तिचें चित्रण हें बरेंच वास्तवदर्शी झालेलें आहे असें म्हणावें लागेल. नलिनीला लग्न करण्याचें सुचवावें तर ती म्हणते, " वायकांनीं लग्न केलेंच पाहिजे असें शास्त्र आहे कीं काय ? चांगले तरुण पुरुष नाहीं कां लग्न केल्याशिवाय रहात ? " [२८] या उल्लेखांनी एकंदरीने रागिणी—उत्तराच्या पुढची पायरी या कादंबरींत गाठली आहे असें म्हणतां येईल.

' नलिनी ' नंतर जवळ जवळ दहा अकरा वर्षांनी वामनरावांनी आपली ' सुशिलेचा देव ' ही कादंबरी लिहिली. दरम्यानच्या कालांत त्यांचे ' साक्रेटिसाचे संवाद ' 'नीतिशास्त्र प्रवेश', ' विचार विलास ' हीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं होतीं. एक तत्त्वचिंतक वा तत्त्वज्ञान, नीतिशास्त्र यांचे अभ्यासक म्हणून ते महाराष्ट्रांत प्रसिद्ध झाले होते. १९२० नंतर विज्ञानशास्त्राचा अभ्यास अधिक जोराने होऊं लागला. व समाजशास्त्रीय उच्च प्रश्नहि मोठ्या आस्थेने व उत्साहाने चर्चिले जाऊं लागले. ' धर्म ', 'परमेश्वर ', ' नीति ', ' न्याय ' ' सत्य ' इ. प्रश्न आजपर्यंत फक्त त्या त्या त्या विषयांच्या अभ्यासकांच्या पुरतेच मर्यादित होते. पण विज्ञान शास्त्रांच्या प्रगतीने व विशेषतः पहिल्या महायुद्धाच्या विक्राळ स्वरूपामुळे हे प्रश्न केवळ थोड्या नीति वा तत्त्वज्ञान या शास्त्रांचा अभ्यास करणारांपुरते मर्यादित न राहतां सर्व साधारण कॉलेज विद्यार्थ्यांपर्यंत त्यांची कक्षा आली. कॉलेज विद्यार्थी हिरीरीने आपलीं मतें ह्या विद्वद्गम्य विषयांवर देऊं लागले. ह्या सर्व प्रश्नांचा केंद्रबिंदु परमेश्वर त्याचें अस्तित्व, त्याच्या अस्तित्वाचे विविध पुरावे, इ. ची पाहाणी करणें हा होता. हे प्रश्न जसे पुरुष विद्यार्थ्यांच्यामध्ये चर्चिले जात होते तसें विद्यार्थिनींतही पण. वामनराव एका विद्यार्थिनींच्या महा-

२८ कित्ता पृ. २७८.

विद्यालयांत प्राध्यापक असल्याने त्यांना तरुण विद्यार्थिनींचें अंतरंग व मनोगत जवळून पहाण्याची संधि आली. व ह्या अनुभवांचें प्रतिबिंब त्यांच्या 'सुशिलेचा देव' ह्या कादंबरींत पाहावयास मिळतें. महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनकक्षा विचारांच्या दृष्टीने किती विस्तृत झाल्या होत्या तें कादंबरीच्या द्वारें चांगलें व्यक्त होतें.

ह्या कादंबरींतील स्त्री जीवनाचें चित्रण कसें झालें आहे. त्यांच्या कोणत्या प्रमुख प्रश्नांचा उहापोह या कादंबरींत लेखकाने केला आहे तें पाहण्यापूर्वी ही कादंबरी लिहितांना लेखकाचा उद्देश कोणता होता हें पहाणें आवश्यक आहे. त्यावरून कादंबरीच्या प्रतिपाद्य विषयाची कल्पना येईल. त्याच्या अनुषंगाने स्त्रीजीवनविषयक समस्यांचें विवेचन करणें योग्य होईल. "सुशिलेच्या व इतर पात्रांच्या मनांत ईश्वरविषयक कल्पनांच्या बाबतींत कशी क्रान्ति झाली. हें निरनिराळ्या प्रकरणांत दाखविण्याचा प्रयत्न केला आहे." असें स्पष्टीकरण लेखकाने प्रारंभीच्या निवेदनांत (प्रस्तावनेंत) दिलें आहे. त्यावरून या कादंबरीच्या प्रतिपादन विषयाची कल्पना येईल. लेखकाची ही भूमिका लक्षांत घेतली कीं, प्रमुख पात्रें ही विशिष्ट विचारसरणीची प्रतीकात्मक घ्यावी लागतात. तीं तशीं आहेतहि. स्पेन्सरच्या 'अज्ञेय' वादाचे पुरस्कर्ते 'गिरीधरराव' आहेत. स्वभावचित्रांच्या दृष्टीने त्यांचें पात्र म्हणजे त्या विचारसरणींचें प्रतीकात्मक दिग्दर्शन होय असें मानावें लागतें. त्या विचारसरणीचा एक परिपाक अतिरिक्त--विवेकवाद--की जो सुखवादाकडे झुकणें शक्य आहे. तेंच त्यांचे चिरंजीव 'रावबा' याच्या स्वभाव चित्रणाने दिग्दर्शित केलें आहे. या विचारसरणीच्या विरोधी विचारसरणी म्हणजे सद्सद्विवेकावर आधारलेली सत्प्रवृत्त विचारसरणी. तिचें प्रतीकात्मक दिग्दर्शन विनायकरावांच्या पात्राद्वारें होतें. ह्याच सद्सद्विवेकाच्या आधाराने, सौजन्य, विवेक, सत्कार्येच्छा, इ. सांस्कृतिक गुण वाढीला लागतात. त्यांचीं प्रतीकात्मक पात्रें म्हणजे सुशीला, बळवंतराव, सुंदराव इ. होत. ह्या सर्वांची अखंड प्रगति होत आहे. याचें कारण सद्-

सद्विवेकावर आधारलेली आहे. अविवेकी अशी सद्वृत्ति सुद्धा जगांत यशस्वी होऊं शकत नाहीं. कारण तिला विशेष परंपरा नाहीं. व म्हणून ती लोकांना पटणार नाही. ती आपोआप निष्प्रभ होणार. पण तिचें साहाय्य सौजन्यास होणार. काफच्या चित्रणाद्वारें वामनरावांनी हें, दर्शविलें आहे असें वाटतें. श्री. व सौ. स्वीट यांच्या द्वारें धर्माधिष्ठित सुबुद्धि ही एकंदरीने ठीक असली तरी तिच्या जोरावर समाजधारणा करतां येणार नाहीं. अशा प्रकारें प्रतिपादन विषयाच्या निवेदनाच्या आधारें ह्या कादंबरीचें स्वरूप दिग्दर्शन होतें. तथापि ही कादंबरी ही प्रामुख्याने 'कादंबरी' आहे रूपकात्मक कथा नव्हे हें चटकन् लक्षांत येतें. तींतील हीं पात्रें आतां पाहिल्याप्रमाणे प्रायः प्रतीकात्मक असलीं तरी तीं मानवगुण दुर्गुणयुक्त आहेत. प्रत्येकांत मानवी गुणांचा वा अवगुणांचा मोठा वाटा आहे. त्यामुळे ही सारी मानवी सृष्टि वाटते. ही सारी मानवी जीवितयात्रा विश्वकुटुंबत्वाच्या समाजरचनेकडे जात आहे व इकडे जातांना हें विश्वकुटुंबत्वाचें ध्येय हीच एकमेव जीवननिष्ठा त्यांनी प्रमाण मानली आहे. त्या ध्येयालाच देवत्व प्राप्त झालें आहे.

ह्या सर्व विवेचनावरून लेखकाचें प्रतिपादन लक्षांत घेतलें तर ही कादंबरी स्त्रीजीवनाच्या कोणत्याहि एका अंगाचें वा समस्येचें दिद्दर्शन करूं शकत नाही, त्यासाठी ती लिहिलेली नाहीं हें स्पष्ट होईल व खरी वस्तुस्थितिहि तशीच आहे. तथापि वामनरावांनी नायिका सुशिला हिच्या द्वारां आपलें विचाराविष्करण केलें आहे हें ध्यानांत घ्यावें लागतें. तें तसें घेतलें असतां प्रमुख प्रतिपादन म्हणून नव्हे पण त्याच्या अनुषंगाने स्त्रीजीवनविषयक कांही अंगाचें दिद्दर्शन केलें आहे. प्रस्तुत प्रबंधांतील विवेचनाच्या भूमिकेस धरून त्या अंगाची पाहणी करणें आवश्यक आहे. अर्थात् या ठिकाणीं अनुषंगाने आलेलें हें दिद्दर्शन व स्वभावचित्रण हीं इतकीं अविभाज्य आहेत कीं त्यांचा वेगळेपणाने विचारच करतां येत नाही.

सुशीलेला शिक्षण मिळालेलें आहे तें इतर पुरुष विद्यार्थ्यांच्या प्रमाणे व त्यांच्या बरोबरच. ह्या सहशिक्षणाने तिचे विचार व पुरुषांचे विचार यांत फरक नाही. तिचा (प्रथम) विवाहहि तिच्या संमतीनेच होतो. तो साधारणपणें ती लहान असतांनाच होत आहे हें खरें आहे. रावबाच्या अतिरिक्तविवेकवादाबद्दल तिला आदर वाटतो. त्याची सुखवादी वृत्ती जशी बळावते तसा तो अनीतीकडे जोरानें ओढला जातो. एका मर्यादेपर्यंत तें ती सहन करते पण पुढे त्याचा त्याग करते. परंतु पुढे तो आसन्नमरणावस्थेंत असतांना त्याच्याकडे परत येते. व त्याची मनोभावें शुश्रुषा करून त्याचा विश्वास संपादन करते. तिच्यांतल्या सद्वृत्तीने रावबांतलि असद्वृत्तीवर विजय मिळविलेला असतो. पुढे ती 'क्राइस्ट कॉस स्कूल' मध्ये शिकावयास रहाते. तिच्या मनांत तेथें असतांना विलक्षण क्रांति होते. धार्मिक (ख्रिश्चन) शिक्षण संस्थेंत जरी ती शिकली असली तरी तिची धर्मावरची श्रद्धा नष्ट होते. ती समाज-रचनेंतच दोष आहेत ते घालवावयास हवेत अशा विचाराप्रत येते व विश्वकुटुंब-वादाच्या ध्येयाकडे झपाट्याने जाऊं लागते. तिचे मित्र सुनंद व बळवंतराव हेहि आपापल्यापरीने समाज कार्य करण्याचा यत्न करतात. त्यासाठी तेहि त्याच ध्येयाप्रत येतात. सुशीलेचा त्यांचा वादविवाद चालू असतो. बलवंतराव सुनंदराव दोघेहि विवाहबद्ध पूर्वीच होतात. बलवंतरावावर विधुरावस्थेंत राहाण्याचा प्रसंग येतो. व मित्रांच्या आग्रहाने व स्वतःच्याहि मताप्रमाणे सुशीला ही बळवंतरावांशी पुनर्विवाह करते व तीं दोघें जगप्रवासास निघतात.

हें सारें जीवनचित्रण हें कोणत्याहि महाराष्ट्रीय स्त्रीच्या कक्षेपलीकडचें आहे. तें वास्तव न घेतां आदर्शच घ्यावें लागतें सुशीलेच्या चित्रणांत वामनरावांनी मानवी भावना इतक्या कौशल्याने ओतल्या आहेत; की त्या योगें तिच्यांतला हा आदर्शत्वाचा भाग लुप्त होतो व ती एक अत्यंत श्रेष्ठ व उदात्त अशी स्वभावरेखा आहे हें प्रत्ययास येतें.

ती विश्वकुटुंबत्वाच्या ध्येयाकडे जाणारी स्त्री आहे. हें ध्येय बाळू व सुनंद ह्या पुरुषांचेंहि आहे. म्हणजे वामनरावांनी स्त्री व पुरुष ह्यांच्या एक-ध्येयत्वाचा पुरस्कार केला आहे. या एकध्येयत्वाच्या पुरस्काराच्या आड तिचें स्त्रीपण येऊं नये म्हणून म्हणून वामनरावांनी शैक्षणिक व इतर बाबतींत पुरुषांच्या प्रमाणे व पुरुषांबरोबर सारे संस्कार तिच्या मनावर करविले आहेत. म्हणजे तिला शिक्षणासाठी झगडावें लागत नाही. याचा परिणाम म्हणूनच कीं काय तिच्या ठायीं नवेंच व्यक्तित्व अवतीर्ण झालेलें दिसतें.

ती बुद्धिमान आहे. म्हणूनच रावबाच्या बुद्धिवादाकडे ती आकर्षिली जाते. सुनंद व बाळू यांच्यांतील सौजन्यापेक्षा रावबाचें बुद्धिशालीत्व तिला मोहिनी घालतें. त्याच्याशी ती अल्पकालांत समरस होते. लहानपणापासून ज्या देवत्त्वाचा शोध तिचा चालू असतो तें देवत्व पतींत सापडल्याचा तिला हर्षहि होतो. पण हें क्षणकालच. कारण सुखवादाच्या आहारीं जाणारा पति 'हा देव कसला तो 'माती'च' अशी तिची मनोदेवता तिला सांगूं लागते. तिच्यांतलें मानव्य शेवटपर्यंत जागृत असतें. पतीचा त्याग केलेला असला तरी तो आसन्नमरणावस्थेंत आहे हें कळतांच परत त्याच्याकडे येते. हें तिच्या ठायींच्या मानजागृतीचें गमक होय. शेवटीं पुनर्विवाहासहि ती तयार होते. ह्याचें कारण "नवयुगीन विश्वकुटुंबी संस्था" वाढीला लागावी म्हणून. देवत्त्वाचा शोध करीत असतां तिला सत्प्रवृत्तीवर आधारलेल्या विश्वकुटुंबी समाजरचनेच्या ध्येयाचा साक्षात्कार होतो. त्या ध्येयाला ती देव मानते. अशाप्रकारें वामनरावांनी महाराष्ट्रीय स्त्रीचा झेप मानवताधिष्ठित विश्वकुटुंबी समाजरचनेप्रत कशी जाऊं शकते हें दर्शविलें आहे. ती अत्यंत बुद्धिमान आहे पण तिच्या ठायींचें मानव्य जागृत आहे. त्यामुळे आपल्या दिवंगत शिशूस आशीर्वाद कळवा असें ती मित्रास लिहिते; त्यामुळेच ती काफ तिचे हात हातांत घेतो तेव्हां त्याला विरोध करीत नाहीं. स्वकृत्याचें तडफदार समर्थनहि तीं करते. तिच्या स्पष्टीकरणानंतर तिच्या मित्रांचीहि तिच्या शुद्धते-बद्दल खात्री पटते.

ह्या कादंबरींतून वामनरावांनी सुशीलेच्या रूपाने स्त्रीजीवनाचा कालोचित असा जो 'आदर्श' निर्माण केला आहे तो महत्त्वाचा आहे. वामनरावांची सुशीला ही ध्येयवादिनी आहे. दृष्टिकोन मनाची ठेवण इ. बाबतींत तिच्यांत व पुरुषांत फरक नाही. तिचें ध्येय कोणतें आहे ह्याचा उल्लेख वर आलेलाच आहे. त्या ध्येयाच्या प्राप्तीसाठी ती बद्धपरिकर झालेली आहे. त्यामुळे तिच्या मनांत स्त्रियांचे हक्क व पुरुषांचे हक्क कोणते त्यांत कोणती सुधारणा हवी इ. बाबतींत संघर्ष झालेला नाही. कारण ती मनाने व निष्ठेने स्त्री व पुरुष यांच्या हक्कांपलीडे मानवी हक्कांप्रत गेलेली आहे. तिच्या जीवनांत पुनर्विवाहाचा प्रश्न निर्माण होतो. पूर्वकालीन स्त्रीच्या जीवनांत ह्या प्रसंगामुळे फारच मोठी घडामोड झाली असती. सुशीला मनाने पुढे गेलेली असल्याने ह्या प्रसंगाकडे ती केवळ मानवी दृष्टीने पाहते. एकाद्या पुरुषावर पुनर्लग्नाचा प्रसंग आला असतां त्याच्या मनांत जो संघर्ष होईल तितकाच सुशीलेच्या मनांत झाला आहे. ह्या अनुभवाने तिच्या जीवनांत व दृष्टिकोणांत अधिक सखोलता व विचार शीलता आली आहे हें खरें, पण ती स्वतःचा मानवी दृष्टिकोन सोडावयास तयार नाही. प्रेमाच्याहिं बाबतींत ती स्वतःचें व्यक्तित्व विसर्जित करण्यांस तयार नाही. "मी असं म्हणत्ये, की मला कांहीं आस्तित्व आहे का नाहीं ? याचं माझ्यावर प्रेम असलं म्हणजे, मी यांची दासी झाल्यें की काय ? [२९] "राजसंस्था ही जशी ईश्वरकृत नाहीं तशी विवाह संस्थाहि नाहीं. ... ती देवानं केलेली नाहीं व दिव्य नाहीं; केवळ मानवकृत, सर्वस्वी मानवी आहे. ... काल मानाप्रमाणं युगधर्माला अनुसरून योग्य ते फेरफार करण्यास हरकत नाहीं; इतकंच नव्हे तर फेरफार करणं इष्ट व आवश्यक आहे."[३०] अशा प्रकारें नव्या विचारप्रणालीच्या योगाने जीवनाच्या सर्वच अंगांकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन तिला उपलब्ध झाला आहे. तिचें वैशिष्ठ्य हें की तो दृष्टिकोन स्वीकारतांना 'मानवी' भूमिका ती सोडावयास तयार नाही. त्यायोगेच तिचें पात्र आदर्शाकडे झुकणारें असलें तरी जिवंत वाटतें.

---

२९ सुशीलेचा देव पृ. १९१ ३० कित्ता पृ. १९२-९३.

स्त्रीजीवनविषयक विशिष्ट प्रश्नांना मानवी प्रश्नांचें स्वरूप प्राप्त व्हावें ही फार मोठी प्रक्रिया ह्या कादंबरीत दिग्दर्शित केली आहे. वामनरावांना अभिप्रेत असलेली विश्वकुटुंबी समाज रचना ही 'मानवी' आहे. केवळ यक्षभूमीप्रमाणे कल्पनागम्य नव्हे. 'देव' ह्या कल्पनेला वामनरावांनी ह्या कादंबरीत सामाजिक स्वरूप दिलें. देव हा केवळ तत्त्वचिंतनाचा विषय म्हणून अस्तित्वांत आलेला नाही. पूर्वकालांत ती एक अत्यंत प्रबल व प्रगतिशील अशी समाजनिष्ठा होती. विज्ञानाच्या आगमनाने ह्या समाजनिष्ठेंतील कल्पना गम्य (श्रद्धाभूत) भागास धक्का बसला. तरी समाज धारणेची उभारणी करतांना कोणती तरी कालोचित समाजनिष्ठा आवश्यक आहे. ध्येयाचा ध्रुवतारा मनुष्याला ही नवी समाजनिष्ठा उपलब्ध करून देईल. व मानवी जीवन अखंड प्रगतिशील असें राहील असा वामनरावांच्या विचारांचा निष्कर्ष आहे. त्याद्दष्टीने ही कादंबरी मराठी वाङमयांत दीर्घकाल संस्मरणीय राहणार आहे. स्त्रीजीवनाच्या आविष्करणाच्या द्दष्टीने पाहतां येवढेंच म्हणतां येईल कीं, स्त्रीजीवन विषयक प्रश्न वा समस्या हे केवळ स्त्रियांचे प्रश्न वा समस्या न राहतां, त्यांना 'मानवी' समस्यांचें स्वरूप प्राप्त होणार आहे. अर्थात अशी परिस्थिति निर्माण झाल्यानंतर, व्यक्तिगत हक्क नागरिक हक्क, सामाजिक हक्क, व्यक्तित्व, जीवनांचें ध्येय इ. सर्व बाबतींत स्त्री व पुरुष यांत केवळ समानता आणि समानताच गृहीत धरलेली आहे. हेंच ह्या कादंबरीचें अनन्य साधारण श्रेष्ठपण.

वामनरावांची शेवटची कादंबरी ही मराठी वाङमयांतील एक उत्कृष्ट कलाकृति आहे. 'सुशीलेचा देव' या कादंबरींत त्यांनीं विश्वकुटुंब वादाचा पुरस्कार केला होता. पण तो केवळ ध्येयात्मक स्वरूपाचा होता. विश्व-कुटुंबी समाजरचना निर्माण व्हावयाची असेल तर देशाला किमानपक्षी स्वातंत्र्य असावयास हवें, ही गोष्ट सर्वसम्मत झाली होती. विश्वकुटुंबी समाजरचना निर्माण करण्याच्या मार्गांत ज्या विविध चळवळींचा समावेश होऊं लागला त्यांत राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळी पण बसूं लागल्या. भार-

तांत पण त्याद्दष्टीने प्रयत्न चालू होता. १९३० वामनरावांनीं 'सुशीलेचा देव' प्रसिद्ध केली. तीं लिहितांना त्यावर्षी झालेली स्वातंत्र्याची चळवळ त्यांच्यापुढे नव्हती. पण तदनंतर गांधीजींच्या कर्तृत्वाच्या आधारें नवें कर्तृत्व राष्ट्रांत निर्माण होऊं लागलें. वामनरावांसारख्या समाज जागृत लेखकाच्या दृष्टींतून हें नवें कर्तृत्व गळणें शक्य नव्हतें. त्याचें एक विदग्ध दिग्दर्शन त्यांनी आपल्या 'इंदुकाळे व सरला भोळे' या कादंबरीच्या द्वारे केलें. वामनरावांच्या तत्त्वशोधक दृष्टीला ह्या महान् प्रयोगांत जो ध्येयात्मक संघर्ष झाला होता त्यांचें दर्शन झालें. हा लढा दिला जात असतांना समाजांत कलात्मकतेची जाणीव निर्माण होऊं लागली होती. कलेचे ह्या महान् जीवन साधनेंत कोणतें साहाय्य होतें या संबंधीं चिकित्सा होऊं लागली. त्यांत कलेचेंच सार्वभौमत्व कलेच्या क्षेत्रांत मानावें असा विचार पण पुढे येऊं लागला होता. कांही कलावंत व कलाप्रेमी लोक प्रामाणिकपणे ह्या विचाराचा पुरस्कार करूं लागले होते. वामनरावांनी ह्याहि पण विचारसरणीचें ध्येयदृष्टीने परिशीलन करून आपलें मत इतरत्र लेखद्वारें व ह्या कादंबरींत जीवन चित्रणाच्या द्वारें दिलें आहे.

'इंदु काळे आणि सरला भोळे' ह्या कादंबरींत वामनरावांनी ध्येयवादी व्यक्तींच्या जीवनांत जो अंतःसंघर्ष निर्माण होतो त्याचें प्रभावीं आविष्करण केलें आहे. ध्येयवादी व्यक्तीला आपल्या ध्येयपूर्तीच्या प्रयत्नांत व्यक्तिगत सुखांकडे, दुःखाकडे दुर्लक्ष करावें लागतेंच, पण व्यक्तिगत कौटुंबिक कर्तव्यांकडे सुद्धां डोळे झाक करावी लागते. हें दुर्लक्ष वा हीं डोळे झाक त्याला बुद्धि पुरस्सार करावीं लागते. किंबहुना ह्या धोरणामुळे जीं संकटें वा दुःखें जीवनावर कोसळतात त्यांना आनंदाने तोंड द्यावें लागतें. ध्येयवादी व्यक्तीचीं ध्येय प्रीतीमुळें तशी तयारी होते. तथापि ती होत असतां अंतर्गत संघर्षास तोंड द्यावें लागतें. ह्या कादंबरींत ह्या अंतर्गत संघर्षाचें प्रभावी विशदीकरण केलें आहे. विनायकराव हे राष्ट्रीय चळवळींत भाग घेतात व त्या ध्येयपूर्तीसाठी त्यांना व्यक्तिगत सुखें, कर्तव्यें यांच्याकडे दुर्लक्ष

करावें लागतें. त्यांचें जीवन संकट कष्टाने व्याप्त असतें पण ते म्हणतात 'लौकिक दृष्टीहून उच्चतर अशी एक दृष्टि आहे. लौकिक दृष्ट्या ध्येयें म्हणजें दुःखें; पण या दुःखांतच उच्च व सात्विक आनंद भरलेला आहे.'' नारायणराव पाठक ज्ञानमार्ग व इतिहास संशोधन हें आपलें ध्येय मानतात, व व्यक्तिगत सुखांचा मोह पडावयास नको, विवाह करून ध्येयच्युति होईल अशी त्यांना फार भीति वाटते. म्हणून प्रेयसीच्या भावनांची फिकीर न करतां ध्येयास चिकटून राहातात. इंदु काळे ही कला प्रेमी युवति असते. तिला आपण कला सेवेंत जीवन घालवावें अशी अनिवार इच्छा असते. पण तिला ती अनिर्बंधपणें पूर्ण करतां येत नाहीं. कलात्मक आविष्करणावर (कलासेवेवर) थोडीं बंधनें पाडून घ्यावीं लागतात. तीं घालून घेतांना तिच्या अंतरंगांत झालेला संघर्ष दारुण आहे.

अशाप्रकारें ध्येयवाद्याच्या जीवनांत ध्येयप्रवृत्ति विरुद्ध कुटुंब सुख वा कर्तव्य प्रवृत्ति हा जो झगडा असतो त्याचें दिग्दर्शन वामनरावांनी ह्या कादंबरींत केलें आहे. त्यादृष्टीने पाहतां ही विशिष्ट स्त्रीजीवन–विषयक कादंबरी नव्हे परंतु वामनरावांनी अत्यंत कौशल्याने स्त्रीजीवनविषयक कांही समस्या समाजापुढे विचारासाठीं मांडल्या आहेत. त्यांपैकी पहिली अशी की, स्त्रीने पतीच्या ध्येयाहून भिन्न असें ध्येय ठेवावें काय? दुसरी म्हणजे विवाह हा पुरुषांच्या कर्तृत्वाच्या आड येतो काय? तिसरी म्हणजे पति ध्येयनिष्ठ असेल असेल तर त्याच्या ध्येयसिद्धीस कोणतें साहाय्य करावें? तें करीत असतां व्यक्तिगत आवडी निवडी इ. ना किती महत्त्व द्यावें? पहिली समस्या इंदु काळेच्या रूपाने दुसरी काशी ढवळेच्या मिषाने व तिसरी सरला भोळे हिच्या उदाहरणाने मांडली आहे. प्रत्येक बाबतींत वामनरावांनी आपलें विशिष्ट मत निःसंदिग्धपणें दिलें आहे. तें उत्तर देतांना ह्या मानसकन्यांचे स्वभावहि उत्कृष्ट रंगविले आहेत.

पहिला प्रश्न कला व नीति ह्या बाबतचा आहे. वामनरावांनी आपलें मत निश्चित्पणें नीतीच्या बाजूने दिलेलें आहे. पण त्यांतला प्रमुख भाग जरा

वेगळाच आहे. विनायकराव भोळे हे ध्येयवादी आहेत. ते स्वतः ध्येय हेंच प्रमाण मानतात ध्येयनिष्ठेच्या आड कुटुंब प्रेम येत असेल तर तें सोडावयास हवें असें त्यांचें मत व वर्तनहि. पण इंदु काळे हीस उपदेश करतांना मात्र तुम्ही आपल्या कलेच्या ध्येयास मुरड घाला असें सांगतात. यावरून येथे असा प्रश्न उत्पन्न होतो की पुरुषांनी ध्येयनिष्ठ राहावें त्यायोगें कुटुंबावर संकटें कोसळलीं तरी चालतील पण स्त्रियांनी मात्र कुटुंबांतलें वातावरण बदलेल म्हणून स्वतःचें ध्येय सोडावयास तयार व्हावें. हें जें मत वामनरावांनीं व्यक्त केलें आहे तें निश्चितपणें टीकास्पद आहे. पण टीका करण्यापूर्वी वामनरावांनी विनायकरावांकरवी जें स्पष्टीकरण दिलें आहे तें ध्यानांत धरणें आवश्यक आहे. ते म्हणतात " कलाप्रेम, कलाप्रेम म्हणून तुम्ही कितीहि म्हटलंत तरी भाऊरावाचं प्रेम तुम्हाला खरोखर पाहिजे आहे...तुमचे माझे प्रकृतिधर्म वेगवेगळे असल्यामुळे तुमचें ध्येय निराळ्या प्रकारचें असणार व माझें निराळे असणार. अर्थात कर्तव्येंहि भिन्न असणार...हे प्रश्न खरोखर सामान्य तत्वाच्या दृष्टीने सोडविण्याचा प्रयत्न करण्यांत विशेष अर्थ नाही...व्यक्ति, स्थिति, प्रसंग पाहून व्यवहार दृष्ट्याच ते सोडविले पाहिजेत " [३२] ह्या वरून असें स्पष्ट होतें की केवळ स्त्री म्हणून इंदु काळे हिला आपलें ध्येय सोडण्यास विनायकराव सांगत नाहीत. तर तिच्या प्रवृत्तीप्रकृतीला तें झेंपणार नाहीं म्हणून. याबाबत वामनरावांचें मत मागे प्रास्ताविक विवेचनांत त्यांच्या जीवन विषयक दृष्टिकोणाचें दिग्दर्शन केलें तेथे उधृत केलें आहे. ते म्हणतात ज्या स्त्रियांना ' तेवढी प्रबळ अंतःप्रेरणा ' आहे की ' आपण समाजकार्य करावें ' (वा ध्येयनिष्ठ राहावें,) त्यांनीच ध्येयाशी चिकटून राहावें. इंदु काळेचें जें चित्र वामनरावांनीं रंगविलें आहे त्यांत ती प्रबल अंतःप्रेरणेची स्त्री नाही असें स्पष्ट पणें दृगोचर होतें. वामनरावांची ही भूमिका ध्यानांत घेतली तर ते केवळ स्त्री म्हणून तिला ध्येयत्याग करावयास सांगत नाही. तत्वतः त्यांना तसें म्हणावयाचें नाही. असें स्पष्ट होते व तें समजून घेतलें कीं, टीकेची तीव्रता

---

३२ इंदुकाळे पृ. ६७

कमी करावी लागते. तथापि एकंदरीने वामनरावांचे विचार या बाबत पुरुष पक्षपाती आहेत हें अमान्य करण्यांत अर्थ नाही. तो पुरुषपक्षपात त्यांच्या समन्वयवादी दृष्टिकोणाचा परिपाक असेल पण आहे हें खरें. स्त्रीचें मन एवढ्या सहानुभूतीने रंगविणाऱ्या या श्रेष्ठ लेखकाच्या रंगसजावटींत ह्या विचाराचा कृष्णवर्ण अधिक भडक झाला आहे हें खरें. तो तसा नसता तर अधिक बरें झालें असतें.

नारायणराव पाठक व काशी ढवळे ह्यांच्या प्रेमकथेच्या आधाराने स्त्री ही पुरुषाच्या ध्येयप्राप्तीच्या मार्गांत अडचण करील काय? ह्या प्रश्नाचें विवरण केलें आहे. येथे या प्रश्नाबाबत त्यांनी जो निर्णय दिला तो योग्य आहे. स्त्रियांचें पुरुषांच्या ध्येयसाधनेस साहाय्यच होत राहील असें काशी ढवळेच्या द्वारें त्यांनी रंगविलें आहे. ज्या कालांत ही कादंबरी लिहिली गेली त्या कालांतला हा प्रमुख प्रश्न आहे. सुशिक्षित किंवा ध्येयवादी तरुणांची अविवाहित राहून समाज सेवा वा ध्येयसेवा करण्याची प्रवृत्ति बरीच प्रबल होती. तिच्यावर विदारक प्रकाश ह्या कादंबरींत वामनरावांनी टाकला आणि आपलें मत या तरुणांना विरोधी असें दिलें आहे. स्त्रीजीवनविषयक एक समस्या म्हणून हा जो तात्त्विक प्रश्न समाजापुढे आला होता त्याचें कादंबरींत विवेचन करून आपलें मत देण्यांत वामनरावांनी औचित्य दर्शविलें आहे. आज कोणी ह्या समस्येच्याबाबत गंभीरपणें वामनरावांच्या विरोधी असें म्हणूं शकेल असें वाटत नाही. खरोखरच एकाद्याचें तसें मत असेल तर त्याला स्त्रीचें मनच कळलें नाहीं असें म्हणावें लागेल.

ध्येयनिष्ठ पतीच्या जीवनाशी पत्नीने कितपत समरस व्हावें स्वतःचें जीवन पतीच्या ध्येयवेडेपणाच्या आहारीं किती द्यावें, स्वतःचें व्यक्तित्व किती प्रमाणांत विसरावें हा एक स्त्रीजीवन–विषयक महत्त्वाचा प्रश्न आहे. आजची समाजरचना ही पुरुष प्रधान असल्याने पुरुषाच्या ध्येयनिष्ठेस इ. गुणांस समाजांत अधिक अवसर आहे व स्त्रीच्या ठिकाणीं तेच गुण असले तर ते तिचें व तिच्याशीं संबद्ध माणसांचें जीवन कमी अधिक प्रमाणांत अस्वस्थ

करून सोडतात. हें खरें आहे. समाज जों जों व्यक्तित्वाची बूज ठेवणारा होईल तों तों हा प्रश्न सुटत जाणार. विशेषतः व्यक्तित्वाची जाणीव स्त्रीच्या ठिकाणीं निर्माण झाल्यानंतर तें पतीच्या व्यक्तित्वाशी कसें मिळवावयाचें हा कठीण प्रश्न आहे. सर्वसामान्य व्यक्तीच्या बाबतींत हा प्रश्न फारसा विकट होत नाही पण ध्येयवादी व्यक्तीच्या बाबतींत ह्या प्रश्नास एका समस्येचें स्वरूप प्राप्त होतें. वामनरावांनी ह्या समस्येचें उत्तर आपल्या परीने सरला भोळे; हिच्या रूपाने देण्याचा यत्न केला आहे व तो यशस्वी झालेला आहे.

सरला भोळे ही प्रवृत्तीने त्यागप्रिय आहे. स्त्री व पुरुष यांच्यांत एकध्येयत्व असावें ही गोष्ट लेखकाला मान्य असल्याने तिला पतीचें ध्येय हें स्वीकार्य वाटतें. आपलें व्यक्तित्व त्याच्याशी व त्याच्या ध्येयाशीं समर्पित करूं शकते. विनायकराव व सरला यांच्या द्वारें वामनरावांनी तत्कालीन इंग्लंडांतील श्रेष्ठ आदर्श पतिपत्नी श्री सिडने वेब् व सौ. बियाट्रिस वेब् यांच्या आदर्श जीवनाची स्थलकाल सापेक्ष प्रतिकृति मराठी वाङ्मयांत निर्मिली आहे. स्त्रियांनी समाजकार्य करूं नये असें मी कधींच म्हणत नाहीं. व ह्या वेब्दंपतींचें उदाहरण मजपुढे आहे असें वामनरावांनीच एका भाषणांत म्हटलें आहे [३३] त्यावरून त्या दंपतीच्या कार्याचा त्यांच्या मनावर परिणाम झाला होता असें स्पष्टपणें दिसून येतें. सामान्यतः हा आदर्श अमान्य होईल असें वाटत नाही. एखाद्या स्त्रीच्या ठिकाणीं खरोखरच प्रभावी व्यक्तित्व असेल, कीं तिचें आणि पतीचें याबाबत जमणें अशक्य असेल. त्याचें ध्येय वा कार्य तिला संपूर्णतया अमान्य असेल तर प्रश्नच वेगळा. मग तेथे सहजीवनच अशक्य होईल. तथापि सहजीवनांत एकध्येयत्व असेल तर एकंदरीने अधिक चारुता असते, तें जीवन अधिक उदात्त असतें असें म्हणावयास हरकत नाही.

प्रस्तुत कादंबरींतील प्रमुख समस्यांचा उहापोह केला. नंतर व्यक्तिचित्रांकडे लक्ष दिलें तरी आपणास असें आढळून येईल की वामनरावांनी

३३ विचार लहरी पृ. ४५

ह्या कादंबरींतलीं स्त्री पात्रें अतीव सहानभूतीने रंगविलीं आहेत. सरला भोळे हिचें पात्र तर आदर्शच आहे. ती उच्चशिक्षित युवति असून पतीच्या ध्येयाशीं संपूर्णतया समरस झालेली आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा भारतांतल्या पुरुषांनी जितक्या त्यागपूर्वक प्राणप्रतिज्ञेने दिला तितक्याच प्राणप्रतिज्ञेने व त्यागपूर्वक साहाय्य भारतीय स्त्रियांनी पण स्वातंत्र्यलढ्यांत केलें आहे. वामनरावांनी स्त्रियांच्या अमोल कामगिरीचें हें विदग्ध आलेखन करून ठेविलें आहे तें फार हृद्य आहे. भारतीय स्त्री ही जीवनध्येय, दृष्टिकोन, त्याग,...इ. सर्व बाबतींत पुरुषांच्या बरोबर आहे. तिच्यांतलें व पुरुषांतलें अंतर हें कमी झालें आहे असें वामनरावांनी जें दर्शविलें तें कदाचित त्यांच्या आदर्श चित्रापैकी एक असेल. पण तें रंगवितांना त्यांनी इतक्या हलक्या हाताने रंग भरले आहेत की त्यायोगें हें वास्तवचित्र आहे की आदर्श आहे हें समजेनासें झालें आहे. काशी ढवळे या पात्राच्या द्वारेंहि वामनरावांनी हीच वस्तुस्थिति परत निदर्शनास आणली आहे, काशी ढवळे ची पतीच्या आकांक्षाशीं समरस होण्याची तीव्र इच्छा पाहिली व केवळ नारायणरावांच्या तात्त्विक पूर्वग्रहामुळे ते तिची निराशा करतात हें पाहिलें की तिच्याविषयी अतीव आदर वाटूं लागतोः—' बायका ध्येयाच्या आड येतील असें तुम्ही मानतां कोणत्या आधारावर ? सरला वहिनी ध्येयाच्या आड आल्या का ? [३४] असा जो सवाल तिने नारायणराव पाठकांना केला आहे तो सवाल ध्येयवादी स्त्री महाराष्ट्रीय पुरुषांना विचारीत आहे असें वाटतें.

जिचें नांव कादंबरीच्या अभिधानांत येतें त्या इंदु काळेचा उल्लेख करणें आवश्यक आहे. इंदु ही कलासक्त स्त्री आहे, सुशिक्षित, संपन्न व सुंदर आहे. कलेच्या क्षेत्रांत आपण नांव करावें असें तिला मनापासून वाटतें. मनाने ती सोज्वळ आहे. पण कलाप्रेम व रूढ नीति ह्यांच्या पर-

---

३४ इंदू काळे...पृ. ११९

स्पर संबंधाबाबत तिच्या चित्तांत कलह निर्माण झालेला आहे. कलाप्रेमाच्या योगाने तिचें जीवनहि थोडें संकटमय झालें आहे. पण तिला वाटतें आपण कलेशी एकनिष्ठ राहावें. इंदु ही व्यक्तित्वजागृत स्त्रीची प्रतीक आहे. तिचें व्यक्तित्व ध्येयाशिवाय—व स्वीकृत ध्येयाशिवाय—इतर कशाशी समर्पित करावें, असें तिला वाटत नाही. प्रभावी व्यक्तित्वाचें अविष्करण म्हणून इंदूचें स्वभावचित्र परिणामकारक झालें आहे. पण एकंदरीने तिला माघार घ्यावी लागते. वामनरावांनी आपलें मत त्या बाजूने दिलें आहे. सरला ही जर 'आदर्श' रूप असेल तर इंदू ही वास्तवरूप आहे. महाराष्ट्रीय सर्वसामान्य स्त्रीला आपल्या ठायीचें व्यक्तित्व विसरून कसें राहावें लागत होतें ह्याचें एक चित्रण म्हणजे इंदूचें चित्र आहे. शेवटीं तिच्या मताचें जरी परिवर्तन होतें असें दाखविलेलें असलें तरी तिचें चित्र अधिक सहानुभूतीने रंगविलें जाणें आवश्यक होतें असें वाटतें. तिचें परिवर्तन लेखकाने अतिशयोक्त दाखविलें आहे की तें थोडें कृत्रिम वाटतें. त्यायोगें असें वाटतें की पूर्व-जीवनांतलीं तिची कलाप्रीतीची उर्मी ही एक तात्कालिक उर्मी होती. पण तें तसें नव्हतें.

"आत्म्याची कलाविषयक जी भूक आहे ती लोकापवादाच्या भीतीने किंवा पतीला उगाच संशय येतो म्हणून दाबून टाकावी काय?"[३५] असें निर्वाणीचे प्रश्न करणाऱ्या व्यक्तीचें कलाप्रेम हा एक तात्कालिक उर्मीचा भाग होता असें नव्हे. एकंदरीने इंदूला समाजपरिस्थितीमुळे आपलें ध्येय सोडून द्यावें लागतें, ही एक ध्येयदृष्टीने पाहतां शोककथा आहे. तिचें चित्रण वामनरावांकडून सहानुभूतीने झाले असें म्हणतां येत नाहीं. सरलेच्या व काशी ढवळेच्या वाट्यास आलेली सहानुभूति तिच्या वाट्यास आली नाहीं. The great Homer nods हें खरें आहे. तथापि इंदूच्या चित्राकडे ह्या विवेचनाच्या आधारें पाहिलें तर महाराष्ट्रीय स्त्री जी आत्मजागृत झाली होती पण तिला आपल्या उर्मी दबून ठेवाव्या लागत असत, असें जें चित्र उभें राहतें तें वास्तवदर्शी नाही असें कोण म्हणेल?

---

३५ इंदुकाळे पृ. ६१

वामनरावांच्या कादंबऱ्यांतील प्रमुख स्त्रीजीवनविषयक प्रश्न व त्यानीं निर्माण केलेल्या व्यक्तिरेखा यांचें अवलोकन केल्यानंतर त्यांच्या या विषयीच्या कामगिरीचें समालोचन करणें आवश्यक आहे.

वामनरावांनी स्त्रीजीवनाचें जे चित्रण केलें आहे त्या बाबत सामान्यतः एकमत आहे. स्त्रीमनाचें आविष्करण त्यांनी फारच सहृदयतेने केलें आहे ही गोष्ट मान्य आहे. "अनेक लेखकांनी आधुनिक स्त्री रंगविण्याचा प्रयत्न केला. तरी तिचा जीवनविकास वामनरावांच्या इतका दुसऱ्या कुणालाच चित्रित करतां आला नाहीं. "[३६] असे खांडेकरांचे त्यांच्या विषयींचे उद्गार आहेत. " सुशिक्षित मुली वाईट नसतात, एवढेंच नव्हे तर त्या अत्यंत प्रेमाळ व आदरणीय असूं शकतात. हें वामनरावांनी...पात्रांच्या द्वारें सिद्ध करून दाखविलें आहे. एवढेंच नव्हे तर, वामनरावांनी ही कामगिरी कादंबरींत शिक्षणामुळे बहकलेल्या तरुणीचें एकहि पात्र न घालूनहि कलात्मक दृष्टीने उत्कृष्ट रीतीने पार पाडली. "[३७] असा वि. ह. कुलकर्णी यांचा निर्वाळा आहे. समाजांत तत्कालीन 'जी नवीन स्त्री' निर्माण होत होती, तिचे विचार अपरिपक्व होते, तिच्यांत उत्साह होता, हिरीरी होती, विलक्षण चैतन्य होतें,...वावनरावांना ही नवी स्त्री दिसली व तिच्या संबंधी निर्माण होऊं पाहणारे प्रश्नहि दिसले...ह्यांचें चित्रण ललितकथेच्या द्वारां करावें असें त्यांस वाटलें." [३८] व त्यांनी तें अत्यंत यशस्वी रीतीने केलें आहे. अशा-प्रकारें वामनरावांनी आपल्या भिन्न भिन्न मानस कन्यांचे रूपानी तत्कालीन महाराष्ट्रीय स्त्रीच्या मनाचें व तिच्या जीवनांत निर्माण झालेल्या प्रश्नांचें चिकित्सक दिग्दर्शन केलें आहे ही गोष्ट सर्वसंमत आहे.

वामनरावांचा स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोन कोणता आहे त्यांचें विवेचन त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनविषयक प्रश्नांची पाहणी करण्यापूर्वी केलें आहे.

---

३६ विचारलहरी : पृ. १५. ३७ अ. म. साहित्य (नेने) : पृ. ९८
३८ वामन मल्हार : वाङ्मयदर्शन : पृ. ३७.

समालोचनात्मक दृष्टीने पाहिलें असतां असें आढळतें की वामनरावांनी स्त्रीजीवनाचें विधायक चित्रीकरण केलें आहे. रागिणी, उत्तरा, नलिनी, सुलोचना, इंदु, सरला, काशी, सुशीला, ह्या त्यांच्या सर्व मानस कन्या मनाने अत्यंत सज्जन आहेत. जीवन कांहींतरी वेगळेपणाने घालवावें, अशी प्रत्येकीची इच्छा आहे; व त्याप्रमाणे आपापलें जीवन घालविण्याचा त्यांनी यत्न केला आहे. ह्या सर्व, सुशिक्षित सत्प्रवृत्त व ध्येयवादिनी स्त्रिया आहेत. पुरुषांशी सामान्यतः समरस व्हावें; त्यांच्या आशा आकांक्षा ध्येयें यांची ओळख करून घ्यावी व त्या ध्येयसिद्धीच्या यत्नांत त्यांना मनःपूर्वक साहाय्य करावें अशी त्यांची मनोमय इच्छा आहे. उत्तरा ही स्वकालीन स्वातंत्र्यवादिनी स्त्रीची प्रतिमा म्हणून रंगविण्याचा वामनरावांनी यत्न केला. पण तिच्या मनाचें शेवटीं इतकें परिवर्तन झालें की तें तिच्या पहिल्या विचारास विरोधी वाटतें. त्या योगें उत्तरेची स्वभावरेखा बिघडली आहे असें डॉ. सहस्रबुद्धे यांचें मत आहे, तें योग्य आहे. पण तसा बदल होण्याचें कारण म्हणजे वामनरावांची स्त्रियांकडे पहाण्याची दृष्टि ही प्रायः विधायक होती. ती अत्यंत सहानुभूतिशील होती हें मुद्दाम उल्लेखावयासहि नको इतकें स्पष्ट आहे.

या विधायक दृष्टीमुळे वामनरावांना स्त्रींत दोष सांपडलेले नाहींत. त्यांनी वर उल्लेखिलेल्या प्रमाणे एकहि शिक्षणाने बहकलेल्या स्त्रीचें स्वभाववर्णन केलेलें नाही. हें लक्षांत धरण्यासारखें आहे. पुरुषांत वामनरावांना दुष्टपणाचा साक्षात्कार झाला व तो त्यांनी आपल्या जनुभाऊ, दिवाणजी बिंदुमाधव म्हसकर,...इ. पात्रांच्या द्वारां व्यक्त केला. पण एकहि स्त्री अशी दर्शविली नाही. याचें कारण असें आहे की वामनरावांना प्रायः सुशिक्षित स्त्रीचें अंतरंग दाखवावयाचें होतें. तें दर्शवितांना 'रागिणी'त तर 'हिंदुधर्म आणि सुधारणा' कर्त्याची भूमिका घेतली आहे. ती भूमिका स्वमताचे बावतींत विधायक आहे. पुढच्या कादंबऱ्यांत निरनिराळ्या इतर प्रश्नांना व जीवनाच्या इतर अंगांना वाव द्यावयाचें त्यांनी ठरविल्यामुळे हें अंग त्यांना

दुर्लक्षित करावें लागलें. शिवाय दुसरें असें की एकहि पात्र जरी त्यानी तसें दर्शविलें असतें तरी समाजाने तें पात्र म्हणजेच सुशिक्षित स्त्रीचें खरें प्रातिनिधिक असें मानून त्यांच्या विधायक चित्रणावर बोळा फिरवला असता. त्या-दृष्टीने त्यांचें धोरण योग्य होते असें वाटतें. हरिभाऊंनी सुद्धा सुधारणावादी लोकांचे दोष भडकपणाने रंगविण्याचें धोरण आपल्या श्रेष्ठ कादंबऱ्यांतून अवलंबिलेलें नाही. हें ध्यानांत धरणें आवश्यक आहे.

पण ह्या शिवाय महत्त्वाची गोष्ट अशी की, हरिभाऊंची सृष्टी ही प्रामुख्याने वास्तवसृष्टि होती. ज्या समाजाचें जीवन हरिभाऊंनी रंगविलें त्याच समाजाचें जीवन वामनरावांना परिचित होतें व तेंच त्यांनाहि रंगवावयाचें होतें. हरिभाऊनंतर समाजांत निरानिराळ्या प्रकारची विलक्षणच क्रांति होत होती. त्याचे आचार विचार,...सर्व एकप्रकारच्या संक्रमणावस्थेंतून जात होते. समाजाची भौतिक धारणा बदलली होती तिच्या अनुषंगाने मानसिक हि धारणा बदलत होती. वामनरावांनी मानसिक बदलाचें स्वरूप प्रथम हेरलें. त्यांच्या तत्वजिगीषु दृष्टीला प्रथम तें दिसणें साहजिक होतें. तें त्यांनी पाहिलें तों त्यांना काय आढळलें असेल ? जुने विचार झपाट्याने अस्तंगत होत आहेत; जुन्या कल्पना मागे पडत आहेत, अगदी पुराणमतवादी लोकहि त्यांना थांबवूं शकत नाहीत. पण त्यांची जागा नव्या कल्पना नवे विचार घेऊं शकत नाहींत. कारण ते विचार त्या कल्पना ह्या अस्पष्ट होत्या, विवाद्य होत्या. परंतु परिस्थिति अशी होती की, समाजाच्या विशिष्ट (मध्यमवर्गीतील) कर्तृत्वशाली गटाच्या मनांत जुन्या नव्याचा संघर्ष चालू होता. त्या संघर्षांत कांही काल त्याच्या मनांत पोकळी निर्माण झालेली आहे. ही पोकळी कर्तृत्वाराधनेस एकंदरीने मारक ठरणार व ती तशी ठरूं नये असें वाटत असेल तर त्या पोकळींत कांहीतरी ठेवावयास हवें. त्यांच्या तत्त्वचिकित्सक वृत्तीने त्यासाठी ध्येयाची योजना केली. त्या द्वारें त्यानी समाजास एक नवी जीवननिष्ठा दिली. त्या निष्ठेच्या आधारावर आपलीं सर्व पात्रें रंगविलीं आहेत. हा ध्येयनिष्ठेचा वाचक 'ध्येयहाच देव' हा विचार इतका नवा होता

की त्याचा पुरस्कार करतांना त्यांनी स्त्री व पुरुष असा भेद केलेला नाही. त्यांच्या दृष्टिकोनाच्या अनुषंगाने त्यांना तसें करणें जरूरहि वाटलें नाही. समाजाची व्यक्तिकेंद्रित्वाकडे जी चाल होती ती त्यांनी बरोबर हेरली आणि तिची गति अधिक वाढविण्याचा यत्न केला.

त्यांचा हा प्रयत्न फार महत्त्वाचा होता असें आजहि वाटूं लागलें आहे. त्यानंतरच्या कालांत राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्रश्नाला अधिक महत्त्व प्राप्त झालें. त्या स्वातंत्र्याचा विचार हा ती पोकळी कांहींकाल व्यापूं शकला पण स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर आज पुन्हा तीच पोकळी तयार झाली आहे. समाजाचें मनोआकाश रिकामें आहे त्यांत ध्येयाचा सूर्य आजहि उगवलेला आहे असें दिसत नाही. त्या दृष्टीने वामनरावांच्या वाङ्मयाचें कार्य व मोल हें महत्त्वाचें व मोठें आहे असें म्हणावें लागतें.

स्त्रीजीवन विषयक दृष्टीने पाहातां वामनरावांनी स्त्रीजीवनाचें जें विधायक आविष्करण केलें तें महत्त्वाचें आहे. स्त्रीजीवनाचीं दुःखें त्यांनी रंगविलीं नाहींत तरी त्यांना तीं दिसलीं नाहीत असें नव्हे तर त्यांचें चित्रण हरिभाऊंनी आगोदर प्रभावी रीतीने करून ठेविलें होतें. जुन्या पद्धतीने जीवन जगणारांची तींच दुःखें होतीं. पण त्यांचा संबंध प्रामुख्याने सुशिक्षित तरुण स्त्रियांशी आला. त्यांच्या आशा, आकांक्षा; ध्येयें इ. चें जवळून अवलोकन करण्याचें श्रेय त्यांना लाभलें. त्या तरुण वयांतल्या उमेदींच्या अनुरोधाने दुःखापेक्षा ध्येयांचा विचार अधिक महत्त्वाचा वाटावा हें क्रमप्राप्त होतें. स्त्रीजीवनाच्या मूलभूत समस्या बदलत होत्या तें त्यांनी बरोबर हेरले. यापुढच्या कालांत स्त्रीशिक्षण, वा पुनर्विवाह वा बालविवाह ह्या कांही स्त्री जीवनाच्या मुख्य समस्या नव्हत. तर त्या प्रामुख्याने वैचारिक व ध्येयात्मक आहेत. हें त्यांनी जाणलें. त्याच दृष्टीने सुशीलेला पुनर्विवाहाचा प्रश्न हा फारसा महत्त्वाचा वाटला नाही. कारण तिची दृष्टीच बदलली होती. शिवाय स्त्रीच्या ठिकाणीं हें जें नवें व्यक्तित्व निर्माण होत होतें तें उदयोन्मुख व्यक्तित्व ध्येयाच्या दिशेने चालू लागावें अशी त्यांची मनीषा होती. या कालांत साहि-

त्यांतलें वास्तवचित्रण हें दोन प्रकारचें होतें. पहिलाभाग म्हणजे दलितांच्या जीवनाचें चित्रण. त्याबाबत वामनरावांना सहानुभूति होती. सुशीलेच्या विश्वकुटुंबी संस्थेच्या द्वारें हीच सहानुभूति व्यक्त होते. दुसरा प्रकार म्हणजे व्यक्तीच्या व्यक्तीगत सुखदुःखांचें आविष्करण. हें वास्तवदर्शी आविष्करण प्रामुख्याने फ्राईड या मनोगाहनशास्त्रवेत्याने घालून दिलेल्या दिशेने जावयाचें होतें. वामनराव हे मानसशास्त्रांचे अभ्यासक होते. त्यांना हें नवें ज्ञानाचें दालन अपरिचित होतें असें नव्हे. पण त्यांनी मोठ्या कौशल्याने हें हेरलें की हें आविष्करण कोणत्याहि ध्येयताऱ्याचें दर्शन देत नाही तर आत्मकेंद्रित्वांच्या रिंगणांत मनुष्यास फिरावयास लावतें. अशा प्रकारचें ध्येयशून्य आत्मकेंद्रित्व त्यांच्या मनोवृत्तीसच मान्य झालें नसतें, तें झालें नाही. वास्तवचित्रणाचें हें नवें तंत्र व स्वरूप त्यांना परिचित असलें तरी त्यांनी तें बुद्धिपुरस्सर टाळलें आहे. तें टाळण्यांत औचित्य दाखविलें आहे.

स्त्रीजीवनाचे दृष्टीने पाहातां वामनरावांनी स्त्री व पुरुष ह्यांच्यांत एकध्येयत्व आहे हा विचार प्रामुख्याने पुढे मांडला. स्त्रियांचे हक्क हे मानवी हक्क आहेत. त्यांचे प्रश्नहि पण त्या दृष्टीने पाहिलें तर ह्या प्रबंधांत ब्रिटिश राजवटींत स्त्री व पुरुष यांच्यांत एकध्येयत्व निर्माण होण्याची प्रक्रीया सुरू होती तिची गति वामनरावांच्या कादंबऱ्यांतून आपणांस पूर्णत्वास गेली असें आढळतें. हें सारें चित्रण प्रामुख्याने ध्येयदर्शी होतें. व दीर्घकाल राहणार हें शक्य होतें. समाज तेथपर्यंत अर्थातच गेलेला नव्हता. मध्यमवर्गातील कांही व्यक्तींची मनाने तेथपर्यंत मजल केली होती. तथापि भांडवली समाजांत मध्यमवर्ग हाच प्रगति करणारा वर्ग असतो, त्यादृष्टीने ही मजल महत्त्वाची गणावी लागते. तथापि वामनराव हे व्यक्तिवादी लेखक नव्हते. ते तत्त्व-जिगीषु होते. व्यक्तिवाद त्यांना फारसा पसंत नव्हता. स्त्रियांना उपदेश करतांना घराकडच्या व पतीच्या सुखसोयीकडे प्रथम लक्ष द्यावें असा उपदेश त्यांनी केला त्याचे कारण हेंच होय. ते तत्त्वचिकित्सक असल्याने व्यापक दृष्टीने जीवनास व जीवनकर्तृत्वास नैतिक अधिष्ठान असावें अशी त्यांची

मनीषा होती. ह्या नैतिक मूल्यांत व्यक्तीने आपलें व्यक्तित्व समर्पित करावे असें त्यांचें मत आहे. सरला विनायकरावांशी इतकी समरस होते त्याचें कारण हेंच होय. यावरून वामनरावांना व्यक्तिवाद मान्य नव्हता हें स्पष्ट होईल.

या कारणामुळेच वामनरावांच्या कादंबऱ्यांतून एकहि पात्र व्यक्तीवादी असें आढळून येत नाही. उत्तरा व इंदुकाळे ह्यांच्या स्वभावांत व्यक्तिवादाचीं बीजें आहेत. पण त्यांची पात्रें तितक्या कौशल्याने त्यांना रंगवितां आलेलीं नाहीत. व्यक्तिवाद वामनरावांना माफक प्रमाणांत जरी मान्य असता तरी त्यांच्यां हातून अधिक उज्वलतर व्यक्ती निर्माण झाल्या असत्या. ध्येयविहीन व्यक्ती समाजांत असतात हें त्यांना समजत असलें तरी रंगवावेसें वाटलें नाही. कारण त्यांच्या तत्वशोधक दृष्टीला तें जीवन आकर्षक वाटलें नाही. वामनरावांच्या कादंबऱ्यांतला हा दोष आहे. त्याने त्यांचें स्त्रीजीवनविषयक आविष्करणहि एकंदरीने मर्यादित झालें आहे.

अर्थात अधिक चिकित्सेने पाहिलें असतांच असें आढळतें. तो दोष असला तरी विशेष मोठा दोष नव्हे. त्यांचें स्त्रीजीवन आविष्करण हें निश्चित पणें मोलाचें आहे. रागिणी, उत्तरा, इंदुकाळे, सरला, सुशीला ह्या मराठी वाङ्मयांत चिरकाल अमर ठरणार आहेत.आणि त्यांच्या अनुषंगाने वामनराव स्त्रीमनाच्या आशा आकांक्षांचे उद्गाते म्हणून मराठी वाङ्मयांत दीर्घकाल प्रसिद्ध राहाणार आहेत.

२ डॉ. श्री. व्यं. केतकर

वामन मल्हार जोशी यांच्या कादंबऱ्या ज्या कालांत प्रसिद्ध होत होत्या त्याच कालांत डॉक्टर श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्याहि कादंबऱ्या प्रसिद्ध होत होत्या. तेहि त्याकालाचे एक महत्त्वाचे आणि प्रातिनिधिक कादंबरीकार होत. त्यांच्या कादंबऱ्यांचा उद्देश समाजाला अधिक विचार करावयास लावणें हाच होता असें दिसतें. वामनराव जोशी हे ज्याप्रमाणे मानसशास्त्र व तत्त्वज्ञान ह्या ज्ञानशाखांचे आचार्य होते तसे डॉ. केतकर समाजशास्त्र व संस्कृतिशास्त्राचे आचार्य होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोन त्यांनीं स्वीकारल्याने नीतिनियमांचें व नीतिसंकेतांचें स्वरूप हें स्थलकाल सापेक्ष असतें ही गोष्ट त्यांना पटली होती. सहाजिकच रूढ नीतिनियमांच्या मागचा संकुचितपणा त्यांच्या निदर्शनास आला. डॉ. केतकरांनीं बहुतेक रूढ नीति कल्पनांना धक्का दिला आहे त्यांचें कारण हेंच होय. आदर्श समाज धारणेचा शोध करतां करता शेवटीं ते प्राचीन भारतीय समाजशास्त्रीय विचारवंतांनी प्रस्तुत केलेल्या समाजव्यवस्थेकडे वळले व तेथेच स्थायी होण्याचा प्रयत्न त्यांनी केला. पूर्व कालीन समाज रचनेचे जे विशेष ह्या कालापर्यंत टीकार्ह ठरले होते त्या जातिभेद चातुर्वर्ण्य इ. विशेषांना चिरकालिक मान्यता द्यावयास कोणताहि प्रत्यवाय नाही, येथपर्यंत त्यांची मजल गेलेली आहे. "चातुर्वर्ण्य हें देखील जागतिक तत्त्व आहे. आणि प्रत्येकाने आपापलें वर्णकर्म करावें ह्यांतच त्याचें कल्याण आहे...ही जी मांडणी प्राचीनांनीं केली तीच खरी असें प्रस्तुत लेखकाचें मत आहे "[१] असा त्यांचा निर्वाळा आहे.

सामाजिक विचारांची उत्क्रांति या कालखंडांत कशी होत होती तिचें अवलोकन करतांना या कालखंडांत सामाजिक रूढी इ. चा विचार

---

१. डॉ. केतकर भारतीय समाजशास्त्र पृष्ठ २४०

शास्त्रीय दृष्टीने होऊं लागला. व्यावहारिक उपयुक्ततेपेक्षा त्यांच्या शास्त्रीय स्वरूपाकडे लक्ष गेलें, हा ह्या कालाचा विशेष मागे उल्लेखिला आहे. साहित्यहि उपयुक्ततेच्या दृष्टीने लिहिलें जात होतें त्याचें परिशीलन आता शास्त्रीय दृष्टीने होऊं लागलें. (सामाजिक बाबतींत तेंच झालें.) बालविवाह विधवा विवाहबंदी, स्त्रीशिक्षणाभाव, जातिभेद इ. गोष्टींनीं आपली सामाजिक प्रगति अडविली आहे अशी पूर्व कालीन सुधारकांची मनोवृत्ति होती. तिला प्रतिरोधी प्रवृत्ति म्हणून सनातनी वा पूर्वसंस्कृतीचे अभिमानी लोकहि पूर्वकालीन गोष्टींचें समर्थन करीत होते. पण हा जो कालखंड होता ह्यांत बुद्धिवादाचें वी पेरलें गेलें होतें. त्यामुळें 'शास्त्रीय' दृष्ट्या पाहणी वा विवेचन करणें आवश्यक वाटूं लागलें होतें. डॉ. केतकरांनीं पूर्वकालीन समाजरचनेचे जे अभिमानी लोक होते त्यांच्या विचाराला समाजशास्त्रीय व व्यापक पाया निर्माण केला. आणि तसला शास्त्रीय पाया सुधारकांच्या विचारांना व कृतींना समाजवादी विचारधारेने निर्माण केला आहे.

तथापि डॉ. केतकरांचे विचार ह्या दोन परस्पर विरोधी संप्रदायांत न बसण्याइतके वेगळे होते. त्यांच्या विचारांचा वास्तविक (नवा) संप्रदाय व्हावयास हरकत नव्हती. पण तसा संप्रदाय न होण्याची कांही कारणें त्याच्या विचारांत होतीं; त्यामुळे एवढा मोठा बुद्धिमंत लेखक होऊनहि त्याची उपेक्षा झाल्यासारखें झालें. वस्तुस्थिति अशी होती की त्यांचे कांही विचार परस्परविरोधी होते. उ. ब्राह्मणकन्येंत वैजिनाथशास्त्र्यांच्या 'स्मृति' च्या द्वारें स्त्रीवंशपद्धतीचा पुरस्कार केला तर 'विचक्षणें'त स्त्रियांनीं नोकरीहि करणें इष्ट नाही असें मत दिलें [२] स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याबाबतहि तसेंच म्हणतां येईल. एका ठिकाणीं स्त्री व पुरुष यांत समान संधि असाव्यात असें मत [३] तर दुसरीकडे स्त्रीस ४।५ वर्षांपलीकडे (लग्न झाल्यावर) नोकरी करण्याची मुभा नसावी असें मत. गंमत अशी कीं त्यांनी हीं दोन्ही

२ विचक्षणा पृ. ३०३ व ब्राह्मणकन्या पृ. २९०.

३ ब्रा. कन्या पृ. २९७.

मतें सारख्याच अभिनिवेशाने पुरस्कारीलीं आहेत. त्यामुळे त्यांना कोणते जवळचें वाटतें हें कळणें कठीण होतें. अशा परिस्थितींत सर्वसामान्य बुद्धिमंताला संभ्रम व्हावा हें अगदी साहाजिकच आहे. डॉ. केतकरांच्या अंतरंगांत, बुद्धिवादी, पाश्चात्य समाज पाहिलेला समाजशास्त्रज्ञ, व पूर्वकालीन समाज धारणेची दगडबंद इमारत पाहून स्तिमित झालेला समाजशास्त्रज्ञ, या दोघांचा संघर्ष चालू होता व शेवटीं शेवटच्या समाजशास्त्रज्ञानें पहिल्यावर मात केली, असें स्पष्टपणें दिसतें. प्रारंभीं जो उदारपणाचा क्रांतिकारकपणाचा भाग त्यांच्या विचारांत होता त्याला मर्यादा पडूं लागल्या. त्यादृष्टीने 'ब्राह्मणकन्ये' तील 'वैजिनाथस्मृति' व 'विचक्षणे'तील 'तर्कटनीति' ह्यांचा तुलनात्मक अभ्यास करणें उद्बोधक आहे.

डॉ. केतकरांना कसल्या प्रकारची समाजरचना हवी आहे ह्याची कल्पना त्यांच्या कादंबऱ्या व लेखन यांच्या द्वारां होऊं शकते. थोडक्यांत त्यांना मनुष्यांच्या नीतिकल्पना बदलावयास हव्या होत्या असें वाटतें. आजच्या रूढ नीतिकल्पना ह्या प्रायः मध्यम वर्गाने निर्माण केल्या आहेत. त्या सर्वसाधारण समजास लावूं पाहणें चूक आहे.[४] म्हणूनच नीतिकल्पना ह्या अधिक लवचिक व सहानुभूतिवर आधारलेल्या असाव्यात; असें त्यांना म्हणावयाचें आहे, तें फारसें चूक आहे असें म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे त्यांनीं मनुष्यांच्या वैवाहिक नीतिकल्पनांवर आर्थिक परिस्थितीचें नियंत्रण असतें हींहि गोष्ट मान्य केली आहे. त्याच्या अनुषंगानेच नीतिनियमांची योजना व्हावयास हवी असा त्यांचा आग्रह आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोणाशी हेंहि विसंगत आहे असें नाही.

---

४ जगामध्यें असलेले स्त्रीपुरुषांच्या व्यवहाराचे बहुतेक निर्बंध अल्पक्षेत्रीय आहेत. अर्थात् तसल्या प्रकारच्या नियमांचें अवलंबन ज्यांचें कर्तव्यच अल्प क्षेत्रीय आहे त्यांसाठी आहेत..." ब्रा. क. पृ. २४०." 'विचक्षणें'त ही पृ. २९५ वर हाच विचार आला आहे.

परंतु त्यांनी पुढे पुढे आपल्या सर्वच कल्पना प्राचीन समाजशास्त्रीय चौकटींत बसविण्याचा यत्न केला आहे. व त्यामुळे ब्राह्मण समाजालाहि एक 'जातीय पंचायत' असावी व तिने 'जातीय' बाबतींत योग्य ती सुधारणा करण्याचा यत्न करावा असें पुरस्कारिलें आहे. जाती रचना तर त्यांना मान्य आहेच. शेवटीं शेवटीं त्यांनी 'चातुर्वर्ण्य लीग' ही काढण्याचा उपक्रम केला. सहाजिकच ब्राह्मणांच्या व ब्राह्मण्याच्या कल्पनेचा त्यांना कंठरवाने पुरस्कार करावा लागलेला आहे. कांही श्रेष्ठ ब्राह्मणांनी मुसलमान, खिश्चन, इ. विविध धर्मांचा स्वीकार करून त्या त्या धर्मीयाच्या लोकांस हिंदु-धर्मात आणावें. त्याने हिंदुधर्माची सर्व संग्राहकता वाढेल.[३ अ] इ. विचार किती जणांना संमत होणें शक्य आहे? अशा परिस्थितींत त्यांचा 'संप्रदाय' तयार होऊं नये यांत नवल तें कसलें?

डॉ. केतकरांनी सुधारकांची निर्भर्त्सना केली आहे. त्यांना त्यांचे सुधारणेचे मार्ग व यत्न संमत नाहीत. कारण ते परभृत व परधार्जिणे लोक आहेत. गांधीजींच्या प्रयत्नाबाबतहि त्यांना आपलेपणा नाही. सुधारकांत व त्यांच्यांत कोठे विरोध आहे हें पाहणें जरूर आहे. पहिली गोष्ट अशी की सुधारकांनी ज्या सुधारणांचा पुरस्कार केला त्या स्त्री-शिक्षण, पुनर्विवाह संमति, बालविवाह विरोध, इ. होत. या समाजसुधारणा डॉक्टर महाशयांनी मान्य करून ते त्यांच्या पुढे गेले आहेत. आपल्या समाजांत सनातनी लोकांचा सुधारणेला किती तीव्र विरोध होता ही गोष्ट विधवा विवाहाचा १८७० चा वाद, व १८९० च्या सुमारास झालेला संमतिवयाच्या कायद्याच्या निमित्ताने झालेला वाद ह्या दोन गोष्टींवरून स्पष्ट होते. डॉक्टर साहेबांच्या सुधारणांच्या मानाने सुधारक फारच 'मवाळ' (समाजसुधारणेच्या बाबतहि) होते असें म्हणावें लागेल. वैचारिक दृष्टीने पाहिलें असतांनाहि सुधारकांच्या विचारांत काय चूक होती तें समजत नाही. पूर्वेतिहासाचा अभिमान रानड्यांना नव्हता असें म्हणतां येणार नाही. उलट ते त्यांतून बाहेर पडूं

(३ अ) भारतीय समाजशास्त्र

शकले नाहीत अशीच त्यांच्यावर टीका होते. न्या. मू. रानड्यांनी संमति-वयाचे वादांत कायद्याचें समर्थन करतांना एक मार्मिक निदान केलें. व तें म्हणजे हिंदुसमाजास आत्मनियंत्रक शक्ति (Self Regulating Power) नाही. हें, ही शक्ति नसल्यानेच कायद्याची आवश्यकता त्यांना वाटत होती. न्या. मू. रानड्यांचें हें विधान चुकीचें होतें असें म्हणतां येत नाही. डॉ. केतकरांनाहि हें वैगुण्य अमान्य होतें असें नव्हे. त्यासाठीच त्यांनी आपल्या कल्पनेप्रमाणे हिंदुसंघटणेचा व शुद्धीचा विचार पुरस्कारला व ही नियंत्रकाशक्ति ब्राह्मणांनी हातांत घ्यावी असें त्यानी पुरस्कारलें. त्या दृष्टीने पाहतांना सुधारकांचे प्रयत्न आणि विचार अधिक बुद्धिगम्य व कालोचित होते. त्यांच्या विचारांचा प्रसार होणें हेंच सहाजिक होतें. कारण केतकरांच्या कालांत समाजांत बदल झपाट्यांने होत होता. परकीय सरकारच्या आर्थिक दास्यामुळे समाजांत श्रीमंत व गरीब हेच दोन वर्ग निश्चितपणें निर्माण होत होते. जातिबद्ध असा हिंदुसमाज ह्याच प्रकारें द्विविभाग युक्त होत होता. अशा कालांत समाजशास्त्रीय व जातीय भाषेंत विचार मांडणें हें धाडसाचें होतें हें खरें पण समाजाच्या मनोभूमिकेप्रमाणे त्याचें मूल्यमापन होत होतें. असो त्यांच्या स्त्रीजीवनविषयक विचारांचा परामर्ष घेणें आवश्यक आहे.

डॉ. केतकर ह्यांचा स्त्रीजीवन–विषयक दृष्टिकोन अत्यंत सहानुभूति-शील आहे. ह्याबाबतच्या विचारांनी ते सुधारकांच्याहि पुढे गेले आहेत. शेवटीं शेवटीं त्यांचीं मतें सनातनत्वाकडे झपाट्याने झुकत होतीं. पण मौज अशी की स्त्रीजीवनविषयक सहानुभूतीची भूमिका त्यांनी विशेषसी सोडली नाही. त्यांच्या दृष्टिकोनाचा पहिला भाग म्हणजे त्यांनी स्त्री व पुरुष ह्याच्यांत संपूर्ण समानत्व कल्पिलेलें आहे. स्त्रियांना नुसत्याच आर्थिक सवलती देऊन ते थांबले नाहीत. तर नीतिनियमांचें परिपालनहि स्त्री व पुरुष यांत समानतेने व्हावें असा त्यांचा कटाक्ष आहे. मातृवंश पद्धतीचा पुरस्कार करण्याची सवलत स्त्रियांना असावी, अनूढ मातृत्वास मान्यता द्यावी इ. क्रांतिकारक

विचारांचा पुरस्कार करून ते सुधारकांच्या खूप पुढे गेले. परंपरावादी लोकांस येथपर्यंत जाणेंच अशक्य होतें.

डॉ. केतकर हे वृत्तीने समाजशास्त्रज्ञ होते, त्यांनी व्यक्तीच्या शारिरिक भुकांचा विचार सहानुभूतीने केला आहे. मनुष्याच्या विविध गरजांपैकी लैंगिक गरजेचा ही प्रभावी व महत्त्वाची गरज आहे. रूढ नीतिनियमांच्या आधारें ह्या गरजेचा समाजाकडून नकळत वा बुद्धिपुरस्सर कोंडमारा होतो. त्यामुळे माणसांमाणसांतले संबंध अधिक गुंतागुंतीचे होतात. डॉ. केतकरांनी आपल्या कादंबऱ्यांतून ह्या बाबतचा बाऊ काढून टाकला आहे, मनुष्याची लिंगविषयक भूक ही उपमर्दिण्यासारखी नाही, त्याबाबतचे नीतिनियम हे अधिक मानवी असावे असें पुरस्कारिलें. त्यांच्या सर्वपात्रांच्या वर्तणुकींत लैंगिक बाबतींतल्या लपवाछपवीचा अभाव आहे हा त्यांच्या ह्या दृष्टिकोनाचा परिपाक आहे.

तथापि लैंगिक संबंधावर कमी बंधनें असावीं असें पुरस्कारतांना डॉ. केतकरांनी लिंगपिसाट वृत्ति वाढेल असें कांहीहि लिहिलें नाही. किंबहुना त्यांच्यांतला समाजशास्त्रज्ञ इतका जागृत आहे, की तो ह्या भावनेचें महत्त्व ओळखतो. आपली लैंगिक भूक निरनिराळ्या प्रकारांने भागविणारीं त्यांचीं पात्रें ही जीवनाच्या विविध क्षेत्रांत विविध कर्तृत्वाने पुढे येतात. त्यांना ध्येयें आहेत, कार्यें आहेत पण नसत्या कर्मठपणावर (Puritanism) त्यांच्या कृती आधारलेल्या नाहीत. अशा प्रकारें लैंगिक प्रवृत्तीचें योग्य तें महत्त्व दाखवितांना तिचें जादा स्तोम न माजविणें हें डॉ. केतकरांचें अनन्य-साधारण वैशिष्ट्य आहे. व याचें कारण त्यांचा समाज शास्त्रीय दृष्टिकोन हेंच होय.

डॉ. केतकर हे जीवनाकडे सम्यग् दृष्टीने पाहातात. विशिष्ट व्यक्तीचे वा जमातीचे नीतिनियम हे तिच्या भोंवतालच्या परिस्थितींतून कसे निर्माण झाले आहेत हें त्यांनी फार कौशल्याने दाखविलें आहे. मध्यमवर्गीय, व्यापारी, वेश्या इ. व्यवसायाशी संबद्ध लोक इ. चे नीतिनियम त्यांच्या

जीवनांतून सहजगत्या कसे आले आहेत, आणि ते तसे आले असल्याने ते पाळण्याकडे त्यांची प्रवृत्ति कशी आहे हें स्पष्टपणें त्यांनी दर्शविलें आहे. म्हणजे मानवी भावनांना वेगळें न काढतां त्यांना समाजाच्या जीवनाच्या पार्श्वभूमीवरच रंगवून त्यांच्यांत निसर्गसहजत्व व आकर्षकता निर्माण करण्याचा ते यत्न करतात. ब्राह्मणकन्येंतील शिवशरणअप्पाचे विचार, 'विचक्षणें' तील मोतीलालशेठजींचे विचार व वर्तन, 'आशावादी' तील पार्शी, बेने इस्त्रायल इ. लोकांची जीवन पद्धति व त्यांचे नीतिनियम हे सहजतेने दर्शविलेले आहेत.

त्यांच्या दृष्टिकोनाचें आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या पात्रांच्या मनांत कोणत्याहि प्रकारचा मानसिक संघर्षाचा अभाव. त्यांनी विचारशील कर्तबगार अशीं पात्रें रंगविलीं, पण त्यांचें जीवन इतकें सहज आहे कीं त्यांत कोणत्याहि प्रकारचा संघर्ष नाही असें वाटतें. त्यादृष्टीनें पाहतां त्यांचीं सगळीं पात्रें थोडीफार अपवादभूत जीवन जगणारी आहेत. डॉ. तर्कटे, प्रो. लोंढे, ब्रह्मगिरी, वैजिनाथ शास्त्री, ही किती कर्तृत्ववान् विचारी माणसें. पण त्यांच्या तोंडून विचार बाहेर पडतात ते निश्चित प्रकारचे व संघर्षविरहित. राजवाड्यांची आठवण करून देणारें डॉ. केतकरांनी निर्माण केलेलें वैजनाथ शास्त्री हें पात्र, व त्याच व्यक्तीची आठवण व्हावी असें वामनरावांनी निर्माण केलेलें नारायराव पाठक हें पात्र ह्या दोहोंची तुलनात्मक पाहणी केली असतां डॉ. केतकरांचा वैजनाथशास्त्री हा नारायणराव पाठकांचें जीवन पण संघर्ष विरहित रीतीने जगतो आहे. इतकेंच नव्हे तर आपल्या विचारांशी विसंगत असतांहि तो पुनर्विवाह करूनहि मोकळा झालेला आहे. डॉ. केतकरांच्या स्त्रीजीवन–विषयक दृष्टिकोनाचा परिचय करून घेतल्यानंतर त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून ज्या विविध प्रश्नांची चिकित्सा केली आहे त्या प्रश्नांचा विचार करणें आवश्यक आहे. स्त्रीजीवनविषयक इतक्या विविध प्रश्नांचा व इतक्या व्यापक रीतीने विचार ह्या कालखंडांत कोणी केला नव्हता. त्यांच्या कादंबऱ्यांतून कांही प्रमुख प्रश्नांचा पुनः पुनः उहापोह झालेला आहे.

डॉ. केतकरांच्या कादंबऱ्या ह्या समाज जीवनविषयक विचारांना प्राधान्य देऊन लिहिलेल्या आहेत. कलात्मकता ही अनुषंगाने आलेली असेल, तिच्याकडे त्यांचें लक्षच नाही. किंबहुना आपल्या कृतींच्या मोठेपणाचें 'मूल्यमापन करावें असें साहित्यशास्त्र अद्याप विकसित झालेलें नाही' असें त्यांनी म्हटलें आहे. त्यावरून एक गोष्ट स्पष्ट होईल कीं, डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांचें मूल्यमापन करतांना प्रस्थापित साहित्यविषयक निकष उपयोगी पडणार नाहीत हें पुष्कळसें खरें आहे. रचनेच्या दृष्टीने त्यांच्या कादंबऱ्या शिथिल आहेत ही गोष्ट सर्वमान्य आहे. स्वभाव लेखनाच्या बाबतहि आपणांस तसेंच म्हणतां येईल. डॉक्टर महाशयांनी कांही उत्कृष्ट स्वभावचित्रें निर्माण केलेलीं आहेत. नाही असें नाही. तथापि त्यांचीं पात्रें हीं प्रामुख्याने विचारप्रधान आहेत. त्यांचीं पात्रें स्वभावविशेषाने चमकत नसून विचारविशेषाने चमकतात. याचा परिणाम असा झाला आहे की, प्रत्येक कादंबरींत समाजाच्या निरनिराळ्या थरांतील निरनिराळ्या विचारांचीं अनेक माणसें त्यांच्या कादंबरींत आलीं आहेत. कादंबरींत एका प्रकारच्या पात्राच्या जीवनाचा व विचारांचा परिचय करून दिला की त्यांचें काम संपलें; मग दुसऱ्या पात्रास प्राधान्य. त्यामुळे एका कादंबरींत अनेक पात्रांस प्राधान्य मिळतें. त्या दृष्टीने कादंबरीस कलादृष्ट्या वैगुण्य प्राप्त होतें हें खरें. पण त्यांनी 'परागंदे' च्या प्रस्तावनेंत म्हटल्याप्रमाणे त्यांच्या कादंबऱ्यांतील वातावरण हें 'एकमेकांशी ज्यांच्या फांद्या अडकल्या आहेत अशा स्वतंत्र बुंधांच्या वृक्षराजींशी' तुलना करतां येईल असें असतें. स्वतः त्यांनीच दिलेला हा दृष्टांत त्यांच्या कादंबऱ्यांची यथायोग्य ओळख करून घेण्याचे दृष्टीने बराच समर्पक आहे. त्यांच्या कादंबऱ्यांचें विवेचन करतांना त्यांच्या वैचारिक मोलाची पाहणी महत्त्वाची आहे. समाजाचे जीवन दिग्दर्शन करण्याची भूमिका प्रधान असल्याने निरनिराळ्या वर्गांतली निरनिराळीं पात्रें आहेत. उदा. मध्यमवर्गाची प्रातिनिधीक कांहीं पात्रें उ. डॉक्टर, वकील, प्रोफेसर इ. व्यापार व व्यवसायांत असणाऱ्या व्यक्ति,

श्रीमंत व त्यांचें जीवन दिग्दर्शन करणारीं, वेश्या व त्यांशीं संबंध असलेले लोक, इ. विविध प्रकारचीं पात्रें त्यांच्या कादंबऱ्यांत आढळतात. त्या सर्वांना थोडे फार सारखेंच महत्त्व दिलेलें असतें. त्यांच्या कादंबऱ्यांतील पात्रांचा व समाज जीवन विषयक प्रश्नांचा विचार विलगत्वाने करतां येत नाही.

'गोंडवनांतील प्रियंवदा' ह्या पहिल्याच कादंबरींत डॉ. केतकरांनी आपल्या 'केतकरी' विचारांची चूणूक दाखविली आहे. ह्या कथेंत शारदाबाई, बिंबा व प्रियंवदा हीं प्रमुख स्त्रीपात्रें आहेत. बिंबा व शारदाबाई या दोघीजणी विधवा आहेत. त्यांची हरिभय्या मोघे व वैजनाथ शास्त्री यांच्याशी ओळख होते, व शेवटीं त्या दोघीजणी पुनर्विवाह करतात. हरिभय्या व बिंबा ह्यांच्या प्रेम प्रकरणांत विचारांच्यापेक्षां विकारांचा भाग अधिक आहे. वैजनाथशास्त्री व शारदाबाई यांच्यांत मात्र समाजसुधारणे-संबंधीं खूपच चर्चा होते. व त्यांत अनेक विषयांचा उहापोह आलेला आहे. स्त्री पुरुष संबंध, प्राचीन ध्येयें व अर्वाचीन ध्येयें, पुनर्विवाह व सुधारकांचे यत्न, विधवांचें कार्यक्षेत्र, चातुर्वर्ण्य व स्त्रीकर्तव्यें इ. अनेक विषयांवर वैजिनाथ शास्त्रयांनी आपलीं मतें व्यक्त केलीं आहेत व त्यांचा शारदेच्या मनावर खोल परिणाम झालेला आहे. वैजनाथशास्त्री हे इतिहास व संस्कृति-संशोधक. त्यांचे विचार हे सुधारणेला विरोधी आहेत. सुधारकांची ते टिंगल करतात. सुधारक सर्व वस्तुस्थिति संबंधाने अगदी ज्ञानशून्य आहेत (प्रियंवदा पृ. ८१) असा त्यांचा अभिप्राय आहे. अर्थात् सुधारकांच्या पुनर्विवाह पुरस्काराला त्यांचा विरोध आहे. असें असलें तरी शेवटीं वैजिनाथशास्त्री व शारदाबाई यांचा पुनर्विवाह होतो. बिंबा हीहि हरिभय्या-बरोबर विवाह करते. ह्या ज्या घटना घडलेल्या आहेत त्यावरून डॉ. केतकरांना पुनर्विवाह हा अमान्य नव्हता असें म्हणतां येईल. नाहीतर इतिहासाचार्य राजवाड्यांची प्रतिकृति म्हणजे वैजिनाथशास्त्री होत; असल्या कर्म व निष्ठावंत पुरुषाला पुनर्विवाहास तयार करण्याचें कांहीच कारण नव्हतें. त्या दृष्टीने

पाहतां वैजिनाथशास्त्र्यांचे विचार म्हणजे केतकरांचे नव्हत असें म्हणतां येतें. पुनर्विवाहाचा पुरस्कार करतां करतां डॉ. महाशयांनी सुधारकांचा व त्यांच्या प्रयत्नांचा यथेश्च उपहास केला आहे. स्त्रीजीवन विषयक प्रमुख तत्कालीन प्रश्न जो 'पुनर्विवाह संमति' त्यास डॉ. केतकरांनी ह्या कादंबरींतून अनुमति दिली आहे.

तथापि प्रमुख पात्र प्रियंवदेचें आहे. वास्तविक तिला कादंबरीभर केवळ पतिवियोगाचा अनुभव घेत बसावा लागतो. तिचा पति रामभाऊ हा बॅरिस्टरची परीक्षा देण्यासाठी इंग्लंडांत गेलेला असतो. दीर्घकाल तो तिकडे असतो. ती पतिनिष्ठ आहे. पति यूरोपांत गेल्यानंतरहि ती सासरींच राहते. पण पतीच्या पत्रव्यवहारावरुन पतीस आंग्लयुवयींचें आकर्षण वाटावयास लागलें असें दिसून येतें. व त्याबद्दल अत्यंत सौम्य शब्दांत ती समज देते. रामभाऊ परत येतो, त्यांचें पुनर्मीलन होतें. तिचें व पतीचें बोलणें निरनिराळ्या विषयांवर होतें. त्यांत बाह्य (शारिरिक व पोशाखविषयक) सौंदर्याचें आकर्षण स्त्री व पुरुष या दोघांना सारखेंच असतें, प्रेमांत तें महत्त्वाचें असतें. ही गोष्ट दोघांनाहि मान्य आहे. (पृ. १०१, १०२)

डॉ. केतकरांच्या प्रेमविषयक विचाराचा हा एक महत्त्वाचा भाग आहे. शारदाबाई व प्रियवंदा यांच्या संवादातूनहि नवनवीन क्रांतिकारक विचार आलेले आहेत. या कादंबरींत प्रियंवदेने हे जे विचार व्यक्त केले आहेत हें या कादंबरीचें वैशिष्ट्य होय. ती म्हणते–'राष्ट्रास पुनर्विवाह आवश्यक आहे किंवा नाहीं हें सांगण्याचा अधिकार स्त्रियांस आहे पुरुषांस नाहीं...राष्ट्रांतले पुरुष नष्ट झाले तरी थोडक्या पुरुषांच्या साहाय्याने अनेक पत्नीपद्धति सुरु करून एका पिढींत पुन्हां गाजबजवितां येईल. पण राष्ट्रांतल्या बायका नाहींशा झाल्या कीं राष्ट्र गेलेंच. ...राष्ट्र म्हणजे बायका, पुरुष नव्हे" (५) पण याही पेक्षां क्रांतिकारक विचार पुढेंच आहेत. ...'एखाद्या जमीनीचा विशिष्ट कीं पेरण्याकडे उपयोग करावा कीं करूं नये हें ज्याप्रमाणे जमीनीच्या मालकाने ठरवावयाचें असतें; बियांच्या व्यापा-

ज्याने नसतें. त्याप्रमाणे प्रजोत्पादनाचा प्रश्न केवळ स्त्रियांनी आपल्या इच्छेने सोडवावा. विवाह आणि प्रजोत्पादन याविषयी झालेले सर्व पुरुषी नियम व्यर्थ आहेत." "स्त्रियांच्या गर्भाशयास क्षेत्राची उपमा देतात. जो शेताचा मालक त्यानेच शेतांत कोणत्या प्रकारचें बीं पेरायचें हें ठरवावयाचें की स्त्रियांच्या मालकाने शेत शोधावयाचें"[७] हे उद्गार कोणाहि स्त्रीस्वातंत्र्यवादिनीचे नाहीत. शंकांतीत असें जिचें वर्तन आहे अशा प्रियंवदेचे हे विचार आहेत. पहिल्याच कादंबरींत ह्या विचारांनी डॉ. केतकरांनी समाजाला जे धक्के दिले ते त्यांच्या मोठेपणाचे द्योतक आहेत. स्त्रीस्वातंत्र्यवादिनी स्त्रीच्या तोंडीं शोभतील असे विचार डॉ. केतकरांसारख्या समाजशास्त्रज्ञाने व्यक्त केले आहेत. स्त्रियांच्या प्रश्नांची व्यापकता विलक्षणच वाढली.

अशा प्रकारें या कादंबरींत वैवाहिक नीति ठरवितांना स्त्रीच्या विचारांचा मागोवा घेऊन तिला संमत असलेले तेवढेच नीतिनियम बंधनकारक मानावेत. व लैंगिक प्रजोत्पादनाच्या बाबतींत तर तिलाच खरें स्वातंत्र्य दिलें पाहिजे असे क्रांतिकारक विचार ह्या कादंबरींत प्रथम आलेले आहेत. परंतु जो पर्यंत पुरुषप्रधान समाज रचना अस्तित्वांत आहे तोपर्यंत ह्या बाबत कांही क्रांतिकारक स्वरूपाचे फेरफार होतील हें शक्य नाही.

डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांत 'आशावादी' 'ब्राह्मणकन्या' व 'विचक्षणा' या कादंबऱ्या विशेष महत्त्वाच्या आहेत. या कादंबऱ्यांतून त्यांनी आपले विचार अधिक निर्भयपणें मांडले आहेत. पण विचारांच्या व प्रश्नांच्या दृष्टीने ह्या कादंबऱ्यांची रचना बरीच शिथिल झाली आहे. 'आशावादी' या कादंबरींत ब्रह्मगिरी हें मध्यवर्ति पुरुष पात्र आहे. पण मध्यवर्ति स्त्रीपात्र म्हणून कोणत्याहि एका पात्राकडे बोट दाखवितां येणार नाहीं. डॉ. नंदिका, हंटर (गोदावरी), पद्मा, विहंगमा, कपिला हीं ह्या कादंबरींतील प्रमुख पात्रें होत. ही कादंबरी प्रामुख्याने देश सुधारणेचे जे

७ कित्ता, पृ. ११४.

विविध यत्न चालू आहेत त्यांचें दिग्दर्शन करण्याच्या दृष्टीने लिहिली आहे. त्या अनेक यत्नांत समाजसुधारणेचें स्थान कोणतें असावें–आहे–याबाबत लेखकाचें मत मांडण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे.

पतित स्त्रियांच्या संबंधीचा प्रश्न सोडविण्यासाठी या कादंबरींत एक आदर्श असें 'उद्योग मंदिर' स्थापन केलें आहे. तेथे मिसेस हंटर ह्या प्रमुख आहेत. ह्या संस्थेंत स्त्रियांना विविध प्रकारचें शिक्षण दिलें जातें. त्यांत धार्मिक शिक्षणाचा भाग अल्प आहे. संचालिका हंटरबाई या धर्माने ख्रिस्ती असल्या व मिस्. हंटर ही त्यांची मानलेली कन्याहि ख्रिस्ती असली तरी संस्थेतलें वातावरण वा संस्थेचें धोरण हें धर्मप्रसारास पोषक नाही. आध्यात्मिक जीवनावर भर देणाऱ्या धर्मापेक्षा ऐहिक जीवनांत अधिकाधिक 'रस' घेण्याचें व त्यादृष्टीने अधिक प्रयत्न करण्याचें शिक्षण व मार्गदर्शन स्त्रियांना येथे मिळतें. डॉ. केतकरांनी पतित स्त्रियांचा प्रश्न सहानुभूतीने व त्यांच्या दृष्टीने मांडलेला आहे. त्यांच्या दृष्टीने म्हणण्याचें कारण कीं त्यांनीं या आश्रमांतलें नैतिक वातावरण हें तत्सम संस्थांत जें आढळतें तसलें कर्मठ नाही. तर तें जीवनान्वेषी आहे.

त्यानंतर दुसरी समस्या म्हणजे पुनर्विवाहित दांपत्यांच्या मुलांमुलींना ज्या प्रकारचें जीवन जगावें लागतें त्याच्या अनुषंगाने निर्माण होणारा प्रश्न होय. डॉ. नंदिका ही एक पुनर्विवाहित दांपत्याची मुलगी. तिचें शिक्षण बरेंच झालेलें असतें. ती इंग्लंडहून डॉक्टर होऊन येते. पण तिचें लग्न एका सामान्य गृहस्थाबरोबर (लालनाथ) झालेलें असतें. तो बराच कमी शिकलेला व नंदिकेच्या मानाने सामान्य असतो. नंदिकेचे विवाहनीतिविषयक विचार पूर्ण पक्व झालेले नसतात. तिचे पति शैक्षणिक व सामाजिक दृष्टीने अगदीं सामान्य असे आहेत. त्यामुळे तिच्या जीवनांत विवाहविषयक असंतुष्टता असावी हें सहाजिक आहे. निदान तसा संशय तिच्या पतीस येतो. डॉ. परमानंद ह्या तरुण डॉक्टराकडे तिचें चित्त आकर्षित झालेलें असावें असा संशय तिच्या पतीला येतो. कारण 'बायकोने

अनुक्रम २१९०९ वि. निबंध
क्रमांक १०८३ नों: दि: ९९ २५/५/

नवऱ्यापेक्षा अधिक उच्च पदवीला असावें ही गोष्ट जगास खपत नाही आणि आपण जरी आपल्या मनामध्ये निराळी दृष्टि ठेविली नाही तरी जग ती दृष्टि टिकूं देणार नाही ' असें त्यास वाटलें. –(आशावादी पृ. ८७).

डॉ. केतकरांनी अशा प्रकारचें हें दांपत्य रंगवून आपले विचार व्यक्त केले आहेत. लालनाथांच्या मनांत पत्नीविषयी तात्कालिक संशय येतो. पण त्यांचें वैवाहिक जीवन हें एकंदरीने सुखी आहे. त्यांत असंतुष्टता नाही असें दाखवून डॉक्टर महाशयांनी ह्या प्रकाराबाबत सहानुभूति व्यक्त केली आहे. नंदिकेच्या रूपाने हा एक प्रश्न मांडला आहे. ह्या कादंबरींतलें नंदिका हें मध्यवर्ति पात्र आहे. असें सामान्यतः म्हणावयास प्रत्यवाय नाही. कादंबरींतल्या प्रमुख घटनांचा ह्या समस्यांचा कोणत्या ना कोणत्या रूपाने तिच्याशी संबंध पोचतो.

विहंगमेच्या रूपाने डॉ. केतकरांनी स्त्रियांच्या आर्थिक परावलंबित्वाचा प्रश्न मांडला आहे. विहंगमा ही एक सुस्वरूप स्त्री आहे. तिच्या सौंदर्यामुळेच तिला बॅ. विश्वास या नांवाचा परदेशाहून शिक्षण घेऊन आलेला गृहस्थ पति म्हणून लाभलेला असतो. तिची बहीण अलकनंदा ही पण तशाच प्रकारच्या दुसऱ्या एका गृहस्थास दिलेली असते. विहंगमेची इच्छा आपल्या नवऱ्याने आय्. सी. एस्. मध्ये शिरावें अशी असते, त्या योगें आपल्याला अधिक वैभव प्राप्त होईल असें तिला वाटतें. तिचा नवरा ही गोष्ट करीत नाही. तो साधा बॅरिस्टरच राहतो. तिचा मेहुणा मात्र आय्. सी. एस् मध्ये शिरून वैभवाप्रत जातो. व म्हणून विहंगमेला बहिणीबद्दल असूया असते. ती स्वतःचे जीवनाबद्दल असंतुष्ट असते, ही असंतुष्टता डॉ. नंदिकेजवळ बोलून दाखविली असतां नंदिकेचे विचार ऐकून तिचें मतपरिवर्तन होतें. नंदिकेच्या मतें स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त झालें व त्या मिळवत्या झाल्या तर असंतुष्टावस्थेंत त्यांना राहाण्याचें कारण रहाणार नाही. विहंगमेला हे विचार पटत नाहीत. पण तिच्या जीवनाला पुढे वेगळीच कलाटणी मिळते. तिची असंतुष्टता कमी होते.

डॉ. नंदिकेचें मन किंचितकाल ज्या तरूण डॉक्टरवर गेलेलें असतें. त्याच्या मोहाला पद्मा ह्या नांवाची एक नर्स बळी पडते. तिच्या वाट्यास हें अनाहूत मातृत्व आलेलें असतें. ती डॉ. नंदिकेच्या दवाखान्यांत प्रसूतिसाठी येते तिला मुलगी होते. ती मुलगी पद्मा स्वत:जवळ ठेवावयास तयार नसते. डॉ. नंदिका ब्रह्मगिरींना ह्याबाबत विचारतात तेव्हा ते त्याबाबत लक्ष घालतात व कोणी हिंदु कुटुंब ती मुलगी जवळ बाळगावयास तयार आहे काय ह्याचा तपास करावयास लागतात. त्यांना कोणीच होकार देत नाही. दरम्यान नंदिकेच्या प्रयत्नाने मिसेस हंटरच्या शाळेंत त्या बालकाची व्यवस्था करण्याचें ठरतें. त्या मानलेल्या मायलेकी नागपुरास येतात तेथे ब्रह्मगिरीबुवांची गाटभेट ओळख होते. मिस् हंटर हीच ब्रह्मगिरींची पत्नी आहे असें पुढे उघडकीस घेतें.

पद्मेवर झालेल्या बलात्कारामुळे तिच्यावर जो प्रसंग येतो, त्यापेक्षा तिच्या मुलाची व्यवस्था काय करावी ह्या संबंधाचा जो प्रश्न उद्भवतो तो एक मोठा सामाजिक प्रश्न आहे. व त्यासाठी अशाप्रकारची एक संस्था असावी असें डॉ. केतकरांनी सूचित केलें आहे. पण ह्याच प्रसंगाने ब्रह्मगिरीबुवांनी (देविदासराव अत्रे) जें समाज संशोधन केलें त्यांत त्यांना वेश्यांच्या जीवनाचें अवलोकन करावयास मिळालें. त्यांत समाजाने हीन मानलेल्या व्यवसायांतली माणुसकी देविदासपंतांना दिसून आली. त्या समाज-जीवनाच्या अंगाविषयींचे विचार या कादंबरींत आले आहेत. त्यांचा विचार करणें आवश्यक आहे.

नंदिका ही जर मध्यभागांतील (कादंबरीच्या) नायिका असेल तर कपिला ही उत्तर भागांतील नायिका आहे असें म्हणतां येईल. ब्रह्मगिरीबुवा जेव्हा अचानकरीतीने एका वेश्येच्या गृहांत प्रवेश करतात तेव्हा तेथे त्यांचें झालेलें स्वागत हें इतकें हार्दिक व सहजस्निग्ध असतें कीं तो अनुभव आल्यानंतर ब्रह्मगिरीबुवांचे वेश्याजीवनविषयक विचार आणि कल्पना बदलतात. डॉ. केतकरांनी आपले ह्या विषयीचे विचार ह्या कादंबरीत

कपिला ह्या पात्राच्या व तिच्या विचारांच्या अनुषंगाने व्यक्त केले आहेत. कपिला ही वेश्याकन्या पण तिला तो व्यवसाय स्वीकारावयाचा नसतो. एका ब्राह्मण विधवेची नायिकेच्या घरीं वाढविलेली मुलगी म्हणजे कपिला होय. तिची इच्छा विवाह करावा अशी असते. पण समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा कलुषित आहे. तिचें म्हणणें स्त्रीशिक्षण हें महत्त्वाचें खरें पण तें देण्याचा प्रकार ठरवितांना "नायकिणींचा देखील सल्ला घेतला पाहिजे" (आशावादी पृ. २००). त्याचप्रमाणे ब्रह्मगिरीबुवांना 'वेश्यावर्गातच शिकलेला व वेश्याव्यवसायाकडे न वळणारा असा एक स्त्रियांचा वर्ग निर्माण होत आहे' व हलके हलके वृद्धिंगत होत आहे असें आढळून आलें. अशाप्रकारें वेश्यांच्या जीवनाबद्दल ब्रह्मगिरी बुवांच्या मनांत जे निरनिराळे गैरसमज होते ते नष्ट होऊन त्यांना त्या जीवनाबद्दल सहानुभूति वाटूं लागली. डॉ. केतकरांच्या मतांपैकीं एक महत्त्वाचें मत म्हणजे वेश्या-व्यवसाय हा समाजधारणेस आवश्यक आहे हें होय. वेश्याव्यवसायाचें समर्थन करतांना डॉक्टर महाशयांनी त्या व्यवसायांत असणाऱ्या स्त्रियांच्या ठायीं मानवतेचा जो पाझर वाहत आहे त्याचें दिग्दर्शन करून दाखविलें आहे. वेश्याचें जीवन निरनिराळ्या उदात्त व थोर भावनांनी युक्त आहे. असें त्यांनी दर्शविलें आहे. त्यांना समाजांत अनेक व्यवसाय करणारे लोक—स्त्रीपुरुष—आहेत त्यांत हा व्यवसाय करणाऱ्या स्त्रिया असावयास कांही हरकत नाही असें म्हणावयाचें आहे. कपिलेचें जें स्वभावचित्र रंगविलें आहे त्यांत त्यांनी त्या वातावरणांत वाढलेल्या मुलींच्या मनोवृत्ती कशा सहानुभूति-शील, उदात्त व मानवी आहेत हें स्पष्ट केलें आहे.

अशा प्रकारें या कादंबरींतील प्रमुख स्त्रीजीवन विषयक अंगोपांगांचें स्वरूप आहे. सुधारकांच्या सुधारणांचा (उ. पुनर्विवाह) अवलंब करून त्यांचा मात्र भरपूर उपहास केलेला आहे. त्यांच्या (डॉ. केतकरांच्या) मतें पुनर्विवाहांत प्रामुख्याने प्रेमाचा भाग असावा. दोघांचे एकमेकांवर प्रेम असावें व मग स्त्रीचें वैधव्य प्रणयभंगास कारण होऊं नये. त्या दृष्टीने

त्यांनी बिंबा व शारदाबाई यांच्या विवाहाला प्रेमभावनेची जोड दिली आहे. सुधारकांच्या प्रयत्नांत लग्न हा व्यवहाराचा भाग होतो. दोन अनोळखी माणसें एकत्र येतात व तो विवाह लागतो. म्हणून डॉ केतकरांना तो पसंत नाही. वेश्या व्यवसायाबद्दलची सहानुभूति, स्त्रियांना विविध कर्तृत्व क्षेत्रें उपलब्ध असावीं असें पुरस्कारण्याचें त्यांचें धोरण, पतित स्त्रियांना अधिक मानवतेने वागविण्याची आवश्यकता, स्त्रियांना आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होण्याची आवश्यकता, ह्या स्त्रीजीवनविषयक गंभीर प्रश्नांबरोबरच वैवाहिक जीवनांतहि प्रियाराधन व वल्लभोपासना या दोन्ही गोष्टींची असलेली आवश्यकता, रूप, पोषाख, टापटीप व्यवस्थितपणा, कलापूर्ण वेषभूषा इ. बाह्य गोष्टींचें असलेलें (महत्त्व त्यांनीं जीवन अधिक रसमय होतें) इ. वेगळ्या प्रकारचे प्रश्नहि ह्या कादंबरींत आलेले आहेत. कादंबरीच्या प्रकाशनाचा काल लक्षांत घेतला तर हे विचार क्रांतिकारक होते असें म्हणावें लागेल. आजहि त्यांपैकी कांहींची क्रांतिकारकता कमी झालेली नाही.

डॉ. केतकरांची कलेच्या दृष्टीने अधिक रेखीव आणि विचारांच्याहि दृष्टीने अधिक क्रांतिकारक अशी कादंबरी म्हणजे 'ब्राह्मणकन्या' ही होय. ह्या कादंबरींत डॉ. केतकरांनीं प्रामुख्याने वेश्याव्यवसायाच्या अनुषंगाने निर्माण होणारा प्रश्न चर्चेस घेतलेला आहे. कालिंदी नांवाची एका पुनर्विवाहित दांपत्याची मुलगी असते. ती जेव्हा मोठी होते तेव्हा तिला व तिच्या संततीला कोणतेंहि स्थान मिळत नाहीं. तिचे वडील ब्राह्मण असतात. त्यांनी तारुण्यांत समाजसुधारणा करावी ह्या हेतूने एका विवाहबाह्य संबंधापासून झालेल्या मुलीशी लग्न केलेलें असतें. त्यांची अपेक्षा असते कीं आपण ब्राह्मण आहोंत तेव्हा कांही काल गेल्यानंतर आपलीं मुलें परत ब्राह्मण समाजांत येतील. पण ब्राह्मणसमाज त्यांना आपल्यापैकी म्हणण्यास व आपल्यांत व्यावयास तयार नव्हता. कालिंदीच्या लक्षांत ही गोष्ट ताबडतोब आली. तिला असें आढळून आलें कीं आपल्या संततीस, हिंदु समाजांत जर

स्थान असेल तर तें विदुर कडुमराठे, अकरमासे ह्या जमातींत होय. ह्याचाच अर्थ त्यांना समाजांत मानाचें असें स्थान नाहीं, व हें ध्यानांत घेऊन ती एका व्यापाऱ्याची 'रखेली' म्हणून राहते. आपल्या पित्याच्या गृहाचा त्याग करते. ह्या तिच्या कृत्यामुळे तिला जो विविध प्रकारचा अनुभव आला तोच कादंबरीचा विषय आहे. डॉ. केतकरांच्या इतर कादंबऱ्यांत अनेक तुल्यबल स्वभावचित्रांचा अशा तऱ्हेने समावेश केलेला असतो कीं, कोणतें प्रमुख व कोणतें दुय्यम हें ठरवितांना संभ्रम उत्पन्न व्हावा. ह्या कादंबरींत मात्र कालिंदी हीच मध्यवर्ति व्यक्ति आहे. सारें कथानक तिच्या भोवतीं रेंगाळतें आहे. व त्यादृष्टीने ही कादंबरी पुष्कळच आकर्षक झालीं आहे. कलाकृति म्हणूनहि तिची योग्यता श्रेष्ठ ठरावयास फारशी अडचण नाही.

वेश्या व्यवसायाकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोण बदलावा हा प्रमुख हेतु दिसतो. व म्हणून कादंबरींतले प्रमुख प्रश्न त्याच व्यवसायाशी संबद्ध असे आहेत. काटेकोरपणें सांगायचें झालें तर या कादंबरींतला प्रमुख विषय म्हणजे वेश्या व्यवसाय नाही. कालिंदी वेश्यांच्या वस्तींत राहाते, पण त्या व्यवसायाकडे ती वळत नाहीं. किंबहुना त्या व्यवसायाबद्दल तिला आपलेपणा वाटत नाही. व आपण काय संकटांत सांपडलों आहोंत अशाच दृष्टीने ती त्या प्रसंगाकडे पाहते. तेव्हां ह्या कादंबरीचा प्रमुख विषय म्हणजे 'विवाह' नांवाचा समाजमान्य संस्कार, अगर तो न करतां स्त्री पुरुषांनी पतिपत्नी म्हणून राहणें हें इष्ट कसें आहे किंवहुना आपण समजतों तितकें निंद्य कसें नाहीं, हे दाखविणें हा आहे. कालिंदीची आजी (आईची आई) मंजुळा ही नवऱ्यास सोडचिठ्ठी देते व डॉ. चिंतोपंत नांवाच्या गृहस्थांबरोबर तशीच राहते. तिला मुलें होतात. त्यांपैकीच एक कालिंदीची आई. तिने फक्त लग्न केलेलें असतें. तिची मुलगी म्हणजे कालिंदी ही परत तोच प्रयोग करूं पाहते. परंतु शेवटीं सर्वच विषयाला कलाटणी मिळली आहे. कालिंदीचा प्रियकर शिवशरणअप्पा हा व्यापारांत अपयश आल्याने आत्महत्त्या करतो. पण कालिंदीच्या मुलाची पोटगीची व्यवस्था करतो. कालिंदी मध्यंतरी

मुंबईस असतां रामराव ह्या मजुरांच्या पुढाऱ्याच्या सहवासांत येते. त्यांचें प्रेम बसतें, व तीं विवाहबद्ध होतात. शेवटीं सर्वच प्रमुख पात्रें विवाहबद्ध होतात. विवाहविरहित पण पतिपत्नी म्हणून राहाण्याचें कोणी ठरवीत नाही. ह्यावरून असें स्पष्ट होते की डॉ. केतकरांना विवाहबाह्य संबंधाचें स्तोम माजवून त्यांचा प्रसार करावयाचा नव्हता. पण रूढ नीतिकल्पनांना धक्का द्यावयाचा होता.

हा धक्का मात्र त्यांनी परिणामकारकपणाने दिलेला आहे असें म्हणतां येतें. विवाह बंधनें हीं किती तकलुपी व शिथिल आहेत हें त्यांनी समाजाच्या निरनिराळ्या जमातींतील व वर्गातील लोकांच्या जीवनावरून दर्शविलें आहे. विवाह हा प्रामुख्याने मालमत्तेंतल्या मालकी हक्कासाठी आहे असें मत वैजनाथ शास्त्र्यांनी दिलें आहे. कालिंदी, तिचा भाऊ सत्यव्रत बहिण उषा, मैत्रिण एसतेर इ. सर्वजण जरी आपलें प्रेम आहे त्या व्यक्ती बरोबर विवाहित होतात तरी त्यांना एका नव्या 'समाजनीती' चें दर्शन होतें. नीति म्हणजे 'वैजनाथनीति' होय. इतिहासचार्य राजवाड्यांची आठवण करणारें —'प्रियवंदे'तील वैजनाथशास्त्री हें पात्र ह्या कादंबरींत आलें आहे. समाजधारणेचे त्यानी तयार केलेले नियम 'वैजनाथस्मृति' म्हणून प्रसृत व्हावेत अशी प्रमुख पात्रांची इच्छा असते व प्रमुख पात्रें ह्या वैजनाथ स्मृतीपुढे मान तुकवितात. डॉ. केतकरांनी या –'स्मृतीं'च्या द्वारे आपले समाजधारणेचे विचार व्यक्त केले आहेत. ते विचार फारच क्रांतिकारक आहेत. त्यापैकी प्रमुख अंगें पुढील होत.

"स्त्रियांची पुरूषांकिकता किंवा कुटुंबांतील पितृसत्ता द्रव्यमूलक असल्यामुळे प्रस्तुत विवाह संस्था अनेक प्रसंगीं स्वाभाविक प्रवृत्तीशी विसंगत व समाजास अपूरी होते" [७] हा अपूरेपणा नष्ट करण्यासाठी जे उपाय वैजनाथ शास्त्र्यांच्या मुखाने डॉ. केतकरांनी सुचविलेले आहेत, त्यांत प्रमुख म्हणजे "जगांत दोन प्रकारच्या कुटुंबपद्धति सर्व देशाच्या कायद्याने चालू

७ ब्राह्मणकन्या पृ. २९०.

व्याव्यात. एक म्हटली म्हणजे मातृसत्ताक कुटुंब पद्धति व दुसरी पितृसत्ताक कुटुंबपद्धति. याशिवाय दोन्ही कुटुंबपद्धतींत देखील अंतर्गत अनेक भेद असणार...पुरुषसत्ताहीन मातृसत्ताक कुटुंबपद्धति यशस्वी करणें लोकसंख्येच्या वाढीसाठी आणि स्त्रियांस त्यांचें हक्काचें मातृत्व देण्यासाठी अवश्य आहे... कार्यारंभासाठी मी सर्व अविवाहित राहिलेल्या व वैधव्यांत असलेल्या स्त्रियांनी जर एक होऊन पितृसत्ताक कुटुंबपद्धती विरुद्ध बंड केलें तर तें अधर्म न होतां उच्चतरधर्म होईल" [८] "मातृसत्ताक कुटुंबपद्धतीची मान्यता वाढावी ह्यासाठी ती स्वीकारण्याचें स्वातंत्र्य प्रत्येक स्त्रीपुरुषास असलें पाहिजे. मग हें स्वातंत्र्य द्यावयाचें म्हणजे एकंदर कुटुंब घटनेच्या कायद्यांत व्यक्तीस वाटेल तो कायदा स्वीकारण्याची मोकळीक द्यावयाची" "मातृसत्ताक कुटुंबपद्धतीचा विकास व तिचा कायदा निश्चित व्हावयाचा आहे.... मातृसत्ताक कुटुंबपद्धतीस उपयुक्त अशीच विवाह पद्धति...पूर्वकालीं भारतांत...कलावतींणीसाठी निर्माण झाली होती. ह्या पद्धतींत स्त्रीवर पुरुषाची सत्ता नाही व त्यावर तिला पोसण्याची जबाबदारी देखिल नाही... आत्मसातत्यरक्षणार्थ गर्भधारण स्त्रीवरच पडते, आणि त्यामुळे स्त्रीची द्रव्यार्जन क्षमता या कालांत नष्ट होते, त्या कालाविरुद्ध उपाय पाहिजेत. पुरुषसत्ताक कुटुंब पद्धति हा एक उपाय झाला. स्थावर जमीन सर्व स्त्रियांच्याच मालकीची करणें हा दुसरा एक उपाय झाला तिसरा उपाय असा सुचतो की पुरुषावलंबी नसलेल्या स्त्रियांचे संघ स्थापन करावेत..."

"जों पर्यंत समाज पुरुषसत्ताक आहे तोपर्यंत तरी समाजांत वेश्यावर्ग राहाणारच. या वर्गाच्या अस्तित्वास सर्व समाज जबाबदार आहे. स्त्रियांस प्रामाणिक द्रव्यार्जनाची संधि अधिक येईल. विवाह विषयक वेडेवाकडे नियम काढून टाकले जातील तेव्हा वेश्यावृत्ति अनवश्यक व निरुपयोगी होत जाईल."

"समाजांतील जी अनौरस संतति आहे ती औरस संततीपेक्षा कोणत्याहि भौतिक शक्तीच्या दृष्टीने कमी नाही...जर पुरुषसत्ताराहित

८ कित्ता.

कुटुंबस्थापना अपवित्र राहिली नाही तर आईस अपत्यागम लपविण्याचें कारणच नाही. यासाठी स्त्रीचा अविवाहित असूनहि मातृत्व प्राप्त करून घेण्याचा हक्क सर्व समाजाने जाहीर करावा..." "मुलगा व मुलगी ह्या दोहोंसहि द्रव्यार्जनास योग्य असें शिक्षण देण्यांत यावें व विवाहाशिवाय कुटुंब-स्थापनेचा पूर्णाधिकार स्त्रीस देण्यांत यावा..." "स्त्री व पुरुष यांतील शिक्षणभेद लयाला जात आहेत. त्यामुळे स्त्रियांचा सर्व प्रकारच्या धंद्यांत व राजकारणांत प्रवेश होत आहे व ज्या कुटुंबात खरी कार्यकर्ती स्त्रीच आहे अशीं कुटुंबें प्रत्येक देशांत सापडावयाचींच."

'ब्राह्मणकन्यें'तील वैजनाथ स्मृतींतील महत्त्वाच्या विचारांवरून केतकरांचा स्त्री–पुरुष संबंध विषयक काय कल्पना होती हें स्पष्ट होतें. डॉ. केतकरांची ही कादंबरी पूर्णतया स्त्रीजीवनविषयक प्रश्नांचा विचार करणारी कादंबरी आहे. या कादंबरींतले हे सारे विचार एकाद्या स्त्रीस्वातंत्र्य वादिनी स्त्रीच्या तोंडीं शोभणारे असे आहेत. पण गंमत अशी की ते समाज-शास्त्रज्ञ डॉक्टर केतकरांनी इतिहास व संस्कृति यांचा खोल विचार करणाऱ्या वैजनाथशास्त्र्यांच्या तोंडून वदविले आहेत. हे सारे विचार कोणाही पुरोगामी विचाराच्या व्यक्तीस मान्य होतील असे आहेत. स्त्री व पुरुष ह्यांच्यांतले मूलभूत फरक हा समाजाच्या नैतिक कल्पनेमुळे निर्माण झालेला आहे. स्त्री व पुरुष यांस भिन्नभिन्न नीतिनियमांचें बंधन पुरस्कारलें जातें. तें अन्यायमूलक आहे. तरीहि तें समाजांत सर्वसंमत आहे असें भासतें याचें कारण समाजांत स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य नाही. तें पुरुषांना आहे. स्त्रिया ह्या पुरुषांच्या आर्थिक दास्यांत आहेत. त्यांचें दास्य नष्ट करण्याचें एकमेव साधन म्हणजे त्यांना संपत्तींत महत्वाचे हक्क देणें. याच प्रयत्नांतली शेवटली पायरी म्हणजे स्त्रीसत्ताक कुटुंब पद्धति होय. डॉ. केतकरांनीं हे विचार मांडून भारतीय समाजांत स्त्री व पुरुष यांत खरी समता प्रस्थापित व्हावी ह्या विचारास फार जोराची चालना दिली आहे.

ह्या प्रबंधांत स्त्री व पुरुष यांच्यांत संपूर्ण समता प्रस्थापित व्हावी, त्याच्यांत व्यक्तिगत, कुटुंबविषयक, व नागरिक हक्क ह्याबाबत, कर्तृत्व क्षेत्राबाबत कोणताही फरक नसावा, ह्या विचाराप्रत येण्याचें कार्य ब्रिटिश राजवटींत झालें असें गृहित धरलें आहे. डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांतून जे विचार प्रदर्शित झाले आहेत त्यांच्या द्वारां ह्या समतेची पार्श्वभूमि निर्माण झाली आहे असें म्हणता येतें. विशेष म्हणजे डॉ. केतकरांनी हे विचार पुरस्कारल्याने त्यांना समाजशास्त्रीय व्यापक बैठक प्राप्त झाली आहे. सुधारकांच्या सुधारणांची व सुधारणेच्या मार्गांची निर्भर्त्सना डॉक्टर महाशयांनी केली असली तरी ते वैचारिक व सर्वच बाबतींत त्यांच्या फारच पुढे गेले होते. ही गोष्ट त्यांना व आपल्या समाजाला निश्चितपणें भूषणावह आहे.

डॉ. केतकरांची शेवटची मोठी कादंबरी म्हणजे ' विचक्षणा ' होय. ब्राह्मणकन्येंतील विवेचनांत डॉक्टरसाहेबांतला खरा समाजशास्त्रज्ञ जागृत आहे, उलट ही कादंबरी लिहितांना त्यांच्यांतला ' हिंदु-समाजशास्त्रज्ञ ' जागृत आहे. त्यांच्या भूमिकेंत हा जो फरक झालेला आहे, त्याच्या मर्यादा कादंबरींतील विवेचनावर पण पडल्या आहेत. ही कादंबरी अधिक 'सामाजिक ' आहे. स्त्रीजीवनविषयक विचारास विशेष असें प्राधान्य ह्या कादंबरींत नाही. जे विचार आहेत ते पूर्वीच्या कादंबऱ्यांत आहेत. 'ब्राह्मणकन्ये'तील वैजनाथशास्त्र्यांची भूमिका आहे तिच्यापेक्षा अधिक उदारतर अशी भूमिका असणेंच संभवत नाही. सहाजिकपणें डॉ. केतकरांना स्त्रीजीवन विषयक वेगळें कांही म्हणावयाचें नसल्याने सामाजिक नीतीकडे त्यांचे लक्ष गेलें आहे.

प्रो. लोंढे यांच्या दोन कन्या मधुमालती व विचक्षणा यांना प्रोफेसर महाशयांच्या उदारमतवादी शिक्षणाचा लाभ झालेला असतो. मधुमालती वडिलांच्या संमतीविना प्रेमविवाह करते पण लवकरच विधवा होऊन घरीं येते. तिची बहीण विचक्षणा हिचें माधव छत्रे यांच्याशी लग्न होतें. तर मधुमालती ही संकर्षण आठवले ह्या चित्रकाराशी पुनर्विवाह करावा या

विचारांत असते. बाळ हा ह्या दोन बहीणींचा भाऊ. ह्या तीन भावंडांना जो जगाचा विविध प्रकारचा अनुभव येतो तो या कादंबरीचा कथाभाग.

प्रो. लोंढे यांचे मित्र डॉ. तर्कटे हे एक मुंबईचे प्रख्यात डॉक्टर असतात. त्यांना कौटुंबिक जीवनाचें सौख्य लाभलेलें असतें. पण रंगी नायकीण ऊर्फ रंजिता वेरेंकर या स्त्रीबरोबर त्यांचे मित्रत्वाचे संबंध असतात. पूर्ववयांत डॉक्टरापासून तिला मंजुळा ह्या नांवाची मुलगीहि झालेली असते. 'आशावादी' तील कपिला, तशीच ह्या कादंबरींतील मंजुळा होय. तिला आईच्या व्यवसायाचा तिटकारा असतो. आपण विवाह करावा व समाजनीतिमान्य जीवन कंठावें अशी तिची मनीषा असते. तिच्या चालणाऱ्या धडपडी व त्यांत तिला येणारे विविध कडूगोड अनुभव हा या कादंबरींतला दुसरा विषय आहे. वेश्याजीवनविषयक विविध अंगांचा व त्या जीवनांशी निगडित असणाऱ्या विविध प्रश्नांचा ऊहापोह ह्या भागाच्या अनुरोधाने डॉ. केतकरांनी ह्या कादंबरींत केला आहे.

मोतीलाल शेट हे एक श्रीमान् व्यापारी असतात, त्यांना संतति नसते, त्यांच्या आधाराने व्यापारी जीवनांतील नीतिविचारांचें दर्शन डॉक्टर साहेबांनी घडविलें आहे. त्याचप्रमाणे रंगाचार्य हे एक गुरु आहेत. त्यांच्याकडे विविध स्त्रिया गुरुप्रसादासाठी येत असतात. त्यांचें 'प्रसाददान' चालू असतें. डॉ. केतकरांना ह्या कादंबरींत जें कांही नवें सांगायचें आहे त्यांत 'गुरुसंप्रदाय' हा वाटतो तितका गर्ह्य नाही हें होय. त्याचें कार्य एकंदरीने समाजपोषक आहे. हा विचार महत्त्वाचा आहे. 'ब्राह्मण कन्ये' त ज्याप्रमाणे 'वैजनाथ स्मृति' आहे त्याप्रमाणे ह्या कादंबरीच्या कथेच्या द्वारें जे विविध प्रश्न निर्माण झाले त्यांचें संकलन करणारी 'तर्कटनीति' आहे. तिला प्रो. लोंढे यांनी व श्रीरंगाचार्यांचे शिष्य पद्मनाथ यांनी पुरवण्या जोडल्या आहेत.

विचक्षणेच्या अनुभवाच्या आधारें डॉ. केतकरांनी स्त्रियांनी नोकरी करणे हें विशेष उत्तेजनकारक नाही असें मत दिलें आहे. त्यांचे म्हणणें असें की स्त्री मिळवती झाली की पुरुष आळशी होतो. ऐदी होतो. डॉ. केत-

करांतला हिंदु समाजशास्त्रज्ञ जागृत होत होता त्याचें हें एक गमक आहे. डॉ. तर्कटे यांनी सनातनीयत्व स्वीकारलें हें दुसरें गमक आहे. वैजनाथशास्त्र्यांनी आपले विचार सांगतांना जी भूमिका घेतली आहे ती आखिल मानवजातीच्या कल्याणाची आहे. डॉ. तर्कट्यांचें पुढे प्रामुख्याने हिंदु समाजच आहे. तथापि वेश्यांच्या प्रश्नासंबंधींचे त्यांचे विचार मूलगामी आहेत. 'समाजामध्ये चार वर्ण हे ज्याप्रमाणे अवश्य आहेत त्याप्रमाणे स्त्रियांमध्येहि भिन्न प्रकारची कुटुंबव्यवस्था आवश्यक आहे...ब्रह्मचारिणी, कुलस्त्री, अवरुद्धा आणि गणिका या चार अवस्था मान्य करण्यांत आल्या आहेत. कुमारी आणि विधवा या दोघींस ब्रह्मचारिणी, कुलस्त्री, अवरुद्धा अगर वेश्या बनण्याचा अधिकार आहे....या अवस्थाहि नीतिशास्त्रास मान्य आहेत,...समाजामध्ये सर्व लोकांस सारखेच नीतिनियम लावून उपयोगी नाहीं..., ऐन्द्रियिक नीतिमत्तेचे नियम सर्वांस एकच लावणें चूक आहे. म्हणून विशिष्ट वर्गास पुनर्विवाह निषेध सक्तीचा करणें हें जरी अमान्य होईल तरी त्यामागे असलेलें तत्त्व म्हणजे भिन्न धर्मास भिन्न आचारधर्म असावा हें संरक्षणीय आहे....'

"समाजामध्ये चाललेली 'गुरुबाजी अनवस्य मुळीच नाही... हिंदुस्थानांत विवाहाच्या भिन्न परंपरा लोकमान्य आहेत. स्त्रीपुरुषांची एकत्र संयुक्तता... प्रत्येक ज्ञातींत नियमांनी शासित व्हावी असें ध्येय ठरलें आहे व अत्यंत मोठा मनुष्यसमूह एकाच नियमांखाली आणण्याचा पाश्चात्य खुळेपणा आपणांस अनवस्यक आहे' या विचारांवरूनहि हें स्पष्ट होते की डॉ. तर्कटे व वैजनाथशास्त्री यांच्या विचारांत महत्त्वाचा भेद आहे. वैजनाथशास्त्री प्रत्येक व्यक्तीस जें स्वातंत्र्य देतात तें या ठिकाणीं डॉ. तर्कटे प्रत्येक जातीस देतात. स्त्री पुरुष संबंधाबाबतहि तसेंच आहे. स्त्रियांनी व पुरुषांनी निरनिराळ्या प्रकारचे संबंध एकमेकांशी करावेत, यासंबंधीचें स्त्रियांचें आणि पुरुषांचें स्वातंत्र्य नाहीसें करणें अयोग्य आहे. स्वजातीय आणि स्ववर्गीय स्त्रीशी जो संबंध करावयाचा तो कायमच्या स्वरूपाचा

आणि अन्यवर्णीय स्त्रीशी कमी कायमच्या स्वरूपाचा करावयाचा हें तत्त्व मनुष्य समजास अनुसरून म्हणजे सनातन आहे. ''

प्रोफेसर लोंढे यांनी 'तर्कटनीती' स जी पुरवणी जोडली आहे. तिच्यांत स्त्रियांनी आर्थिक स्वातंत्र्याचाहि हक्क असावा असे मत दिलें. ''स्त्रियाच्या आर्थिक स्वातंत्र्याचा हेतु स्त्रियांस नवऱ्यापासून स्वतंत्र करण्याचा नसून बाप व नवरा या खेरीज इतरांवर त्यांचें जें अवलंबित्व उत्पन्न होतें, त्यांपासून त्यांची मुक्तता करणें हा आहे...बापापासून त्यांचें आर्थिक स्वातंत्र्य स्थापित होऊं देण्यास हरकत नाहीं. नवऱ्यापासून स्थापित होणें अनिष्ट '' यावरूनहि त्यांच्या विचारांची दिशा स्पष्ट होते.

'विवाहाशिवाय एकत्र राहणें आणि विवाह करून एकत्र राहणें यामध्यें फारसा फरक नाहीं.'

पद्मनाभाने आपली 'खैलिक चतुःसूत्री' ह्या तर्कट नीतीस जोडून गुरुबाजी ही संस्था आवश्यक आहे.'' समाजामध्ये विवाहमर्यादेचें अतिक्रमण करणारा स्त्रीपुरुष संबंध अवश्य होतोच. कारण विवाह ही संस्था सर्वांच्या सारख्या उपयोगाची होत नाहीं....जेव्हा ऐंद्रिय संबंध व विवाह संबंध हे एकक्षेत्रीय राहूं शकत नाहीत, तेव्हा विवाह भंगावयाचे की, विवाह कायम राखून विवाह क्षेत्राबाहेरील संबंधांस शास्त्राने मान्यता द्यावयाची हा प्रश्न आहे... '' अशा परिस्थितींत विवाह बाह्य संबंधाच्या बाजूने आपलें मत पद्मनाभाने दिलें आहे. तें कार्य गुरुसंस्था करते असें त्याला म्हणावयाचें आहे.

अशा प्रकारें ह्या कादंबरींतील प्रमुख समाज विषयक विचारांचें स्वरूप आहे. कादंबरींत वेश्याव्यवसायाचें जें चित्र रंगविलें आहे तें पाहतांना डॉ. केतकर हे त्या व्यवसायांतील व्यक्तींच्या जीवनाकडे सखोलतेने पाहतात असें दिसून येतें. वेश्या व्यवसायांतील स्त्रियांनी संगितादि ललित कलांच्या क्षेत्रांत जी महनीय कामगिरी बजावली ती महत्त्वाची आहे. रंजिता वेरेंकर ही डॉ. तर्कटे यांच्याशी विवाहबद्ध होत नाही तर स्वतंत्रपणें राहून त्या कलेची उपासना ती करते. त्या साधनेच्या योगाने तिची सांपत्तिक

स्थिति सुधारते. तिला स्वतंत्र अस्तित्व पण असतें. डॉ. केतकरांनीं हें स्वतंत्र अस्तित्व असण्याचें कारण आर्थिक स्वातंत्र्य हें आहे हें मोठ्या कौशल्याने दिग्दर्शित केलें आहे. त्या दृष्टीने रंजितेचें जीवन हें वाचकांस निश्चितपणें विचार करावयास लावतें. त्या व्यवसायाविषयी आणि त्यांतील व्यक्तीविषयी सहानुभूति निर्माण करणें हें प्रमुख उद्दिष्ट डॉ. केतकरांपुढे आहे व तें त्यांनी सामान्यतः यशस्वी तन्हेने साध्य करून घेतलेलें आहे.

'ब्राह्मणकन्या' व 'विचक्षणा' ह्या कादंबऱ्यांकडे तुलनात्मक दृष्टीने पाहिलें तर लेखकाच्या मनांत कसा फरक पडत होता तें स्पष्ट होतें. 'ब्राह्मण-कन्या' लिहितांना केतकरांची मनोसृष्टि मानवी विचारांनी व्याप्त झाली होती. त्यामुळे त्या कादंबरींतील वातावरणांत अधिक 'मानवी' पणा भरलेला आढळून येतो. लेखकाची भूमिका समाजाभिमुख आहे. उलटपक्षी 'विचक्षणा' कादंबरींत लेखकाचा कल झपाट्याने हिंदुसमाजशास्त्राकडे झुकत जाहे असें आढळून येतें. पहिली कादंबरी ही निश्चितपणें अधिक व्यापक विचारांनी युक्त आहे. दुसरींत विचार जरी [illegible] तेच असले तरी त्याचें प्रतिपादन हें 'मानवी' नाही. ते [illegible] नीयत्वाकडे झुकत आहे. पहिल्या कादंबरींत समाजजीवनाचा प्राथमिक केंद्र बिंदु व्यक्ति आहे असें गृहित धरलेलें दिसतें. पण दुसऱ्या कादंबरींत व्यक्तीऐवजी 'जाती' ला अधिक महत्त्व दिलें आहे. ही जी त्यांच्या गतीची दिशा आहे ती समाजविकासाच्या गतीच्या दिशेने नसून त्याच्या विरोधी आहे. असे असलें तरी रूढ नीतिनियमांची कृत्रिमता व अशक्यता त्यांनी जी निदर्शनास आणली ती निश्चितपणें अधिक महत्त्वाची आहे.

'ब्राह्मणकन्या' ही कादंबरी प्रसिद्ध झाली त्याच वर्षी 'गांवसासू' ही कादंबरी डॉ. केतकरांनी प्रसिद्ध केली आहे. कुसुमकलिका ही एक कवडी मैत्र हा बंगाली मनुष्य व लिझी ही इंग्लिश स्त्री या दांपत्याची मुलगी असते. तिला आपले आईबाप हे निरनिराळ्या धर्माचे व वर्णाचे असल्याने, युरोपीय वा इंग्रज पति मिळणें शक्य नसतें. तिची आई तिचें लग्न उपेंद्रदास

ह्या बंगाली बॅरिस्टराशी जमवून देते. तिला एक सावत्र मुलगा पण असतो. उपेंद्रदास हा अत्यंत श्रीमंत जमीनदार असतो. पण त्याचें व कुसुमकलिकेचें पटत नाही. ती मुलींच्या शिक्षणासाठी इंग्लंडांत वास्तव्य करते. तिला ललिता व सुनीति ह्या दोन मुली असतात. त्या इंग्लंडांतच राहातात. शिकलेल्या असतात. आय्. सी. एस्. अगर इतर परीक्षांसाठी येणाऱ्या तरुणांपैकी कोणाची तरी (विशेषतः आय्. सी. एस्. तरुणांची) आपल्या दोनही मुलींसाठी वर म्हणून नियुक्ति करावी असें मिसेस दासला वाटत असतें. त्याप्रमाणे तिचे विविध प्रयत्न असतात. त्या प्रयत्नांचें सविस्तर वर्णन म्हणजे प्रस्तुत कादंबरी होय. ललितेला आय्. सी. एस्. तरूण मिळूं शकत नाही, पण कादंबरीची नायिका सुनीति हिला त्याबाबत यश येतें. आईचे प्रयत्न व त्यांना येणारें यशापयश ह्याच गोष्टींना ह्या कादंबरींत महत्त्व आलेलें आहे.

ही एक साधी प्रेमकथा आहे. तिच्यांत इंग्लंडांत राहणाऱ्या भारतीय लोकांपुढे असणारे विविध प्रश्न व त्यांचें तेथील जीवन ह्यांना महत्व आलें असल्याने इतर प्रश्नांना दुय्यमत्व प्राप्त झालें आहे. मिसेस जान्हवी कैलासनाथ ह्या बाई पुष्कळ दिवस इंग्लंडांत स्थायी झालेल्या असतात व त्यांचें ह्या प्रेमप्रकरणांत बरेंच साहाय्य होतें. स्त्रीजीवनविषयक प्रश्नाचे दृष्टीने ही कादंबरी विशेष महत्वाची नाही. तिच्यांतली प्रमुख स्त्रीपात्रें म्हणजे मिसेस कैलासनाथ, कुसुमकलिका दास व सुनीति दास हीं होत. तीन निरनिराळ्या पिढ्यांचीं प्रतीक आहेत. कैलासनाथ ही एक सत्प्रवृत्त व तरुणांत मिळून मिसळून वागणारी मध्यमवयीन स्त्री आहे. मिसेस दास ही एक व्यवहारी व फारसा व्यापक विचार केलेला नसलेली...अशी स्त्री असते. आपल्या मुलीला आय्. सी. एस्. पति मिळावा हीच तिची जबर इच्छा असते. आणि हें उद्दिष्ट पार पाडतांना ती प्रेम, चांगुलपणा इ. गोष्टींचा बिलकुल विचार करावयास तयार नाही. सुनीति दास ही अनुभवी, मातेच्या आज्ञेंत वागणारी तरुण मुलगी आहे. तिला योग्य पती मिळण्यांत मिसेस कैलासनाथ ह्यांचें साहाय्य होतें. स्वभाव चित्रणाच्या दृष्टीने हीं पात्रें चांगलीं

रंगविलेलीं आहेत. तथापि डॉक्टर केतकरी विचारांचें दर्शन प्रभावीपणाने होत नाही व म्हणूनच ही कादंबरी ही चांगल्यापैकी प्रेमकथा असतांहि सामान्य वाटते.

डॉ. केतकरांच्या कादंबऱ्या त्यांतील नव विचारांच्या अविष्कारामुळे मराठी वाङ्मयांत दीर्घ कालपर्यंत महत्त्वाच्या राहाणार आहेत. कादंबरीच्या कालांगाकडे त्यांनी जाणून बुजून दुर्लक्ष केलें असें दिसतें. कांही उर्णावा त्यांना सहजा सहजीं टाळतां आल्या असत्या, पण त्याबाबीकडे त्यांनी फारसें लक्ष दिलें नाही हेंच खरें. कादंबरीच्या कलांगांत स्वभाव लेखन हें महत्त्वाचें अंग आहे. डॉ. केतकरांचीं पात्रें प्रायः विचार करणारीं अशीं आहेत. एका कादंबरींत अनेक पात्रें प्राधान्य पावतात. एक 'ब्राह्मण कन्या' सोडून दिली तर कादंबरीच्या निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या नायिका आहेत असें वाटतें. 'आशावादींत' प्रारंभीं मिसेस हंटर तर नंतरच्या भागांत डॉ. नंदिका, विहंगमा व शेवटीं कपिला अशा विविध स्त्रियांना महत्त्व येतें. 'प्रियंवदा' मध्येहि तसेंच. प्रियंवदा, बिंबा, व शारदाबाई यांना निरनिराळ्या भागांत प्राधान्य मिळालेलें आहे. 'गांवसासू' मध्येहि तसेंच आढळतें. प्रारंभीं मिसेस कैलासनाथ, तर नंतर मिसेस दास व शेवटीं सुनीति दास अशा स्त्रिया आल्या आहेत. 'विचक्षणें'त प्रारंभीं विचक्षणा, नंतर रंजिता व शेवटीं मंजुळा अशा प्रकारें त्यांच्या कादंबऱ्यांत निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या पात्रांना महत्त्व आलेलें असतें.

असें होण्याचें कारण त्यांचा समाजशास्त्रीय विशिष्ट दृष्टीकोन. डॉ. केतकरांचे मतें माणसांचे विचार समजले, ते विचार कां निर्माण झाले हें कळलें की त्या माणसाची ओळख झाली. त्यांच्या सर्व पात्रांचे विचार ठरलेले आहेत. त्यांच्या (पात्रांच्या) मनांत संघर्ष हा प्रकारच नाही. संशय इ. आल्याने मनें विचलित झालीं असल्याचें वर्णन आहे पण यापेक्षा अधिक नाही. सबंध कादंबरीसृष्टींत थोडीशी संशयात्म मनस्थिति असणारे

पात्र म्हणजे 'ब्राह्मणकन्यें' तील अप्पासाहेब डग्गे हें होय. कन्या कालिंदी हिने जो निर्णय घेतलेला असतो व त्या निर्णयानुसार तिने जो गृहत्याग केलेला असतो त्यामुळे अप्पासाहेब थोडे विचलित झाले आहेत. नाही असें नाही. पण स्वतःची शंकानिवृत्ति करण्यासाठी ते वैजनाथशास्त्र्यांकडे जातात. त्यांचे विचार ऐकून त्यांचें शंकानिरसन होतें. आप्पासाहेबांची अशी वृत्ति असण्याचें कारण त्यांनी 'सुधारकांच्या' नादीं लागून विवाहसंबधारहित रहाणाऱ्या दांपत्याला झालेल्या शांताबाईशी 'विवाह' केलेला असतो.

गंमत अशी की डॉक्टर महाशयांचीं बहुतेक पात्रें सामान्यतः जनमतास मानवणार नाही असें जीवन जगत असतात. आणि तरीहि त्यांच्या चित्तांत कोणत्याहि प्रकारचा संघर्ष, संभ्रम नसतो. डॉ. तर्कटे हे राजरोसपणें रंजितेशी संबंध ठेवतात. नंदिका ही आपल्यापेक्षा लायकीने कमी आहे अशा गृहस्थाबरोबर लग्न करते, कालिंदी ही कॉलेजात जाणारी तरुण स्त्री, ती बी. ए. च्या वर्गात असते, पण बी. ए च्या परीक्षेला न बसतां एका व्यापाऱ्याजवळ रक्षा म्हणून राहते. तिची ही कृति सामजांत खळबळ उडविणारी अशी असते. पण तिने ही गोष्ट इतक्या विचारपूर्वक केलेली असते की तिच्या मनांत पश्चात्ताप तर जाऊं द्याच पण साधीं विचार भावनांचीं आंदोलनेंहि होत नाहीत. ती आपले विचार आपला भाऊ सत्यव्रत यास स्पष्ट करून सांगते व त्यालाहि ते तत्क्षणीं पटतात. प्रो. लोंढ्यांची विधवा मुलगी मधुमालती ही संकर्षण आठवले ह्या तरुण चित्रकाराबरोबर पळून जाते. त्यांना कळतें ते शांत असतात. एकाद्या कादंबरीकाराला हा असला प्रसंग किती मोलाचा वाटला असता. पण प्रो. लोढें मुलीला तार करावयास सांगतात व तिचें 'मुंबई पाहणें' झालें की तरुण सहकाऱ्या बरोबर राहावयास परत ये, असें कळवितात. ह्या वरून हें स्पष्ट होतें की हीं सारीं पात्रें व हे सारें जीवन वेगळेंच आहे. नेहमी व्यवहारांत आढळून येणारीं छोट्या छोट्या सुखदुखांनीं आनंदी अगर घायाळ होणारीं अशीं हीं पात्रें नव्हत. अशा वाङ्मयसृष्टीचें परिशीलन हें खरोखर निराळ्या निकषांनी करावयास हवें.

आपले रूढ साहित्यक्षेत्रीय नियम बदलावयास हवेत अशा अर्थाचे उद्गार त्यांनी जे 'गावसासूच्या' प्रस्तावनेंत काढले आहेत ते खरोखर अन्वर्थक आहेत. संघर्षविरहित जीवन व पात्रसृष्टि हें डॉक्टर केतकरांच्या कादंबऱ्यांचें वैशिष्ट्य होय. पात्र वृद्ध असो, मध्यमवयीन असो, तरूण असो, स्त्री असो अगर पुरुष असो. त्यांचे विचार इतके परिपक्व झालेले आहेत की त्यांच्या कृती ह्या पूर्व विचारांनी नियोजित असतात. 'ब्राह्मणकन्ये' त उषेच्या मागे एक कॉलेज तरुण येतो. व तिच्याशी लगट करण्याचा प्रयत्न करतो. पण त्याची ही कृति इतकी पूर्व विचार करून झालेली असते की आपल्या युक्तिवादाने तो सत्यव्रतास निरूत्तर करतो व शेवटी उषा त्याच्याशी विवाहासहि तयार होते. अतीव विचारी अशी पात्रसृष्टि अन्यत्र आढळणें कठिण आहे. बरे हे लोक विचारी आहेत म्हणून जीवनांत रस आनंद घेत नसतील असें म्हणावें तर तसें नाही. शारीरिक म्हणजे देह आणि वेष सौंदर्य हीं महत्त्वाचीं आहेत असें डॉ. केतकरांचें मत आहे. व बहुतेक पात्रांना तें संमत आहे असें वाङ्मयसृष्टीतील नीटनेटकेपणा व वेषभूषेंतील सौंदर्यगामित्व हा अमेरिकन शिक्षणाचा व जीवनानुभवाचा परिपाक असावा असें वाटतें.

ज्याप्रमाणे व्यक्तिगत भावनांत संघर्ष नाही त्याप्रमाणे कोणत्याहि प्रकारच्या कौटुंबिक संघर्षापासूनहि त्यांच्या कादंबऱ्या अलिप्त आहेत. येथे दोन पिढ्यांचें भांडण कुठेच नाही. प्रो. लोंढे ह्यांचीं मुलें मनमोकळेपणाने वावरतात. पण त्यांच्या हालचालीहि त्यांना माहित असतात वा पसंत अतातात असें नाही. पण तरुण पिढीविरुद्ध त्याचें कांही एक म्हणणें नाही. कालिंदी घरांतून पळून गेलेली असते ह्या मुळे तिचे वडील अण्णासाहेब व भाऊ सत्यव्रत हे शंकाकुल झालेले असतात, पण बापलेकांत कोठे कधीहि बोलाचाली नाही. कांही नाही.

हें असें संघर्षहीन जीवन रंगविण्याचें कारण ध्यानांत घेणें जरूर आहे. डॉ. केतकर हे कांही वास्तववादी लेखक नव्हेत. त्यांची पात्रें सत्यसृष्टींतील वाटत नाहीत असें नव्हे. पण त्यांचा वास्तववाद हा पात्रांच्या

स्वभावा पुरता मर्यादित नसून त्या भोवतालची परिस्थितिहि ते तितक्याच सहानुभुतीने दाखवितात. डॉ. केतकरांचा खरा संघर्ष हा समजाच्या नैतिक विचारांशीच होता. संघर्षाचें हें स्वरूप इतकें व्यापक, मूलगामी, व चित्तभेदक होतें की लोकांनी तें सहजासहजीं आकलन करून घेतलें नसतें; व घेतले नाही. त्यांची पात्रें अशाप्रकारें अढळ विचारश्रद्धा (strong convctions) असलेलीं आहेत व त्यामुळेच लेखकाचे क्रांतिकारक व समाजाला अपरिचित व धक्का देणारे विचार तीं पात्रें परिणामकारक रीतीने व्यक्त करूं शकतात. ह्या वैचारिक वैशिष्ट्यामुळे त्यांना जीवनांतल्या इतर लहान सहान संघर्षांकडे लक्ष द्यावेसें वाटलें नाहीं. स्वभावामुळे म्हणतां येणार नाही पण विचारामुळे त्यांचीं, ब्रह्मगिरी, डॉ. नंदिका, कपिला, कालिंदी, वैजनाथशास्त्री, शिवशरण-अप्पा, मंजुळा...विचक्षणा डॉ. तर्कटे इ. किती तरी पात्रें आपापल्या परी लक्षांत राहाण्या सारखीं आहेत. मध्यमवर्ग, त्याचे विचार, कल्पना, व्यापारी-वर्ग, त्यांच्या विचार कल्पना, सरकारी (ज्येष्टप्रतीचे) नौकर त्याच्या विचार कल्पना, इतर अनेक व्यवसायांत पडणारे अनेक तरुण लोक, त्यांचे प्रयत्न, त्या प्रयत्नांच्या आड निष्कारण अडगळीप्रमाणे येणाऱ्या वेडगळ नैतिक कल्पना, इ. विविध जीवनांचें दर्शन त्यांनी इतक्या विश्वसनीयतेने रंगविलेलें आहे की, त्यानी मराठी वाङ्मयाला व्यापक जीवन व त्याचे प्रश्न म्हणजे काय असतात ह्याची कल्पना बरोबर आणून दिली. त्याचप्रमाणे जीवनांत भावनात्मक संघर्षापेक्षा विचारनिष्ठेची आवश्यकता आहे; आपल्या रूढ नीतिकल्पना आपण तपासून घ्यावयास हव्यात; त्यांचें अपूरेपण ध्यानांत घ्यावयास हवें इ. गोष्टींची महाराष्ट्रीय समाजास त्यांनी जी जाणीव करून दिली त्याबद्दल डॉ. केतकरांचें मराठी साहित्य दीर्घकाल ऋणी राहणार आहे.

वैचारिक दृष्टीने पाहतां डॉ. केतकरांचे बरेच विचार मान्य व्हावयास आज फारशी अडचण नसावी असें वाटतें. 'धर्माचा आणि विवाहाचा कांही संबंध नाही; रखेली ठेवणें हें कित्येक वेळां समर्थनीय ठरतें; कला-निपुण स्त्रियांना प्रचलित विवाह बंधनें लांगू नसावींत; तरुणतरुणींनी प्रेम-

संशोधनाच्या किंवा प्रेमदर्शनाच्या बाबतींत संकोच किंवा भिडस्तपणा बाळगूं नये;' "अशा प्रकारचीं मतें समर्थनीय असोत किंवा नसोत तीं निर्भयपणें समाजापुढे मांडणें हें काम कोणी तरी केव्हां तरी करावयास हवेंच होतें. त्याशिवाय त्यांची आमूलाग्र छाननी होणें शक्य नव्हते"[१०]. हे वामनराव जोशांचे उद्गार ध्यानांत धरण्यासारखे आहेत.

'ब्राह्मणकन्ये' तील वैजनाथशास्त्र्यांचे विचार बरेच मूलमामी आहेत. त्यांपैकी स्त्री व पुरुष यांना सर्व क्षेत्रांत सारखा वाव असावा हें जें मत आहे तें मान्य होण्यास फारसा प्रत्यवाय नाही. डॉ. केतकरांच्या मतांपैकी लोकांना विलक्षण वाटणारें मत म्हणजे वेश्या व्यवसायाला त्यांनी दाखविलेली संमति व ह्या मताला दिलेला समाजशास्त्रीय पाया होय. दुसरें मत म्हणजे स्त्रीपुरुषांच्या विवाहबाह्य संबंधांना समाजाने मान्यता द्यावीं हें. हीं दोन मतें कांही काल असंमत राहाणार असें दिसतें. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिलें तर वेश्यांची समाजाला आवश्यकता असतें असें सिद्ध करतां येते. पण डॉ. केतकरांनी ह्या प्रश्नाचें जेव्हा दिग्दर्शन केलें तेव्हा वेश्यांचा प्रश्न हा प्रामुख्याने आर्थिक आहे हेंहि दाखविलेलें आहे. आर्थिक दृष्ट्या जर तद्व्यवसायीनींची सोय लावतां आली तर ह्या व्यवसायाचें अधिष्ठान बरेंचसें भंगित होईल असें म्हणावयास हरकत नाही. ह्याच दृष्टीने समाजवादी विचारसरणी ही वेश्यांच्या व्यवसायाविरुद्ध आहे. दुसरा भाग म्हणजे विवाहबाह्य संबंधास कायदेशीर वा नैतिक मान्यता द्यावी हा. प्रचलित विवाहनीतींत कांहीतरी महत्त्वाचे फरक करावयास हवेत असें आजकाल सर्वच समाज विचारवंतांस वाटावयास लागलें आहे. प्रख्यात विचारवंत बट्रेन्ड रसेल हे आपल्या 'विवाह व नीति' ह्या प्रबंधांत विवाहित स्त्री पुरुषांनी एकमेकांच्या असल्या संबंधाबाबत थोडी उदारवृत्ति बाळगावी असें म्हणतात. अर्थात् सरास तशी मान्यता आज मिळणें अशक्य आहे. कारण विवाह हा प्रामुख्याने आर्थिक सोयीसाठी अस्तित्वांत आला आहे. आज समाजांतले आर्थिक वर्चस्व हें पुरुषांच्या

१० विचार सौंदर्य पृ. ६०.

हातांत आहे. आर्थिक व सामाजिक क्षेत्रांत जर स्त्री व पुरुष यांत खरी समता प्रस्थापित होईल तर वैवाहिक नीतिमागलें अर्थकारण नष्ट होईल व स्त्रीपुरुष ह्यांचे परस्पर संबंध अधिक घनिष्ट व भावनानिष्ठ व मानवी होतील. तेव्हा डॉ. केतकरांच्या विचारांत जेवढा व स्वीकार्य भाग आहे तेथपर्यंत आपण विचाराने आलेलों आहोंत असें सामान्यतः म्हणावयास हरकत नाही.

तथापि डॉ. केतकरांच्या विचारांतील एक गोष्ट खटकल्याविना रहात नाही. डॉ. केतकर हे विचाराने इतके पुढे होते की वास्तविक त्यांचें समाजवादी विचारांशी संगनमत व्हावयास हरकत नव्हती. पण आयुष्याच्या शेवटच्या दिवसांत डॉ. केतकर सनातनी विचारांकडे वळत होते. प्राचीन भारतीय समाजरचनेचें आकर्षण अधिकाधिक प्रभावी व्हावयास लागलें होतें. त्या प्रमाणांत प्रचलित समाजापासून दूर दूर जात होते. असें कां व्हावें हें समजत नाही. असें होण्याचें एक प्रमुख कारण म्हणजे डॉक्टर महाशय हे समाजशास्त्रज्ञ असल्याने त्यांना व्यक्तिवाद मान्य नव्हता. मनुष्याला विविध भौतिक सुखदुःखांचा अनुभव घ्यावा लागतो ही गोष्ट समाजशास्त्र विचारांत घेतें. माणसाला इच्छा, भावना असतात हीहि बाब तें विसरत नाही. पण या अंगांप्रमाणे माणसाच्या ठायीं व्यक्तित्वाची जाणीव असते व ती इतकीच प्रभावी असते. किंबहुना या अंगांवर प्रभुत्व मिळवावें इतकें त्याचें सामर्थ्य असतें. समाजशास्त्राला हा व्यक्तिवाद मान्य असतोच असें नाही. निदान डॉ. केतकरांना तो मान्य नव्हता असें दिततें. वास्तविक त्यांचें शिक्षण अमेरिकेसारख्या व्यक्तिवादी राष्ट्रांत झालेलें होतें. त्यामुळें असें व्हावयास नको होतें. पण प्राचीन भारतीय संस्कृतिच्या श्रेष्ठत्वाच्या विचाराने विजय मिळविला हेंच खरें.

समाजवादी विचार हा जरी एक सांप्रदायिक विचार असला आणि म्हणून त्या विचाराप्रत येण्यांत फारसे स्वारस्य नाही असें म्हणतां आलें तरी पण वैचारिकदृष्ट्या डॉ. केतकर मानवतेप्रत येण्यास हरकत नव्हती.

मानवतेचा विचार हा कांहीं सांप्रदायिक विचार नव्हे. 'ब्राह्मणकन्ये'तले डॉ. केतकर हें मानवतेच्या अगदी जवळ आले आहेत. पण पुढे ते त्या विचारापासून दूर जाऊन सांस्कृतिक सनातनीयत्वाशी समरस झाले. असो. डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवन विषयक प्रमुख प्रश्नांचा येथे उहापोह करावयाचा होता.

१९२० ते १९३५ ह्या कालांतले दोन प्रमुख कादंबरीलेखक व विचारवंत म्हणजे वामनराव जोशी व डॉ. केतकर हे होत. ह्या दोनहि लेखकांच्या कादंबऱ्यांचा व त्यांतील स्त्रीजीवनविषयक प्रश्नांचा उहापोह या ठिकाणीं केला आहे. दोघांच्या कादंबऱ्यांचे गुण परस्परविभिन्न आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. दोघेहि स्त्रीजीवनाचे भाष्यकार आहेत. आपापल्या दृष्टिकोनांतून स्त्रीजीवनाचें दिग्दर्शन करण्याचा प्रयत्न दोघांहि कादंबरीकारांनीं केला आहे. दोघांच्या वैशिष्ट्याचें विवेचन येथे केलें आहे. तुलनात्मक दृष्टीने दोघांच्या कृतींकडे दृष्टि टाकणें अनाठायीं होणार नाही.

डॉ. केतकर व वामनराव हे एकाच कालाचे पण दोन परस्पर भिन्न विचारांचे प्रतिनिधि आहेत. तथापि स्त्रीजीवन विषयक मतें पाहतां दोघांचीं मतें परस्परांपासून फारशी भिन्न आहेत असें म्हणतां येणार नाहीं. वामनराव हे समाजवादी विचारांकडे आस्थेने पाहात होते तर डॉ. केतकर कम्युनिष्टांवर परभृत म्हणून टीका करून त्यांचेकडे पाठ फिरवीत होते. वामनरावांना विश्वकुटुंबी समाजरचनेची तहान लागली होती. त्यांच्या कादंबरीतील बलवंतराव व सुशीला हीं पात्रें त्याबाबतचे प्रयोग जगांत कसकसे होत आहेत हें पाहण्यासाठीं जगप्रवासास निघतात तर केतकरांचीं पात्रें जगप्रवास करून येऊन येथेच वैचारिक क्रांति करायला पाहिजे असें म्हणतात. वामनराव 'ध्येय हाच देव' असें कल्पून मानवतेकडे जात आहेत तर केतकरांचे डॉ. तर्कटे हे सनातन-समाज-संघाचे अध्यक्ष झाले आहेत. डॉ. केतकरांनी स्वतः 'चातुर्वर्ण्य लीग' काढली होती. ते मानवतेकडे न जातां ब्राह्मण्याकडे जात आहेत. ब्राह्मणांनी विविध धर्मपंथांची दीक्षा घेऊन सर्व जगाला हिंदुधर्माच्या

कक्षेंत आणावें अशी डॉ. केतकरांची मनीषा आहे. वामनरावांचीं पात्रें ध्येयाच्या परिपूर्तीसाठी प्राणपणाने विविध प्रकारचा झगडा देत आहेत तर डॉ. केतकरांचीं पात्रें आपल्या दीर्घ विचारांनी ठरलेल्या नीतिकल्पना जगाने स्वीकाराव्या असें म्हणत आहेत. वामनरावांचे विनायकराव भोळे व केतकरांचे प्रोफेसर लोंढे हे सामान्यतः समकालीन पण त्यांच्यातला फरक हा स्पष्ट आहे. अशाप्रकारे डॉ. केतकर व वामनराव ह्या दोन केवळ व्यक्ति नाहींत तर त्या वेगवेगळ्या प्रवृत्ती आहेत; विचारसरणी आहेत. दोघेहि परस्पर भिन्न आहेत पण कालदृष्ट्या पहातां परस्परपूरकहि आहेत. महाराष्ट्रीय स्त्रीचें व महाराष्ट्रीय समाजविचाराचें क्षेत्र विस्तीर्ण व व्यापक होण्यास दोघांचेंहि साहाय्य झालेलें आहे.

अशा प्रकारें ह्या दोन प्रमुख कादंबरीकाराच्या कादंबरीसृष्टीचा मागोवा घेत घेत आपण १९३५ पर्यंत आलेलों आहोंत. वैचारिक, नैतिक, प्रात्यक्षिक इ. दृष्टीनें पाहतां ह्या कालखंडांत स्त्रीजीवनाची प्रगति कोठपर्यंत झाली होती त्याचें विहंगमावलोकन करणें आवश्यक आहे.

मागील (१८८० ते १९२०) या कालखंडाचा विचार करतांना त्या कालखंडांत महाराष्ट्रीय स्त्री ही अर्धवट जागृत होती. शाळेंत वा तत्सम संस्थांत ती जाऊं लागली होती. डोळे उघडून भोवताली पाहण्याचा प्रयत्न करावयास ती नुकतीच सुरुवात करीत होती इ. गोष्टींकडे लक्ष वेधलें गेलें होतें. म्हणजे पुरुष जागृत होता तर स्त्री ही जागृत नव्हती. पुरुष तिला जागृत करण्याचा यत्न करीत होता. त्याच्या ठिकाणीं जी जागृति झाली होती तिच्या आधारें स्त्रीजीवनावर जीं अमानुष बंधनें घातलीं होतीं तीं नष्ट व्हावयास हवींत असें तो पुरस्कारूं लागला होता.

ह्या पार्श्वभूमिवरून जर १९२० ते १९३५ या कालखंडाकडे दृष्टिक्षेप टाकला तर काय आढळतें ? स्त्रियांची शैक्षणिक क्षेत्रांत जोरानें प्रगति होत आहे. विद्याविभूषित स्त्रियांची संख्या समाजांत वाढीला लागत आहे. ती बरीच वाढली आहे. अर्थात् शिक्षणाचा फायदा घेऊन पुरुषांशी

बरोबरी करण्याचा यत्न करणाऱ्या ह्या सगळ्या मध्यमवर्गीय महिला आहेत. त्यांची विचारधारणा ही मध्यमवर्गीय आहे. एकीकडून स्वतःच्या हक्कांची जाणीव होत आहे तर दुसरीकडून पूर्वकालीन पातिव्रत्यादि जीवित ध्येयांचें आकर्षणहि कमी झालेलें नाहीं. ह्या कालखंडांत जी एवढी विलक्षण क्रांति झाली याचें कारण प्रामुख्याने महायुद्धाने घडवून आणलेल्या नव्या परिस्थितींत आहे. महायुद्धाने ह्या कालांत कोणता फरक घडवून आणला ह्याचें विवेचन ह्यापूर्वी प्राथमिक विवेचनांत एका प्रकरणांतच आलेलें आहे. स्त्री व पुरुष यांच्यांत एकध्येयता निर्माण होण्याच्या दृष्टीने या कालखंडांत कोणती प्रगति झाली होती तें पाहणें आवश्यक आहे.

वामनराव जोशी व डॉक्टर केतकर यांची जर वाङ्मयसंपदा पाहिली तर ह्या दिशेने महाराष्ट्रीय स्त्रीने बरीच प्रगति केली होती असें म्हणतां येईल. वामनरावांच्या सुशीलेने विश्वकुटुंबी समाजरचनेची उभारणी करणें हें ध्येय कल्पून त्या दिशेनें स्त्रियांना यत्न करावयास आवाहन दिलें तर डॉ. केतकरांनी आपल्या वैजनाथ–स्मृतींतून सामाजिक व नैतिक क्षेत्रांत पुरुषाचा समान हक्क प्रस्थापित केला. ह्याच गोष्टींकडे लक्ष दिलें तर स्त्री व पुरुष यांच्यांत जी एकध्येयता व एककार्यता निर्माण होण्याची प्रक्रिया ब्रि. राजवटीच्या प्रारंभापासून सुरू झाली होती ती पूर्णावस्थेप्रत गेली होती असें तत्त्वतः म्हणतां येतें. तथापि हें लक्षांत घेतलें पाहिजे की, वामनराव जोशी व डॉ. केतकर यांचे या बाबतचे विचार हें वस्तुस्थितीचे निदर्शक नसून ध्येय निश्चितीचे निदर्शक आहेत. म्हणजे हे स्त्रीशिक्षण, बालविवाह प्रतिबंध, पुनर्विवाह संमति इ. 'प्राथमिक' सुधारणांच्या पलीकडे बरीच प्रगति झाली. ह्या सुधारणांचा पुरस्कार करतांना स्त्रीला व्यक्ति म्हणून समाजांत कांहीं बरें स्थान असावें एवढीच सुधारकांची भूमिका होती. आगरकर विचारांच्या दृष्टीने जरी खूप पुढे असले तरी त्यांना सुरुवात ह्या सुधारणांपासूनच करावी लागली. ह्यावरून ह्या कालांतील स्त्रीजीवनविषयक परावलंबित्वाची कल्पना येते.

ह्या कालखंडांत हे सारेच प्रश्न मागे पडले. म्हणजे वैचारिक दृष्टीनें ते विवाद्य राहिले नाहींत. स्त्रीशिक्षणाचा प्रश्न तर स्त्रियांसाठी स्वतंत्र

विद्यापीठ स्थापन होऊन निकालांत निघाला. पुनर्विवाहाची चालहि समाजाच्या अंगवळणी पडली. पुनर्विवाहितांचे मेळावे जमविण्याचे यत्न होऊं लागले. प्रत्यक्ष पुनर्विवाहितांची संख्या किती वाढविली गेली हा फारसा महत्त्वाचा प्रश्न राहिला नाहीं. त्या मागील नैतिक अधिष्ठान अधिकाधिक सुस्थिर झालें. बालविवाहाचा प्रश्न एका परीने १९२९ चा सारडा कायदा संमत होऊन निकालांत निघाला. त्याशिवाय महायुद्धाने समाजाची आर्थिक स्थिति इतकी झपाट्याने बदलत होती की, व समाजाच्या मनोधारणेंत जोराने बदल होत होता की, बालविवाह हा जवळ जवळ कमी झाला. तो एक सामाजिक प्रश्न राहिला नाहीं.

उलटपक्षी नवे नवे प्रश्न निर्माण झाले होते. त्यापैकी प्रमुख प्रश्न म्हणजे स्त्रियांच्या हक्कासंबंधीचा. स्त्रीला कोणते सामाजिक, कौटुंबिक, राजकीय हक्क असावेत याची चर्चा होऊं लागली. वामनरावांची उत्तरा ही असल्या चर्चा करणाऱ्या वर्गाची प्रतिनिधि आहे. एकंदर कालखंडाचा रोख शास्त्रीय पहाणी करण्याकडे होता. हा व इतर प्रश्नहि त्यादृष्टीने हाताळले गेले. हक्काच्या बाबत 'शास्त्रीय' पाहणी होऊन 'हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा' कशी होत आहे हें ह्याच नांवाच्या पुस्तकाद्वारें दर्शविलें गेलें. समान हक्क हें नवें ब्रीद झालें. ते कसे प्राप्त करून घ्यावे हा सामाजिक प्रश्न निर्माण झाला. निरनिराळ्या कायद्यांची आवश्यकता भासूं लागली. त्यादृष्टीने कायदेमंडळांमार्फत चक्रें फिरण्यास सुरवात झाली.

हक्क संपादण्यासाठीं कायदेमंडळाकडे वळण्याचा एक मार्ग होता. लोकशाही राजवटींत कायदे संमत करणें फारसें सोपें नसतें. कारण सामान्यतः लोकमत हें स्त्रीजीवनविषयक सुधारणेच्या बाबत उदासीन असतें. हा प्रत्यय स्त्रियांच्या बाबत होणाऱ्या कायद्यांच्या संबंधांत आजपर्यंत आला व आजहि येत आहे. शिवाय हक्कांची जाणीव ही महत्त्वाची होती. व तिच्या दिशेने समाजांत जागृति होणें व विचार दर्शन होणें आवश्यक होते. तशा प्रकारें विचारमंथन ह्या कालांत झालें. ह्या विचारमंथनांत कोणती गोष्ट जर

प्रामुख्याने घुसळून बाहेर आली असेल तर ती म्हणजे स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य वा स्वावलंबन कितपत असावें ही समस्या होय. स्त्री जागृत झाल्या नंतर तिच्या लक्षांत प्रथम कोणती गोष्ट आली असेल तर ती म्हणजे आर्थिक पारतंत्र्याची जाणीव. आपण पुष्कळशा हक्कांना मुकलेलों आहोंत याचें कारण आर्थिक दृष्ट्या आपणांस दुसऱ्यावर अवलंबून राहावें लागतें हें आहे असें जेव्हां सर्वसामान्य मध्यमवर्गीय स्त्रीच्या निदर्शनास आलें तेव्हां तिची तें स्वातंत्र्य मिळविण्यासाठी धडपड सुरू झाली. पण समजाचे संकेत व नियम हे पुरुषायत्त असल्याने तिला विरोधी होते. साहजिकच तिला द्विविध स्वरूपाचा लढा द्यायाला लागला. युद्धोत्तर कालांत मध्यमवर्गाची स्थिति हलाखीची होत होती. एका माणसाने मिळविलेल्या पैशावर चरितार्थ भागविणेंहि अशक्य झालें; अशा परिस्थितींत परिस्थितीनेहि स्त्रियांना हा आपला हक्क प्रस्थापित करण्यास जोराने उद्युक्त केलें.

ह्या प्रक्रियेचे परिणाम बहुविध झालेले आहेत. स्त्रियांपुढे व्यापक असें कर्तृत्वक्षेत्र निर्माण झालें. कौटुंबिक संकुचित वातावरणांतून त्यांनीं बाहेरील व्यापक वातावरणांत प्रवेश केला. स्त्री व पुरुष यांत एककार्यत्व असावें हाहि विचार जोराने सर्व संमत होऊं लागला. तथापि स्त्रियांवरील बंधनें विविध स्वरूपाचीं होतीं. कांही निसर्गाने लादलेलीं तर कांही समाजनीति नियमांनी तयार झालेलीं. त्यांत त्यांची ओढाताण होणें साहजिकच होतें. पण त्याचा एक असा परिणाम झाला की स्त्रियांची चळवळ ही दलितांच्या हक्क संपादण्याच्या चळवळीशी एकरूप झाली. कारण स्त्रियांना जसे अधिकार नव्हते तसे दलित वर्गासहि नव्हते. ही परिस्थिति पूर्वकालापासून होती. अशा स्थितींत स्त्रियांची चळवळ दलितांच्या उद्धाराच्या चळवळींत विलीन पावावी हें साहजिक होतें.

अशा प्रकारें स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्याच्या प्रश्नास ह्या कालांत महत्त्व आलें व सामान्यतः ह्या कालाचे शेवटीं तत्त्वतः तो हक्क मान्य करण्यांत आला असें म्हणावयास हरकत नाहीं. ह्या शिवाय स्त्रियावर निसर्गाने

मातृत्व लादलेलें आहे. त्याच्या अनुरोधाने विविध प्रश्न निर्माण झाले. त्यांपैकी प्रमुख प्रश्न म्हणजे अनूढ मातृत्वाचा. मातृत्व हें निसर्गसिद्ध आहे हें खरें; पण समाजसंकेतानुसार फक्त विवाहित मातृत्व हेंच समाजमान्य धरलें जातें. अविवाहित स्थितींत आलेलें मातृत्व हेंच समाजाच्या उपहासाचा व असहानुभूतीचा विषय होतें. असें होण्याचें कारण प्रामुख्याने स्त्रीला आर्थिक स्वायत्तता नाहीं हेंच आहे. त्याशिवाय नीतिनियमांच्या बाबतींत तिच्याकडे अधिक काटेकोरपणें पाहिलें जातें. समाजाची ही अनुदारवृत्ति जो पावेतों बदललेली नाही, किंवा ह्या प्रकारास कायदेशीर मान्यता मिळालेली नाही तोपावेतो हा प्रश्न तसाच राहाणार. ह्या कालांत जे अनेक प्रश्न निर्माण झाले त्यांत हा एक प्रमुख होय. डॉ. केतकरांसारख्यांनी ह्या प्रश्नास महत्त्व दिल्याने समाजाच्या या बाबतच्या विचारांस जोराचा धक्का बसला.

याच प्रश्नांत वेश्यांच्या प्रश्नांचाहि समावेश व्हावयास हरकत नाही. वेश्या हा समाजाचा एक तिरस्कृत व बहिष्कृत असा स्त्रीवर्ग आहे. समाज या व्यवसायाकडे तिरस्काराने पाहतो. पण भांडवली समाजरचनेला तर तो अत्यावश्यक वाटतो. आदर्श समाजरचनेंत वेश्या असणार नाहीत. कारण हा प्रश्न सर्वसामान्य माणसाची समजूत असते त्याप्रमाणें लैंगिक नसून प्रायः आर्थिक व नैतिक आहे. ह्या दोनहि क्षेत्रांत जर महत्त्वाचे व इष्ट असे फेरबदल झाले तर हा वर्ग आस्तित्वांत राहाणार नाही. डॉ. केतकरांनीं ह्या वर्गाचें आस्तित्व अपरिहार्य आहे असें अनेक वेळां प्रतिपादिलें आहे. अधिक बारकाईने पाहिलें तर डॉक्टर महाशयांचा रोख हा समाजसंमत अशा वेश्या आहेत त्यांच्यावर नसून 'रक्षा' किंवा डॉक्टर साहेबांच्या शब्दांत 'रखेली' म्हणून जी संस्था आहे तिच्यावर अधिक आहे. त्यांच्या विचाराचें विवेचन ह्यापूर्वी आलेलेंच आहे.

अविवाहित मातांबरोबर त्यांच्या संततीला कोणतें स्थान समाजांत असावें हा प्रश्नहि महत्त्वाचा होतो. अर्थात् हे सारे प्रश्न थोड्याफार स्वरूपांत मानवी समाजांत दीर्घकाल अनिर्णितच राहाणार. स्त्रीसत्ताक पद्धति सर्रास रूढ

झाली तर ह्या प्रश्नाची तीव्रता कमी होईल हें खरें. पण तसें होणें शक्य कोटींतलें दिसत नाहीं. सहाजिकच असले प्रश्न हे तसेच राहाणार.

ह्या विवेचनावरून स्त्रीजीवन विषयक जुने प्रश्न निकालांत कसे निघत होते व नवे कसे निर्याण होत होते ह्याची स्थूलमानाने कल्पना येईल. डॉ. केतकर अगर वामनराव जोशी ह्यांचे विचार पाहिले की त्यांनी स्त्री व पुरुष ह्यांत सर्व क्षेत्रांत समानता पुरस्कारली आहे असें प्रत्ययास आल्याविना राहात नाही. स्त्रीजीवन विषयक दृष्टीने पाहतांना ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे हें खरें. पण सर्वसाधारण स्त्रीची राहूंद्याच पण सर्वसाधारण मध्यम-वर्गीय स्त्रीची मजल येथपर्यंत कालपर्यंतहि गेली नव्हती तर ह्या कालांत कोठून ? डॉ. केतकरांची कालिंदी अगर वामनरावांची सुशीला अशा स्त्रिया आजच्या समाजांत किती आढळतील ? यावरून हें स्पष्ट होईल की, ह्या लोकांचा यत्न हा ध्येयस्वरूपी आहे. म्हणजे एवढेंच म्हणतां येईल की १९३५ पर्यंत कोणती मोठी गोष्ट सर्वमान्य झाली असेल तर ती ही कीं, वैचारिक नैतिक, सामाजिक, आर्थिक या सर्व दृष्टीने स्त्री व पुरुष हे समान आहेत; आणि ह्यांस समान नियमांचे बंधन असावें त्यांत दुजाभाव नसावा.

ही जी ध्येयनिश्चिति झाली ही एक महत्त्वाची पायरी असली तरी ती पुरुषांच्या विचारीपणाने प्राप्त झालेली होती हें विसरणें योग्य नव्हे. पण ही अवस्था प्राप्त होण्यास आणखी एक मानसिक घडामोड होणें आवश्यक होते. ती ह्या कालखंडांत झाली नाही. ही गोष्ट म्हणजे व्यक्तिवादाचा उदय व त्याचा स्त्रियांत प्रसार होणें ही होय. वामनराव जोशी हे तत्वशोधक लेखक होते त्यांनी तात्विक व ध्येयदृष्टीने आपलें मत अभिव्यक्त केलें. उलट-पक्षी डॉ. केतकर हे समाजशास्त्रज्ञ होते. त्यांना समाजशास्त्राचे नियम अभिमत व ज्ञात होते. त्यांच्या आधारें त्यांनी स्त्रियांना विवक्षित बाबतींत स्वायत्तता असावी असें पुरस्कारिलें, त्यादृष्टीने पाहतां त्या दोघांच्याहि दृष्टि ह्या वेगळ्याच आहेत. त्यांनी क्षेत्राची व्यापकता निर्माण केली. ती दृष्टो-त्तीस आणली. पण तें क्षेत्र प्रत्यक्ष तुडवून जाण्याचें कार्य स्त्रीला करावयाचें

होतें. तें ह्या कालखंडांत झालें नाही. या कालखंडांत समाजशास्त्रीय वैचारिक व ध्येयात्मक तात्त्विक दृष्ट्या स्त्री व पुरुष यांच्यांत समानत्व सिद्ध झालें. पण तें जीवनध्येय कल्पून त्याच्या प्रत जाण्याची तयारी होण्यास जी आत्मविश्वासपूर्ण जाणीव व्हावी लागते ती ह्या कालखंडांत स्त्री व पुरुष यांच्या ठायीं निर्माण झालेली नव्हती. त्या जाणिवेस वैचारिक भाषेंत व्यक्तिवाद असें नांव देतां येईल. ती जाणीय प्रायः या कालखंडाच्या शेवटच्या भागांत प्रभावी रीतीनें दृग्गोचर होऊं लागली होती. ध्येयात्मक व सामाजिक दृष्ट्या केवळ तयारी होणें हें महत्त्वाचें नव्हे. तर त्यांत व्यक्तिवादाची जाणीव ही प्रमुख आहे. ही व्यक्तित्वाची जाणीव सामान्यतः १९३२ । ३३ च्या नंतर सुरू झाली. वाङ्मयांत, विचारप्रधान लेखनांत इ. सर्वच क्षेत्रांत ह्या विचाराचे पडसाद उमटूं लागले. स्त्रीच्या व्यक्तित्वाचे आविष्करण करण्यासाठी व्यक्तित्ववादी लेखकच असणें आवश्यक होतें. महाराष्ट्राचे पहिले व्यक्तिवादी लेखक म्हणजे प्रो. ना. सी. फडके होत. वामनराव जोशी अगर डॉक्टर केतकर यांनी स्त्री जीवनाच्या ज्या चतुःसीमा तयार करून दिल्या त्यांत स्त्रीच्या व्यक्तित्वाचा अविष्कार करील असें मंदिर उभारलें जाणें आवश्यक होतें. यापुढल्या कालांत अनेकांनी तें पुरें करण्याचा यत्न केला आहे. त्याचा पाया घालणारे लेखक प्रो. फडके होत. त्यांच्या कालापर्यंत आपण येऊन पोंचलों आहोंत.



प्रो. फडके, खांडेकर व माडखोलकर.

१ : प्रो. ना. सी. फडके

१९३५ ते १९४७ या कालखंडांतील कांदबरी वाङ्मयाचें परिशीलन करतांना प्रामुख्याने प्रो. नारायण सीताराम फडके यांचा उल्लेख करावा लागतो. वास्तविक फडक्यांची पहिली कादंबरी ही १९१८ त लिहिली गेली. त्यांच्या बऱ्याच कादंबऱ्या १९३५ पर्यंत प्रसिद्ध झाल्या होत्या. किंबहुना त्या कालाचेहि ते एक नामवंत कादंबरीकार होत. डॉ. केतकर, वामनराव जोशी ह्यांच्या इतक्याच–किंबहुना त्यांच्यापेक्षा अधिक लोकप्रिय अशा कादंबऱ्या म्हणजे फडक्यांच्या कादंबऱ्या असें म्हटलें जात होतें. तथापि त्यांचें लेखन अद्यापहि अविरतपणें चालू आहे. आणि आजहि ते एक अत्यंत लोकप्रिय कादंबरीकार आहेत असें आढळून येतें. साहजिकच त्यांच्या साहित्याचें विवेचन ह्या शेवटच्या कालखंडांत येणें अप्रयोजक होणार नाही असें वाटतें. या ठिकाणीं जी पद्धति स्वीकारली आहे ती स्थूलमानाने कालानुसारी आहे तरी वास्तवांत लेखकानुसारी आहे. व म्हणूनच विद्यमान लेखकांच्या साहित्याचा विचार हा शेवटीं संभवतो.

प्रोफेसर फडके यांचें मराठी साहित्य–थोडें का होईना–वाचलें नाही असा एक तरी सुविद्य महाराष्ट्रीय आज असेल की नाही याची शंका आहे. ते प्रथितयश सव्यसाची लेखक आहेत. कोणताहि विषय अत्यंत आकर्षक व सुगम करून सांगण्याची त्यांची हातोटी ही केवळ अपूर्व आहे. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीमुळेच ते महाराष्ट्रांत आज शैलीकार लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांचें लेखन विविध प्रकारचें आणि विपुल आहे. आपल्या कादंबऱ्यांच्या द्वारें त्यांनी मराठी कादंबरीचा आधुनिक अवतार निर्माण केलेला आहे. हरिभाऊंच्या नंतरचा एक श्रेष्ठ कादंबरीकार म्हणून त्यांच मोठेंपण सर्वमान्य होईल असें वाटतें.

तथापि विद्यमान लेखकासंबंधी लिहिणें हें नेहमीच धोक्याचें असतें. एकतर त्यांची सेवा ही चालू असल्याने निश्चितप्रकारचें मूल्यमापन करतां येत नाही. कारण ते कालदृष्ट्या जवळ असल्याने त्यांचे दोष व गुण हे दोन्हीहि स्पष्टपणानेच दृग्गोचर होत असतात. कालामुळेंच गुणांची चकाकी किती आहे तें सिद्ध होणार असतें. समकालीन टीका प्रायः पूर्वग्रहांपासून अलिप्त असणें कठीण असतें. यार्चीं अनेकविध कारणें देतां येतील. पहिलें म्हणजे टीकेच्या मूल्यांतच भेद असतो. लेखकाला संमत असलेलीं टीकामूल्यें ही टीकाकाराला ज्ञात वा संमत असतातच असें नाही. केशवसुतांवर वा रविकिरण मंडळांच्या कवींच्या कृतींवर झालेली समकालीन टीका ही याच प्रकारची आहे. दुसरें कारण म्हणजे लेखक व टीकाकार यांच्या दृष्टिकोनांत महत्त्वाचा फरक असतो. उ. फडके म्हटलें की त्यांचें लेखन विशिष्ट प्रकारचें असणार त्याच्यावर टीका करावयासच हवी अशी एक कांहीची प्रवृत्ति असते. तिसरें कारण म्हणजे लेखकाबाबत टीकाकारांच्या कांही अपेक्षा असतात. त्या अपेक्षांची परिपूर्ति किंवा त्यांचा भंग लेखकाकडून होत असतो व त्यामुळेंहि टीका होत असते. याशिवाय आणखी एक कारण म्हणजे व्यक्तिगत हेवेदावेहि टीका अनुकूल-प्रतिकूल करूं शकतात. सामान्यतः असें असलें तरी कित्येकदां समकालीन टीका ही महत्त्वाची असते. कांही टीकाकार निःपक्षपाती बुद्धीनें मूल्यमापन करीत असतात. या सर्व प्रकारांची टीका प्रत्येक लेखकावर होत असते आणि प्रो. फडके हेहि त्याला अपवाद नाहीत.

तथापि प्रो. फडक्यांचें मोठेपण विवाद्यतेच्या पलीकडे आहे असें म्हणतां येईल. ते या घटकेलाहि अत्यंत लोकप्रिय आहेत. त्यांच्या कांहीं कृती उत्कृष्ट आहेत, भाषासौष्ठव व कलात्मक साक्षेप हे गुण त्यांच्या कृतींत लक्षांत येण्याइतके ठसठशीत असतात. विशिष्ट विचारांचाहि त्यांनी लेखनांतून पुरस्कार केलेला आहे, या गोष्टी सर्वमान्य व्हाव्यात असें वाटतें. त्या ध्यानांत घेतल्यातर त्यांच्या साहित्यांचें विविध दृष्टींनी परिशीलन

करण्यास हरकत नाही असें वाटतें. गुणांप्रमाणे त्यांचे कांहीं दोषहि स्पष्ट झालेले आहेत. त्यांचे विवेचन येथे करावचें नाही. त्यांच्या कादंबऱ्यांतून स्त्रीजीवनाचें जें प्रतिबिंब उमटलें आहे, त्यांनी ज्या कांही तद्विषयक प्रश्नाची चर्चा केली आहे, ह्याच गोष्टींची पाहणी याठिकाणीं करावयाची आहे. तत्पूर्वी लेखकाची भूमिका, दृष्टिकोन, तत्त्वज्ञान, इ. बाबत व स्त्रीजिविनविषयक दृष्टिकोनाबाबत थोडें विवेचन करणें जरुर आहे.

प्रो. फडके यांच्या जीवनविषयक व स्त्रीजीवन विषयक दृष्टिकोणाचा परिचय करून घेण्यापूर्वी वैचारिक दृष्ट्या प्रो. फडके यांचें एक वैशिष्ट्य आहे असें लेखकास वाटतें व त्याचा येथे प्रथम उल्लेख करणें आवश्यक आहे. या प्रबंधांत मागे एका ठिकाणीं प्रो. फडके हे आधुनिक महाराष्ट्राचे पहिले व्यक्तिवादी लेखक होत असें म्हटलें आहे. तो विचार येथे अधिक स्पष्ट करून मांडणें आवश्यक आहे.

आधुनिक कालांत भारतांत ज्या कांही जीवननिष्ठा निर्माण झाल्या आहेत त्यांत व्यक्तिवाद ही प्रमुख होय. किंबहुना समता आणि बंधुभाव हीं व्यक्तित्वाचींच दोन अंगें आहेत असें म्हणणें सयुक्तिक होईल. व्यक्तिवादी विचारसरणी प्रायः आगरकरांनी प्रथम ठसठशीतपणें पुरस्कारली हें खरें. तिचा परिणाम हरिभाऊ आपटे, वामनराव जोशी आदि लेखकांवरहि झाला. पण त्यांनी त्या विचारसरणीचा कांही भागच स्वीकारला. वस्तुतः आगरकरांनीसुद्धा व्यक्तिवादाच्या बुद्धिप्रामाण्याच्या अंगावर अधिक भर दिला. आगरकरांचें कार्य हें प्रामुख्याने वैचारिक जागृतीचें होतें. तें करतांना त्यांनी बौद्धिक विवेचनास अधिक महत्त्व द्यावें हें क्रमप्राप्त होतें. हरिभाऊ आपटे हे सुधारणावादी खरे पण व्यक्तिवादी नव्हते. त्यांच्यावर रानडे व चिपळूणकर यांच्या विचारसरणीचे संस्कार अधिक खोलवर उमटलेले होते व आगरकरांच्या व्यक्तिवादापासून ते थोडे दूरच होते इ. विवेचन आपट्यांची विचारसरणी पहातांना मागील भागांत आलें आहे. वामनराव जोशांनी सामान्यतः आगरकरांची विचारसरणी मान्य केली, पण ते स्वतः तत्त्व-

शानाचे विद्यार्थी असल्याने त्यांनी त्या विचारसरणीच्या तात्त्विक अधिष्ठानाकडे व तिच्यामूळांशी असलेल्या नैतिक मूल्यांकडे अधिक लक्ष दिलें. त्याच कारणाने वामनराव व्यक्तिवादी नायिका, नायक निर्माण करूं शकले नाहींत, तर ध्येयवादी करूं शकले. वास्तविक ध्येयवादाचा आणि व्यक्तिवादाचा विरोध आहे असें नव्हे. आगरकर हे व्यक्तिवादाचा पुरस्कार करणारे असून ध्येयवादी लेखक होते. व्यक्तिवादी लेखकाचें वैशिष्ट्य एवढेंच कीं तो आपला ध्येयवाद ठरवितांना अध्यात्मिक अगर ग्रंथकार, धर्म, इ. ची वचनें, संदेश, इ. प्रमाण न मानतां स्वतःची योग्यायोग्य विवेचकबुद्धि प्रमाण मानतो.

हा जर निष्कर्ष विचारांत घेतला तर प्रो. फडकें हे व्यक्तिवादी लेखक आहेत असें स्पष्ट होईल. त्यांच्या साहित्यविषयक मतांची छाननी केली तरी काय आढळतें ? ' कलेसाठी कला ' हा विचार मानणारे ते एक प्रमुख लेखक आहेत. या विचाराचें मूलभूत वैशिष्ट्य व्यक्तिवाद हेंच नव्हे काय ? कलेसारख्या क्षेत्रांत, धर्म, नीति, प्रचार, बोध, इ. कलाबाह्य क्षेत्रांतील मूल्यांना महत्त्व देण्यापेक्षा तिचा निर्माता जो कलावंत त्याच्या कलात्मकतेला म्हणजे व्यक्तित्वाला अग्रस्थान असावें, असाच या विचाराचा आशय नाहीं काय ? ह्या मताचे महाराष्ट्राचे प्रमुख पुरस्कर्ते प्रो. फडके आहेत. व ते त्या विचारसरणीला चिकटून आहेत ह्याचें कारण त्यांची व्यक्तिवादी मनोधारणा ही होय. आचार्य जावडेकरांशी पुरोगामी वाङ्मयाच्या निकषांबाबत जेव्हा त्यांनी वाद घातला तेव्हा तेथेहि त्यांनी धर्म, अर्थ, काम, मोक्ष, ह्या पूर्व कालीन जीवितमूल्यांपैकी धर्म व मोक्ष ह्यांचा अधिक्षेप केलेला आहे, त्याचें बीज ह्या त्यांच्या मनोधारणेंत आहे असें म्हणतां येईल. आपल्या कादंबऱ्यांतून त्यांनी प्रेमाचीं जीं सुरम्य चित्रें रंगविलीं तीं व प्रेम ही भावना इतक्या आकर्षकपणाने रंगविली जाण्याचं कारणहि त्यांची ही विशिष्ट विचारसरणीच होय. व्यक्तित्वाचें एक प्रभावी आकर्षण म्हणून प्रेम भावनेला त्यांनी महत्त्व दिलें आहे. प्रणय या भावनेला ते हीन लेखूं शकत नाहीत

कारण ती भावना हा व्यक्तित्वाचा एक प्रभावी आविष्कार आहे. त्यांची राजकीय आणि सामाजिक मतें पाहिलीं तरीहि आपणांस हीच गोष्ट प्रत्ययास येईल. प्रोफेसर फडके हे राजकीय विचारांच्या बाबतींत कम्यूनिझमपर्यंत गेले आहेत. आपल्या 'वादळ' ह्या भाषांतरित 'कादंबरी'ला जी प्रस्तावना जोडली आहे तिच्यांत त्यांनी ही गोष्ट स्पष्ट केली आहे. तथापि त्यांना कम्यूनिस्ट चळवळ, रशियाचा प्रयोग इ. बद्दल विशेषसी आस्था नाही. ह्याचें कारण व्यक्तित्वाची गळचेपी त्या प्रयोगांत वा चळवळींत होत असेल अशी त्यांना भीति वाटते. व त्यामुळे साम्यवादी विचारांपर्यंत तात्त्विक दृष्ट्या जाऊनहि आपला व्यक्तिवाद ते सोडण्यास तयार नाहीत.

ते ज्या काळांत पुढे आले तो काल व्यक्तिवादाच्या वाढीचा काळ होता. १९२० नंतर कर्मयोग हें जीवनमूल्य मानणाऱ्या टिळकांचें युग संपलें व गांधीजींचें असहकाराचें युग सुरू झालें हें व्यक्तिवादाच्या वाढीला पोषक असें युग होतें. गांधीजी हे पहिले व्यक्तिवादी पुढारी होत. राष्ट्रीय आंदोलनांत प्रो. फडके शिरले तरी त्यांतून ते लवकर निवृत्त झाले ह्याचें कारण म्हणजे त्यांचा पिंडच व्यक्तिवादी होता. कोणा व्यक्तीच्या सांगण्याप्रमाणे वागणें हें त्यांना झेपण्यासारखें नव्हतें हेंच खरें. तथापि या कालाचा विचार 'व्यक्तिवाद' हा त्यांनी इतका आत्मसात केला होता की, त्याचा आविष्कार व प्रसार त्यांनी आपल्या लेखनांतून प्रभावी रीतीने केला. व हें त्यांचें खरें वैचारिक वैशिष्ट्य होय.

तथापि व्यक्तिवादाच्या वाढीला हा काल पुढे पुढे विशेषसा पोषक राहिला नाही. कारण समाजवादी विचारांची रुजावट समाजाच्या (मध्यमवर्गाच्या) मनोभूमींत जोराने होऊं लागली होती. व १९३८ नंतर तर व्यक्तिवादी विचारच मागे पडला, समाजवादी विचाराच्या प्रसाराचें युगमान सुरू झालें. प्रो. फडके हे मनोधारणेने जरी व्यक्तिवादी आहेत तरी त्यांनीं आपली व्यक्तिवादी भूमिका ही आग्रही न ठेवतां अधिक लवचिक ठेवली. त्यामुळे, व्यक्तिवादी भूमिकेवरून समाजसत्तावादी विचारांबाबतची, आस्था ते व्यक्त

करूं शकले. तथापि त्या भूमिकेमुळेच त्या विचारसरणीशीं ते तादात्म्य पावूं शकले नाहीत, व्यक्तिवाद हाच प्रमुख राहिला; यांचें मुख्य गमक म्हणजे त्यांच्या कादंबऱ्या ह्या बाह्यतः राजकीय पण आंतरिक दृष्टीने प्रेमकथा अशा झालेल्या आहेत. प्रो. फडक्यांच्या मनोधारणेचें महत्त्वाचें अंग म्हणजे व्यक्तिवाद. त्याचें हें विवेचन त्यांच्या कादंबऱ्यांची पाहणी करतांना उपयुक्त होईल. त्यांच्या वृत्तीचे गुण व दोष ह्यांच्या मागली ही भूमिका महत्त्वाची आहे असें वाटतें.

प्रोफेसर फडके ह्यांचें जीवनविषयक तत्त्वज्ञान पाहतांना त्यांच्या मनोरचनेची ठेवण ध्यानांत घेणें आवश्यक होतें. ती लक्षांत घेतल्यानंतर त्यांच्या लेखनांतील विविध प्रवृत्तींचा उलगडा होऊं शकतो. प्रोफेसर फडके व वामनराव जोशी हे दोघेजण वास्तविक तत्त्वज्ञान व मानसशास्त्र या विषयांचे अभ्यासक व अध्यापक. पण त्या विषयांचा दोघांच्या मनावर भिन्न परिणाम झाला. याचें कारण दोघांच्या मनाची ठेवणच भिन्न आहे हें होय. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासामुळे वामनरावांच्या ठायीं उच्च नैतिक ध्येयवाद निर्माण झाला. त्याच्या उलट परिणाम फडक्यांच्या मनावर झाला. वामनराव हे नैतिक ध्येयांबद्दल आदर बाळगतात. आपण जग सुधारावें व त्यांत एकंदरीने माणसास यश येईल असा त्यांचा विश्वास आहे. या अर्थाचें त्यांचें एक वचन मागे उद्धृत केलें आहेच. दोघांनाहि जीवनाचे पुरोगामित्व मान्य आहे. म्हणजे विश्वकुटुंबी समाजपद्धति या जगांत निर्माण व्हावी अशी दोघांचीहि इच्छा आहे. त्याबाबत साहित्याने योग्य तें साहाय्य करावें अशी दोघांचीहि मनीषा आहे. प्रा. फडके हे कलावादी असले तरी आजची असाधारण समाजअवस्था पाहून 'कले करतां कला' हें ध्येय जरा बाजूस ठेवण्यास तयार आहेत अशी कबूली त्यांनी जावडेकरांना उत्तर देतांना एकदा दिली आहे. [१]

तथापि ह्या साम्यामागे फरक फार मोठा आहे. प्रो. जोशी हे जग दुःखाने भरलें असलें तरी सुधारण्याचा यत्न करावा असें म्हणतात. त्यांतच त्यांना श्रेष्ठ प्रकारचा आनंद भरलेला आहे असें दिसतें [२] जीवनांतील

१ पुरोगामी साहित्य २ इंदु काळे सरला भोळे.

दुःखांवर उतारा म्हणून त्यांनी ध्येयवादाचा अवलंब केला आहे असें वाटतें. प्रो. फडक्यांची दृष्टि वेगळी आहे. त्यांच्या दृष्टीने समाजरचना सुधारण्याचा प्रयोग हा एकंदरीने श्रेयस्कर असला तरी मानवजातीचीं दुःखें हीं राहाणारच आहेत. तीं नष्ट होणार नाहींत. दुःख आणि जीवन ह्यांचें साहचर्य हें कायमचेंच आहे, हें लक्षांत घेऊनच मणासाने आपलें जीवनविषयक तत्त्वज्ञान तयार करावें. त्यांत दुःखाकडे पाहण्याची प्रवृत्ति बदलावी. दुःखांतच थोडाफार आनंद घ्यायला शिकावें. किंवा जेव्हा आनंदाचे वा सुखाचे क्षण उपलब्ध होतात त्यांत निर्भरपणें रमावें. अशा प्रकारें मनुष्याच्या दुःखाकडे पाहण्याची त्यांची दृष्टि ही थोडी वेगळी आहे. कलावादी लोकांची वृत्ति सामान्यतः अशी असते. प्रो. फडक्यांच्या जीवनाविषयक दृष्टिकोनावर ह्या कलावाद्यांच्या दृष्टिकोनाचा ठसा उमटलेला आहे.

तथापि प्रो. फडक्यांचें याबाबत एक वैशिष्ट्य आहे. सामान्यतः कलावादी लेखक हे जीवनाकडे थोड्या तुच्छतेने पाहातात. जीवनांतलीं दुःखें व अपूर्णता पाहून त्यांना जीवनाविषयीं एकप्रकारचा तिरस्कार, घृणा, वाटूं लागते. ही अपूर्णता कुरूपता कलेच्या क्षेत्रांत नसते. तेथे विशुद्ध आनंद व विशुद्ध सौंदर्य ह्यांचा साक्षात्कार त्यांना होतो व त्यायोगें ते कलेला आणखी कवटाळतात व कला ही आणखी जीवनापासून दूर जाते. यक्षभूमीकडे ती जाऊं लागते. प्रो. फडके हे कलावादी आहेत, आणि त्यांच्या लेखनांत कलावादी लेखकांच्या लेखनांत आढळून येणारे गुण व दोष हे आढळून येतात. कलेंतील कलात्मकतेविषयीं अतीव आस्था, जीवनाच्या दुःखाकडे डोळेझांक करण्याची दृष्टि इ. विशेष त्यांच्या कृतींतही आढळून येतात, आणि त्यायोगेंच त्यांच्या कादंबऱ्या ह्या टीकेचा विषय झालेल्या आहेत. तथापि कलावादी लोक हे जीवनाविषयीं जी तुच्छताबुद्धि दाखवतात ती मात्र प्रो. फडके दाखवीत नाहीत व हेंच त्यांचें वैशिष्ट्य.

ह्या त्यांच्या वैशिष्ट्याने त्यांनीं एक प्रकारचा 'जीवनवाद' निर्माण केला आहे. या 'जीवनवादाचे'चे आविष्करण प्रामुख्याने कोठे होत

असेल तर तें त्यांच्या लघुनिबंधांतून. ते इतके उत्कृष्ट निबंध लिहूं शकले याचें एक कारण म्हणजे "व्यक्तिवाद" हेंच होय. जीवनांतल्या विविध सुखांकडे व दुःखांकडे 'आनंदा'च्या दृष्टीने पाहावयाचें हा त्यांच्या जीवित विषयक दृष्टिकोनाचा भाग आहे. मानवी जीवन म्हटलें कीं दुःखें आलींच अर्थात् जीवनांत जर आनंद घ्यायचा असेल तर दुःखांतहि आनंद घ्यायला शिकले पाहिजे. असें एकंदरीने त्यांचें मत दिसतें.

ह्या जीवनवादी वृत्तीवर स्वप्नाळूपणाची छाया आहे असें वाटतें. ही एक विस्मृतीची धडपड आहे असेंहि बारकाईने पाहिले असतां वाटूं लागतें. पण लेखकाच्या अंतरंगांत ही वृत्ति इतकी खोलवर गेलेली आहे कीं तींत कृत्रिमतेचा वासहि येत नाहीं. लेखक जीवन अत्यंत आस्थेने व सहानुभूतीने रंगवीत आहे. त्याचे रस आणि रंग हे सारख्याच कौशल्याने लोकापुढे ठेवीत आहे.

एकंदर जीवनांतील दुःखांकडे एक अपरिहार्य अंग म्हणून पाहण्याची लेखकाची वृत्ति असल्याने कांही उणीवाहि राहिल्या आहेत. दुःखें ही अपरिहार्य ठरल्यानंतर त्यांचें मूळ इ० पाहण्याचें अर्थातच कारण नाहीं असें होतें. एकाकी जीवन काढण्याचें दुःख व्यक्तीच्या (स्त्रीच्या) वाट्याला आलेलें दिसतें. हें दुःख खरें. पूर्वी तें बालविवाहाच्या रूढीमुळे लौकर वैधव्य येऊन आलेलें असेल, उलट आज तें लवकर लग्न न झाल्याने कौमार्यावस्थेंतच अनुभवास येत असेल. एकूण काय दुःख तें दुःख मग त्यांचीं कारणें कोणतींहि असोत. लेखकाला कारणांशीं काय करायचें? जीवनांतील दुःखाशी फक्त त्यांचा संबंध. व तेंच त्याला दाखवावयाचें असतें. अशा प्रकारची एकंदरीने त्यांची विचारसरणी आहे. त्यायोगें एक मोठें वैगुण्य आलें आहे व तें म्हणजे आधुनिक जीवनाच्या ज्या मूलभूत व महत्त्वाच्या समस्या आहेत त्यांकडे लेखकाचें दुर्लक्ष झालें आहे. म्हणजे आधुनिक जीवनाचा एक अपरिहार्य भाग म्हणून विविध राजकीय घडामोडी इ. त्यांनी दर्शविल्या आहेत. नाही असें नाही. पण त्यांकडे लेखकाची पाहण्याची

वृत्ति सहानुभूतीचीहि नाही अगर तिरस्काराचीहि नाही; वास्तवजीवनाच्या चित्रणाचा एक भाग अशी आहे. त्यामुळें त्यांचे नायक एकंदरीनें दुबळे आहेत. राजकारणांत जरी त्यांचें अंग असलें तरी प्रेमाच्या (प्रिय) व्यक्तीच्या बद्दलची आस्था हीच अधिक महत्त्वाची आहे, असें त्यांना वाटतें. कारण अंगिकृत कार्य हें जीवनशक्तीच्या वापरासाठी व अंतःकरणासाठी कांही असेल तर तें प्रिय व्यक्तीचें प्रेम. जगांतला एकमेव श्रेष्ठ आनंद त्यांतच आहे असें त्यांना वाटतें. ह्या चित्रणाचें बीज लेखकाच्या मनोवृत्तींत आहे; दृष्टिकोनांत आहे.

स्त्रीजीवन विषयक दृष्टिकोन, त्यांनीं कोणता धारण केला आहे हें जरी पाहूं लागलों तरी ह्याच प्रवृत्तीचें दिग्दर्शन होऊं शकतें. प्रो. फडक्यांनी विविध प्रकारच्या नायिका व स्त्रिया निर्माण केल्या आहेत. त्यापैकी कांही चित्रें अविस्मरणीयहि आहेत. तथापि एकंदरीने त्यांच्या चित्रणांत विविधता कमी आहे असें निदान १९३५ पर्यंत तरी भासमान होत होतें.

प्रो. फडके हे स्त्रीजीवनाकडे पुरुषांच्या जीवनाइतक्याच सहानुभूतीने पाहूं शकतात. समाजवादी विचारापर्यंत मजल झालेली आहे. अर्थात स्त्री व पुरुष यांच्यांत एक प्रकारचें समानत्व आहे हें गृहित धरलेलें दिसतें. त्यांनी पुरुषाप्रमाणे राजकारण, समाजसेवा इ. ध्येय म्हणून बाळगणाऱ्या स्त्रियाहि दर्शविल्या आहेत. तथापि जीवनाकडे पाहण्याची वृत्ति ही वर उल्लेखिल्याप्रमाणे तटस्थपणाची असल्याने जीवनविषयक वा स्त्रीजीवनविषयक प्रश्नांचें भेदक दिग्दर्शन ते करूं शकलेले नाहींत. स्त्रियांच्या वाट्यास विविध दुःखें आलेलीं असतात. एवढीच गोष्ट त्यांनी ध्यानांत घेतलेली आहे. त्या दुःखामागे कारणें आहेत, त्यांच्या निरसनाचे कांही प्रयत्न, उपक्रम झालेले आहेत, त्यांच्याकडे लेखकाचें लक्ष गेलेलें दिसत नाही. कारण, कारणांकडे डोळेझांक करण्याची लेखकाची वृत्ति आहे. स्त्रियांच्या विविध प्रश्नांपैकी प्रेमविवाह हा एकच प्रश्न त्यांना महत्त्वाचा वाटला. इतर सुधारणाबद्दल विशेष आस्था होती असें नव्हे. आजचे तरुण स्त्री–पुरुष व त्यांपुढील प्रश्न, ह्या पुस्तकांत

त्यांनी "प्रीतिविवाह रूढ करणें ही खरी सुधारणा होय. आणि ही सुधारणा घडवून आणण्याचें काम तरूण स्त्रीपुरुषांचेंच होय" असा तरुणांना आदेश दिला आहे. याच पुस्तकांत त्यांनीं बालविवाह व पुनर्विवाह ह्यांत श्रेष्ठ कनिष्ठ ठरवितां येत नाही असेंहि म्हटलें आहे. (पृ. ९०). ह्यावरून एक गोष्ट स्पष्ट होईल कीं, त्यांना स्त्रीजीवनाचे तत्कालीन अनेकविध प्रश्न होते त्यांत केवळ प्रीतिविवाहाचा प्रश्न तेवढा जिव्हाळ्याचा वाटला. आणि ही त्यांची वृत्ति ध्यानांत घेतली तर त्यांच्या कादंबऱ्या ह्या प्रामुख्याने प्रेमप्रधान कां आहेत ह्याचा उलगडा होतो.

आपण सहेतुक लिखाण लिहूं शकतों हें दर्शविण्यासाठीं त्यांनी मुद्दाम 'उद्धार' ही कादंबरी एका स्त्रीजीवनाविषयक प्रमुख समस्येची चर्चा करण्यासाठी लिहिली पण त्या कादंबरींत काय सिद्ध केलें तर स्त्रीजीवनविषयक सर्व प्रश्न आर्थिक स्वातंत्र्याने सुटतील असें नव्हे हें. ह्या त्यांच्या मतावरूनच त्यांच्या दृष्टिकोनाची कल्पना येऊं शकते. त्यांना कोणत्याहि सामाजिक वा व्यक्तिगत दुःखाची कारण परंपरा ही अमान्य आहे. दुःखें तेवढी खरी. हेंच ह्याहि बाबतींत आपल्या प्रत्ययास येतें. स्त्रीजीवन व पुरुष जीवन हीं एकमेकास पूरक आहेत. हे मात्र त्यांनी चांगल्या रीतीने दिग्दर्शित केलें आहे. स्त्रीजीवन विषयक प्रश्नाबाबत - व स्त्रियांबाबत एकंदरीने सहानुभूति असली तरी त्यांच्या नायिका ह्या समाजकारण अगर राजकारण यांत धडाडीने प्रथम शिरतात पण नंतर त्यापासून परावृत्त होतात. त्यांना प्रेमाचा आसरा घर हेंच बरें वाटतें. हें एकंदरीने वस्तुस्थितीचें चित्रण असेलहि पण लेखकाला कांही चित्रें तरी वेगळ्या प्रकारचीं दाखवितां आलीं असतीं. असो, त्यांच्या स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोनाचा परिचय करून घेतल्यानंतर त्यांच्या नायिकांच्या चित्रांकडे व कादंबऱ्यांतील स्त्रीजीवन विषयक समस्यांकडे वळणें आवश्यक आहे.

प्रो. फडक्यांच्या १९४७ पर्यंत एकंदर २३ कादंबऱ्या प्रसिद्ध होत्या. त्यापैकी तीन रूपांतरित व ऐतिहासिक अशा चार सोडून दिल्या

तर राहिलेल्या एकोणीस ह्या स्वतंत्र सामाजिक कादंबऱ्या आहेत. ह्या कादंबऱ्यांकडे त्यांच्या प्रकाशनकालाच्या दृष्टीने पाहिलें तर असें आढळून येतें कीं, १९३६ पर्यंत म्हणजे 'आशा' प्रसिद्ध होईपर्यंत एक दृष्टिकोन आहे. प्रवासी, (१९३७) उन्माद (१९३९–४०) समरभूमि (१९३८) ह्या एका वेगळ्या मनःस्थितींत लिहिलेल्या आहेत. नंतरच्या 'इंद्रधनुष्य' (१९४०) प्रतिज्ञा (१९४२) शाकुंतल (१९०४) बस नंबर बारा (१९४४) इ. ह्या एका वेगळ्याच मनोवृत्तींतल्या आहेत. व शेवटच्या दोन तीन कादंबऱ्यांत लेखकाने वेगळा दृष्टिकोन धारण करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रो. फडक्यांच्या पहिल्या चार पांच कादंबऱ्यांत 'जादूगार' आणि 'दौलत' याच कादंबऱ्यांना महत्त्वाचें स्थान द्यावें लागेल. 'अल्ला हो अकबर' ही ऐतिहासिक कादंबरी लेखकाच्या सर्वच दृष्टींनी प्रारंभिक नवाशिकेपणाची साक्ष देते. तर 'कुलाब्याची दांडी' आणि 'अटकेपार' ह्या कादंबऱ्या प्रेम विषयक कथा आहेत. त्यांत प्रो. फडक्यांनीं प्रेम या भावनेचें कलात्मक आविष्करण केलेलें आहे. पण लेखकाची दृष्टि ही 'सामाजिक' नसून प्रायः काव्यमयच आहे. त्या कादंबरीला वास्तविक व्यापक असें सामाजिक अधिष्ठान देतां येणें शक्य होतें तरी त्यांनी तें दिलेलें नाही. कारण त्यांच्या कल्पनेप्रमाणे समाजसुधारणा व साहित्य यांचा कला-दृष्ट्या निकटवर्ति संबंध नाही. समाजस्थितिपर विचारांना चालना देणें हें काम केवळ अनुषंगाने साहित्याकडून होत असते. ह्यामुळे विशिष्ट सामाजिक अधिष्ठान मध्यवर्ति धरून 'उद्धार' शिवाय त्यांनी एकहि कादंबरी लिहिलेली नाही.

प्रो. फडक्यांच्या कादंबऱ्यांचा विचार करतांना तत्कालीन साहित्य-विषयक व सामाजिक विचारापैकी आणखी एक विचार ध्यानांत घेणें आवश्यक आहे. इ. स. १९३० चे सुमारास त्यांचें 'प्रतिभासाधन' हें पुस्तक प्रसिद्ध झालें. त्या पुस्तकाने मराठी साहित्यांत वाङ्मयीन चर्चेचें एक नवें युग निर्माण झालें. साहित्यविषयक विविध प्रश्नांची चर्चा साहित्यक्षेत्रीय प्रश्न म्हणून होऊं लागली. पुस्तकाचें, विशेषतः ललित वाङ्मयाचें परिशीलन

करतांना साहित्यबाह्य मूल्यांपेक्षां साहित्यक्षेत्रीय मूल्यांचाच विचार केला जावा असा विचार साहित्य क्षेत्रांत प्रस्थापित होऊं लागला. प्रो. फडक्यांची कलावादी विचारसरणी ह्याबाबत आग्रही होती. म्हणजे काव्य, कथा, कादंबऱ्या आदि ललित कृतींचें परीक्षण करतांना कलाविषयक तत्त्वें वा नियम यांचें परिपालन लेखकाने किती कसोशीने केलें आहे हें लक्षांत घेऊनच त्यांच्या कृतीचें मोठेंपण वा लहानपण ठरवावें. समाजक्षेत्रीय व राजकीय विचारांचा वा घटना घडामोडींचा उल्लेख वा अनुल्लेख हा कलाकृतीच्या श्रेष्ठ कनिष्ठपणाचें मूल्यमापन करतांना महत्त्वाचा नव्हे. या विचारांचा पुरस्कार प्रो. फडक्यांनी प्रारंभासून केला व आजहि ते करीत आहेत. ह्या त्यांच्या विचारप्रणालीचा त्यांच्या लेखनावर असा परिणाम झाला आहे की, त्यांच्या कलाकृतींत (कादंबऱ्यांत इ.) सामाजिक, राजकीय, इ. घटनांना दुय्यम स्थान प्राप्त झालें आहे. कलात्मकता ह्या एकाच निष्कर्षावर कलाकृती घासून पाहाव्यात असा लेखकाचा आग्रह आहे. त्या निष्कर्षाचाच साक्षेपी स्वीकार लेखकाने केलेला आहे. त्यामुळे त्यांच्या कांही कादंबऱ्या ह्या उत्कृष्ठ कलाकृती म्हणून चिरकाल आकर्षक राहाणार आहेत. तथापि ह्याच गोष्टींमुळे लेखकाला सामाजिक समस्यांबद्दल आस्था नाही. व्यक्ति म्हणून प्राध्यापक महाशयांना ती असली तरी त्यांच्यांतील ललितलेखकाला ती नाही हें स्पष्ट आहे.

त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनाची पाहणी करतांना त्यांच्या साहित्यविषयक विचारप्रणालीचा विसर पडूं देणें इष्ट नाही. त्यांच्या कादंबऱ्यांत (उद्धार खेरीजकरून) स्त्रीजीवनविषयक समस्यांचा विचार केलेला नाही. तसा उहापोह आलेला असेल तर तो केवळ अनुषंगाने होय. त्यांच्या बहुसंख्य कादंबऱ्या ह्या प्रेमकथा आहेत. आणि ह्या प्रेमकथांत विविधता कांही असेल तर ती तंत्रात्मक वा कलाक्षेत्रास अभिमत असेल तीच. इतर अंगांचा विचार महत्त्वाचा नाही. उदाहरणार्थ प्रेम या भावनेच्या अविष्कारासाठीहि त्यांनी समाजाचें अस्तित्व विचारांत घेतलेलें नाही. त्यांच्या प्रेमि-

कांना समाजाशी झगडावें लागलें नाही. 'अटकेपार' मध्ये जरी हिंदु-मुस्लीम विवाहाचा प्रश्न आला असला तरी नायकनायिकांच्या प्रेमाची परिपूर्ति न दाखवितां त्यांच्या वांट्यास वैफल्य आलेलें दर्शविलें आहे. व तें दर्शवितांना उभय समाजाच्या रूढिनिष्ठेकडे फक्त तुच्छतापूर्वक अंगुलिनिर्देश केला आहे. इतर कादंबऱ्यांतून असा कांही सामाजिक संघर्ष प्रेमभावनेच्या अनुषंगानेहि दिद्गर्शित होईल अशी चित्रें न रंगविण्याची खबरदारी लेखकाने घेतली आहे, कारण कलादृष्ट्या ह्या गोष्टी केवळ अनवश्यक आहेत. [१]

कलादृष्ट्या त्यांनी कादंबऱ्या लिहितांना कोणता निकष प्रमाण मानला असेल तर तो म्हणजे स्वभाव–लेखन हा होय. ह्या निकषाचें परिपालन आपल्या हातून किती कसोशीने झालें आहे तें पाहून आपल्या कृतींचें मोठेंपण ठरवावें, अशी लेखकाची मनीषा दिसते ती त्यांच्या साहित्य-क्षेत्रीय विचारांशी सुसंगत आहे. स्वभाव लेखनाच्या कलेंत मात्र प्राध्यापक महाशयांनी अपूर्व यश संपादन केलें आहे ही गोष्ट सामान्यतः सर्वसंमत आहे. डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी आपल्या स्वभाव लेखनावरील प्रबंधांत या कौशल्याबाबत प्रोफेसर मजकुरांची मनसोक्त प्रशंसा केली आहे व ती अस्थानीं आहे असें नव्हे. स्त्रीजीवनविषयक पाहणी करतांनाहि त्यांच्या कादंबऱ्यांतील विविध स्त्रीभूमिकांच्या स्वभावाची ठेवण व तिचें लेखकाने केलेलें चित्रण ह्याच गोष्टी प्रामुख्याने ध्यानांत घ्याव्या लागतात. किंबहुना ह्यापुढच्या कालांतील सर्वच लेखकांच्या कलाकृतींत ह्या लेखन कौशल्याचा स्वतंत्रपणें विचार करावा लागतो. कारण इंग्रजी साहित्याचा परिचय उच्च अभ्यासांतून होत होता. त्यांत त्या साहित्याच्या ह्याच अंगाकडे लक्ष वेधलें

१ आपल्या 'साहित्य आणि संसार' ह्या पुस्तकाच्या ६८ व्या पृष्ठांवर प्रो. फडके म्हणतात "तत्कालीन प्रश्नांची चर्चा आणि सोडवणूक करणें हा ललित लेखनाचा आद्यहेतु नसून, सामान्य अविनाशी मानवी भावनांची हृदयस्पर्शी चित्रें रेखाटणारे ललितवाङ्मयच अक्षर ठरतें हा माझा सिद्धांत."

जात होतें त्याचा परिणाम लेखकांवरहि झालेला आहे. ह्या सर्व विवेचनावरून हें स्पष्ट होईल कीं प्रो. फडक्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनाची पाहणी त्या स्वभावरेखांत जी विविधता, जें कौशल्य आहे त्याची पाहणी, हीच प्रमुख गोष्ट होय. १९३५ नंतरच्या वाङ्मयांतील विविध गोष्टींचा विचार करतांना स्वभावलेखन कलेंतील यश ह्या अंगांकडे विशेष आस्थेने लक्ष द्यावें लागतें. स्वभावलेखनाची व तें ज्या मानवी मनाचा एक अविष्कार आहे त्या मानवी भावनाबद्दलची लेखकाची काय कल्पना आहे ती लक्षांत घेणें आवश्यक आहे.

'साहित्य आणि संसार' या पुस्तकाच्या ६९ व्या पृष्ठावार ते म्हणतात. "कालिदासाच्या शकुंतलेची वेशभूषा निराळी असली, आणि आजच्या एखाद्या कादंबरींतील नायिकेची वेशभूषा भिन्न असली, तरी त्या दोघींच्या अंतःकरणांत राग, द्वेष, प्रणयादि ज्या भावना स्फुरत असलेल्या लेखक दाखवील, त्या किती सामान्य व अविनाशी स्वरूपाच्या आहेत यावरच त्या त्या ललितकृतीचें अक्षरत्व अवलंबून राहणार आहे...जग जसजसें बदलत आहे तसतसे माणसांचे पेहराव, त्यांच्या घरादारांचे प्रकार द्रव्योत्पादनाची आणि वहातुकीचीं साधनें...या साऱ्या गोष्टी बदलत आहेत. पण असें असूनहि ज्या मूलभूत भावनांना आपण 'मनुष्यत्व' ही सामान्य संज्ञा देतों त्या कायमच आहेत...प्रियाराधनाचे जुने प्रकार जाऊन नवे आले असतील, पण प्रियाराधनेची मानवी प्रवृत्ति होती तशीच कायम आहे...वात्सल्याचा अविष्कार पूर्वी होत नव्हता अशा तऱ्हेने आज होत असेल; पण वात्सल्याची मानवी अंतःप्रवृत्ति होती तशीच आहे. या अविनाशी मानवी धर्माचें रेखाटन हा ललितवाङ्मयाचा मुख्य आधार होय. अर्थातच ज्या कालीं हें रेखाटन व्हावयाचें त्या कालाशीं सुसंबद्ध असा आकार त्या लेखकाने त्या रेखाटनाला दिला पाहिजे" या दीर्घ उताऱ्यांतून व्यक्त झालेली लेखकाची भूमिका फार महत्त्वाची आहे. वर म्हटल्याप्रमाणे लेखकाला सामाजिक प्रश्न इ. हे केवळ पार्श्वभूमीरूप वाटतात त्यापेक्षा त्यांना अधिक महत्त्व नाही.

ह्या भूमिकेचा आणखी एक असा परिणाम झाला आहे कीं, लेखकाने वर उल्लेखिलेल्या कांही भावनांनाच महत्त्व दिलें आहे. कारण ह्या भूमिकेप्रमाणे देशप्रेम हा प्रेम भावनेचा आविष्कार होतो. अर्थात् ह्या दोहोंत अधिक स्थायी 'स्वरूपाची भावना म्हणजे' प्रेम होय. अर्थात् लेखकाला तीच महत्त्वाची वाटावी. अर्थातच देशप्रेमाची भावना व प्रेमभावना ह्यांतच जर विरोध आला, पण तसला संघर्ष म्हणजे सामाजिक जीवनाच्या अधिक चर्चेस वाव द्यावयाचा, व लेखकाला तो वर्ज्य आहे कारण लेखकाचे मतें ललित लेखनांत 'कायम स्वरूपाच्या' भावनांसच स्थान. ह्यामुळेच राजकीय विविध चळवळींचा उल्लेख करूनहि फडक्यांच्या कादंबऱ्या ह्या प्रायः प्रेमकथाच राहिल्या आहेत. मानवी मनांतच जो विविध प्रकारचा संघर्ष चालू असतो तो लेखकाच्या दृष्टीने महत्त्वाचा नाहीं. कारण त्या संघर्षदर्शनांत कदाचित् व्यापक नैतिक समस्येंत शिरावें लागेल व मग ललितकर्थेत 'नीति' येईल. आणि कलेला तर ती वर्ज्य; कलेंत ती कशी आणायची ? असो स्वभाव लेखन हें जरी मूळ घेतलें तरी प्रो. फडक्यांचें कादंबऱ्यांतून जें स्वभावलेखन कौशल्य व्यक्त झालें तें कलात्मकतेचे दृष्टीनें कितीहि कौतुकास्पद असलें तरी मूलतः एकांगी आहे. त्यांत रम्यतेचा भाग असला तरी श्रेष्ठतेचा भाग हा त्यामानाने अल्प असणार.

प्रो. फडके यांच्या अनेक नायिकांत 'जादूगार' मधील इंदुमति ही एक श्रेष्ठ स्वभावरेखा आहे. ही स्वभावरेखा उठावदार बनण्याचें कारण म्हणजे लेखकाने ह्या पात्राचें स्वभावपरिवर्तन यशस्वितेने रंगविलेलें आहे. इंदुमति ही वामनरावांच्या 'उत्तरे' प्रमाणे स्त्रियांच्या हक्कांबाबत जागरूक आहे. " स्त्रियांना जर खरें खुरें सुखी व्हावयाचें असेल तर सदैव पुरुषांच्यावर अवलंबून राहण्याची गुलामगिरीची वृत्ति त्यांनी काढून टाकली पाहिजे. जेव्हा त्या पुरुषांचा जुलुम मान्य करावयास तयार होणार नाहीत तेव्हाच त्यांना खरें स्वातंत्र्य व सुख मिळेल. " ...इ. प्रकारचे तिचे विचार असतात. व ती ते लेखन भाषण इ. तून व्यक्त करते. तिचें मत साहजिक-

पणेंच पुरुषांच्या चांगुलपणाविषयीं सांशक असतें. त्याला कांही तिचे अनुभवहि कारणभूत झालेले आहेत. तथापि आनंदरावांचा तिचा परिचय झाल्यापासून तिचे हे पूर्वग्रह हलके हलके कमी होण्याची क्रिया सुरू होते. आनंदरावांच्या विविध गुणांचा अनुभव येऊन तिचें मत बरेंच बदललेलें असतें. परंतु आनंदराव 'मॉडेल' साठी उभे राहण्यासंबंधी विचारतात तेव्हा परत तिच्या मनांत आशंकांचें वादळ निर्माण होतें. पण पुन्हा असे प्रसंग घडतात की तिला पश्चाताप होतो व आनंदरावांबाबतचें आकर्षण वाढत जाऊन ती विवाहबद्ध होते. स्त्रीस्वातंत्र्यवादिनीला शोभणारा तिचा पुरुषद्वेष नष्ट होऊन ती पुरुषावर प्रेम करूं लागून विवाह करते ही मानसिक प्रक्रिया लेखकाने कौशल्यपूर्वक रंगविली आहे व हेंच त्याचें वैशिष्ट्य. स्वभावलेखनकलेच्या निकषास उतरेल असें हें चित्र आहे व त्याबद्दल प्रा. देशपांडे व डॉ. सहस्रबुद्धे ह्यांनी फडक्यांची प्रशंसा केली आहे ती योग्य आहे. इंदुमतीची आई ही परित्यक्तावस्थेचें दुःख सहन करीत असते. पण लेखकाने ही वस्तुस्थिति केवळ 'कलावंता'च्या दृष्टिकोनांतून पाहिली आहे. शेवटी तिची परित्यक्तावस्था एखाद्या साडेसातीप्रमाणे अचानक संपते. नानू; जानकी यांचे पण संबंध सुधारतात. व सर्वत्र आनंद होतो. स्त्रीजीवनाचे दृष्टीने तीन महत्त्वाचीं चित्रें आहेत. नायिका इंदुमति, तिची आई व जानकी. पैकी आई व जानकी ह्यांचीं चित्रें केवळ पार्श्वभूमीरूप आहेत. बहुसंख्य स्त्रियांच्या वाट्याला येणारें संकटपूर्ण आयुष्य त्यांच्या वाट्याला आलेलें असतें. याशिवाय कोणताच उद्देश त्या स्वभावचित्रणामागे नाही. कादंबरीच्या नायिकेच्या विचारांचें परिवर्तन हा कादंबरीचा विषय आहे. पण दृष्टि केवळ कलावंताची आहे. ह्याशिवाय लेखकाच्या मतें प्रीतिविवाह हीच खरी सुधारणा असल्यामे त्या सुधारणेला परिपोषक असें सारें कल्पनापूर्ण वातावरण आहे. कादंबरी ही एक चांगली प्रेमकथा आहे. इंदुमतीच्या स्वभावाचे आज्ञाधारकता प्रेमळपणा, इ. गुण विविध प्रसंगाच्या आधारें दाखवून व्यापक सहानुभूति निर्माण केली आहे. प्रेमकथा लिहिणें हाच उद्देश असल्याने इतर प्रश्नांचा संभवच उरत नाही.

'जादूगार'च्या नंतर पहिल्या चारपांच कादंबऱ्यांत फडक्यांची श्रेष्ठ कादंबरी म्हणजे 'दौलत' होय. ही कादंबरीसुद्धां श्रेष्ठ ठरण्याचें एक कारण म्हणजे तिच्यांतील सूप्त रूपाने असलेली एक प्रकारची हेतुपुरस्सरता. 'दौलत' म्हणजे काय ह्या संबंधीच्या विविध लोकांच्या ज्या कल्पना असतात त्या कल्पनांचा परिपोष करणारीं पात्रें लेखकाने ह्या ठिकाणीं निर्माण केलीं आहेत. पण हीं पात्रें जरी अशीं प्रतिमारूप असलीं तरी त्यांचें प्रतिमारूपकत्व लवकरच संपतें व मानवी स्वभावाचे विशेष त्यांतून सहजगत्या बाहेर पडूं लागतात. निर्मला ही या कथेची नायिका. तिचें चित्र अतिशय हळुवारपणें लेखकाने रंगाविलें आहे. मराठी साहित्यांत जीं कांही रम्य नायिकेंचीं चित्रें आतापर्यंत रंगाविलीं गेलींत त्यांपैकी हें एक आहे. येथे नायिकेला वास्तविक स्वतःच्या वडिलांबरोबर लढायचे असतें. तिच्या 'संपत्ती' संबंधीच्या कल्पना निश्चित झालेल्या असतात. त्याप्रमाणे ती कमी श्रीमंत असलेल्या अविनाशावर प्रेमहि करूं लागते. पण वडिलांचा आग्रह तिने एका आय्. सी. एस्. बरोबर लग्न करावें. ती तें नाकारते. व हाच काय तो कादंबरींतला अधिकाधिक घर्षणशील प्रसंग. पण ती मावशीकडे लोणावळ्यास जाते. अशी तिची सुटका दाखविली आहे. वडिलांचा विरोध मोडण्यासाठी लेखकाने त्यांना आजारी केले आहे. प्रसंग ह्या दृष्टीने मानसिक परिवर्तनास अत्यंत योग्य अशी घटना ही आहे. त्याप्रसंगाने निर्मलेचा मार्ग मोकळा होतो. एकंदरीने निर्मला हें एक रम्य पात्र असलें, कलात्मकतेच्या दृष्टीने त्यांत विविध प्रकारचें कौशल्य असलें तरी ती साधी प्रेयसीच आहे असें आढळून येतें. विविध प्रसंगांना तिला तोंड द्यावें लागतें. पण ते सारे प्रसंग त्यामानाने सौम्य असतात. हरिभाऊंच्या, वामनरावांच्या वा डॉक्टर केतकरांच्या नायिकांशीं तुलना करतांना ह्या चित्रणांतली कलात्मकता निश्चितपणें आश्चर्य मोहित करून सोडते. पण इतर बाबींत त्या लेखकांचीं स्त्रीचित्रें निश्चितपणें अधिक जिवंत वाटतात. मराठी स्त्रियांना अद्याप प्रेम (आधुनिक प्रकारचें) हा प्रकार नवा होता. ती भावना इतक्या साक्षे-

पाने ह्या वेळेपर्यंत कोणा कलावंताने रंगविली नव्हती. प्रोफेसर महाशयांचें तेंच मोठेपण.

तुलनेनेच पाहूं लागलें तर याच कादंबरींतील माधुरी, कमल ही पात्रें अधिक करुणास्पद जीवन जगतात. कमल ही आय्. सी. एस्.शी विवाहित होते, पण तिचें सर्व जीवन दारुणनिराशेनें भरलेलें असतें. माधुरीला एवढ्या संकटांना तोंड द्यावें लागतें पण शेवटीं यश पदरांत पडतें. हीं पात्रें केवळ पार्श्वभूमिवजा आहेत हें स्पष्ट आहे. त्यांचा उपयोग विशिष्ट उद्देशासाठी आहे. ह्यापेक्षां अधिक बारकाव्याने स्त्रीजीवनाबद्दल लेखकाला कांहीहि म्हणावयाचें नाही.

'दौलत' आणि 'जादूगार' ह्या नायिकाप्रधान कादंबऱ्या आहेत. त्यामुळे त्या दृष्टीने पाहिलें असतां त्यांत वास्तविक स्त्रीजीवनाचें अधिक भेदक दर्शन व्हावयास हवें होतें. पण लेखकाला प्रेमाशिवाय अन्य प्रश्न तितका महत्त्वाचा वाटत नाही. ह्यानंतर त्यांची नायिकाप्रधान कादंबरी म्हणजे 'काश्मिरी गुलाब' होय. वास्तविक ह्या कादंबरीची नायिका बरीच वेगळ्या प्रकारची आहे. तिला जगांतल्या अनेक कटु प्रसंगांचा अनुभव येतो. शेवटी तर कोर्टात जाऊन उभें राहावें लागतें. गुलाबवर आलेले विविध प्रसंग आहेत. त्यायोगें तिच्याबद्दल खरोखर सहानुभूति वाटूं लागते. "येथें फडक्यांच्या नाजुक कलेच्या सूक्ष्म छटा आढळणार नाहीत; मनांत तरंगत राहतील अशीं मनोहर सृष्टिवर्णनें नाहीत; किंवा सुंदर स्वभावचित्रें नाहीत. गुलाबच्या आयुष्यांतील...बऱ्या वाईट अनुभवांचा इतिहास येथे दिला आहे...केवळ मनरंजनासाठी एक करमणुकीची कथा एवढेंच या कादंबरीला महत्त्व आहे" असें फडक्यांचे चरित्रकार प्रा. देशपांडे या कादंबरीबाबत म्हणतात. यावरून ह्या कादंबरीच्यासंबंधी एकंदर कल्पना येऊं शकते. गुलाबला एवढे प्रसंग अनुभवावे लागतात, पण तो केवळ जीवनांतील दुःखाचा एक भाग होय. असें दुःख अनेकांच्या वाट्याला येतें. तें मुकाट्याने सहन करणें एवढेंच कार्य उरतें. अशी एकंदरीने लेखकाची वृत्ति आहे.

शेवटीं प्रीतिसाफल्य होऊन गुलाबच्या संकटपरंपवेर मात होते. स्त्रीजीवन-विषयक अधिक सहानुभूति असती तर ह्याच अनुभवांतून श्रेष्ठतर कलाकृति निर्माण केली असती. गुलाबच्या खालोखाल शैलजेचें पात्र आहे; पण तें केवळ पार्श्वभूमि म्हणून. तिच्याबद्दल सहानुभूति वाटते. पण लेखकाने तें पात्र अर्धवटच सोडलेलें आहे.

'कलंक शोभा' व 'निरंजन' ह्या दोन पुरुषप्रधान कादंबऱ्या आहेत. 'निरंजन' मध्ये लेखकाने प्रथमच सामाजिक जीवनांतील प्रत्यक्ष घडवळी इ. चा उपयोग करून घेतला आहे. यापूर्वीच्या कादंबऱ्या ह्या प्रायः काल्पनिक आहेत. त्यांत कालसापेक्षता कांही नाही. ही कादंबरी लेखकाने गांधीजींच्या सत्याग्रहाच्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली आहे. नायक निरंजन ह्याचा विवाह झालेला असतो. पण पत्नी योग्य न मिळाल्याने त्याचें वैवाहिक जीवन सुखाचें नसतें. तो मंदाकिनी नांवाच्या स्त्रीकडे आकृष्ट होतो. आपल्याकडून मोहाचे प्रसंग टाळण्याचा प्रयत्न तो करतो. कादंबरीकाराने प्रेमाचा त्रिकोण निर्माण केलेला आहे. तथापि ही साधी प्रेमकथा असल्याने निरंजनच्या पत्नीचा-जान्हवीचा-मृत्यू दाखविलेला आहे. कारण त्यानेच निरंजनाचा मार्ग मोकळा होतो. निरंजनाचें चित्र हें खरें महत्त्वाचें. जान्हवीचा स्वभाव ज्या तऱ्हेचा रंगविला आहे तो स्वभाव-चित्र पाहतांना समर्पक वा योग्य वाटला तरी केवळ पार्श्वभूमि म्हणून त्याचा उपयोग लेखकाला करावयाचा होता असें स्पष्ट दिसतें. मंदाकिनीचें चित्रण हें अधिक सहानुभूतीने झालें आहे. कारण ती कादंबरीची नायिका आहे. व तिचें प्रेम समाजनीतिदृष्ट्या अनैतिक आहे. ही जाणीव तिच्याजवळ सदैव आहे. त्यामुळे तिच्या मनाची अवस्था मोठी चमत्कारिक झाली आहे. लेखकाने हें चित्रण चांगल्यारीतीने केलें आहे. ह्या कादंबरींत लेखकाला द्विभार्या करण्याच्या प्रथेची पार्श्वभूमि सांगायची होती कीं काय हें कळत नाही. लेखकाची सहानुभूति प्रेम विवाहाच्या बाजूने आहे. अर्थात् ती

मंदाकिनीचे बाजूने आहे. जान्हवीवर आपण अन्याय केला असें वाटूं नये म्हणून तिला पश्चात्ताप करावयास लावून तिच्या हस्तें निरंजनाच्या दुसऱ्या विवाहाची सांगता केली आहे. तें सारें केवळ कादंबरींत शोभण्यासारखें आहे. स्त्री जीवनविषयक प्रश्नांच्या दृष्टीने पाहिलें तर स्त्रियांचे विवाह इतके उशीरा होत कीं त्यांचें लक्ष विवाहित पुरुषांकडेहि जाऊं लागले होतें असें लेखकाला दाखवावयाचें होतें असें म्हणतां येईल. पण तसें कांही नाही. केवळ एक प्रेमकथा म्हणूनच त्याने ती सांगितली आहे. प्रथम पत्नीवर होणारा अन्याय तिच्या मृत्युमुळे नष्ट झाला आहे व त्यायोगें सामाजिक समस्येपासून सुटका करून घेतली आहे.

'कलंकशोभा' हीहि पण पुरुषप्रधानच कादंबरी आहे. शशिकांत हा एक कॉलेजतरुण केवळ मित्राच्या प्रेमासाठी स्वतःवर नीतिदृष्ट्या कलंकित झालेला असा आक्षेप ओढवून घेतो. अशा तरुणाच्या कॉलेज-जीवनांतील अद्भुतरम्य प्रेमाची ही एक प्रणयकथा आहे. रचनेची कुशलता ही वाखाणण्यासारखी आहे. लेखकाने 'मी कादंबऱ्या कशा लिहितों' ह्या लेखांत ह्या कादंबरीचें रचनासौंदर्य मला कसकसें जमलें तें स्पष्ट केलें आहे. त्यावरूनहि हें स्पष्ट होईल कीं ही कादंबरी म्हणजे कॉलेज जीवनांतील काल्पनिक प्रसंगांवर आधारलेली एक प्रेमकथा आहे. तिच्या रचनेच्या ठाकठिकीला अधिक महत्त्व आहे. नायिका रजनी ही नायकावर प्रेम करते. तिच्या प्रीति साफल्यांत नायकाकडूनच कांहीं संकटें आणलेलीं आहेत. पण सर्व शेवटीं आनंदी आनंद होतो. प्रथमपासून अखेरपर्यंत ही कल्पनारम्य व पुरुष-प्रधान प्रेमकथाच वाटते.

अशाप्रकारें १९३६ पर्यंतच्या प्रमुख कादंबऱ्यांचें विवेचन केलें. ह्या कालांतली येथल्या विवेचनाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची कृति म्हणजे 'उद्धार' ही होय. ह्या कादंबरींत लेखकाने प्रयोजनपूर्वक कांही सामाजिक समस्या मनांत धरून लेखन करण्याचा यत्न केलेला आहे. ती समस्या स्त्रीजीवन-विषयक आहे. तिचें विस्ताराने परीक्षण करणें आवश्यक आहे.

'उद्धार' या कादंबरींत प्रा. फडक्यांनी स्त्रियांच्या आर्थिक पारतंत्र्याच्या सामाजिक प्रश्नाची चिकित्सा केली आहे. 'आर्थिक स्वातंत्र्य हेंच स्त्रियांच्या उद्धाराचें खरें सामर्थ्यवान् शस्त्र' अशी नायिका विद्या हिची कल्पना असते. ही कल्पना किती चुकीची आहे व उद्धाराचें खरें रहस्य रूढ नीतिकल्पनांचा जाच सोडण्यांत कसा काय आहे हें प्रतिपादन करण्यासाठी कथेची सजावट केलेली आहे. विद्या ही अति विचार करणारी नायिका आहे. तिच्या भोंवतालची परिस्थिति ही अशी आहे की तिचें जो जों बाकराईने अवलोकन करावें तो तों स्त्रियांचें आर्थिक परदास्य हेंच त्यांच्या हलाखीचें कारण आहे असें तिच्या प्रत्ययास यावें. परंतु लेखकाला आर्थिक परदास्य हें एक कारण आहे हें पसंत असलें तरी 'स्त्रियांना पदोंपदीं स्वतःची कुचंबणा करावयास लावणारी निसर्गाने त्यांच्यावर लादलेली मातृपदाची जबाबदारी हीच त्यांच्या पायांतली खरी जबरदस्त शृंखला आहे; असें मला प्रतिपादावयाचें होतें' अशी कबुली त्याने 'साहित्य आणि संसार' मधील 'मी माझ्या कादंबऱ्या कशा लिहितों' ह्या लेखांत दिलेली आहे. लेखकाच्या ह्या प्रतिपादनाशी सुसंबद्ध असें वातावरण व स्वभावचित्रें निर्माण करण्याची लेखकाने कोशीस केली आहे. त्यादृष्टीने विद्या व विषया ह्यांचीं स्वभावचित्रें निर्माण केलीं आहेत. विषया ही सिनेमा व्यवसायांत असणारी व स्त्री-पुरुषांच्या परस्पर संबंधांविषयी अगदी तर्कशुद्ध पद्धतीने विचार करणारी अशी स्त्री आहे. 'बायका मिळवत्या झाल्या की, जादूची कांडी फिरविल्याप्रमाणे त्या अधिक सुखी होतील असं तुला वाटतं; पण मला तसं वाटत नाही. बायकांच्या गुलामगिरीचीं पाळं मुळं फार खोल आहेत, इतकीं की तीं नाहिशी करायचीं झालीं तर आज रूढ असलेले सारे नीतिनियम... पार बदलून टाकले पाहिजेत...' इ. विचार जेव्हा ती वीणामावशीकडून ऐकते तेव्हा तिला धक्का बसतो. तिच्या मनांत परिवर्तन होऊं लागतें. आर्थिक दृष्ट्या 'स्वतंत्र' असणारी विषयाहि तिला असेंच बजावते. 'मला वाटतं स्त्रीचं जिणंच निसर्गानं असं चमत्कारिक अन् गुंतागुंतीचं करून ठेवलं

आहे की, या नाही त्या स्वरूपांत तिला गुलामगिरी पत्करलीच पाहिजे... " " कारण प्रेम स्त्री व पुरुष दोघेहि करतात. पण त्याची परिपूर्ति झाली की, पुरुष तेवढा स्वतंत्र राहावा, अन् स्त्रीचे हातपाय बांधले जावेत असा निसर्गाचा न्याय आहे " असें विषयेचें मत असतें. या विषयावर ती चारुदत्त, विनयकुमार, कोदंडराव ह्यांच्याजवळ विचारविनिमय करते. " स्त्रियांना गुलामगिरींतून आपली सुटका करून घ्यावयाची असेल तर मातृपदाविषयींच्या परंपरागत कल्पना त्यांनी बदलून टाकिल्या पाहिजेत " असें तिला हळूहळू वाटावयास लागतें. " जोंपर्यंत सारी नीति अनीती आणि स्त्रियांचं पावित्र्य व श्रेष्ठत्व ठरविण्याचं विवाहयुक्त मातृत्व हें एकच प्रमाण समाज मानील तोंपर्यंत स्त्रियांचा खरा उद्धार होणं शक्य नाही " असा मध्यवर्ति विचाराचा समारोप विषयेच्या मुखाने लेखकाने करविला आहे.

प्रो. फडक्यांनी लिहिलेली सहेतुक कादंबरी व तीहि स्त्रीजीवन विषयक प्रश्नाची चर्चा करणारी, म्हणून ह्या कादंबरीला विशेष महत्त्व आहे. लेखकाचें मत आर्थिक स्वातंत्र्यानेच स्त्रियांचा उद्धार होणार नाही तर नीतिविषयक संकेत बदलले पाहिजेत हें विवाद्य असणें शक्य आहे. पण कादंबरीचें प्रतिपाद्य या दृष्टीने त्यांत कांही दोष नाही. तथापि लेखकाने ह्या प्रश्नाकडे सामाजिक दृष्टीने न पाहतां केवळ मानसशास्त्रीय दृष्टीने पाहिलें आहे. त्यामुळे विद्येचें पात्र हें अपवादभूत वाटतें. सामाजिक प्रश्नांची चर्चा करणाऱ्या कादंबऱ्यांत अशीं अपवादभूत पात्रें आलीं तर त्यायोगे कलाकृतीचा परिपोष जरी योग्य होत असला तरी प्रतिपाद्य सामाजिक विचारास एक प्रकारचा अन्याय होतो. विद्या हें पात्र अपवादभूत न घेतां प्रातिनिधिक घेतलें, तर तें अधिक समर्पक झालें असतें. मातृत्वाच्या योगानें आलेलीं बंधनें नायिकेच्या कक्षेंत यावींत म्हणून केवळ तिच्यावर काल्पनिक गर्भसंभवाचा प्रसंग आणलेला आहे; असो. प्रो. फडक्यांनी सामाजिक प्रश्नावर म्हणून ही कादंबरी लिहिली असली तरीं त्यांची भूमिका ही प्रामुख्याने कलावंताची आहे असें स्पष्ट होतें. स्त्रियांच्या उद्धारांसाठी नीतिविषयक कल्पना बदला-

वयास हव्यात एवढ्याच निर्ल्कर्षाप्रत तो येतो. पण त्यांचें स्वरूप कसें असावें हें लेखक कुठेहि सांगत नाही. कारण लेखकाच्या मतें ललित लेखकाचें तें कार्यच नव्हे.

वस्तुस्थिति अशी आहे की स्त्रियांच्या पारतंत्र्याचें बीज खरोखर आर्थिक परावलंबित्वांतच आहे. स्त्रियांचा उद्धार केवळ आर्थिक स्वातंत्र्य दिल्याने होईल असे जेव्हा म्हटलें जातें तेव्हा त्या गोष्टीकडे अधिकाधिक लक्ष वेधणें हाच उद्देश असतो. नीतिनियम म्हणून जे असतात ते आर्थिक रचनेच्याच आधारे आलेले नाहीत काय ?| आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे केवळ मिळवतेंपण असा संकुचित अर्थ केला जातो. पुरुषांना आर्थिक स्वातंत्र्य असून समाजरचनेची इमारत त्या पायावर उभारलेली आहे. स्त्रियांना नौकरी करूं दिल्याने दिखाऊ आर्थिक स्वायत्तता लाभते. पण त्यांना राहावें लागतें वेगळ्या पायावर उभ्या राहिलेल्या समाजरचनेंत. तेव्हा लेखकाने आर्थिक स्वातंत्र्याचा अर्थ जितका संकुचित केला आहे तितका न घेतां अधिक खोलवर घेतला असता तर आर्थिक स्वातंत्र्य व रूढ नीतिनियम ह्यांत जें द्वैत आहे असें वर वर पाहिलें असतां वाटतें तसें वाटलें नसतें. पण ह्या सर्व निष्कर्षाप्रत येण्यास ललितलेखकालाहि सामाजिक व आर्थिक रचनेसंबंधीं खोलवर विचार करावा लागतो. तो करतांना वा त्याचें आविष्करण (कादंबऱ्यांतून) करतांना विशुद्ध लालित्यप्रेमाची लालसा थोडी बाजूला ठेवावी लागते. लेखकास तर तें सर्वथा अमान्य. अशा परिस्थितींत हेतुप्रधान लेखनाचा वा ललित वाङ्मयांतील हेतुप्राधान्याचा असा विपर्यास व्हावा हें क्रमप्राप्त होतें. 'उद्धार' ही प्रा. फडक्यांची स्त्रीजीवनविषयक कादंबरी असली तरी तिच्यांत लेखकाची वैचारिक भूमिकाच चुकीची असल्याने प्रतिपादनास वेगळेंच वळण मिळालें आहे. ही वैचारिक भूमिका शास्त्रशुद्ध व आविष्करण प्रातिनिधिक स्वरूपाचें झालें असतें तर ही कादंबरी निश्चितपणें सामाजिक दृष्ट्या अधिक श्रेष्ठ दर्जाची झाली असती.

दुसरी एक बाब अशी कीं, लेखकाला सामाजिक दृष्टीने क्रांतिकारक असे विचार टाळावयाचे आहेत. त्याची समाजाशी जुळतें घेण्याची प्रवृत्ति ही प्रमुख आहे. विद्येचें स्वभावचित्र हें एक मानसशास्त्रीय विशिष्ट नमूना म्हणून रंगविलेलें आहे. व त्यादृष्टीनेच त्या स्वभावचित्राकडे पाहावें अशी लेखकाची अपेक्षा आहे. आपली आई मावशी होते व मावशी आई होतें व तें ज्ञान आपणांस फार उशीरां होते. ह्या अनुभवाने तिच्या मनोवृत्तीवर वेगळाच परिणाम व्हावा; कीं ज्यांत काल्पनिक गर्भसंभवाच्या घटनेचीं बीजें असावींत. हें सारें चित्रण कलादृष्टीने वा मानसशास्त्रीय आविष्करणाच्या दृष्टीने कलापूर्ण असलें तरी ज्या सामाजिक समस्येची चिकित्सा करण्याचा संकल्प लेखकाने केला आहे त्याला विरोधी आहे. त्यांत त्या दृष्टीने प्रातिनिधिक भाग अधिक हवा होता. येथे तो अल्प आहे.

हे जर मूलभूत मतभेदाचे भाग सोडले तर स्वभावचित्रण ह्या दृष्टीने विषया, विद्या, वीणा मावशी इ. चीं स्वभावचित्रें कुशलतेने रंगविलीं आहेत. वडील जेव्हा तिच्या पगाराचे पैसे मागतात तेव्हा तिने दिलेला नकार, उडाण-टप्पू मावाची तिने घेतलेली हजेरी, ह्या प्रसंगांनी तिच्या बाणेदार व निर्भय वृत्तीची कल्पना येते. तिचें मातृप्रेम तिच्या उदार कोमल स्वभावाची साक्ष देतें. तिने तिच्या गोड स्वभावाने कोदंडरावांच्या घरांत सर्वांचा आदर संपादन केला आहे. तिची मैत्रिण विषया हिचें चित्रहि रम्य आहे. ती अत्यंत धीट आहे. चाणाक्ष आहे. केवळ महत्त्वाकांक्षेसाठी आपलें प्रेम व्यक्त करतां येत नाही म्हणून तिला खरेंखुरें वाईट वाटतें. आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र असूनहि जेव्हा इतर बंधनांनी तिचें जीवन व्याप्त होतें तेव्हा तिला खरोखर वाईट वाटतें. विषयेचें चित्र हें त्या मानाने अधिक प्रातिनिधिक आहे. तिच्या आधारें लेखकाचें उद्दिष्ट बरेंच सफल होतें. नायिकेच्या आधारें नव्हे.' अभिजात रसिकता व त्याला औदार्याची व मार्मिक विनोदवृत्तीची जोड मिळाल्यामुळे विषयेचें स्वभावचित्र अतिशय वैशिष्ट्यपूर्ण व मोहक झालें आहे. आणि प्रो. फडक्यांच्या चिरंजीव स्वरूपाच्या स्वभावचित्रांत त्याला स्थान द्यावयास हरकत नाही.'

अशा प्रकारचे उद्गार प्रा. मा. का. देशपांडे यांनी काढले आहेत ते लक्षणीय आहेत.

'उद्धार' नंतर स्त्रीभूमिकाप्रधान कादंबरी म्हणजे 'आशा' ही होय. ही एक साधी मनोरंजक प्रेमकथा आहे. पण आशेच्या स्वभावापेक्षा विलासचें स्वभावचित्रच अधिक वैशिष्ट्यपूर्ण आहे. आशेची भेट होईपर्यंत त्याने कशावर वा कुणावरच मनापासून प्रेम केलेलें नसतें. सुखविलासांनी गजबजलेल्या रस्त्याने तो पूर्ण बेफिकिरीनेच चालत आला होता. आशेचें दर्शन झाल्यानंतर प्रथमच अंतर्मुख होऊन विचार करण्याचा प्रसंग निर्माण झाला होता. आशेवर तो अनुरक्त होता. तीहि त्याच्यावर अनुरक्त होत होती. त्यांचें प्रेम सुरूं झाल्यानंतर नेहमीप्रमाणे त्याचा शेवट प्रणयभावनेच्या परिपूर्तीत होतो. मध्यंतरी शरश्चंद्राचे आगमनाने थोडा अडथळा निर्माण होतो. पण तो लवकर नष्ट होतो. "त्यांचा विवाह होतो त्यावेळीं अल्पांशानेहि या प्रणयपूर्तीचें कौतुक वाचकांना वाटत नाही." असें प्रा. देशपांडे म्हणतात. आशेच्या स्वभावांतील कांही रेषांशिवाय या कादंबरींत इतर आकर्षण अल्प आहे.

'दौलत', 'जादूगार' नंतर १९४० पर्यंतच्या कालांतील प्रो. फडक्यांची बरीच गाजलेली कृती म्हणजे 'प्रवासी' कादंबरी होय. ह्या कादंबरींत राजाभाऊ सरंजामे ह्या नायकाचें चरित्र रंगविलें आहे. स्वातंत्र्य-संग्रामात जे अनेक भारतीय वीर पतन पावले त्यांपैकी एक तेजस्वी रत्न म्हणजे हा राजाभाऊ होय. वास्तविक पाहूं गेलें असतां ही कादंबरी म्हणजे पुरुष प्रधान कादंबरी आहे. राजाभाऊ व त्याचें विविध कर्तृत्व हा कादंबरीचा खरा वर्ण्यविषय. पण त्याचें चरित्र रेखाटतांना त्याच्या आयुष्यांत आलेल्या विविध स्त्रियांचा उल्लेख आला आहे. अशा स्त्रियांत उमा, नीलांबरी व चंचला ह्या प्रमुख होत. ह्या तिघीहि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. उमा ही एक परित्यक्त विवाहित स्त्री आहे. तिचा पति महेश्वर हा मधूनच उपस्थित राहून तिला छळतो. शेवटीं तो तिला घेऊन जातो. पण अत्यंत लाजीरवाणें,

करुणास्पद, जीवन तिला जगावें लागतें. कादंबरींतील मध्यवर्ति स्त्रीरेखा म्हणजे उमा असें म्हणावयास हरकत नाही. चंचला ही अत्यंत सुंदर पण वेश्याकन्या असते. तिच्या व्यवसायांतर्गत नीतिनियमाप्रमाणे ती एका हैदराबादच्या श्रीमंत गृहस्थाबरोबर राहते. पण तिला पुढे वाईट अनुभव येतात, व नायकाजवळ ती आपला पश्चाताप व्यक्त करते. राजाभाऊने केलेल्या प्रणययाचनेचा तिने धिःकार केलेला असतो. नीलांबरी ही एक नर्तिका असते. ती व तिची बहीण जयमाला यांनी 'जयमाला डान्सर्स' म्हणून नृत्यसंस्था काढलेली असते. ती राजाभाऊजवळ आपलं प्रेम व्यक्त करते. राजाभाऊच्या मनांत देशाविषयीच्या विचारांना प्राधान्य असल्याने तर ती त्याच्यावर अधिकच आकृष्ट होते. मोठ्या कुशलतेने लेखकाने ह्या नायकाच्या ह्या तीनहि प्रणयनींना शेवटीं त्याच्याजवळ आलेल्या व त्याच्या कार्याशी समरस झालेल्या अशा दाखविल्या आहेत. तिघीहि प्रेयसी आहेत. प्रत्येकीची परिस्थिति वेगळी आहे. उमेचें चित्र करुणरम्य आहे. प्रो. फडक्यांनी ही स्वभावरेखा अतीव सहानुभूर्तीने रंगविलेली आहे. विशेष म्हणजे तिच्याजवळ रूपसंपदेचें भांडवल अल्प असतें व त्यामुळेच तिच्यावर परित्यक्ता होण्याचा प्रसंग पातलेला असतो. ती करारी आहे. बाह्यतः सभ्य पण अंतस्थ दृष्टीने छळणाऱ्या एका दुष्ट माणसाशी तिचा विवाह झालेला असतो. त्याच्यापासून ती दूरहि राहते. पण हिंदु समाजाचे नियम व हिंदु कायदा तिला सुखानेहि राहूं हेत नाहीत. तिचें प्रेम जगावेगळें असतें. ती राजाभाऊवर प्रेम करते, त्याच्याशी ती इतकी समरस झालेली आहे की त्याच्या ध्येयावरहि प्रेम करते व स्वातंत्र्य संग्रामांत झालेल्या झटापटींत तिला मृत्यु येतो. 'उमा' ही प्रो. फडक्यांनी निर्मिलेली एक श्रेष्ठ स्त्रीरेखा आहे. तिचें श्रेष्ठपण तिच्या त्यागांत आहे. तिला जें खडतर जीवन जगावें लागतें तें पाहून खेद होतो. तरीहि 'प्रवासी'ची नायिका उमा आहे, असें म्हणतां येणार नाही. नीलांबरी व चंचला ह्याहि राजाभाऊवर अनुरक्त आहेत. त्यांनाहि जगाचा विविध प्रकारचा अनुभव येतो. त्याहि नायकाच्या

ध्येयाशी समरस होण्याचा प्रयत्न करतात. स्वतःच्या व्यक्तिगत जीवनांतून त्यांतील सुखदुःखांतून बाहेर पडून ह्या कादंबरीतील नायिका राष्ट्रीयजीवनाशी समरस होण्याचा प्रयत्न करतात व तेंच ह्या कादंबरीचें वैशिष्ठ्य आणि मोठेंपण होय.

'प्रवासी' ही ज्याप्रमाणे तत्कालीन भारतीय तरुणांच्या आकांक्षा व ध्येयनिष्ठा दर्शविणारी कृति आहे तशी 'समरभूमि' ही पण आहे. 'प्रवासी' त राष्ट्रीय लढ्याचा १९३० पर्यंतचा इतिहास आला आहे. 'समरभूमीं' त १९३७ पर्यंत झालेली, राजकीय प्रगति, दिग्दर्शित केलेली आहे. नायक समाजसत्तावादी विचारांशी समरस होतो. नायक नायिका राजकीय ध्येयांशी समरस झालेल्या आहेत तरी प्रणय भावनेला स्थान नाही असे नव्हे. 'नायक नायिका ही सामान्य तरुण तरुणीप्रमाणे उच्छृंखल व भावनांकित नसून कर्यव्य व प्रेम यांत ती कर्तव्याला अधिक मार्क देतात; कोणत्यातरी असामान्य तऱ्हेने कुणावर तरी प्रेम करावें व तें कुणाशी बोलून न दाखवितां केवळ त्याचें मनाशी जतन करण्यांत आनंद मानावा' अशी नायिकेची विचारसरणी दाखविली आहे. " नायिका प्रणयभावनेबद्दल प्रथम अनभिज्ञ असून नंतर अनुभवाने ती त्यांत पारंगत होते...मात्र तिच्या मनांतील हा प्रणयविकास दाखवितांना 'प्रेमाचें तत्त्वज्ञान' विशद करणारा एखादा ग्रंथ जवळ ठेवून त्यांतील एकेक प्रमेय घेऊन तें जणूं नायिकेच्या कृतीद्वारा सोदाहरण पटवून दिलें आहे...त्यांत नाविन्य नाही. तरुणतरुणींच्या मनांत उद्भवणारे प्रणयतरंग नाजूक हाताने चितारण्याचें लेखकाचें नेहमीचें कौशल्य येथे दिसत नाही...पूर्वीच्या कादंबऱ्यांतील विचारांचे व प्रसंगांचे निर्जीव पडसाद या कादंबरींत ऐकूं येतात..." हें प्रा. देशपांड्यांनी ह्या कादंबरीचें केलेलें मूल्यमापन आधारास घेण्यासारखें आहे.

'उन्माद' ह्याहि कादंबरींत हाच प्रकार झालेला आहे. वस्तुतः ही कादंबरी नायकप्रधान आहे. श्रीनिवास ह्या कादंबरीच्या नायकाच्या मनोविकासाचें दिग्दर्शन अगदी बालपणापासून केलेलें आहे. तो पुढे मजुरांचा

पुढारी होतो. व संप इ. मार्गांनी मजुरांत जागृति कशी होईल व समाज-सत्तावादाप्रत आपली कशी मजल जाईल ह्या गोष्टींचा ध्यास घेतो. कादंबरीचा मुख्य विषय आबासाहेब व श्रीकांत श्यामकांत ह्यांच्यांतील विग्रह दिसतो. त्यारूपाने नवी पिढी व जुनी पिढी ह्यांतील विग्रहाचें चित्रण लेखकाला करावयाचें असावें असें वाटतें. लेखकाची सहानुभूतिं अर्थात् नवीन पिढीच्या बाजूने आहे. कादंबरीची नायिका सुनीति ही मात्र अगदी वेगळ्याच प्रकारची नायिका आहे. निरुपायाने तिचा विवाह कृष्णराव जॉबरबरोबर होतो. तो विवाह तिला एकंदरीने त्रासदायक ठरतो. पुढे कृष्णराव एका झटापटींत जखमी होतो व त्यांत त्याचा अंत होतो. ती नायक श्रीनिवास याच्यावर प्रेम करीत असतेच. तीं दोघे एकत्र राहातात. कामगार जागृतीचें ध्येय दृष्टीपुढे ठेवून तें ध्येय प्राप्त करून घेण्याचा त्यांचा यत्न चालू असतो. ध्येयप्राप्तीच्या प्रयत्नांचा उन्माद त्यांना चढलेला असतो. सुनीतीच्या या असाधारण चरित्राने नायिकेची प्रत येथे बदलली आहे. श्यामकांताचें (श्रीनिवासचा जुळा भाऊ) प्रेमहि एका चंद्रिका नांवाच्या मुलीवर असतें. तेंहि एक रहस्य आहे. शेवटीं आबासाहेबांना आपण आपल्या मुलांना विरोध केला ह्या बद्दल पश्चाताप होतो. पण ते आजारी असतात व त्यांतच त्यांचें देहावसान होतें. कादंबरी ही मजूरचळवळीची पार्श्वभूमी घेऊन लिहिलेली एक प्रेमकथा आहे. समरभूमीप्रमाणेच तिचें पण वर्णन करतां येईल. प्रेमकथा हीच मुख्य. सुनीतीचें असाधारण जीवन हाच त्यांतल्या त्यांत वेगळेपणाचा भाग.

यापुढल्या कादंबऱ्यांत ' प्रतिज्ञा ' ही कादंबरी सामान्य स्वरूपाची आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघटनेसारख्या एका संस्थेच्या कार्याचें दिग्दर्शन तीत लेखकाने केलें आहे. संस्थेचा ध्येयवाद व त्यांत भावनाशीलतेला असलेलें महत्त्व इ. चें दिग्दर्शन केलें आहे. ह्या कादंबरीपेक्षां ' शाकुंतल ' ही कादंबरी वेगळ्या प्रकारची आहे. एकाच स्त्रीच्या जीवनाशी परस्परविरोधी विचारप्रणालीचीं माणसें कशीं निगडित झालेलीं आहेत हें कुशलतेने रेखाट-

लेलें आहे. नायक पद्माकर हा राजकीय पुढारीच आहे. तो कोल्हापूरच्या शेतकऱ्यांच्या लढ्याचें नेतृत्व करतो. त्या चळवळीच्या दिशेने त्याचे विविध प्रयत्न चालू असतात. नायिका शकुंतला ही वास्तविक त्याची बालमैत्रीण. पण पुढे तिचें लग्न एका बाळासाहेब नांवाच्या हिंदुसभावादी तरुणाबरोबर होतें. तो तिला न विचारतां सैन्यांत जातो. नायिका काँग्रेसच्या बाजूची असल्याने तिला हें पसंत नसतें. ती भांडून वडिलांकडे कोल्हापुरास येते. तेथे पद्माकराच्या विविध चळवळींची व त्याच्या लोकप्रियतेची कल्पना येते. बाळासाहेबांकडून पत्र पैसे इ. येत असतात. पण त्यांचा ती स्वीकार करीत नसते. दुर्दैवाने बाळासाहेबांची युद्धाच्या निरनिराळ्या हालचालींत दृष्टि जाते. त्यांना इतर कोणाचा आधार नसतो. शकुंतलेचे वडिल तिच्या संमतीने त्यांना घेऊन कोल्हापूरला येतात. नायिका त्यांची सेवा करते. स्त्री-जीवनविषयक प्रश्नाच्या दृष्टीने ही कादंबरी महत्त्वाची आहे. नायिकेच्यापुढे जी समस्या निर्माण झाली आहे ती बरीच गंभीर स्वरूपाची आहे. बाळा-साहेबांचा परित्याग ती करूं शकत नाही ह्याचें कारण तें करणें अमानुष होय. ती त्यांची सेवा करण्यास पुढे येते हें दर्शविण्यांत लेखकाने औचित्य दर्शविलें आहे. तिचे व पतीचे संबंध हे विशेषसे सलोख्याचे नसतांना ती जी ही जबाबदारी स्वीकारते त्यामुळे तिच्याविषयी आदर वाटावयास लागतो. तिचे चित्र हेंच मध्यवर्ति आहे व तिच्या पुढील समस्या हीच प्रमुख समस्या होय. लेखकाने ती तटस्थपणाने रंगविली आहे. 'बाळासाहेब आणि पद्माकर या दोन पुरुषांच्या जीवनांत तिचं स्वतःचं आयुष्य गुंतलं होतं. कोणापासून तिला दूर होणं शक्य नव्हतं.' बाळासाहेबांचा प्रतिपाल वात्सल्य भावनेने करण्याचें ती ठरविते. तिचें खरें प्रेम पद्माकरावरच असतें. कांही आवेगाच्या भरांत ती आत्महत्त्येचाहि प्रयत्न करते. पण पद्माकराचें विविध प्रकारचें धाडस पाहून तिच्या मनांत उपरति होते "या विचाराने तिचं मन किती शांत झालं! आतां भीतीची, शंकेची, कसलीहि खळबळ तिच्या अंतःकरणांत उरली नव्हती. निराशा, वैताग, तिरस्कार, दुःख,

त्याग इत्यादि साऱ्या गोष्टी तिच्या आयुष्यांतून निघून गेल्या होत्या. तिला खूप खूप जगावसं वाटत होतं. ''

एकंदरीने स्त्रीजीवनांतील एक समस्या म्हणून ह्या कादंबरीचें स्थान फडक्यांच्या कादंबऱ्यांत वैशिष्ट्यपूर्ण राहील.

' बस नंबर बारा ' ही एक छोटीशी कादंबरी आहे. रत्ना ह्या स्त्रीच्या अत्यंत चमत्कारिक रीतीने झालेल्या प्रेमवैफल्याची हकीकत ह्या कादंबरीत आहे. श्रीधर दाते ह्या गृहस्थांबरोबर तिचा प्रेमविवाह होतो. हे गृहस्थ इंग्लंडहून आय. सी. एस. होऊन आलेले होते. पण सरकारी नोकरी त्यांच्या स्वतंत्रवृत्तीला झेपली नाही. त्यांचें इंग्लंडमध्ये असतांना लग्न झालेलें असतें, पण एका अपघातांत त्यांची पत्नी मृत झालेली असते असें त्याला कळतें. तो हिंदुस्थानांत येतो. रत्नाबरोबर विवाह करतो. त्यांचें नवें सहजीवन सुरू झालें असतां एकाएकीं त्याला इंग्लंडमधील पत्नीचें पत्र येतें. अपघातांत ती मृत झालेली नसते. कांहीतरी गफलतीने तिच्या मृत्यूची चुकीची बातमी त्याला कळलेली असते. हें पत्र वाचून त्याच्या मनाला विलक्षण धक्का बसतो. प्रेमाच्या बाबतींत आपण दोन स्त्रियांशी बेइमानपणा केला असें त्याला वाटतें. त्याच्या मानसिक शक्ति दुर्बल होतात. तो आत्महत्या करतो. अशाप्रकारें अत्यंत अचानकतेने रत्नाला आलेल्या वैधव्याची ही कथा आहे. ती परत आपले पूर्वीचे व्यवहार निरुपाय म्हणून सुरू करते. स्त्रीजीवनविषयक एक चित्रण म्हणून महत्त्व आहे.

याच कादंबरीच्या नंतर लिहिलेली प्रो. फडक्यांची प्रसिद्ध कादंबरी म्हणजे ' अखेरचें बंड ' ही होय. ही कादंबरी एक प्रेमकथा आहे. पण स्वभावचित्रणाच्या दृष्टीने एकात्मता कमी आहे. कादंबरीची नायिका रोहिणी हिच्यायर आपल्या धाकट्या भावंडांचें संगोपन आणि शिक्षण करण्याची जबाबदारी येते. ती साक्षेपाने ही जबाबदारी पार पडते. स्वतःच्या प्रेमाचा अगर सुखाचा विचारहि वयाच्या बत्तीस वर्षांपर्यंत तिच्या मनांत

आलेला नसतो. विवाहित होण्याची संधि यापूर्वी तिने नाकारलेली असते. पण तिचीं भावंडें—एक बहीण व भाऊ यांना मात्र तिच्या त्यागाची व सौजन्याची कल्पना नसते. ते तिला विविध प्रकारें उपद्रव देतात. व ह्या उपद्रवामुळेच नायिकेच्या मनांत द्वंद्व सुरू होतें. तिच्या अपेक्षा धुळीस मिळालेल्या असतात. अतिशय एकनिष्ठेने तिने जो त्याग केलेला असतो त्याचें चीज तर होत नाहीच पण दारुण विफलता मात्र तिच्या वाट्यास येते. तिला एकदा प्रिय मानलेल्या स्वतःच्या कल्पनेशी झुंज द्यावी लागते. व तेंच अखेरचें बंड होय. शेवटीं ती आपल्या भावंडांचा त्याग करून प्रियकराकडे जाते व ही झुंज संपते. प्रेमाच्याहि बाबतींत तिला बहिणीशी झगडावें लागतें. कारण तिच्याच प्रियकराशी विवाह करण्याचा प्रयत्न तिची धाकटी बहिण रेखा करते. ती अधिक सुंदर, तरुण, असते. पण प्रियकर अच्युत ह्याचें प्रेम रोहिणीवरच असतें. व तो तिच्याशीच विवाहित होण्याची तयारी दर्शवितो. कादंबरीच्या दुसऱ्या भागांत नायिकेची आई कला हिच्या संसाराची वाताहात दर्शविली आहे. रोहिणीचे वडिल एक प्रख्यात नट असतात. महाराष्ट्रांत त्यांनी अलोट किर्ती मिळविलेली असते. पण त्यांचें गृहजीवन हें कसें असतें हें येथें दाखविलें आहे. एकंदर वर्णनाचा व कथेचा रोख पाहतांना बालगंधर्वांची आठवण होते. पण कोणाहि एका विशिष्ट कलावंताचें म्हणण्यापेक्षा सर्वसामान्य दृष्टीने कलावंताचें गृहजीवन म्हणून या चित्रणाला महत्त्व देणें अधिक युक्त होय.

स्त्रीजीवनाच्या अविष्करणाच्या दृष्टीने विचार करतां ही कादंबरी फार महत्त्वाची आहे. कला, रोहिणी आणि रेखा ह्या तीन स्त्रियांचा स्वभाव ह्या कथेंत रेखाटलेला आहे. कला ही अत्यंत सच्छील, पतीच्या जीवनाशी समरस झालेली अशी स्त्री आहे. तिच्या पतीला अपूर्व कीर्ति लाभलेली असते. पण त्याच्या स्वभावांतर्गत कांही वैगुण्यामुळे तिला अत्यंत त्रास सहन करावा लागतो. तिचें जीवन म्हणजे एक शोकांतिका आहे. क्षयासारख्या दुखण्यास ती बळी पडते. शेवटीं तिच्या पतीस आपण तिला

ज्या तऱ्हेने वागविलें ती तऱ्हा पाहून एक प्रकारचा तीव्र पश्चाताप होतो. कोणाहि महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनाची आठवण व्हावी इतकें तिचें जीवन करुणास्पद आहे. कादंबरीच्या पहिल्या भागाची कला ही नायिका होय असें म्हटलें असतां फारसें असयुक्तिक होईल असें वाटत नाही.

रोहिणीचें स्वभावचित्र लेखकाने अतिशय कौशल्याने रंगविलें आहे. ती शिकते, बी. टी. होते, एका शाळेची मुख्याध्यापिका होते. वयाचीं बत्तीस वर्षे पूर्ण झालेलीं असतात तरी तिला 'प्रेम' या गोष्टीचा विचार करायला सवड नसते. बापाने लादलेली जबाबदारी कर्तव्यकठोरतेने ती पार पाडीत असते. पण आंतरिक दृष्टीने तिच्या जीवनांत रितेपणा असतो, तो भरून कसा निघतो हेंच प्रामुख्याने कादंबरींत दाखवायचें आहे. बत्तीस वर्षांची नायिका ह्या दृष्टीने ह्या कादंबरीच्या विषयाकडे पाहिलें तर एक वेगळेंच दर्शन होतें. प्रेम ही भावना अत्यंत महत्त्वाची व जीवनांत एकमेव महत्त्वाची आहे असें लेखकाचें मत आहे. त्यादृष्टीने नायिकेच्या जीवनांत प्रेम भावनेचा उद्भव व विकास दर्शविला आहे. पण तो दर्शवित असतां महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनाला जें नवे वळण लागत आहे व नव्या परिस्थितींत महाराष्ट्रीय स्त्रीने कसा बदल करून घेतला आहे हें या ठिकाणीं लेखकांनी जें दर्शविलें आहे तें स्त्रीजीवनाच्या आविष्काराच्या दृष्टीने महत्त्वाचें आहे.

या कादंबरींतलें अखेरचें बंड हें अर्थात तिच्या स्वतःच्या माणसांविरुद्ध आहे. वास्तविक त्यांच्यासाठी रोहिणीने आपल्या विवाहाचा विचारहि केलेला नसतो. तशी तिला सवडहि मिळालेली नसते. आपल्या धाकट्या बहिणीचें व आपलें प्रेम एकाच व्यक्तीवर बसावें, व असा चमत्कारिक पेचप्रसंग निर्माण व्हावा ही आधुनिक कुमारिकांच्या जीवनांतील अत्यंत करुण घटना होय. तिला एका विशिष्ट प्रमाणांत सामाजिक महत्त्वहि आहे पण प्रो. फडक्यांनी तो सामाजिक भाग वगळला जावा अशी योजना करून रेखाच्या स्वभावांत मुद्दाम विरोधी रंग अधिक भडक प्रमाणांत भरले. लेखकाच्या ठिकाणी सामाजिकता अधिक जागृत असती तर याच कथा-

नकाद्वारें त्याला एका स्त्रीजीवितविषयक आधुनिक समस्येचें भेदक दिग्दर्शन करतां आलें असतें. पण लेखकांनी तें टाळलें आहे.

१९४७ पर्यंतच्या कालांत प्रसिद्ध झालेल्या प्रो. फडक्यांच्या प्रमुख कादंबऱ्यांचा विचार केला. आतां स्त्रीजीवनाचे चित्रकार ह्या दृष्टीने प्रोफेसर मजकुरांच्या चित्रणाकडे दृष्टिक्षेप टाकणें आवश्यक आहे.

प्रो. फडके यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीचीवनाचें अवलोकन करूं लागलें असतां जर कोणती गोष्ट प्रथम दृष्टोत्पत्तीस येत असेल तर ती म्हणजे स्वभाव-लेखनाबाबत लेखकास वाटत असलेला साक्षेप ही होय. त्यांच्या कादंबऱ्यांचा प्रमुख विषय म्हणजे प्रेम हाच होय. राजकीय वा सामाजिक स्वरूपाच्या घडामोडींना काही कादंबऱ्यांतून महत्त्व प्राप्त झालेलें असलें तरी त्यांच्या कादंबऱ्या ह्या प्रामुख्याने प्रेमकथाच झाल्या आहेत. असें होण्याचें कारण त्यांचा जीवितविषयक दृष्टिकोन हेंच असावें. मागे त्यांचें वचन उधृत केलें आहे त्या आधारें एवढेंच म्हणतां येतें की त्यांना सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचा विषय म्हणजे 'प्रेम' हाच वाटतो असें दिसतें. ह्या दृष्टिकोनामुळेच त्यांच्या कादंबरीवाङ्मयांतून राजकीय, सामाजिक घडामोडीच्या चित्रणास केवळ पार्श्वभूमीचें स्वरूप आलेलें आहे. त्यामुळेच प्रेमकथा म्हणून प्रत्येक कथेंत वेगळेपणा असला तरी जितका विविधपणा असावयास हवा तितका प्रत्ययास येत नाही. ह्या विशिष्ट दृष्टिकोनामुळे नायिकाचें स्वभावचित्रणहि सामान्यतः एकाच पद्धतीचें झाले आहे. 'तरुण-तरुणींच्या अंतःकरणांतील थैमान घालणाऱ्या विविध भावना हळुवारपणें व्यक्त करून दाखविण्याचें त्यांचें कौशल्य चांगलेंच प्रत्ययास येतें. प्रणयीजनांच्या अंतःकरणांतील अगदीं सूक्ष्म छटा देखील ते फार सुंदर रीतीनें चित्रित करतात. परंतु त्यांच्या कादंबऱ्यातील सर्वांत मोठा दोष म्हणजे त्यांतील विषयवैचित्र्याचा अभाव व स्वभाव-चित्रांतील एकसारखेपणा हा होय'. हे 'अर्वाचीन मराठी साहित्य' ह्या ग्रंथांत प्रा. वि. ह. कुलकर्णी यांनी जे उद्गार काढले आहेत ते महत्त्वाचे आहेत.

प्रेमाच्याहि अविष्करणांत त्यांना विवाह–पूर्व प्रेमाचेंच महत्त्व अधिक वाटतें. विवाहित जीवनांत प्रेमाचा उद्भव झालेले प्रसंग त्यांनी कांही कादंबऱ्यांत वर्णन केलेले आहेत; नाही असें नाही. उदाहरणार्थ 'निरंजन' 'प्रवासी' या कादंबऱ्यांत ह्या प्रकारच्या प्रणयाचें स्वरूप प्रत्ययास येतें. पण एकंदरीने लेखकांस तसल्या चित्रणाबद्दल विशेष आसक्ति नाही असें वाटतें. याचें कारण प्रो. फडके यांची वृत्ति होय. ते व्यक्तिवादी आहेत, परंतु त्यांचा व्यक्तिवाद–सुखवादाकडे वळलेला दिसतो. त्यांच्या व्यक्तिवादांत सामाजिक-दृष्ट्या क्रांतिकारकता नाही. त्यामुळे 'बंधनाच्या पलिकडे' सारखें चित्रण हें एकंदरीने त्यांना मान्य नाही. समाजजीवनाशी जुळवून घेणारा असा हा व्यक्तिवाद असल्याने त्याचें अस्तित्व स्पष्टपणे प्रतीत होत नाही. शिवाय एका बाजूने कलावादाच्या खाली तो झांकला गेला आहे.

व्यक्तिवादी लेखक हे सामान्यतः शेवटी शेवटीं तुच्छतावादाकडे (सिनीसिझम) वळतात. कारण व्यक्तिवादाचें पर्यवसान आत्मकेंद्रित्वांत होतें आणि आत्मकेंद्रित्व हें तुच्छतावादाकडे नेऊन सोडतें. प्रो. फडके हे जरी मनोवृत्तीने व्यक्तिवादी असले तरी ते जीवनविन्मुख नाहीत. त्यामुळे त्यांचें तोंड हें तुच्छतावादाकडे न राहतां मानवतावादाकडे राहिलें आहे. अर्थात मानवतेबरोबर ते दूरवर जाऊं शकत नाहीत. याचें कारण म्हणजे त्यांचा व्यकिवाद हा क्रांतिकारकतेंतून उदित झालेला नाही. तशी क्रांतिकारकता येण्यासाठी सामजजीवनाकडे अधिक आस्थेने पाहावे लागतें. प्रो. फडक्यांची वृत्ति ही 'कलावंताची' च आहे तींत समाजमनस्कतेला फारसा वाव नाही. जीवनांतली प्रमुख प्रेरणा म्हणजे 'प्रेम' हीच होय अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. विविध ध्येयें इ. आहेत, तीं ते अमान्य करीत नाहीत, किंबहुना 'उन्माद' मध्ये तर त्यांना ह्या ध्येयांचा कैफ दाखवावयाचा आहे. पण ही ध्येयलालसा जीवनशक्तीच्या व्यापाराचें क्षेत्र म्हणून आलेली आहे. खरा व्यक्तित्वाचा आत्मा असेल तर तो प्रेम होय. म्हणूनच 'अखेरच्या बंडांतील' रोहिणी वयाचीं बत्तीस वर्षें अविवाहित राहून शेवटीं विवाहित होते. तिचें अखेरचें बंड हें प्रेमासाठी आहे.

प्रोफेसर फडक्यांच्या ह्या विशिष्ट मनोभूमिकेमुळे त्यांच्या एकाहि कादंबरीत प्रेमभावनेतून मानवतेचा उदय झालेला दिसून येत नाही. त्यांच्या कादंबऱ्यांत किंचित् उदात्त प्रेमाचा अविष्कार जर कोणत्या नायिकेच्या द्वारे झालेला आहे असें आढळून येत असेल तर ती म्हणजे 'प्रवासी' तील उमा ही होय. ही स्त्री स्वतःच्या वैवाहिक जीवनांत अयशस्वी झाली आहे, तिचें राजाभाऊवर मनोमय प्रेम आहे. त्या प्रेमाच्यासाठी ती पतीचा विविध प्रकारचा छळ सोसते. अत्यंत अपेष्टांत जीवन कंठते, आपलें प्रेम बोलून दाखविण्याचेंहि भाग्य तिला लाभत नाही. प्रियकराच्या ध्येयाविषयीहि तिला आपलेपणा वाटतो व त्या ध्येयाप्रत जाण्याच्या यत्नांतच तिचा अंत होतो. तिचा हा अंत प्रियकराच्या ध्येयासाठी होण्यापेक्षा प्रियकराच्या प्रेमासाठीच होतो असें म्हटलें असतां फारसें असयुक्तिक होणार नाही.

तेव्हा प्रो. फडक्यांच्या कादंबऱ्यांतील प्रेमभावनेच्या चित्रणाला ही जी मर्यादा पडली आहे ती स्त्रीजीवनाचा विचार करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. हरिभाऊंनी जागृत केलेल्या स्त्रीच्याठायीं प्रोफेसर मजकुरांनी प्रणयभावनेचा उद्भव केला. व्यक्तिमत्वाचा पहिला व महत्त्वाचा अविष्कार प्रणयभावनेद्वाराच होतो, त्यादृष्टीने महाराष्ट्रीय स्त्रीच्या ठायीं ही प्रणय भावना निर्माण झालेली दर्शविली जाणें ही तिच्या व्यक्तित्वाच्या जागृतीच्या दृष्टीने महत्त्वाची पायरी होय. व ती व्यक्तिवादी प्रवृत्तीच्या प्रो. फडक्यांनी तयार करावी यांतहि औचित्य आहे. पण या पलीकडे जाऊन प्रणयभावनेचा व ती बरोबर व्यक्तित्वाचा विकास दर्शविला जाणें आवश्यक होतें. तें मात्र प्रो. फडक्यांच्या दृष्टीच्या कक्षेत आलेलें दिसत नाही. प्रणयभावनेचे चित्रकार म्हणून ते प्रसिद्ध असले तरी त्यांच्या चित्रणांत उदात्ततेच्या छटेचा अभाव दिसून येतो त्याच्याकडे दुर्लक्ष करणें योग्य नाही.

हा जर मोठा दोष सोडून दिला, आणि इतर दृष्टीने पाहिलें तर विविध प्रकारच्या आंदोलनाचें दर्शन होतें. त्यांच्या नायिकांचें जीवनध्येय

प्रेम हेंच असलें तरी त्यांच्या कर्तृत्वाचीं क्षेत्रें बरींच विस्तृत झालीं आहेत. सामान्यतः त्यांच्या नायिका ह्या मध्यमवर्गाच्या सुखवस्तू थरांतून आलेल्या आहेत. त्यांचें जीवन ज्या थरांतून आल्या त्या थराच्या जीवनास सुसंगत आहे, त्यादृष्टीने शिक्षण, कलासेवा, इ. क्षेत्रें त्यांच्या कक्षेंत आलेलीं आहेत. सामाजिक व राजकीय ध्येयाबद्दलची आस्थाहि तीव्र आहे. तथापि त्यांच्या जीवनांत जो आंतर्गत सामाजिक विरोध आहे त्याचें दिग्दर्शन मात्र होत नाही. याचें कारण लेखकाला त्या गोष्टींत विशेष स्वारस्य वाटत नाही हेंच होय. तथापि महाराष्ट्रीय स्त्रीच्या ठायीं प्रणयभावनेचा उद्गम झालेला दाखवणारे कादंबरीकार म्हणून त्यांचें नांव स्त्रीजीवनदृष्ट्या पाहाणी करतांना विचारांत घ्यावें लागेल. त्याबरोबरच प्रणयभावनेच्या आविष्काराला मर्यादा आहेत हेंहि ध्यानांत धरणें आवश्यक आहे.

लेखकाच्या ठिकाणीं सामाजिक क्रांतिकारकता नसल्याने स्त्रीचा समाजाशी स्वत्वाच्या अविष्करणास वाव असावा म्हणून जो संघर्ष चालला होता, ज्याचें एक दर्शन वामनराव जोशांच्या कादंबऱ्यांत होतें, दुसरें डॉक्टर केतकरांच्या कादंबऱ्यांत होतें, तसें दर्शन कोठेंहि होत नाहीं. हें कादंबरीविश्वच निराळें आहे. ह्यांतलीं माणसें समाजजीवनाशीं क्षणभर समरस होतात, विशिष्ट गोष्टीसाठी झगडतातहि पण पुन्हा काय होतें कुणास ठाऊक तीं प्रेमवेडीं होतात आणि तिथेंच विसावतात. महाराष्ट्रीय स्त्री विविध क्षेत्रांत पुढे पुढे येत होती, तिच्या व्यक्तित्वाच्या अविष्कारासाठी विविध समाजक्षेत्रें उपस्थित होत होतीं; पण प्रो. फडक्यांना एक प्रणयाचें क्षेत्र दिसलें. तें त्यांना प्रथम दिसलें तेथेच ते रमले आणि तेथेच थांबले. महाराष्ट्रीय स्त्री त्या क्षेत्रांत आली तेथे क्षणएक थांबली रमली, पण पुढेहि गेली. फडके तिच्याबरोबर जाऊं शकले नाहीत. ते त्याच ठिकाणीं थांबले !

२ वि. स. खांडेकर

१९३५ ते १९४७ ह्या कालखंडांतील प्रो. फडक्यांइतकेच लोकप्रिय लेखक म्हणजे विष्णु सखाराम खांडेकर हे होत. फडक्यांप्रमाणेच खांडेकरहि आपल्या विशिष्ट वाङ्मयसेवेने प्रसिद्ध झालेले आहेत. विविध स्वरूपाची वाङ्मयनिर्मिति त्यांनी केलेली आहे. ह्या कालखंडांत जी साहित्यविषयक तात्त्विक चर्चा झाली तींत प्रो. फडक्यांच्या कलावादी विचारसरणीला विरोध ज्या लेखकांनी आपल्या विचारांनी व साहित्याने केला त्यांत खांडेकर हे प्रमुख होत. फडक्यांपेक्षा त्यांचें आणखी वैशिष्ट्य म्हणजे तें चित्रपट लेखक म्हणूनहि नाम कमावूं शकले. त्याप्रमाणेच प्रो. फडक्यांप्रमाणे त्यांची वाङ्मयविषयक कामगिरी बहुविध स्वरूपाची आहे. त्यांच्या वाङ्मयांत कादंबऱ्यांना वेगळेंच स्थान आहे. "मी का लिहितों?" या एका रेडिओवर दिलेल्या व्याख्यानांत ते म्हणतात "या प्रश्नाचें प्रामाणिक उत्तर आज एका वाक्यांत द्यावयाचें तर मी म्हणेन मी पोटासाठी चित्रपट लिहितों, स्वतःच्या आनंदासाठी लघुनिबंध आणि रूपककथा ह्यांच्याकडे वळतों, आणि टीका, निबंध, लघुकथा व कादंबऱ्या यांचें लेखन जें माझ्या-हातून घडतें त्याचें कारण आत्माविष्काराच्या द्वारें जीवनाची सेवा करण्याची माझी इच्छा अजूनहि पंचवीस वर्षांइतकीच तीव्र व अतृप्त राहिली आहे म्हणून"[१] ह्या वरून त्यांच्या कादंबऱ्यांचें स्थान त्यांच्या इतर लेखन-संभारांत कसें वैशिष्ट्यपूर्ण आहे ह्याची कल्पना येऊं शकेल. खांडेकर हे सहेतुक लेखन करणारे लेखक आहेत. त्यांचा प्रो. फडक्यांच्या विचारसरणीला कट्टा विरोध आहे. कालाचा कौल पाहाण्याच्या दृष्टीने जर ह्या वादाकडे पाहिलें तर खांडेकरांच्याच विचारसरणीचा विजय झालेला आहे. असो

१ 'गोफ आणि गोफण' पृ. १५२.

खांडेकराची वाङ्मय विषयक विचारसरणी ज्या जीवित विषयक दृष्टिकोनाचा भाग आहे तो जोवितविषयक दृष्टिकोन प्रथम परिचित करून घेणें आवश्यक आहे.

ज्या कालांत खांडेकरांचें लेखन झालें त्या कालांतल्या प्रमुख विचारसरणींचा परिणाम त्यांच्या मनावर झालेला आहे. त्यांच्या विचारसरणीवर प्रथम कोणाचा ठसा उमटलेला असेल तर तो म्हणजे आगरकरांच्या विचारांचा. आगरकरांचा बुद्धिवाद त्यांनी फार लवकर आत्मसात केला. त्यायोगेंच समाजवादी विचारांचा स्वीकार त्यांनी फार त्वरेने केला. लो. टिळकांच्या कर्तृत्वाविषयी व मोठेपणाविषयी साऱ्या महाराष्ट्रास जसा आदर आहे तसा त्यांनाहि आहे. पण त्यांच्या विचारसरणीचा मात्र त्यांनी स्वीकार केलेला नाही. आगरकरांच्या कालांत ज्या सुधारणांना प्राधान्य मिळालें त्यांपैकी कांहींचा उल्लेख नि पुरस्कार त्यांनी आपल्या प्रारंभीच्या कादंबऱ्यांतून केला आहे.

तथापि त्यांच्या विचारांवर खोल संस्कार कोणाचा उमटला असेल तर तो समाजवादी विचारसरणीचा होय. समाजवादी विचार आपल्या देशांत आले त्याच कालांत आपली स्वातंत्र्याची चळवळ जोरांत वाढत होती. त्या चळवळींत कोणाचें कर्तृत्व प्रामुख्यानें निदर्शनास आलें असेल तर तें गांधीजींचें. गांधीजींच्या विचारसरणीचा संस्कार खांडेकरांच्या विचारसरणीवर समाजवादी विचारसरणीइतकाच खोल उमटलेला आहे. किंबहुना कोणाचा अधिक आहे हें स्पष्टपणें शोधून काढणें कठिण आहे. याबाबत त्यांचीच जर कबुली पाहूं लागलों तर ती मिळणें कठिण आहे. आपल्या "दोनध्रुव" ह्या कादंबरीवर टीकाकारांनी जे अनेक आक्षेप घेतलेले आहेत त्यांचा परामर्ष घेण्यासाठीं लिहिलेल्या "कैफियतीं"त ते म्हणतात "या कादंबरींत समाजवाद नाही किंवा गांधीवाद नाही. हे वाद लढविण्याइतकी विद्वत्ता 'मी कॉलेजांत होतों' असें शपथेवर सांगण्याइतकाच ज्याचा आणि उच्च शिक्षणाचा संबंध आला, त्या माझ्यासारख्या एका

खेडेगावांतल्या एका शिक्षकाच्या अंगीं कुठून असणार ?" [३] स्वतःला जें जीवन पाहण्याला वा अनुभवयाला मिळालें त्याचें चित्रण करण्याचा प्रयत्न त्या कादंबरींत केला आहे, असा त्यांच्या म्हणण्याचा आशय आहे.

तथापि खांडेकरांच्या विचारसरणीवर समाजसत्तावादी विचारांचा परिणाम खोलवर झाला आहे हें स्पष्ट आहे. ही विचारसरणी इतकी सर्वंकष होती की, ह्या कालांतील कोणाहि विचारवंताला तीपासून अलिप्त राहाणें हें सर्वथा अशक्य होतें. ह्या विचारसरणीच्या बाजूने वा तिला विरोध करण्याच्या दृष्टीने ह्या कालांतील बहुतेक सर्व लेखकांनी कांहीना कांही मतप्रदर्शन केलें आहे. खांडेकरांनी १९३५ मध्यें प्रसिद्ध झालेल्या "साहित्य आणि समाजजीवन" ह्या पुस्तकाला एक प्रस्तावना लिहिली आहे. व त्या प्रस्तावनेंत लेखकाच्या दृष्टिकोनाबद्दल सहानुभूतीपूर्ण लिहिलें आहे. त्या पुस्तकांत लेखक पेंडसे यांनी समाजवादी विचारांचा अवलंब करून साहित्याचें मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला. त्यांतील प्रतिपादन हें विवाद्य झालें असलें तरी तो एक नवा उपक्रम होता. व खांडेकरांनी ह्या विचारास प्रस्तावना लिहून संमति दिली.

खांडेकरांनी आपल्या समाजवादी विचारनिष्ठांना गांधीवादी मानवतावादाचें अधिष्ठान दिलें आहे. त्यांच्या जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचेंहि तें एक प्रातिनिधिक दिग्दर्शन आहे. त्या दृष्टीने त्यांच्या साहित्याची प्रत वेगळी झाली आहे.

समाजवादी विचारांचा परिणाम खांडेकरांच्या लिखाणांतून पदोपदीं दिसून येतो. वर उल्लेखिलेल्या 'दोन ध्रुवां'तील कैफियतींत ते म्हणतात. "आपला समाज एकरूप नाहीं, एकजीव नाही. एका समाजाचे दोन विचित्र भाग (झाले) आहेत...त्यांतल्या एका भागाची चैन दुसऱ्याच्या कष्टावर उभारली आहे. एकाची रंगपंचमी दुसऱ्याच्या रक्ताने साजरी होत आहे... एकाचें स्वातंत्र्य दुसऱ्याच्या गुलामगिरीवर उभारलेलें आहे. ही एकाच

३ दोनध्रुव पृ. २८९.

जगांतलीं माणसें नाहीत. यांची दोन जगें आहेत सर्वस्वीं भिन्न आहेत.'' [४] ह्या विधानांतला आशय जर पाहूं लागलों तर लेखकाच्या मनावर समाजसत्तावादी विचारांचा संस्कार खोलवर उमटलेला आहे असें आढळून येईल. ह्या विधानांतील आर्थिक बाबीकडे लेखकाचें लक्ष गेलें आहे तें ह्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे. कारण ह्यांत जो विचार आहे तो समाजाच्या 'वर्गीय' धारणेवर आधारलेला आहे आणि ही वर्गीय धारणा आर्थिक व्यवस्थेमुळे प्रायः आस्तित्वांत आली आहे हें पण स्पष्ट आहे. ह्या साऱ्या गोष्टी वा हीं सारीं वैशिष्ट्यें समाजसत्तावादी विचारांच्या अनुरोधानेच आलीं आहेत हें स्पष्ट आहे.

खांडेकरांच्या लेखनांत ह्या विचारसरणीचा आणखी एक परिणाम पाहावयास मिळतो. समाजांत आर्थिक कारणांमुळे जसे दोन प्रमुख वर्ग आस्तित्वांत आलेले असतात तसा तिसरा एक वर्ग असतो. तो म्हणजे मध्यम वर्ग होय. मध्यम वर्गाच्या विशिष्ट मनोरचनेंतून भांडवलशाही समाजांत विशिष्ट ध्येयप्रणाली सुरु होतात. पण कांही कालानंतर ह्या वर्गाच्या विचार-सरणीचें स्वरूप शबलित होऊं लागतें कारण तो वर्ग सर्वसाधारण समाजाशी समरस होतोच असें नाही. समाजांत जर खरा न्याय व खरी समता प्रस्थापित व्हावयाची असेल तर ह्या मध्यम वर्गाने बहुजन समाजाच्या आशा आकांक्षाशी समरस व्हावयास हवें व त्यासाठीं आपल्या 'वर्गीय' वैशिष्ट्याचा परित्याग करावयास हवा. खांडेकरांनी हा विचार मधून मधून मोठ्या आवेशाने मांडला आहे. 'कलात्मक दृष्टीने श्रेष्ठ दर्जाच्या वाङ्मयीन ललितकथा आपल्याकडेहि निर्माण होतील. पण त्याकरितां आमच्या लेखकांनी पराभूत झालेल्या आजच्या मध्यम वर्गाच्या दृष्टीने जगाकडे पाहावयाचें सोडून दिलें पाहिजे.' [५] असें त्यांनी आपल्या सोलापूरच्या प्रसिद्ध अध्यक्षीय भाषणांत व्यक्त केलें आहे. 'पांढरे ढग' ही त्यांची कादंबरी ह्याच विचाराचें

---

४ दोन ध्रुव--पृ. २८६, (आवृत्ति १९४४) ५ तीन संमेलनें पृ. २-३.

आविष्करण करण्याकरतां लिहिली आहे. त्या कादंबरीच्या द्वितीयावृत्तीच्या वेळीं तिला एक विस्तृत 'प्रास्ताविक' लिहिलें आहे त्यांत त्यांनीं आपली एतद्विषयक भूमिका स्पष्ट केली आहे. समाजांतलें दैन्य दारिद्र्य विलक्षण वेगाने वाढत आहे. तें कमी कसें करणार ? निरनिराळ्या दिशांनी समाजाची जी अधोगति होत आहे ती कशी थांबविणार ? "ह्या प्रश्नांचीं उत्तरें ज्याला प्रामाणिकपणें द्यायचीं आहेत, त्या मध्यम वर्गांतल्या सुशिक्षित तरुणाने आतां कुटुंबसुखावर निखारे ठेविले पाहिजेत; आर्थिक स्वास्थ्याचा मोह झुगारून दिला पाहिजे आणि तारुण्यांतल्या प्रीतीकडेसुद्धां हंसतमुखाने पाठ फिरविली पाहिजे" [६] मध्यमवर्गासंबंधीच्या ह्या अपेक्षा आहेत.ह्या समाजवादी विचारांचा परिपाक होत. "गोफ आणि गोफण" ह्या आपल्या १९४६ त प्रसिद्ध केलेल्या टीकालेखांच्या संग्रहाच्या 'प्रास्ताविकां' त ते म्हणतात. "मध्यमवर्गापुरती मर्यादित झालेली सामाजिक प्रगतीची कल्पना सोडून देऊन बहुजन समाजाचें विविध विषण्णतेचें दुःख ज्या दिवशीं नाहींसें होईल त्याच दिवशीं खरीखुरी सामाजिक क्रांति होईल." [७]

अशा प्रकारें सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा 'वर्गीय' परिभाषेंत उहापोह, संस्कृतीच्या परिवर्धनांत विशिष्ट वर्गाकडे विशिष्ट जबाबदारी आहे, वा विशिष्ट वर्गाचें विशिष्ट स्थान आहे इ. गोष्टी त्यांनी विशद केल्या आहेत, त्या निश्चितपणें समाजवादी विचारांचा परिपाक होत. पण खांडेकरांनी ह्या समाजवादास मानवतावादाची जोड दिली तेंच त्यांचें वैशिष्ट्य आहे. या मानवतावादाचा पुरस्कार करण्यासाठी त्यांना जर गांधीजींच्या कर्तृत्वाविषयीं व विचारसरणीविषयीं जिव्हाळा वाटत असला तर तो स्वाभाविक आहे. त्यांत अनिष्ट असें कांही आहे असें म्हणतां येत नाही. गांधीजींच्या विविध चळवळींचा उल्लेख खांडेकरांनीं वारंवार अत्यंत आदराने

६ पांढरे ढग पृ. २४ (१९४४ ची आवृत्ति). ७ गोफ आणि गोफण प्रस्तावना. १२.

केला आहे. "सत्य अहिंसेसारख्या तात्त्विक गोष्टी घ्या, खादी प्रसार आणि हरिजनसेवा यांसारखे विधायक कार्यक्रम पहा, किंवा 'मीठलूट' आणि 'चलेजाव' सारख्या उग्र राजकीय चळवळींच्या अंतरंगांत प्रवेश करा, सर्वत्र मानवतेच्या पूजेसाठी मनुष्याला जन्म आहे असें कृतीने सांगणारी गांधींची मूर्ति दिसून येईल" ८ "क्रौंचवध" ह्या आपल्या कादंबरीच्या 'निवेदना' तहि त्यांनीं गांधीजींच्या विचारसरणीबाबत अत्यंत गौरवपूर्ण उहापोह करून "वर्तमान काळ गांधीजींच्याकडे राजकीय पुढारी म्हणून पाहात असला तरी भविष्यकाळ विसाव्या शतकांतल्या गुंतागुंतीच्या मानवी जीवनाचे भाष्यकार याच दृष्टीने त्यांना मान देईल.....त्यांचें नांव खिस्त, आणि बुद्ध किंवा मार्क्स आणि फ्रॉईड यांच्या बरोबरीनेच तें उच्चारावें लागेल." असे उद्गार काढले आहेत. त्यांच्या विचारसरणीवर, नव्हे जीवनविषयक दृष्टिकोनावर गांधीजीच्या विचारांचा परिणाम झालेला असणें अपरिहार्य आहे.

वि. स. खांडेकरच्या जीवितविषयक दृष्टिकोनाची कल्पना या विवेचनावरून होऊं शकेल. खांडेकर हे केवळ एक भूतदयावादी लेखक आहेत असा कांही टीकाकारांच्या टीकेचा रोख आहे असें दिसतें. (तीन संमेलनें ह्या पुस्तकाच्या प्रास्ताविक "प्रवासांतल्या गप्पा" ह्या लेखांत त्यांनीं तसा उल्लेख केला आहे.) पण वर त्यांच्या विचारसरणीची जी पहाणी केली तिच्या आधारें असें म्हणतां येईल की खांडेकर हे विचारांच्या दृष्टीने समाजवादी मानवतेप्रत आलेले आहेत. त्यांच्या ललितकृतींतून ह्या त्यांच्या विचारसरणीचें परिणामकारक आविष्करण झालें आहे काय ही कदाचित मतभेदाची गोष्ट होऊं शकेल. पण त्यांच्यांतल्या कलावंतांपेक्षा त्यांच्यातल्या टीकाकाराने वेळोवेळी जी कबूली दिली आहे तीवर बोट ठेवून असें म्हणतां येतें की, ते ह्या विचाराप्रत आलेले आहेत.

---

८ कित्ता पृ. १५.

त्यांच्या दृष्टिकोनाचा आणखी एक भाग म्हणजे साहित्याबाबत त्यांची अपेक्षा. समाजाच्या सांस्कृतिक प्रगतींत आणि धारणेंत साहित्याला विशिष्ट कार्य करावयाचें आहे असा त्यांचा विश्वास आहे. तें नियोजित कार्य आपलें वाङ्मय करूं शकत नाही ह्या जाणिवेने त्यांचें मन विषण्ण आणि आकुल होतें. व त्या दृष्टीने साहित्याने कार्यप्रवण व्हावें व आपलें महान् कार्य करावें ह्या एका इच्छेपोटीं त्यांच्या टीकेचा प्रामुख्याने जन्म झालेला आहे. सोलापूरच्या संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांत इतर वाङ्मयविषयक विविध प्रश्न पुढे उभे असतांनासुद्धा ललितलेखनांतील दोषांचाच त्यांनी उहापोह केला. ह्याचें कारण " पाश्चात्य राष्ट्रांप्रमाणे आपल्याकडेहि ललित वाङ्मय हाच सामान्य मनुष्याचा धर्म होऊं पहात आहे. ललितकथा सामान्य मनुष्याच्या आयुष्यांत तत्त्वज्ञानाच्या ग्रंथाची जागा घेत आहे. आजचा ललित लेखक हा नुसता भूतकालाचा इतिहासकार किंवा वर्तमानकालाचा चित्रकार नाही; तो भविष्यकाळाचा शिल्पकार आहे. " अशी त्यांची मनोमय श्रद्धा आहे. त्याचप्रमाणे त्याच भाषणांत " मनुष्य हा परिस्थितीचा गुलाम नाही, तो आपल्या मनाचा गुलाम आहे. मनाच्या शृंखला वाङ्मयच तोडूं शकतें." असेंहि त्यांनी आग्रहपूर्वक सांगितलें आहे. आजकालच्या ललित लेखकांत ललित लेखनाकडे इतक्या साक्षेपाने, आशावादीपणाने पाहाणारा दुसरा ललित लेखक क्वचितच आढळून येईल. लेखकांचे ललितसाहित्याकडे त्याच्या कार्याकडे पाहण्याचे विविध दृष्टिकोन असतात, कोणी प्रामुख्याने कलाकृतीची निर्मिति ह्याच दृष्टीने पाहातात, कोणी विशिष्ट विचारसरणीचा साक्षेपी प्रचार नि प्रसार साहित्याने करावा असें अपेक्षितात व म्हणतात; कोणी, केवळ आत्माविष्काराचें एक साधन म्हणून ललित लेखनाकडे पाहातात; कोणी समाजाच्या भावनानिष्ठ आत्म्याचा आविष्कार म्हणून त्याच्याकडे पाहातात, तर कोणास समाजशास्त्रीय तत्वज्ञानात्मक उच्च विचारांनीं ललितवाङ्मयास समृद्ध करावें असे वाटतें. खांडेकरांच्या भूमिकेंत ह्या विविध अपेक्षांचा समन्वय झालेला आहे व तो उपरिनिर्दिष्ट वचनांतून अभिव्यक्त होतो. खांडे-

करांच्या जीवितविषयक दृष्टीचें परिशीलन करतांना त्यांच्या साहित्यविषयक भूमिकेचेंहि स्वरूप माहित करून घेणें आवश्यक वाटलें व म्हणून हें विवेचन जरा विस्तारानें केलें. जीवितविषयक दृष्टिकोनानंतर त्यांच्या स्त्रीजीवनविषयक भूमिकेची पाहणी करणें आवश्यक आहे.

आपल्या "स्त्री आणि पुरुष" ह्या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेंत खांडेकरांनीं ह्याबाबतची आपली भूमिका विषद केलेली आहे. वास्तविक वर उल्लेखिलेल्या दृष्टिकोनाच्याद्वारें स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोन व्यक्त होतो. पण खांडेकरांनी ह्या प्रस्तावनेंत आपला दृष्टिकोन अधिक विस्तारपूर्वक व्यक्त केला आहे. पूर्वकालीन लेखकविचारवंताचे स्त्रीविषयक विचार कसे संकुचित आहेत हें दाखवून आधुनिक मनुष्यास ते संमत होणें, अशक्य आहे असें त्यांनी आपलें मत दिलें आहे. पूर्वकालांतील स्त्रीदास्याची मीमांसा मोठ्या मार्मिकपणाने करून खांडेकरांनी "आजची हिंदी स्त्री शतकानुशतकें पायांत पडलेल्या शृंखलांतून नुकतीच कुठे मुक्त होण्याच्या मार्गावर आहे. ती स्वतंत्र होऊं इच्छित आहे" असें आजच्या स्त्रीजीवनाबद्दलचें आपलें मत दिलेलें आहे. आजची स्त्री विचाराने पुरुषाबरोबर आली आहे. "स्त्री ही भोळी, खुळी, दुबळी, बाहेरच्या धकाधकीचा मामला तिला कधीच मानवणार नाही. ती धडपडेल, अडेल, फसेल, तिचा अधःपात होईल. अर्थात तिने कुटुंबासाठीं जगलें पाहिजे हें ओघानेच सिद्ध होतें" ही पूर्वकालीन विचारसरणी आजच्या स्त्रीला मान्य होणें अशक्य आहे. व्यक्तित्वाच्या विकासाची संधि हा प्रत्येक मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे हें ती जाणते. कौटुंबिक कर्तव्यांइतकीच किंबहुना त्यापेक्षा आर्थिक, सामाजिक कर्तव्यें मानवी जीवनांत महत्त्वाचीं असतात याची तिला आतां पुरेपूर जाणीव झालेली आहे. निव्वळ कुटुंबासाठी ती आता जगूं इच्छित नाही. कुटुंबाइतकीच ती स्वतःसाठी जगूं इच्छिते. स्वतःइतकीच समाजासाठी जगण्याची नवी महत्त्वाकांक्षाहि ती मनांत फुलवीत आहे[९] सहाजिकपणें आजची हिंदी

९ स्त्री आणि पुरुष–भूमिका पृ. १४.

स्त्री विशिष्ट मानसिक संक्रमणांतून आणि विचारांच्या आंदोलनांतून पुढे जात आहे. तिला पूर्वकालीन आदर्शांबद्दल आदर असला तरी ते स्वीकार्य वाटणार नाही. तिचे नवे आदर्श वेगळेच आहेत. त्यानंतर खांडेकरांनी सुशिक्षित स्त्रीच्या ठायीं आढळून येणाऱ्या कांही मानसिक दोषांचें दिग्दर्शन करून ते दोष पुरुषांच्याहि ठायीं आहेत हेहि सांगितलें आहे.

स्त्रीविषयक सर्वांत महत्त्वाचा मतभेदाचा मुद्दा म्हणजे स्त्रीमनाचा— त्याबाबत खांडेकर म्हणतात. 'स्त्रीमन तें स्त्रीमन आणि पुरुषमन तें पुरुषमन! विनायक कवीने चित्रित केल्याइतका या दोन मनांत भेद नसेल—नव्हे नाहींच. 'स्त्री तेवढी कोमल आणि पुरुष तेवढा कठोर हा यापुढे एक जुना पुराणा कविसंकेतच ठरेल' असेंहि आपलें मत दिलें आहे तथापि स्त्री कितीहि सुशिक्षित झाली तरी...नैसर्गिक वात्सल्याचा तिला त्याग करतां येणार नाही. स्त्री पुरुषांच्या सर्व व्यावहारिक हक्कांत समता अवश्य हवी...समतेचा जन्म विरोधांतून होत असला तरी सहकार्य हें तिचें जीवन आहे. "मानव जातीचा तिच्या बुद्धीइतकाच हृदयाचा विकास व्हायला हवा. तो विकास स्त्रियाच अधिक सत्वर व अधिक सुंदररीतीने करूं शकतील" असा लेखकाचा विश्वास आहे. तसेंच "मातृधर्मापेक्षाहि श्रेष्ठ अशा मानवधर्माचें परिपालन करण्याकरतां ती पुढें सरसावेल! एक दिवस तो — दिवस लवकर उगवेल कां? ती जगन्माता होईल". "नव्या जीवन क्रांतींत पुरुषापेक्षा स्त्रीचें नेतृत्व अधिक प्रभावी ठरण्याची शक्यता आहे. पुरुष शूर आहे, पंडित आहे पण कुठलीहि नवी सृष्टि निव्वळ शौर्यांतून आणि पांडित्यांतून निर्माण होत नाही. ती त्यागांतून आणि बुद्धिनिष्ठ भावनांतूनच उगम पावते" असा लेखकाचा निर्वाळा आहे.

या विविध वचनांवरून खांडेकरांची स्त्रीजीवनविषयक दृष्टि अत्यंत सहानुभूतिशील पण शास्त्रीय आहे असें दिसून येईल. या प्रबंधांत जी दृष्टि आध्याहृत धरली आहे तिचें स्वरूप खांडेकरांच्या दृष्टिकोनाशी खूपच जुळतें आहे. जीवन क्षेत्र, जीवनमूल्य यांबाबत समता व खरी मानवतावादी भूमिका

ही पुरुष व स्त्री या दोघांसहि सारखीच स्वीकार्य आहे हा महत्त्वाचा भाग होय. खांडेकरांच्या स्त्रीजीवन विषयक विचारांची पाहणी केली तर असें आढळून येईल कीं त्यांचे विचार जसे व्यापक आहेत तसे सखोलहि आहेत. नव्या स्त्रीच्या मनांत कोणत्या प्रकारचा संघर्ष चाललेला असेल ह्याची चाहूल त्यांना बरोबर लागली आहे. तिच्या विविध भावनाविषयीं जशी त्यांना सहानुभूति आहे तशी तिच्या ठायींच्या कांही दोषांकडेहि ते दुर्लक्ष करूं शकत नाहींत. असो खांडेकरांच्या स्त्रीजीवनविषयक भूमिकेचा परिचय करून घेतल्यानंतर त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनाचें परिशीलन करणें आवश्यक आहे.

खांडेकरांच्या जीवनविषयक व स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोनाचा परिचय करून घेतल्यानंतर त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनाच्या प्रतिबिंबाचा विचार करणें जरूर आहे. खांडेकर हे हेतुप्रधान लेखन करणारे कादंबरीकार आहेत. त्यांच्या ह्या धोरणाचा त्यांच्या कादंबऱ्यांवर परिणाम झालेला आहे. त्यांची पहिली कादंबरी 'हृदयाची हांक' ही होय. ह्या कादंबरींत लेखकाचा नवशिकेपणा स्पष्ट होतो. श्रीमंतीच्या हाकेला ओ देऊन, अधिकाराची हाक निमुटपणें मान्य करून अगर विद्वत्तेच्या हाकेपुढे मान वाकवून मुलीने जन्माचा जोडीदार मुळीच निवडूं नये, तिने फक्त हृदयाच्या हाकेला ओ द्यावी अशा मध्यवर्ति कल्पनेवर कादंबरीची उभारणी केली आहे. कादंबरीचीं पात्रें सहाजिकपणें प्रतिमारेखेच्या मर्यादेंतच राहातात. ती मर्यादा ओलांडून मानवरेखेच्या कक्षेंत प्रवेश करील असें एकहि पात्र ह्या कादंबरींत नाही. तत्त्वाच्या मांडणीच्या दृष्टीने कमळ, कुमुद व कुसुम ह्या तरुण स्त्रियांची योजना केली आहे. हृदयाच्या प्रेरणेनुसार वागल्यामुळे कमळ–दिवाकर, कुसुम–प्रभाकर हीं सुखी होतात, तर तिच्याकडे दुर्लक्ष केल्यामुळे कुमुद व तिचे पति ह्यांचें आयुष्य दुःखमय होतें. पण पात्रांच्या सजावटीच्या बाबतींत लेखकाला विशेष यश आलें नाही. सारींच पात्रें कोट्या करण्यांत प्रविण आहेत. त्यांच्यातल्या व्यवच्छेदक रेषा पुसट झाल्या आहेत. अशाप्रकारें

ही कादंबरी विषयदृष्ट्या व व्यक्तिचित्रणदृष्ट्या विशेष महत्त्वाची नाही. या दोन्हीहि बाबतींत स्त्रीजीवनाचे आविष्काराचे दृष्टीने कोणतेंच वैशिष्ट्य नाही.

'कांचनमृग' ही त्यादृष्टीने थोडी वेगळ्या प्रकारची कादंबरी आहे. सुधाकर हा कादंबरीचा नायक कॉलेजांतली प्राध्यापकाची नौकरी सोडून दक्षिण कोकणांतल्या एका गांवांतील शाळेंत साधा शिक्षक होतो. तरुण पिढीच्या मनांत जो ध्येयवाद उसळत होता त्याचें एक दर्शन खांडेकरांनी ह्या कादंबरींत घडविलें आहे. सुधारकांना ह्या नवध्येयाच्या स्वीकारांत जे विविध बरे वाईट अनुभव आले तोच कादंबरीचा विषय होय. स्त्रीजीवनाच्या अविष्करणाच्या दृष्टीने या कादंबरीचा महत्त्वाचा विशेष म्हणजे नायिका सुधा ही विधवा आहे असें दर्शविलें आहे. तिची सासू सुंद्राबाई व दीर मधुकर या दोघांच्या जाचांत तिला राहावें लागतें. तिला सोसाव्या लागणाऱ्या विविध अपेष्टांचें वर्णन चांगलें साधलें आहे. शेवटीं तिचा विवाह नायकाशी—सुधाकराशी होतो असें दर्शविलें आहे. ह्या शिवाय कादंबरींतलें महत्त्वाचें पात्र म्हणजे उपनायिका वारुणी ही होय. एका सुशिक्षित स्त्रीचें चित्र खांडेकरांनी ह्या पात्राचें द्वारें रंगविलें आहे. पण स्वभावरेखनाच्या ठसठशीतपणाच्या आभावीं तिचें पात्र वैशिष्ट्यपूर्ण व आकर्षक वाटत नाही. ह्या तरुण स्त्री पात्राशिवाय, सुंद्राबाई ही सुधेची सासू, जानकीबाई ही सुधाकरांची आई, हीं वयस्कर पात्रें आलीं आहेत. दोघींचे स्वभाव चांगल्या रीतीने दर्शविले आहेत. वहिनीबाई व मावशीबाई हींहि दोन पात्रें आपापल्या परीने वैशिष्ट्यपूर्ण अशीं रंगविलीं आहेत. यमू हें खालच्या वर्गातील पात्र म्हणून उल्लेखनीय आहे.

अशा प्रकारें ह्या कादंबरींतील स्त्रीसृष्टि ही विविधतापूर्ण आहे. पण स्वभाव वैशिष्ट्याने दृष्टींत भरतील अशीं पात्रें कमी आहेत. विषयाच्याच दृष्टीने पाहूं गेलें असतां विधवाविवाहाचा प्रश्न लेखकाने हाताळलेला आहे. त्यादृष्टीने समर्पक गोष्टी बऱ्याच आणल्या आहेत. जानकीबाईच्या सत्प्रवृत्त-

स्त्रीचें परिवर्तन हा महत्त्वाचा भाग आहे. सदानंद स्वामीच्या निर्मितीने तें काम बरेंच नैसर्गिक झालें आहे. अशा प्रकारें स्त्रीजीवनाच्या चित्रणाच्या दृष्टीने थोडी महत्त्वाची अशी ही कथा आहे.

या कादंबरी नंतरची म्हणजे 'उल्का' ही होय. ही स्त्रीजीवनप्रधान कथा लिहावयाची असा लेखकाचा मनोदय आहे; असें दिसतें. उल्का आपलें आत्मचरित्र लिहीत आहे. पंचवीस वर्षांच्या महाराष्ट्रीय स्त्रीला आत्मचरित्र लिहिण्यासारखा काय अनुभव आलेला असणार? "रांधा, वाढा, उष्टी काढा, हा आम्हां बायकांचा कार्यक्रम, त्यांत वर्णन करण्यासारखा पराक्रम तरी कसला असायचा? संसाराच्या शिडीची अगदी वरची पायरी म्हणजे चार मुलांची आई होणें! गोपू–बापू–चंद्री–सुंद्री!" अशा प्रकारें स्त्रीजीवनाच्या केविलवाणेपणावर नायिकेच्या करवी लेखकाने टीका केली आहे. 'कांचन मृग'च्या पुढची पायरी म्हणून लेखकाने उल्का ही पुनर्विवाहित दांपत्याची मुलगी आहे असें दाखविलें आहे. त्याच्यापुढची पायरी म्हणजे हा पोट जातींतला विवाह होता असेंहि दर्शविलें आहे. साहजिकपणें जगाचा अगदी वेगळाच अनुभव उल्केला यावा हें उघड आहे. उल्केच्या मैत्रिणी निरा व इंदु ह्या आहेत. निरा ही खालच्या वर्गातली आहे. रूढ पद्धतीप्रमाणे तिचें लग्न होतें. तिचा नवरा तिला मारहाण करतो. इंदु ही मध्यमवर्गाला शक्य असणारें सुखवादी जीवन जगते. उल्केचें लग्न जमण्यास भाऊंना बराच त्रास पडतो. त्यांचा पुनर्विवाहच झालेला असल्याने पुनर्विवाह मंडळाच्या लोकांशी त्यांचा परिचय असतो. आणि त्याचा उपयोग उल्काचें लग्न जुळविण्यास होतो. तिचें बेळगांवकडच्या पंडित नांवाच्या धनाढ्य गृहस्थांशीं लग्न होतें. उल्केच्या मनावर ध्येयवादी संस्कार झालेले असतात. पण तिला श्रीमंत पति मिळतो. त्यामुळे समाजांत चाललेल्या वर्गकलहाची आघाडी तिच्या घरांतच उघडते. पतीच्या मर्जीविरुद्ध ती सत्याग्रहाच्या चळवळींत भाग घेते, शिक्षा भोगते, परत येते. पति तिला चांगले वागवतात. पण त्यांचीं कुळें त्यांच्यावर फार रुष्ट असतात

व एकदां नदींतून जात असतां नांव बुडाविण्याची व्यवस्था त्यांच्याच कुळापैकी एक जण करतो. ते बुडून मृत्यु पावतात. पुढे उल्का एक ट्रस्ट करते व जमीनीवर कुळांचा हक्क मान्य करते. ही सर्व घडामोड होत असतां चंद्रकांत नांवाचा एक तरुण देशसेवेच्या निरनिराळ्या दिव्यांतून जातो व उल्केच्या स्फूर्तीचा झरा तोच असतो.

ह्या कादंबरीपासून एक गोष्ट स्पष्ट होते. खांडेकरांना समाजाची आर्थिक दृष्ट्या जी विमागणी होत आहे, झाली आहे, ती महत्त्वाची वाटते, व ह्या दोन परस्परविरोधी हितसंबंध असलेल्या वर्गांचे संबंध कसे घर्षणशील असतात हें प्रभावकारी रीतीने दर्शविण्याचा लेखकाचा यत्न सुरू होतो. त्याचा परिणाम कादंबरींतहि पाहावयास सांपडतो.

उल्केचें विवाहपूर्व जीवन हें वास्तवचित्रण ह्या दृष्टीने बरें उतरलें आहे. दोन तीन तरुणांशी तिचा विवाह होण्याचें ठरलें असतें पण तें प्रत्येक वेळीं कांहीना कांही कारणाने फिसकटतें हाही भाग योग्य आहे. तसेंच तिचा विवाह होण्यास कारण झालेली प्रसंगमालिकाहि स्वाभाविक आहे. पण तिचा विवाह झाल्यानंतर मात्र तिचें कौटुंबिकजीवन हें वर्गकलहाचें एक रणकुंड होतें त्या दृष्टीने पुढच्या घटना ह्या थोड्या अस्वाभाविक वाटतात. उल्केचा तुरुंगवास हा प्रसंग मात्र योजनापूर्वक वाटतो.

उल्केशिवाय दुसरें महत्त्वाचें स्त्री पात्र नाही. तिची मैत्रीण इंदु ही सुखवादी झालेली व तिच्या मित्राशी विवाहित झालेली दर्शविली आहे. दुसऱ्या मैत्रिणीचा उल्लेख वर आला आहेच. महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनांतील टप्पे ह्या दृष्टीने उल्केचें जीवन प्रतीकात्मक वाटतें. विविध रूढींना व अनिष्टांना तोंड देऊन ध्येयवादाची ज्योत तेवत रहावी असा यत्न करणारी महाराष्ट्रीय स्त्री पतीविरुद्ध सुद्धा जाण्याइतकी पुढे आलेली आहे. उल्का ही सर्वसामान्य महाराष्ट्रीय मध्यमवर्गीय स्त्रीची प्रतिनिधि नसेल पण महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनांत जी सामाजिक जाणीव होती त्या जाणिवेचें आविष्करण म्हणून हें चित्रण प्रातिनिधिक आहे.

ह्या कादंबरीच्यानंतर लिहिलेली कादंबरी 'दोन ध्रुव' ही होय. खांडेकरांनी समाजवादी विचारसरणीचा पुरस्कार यांपुढील कादंबऱ्यांतून व लेखनांतून अधिक ठसठशीतपणें केलेला आहे. समाजांत आर्थिक रचनेच्या अनुषंगाने श्रीमंत व गरीब असे दोन वर्ग निर्माण होतात. या वर्गांत सर्वच बाबतींत दोन ध्रुवाइतकें अंतर असतें. ह्यांतला धनिक वर्ग सर्वच बाबतींत भाग्यशाली असतो. समाजांतल्या सुखसोयी, नीतिनियम, कायदे इ. सर्व धनिक वर्गाच्या सोयीच्या दृष्टीने ठरविलेल्या असतात. या सर्व सुखसोयी इ. ना व व्यक्तिगत हक्कांना समाजाचा बहुसंख्य वर्ग मुकलेला असतो. कलेच्या क्षेत्रांतहि हें द्वंद्व दृगोचर झाल्याविना राहात नाही. स्त्रीचें स्थान हें दलिवर्गात असतें. मध्यमवर्गात हा संघर्ष दिसून येतो. मध्यमवर्गात दोन गट असतात. एकाची सहानुभूति सधन वर्गाच्या बाजूने असते तर दुसऱ्याची निर्धन वर्गाच्या. मध्यम वर्गाच्या ह्या दोन गटांतला विग्रह खांडेकरांच्या कादंबऱ्यांत प्रतीत होतो. खांडेकरांचें वैशिष्ट्य असें की त्यांनी घराघरांतून हा संघर्ष चालू आहे असें दर्शविलें आहे. सामाजिक घडामोडींच्या अनुषंगाने व लेखकाच्या दृष्टिकोनाच्या आधाराने हें सर्व ठीक वाटतें. 'दोन ध्रुव' व ह्या कादंबरीनंतरच्या सर्व कादंबऱ्यांतील जीवनाचें स्वरूप हें असें आहे.

'दोन ध्रुव' मधील रमकांत–वत्सला ह्या कुटुंबांत हाच कलह झालेला आहे. रमाकांत स्वप्नाळू जीवनांत रमणारा, सौंदर्याच्या पुस्तकी कल्पनांवर जगणारा असा आहे. त्याच्या त्या कल्पनेनुरूप त्याची पत्नी वत्सला नसते. आणि तिच्या अंगचे इतर गुण ओळखण्याइतकी माणुसकी रमाकांताजवळ नसते. वत्सलेला त्याचें वागणें सहन करणें अशक्य होतें. ती गृहत्याग करते. व कामापूरच्या काजू कारखान्यांत मजूर म्हणून राहते.

मध्यमवर्गीय ध्येयवादिनी स्त्रियापुढे खांडेकरांनी एक नवा आदर्श उभा केला आहे. खांडेकरांच्या 'हिरवा चांफा', 'कौंचवध', 'दोन मनें' या कादंबऱ्यांतील नायिकांच्या द्वारां हीच गोष्ट लेखकाने पुनः पुनः

समाजासमोर मांडली आहे. त्या दृष्टीने पाहतां ह्या चार कादंबऱ्यांचा साचा जवळ जवळ ठरल्या सारखा वाटतो. साहजिकपणेंच स्त्रीजीवनविषयक विशिष्ट प्रश्न व त्याचें आविष्करण यांत ह्या कादंबऱ्यांतून विविधता आढळून येत नाही. स्वभावचित्रणाचे बाबतींतच काय वेगळेपणा असेल तेवढाच.

'दोन ध्रुव' मध्ये वत्सला, सुरंगा, सुलोचना हीं प्रमुख स्त्रीपात्रें होत. ह्याशिवाय काशी ह्या कामकरी स्त्रीचें जीवनचित्रहि रंगविलें आहे. ह्या सर्वांत वत्सलेचें स्वभावचित्रच अधिक ठसठशीत व ओजस्वी झालें आहे. सुलोचना ही कारखानदाराची मुलगी चित्रकर्ती म्हणून दर्शविली आहे. कल्पनेच्या जगांत जगणारी अशी ही मुलगी आहे. वत्सलेच्या सांगण्यावरून कारखाना बंद न करण्याची व्यवस्था करण्याचें महत्त्वाचें काम तिच्या हातून होतें एवढेंच. यापेक्षा अधिक आकर्षक व्हावें असें तिचें चित्रण झालेलें नाही. सुरंगाचें चित्रण हें त्यांतल्या त्यांत वेगळ्या प्रकारचें आहे. समाजाच्या मागासलेल्या वर्गांतून ती रूप आणि गळा ह्यांच्या जोरावर नटी म्हणून पुढे येते. दोन भिन्न जगांत जगण्याची व त्यांच्या मूल्यांशी मिळतें घेण्याची कसरत तिला करावी लागली आहे. त्यादृष्टीने तिच्या जीवनांतली समस्या ही महत्त्वाची वाटते. ह्या वेगळेपणानेच तिचें चित्रण आकर्षक झालें आहे. रमाकांतांवर तिचें प्रेम असतें; मुलाला सांभाळण्याची जबाबदारी घेतां काय असें विचारून त्यांची ती परीक्षाहि घेते. पण परस्पर विरुद्ध हितसंबंध असलेल्या वर्गांशी तिचा संबंध आल्याने तिची मनोवृत्ति थोडीशी भांबावल्या-सारखी झालेली दिसते.

वत्सलेचें स्वभावचित्र मात्र बरेंच उठावदार झालें आहे. स्वतः चांगल्या प्रकारची लेखिका ती असते. कामापूरच्या काजू कारखान्यांत ती मजूर म्हणून राहते तरी तिच्या जीवनाचीं मूल्यें वेगळीं आहेत. गांधीजीच्या विचारांचे अनुयायी बाप्पा यांच्याशी विवाद करून त्यांना त्यांच्या धोरणांतली चूक पटविते. रमाकांतला नंतर पश्चात्ताप होतो तो तिची क्षमा मागतो...

तिचा परत स्वीकार करण्याची इच्छा दर्शवितो. विद्याधरचें प्रेमहि ती मिळविते. पण तिचा ध्येयवाद मध्यमवर्गीय स्वप्नाळू जीवनमूल्यांपासून तिला दूर नेतो. ती|अधिक व्यापक विचाराधिष्ठित व भावनानिष्ठ असें जीवन पसंत करते तेंच तिचें वैशिष्ट्य. वत्सलेच्या रूपाने खांडेकरांना मानवजातीच्या ठायींची वत्सजागृत करावयाची आहे. ती नवी ध्येयवादिनी स्त्री आहे. भावानंदांची बहिण ताई, सुशीला, सरला भोळे, ह्यांच्या जातीची ध्येयवादिनी स्त्री म्हणून खांडेकरांनीं निर्माण केली आहे. मराठी साहित्यांतील स्त्रीसृष्टींत तिचें स्थान मोठें आहे. बारा वर्षांनंतर निघालेल्या आवृत्तीला खांडेकरांनी जी 'कैफियत' जोडली आहे तिच्यांत वत्सलेसंबंधी 'लिहितांना ती बोलत नाही, नुसतीच टक लावून पाहते आहे...मला वाटतें–तिच्या माझ्या चेहऱ्यांत साम्य आहे...ही माझी बहीण आहे." असे उद्गार काढले आहेत. त्यांचा आशय खांडेकरांच्या जीवनविषयक ध्येयनिष्ठेंतून तिची निर्मिति झाली होती असा आहे. कोणत्याहि समाजांतील विशिष्ट वर्गाचें वा स्त्रीचें हें चित्रण नव्हे. लेखकाच्या ह्या कबूली वरून तिचें इतर ध्येयवादी नायिकाशी असलेलें साम्य स्पष्ट होईल.

'हिरवा चांफा', 'क्रौंचवध' व 'दोन मनें' ह्यांतील स्त्रीजीवनाचें आविष्करण एकाच प्रकारचें आहे असें म्हटलें असतां चूक होईल असें वाटत नाही. 'हिरवा चांफा' मधील सुलभा, हिला मुकुंद ह्या समाजवादी कार्यकर्त्याबद्दल प्रेम वाटतें. क्रौंचवध मधील सुलोचनेला दिनकर ऊर्फ दिलीप ह्या तसल्याच विचारसरणीच्या मित्राबद्दल आदर नि सहानुभूति वाटते. तर 'दोन मनें' मधील चपला ही श्रीकडे आकृष्ट होते. या प्रत्येक कादंबरीतला नायक हा अत्यंत कष्टाळू हुषार असा असून समाजाच्या अभ्युदयासाठीं कांहीतरी करावें अशी त्याची धडपड चालू असते. अर्थात गरीबांच्या दरिद्री लोकांच्या जीवनाशी ते समरस होतात. कथानकाला उठाव मिळावा म्हणून या प्रत्येक कादंबरींत उच्च मध्यम वर्गाचीं प्रातिनिधिक अशीं कांही स्त्री व पुरुष पात्रें निर्माण केलीं आहेत. 'हिरवा चांफा' मध्यें बॅ. विजय, 'दोन मनें' मध्ये बाळासाहेब तर 'क्रौंचवध' मध्ये भगवंतराव,

हीं असल्या प्रकारचीं होत. हीं पात्रें लब्धप्रतिष्ठित असतात व प्रत्येकाच्या जीवनांत एकादी दुसरी चमत्कारिक घटना घडलेली असते. प्रो. गरुड, (हिरवा चाफा), प्रो. दातार (क्रौंचवध), प्रो. आगटे (दोन मनें) ह्याहि पात्रांचा तोंडवळा एकसारखा आहे असें म्हणावयास हरकत नाही. त्याचप्रमाणें प्रत्येक कादंबरींत एक मध्यवर्ति ठसठशीत कल्पना लेखकाला मांडावयाची आहे असा लेखकाचा दावा आहे. कादंबरीचा विषय व्हावा इतकें व्यापकपण त्या कल्पनेला आहे हें निश्चित. त्याप्रमाणे कादंबरींत ती कल्पना महत्त्वाचीहि वाटते, पण सर्व कल्पनांचा एकत्रित विचार करूं लागलों तर ह्या कल्पना म्हणजे एकाच मध्यवर्ति विचारसरणीच्या भिन्न-भिन्न शलाका आहेत असें आढळून येतें. व त्यांच्यांतलें नाविन्य फिकें पडूं लागतें. 'हिरवा चांफा 'मध्ये प्रेमाच्या विशिष्ट प्रकाराचा लेखकास परिचय करून द्यावयाचा आहे. 'दोन ध्रुव' मध्ये जी कल्पना आहे तिचें स्वरूप कसें आहे त्या गोष्टीचें विवेचन ह्यापूर्वी आलेलेंच आहे. 'दोन मनें 'मध्येहि लेखकाला प्रत्येक माणसाच्या मनांत सत्प्रवृत्ति व असत्प्रवृत्ति यांच्यांत जो झगडा चालूं असतो त्याचें स्वरूप स्पष्टपणें मांडावयाचें आहे. आणि सत्प्रवृत्तीला मानवतेची जोड द्यावयाची आहे. ह्या विचाराचें वेगळ्यारीतीने आविष्करण 'क्रौंचवध 'मध्यें झालें आहे. मानवतेच्या विचाराला भावना-निष्ठेचें स्वरूप तेथे दिलें आहे. व त्याच्या समर्थनासाठी विस्तृत प्रस्तावना लिहिली आहे. अशा प्रकारें खांडेकरांच्या ह्या तीन कादंबऱ्यांचें विवेचन एकत्ररीतीने करतां येईल.

स्त्रीजीवनाच्या आविष्काराच्या दृष्टीने नायिकांचें स्वभावचित्रण हें महत्त्वाचें आहे. खांडेकरांच्या नायिकांचें सामान्यतः काय मनोगत आहे हें यापूर्वी उल्लेखिलें आहेच. त्यांच्या नायिका ह्या मध्यमवर्गीतील आहेत. कोणत्याहि प्रेमकथांतल्या प्रणयिनीचें स्थान प्राप्त व्हावें इतकी त्यांची सर्वविध पात्रता आहे. त्या नायकावर प्रेम करतात, आकृष्ट होतात. पण लेखकाला

मानववादी विचारांचा पुरस्कार करावयाचा असल्याने त्या चटकन त्या विचाराकडे वळतात. त्या दृष्टीने त्यांचें प्रेम हें उदात्त आहे. प्रेमाचेंच आविष्करण पाहावयाचें झालें तर त्या मध्यमवर्गाच्या प्रेमकल्पनांतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करतात. तो भाग योग्य आहे. परंतु असें मध्यमवर्गाच्या जीवननिष्ठांतून बाहेर पडणें व बहुजन समाजाच्या जीवननिष्ठेशी—मानवतेशी एकरूप होणें ही एक महान राष्ट्रीय वा सामाजिक प्रक्रिया आहे. खांडेकरांचे नायक हे त्या दिशेने प्रवास करतात तो पुष्कळसा निसर्गसिद्ध आहे. कारण त्यांच्या भोवतालची परिस्थितीच तशी असते. त्या दृष्टीने दिनकर (क्रौंचवध) व. श्री (दोन मनें) ह्यांची मनःप्रवृत्ति योग्य आहे. पण नायिका ह्या केवळ प्रेमापोटीं नायकाशी समरस होतात. त्यांच्या जीवनांत जी वैचारिक क्रांति दाखवावयास हवी ती अद्यापपर्यंत प्रभावीरीतीने त्यांना एकाहि कादंबरींत दर्शवितां आली नाही. 'पांढरे ढग' मध्ये हा विषय हाताळावयाचा आहे. पण त्या प्रक्रियेचें खरें दिग्दर्शन त्या कादंबरीच्या उत्तरार्धांतच येणें अपरिहार्य आहे. अशा प्रकारें खांडेकरांच्या ह्या तीन कादंबऱ्यांतील नायिका ह्या सामान्यरूढ मार्गापासून वेगळा जीवनमार्ग अवलंबतात तरी त्यांचा मनोकंद हा स्वप्नाळू मध्यमवर्गीय आहे. त्यांचा प्रयत्न त्या दिशेने चालू आहे. पण वैचारिक दृष्ट्या क्रांति व्हावयाची आहे. ह्या तीनहि कादंबऱ्यांतून दुय्यम पात्रांचे द्वारां स्त्रीजीवनावर होणारे अन्याय दिग्दर्शित केले आहेत. त्यांचें स्वरूप हें प्रातिनिधिक असलें तरी चित्रण सामान्य आहे.

खांडेकरांच्या कादंबऱ्यांत 'रिकामा देव्हारा' व पांढरे ढग ह्या वैशिष्ट्यपूर्ण कथा आहेत. दोनहि कादंबऱ्या स्त्री जीवनाच्या आविष्करणाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहेत. 'रिकामा देव्हारा' मधील अंगांशी वरील कादंबऱ्यांतील अंगांचें साम्य आहे. नायक नायिका ह्यांच्या प्रवृत्ति समान आहेत. (पूर्व कादंबऱ्यांतील नायिका नायकांशी तुलतां) फक्त नायिका ही वेगळ्याच प्रकारचें धाडस करते. असें दाखविलें आहे व तें धाडस करीत असतां जो त्याग तिने दर्शविला आहे तो महत्त्वाचा आहे. भावांच्या

शिक्षणाची इ. आबाळ होऊं नये म्हणून निराधार झालेली सुशीला (नायिका) एका वयस्कर गृहस्थाशी (दासोपंत) लग्न करते. त्यांच्याच मुलास नायकाला (अशोकाला) ही गोष्ट पसंत नसते. अशा प्रकारें अस्वाभाविक असा पेच प्रसंग निर्माण होतो. कॉलेजांत प्राध्यापक असलेल्या अशोकावर विविध आरोप केले जातात. त्याला नौकरीहि सोडावी लागते.

कादंबरींत खरा पेचप्रसंग निर्माण होतो तो सुशीलेचे यजमान तिला एका लुंगेबुवाच्या प्रसादाचा स्वीकार करावयास सांगतात ह्या घटनेमुळे, तिला ही गोष्ट नापसंत असते. कारण ती उघड उघड अनैतिक असते. पण पतीचीच आज्ञा असते. तिला ती मोडतां येत नाही. त्या प्रसंगांतून नाट्यमयतेने ती पार पडते. व पुढे तिचा तपास तिच्या आवाजावरून तिच्या धाकट्या बहिणीस लागतो. सर्वांची भेट रेडिओ स्टेशनाच्या आवारांतच होते. कारण गळा चांगला असल्याने उपजीविकेचे मार्ग काढण्याचे अनेक मार्ग आहेत त्यापैकी रेडिओवर गाण्याच्या व्यवसायांत तिला यश येते. नायक नायिकांचें नातें शेवटींहि भावाबहिणीचेंच रहातें. पण शेवट गोड होतो. कादंबरींत प्रत्येक पात्र आपलें आत्मकथन करतें अशी कल्पना करून लिहिली आहे. नायिका व तिचा त्याग हाच महत्त्वाचा विषय. हा तिचा त्याग केवळ कुटुंबाकरितां असतो. मुंबईस जें व्यापक जीवन तिला दिसतें त्यामुळे मानवजातीच्याच सुधारणेशिवाय गत्यंतर नाही असें तिला प्रत्ययास येते. पण ती कलाटणी एकंदरीने नायिकेच्या चित्रणास झेपत नाही. कारण ही एक प्रामुख्याने कुटुंबकथा आहे. तिच्यांत प्रसंगहि प्रातिनिधिक असण्यापेक्षां अपवाद स्वरूपाचा आहे. इराणांत पंचवीस वर्षें घालविलेले दासोपंत त्यांच्या कौटुंबिक जीवनांतली ही हकिकत आहे. अशोक हा कॉलेजांत प्राध्यापक आहे व त्याचा एका समाज सुधारणेचें कार्य करणाऱ्या संस्थेशी संबंधपण आहे. पण त्या संस्थेंत इतर लब्धप्रतिष्ठित लोक असतात, त्यांचीं एकेक लफडीं असतात. त्यांच्या द्वारें लेखकाने समाजाच्या नैतिक अधःपाताचा तीव्र निषेध केला आहे. स्त्रीजीवनाच्या अविष्करणाच्या दृष्टीने

पाहतां 'रिकामा देव्हारा' ही एक कुटुंबकथा आहे. कुटुंबांत स्त्रीला प्रामुख्याने 'माता' म्हणून जगावें लागतें. त्या मातृभावनेचा उदय दाखविला आहे. पण स्त्रियांना माणूसकीने वागविले जात नाही असें मोठ्या भेदक रीतीने दर्शविलें आहे. स्त्रिया या देवता आहेत असें म्हटलें जातें. पण त्या दुबळ्या देवता आहेत असें या कादंबरीची नायिका सुशीला म्हणते. तसल्या देवता होण्यापेक्षा माणूस होणें तिला अधिक आवश्यक असतें व त्यासाठीच ती गृहत्याग करून व्यापक जीवनाचा अनुभव घेते. पुष्पेच्या रूपाने समाजांत गरीब निराश्रित स्त्रियांना लब्धप्रतिष्ठित लोकांपासून आश्रयाच्या नांवाखाली फायदा न होतां उपद्रव कसा होतो हें दर्शविलें आहे. माणुसकीच्याच विचाराचा प्रकर्ष दाखवावयाचा असल्याने प्रसंग, घटना व वातावरण अस्वाभाविक असतांहि कादंबरींतील विषय महत्त्वाचा आहे असें पटतें. स्त्रियांना समाजांत माणुसकीचे हक्क नाहीत, माणुसकीने वावरतां येत नाही ह्या वस्तुस्थितीचें भडक चित्रण केलें आहे तें महत्त्वाचें आहे व तेंच येथील विवेचनाचे दृष्टीने महत्त्वाचें आहे.

खांडेकरांची 'पांढरे ढग' ही कादंबरी त्यांच्या चांगल्या कादंबऱ्यांपैकीं एक आहे. तिचें शीर्षक अत्यंत अन्वर्थक आहे. मध्यमवर्गाला उद्देशून तें दिलें आहे. लेखक मध्यमवर्गीतील आहे. त्याप्रमाणेच कादंबरींतले वातावरणहि मध्यमवर्गीय आशा–आकांक्षाचें चित्रण करणारें आहे. पण लेखकाला मध्यम वर्गाने आपल्या संकुचित ध्येयवादाचा व जीवनाचा परित्याग करून सर्वसाधारण समाजाच्या आशा–आकांक्षांशी एकरूप व्हावयास हवें असें सांगावयाचें आहे असें वाटतें. त्यादृष्टीनें नायक अभय हा व्यापक समाजजीवनाचा अनुभव घेतो व कार्याच्या परिपूर्तीसाठी नरेंद्र ह्या युक्तप्रांतीय साम्यवादी कार्यकर्त्याकडे नागपुरला जातो. "समाज सुखी करायला आधी सामाजिक मन निर्माण केलें पाहिजे. मानवी हक्कांकरितां झगडायला लढायला प्रसंगीं मरायलाहि ज्यावेळीं दलितवर्ग तयार होईल त्याचवेळीं आजचे बिकट प्रश्न सुटतील" असा निष्कर्ष कादंबरीकाराने अभयच्या विचारसरणीच्या द्वारें काढला आहे.

या कादंबरीचें स्त्रीजीवनाच्या आविष्कारणाच्या दृष्टीनेहि महत्त्व आहे. माला लता व प्रमिला ह्या प्रमुख नायिकारूप स्त्रिया होत. माला ही सुंदर आहे, पण तिच्यांत, विशेष कर्तृत्व नाही ती दुबळी आहे; खुळी आहे; विवाह करतांना तिने स्वसुखाचाच अधिक विचार केला आहे. आपल्या प्रवृत्तीचे चोज पुरविणाऱ्या कांचनशी तिने लग्न केलेलें असतें, पण ती अभयवरहि प्रेम करते. मध्यमवर्गातील विशिष्ट मनोवृत्तीचें आविष्करण ह्या दृष्टीने हें चित्र बरें रंगविलें आहे. दुसरा नमुना लतेचा. ही सौंदर्यांत मालेपेक्षा किंचित कमी आहे. पण अधिक बुद्धिमान व कलाप्रेमी आहे. ती नटी म्हणून पुढे येते. प्रतिभेचें देणें तिला लाभलेलें आहे, ती सुरेख रूपककथाहि लिहिते. अभयवर तिचें प्रेमहि असतें. पण तिच्या मनाला श्रीमंती वातावरणाची व सुखासीनतेची चटक लागलेली असते. सुखासीन जीवनाचा मोह तिला आवरत नाही. अशोकाचा समाजसेवेचा मार्ग व त्यांतल्या हाल अपेष्टा इ. तिला झेपत नाहीत. ती एका सिनेमा दिग्दर्शकाबरोबर विवाहित होते. अशा प्रकारें मध्यमवर्गातील स्त्रीवर्गाचें दौर्बल्य अत्यंत परिणामकारक रीतीने दर्शविलें आहे. त्याच बरोबर प्रमिला व ज्योति ह्या अशा तरुण स्त्रिया आहेत कीं त्या नवध्येयाशी समरस होण्याचा प्रयत्न करतात. ज्योति तर पतीच्या ध्येयाशी इतकी एकरूप झाली आहे कीं, त्यासाठी स्त्रीविशेष मातृत्वावरसुद्धां मात करावी असेंहि तिला वाटतें. प्रमिलेचें मात्र स्वभावचित्रण हें केवळ अस्फुटरूपांतच येथे आलें आहे. लेखकाला प्रमिलेच्या द्वारें नव्या स्त्रीची निर्मिति करावयाची आहे. पण तो कादंबरीच्या पुढच्या भागाचा विषय आहे. ह्या पात्राबरोबर, कावेरी, कोड आलेली अक्का, अभयची अक्का, लताची आई इ. स्त्रियांचे चित्रण केलें आहे. दुबळेपण, त्याग, धैर्य, इ. गुणांचें मिश्रण प्रत्येक पात्रांत झालेलें आहे. समाजाचा श्रीमंत वर्ग व त्याचे आधाराने मध्यमवर्गांत शिरलेली अनैतिकता इ. गोष्टींचेंहि दिग्दर्शन होतें. " समाजांत स्त्री अजून सुरक्षित नाहीं. रानटी पुरुषाच्या कामुकतेने सध्या सभ्यरूप धारण केलें आहे हें कांहीं खोटे नाही—

एकाद्या स्त्रीचा एकदम हात धरून पुरुष पूर्वीप्रमाणे तिला पळवून नेत नाही. पण तिच्या दारिद्र्याचा किंवा दुबळेपणाचा फायदा घ्यायला तो नेहमीं तयार असतो...." अशा प्रकारचे विचार अभयच्या मनांत असतात. व त्यांना पोषक असाच अनुभव त्याला येतो. पांढरपेशेपणाच्या पाशांतून माणसें मुक्त होत आहेत, निदान मध्यमवर्गीतील कांही व्यक्तींचा तसा यत्न चालू आहे असें लेखकाला दाखवावयाचें आहे. स्त्रीजीवनाच्या आविष्करणाच्या दृष्टीने 'पांढरे ढग' मधील स्त्रीजीवनाचें आविष्करण बरेंच बहुविध व ठसठशित आहे. वास्तविक अभय हें मध्यवर्ति पात्र आहे. पण त्याच्या भोंवतीं विविध स्त्रीपुरुष आणले आहेत, त्यांत स्त्रीजीवनाचें चित्रणच अधिक भडक आहे. अभयची बहिण अक्का हिचें त्यागपूर्व जीवन हें श्रेष्ठ खरें पण तो त्याग कुटुंबापुरतां आहे. अभयचें जीवनहि तसेंच राहावें अशी तिची मनीषा असते. आपल्या कटु अनुभवाला व शारिरिक व्याधीला अगर विरूपतेला न दाद देतां प्रेमळपणाने व लोकोपयोगी वृत्तीने समाजाचा आदर संपादणारी कोड फुटलेली अक्का हा एक दुसराच नमुना आहे. त्याचप्रमाणे लताची आई व कावेरी दोघीहि मोहविविश स्त्रिया पण लताची आई ज्या प्रकारचें जीवन जगते त्यापेक्षा वेगळी उभारी कावेरीच्या ठिकाणीं आहे. अनाहूतपणें पदरीं पडलेलें मातृत्व, पण त्याचा ती तिरस्कार करीत नाही. अशा प्रकारें मध्यमवर्गीय स्त्रीच्या जीवनांगाचे विविध स्वरूपीं दिग्दर्शन करणारी ही एक चांगल्यापैकी कादंबरी आहे. तंत्रदृष्ट्या तिच्यांत कांही दोष असले तरी स्त्रीजीवनविषयक चित्रण ह्या दृष्टीने दोष विशेष मोठे आहेत असें नाही.

'सुखाचा शोध' ह्या छोट्या कादंबरीच्या द्वारें भावनानिष्ठेचें महत्त्व पटविलें आहे. " माणसाने जीवन अनैसर्गिकपणें घालविलें तर त्याला कधीच सुख लाभणार नाहीं. उलट आपल्या कोमल भावना ताज्या तवान्या ठेविल्या तर पुस्तकी ज्ञान नसतांहि जीवनांत आनंद निर्माण होऊं शकतो "— असा नायकाचा निर्णय आहे. स्त्रीजीवन विषयक दृष्टीने विशेष नवे असें कांहीं सांगायचें आहे असें वाटत नाहीं.

'पहिलें प्रेम' ही छोटी कादंबरी मध्यमवर्गीय प्रेमविषयक कल्पनांचा अधिक्षेप करणारी आहे. 'पहिल्या प्रेमामागे जें एक अद्‌भुतरम्यतेचें वलय आहे तें काढून टाकण्याचा यत्न लेखकानें केला आहे. 'पहिलें प्रेम' हें पुष्पासारखें असून तें सुकलें की मनुष्य प्रेमाला मुकला या कल्पनेला अनुभवाचा फारच थोडा आधार आहे. पहिल्या प्रेमांतल्या निराशेनें मनुष्य उदास होईल, त्याच्या डोळ्यावरची काव्याची झांपडहि थोडीफार कमी होईल; पण एवढ्यामुळे त्याला पुन्हा प्रेम करावेसें वाटणारच नाही, आणि त्याने पुनः प्रेम केलें तरी त्या प्रेमाला पहिल्याची सर येणार नाही 'या गोष्टी काव्यांत शोभून दिसल्या तरी जीवनांत त्यांना अवास्तव महत्त्व देण्यांत अर्थ नाहीं.' हीं गोष्ट देवदत्त व प्रभाकर यांच्या दोघांच्या प्रणयकथेच्या आधाराने रंगविली आहे. त्यांचा प्रेमभंग झालेला असतो तरी क्षणिक वादळाखेरीज जीवनांत कांही घडलें नाही. "प्रीति मनामनांची मिळणी आहे" ह्या गोष्टीची सत्यता पात्रास पटते. पहिल्या प्रेमांतला उन्माद पुढल्या प्रेमांत थोडासा कमी झाला तरी उल्हास, उत्साह, उदात्तपणा ह्या दृष्टीने हें प्रेम पहिल्या प्रेमापेक्षाहि अधिक उत्कट असण्याची शक्यता आहे. ही गोष्ट सखाराम व गोकुळा यांच्यातील प्रीतीच्या आधाराने दर्शविली आहे. प्रेम हा या कादंबरीचा विषय व त्याला मानवतेची कलाटणी हें त्याचें आविष्करण.

खांडेकरांची सर्वांत अलीकडील कादंबरी 'जळलेला मोहर' ही होय या कादंबरीचें स्वरूप प्रायः मानसशास्त्रीय आहे. वैवाहिक जीवनांतील प्रेमाबद्दल वा इतरहि गोष्टीबद्दल माणसांच्या विशिष्ट अपेक्षा असतात. त्यांच्या अगदीं विरुद्ध असे अनुभव प्रत्यक्षांत येत असतात. अशा अनुभवांचे विविध नमुने एकत्र करून ही कादंबरी सजविली आहे. मानसशास्त्रीय आविष्करणाच्या दृष्टीने या कथेचें महत्त्व बरेंच आहे. पण समाजांतील विविध व्यवसायांतील व विविध प्रवृत्तीच्या लोकांच्या जीवन दिग्दर्शनाविना अन्य असा कोणता प्रभावी प्रश्न विशेषत्वाने निदर्शनास येईल असें स्त्रीजिवन विषयक अंग या ठिकाणीं आलेलें नाही. अर्थातच त्यादृष्टीने कादंबरीचें मोल बेताचेंच आहे.

३ ग. त्र्यं. माडखोलकर

प्रो. फडके आणि खांडेकर यांच्या इतक्याच श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर यांच्या कादंबऱ्या लोकप्रिय आहेत. १९३५ ते १९४७ च्या कादंबरी वाङ्मयाचा विचार करतांना त्यांच्या कादंबऱ्यांचा विचार प्रो. फडके व खांडेकर यांच्या बरोबरीने करावा लागतो. माडखोलकरांच्या अकरा कादंबऱ्या १९४७ पर्यंत प्रसिद्ध झालेल्या आहेत. प्रथम ते टीकाकार म्हणून पुढे आले तरी कादंबरीकार म्हणून त्यांनी चांगलेंच यश संपादिलें आहे. प्रथम त्यांच्या जीवनविषयक व स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोनाचा परिचय करून घेणें प्राप्त आहे.

माडखोलकर यांच्या विचारांवर आपल्या युगांतील परस्पर विभिन्न व परस्पर विरोधी विचारांचा परिणाम झालेला आहे. "स्वैरविचार" मध्ये आपल्या आवडत्या लेखकांत चिपळूणकर व परांजपे यांचा उल्लेख केला आहे. त्यांनी निबंधमालाकारांवर एक दीर्घ प्रबंधहि लिहिला आहे. यावरून माडखोलकरांच्या विचारसरणीवर चिपळूणकर परांजपे ह्यांच्या उत्थापनवादी विचारसरणीचा संस्कार खोलवर झालेला दिसतो. कालपर्यंत संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या पुरस्कारामागे त्यांची हीच भूमिका होती. १९४७त त्यांनी 'तरुण भारत' या दैनिकाचा जो विशेषांक प्रसिद्ध केला त्याच्या संपादकीयांत म्हणतात "आजच्या युगाचा धर्म, आजच्या कालखंडाची नियती स्वातंत्र्यप्राप्ति ही आहे. ब्रिटिश साम्राज्यशाहीने आपल्या सार्वभौमत्वाच्या तोऱ्यांत चिरडून छिन्नाभिन्न करून टाकलेल्या (भारताच्या) घटकराष्ट्रांचें पुनरुत्थान हेंहि त्या धर्माचें त्या नियतीचें एक अंगभूत कार्य आहे." [१] आपल्या 'सुभाषवाद' ह्या पुस्तकांत ह्याच विचारांचा पुरस्कार त्यांनी अभिनिवेशाने केलेला आहे.

१ "तरुण भारत" विशेषांक १९४७. पृ. ३९

१९३४ मध्ये मराठी काव्यावर लिहितांना सुद्धा केशवसुतांचा अधिक्षेप करतांना चिपळूणकरांना अतिरिक्त मोठेपणाचें स्थान दिलें आहे. ह्यावरून ही गोष्ट स्पष्ट होईल की वैचारिक दृष्टीने पाहतां माडखोलकर हे उत्थापनवादी विचारांचे पुरस्कर्ते आहेत असें म्हटलें असतां फारसें असयुक्तिक होणार नाही.

तथापि ज्या कालांत माडखोलकरांचें लेखन झालें तो कालखंड वैचारिक दृष्टीने साम्यवादी विचारांच्या प्रसाराचा कालखंड होता. माडखोलकरही त्या विचारापासून अलिप्त राहूं शकले नाहीत. आपल्या 'मुक्तात्मा' ह्या पहिल्या कादंबरींत तर त्यांनी साम्यवादी चळवळींचें कार्य प्रथमावस्थेंत कसें चालू होतें हें सहानुभूतीने रंगविलें आहे, व कॉ. डांगे यांनी त्यांच्या त्या चित्रणाच्या यशस्वितेचें प्रशस्तीपत्रहि दिलेलें आहे. त्याचप्रमाणे आपल्या अनेक कादंबऱ्यांतून (उ. कांता, दुहेरी जीवन, मुखवटे, नवे संसार, प्रमंद्वरा) त्यांनी आपले नायक वा प्रमुख पात्रें ही समाजवादी विचारांचीं पुरस्कर्ती आहेत असें दर्शविलें आहे. 'स्वैर विचार' ह्या पुस्तकांत संग्रहित केलेल्या निबंधांत 'साम्यवाद व नवी लैंगिकनीति' या विषयावर माडखोलकरांनी लेखमाला लिहिली ती आली आहे. तिच्यांत त्यांनी साम्यवाद ज्या नव्या नीतीचा पुरस्कार करतो त्या नीतीच्या विधायक स्वरूपाकडे लक्ष देऊन तिच्याकडे आदराने पहावयास हवें असें पुरस्कारिलें आहे. तसेंच राष्ट्रीय अभ्युदयाच्या त्यांच्या कल्पनेचा पाया समाजवाद असावा असें वाटतें. ह्या विचारांचा पुरस्कार 'मुक्तात्मा' मधून बऱ्याच साक्षेपाने केला आहे. त्याप्रमाणेच आवडत्या लेखकांत आपटे (हरिभाऊ) व श्री. कृ. कोल्हटकर यांचा उल्लेख झालेला आहे. पैकी आपट्यांच्या विचारसरणीचा गाभा प्रामुख्याने अभ्युदयवाद होता असें या प्रबंधांत आलें आहे. कोल्हटकरांचा परिणाम हा वैचारिक म्हणण्यापेक्षा साहित्यविषयक म्हणावयास हरकत नाही. थोडक्यांत असें म्हणतां येईल की माडखोलकर समाजवादी विचारांकडे एककाल आकृष्ट झाले होते. परंतु तें आकर्षण मूलगामी होतें

असें म्हणतां येत नाही. नाहीतर आजच्या युगाच्या विचारांचा उल्लेख करतांना राष्ट्रीय स्वातंत्र्यप्राप्ती व राष्ट्रीय अभ्युदय ह्यांच्या बरोबर समाजवादी विचारांचा स्वीकारही यावयास हरकत नव्हती. पण माडखोलकरांना समाजवादी विचारांची ओढ अंतरंगांतून नाही. आवडत्या लेखकांत आगरकरांचा उल्लेख नाही ही गोष्ट फार महत्त्वाची आहे. समाजवादी विचारप्रणालि म्हणजे आगरकरांच्या विचारांची परिपूर्ति होय. ही गोष्ट माडखोलकरांना अमान्य आहे असें नाही. 'मुक्तात्मा' मधील नायक आगरकरांच्या त्या दृष्टीने उल्लेख करतो. त्यांना आगरकरांचा व्यक्तिवाद मान्य नाही असें स्पष्ट दिसतें.

ह्या विचारसरणीमुळे त्यांचा स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोन असाच परस्पर विरोधी विचारसरणींनी युक्त आहे. 'साम्यवाद व नवी लैंगिकनीति ह्या लेखांत नव्या लैंगिक वा सामाजिक नीतीमुळे स्त्रीजीवनांत कोणते क्रांतिकारक बदल होणार आहेत त्याचें त्यांनीं साधार विवेचन व पुरस्करण केलें आहे. "स्त्री व पुरुष यांचा स्वातंत्र्य, जबाबदारी आणि हक्क ह्या तीनहि बाबतींत समान दर्जा" हें त्यांच्या नव्या नीतीच्या सूत्रांतील पहिलें सूत्र आहे.[२] ह्या पहिल्यासूत्रास पोषक अशी आणखी नऊ सूत्रें या लेखांत उल्लेखिलीं आहेत. त्याचप्रमाणे नव्या नीतीच्या बनावांत मार्क्स व फ्रॉइड, एलिस, यांच्या विचारांचें महत्त्वहि मान्य केलें आहे. त्याचप्रमाणे तार्किक वा तात्त्विक दृष्टीने माडखोलकरांना स्त्री व पुरुष यांच्यांतली विविध प्रकारची समता मान्य आहे. पण हा झाला साम्यवादी विचारसरणीच्या परिणामाचा भाग.

माडखोलकरांच्या विचारसरणीवर उत्थापनवादी विचारसरणीचा परिणाम अधिक खोलवर झाला आहे हा विचार वर आलेलाच आहे. ह्या विचारसरणीचा स्त्रीविषयक दृष्टिकोन हा सहानुभूतिशील नाही. आर्थिक म्हणा अगर तात्त्विक म्हणा कोणत्याहि कारणामुळे असो ह्या विचारसरणीचे

२ 'स्वैर विचार, पृ. ५३.

पुरस्कर्ते हे स्त्रियांच्या सामाजिक स्थानांत मूलभूत बदल व्हावा ही गोष्ट मान्य करीत नाहींत. पौरुषत्व ही मानवी जीवनांतली अजब चीज आहे. तिला कमीपणा आणणारा भाग समाजजीवनांत नसावा. स्त्रीने पुरुषाचें वर्चस्व सर्वस्वी मान्य करावें. निसर्गाने तिच्यावर जें मातृत्व लादलेलें आहे त्याच्याच अनुषंगाने 'गृह' तिच्याकडे आलें आहे. स्त्रीचें सारें कर्तृत्व त्याग.....इ. हीं सारीं त्या 'गृहा'च्या कक्षेंत सामावलीं जावींत असा अभ्युदयवादी विचारसरणीवाल्यांचा स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोन असतो. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांतून सहाजिकपणें ह्या दृष्टिकोनाला पोषक असें चित्रण झालें आहे. त्यांच्या नायिका रडव्या, दुबळ्या, अशा वाटतात, त्या शिकलेल्या आहेत (भं. दे.), समाजकार्यांत भाग घेतात, (दु. जी.) तरी पण त्यांच्या जीवनविषयक दृष्टिकोनावर एक प्रकारच्या हताशतेची छाया पसरली आहे व त्यांचें कारण लेखकाची विचारसरणी हेंच होय. 'मुक्तात्मा' मध्ये सुमति हें पात्र 'सफ्रेजेट्' आहे असें लेखकाने सांगितलें म्हणूनच म्हणायचें ह्या पेक्षा तशा विचारसरणीला पोषक असें वर्तन तिच्या हातून होत नाही. थोडक्यांत माडखोलकरांना आधुनिक स्त्रीचा लढा कशासाठी आहे हें कळलेलेंच नाही. (समाजवादी व नव्या लैंगिक नीतीच्या पुरस्कर्त्याला हें कळूं नये ह्याचें नवल वाटतें!) असा निष्कर्ष त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवन चित्रण पाहून काढला तर तें फारसें चूक होईल असें म्हणतां येणार नाही. याचें कारण मांडखोलकरांना व्यक्तिवाद मान्य नाही; त्यामुळे व्यक्तिवादी स्त्रिया ते निर्माण करूं शकले नाहींत. स्त्रीजीवनविषयक दृष्टि ही प्रामुख्याने रूढ परंपरागत विचारांनी युक्त अशी आहे असें वाटतें.

याचें एक गमक त्यांनी दिलेल्या एका कबूलींत आढळते. आपल्या कादंबऱ्यांत उत्तानशृंगाराचे प्रसंग का आले यांचें एक स्पष्टीकरण त्यांनी आपल्या 'दोन तपें' ह्या आत्मचरित्रकथेंत दिलें आहे. त्यांतील कांही भाग असा "स्मरणशक्ति ग्रहणक्षम झाल्या दिवसापासून ज्याच्या मनावर संस्कृत साहित्याचे संस्कार अविरत घडले...तारुण्याच्या अगदी सुरवातीला

(गुरुजींनी) ज्याला ' कुमारसंभवा'च्या आठव्या सर्गातील कामदोहदाचा परमार्थ विशद करून सांगितला, त्याला संस्कृतकवींनी इतक्या अहमहमिकेने आळविलेल्या रसराजाविषयी विशेष आसक्ति असावी, यांत काय नवल ? " [३] या स्पष्टीकरणाचें विश्लेषण केलें तर काय आढळतें ? त्यांना शृंगार ह्या रसराजाची सेवा करावयाची होती. आधुनिक मनाला उजळून काढणारी प्रेमभावना व तिचें आविष्करण, आणि जुन्याकवींना अभिप्रेत असणारा शृंगार यांत फरक आहे. प्रेम भावनेंत व्यक्तित्वाच्या आविष्करणाला प्राधान्य असतें, शृंगारांत शारिरिक वासनापूर्तीला अधिक महत्त्वाचें स्थान असतें. माडखोलकरांना व्यक्तिवाद मान्य नसल्याने त्यांचें प्रेम भावनेचें आविष्करण हें केवळ शारीरिक कामविषयक वासनापूर्तीचें चित्रण व्हावें हें अपरिहार्य आहे. त्यांचे कामी नायक हे ' स्त्रीची शिकार करण्यास निघालेले ' असेच आहेत. ही ' शिकारी वृत्ति ' आहे, ही एकंदरीने फारशी स्पृहणीय नाही.

शेवटीं त्यांचा साहित्यविषयक दृष्टिकोन पाहणें आवश्यक आहे. " वाङ्मय हें मी साधन समजतो, साध्य नव्हे. " अशी आपली श्रद्धा आहे हें त्यांनीं ' दोन तपें ' मध्ये (पृ. २५१) उल्लेखिलेलें आहे. ही श्रद्धा प्रारंभापासूनची आहे. ह्या विचारांच्या अनुषंगाने त्यांच्या कादंबऱ्याकडे पाहणें आवश्यक आहे. ' कले करतां कला ' हें मत त्यांना अर्थातच अमान्य असणें अपरिहार्य आहे. टीकावाङ्मयाकडून कादंबरी वाङ्मयाकडे कां वळलां ! असा एकाने प्रश्न विचारला असतांहि त्यांनीं " वाङ्मय हें बोलून चालून मानवी जीवनाची अनुकृति, प्रतिकृति किंवा विकृति होय. तेव्हा, त्या वाङ्मयाचे टीकाकार होण्यापेक्षा त्याला आधारभूत असलेल्या विशाल मानवी जीवनाचे टीकाकार होणें हें अधिक उद्बोधक, अधिक आल्हाददायक नाही काय ? मी कादंबरी लेखनाकडे वळलों; तो मुख्यतः याच भावनेने " [४] अशा प्रकारचें उत्तर दिलेलें आहे. श्री. माडखोलकर हे एक साक्षेपी लेखक आहेत. कलागुणांच्या दृष्टीने तर त्यांच्या कादंबऱ्यांचें स्थान प्रो. फडक्यांच्या

---

३ ' दोन तपें पृ. २५०. ४ स्वैर विचार पृ. १०.

बरोबरीने आहे. राजकीय प्रश्न वा विचार ह्यांची कादंबऱ्यांतून पद्धतशीर चर्चा करण्याचा पायंडा त्यांनी पाडला असें म्हटलें तरी चालेल. महात्मा गांधींच्या विचारसरणीला त्यांनी कादंबऱ्यांतून विरोध केला आहे. स्त्री-जीवनविषयक दृष्टीने पाहणी करतांना ह्या राजकीय चर्चितांकडे वा त्यांच्या गांधी-विरोधाकडे विशेष आस्थापूर्वक लक्ष देणें आवश्यक नसलें तरी विषयाच्या विवेचनाच्या अनुरोधाने जेथे उल्लेख येईल तेथे चर्चा करावी लागेल. गांधीजींना त्यांचा विरोध आहे. त्याचें वैचारिक कारण म्हणजे व्यक्तिवादाची अमान्यता हेंच असावे. गांधीजी हे वृत्तीनेच व्यक्तिवादी, तर माडखोकरांना तो विचारांचा धागा जवळ जवळ अमान्य. त्यामुळे हा विरोध थोडासा मूळांतला आहे. ह्यापेक्षा अधिक विश्लेषण येथे आवश्यक आहे असें वाटत नाही.

'मुक्तात्मा' ही माडखोलकरांची पहिली कादंबरी. ही प्रामुख्याने राजकीय कादंबरी आहे. स्त्रीजीवनविषयक विशिष्ट चित्रणाचा आविष्कार करण्यास या कादंबरींत तसा फारसा अवसर नाही, आणि लेखकाची ही पहिलीच कथा असल्याने त्याबाबत फारसें यशही संभवत नाही. ललिता व सुमति ह्या कॉलेजकन्या ह्या कादंबरीच्या नायिका व उपनायिका आहेत असें म्हणावयास हरकत नाही. ललिता ही अजारीच दर्शविली आहे. तिचें प्रारंभीं उपनायक केशव याच्यावर प्रेम असतें असें तिला वाटतें. पण अजारीपणांत चंद्रशेखरची सहानुभूतिशील वृत्ति पाहून ती त्याच्यावर अनुरक्त होतें. त्याचें ध्येय व कार्य हीं तिला पसंत नसतात; पण त्याच्या व्यक्तित्वाबद्दल आदर वाटतो. सुमति व केशव यांच्यात प्रेमाची देवघेव होते. अर्थात कादंबरीला राजकीय महत्त्व असल्याने प्रेमविषयक आकांक्षांची परिपूर्ति दर्शविणें हें तिचें उद्दिष्ट नाही. प्रौढ स्त्रियांत, पार्वती, चंद्रशेखरची आई ही पात्रें महत्त्वाचीं आहेत. पार्वतीचें वैवाहिक जीवन अयशस्वीच असतें असा उल्लेख आहे. प्रेमा हें पात्रहि महत्त्वाचें आहे. हें पात्र म्हणजे इंग्रजी कादंबऱ्यावरून सुचलेलें असावें. गांवांतले लब्ध प्रतिष्ठित लोक व

अंमलदार तिच्याकडे येतात, गप्पा मारतात. तिच्याकडे चंद्रशेखर येतो. त्याच्या कार्याबद्दल तिला सहानुभूति वाटते. त्याच्या कार्यात साहाय्य करावें अशी तिची मनोमय इच्छा आहे. त्याप्रमाणे ती कसलेंहि साहाय्य करण्याची तयारी दर्शविते. पण केवळ मोहातींत राहावयास हवें म्हणून तो तिचें सहकार्य, प्रेम... सर्व नाकारतो. तथापि त्याला ऐनप्रसंगीं कृतज्ञतापूर्वक साहाय्य करते. तिची शेखरच्या कार्याबद्दलची तळमळ हा महत्त्वाचा धागा आहे. सुमति, ललिता ह्यांचा स्त्रियांच्या परिस्थितीबद्दल वादविवाद होतो. सुमति सफ्रेजेट असल्याने स्त्रीदास्याविरुद्ध मतें देते. पण पुढे तिच्या हातून कांही विशेष कार्य होतें असें दिसत नाही. एकंदरींत ह्या कादंबरीला स्त्री-जीवनविषयक आविष्काराच्या दृष्टीने विशेष महत्त्व नाही.

माडखोलकरांची स्त्रीजीवनविषयक प्रश्नांची चर्चा करणारी खरी कादंबरी म्हणजे 'भंगलेलें देऊळ' ही होय. एका 'मानिनी' चें हें आत्मचरित्र आहे. तिच्या वैवाहिक जीवनाची परवड प्रामुख्याने लेखकाला चित्रित करावयाची आहे. अनुसूयेचें अरुवर प्रेम असतें, अरुला पण अनुसयेबद्दल आकर्षण वाटत असतें. पण त्याच्या प्रेमविषयक कल्पनाच जगावेगळ्या होत्या. "प्रेमाचं पर्यवसान त्याच एका (विवाह) संबधांत झालें पाहिजे... मला कशीशीच वाटते ती कल्पना." असें त्यांचें मत असतें. "चकोरासारखी वृत्ति आहे माझी. सुधेचा एखादा बिंदु तोंडांत पडावा आणि बाकीचं आयुष्य चंद्रिकेच्या चिंतनांत घालवावं यांतच त्याचं जसं सर्व सुख असतं, तसं जीवन आहे माझं! तुझ्याविषयीं विचार करण्यांत, एकादेच वेळीं तुझ्या स्पर्शाचं सुख अनुभवण्यांत जो आनंद वाटेल, तो कदाचित् जन्माची गाठ पडल्यानं नाहीसा सुद्धा होऊन जाईल... लग्नाचा आणि प्रेमाचा कांहीं संबंध आहे किंवा असावा, असं वाटत नाही मला!" असे त्याचे प्रेमविषयक विचार असतात. ते अनूचा प्रेमभंग करण्यास कारणीभूत होतात. अशाप्रकारें केवळ मानसिक कारणांनी प्रियकर प्रेयसीच्या वियोगाचा बनाव झाला आहे ही गोष्ट कादंबरीच्या दृष्टीने निःसंशय प्रशंसनीय

आहे. पुढे अनू, अनिरुद्ध प्रभाकर यांच्या सहवासांत येते. त्यांच्याबद्दल तिला आकर्षण वाटतें, व शेवटीं त्यांच्याशी तिचा विवाहहि होतो. अर्थात् हा 'प्रेमविवाह' असला तरी त्याच्यात हुंडा इ. आर्थिक देवघेवीला बरेंच महत्त्व आहे. परंतु प्रेमाच्या योगाने नायिकेच्या तें लक्षांत येत नाही एवढेंच.

पुढे नायिकेच्या वैवाहिक जीवनांतील विविध प्रसंग आले आहेत. त्यांची कारणें खरीं दोनच. वारंवार मातृत्वाची जबाबदारी पडल्याने नायिकेच्या अंगीं आलेलें दौर्बल्य, व नायकाची थोडीशी अतिरिक्त—वा असंमयी भोग लोलुपता. "मला पुष्कळदां असें वाटतें कीं, संततिनियमनाचे उपाय जर त्या वेळीं आजच्या इतके सुलभ असते तर माझ्या संसाराचा जो विचका झाला तो...खचित टळला असता" असें आपलें मत अनूने पृ. ११४ वर दिलें आहे. व बारकाईने पाहूं लागलें तर खरें कारण तेंच आहे. अर्थात् अनिरुद्धाचें पूर्वचरित्र जें आलें आहे त्या आधारें मात्र जरा वेगळे निष्कर्ष काढले पाहिजेत. कारण संयम त्याला माहीत नव्हता. माडखोलकरांच्या बहुतेक नायकाप्रमाणे त्याला अमर्याद कामपिपासा आहे, व अनूच्या संसाराची वाताहत होण्याचें खरें तें कारण आहे.

सुशिक्षित स्त्रीच्या जीवनाविष्काराच्या दृष्टीने अनूची कहाणी मोलाची आहे. त्या बाबतींत बऱ्याच नव्या नव्या गोष्टी लेखकाने मांडलेल्या आहेत. विवाहाची मर्यादा वाढल्याने विवाहपूर्वक प्रेमसंबंधाचे धागेदोरे व्यक्तीच्या जीवनांत असणें शक्य आहे ही एक वस्तुस्थिति. त्याचप्रमाणे सुशिक्षितपणामुळे स्त्रियांच्या कर्तृत्वशक्तीस अधिक वाव निर्माण झालेला असला तरी मातृत्वाची जबाबदारी व पत्नीत्वाची जबाबदारी ही पूर्ववत असल्याने तिची त्रेधा अधिकच वाढली आहे. तसेंच प्रेमविवाहाच्या प्रचारामुळे एकपत्नीव्रत पद्धतीचा प्रसार वाढत आहे ही गोष्ट स्त्रीच्या व्यक्तित्वाची प्रतिष्ठा राखण्याच्या दृष्टीने श्रेयस्कर असली तरी तिची तिरपिट अधिक होत आहे. अनू जर सुशिक्षित नसती तर आहे त्याच कारणास्तव अनिरुद्ध मनूशी राज-

रोसपणें विवाहहि करूं शकला असता, व अनूलाहि फारसें वाईट वाटलें नसतें. पण इंग्रजी शिक्षणाने जो व्यक्तिवाद आणला त्या बरोबर ह्या सर्व गोष्टी आल्या. तथापि भारतीय समाजांत स्त्रीच्या व्यक्तित्वाला स्थान नसल्याने हे असे अन्याय होणें अपरिहार्य आहे. कारण समाजाची धारणा ही संपूर्णतया पुरुषप्रधान आहे.

माडखोलकरांनी हा सामाजिक प्रश्न मानसशास्त्रीय मनोभूमिकेवरून मांडला आहे. त्याचें स्वरूप विशुद्धपणें स्पष्ट व्हावें म्हणून आर्थिक परतंत्र्याचा भाग वगळला आहे ही गोष्ट चांगली केली आहे. परंतु लेखकाचें मतें हें असें होण्याचें कारण प्रामुख्याने पुरुषाची बेजबाबदार वासनाप्रियता हीच आहे. " मानवी संस्कृति आणि सुधारणा यांची इतकी प्रगति झाली पण पुरुष भटक्या आणि शिकारीच राहिला आहे मनाने. बदलत्या परिस्थितीप्रमाणे त्या शिकारीचें स्वरूप न् त्या भटकेपणाची क्षेत्रें बदललीं एवढेंच काय तें. तारुण्याची रग जोंपर्यंत याच्या रक्तांत कायम असते तोंपर्यंत त्याला तृप्ति म्हणून कधी माहित नसते मुळीच." (पृ. ११४) माडखोलकरांच्या पुरुषविषयक कल्पनांचा आशय प्रायः असा आहे. व त्या दृष्टिकोनाधारें स्त्री व पुरुष यांचे संबंध त्यांच्या कादंबऱ्यांत चित्रित झाले आहेत. हें जें पुरुषाचें वर्णन माडखोलकरांनी केलें आहे तें प्रातिनिधिक आहे असें म्हणतां येणार नाही. प्रा. वाळिंबे ह्यांनीहि असेंच मत आपल्या " मुक्तात्म्यापासून प्रमद्वरेपर्यंत " ह्या ग्रंथांत दिलें आहे. [६] ही पिपासावृत्ति अधिकाधिक वाढूं नये असें वाटत असेल तर स्त्रियांना समाजांत अधिक मानाचें व स्थैर्याचें स्थान दिलें पाहिजे. स्त्रिया दुबळ्या असल्याने पुरुषांच्या ह्या वृत्तीस बंध बसत नाही. तेव्हा अनूच्या जीवनाची वाताहत ही करूणापूर्ण असली तरी कारणांच्या दृष्टीने प्रातिनिधिक आहे असें म्हणतां येत नाही. ती अपवादभूत आहे. तथापि सुशिक्षित स्त्रीच्या जीवनांत जीं नवीं कंटकस्थानें निर्माण होऊं पहात होतीं त्याचें दिग्दर्शन माडखोलकरांनी यशस्विपणें केलेलें आहे.

---

६ मुक्तात्म्यापासून प्रमद्वरेपर्यंत

शेवटच्या भागांत अनूने विवाह संस्थेला देऊळ कल्पून तें भंगलेलें असलें तरी आवश्यक आहे असें प्रतिपादित केलें आहे. विवाह संस्थेच्या अस्तित्वाबद्दल आज तरी फारसे मतभेद होतील असें वाटत नाही. कारण ती प्रामुख्याने सामाजिक संस्था आहे. पण त्या संस्थेच्या नांवाखाली स्त्रियांवर अनेक जबाबदाऱ्या लादाव्या व पुरुषाने मात्र 'शिकारी' वृत्तीचा अवलंब करण्यास मोकळें असावें हें अयोग्य आहे व हेंच थांबावयास हवें. "विवाह संस्थेने जर कांही केलें असेल तर तिने स्त्री–पुरुषांच्या व्यवहारांत संयम आणला. स्त्रीला संरक्षणाची हमी दिली. पुरुषांना शुचितेचें महत्त्व शिकविलें व मुलांच्या संगोपनाची उत्तम सोय केली." (पृ. १५४) असा अनूचा विवाहसंस्थेबाबतचा दावा आहे. तो अर्धसत्य आहे. विवाह संस्थेने स्त्रियांना संरक्षण दिलें हेंच खरें पण या संरक्षणाची आवश्यकता पुरुषाच्या लढाईप्रेमी वृत्तीमुळे निर्माण झाली. पुरुषांच्या व्यवहारांत संयम व शुचिता आणली ही कल्पना साफ चूक आहे. अनेक पत्नी करण्याची मोकळीक स्वतःला ठेवल्यावर संयमाचा प्रश्न येतो कुठे ? आणि शुचिता ही प्रामुख्याने स्त्रीच्या मनावर ठसविण्याच्या दृष्टीने आली. स्त्रीनेच आणली. तेव्हा विवाह संस्थेची अनूची कल्पनाच कांही चमत्कारिक आहे. सहाजिकच तिचें विवेचन संदिग्ध झालें आहे. या बाबतचें सविस्तर विवेचन ह्या प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणांत विस्ताराने आलें आहे.

तथापि माडखोलकरांनी अनूच्या निमित्ताने सुशिक्षित स्त्रीच्या जीवनाचें चित्र समाजापुढें भडकपणें मांडले आहे. अनूची व्यथा ही शोकाकुल करणारी आहे. तिच्या मानी स्वभावाप्रमाणे वास्तविक तिने घटस्फोट व्यावयाचा होता. पण तो न घेतां तिने फक्त विभक्त राहण्याचा निर्णय घेतला. तो तसा घेणें तिला परिस्थितीने भाग पाडलेलें असतें. कारण समाजांत घटस्फोटित स्त्रीला स्वतंत्रपणें राहणें शक्य व्हावें अशी परिस्थितीच नाही. व तिचें खरें दुखणें हेंच आहे. मांडखोलकरांना आधुनिक स्त्रीचा झगडा कशासाठी चालला आहे हें समजलें नाही असें एक विधान मागे

केलें आहे. त्याचा प्रत्यय येथे येतो. त्यांना अनूचे खरें दुखणें कळलें असतें तर त्यांनीं हेंच दाखविलें असतें की; समाज स्त्रियांच्या बाबतींत निष्कारण कठोर आहे. अनूसारख्या मानिनीला समाजाच्या ह्या अनुदार वृत्तीमुळे लाजीरवाणें जीवन कंठावें लागत आहे. व ही वस्तुस्थिति भडकपणें न मांडतां विवाह संस्थेच्या शुचित्वाचें दुबळें समर्थन करून पुरुषांना तिने संयम शिकविला असें प्रशस्तीपत्र माडखोलकरांची अनूसया देत आहे. वास्तव चित्रणाच्या दृष्टीने तें विसंगत आहे.

अनूची बहीण मनू हिच्या जीवनाची हकिकतहि ओघानेच आली आहे. मनूही निराश्रित म्हणूनच अनूने तिला बोलाविलें असतें. तेव्हा तिच्या जीवनाच्या परवडीचें कारण तिचा निराधारपणा हें आहे. स्वतंत्र असती तर तिने दुसऱ्याशी विवाहहि केला असता. मेव्हण्याशी अनैतिक संबंध ठेवून राहण्याचें जें दुर्भाग्य तिच्या वाट्यास आलें आहे तें तिच्या दृष्टीने पाहतां अनूपेक्षाहि लाजीरवाणें असें आहे. परंतु लेखकाने तिला इतकें दुय्यम स्थान दिलें आहे कीं, तिच्या जीवनांतील ह्या दुखण्याकडे लक्षच गेलेलें नाही लेखकाचें. एकंदरीने माडखोलकरांच्या या कादंबरींत सुशिक्षित स्त्रीच्या जीवनांतील कांही समस्यांचें परिणामकारक दिग्दर्शन झालेलें असलें तरी त्या आधारें जे निष्कर्ष नायिकेच्या करवीं लेखकाने काढले आहेत ते समर्पक नाहीत. सुशिक्षित स्त्रीचे प्रश्न जरी लेखकाला कळले असले तरी तिचा एकंदरीने लढा कशाकरतां आहे हें लेखकाला समजलेलें नाही. त्यांतल्या त्यांत आश्चर्याची गोष्ट अशी कीं नायिका ही 'मानिनि' आहे. या शब्दाद्वारें लेखकाला तिच्याठायीं व्यक्तित्वाची तीव्र जाणीव (Individual Consciousness) आहे असें सूचित करायचें आहे. पण तिची शेवटची वृत्ति व समर्थन हीं ह्या मनोवृत्तीला परिपोषक उतरलीं नाहीत. ह्याचें बीज लेखकाच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनांत आहे. हें स्पष्ट व्हावयास हरकत नाही.

'भंगलेलें देऊळ' ही कादंबरी स्त्रीजीवनविषयक विचार दिग्दर्शनास वाहिली आहे. तिच्यांत मधून मधून स्त्रीजीवनासंबंधी लेखकाचा दृष्टिकोन

विशद करणारीं अनेक विधानें आलीं आहेत. त्यापैकीं कांही महत्त्वाचीं आहेत. त्यांचा उल्लेख करणें आवश्यक आहे. अनू सार्वजनिक कार्यांत भाग घेते. तिचा त्या कामांत वेळ जातो. सहाहिकच त्या प्रमाणांत तिच्या पतीची गैरसोय होते. त्या दोघांचें बोलणें-चालणेंहि होतें. तो तिला "माझी बायको म्हणून नव्हे, माझ्या मुलांची आई म्हणून इथं राहाण्याचा हक्कच आहे तुला" असें म्हणतो. सहाजिकच तिला चीड येते, व ती म्हणते, "माझा कांहीच हक्क नाही का मुलांवर? मुलाला जन्म देणारी माता ही काय केवळ भोगदासी आहे का तिच्याविषयीं असली भाषा वापरायला?" पण ती बाहेर पडते तरी स्वतंत्र राहाण्याचें धाडस होत नाही. स्वतःच्या दुःखासंबंधी बोलतांना "माझ्याबरोबर समाजांत संपन्न व सुखी म्हणून मिरवणाऱ्या इतर बायका... या बाबतींत अभागी आहेत. पुरुष स्वभावतःच बहुःस्त्रीक आहे." स्वतःच्या कृतीचें समर्थन करतांना "स्त्रीच्या प्रेमाचा संबंध प्रथम ज्या पुरुषाशी घडून येतो, त्याचें एक प्रकारचें सुप्त स्वामित्व कायम राहतें, तिच्या भावनांवर, तिच्या जीवनावर" एवढेंच म्हणून ती थांबत नाही तर पुढे विचारते "आणि तें तसें राहावें हें साहजिकच नाही का एकापरीने?" अर्थात मनाने अनू दुबळी आहे. ह्या विना ह्याला कांही अर्थ नाही. तिला घटस्फोटाचा हक्क हवा आहे. पण विवाहसंस्था जतन करावयाची आहे. इतर अनेक विधानापैकी, प्रौढ विवाहामुळे "अनाघ्रात पुष्पाची अपेक्षा करण्याचें तें युग आतां संपलें. एकमेकांच्या पूर्वायुष्याची फाजील माहिती काढण्याच्या फंदांत न पडतां... प्रामाणिकपणें वागण्याचा यत्न करणें, हेंच समंजसपणाचें ठरणार आहे या पुढे (२९९)." "पुरुषांच्या प्रणयचेष्टांचें व काव्यकौतुकाचें साधन व्हावें, एवढ्यासाठीच का स्त्रीजात उत्पन्न झाली आहे?" "जिथे प्रेम जिथे मीलन, तिथे उन्माद हा असायचाच (२८)" लक्षणीय आहेत इ. या कादंबरींत जातां जातां माडखोलकरांनी मिश्र विवाहाचा पुरस्कार केला आहे. आणि त्यावर समाजांत कशी टीका झाली ह्याचें दिग्दर्शन केलें आहे. अर्थात मूळ विषयाच्या

दृष्टीने ह्या गोष्टीस दुय्यमत्व प्राप्त व्हावें हें सहाजिक आहे. पण केव्हातरी दोघांच्या (अनिरुद्ध व अनू) संवादांत ह्या विषयाबाबत थोडें विचार प्रकटीकरण होणें आवश्यक होतें. तें अधिक स्वाभाविक झालें असतें. माडखोलकरांची ही कादंबरी येथील विवेचनाच्या दृष्टीने महत्त्वाची असल्याने तिचें विवेचन अधिक विस्ताराने केलें आहे.

पुढची कादंबरी 'शाप' ही होय. या कादंबरींत लेखकाने घातलेल्या एका उन्मादक प्रसंगानेच ती विशेष गाजली. नायक निशिकांत हा सत्याग्रहांत जाऊन आलेला एक तरुण आहे. त्याचे पुढच्या कार्याबद्दल विचार चालूं असतात. सुहास ह्या मुलीवर त्याचें प्रेमहि असतें. पण त्याचे हातून भावनेच्या भरांत एक चूक होते. व तिचें घोर प्रायश्चित त्याला भोगावें लागतें. एका दुर्धर रोगाला तोंड देण्याचा प्रसंग त्याच्यावर येतो. अशाहि वेळीं सुहास त्याचेकडे राहावयास येते. हें तिच्या मनाचें मोठेपण. त्यागाची ही परिसीमा स्पृहणीय आहे. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांत इतक्या उदात्त भावनेने प्रेरित झालेल्या नायिका कमी आहेत. स्त्री प्रेमाच्या त्यागशीलतेची ही एक कथा आहे. स्त्रीच्या प्रेमांत किती उदात्तता भरलेली असते ह्याचें एक आविष्करण आहे हें. यापेक्षा आधिक महत्त्वाचा प्रश्न इ. या कादंबरींत आलेला नाहीं. सुहास मात्र भावाशी चांगलांच युक्तिवाद करते. "ज्या माझ्या स्त्रीपणाची तुला एवढी काळजी वाटते, तोच मला सांगत आहे कीं मी त्यांना या दुर्धरप्रसंगांत धीर दिला पाहिजे; त्याच्या शरीराची व मनाची आईप्रमाणे जपणूक केली पाहिजे" (पृ. ११९). तिचें प्रेम त्याने अव्हेरिलेलें असतें तरी ती या त्यागास तयार होते. हें पाहून तिच्याबद्दल आदर वाटावयास लागतो.

"कांता" ह्या नांवावरून ही कादंबरी कांतेच्या जीवनाला प्राधान्य देणारी असावी असें वाटते. पण वास्तविक ती तशी नाही. ह्याबद्दल टीकाकारांचें एकमत आहे. मांडखोलकरांच्या कादंबऱ्यांवरील आपल्या प्रबंधांत प्रा. वाळिंबे यांनी असेंच मत दिलेलें आहे. सोलापूर संमेलनाच्या

अध्यक्षीय भाषणांत खांडेकरांनीहि अशीच समीक्षा केली आहे. आणि कादंबरीचा उठाव झालेला आहे तो पाहतां सर महादेव ठाकुरांच्या आयुष्यास शेवटच्या दिवसांत जी कलाटणी मिळालेली आहे तो खरा कादंबरीचा विषय. पण कांतेच्या जीवनकथेच्या आधाराने एक वेगळा धागा कथानकांत मिसळला आहे एवढेंच.

कांतेचा पति व कादंबरीचा नायक प्रियदर्शन याने सत्याग्रहाच्या चळवळींत भाग घेण्याचें ठरविल्यापासून त्याच्या घरांत वादळ निर्माण होतें. कांतेलाहि प्रियदर्शनाने तुरुंगांत जावें असें वाटत नाहीं. पण आपल्या सांगण्याचा कांही उपयोग होणार नाही हें जाणून ती त्याला निरुपाय म्हणून संमति देते. एवढेंच नव्हे तर आपणहि तुरुंगांत जावें अशी इच्छा व्यक्त करते. पण ही इच्छा उपहासगर्भ असावी असें वाटतें. बिचारा प्रियदर्शन मात्र तिची समजूत घालतो. कांतेच्या आयुष्याची जी वाताहत झाली तिला घडत येणारे प्रसंग जरी कारणीभूत झाले असले तरी तीहि जबाबदार आहे. पतीच्या मार्गापेक्षा व त्याच्या ध्येयनिष्ठेपेक्षा सासऱ्याच्या वैभवाचें आकर्षण तिला अधिक असतें. शेवटीं सुद्धा सर महादेवांच्या मनाचा प्रक्षोभ पाहून व त्यांना अनुभवावा लागलेला मनस्ताप पाहून तिचें मन हेलावतें. त्यांच्या अपेक्षाभंगाचें चित्र पुढे उभे राहून ती पतीच्या भेटीच्या प्रयत्नांनाहि विरोध करते. मरतांना सुद्धा " मला स्वतःसाठी वाईट वाटत नाही. पण त्यांच्या हट्टापायीं साऱ्या कुटुंबाची वाताहत झाली " असे उद्गार तिच्या तोंडून बाहेर पडतात. व त्याचवेळीं पंडितच्या तोंडून अनेक कुटुंबाची वाताहत होईल तेव्हाच देशाला स्वातंत्र्य प्राप्त होईल अशा अर्थाचे शब्द उच्चारले जातात ते प्रसंगोचित वाटत नाहीत.

कांतेच्या द्वारें लेखकाला स्त्रीजीवनविषयक कोणती वस्तुस्थिति रंगवावयाची होती हें समजणें कठीण आहे. तिच्या घरांत जो लढा सुरू झाला होता तो वास्तविक दोन पिढ्यांमधला प्रतिनिधिक स्वरूपाचा लढा होता. आणि त्या लढ्यांत ह्या सुशिक्षित तरुण स्त्रीची बाजू कोणती तर वृद्ध

पिढीची. हें किती विसंगत दिसतें ! अशा वस्तुस्थितीमुळे तिच्या मृत्यूमुळे जो चटका बसावयास हवा तो बसत नाही. तिच्या अज्ञानपणाची कीव करावीशी वाटते. पुरुषांच्या बदलचे तिचे उद्गार हे असेच पूर्वग्रहदूषित आहेत. वास्तविक तिला समंजस ध्येयवादी पति मिळालेला असतो. पण तिचें मन सासऱ्याच्या वैभवाच्या भपक्याने इतकें भुललेलें आहे की पतीचे गुणहि तिच्या लक्षांत येत नाहीत. त्यामुळे कांतेच्या जीवनाची ही शोककथा ही भव्योदात्त न वाटतां केवळ दुर्बल व रडवी अशी वाटते. उर्मिलेलाहि ती आपल्या संकुचित दृष्टिकोनाचे घुटके पाजते. व तिचेंहि मत असेंच कलुषित व्हावें अशी भरपूर योजना करून ठेविते. माडखोलकरांना नव्या परिस्थितींतील मूलभूत आर्थिक घडामोडीमुळे जुन्या घराण्यांची कशी वाताहात होते व त्यातून नवें कर्तृत्व कसें निर्माण होतें हें दाखवावयाचें असावें. पण या व्यापक सामाजिक लढ्यांत नायिकेला जें कार्य करावयास लावलें तें इतकें असमर्पक आहे की तिच्याविषयी आदराची भावना शिल्लक राहात नाही. " स्त्रीचं जीवन भावनामय असतं." असं तिचं मत आहे व " साहसी पुरुषांच्या आयुष्यांत स्त्री ही केवळ शोभेची वस्तु आणि उपभोगाचा विषय असतो एक." असं ती निर्वाणीने सांगते. त्यांत तिची भूमिका तक्रारीची नसून जुळवून घेतलें पाहिजे अशी आहे.

' कांता ' नंतरची माडखोलकरांची कादंबरी ' दुहेरी जीवन ' ही होय. ही कादंबरी स्त्रीजीवनपर म्हणण्यापेक्षा पुरुष जीवनपर आहे असें म्हणणें सयुक्तिक होईल. कारण ह्या कादंबरींत राजकारणांत पडलेल्या व मंत्रीपदापर्यंत ज्याची वर्णी लागली आहे अशा मुकुंद नायकाच्या खाजगी जीवनांत त्याचा ज्या अनेक स्त्रियांशी संबंध येतो त्याचें वर्णन केलें आहे. कादंबरी वाचल्यानंतर जर प्रमुखपणें कोणती गोष्ट दृष्टींत भरत असेल तर ती म्हणजे नायकाचें भोगलोलुप जीवन. संयम असा त्याला माहीतच नाही. आणि स्त्रियांकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोन केवळ भोगलोलुपताप्रधान असा आहे. नायकाची बेजबाबदार वृत्ति हीच कादंबरी-

काराला दाखवावयाची असेल तर प्रयत्न ठीक आहे. पण तसें करतांना वाचकाच्या मनावर परिणाम कोणता होतो हें पहाणें आवश्यक आहे. त्या परिणामाचा कौल मात्र त्या दृष्टीने प्रतिकूल पडतो. स्वतःला सोशालिस्ट म्हणवणारा हा नायक स्त्रीविषयक लालसेला इतका बळी पडतो व त्याच्याबद्दल त्याला कांही वाटतहि नाही हें दर्शविणें एकंदरीने योग्य नाही. नायक स्वतःचें समर्थन करतांना असें लिहितो 'कांही माणसांना जणुं कांही असा शापच असतो की, ज्या दैवी भावनांच्या किंवा दिव्य ध्येयांच्या स्फूर्तीने त्यांचीं मनें थरारून जातात, त्यांना अनुरूप असें आचरण करण्याची धमक त्यांच्या अंगांत नसते, अशा अभागी माणसांपैकीच कदाचित मी एक असेन.' ही सर्व कबुली केवळ मानभावीपणाची ढोंगीपणाची आहे. स्वतःच्या अनैतिक वर्तनाच्या समर्थनासाठी 'दैवी शापा' च्या ढेकळाआड दडण्याचा हा एक अश्लाघ्य यत्न आहे. नायकाने हें वाक्य लिहीपर्यंत मोहाचा प्रतिकार करण्यासारखें कांहीही केलेलें नाही. उलट त्याचा नव्या नव्या स्त्रीचा शोध मात्र अविरत चालू असतो.

अशा भोगलोलुप व नीतिशून्य नायकाच्या भोगलोलुपतेला बळी पडलेल्या स्त्रिया या कादंबरींत आल्या आहेत, बऱ्याच जणींचा संबंध केवळ तात्कालिक असतो. नायकाची पत्नी सुलोचना हिला हें त्याचें वर्तन माहीत असतें. सुलोचनेशीं जरी नायक विवाहबद्ध होतो तरी, शिरीन किंवा हेलन ह्या पूर्वकालीन प्रेयसीवर नायकाचें जें प्रेम होतें तें सुलोचनेवर नाही. त्यांत संगीतकुशलतेच्या पोटीं, वादविवादपटुत्वाच्या पोटीं आलेला बुद्धिप्रधान आदराचा भाग अधिक आहे. विशेष असें की विवाहानंतरहि नायकाचे इतर स्त्रियांकडे आकृष्ट होण्याचे, त्यांच्या मोहांत पडण्याचे प्रकार चालू असतात. जीनीव्हाला भारताचा प्रतिनिधि म्हणून गेला असतांहि नायकाने तिकडे आपले गुण उधळले आहेत. शेवटीं क्षमा देशपांडे ह्या ख्रीस्तधर्मीय स्त्रीशी त्याचा संबंध येतो आणि तिला मातृत्वाचा स्वीकारहि करावा लागतो. त्या संबंधापायी प्रथम प्रथम तो विवाहाची लालूच दाखवितो तिला. पण जेव्हा प्रत्यक्ष प्रसंग

येतो तेव्हां पांच हजार रुपयांचा चेक तिच्यापुढे झोंकून "त्यावेळीं भावनेच्या भरांत मी कांही जरी बोललों असलों, तरी त्याप्रमाणे आज वागण्याची माझी हिंमत नाही" अशी कबूली देतो. ह्यापूर्वी तो तिला गर्भपात करण्याचाहि सल्ला देतो. तो सल्ला ऐकून मात्र तिच्या ठिकाणचें मातृत्व जागृत होतें. व त्याचा जो धिक्कार क्षमा करते तो फारच परिणामकारक वाटतो. "गर्भसंभव टाळण्याचा प्रयत्न फसला म्हणून मला खेद होत नाही. किंवा निसर्गानं मजवर टाकलेल्या ह्या जबाबदारीलाहि मी भीत नाही. माझ्या प्रभूनं जन्मभर स्वतःला कुमारीचा पुत्र म्हणवून घेतलं; मग मला कुमारी–माता होण्यांत लाज कसली ? तुम्ही स्वतःला सोशालिस्ट म्हणवीत असलांत तरी अनूढ मातृत्वाचं तत्त्व आचरणांत आणण्याची हिंमत नाही तुम्हांला." तिने केलेली ही निर्भत्सना अत्यंत समर्पक आहे.

ह्या कादंबरीच्या पहिल्या आवृत्तींत सुलोचनेने जोडलेली पूर्तता, होती. १९४५ च्या दुसऱ्या आवृत्तींत ती नाही. ती गाळल्याचा उल्लेखहि नाही. सुलोचनेच्या विचारांवर प्रकाश पाडण्याच्या दृष्टीने ती जरूर होती. तथापि प्रा. वाळिंब्यांनी उल्लेखिलेली तिची भूमिका लक्षांत घेतां ती नाही हेंच बरें आहे. एकाद्या स्त्रीला वैवाहिक जीवनांत कशा प्रकारच्या पुरुषाबरोबर संसार करावा लागतो हें पाहून तिच्याबद्दल करुणा वाटते. पण सुलोचनेचा विरोध मात्र कोठेहि जाणवत नाही. व हें चमत्कारिक दिसतें. मांडखोलकरांच्या स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोनाला हें सारें धरून असलें तरी आधुनिक स्त्रीच्या मनाच्या विविध व्यथांचें आविष्करण करण्याच्या दृष्टीने हें चित्रण दोषास्पद झालें आहे.

सुलोचने सारखेंच जीवन 'रोज' या 'मुखवटे' मधील नायिकेच्या वाट्यास येतें. नायक मोहन हा अनिरुद्ध, मुकुंद, ह्यांच्या परंपरेंतला आहे. व सुलोचना, अनू यांचीच मनोवृत्ति रोजची आहे. तथापि नायकाला जगणें असह्य होतें. व तो आत्महत्या करण्याचा मार्ग चोखाळतो. "माझें सगळें जीवन प्रतारणा करण्यांत गेलें.....मी आजवर अनेक स्त्रियांच्या मोहाला

बळी पडलों, आणि त्यांचाहि बळी घेतला. पण तुझ्याविषयीं मला जें आकर्षण वाटलें तें या सर्व अनुभूतीहून अगदीं निराळें, कांहीतरी अलौकिक असें होतें.'' अशी आपली भूमिका रोजला कळवितो. अर्थात कादंबरीत हें उपकथानक आहे. कादंबरीचा मुख्य विषय वेगळाच (राजकीय) आहे. रोजचें मन मात्र त्याच्याविषयी एवढा अनुभव येऊन, संसाराचा एवढा विचका होऊन विटत नाही हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

माडखोलकरांची 'नवे संसार' ही कादंबरी जितकी राजकीय आहे तितकीच सामाजिकहि आहे. तिचें राजकीय वैशिष्ट्य विवाद्य आहे. सामाजिक दृष्टीने एक वेगळाच प्रश्न माडखोलकरांनी ह्या कादंबरीच्या द्वारें मांडण्याचा उपक्रम केला आहे. सुशिक्षित स्त्रियांच्या संसाराची परवड कशी होते. तें त्यांनी 'भंगलेलें देऊळ', 'मुखवटे' 'दुहेरी जीवन' इ. कादंबऱ्यांतून केलें आहे. तसलेंच विवेचन आणखी एका दृष्टिकोनांतून त्यांना करावयाचें आहे. उपरिनिर्दिष्ट कादंबऱ्यांतून नायकांचें चित्रण हें त्यादृष्टीने प्रातिनिधिक झालेले नाही. या कादंबरींतला विद्याधर हा त्यांच्या मालिकेंतला वाटत नाही. सुशिक्षित स्त्रियांच्या संसाराची परवड होण्याची वेगळींच कारणें आहेत. केवळ आर्थिक स्वातंत्र्य हें फारसें महत्त्वाचें नाहीं. ''स्त्री आर्थिक दृष्टीने स्वतंत्र झाली म्हणजे सुखी होईल असं म्हणतों नाही का आपण? वाहिनी न् मी दोघीही आजच्या घटकेस आपल्या पायावर उभ्या आहोंत. पण काय उपयोग आहे त्या आर्थिक स्वातंत्र्याचा?'' असा मीरेचा सवाल आहे. माडखोलकरांचें हेंच मत दिसतें. त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून ज्या प्रकारचीं चित्रें रंगविलीं आहेत, त्यावरून त्यांचा हाच दृष्टिकोन व्यक्त होतो. खरी वस्तुस्थिति अशी आहे कीं, आज (वा कादंबरी लिहिली त्या काळीं) स्त्रियांना जें आर्थिक स्वातंत्र्य आहे तें केवळ तकलुपी आहे. तें केवळ व्यक्तिगत स्वरूपाचें आहे. सामाजिक मान्यतेच्या दृष्टीने त्यांत वैगुण्यें आहेत. आर्थिक व इतर दृष्टींनी आपण 'स्वतंत्र' आहोंत ही गोष्ट स्त्रियांनाच अद्याप उमगलेली नाही. ती जशी जशी उमगूं

लागेल तसतसें तिचें जीवन अधिक व्यापक व बहुशाखान्वित होईल. व पुरुषांच्या जीवनांत प्रेम हा केवळ एक लहानसा भाग आहे तशी स्थिति स्त्रियांचीसुद्धा होईल. व तसें होणें कोणत्याही दृष्टीने अनिष्ट आहे असें म्हणतां येणार नाही. मातृत्वाची जबाबदारी निसर्गाने स्त्रियांवर लादलेली आहे. ह्या वस्तुस्थितीचें निमित्त करून पुरुषांनी तिचें जीवन आणखी संकुचित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पण ही समाजरचनाच पुरुषी असल्याने पुरुषांवरल्या सर्व जबाबदाऱ्या राज्यसंस्थेने घेतल्या. व स्त्रियांवरल्या मात्र तशाच ठेवल्या. (हा उल्लेख ह्या प्रबंधांत पहिल्या प्रकरणांत आला आहेच). परंतु माडखोलकरांना हे विचार मान्य नसावेत. त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रिया आर्थिकदृष्ट्या 'स्वतंत्र' असल्या तरी त्यांचें जीवन संकुचितच आहे. आर्थिक स्वातंत्र्य हाच समाजाच्या स्वातंत्र्याचा एकमेव मार्ग आहे असें नव्हे. तसें असतें तर समाजांतील सधन वर्गाचें जीवन निरामय व निरागस आनंदाने व सौख्याने भरलेलें असावयास हवें. पण ही नवी कालोचित दृष्टि जवळ नसल्याने सरला म्हणते "जुन्या बायका नवरा वाईट लागला तर घरांत आदळआपट करून, माहेरी गाऱ्हाणीं करून... शोभा तरी करीत असत त्याची...पण सुशिक्षित स्त्रीला आपल्या संसाराचे धिंडवडे उघड्या डोळ्यांनी बघावे लागतात! मनाचा मार हूं का चूं न करतां सोसावा लागतो. नवऱ्याच्या चोचलेखोर चैनी मनाला ताब्यांत ठेवण्याच्या वेड्या आशेने त्याच्या व्यवसायांत सामील व्हायचं न् स्वतःची अवनति करून घ्यायची. जुन्या संसारांत प्रेम नसेल कदाचित पण निष्ठा होती, स्थैर्य होतं. नव्या संसारांत प्रेमहि नाही, निष्ठाहि नाही नि स्थैर्यहि नाही." ह्याहि विधानांत माडखोलकरांनी पुरुषांच्या चोजल्यांना अप्रत्यक्ष संमति दिली आहे. संसार करण्याची शिकस्त स्त्रीने करावी. पुरुषाला स्वतःच्या बेतालपणाने फक्त त्यांत विघ्नें आणण्याचा हक्क आहे; व माडखोलकरांना आणि नायिकांनाहि तो मान्य आहे. सहाजिकच नवें संसार हे दिवाळखोर निपजावे हें ओघानेच येतें.

स्त्रीजीवनाच्या दृष्टीने मीरा व मुक्ता ह्या दोन स्त्रियांचा उल्लेख आलेला आहे. मीरेचें जीवन अधिक करुण आहे. मुक्तेचें जीवन किंचित उदात्त आहे. विद्याधराला आवरून धरण्याचा ती अटोकाट प्रयत्न करते. पण त्यांच्याद्वारें जो सामाजिक प्रश्न मांडला आहे, तो महत्त्वाचा आहे व त्याचें विवेचन केलें आहे.

'नागकन्या' व 'डाक बंगला' ह्या कादंबऱ्या एकाच प्रकारच्या आहेत; 'डाक बंगला' ह्या कादंबरीच्या प्रस्तावनेंत तर लेखकांच्या मित्रांनी युगाला दोष देऊन अश्लील व तत्सम उल्लेखांबद्दल लेखकाला संरक्षण दिलें आहे. वास्तविक आजचें युग अश्लील आहे हें म्हणणें असत्य आहे. काम-विषयक विचारांचा आज जो मुक्तपणें खल होतो तो अश्लीलता प्रेमामुळे होत आहे हें म्हणणें विपर्यस्त आहे. एलिस व फ्रॉईड या महान् शास्त्रज्ञांनी जें मानसशास्त्रीय संशोधन केलें व त्याद्वारें त्यांना योग्य वाटले ते निष्कर्ष जगापुढे मांडले. ते मांडण्यांत अश्लीलताप्रेम आहे, असें म्हणणें चूक आहे. वाङ्मयांत व कलेंतहि ज्याला विशुद्ध अश्लील म्हणतां येईल अशा भागाचें प्रमाण फार कमी आहे. गतकालीन साहित्यांत वा कलेंत तें कितीतरी आधिक आहे. व त्या दृष्टीने विचार केला तर व अश्लीलतेच्याच परिभाषेंत बोलायचें झालें तर पूर्वीचेंच युग अश्लील म्हणतां येईल. खुद्द माडखोलकरांनीं ह्याबाबत स्वत:चें जें समर्थन केलें आहे त्यांत पूर्वकालीन साहित्यांतील शृंगार स्थळांच्या परिणामाचेंच कारण दिलें आहे. जुन्या काळच्या श्रेष्ठ साहित्यिकांच्या साहित्यांतली ही अश्लीलता आहे. आधुनिक काळांतल्या श्रेष्ठ साहित्यिकांचें साहित्य जर ह्या दृष्टीने तपासलें तर तें निःसंशय सोज्ज्वल ठरेल. या दोन कादंबऱ्यांतले मध्यवर्ति प्रसंग हे केवळ उन्मादमूलक शृंगार–रसाच्या निर्मितिसाठी योजले आहेत. त्यादृष्टीने इतर कथाभागाची जुळवाजुळव झालेली आहे. कांचनगौरीवरील संकटपरंपरा ही त्यादृष्टीने आलेली आहे. व ह्या शृंगार प्रसंगावर अगदीच बेछूटपणाचा आक्षेप येऊं नये म्हणून तिला आत्महत्या करावयास लावलें आहे. मदीयाचें चित्रहि तसेंच आहे. तिला जे

विविध देशांचे अनुभव आलेले दाखविले आहेत; त्यांचें प्रयोजन मुख्य जलविहाराच्या प्रसंगांत अस्वाभाविकता वाटूं नये म्हणूनच. ह्या दोनहि कादंबऱ्यांची निर्मिति ही या प्रसंगपरिपोषाच्या निमित्ताने झालेली आहे प्रामुख्याने.

'प्रमद्वरा' ही कादंबरी बेचाळीसच्या लढ्याच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली आहे. नायिका प्रमद्वरा ही त्या लढ्याकडे अत्यंत आस्थेने पाहणारी, त्यांत भाग घेणारी स्त्री आहे. तिला दोन मुलें आहेत. तरी ती देशसेवेच्या मार्गाकडे ओढली जाते. मंगला ही तिची मैत्रिण. तीहि तिच्याप्रमाणेच देशाच्या लढ्याशी समरस झालेली आहे. त्यांच्या भागांत लढ्याचें मार्गदर्शन स्वामीजी करतात. त्यांना त्या कार्यात मृत्यू येतो. त्याचा परिणाम प्रमद्वरेच्या मनावर होतो. ती आजारी पडते तरी देशाविषयीचे विचार तिने सोडलेले नसतात. शेवटीं ती पतीकडून सक्रिय साहाय्याचें वचन घेते. अशाप्रकारें एका अत्यंत तेजस्वी व बाणेदार स्त्रीचें माडखोलकरांनीं चित्रण केलें आहे. ती साहसी आहे, तशीच तिची त्यागालासुद्धा तयारी आहे. प्रत्येक घराघरांत क्रांतीला बळी पडलेले लोक असावयास हवेत. तेव्हांच क्रांतीला खरी मदत लोकांकडून होईल. सारें चित्रण कादंबरीच्या उच्च वातावरणाला समर्पक असेंच आहे. शृंगाराचा भाग कोठेहि नाही.

स्त्रीजीवनाच्या दृष्टीने महत्त्वाची गोष्ट म्हणजे कादंबरीची नायिका सुशिक्षित मिळवती स्त्री आहे. बदफैली पतीच्या वेड्याचारांना बळी पडणारी व त्यांचें समर्थन करणारी दुबळी भेकड नायिका ही नव्हे. हा नवा नमुना जो रंगविला आहे तो निःसंशय प्रगतिपर आहे. स्त्रीच्या जीवनाला(राष्ट्रीय आणीबाणीच्या प्रसंगांच्या निमित्ताने कां होईना) व्यापकता येत आहे हें जें चित्रण या कथेंत लेखकाने केलें आहे तें कौतुकास्पद आहे.

पण या सर्वांपेक्षा 'चंदनवाडी' कादंबरीच्या वातावरणाचा सूर कांही वेगळाच आहे. मध्यमवर्गीय स्त्रियांच्या जीवनाला ह्या कादंबरींत वाव नाही. येसू आणि रखमा ह्या दोन सासूसुनांच्या तेजस्वी स्वाभिमानी

जीवनाची, व चंदन या कादंबरीच्या नायिकेच्या अपूर्व स्वार्थत्यागाची ही कथा आहे. येसू, रखमा आणि चंदन ह्या तीन पिढ्यांच्या प्रतिनिधि आहेत. आणि त्यांचें चित्रणहि मोठ्या कौशल्याने झालें आहे. सावकाराच्या कर्जापायी त्यांना आपल्या वडिलोपार्जित घरादारांना मुकावें लागतें. त्यांत सावकाराच्या कामुक अभिलाषाची छाया अपरिहार्यपणें मिसळली आहे. दोघींच्याहि स्वाभिमानाला डंख करणारा हा प्रसंग, त्याचे पडसाद किती भिन्न भिन्न उमटले आहेत ? येसूला चीड येते पण तिला अशी आपली एक आशा असते की आपण चंदनवाडी परत मिळवूं, तींत परत राहायला जाऊं. सरंजामी वैभवाचा तिने अनुभव घेतलेला असतो, आणि त्याला अनुसरूनच तिची इच्छा असते. नव्या परिस्थितीची कल्पना तिला असली तरी तिच्या पुढे जुन्या काळाचें लोभस चित्रच वावरतें. रखमा ही अधिक करारी आणि तेजस्वी आहे. तिला चंदनवाडीचें नांव काढलेलें खपत नाही. तेथे परत जाण्याची कल्पनाहि तिला अमान्य असते. तिच्या पिढीच्या दृष्टीने तिचे विचार असतात. तिच्या विषयीची अभिलाषा ही त्यांच्या गृहत्यागास कारणीभूत झालेली असते. अर्थात तिला चीड येणें हें साहजिकच आहे. तिसऱ्या पिढीची प्रतिनिधि चंदन तिला बरेच दिवस हा इतिहास ठाऊकहि नसतो. पण तिचें अवधूतवर प्रेम असतें. तीं दोघें एकत्र काम करतात. तेथे दोघांकडून मोहाच्या आहारी जाऊन अविचाराचें कृत्यहि घडतें. तो तुरुंगांत जातो. एका पिढीचीं वैरें दुसऱ्या पिढीप्रत तितक्याच तीव्रतेने जात नाहीत हें फार सुरेख दर्शविलें आहे. अवधूत वडिलांपासून वेगळा राहतो. त्याच्या वडिलांस त्याचें हें प्रेम पसंत नसतें. रखमेच्या दृष्टोत्तीस चंदनला दिवस गेलेत हें येतें. तेव्हा तिला मनस्वी राग येतो, तसें येणेंहि साहजिक आहे. गर्भपाताच्या मार्गाचा अवलंब करावा असें तिला वाटते. त्याप्रमाणे ती एक औषध चंदनला देते, व तेंच तिच्या मृत्यूस कारण होतें.

अशा प्रकारें स्त्रियांच्या तीन पिढ्यांच्या दुःखाची ही कथा आहे. कथेंत मानवी भावनांतील उच्चपणाचें दर्शन इतकें विपुल व विदग्ध आहे

की तें वाचून मनांत वेगळेच विचार निर्माण होतात. चंदनच्या मृत्यूबद्दल दुःख होत असलें तरी सर्व प्रसंगांमागले मानसिक धागेदोरे ध्यानांत घेतले तर ती घटना थोडी नैसर्गिक व थोडी अपरिहार्य आहे हें पटूं शकतें. ह्या कादंबरीच्या द्वारें लेखकाने रूढ चाकोरी सोडून दूर जाण्याचें जें धोरण स्वीकारलें आहे तें एकंदरीने प्रगतीचें द्योतक होय असें म्हणतां येईल. या कादंबरींतील जीवनाचेंहि एक वैशिष्ट्य आहे. मध्यमवर्गीय सधन कुटुंबांतील व्यक्तीचें हें जीवन नसून थोडें व्यापक असें जीवनचित्रण लेखकाने येथे केलें आहे. कादंबरींतील तीनहि स्त्री रेखा वास्तविक अगदी सर्वसामान्य स्त्रिया आहेत. त्यांना अनुभवावे लागणारे प्रसंगहि तसेच सर्वसाधारण आहेत. माडखोलकरांनी त्यांचें स्वभावचित्रण यशस्वीरीतीने केलें आहे. अर्थात एका कुटुंबाची समाजाच्या संक्रमणावस्थेमध्ये होणारी वाताहत, तिचें हें चित्र आहे. ती वाताहत ही सामाजिक फरकांच्यामुळे निर्माण झालेली आहे. व्यक्तीचे जीवन हें जीवनांत व्यापक स्वरूपाच्या होणाऱ्या फेरबदलांनी कसें नियंत्रित होत होते हें महत्त्वाचें आहे. या बदलाचें चित्रण करतांना स्त्रीजीवनाचें माध्यम स्वीकारलें हेंच या कादंबरीचें वैशिष्ट्य. 'कांता' ह्या कादंबरींत लेखकाला असाच एका युगाचें कर्तृत्व संपल्याचा समाजक्रांतीचा भाग रंगवावयाचा आहे. त्यासाठी तेथे सर महादेवांचें कुटुंब हें प्रतिनिधि आहे. येथे चंदनवाडीच्या मालकींत होणारा फरक व त्या फरकाने झालेलीं मानसिक आंदोलनें, हीं महत्त्वाची आहेत.

माडखोलकरांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनविषयक चित्रणाचे विशेष पाहिल्यानंतर त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनचित्रणाकडे सम्यग् दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. माडखोलकरांनी प्रामुख्याने सुशिक्षित स्त्रियांच्या संसाराचें चित्रण केलें ही गोष्ट त्यांना निश्चितपणें भूषणावह आहे. अर्थात प्रेमविषयक विदग्ध आविष्करणाला सुशिक्षित स्त्रीच्या जीवनांत जितकें स्थान आहे तितकें अशिक्षित स्त्रीच्या जीवनांत नाही ही गोष्ट खरी. चंदनवाडींत सामान्य स्त्रियांचें जीवन आलें असलें तरी त्याची प्रत अगदी वेगळी आहे.

प्रो. फडके, खांडेकर व माढखोलकर यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनाचें आविष्करण पाहिल्यानंतर या तीन लेखकांनी केलेल्या स्त्रीजीवन चित्रणाकडे समालोचनात्मक दृष्टिक्षेप टाकणें आवश्यक आहे. हे तीनहि महान् लेखक आपल्या कालाच्या विविध प्रवृत्तींचे प्रतिनिधि आहेत. त्यांच्या प्रवृत्तींचा व स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा परिचय प्रारंभीं आलेला आहेच. साम्याच्या दृष्टीने पाहतां असें आढळून येईल की, कलात्मक आविष्काराची जाणीव तिघांच्याहि ठायीं तीव्र आहे. प्रवृत्ती व दृष्टिकोन भिन्न असले तरी प्रत्येकाने केलेलें स्त्रीजीवनाचें चित्रण आपापल्यापरीने सौंदर्ययुक्त आहे. त्या बाबतींत तुलनात्मक दृष्टीने श्रेष्ठ कनिष्ठता ठरविण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. त्याचप्रमाणे मानवी जीवनांतील अनुभवाची सूक्ष्मता सुद्धा प्रत्येकाच्या प्रत्ययास आली आहे व तिला अविष्कृत करण्याचा यत्न त्यांनी केलेला आहे. प्रत्येकाच्या ठायीं सामाजिक जाणीवहि तीव्र आहे. प्रो. फडक्यांचें साहित्याच्या समाजकार्याबाबतचे विचार कांहींहि असले तरी, आधुनिक कालांत प्रेमविवाहासारखा विचार त्यांनी महाराष्ट्रीयांच्या पूर्णपणें परिचयाचा करून सोडला आहे. प्रेमविवाहाकडे वा प्रेमाकडे पाहण्याचा तरुण पिढीचा दृष्टिकोन विशिष्ट तऱ्हेने बनण्यांत प्रो. फडक्यांच्या कादंबऱ्यांचा फार मोठा वाटा आहे. खांडेकरांनी मानवतास्पर्शाचें जें धोरण सातत्याने अवलंबिलें आहे तेंहि महत्त्वाचें आहे. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनांबाबत मात्र निश्चितपणें कांही आस्तिपक्षी विधान करतां येत नाही. तथापि 'भंगलेलें देऊळ' सारखी उत्कृष्ट कथा लिहून माडखोलकरांनी समाजाला विचारप्रवण बनविलें आहे.

तथापि स्त्रीजीवनाचे खरेखुरे प्रश्न मांडण्याच्या दृष्टीने पाहतां या लेखकांना तितकेसें यश आलें असें म्हणतां येत नाही. प्रो. फडके, माडखोलकर यांनी विशिष्ट प्रश्न आपल्या विशिष्ट कादंबऱ्यांतून मांडण्याचा प्रयत्न केला. पण त्यापलिकडे त्यांना विशेष लक्ष द्यावेसें वाटलें नाही. खांडेकरांनी मात्र आपल्या कादंबरीजगांत निश्चितपणें अधिक ठसठशित अशा स्वभावरेखा

निर्माण केल्या आहेत. कोणताहि स्त्रीजीवनविषयक विशिष्ट प्रश्न कोणत्याहि एका विशिष्ट कादंबरींत न मांडतांहि स्त्रीजीवन चित्रणाच्या दृष्टीने खांडेकरांच्या कादंबऱ्या अधिक सरस झाल्या आहेत. हरिभाऊंनी आपल्या ताई द्वारें जी नवी स्त्री रंगविली, वामनरावांनी जिच्या पुढच्या पिढ्या रागिणी, सुशीला, सरला यांच्या द्वारें, रंगविल्या, त्याच परंपरेंत खांडेकरांच्या वत्सला; प्रमिला, यांचें स्थान आहे. माडखोलकरांच्या प्रमद्वरेंत थोडी चुणूक दिसते पण फडक्यांचें स्त्रीविश्व रितें रितें भासतें.

यांचें कारण लेखकांच्या दृष्टिकोनांतच आहे. फडक्यांना मानवी जीवनांत प्रेम या भावनेपेक्षा महत्त्वाची अशी दुसरी भावना नाही असें वाटत असावें. महाराष्ट्रीय स्त्रीच्या व्यक्तित्व जागृतीच्या दृष्टीने प्रेम भावनेचा अविष्कार हा निश्चितपणें मोलाचा आहे हें खरें. तथापि त्यांच्या कादंबऱ्यांतील चित्रणांत या प्रेमभावनेंतहि कांही सखोलता आहे, असें आढळून येत नाही. प्रणय भावनेकडे पाहाण्याचा दृष्टिकोन हा केवळ प्राथमिक आहे. त्याच्या पार्थिवतेच्या पलीकडे जाऊन विशिष्ट तत्त्वज्ञान निर्माण करण्याचा प्रयत्न लेखकाला करावासा वाटला नाही यामुळेच लेखक सुखवादी आहेत असा निर्णय काढावा लागतो. मोठ्या लेखकांचें प्रणयभावनेबाबतचें विशिष्ट तत्त्वज्ञान असतें. तें महत्त्वाचें असतें. फडक्यांना तसें तत्त्वज्ञान इ. कांहीहि नाही. त्यांच्या प्रेमाचीं चित्रें हीं तारुण्यांतल्या उन्मादक अवस्थेंतील प्रणयापुरतींच मर्यादित आहेत. प्रणयाच्या देहनिष्ठ उन्मादकतेंतून बाहेर पडल्याशिवाय त्या प्रणयभावनेला उच्चत्व प्राप्त होत नाही. मग तें बाहेर पडणें प्लेटोच्या कल्पनेच्या दिशेने चालावयास लागो, वा मानवतेच्या दिशेने चालावयास लागो. पण कोणत्यातरी दिशेने त्याची वाटचाल चालू आहे असें प्रत्ययास यावें लागतें तसें येथे येत नाही. फडके हे व्यक्तिवादी लेखक आहेत असें येथे वर्णिले आहें, त्यादृष्टीने त्यांच्याकडून ही अपेक्षा करणें चूक ठरत नाही, पण निराशा पदरांत येते हेंच खरें.

माडखोलकरांचीहि तीच स्थिती. त्यांचेंहि प्रेमविषयक तत्वज्ञान असेंच देहनिष्ठ आसक्ती भोवतींच रेंगाळतें आहे. या दृष्टिकोनामुळे या लेखकांना

स्त्रीहृदयाच्या खऱ्या व्यथा, तिच्या धडपडीचा खरा अर्थ, ह्या तिच्या पुढच्या खऱ्या समस्या, कळल्या आहेत असें वाटत नाही. फडक्यांच्या 'शाकुंतला'त एक प्रयत्न झाला आहे, पण त्याचें स्वरूप प्रातिनिधिक नाही. खांडेकरांच्या ठायीच्या विशिष्ट दृष्टिकोसामुळे त्यांच्या कादंबरी-कथा-जगांतील स्त्रीजीवन चित्रण अधिक प्रामाणिक झालें आहे, असें वाटतें. त्यांच्याठिकाणीं फडक्यांची मोहक शैली, अगर माडखोलकरांची धुंद करणारी लेखन पद्धति नसेल, पण त्यांना समाजांतील विविध संघर्षांचें स्वरूप अधिक स्पष्टतया दृग्गोचार झालें आहे. त्या योगानेच त्यांचें जीवनचित्र अधिक मोलाचें झालें आहे असें वाटतें.

एकंदरीने व कालसापेक्ष दृष्टीने पाहतां असें आढळून येतें कीं ह्या कालांत साहित्यक्षेत्रांत सामाजिक विचारांपेक्षा कलात्मक व सौंदर्यविष्कार हाच महत्त्वाचा गणला होता. इंग्रजी साहित्याचा अभ्याससुद्धा त्याद्दष्टीने होत होता. वाङ्मय गुणांच्या दृष्टीने पाहतां ही अवस्था आवश्यक अशी होती. तथापि वैचारिक-दृष्टीने पाहतां कांही वैगुण्यें निदर्शनास यावींत हें एकापरीने अपरिहार्य होतें.

प्रो. फडके यांच्या कादंबऱ्यांतून जर कोणता प्रमुख स्त्रीजीवनविषयक प्रश्न असेल तर तो म्हणजे सहवासोत्तर प्रेमविवाहाचा होय. महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनांत जी क्रांति होत होती तींत पूर्वकालीन ध्येयाविषयीं साशंकता हा महत्त्वाचा भाग होता. पूर्वी जरी प्रेमविवाह प्रचलित नसत तरी पावित्र्यादि मूल्यांच्या व धर्मविचाराच्या शिकवणुणीच्या योगाने सामाजिक दृष्ट्या सहजीवन शक्य व सह्य झालें. नव्या विचारांबरोबर जुन्या मूल्यांवरची निष्ठा नष्ट झाली की, जीवनांत क्रांति होऊं लागते. त्यावेळीं तिला जर योग्य मार्ग मिळाला नाही तर ही क्रांति सामाजिक दृष्ट्या अपरिपोषकहि होते. जुन्या विचारांतून बाहेर पडलेल्या स्त्रियांच्या पुढे प्रो. फडक्यांनी हा प्रेमाचा मार्ग ठेविला. कारण या अवस्थेंत स्त्रीला या भावनेविना सहजीवन अशक्यच होतें. वैवाहिक जीवनांतलीं बंधनें तिला कशी स्वीकार्य वाटणार? पूर्वी तीं धर्माच्या बागुलबोवाने वाटत. नवजागृत स्त्रीच्या ठायीं जो प्रणयाचा

उद्भव झाला होता, त्या भावनेंत हें सामर्थ्य होतें. व तें इतक्या पुनरुक्तीने रंगविण्यांत प्रोफेसर मजकुरांनी एक सामाजिक कार्य केलें आहे यांत शंका नाही. तथापि ही नवजागृत स्त्री प्रो. फडक्यांच्या कथांतून प्रेमभावनेजवळ आली ती तेथेच थांबली. तिची पुढे प्रगतीच झाली नाही. व येथेंच स्त्री-जीवन चित्रणांतील अपरेपणा वा वैगुण्य प्रत्ययास येतें. ही स्त्री प्रो. फडक्यांच्या विचारान्वयें आत्मसंतुष्ट, सुखवादी अशी झाली. प्रोफेसर फडके हे आधुनिक स्त्रीच्या जीवनाचें चित्रण करणारे एक श्रेष्ट लेखक आहेत, त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या अपेक्षाहि मोठ्या असतात. त्या दृष्टीने हें विवेचन केलें आहे. केवळ प्रोफेसर मजकुरांची खोड काढण्याचा हेतु नाही.

प्रो. फडके, खांडेकर व माडखोलकर हे १९४७ च्या पूर्वीच्या कालांतील श्रेष्ठ लेखक होत. त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनविषयक चित्रणाचें अवलोकन केलें. लेखकाची या प्रबंधांतील विवेचनामागें विशिष्ट भूमिका आहे. त्या भूमिकेवरून पाहणी केली असतां जे निष्कर्ष निघाले ते येथे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या साहित्याचे अनेक दृष्टींनी परिशीलन होऊं शकेल. ही एक दृष्टी आहे, कोणत्याहि प्रकारचा पूर्वग्रह वा व्यक्तिगत आपलेपणा, परकेपणा या विवेचनामागे नाही.

प्रो. फडके, खांडेकर, माडखोलकर यांच्याप्रमाणेच वरेरकर व इतर अनेक कादंबरीकारांनी स्त्रीजीवन चित्रणाचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या चित्रणाचें स्वरूप पाहणें आवश्यक आहे. ह्या कालांतल्या स्त्रीजीवन चित्रणाचा तो एक मोठा भाग आहे. ह्या सर्वांच्या चित्रणाचा साकल्याने विचार केल्यावरच एकंदर चित्रणांतील वास्तवता प्रतीत होईल.

वरेरकर व इतर कादंबरीकार

भा. वि. वरेरकर

प्रो. फडके, खांडेकर व माडखोलकर यांच्या कालांतले एक श्रेष्ट कादंबरीकार म्हणून वरेरकरांचा उल्लेख करावा लागतो. भार्गवराम विठ्ठल वरेरकर हे एक नाटककार म्हणून प्रामुख्याने प्रसिद्ध आहेत. त्यांनी समाजाच्या जिव्हाळ्याच्या विषयांवर नाटकें व कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ज्या काळांत त्यांचें हें लेखन प्रकाशित होत होतें त्या काळांत साहित्यक्षेत्रांत कलावाद वि. प्रचारवाद वा जीवनवाद असा मोठा वाद सुरू होता. कलावादाची तरफदारी प्रो. फडक्यांनी केली, तर वरेरकरांनी प्रचारवादाचा जोराने पुरस्कार केला. त्यांच्या प्रचारवादी भूमिकेच्या योगानेच मामांच्या साहित्याकडे विवक्षित दृष्टिकोनांतून पाहिलें गेलें. वास्तविक कला आणि सामाजिकता या दोन्ही बाबतींत वरेरकरांच्या कृती श्रेष्ठ असतांना त्यांचें कौतुक मात्र व्हावयास हवें होतें तेवढे झालें नाही, हें खरें आहे. पण यांचें कारण पूर्वग्रह, अहंभाव, इ. असण्यापेक्षा वैचारिक आहे, त्याचें थोडें विवेचन करणें आवश्यक आहे. त्यासाठी वरेरकरांची स्त्रीजीवनविषयक दृष्टि व जीवनविषयक दृष्टिकोन यांचा परिचय असणें जरूर आहे.

पहिली गोष्ट अशी की, वरेरकर हे मनाने आणि वृत्तीने सामाजिकतेविषयी अधिक जागृत असे लेखक आहेत. त्यांचा प्रचारवाद हा वरवर पाहिले असतां तात्कालिक वाटतो तितका तो तसा नाही. 'ज्या व्यक्तिसमूहांत, राष्ट्रांत किंवा वर्गांत कलावंत वावरत असतो त्यांतील प्रत्येक दुसऱ्या व्यक्तीच्या आत्मीयतेशी त्याच्या त्याच्या आत्मीयतेचें संघर्षयुक्त संमिश्रण घडत असतें. अशारीतीने घडणाऱ्या संमिश्र गोळाबेरजेलाच सामाजिक आत्मीयता (Social Psychology) म्हणतात. अर्थात या वैयक्तिक-

त्यांतच सामुदायिकत्वाचा अंतर्भाव झालेला असतो. म्हणून कलाकृतीचें परीक्षण करतांना त्यांतील तंत्रमूलक संमिश्र तत्त्वांचा विचार करून त्यांचें परस्परावलंबन स्पष्ट करावें.' [१] असें त्यांचें स्वतःच्या सामाजिकतेविषयींचें स्पष्टीकरण आहे. ह्या त्यांच्या सामाजिकतेच्या आग्रहामुळेच त्यांच्या कृतीचें स्वरूप भिन्न झालें आहे. प्रायः आत्मसंतुष्ट असणाऱ्या मध्यमवर्गाला एवढें सामाजिक आवाहन झेपण्यासारखें नव्हतें. त्यामुळे त्यांच्या साहित्याला जेवढी लोकप्रियता मिळावयास हवी तेवढी लोकप्रियता मध्यमवर्गात नाही. खालच्या वर्गात त्यांचें साहित्य वाचलें जात असलें तरी त्या वर्गातून टीकाकार पुढे आलेले नाहीत. व सुशिक्षित लोक 'टीकाकार' म्हणून पुढे येतात. त्यांना या प्रवृत्तीभिन्नतेमुळे वरेरकरांचे लेखन विशेष पसंत पडत नाही. मामांचा विद्यापीठीय विद्वानांवर जो कटाक्ष आहे त्याचें खरें कारण हें आहे.

वरेरकराचे साहित्यविषयक विचार वा त्यांचा साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा महत्त्वाचा आहे. त्याचा परिचय करून घेतल्याविना त्यांच्या वाङ्मयीन कृतींकडे पाहाण्याची विशिष्ट भूमिका निर्माण होणार नाही. 'सामुदायिक असो किंवा वैयक्तिक असो, जीवनाचा आधार आज डळमळींत झाला आहे. त्याला पायाशुद्ध करण्यासाठी सामुदायिक विचारांचें सरसहा परिवर्तन करण्याखेरीज दुसरा उपाय नाही. त्यासाठी सामुदायिक जीवनाची सूक्ष्म विचिकित्सा झाली पाहिजे आणि ती विचिकित्सा होण्यासाठी लेखन हें सामुदायिक जीवनाशी तादात्म्य पावलें पाहिजे. बदलत्या परिस्थित्यनुरूप लेखन शैलींतहि बदल केला पाहिजे, आणि तो बदल करतांना वाङ्मयाच्या वास्तवतेला यत्किंचितहि धोका न देण्याची खबरदारी घेतली पाहिजे.' [२] हा त्यांचा साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे. वरेरकरांचें वैशिष्ट्य म्हणजे ते पुरोगामी विचारसरणीचा पुरस्कार सतत करीत आले आहेत. आणि तो करीत असतांना कोणत्याहि विशिष्ट समाजप्रणालीशी

१ वरेरकरकृत 'आघात' पृ. ६५. २ 'आघात', पृ. ७३.

ते एकरूप झालेले नाहीत. त्यांचें शिक्षण, त्यांचें वय हीं लक्षांत घेतां ही गोष्ट त्यांना निःसंशय स्पृहणीय आहे.

अशाप्रकारें सामाजिकतेचा व त्या सामाजिकतेसाठी वास्तववादाचा पुरस्कार हे वरेरकरांच्या वाङ्मयविषयक विचारसरणीचे विशेष होत. त्यांच्या जीवनांत हा वैचारिक संघर्ष आहे त्याचें चित्रण त्यांच्या 'माझ्या कलेसाठी' 'सारस्वत' इ. उत्कृष्ट कृतींतून आविष्कृत झालेलें आहे. त्यांचे अनेक वाङ्मयविषयक विचार हे खरोखर फार अव्वल दर्जाचे आहेत. पण मध्यमवर्गीय मनाला ते झेपण्यासारखे नव्हते. लेखकाचा स्वतंत्र धंदा असावा, हा त्यांचा आग्रह वाङ्मयच्या वाढीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा होता. आपल्या मतांत व वर्तनांत फरक नसावा म्हणून त्यांनी नोकरीहि सोडून दिली आहे. फडके, खांडेकर व माडखोलकर यांच्या समकालीन असे ते कादंबरीकार आहेत. पण समाजाशी खरोखर कोणाचा संघर्ष आला असेल आणि समाजमनावर कोणी संस्कार घडविण्याचा साक्षेपी प्रयत्न केला असेल तर तो वरेरकरांनीच. कलात्मकतेच्या निकषांच्या दृष्टीनेहि त्यांचें साहित्य वरील लेखकांशी गुणाने तुल्यबल आहे. पण त्यांच्या प्रचारवादित्वाच्या आग्रहामुळेच त्याच्याकडे जितके निरागसतेने पाहणें आवश्यक आहे तितकें पाहिलें गेलें नाही, हें खरें. वरेरकरांच्या साहित्यविषयक विचारांचा व भूमिकेचा हा परिचय करून घेतल्यानंतर त्यांच्या स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोनाचा परिचय करून घेणें आवश्यक आहे.

वरेरकरांच्या वास्तववादापेक्षा त्यांच्या स्त्रीजीवनविषयक चित्रणावर विशेषतः त्यांनी निर्माण केलेल्या स्त्रीपात्रांवर अधिक टीका केली जाते. वरेरकर हे विशिष्ट मध्यमवर्गीय विचार निष्ठांमधून बाहेर पडले व अधिक व्यापक जीवननिष्ठांचा त्यांनीं स्वीकार केला त्याचें एक प्रत्यंतर त्यांच्या नायिकांद्वारे होतें. वरेरकर हे स्त्रियांच्या चळवळीचे कट्टे पुरस्कर्ते आहेत. स्त्रियांची हक्कासंबंधीची व सर्वच क्षेत्रांत धडाडीने पुढे येण्याची प्रवृत्ती एकाद्या स्त्रीस्वातंत्र्यवादिनी कादंबरीकर्तीच्या कादंबऱ्यांतून दिग्दर्शित व्हावी तितक्या

जिव्हाळ्याने व साक्षेपाने ती वरेरकरांच्या कादंबरी नाटकांतून चित्रित झाली आहे. त्यांना स्त्री व पुरुष यांत समता म्हणजे खरी समता प्राप्त व्हावी असें वाटतें. आजच्या समाजांतील पुरुषविशिष्ट कामांत स्त्रियांचा हातभार सुरू झाल्यानंतर स्त्रीविशिष्ट–केवळ निसर्गानेच भेदभाव केला तो बाजूला ठेवून–गणलीं जाणारीं कामें पुरुषांनी करण्यास पुढे येण्यास कांहींच हरकत नाहीं. ही अगदी तर्कशुद्ध विचारसरणी आहे. आपली समाजरचना पुरुष-प्रधान असल्याने स्त्रियांच्याकडे निसर्गाने दिली त्यापेक्षा कितीतरी अधिक कामें व जबाबदारी पुरुषवर्गाने स्त्रियांवर लादली आहे. ही सारी विभागणी पुरुषनिर्मित व सांकेतिक आहे. पुरुषवर्गाने तीं बंधनें बाजूला सारून पुढे यावयास कांहींच हरकत नाहीं असें त्यांना वाटतें. तसें चित्रण त्यांच्या नाटक कादंबऱ्यांतून आल्यास नवल नाही.

त्यांच्या ह्या स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोनाचे अनुषंगाने स्त्रीजीवनाचें चित्रण त्यांच्या नाटक कादंबऱ्यांतून आलें आहे. त्यांचा हा दृष्टिकोन सर्व-सामान्य मध्यमवर्गीयांच्या कल्पनेस विसंगत असल्याने व तो थोडासा त्याच्या श्रद्धांना धक्का देणारा असल्याने त्याच्या दृष्टीला हें चित्रण वास्तव वाटत नाही. व वास्तववादाच्या नांवाखालीं असलें चित्रण त्याच्या स्वप्नप्रेमी दृष्टीस खटकल्याविना राहात नाहीं. तसेंच पाहिलें तर रूढ अर्थाने हें वास्तववादी चित्रण नव्हेहि. पण मामा वरेरकर यांची वास्तवाची कल्पना थोडी वेगळी आहे तिचा स्वीकार केला तर हें चित्रण विशेष अवास्तव असें वाटणार नाही. त्यांच्या नाटक कादंबरींतील वास्तवाचें स्वरूप प्रातिनिधिक असण्यापेक्षा प्रतीकात्मक आहे. ही वस्तुस्थिति ध्यानांत घेतली तर त्यांच्या लेखनकृतींतील वास्तवतेचा योग्य तो अन्वय लागण्यास अडचण पडणार नाही असें वाटतें. वास्तववादांत प्रतिबिंबात्मक वास्तववादाइतकाच प्रतीकात्मक वास्तववादहि महत्त्वाचा आहे. हरिभाऊ आपटे यांच्या कादंबऱ्यांतील जीवनचित्रण हें प्रतिबिंबात्मक वास्तववादाचें उदाहरण आहे. वरेरकरांचें प्रतीकात्मक वास्तवतेचें.

वरेरकरांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनाचें चित्रण हेंहि प्रतीकात्मक वास्तववादी आहे. सामान्य समजुतीप्रमाणे स्त्री ही कांही (शालीनता, कोम-

लता, सौजन्य, मनमिळावूपणा, पड घेण्याची प्रवृत्ति अशासारख्या) विशिष्ट गुणांची मूस समजली जाते. वरेरकरांच्या कादंबऱ्या, नाटकें यांतून आढळणाऱ्या स्त्रीचित्रांत हे गुण आढळून येत नाहीत, तर याच्या विरुद्ध 'गुण' आढळून येतात. सहाजिकपणें हें सारें चित्रण 'अवास्तव' वाटावें यांत नवल नाही. ब्रिटिश राजवटींत महाराष्ट्रीय स्त्रीच्या ठायीं जी नवी आत्मजागृति झाली आहे तिचें स्वरूप प्रायः वरेरकरांच्या कादंबरी—नाटकांतून आविष्कृत झालेलें आहे. आगरकरांचा व्यक्तिवाद आत्मसात केलेल्या स्त्रीचा स्वतःच्या आविष्काराच्या आड येणाऱ्या विविध प्रवृत्ति, संकेत, कल्पना, इ. विरुद्ध संघर्ष यावा हें सहाजिक आहे. नवजागृत स्त्रीच्या अंतरंगाचा पडसाद जर ऐकूं गेला तर तिच्या मनांत ज्या विविध समस्या निर्माण झाल्या आहेत त्याचें प्रतीकात्मक चित्रण वरेरकरांच्या नाटक कादंबऱ्यांतून चित्रित झालें आहे. सर्वसामान्य महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनांतहि वास्तविक तसा संघर्ष सुरू झालेला आहे. पण वर निर्दिष्ट केलेल्या 'गुणां' चें आवरण तिच्या मनावर इतकें जाड आहे की तें छेदून त्या बाहेर येण्याचें धाडस तिला होत नाही. याचा अर्थ वरेरकरांच्या नायिकांच्या मनांतला झगडा इ. तिला असंमत आहे अशांतला भाग नाही. वरेरकरांच्या नाटक कादंबऱ्यांतील वास्तवचित्रणाचें स्वरूप हें असें प्रतीकात्मक आहे. प्रतीकात्मकतेने पाहूनच त्यांतला बोध घ्यावयास हवा. नवजागृत स्त्रीच्या मनांत सर्व क्षेत्रांत आपण हिरीरीने पुढे यावें ही जी वास्तव पण थोडी सुप्त तथापि अत्यंत प्रभावी अशी मनीषा आहे तिचें चित्रण वरेरकरांविना अन्य कादंबरीकार दिग्दर्शित करूं शकला नाही.

अशाप्रकारें स्त्रीच्या जीवनांतील आकांक्षांचें चित्रण करणें हा वरेरकरांच्या स्त्रीविषयक जीवनचित्रणाचा महत्त्वाचा भाग होय. वरेरकरांचा स्त्रियांच्या कर्तृत्वशीलतेवर धडाडीवर अतिशय विश्वास आहे. सामान्यतः व्यवहारज्ञानाच्या बाबतींत मागे असणाऱ्या स्त्रिया दुसऱ्याच्या थापांस, दिखाऊपणास बळी पडलेल्या, फसलेल्या, अशा प्रकारच्या स्त्रिया त्यांच्या

साहित्यांत आढळून येत नाहीत. हा त्यांच्या स्त्रियांच्या कर्तृत्वावरील विश्वासाचा परिपाक आहे. त्यांच्या सर्वच स्त्रीपात्रांनी त्यांच्यापासून कमालीचा सडेतोडपणा वा फटकळपणा घेतलेला आहे. त्याप्रमाणेच संकटांनी हैराण न होतां अत्यंत धीरोदात्तपणाने वागून आपला मार्ग काढतात. हें सर्व करीत असतांना, आत्माविष्काराच्या आहारीं जाऊन मनुष्यजातीच्या ठायीं असणाऱ्या उच्च भावनांची व त्यांची फारकत झाली आहे असें नव्हे. पण रूढसंकेताच्या आहारीं गेलेल्या मध्यमवर्गीयांस हा चांगुलपणा प्रतीत होत नाही !

शेवटी वरेरकरांच्या स्त्रीजीवनविषयक चित्रणाच्या ह्या प्रबंधामागे जी भूमिका आहे तिच्या अन्वयें एक विशेष लक्षांत घेणें आवश्यक आहे. वरेरकरांच्या स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोनाचा तो एक भाग आहे असें म्हणतां येईल. ब्रिटिश राजवटींत या देशांतील स्त्रियांच्या जीवनांत जो फरक होत होता त्याचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे स्त्री आणि पुरुष यांचीं कर्तृत्वक्षेत्रें एक वा समान होत होतीं. समान कर्तृत्वक्षेत्रांचा (स्त्री व पुरुष यांसाठी) पुरस्कार वरेरकरांइतक्या अहमहमिकेने इतर लेखक–लेखिकांनी क्वचितच केला असेल. या समानक्षेत्रत्वाच्या मागे एक मानसिक स्थित्यंतर होत होतें. तें म्हणजे स्त्री व पुरुष यांचीं जीवनध्येयें समान वा एकच होत होतीं. हें आजपर्यंत स्त्रियांसाठी केवळ पातिव्रत्य हेंच जीवनमूल्य गणलें जात होतें. त्याशिवाय अन्य सांस्कृतिक उच्च ' गुण ' हे केवळ त्याच्या अनुषंगाने आलेले आहेत. त्यांमधून साहजिकपणें एकप्रकारच्या दास्याची छटा व्यक्त होते. ह्या छटेमुळेच वरेरकरांना हे ' गुण 'हि चित्रित करावेसे वाटत नाही. अशाप्रकारे स्त्री व पुरुष यांच्यांत आजच्या दृष्टीस जी एकध्येयता दिसते तिचें चित्रण वरेरकरांनी प्रामुख्याने आपल्या स्त्रीपात्रांच्याद्वारां केलें आहे. त्यांच्या स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोनाचे व येथील विवेचनाच्या मागील भूमिकेच्या अनुषंगाने अतिशय महत्त्वाचें असणारें हे वैशिष्ट्य लक्षांत घेणें आवश्यक आहे. म्हणूनच त्याचा प्राधान्याने उल्लेख केला. आहे.

वरेरकरांच्या कादंबऱ्यांची संख्या ३०।३५ पर्यंत जाते. त्या शिवाय त्यांनी अलीकडे सर्व शरत्साहित्य मराठींत आणण्याचा उपक्रम केला आहे.

तो वेगळाच. वरेरकरांच्या कादंबऱ्यांतले प्रश्न हे प्रामुख्याने प्रचलित चळवळींपासून निर्माण झालेले असे घेतलेले असतात. त्यांच्या इतका प्रगमनशील लेखक मराठींत दुसरा झालेला नाही. कालाच्या बरोबर राहून वाङ्मयाच्या (ललित वाङ्मयाच्या विशेषतः) द्वारें व्यक्तीच्या ठायीं सुप्त असणारें सामाजिक मन जागृत करणें हें अत्यंत महत्त्वाचें कार्य त्यांनी केलें आहे. खांडेकरांनीसुद्धा त्यांच्या कालासमवेत राहाण्याच्या प्रवृत्तीबद्दल त्यांना धन्यवाद दिले आहेत. मालक-मजूर लढा, दारुबंदी, खेडेगांवांच्या उद्धाराचा प्रश्न, इ. अनेकविध प्रश्न त्यांच्या कादंबऱ्यांतून आणि नाटकांतून चर्चिले गेले आहेत. त्यांच्यांतलें जीवनहि अत्यंत व्यापक आहे. आत्मकेंद्रित्व हा लेखकाचा गुणधर्मच नसल्याने ज्याला प्रेमकथा म्हणतां येईल अशी कथा वरेरकरांच्या कडून लिहिली गेलेली नाही. तथापि त्यांना प्रेमाचें वा विवाहोत्तर जीवनांतील उदात्ततेचें, सौहार्दतेचें महत्त्व मान्य वा विदित नाही असें नव्हे. पण आपल्या समाजांतील कौटुंबिक जीवनांत या भावनेला इतकें स्थान प्राप्त झालेलें नाही. ही गोष्ट त्यांना सलते आहे. आपल्या समजांत विवाहाला किती मामुली स्वरूप प्राप्त झालें होतें ह्याचें वर्णन त्यांनी आपल्या 'नाटकी संसार' मध्ये केलें आहे. त्यांच्या तरुणपणीं काय परिस्थिति होती ह्याचें दिग्दर्शन ते करतात 'त्या काळच्या परिस्थितीकडे लक्ष दिलं म्हणजे लग्नाचा खेळ जुगारासारखाच होता.....पुरुषापेक्षा जास्त वयाची न ठरणारी अशी कुणितरी स्त्री-मुलगी म्हणा हवी तर-एकदां कुणा तरी पुरुषाशी कायमची जखडून टाकली कीं तें लग्न झालें. भांडत झगडत त्यांनी आयुष्य कंठलं, की तो संसार झाला. त्यांना मुलंमुली झाल्या, की तो संसार थाटला गेला. या पलीकडे मानवी जीवनाची फारशी उच्च कल्पना त्यावेळीं कुणीच हिशेबांत घेत नसे" (माझा नाटकी संसार पृ. १००). असल्या स्नेहहीन संसारांत स्त्रियांचें स्थान किती हीन होतें यांचें चित्रण हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतून झालेलें आहे. त्यापुढला भाग प्रामुख्याने वरेरकरांच्या कादंबऱ्यांतून आला आहे. त्यांच्या स्त्रीजीवनविषयक कल्पनेमुळे हें चित्रण वास्तवादी असलें तरी

त्यांतील वास्तवता ही प्रतिबिंब स्वरूपी नाहीं हा विचार मागे आलाच आहे. प्रतिबिंबरूप वास्तववादाचें कार्य वास्तविक हरिभाऊंबरोबरच संपलें होतें. हें लक्षांत घेतलें तर स्त्रीजीवनाचें हरिभाऊनंतर वास्तववादी चित्रण करणारे पहिले कादंबरीकार म्हणून त्यांचा उल्लेख करणें अयोग्य होणार नाही.

वरेरकरांच्या अलीकडील बऱ्याच कादंबऱ्यांत प्रचलित सामाजिक प्रश्न आले आहेत. त्या प्रश्नांच्या अनुषंगाने मांडणी हें त्या ठिकाणीं त्यांचें उद्दिष्ट आहे. अशा वस्तुस्थितीमुळे त्या कादंबऱ्यांतून स्त्रीपात्रें आलेली असलीं तरी स्त्रीजीवनास प्राधान्य आलेलें नाही. शिवाय त्या ठिकाणचें हें स्वभावचित्रण त्यांच्या इतरत्र आलेल्या चित्रणाशीं बरेंच जुळतें असतें. सहाजिकच त्यांच्या प्रमुख स्त्रीजीवनविषयक कादंबऱ्या आहेत त्यांचा विचार करणें योग्य होईल. अशा कादंबऱ्यांत, 'विधवा कुमारी' 'परत भेट' 'चिमणी' 'गोदू गोखले' 'उघड झाप' 'विकारी वात्सल्य' 'वेणू वेलणकर' इ. प्रमुख होत. त्यांना प्रामुख्याने मांडावयाचें स्त्रीजीवन, व त्यांतील प्रमुख समस्या इ. चें चित्रण या कादंबऱ्यांतून झालें आहे तेंच त्यांचें प्रातिनिधिक असें चित्रण आहे. सहाजिकपणेंच या कादंबऱ्यांचा प्रथम विचार करणें योग्य होईल. या कादंबऱ्यांतून प्रायः मध्यमवर्गीय स्त्रीच्य जीवनास प्राधान्य मिळालें आहे. त्यामुळे त्यांचा एक गट हा स्वाभाविक असा उठून दिसतो.

वरेरकरांची पहिली कादंबरी 'चिमणी' ही आहे. जिच्यांत प्रेम-कथेचीं बीजें आहेत अशी ही जवळ जवळ एकच कथा. या कादंबरींतील नायिका ही सरंजामी वातावरणांत वाढलेली असते तरी ती अत्यंत हुशार आणि चाणाक्ष आहे. तिच्या मॅट्रिकपर्यंतच्या शिक्षणाची हकीकत ह्या कादंबरींत आली आहे. विविध स्वभावरेखांशिवाय इतर कोणता प्रश्न लेखकाला आग्रहाने मांडावयाचा होता असें वाटत नाही. पण वरेरकरांची खरी गाजलेली कादंबरी म्हणजे 'विधवा कुमारी' हीच होय. या कादंबरींतलें जीवन-चित्रण व लेखनांतील विशिष्ट साधेपणा हा हरिभाऊ आंपट्यांची आठवण

करून देणारा असा आहे. तशाप्रकारची कबूली टीकाकारांनीहि दिली आहे. या कादंबरीत वरेररकरांनी हरिभाऊंच्या जीवनाचा धागा घेतला आहे. नायिका मथुरा हिच्यावर बालपणींच वैधव्याची कुऱ्हाड कोसळते. तिला वैवाहिक जीवन म्हणजे काय इ. कळूं लागण्यापूर्वीच सक्तीच्या वैधव्याचा स्वीकार करावा लागतो. हिंदु व विशेषतः ब्राह्मण विधवा स्त्रीला किती अनुदारपणें वागविलें जात असे, याचें हें उत्कृष्ट चित्र आहे. तथापि ह्यांतली नायिका शिकण्याचा प्रयत्न करते. व तिची मजल विलायतची यात्रा करण्यापर्यंत जाते. हा जो भाग आहे ह्यांत वरेरकरांचें वैशिष्ट्य दिसून येतें. आगरकरांच्या व्यक्तिवादाशी हरिभाऊ समरस झाले नाहीत असें विधान मागे हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचा विचार केला त्यावेळीं आलें आहे. वरेरकर हे आगरकरांच्या विचारांशी समरस झाल्याने त्यांनी केवळ वैधव्यावस्थेंत केविलवाणें जीवन कंठावयास लावून लोकांच्या कारुण्याचा विषय करण्यापेक्षा तिच्या प्रयत्नांना अधिक महत्त्व दिलें आहे. ती आपली प्रगति करून किती घेऊं शकते, ह्याचें एक उदाहरण ह्या दृष्टीने हें चित्रण महत्त्वाचें आहे. मथुरेचें विलायतेहून आल्यानंतरचें जीवन 'परत भेट' मध्ये आलेलें आहे. तिला होत असलेला विरोध हा थोडा बोथट झालेला असला तरी पूर्णपणें नष्ट झालेला नाही. समाजाच्या व्यापक जीवनाशी ती समरस होण्याचा प्रयत्न करते. चन्दू व तिच्यामधील प्रेमाचें प्रकरण उपकथानकासारखें आलें आहे. पण त्याचा परिपोष संयमपूर्ण झालेला आहे. आगरकरांच्या विचारांच्याच दृष्टीने पाहतां तिला पुनः विवाहबद्ध व्यावयास कांहीच हरकत नव्हती. परंतु मनाने ती इतक्या वरच्या अवस्थेप्रत पोचली होती की, तिचा निर्णय हाच योग्य वाटूं लागतो. विधवा स्त्रीला (उच्चवर्णीय) किती विविध प्रकारचा त्रास समाज देतो, समाजाच्या वागण्यांत निर्घृणता कशी असते, हें जसें कादंबरीकारास दर्शवावयाचें आहे तसें महाराष्ट्रीय स्त्रीच्या ठायीं किती सुप्त कर्तृत्वशक्ति सामावलेली आहे, हेंहि पण दाखवावयाचें आहे. तेंच या कादंबरीचें महत्त्व होय.

परंतु वरेरकरांची खरी स्त्रीजीवनविषयक श्रेष्ठ कादंबरी म्हणजे 'गोदू गोखले' हीच होय. या कादंबरीचे दोन भाग आहेत. पहिल्या भागांत नायिकेच्या मॅट्रिकपर्यंतची हकीगत आली आहे. दुसऱ्या भागांत तिचें कॉलेज-शिक्षण व वैवाहिक जीवन यांची कथा आलेली आहे. व 'उघड झाप' या कादंबरींत तिचें स्वतंत्रजीवन प्रामुख्याने आलेलें आहे, या तीन कादंबऱ्यांतून त्यांनी गोदू गोखले हें इतकें ठसठशित स्वभावचित्र निर्माण केलें आहे की मराठींतल्या श्रेष्ठ स्वभावचित्रांत ह्या स्वभावचित्रणाचा समावेश व्हावयास कांहीच हरकत नाही असें म्हणतां येईल. ह्या तीन कादंबऱ्यांतून वरेरकरांच्या स्त्रीजीवनविषयक कल्पनेचे सारे विशेष आलेले आहेत.

गोदू गोखले हिचें अगदी बालपणापासून चरित्र आलें आहे. मामलेदाराची ही मुलगी आहे तिच्या ठिकाणीं अहंभावना कशी वाढत जातें हें उत्कृष्टरीतीने दर्शविलें आहे. पहिल्यापासूनच तिचा सडेतोड स्पष्ट-वक्ता, चाणाक्ष, स्वभाव सुरेख रंगविला आहे. तिच्या स्वभावाचें वेगळेंपण पाहतां वास्तविक तिने वैवाहिक पाशांत पडावयास नको होतें. स्वभावतः अत्यंत तेजस्वी असल्याने तिचें सामान्य पुरुषाशी जमणें अशक्य होतें. तशा प्रकारची सूचना तिच्या आईने मरतेवेळीं तिला दिलेली असते. पण ती ओळखींतल्या एका पुरुषाशी विवाहबद्ध होते. तिचें पतीशी पटत नाही. एक मूल (मुलगी) झाल्यानंतर ते वेगळे राहातात. पुढे ती कॉलेजांत जाते वकीलीचा अभ्यास करते. सनद घेऊन वकीली व्यवसाय सुरवात करते. त्यांत तिला असामान्य यशहि प्राप्त होतें. तिच्या इतर दोघी मैत्रिणी असतात त्या तिघीहि एकत्र राहात व असें केवळ स्त्रियांचें असें एक अभिनव 'कुटुंब' वरेरकरांनी ह्या कादंबरींत निर्माण केलें आहे. स्वतंत्र-बाण्याच्या स्त्रीला वैवाहिक जीवनांत पदोपदीं अपमानाचीं शल्यें बोचत असल्याने तें कसें अशक्य होतें हें दर्शविलें आहे. शेवटीं दोघेजण विभक्त राहातात. तिचे पति दुसरा विवाह करतात. त्यांना ती परवानगी देते. पण 'माझ्या मनांत हे विचार आले तर तुम्हाला काय वाटेल' असें

विचारून त्याला अंतर्मुख होण्यास सांगते. कादंबरीच्या शेवटी तिचे उद्गार अतिशय जळजळित आहेत. वरेरकरांच्या इतर नायिकांच्या उद्गारांप्रमाणे त्यांत सडेतोडपणा फटकळपणा ओतप्रोत आहे. पण विशेष म्हणजे तर्कशुद्धतेच्या व मानवी समानतेच्या दृष्टीने पाहिलें तर त्यांत गैर असें कांहीहि नाही. अशा प्रकारें अत्यंत कर्तृत्वशील अशा एका स्त्रीचें चरित्र वरेरकरांनी 'गोदू गोखले' ह्या कादंबरीच्या दोन भागांतून रंगविलें आहे. स्त्री-जीवनाची परावलंबिता, असहायता, आणि त्या असहायतेवर व परावलंबित्वावर मात करून पुढे येण्याचा व समाजांत मानाचें स्थान मिळविण्याचा नवजागृत स्त्रीचा साक्षेपी प्रयत्न हाच ह्या कादंबरीचा विषय आहे. स्त्री व पुरुष यांत पदोपदीं कसा भेदभाव केला जातो, आणि एकंदरीने त्यांना (स्त्रियांना) कसें अवमानित जीवन कंठावें लागतें हें या कादंबरींत दर्शविलें आहे. गोदूच्या ठिकाणची धडाडी, बुद्धिमत्ता, कर्तृत्व हीं केवळ अपूर्व आहेत. शेवटीं ती राष्ट्रस्वातंत्र्याच्या चळवळींत भाग घेते, तुरुंगांत जाते. अर्थात् तुरुंगवासाचा अनुभव घेतल्यानंतर जितका मान सन्मान पुरुषाला मिळतो तितका मला मिळेल काय, असा विचार तिच्या मनांत आल्याविना राहात नाही. एकंदरीने नवजागृत स्त्रीच्या ठायींची उर्मी, धडाडी, उभारी ह्या गोष्टी या कादंबरीत अत्यंत परिणामकारतेने चित्रित झाल्या आहेत.

याच गोदू गोखलेच्या मार्गदर्शनाखाली व अगदी वेगळ्याच वातावरणांत तिची मुलगी 'बबी गोखले' हिचें शिक्षण होतें. गोदू गोखलेने विवाह केला असला तरी आपलें नांव बदललें नाही. अखेरपर्यंत ती माहेरचेंच नांव लावते. तिची मुलगी बबी ही सुद्धां आपलें आडनांव गोखले असेंच लावते. तिच्या विचारांचा, व ज्या परिस्थितींत तिचें शिक्षण झालें त्या असाधारण परिस्थितींचें चित्रण वरेरकरांनी आपल्या 'उघडझांप' या कादंबरींत केलें आहे. वास्तवदृष्टीने पाहतां ही कादंबरी म्हणजे 'गोदू गोखले' चा तिसरा भाग होय. कादंबरीची नायिका बबी गोखले असली तरी चित्रणाला उठाव कोणाचा मिळाला असेल तर तो तिच्या आईचाच. कोणत्या

परिस्थितींत गोदूने वकिलीचा अभ्यास केला, सनद मिळविली, तसेंच तिला व्यवसायांत कसें अपूर्व यश मिळत आहे हें या कादंबरींत दर्शविलें आहे. शेवटीं आपल्या पतीवर कोर्टांत मात करण्याची जी तिची धडपड होती तिला यश आलेलें पण दर्शविलें आहे.

तथापि कादंबरीचा मुख्य विषय म्हणजे घटस्फोटित स्त्रीच्या अपत्यांकडे पाहण्याची समाजाची दृष्टि किती अनुदार, घृणास्पद आहे तें दर्शविणें हा आहे. बबी गोखले प्रमाणेच तिची मैत्रीण सुशीला असते. हिंदु समाजांत घटस्फोट घेण्याची पद्धति रूढ करणें आवश्यक आहे. स्त्रियांची स्थिति त्याने सुधारेल हें लेखकाला आग्रहाने सांगावयाचें आहे व तें सयोग्य रीतीने चित्रित झालें आहे. घटस्फोटाच्याच अनुषंगाने अशा व्यक्तींच्या संततीच्या प्रश्नाचें स्वरूपहि ओझरतें आलें आहे. गोदूचा नवरा नाना हा एक दोनदा कायद्याचा आधार घेऊन मुलीची मागणी करून जातो. तिच्या पद्धतीप्रमाणे ती उत्तर देते. पण कायदेशीरदृष्ट्या या युक्तिवादांत कांही अर्थ नव्हता; व हेच लेखकास सूचित करावयाचें आहे. या कादंबरीच्या शेवटीं बबीच्या एका पार्शी मैत्रिणीवर अनूढ मातृत्व प्राप्त होतें. पार्शी जमात ही थोडी अधिक (याबाबतींत) सहिष्णु पण अधिक व्यवहारी. तिची (पार्शी मैत्रिणीची) आई आपल्या मुलीला या प्रसंगांतून मुक्त होण्यासाठीं गर्भपात करून घेण्याचा सल्ला देते. तिला अर्थात् तो पटत नाहीं. ती गोदूकडे येते. गोदू तिला धीर देते व तेथेच राहाण्यास सांगते. अशा प्रकारें शेवटीं अनूढ मातृत्वाचा पुरस्कारहि ह्या कादंबरींत वरेरकरांनी केला आहे.

वरेरकरांच्या नायिका या अत्यंत व्यवहारी असतात. मोहाच्या जाळ्यांत त्या स्वतःस सापडवून घेत नाहीत. प्रेमाच्या प्रकाराकडे त्यांची पाहाण्याची दृष्टि अत्यंत डोळस असते. प्रेम या भावनेचें जीवनांतलें महत्त्व त्यांना अर्थातच अमान्य आहे असें नव्हे, पण बाह्यतः प्रेम व आंतरीक दृष्टीने दास्य असें प्रेम त्यांना नको आहे. अशा प्रकारें या कादंबऱ्यांतून वरेरकरांनी आपले स्त्रीजीवनाविषयक सारे विचार दिग्दर्शित केले आहेत. हे प्रश्न चित्रित

करतांना वरेरकरांचें लक्ष मध्यवर्गीय (ब्राह्मण) स्त्रीच्या ठायीं केंद्रित झालेलें असलें तरी इतर वर्गांतील वा समाजांतील स्त्रियांचा त्यांना विसर पडलेला नाही. गोदूची मैत्रिण ठकू ही तेलीण असते. पण विरोधी परिस्थितींशी झगडून ती पुढे येते. व आपल्या पतीचें शिक्षण करते. तिचे यजमान आफ्रिकेंत वैद्यकी करावयास जातात. ती मात्र येथेच राहाते. तसेंच शेवटीं पार्शी, गुजराती, इ. समाजांतील स्त्रियांच्या जीवनाचें चित्र रंगवून करून त्या त्या समाजांतील अनिष्ट रूढींचा इ. निर्देश केला आहे.

'गोदु गोखले' पेक्षा थोडी वेगळी असणारी 'वेणू वेलणकर' ही कादंबरी आहे. गोदु गोखले वकीलींत नांव कमावते. तर वेणूची आई खानवळ काढते आणि अत्यंत व्यवहारीपणाने वागून त्या व्यवसायांत स्थायी होते. तिच्या मार्गदर्शनाखाली वेणूचें शिक्षण होतें. वेणू शिकते, कॉलेजांत जाते, पण आपल्या आईच्या व्यवसायांत साहाय्य करते. व तोच व्यवसाय पुढे चालू करते. वेणूचे पुष्कळसे गुण गोदूपासून घेतलेले दिसतात. वेणूची आई खानावळ काढण्यापूर्वी एका श्रीमंत कुटुंबांत स्वयंपाकास राहते.तेथल्या मालकिणीने तिच्यावर खूश होऊन मृत्यूसमयीं तिला एक हजार रुपये दिलेले असतात. तेच तिला खानावळ काढण्यास उपयोगी पडतात. पण पुढे त्या कुटुंबाची श्रीमंती जाते. त्या कुटुंबांतले प्रमुख तरुण गृहस्थ बाळासाहेब हे त्यांच्या खानावळींत जेवावयास येतात. पुढे या दोघी मायलेकींचें त्यांच्याकडे लक्ष जातें. त्यांना त्या हजार रुपयाची महति पटते,...त्या त्यांना पूर्वीची ओळख देतात व शेवटीं वेणूचा विवाह होतो त्यांच्याशी, असें सूचित केलें आहे. स्त्री-विषयक प्रश्नापेक्षा स्त्रीच्या कर्तृत्वाचें व कृतज्ञताबुद्धीचें हें चित्रण आहे.

वरेरकरांच्या महत्त्वाच्या स्त्रीजीवनविषयक कादंबऱ्यांत 'कुलदैवत' ह्या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. ह्या कादंबरींत वरेरकरांनी गोव्याकडील देवदासींच्या व कलावंतीणींच्या जीवनांतील प्राधान्य दिलें आहे. माणक वेणू आणि गंगू ह्या तिघी मैत्रीणी असतात. माणक बी. ए. होते.

वेणू व गंगू विवाहित असतात. गंगू विवाहानंतर गोव्यास आपल्या कुल-दैवताच्या (मंगेशाच्या) दर्शनास गेली असतां, तेथे तिला स्थानिक स्त्री-जीवनाचें दर्शन होतें. मोगा ह्या कलावंतीणीचें जीवन जगणाऱ्या स्त्रीचा परिचय होतो. तिला तिच्या ' यजमानापासून कल्याणी नांवाची मुलगी झालेली असते. ती (मोगा) ' रक्षा ' असते, पण अत्यंत एकनिष्ठ असते. आपल्या यजमानांना हलाखीचे दिवस आल्यावर ती मुंबईस जाते एका शेटीजवळ राहते व मिळालेले पैसे यजमानाकडे पाठविते. वेणू व माणक यांची मुंबईस असतां मोगाकडे ये जा असते. वेणूचे पति सुंदरराव कल्याणीशी प्रेमचेष्टा करतात. मोगासारख्या स्त्रीकडे जाणें येणें असतें म्हणून माणकला (ती एका शाळेंत नोकरीस असते तेथून) काढून टाकतात. वेणूला पतिगृहापेक्षा मोगाचेंच घर आपलें वाटतें. तिने पतित्याग करून स्वतंत्रपणें जीवन कंठण्याचा निर्णय घेतलेला असतो. अशा प्रकारें माणक, वेणू , कल्याणी या तिघींना नोकरी हवी असते. कल्याणीला आईचा व्यवसाय स्वीकारावासा वाटत नाही. पण त्यांना कोठे नोकरी मिळणें शक्य नसतें. शेवटीं तिघी मिळून एक खाणावळ काढतात. अशाप्रकारें या कादंबरींत गोव्याकडील विशिष्ट समाजां-तील स्त्रीजीवनांचें अंग रंगविलें आहे. देवदासीच्या व्यवसायांत असणाऱ्या स्त्रियांच्या अंतरंगांत मानव्य कसें जागृत असतें तें त्यांना दाखवावयाचें आहे. त्यायोगें समाजाची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टि बदलावयाची आहे.

वरेरकरांनी ह्याहि कादंबरींत पुन्हा स्त्रियांच्याच अशा ' कुटुंबा ' चा पुरस्कार केलेला दिसतो. ' गोदू गोखले ' ह्या कादंबरींतल्या ह्या गोष्टीचा उल्लेख या पूर्वीच आलेला आहे. वरेरकरांच्या स्त्रीविषयक दृष्टिकोनाचा तो भाग आहे. त्यांना स्त्रियांवर झालेले होत असलेले अन्याय दिसतात; त्यांची चीडहि येते; पण हे अन्याय होतात म्हणून स्त्रियांनी हैराण न होतां त्यांना तोंड देऊन त्यांतून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे असें त्यांना सुचवा-वयाचें आहे. त्यामुळे त्यांनी संकटांनी हतबल झालेल्या स्त्रीचें चित्र रंगविलें नाही. तर धडपड करून पुढे मार्ग काढणाऱ्या स्त्रियांचीं चित्रें प्राय: रंगविलीं

आहेत. स्त्रीच्या कर्तृत्वावरला लेखकाचा अगम्य विश्वास हा या चित्रणाला कारणीभूत आहे. त्याचें चित्रण त्यांच्या प्रत्येक कादंबरींतून प्रभावीपंणें होतें. अर्थात त्यायोगें पुरुषास (पुरुषपात्रास) दुय्यम स्थान व सामान्य पद प्राप्त होणें हें केवळ अपरिहार्य ठरतें.

' विकारी वात्सल्य ' ह्या कादंबरींत वात्सल्यप्रेमाची महति गाइली आहे. कादंबरींतल्या प्रमुख पात्राभोंवती कोणत्या ना कोणत्यातरी वात्सल्य भावनेशी निगडित अशा रहस्याची योजना केलेली आहे. मनोहरपंतांचें एका कुळवाडी स्त्रीवर प्रेम असतें. त्यांच्यापासून तिला मूलहि होतें. तो पुढे मोठा होतो. मनोहरपंतांचे एक वरिष्ठ अधिकारी माधवराव यांच्याकडे तो वाढतो, शिकतो. त्यांच्या मुलीचें (ललितेचें) त्याच्यावर प्रेमहि असतें. पण तिची आई इ. तिचें लग्न सजातीय अशा दुसऱ्याच एका पुरुषाशीं करून देतात. कादंबरीची नायिका चिंगी ऊर्फ छाया ही एका शिंपी जातीच्या तरुणावर प्रेम करते. अशा प्रकारें आंतरजातीय विवाहाचा पुरस्कार या कादंबरींत लेखकांनी केला आहे. मनोहरपंत, माधवराव यांना धीटपणें वागण्याचें–मनाला ज्या गोष्टी पटतात, त्या करण्याचें–धाडस करवत नाही. म्हणून पुढे त्यांना पश्चात्ताप होतो. ह्या पश्चात्तापाने ते मानसिक दृष्ट्या शुद्ध होतात. पण ह्या सर्व परिवर्तनाच्या मुळाशी वात्सल्य ही भावना आहे. तिचेंच चित्रण प्रामुख्याने लेखकाला करावयाचें आहे. कादंबरींतील प्रमुख स्त्री पात्रें, छाया, ललिता, जनी, हीं कर्तबगार आहेत. वरेरकरांच्या नायिकांत आढळून येणारे गुण आहेत. पण त्याचबरोबर विशिष्ट कथानकाच्या योगाने त्यांच्यांत संयम आला आहे. त्यामुळे हीं स्वभावचित्रें अधिक आकर्षक व मानवी भासतात.

वरेरकरांच्या महत्त्वाच्या अशा स्त्रीजीवनाविषयक कादंबऱ्या अशा एवढ्याच असें म्हणावयास हरकत नाही. यापुढे वरेररकरांनी अधिक सामाजिकता स्वीकारली. समाजाचें जें विविध प्रश्न उत्पन्न होत होते, त्या प्रत्येक महत्त्वाच्या प्रश्नावर कादंबरी नाटक स्वरूपाची रचना करण्याचा उपक्रम केला

आहे. त्या कादंबऱ्यांत स्त्रीपात्रें आलीं असलीं तरी तीं मूळ (वर्ण्य वा मुख्य) विषय असेल त्याच्या अनुषंगानेच आली आहेत. स्त्रीजीवनाविषयक प्रश्नांना प्राधान्य असें नाही. पण चित्रण करतांना बरेरकरांनी व्यापक दृष्टीचा अवलंब केला आहे. म्हणजे महाराष्ट्रीय उच्चवर्णीय स्त्रीबरोबर एक उपेक्षणीय समाजांतील स्त्री पात्र किंवा महाराष्ट्रीयेतर समाजांतील तरी, असावयाचे, असें धोरण त्यांनी ठरविलें असावें असें दिसतें. त्यांची स्त्रीपात्रें हीं सामान्यतः कर्तबगार आहेत व प्रमुख पुरुष पात्रांना तीं मार्गदर्शन करतात. त्यांना (स्त्री पात्रांना) समाजाची अधिक ओळख माहिती इ. आहे. पुरुषपात्रें हीं त्या मानाने सामान्य आहेत. अशा प्रमुख विषयप्रधान कादंबऱ्यांत ' धांवता धोटा ' ' भानगड गल्ली ' ' पेटतें पाणी ' ' सात लाखांतील एक ' ' फाटकी वाकळ ' शिपायाची बायको ' ' लढाईनंतर ' इ. कादंबऱ्यांचा उल्लेख केला पाहिजे. ' धांवता धोटा ' ही मजुरांच्या चळवळींच्या पार्श्वभूमिवर लिहिलेली आहे. ' भानगड गल्ली ' ही तर १९३० च्या लढ्याचें चित्रण करण्यासाठींच आहे. ' पेटतें पाणी ' त दारुबंदीचा विषय आहे. तर ' सात लाखांतील एक ' व ' फाटकी वाकळ ' यांत ग्राम सुधारणेच्या मार्गातल्या विविध अडचणी इ. चा उल्लेख केला आहे. ' लढाईनंतर ' ह्या कादंबरींत पहिल्या युद्धानंतरच्या परिस्थितीचें चित्रण आहे. तिला तर बरेरकर ' ऐतिहासिक कादंबरी ' च म्हणतात. युद्धकालीन जीवनाला ' शिपायाची बायको ' त स्थान मिळालें आहे. तर ' मलबार हिल ' ह्या कादंबरींत खेड्यांतील निरागस जीवन व मुंबईतील कृत्रिम जीवन यांचें परस्पर विरोधी दर्शन घडविलें आहे. पैशाच्या मोहाने किती अमानवी कृत्यें माणसाकडून होतात हें दाखवून शेवटीं प्रेमाचा विजय दाखविला आहे.

इतर समाजांबद्दल सहानुभूति निर्माण करण्याच्या प्रयत्नांपैकी, ' तरतें पोलाद ' व ' द्राविडी प्राणायाम ' यांचा उल्लेख करावा लागेल. ' तरतें पोलाद ' ची नायिका नार्गिस ही एक पार्शी मुलगी आहे. ती अण्णासाहेब सप्रे यांनी बाळगिलेल्या गोविंद या आय. सी. एस्. तरुणाला

नोकरी सोडावयास लावून राजकीय चळवळींत ओढण्याचा प्रयत्न करते. कादंबरीच्या शेवटी तर 'गोविंद' हा एक मुसलमान स्त्रीचा टाकलेला मुलगा असतो हें गुपित उघडकीस आणून हिंदु–मुसलमानांचे सामाजिक संबंध किती परस्परांशी दृढत्वाने निगडित आहेत हे दर्शविलें आहे. 'द्राविडी प्राणायाम' मध्ये लाजवंती व जयंती पटेल या दोन गुजराती स्त्रियांनी रमाकांत व विश्वास या महाराष्ट्रीय तरुणांबरोबर संसार थाटून त्यांच्या वैवाहिक जीवनाचें चित्रण केलें आहे. नायिका ह्या गुजराती असल्या तरी वरेरकरांच्या नायिकांचे बरेच गुण त्यांनी उचलले आहेत. त्यांच्यामधील प्रेमाचा धागा इतका दृढ आहे की त्याच्या जोरावर ह्या आपल्या सहकाऱ्यावरील विविध संकटांना तोंड देतात. लाजवंती आपल्या मद्य इ. व्यसनाधीन झालेल्या पतीस मोठ्या कौशल्याने ताळ्यावर आणते, व व्यसनमुक्त करते. 'तो महाराष्ट्रीय आहे, त्याच्या बरोबर तुझा संसार सुखी होणार नाही' असें तिचे हितचिंतक तिला वारंवार सांगत असतात. त्यांच्या कारवायांना ती क्षणकार बळीहि पडते. पण शेवटीं त्या दोघांचें पुनर्मिलन होतें असें दाखविलें आहे. जयंती पटेल हिचा नवरा शाळेंत शिक्षक आहे तर ती कॉलेजांत प्रोफेसर आहे. हा अर्थात वरेरकरी चित्रणाचा भाग झाला. पण 'द्राविडी प्राणायाम' मधील गुजराती नायिकांच्या प्रेमाचा रज्जू इतका पक्का आहे की आपल्या व्यसनासक्त सहचाऱ्यास नैतिक अधःपातांतून मुक्त करण्यांत त्या चिकाटी दाखवितात व शेवटीं यशस्वी होतात.

समलोचनात्मक दृष्टीने पाहतां असें म्हणतां येईल की, उद्यांची स्त्री ही हरिभाऊंच्या नंतर वरेरकरांकडेच आपले खरे कैवारी म्हणून वोट दाखवील. वरेरकरांनी महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनाला जें व्यापकत्व येत आहे, तिच्या अंतरंगांत नव्या कर्तृत्वाचा जो संचार झाला आहे; त्याचें दर्शन इतक्या जिव्हाळ्याने व परिणामकारक रीतीने केलें आहे की त्याची दखलगिरी घेतल्याविना त्यांच्या वाङ्मयाकृतींतील स्त्रीजीवनाचें विवेचन पुरे होऊं शकत नाही. शिक्षण, वैद्यकी याप्रमाणें वकिली, व्यापार, इ. विविध व्यव-

सायांत हिरीरीने भाग घेणाऱ्या स्त्रिया वरेरकरांनी निर्माण केल्या आहेत. वरेरकरांच्या स्त्रीसृष्टींत दुबळेपणा, गरीबपणा, यांचा अभाव आहे. त्या-योगेंच कित्येकांस त्यांचें जीवनचित्रण अस्वाभाविक वाटतें. विशुद्ध वा विशिष्ट वाङ्मयीन दृष्टीने तें तसें असेलहि पण स्त्रीजीवनाला जें व्यापकत्व येत आहे त्यांत एक प्रकारचा जिवंतपणा आणण्याच्या दृष्टीने हें असलें चित्रण नुसतें समर्थनीय नव्हे तर स्तुहणीय गणावें लागेल. स्त्रीच्या ठायीच्या विविध क्षेत्रीय कर्तृत्वशीलत्वेचें दर्शन जें त्यांनी घडविलें आहे तें महत्त्वाचें आहे. त्यादृष्टीने त्यांची निर्भर्त्सना न करतां त्यांना धन्यवाद द्यावयास हवेत. पण आजचे टीकाकार ही भूमिका घेऊं शकत नाहीत ह्याचें कारण त्यांच्या मनांचा पिंड वेगळा आहे. वरेरकरांचें चित्रण बरेंच प्रक्षोभक आहे. तें वास्तवाच्या नांवाखाली झालेले आहे. वास्तवता आम्हास अमान्य आहे असें नव्हे. पण इतकी भडक वास्तवता आम्हांस अद्याप झेपत नाही हें खरें आहे. कालोचित दृष्टीने पाहतां व ह्या सर्व प्रबंधाच्या मूळाशी जी विशिष्ट भूमिका आहे त्या भूमिकेवरून पाहतां, वरेरकरांच्या स्त्रीजीवनविषयक चित्र-णाचें समर्थन करणें आवश्यक आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे कीं, आजच्या स्त्रियांसहि वरेरकरांच्या ह्या भूमिका पसंत नाहीत. कारण ह्या स्त्रियाचीं जीवनमूल्यें हीं मध्यमवर्गीय आहे. त्यांना एक प्रकारचा स्वप्नवाद प्रिय आहे. त्या स्वप्नवादाचा वरेरकर पदोपदीं भंग करतात म्हणून आजची मध्यमवर्गीय स्त्री वरेरकरांच्या ह्या स्त्री सृष्टीकडे पाहून गालांतल्या गालांत हसत आहे. पण उद्यांची स्त्री मात्र वरेरकरांच्या साहित्याजवळ थोडावेळ थांबेल. त्यांच्या स्त्रीचित्रांतील आक्रस्ताळेपणापेक्षा, तिच्या युक्तिवादांतील बिनतोडपणा पाहून तिचें अंतःकरण कौतुकाने भरून येईल. मातृत्वाच्या व मानवतेच्या उदात्त भावनांच्या आविष्काराला शीग चढली नाही म्हणून थोडीशी रुखरुख लागेलहि तिला. पण त्या उदात्ततेच्या नांवाखाली दौर्ब-ल्याचा व अकर्तेपणाचा पाठपुरावा करण्यापेक्षा हा सडेतोडपणा तिला निश्चितपणें अधिक जवळचा वाटेल. एकाद्या स्त्री लेखिकेलाहि शोभून दिस-

णार नाही इतक्या अतीव अट्टाहासाने व कैवाराने निर्माण केलेली कर्तृत्ववान स्त्रियांची ही परंपरा पाहून तिचें मस्तक आदराने नत होईल. आणि तिच्या तोंडून उद्गार निघतील, महाराष्ट्रीय स्त्रीला आगरकरांनी जागें केलें, हरिभाऊंनी तिच्या हुंदक्यांचे निनाद महाराष्ट्राच्या हृदया हृदयांत घुमवले; ज्योतिबा फुल्यांनी आणि पुढे अण्णासाहेब कर्व्यांनी तिला शिक्षणाच्या व विद्यापीठाच्या दारांत नेलें; वामनरावांनी तिला समाजवादी विचारांची ओळख करून दिली. महाराष्ट्रीय कवींनी नवजागृत स्त्रीच्या हृदयांतील प्रेमाचा कलख काव्यप्रांतांत घुमविला. पण तिच्या हुंदक्यांचा आवेग ओसरल्यानंतर ती आत्माभिमुख होऊन विचार करूं लागली, तेव्हां तिच्या हृदयांत जो दारुण कलह नि कल्लोळ निर्माण झाला, कुणी केलें त्याचें चित्रण ? कुणी केलें ह्याचें चित्रण ? या नवजागृत मनाच्या नव्या उभाऱ्या, कर्तृत्वाची नवीं क्षेत्रें कुणी माझ्या कक्षेंत आणलीं ? या प्रश्नांचीं उत्तरें जेव्हा ती शोधावयाचा प्रयत्न करील तेव्हा तिच्या मनःचक्षूंसमोर कुणाची मूर्ति उभी राहील तर ती मामा वरेरकरांची हंसतमुख मूर्तिच होय. वाङ्मयीन वादांच्या बाहेर पडून जीवनाच्या नव्या जाणीवेच्या अनुषंगाने साहित्याकडे पहाणारा उद्यांचा टीकाकार वरेरकरांना धन्यवाद देईल. आणि असें त्यांचें स्थान आहेहि.

इतर कादंबरीकार

वरेरकरांच्या कादंबऱ्यांचा विचार केल्यानंतर इतर कांही कादंबरीकारांच्या कृतींचा उल्लेख करणें आवश्यक आहे. अशा लेखकांत प्रथम कांही स्त्रीलेखिकांच्या उल्लेख करणें योग्य होईल. वास्तविक स्त्रीलेखिकांची परंपरा ही हरिभाऊंच्या कालाइतकी पूर्वीची आहे. काशीबाई कानिटकर, गिरीजाबाई केळकर, यांचें लेखन कथेच्या प्रांतांत महत्त्वाचें गणलें जात होतें. तथापि सामान्यतः असें आढळून येतें की, १९२५ नंतर इतर अनेक नवीन लेखिका पुढे येऊं लागल्या. कादंबरी अगर कथेच्या क्षेत्राचा विचार करतांना

विभावरी शिरुरकर, गीतासाने, कुमुदिनी प्रभावळकर, शांताबाई नाशिककर आनंदीबाई शिर्के, कमलाबाई बंबेवाले, इ. चा उल्लेख करावा लागतो. ह्या पैकी बहुतेकींनी कथा व कादंबरी या दोनही प्रकारांची रचना केली आहे. त्या शिवाय केवळ लघुकथेच्या क्षेत्रांत ज्यांची विशेष कामगिरी झाली आहे अशांत, कमलाबाई टिळक, कमलाबाई देशपांडे, मालतीबाई दांडेकर, कुसुमावती देशपांडे इ. लेखिकांचा उल्लेख करावा लागतो. त्रि. राजवटीच्या शेवटच्या चार पांच वर्षांपासून पुढे येत असलेल्या लेखिकांत, कमला फडके, शांता शेळके, पिरोज आनंदकर आदि लेखिकांची आठवण होण्यासारखी आहे. या व इतर अनेक लेखिकांनी मराठी साहित्य समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्रीलेखिकांच्या साहित्याचें मूल्यमापन डॉ. सरोजिनी बाबर यांनी आपल्या प्रबंधांत विस्ताराने केलें आहे.

या लेखिकांत त्यांतल्या त्यांत अधिक कादंबरी रचना ज्यांची झालेली आहे त्यांत गीताबाई साने यांचा प्रथम उल्लेख करावा लागेल. त्यांच्या, 'माळरानांत', 'लतिका', 'वठलेलावृक्ष', 'निखळलेली हिरकणी' 'फेरीवाला' 'धुकें आणि दहिवर' इ. कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यांच्या प्रारंभीच्या कादंबऱ्यांतून स्त्रीविषयक कांही प्रश्नांचा उल्लेख आलेला आहे. हे सारे मध्यमवर्गीय स्त्रीच्या पुढचे प्रश्न आहेत. 'माळरानांत' ची नायिका स्वतंत्रपणें पुढे येण्याचा प्रयत्न करते. पण तिला सर्वांचा विरोध होतो.'लतिका' तील नायिका ही एक मध्यमवर्गीय दुबळी स्त्री आहे. ज्या व्यक्तीवर प्रेम बसलें त्या व्यक्तिबरोबर विवाह व्हावयास हवा असें म्हणण्याचें धाडस तिला होत नाही. दुसऱ्याच माणसाशी विवाहित होते. तिच्या आयुष्यांतील विविध भावनांची ओढाताण हाच कादंबरीचा विषय आहे. 'निखळलेली हिरकणी' या कादंबरींत वैवाहिक जीवनांत अयशस्वी झालेली स्त्री पतीला दुसऱ्या स्त्री बरोबर विवाह करण्याची परवानगी देते. त्याप्रमाणे तो विवाह होतोहि. पण ह्या स्त्रीकडे समाजाची पाहण्याची दृष्टि अनुदारपणाची असल्याने तिला किती त्रास होतो हें दर्शविलें आहे. तर 'फेरीवाला' या कादंबरींत बेकारीचीं दुःखें

वर्णन करून शेवटीं कापड विकण्याचा (फेरीवाल्याचा) व्यवसाय स्वीकारणारा नायक दाखविला आहे. तो निरुपायाने एका वेश्याव्यवसाय स्वीकारलेल्या स्त्रीशी विवाह करतो. ती स्त्री पतित हिंदु विधवा असते. तिचा त्याचा ओझरता परिचय पूर्वी एकदा झालेला असतो. पण हा विवाह एकंदरीने कोणासच सुखाचा होत नाही. वेश्या व्यवसायांत कांही दिवस घालविल्याने तिला दुर्धर रोग झालेला असतो. अर्थात वैवाहिक व साधें जीवन अशक्य असतें. ती आत्महत्त्या करते, असें दर्शविलें आहे.

अशा प्रकारचें गीताबाईंच्या कादंबरीक्षेत्रांतील जीवनाचें स्वरूप आहे. सामान्यतः मध्यमवर्गीय स्त्रीच्या जीवनांतील विविध बारीक सारीक समस्यांचें चित्रण चांगलें झालें आहे. बहुतेक नायिका शिकलेल्या आहेत.त्यांची स्वतंत्रपणें व्यवसाय (नोकरी) करून जीवन कंठण्याची मनीषाहि योग्य रीतीने व्यक्त होते. शेवटी लेखिकेची सहानुभूति समाजवादाच्या दिशेने होत असलेली स्पष्ट दिसते. सामाजिक समस्यांचें परिणामकारक चित्रण लेखिकेला जरी जमलें नाही तरी मध्यमवर्गीय स्त्रीच्या जीवनांतील विविध संघर्ष सहानुभूतिपूर्वक रेखाटले गेले आहेत. तिची सामान्यतः समाजवादी जीवनमूल्यांप्रत वाटचाल चालू आहे. तथापि वैचारिक दृष्टीने विशेष क्रांतिकारकता प्रत्ययास येत नाही.

ह्या स्त्री लेखिकांत आपल्या एकाद्या दुसऱ्या वैशिष्ट्यपूर्ण कृतींनी मोलाची कामगिरी करणाऱ्या कांही स्त्रियांचा व त्यांच्या कृतींचा उहापोह करणें आवश्यक आहे. अशा वैशिष्ट्यपूर्ण कृतींत प्रेमा कंटक यांच्या 'काम आणि कामिनी' व कृष्णाबाई मोटे यांच्या 'मीनाक्षीचें जीवन' ह्या प्रमुख होत. प्रेमाताईनी 'अग्नियान' ही एक राजकीय प्रश्नाची चिकित्सा करणारी कादंबरी लिहिली आहे. स्त्रीजीवनविषयक पाहणीच्या दृष्टीने त्यांची 'काम आणि कामिनी' ही कृति महत्त्वाची आहे. ह्या कादंबरींत लेखिकेने विवाहोत्तर जीवनांतहि पूर्वजीवनाप्रमाणेच ब्रह्मचर्य प्रतिपालनाची कसोशी करणाऱ्या व्यक्तीचें विवाहपूर्व व विवाहोत्तर जीवन रंगविलेलें आहे. मुकुंद, चंद्रशेखर

व लीलाधर हे १९२० च्या चळवळींत आपापल्या कॉलेजांना रामराम ठोकणारे तरुण आहेत. त्यांच्या नंतरच्या जीवनांतील विविध घडामोडी चित्रित केल्या आहेत. सुमति, वृंदा, हेमा या तरूण स्त्रियांच्या प्रतिनिधी होत. लीलाधर विलायतेहून येतो, त्याचा सुमतीचा विवाह होतो. त्याची आपापल्यापरीने देशसेवा चालू असते. चंद्रशेखर व्यापारांत शिरतो (कारण तो गुजराथीच असतो.) व मुकुंद हा गांधीजींच्या सेवाव्रताचा अवलंब करून सातारा जिल्ह्यांतील सोनगांवास आपला आश्रम स्थापन करतो. मुकुंद आपल्या पत्नीच्या–वृंदेच्या–प्रेम वा कामविषयक भावनांची दखल न करतां ब्रह्मचर्य व्रत पाळण्याचा तिला उपदेश करतो. तो बडोद्यास कॉलेजांत असतो. पुढे त्याचें लोकसेवेकडे अधिकाधिक लक्ष जातें. वृंदेला त्याच्या उपदेशानुसार वागणें अशक्य होतें. तिचे व चंद्रशेखरचे संबंध मैत्रीचे होतात. त्याच्यापासून तिला गर्भधारणाहि होते. मुकुंदाच्या ही गोष्ट लक्षांत येते. तो तिला सर्व साहाय्य देतो. (त्याने तिला त्याचा मार्ग पसंत नसल्यास इतर पुरुषाशी मित्रसंबंध जुळविण्यासहि परवानगी दिलेली असते.) तिच्या मुलाचें नांव सत्यकाम ठेवितो. पण वृंदेलाच राहणं अयोग्य वाटून ती गृहत्याग करते. मुकुंद पुष्कळ प्रवासानंतर सोनगांवास येतो, तेथे एक आश्रम स्थापतो. पुढे वृंदाहि त्याच्याकडे येते. तो तिचा परत स्वीकार करतो. पण स्वतःच्या शरीराकडे दुर्लक्ष झाल्याने त्याला आजारीपण येतें त्यांतच त्याचा अंत होतो !

मुकुंद या गांधीवादी तरुणाचें विवाह व जीवनविषयक तत्त्वज्ञान, स्त्रीजीवनविषयक त्याचा दृष्टिकोन इ. चें या कादंबरींत दिग्दर्शन केलें आहे. गांधीजींच्या एतद्विषयक विचारांचा उहापोह यापूर्वीच आला आहे. ह्या कादंबरींत जीवनदर्शनाच्या आधारें त्याचें दिग्दर्शन केलें आहे. स्त्रीने खरी सहचारिणी व्हावें, निर्भय व्हावें असा त्याचा (मुकुंदाचा) प्रयत्न असतो. त्याची तत्त्वनिष्ठा विलक्षण आहे. विशेष हें की, त्या तत्त्वनिष्ठेची मानवतेशी सांगड घातली आहे. आपल्या मतांचा पत्नीने स्वीकार करावा अशी त्याची इच्छा असते. पण तो त्या बाबतींत आग्रहाचा अवलंब न करतां मतपरिवर्तनाचा अवलंब करतो. कादंबरींत तें झालें आहे असें दर्शविलें आहे..

विवाहोत्तर नीतीबद्दल व स्त्रियांच्या उद्धाराबद्दल अगदी अपवादभूत असणारीं अशीं मतें ह्या कादंबरीत व्यक्त केलीं आहेत. तीं त्या त्या प्रश्नाबाबत चालना देण्याच्या दृष्टीने होय. उ. 'आजपर्यंत लोकांची अशीच कल्पना आहे की, पतिपत्नींनी परस्पराविषयी विकार बाळगले तरी त्यांत दोष नाही. परक्याविषयी वाळगूं नयेत. हें म्हणणें चुकीचें आहे. पतिपत्नींनीहि एकमेकांविषयीं विकार बाळगतां कामा नये. तेंच तर पतनाचें कारण आहे.' (पृ. १९२). 'संततीची इच्छा नसतांना जर विषय सेवन केलं तर तें विकारजन्य समजावें.' स्त्रीजातीला प्रबुद्ध करण्याची, तिची उन्नति करण्याची मुकुंदाला अत्यंत तळमळ असते. पण त्याचीं मतें व त्याचे मार्ग हे असे आहेत. एकदां त्याची मैत्रिण त्याला तुम्ही स्त्रियांची काय सेवा केलीत? असा प्रश्न करते. तेव्हां तो म्हणतो, 'आजपर्यंत साऱ्या स्त्रीजातीकडे मी निर्विकार दृष्टीने पाहात आलो आहे. हीच मोठी सेवा मी केली आहे. यापेक्षा अधिक तें पुरुषाच्या हातून काय होणार?' (पृ. ३००) अबलोन्नतीची तळमळ त्याला लागली होती. त्याचा मित्र चंद्रशेखर स्वतःच्या कम्यूनिझमकडे वळणाऱ्या पत्नीची निर्भत्सना करतो. पण मुकुंद त्याची कानउघडणी करतो. त्याचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा असा आहे. 'स्त्री ही शक्ति आहे. तिला ज्या रूपांत पुजावी त्या रूपांत ती दर्शन व प्रसाद देते. तिला देवी म्हणून पुजणाऱ्याला ती चैतन्यमयी मंगलदेवता होऊन सौख्याचा ठेवा देते. तिला राक्षसी समजणाऱ्या समोर ती विकाळ व हिडीस स्वरूपांत प्रकट होते. त्या स्वरूपांत तिचा स्वभाव दुःखमय असतो, पण त्याची जबाबदारी पुरुषावरच असते ना? तूं आतांपर्यंत स्त्रीजातीकडे कधीच आदराच्या पूज्यतेच्या दृष्टीनं पाहिलं नाहीस. स्त्रीजात तेवढी आपल्या सुखासाठी, ती आपल्या भोगाचं साधन आहे असंच मानीत आलास. तिच्यांतील दैवी गुणाकडे तूं लक्ष दिलं नाहीस. तुझ्या सुखासाठी आपल्यांतील पशुवृत्ति हीन विकार यांचाच विकास स्त्रीनं करावा असं तूं मानत आलास तेंच तुला मिळालं, तर मग त्यांत आश्चर्य कोणतं?" (पृ.

३५२-५३). आर्थिक स्वातंत्र्याला त्याचा विरोध नाही. अशाप्रकारें स्त्रीच्या उद्धाराचा मार्ग दाखविणारी पण महत्त्वाच्या बाबतींत अत्यंत क्रांतिकारक विचारांचें दिग्दर्शन करणारी ही एक महनीय कृति आहे. स्त्रीजीवनाकडे पाहण्याचा हा एक विधायक दृष्टिकोन आहे. सामाजिक वा व्यक्तिगत हक्कापेक्षा नैतिक मूल्यांकडे अधिक लक्ष द्यावयास हवें हा या कादंबरीचा आदेश आहे. प्रेमाबाईनी मुकुंद, वृंदा, सुमति ह्या अप्रतिम व्यक्तिरेखा रंगविल्या आहेत. गांधीजींच्या जीवनदर्शनाच्या आधारावर हें चित्रण झालें आहे. चंद्रशेखरचें पात्र आदर्श स्वरूपाचें वाटणें कांहीना शक्य आहे. पण त्याचे लोकविलक्षण विचार असावेत असें त्याचें चरित्रहि त्यांनीं रंगविलें आहे. वृंदेचें परिवर्तनहि योग्य वाटतें. चंद्रशेखराचें मत परिवर्तन मात्र तितकें सयुक्तिक वाटत नाही. एकंदरीने स्त्रीजीवन विषयक क्रांतिकारक विचार मांडणारी ही एक श्रेष्ठकृति आहे असें म्हणतां येते.

' काम आणि कामिनी ' इतकींच महत्त्वाची दुसरी कादंबरी म्हणजे कृष्णाबाई मोटे यांची ' मीनाक्षीचें जीवन ' ही होय. हीहि एक स्त्रीजीवन-विषयक कादंबरी आहे. पहिली कादंबरी नायकप्रधान आहे तर प्रस्तुत कादंबरी नायिकाप्रधान आहे. नायिका मीनाक्षी ही आपलें आत्मचरित्र सांगते अशी कल्पना आहे. तिने एका साम्यवादी कार्यकर्त्याबरोबर प्रेम विवाह केलेला असतो. त्याच्याशी संसार करण्याची तीला उभारी लागते. त्याच्या जीवनाशी समरस होण्याचा ती अटोकाट यत्न करते. पण त्याला मात्र आपल्या ध्येयनिष्ठेमुळे अंगावर घेतलेल्या कामामुळे वैवाहिक जीवनांत रमावयास वेळ नसतो. त्याच्या जीवनाबरोबर आपली फरफट चालली आहे हें पाहून तिची दारुण निराशा होते. तिला शिलू नांवाची मुलगी असते. कौटुंबिक व वैवाहिक सुखासाठीं आसुसलेलें तिचें मन तिच्या यजमानांचा सहकारी सुरेश याच्यावर कांहीं काल केंद्रित होतें. पण तिला जीवन असह्य होतें. घर सोडून बहिणीकडे जाते. मुलीला बहिणीच्याच ताब्यांत देते व स्वतः सिनेमा व्यवसायांत नटी म्हणून शिरते, नांव कमावते पण कसल्या तरी आजारांत मृत्यू पावते.

अशा प्रकारचें अगदी वेगळ्या स्वरूपाचें हें कथानक आहे. ध्येयवाद्याच्या भग्न संसाराच्या वाताहतीची ही एक हकिकत आहे. महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनांतील हा एक टप्पा आहे. मीनाक्षीने प्रेमविवाह केलेला असतो, पण पतीच्या प्रखर ध्येयवादामुळे सहजीवन तिला लाभत नाही. स्वत्व जागृत झालेल्या स्त्रीची ही जीवनकथा आहे. नायिका पतीवर व समाजावर केवळ चिडून जात नाही. स्वतःचा स्वतंत्र असा व्यवसाय शोधते. व त्यांत समाधान मानते. तिच्या पतीच्या वागणुकीमागे विशिष्ट तत्त्वज्ञान होतें. स्त्रीलाहि पुरुषाप्रमाणे स्वतंत्र जीवन असावयास काय हरकत आहे ! असें त्यांना वाटतें. त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्न चालू होते. पण नायिकेचें स्वप्न वेगळें होतें. शेवटीं तिने स्वतंत्र जीवन स्वीकारलें. पण तिला यासाठी मोठें मोल द्यावें लागलें.

आधुनिक सुशिक्षित स्त्रीच्या जीवनाची थोडी चिकित्सा या कथेंत आली आहे. ती महत्त्वाची आहे. ' सध्याच्या आधुनिक स्त्रीने माजघराचा उंबरठा ओलांडला आहे. तिला बाहेर जायला आडकाठी नाही. पण अजून तिचें क्षेत्रच तिला आवरतां येत नाही...अशा वेळीं बायका काय करूं शकतात ? सुकाणू नसलेल्या नौकेप्रमाणे त्यांची स्थिति होते. पुढे जातां येत नाही, मागेही नाही. आमचे संसारांतील जोडीदार, बाहेरच्या व्यवसायाच्या अडीअडचणींनी कष्टून जात असतां, किंवा त्यांत मग्न असतां, आम्ही साऱ्या काय करतों, एक रडतों तरी किंवा रिकामपणाला कंटाळतों तरी. आणि मग त्यांतून सुटका म्हणून हा समाज पहा, तो समाज पहा, इथे शिवणक्लासांत नांव घाल... अशी धडपड करूं पाहतों. पण आमचें ह्या गोष्टींत खरोखर मन कितपत असतें ... विवाहित स्त्री अशा रीतीने घराच्या बाहेर पडून आपल्याला गुंतवून घेतांना दिसते, पण तें केवळ पुरुष घरीं नसतो म्हणून ! " (पृ. ४५). मध्यमवर्गीय स्त्रीच्या जीवनाची ही चिकित्सा बरीच वास्तवपूर्ण अशी वाटते.

अशा प्रकारें ' मीनाक्षीचें जीवन ' ह्या कादंबरींत संक्रमणावस्थेतील महाराष्ट्रीय स्त्रीचें चित्र आलें आहे. नायिका मीनाक्षी हिने त्यांतल्या

त्यांत मार्ग काढण्याचा उपक्रम केला आहे. जेव्हा तिच्यापुढे कोणता व्यवसाय स्वीकारावा असा प्रश्न पुढे उभा राहतो तेव्हा तिला कांही उत्तर सुचत नाही. कारण कोणत्याच व्यवसायास आवश्यक अशी तिची तयारी नसते. पण मागे नाटकांत तिने काम केलें होतें. तें चांगलें झालें होतें. व त्यावरून हा व्यवसाय तिला सुचतो. वास्तविक हा सर्व साधारण सुशिक्षित स्त्रीपुढचा प्रश्न आहे. पण नायकाच्या ध्येयवादामुळे ही परिस्थिती निर्माण होते असें दाखविल्याने कलात्मक न्यायाचें परिपालन झालें असलें तरी त्याचा वास्तवस्पर्श कमी झाला आहे. पण त्याचाच आणखी एक फायदा झालेला आहे. स्त्रीजीवनांत होत असलेल्या ह्या फरकाबरोबर पुरुषाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोनहि बदलला आहे हें लेखिकेला सूचित करतां आलें आहे. समाजाच्या नैतिक धारणेंत कसा महत्त्वाचा फरक घडूं लागला आहे व यापुढच्या कालांत स्त्रीपुरुष संबंध कसे भूलतः भिन्न होणार आहेत याचें दिग्दर्शन ह्या दोन्ही कृतींच्या द्वारें उत्तम रीतीने होऊं शकतें. ह्या दोन कृतींचें कर्तेपण हें स्त्रीलेखिकांकडे जावें ही त्यादृष्टीने अत्यंत स्पृहणीय अशी घटना आहे.

स्त्री पुरुष संबंधांत अधिक न्यायीपणा असावा असे विचार समाजांत प्रसृत होते तसतशी विविध कायद्यांची पण आवश्यकता निर्माण झाली होती. स्त्रीजीवनाच्या दृष्टीने अशी महत्त्वाची तरतूद म्हणजे घटस्फोटाला परवानगी ही होय. वैवाहिक जीवनांतील असमाधानापासून मुक्तता करून घेण्याचा हा एक मार्ग आहे. हिंदुसंकेताप्रमाणे विवाह हा एक संस्कार आहे, त्याचें निराकारण होत नाही. सुधारकांच्या विचारांनी ह्या सुधारणेची आवश्यकता प्रतिपादली होती. कादंबरीच्या द्वारे ज्या कांही व्यक्तींनी हा प्रश्न मांडला त्यांत कमलाबाई बंबेवाले ह्यांचा उल्लेख करावा लागेल. ह्या लेखिकेने 'बन्धुमुक्ता' या नांवाची कादंबरी ह्या विषयाचें प्रतिपादन करण्यासाठी लिहिली आहे. नायिका उषा हिचें आपल्या व्यसनी व अमानुष पतीशी पटत नाही. प्रभाकर नांवाच्या तरुणाकडे ती आकृष्ट होते. पण हिंदु कायदा घटस्फोट मानीत नाही. तिला तो हवा असतो. ती धर्मांतरहि करते. तरी

पण हिंदु कायद्याचा काच संपत नाही. अखेरीस ती आत्मत्याग करते. हेतुप्रधान कथा असल्याने कायद्याची चर्चा आली आहे. नियोजित कायद्याचा आराखडाहि बरा आहे. नायिकेने आत्मत्याग केला ही गोष्ट सयुक्तिक नाही अशी कांहीची टीका आहे. पण हेतुप्रधान कादंबरी असल्याने हा आत्मत्याग जरी कलानियमांना धरून नसला तरी त्याद्वारें सूचित होत असलेल्या वस्तुस्थितीशिवाय दुसरें हिंदु स्त्रीला गत्यंतर नाही. या दृष्टीने समर्थन करतां येणें शक्य आहे. स्त्रीजीवनपर प्रश्नावरील सहेतुक कादंबरी म्हणून तिचें (मोठेंपण) वैशिष्ट्य अधिकच आहे.

कुमुदिनी प्रभावळकर यांच्या दोन तीन कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. 'अनियमित जग' व 'कुस्करलेलें हृदय' ह्या दोन्ही कादंबऱ्यांतून स्त्रीजीवनांतील विविध प्रसंगांचें चित्रण केले आहे. 'कुस्करलेलें हृदय' मध्ये नायिकेचा वैवाहिक जीवनांत पदोपदीं अपेक्षाभंग कसा होत गेला व शेवटीं घराबाहेर पडण्याविना तिला गत्यंतर कसें राहिलें नाही हें दर्शविले आहे. तर 'निर्माल्यांतली कळी' ह्या कादंबरींत वेश्याजीवनाचे कांही पैलू रंगविले आहेत. देहविक्रय करून चरितार्थ चालविणाऱ्या स्त्रियांनी आपला व्यवसाय सोडून नवें जीवन सुरू करावें असें सुचविलें आहे. त्याच वर्गातील सुशिक्षित तरुणांनीं तरुण स्त्रियांना त्या व्यवसायापासून परावृत्त करावें असें सुचविलें आहे. कादंबरीचा विषय व मांडणी चांगली आहेत. डॉ. केतकरांनी आपल्या कादंबऱ्यांत त्या व्यवसायांतील तरुण स्त्रियांचा तिकडे ओढा नाही असें दर्शविलें आहे. वस्तुतः पाहतां हा एक अत्यंत महत्त्वाचा असा सामाजिक प्रश्न आहे. त्याबाबत शासन संस्थेने कांही तरी धोरण आखावयास हवें. कारण कायद्याने हा व्यवसाय बंद केला तर त्या व्यवसायिनींची आर्थिक तरतूद काय ? हा प्रश्न आहे. एका स्त्री लेखिकेचें ह्या विषयाकडे लक्ष वेधलें जावें हें समुचित आहे.

गेल्या पिढींतल्या स्त्रियांपैकी इंदिराबाई सहस्रबुद्धे यांनी कांही कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'गोदावरी', 'बाळूताई धडाधे', केवळ ध्येया-

साठी,' अशा तीन कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. पहिलींत विधवेवर येणाऱ्या अनेकविध प्रसंगांचें वर्णन आहे. दुसरींत जगाच्या बाह्य चांगूलपणावर न भुलण्याचा आदेश दिला आहे. वरपांगीं सुधारक म्हणविणारे लोक तत्त्वतः सुधारणेला कसे विरोधी असतात हें दर्शविले आहे. तिसऱ्या कादंबरींत लेखिकेने विवाहसंस्थेची अनवस्यकता प्रतिपादिली आहे. प्रतिपादनाच्या दृष्टीनें ही कादंबरी क्रांतिकारक आहे. पण तिच्यावर एका इंग्रजी कादंबरीची छाया आहे हें लक्षांत घेतलें की तें नाविन्य नष्ट होते. तथापि परकीय विचारांच्या आधाराने कां होईना येवढ्या मागच्या कालांत इतके क्रांतिकारक विचार मांडले जावेत हें लेखिकेला भूषणावह आहे. तत्त्वाच्या दृष्टीने पाहिले असतां विवाहाने—मातृत्वाने—स्त्रीला पारतंत्र्य येतें यांत कांहींच चूक नाही. आता त्यासाठी विवाहसंस्थाच नष्ट करावी काय हा प्रश्न आहे. पण नवजागृत स्वातंत्र्यवादिनी स्त्रीची पहिली प्रतिक्रिया अशी होणें हें अगदी शक्य आहे. कारण त्यांतूनच पुढे मग संकट निराकरणाचा मार्ग निघतो. विवाहसंस्थेची अनवस्यकता जरी तंतोतंतपणें पटूं शकली नाही वा सिद्ध करतां आली नाही, तरी ती संस्था नष्ट व्हावी असा विचार डोक्यांत यावा अशीं बोचक वैगुण्यें ह्या संस्थेंत आहेत हें अमान्य करतां येईल असें वाटत नाही.

या स्त्री लेखिकांच्या कादंबऱ्यांचा विचार करीत असतां आपल्या कृतींनी मोलाची भर मराठी वाङ्मयांत घालणाऱ्या शांताबाई नाशिककर यांच्या कादंबऱ्यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांच्या कादंबऱ्या सामाजिक दृष्ट्या महत्त्वाच्या आहेत. 'लग्नाच्या बाजारां'त त्यांनी विवाह संस्थेचा कसा बोजवारा उडाला आहे हें दर्शविलें आहे. 'माझीं कोरीव लेणी' महाराष्ट्रीय स्त्रीच्या गेल्या पन्नास वर्षांच्या प्रगतीची कल्पना देतात. परिस्थितींत कसा फरक पडत चालला होता हें चांगल्या रीतीनें दर्शविलें आहे. धर्माच्या नांवाखाली चाललेल्या विविध अमानुष रूढींचा निषेध हाच का धर्म' ह्या कथेंत केला आहे. 'कीर्ति' मध्ये अस्पृश्यतेचा प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न

दिसतो. तर 'चिखलांतलें कमळ' ह्या कादंबरींत विवाहसंबंध न होतां आईबापांस झालेल्या संततीचा प्रश्न विचारांत घेऊन त्यांच्या चांगल्या गणलेल्या घराण्याशी विवाहसंबंध घडून घेतो असें दाखविलें आहे. 'पुसलेलीं चित्रें' या कादंबरींत लेखिकेने घटस्फोटाच्या कायद्याची आवश्यकता प्रतिपादली आहे. कल्याणी व प्राची या दोन बहिणींचें आपल्या पतींशीं पटत नाही. त्यांचे यजमान त्यांना अमानुष रीतीने वागवितात पण त्यांना दुसरा मार्ग नाही. धर्मांतर करूनहि घटस्फोटाचा प्रश्न सुटत नाही. शेवटीं या दोघी बहिणी आपल्या प्रियकरांबरोबर मानस विवाह करून (विवाह झाला असें दर्शविणाऱ्या कांही शपथा इ. घेऊन) एकमेकांशी एकनिष्ट राहण्याच्या आणाभाका घेतात. घटस्फोटाची तरतूद नसल्याने त्यांना दुसरा मार्ग दिसत नाही.

अशा प्रकारे सामाजिकतेच्या दृष्टीने बरेंच महत्त्वाचें असें लिखाण करून स्त्रीजीवनाच्या कांही समस्या चित्रित केल्या आहेत. पण लेखिकेचें लक्ष मध्यमवर्गीय स्त्रीवरच केंद्रित झालें आहे असें दिसतें. तसेंच ह्या निरनिराळ्या बंधनांच्या मूळाशी आर्थिक परदास्य आहे ही कल्पना लेखिकेला आली असली तरी तिला महत्त्व द्यावेसें वाटलें असें दिसत नाही. सामाजिक अन्यायांचें दिग्दर्शन करतांना ज्या विशिष्ट वैचारिक क्रांतिकारकतेचा अवलंब करावयास हवा, तो लेखिकेला संमत नसावा असें दिसतें.

शांताबाईंबरोबरच मालतीबाई दांडेकर यांचें नांव पुढे येतें. मालतीबाईंनी सात आठ कादंबऱ्या लिहून स्त्रीजीवनाच्या विविध समस्यांचें चित्रण केलें आहे. आजन्म अविवाहित राहण्याची पाळी आलेल्या स्त्रियांची संख्या समाजांत वाढत आहे. अशाच एका कुमारिकेचें जीवन मालतीबाईंनी आपल्या 'मातृमंदिरांत' त रंगविलें आहे. ज्या व्यक्तीबरोबर आपला विवाह व्हावा असें वाटतें, त्याच व्यक्तीचें आपल्या धाकट्या बहिणीवर प्रेम बसावें व त्यांचा संसार थाटलेला पाहाण्याचा प्रसंग नायिकेवर आला

आहे; व ती धीराने त्या प्रसंगास तोंड देऊन स्वतः समाजसेवेचा मार्ग स्वीकारते. जीवनांत येणाऱ्या विविध अडचणींशीं धीराने सामना देणाऱ्या स्त्रीचें चित्र 'तेजस्विनी' त रंगविलें आहे. आर्थिक परिस्थितींत होणारा चढउतार, शत्रू आणि मित्रांशी द्यावा लागणारा सामना, इ. भाग कथेच्या ओघांत आला आहे. अशाच प्रकारचें सोशीक जीवन जगणाऱ्या दुसऱ्या एका स्त्रीचें चित्र लेखिकेने 'कृष्ण रजनीं' त रेखाटलें आहे. 'वज्रलेप' या कादंबरींत विवाहित स्त्रीला किती विविध प्रकारच्या जुलमी बंधनांना तोंड द्यावें लागतें ह्याचें वर्णन आलें आहे. तर 'काटेरी मार्ग' ह्या कादंबरींत एक परित्यक्ता स्त्री घटस्फोटाची परवानगी नसली तरी दुसरें लग्न करते अशी क्रांतिकारक घटना रंगविली आहे. सासूरवास, मोठ्या कुटुंबांत परस्परांबद्दल असणारे हेवेदावे इ. अनेक गोष्टी आपल्या कादंबऱ्यांतून रंगविल्या आहेत.

अशा प्रकारचें मालतीबाईंच्या कादंबरीविश्वांतील जीवनाचें स्वरूप आहे. लेखिकेला प्रायः जरी कुटुंबजीवनाचींच निरनिराळीं अंगें रंगवावयाचीं असलीं तरी त्याच्याशी निगडित असलेल्या सामाजिक प्रश्नांकडे तिचें दुर्लक्ष झालें नाही हें विशेष होय.

या स्त्री लेखिकेंत आनंदीबाई जयवंत यांचा उल्लेख करावयास हवा. त्यांच्या 'जगाशी बंडखोरी', 'उर्मिला' व 'कुलकथा' ह्या कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. पहिली एक प्रेमकथा आहे. जगाच्या चांगुलपणास मुकलेली व्यक्ति जगावर (जगांतील चांगल्या व्यक्तीवर) कशी उलटते, हें व निरनिराळ्या अनैतिक व असामाजिक कृत्यांची आखणी कशी करते हें दाखविलें आहे. प्रेमकथेला व्यापक सामाजिक पार्श्वभूमि देण्याचा उपक्रम या कथेंत केला आहे. 'उर्मिला' हें एका स्त्रीचें जीवनचित्र आहे. तिच्या जीवनाच्या आधारें जीवनांतील सत्प्रवृत्त असत्प्रवृत्त व्यक्तींच्या कारवायांच्या कृत्यांचा कसा परिणाम होतो हें दर्शविलें आहे. 'कथे' ची कल्पना डेव्हिड कॉपरफील्डवरून सुचली असा उल्लेख लेखिकेने प्रारंभीच्या प्रास्ताविकांत केला

आहे. शेतकऱ्यांच्या (खानदानी) जीवनांतील विविध कडुगोड प्रसंग या कादंबरींत आले आहेत.

एकंदरीने समालोचनात्मक दृष्टीने पाहतां लेखिकेची प्रवृत्ति ही वास्तववादी चित्रणापेक्षा आदर्शवादी–बोधवादी–चित्रण करण्याकडे अधिक आहे असे दिसतें. त्यायोगेंच स्त्रीजीवनाच्या विविध सुखदुःखांचें परिणामकारक चित्रण केलें असलें तरी त्याच्या सामाजिकतेकडे लक्ष गेलेलें दिसत नाही. उर्मिलेसारखी स्त्री मोहास बळी पडते, अनूढ मातृत्वाचा प्रसंगहि तिच्यावर आलेला असतो, पण हा तिच्या केवळ अविचाराचा परिणाम आहे असें लेखिकेला दाखवावयाचें असावें असें वाटतें. असो लेखिकेचें लेखन कमी असलें तरी जीवनचित्रण समाधानकारक आहे असें म्हणावयास हरकत नाही.

ह्या विविध स्त्री लेखिकांच्या कादंबऱ्यांतील जीवनाविष्काराकडे दृष्टिक्षेप टाकला तर एक गोष्ट स्पष्ट होते की, महाराष्ट्रीय स्त्रीची समाजजीवनांतील असहायता सर्वांच्याच लक्षांत आली आहे. त्याचप्रमाणे तिच्या जीवनांतील बोचक व भेदक प्रसंगहि त्यांच्या नजरेंतून सुटलेले नाहीत. तथापि तें जीवनचित्रण ज्या भेदक रीतीने करावयास हवें तसें झालेले नाही हें मात्र सत्य आहे. डॉ. सरोजिनी बाबर यांनी आपल्या स्त्रियांची मराठीतील साहित्यसेवा ह्या प्रबंधांत स्त्री लेखिकांच्या ठायीं 'कल्पना वैभव' नाही असें म्हटलें आहे. 'कल्पना वैभव येथे कोते पडतें आहे.' असें त्यांचें मत आहे. पण वस्तुतः केवळ कल्पनावैभव कोतें आहे हें म्हणणें चूक आहे. खरी वस्तुस्थिति अशी आहे की, स्त्री लेखिकांनी जीवनाचा व्यक्तिनिरपेक्ष (objective) दृष्टीने विशेषसा विचार केला नाही. त्यांच्या (स्त्रियांच्या) जीवनांत प्रत्यक्षांतच इतकें कारुण्य भरलें आहे की, त्यांना तेंच महत्त्वाचें वाटलें. या कारुण्याच्या पलीकडे जाऊन त्याचीं बीजें शोधून काढण्याचा प्रयत्न करावा लागतो तो फारच थोड्या लेखिकांनी केला आहे. अशा लेखिकांत प्रेमाबाई कंटक, कृष्णाबाई मोटे, व विभावरी शिरूरकर यांचा उल्लेख करावा लागतो. ह्या लेखिकांच्या जीवनविषयक व्यापकदृष्टि-

कोनामुळे त्यांच्या कृतींना वेगळ्याच प्रकारची धार आली आहे. या तिघींत विभावरीने महाराष्ट्राचें लक्ष चांगलेंच ओढून घेतलें.

वस्तुतः विभावरीचें लेखन त्या मानाने अल्प आहे. 'हिंदोळ्यावर' ही कादंबरी, 'कळ्यांचे निश्वास' हा कथासंग्रह व 'विरलेलें स्वप्न' ही छोटी कादंबरी, एवढेंच लेखन विशेष गाजलें. हा गाजावाजा प्रायः लेखिकेच्या अज्ञातपणामुळे होता असें म्हणतां येतें. तथापि लेखनाचें जें मोठेंपण आहे त्याकडे लक्ष जाण्याच्या दृष्टीने हें योग्यच झालें. 'हिंदोळ्यावर' हीच कादंबरी या कादंबऱ्यांत महत्त्वाची आहे. 'विरलेलें स्वप्न' ही एक प्रणयकथा आहे. तिचा नायक हा ध्येयनिष्ठ आहे. त्याच्यावर त्याच्या प्रेयसीचें प्रेमहि आहे. पण त्यांचें प्रेम सुफलित होत नाही. ते का होत नाही ह्याचा उलगडा कोठे होत नाही. 'हिंदोळ्यावर' ही कादंबरी मात्र फार महत्त्वाची आहे. कादंबरी निरनिराळ्या दृष्टींनी महत्त्वाची आहे. पहिली गोष्ट अशी की कादंबरीची नायिका ही कोणी कुमारी वा विधवा नसून एक परित्यक्ता स्त्री आहे. मध्यमवर्गात त्या कालीं अशा परित्यक्ता बऱ्याच दिसत असत. त्या-दृष्टीने पाहतां कादंबरीच्या विषयाचें अव्वलपण लक्षांत घ्यावें लागतें. ही नायिका चांगली सुशिक्षित आहे. ती नोकरी करून स्वतंत्रपणें जीवन कंठण्याचा प्रयत्न करते. पण कितीहि प्रयत्न केले तरी तिच्या मनाचा रितेपणा कांही कमी होत नाही. जगाच्या सहानुभूतीचा तिला अनुभव आलेला नसतो. अशा एका अभागिनीच्या मनांत येणाऱ्या विविध विचारांचें, उसळणाऱ्या विविध भावनांचें हें आविष्करण आहे. तिचें प्रेम एका युवकावर असतें. पण तें सफल होण्याची कधीच शक्यता नसते. कारण ती हिंदु विवाहित व परित्यक्त स्त्री असते. नवऱ्याची तिच्यावर कायदेशीर सत्ता असते. पण त्याची सहानुभूति मात्र तिच्या प्रत येऊं शकत नाही. समाज त्याबाबत कांहीच करूं इच्छित नाही व शकतहि नाही. स्त्रीजीवनाला सार्थकत्व आणणाऱ्या मातृत्वाचीं तिला तहान लागलेली असते, पण तीहि मनीषा पूर्ण होणें सर्वथा अशक्य असतें. कारण पुनः ती विवाहित स्त्री

असते ही गोष्ट तिला विचारांत घ्यावी लागते. मध्यमवर्गीय विशिष्ट वातावरणांत वावरणाऱ्या स्त्रीचें जीवन किती कारुण्यपूर्ण झालें आहे या वस्तुस्थितीचें दिग्दर्शन करणारी ही कादंबरी आहे. तिच्या परिचयांतली राजाई ही एक मोलकरीण असते, तिच्यावर असलाच प्रसंग येतो, पण ती चटकन् 'मोहतुर' करून मोकळी होते. या दृश्याने अचलेचें (नायिकेचें) मन अधिकच विषण्ण होतें.

ही कादंबरी महाराष्ट्रीय स्त्रीच्या विचारक्रांतीच्या दृष्टीने प्रातिनिधिक आहे असें म्हणावयास हरकत नाही. कादंबरींतल्या नायिकेचा झगडा हा दुहेरी आहे. तिच्यावर समाजाने एकाकी जीवन लादलेलें आहे. अशा प्रकारें नायिकेचें मन मूक दाखवून जरी लेखिकेने तिच्या दीन स्थितीचें चित्रण केलें तरी तें आकर्षक झालें असतें. पण या ठिकाणीं नायिकेच्या मनांतील विविध विचार चित्रित केलेले आहेत. ती चांगलीच सुसंस्कृत आणि बरीच बहुश्रुत अशी आहे. कोणाही चांगल्या पुरुषाशी तिने अगदी एकनिष्ठेने संसार केला असता इतकें तिचें भावजीवन उदात्त आहे. पण अशा अत्यंत सच्छील, सत्प्रवृत्त, सुबुद्ध स्त्रीच्या वाट्याला परित्यक्तेचें जीवन आलें आहे, ही अर्थातच सामाजिक जीवनावर कठोर अशी टीका आहे. नायिकेच्या मनांत वात्सल्य भावनांचा जो सागर उचंबळून येतो, आणि आपल्या असहायतेची जाणीव जेव्हा तिला होते, तेव्हा तिचें मन विदीर्ण होतें. समाजाने चिरडलेल्या मानवी मनाचा हा आक्रोश फारच परिणामकारक आहे.

तथापि ज्या कारणाने महाराष्ट्रीय स्त्रीच्या विचारक्रांतीचा एक टप्पा दाखविणारी अशी ही कादंबरी आहे असें म्हटलें तें कारण वेगळेंच आहे. व तें म्हणजे तिच्या मनांतले विविध विचार होत. अचला ही परित्यक्ता आहे. पण स्वतंत्रपणें ती जीवन कंठते आहे. आणि आपल्या पतीचें नांवही ती काढीत नाही. आणि तिच्या मनांत आंपल्या प्रियकराचेच विचार येतात. पुरुष लेखक असता तर कदाचित पतीबद्दलचे विचार तिच्या मनांत येतात, त्याच्याकडे जावें, असें तिला वाटतें असें दाखविलें असतें.

पण लेखिकेने मोठ्या कौशल्याने आणि साक्षेपाने ती गोष्ट टाळली आहे. या वैशिष्ट्यामुळेच कित्येकांना ही कादंबरी अनैतिक वाटली आहे ! पण तिच्या मनांत आपल्या पतीकडे जाण्याचे विचारहि येत नाहीत. या वस्तुस्थितींतून अचलेच्या (व त्या अनुषंगाने महाराष्ट्रीय स्त्रीच्या) जीवनांतील दोन गोष्टी व्यक्त होतात. पहिली म्हणजे तिच्या ठिकाणीं जें व्यक्तित्व जागृत झालेलें आहे त्या व्यक्तित्व जागृतीच्या दृष्टीने तिला असें निष्कारण पडतें घेणें हें अपमानास्पद वाटतें, ही अत्यंत महत्त्वाची अशी अवस्था आहे. व या पुढचा मोठा टप्पा वा मोठी गोष्ट म्हणजे ती आपल्या प्रियकराच्या विचारांत दंग असते. कदाचित सामाजिकरूढीच्या निर्घृणतेमुळे तिला त्याच्याशी विवाह करणें शक्य नसेल, व त्यामुळे ती एकाकी जीवन कंठीलहि, पण तिच्या मनांत हे विचार येतात हे 'पापी विचार' आहेत असें मात्र तिला वाटत नाही. याचाच अर्थ असा की, पुरुषाने लादलेलें, आपल्या वर्चस्वासाठी लादलेलें पातिव्रत्य हें मूल्य तिने मनाने पूर्णपणें झिडकारून दिलें आहे. व ही तिची तयारी ही फार मोठ्या वैचारिक वा मानसिक क्रांतीची द्योतक आहे. महाराष्ट्रीय स्त्री व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचारांचा स्वीकार करीत होती. मध्ययुगीन पातिव्रत्यासारख्या मूल्यांच्या मोहांतून ती बाहेर पडत होती. भारतीय समाजांत ही वैचारिक क्रांति ब्रिटिश राजवटींत झाली. साहित्यांत नव जागृत, व्यक्तिवादी विचारांचा स्वीकार केलेली, मध्ययुगीन ध्येयप्रणालींतून बाहेर पडणारी अशी कोणती स्त्री आढळून येते ? असें पाहूं लागलों तर अचलेपाशीच थांबावें लागेल व त्यादृष्टीने 'हिंदोळ्यावर' ची अनन्यसाधारण सर्वांगीण क्रांतिकारकता मान्य करावी लागते. अशा प्रकारें विभावरी शिरुरकरांच्या या एका पण अतिशय महत्त्वाच्या कादंबरीचा विचार या विवेचनांत जरा आस्थेवाईकपणें करावा लागतो. रूढ सामाजिक विचारांच्या दृष्टीने पाहतां जास्तींत जास्त ही कादंबरी घटस्फोटाच्या आवश्यकतेसाठी लिहिली असें म्हणतां येईल पण ह्या कादंबरींत तसा उल्लेख नाही हें अर्थात तिचें मोठेंपण आहे. विशेषतः विचार करावयास लावणें हें विभावरी वाङ्मयाचें वैशिष्ट्य

दिसतें. त्याच्या अनुषंगाने ह्या कादंबरीचा बोलबालाहि बराच झाला. पण त्यांत क्रांतिकारकतेचें दिग्दर्शन झालें आहे असें वाटत नाही. मनोविश्लेषणाचा एक यशस्वी प्रयत्न म्हणून फार तर या कादंबरीची स्तुति झालेली आहे. पण या मनोविश्लेषणांतली ही जी सामाजिक क्रांतिकारता या ठिकाणीं दर्शविली तीच ऐतिहासिक दृष्टीने पाहतां अधिक मोलाची आहे असें वाटतें. ब्रि. राजवटींत लिहिल्या गेलेल्या स्त्रीजीवनावरील उत्कृष्ट कादंबऱ्यांत 'हिंदोळ्यावर' चें स्थान फार उच्च आहे. ती केवळ वाङ्मयीन कलाकृति नव्हे. स्त्रीजीवनाचा एक मोठा टप्पा दर्शविणारी फार मोठी कलाकृति आहे.

प्रमुख लेखिकांच्या लेखनाचें स्वरूप पाहिल्यानंतर त्यांच्याकडे समालोचनात्मक दृष्टींतून नजर टाकणें आवश्यक आहे.

विवाहाच्या निराकरणाचा अधिकार स्त्रीला अत्यावश्यक आहे असें या लेखिकांचें मत असल्याचें दिसतें. प्रमुख लेखिकांची एक तरी कादंबरी या प्रश्नावर लिहिलेली आहे. हा प्रश्न स्त्रीला फार जिव्हाळ्याचा वाटणें साहजिक आहे. पण कालचा हिंदुकायदा इतका अन्यायी होता की त्याने कलात्मकता सुद्धा कधेंत येऊं दिलेली नाही. प्रभावळकरबाईंची उषा प्राणत्याग करते, शांताबाईंचे नायक नायिका दूर दूर निसर्गाच्या सान्निध्यांत निष्ठापूर्वक आणाभाका घेतात, तर मालतीबाईंनी कायद्याची पर्वा न करतां सरळ पुनर्लग्नच दाखविलें आहे. या प्रकारचा कोणताच निर्णय न घेतां केवळ भावनाविचारांचें आंदोलन दाखवून समाजालाच या बाबतींत विचार करावयास लावण्याचा उपक्रम विभावरीबाईंनी केला आहे.

विविध अवस्थांत (कौमार्य, सुवासिनी, विधवा) स्त्रियांना सहन कराव्या लागणाऱ्या जाचाचें चित्रण स्त्रियांच्यांच लेखनांत परिणामकारकतेने यावें यांत नवल नाही. बहुतेकांनी नवविवाहितेच्या भावनांची नववर फिकीर करीत नाही असें रंगविलें आहे. तें सर्वसाधारण स्त्रीजातीच्या अनुभवाचें प्रातिनिधिक स्वरूपाचें आहे, असें म्हणावयास हरकत नाही. विवाहित व भावनामय जीवनावरच स्त्री लेखिकांचें लक्ष केंद्रित झालें असलें तरी कांहींनी

स्त्रींत जी जागृति निर्माण झाली आहे तिचा आविष्कार करण्याचें महनीय कार्य केलें आहे. गीताबाई साने, कृष्णाबाई मोटे, विभावरीबाई शिरुरकर, प्रेमाबाई कंटक ह्या लेखिकांचा ह्या संबंधांत मुद्दाम उल्लेख करावा लागेल. महाराष्ट्रीय स्त्री खरोखर जागृत झाली आहे, विविध प्रकारच्या दास्यांतून ती धडाडीने पुढे येत आहे; समाज जीवनाच्या साकल्यासाठीहि ती बद्धपरिकर होत आहे. निदान माजघराच्या उंबरठ्याच्या बाहेर तरी तिचें पाऊल पडलें आहे, असें निश्चितपणें म्हणतां येतें. उत्कृष्ट पुरुष स्वभावचित्रेंहि ह्या लेखिकांनी निर्माण केलीं आहेत. हेंहि जातां जातां लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. तथापि प्रेमाबाई कंटक सोडून दिल्या तर विशिष्ट सामाजिक विचारसरणीचा स्वीकार कोणी केलेला दिसत नाही. कांहींची त्या दिशेने वाटचाल चालू आहे. पण बहुसंख्य लेखिका ह्या प्रवृत्तीने व्यक्तिवादीच दिसतात. हें एक प्रगतीचें लक्षण आहे असें म्हणतां येईल.

प्रमुख स्त्री लेखिकांच्या कादंबरी इ. साहित्यांतील स्त्री जीवनाचा विचार केल्यानंतर एका प्रश्नावद्दल थोडा उहापोह करणें आवश्यक आहे. तो म्हणजे स्त्री जीवनाचें चित्रण वा स्त्रियांच्या विषयींचे प्रश्न यांचें दिग्दर्शन 'पुरुष लेखकांपेक्षा स्त्री लेखिकांकडून अधिक मूलगामी वा मूलतःच वेगळ्या प्रकारचें होतें कीं काय ? ' हा होय. खरें पाहिलें तर असा प्रश्न निर्माण होण्याचें कांहींच कारण नाही. कारण प्रतिभा प्रज्ञा वा बुद्धि ह्या गोष्टी स्त्रीपुरुष निरपेक्ष आहेत. विज्ञान, गणित, इ. क्षेत्रांत स्त्रीची बुद्धि चालू शकणार नाही असा गैरसमज पुष्कळच काल रूढ होता. स्त्री व पुरुष यांचे स्वभावधर्म हे सर्वस्वी भिन्न आहेत. त्या योगाने एकाच्या मनांतील खळबळी इ. दुसऱ्याला कळणारच नाहीत असाहि एक समज कांही लोकांत रूढ आहे. बारकाईने पाहूं गेलें असतां अशा प्रकारच्या भिन्नत्वाची कल्पना दृढमूल होण्याचें कारण कृषिसंस्कृती-अवस्थेंतील स्त्रीजीवन आहे. पहिल्या खंडांतील प्रारंभींच्या प्रकरणांत स्पष्ट केल्याप्रमाणे ह्या अवस्थेंत स्त्री व पुरुष ह्यांचें जीवन सर्वस्वी एकमेकांपासून विभिन्न झालें होतें. जीवनध्येयेंहि वेगळीं होतीं.

ह्या अवस्थेंत अधिक काल संबंध मानवजमातीनेच कंठला आहे. (अद्यापसुद्धा सर्वजगांतील सर्व समाज ह्या सांस्कृतिक अवस्थेंतून बाहेर पडले आहेत असें नाहीं,) त्याचा परिणाम वर निर्दिष्ट केलेली समजूत होण्यांत झाला आहे.

स्त्री व पुरुष हीं मानव्याचीं दोन अंगें आहेत असें मानलें तर व प्रतिभेचें इ. देणें दोघांना सारखेंच आहे असें गृहित धरलें तर एकमेकांच्या जीवनाची कल्पना एकमेकांस होऊं शकणार नाहीं हें म्हणणें चूक आहे. असें कोणतें स्त्रीजीवनाचें विशेष अंग आहे कीं जें खरोखर प्रतिभावान् अशा पुरुष लेखकाच्यासुद्धा कक्षेंत येणार नाहीं ? व उलटहि प्रश्न विचारतां येईल. दोघांना समाजांत इतक्या निकटवर्तिपणाने जीवन कंठावें लागतें कीं एकमेकांपासून लपून कांहीं राहील असा संभवच नाहीं. आणि प्रतिभावान् व्यक्तीला तर मानसिक आंदोलनें इ. सुद्धा आकलन होतात. स्त्रीलाच जिचा परिचय होणें शक्य आहे अशी भावना म्हणजे मातृत्व हीच भावना होय. परंतु मातृत्वाचें जें अतिरिक्त गुणगान केलें आहे तें प्रामुख्याने पुरुष-लेखकांनीच होय. तो भाग म्हणजे कृषि-संस्कृति-प्रधान विचाराच्या वर्चस्वाचा भाग होय. या वरून ही गोष्ट स्पष्ट होईल की स्त्रीजीवनाचें चित्रण वा आविष्करण हें स्त्रीलेखिकांना जितकें जमेल तितकें पुरुष लेखकाना जमणें शक्य नाही ह्या समजुतींत काडीचेंहि तथ्य नाही. व्यक्तिविशिष्ट वा समष्टि-विशिष्ट कांहीं वेगळेपणा असेलहि पण तो वेगळेपणा हा केवळ प्रमाणाचा, प्रकाराचा वा मूलभूत महत्त्वाचा नव्हे.

आज आपण व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचारास मान्यता मिळालेल्या अशा जगांत नि वातावरणांत राहात आहोंत. व्यक्तीच्या कार्यकक्षा, ध्येयें, इ. हीं सर्वस्वी समान झालेलीं आहेत. राजकीय वा सामाजिक हक्कांत मानवी समतेचा विचार हा मूलभूत महत्त्वाचा आहे असें समजतों. व्यक्ति-त्वाची जाणीव निर्माण होण्याची व जीवनाला व्यक्तित्वनिष्ठ घाट येणें ही एक प्रक्रिया आहे. ब्रि. राजवटींत ती सुरू झाली व आज बराच मोठा टप्पा गाठलेला आहे. सामान्यतः विचाराने आपण तेथप्रत आलेलों आहोंत.

अशा प्रकारें स्त्री ही एक व्यक्ति मानली, तिला पुरुषाप्रमाणेच विशिष्ट ध्येयें आहेत, कर्तव्यें आहेत, हक्क आहेत ही गोष्ट मान्य केली की स्त्रीजीवनांत वेगळेपणा असा कोणता राहतो की जो प्रतिभावान पुरुषाच्या कक्षेपलीकडील आहे, की जो केवळ तो 'पुरुष' म्हणूनच त्याला समजणार नाहीं ?

साहित्याकडे पाहिलें तरी काय आढळतें ? मोठमोठ्या, धुरंधर लेखकांनीं स्त्रीजीवनांतील विविध भावना संघर्ष यांचें उत्कृष्ट आविष्करण केलें आहे. अलीकडचा काळ घेतला तरी हेंच आढळून येईल. हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यांत तत्कालीन जीवनाचा असा कोणता अवयव राहिला आहे की जो केवळ हरिभाऊ हे पुरुष लेखक होते म्हणून त्यांना समजलेला नाही ? वरेरकरांच्या नाटक कादंबऱ्यांतून एखाद्या स्त्री लेखिकेला जमणार नाहीं इतक्या बारकाव्याने स्त्रीजीवन चित्रण आलेलें आहे. विविध कवींच्या काव्याची साक्षहि या बाबतींत काढतां येण्यासारखी आहे. व्यक्ती व्यक्तीचे विचार, संस्कार, इ. वेगळे असतात. त्याप्रमाणे तसा फरक प्रत्येक व्यक्तींत राहणार पण स्त्री लेखिकांचें एकमेव वैशिष्ट्य—कीं जें पुरुष लेखकांना ते केवळ पुरुष आहेत म्हणून सर्वथा अशक्य—असें कांहीं आहे असें वाटत नाहीं. स्त्रीलेखिकांच्या लेखनांत त्यांच्या जीवनाच्या अनुषंगाने कांहीं वेगळेपणा असणें अपरिहार्य आहे. पण तो वेगळेपणा मूलभूतपणाचा नव्हे. व व्यक्तिस्वातंत्र्याधिष्टित समाजरचनेंत तर तसा मूलभूत वेगळेपणा मानणें वा अभिप्रेत धरणें वैचारिक व इतर दृष्टींनी अयोग्यच आहे.

स्त्रियांची चळवळ ही व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचारांच्या उद्भवानंतर निर्माण झालेली आहे. दास्यमुक्तता हें तिचें स्वरूप आहे. स्त्रीला स्त्री म्हणून विशिष्ट नागरिक वा सामाजिक हक्क नाकारले जात होते. ते हक्क प्राप्त करून घेणें हें तिचें (त्या चळवळीचें) उद्दिष्ट होतें. हें तिचें स्वरूप जर लक्षांत घेतलें तर त्यांत स्त्रीला व पुरुषाला अगम्य असें काय आहे ? व्यक्तित्वाचे व नागरीकत्वाचे हक्क मिळण्यास कांही पुरुषांचा विरोध होता तसा कांही स्त्रियांचा पण होता. पुढच्या अवस्थेंत तर असें आढळून आलें की, जसे

स्त्रियांना नागरीकत्वाचे इ. हक्क नाहीत तसे पुष्कळशा पुरुषांनाहि नाहीत. अर्थात् अशा पुरुषांची हक्क प्राप्त करून घेण्यासाठी चळवळ सुरू झाली. स्त्रीचेंहि तेंच उद्दिष्ट होतें. अर्थात् ह्या दोन्ही चळवळी एकमेकांत विलीन पावल्या आहेत. आज 'स्त्रियांचे प्रश्न' असे कांही नाहीत. जे आहेत ते सर्व सामाजिक प्रश्न आहेत, मानवी प्रश्न आहेत. शिक्षण, आरोग्य, सांस्कृतिक प्रगति करून घेण्याची मुभा इ. गोष्टी ह्या समाजांत मुक्तपणें उपलब्ध व्हावयास हव्यात असें म्हटलें जातें तेव्हा स्त्री व पुरुष ह्या दोघांचाहि त्यांत समावेश होतो. अशा प्रकारें स्त्री व पुरुष यांची बुद्धिमत्ता समान मानली, दोघांची ध्येयें इ. समान मानलीं, व व्यक्ति म्हणून दोघांना समान हक्क, अधिकार, इ. आहेत असें मानलें तर, स्त्री व पुरुष यांच्या जीवनांत मूलभूत विलगपणा असा कोठे उरतो कीं जो एकमेकांच्या आकलनाच्या कक्षेपलीकडे राहील ?

आज आपण साहित्यांत सभोवार नजर टाकली तर काय आढळतें ? काव्य घेतलें तर त्यांत व्यक्तिवादी आत्मकेंद्रित रविकिरणमंडळाचे कवि आहेत. त्यांच्यांत इंदिरा संतांचा समावेश करावा लागेल. सौंदर्यवादाला प्रमाण मानणारे तांब्यांच्या संप्रदायाला जवळचे असे जे कांही कवि आहेत त्यांत शांता शेळके यांचा उल्लेख करावा लागेल. कादंबरीचा विचार केला तरी समाजवादाच्या दिशेने ज्या अनेक लेखकांची वाटचाल चालू आहे त्यांत मालती बेडेकर यांचा समावेश करावा लागेल. म्हणजे काय ? ज्या विविध सामाजिक विचारसरणी आहेत त्यांत जसें पुरुष लेखक इ. आहेत तशा स्त्रियाहि आहेत. केवळ स्त्रिया म्हणून या प्रत्येक क्षेत्रांत त्यांचें कांही वेगळेपण आहे, व तें मूलभूत स्वरूपाचें आहे असें मानतां येणार नाही. तसें वाटणें हें वैचारिक दृष्ट्या वेगळेपणाचें (वास्तविक मागासलेपणाचेंच म्हणावयास हवें,) लक्षण आहे. अर्थात ह्या सर्व विवेचनांत हेंहि गृहित धरलें आहे की, असे कोणतेहि पुरुषांचे प्रश्न नाहीत की जे स्त्रीला ती केवळ स्त्री आहे म्हणून उलगडूं शकणार नाहीत. आज स्त्री व पुरुष यांनी केलेल्या जीवनचित्रणांत वरवर

पाहिलें असतां थोडा वेगळेपणा दिसतो. पण त्याचें स्वरूप वरवरचें आहे. शिवाय तसें होण्याचें कारण आपल्या समाजांत समतेचा वावर हा सर्वदूर सारखेपणाने पसरलेला नाही. कांही लोकांचा ह्या समतेला वैचारिकच विरोध आहे. म्हणजे वस्तुतः स्त्रियांना थोड्या वेगळ्याच परिस्थितींत जगावें लागत आहे. त्याचा परिणाम तसा थोडा वेगळेपणा त्यांच्या जीवनचित्रणांत येण्यांत झाला आहे. जों जों स्त्री व पुरुष ही एकमेकांच्या जवळ येतील, तो तों त्यांच्यांत सहकार्याची व सहानुभूतीची भावना अधिकाधिक वाढीला लागेल. व त्यांच्यांत आज दिसणारा वरवरचा वेगळेपणाहि कमी होईल. व्यक्तिवैशिष्ट्य अर्थातच कायम राहाणार.

प्रमुख कादंबरीकारांच्या कृतींचा विचार केल्यानंतर कांही इतर विशिष्ट कादंबऱ्यांचा विचार केला पाहिजे. प्रसिद्ध लेखकांच्या कृतींप्रमाणे कांही कृती वेळोवेळी प्रसिद्ध पावल्या आहेत. अशा कांही कृतींचा उल्लेख करणें योग्य होईल. स्त्रियांच्या विषयींची सहानुभूतिची भावना ब्रि. राजवटीच्या पहिल्या चाळीस पन्नास वर्षांत निर्माण झाली. स्त्रियांना शिक्षण देण्याचे व त्यांच्यांत जागृति निर्माण करण्याचे प्रयत्न कसे सुरू झाले व त्यांचें स्वरूप कसकसें बदलत आलें इ. उहापोह निरनिराळ्या प्रकरणांतून आलेला आहेच. कादंबरीची त्या बाबतींत विशिष्ट कामगिरी आहे. प्रसिद्ध लेखकांनी ह्या बाबत आपल्या कृतींतून जीवनचित्रणाच्या आधारें जी कामगिरी केली तिचा उल्लेख आतापर्यंत आलेला आहे. पण कांही लेखक असे होऊन गेले आहेत की, त्यांच्या एकाददुसऱ्या कृती गाजल्या आहेत. अशा कृतींचा परामर्श घ्यावा लागतो.

ह्या संबंधांत प्रथम कोणत्या कृतीचा उल्लेख करणें योग्य होणार असेल तर ती कृती म्हणजे 'यमुनापर्यटन' ही होय. आधुनिक मराठींतली स्त्रीजीवनविषयक पहिली कादंबरी म्हणून ह्या कादंबरीकडे बोट दाखवावें लागेल. ह्या कादंबरींत हिंदु स्त्रीचीं दुःखें वर्णन केलीं आहेत. वैधव्यावस्थेतील दुःखांना प्राधान्य मिळालें आहे. नायिका खिस्ती धर्माकडे वळते हा

भाग सोडून दिला तर कादंबरी सामान्यतः प्रातिनिधिक आहे. त्यानंतरचा क्रम हरिभाऊ आपट्यांच्या 'पण लक्षांत' चा लागेल. ह्या कादंबरीबद्दलचें व्यापक विवेचन मागे आलेंच आहे हरिभाऊंच्या इतरहि कृतींचा उल्लेख करण्यास प्रत्यवाय नाही. वामनरावांची 'रागिणी' 'सुशीलेचा देव' 'इंदु काळे सरला भोळे' या त्यानंतरच्या प्रसिद्ध स्त्रीजीवनविषवक कादंबऱ्या होत. वरेरकरांची 'विधवा कुमारी' 'गोदू गोखले' ह्या कृती त्यानंतर महत्त्वाच्या आहेत. ह्याच कालांतली प्रसिद्ध स्त्रीजीवनविषयक कादंबरी म्हणजे 'बंधनाच्या पलीकडे' ही होय. व्यक्तिवादाचा आविष्कार या कादंबरींतून झाला आहे. कादंबरीची नायिका वेश्याकन्या आहे. तिच्यावर एका उच्च कुलोत्पन्न तरुणाचें प्रेम आहे. असा विवाह अर्थात सामाजिक-दृष्ट्या तत्कालीन कल्पनेप्रमाणे होणें अशक्य होतें. पण लेखकांनी 'बंधनाच्या पलिकडे' जाऊन तसली शक्यता चित्रित केली आहे. पु. य. देशपांडे यांच्या 'सदाफुली' 'सुकलेलें फूल' इ. कादंबऱ्याहि स्त्रीजीवनविषयक कथा आहेत. पण त्यांत विशिष्ट समस्येपेक्षा वा विवक्षित चित्रणापेक्षा प्रणयभावनेला अधिक प्राधान्य मिळालें आहे. स्त्रीजीवनाच्या सहानुभूतीचें क्षेत्र किती व्यापक होत होतें. ह्याची कल्पना ह्या कादंबरीवरून येतें. देशपांड्यांच्या 'विशाल जीवन' 'काळी राणी' इ. कादंबऱ्यांतून त्यांची व्यक्तिवादी प्रवृत्ती व्यक्त होते. पण समाजवादी ध्येयांकडे ते जोराने ओढले जात होते. असें स्पष्टपणें दिसून येत असले तरी त्यांची मनोवृत्ति निसर्गतः व्यक्तिवादी आहे. तिचें दिग्दर्शन ह्या सर्वच कृतींतून होतें. विशाल वा व्यापक जीवनाची ओढ हा या कादंबऱ्यांचा विशेष आहे. स्त्रीजीवनविषयक भावना इ. ना प्राधान्य अर्थात पहिल्या कांही कृतींतच मिळालें आहे.

यानंतरची या दृष्टीने महत्त्वाची कादंबरी म्हणजे 'हिंदोळ्यावर' ही होय. ह्या कादंबरींतल्या स्त्रीजीवनविषयक प्रतिबिंबाचें दिग्दर्शन यापूर्वीच आलें आहे. या कालांतली आणखी एक वेगळ्या प्रकारची कादंबरी म्हणजे मो. ग. रांगणेकर यांची 'सीमोल्लंघन' ही होय. ह्या कादंबरींत एक प्रेम-

कथाच आलेली आहे. प्रणय लेखकांचा परिचित असा 'प्रेमिकांचा त्रिकोन' पण आहे. तथापि ह्या त्रिकोनाची सोडवणूक करतांना लेखकांनी एक नवा प्रश्न विचारासाठी पुढे मांडलेला आहे आणि तो प्रश्न म्हणजे द्विपतित्वाचा होय. वास्तविक असला विचार यापूर्वीच वामनराव जोशांच्या 'आश्रम हरिणीं' त आलेला आहे. व त्याचें मूळ टेनिसनच्या 'इनॉक् आर्डेन' मध्येहि सांपडते. स्त्रीविषयक सहानुभूतीपूर्ण दृष्टिकोण म्हणून ह्या विचाराच्या समर्थनाकडे पाहतां येईल. सामान्यतः आपल्या समाजांत अगदीं अलीकडे अलीकडेपर्यंत द्विभार्यापद्धति (वा अनेक भार्यापद्धति) प्रचारांत होती. उच्च वर्णीय कुटुंबांतून तिचा प्रादुर्भाव फारसा नव्हता. पण खालच्या वर्गांत सरसहा ती रूढ होती आणि तिचें समर्थन आर्थिक कारणपरंपरा लक्षांत घेऊन करतांहि येईल. या द्वि (वा बहु) पत्नी पद्धतीची प्रतिक्रिया म्हणून बहु (निदान द्वि) पतित्वाचा विचार तर्कशः योग्य वाटतो. पण यापेक्षा अधिक बारकाईने पाहतां त्यांत स्त्रीकार्यतेचा भाग अल्प आहे. कारण ज्या समाजांत अनेक स्त्रिया करण्याची पद्धति होती त्या समाजांत स्त्रीला उपभोग्य व्यक्ति यापेक्षा अधिक मानाचें स्थान नव्हतें. स्त्रीप्रधान समाजरचनाच असेल तर कदाचित बहुपतित्वाची चाल रूढहि होईल. कारण त्यांत पुरुषांना व्यक्ति म्हणून स्थानच नसणार. पण स्त्री व पुरुष या दोघांना व्यक्तित्वाचे अधिकार आहेत असें मान्य केलें तर, व सामान्य माणसाची प्रवृत्ति इ. लक्षांत घेतल्या तर असल्या पद्धतीच्या स्वीकाराचा विचार समंजसपणें करणें योग्य होईल असें वाटत नाही. तथापि एक प्रयत्न वा स्त्रीकडे त्यांतल्यात्यांत सहानुभूतीने पाहण्याचा विचार म्हणून ह्या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. त्यानंतरची गाजलेली कादंबरी म्हणजे 'राक्षस विवाह' ही होय. ह्या कादंबरींत प्रेमविरहित अशा सर्वच विवाहांना 'राक्षस विवाह' असें ठरविलें आहे.

हिंदु स्त्रीच्या कायदेशीर हक्कांची जाणीव होऊं लागली होती. त्या दृष्टीने कांही प्रयत्न यापूर्वीच सुरू झाले होते. श्री. कृ. के. गोखले ह्यांनी

'हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा' हें पुस्तक लिहिलें. त्याप्रमाणे त्यांनी 'एकत्र की विभक्त' ही एक कादंबरी लिहिली. तींत एकत्र कुटुंबांत हिंदु स्त्रीच्या जीवनाची कशी कुचंबणा होते हें दर्शविलें आहे. तशा प्रकारची विशिष्ट कायदेशीर सुधारणा पुढे धरून अलीकडे वा. वि. जोशी यांनी रचना केली आहे. विभावरी वाङ्मयानंतर स्त्री पुरुष-संबंध विचारांना एक चालना मिळाली. प्रेम ही केवळ एक तारुण्यसुलभ भावना अशा दृष्टीने तिचें चित्रण न होतां जीवनांतली एक अत्यंत महत्त्वाची भावना म्हणून तिच्याकडे पाहिलें जाऊं लागलें. त्यांत स्त्रीच्या व्यक्तित्वाचा विचार होऊं लागला.

अशा कांही कृतींत श्री. के क्षीरसागर यांच्या 'राक्षस विवाहा' ला स्थान द्यावें लागेल. सुसंस्कृत स्त्रीला सुद्धां विवाहांत स्वतःचें देहार्पण करावयाचें असतें. विवाह हा सहजीवनाचा पाया. त्याची कल्पना एकंदरीने पवित्र, काव्यमय, उदात्त, अशी आहे. पण प्रचलित समाजव्यवस्थेंत त्याला केवळ कृत्रिमतेचें ओंगळवाणें स्वरूप प्राप्त झालें आहे. अशा उच्च भावनाशून्य बहुसंख्य विवाहांना लेखनकाने 'राक्षस विवाह' म्हणून संबोधिलें आहे. सुशिक्षित स्त्रीच्या मनाचा कोंडमारा वा कुचंबणा थांबली नव्हती असें ह्यावरून स्पष्ट होतें. प्रणय भावनेला योग्य महत्त्व वा सहजीवनाला भावनामय आधार देण्याचें दृष्टीने सदर कादंबरीचें महत्त्व वरेंच आहे.

आणखीहि एक दोन वैशिष्ट्यपूर्ण कृतींचा उल्लेख या संबंधांत करावा लागेल. डॉ. केतकरांनी वेश्याव्यवसायाकडे वेगळ्या दृष्टीने पाहावयास शिकविलें. पण डॉक्टर मजकुरांच्या वेश्याव्यवसायाच्या समर्थनाचा अगदी वेगळा अर्थ आहे. त्यांनी त्या व्यवसायांतील स्त्रियांच्या जीवनांतील उदात्तता रंगविली होती. नव्या पिढीची वृत्ती ही तो व्यवसाय न स्वीकारण्याकडे आहे ही गोष्ट डॉक्टर महाशय विसरूं शकले नव्हते. या व्यवसायाकडे निश्चितपणे अधिक्षेपाची दृष्टि समाजवादी विचारसरणीची आहे. त्या दृष्टीने ह्या व्यवसायांतील जीवनांतील अमानुषता, कुरुपता, विद्रूपता दर्शवून त्यामागील नैतिक अधिष्ठान काढून घेणें हें एक महत्त्वाचें अंग आहे. रशियांत त्या दृष्टीने

'यामा द पिट्' या कादंबरीचा उद्भव व प्रसार झाला. तिचाच अनुवाद मराठींत या सुमारास झाला. 'यामा' अशाच नांवाने ती मराठींत आली. वेश्याव्यवसायांतील ओंगळवाणेपणा, किळसवाणेपणा, दर्शविण्याच्या दृष्टीने ह्या कादंबरीचें महत्त्व अपार आहे. प्रत्यक्ष कादंबरींतील वर्णन जरी रशियांतील असलें तरी त्यांत एकप्रकारची सार्वदेशिकता आहे. आणि त्याच दृष्टीने स्त्री व मानव जातीला कलंकभूत असणाऱ्या ह्या व्यवसाया मागील नैतिक अधिष्ठान काढून घेण्याच्या दृष्टीने सदर कादंबरी महत्त्वाची आहे.

अशा प्रकारची परकीय जीवनाचा आधार असलेली पण उदात्त भावनांचें चित्रण करणारी आणखी एक कादंबरी म्हणजे 'रणांगण' ही होय. ह्या कादंबरींत युद्धकालीन व विशेषतः युरोपीय वातावरण रंगविलें आहे. नायिका हार्टा ही नायकाबरोबर-महाराष्ट्रीय तरुणाबरोबर—कांही काल घालविते. त्याच्यावर प्रेम करते. शेवटीं बोट मुंबई बंदराला लागते त्यांची ताटातूट होते. आंतरराष्ट्रीय महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली अशी ही कादंबरी आहे. तिचें स्वरूप प्रेमकथेसारखें असलें तरी प्रियकर प्रेयसींच्या अनुभूतींचें क्षेत्र इतकें व्यापक झालें आहे कीं त्या प्रेमाला अतिशय उदात्त असें स्वरूप प्राप्त झालें आहे. महायुद्धाने मानवी जीवनाची उच्चतर मूल्यें कशीं धुळीस मिळालीं आहेत. स्त्रीजातीच्या जीवनाची कशी परवड झाली आहे हें फार उत्कृष्ट रीतीने चित्रित केलें आहे. तरी विविध कटु अनुभवांनी ही अभागिनी स्त्री निराश, हताश न होता मानवजातीच्या मांगल्याची व कल्याणाची वाट शोधते.' अमुकच आपला देश अशी भावना पुढच्या पिढीची उरणार नाही. माझी आई पोलंडमधली आहे, माझा जन्म बर्लिनमध्ये झाला. माझीं मुलें शांघायमध्ये जन्म घेणार! आजी पोलंडची, आई जर्मनीची आणि स्वतः चीनची अशांचीं मुलें कुठच्या देशासाठीं भांडतील?' असा तिचा सवाल आहे. हें जे मानवतेचें विशाल दर्शन ह्या कादंबरीत होतें, तो ह्या कादंबरीचा एक अनन्य साधारण विशेष आहे. भारतीय वा महाराष्ट्रीय स्त्रीच्या सामाजिक जीवनाची कक्षा जरी तेथ-

पर्वत जाऊं शकली नव्हती, तरी पण महाराष्ट्रीय लेखकाच्या दृष्टीची झेप किती दूरवर जात होती हें लक्षांत घेण्याच्या दृष्टीने ही कादंबरी उल्लेखनीय आहे. ही जी मानवतेप्रत जाण्याची वाट चाल चालू होती तिचा एक टप्पा दर्शविणारी कृति म्हणून या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल.

शेवटीं या संबंधांत आणखी एका कादंबरीचा उल्लेख करावा. श्री. न. चिं. केळकर यांच्या कांही कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. त्यांत 'जगाची रीत' ह्या कादंबरीचा त्या ठिकाणीं उल्लेख करावा लागेल. ह्या कादंबरीचें कथानक 'श्रद्धानंद अनाथ महिलाश्रम' या संस्थेच्या भोंवती आधारलेलें आहे. केवळ संशयामुळे ज्याचें जन्मरहस्य अनाकलनीय राहतें अशा एका मुलाची आश्रमांत रवानगी होते. त्या मुलाला पुढे आपले आईबाप मिळतात. एकमेकांच्या वर्तनाविषयीं संशय घेणें ही एक 'जगाची रीतच' आहे असा एक निष्कर्ष एका पात्राने काढला आहे. निराधार स्त्रीला आधार देऊन समाजाची सेवा करणाऱ्या संस्थाचें कार्य कसें चालतें त्याचें दिग्दर्शन या कादंबरीत आलें आहे. स्त्रीजीवनविषयक महत्त्वाच्या संस्थेकडे लक्ष वेधण्याचे दृष्टीने कादंबरीचें महत्त्व अनन्य आहे.

वरेरकरांच्या तसेंच प्रमुख स्त्रीलेखिकांच्या मुख्य कृतींचा व वेळोवेळीं स्त्रीजीवनविषयक म्हणून गाजलेल्या कादंबऱ्यांचा आतापर्यंत उहापोह केला. त्यानंतर याठिकाणीं इतर अनेक कादंबरीकारांच्या कृतींचें व त्यांतील स्त्रीजीवनाचें स्वरूप पाहणें आवश्यक आहे. अर्थात सर्व कृतींचें विस्तृत विवेचन करणें शक्य नाही. तथापि समालोचनात्मक दृष्टीने त्यांची पाहणी करणें आवश्यक आहे. या प्रबंधामागे जी विशिष्ट भूमिका आहे तिच्या अनुषंगाने ज्यांचें विशिष्ट दृष्टीने संस्मरणीय असें साहाय्य झालें आहे त्यांचा विचार विस्तारशः केला आहे. तथापि इतर लेखकांचें आपापल्यापरीने साहाय्य झालें आहे; हें विसरतां उपयोगी नाही.

अशा लेखकांत पहिले म्हणजे नारायण हरि आपटे हे होत. यांनी लिहिलेल्या कादंबऱ्यांची संख्या बरीच आहे. विशिष्ट समाजगटांत त्यांच्या

कादंबऱ्या लोकप्रियहि झाल्या आहेत. आजहि त्या वाचल्या जातात. आधुनिक मध्ययवर्गीय तरुणांच्या (स्त्री व पुरुष) कौटुंबिक जीवनांत जे अनेकविध प्रश्न निर्माण झालेले आहेत त्यांनी त्याचें जीवन कसें दोलायमान झालें आहे हें दाखवून त्यांतून मार्ग काढण्याकरतां म्हणून सत्प्रवृत्ति, सेवावृत्ति, वडिलांच्या बद्दलचा आदर इ. सांस्कृतिक गुणांकडे लक्ष वेधणें, हें लेखकाचें उद्दिष्ट दिसतें. लेखकाचा भर या सांस्कृतिक गुणांवर अधिक आहे. विशुद्ध, सोज्वळ, कौटुंबिक असें हें जीवन आहे. त्यांत संघर्ष आहेत, खटके आहेत, पण क्षणिक उठणाऱ्या वावटळीप्रमाणे. या संघर्षांचें कारण शिक्षण व परकीय विचार, अशी लेखकाची समजूत दिसते. त्या खेरीज 'याला कारण शिक्षण' असें नांव कादंबरीला दिलें जाणार नाही. नव्या स्त्रीच्या भावनांचा सुद्धा सहानुभूतीने विचार केलेला दिसत नाही. लेखकांस व्यक्तिवाद वा तत्सम जाणीव ही एक प्रभावी शक्ति आहे ही गोष्ट संमत नसावी. त्यांच्या मतें हें संघर्षमय जीवन पाश्चात्य शिक्षणाचा एक परिणाम आहे. सत्प्रवृत्ति, सदाभिरुचि, सेवावृत्ति, त्याग; वडिलांबद्दल आदर, इ. गुणांच्यावर भर दिला गेला तर सर्व ठीक होईल असें त्यांना वाटतें. त्या दिशेने त्यांचा प्रयत्नहि आहे. पण मध्यम वर्गीय जीवन त्यांतील संघर्ष बारकाईने पाहिलें असतां इतके वरवरचें नाहीत. ते अधिक मूलगामी आहेत. ही गोष्ट लेखकांना तितकी संमत नसावी.

स्त्रीजीवनाच्या दृष्टीने पाहतांहि असें आढळून येतें की, हें जीवन संघर्षमय आहे, पण ते संघर्ष वरवरचे आहेत. सासू, सून, यांचा संघर्ष आहे, पण एकंदरीने वास्तवापेक्षा आदर्शाकडे लेखकाचा ओढा अधिक दिसतो. मध्यमवर्गीय स्त्रीच्या जीवनांतहि अधिक क्रांतिकारक प्रसंग निर्माण झाले आहेत. तिचा जुन्या विचार व जीवनप्रणालीशी विरोध आहे, ही गोष्ट कादंबरीकाराच्या तितक्या स्पष्टपणाने प्रत्ययास आलेली दिसत नाही. कारण स्त्रीच्या ठिकाणीं जागृत झालेल्या व्यक्तित्वाची लेखकास जाणीव नाही. अशा परिस्थितींत ना. ह. आपट्यांच्या कादंबरी जीवनांत स्त्रीजीवनाचा आविष्कार

हा विशेष आकर्षक वाटत नाही. त्यांच्या एकटी, अपेक्षा, न पटणारी गोष्ट इ. कादंबऱ्या त्यांतल्यात्यांत प्रसिद्ध आहेत. 'न पटणारी गोष्ट' मध्ये लेखकाने स्पृहणीय अशी चुणूक दाखविली आहे. पण त्या भूमिकेचा पुढे पाठपुरावा केला नसल्याने ती अपवादभूत वाटते. स्त्रीजीवनविषयक चित्रणाच्या प्रतीबद्दल असें म्हणतां आलें तरी, त्यायोगें लेखकाचें वैशिष्ट्य आहे त्याचें मोल कमी होत नाही. आपट्यांचीं पात्रें प्रायः सत्प्रवृत्त असतात. कौटुंबिक जीवनांत सामान्यतः प्रसन्नता असते. ह्या गोष्टी अगदीं मर्यादित अर्थाने थोड्या वास्तव आहेत असें म्हणतां येईल. उच्च विचारांना, सदभिरुचीला व सत्प्रवृत्तीला त्यांच्या कादंबऱ्यांत जें विलक्षण आवाहन आहे तेंच त्यांचें अनन्यसाधारण लक्षण होय.

ह्याच प्रवृत्तीचा अधिक ठसठशितपणें व प्रभावीपणें आविष्कार जर कोणाच्या साहित्यांतून होत असेल तर तो साने गुरुजींच्या होय. साने गुरुजींचें लेखनहि विपुल, व्यापक व उच्च भावनाविचारांनी ओतप्रोत भरलेलें आहे. साने गुरूजींचें वैशिष्ट्य असें की त्यांनी अधिक व्यापक जीवनाचा परिचय करून दिला आहे. त्यांच्या वाङ्मयाचा रोख मानवतेकडे आहे हें प्रसिद्ध आहे. लेखनाच्या पानापानांतून उदात्त भावनेला आवाहन मिळालें आहे. त्याबरोबरच समाजसेवेच्या विधायक मार्गांचें व आदर्शांचें चित्रणहि लेखकाने अत्यंत आस्थेवाईकपणें केलें आहे. लेखकाच्या व्यक्तिवैशिष्ट्यामुळे व उन्नत विचारांनी गुरूजींचें लिखाण कुमारांत अत्यंत लोकप्रिय आहे. साने गुरूजींनी पण आपले वाचक प्रायः कुमारावस्थेंतीलच आहेत असें कल्पून त्यांच्या विविध प्रवृत्ती, भावना इ. ना अवसर दिला आहे सदाभिरुचि, सत्प्रवृत्ति, तळमळ, व्यापक जीवनाची ओढ या गोष्टीमुळे अल्पसा मध्यमवयीन वाचकवर्गहि गुरूजींना लाभला आहे.

स्त्रीजीवनाचे दृष्टीने गुरूजींच्या वाङ्मयाचें वैशिष्ट्य आहे. गुरूजींची स्त्रीकडे पाहण्याची विशिष्ट दृष्टि आहे. आपल्या 'स्त्रीजीवना'च्या प्रस्तावनेंत त्यांनी तिचें विशदीकरण केलें आहे. स्त्री ही पावित्र्याची, शुचितेची,

उदात्ततेची, मातृत्वाची मूर्ति आहे. 'स्त्री हें परमेश्वराचें महाकाव्य आहे'. या त्यांच्या एका वाक्यावरून त्यांच्या स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोनाची कल्पना येऊं शकते. अर्थात् स्त्रीवर होत असलेले सामाजिक अन्याय त्यांना पसंत नाहीत. पण त्यांच्या परिमार्जनासाठी विशेष क्रांतिकारकता धारण करावी असें त्यांना वाटत नाही. नैतिक गुणांवर अधिक भर द्यावा, असें त्यांना वाटतें.

साने गुरुजींचें साहित्य ध्येयवादी, नीतिवादी व भावनावादी आहे. समाजाच्या व व्यक्तीच्या ठिकाणचीं नैतिक जाणीव जागृत करावयाची हें उद्दिष्ट त्यांच्यापुढे आहे. सहाजिकपणें या धोरणामुळे त्यांच्या वाङ्मयांत पुनरुक्ति वा तोच तो पणा आलेला आहे. स्त्रीजीवनचित्रणाच्या दृष्टीने पाहताहि असें आढळून येतें की, गुरुजींनी स्त्रीच्या निसर्गदत्त मातृभावनेवर व प्रेमळपणावर अधिक भर दिला आहे. त्यांचीं स्त्रीपात्रें हीं नैतिक गुणांचीं आदर्श अशी झालीं आहेत. राष्ट्रीय ध्येयासाठी प्राण वेचणाऱ्या स्त्रिया गुरुजींनी रंगविल्या आहेत. पण त्यांचा ओढा नैतिक गुणांकडे आहे. गुरूजींनी बरेंच वाङ्मय इतर भाषांच्या कृतींवरून अनुवादिलेंहि आहे. अनुवाद करतांना गुरुजींनी मूळ कथेला भारतीय साज चढविला आहे. म्हणजे फक्त सूत्र तेवढें परकीय राहतें, आपणांस हवा तसा नैतिक गुणांवर भर देतां येतो. त्यांच्या कादंबऱ्यांत 'श्यामची आई', 'श्याम', 'धडपडणारीं मुलें', 'क्रांति' इ. कादंबऱ्या प्रमुख वा महत्त्वाच्या आहेत. विशिष्ट स्त्रीजीवनविषयक अशी कादंबरी आढळत नाही. 'क्रांती' तली नायिका क्रांति ही देशाच्या स्वातंत्र्यासाठी व मानवतेसाठी धडपड करते. इतर कृतींतून मराठी स्त्रीजीवनाची विकलांगता वर्णिली आहे. स्त्रीला समाजांत, कुटुंबांत कसा जाच सहन करावा लागतो याचें चित्रण करुणा उत्पन्न करील असें गुरुजींनी रंगविलें आहे.

गुरुजींचें वाङ्मय उच्च गुणांचा पोरेपोष करणारें वाङ्मय म्हणून दीर्घकाल विख्यात राहाणार आहे. पण नैतिक गुणांवर भर देतांना सामाजिक जीवनांतील विविध प्रश्नांवर, समस्यांवर भर द्यावयास हवा होता. व तो

त्यांच्याकडून दिला गेलेला नाही. याचें कारण त्यांचें मतें महत्त्वाचा सामाजिक प्रश्न म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्याचा, व तो सोडवीत असतां नैतिक गुणांवर भर दिला की झालें. समाजवादी विचार व जीवनमूल्यें हीं त्यांना जवळचीं वाटलीं तरी त्या विचारांतील सामाजिकतेपेक्षा नैतिक व मानवतावादी अंगाकडे त्यांचें लक्ष गेलें व तेंच त्यांना महत्त्वाचें वाटलें.

सामाजिक ध्येयासाठी स्त्रीची चाललेली धडपड त्यांनी रंगविली असली तरी महाराष्ट्रीय स्त्रीच्या जीवनांत कांही मूलभूत स्वरूपाची, आंतरक्रांति झाली आहे. व तिचा कोणती तरी गोष्ट साध्य करून घेण्याचा प्रयत्न चालू आहे ही गोष्ट त्यांना तितकीशी संमत नव्हती, असें वाटतें. मनुष्याच्या ठिकाणच्या सत्प्रवृत्तीवर त्यांचा नितांत विश्वास होता, व ती प्रवृत्ति एकदा जागृत झाली की सारे मानवी प्रश्न सुटण्यास मदत होईल. स्त्रीचे जीवनाकडे व त्यांतील विविध प्रश्नांकडे त्यांनी ह्याच दृष्टीने पाहिलें आहे.

ह्याच प्रकारचें लेखन करणाऱ्या कादंबरीकारांत महाराष्ट्र कुटुंबमाला कर्ते ना. वि. कुलकर्णी यांचा उल्लेख करावा लागेल. कुलकर्ण्यांनी बऱ्याच कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांत विविध सामाजिक प्रश्नांचें दिग्दर्शन केलें आहे. 'न्याय' 'मजूर' 'माणिक' इ. कादंबऱ्या विशेष प्रसिद्ध आहेत. 'मजूर' या कादंबरीत भांडवलवाल्यांनी थोडी सहानुभूति दाखविली तर मजुराचें जीवन पुष्कळच सुखी होईल असें चित्र रेखाटलें आहे. ग्रामीण जीवनास व त्यांतील कांही प्रश्नांस त्यांना इतर कादंबऱ्यांतून वाव मिळाला आहे. स्त्रीजीवनाचें दृष्टीने पाहतां सामाजिक प्रश्नांस विशेष अवसर मिळाला आहे असें वाटत नाही. कादंबऱ्यांतील वातावरण एकंदरीने कौटुंबिक आहे.

अशा प्रकारें एका विशिष्ट मनोवृत्तीचा वा दृष्टिकोनाचा अवलंब करून लिहिणाऱ्या प्रमुख लेखकांच्या कादंबरींतील स्त्रीजीवनाच्या चित्रणाचा विचार केला. हा दृष्टिकोन धारण करणारे हे लेखक तरुणांच्या विचाराकडे व ध्येयांकडे विशेष सहानुभूतिने पाहतात असें वाटत नाही. तथापि समाजांत जी खळबळ चालू होती ती बरीच मूलगामी होती. समाजाच्या जीवनाची

प्रतच्च बदलत होती. नवा व्यक्तिवाद आविष्कृत होत होता, जन्मास आला होता. ह्या व्यक्तिवादाची निषेधात्मक बाजू आताच उल्लेखिलेल्या कादंबरीकारांच्या लेखनांतून आली आहे. समाजाचे जीवन जें बदलत होतें, त्यांत व्यक्तिवादी विचारांच्या अनुरोधानें व सामाजिक परिस्थितीच्या अनुरोधानें नवनवीन प्रवाह निर्माण होत होते. नवजागृत झालेली मध्यमवर्गीय स्त्री, वामनराव जोशी, प्रो. फडके, खांडेकर, माडखोलकर इ. लेखकांना जशी दिसली तशी इतरहि लेखकांना दिसली. तिच्या ठिकाणच्या, ध्येयप्रीति, प्रणयभावना, इ. उच्च उदात्त भावनांचें आविष्करण आताच उल्लेखिलेले धुरंधर लेखक करीत होते. सानेगुरुजी, ना. ह. आपटे इ.सारखे तिला नीतीचे व संयमाचे पाठ देत होते. पण व्यक्तिवादी विचारांच्या योगाने ह्या नवजागृत स्त्रीवर्गांत एक विशिष्ट प्रतिक्रिया होणेंहि अपरिहार्य होतें. व ती म्हणजे सुखवादाचें आकर्षण.

स्त्रीशिक्षण सर्रास झालें. त्यायोगें कॉलेजमध्यें जाणाऱ्या जशा स्त्रिया समाजांत वावरूं लागल्या त्याप्रमाणे केवळ प्राथमिक किंवा तत्सम शिक्षण घेतलेल्या स्त्रियांची संख्या वाढली होती. त्यांच्यापैकी कांहीना (वैधव्य, परित्यक्तावस्था इ. कारणांनी) शिक्षिका परिचारिका इ. व्यवसायांचा स्वीकार करणें आवश्यक झालें, त्यांना थोड्याबहुत शिक्षणाचा लाभ झाल्याने सुधारणावादी विचारांच्याविषयी त्यांच्या मनांत सहानुभूति निर्माण होणें अगदीं स्वाभाविक होतें. कारण प्रत्यक्ष जीवन हें असह्य वाटावें इतकें तें दुःखपूर्ण होतें. त्यांत समाजाने त्यांना केवळ संन्यस्तवृत्तीने राहाण्याची सक्ति केली होती. ह्या समाजाच्या जाचाविरुद्ध प्रतिक्रिया होणें अपरिहार्य होतें. कांही स्त्रियांच्या बाबतींत तशी प्रतिक्रिया झालीहि असेल. अशा प्रकारचें चित्रण प्रामुख्याने हडप यांच्या कादंबऱ्यांत आलें आहे. त्यांच्या कादंबऱ्यांतून (प्रारंभींच्या) शृंगारवर्णनांना वा तत्सम गोष्टींना अधिक अवसर मिळत असे. त्यायोगें त्यांच्या कादंबऱ्यांकडे पाहण्याचा एक तिरस्कारयुक्त दृष्टिकोन निर्माण झाला होता. तशांत य. गो. जोशी, आपटे, सानेगुरुजी, इ. लेखकांच्या

नैतिक गुणांच्या प्रभावी आविष्करणापुढे हडपांचीं चित्रें हीं तिरस्कृत ठरावी हें मध्यमवर्गीय मनोवृत्तीला साजेसें होतें. पण स्त्रीच्या ठिकाणीं व्यक्तिवाद निर्माण होण्याची ती एक प्राक्रिया होती हें लक्षांत घेतलें व त्या प्रक्रियेचा सामाजिक अनुबंध ध्यानांत घेतला तर हडपांच्या कादंबरीजीवनाचें सामाजिक महत्त्व लक्षांत येतें. मध्ययुगीन विचारांनी स्त्रीचें जीवन इतकें आवळलें गेलें होतें की त्यांत काडीचाहि अर्थ राहिला नव्हता. केवळ कर्तव्यें आणि संन्यस्तवृत्तीने जीवन कंठून करावीं लागणारीं कर्तव्यें, हाच स्त्रीजीवनाचा अर्थ प्रत्यक्षांत आस्तित्वांत आला होता. व्यक्तिवादाच्या स्वतंत्र विचाराचा उद्भव झाल्यावर जी नवी जाणीव निर्माण झाली त्या जाणिवेपायीं या संन्यस्तवृत्तीचें दुसरें टोंक गांठलें जाणें शक्य होतें. समाजजीवनाचा लंबक हा जो दुसरीकडे जात होता, ती एक वस्तुस्थिती होती तिचें चित्रण साहित्यांतून होणें हें एकापरी आवश्यक नि अपरिहार्य होतें. तें काम हडपांच्या प्रारंभींच्या कृतींनी केलें आहे. 'मास्तरीण काकू' 'जाळ्यांतील मासा','बाईलवेडा' इ. इ. कादंबऱ्यांतून हें अशा प्रकारचें जीवन आलें आहे. तर 'दुलारी' ह्या कथेंत त्यांनी एका गंभीर (अनूढमातृत्वासारख्या) सामाजिक प्रश्नांची सूचक मांडणी केली आहे. समाजांत लब्ध प्रतिष्ठेच्या नांवाखालीं चाललेलीं काळींविद्रीं कृत्यें त्यांनीं आपल्या कादंबऱ्यांतून वर्णिलीं आहेत. कलात्मकतेच्या वा नीतिमत्तेच्या दृष्टीने त्यांचें परिशीलन करण्यापेक्षा कालसाक्षेप दृष्टीने त्यांच्याकडे पाहणें आवश्यक आहे. तसें पाहिलें असतां रूढ दृष्टीने पाहणारा टीकाकार ज्या उपेक्षेच्या वा तुच्छतेच्या दृष्टीने पाहतो ती उपेक्षावृत्ति दर्शविण्याचें कारण उरत नाही. महाराष्ट्रीय स्त्रीच्या ठायीं जी व्यक्तित्वाची जाणीव निर्माण होती, ती होत असतांना रूढ समाज व नीति बंधनें यांच्या पलीकडे जाण्याची प्रवृत्ति तिच्या ठायीं होणें हें त्या प्रक्रियेच्याच दृष्टीने अपरिहार्य ठरतें. त्यांच्या कादंबऱ्यांतील जीवन अवास्तव नव्हतें अशी कबुली अ. म. साहित्य (सं. नेने बडोदें १९३५) मधील टीकाकारांनीं दिली आहे. त्या दृष्टीने पाहतां हडपांच्या या कादंबऱ्यांतून स्त्री जीवनाचें जें चित्रण आलें आहे ती एका

दृष्टीनें (सामाजिक भावनांच्या सर्जनांच्या purging दृष्टीने) समाजपोषक अशी गोष्ट झाली. अशाप्रकारें सांचलेल्या भावनांना वाट मिळाल्यानंतरच व्यक्तित्वाची वाढ विधायक दिशेने होणें शक्य होतें व तसेंच झालें आहे. हडपांच्या कादंबऱ्यांतून आलेल्या बरेवाईट प्रसंगांचा सामाजिक इष्टानिष्टतेच्या दृष्टीने विचार करण्यापेक्षा वेगळ्या दृष्टीने विचार केला असतां अशा निष्कर्षाप्रत यावें लागतें. अनिष्ट वाटणाऱ्या वा अनीतिमय भासणाऱ्या घटनांना वाङ्मयीन क्षेत्रांत वेगळाच अर्थ प्राप्त होतो. तसा हडपांच्या कादंबरीजीवनाला प्राप्त झाला आहे असें वाटतें.

वाङ्मयाच्या दृष्टीने पाहतांहि हें कादंबरीवाङ्मय वास्तववादी होतें, असें म्हणतां येतें. समाजाच्या जीवनाबरोबर साहित्याची मार्गक्रमणा वास्तववादाच्या दिशेने होत होती. हरिभाऊंच्या नंतर समाजाची धारणा बदलली. सहाजिकच वास्तवाचें स्वरूपहि बदललें. नव्या वाङ्मयांत वास्तववादाचा अवलंब सामाजिक दोषांचें दिग्दर्शन करण्याकरतां होणें अपरिहार्य होतें. तसें हडपांच्या बाबतींत झालें आहे. हडपांच्या कादंबऱ्यांत स्त्रीजीवनाच्या विविध अंगांचा विचार झालेला आहे. समाजांतले प्रतिष्ठित लोक स्त्रीला कुमार्गाला लावण्याला कसे कारणीभूत होतात हें दाखविलें आहे.

अर्थात् ही उर्मी तत्कालिक होती. पुढे हडपांनी नाथ माधवांच्या स्वराज्यपंथांत प्रवेश केला व स्वातंत्र्य प्राप्तीनंतर हडपांनी 'कादंबरीमय आंगलाई' लिहिली त्यांतील जीवन चित्रण हें अर्थात वेगळ्या दर्जाचें झालें आहे. हडपांनी समाजवादी विचारांच्या दिशेने वाटचाल केली आहे. त्या अलीकडच्या कादंबऱ्या स्वातंत्र्य युगांतील आहेत, त्या येथील विवेचनाच्या कक्षेच्या पलीकडच्या आहेत.

आतांपर्यंत केलेल्या विवेचनावरून १९३५ च्या आसपासच्या ह्या कालखंडांत विविध व क्वचितप्रसंगीं परस्पराभिन्न प्रवृत्तींचे कादंबरीकार आपापलें लेखन कसे करीत होते याची कल्पना येऊं शकेल. या कालांत स्त्रीजीवनाला व तद्विषयक प्रश्नांना व्यापक स्वरूप प्राप्त झालें होतें. स्त्री

जीवनाचें प्रमुख प्रश्न कोणते व त्यांची सोडवणूक कशाप्रकारें करावयाची या बाबतींत विचारचर्चा होऊन कांहीं निश्चित स्वरूपाच्या उपाय योजना आग्रहाने पुढे येऊं लागल्या होत्या. ते उपाय प्रामुख्याने वैवाहिक जीवनासंबंधी असणें अपरिहार्य होतें. स्त्रीचे प्रमुख प्रश्न हे विवाहविषयक प्रश्न होत. पूर्वी विधवा विवाहाचा प्रश्न होता, तो मागे पडला तर प्रौढ कुमारींचा, व परित्यक्तांचे प्रश्न पुढे आले. या शिवाय आर्थिक स्वातंत्र्याचा प्रश्न महत्त्वाचा झालाच होता. हे प्रश्न कादंबरी वाङ्मयांतून मांडण्याचें काम कांही लेखकांनी तत्त्वनिष्ठापूर्वक केलें आहे. अशा लेखकांत राजरत्न वा. वि. जोशी यांचा समावेश प्रामुख्याने करावा लागतो.

राजरत्न जोशी यांनी हिंदु स्त्रियांच्या कायदेशीर हक्कांत सुधारणा व्हावी म्हणून खूप प्रयत्न केले आहेत. कायद्यांची आवश्यकता प्रतिपादणारी गंभीर पुस्तकेंहि त्यांनी लिहिलीं आहेत. त्याचप्रमाणे कांही कादंबऱ्या लिहून त्यांच्या द्वारां स्त्रियांच्या हक्कांची तरफदारी केली आहे. त्यांच्या कादंबऱ्यांत 'रोहिणी', 'जन्माचा बंदिवान', 'पराधीन' 'अंतर' इ. कादंबऱ्या प्रमुख होत. 'जन्माचा बंदिवान' ह्या कादंबरींत स्त्रीच्या सामाजिक हक्कांची तरफदारी केली आहे. विविध हक्कांचा उहापोह करून प्रामुख्याने हिंदु स्त्रीला विवाह निराकरण करून घेण्याचा उर्फ घटस्फोटाचा हक्क पुरस्कारिला आहे. कादंबरीचें उद्दिष्टच तें असल्याने त्या दृष्टीने कादंबरीची रचना केली आहे. कालिंदी, धनवंता, दमयंती, तरंगिणी, ह्या विशिष्ट हिंदु स्त्रिया व बलिभद्र, गोवर्धन, सुरेश, महिपती हे विशिष्ट हिंदुपती यांच्या स्वभावरेखा दर्शवून हिंदु स्त्रीच्या वैवाहिक जीवनाची परवड रंगविली आहे. त्याद्वारें घटस्फोटाच्या पद्धतीची व कायद्याची आवश्यकता लेखकाने प्रतिपादिली आहे. लेखकाने आपलें कायद्याचें ज्ञान मधून मधून प्रकट केलें आहे. कादंबरी सहेतुकच असल्याने हे उल्लेख असमर्थनीय वाटत नाहीत. सहेतुक कथारचनेकडे जर पक्षपाती दृष्टीने न पाहण्याचें ठरविलें तर कादंबरीच्या द्वारें स्त्रीच्या विवाहविषयक हक्कांची तरफदारी चांगल्या रीतीने केलेली आहे असें म्हणावयास

हरकत नाही. त्याचप्रमाणे लेखकांनी आपल्या दुसऱ्या 'पराधीन' ह्या कादंबरीच्या द्वारां स्त्रीच्या आर्थिक हक्कांची तरफदारी केली आहे. या कादंबरींत हिंदु स्त्रीची आर्थिक हक्कांचे अभावी आलेली पराधीनता दिग्दर्शित केली आहे. अहिल्या, मंदोदरी, कौसल्या इ. प्रमुख स्त्रीमात्रांच्या वैवाहिक जीवनांतील प्रसंगांच्या आधारें हिंदु स्त्रीची स्थिती पराधीनासारखी कशी आहे त्याचें दिग्दर्शन केलें आहे. जोशी ह्यांच्या ह्या दोन सहेतुक कृतींचा स्त्रीजीवन विषयक साहित्यांत मुद्दाम उल्लेख करावा लागतो.

या दोन प्रमुख कादंबऱ्यांशिवाय राजरत्न जोशांच्या 'सूड', 'अंतर' इ. कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. 'सूड' मध्ये एका परिव्यक्त स्त्रीच्या जीवनाची करुण कहाणी आली आहे. तर 'अंतर' मध्ये स्नेहपूर्ण सहजीवनास आवश्यक असणाऱ्या प्रवृत्तींची चर्चा केली आहे. जोशी हे स्त्रियांचे कैवारी असे कादंबरीकार आहेत. कायदेशीर दृष्टीने हिंदू स्त्रीची कशी असह्याय्य परिस्थिती आहे ह्या वस्तुस्थितीचें चित्रण त्यांनी आपल्या कादंबरीसृष्टींत विशेष साक्षेपाने केलें आहे. कायद्यांचीच चर्चा अभिप्रेत असलेल्याने त्याबाबत थोडी अधिक चर्चा चिकित्सा यावी हें अपरिहार्य होतें. स्त्रीजीवनाची सुधारणा व्हावी यासाठी जे अनेक मार्ग उपलब्ध आहेत त्यापैकी कायदेशीर मान्यता हाहि एक आहे. तशी कायदेशीर तरतूद होण्यासाठी समाजमनांत त्याबाबत सहानुभूति असणें आवश्यक असतें. वैवाहिक जीवनावर नियंत्रण इ. ठेवणें ह्या बाबत जे कायदे करावयाचे असतात ते करण्यांत नीति (कायदे) तज्ञांचा जरी प्रामुख्याने भाग असला तरी त्यामागे जनमनाचा विशिष्ट पुरावा वा पाठिंबा आवश्यक आहे. स्त्रीजीवनविषयक सुधारणा करणारे कायदे होण्यासाठी जनमनांत जी पूर्वतयारी होणें आवश्यक आहे ती करण्याचें कार्य राजरत्न वा. वि. जोशी यांनी आपल्या कादंबऱ्यांच्या द्वारें केलें आहे. म्हणूनच त्यांचा उल्लेख स्त्रीजीवनविषयक वाङ्मयाची पाहणी करतांना अगत्यपूर्वक करावा लागतो. येथे त्या दृष्टीनेच हें समालोचन केलें आहे.

वैवाहिक जीवनाची सर्वांगीण परीक्षा सुरु झाली होती. तींत ज्याप्रमाणे कायद्यांकडे लक्ष गेलें त्याप्रमाणे वैवाहिक जीवनांतील प्रेमविषयक प्रश्नांकडे सुशिक्षितांचें लक्ष जाऊं लागलें. यापूर्वीच्या कालांत सहवास वा प्रेमोत्तर विवाह का विवाहोत्तर प्रेम हा विषय महत्त्व पावला होता. या कालांत वैवाहिक जीवनांत निरनिराळ्या कारणांनी जी प्रेमविषयक भावनांची कुचंबणा होते तिला महत्त्व प्राप्त झालें. साहित्यांत जें स्वभावदर्शन महत्त्वाचें आहे तें था पार्श्वभूमीवर रंगविलें जाऊं लागलें. 'विवाहबाह्य स्त्रीपुरुष संबंधाने कादंबरी वाङ्मयाचा बराच भाग व्यापला जाऊं लागला' असें प्रा. निरंतर (मराठी साहित्य, १९१४ ते १९४४, पृ. ११५) म्हणतात. अशा प्रकारें स्त्रीपुरुष संबंध एका विशिष्ट पार्श्वभूमीवरून चित्रित होऊं लागले.

अशा प्रकारचें हे विशिष्ट प्रश्न वा त्यांनीं युक्त असलेलें जीवन रंगविण्याचा ज्या लेखकांनी प्रयत्न केला त्यांत वि. वि. बोकील ह्यांचा उल्लेख करावा लागेल. बोकील हें आपल्या 'फोल आशा' 'झंझावात' ह्या कादंबऱ्यांनी पुढे आले. त्यानंतर त्यांनी 'दुसरी सावली' इ. कादंबऱ्या प्रासिद्ध केल्या. नंतर त्यांचें लक्ष लघुकथा व नाटिका या प्रकारांकडे अधिक आकर्षित झालेलें दिसतें. तथापि त्यांच्या कादंबऱ्यांतून विवाहोत्तर जीवनांतील प्रेमसंघर्षाचें चित्रण झालें आहे तें एका विशिष्ट सामाजिक प्रवाहाचें द्योतक होय. हा प्रश्न वा त्याच्या अनुषंगाने आलेले जीवन, ह्याचें चित्रण अनेक कादंबरीकारांनी केलें आहे. प्रा. निरंतर यांनीं आपल्या 'जीवन नृत्यांत' तळवलकरांनी आपल्या 'आकाश मंदिरांत' कवठेकरांनी 'अपूरे डाव' या कादंबरींत, त्याचप्रमाणे इतर अनेक लेखकांनी आपल्या वाङ्मयांतून (कादंबरी) या प्रश्नाचें दिग्दर्शन कलेच्या व समाज जीवनाचें चित्रण करण्याच्या भूमिकेवरून केलें आहे.

या सर्व विविध चित्रणाचें या ठिकाणीं अधिक विस्तारशः विवेचन करणें शक्य नाहीं. पण या चित्रणामागे जी एक सामाजिक दृष्टीने महत्त्वाची प्रवृत्ति आहे ती लक्षांत घेणें आवश्यक आहे. त्रि. राजवटींत जो नवा

व्यक्तिवादी विचार आला त्याचा स्वीकार भारतीयांनी केला. तसा स्वीकार केल्यानंतर साहित्यातील चित्रणांत प्रेम भावनेस एक नवेंच स्वरूप, आकर्षण प्राप्त झालें. पहिल्या अवस्थेंत ही प्रेम भावना केवळ एक तारुण्य सुलभ भावना आहे अशा दृष्टीने तिच्याकडे पाहिलें जाऊं लागलें. परंतु व्यक्तिवादाचा विचार जों जों (सुशिक्षित) समाजांत खोलवर जाऊं लागला तों तों त्या भावनेचें अधिकाधिक व पिंजण विचिकित्सक चित्रण होऊं लागलें. अशा प्रकारें वैवाहिक जीवनांत तिला (विशेषतः आत्मकेंद्री व्यक्तींच्या बाबतींत) अतिशय महत्त्वाचें वा क्वचित् प्रसंगीं स्फोटक स्वरूप प्राप्त व्हावेंत हें साहचिक होतें. पण समाजवादी विचारांचा अंगिकार जसा अधिकाधिक प्रमाणांत होऊं लागला तसतसें ह्या प्रणय भावनेच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलला जाऊं लागला. 'कुसुमाग्रज' कवींच्या 'वैष्णव' कादंबरींत, आंबेकर यांच्या 'काळे ढग' मध्ये, तळवलकरांच्या 'आकाश मंदिरां'त व इतरहि अनेक लेखकांच्या कृतींतून त्याप्रवृत्तीचा आविष्कार व अवलंब होत आहे. ह्या सर्वांच्या मागे स्त्री व पुरुष यांना समान नीतिनियम बंधनकारक असावेत ही जी सुत मनीषा आहे ती महत्त्वाची आहे. सामाजिक प्रगतीची द्योतक अशी ती आहे.

प्रमुख कादंबरीकारांच्या, व प्रमुख स्त्रीजीवनविषयक कृतींचा विचार केल्यानंतर आणखी एका प्रकारच्या कादंबऱ्यांचा विचार करावयास हवा. आतापर्यंत झालेल्या विवेचनावरून ही गोष्ट स्पष्ट होईल की, ब्रि. कालखंडांत प्रमुख स्त्रीजीवनविषयक प्रश्न वा चित्रण म्हणजे मध्यमवर्गीय स्त्रीच्या जीवनाचें व समस्यांचें चित्रण होय. पण १९३५ नंतर मध्ययवर्गाशिवाय असणारा कामगार व किसान यांचा मोठा वर्ग आहे. त्याच्या जीवनाचें चित्रण इ. व्हावयास हवें, अशी विचारसरणी प्रसृत होऊन सर्व संमत होऊं लागली. हा अर्थातच समाजवादी विचारांच्या प्रसाराचा परिणाम होता. गांधीजींच्या कार्याच्या योगाने सुद्धा समाजाच्या बहुसंख्य विभागाकडे शिक्षित वर्गाचें लक्ष वेधलें गेलें. कादंबरी नाटक इ. प्रकारची रचना त्यांच्या जीवनांतील

प्रसंगांवर वा समस्यांवर होऊं लागली. त्या वर्गांतील स्त्रियांचें जीवन अर्थातच अनुषंगाने आलेच. येथे त्या चित्रणाचें अवलोकन करावयाचें आहे.

अशा सर्वसाधारण वर्गांत प्रामुख्याने चार पांच प्रकार करतां येतील. अगदीं पहिला प्रकार म्हणजे कामगारांचा. समाजवादी विचारप्रणाली प्रामुख्याने प्रथम शहरांत प्रसृत झाली. तेथे अर्थातच कामगारवर्ग हाच सर्वसाधारण समाजांतला उपेक्षित वर्ग म्हणून लोकांच्या दृष्टीपुढे आला. तसेंच युरोपांत जी समाजसत्तावादी राजवट कांही देशांत सुरु झाली ती प्रायः 'कामगारांची राजवट' या नांवाने सुरु झाली. त्या शिवाय कामगार हा सर्वसाधारण शेतकऱ्यापेक्षा अधिक प्रगतिवादी असतो. त्याला आधुनिक संस्कृतीचा परिचयहि झालेला असतो. आपणांकडे हा समाजवादी विचार जेव्हा आला तेव्हा तो युरोपमधून आला. त्यायोगें त्यावेळीं कामगारवर्गच दलितवर्ग म्हणून पुढे आला. त्यावेळीं त्यावर्गाकडेच लक्ष गेलें. काव्यांत काणेकरांनी ह्याच लोकांच्या कैवाराची भूमिका घेतली. समाजवादी विचारांचा अवलंब वा अनुकरण करणाराला साहजिकपणेंच कामगारांचा उल्लेख केल्याविना राहावत नाही. प्रो. फडके, खांडेकर आदि लेखकांच्या लेखनांतूनहि या भूमिकेमुळेच कामगारांचा उल्लेख येतो. त्यांच्या कादंबऱ्यांचे नायक हे कामगार पुढारी असतात. पण हें जीवनचित्रण एकंदरीने वरवरचे असतें. त्यांतून कामगारवर्ग व त्याच्या हीन दीन परिस्थितीबद्दल सहानुभूति तेवढी असते. कामगारांचेंच जीवन जेथे पूर्णत्वाने लेखकाच्या कक्षेंत येत नाही तेथे कामगार स्त्रियांचें तें काय येणार ?

कामगार वर्गाच्या जीवनावर लिहिलेली पहिली कादंबरी म्हणजे वरेरकरांची 'धांवता धोटा' हीच होय. या कादंबरींत लेखकाने कामगार चळवळीचें विराट स्वरूप दर्शविलें आहे. कामगारांचें जीवन हें केवळ अगतिकता, अज्ञान इ. नी भरलेलें होतें. त्याचे प्रश्न हे प्रामुख्याने आर्थिक आहेत. त्यांच्या प्रश्नांत स्त्री व पुरुष असा फरक नाही. दोघांनाहि प्रामुख्याने जगण्यासाठीं जीवनकलहास तोंड द्यावें लागतें. अर्थातच स्त्री जीवनाच

वेगळेंपण लुप्त होतें. मातृत्वाची जबाबदारी तिच्यावर पडते व परावलंबित्व अधिकच वृद्धिंगत होतें. वरेरकरांच्या ह्या कादंबरींत असेच उल्लेख आले आहेत. अर्थात कामगारांच्या जीवनविषयक प्रश्नास महत्त्व आल्याने स्त्री जीवनाचा संकोच व्हावा हें क्रमप्राप्त होतें. पहिली मराठी कामगार जीवन-विषयक कादंबरी म्हणून तिचें मोल असाधारण आहे.

यानंतर केवळ कामगारांच्या जीवनावर लिहिलेल्या व नांवाजलेल्या अशा कादंबऱ्या फार कमी झाल्या. बहुसंख्य लेखकांनी पार्श्वभूमि म्हणून कामगारांचें जीवन चित्रित केलें आहे. फडके खांडेकरांच्या कृतींचा उल्लेख वर आलेला आहेच. समाजवादी विचाराचा प्रसार जसजसा वाढूं लागला तसतसा त्या विचाराच्या प्रार्श्वभूमीवरून तेथल्या परिस्थितीची पाहणी सुरू झाली. तेव्हा सहाजिकच बहुसंख्य खेडूत व शेतकरी वर्गाच्या आस्तित्वाची जाणीव झाली. 'बहुजन समाज' म्हणून त्यांचा प्रामुख्याने उदो उदो होऊं लागला. ग्रामीण जीवनाकडे अर्थातच लेखकांचें लक्ष गेलें. सहाजिकपणें शेतकऱ्यांच्या म्हणजेच ग्रामीण जीवनावर लेखन करणारे व त्या जीवनांतील विविध प्रसंग चित्रित करणारे लेखक पुढे आले. आजहि ग्रामीण जीवनावर बरेंच लिहिलें जात आहे. याबाबत यशस्वी चित्रणाच्या दृष्टीने कांही कलाकृती दृष्टींत भरतात. वरेरकरांच्या, 'सात लाखांतील एक,' 'फाटकी वाकळ' इ. प्रसिद्ध होत. रामतनय यांची 'खरा उद्धार' ना. वि. कुलकर्णी यांच्या 'मजूर', न्याय इ. दिवेकृत 'सराई', 'पाणकळा', ग. ल. ठोकळकृत 'गांवगुंड', चिंदरकरांची 'महापूर', माडखोलकरांची 'चंदनवाडी', कवि कुसुमाग्रज यांची 'वैष्णव' हडपांची, 'वादळ' 'गोदाराणी', इ. प्रमुख होत.

अर्थात् या सर्व कृतींतून स्त्रीजीवन चित्रणास उठाव मिळाला आहेच असें नाही. कारण ग्रामीण चित्रणाकडे वेगळ्याच दृष्टीने पाहिलें जात आहे. त्यांतील स्त्री जीवनांत पुरुष जीवनांत तसा फारसा फरक नाही. स्त्रियांचे

प्रश्न व पुरुषांचे प्रश्न हे जवळ जवळ समान आहेत. त्यांच्याकडे वास्तवतापूर्ण दृष्टीने पाहण्याची प्रवृत्ति अद्याप लेखकांत निर्माण झालेली नाही.

आताच उल्लेखिलेल्या लेखकांचे दृष्टिकोन हे भिन्न भिन्न आहेत. ते ध्यानांत धरले असतां त्यांच्या कादंबरी चित्रणांतील जीवनाचा अन्वय कळूं शकतो. या लेखकांतला पहिला वर्ग म्हणजे वरेरकर, कुसुमाग्रज इ. ध्येयवादी लेखकांचा. हे लेखक जरी मध्यमवर्गांतून पुढे आले आहेत तरी त्यांनी सर्व-साधारण समाजाचें जीवन शक्यतों त्याच्या दृष्टीने हेरण्याचा यत्न केला आहे. तें जीवन चित्रित असतां, जातां जातां विधायक मार्गाचा सुद्धा निर्देश केला आहे. 'खरा उद्धार' या कृतीचा उल्लेख याच संदर्भात करतां येईल. दुसरा वर्ग म्हणजे, दिघे, ठोकळ आदि लेखकांचा. या लेखकांना ग्रामीण जीवन जवळून पाहावयास मिळालें आहे. त्याचप्रमाणे लेखनाचें कलात्मक अंगहि चांगलें साधलें आहे. पण हे लेखक वृत्तीने मध्यमवर्गीय आहेत. त्यांनी केलेलें ग्रामीण जीवनाचें चित्रण हें वाच्यतः ग्रामीण पण अंतरंगाने नागर (शहरीं) असें झालें आहे. प्रेमासारख्या भावनाचा आविष्कार ग्रामीण लोकांनाहि चांगला जमूं लागला आहे, असें दिसतें. म्हणजे शहरीं लोकांचे जीवित प्रश्न हे जसे लैंगिक वा वैवाहिक नीतीभोवतीं फिरतात तशीच परिस्थिति ग्रामीण लोकांच्या जीवनांतहि होत आहे असा भास या लेखकांच्या कृतींची पाहणी करतांना होतो. ह्या लेखकांचा कल एक प्रकारच्या रम्यवादाकडे असल्याने ह्या लेखनांत जीवनसाक्षेप एकंदरीने कमी प्रमाणांत दिसून येतो.

त्यानंतरचा तिसरा वर्ग म्हणजे ना. वि. कुलकर्णी, ना. ह. आपटे आदि लेखकांचा ह्या लेखकांना ग्रामीन जीवन अत्यंत साधें अतएव उच्च व आकर्षक असें वाटतें. पुष्कळ लेखकांची ही प्रवृत्ति आहे. ग्रामीण जीवनाचें अत्यंत रम्य चित्रण करावयाचें व त्यांत उच्चत्वाचा साक्षात्कार वाचकांना करवून द्यावयाचा, अशी या लेखकांची मनोवृत्ति असते. साहजिकपणें हेंहि लिखाण जीवनापासून दूरावतें.

ललित वाङ्मयाचा कादंबरी हा फार मोठा व महत्त्वाचा भाग आहे. कादंबरीच्या सर्वंकषतेमुळे एकंदर ललित वाङ्मयाच्या वतीनेहि ती बोलूं शकते. त्रि. राजवर्टीत स्त्रीजीवनाची जी उत्क्रांति होत होती तिचें आंतरस्वरूप कादंबरीकारांच्या प्रतिभेंतून कसें दिसलें व त्यांच्या कृतींतून तें कसें चित्रित झालें आहे याची पाहणी या प्रकरणांत केली आहे. ती अर्थात् मतभेदांना भरपूर अवसर असणारी अशी झालेली असणें शक्य आहे. तथापि तिचें महत्त्व कमी होत नाही. आज स्वातंत्र्याच्या कालांत साहित्याकडे थोड्या वेगळ्या दृष्टीने पाहिलें जाऊं लागलें आहे असें दिसतें. मानवी मनाला होणाऱ्या विविध जाणिवांचें दिग्दर्शन साहित्यांत होतें असा विचार प्रस्तुत होत आहे. आजचा सर्वसामान्य लेखक ह्या जाणिवा समाजनिरपेक्ष भूमिकेंतून चित्रित करतांना दिसतो. त्याच्या दृष्टीला हें सारें विवेचन अस्थानीहि वाटेल. तथापि मनुष्य हा मूलतः सामाजिक प्राणी आहे. व त्याची प्रमुख जाणीव ही सामाजिकच राहाणार आहे. हें लक्षांत धरलें तर (इतर कलांपासून साहित्याचें वेगळेंपण याच बाबतींत असतें.) या विवेचनाचा अन्वयार्थ लावण्यास मदत होईल.

त्रि. राजवर्टीत भारतीय स्त्रीची जागृति कोणत्या दृष्टीने होत होती ह्याचा उल्लेख मधून मधून आलेला आहेच. ती करण्यांत ज्यांचा चांगला हातभार लागला आहे अशांच्या कृतींचा उल्लेख केला आहे. प्रबंधामागील भूमिकेच्या दृष्टीने ज्यांचें लेखन स्त्रीजीवनचित्रणाच्या दृष्टीने अधिक साक्षेपी झालेलें आहे त्यांच्या कृतींचा उहापोह विस्ताराने होणें अपरिहार्य होतें. ध्येयवादी व मातबर लेखकांची परंपरा तशीच पुढे चालू राहणार असली तरी ध्येयांचें संक्रमण फार झपाट्याने ब्रिटिश राजवर्टीत होत होतें. त्याचा आढावा घेण्याच्या दृष्टीने व मराठी कादंबरींतील स्त्रीजीवनचित्रणांतील सामाजिक आशय पाहण्याच्या दृष्टीने हें विवेचन महत्त्वाचें वाटावें असें लेखकास वाटतें.

* * *

स्त्रीजीवनचित्रणाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा विभाग म्हणजे वेश्या वा तत्सम वर्गातील स्त्रियांच्या जीवनाचें चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांचा होय. समाजवादी वा व्यक्तिवादी विचाराच्या उदयानंतरच या वर्गाकडे लेखकांचें लक्ष वेधलें आहे. याबाबत प्रथम कोणाचा उल्लेख आवर्जून करावा लागत असेल तर डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांचा. त्यांच्या कादंबऱ्यांचें विवेचन यापूर्वी आलेलेंच आहे. व्यक्तिवादाच्या आहारीं गेलेल्या लेखकांत पु. ल. देशपांडे यांचा उल्लेख करावा लागतो. त्यांनी आपल्या 'बंधनाच्या पलीकडे' या कादंबरीची नायिका वेश्याकन्या आहे असें दाखवून समाजाचें लक्ष तिकडे वेधिलें. त्यानंतर या जीवनावर लिहिलेल्या कादंबऱ्यांत 'यामा' (ही भाषांतरित,) वरेरकरांची 'कुलदैवत' इ. प्रसिद्ध होत. अगदी अलीकडची बोरकर यांची 'भावीण' हीहि महत्त्वाची आहे. या व्यवसायांतील व्यक्तींच्या ठिकाणची उदात्त भावनामयता व मानवता हेच विशेष लेखकांना स्पष्टपणें पुढे मांडावयाचे आहेत. त्याचप्रमाणे हा व्यवसाय प्रमुखत्वाने आर्थिक कारणांसाठी अस्तित्वांत आला आहे. तसेंच या व्यवसायाचें आकर्षण त्याच वर्गातील तरुण मुलामुलींना नाही ही गोष्ट पण निदर्शनास आणण्यास लेखक विसरत नाही.

या मध्यमवर्गेतर लोकांच्या जीवनचित्रणांत अलीकडे आणखी लोकांची भर पडत आहे. अस्पृश्यांप्रमाणे जंगलांतून राहणारे व व्यवसाय करणारे, कातकरी, कोळी, वारली इ. लोक नव्याने समाजाच्या दृष्टीपुढे येत आहेत. वारली लोकांचा लढा तर महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. त्या जीवनावर प्रकाश पाडणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. त्यांत हडपांची 'गोदाराणी', प. त्रिं. सहस्रबुद्धे यांची 'पहिली सलामी', भुस्कुटे यांची 'दासू' व शं. रा. भिसे यांची 'जंगलांतील छाया' या प्रसिद्ध होत. पहिले तीन लेखक हे कम्युनिझमकडे वळलेले आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांतलें वास्तवचित्रण हें त्या दृष्टींतून आलें आहे. त्यांत वर्गकलहाचें स्वरूप अधिक भडक स्वरूपांत दर्शविलें आहे. शेवटच्या कादंबरीचा लेखकांच्या कल गांधीवादाकडे असल्याने

त्या दिशेने त्यांनी उद्धाराचा मार्ग दाखविला आहे. या कादंबऱ्यांतील स्त्री-जीवनचित्रणाच्या दृष्टीने पाहतां ग्रामीण जीवनांतील स्त्रीजीवनाविषयीं वर जें म्हटलें आहे तेंच म्हणतां येईल. फरक एवढाच की, या जीवनाचें चित्रण करणारे लेखक हे वास्तववादी आहेत. त्यांच्यांत सामाजिक साक्षेप अधिक आहे.

ब्रिटिश राजवटीच्या शेवटच्या दशकांत वैवाहिक जीवनांतील विविध प्रसंगांच्या आविष्करणाला महत्त्व प्राप्त झालें होतें असें दिसतें. वैवाहिक जीवनांतील असमाधानाची रुखरुख सर्वच कादंबरीकारांना थोड्याफार प्रमाणांत आहे असें दिसतें. 'आधुनिक स्त्रीच्या जीवनावरच सर्व सामाजिक विचार केंद्रित झाल्यासारखे दिसतात. आणि वैवाहिक सुख हा एकच प्रश्न व त्याची शरीरसुख ही एकच बाजू सर्वत्र रंगून राहिलेली दिसत आहे, अशा प्रकारचे उद्गार प्रा. गं. भा. निरंतर यांनी आपल्या १९४४ त केलेल्या तीस वर्षांच्या कादंबरीच्या समालोचनांत (मराठी साहित्य, १९१४–४४, पृ. १४०) काढले आहेत. त्यावरून कादंबरींतील जीवनचित्रण व त्याच्या मर्यादा याची कल्पना येऊं शकते. बोकील, कवठेकर इ. अनेक ख्यातनाम लेखक-लेखिका यांच्या विविध प्रकारच्या कादंबऱ्यांची आठवण ह्या संबंधांत लक्षांत घेण्यासारखी आहे.

ह्या सर्व जीवनाविष्कारांत जर कोणती उणीव असेल तर लेखक हे अद्याप मानवतेच्या उंच भूमिकेप्रत जाऊं शकलेले नाहीत. वस्तुस्थिति अशी की टीकाकारांनाही ही जाणीव स्पष्टतया झालेली दिसत नाही. प्रा. कुसुमावतीबाई देशपांडे (मराठी कादंबरीचा उत्क्रांतिमार्ग) व खांडेकर (अध्यक्षीय भाषण, १९४१) यांच्यासारखे टीकाकार सोडले तर बहुतेक टीकाकार अद्याप तंत्रवादाचा (Formalism) च अवलंब करीत आहेत. पण स्वातंत्र्य-संपादनाने परिस्थिति मूलतः बदलली आहे. या परिस्थितीचा परिणाम लेखकांवर होणार आहे. त्यांच्या लेखनांतील जीवनचित्रणाची प्रत बदलणार आहे. अशा नव्या कालाच्या आरंभाप्रत आपण आलों आहोंत. यापुढे स्त्रीजीवनचित्रणाचीहि प्रत आणि पद्धति बदलणार आहे.

समालोचन

: १ :

आतापर्यंत ब्रिटिश राजवटींत स्त्रीजीवनविषयक प्रश्नांची जी चिकित्सा झाली तिचें स्वरूप व निर्माण झालेल्या मराठी साहित्यांतील स्त्रीजीवनाचें स्वरूप या दोहोंचें विवेचन केलें. हें विवेचन करतांना लेखकाची विशिष्ट भूमिका होती. तिचा परिचय या प्रास्ताविक निवेदनांत करून दिला. आतां या ठिकाणीं या प्रबंधांत जी चिकित्सा आली तिच्याकडे समालोचनाच्या दृष्टींतून पाहावयाचें आहे. विवेचनाच्या सोईसाठी जें पृथःकरण केलें, त्यांतून जे निर्णय निघाल्यासारखे वाटतात त्यांची समवादात्मक दृष्टीने पाहाणी करावयाची आहे. तसे करणें निष्कर्षांतला वा विवेचनांतला सुसूत्रपणा स्पष्ट होण्यासाठी इष्ट ठरेल.

प्रस्तुत विवेचन करतांना निबंध (विचारप्रधान वाङ्मय), कादंबरी हे प्रमुख साहित्यप्रकार विचारांत घेतलेले आहेत. साहित्याचे अत्यंत महत्त्वाचे असे हे प्रकार आहेत याबद्दल दुमत होईल असें वाटत नाही. या प्रकारांतून समाजाच्या भावना, त्याचे विचार आणि जीवितमूल्यें यांचें दर्शन होतें. सांस्कृतिक जीवनांत या तीनहि गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. इतर वाङ्मयप्रकारांतून या तीनहि प्रमुख अंगांचें जितकें व्हावयास पाहिजे तितकें ठसठशीत दिग्दर्शन होत नाही. सहाजिकपणेंच ह्या प्रमुख प्रकारांचीच निवड करावी लागली.

प्रबंधांतील विवेचनांत जे विविध प्रकारचे निष्कर्ष निघाल्यासारखे वाटतात त्यांचें स्वरूप पाहाणें व मूल्यमापन करणें आवश्यक आहे.

या प्रबंधांत जें विवेचन आलें आहे त्या विवेचनाच्या आधारें सर्वांत महत्त्वाचा असा कोणता निष्कर्ष निघाला असेल तर तो हा की, ब्रिटिश राजवटींत स्त्रीच्या बाह्यजीवनाबरोबर आंतरजीवनांतहि क्रांति होत होती. ही आंतरजीवनांतली क्रांति कोणत्या दिशेने व कोणत्या प्रकाराने झाली तें प्रामुख्याने साहित्यांत व त्याच्या वर उल्लेखिलेल्या प्रकारांत प्रतिबिंबित होतें. साहित्याचा तोच विषय आहे. स्त्रीजीवनांत जी आंतरक्रांति झाली तिचें एक गमक म्हणजे स्त्रीजीवनाचीं ध्येयें वा मूल्यें बदललीं हें होय. ब्रि. राजवटीच्यापूर्वी स्त्रीपुढे जीं ध्येयें वा मूल्यें होतीं, तीं बदलण्यास ब्रि. राजवटींत सुरुवात झाली, व त्या राजवटीच्या शेवटीं याबाबतचा एक टप्पा गांठला गेला. या प्रबंधांत जे महत्त्वाचे निष्कर्ष काढले आहेत त्यांत हा सर्वांत महत्त्वाचा निष्कर्ष आहे.

ह्या निष्कर्षाच्या अनुषंगाने आणखीहि इतर निर्णय निघाले आहेत. नवीन जीवनध्येयें कोणतीं निश्चित झालीं हा त्यानंतरचा महत्त्वाचा विचार होय. याबाबत पाहाणी करतांना असें आढळून आलें आहे की, हीं जीवनध्येयें यापुढे स्त्री व पुरुष यांना समान राहाणार आहेत. म्हणजे पुरुष जीं जीवनमूल्यें प्रमाण मानणार तींच स्त्रीलाहि प्रमाण राहाणार आहेत. स्त्री व पुरुष यांच्या जीवनध्येयांत समानता निर्माण होणें हें महत्त्वाचें कार्य ऐतिहासिक दृष्ट्या ब्रि. राजवटींत पार पाडावयाचें होतें. राजवटीच्या परकेपणामुळे तें कार्य जितकें नेटाने वा साक्षेपाने व्हावयास पाहिजे होतें तितकें तें झालें नाही. पण वैचारिकदृष्ट्या ही समानता मान्य झाली आहे, असें सामान्यपणें आढळून येते.

जीवनध्येयें एक वा समान होण्याची ही प्रक्रिया केवळ वैचारिक वा विशिष्ट सांस्कृतिक अशी नाही. जीवनांतून ती उत्क्रांत झालेली आहे. म्हणजे जीवनध्येयें एक होण्यांतला महत्त्वाचा टप्पा म्हणजे स्त्री व पुरुष ह्यांच्या कार्यकक्षांत समानता होणें हा होय. हा टप्पा अर्थात बराच महत्त्वाचा आहे. या बाबतींत ब्रिटिश राजवटींतली प्रगति अत्यंत अल्प आहे. कार्यक्षेत्रें

एक होण्याची क्रिया ही आर्थिक, सामाजिक, राजकीय, नैतिक इ. विविध दृष्टींनी महत्त्वाची आहे; व ह्याबाबत प्रगति होत असतांना सहाजिकपणेंच ह्या सर्व विविध क्षेत्रांतील विरोधी शक्तींचा वा प्रवाहांचा विरोध झाला आहे. शिवाय जगांतील बहुतेक देशांतील समाजरचना ही प्रायः पुरुषप्रधान असल्याने प्रत्येक देशांत स्त्री व पुरुष यांना समान कार्यक्षेत्रें असावींत असा विचार सर्वमान्य होण्यास पुरुषांचा (व कांही प्रमाणांत स्त्रियांचाहि) विरोध झाला आहे. या बाबतींत ब्रिटिश राजवटींत विशेष प्रगति झाली नाही. पण या देशांतील राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्याच्या वेळीं प्रमुख राजकीय पुढारी व विचारवंत यांनी स्त्रीपुरुषांच्या एकध्येयतेचा व एककार्यकक्षांचा पुरस्कार केला आहे. ब्रि. राजवटीनंतर स्वतंत्र भारताने जी राज्यघटना तयार केली तींत प्रारंभींच ही समानता मान्य केली आहे. त्या दृष्टीने पाहातां एकध्येयतेच्या वा एककार्यतेच्या विचाराप्रत येण्याची प्रगति ब्रि. राजवटींत झाली. स्वतंत्र भारतांतील राज्ययंत्राचें स्वरूप व धोरण हीं ऐहिक वा धर्मविचारातींत (सेक्युलर) राहाणार आहेत, ही घोषणाहि त्या दृष्टीने फार महत्त्वाची आहे. अशा प्रकारें एककार्यता व एकध्येयता या दोनहि बाबतींत महत्त्वाचे निर्णय घेतले गेले आहेत ते सामान्यतः अनुकूलतेच्या दिशेने घेतले गेले आहेत; आणि ही दिशा ब्रिटिश राजवटींत ठरली जात होती.

ब्रिटिश राजवटींत जर राज्यकर्त्यांनी कोणता प्रमुख विचार आणला असेल तर तो लोकशाहीचा. त्याच्या राजकीय, वैचारिक, सामाजिक स्वरूपाबद्दल उलटसुलट विवेचन खूपच झालेलें आहे. ब्रिटिशांनी ह्या देशांत जी लोकशाहीची कल्पना बद्धमूल केली ती म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्यावर आधारलेली सहिष्णु (लिबरल) लोकशाही होय. लोकशाहीच्या विचाराच्या मुळाशी असणारा व्यक्तिवाद हा प्रमुख विचार ब्रिटिश राजवटींत वाढीला लागला. सांस्कृतिक व साहित्यिक क्षेत्रांत तर त्याचें अपरंपार महत्त्व आहे. ब्रि. राजवटींतलें साहित्य हें व्यक्तिवादाच्या कल्पनेशी निगडित असलेलें साहित्य आहे. या व्यक्तिवादाचा उल्लेख या प्रबंधांत वारंवार स्त्रीजीवनाच्या

अनुरोधाने आला आहे. स्त्रीला व्यक्ति म्हणून स्थान नव्हतें. तें तसें असावयास हवें, हा विचार व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचाराचें एक उपांग होय.

वर उल्लेखिलेल्या एककार्यता व एकध्येयता यांच्या मुळाशी बारकाईने पाहूं गेलें तर हा व्यक्तिस्वातंत्र्याचाच विचार आहे असें आढळून येईल. स्त्री-स्वातंत्र्याची चळवळ इंग्लंडांत व जगांतहि या विचाराबरोबरच रूढ झालेली आहे. ब्रि. पूर्व समाजांत स्त्रीला मानाचें स्थान नव्हतें. तें निदान व्यक्ति म्हणून तरी असावयास कांही हरकत नाही, असा विचार मूळ धरूं लागला, आणि हलकें हलकें वाढूं पण लागला. अशा प्रकारें व्यक्ति म्हणून स्त्रीचें प्रामुख्याने साहित्यांत चित्रण होणें आणि तिच्या व्यक्तित्वाची जाणीव कवि व लेखक यांच्या ठायीं निर्माण होणें ही महत्त्वाची गोष्ट आहे.

या व्यक्तित्वाच्या विचाराचा दुसरा पैलू म्हणजे स्त्रियांच्या ठायीं व्यक्तित्वभावना निर्माण होणें ही होय. ही गोष्ट मात्र स्त्रियांच्या कर्तृत्वांतूनच प्रायः स्पष्ट व्हावयाची आहे. या दिशेने पाहाणी केली असतां असें आढळून येतें की, स्त्रीच्या ठायीं ही व्यक्तित्वाची जाणीव मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेली आहे, होत आहे. जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत स्त्रिया अहमहमिकेने पुढे येत आहेत. त्या क्षेत्रांत आपण कांही काम करावें, नांव कमवावें, अशी मनीषा त्यांच्या ठायीं निर्माण झालेली आहे. वडिलांच्या वा पतीच्या नांवावर ओळखलें जाण्यापेक्षा आपल्या नांवावर ओळखलें जावे असा विचार त्यांच्या मनांत जोराने मूळ धरीत आहे. व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार स्त्रीने आत्मसात् केल्याचें हें प्रत्यंतर होय. विविध क्षेत्रांत स्त्रिया पुढे येत आहेत. त्यांच्या कर्तृत्वाला निरनिराळीं क्षितिजें निर्माण होत आहेत. ही सर्व क्रिया वा हा विचार प्रसृत वा सर्वसंमत होणें हें महत्त्वाचें कार्य ब्रिटिश राजवटींत झालें आहे व साहित्याची साक्ष पाहातांहि त्याचें प्रतिबिंब साहित्यांत पडलेलें दिसतें.

तथापि स्त्रियांनी व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार जरी आत्मसात् केला असला, समाजांत वा साहित्यांत त्यांच्या व्यक्तित्वाची सामान्यतः बूज ठेविली जाण्याची क्रिया दिसून आली तरी, अधिक व्यापकपणें पाहतां या विचाराचा अर्धवटच स्वीकार वा अवलंब झालेला आहे असें आढळून येतें. व्यक्तिस्वातंत्र्याचा वैचारिक अर्थ घेतला तर विचारस्वातंत्र्याची वा विचार व्यक्त करण्याच्या स्वातंत्र्याची आठवण होते. पण वस्तुतः व्यक्तिस्वातंत्र्याचा अर्थ खूपच व्यापक आहे. त्या व्यापक अर्थाने पाहतां ब्रिटिश राजवटींतच काय पण ब्रिटिश राजवटीच्या नंतरच्या आज सात वर्षांतली प्रगति अल्प आहे. स्त्रियांना कांही महत्त्वाचे अधिकार मर्यादित स्वरूपांत प्राप्त झाले आहेत पण त्यांस लोकांचा पुष्कळच विरोध आहे.

स्त्रीच्या दृष्टीने ह्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या व्यापक विचारांकडे पाहिलें तर काय आढळतें ? ब्रि. राजवटींत स्त्रीच्या व्यक्तिस्वातंत्र्याला सांकेतिक मान्यता मिळाली असें दिसतें, व त्याचा उल्लेख वर आलाच आहे. पण व्यक्तिस्वातंत्र्याशी अपरिहार्यपणें निगडित असणारे सामाजिक वा आर्थिक इ. हक्क यांच्या प्राप्तीच्या दृष्टीने पाहिले तर अद्याप तीव्र निराशाच पदरांत पडते !

आर्थिक क्षेत्रांत तर परिस्थिति भयानकच आहे. स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य नव्हतें तें प्राप्त झालें की, त्यांच्यामागचें पुष्कळसें दास्य कमी होईल असा विचार रूढ झाला. त्याप्रमाणे बऱ्याच स्त्रिया नोकरी इ. मार्गांनी आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होऊं लागल्या; पण समाजांतला जो कायदा आहे, त्याला ही गोष्ट अद्याप पूर्णपणें संमत नाही. स्वकष्टार्जित संपत्तीवर तिच्या हयातींतहि तिच्या पुरुष पालकाची सत्ता होती, ती अलीकडे (१९३८) तिच्याकडे सुपूर्द झाली होती. पण त्या अर्जित संपत्तीची उपभोगापलीकडे विल्हेवाट लावण्याचा अधिकार कालपर्यंत तिला मिळालेला नव्हता. याचा अर्थ असा की, व्यक्ति म्हणून स्त्रीला मान्यता मिळाली आहे. त्याचें स्वरूप प्रायः सांकेतिक वा वैचारिकच आहे. समाज तिला अद्याप खरे

महत्वाचे, की जे असल्यावर मग त्या व्यक्तिस्वातंत्र्याला कांही तरी अर्थ राहातो, असे अधिकार तिला खूप खटपटीनंतर आतां कोठे प्राप्त होत आहेत. डॉ. आंबेडकरांच्या प्रसिद्ध 'हिंदु कोड' बिलाची परवड ह्या दृष्टीने फारच उद्‌बोधक आहे, उद्वेगजनकहि आहे !

आर्थिक अधिकारांतला अत्यंत महत्त्वाचा हक्क म्हणजे संपत्तीची वाटणी करण्याचा अधिकार होय. हिंदु स्त्रीला तो आजच प्राप्त होत आहे. याच हक्काची दुसरी बाजू म्हणजे वडिलोपार्जित संपत्तीच्या मालकीचा प्रश्न होय. या बाबतींतहि स्त्रीला अद्यापपर्यंत पूर्णपणें समानत्वाचा अधिकार आजहि मिळालेला आहे असें म्हणतां येणार नाही.

आर्थिक हक्कांकडून सामाजिक व राजकीय हक्कांकडे वळलें तरी हेंच आढळतें. आपल्या देशांत स्त्रियांना राजकीय हक्कांसाठी लढावें लागलें नाहीं असें म्हटलें जातें. आपल्या इंग्लंड देशांतील भगिनींनी त्याबाबत महत्त्वाचा लढा दिला. त्याचा फायदा आपणांस झाला. कारण दोन्ही ठिकाणचे राज्यकर्ते एकच होते. आपल्या स्त्रियांना 'राजकीय हक्क' चळवळ न करतां व पुरुषांनी विरोध न करतां दिले गेले आहेत, असेंहि म्हटलें जातें. वास्तविक ह्याबद्दल आपणांस जेवढें श्रेय मिळतें तेवढें मिळावें असें आपलें कर्तृत्व नाही. कारण राज्यकर्त्यांच्या हातांत हक्कदान होतें. संमतिवयाच्या बिलाच्या वेळीं एवढा प्रचंड विरोध होऊनहि राज्यकर्त्यांनी बिल संमत केलेंच. राजकीय हक्क स्त्रियांना देऊं नयेत असा प्रचार आपण केला नाही, ही गोष्ट महत्त्वाची नाही. कारण तसें केलें असतें तर राजकीय चळवळीचा वा आंदोलनाचा कणाच मोडला असता. राजकीय स्वातंत्र्य मागण्याचा नैतिक अधिकार त्यायोगें कधीहि प्राप्त झाला नसता. त्यापेक्षा दुसरें महत्त्वाचें कारण म्हणजे जे 'राजकीय हक्क' आहेत वा होते, त्यांत खरा महत्त्वाचा हक्क म्हणजे मतदानाचा अधिकार असणें हा होय. ब्रिटिश स्त्रियांनीहि मोठ्या प्राणप्रयासाने तो अधिकार पदरांत पाडून घेतला. पण त्या अधिकाराने त्यांच्या पदरांत फार मोठें कांही पडलें, असें मुळीच झालें नाही. त्यांना लढा द्यावा

लागला याचें कारण तो हक्क फार (प्रात्यक्षिक जीवनाच्या दृष्टीने) महत्त्वाचा होता असें नाही, तर त्याला विरोध कडवा झाला हेंच आहे. इंग्लंडांतील प्रतिकूल पुरुषांच्या आडमुठ्या वृत्तीमुळे स्त्रियांना लढा द्यावा लागला, तेव्हा तीव्र लढ्याचें कारण त्या लढ्याला मागे फार मोठा हक्क होता असें नव्हे, तर पुरुषांचा तीव्र विरोध (एवढ्या साध्या गोष्टीस) होता, हें खरें आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचाराचा अपरिहार्य अवयव म्हणजे राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य होय. त्याचा विचार विस्ताराने प्रबंधांत इतरत्र करण्याचें प्रयोजन नव्हतें. तसा उल्लेखच कोठे आला नाही. म्हणून या ठिकाणी या समालोचनांत तें करावेसें वाटलें. आपल्याकडे मतदानाचा अधिकार केवळ फारसा विरोध न होता मिळालेला आहे. तो एक अव्वल महत्त्वाचा असा राजकीय हक्क असला तरी सामाजिक परिमाणाच्या दृष्टीने त्याचें महत्त्व मर्यादित आहे.

विवाहविषयक हक्कांत विवाह करण्याचें स्वातंत्र्य जसें महत्त्वाचें आहे तसें तो मोडण्याचेंहि. पण या बाबतींतले कायदे पाहातां स्त्रीला विशेष (नव्हे थोडेहि) अधिकार कालपर्यंत नव्हते. खरोखर व्यापक दृष्टीने पाहातां हे अधिकार मूलभूत दृष्टीने फार महत्त्वाचे आहेत. स्त्रीचे खरे सामाजिक अधिकार याहून वेगळेच आहेत. समाजांत तिला पुरुषांबरोबरचें स्थान प्राप्त झालें, सर्व क्षेत्रें तिच्या कर्तृत्वासाठी मोकळीं झालीं तरी मानवजातीचें सातत्य टिकविण्याची जबाबदारी तिच्यावरच राहाणार आहे. तें तिचेंच कार्य राहाणार आहे. सबंध मानवजातीच्या सेवेचा एक उज्ज्वल मार्ग म्हणून तिच्या ह्या स्त्रीविशिष्ट कार्यकक्षेकडे लक्ष द्यावयास हवें. तिच्याकडून घडत असलेली ही मानवजातीची सेवा लक्षांत घेऊन त्याबाबत तिला कांही विशिष्ट अधिकार सर्वसंमत कायदे करून द्यावयास हवेत. नुसत्या मातृत्वाच्या शाब्दिक वा भावनानिष्ठ गुणगानाचा कांहीहि उपयोग नाही. पण स्त्रीच्या सामाजिक हक्कांचा विचार जरी करावयाचा झाला तरी याबाबत तिला कांही जादा विशिष्ट अधिकार द्यावयास हवेत ही कल्पनाच अद्यापपर्यंत बहुसंख्य लोकांना वा विचारवंतांनाहि आलेली नाही. पुरुषप्रधान अशी समाजरचना आज अस-

ल्याने पुरुषाने आपल्या कौटुंबिक वा व्यक्तिगत जबाबदाऱ्याहि राज्यसंस्थेवर टाकल्या आहेत. याचा उल्लेख अगदी प्रारंभींच्या प्रकरणांत (स्त्री आणि संस्कृति) आलेला आहेच. तेव्हा स्त्रीच्या सामाजिक हक्कांना तिच्या प्रसूतीच्यासाठी (उ. राज्याच्या खर्चाने प्रसूति व्हावी असा कायदा) मुलांच्या संगोपनासाठी व प्रसूतिपूर्व व उत्तर कालांत तिच्या प्रकृतीच्या जपणुकीसाठी कायदेशीरपणे कांही उपाय योजना होणें आवश्यक आहे. केवळ त्यांना सर्व क्षेत्रें उपलब्ध करून दिलीं, असें निमित्त सांगून याबाबतचे विशिष्ट हक्क नाकारणे हें चूक आहे, पुरुषी आहे, अमानवी आहे, समतेच्या मूलभूत व उदात्त तत्त्वाविरुद्ध आहे. स्त्रियाच जेव्हा अधिक प्रमाणांत पुढे येतील, व ह्या हक्कांसाठी झगडतील, तेव्हाच या बाबतींत कांही व्हावयाचें असेल तर तें होणार आहे. ब्रि. राजवटींत तें झालें नाही. नंतरच्या सातआठ वर्षांतहि तें झालें नाही व लोकांची मनोवृत्ति वा राज्यकर्त्यांचें धोरण जोंपर्यंत क्रांतिकारकतेने बदललेलें नाही तोंपर्यंत याबाबत कांही विशेष प्रगति होईल असें वाटत नाही.

आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इ. क्षेत्रांतील स्त्रियांच्या हक्कांचा विचार केल्यानंतर नैतिक बाबतींत थोडासा ऊहापोह करणें आवश्यक आहे. व्यक्तिस्वातंत्र्य व वरील क्षेत्रांत विशिष्ट हक्क यांची जरी स्त्रियांना प्राप्ति झाली तरी नैतिक दृष्टींत समानता येणार नसेल तर त्या समानतेंत कांही अर्थ आहे असें म्हणतां येणार नाही. आतांच पाहिलेले सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रांतील हक्क हे प्रामुख्याने राज्यसंस्थेच्या कक्षेखाली येतात. समाजाच्या नैतिक वा वैचारिक जीवनाशी त्यांचा तितका निकटवर्ति संबंध नाही. त्यामुळे त्यांचें प्रत्यक्ष प्रतिबिंब साहित्यांत तितकें स्पष्टपणें उमटलेले नाही. तसें प्रतिबिंब उमटविलें जावें अशी इच्छा असणारांना मुद्दाम होऊन प्रचारवादी भूमिका स्वीकारून कादंबऱ्या इ. लिहाव्या लागल्या आहेत. वरेरकर, वा. वि. जोशी, कमळाबाई बंबेवाले इ. लेखक-लेखिकांच्या विशिष्ट कादंबऱ्या या संबंधांत डोळ्यांपुढे येण्यासारख्या आहेत.

ह्या प्रश्नांना जेव्हा कांही नैतिक बाजू असते तेव्हाच त्या कलाकृतीचा वा कादंबरीचा विषय बनतात. शिवाय विवाहविच्छेदन इ. सुधारणा विशिष्ट कायदे करून होणें शक्य असतें. त्यांच्या मागलें मानसिक जीवन हेंच कादंबरीच्या कक्षेंत येतें. कायदे झाले तरी मानवी समस्या ह्या कांही ना कांही तरी राहाणारच; व जों जों त्यांचें स्वरूप अधिक नैतिक तों तों त्या साहित्यक्षेत्रांत महत्त्वाच्या गणल्या जाणार. अशाप्रकारें सामाजिक, आर्थिक इ. क्षेत्रांतील चळवळींवर तत्काळ कादंबऱ्या इ. कां निर्माण होत नाहीत याचा उलगडा होऊं शकतो. विशिष्ट चळवळ जेव्हा सुरू होते तेव्हा तिच्या मागे विशिष्ट नैतिक (उच्च) भूमिका असते. जसजशी ती चळवळ वाढत जाते तसतशी ती नैतिक भूमिका अधिकाधिक सुस्पष्ट व सर्वसाधारण समाजाच्या निकटवर्ति अशी होऊं लागते; व अशी निकटवर्ति होऊन तिला जेव्हां उच्च नैतिक असें स्वरूप होतें तेव्हांच ती साहित्याचा विषय होते. तेव्हा प्रचारवादी साहित्य-लेखकाजवळ जर ही नैतिक बाजू ओळखण्याची व तिला योग्य तें महत्त्व देण्याची दृष्टि वा कुवत नसेल तर त्या प्रचाराला केवळ प्रचारीच स्वरूप राहातें. वरेरकरांच्या कांही कृतींच्या बाबतींत असेंच झालें आहे.

व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार मान्य करावयाचें म्हटल्यानंतर नैतिक बाबतींतहि समानता धारण करणें आवश्यक आहे. किंबहुना व्यक्तिस्वातंत्र्याच्या मान्यतेची परमावधि कोणती असेल तर ती हीच समानदृष्टि मनोवृत्ति असें म्हणतां येईल. पण ब्रि. राजवटींतलें जीवन पाहातां ही समानदृष्टि मात्र लोकांच्या—सुशिक्षितांच्याहि—ध्यानीं आली आहे असें म्हणतां येत नाही. मनुष्याने कृषिअवस्थेंत प्रवेश केल्यानंतर जी परवशता स्त्रीवर लादली तिचें स्वरूपविवेचन प्रारंभींच्या ' स्त्री आणि संस्कृति ' ह्या प्रकरणांत आलें आहेच. ह्या परवशतेचा एक परिपाक म्हणजे स्त्रीवर्गासाठी पातिव्रत्य हें जीवनमूल्य ठरविण्यांत आलें. हा पण उल्लेख तेथे आला आहेच. पुरुष—सावर्ण्याच्या व पातिव्रत्याच्या अनुषंगाने स्त्रीवर नैतिक बंधनें अधिक लादलीं गेलीं. तिने

आयुष्यांत एकाच पुरुषाशीं एकनिष्ठ राहिलें पाहिजे अशी अपेक्षा तिच्याकडून केली जाऊं लागली व त्या अपेक्षेला मूर्तस्वरूप कायद्यांनी व संकेतांनी दिलें. नुसतें एकनिष्ठ नव्हे तर तिचें विवाहपूर्व जीवन अत्यंत शुद्ध असावयास हवें. शुद्धशीलत्व हें स्त्रीचें पातिव्रत्याचेंच उपांग म्हणून गणलें गेलें. वरच्या (उच्च) वर्गांत तिच्यावर पतिनिधनानंतर सक्तीचें संन्यासी जीवन लादलें गेलें. थोड्क्यांत कृषिसंस्कृतीच्या कालखंडांत स्त्रीसाठी एक नीतिनियम व पुरुषासाठीं दुसरे असा दुजाभाव सर्रास प्रचारांत आला. पुरुषांच्याबरची (नीतिनियम) बंधनें हीं कमी होतीं. त्याबाबत थोडी शिथिलता झालेली असली तरी "तें नैसर्गिक आहे"[1] असें मानण्याची प्रवृत्ति झाली. स्त्रीच्या हातून मात्र चुकूनहि असलें कृत्य झालें तर तिचें नांव मात्र कायमचें बद्दू होत असे. आजहि होतें. सहाजिकपणें स्त्रियांचें शील पुरुषांपेक्षा (सर्वसाधारण) अधिक शुद्ध आहे, असें म्हणतां येईल. नैतिक बाबतींत असा दुजाभाव असणें आवश्यक आहे काय ? तो तसा मानण्यांत येतो याबाबत साहित्यांत कोणकोणत्या प्रतिक्रिया झालेल्या आहेत आणि ब्रि. राजवटींत त्याबाबत कोणती अवस्था होती वा कोणता टप्पा गाठला, याबाबत अधिक विवेचन करणें आवश्यक आहे.

स्त्रीवर निसर्गाने मातृत्वाची जबाबदारी लादली आहे. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेंत तर या मातृत्वाच्या 'विशुद्ध' पणाला अपरंपार महत्त्व आलेलें आहे. पुरुषाला मातृत्व होण्याचा संभव कधीच नसल्याने त्याची कामविषयक नीतिनियमांच्या परिपालनांतील शिथिलता सामान्यतः खपून जाते. समाजास एकादा पुरुष हा स्खलनशील आहे असें कळलें तरी त्याच्याबद्दल समाज विशेष काटेकोरपणें पाहात नाही. या कारणास्तव त्याच्या ऐहिक वा सामाजिक व्यवहारांत कसलाहि प्रत्यय वा अडथळा येत नाही; पण स्त्रीच्या बाबतींत मात्र समाजाची दृष्टि अत्यंत चिकित्सक असते. अशा

१ उदाहरणार्थ, पुरुष हा निसर्गतःच बहुभार्याक् प्राणी आहे. अशा विचारांचा पाठपुरवठा अनेक लेखकांनी केला आहे.

स्त्रीला सामाजिक व व्यक्तिगतहि जीवन कधी कधी अशक्य होतें. ही समाजाची समानतेची भावना व्यापक व्हावी असा प्रयत्न निराळ्या निराळ्या साहित्यिकांनी केला आहे. अविवाहितपणांतलें–अनूढ–मातृत्व हें समाजमान्य असावें, विधवा स्त्रीलाहि जर अपत्य संभव झाला तर समाजाने त्या बाबतींत सोशिकपणा दाखवावा, असे विचार साहित्यिक विचारवंत यांनी बोलून दर्शाविले आहेत. बुद्धिवादी वा व्यक्तिवादी दृष्टीने पाहतां अशा प्रकारांस संमति असण्यास कांहीच प्रत्यवाय नाही. तथापि, वेळोवेळीं झालेलें या बाबतींतलें अनुकूल विचारप्रदर्शन होऊनहि समाजाची दृष्टि बदललेली नाही. सर्वच महत्त्वाच्या क्षेत्रांत जेव्हा स्त्रिया पुढें येतील व थोड्या धिटाईने या बाबतींत कोणी प्रयत्न करतील, तेव्हांच ही समानताप्रधान नैतिक दृष्टि समाज आत्मसात् करील असें दिसतें. ब्रि. राजवट आली नी गेलीहि. व्यक्ति-स्वातंत्र्याचा विचार या देशांत तिने बद्धमूल केलाहि. पण स्त्री-पुरुष यांच्या नैतिक व्यवहारांत मात्र समान दृष्टीचा स्वीकार समाजाने आजहि केलेला नाही. कादंबरी आदि लेखनांतून, प्रा. र. धों. कर्वे आदि विचारवंतांच्या विचारप्रचाराने ह्याबाबत बरीच सहानुभूति निर्माण झालेली आहे. पण संततिप्रतिबंधक साधनांचा प्रसार होत असल्याने समाजाची दृष्टि न बदलतांहि पुरुषांप्रमाणे स्त्रियांचेहि अनैतिक व्यवहार उजेडांत न येण्याची सोय झाली आहे. त्यामुळे समान दृष्टि निर्माण होण्याची शक्यता थोडी दुरावली आहे. कित्येकजण तर ह्या कारणाने संततिप्रतिबंधक साधनांचाच धिःकार करितात. त्यांचे मतें त्या साधनांनीं स्त्रियांची नीति बिघडविण्यात मदत केली आहे. तसें कदाचित् होत असेलहि; पण व्यक्तित्वाचे दृष्टीने पाहिलें तर तें म्हणणें समर्थनीय वाटत नाही. हीं बंधनें एकांगी आहेत. पुरुषांना कोणीच बंधनांत ठेवूं शकत नाही, पण स्त्रीवरचीं बंधनें मात्र अतिरिक्त कटाक्षाने पाळण्याचा प्रयत्न होत आहे. समता-प्रधान नैतिक दृष्टीला हें खपणार नाही. नीति-बाबतची चाड ही स्त्री व पुरुष या दोघांनाही तितकीच महत्त्वाची आहे. हें तत्त्वतः मान्य केलेंहि जातें, पण प्रत्यक्षांत मात्र पुरुषाच्या नीतिपालनापेक्षा

स्त्रीच्या नीतिपालनावर अधिक कटाक्ष बाळगला जातो. याचाच अर्थ आमची समानता-प्रधान दृष्टि वरवरची आहे.

नैतिक बंधनांच्या बाबतींत स्त्री व पुरुष यांत समानता असावी असा विचार मात्र असणारांमध्येहि दोन पर्याय संभवतात. नीतिनियम वा त्यांचें परिपालन अत्यंत महत्त्वाचें आहे ही गोष्ट सर्वमान्य आहे. अर्थात पुरुषासहि नीतिपालनांचें महत्त्व पटलें आहे. पण तरीहि त्याच्याकडून जर कांही स्खलनशील वर्तन झालें तर समाजाने कानाडोळा करण्याची वृत्ति स्वीकारली आहे. हीच वृत्ति स्त्रियांच्याबाबत स्वीकारावी हा अत्यंत महत्त्वाचा व सामान्यतः सर्वसंमत असा मार्ग होय. बहुतेक सर्व विचारवंतांनी व साहित्यिकांनी ह्याच विचाराचा (वा पर्यायाचा) पुरस्कार केलेला आहे. विवाहविच्छेदन किंवा घटस्फोट, अनूढ मातृत्व, इ. गोष्टींस मान्यता ही या पर्यायावर आधारलेली आहे. पण याशिवाय आणखीहि एक पर्याय आहे, त्याचा कांही विचारवंत लोक पुरस्कार करितात. त्यांच्या मताने नैतिक दृष्टीने पाहतां स्त्री ही पुरुषापेक्षा निःसंशय श्रेष्ठ आहे. तिच्यावर अधिक बंधनें आहेत, पण त्यांच्या परिपालनाने तिचें जीवन अधिक उच्च व नैतिक दृष्ट्या अधिक उन्नत आहे. ही उन्नतता हा मानवजातीचा एक श्रेष्ठतर ठेवा आहे असें पण त्यांना म्हणावयाचें आहे. आतांच उल्लेखिलेला समानतेचा पर्याय जर अवलंबावयाचा झाला तर पुरुषांप्रमाणे स्त्रीनेहि नैतिकदृष्ट्या अधःपतित जीवन कंठावें असें म्हणण्यास पुष्टि देण्यासारखें होईल. मानव जातीची नैतिक उंची वाढवावयाची असेल तर स्त्रियांच्याइतकी नैतिक उच्चता पुरुषांनीहि पुरस्कारावयास हवी. म्हणजे पुरुषांना जें 'स्वातंत्र्य' (नैतिक बाबतींत) आहे तें कमी करावें. स्त्रीला बंधनकारक मानलें जाणारे नीतिनियम तितक्याच कटाक्षाने पुरुषाच्या बाबतींत पाळले जावेत. हा समानतेचा पर्याय कांही विचारवंतांनी आग्रहाने पुरस्कारला आहे. आपल्या देशांतील या पर्यायाचे प्रमुख पुरस्कर्ते म्हणजे गांधीजी होत. वरवर पाहिलें असतां या पर्यायांत तथ्य आहे असें आढळून येतें. पण सामाजिक परिणामांच्या दृष्टीनें तर या विचाराचा स्वीकार

पुरुषवर्गाकडून कटाक्षाने कधीच होणार नाही, आणि स्त्रियांवरचे निर्बंध मात्र कटाक्षाने पाळण्याची कोशीस केली जाईल. हा परिणाम लक्षांत घेऊन पहिला पर्यायच अधिक स्वीकारणीय आहे असें म्हणतां येईल. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहतां तोच अधिक योग्य आहे.

वैवाहिक जीवनांतील नीतिनियमांच्या पालनांतहि ही पक्षपाती दृष्टि आहे. वैवाहिक अवस्थेंत पुरुष व स्त्री सामान्यतः एकनिष्ठ असतात असें मान्य केलें जातें. पण पुरुषाकडून जर त्याबाबत शिथिलता वा चूक झाली तर समाजास विशेष कांही वाटत नाही. पण स्त्रीच्या बाबतींतली शिथिलता समाजाच्या लक्षांत आली तर मात्र जीवन असह्य होतें. आपल्याकडे स्त्री-स्वातंत्र्याचा प्रसार फारसा झालेला नाही. स्त्रियांना समाजांत मिसळण्याचीहि फारशी संधि आजपर्यंत मिळत नसे. त्यामुळे हा प्रश्न फारसा महत्त्वाचा झालेला नाही. पण जसजसें स्त्रीजीवनाचें महत्त्व सामाजिक दृष्टीने वाढत जाईल, म्हणजे त्यांचा विविध क्षेत्रांत संचार होऊं लागेल तसतसे, या बाबतींतले आपले संकेत बदलावयास हवेत अशी अपेक्षा नि परिस्थिति निर्माण होईल. पण या परिस्थितीच्या मुळाशी जी नैतिक समानतेची दृष्टि असावयास हवी ती नसेल तर सामाजिक (स्त्री-पुरुष यांचे) संबंध आधिक घर्षणशील होणें अपरिहार्य आहे. बर्ट्रँड रसेलने याबाबत आपल्या 'मॅरेज अँड मॉरल्स' या ग्रंथांत स्त्री व पुरुष या दोघांनीहि आपल्या वैवाहिक सहजीवनांतहि एकमेकांच्या एकाद् दुसऱ्या अशा प्रकारच्या चुकीबद्दल उदार दृष्टि धारण करावी असें म्हटलें आहे. त्याने व अमेरिकेंतील प्रख्यात न्यायाधीश लिंडसे यांनी विवाहाचे दोन प्रकार असावेत असें पुरस्कारलें आहे. पहिला, आपले सर्रास रूढ असणारे विवाह; (म्हणजे प्रायः संततिप्राप्तीसाठी केलेले व त्यायोगें सामाजिक, सांपत्तिक इ. प्रश्न निर्माण करणारे विवाह) व दुसरा मित्रभावनेने स्त्री व पुरुष यांनी लैंगिक संबंध वर्ज्य न मानतां एकत्र राहाण्याच्या दृष्टीने केलेले विवाह. या प्रकारच्या विवाहांत स्त्री व पुरुष यांनी आपणांस संतति होणार नाही अशी काळजी घ्यावयाची असते. नैतिक समानतेच्या बाबतींत जागतिक विचारांचा

हा टप्पा लक्षणीय आहे. नैतिक दृष्ट्या पुरुषांशी समानता प्रस्थापित करावी अशी मनीषा अद्याप या देशांतील स्त्रियांच्याहि ठायीं निर्माण झालेली नाही. त्यांच्या मनावर जुन्या विचारांचें दडपण आहे तें कमी झालेलें नाही. निरनिराळ्या क्षेत्रांत त्यांचें कर्तृत्व सिद्ध व्हावयाचें आहे. त्यासाठी त्यांना आणखी एकदां पुरुषांशी लढा द्यावा लागेल असें वाटतें. कारण पुरुषवर्गाने जे 'समानतेचे' अधिकार दिले ते केवळ औदार्याच्या भावनेने. अद्याप त्यांच्यामागची भूमिका तयार झालेली नाही. अर्थातच त्यांचा जसजशी स्त्री पुढे येईल व जास्त अधिकारासाठी मागणी करील तसतसा विरोध होऊं लागेल. कदाचित् कांही काळ त्याला तीव्रताहि निर्माण होणे शक्य आहे. समाज अद्याप घटस्फोटित स्त्रीकडे सहानुभूतीने पाहावयास तयार नाही. हें लक्षांत घेतलें असतां आपली सामाजिक कुवत ध्यानांत येईल.

तथापि, याबाबत पुरुषांनी व समाजाने अधिक सहानुभूतीने पाहावें. ती सहानुभूति केवळ भूतदयावादी वृत्तीला पोषक अशी न ठरतां ती अधिक साक्षेपी असावी, असा उपक्रम कांही विचारवंत करीत आहेत. अशा लोकांत आचार्य भागवत, आचार्य दादा धर्माधिकारी इ. चा समावेश करावा लागेल. स्त्रीजीवनाच्या मूलभूत समस्येचें विवेचन दादा धर्माधिकारी यांनी वारंवार केलें आहे. त्यांत मूलभूत समस्येंत स्त्रियांच्या शीलाच्या शुद्धतेच्या कल्पनेच्या अनुषंगाने समाजांत जो संघर्ष निर्माण झाला आहे वा होत आहे त्याचें विवेचन केलें आहे. स्त्रीला संरक्षण मिळालें, समतेचे अधिकार मिळाले तरी तेवढ्याने भागणार नाही. "जोपर्यंत स्त्री स्वरक्षित होणार नाही तोपर्यंत ती खऱ्या अर्थाने सुरक्षितहि होणार नाही. दुष्टांचा व गांवगुंडांचा प्रतिकार करण्याची धमक तिच्या अंगी आल्याखेरीज स्त्रीजीवन सुरक्षित व स्वतंत्र होणार नाही. स्त्रीची प्रतिष्ठा, तिची अब्रू, तिचें शील अशा रीतीने शरीरनिष्ठ होऊन बसलें आहे."[१] असे उद्गार दादा धर्मा-

१ निबंध परिमल, पृ. १०९.

धिकारी यांनी 'नव्या युगाची स्त्री' ह्या निबंधांत काढले आहेत. स्त्री कितीहि मोठ्या अधिकारावर गेली तरी जोंपर्यंत ती अपहृत होऊं शकते तोंपर्यंत तिला योग्य स्थान नाही, असा त्यांच्या म्हणण्याचा आशय आहे. ह्या समस्येचें येथील विवेचनाचे आधारें निराकरण होऊं शकतें. शीलविषयक स्त्रीकडून ज्या अपेक्षा केल्या जातात त्यांत फरक व्हावयास हवा. अशी आवश्यकता सर्वत्र निर्माण होत आहे. देशाच्या फाळणीमुळे हा प्रश्न धसास लागल्यासारखा झाला आहे. पण तो केवळ संकटकालीन उपाययोजना वा जुळवाजुळव अशासारखा न राहतां, या वादांत व्यापक स्वरूपाची पार्श्व-भूमि निर्माण होणें आवश्यक आहे. हा प्रश्न ब्रि. राजवटींत निर्माण झालेला नव्हता, पण तो नंतर निर्माण झाला आहे. ज्या दिशेने ह्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा प्रयत्न होत आहे, ती दिशा एकंदरीने योग्य आहे, असें म्हणा-वयास हरकत नाही. आचार्य धर्माधिकारी यांच्या शब्दांत याबाबतच्या विवेचनाचा परिहार करणें योग्य होईल. ते म्हणतात, 'स्त्रीला पुरुषांबरोबर मोकळेपणाने राहतां यावें म्हणून आजपर्यंत हार्डीमार्सी खिळलेल्या अनेक समजुतींना फांटा द्यावा लागेल. अशांपैकी एक समजूत अशी कीं, स्त्रीचें शरीर कांचेच्या भांड्यासारखें आहे, म्हणून तिची अब्रूहि ठिसूळ आहे. तुम्ही जर ही समजूत उराशी बाळगून बसाल तर तुम्हांला कांचेच्या भांड्याप्रमाणेच वागावें लागेल. स्त्रियांच्या मनांत जोंपर्यंत ही खुळी समजूत कायम राहील तोंपर्यंत स्त्रिया-स्त्रियांतहि खरी मैत्री होऊं शकणार नाही. त्यांच्यांत परस्परविश्वास राहील. स्त्रीचें प्रेम कुटुंबाच्या मर्यादित क्षेत्रांतच आपले चमत्कार दाखवितें. आतां समाजाच्या व्यापक क्षेत्रांत त्याचें तेज व माधुर्य प्रत्ययास आलें पाहिजे. त्या प्रेमाच्या उत्कटतेने व निरपेक्षतेने आमचें सामाजिक जीवन उन्नत व उदात्त झालें पाहिजे. तसें व्हावयाला भित्रेपणा हें स्त्रीचें भूषण नसून दूषण आहे ही गोष्ट मुलींच्या मनावर बिंबविली पाहिजे" (नव्या युगाची स्त्री :–निबंधपरिमल, पृ. ११२) अशा प्रकारें ब्रिटिश

राजवटींत व्यक्ति-स्वातंत्र्याचा विचार जो सर्वदूर प्रसृत होत होता, त्याचे स्त्री-जीवनाच्या दृष्टीने विविध पर्याय किती आहेत त्याचें दिङ्मात्र दर्शन येथे केलें. या विवेचनावरून व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार आम्ही कसा अर्धवटच स्वीकारला आहे, तो पूर्णपणें स्वीकारला जाण्यासाठी आपल्या नीतिविषयक कल्पनांत कसा बदल झाला पाहिजे व स्त्रीपुरुषांच्या नीतिमत्तेकडे पाहाण्याची समानताप्रधान नैतिक दृष्टि निर्माण होणें कसें अत्यावश्यक आहे, ह्याचें पण दिङ्मात्र दर्शन केलें. ब्रि. राजवटीनंतरच्या कालांत–आजच्या स्वातंत्र्याच्या कालांत–हा प्रश्न निकालांत निघाला पाहिजे. त्याबाबत आपण सामाजिक दृष्टीने किती वाटचाल केली तिचें हें विवेचन केलें. स्त्रीने व्यक्तिस्वातंत्र्याचा विचार ब्रिटिश राजवटींत आत्मसात् केला हें प्रबंधांतील विवेचनांतून दिङ्मात्रित झालें आहे. या प्रबंधांत काढलेल्यापैकी तो एक प्रमुख निष्कर्ष आहे. त्याच्या मर्यादा स्पष्ट करणें आवश्यक होतें. साहित्यांतील चर्चेच्या वा प्रतिबिंबाच्या अनुषंगाने विवेचन करण्यास अवसर सापडला नाही, व म्हणून येथे त्याचें थोड्याशा विस्ताराने दिङ्मात्र दर्शन केलें.

: २ :

सामाजिक जागृतीबरोबर साहित्यांत ब्रि. राजवटींत कोणत्या विविध अशा समस्या निर्माण झाल्या व त्याचें साहित्यांत कसें प्रतिबिंब पडलें याचें विवेचन त्या त्या कालखंडाचा व त्यांत निर्माण झालेल्या साहित्याचा ऊहापोह करतांना आलेलें आहे. ह्या ठिकाणी समालोचनांत ह्या विविध समस्यांकडे विहंगात्मक दृष्टिक्षेप टाकून त्यांतून व्यक्त होणाऱ्या स्त्रीजीवनाच्या प्रगतीचा आढावा घेणें आवश्यक आहे.

ब्रि. राजवट सुरू होण्यापूर्वी स्त्रीचें जीवन किती पराधीन झालें होतें त्याचें विवेचन दुसऱ्या प्रकरणांत आलेलेंच आहे, स्त्रीदास्याची परमावधि

झाली होती. त्यांतून मुक्त होण्याची सुरुवात सतीच्या चालीच्या प्रतिबंधाने झाली आहे. सतीची पद्धति ही दास्यवृत्ति किती पराकोटीला गेली होती ह्याचें गमक होय. सतीच्या चालीच्या मागे कांही एक वैचारिक भूमिका झालेली असणें शक्य आहे. " पुरुषाला कुटुंबाबाहेर अनेक कर्तव्यें आहेत पण पत्नीला हीं दुसरीं कर्तव्यें नाहीत, तिला स्वतंत्र पुरुषार्थहि नाहीत असें गृहीत धरलें म्हणजे निरपत्य विधवेला या जगांत कर्तव्यांसाठी जगण्याचें कारणच उरत नाही. स्वतःच्या जीवनाशेने व सुखाशेने जगणें हें तर ध्येय कधीच होत नाही. म्हणून तिने प्रिय पतीबरोबर जाळून घेणें हेंच तिचें श्रेष्ठ कर्तव्य ठरतें " अशाप्रकारचें स्पष्टीकरण आचार्य जावडेकरांनीं आपल्या ' आधुनिक भारत ' या ग्रंथांत (पृ. ८२) दिलें आहे. पण त्यांनींच ही विचारसरणी त्याच ठिकाणीं खोडून काढली आहे. ते म्हणतात, ' या विचार-सरणींत स्त्रीला स्वतंत्र अस्तित्व नाही असें गृहीत धरलें आहे. स्त्रीस्वातंत्र्याच्या श्रेष्ठ ध्येयाच्या दृष्टीने ' सती ' हा कोणत्याहि स्वरूपांत अधर्मच ठरतो. " असो. ब्रि. राजवटींत स्त्रीच्या जीवनाला सुरुवात सतीच्या ' पवित्र ' चालीच्या बंदीपासून व्हावी ही घटना फारच अन्वर्थक आहे. सतीबंदीचें हें श्रेय राममोहनांना जातें हा उल्लेख मागे आलेलाच आहे. राममोहनांनीं स्त्रियांना वडिलोपार्जित संपत्तींत वारसा हक्क मिळावा याबद्दलहि खटपट केली. प्राचीन स्मृतिग्रंथांत मुलींना निदान मुलांच्या चतुर्थांशाइतका तरी हिस्सा मिळावा असें प्रतिपादिलें असल्याचें त्यांनी जनतेपुढे मांडलें. तसेंच आईबापांनी कन्याविक्रय करूं नये व बहुपत्नीकत्वाची चाल बंद व्हावी ह्या-बद्दलहि लोकांत जागृति केली. पण त्यांना यश आलें सतीच्याच चालीच्या विरुद्ध केलेल्या प्रयत्नांत. ब्रि. राजवटींत निर्माण झालेल्या स्त्रीविषयक प्रश्नांत पहिला प्रश्न सतीचा आहे व त्याची वासलात कशी लागली हें येथे स्पष्ट करावयाचें होतें. राममोहनांच्या सुधारणेच्या इतर प्रयत्नांबाबत असें म्हणतां येईल की, ज्या समाजांत सतीची चाल रूढ असण्याइतकें महत्त्व नि मोठेंपण पुरुषवर्गाला प्राप्त झालें होतें, स्त्रिया जेथे पूर्ण अज्ञानांत होत्या, त्या समाजां-

तले पुरुष सुखासुखी आपलें महत्त्व वा मोठेंपणा कमी करण्याचा यत्न करतील वा तसल्या प्रकारच्या सुधारणांस संमति देतील हें शक्यच नव्हतें.

अशाप्रकारें ब्रिटिश राजवटींत स्त्रियांच्या सुधारणेला सुरुवात त्यांना कोणत्याहि अवस्थेंत जगण्याला परवानगी आहे ह्या गोष्टीपासून झाली आहे. सतीबंदीने वैधव्यावस्थेंत जगण्याचा त्यांना 'अधिकार' मिळाला. ही त्या दृष्टीने पाहातां खूपच महत्त्वाची क्रांति होय. तथापि जगण्याची परवानगी जरी स्त्रीला मिळाली तरी प्रत्यक्षांत तिचें जीवन म्हणजे जिवंत मृत्युस्वरूप होतें. ज्या सुधारकांनी सतीची बंदी करविली त्या सुधारकांच्या मनांत भूतदयावादी वृत्तीचा प्रादुर्भाव झाला होता. त्यांनी अर्थातच वैधव्यावस्थेंतील दुःखें कमी करावीं ह्यासाठी तीं मोठ्या साक्षेपाने समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. समाजाच्या मनांतहि ही भूतदयाबादी वृत्ति निर्माण होत होती. व एकंदर विधवाजीवनाबद्दल व्यापक सहानुभूति त्याच्याठायीं होत होती. वैधव्यावस्थेंतील स्त्रीचीं दुःखें कमी कशीं होतील अशा दृष्टीने विचारवंत लोक विचार करूं लागले तेव्हा त्यांच्या दृष्टीपुढे दोन सुधारणा आल्या. त्या दोन्ही सुधारणा यापुढे महत्त्वाच्या स्त्रीजीवनविषयक सुधारणा म्हणून गणल्या गेल्या. त्या म्हणजे पुनर्विवाहाला परवानगी असावी अशी समाजाची तयारी करणें व वैधव्याची शक्यता कमी करण्यासाठी बालविवाहाला प्रतिबंध करणें अशा या दोन सुधारणा होत. या सुधारणा १९२० पर्यंत प्रमुख स्त्रीजीवनविषयक सुधारणा होत असें समजलें जात होतें, व त्याप्रमाणे त्या तशा होत्याहि. १९२० नंतरसुद्धा समाजाची मानसिक तयारी झाली म्हणून त्या सर्वमान्य झाल्या असें नव्हे, तर त्या होण्यासारखे मोठे बदल समाजाच्या आर्थिक व सामाजिक जीवनांत होत होते, व त्या बदलांना या सुधारणा अंमलांत आणण्याचें श्रेय द्यावें लागेल. समाज संपूर्णतया मनाने ह्या सुधारणांच्या बाजूने होता असें नव्हे. अशा परिस्थितींत ह्या सुधारणांच्या मागे कांही मानसिक अधिष्ठान निर्माण करण्याचा प्रयत्न कोणी केला असेल तर तो समाजसुधारकांनी होय. लोकहितवादी, विष्णु परशुराम पंडित, रानडे,

आगरकर, फुले, गोखले इ. समाजसुधारकांचे प्रयत्न ध्यानांत धरण्यासारखे आहेत. या सुधारणांचा पुरस्कार हा साठ-सत्तर वर्षे मोठ्या अभिनिवेशाने होत होता. त्यांना होणारा विरोधहि तितकाच तीव्र होता. या प्रदीर्घ कालांत समाजसुधारकांचा पण ह्या सुधारणांकडे पाहाण्याचा दृष्टिकोन बदलत होता. त्या बदलाचे तीन-चार टप्पे दृष्टीपुढे येतात. लोकहितवादी, फुले यांच्या विचारसरणी ह्या पहिल्या अवस्थेच्या द्योतक, रानडे, आगरकर यांची दुसरी अवस्था, व त्यानंतरची तिसरी अवस्था. कायद्याच्या दृष्टीने पाहातां १८५६ त पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता देण्याचा कायदा, १८८५ च्या सुमारास झालेला संमतिवयाचा कायदा व १९२९ त झालेला सारडा कायदा हे तीन कायदे प्रमुख होत. पहिला कायदा लवकर सम्मत झाला तरी समाजाची तयारी झाली नाही. उलटपक्षी, दुसऱ्या कायद्यांत विरोध झाले तरी त्या सुधारणा अपरिहार्यपणें स्वीकाराव्या लागल्या. राममोहनांच्या अनेकभार्यापद्धतीला प्रतिबंध करण्याला कायदेशीर महत्त्व वा मान्यता स्वराज्याच्या काळांत प्राप्त झालें आहे. (मुंबई सरकारने द्विभार्याप्रतिबंधक कायदा १९४७ त केला.) यावरून असें आढळून येईल की, कायदा आणि समाजसुधारणा यांचा अन्योन्य संबंध असला व कायद्याने विशिष्ट सुधारणेला पद्धतशीर मान्यता दिली तरी त्या सुधारणेला आवश्यक अशी मानसिक तयारी समाजाची नसेल तर ती सुधारणा समाज फारशा तत्परतेने मान्य करीत नाही. उलटपक्षी, समाजांत महत्त्वाचे बदल घडून येऊं लागले की कायदा व मानसिक तयारी यांची पर्वा न करतां त्या सुधारणा संमत होतात. यासंबंधी अधिक विवेचन त्या त्या कालखंडांतील सुधारणांचा ऊहापोह केला तेव्हा आलें आहेच.

लोकहितवादी व फुले यांचा काल हा समाजसुधारणेचा प्रभातकाल होय. या कालांत समाजसुधारणांचा पुरस्कार करतांना त्यांनी प्रामुख्याने समाजाच्या भूतदयावादी वृत्तीला आवाहन केलें आहे. विशेष खोलांत जाऊन युक्तिवादाचा अवलंब करून त्यांनी मधून मधून समाजसुधारणेची अपरि-

हार्यता समाजमनावर ठसविण्याचा प्रयत्न केला आहे. पण तशा प्रकारचा युक्तिवाद स्वीकारण्याची समाजाची प्रगति झाली नव्हती. केवळ सहानुभूतीस आवाहन करून वैधव्यावस्थेंत स्त्रीला जें संन्यासी वृत्तीचें जीवन कंठावें लागतें, त्याविरुद्ध मत दिलें आहे. केशवपन, विधवा स्त्रीला समाजांत ज्या अवहेलनेने वागविलें जातें तो प्रकार, कुटुंबांत जें हीनदीन, परावलंबी जीवन तिच्या वांट्यास येतें तें जीवन, या सर्वांविरुद्ध लोकमत तयार व्हावें असा या सुधारकाग्रणींनीं प्रयत्न केला. तो करतांना सामान्यतः समाजाच्या दया-वृत्तीस हालविलें आहे. असें दयावृत्तीस आवाहन करून सुधारणांचा पुरस्कार करणें ही प्रथमावस्था.

परंतु हें दयावृत्तीचें आवाहन समाजास फारसें पोंचलें नाहीच. हिंदु समाजाची जी सांस्कृतिक घडण आहे तिच्यांत सामान्यतः भूतदयावृत्तीस वाव आहे असें वरवर दिसत असलें तरी याच दयावृत्तीचें मानवी स्वरूप म्हणजे मानवी सहानुभूति हिचें मात्र एकंदरीने तिला वावडें आहे. वारकरीपंथीयांनीच याबाबत अधिकाधिक प्रयत्न केला. समाजाच्या उच्चवर्णीयांत वारकरी संप्रदायाची विचारसरणी फारशी मान्यता पावली नाही. त्याचेंच सांस्कृतिक, आर्थिक इत्यादि वर्चस्व सर्व समाजावर होतें. त्या वर्चस्वास धक्का बसूं नये असे त्यांचे यत्न होते. ब्रि. राज्यकर्त्यांच्या आगमनामुळे ह्याच वर्गाच्या आचारविचारांत क्रांति होण्याची वेळ आली. साहजिकपणें पहिला प्रयत्न त्याच्या ठायीच्या सहानुभूतीला आवाहन करून समाजसुधारणा करण्याचा झाला व लोकहितवादी आदि सुधारकांनी तो केला.

यापुढची अवस्था विष्णु परशुराम पंडित व रानडे यांनी आपल्या दृष्टिकोनाद्वारें गाठली. हे सुधारक ज्या वर्गातून आले होते त्यांच्या मनो-वृत्तीची त्यांना चांगलीच ओळख होती. त्याच्या सामाजिक निष्ठांत मानवी सहानुभूतीला फारसें स्थान नाही हें पण त्यांनी ओळखिलें. त्याच्या मनो-वृत्तींत धर्मवचन प्रामाण्याला अधिक महत्त्व आहे ही गोष्टसुद्धा त्यांच्या ध्यानांत आली. साहजिकच त्यांनी ह्या सर्व सुधारणांना धर्मवचनांच्या

(स्मृतिवचन मान्यतेच्या) चौकटीत बसविण्याचा प्रयत्न केला. म्हणजे सुधारणा त्याच, पण सुधारकांची प्रवृत्ति मात्र वेगळी. अर्थात् समाजाची रूढिप्रियता इतकी विलक्षण होती, तिला इतकें दार्ढ्य आलें होतें की, अशा समाजसुधारणांना धर्मवचनांची मान्यता आहे असें सिद्ध झालें असतें तरी त्यांनी त्या सुधारणा स्वीकारल्या नसत्या. पण येथे वस्तुस्थिति अशी की, बहुसंख्य स्मृतिवचनेंच त्यांच्या बाजूचीं. अशाप्रकारें समाजसुधारणा जरी त्याच असल्या तरी सुधारकांच्या प्रचारपद्धतींतला फरक हा वैचारिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे.

या बाबतींतला तिसरा टप्पा म्हणजे आगरकरांचा होय. आगरकरांनी मानवी सहानुभूतीचा व्यापक आविष्कार म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्य, त्याचा अवलंब केला आणि त्याला शास्त्रीय दृष्टीची–बुद्धिवादाची–जोड दिली. समाजसुधारणेच्या मागे व्यापक नैतिक पार्श्वभूमि निर्माण करण्याच्या दृष्टीने आगरकरांचा हा प्रयत्न अत्यंत महत्त्वाचा होय. सुधारणेची ही शास्त्रीय अवस्थाच होय. ही अवस्था आगरकरांनी गांठली. कालदृष्ट्या ती (समाजाच्या मनाच्या ठेवणीच्या दृष्टीने) बरीच पुढची आहे. या योगानेच आगरकरांनी निर्माण केलेली वैचारिक भूमिका समाजाला समाजवादी विचारांचा उदय होईपर्यंत पटली नाही.

अशाप्रकारें सतीच्या बंदीनंतरचे प्रमुख स्त्रीजीवनविषयक प्रश्न निर्माण झाले. त्यांच्या सोडवणुकीच्या दृष्टीने समाजाच्या व सुधारकांच्या मनोभूमिकेंत वा दृष्टिकोनांत जो फरक होत होता त्याचें विवेचन केलें. आगरकरांपर्यंत ही जी टप्प्याटप्प्यांनी समाजविचारांची उत्क्रांति होत होती तिला एक व्यापक वैचारिक अधिष्ठान आगरकरांच्या कालांत प्राप्त झालें, व तें प्रायः आगरकरांच्या प्रयत्नाने प्राप्त झालें. आगरकरांची भूमिका ही नुसतीच वैचारिक होती असें नव्हे, तर समाजप्रगतीच्या दृष्टीने पाहतां समाजसुधारणेला नैतिक महत्त्व प्राप्त झालें. हें नवें नैतिक अधिष्ठान हरिभाऊ आपट्यांच्या ध्यानांत आलें व त्या दृष्टीने त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून, कथांतून नवी नैतिक

मनोवृत्ति निर्माण करण्याचा यत्न केला. हरिभाऊंच्या वेळेपर्यंतची चिंकित्सा ही प्रामुख्याने विचारप्रधान वा प्रचारप्रधान होती. पण स्त्रीविषयक प्रश्नांची सोडवणूक अधिक साक्षेपाने व्हावयास हवी. त्यासाठीं समाजाची नैतिक भावना जागृत केली पाहिजे असें आपट्यांना वाटलें. आपट्यांच्या कादंबरी जगांतील स्त्रीजीवनाचें अधिक विस्तारशः विवेचन यापूर्वी आलेंच आहे. या ठिकाणीं समालोचनांत हरिभाऊंच्या साहित्यांतून समाजाच्या नैतिक भावनांस आवाहन करण्याचा यत्न कसा होता, व हें नैतिक आवाहन समाजास पोंचावें अशी परिस्थिति कशी निर्माण होत होती ह्याचें विवेचन केलें.

कुटुंबाशिवाय अन्य क्षेत्रांत व समाजांत स्त्रीला कर्तव्यें नव्हतीं. सतीबंदीमुळे कुटुंबांत जगणें तरी शक्य झालें. तिला समाजांत कोणतेंच स्थान नव्हतें हें लक्षांत घेतलें तर तिचे प्रश्न प्रामुख्याने कौटुंबिक असावेत हें ओघानेच येतें. त्या दृष्टीने पाहतां, केशवपन, एकत्र कुटुंबांत स्त्रीचा होणारा कोंडमारा, विधवा अवस्थेंत तिला सहन कराव्या लागणाऱ्या यातना, समाजांत तिचा होणारा अपमान इ. गोष्टींनाच महत्त्व यावें हें साहजिक होतें. अशाप्रकारें आगरकरांच्या पूर्वीच्या व नंतरच्याहि कालांत स्त्रीचे प्रमुख प्रश्न हे कौटुंबिकच होते. आगरकरांनी व्यक्तिस्वातंत्र्यवादाच्या भूमिकेवरून त्यांना अधिकाधिक महत्त्व देण्याचा प्रयत्न केला.

या प्रारंभींच्या कालांत स्त्रियांच्या उद्धाराचा मार्ग म्हणजे त्यांना शिक्षण देऊन शहाणें करणें हाच होय; असें सर्वसामान्य विचारवंतास वाटूं लागलें. सरकारचें धोरण ह्या बाबतींत अनुकूल असल्याने स्त्रीशिक्षणाच्या शाळा निघणें इ. उपक्रम झाले. स्त्रीला शिक्षण द्यावयास हवें असा विचार सामान्यतः सर्वमान्य होता. पण समाजांतला प्रतिगामी विचारप्रवाह बराच प्रबल होता. त्यामुळे या 'सुधारणे'सहि कमालीचा विरोध झाला आहे. स्त्रीशिक्षणास बालविवाहामुळे अडचण येते म्हणून विवाहकाल पुढे ढकलला जावा असा युक्तिवाद आगरकरांनी केला आहे. ह्याशिवाय स्त्रीविषयक सामाजिक प्रश्नांत हुंड्यांचा प्र[illegible], वाढ-जरठ विवाह, विवाहानंतर स्त्रीला

(मुलीला) सासरीं होणारा जाच इ. गोष्टींकडे समाजाचें लक्ष जाऊं लागलें. या सर्व प्रकारच्या त्रासांनीं युक्त असलेलें स्त्रीजीवन हरिभाऊंनीं रंगविलें. देवलांनी आपल्या 'शारदा' नाटकांतून एका प्रश्नाला जोराची चालना दिली. हुंड्याच्या चालीचा निषेध मधून मधून व वारंवार होत आला आहे. पण या चालींत घृणास्पदता असली तरी लोभाविष्टतेचा तो एक भाग आहे, त्याशिवाय त्याचें स्वरूप बरेंच व्यवहारी आहे. ज्याला नैतिक संघर्ष म्हणतां येईल, असें त्यांत फारसें नाही. त्यामुळे या चालीवर 'हाच मुलाचा बाप' सारखें नाटक झालें असलें तरी त्या नाटकाने वा कोणत्याहि मार्गांनी हुंडा पद्धति कमी पडली असें म्हणतां येत नाही. प्रेमविवाहामुळे वास्तविकपणें स्वाभाविकच त्या चालीला दुय्यमत्व प्राप्त होण्याची परिस्थिति निर्माण व्हावी, पण प्रत्यक्षांत तसें दिसत नाही.

अशाप्रकारें एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं जीवनविषयक प्रमुख समस्यांचें स्वरूप होतें. यापुढील पंधरा-वीस वर्षें हीं सामान्यतः समाज-सुधारणेला प्रतिकूल होतीं. समाजजीवनांत अशा कांही घडामोडी व चळवळी होत होत्या की, सामाजिक व स्त्रीविषयक प्रश्नांना दुय्यमत्व प्राप्त झालें. आतांपर्यंत उल्लेखिलेल्या शिक्षण, बालविवाहप्रतिबंध, पुनर्विवाह अनुमति इ. ह्याच प्रमुख समस्या होत, असें सर्वमान्य झालें. समाजाच्या सुशिक्षित वर्गात विविध लेखकांच्या लेखनामुळे स्त्रीजीवनाविषयीं व्यापक सहानुभूति निर्माण होत होती. समाजजीवनांत मात्र राष्ट्रीय, सामाजिक, आर्थिक इ. क्षेत्रांतील प्रश्नांना महत्त्व प्राप्त झालें. त्या प्रश्नांच्या सोडवणुकीची निकड अधिक वाटूं लागली. अशा परिस्थितींत स्त्रीजीवनाची कुचंबणा व्हावी हें साहजिक होतें. सांस्कृतिक परंपरेच्या अभिमानाची जी लाट उसळली त्या लाटेंत तर या सुधारणांची हेळसांड होऊं लागली. पुन्हा पूर्वकालीन पाति-व्रत्यासारख्या स्त्रीजीवनविषयक मूल्याचा उदोउदो होऊं लागला. समाज-सुधारणेच्या बाजूने असणाऱ्यांची टिंगल होऊं लागली. अशा रीतीनें प्रारंभा-पासूनच थोडा प्रबल असणारा सुधारणाविरोधी विचार हा राष्ट्रीयत्वाच्या

नांवाखाली अधिकच प्रभावी झाला, व त्या प्रमाणांत स्त्रीची व तिच्या प्रश्नांची उपेक्षा झाली. तसें होणें एकापरीने अटळ होतें. खाडिलकर, गडकरी इ. धुरंधर लेखकांचीं नाटकें, शिवरामपंत परांजपे यांचें लिखाण, ह्यांतील स्त्रीविषयक दृष्टिकोन लक्षांत घेतला तर ह्या विवेचनातील आशय ध्यानांत येईल.

पण पहिल्या महायुद्धानंतर परिस्थितींत फार महत्त्वाचे फरक पडले. इंग्लंडांतील स्त्रीवर्गाने सर्व महत्त्वाच्या कार्यकक्षांत अहमहमिकेने पुढे येऊन आपली पात्रता सिद्ध केली; व त्यायोगें त्यांच्या राजकीय हक्कांचा मार्ग मोकळा झाला. आपल्याकडेहि या सर्व घडामोडींचा परिणाम झाल्याविना राहिला नाही. स्त्रीविषयक उपेक्षावृत्ति थोडी कमी झाली. स्त्रीवर्गावरहि इंग्रजी शिक्षणाने व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचारांचा व इंग्लंडांतील भगिनींच्या लढ्याचा परिणाम झाल्याविना राहिला नाही. स्त्रियांची अशी मध्यवर्ती संघटना असावी अशी इच्छा निर्माण झाली.* सुशिक्षित स्त्रियांची संख्याहि हळूहळू वाढत होती. एकंदर वातावरणांत राजकीय प्रश्नांइतकेंच सामाजिक प्रश्नांना महत्त्व प्राप्त झालें. 'मासिक मनोरंजना 'सारखें नियतकालिक 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते' इ. ध्येय असणारें मासिक बरेंच लोकप्रिय झालें. गुर्जर, वा. गो. आपटे, सहकारी कृष्ण इ. लेखक पुढे आले. स्त्रियांची परवशता दृष्टोत्पत्तीस येऊन ती दूर करण्यास कायदेशीर प्रयत्नांची आवश्यकता पण भासूं लागली.

याप्रमाणे बदललेल्या परिस्थितींत स्त्रीजीवनाचे प्रश्न मात्र फारसे बदलले असें म्हणतां येत नाही. सामाजिक परिस्थिति होती तशीच होती. सुशिक्षित स्त्री ही व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचारांनीं भारलेली असे. तिच्या मनांत समान हक्क संपादण्याचे विचार येत असत. पुरुषांविषयी थोडी तेढहि तिच्या मनांत येत असे. जुन्या विचारांच्या आहारीं असलेल्या बहुसंख्य समाजास या स्त्रीविषयी सहाजिकपणें आदर वाटत नसे; व स्त्रीशिक्षणाविरुद्ध मत जाईल की काय अशी भीति निर्माण झाली होती. वामनराव जोशांनी

* त्याप्रमाणे १९२७ मध्यें अखिल भारतीय महिला सभा स्थापन झाली.

आपल्या ' रागिणी ' द्वारां सुशिक्षित स्त्रीच्या अंतरंगाचें खरें दर्शन घडविलें. व त्यायोगें समाजाचा कदाचित् दृष्टिकोन बदलला असणें शक्य आहे. स्त्रीच्या ठायीं व्यक्तित्वभावना निर्माण झालेली लेखकांना दिसावी व ती त्यांनी सहानुभूतीने रंगवावी ही निश्चितपणें महत्त्वाची व प्रगमनशील अशी अवस्था आहे. स्त्रीच्या व्यक्तिविकासास समाजांत वाव हवा, त्याचप्रमाणे स्त्रीचें कार्यक्षेत्र वा कर्तव्यें हीं केवळ कुटुंबापुरतीं न राहतां व्यापक सामाजिक कर्तव्यांचाहि त्यांत समावेश व्हावयास प्रत्यय नसावा असा प्रयत्न स्त्रियांकडून होऊं लागला. सुधारणावादी लोक हे सामान्यतः सरकारच्या बाजूस झुकणारे असणारे; सरकारमार्फत म्हणजे कायद्याच्या द्वारें स्त्रियांना महत्त्वाचे अधिकार असावेत असे त्यांचे यत्न सुरू झाले. कृ. के. गोखले यांचें ' हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा ' सारखें पुस्तक या दृष्टीने महत्त्वाचें आहे. अशा रीतीनें स्त्रीला आर्थिक दृष्ट्या व समाजांत वा कुटुंबांत मानाचें व निश्चित स्वरूपाचें स्थान असावें असा विचार सर्वदूर प्रसृत होऊं लागला. बालविवाहप्रतिबंधित (मर्यादित स्वरूपांत) करणारा कायदा याच काळांत (१९२९) झाला. अशा प्रकारच्या प्रयत्नांनी स्त्रीजीवनविषयक समस्यांचें क्षेत्र अधिक व्यापक व अधिक सामाजिक होत होतें. स्त्रियांचे प्रश्न म्हणजे कांही परधार्जिण्या सुधारकांनी केवळ अंधानुकरणाने आणलेल्या परकीय कल्पना नव्हत तर ते महत्त्वाचे असे सामाजिक प्रश्न आहेत, अशी जाणीव राजकीय विचारवंतांनाहि झाली. स्त्रियांच्याविषयीं एकंदर बरीच उपेक्षा झाली आहे असें जबाबदार लोकांसहि पटूं लागलें. सयाजीमहाराज गायकवाडांसारख्यांचें लक्ष तिकडे वेगाने वेढलें गेलें. राष्ट्रीयत्वाचे अभिमानी लोकहि जरा निवळलेल्या दृष्टीने स्त्रियांच्या प्रश्नांकडे पाहूं लागले. डॉ. आण्णासाहेब कर्वे यांच्या प्रयत्नांस मूर्त स्वरूप प्राप्त होऊन स्त्री-विद्यापीठाची स्थापना झाली; व असलेली स्त्रीशिक्षणाविषयीची उपेक्षावृत्ति कमी होण्यास मदत झाली.

इंग्लंडमध्ये ज्याप्रमाणे महायुद्धाची संधि स्त्रियांनी साधून आपली पात्रता सिद्ध केली व महत्त्वाचे राजकीय अधिकार प्राप्त करून घेतले. तसा

थोडा प्रकार याहि देशांत झालेला आहे. प्रत्यक्ष स्त्रियांना राजकीय अधिकार हवेत. यासाठी त्यांना लढा द्यावा लागला नाही, तरी देशाच्या राजकीय लढ्यांत त्यांनी पुरुषांबरोबरीने सहकार्य केलें. मोठमोठ्या राजकीय पुढाऱ्यांनी त्याबद्दल गौरवोद्गार काढलेहि आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष जरी राजकीय हक्कांसाठी लढा द्यावा लागला नसला तरी राजकीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून स्त्रियांनी जें सहकार्य केलें त्यायोगें एक फार मोठी गोष्ट सिद्ध झाली, व ती ही की, स्त्रीचें क्षेत्र हें केवळ कुटुंब नाही, तिला महत्त्वाचीं सामाजिक कर्तव्यें आहेत. तिचीं सामाजिक कर्तव्यें व पुरुषाचीं सामाजिक कर्तव्यें हीं एकरूप आहेत. म्हणजेच या प्रबंधांतलें मुख्य प्रतिपाद्य की, स्त्री व पुरुष यांचीं कार्यक्षेत्रें व ध्येयें हीं समान आहेत, ह्या टप्प्याप्रत मनाने स्त्री व पुरुष दोघेहि आलीं.

साहजिकपणेंच १९३० नंतर असें आढळून येतें की, स्त्रीचे प्रमुख प्रश्न हे सामाजिक झाले. व्यक्तिगत प्रश्न हेहि कुटुंबांतील व्यक्तीचे म्हणून न राहातां समाजांतील व्यक्तीचे म्हणून गणले जाऊं लागले. या नव्या बदलाच्या जाणीवेने या कालांतला प्रमुख प्रश्न कोणता असेल तर स्त्रीच्या आर्थिक स्वातंत्र्याचा. व्यक्तित्वाची जाणीव झालेली स्त्री जेव्हा समाजांत आपणांस कोणतें स्थान आहे ह्या दृष्टीने पाहूं लागली तेव्हा तिला असें आढळून आलें की, समाजांत तिला स्थान नाही, व तें नसण्याचें कारण म्हणजे अर्थप्रधान अशा समाजव्यवस्थेंत तिला अर्थविषयक कोणतेहि अधिकार नाहीत. अर्थात् आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्यासाठी तिचा प्रयत्न सुरू झाला. अर्थप्रधान व्यवस्थेंत आर्थिक स्वायत्तता असलेल्या व्यक्तींना कांही तरी स्थान असतें. त्या दृष्टीने स्त्रीने आर्थिक स्वायत्तता मिळविण्याचा प्रयत्न करावा हें सुयोग्य होतें. हें आर्थिक स्वातंत्र्य आणण्याचे दोन मार्ग. एक स्वतः मिळविणें व दुसरें वडिलोपार्जित वा तत्सम संपत्तींत वारसा इ. सारखे महत्त्वाचे हक्क मिळविणें. ह्यापैकीं दुसरा मार्ग हा बराच अवघड होता. समाजाची संमति त्याला मिळणें हें सर्वस्वी अशक्य होतें. स्वातंत्र्यकालांतहि

डॉ. आंबेडकर यांच्या बिलाची जी वासलात लागली ती या बाबतींत आज आपल्या समाजाची मनोवृत्ति कोणती आहे ह्यावर प्रकाश पाडते. त्याशिवाय हा हक्क अगदी थोड्या स्त्रियांपुरताच असणार; ह्या योगाने त्या प्रश्नाला, किंवा प्रश्नाच्या त्या अंगाला दुय्यमत्व प्राप्त झालें. स्त्री व पुरुष यांच्यांत मूलभूत समता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीनेहि ह्या हक्कांबाबत हेळसांड योग्य नाही.

बालविवाह, पुनर्विवाह ह्यांच्या पलीकडे जाऊन आर्थिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्याच्या अवस्थेपर्यंत येण्यांत जी स्त्रीची प्रगति होत होती, तिच्यांत एक आंतरिक भागहि होता. समाजाचा—विशेषतः सुशिक्षित वर्गाचा —तिच्याकडे पाहाण्याचा दृष्टिकोन बदलत होता. स्त्रीच्या ठायीं व्यक्तित्वाची जाणीव होत होती. ती पुरुषाच्या लक्षांत येत होती. वामनरावांच्या 'रागिणी'-चा उल्लेख वर आलाच आहे. व्यक्तित्वाचा एक अपरिहार्य परिपोष म्हणून प्रणयभावनाहि तिच्या ठायीं निर्माण झाली. कवींची दृष्टीहि बदलली होती. केवळ पुरुषाच्या उपभोगासाठी तयार केलेली मानवी देहाकृति म्हणून न पाहतां व्यक्ति म्हणून, प्रेयसी, सहचरी म्हणून तिच्याकडे कवींचें लक्ष जात होतें. या संबंधांत माधवराव पटवर्धनांचीं व रविकिरण मंडळाच्या वा इतर कवींचीं काव्यें उल्लेखिण्यासारखीं आहेत. अशा प्रकारें सामाजिक दृष्टीने आर्थिक स्वातंत्र्याच्या पुरस्कारापर्यंत व व्यक्तिगत दृष्ट्या प्रेमभावनेच्या निर्मिती-पर्यंत स्त्रीची प्रगति होत होती, झाली होती. समाजांत व्यक्ति म्हणून तिची बूज होऊं लागली. तिच्या विविध प्रश्नांसंबंधी थोडी अधिक आस्था निर्माण झाली.

१९३५ नंतर समाजवादी विचारांचा प्रसार झपाट्याने होऊं लागला. त्याचा स्त्रीजीवनावर कोणता परिणाम झाला ह्याचें विवेचन मागे एका प्रकरणांत आलेंच आहे. स्त्रीचें कुटुंबांत व समाजांत व्यक्ति म्हणून जें स्थान निश्चित होऊं लागलें, त्या योगाने विविध स्वरूपाचे प्रश्न निर्माण होऊं लागले. उदाहरणार्थ, विवाह निराकरणाचा. ह्या प्रश्नाबाबत किती मजल गाठली गेली ह्याचा उल्लेख याच प्रकरणांत आला आहे. व्यक्ति म्हणून स्त्रीला स्थान

द्यावयाचें असेल तर तिला करार करण्याचें व त्या कराराचें निराकरण करण्याचें सामर्थ्य असणें ओघानेच येतें. अनेक लेखकांनी आपली लेखणी याबाबत झिजविली आहे. राजरत्न वा. वि. जोशी, कमळाबाई बंबेवाले इ. च्या कादंबऱ्या ह्या प्रश्नावर लिहिलेल्या आहेत. इतर अनेक लेखकांच्या कृतींतून ह्याबाबतचा उल्लेख आला आहे. अलीकडच्या कालांत प्रणयभावनेला महत्त्व प्राप्त झालें आहे. पण तें जेव्हा झालें नव्हतें तेव्हा 'सहवासोत्तर विवाह की विवाहोत्तर प्रेम' अशा प्रकारचे प्रश्न चर्चिले जात होते. अलीकडे सामान्यतः प्रेमविवाहांची पार्श्वभूमि गृहीत धरून विवाहोत्तर स्त्री व पुरुष यांच्या जीवनांतील विविध प्रश्नांची चर्चा चालू असते. अशा प्रश्नांत पत्नीकडून बौद्धिक सहकार्य न झालें तर पुरुषाची होणारी कुचंबणा इ. स्वरूपाच्या प्रश्नाला प्राधान्य मिळालें होतें. प्रो. फडके यांच्या 'निरंजन' व बोकीलांच्या 'दुसरी सावली' इ. कादंबऱ्यांतून हा प्रश्न मांडलेला दिसतो.

पण आर्थिक स्वातंत्र्याच्या प्रश्नाचा पहिला पर्याय हाच बराच गाजला. प्रो. फडके यांची 'उद्धार' ही कादंबरी ह्याच प्रश्नाचें दिग्दर्शन करण्यासाठी लिहिली गेली आहे. त्या कादंबरीचें व तींतील स्त्रीजीवनविषयक समस्येचें विवेचन यापूर्वी आलेंच आहे. आर्थिक स्वातंत्र्य मिळविण्याचा एक प्रमुख मार्ग म्हणजे नोकरी वा व्यवसाय करून आर्थिक स्वातंत्र्य मिळविणें. ह्याहि बाबतींत बहुतेकांची कल्पना नोकरी करण्याच्या पलीकडे जात नाही. एकटे वरेरकर या बाबतींत अपवाद दिसतात. त्यांनी आपल्या नाटक-कादंबऱ्यांतून वकिली, व्यापारधंदा करून समाजाच्या आर्थिक व्यवहारास साहाय्य करणाऱ्या व त्यायोगें मानाचें जीवन जगणाऱ्या कर्तृत्वशील स्त्रियांचीं चित्रें रंगविलीं. आर्थिक स्वातंत्र्य हें एक महत्वाचें व्यक्तिगत स्वातंत्र्य आहे यांत शंका नाही. माडखोलकरांच्या कादंबऱ्यांतून जे स्त्रीजीवनविषयक प्रश्न चर्चिले आहेत तेथे स्त्रीला आर्थिक दृष्ट्या स्वायत्त कल्पिलेलें आहे. प्रसिद्ध स्त्रीजीवनविषयक कादंबरी 'हिंदोळ्यावर' हिची नायिकाहि मिळवती आहे. तरीहि तिच्या जीवनांतील समस्या आहेत तशाच आहेत असें भासविण्याचा यत्न

झाला आहे असें दिसतें. या बाबतींत एक गोष्ट लक्षांत घेणें आवश्यक आहे. आर्थिक दृष्ट्या मी स्वतंत्र राहीन असा प्रयत्न करणारास पोषक परिस्थिति राज्यसत्तेने निर्माण करावी. आर्थिक स्वातंत्र्य हा मूलभूत व्यक्तिगत हक्क आहे. समाजवादी समाजव्यवस्थेंत प्रत्येक व्यक्तीच्या निर्वाहाची (आर्थिक स्वातंत्र्याची) कायदेशीर तरतूद केली जाते. तेथे हा प्रश्न संपतो. आजच्या अर्थप्रधान जगांत आर्थिक स्वातंत्र्याला महत्त्व प्राप्त व्हावें हें क्रमप्राप्त आहे. आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त झालें की, सर्व प्रश्न (निदान स्त्रियांचे) सुटतील असें कोणीच म्हणत नाही. पुरुष आर्थिक–स्वायत्त आहेत, पण पुरुषाचे प्रश्न कुठे संपलेत ? पण पुरुषप्रधान समाजरचना असल्याने पुरुषाचे प्रश्न हे ' सामाजिक ' झालेत व स्त्रीचे प्रश्न हे ' स्त्रीचे ' राहिले आहेत. तेव्हा हा दृष्टिकोनाचा प्रश्न आहे. आर्थिक स्वातंत्र्य हें व्यक्तिस्वातंत्र्याचा एक भाग म्हणून त्याकडे पाहिलें असतां ह्याबाबतचा विरोध नष्ट व्हावयास हरकत नाही. १९३५ पर्यंतच्या कालांत ह्या प्रश्नाला बरेंच महत्त्व प्राप्त झालें होतें. पुनर्विवाह, बालविवाह ह्यांच्या पलीकडे जाऊन स्त्रीला समाजांत स्थान प्राप्त होत होतें, व त्याचें प्रत्यंतर म्हणजे स्त्रीला आर्थिक स्वायत्तता असावी, अशा विचारापर्यंत समाजाची प्रगति झाली होती. ही प्रगति होण्यांत सुद्धा परिस्थितीचा भाग बराच आहे. पुरुषांची स्त्रीकडे पाहाण्याची मनोवृत्ति ही बिलकुल बदललेली नाही. त्यायोगेंच सामान्यतः मिळवत्या स्त्रीला मिळवत्या पुरुषापेक्षा अधिक त्रास सहन करावा लागतो.

१९३५ नंतरच्या कालांत स्त्रीजीवनविषयक प्रश्नांचें स्वरूप विविध झालें. या कालांत समाजवादी ध्येयप्रणाली जोरांत वाढत होती. स्त्रियांनाहि या नव्या ध्येयांविषयीं जबरदस्त आकर्षण निर्माण झालें होतें. अशाप्रकारें ध्येयवादाच्या वा तत्सम दिशेने प्रवास करणाऱ्या स्त्रियांचे जीवन साहित्यांत रंगविलें जात होतें. ह्या स्त्रिया मनाने बऱ्याच उन्नत आहेत. वामनराव्रांची सुशीला, सरला, खांडेकरांची वत्सला, खांडेकरांची 'पांढरे ढग' मधील प्रमिला इ. उदाहरणें होत. ह्या स्त्रियांचें जीवन हें समाजजीवनाशी पूर्णपणें समरस

झालेलें असें आहे. त्यांच्या जीवनांत प्रश्न आहेत पण ते व्यक्तिगत स्वरूपाचे. त्यांची मजल मनाने समाजवादी ध्येयाप्रत आली असल्याने त्या विचारसरणीला अभिप्रेत असलेला न्याय समाजांत प्रस्थापित करणें हें त्यांचें उद्दिष्ट होय. दुसरा भाग म्हणजे वैवाहिक वा विवाहपूर्व प्रणयभावनेचें दिग्दर्शन करणाऱ्या व त्यांतील विविध समस्यांचें विवरण करणाऱ्या कादंबऱ्या वा ललितकृति. बहुसंख्य ललितकृति ह्या प्रकारच्या प्रश्नांचें चित्रण करतात. ह्यांत कधी वैवाहिक जीवनांत स्त्रीची कुचंबणा दर्शविली असते, पतिपत्नींतील विविध कारणांमुळे झालेल्या बेबनावाला प्राधान्य मिळालें असतें. एकमेकांच्या अपेक्षांची पूर्ति एकमेकांकडून कशी होते वा होत नाही, ह्याचें चित्रण असतें. एकत्र कुटुंबांत वा तत्सम कुटुंबांत स्त्री वा पुरुष यांची होणारी कुचंबणा, इ. ना वाचा फोडलेली असते. बहुसंख्य प्रेमकथांचा समावेश ह्याच वर्गांत करतां येईल. प्रणयभावनेचें विविधरंगी चित्रण हेंच ह्या कथांत उद्दिष्ट असतें. यानंतर स्त्रीजीवनाच्या आविष्करणाचा तिसरा प्रकार म्हणजे ज्यांत स्त्रीजीवनविषयक जे सामाजिक प्रश्न आहेत त्यांची चर्चा केलेली असते. उ. वेश्याव्यवसायांतील स्त्रियांचें जीवन व त्यांतील समस्या. त्या व्यवसायाच्या अनुषंगाने निर्माण होणारे प्रश्न, घटस्फोटित स्त्रियांचा प्रश्न, परित्यक्त वा अपहृत स्त्रियांचा प्रश्न, दलित, पतित वर्गांतील स्त्रियांचें जीवन इ. अशाप्रकारें ब्रिटिश राजवटींत कालक्रमाने जे प्रमुख स्त्रीजीवनविषयक प्रश्न निर्माण झाले त्यांची एक प्रकारची संगति लावतां येते.

अशाप्रकारें सतीच्या चालीच्या प्रतिबंधापासून तों अनूढमातृत्व वर्ज्य मानूं नये अशा विचारापर्यंत स्त्रीजीवनविषयक वेळोवेळीं विविध प्रश्न कसे निर्माण झाले याचें विवेचन केलें. हे प्रश्न आतांच पाहिले त्याप्रमाणे तीन प्रकारचे आहेत. कांही व्यक्तिगत जीवनाला प्रतिबंध होतो तो दूर करण्याच्या दृष्टीने पुढे आले आहेत. अशा प्रश्नांत विवाहनिराकरण, पुनर्विवाह पुरस्कार इ. चा समावेश करतां येईल. त्यानंतर इतर कांहीं प्रायः कौटुंबिक जीवनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. वैवाहिक जीवनांत स्त्री व पुरुष यांचें न

जमणें इ; त्याप्रमाणे प्रणयभावनेच्या आविष्काराच्या दृष्टीने विविध प्रकारच्या समस्या निर्माण होतात; त्यांचा समावेश ह्या वर्गांत करतां येईल. तिसऱ्या प्रकारचे प्रश्न विशेषतः नैतिक स्वरूपाचे आहेत. पुरुषांनी वा समाजाने आपल्या नीतिविषयक कल्पनांत अधिक सहिष्णुता आणावी अशा दृष्टीने पुढे आलेले आहेत. ह्यांत अनूढ मातृत्व, वेश्याजीवनविषयक प्रश्न यांचा समावेश करतां येईल. हे सर्व प्रश्न निर्माण झालेले आहेत याचें कारण व्यक्तित्वभावनेला समाजाच्या नैतिक व सामाजिक जीवनांत अतिशय महत्त्व आलेलें आहे हेंच होय. स्त्रीला व्यक्ति म्हणून जगण्याचा हक्क मान्य केल्यानंतर हक्कांच्या परिपूर्तीच्या दृष्टीने त्या प्रश्नांचा उद्भव झालेला आहे. केवळ सामाजिक दृष्टीने ह्या प्रश्नाकडे पाहून तो सोडविण्याचा प्रयत्न करावा, व्यक्तिभावनांचा बडेजाव मानूं नये, असा युक्तिवाद कांही लोक करतात; पण त्रि. राजवटीच्या कालांत व्यक्तिवाद विचारक्षेत्रांत खोलवर गेलेला आहे. त्यायोगें असा युक्तिवाद यशस्वी वा सर्वसंमत होणें शक्य नाही. अशाप्रकारें विविध सामाजिक समस्यांचें विशुद्धीकरण व्यक्तित्ववादी भूमिकेवरून होऊं लागलें व स्त्री-विषयक समस्यांच्या निराकरणाच्या बाबतींतहि तीच भूमिका स्वीकारली जाऊं लागली, हेंच कार्य त्रि. राजवटीचें होतें. त्या दृष्टीने या सामाजिक समस्यांकडे पाहाणें आवश्यक आहे.

: ३ :

त्रि. राजवटींत स्त्रीजीवनांत कोणती मूलभूत क्रांति झाली व त्या क्रांतीचा एक अपरिहार्य भाग म्हणून स्त्रीजीवनविषयक विविध सामाजिक प्रश्न कसे निर्माण झाले, प्रत्यक्षांत त्यांची वासलात कशी लागली व साहित्यांत त्यांचें प्रतिबिंब कसें उमटलें ह्यांचें पण ओझरतें दिग्दर्शन केलें. एका अधिक

महत्त्वाच्या प्रश्नाबाबत थोडा ऊहापोह करणें आवश्यक आहे. तो प्रश्न म्हणजे या राजवटींतले विचार (स्त्रीजीवनविषयक प्रामुख्याने) वा साहित्यांतलें जीवनाचें चित्रण हें कितपत 'भारतीय' आहे, व कितपत 'परकीय' म्हणजे केवळ अंधानुकरणाने आलेलें आहे हा होय.

ब्रिटिश राजवट ही उघड उघड परकीयांची राजवट होती. राज्यकर्ते येथे राहाण्याच्या दृष्टीने कधीच आले नाहीत व शेवटपर्यंत ते येथे स्थायी झाले नाहीत. म्हणजे त्यांनी ह्या देशास आपलें असें कधींच मानलें नाही. त्याशिवाय आपल्या मायदेशाचा त्यांचा अभिमान शेवटपर्यंत कडवा होता. येथे येऊन राज्य करण्यापलीकडे येथे स्थायी होण्याचें त्यांचें धोरण नसल्याने ते शेवटपर्यंत 'परकीय' च राहिले. पण या सर्वांपेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी की, त्यांची सांस्कृतिक पातळी ह्या देशांत ते ज्या वेळीं आले त्या वेळच्या येथील सांस्कृतिक पातळीपेक्षां खूपच उन्नत होती. ज्ञान, विज्ञान, संस्कृति, समाजशास्त्रें, इतिहास, इ. विविध ज्ञान व समाजशाखांत त्यांनी केलेली प्रगति ही आपणांस केवळ अपूर्व व म्हणूनच अनुकरणीय होती. प्रारंभापासून त्यांच्या देशांतील जीवनाचा ठसा या देशांतील जीवनावर उमटूं लागला होता, व शेवटपर्यंत तो तसाच राहिला. त्यांनी या देशास बऱ्याच कल्पना नवीन दिल्या. त्या कल्पनांचा स्वीकारहि करावा लागला वा यापुढे लागेलहि. पण राष्ट्रीयत्वाचा विचार वा राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ जों जों प्रसार पावूं लागली तों तों भारतीय, अभारतीय असा पक्षपात प्रत्येक क्षेत्रांत राष्ट्रीय वृत्तीच्या पुरस्कर्त्यांकडून केला जाऊं लागला. त्यांत परकीय गोष्टींचा अधिक्षेप व एतद्देशीय वा 'राष्ट्रीय' गोष्टींचा पुरस्कार होऊं लागला. नव्या विचारांकडे पाहाण्याचा एक कलुषित वा पूर्वग्रहपूर्ण असा निकष निर्माण होत होता. 'अभारतीय' म्हणून कित्येक विचार इ. अग्राह्य असें सांगण्यांत येत होतें व आजहि सांगण्यांत येतें. या ठिकाणीं स्त्रीजीवनांत जे बदल झाले आहेत त्यांतील 'भारतीयत्व' व 'अभारतीयत्व' याची चिकित्सा करावयाची आहे.

ब्रिटिश राजवर्तीतील साहित्यांत वा विचारांत अनुकरणशीलता बरीच होती. हें अनुकरण सरळ सरळ ब्रिटिशांचें होतें. राज्यकर्ते त्या अनुकरणाच्या बाजूने होते. कारण त्यायोगें त्यांचेंच मोठेंपण सिद्ध होत होतें. बहुसंख्य शिक्षित लोक हे इंग्रजी विद्या परिचित वा पारंगत असत. त्यांच्या अभ्यासांत व शिक्षणांत राज्यकर्त्यांच्या स्वदेशीय विचारांचा इ. पुरस्कार केला जात असे. इंग्रजीसारख्या परकी भाषेंतून सर्व ज्ञानदान व राज्यकारभार चाले. त्यामुळे सुशिक्षित लोकांचा वर्ग वेगळाच झाला होता. त्या सुशिक्षित वर्गाचे आचार-विचार इ. इंग्रजी शिक्षणाने तयार झालेले असत. इंग्रजी ज्ञानामुळे व इतर कारणांनी त्याला समाजांत महत्त्वाचें स्थान मिळे, व समाजाशी स्वकीय लोकांशी मिसळण्याची जरुरी त्यास विशेषशी वाटत नसे. नवे विचार, चळवळी हे परकीय विद्याविभूषित पदवीधर वा तत्सम लोक सुरू करीत. त्या चळवळीचें मूळ ब्रिटिशांच्या कोणत्या तरी गोष्टींच्या अनुकरणांत असे. त्यामुळे त्यांनी जे विचार ज्या चळवळी पुरस्कृत केल्या त्यांत अनुकरणाचा भाग निश्चित असे. स्त्रीविषयक सुधारणेची चळवळसुद्धां या गोष्टीस अपवाद नाही; व म्हणूनच आतापर्यंत त्यासंबंधी जे जे निष्कर्ष काढले आहेत त्यांतील भारतीय, अभारतीयपणाची चिकित्सा करावयाची आहे. या ठिकाणीं समालोचनांत ती करणें अस्थानीं होणार नाही असें वाटतें. त्याशिवाय हा कालखंड सरळ सरळ राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा असा कालखंड आहे. तेव्हा त्या कालखंडांत 'परकीय' गोष्टी इ. कोणत्या आल्या, त्यांचें स्वरूप कोणतें, त्यांची इष्टानिष्टता कितपत होती, यासंबंधी जर विवेचन करतां आलें तर परकीय राजवटीची या प्रबंधांतील विषयाच्या व विवेचनाच्या दृष्टीने नेमकी फलश्रुति कोणती ह्याचा उलगडा होऊं शकेल.

स्त्रियांची चळवळ ही सुधारकांच्या प्रयत्नांनी सुरू झाली. किंबहुना स्त्रीदास्यविषयक कल्पना प्रामुख्याने सुधारकांनीच प्रथम प्रस्तुत केली व तें

दास्य नष्ट करण्याचे त्यांचे यत्न सुरू झाले. हे सुधारक 'परकीय सत्तेचे पूजक', 'बाटगे', 'स्वसंस्कृतीचा अभिमान नसलेले' असे गणले जात. त्यांच्या सुधारणाविषयक कल्पनांचा अधिक्षेप वा निषेध त्यांचे विचार परकी आहेत या एकाच कारणाने केला जात असे. हा आक्षेप प्रायः संस्कृति-अभिमानी लोकांकडून केला जात असे. 'राष्ट्रीय' वृत्तीचा पुरस्कार करणारें राष्ट्र, स्वातंत्र्याची कल्पना हिरीरीने उचलून धरणारे कित्येक मोठे मोठे पुढारी अशा प्रकारची वृत्ति बाळगीत असत. लोकमान्य टिळक व शिवरामपंत परांजपे यांचे विचार या संबंधांत उल्लेखण्यासारखे आहेत. स्त्रियांना शिक्षण द्यावयाची प्रथा सुरू झाली तेव्हा टिळकांनी 'फीमेल हायस्कुलांतील शिक्षणक्रम' या विषयावर आधुनिक शिक्षणावर टीका करणारी एक लेखमाला लिहिली, तिचा उल्लेख मागे आलेला आहेच. टिळकांना स्त्रियांच्या ठिकाणीं व्यक्तित्वाची जाणीव होईल असें कोणतेंहि शिक्षण त्यांना द्यावयास नको होतें असें स्पष्ट दिसतें. परांजपे यांच्या लिखाणांत तर सुधारकी विचारांची व सुधारकांची प्रच्छन्न टिंगल केलेली मधून मधून सर्वत्र आढळून येते. १९२० पर्यंत राजकीय व सामाजिक प्रश्नांचें विभक्तीकरण झालें होतें; व त्या कालांत राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार करणारे पुढारी हे सामाजिक सुधारणांचा–की ज्या ज्या वेळीं प्रामुख्याने स्त्रीविषयक सुधारणा होत्या–सामान्यतः अधिक्षेप करीत. ह्या अधिक्षेपांतला एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सुधारकांचे हे समाजसुधारणेचे विचार हे केवळ परकीय अतएव अभारतीय आहेत, व म्हणूनच ते अस्वीकार्य होत, हा होय. आज स्वातंत्र्यानंतरहि 'परकीय' म्हणून विविध गोष्टींचा निषेध होत आहे. येथच्या विवेचनाच्या दृष्टीने स्त्रीविषयक सुधारणांचा भारतीय वा अभारतीय, अशा दृष्टीने तारतम्यपूर्वक विचार करणें आवश्यक आहे. तो करीत असतांनाच त्या स्वीकार्य वा समर्थनीय व अस्वीकार्य वा असमर्थनीय ह्याबाबत योग्य तो उलगडा होऊं शकेल.

राष्ट्रीय जागृतीच्या प्रभातकालांत राष्ट्रीय संस्कृतीबद्दलचा व परंपरेबद्दलचा अभिमान तीव्र असतो. राष्ट्रीय विचारांचा प्रसार त्या योगें होऊं

शकतो. तो अभिमान हा एक अत्यंत स्फूर्तिदायक विचार असतो हेंहि खरें आहे. परदास्यांत सांपडलेल्या राष्ट्रांचें दुर्दैव असें असतें की, त्याच्या संस्कृति-परंपरा इ. चा अधिक्षेप राज्यकर्त्यांकडून वारंवार होत असतो. कारण, जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर आपला ठसा उमटावा असा राज्यकर्त्यांचा यत्न (हट्ट) असतो, आणि तो राज्यकर्त्यांच्या मनोवृत्तीस धरून असतो. राष्ट्रीय जागृतीच्या कालांत (विशेषतः परदास्यांतील राष्ट्रांत) स्वसंस्कृतीचा अतिरिक्त अभिमान बाळगण्याची व परकीय (विशेषतः राज्यकर्त्यांच्यामुळे आलेल्या) गोष्टींचा द्वेष करण्याची मनोवृत्ति बरीच प्रबळ असते. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रश्न राष्ट्रीय विचारवतांच्या दृष्टीने महत्त्वाचा असतो व त्यामुळे समाजाच्या व्यापक जीवनांगांचा तारतम्याने विचार करावयास हवा; ही वृत्ति त्यांच्या ठायीं लवकर निर्माण होत नाही. (आपल्याकडे अशाप्रकारची परिस्थिति १९२० पर्यंत होती.) पुढे जसजसा राष्ट्रीय जागृतीचा व्याप वाढत जातो तसतसें राष्ट्रीयच नव्हे तर समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, सर्वांगीण प्रगतीचें पुढारीपण राष्ट्रीय विचारसरणीला द्यावें लागतें. त्या अवस्थेंत राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांनाही थोडें अंतर्मुख व्हावें लागतें. थोडें तारतम्य वापरावें लागतें. ती अवस्था आपणांकडे १९३० नंतर आली आहे. १९२० ते १९३० हा काल सामान्यतः संभ्रमावस्थेचा वा संक्रमणाचा खरा प्रातिनिधिक असा गणावा लागतो. राष्ट्रवादाच्या विकासांतसुद्धा ग दोन अवस्था लक्षांत घ्याव्या लागतात. १९२० चे पूर्वी राष्ट्रवादाचें स्वरूप संरक्षक होतें. पुढें तें आक्रमक झालें. १९३५ नंतर तें (समाजवादी विचारसरणीच्या योगाने) समावेशक झालें. या तीनहि अवस्थांत स्त्रीजीवनाच्या प्रमुख सुधारणांचा पुरस्कार होत होता तरी त्याला विरोधहि तितकाच तीव्र होता व तो प्रामुख्याने स्वकीय, परकीय या मुद्यावर.

वास्तविक पाहातां मानवी जीवन हें एकप्रकारच्या देवघेवीवर आधारलेलें असतें. समाजाची संस्कृति ही तर निश्चितपणेंच या देवघेवीवरच प्रामुख्याने आधारलेली असते. चांगली सोइस्कर गोष्ट दिसली की तिचा स्वीकार

करावा ही वास्तविक नैसर्गिक प्रवृत्ति. भारतीय संस्कृतीची पाहाणी केली तरीहि आपणांस ही देवघेव आढळून येईल. आर्य, द्राविड परकीय लोकांनी वेळोवेळीं आणलेल्या विविध गोष्टी यांनी ही संस्कृति समृद्ध झालेली आहे. भारतीय संस्कृतीचें वैशिष्ट्य हें की ही एक अत्यंत समावेशक अशी संस्कृति आहे. भारतीय संस्कृतीचें हें समावेशक स्वरूप सामान्यतः सर्वमान्य आहे. तथापि ब्रिटिशांच्या पूर्वी स्वकीय, परकीय असा विचार कांहींच्या मनांत आला असेल तर तो फार महत्त्वाचा वाटला नाही. कारण हिंदुधर्माच्या परिपूर्णतेवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. शिवाय या कालांत भारतीय संस्कृतीचें स्वरूप गतिशील राहिलें नव्हतें. कृषिसंस्कृतीचा हा काल होता. त्या संस्कृतीच्या आयुष्याचा शेवटला खंड सुरू झाला होता. त्यांत जीवन कमालीचें गतिशून्य झालें होतें. रानड्यांच्या मतें ह्या कालांत 'आत्मनियंत्रक शक्ति' (सेल्फ रेग्युलेटिंग पॉवर) नव्हती. टिळकांचे मतें तो 'थंड गोळा' होऊन पडला होता. आगरकरांचे मतें त्याला 'शिलावस्था' प्राप्त झालेली होती. 'हिंदी मनुष्याचा परंपरागत जीवनक्रम हा संपूर्णपणें सनातन रूढीच्या आणि अंधश्रद्धेच्या बंधनांत बंदिस्त होता. धार्मिक आणि सामाजिक ह्या दोन कल्पनांत भेद दाखविणारी सीमारेषा सांपडत नव्हती. जन्मापासून मरणापर्यंतचे व्यवहार धर्ममर्यादेंत बद्ध होते. या सकाळपासून त्या सकाळपर्यंतचे चोवीस तासांचे कार्यक्रमहि धर्मग्रंथांनी ठरवून दिलेलेच असत.'[१] अशा अत्यंत गतिहीन संस्कृतीचा व ब्रिटिशांच्या गतिमान संस्कृतीचा संघर्ष येथे गेल्या एक दीड शतक झाला. त्यांत आपणांस ब्रिटिशांपासून खूप गोष्टी शिकाव्या लागल्या. आधुनिक कालाप्रत येण्यासाठी त्या गोष्टींचा स्वीकार करणें अत्यावश्यक होतें. ज्यांचीं मनें पूर्वकालांत रमत होतीं, किंवा ज्यांच्या मनावर त्या संस्कृतीचे परिणाम खोल झालेले होते, त्यांचा विरोध झाला हें खरें आहे, पण त्या विरोधांत तात्त्विक अर्थ कांहीहि नव्हता. ब्रिटिश रियासतींतील भारतीय, अभारतीय याबाबत विचार करतांना ही वस्तुस्थिति

---

१ अभिरुचि, १९४८ दिवाळी अंक, पृ. ३९३. लेख-लक्ष्मणशास्त्री जोशी.

लक्षांत घेणें आवश्यक आहे. भारतीय संस्कृतीच्या ब्रि. पूर्व (निकटवर्ति) कालखंडांत जगाला देण्यासारखें कांहीच नव्हतें. उलटपक्षी येथलें जीवन हें इतकें मागासलेलें होतें की, इतरांपासून नवनवीन गोष्टी घेऊन येथील जीवनाची समृद्धि व कस वाढविणें आवश्यक होतें. ती गोष्ट ब्रि. राजवटींत झालेली आहे.

अत्यंत महत्त्वाचे विचार व अत्यंत महत्त्वाच्या कल्पना ह्या सार्वजनिक स्वीकाराच्या दृष्टीने राष्ट्रभेदातीत असतात, असावयास हव्यात. अलीकडील विज्ञानप्रगतीमुळे अशा कल्पनांची सार्वदेशिकता फारच वाढली आहे. वैज्ञानिक शोध हे कोणत्याहि राष्ट्रांतील व्यक्तीने लावलेले असले तरी ते सर्व जगास ते विचार (आपपरभाव) न करतां घ्यावे लागतात. तें घेणेंच इष्ट असतें. उदा.—दशकपद्धति ही 'भारतीय' आहे. (मुळांत) पण सर्व जगांत ती सर्वमान्य आहे. कोणत्याहि देशाच्या मनांत ती परकी आहे म्हणून त्याज्य असें येत नाही. आलें तर तें त्यालाच गैरसोयीचें होणार आहे. वर्षगणनापद्धतीच्या बाबतींत असेंच म्हणतां येईल. वैज्ञानिक सुखसोयी यंत्रें इ. चा या संबंधांत उल्लेख करतां येईल.

या वैज्ञानिक व इतर दृष्टींनी महत्त्वाच्या असणाऱ्या गोष्टींत कांही सामाजिक विचार बसतात. आजच्या कालांत ते सर्वमान्य झालेले आहेत. आपण यापुढे ते केवळ ब्रिटिशांनी आणले म्हणून टाकूं शकत नाही. अशा प्रमुख विचारांत, स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, बुद्धिवाद व लोकशाही हे होय. या सर्वांच्या मुळाशीं व्यक्ति व तिचें स्वातंत्र्य हा विचार आहे. या सर्व नवविचारांचा परिचय आपणांस ब्रिटिशांनी करून दिलेला आहे. या पांचहि व त्यांच्या मुळाशी असणाऱ्या सहाव्या व्यक्तिवादाच्या विचारास पूर्व ब्रिटिश कालांतील विचारधनांत स्थान नाही. तेव्हां हे आपणांस पूर्णपणें परके असणारे व ब्रिटिशांनीच त्यांचा परिचय करून दिला म्हणून 'परकीय' ठरणारे विचार आपण यापुढच्या कालांत ते परकी आहेत म्हणून टाकूं शकतों काय, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. स्त्रीविषयक निरनिराळ्या सुधारणांच्या कल्पनेच्या मुळांशीं यापैकी एक वा अनेक विचार आहेत हें लक्षांत घेणें आवश्यक आहे.

सामाजिक व राजकीय दृष्टीने पाहतां ह्या सर्व विचारांचा आपण स्वीकार केला आहे. आपली राज्यघटना पूर्णपणें लोकशाही स्वरूपाची (लोकसभात्मक) आहे, व तिच्या व्यक्तिगत हक्कांत स्वातंत्र्य, समतादि मूल्यांचा समावेश केला आहे. याचा अर्थ या विचारांतील परकेपण संपलें. ते विचार आता आपले झाले. स्त्रीजीवनविषयक विविध प्रश्नांच्या विवेचनाच्या वेळीं भारतीय, अभारतीय असा विचार केला नाही याचें कारण ही आतां विशद केलेली वस्तुस्थिति होय.

तथापि, अनुकरणशीलतेचा आक्षेप हा शिल्लक राहतो. परकीय राजवट असेपर्यंत पुष्कळशा गोष्टी येथल्या परिस्थितीचा विचार न करतां केवळ अनुकरणाने आल्या असतील. येथल्या जीवनाच्या व परिस्थितीच्या दृष्टीने त्यांची आवश्यकता कांही नसेलहि. त्या अर्थाने सर्वच बारीक सारीक गोष्टींचें, लकबांचें, विचारांचें असें अपरिहार्यत्वाचें कारण देऊन समर्थन करतां येत नाही. व्यक्तिस्वातंत्र्य हा श्रेष्ठ विचार असला तरी जोंपर्यंतं आपल्या देशांत बहुसंख्य व्यक्ति अज्ञानी आहेत तोंपर्यंत त्या स्वातंत्र्याचें त्यांना काय होय, असा युक्तिवाद करतां येतो, केला जातो. स्त्रीविषयक विविध सुधारणांना ह्या मुद्यावर विरोध झाला आहे. वामनराव जोशी यांनीहि एका भाषणांत स्त्रियांना हक्कासाठीं झगडण्यापेक्षां आपली पात्रता वाढविण्याचा यत्न करा असें सांगितलें आहे. याचाच अर्थ योग्य परिस्थिति निर्माण होण्यापूर्वी अनुकरणाच्या प्रेमाने कांहीं गोष्टी अगोदर येत असतात. जोंपर्यंत 'परिस्थिति' निर्माण होत नाही, तोंपर्यंत त्या परकीय म्हणून दूर ठेवणें योग्य.

हा युक्तिवाद वरवर पाहिलें असतां समर्पक वाटतो; पण बारकाईने पाहिलें असतां तो फारसा समर्पक नाही असें आढळून येतें. परिस्थिति योग्य ती निर्माण झाल्याविना त्या विचारांचें आकलन होऊं शकत नाही. तेव्हा अनुकरण हें महत्त्वाचें वाटलें तरी योग्य परिस्थिति निर्माण झाल्याविना तें अनुकरण करण्याची बुद्धीच होत नाही. अशीं किती तरी साहित्यांतील व इतरहि उदाहरणें दिसून येतील. सर्वसाधारण लोकांस जो विचार 'नवा'

वाटतो तो त्यांना परिस्थितींचें योग्य तें आकलन होत नाही म्हणून. जे प्रज्ञावंत वा बुद्धिमान् असतात त्यांना परिस्थितीचें निदान होतें, व योग्य विचाराच्या शोधांत असतां त्यांना अगोदर रूढ असलेला विचार स्वीकारणीय वाटतो. विज्ञानविषयक शोधांच्या बाबतींतहि असेंच म्हणतां येतें. दोन-अडीच हजार वर्षांपूर्वी आजच्यासारखे बरेच क्रांतिकारक (की जे पुढे तसे ठरले) शोध निरनिराळ्या देशांत लागले होते. अशा शोधांनी त्या वेळीं काडीचीहि क्रांतिकारक परिस्थिति निर्माण केली नाही. उलट, योग्य परिस्थितींत ते लागल्याबरोबर त्यांनी नवी अशी वैज्ञानिक संस्कृति आज निर्माण केली आहे. (अशा अनेक शोधांची जंत्री प्रो. माटे यांच्या ' विज्ञानबोधाच्या प्रस्तावनें ' त आली आहे, व तेथे हाच विचार मांडला आहे.)

परकीयत्वाचा आक्षेप ज्या सांस्कृतिक राष्ट्रवादी विचारवंतांकडून प्रामुख्याने केला जातो, त्या सांस्कृतिक राष्ट्रवादी विचारवंतांना जो राष्ट्रवाद प्रिय आहे, तो राष्ट्रवाद तरी अस्सल ' भारतीय ' अशी विचारसरणी आहे काय ? तर तशी ती नाही असें आढळून येईल. तेव्हा राष्ट्राभिमान हा विचारच मुळी परका आहे हें लक्षांत घेतलें तर, स्वकीय, परकीय हा भेदाभेद करणें हें किती नाजूक व वैचारिक दृष्ट्या धोक्याचें काम आहे याची कल्पना येऊं शकेल. राष्ट्रवादी विचारसुद्धा ब्रिटिशांच्या राजवटीचीं साठसत्तर वर्षें झाल्यानंतर आलेला आहे. याचाच अर्थ त्या कालांत त्या विचाराला अनुकूल अशी परिस्थिति निर्माण होत होती. अनुकरण करावयाचें झालें तरी तें कशाचें करावयाचें हें ठरवितांना ज्या समाजास तें पटावें असें वाटत असतें त्या समाजास खरोखर तें तसें पटेल किंवा नाही याबद्दल विचार करावा लागतो. तसा विचार योग्य दिशेने झाला तरच तें अनुकरण योग्य वा पोषक ठरतें. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या वेळीं इंग्लंडांत वर्ड्स्वर्थ, शेले, कीट्स इ. कवि; रस्किन, ऑर्नोल्ड, इ. टीकाकार; टेनिसन, ब्राउनिंग इ. जवळ जवळ समकालीन कवि असे विविध लेखक प्रसिद्धीस आले होते. पण चिपळूणकरांना त्यापेक्षा जुने असे ॲडिसन, डॉ. जॉन्सन इ. लेखकच

अनुकरणीय वाटले. कारण महाराष्ट्रीय व भारतीय समाजाची प्रगति ही तेथपर्यंतच झालेली होती. इंग्रजीचा अभ्यास जरी विद्यापीठांतून इ. होत असला, तरी शेक्स्पिअर आदि ग्रंथकारांकडेच अधिक लक्ष खिळलेलें होतें. कारण शेक्स्पिअर हा पुनरुज्जीवनाच्या काळचा व प्रवृत्तीचा ग्रंथकार, त्या (पुनरुज्जीवनवादी) मनोवृत्तींत असणाऱ्या भारतीय नवशिक्षितांना शेक्स्-पिअरचें प्रलोभन अतिशय वाटणें साहजिक होतें. आगरकरांनी जो बुद्धिवाद पुरस्कारला तो अधिकाधिक नवा विचार होता. त्यांचे मिल्ल व स्पेन्सर यांच्या व्यक्तिवादाचें समर्थन हेंहि तसेंच नवें होतें. बहुसंख्य लोकांना (सुशि-क्षितांना) तें झेंपणें कठीण होतें. त्यामुळे आगरकरांना लोकप्रियता लाभली नाही. पण याचा अर्थ आगरकरांचे विचार ही परक्यांची अनावश्यक उसन-वारी असें नव्हे. आगरकरांसारखा बुद्धिमंत मनुष्य ह्या समाजाला काय हवें हें चटकन् ओळखता झाला. त्याने (समाजाने) त्याप्रमाणे व्यक्तिवादाचा स्वीकार करावा अशी आगरकरांची मनीषा होती. अर्थात् ती कालोचित होती असेंच म्हणावें लागेल. त्याचप्रमाणे पहिल्या युद्धानंतर आपणांकडे रविकिरणमंडळाचा कालखंड सुरू झाला. त्या काव्याची धर्ती शंभर वर्षां-पूर्वी होऊन गेलेल्या वर्ड्स्वर्थ, शेले इ. कवींनी घालून दिली होती. तत्का-लीन समकालीन इंग्रज कवींचें काव्य हें रविकिरणमंडळाच्या संप्रदायाच्या कवींना अनुकरणीय वाटलें नाही. कारण सामाजिक परिस्थितींत तशी बीजेंच नव्हतीं. पहिल्या महायुद्धानंतर इंग्लंडांत झालेल्या काव्याच्या धर्तीवर दुसरें महायुद्ध संपतां संपतां मराठी काव्य (जें आजकाल नवकाव्य या नांवाने ओळखलें जातें) होऊं लागलें. कारण पहिल्या महायुद्धानंतर इंग्लंडांत जी परिस्थिति होती ती दुसऱ्या महायुद्धानंतर इकडे अनुभवास येऊं लागली. एकोणिसाव्या शतकांत इंग्लंडांत गाजलेला कलावादी संप्रदाय १९३० नंतर इकडे येण्याची परिस्थिति निर्माण झाली. या सर्व उदाहरणांवरून एक गोष्ट स्पष्ट होईल की, श्रेष्ठ साहित्यांत वा श्रेष्ठ कलेंत अनुकरणमूलकता थोडी असते. वरवर पाहिलें असतां अनुकरणमूलकता वाटते; पण बारकाईने पाहतां

तींत परिस्थितिसापेक्षताहि असते. सुनीत, भावगीत, लघुनिबंध, लघुकथा, नवीन धर्तीचीं एकांकी नाटकें, इ. वाङ्मयप्रकारांचीं उदाहरणें घेतलीं तरी हेंच आढळून येईल की, हे प्रकार इंग्रजी वाङ्मयावरून आले आहेत, हें स्पष्ट आहे. तरी ते लोकप्रिय झाले त्या अर्थी योग्य ती परिस्थिति निर्माण झाली व महान् कलावंतांनी वा ग्रंथकारांनी आपले संस्कार त्यावर उमटविल्यानंतर त्यांच्यातलें भारतीयत्व हेंच जिवंत झालें, व परकीयत्व लोप पावलें.

स्त्रीजीवनविषयक विचारांच्या बाबतींतहि असेंच झालें आहे. स्त्रियांना मिळालेली 'समानता' ही कशी वरवरची आहे. त्या समतेच्या मुळाशी समताप्रधान दृष्टि कशी अभावानेच दिसून येते याचाहि पण उल्लेख मागे केलाच आहे. दृष्टिकोणाच्या बाबतींतहि तसेंच आहे. बहुसंख्य लेखकांचा कवींचा दृष्टिकोण याबाबत अद्याप फारसा बदलला आहे असें म्हणतां येत नाहीं. प्रेमाचें उदाहरण घेतलें तरी हेंच आढळतें. प्रेम ही कल्पना महत्त्वाची खरी. तिचें महत्त्व स्त्री व पुरुष या दोघांच्याहि जीवनांत अपरंपार आहे, ही गोष्ट सर्वसामान्य आधुनिक वृत्तीच्या मनुष्यास संमत आहे असें दिसतें. पण पुरुषाच्या जीवनांत प्रेमभावनेचें महत्त्व व स्त्रीच्या जीवनांत प्रेमभावनेचें महत्त्व याबाबतची आमच्यांतील बहुसंख्य लेखकांची आणि लेखिकांची (कवियित्रींची) कल्पना ही पूर्णपणें 'रोमँटिक' आणि पुरुषी अशीच आहे. ती कल्पना बायरन् या कवीपासून आम्हीं घेतली व त्यानंतर मात्र सबंध ब्रिटिश राजवटींत आतापर्यंत प्रगति नाहीं, ती कल्पना अशी : 'Man's love is of man's life a thing apart, it is woman's whole existence.' प्रेम हा पुरुषाच्या जीवनांतला एक भाग आहे, पण स्त्रीचें तें सर्वस्व आहे ही होय. बायरन्नंतर शेलेनें आपले क्रांतिकारक विचार (प्रेमाविषयीचे) मांडले. 'काव्य' म्हणून त्यांचा परिचयहि झाला, पण अंतरंगाप्रत ते विचार भिडलेच नाहीत. त्याचप्रमाणे शॉनें आपल्या विचारांनीं जबरदस्त धक्के दिले. पण भारतीय मनापर्यंत ते विचार आले आहेत असें वाटत नाही. तीच गोष्ट इब्सेनची. इब्सेनची 'नोरा' अन्यांना निर्मलेल्या स्वरूपांत व रांगणेकरांना

भानुमतीच्या स्वरूपांत चित्रित करावीशी वाटली. पण उपरिनिर्दिष्ट वचनाशी जुळता असा ह्या लेखकांचा स्त्रीजीवनविषयक दृष्टिकोण असल्यानें इब्सेनच्या बाह्यांगांचेंच अनुकरण झालें. या लेखकांना स्त्रीजीवनास आवळणाऱ्या सामाजिक पाशांची कल्पना नाही असें नाही. पण त्यांच्या दृष्टिकोणांत मूलभूत दृष्ट्या क्रांतिकारकता असावयास हवी ती नाही. हा दोष नसेलहि, पण सामाजिक अवस्थेच्या निदर्शक अशा या घटना आहेत.

ब्रिटिश राजवटींत केवळ अनुकरणात्मकच वाङ्मय निर्माण झालें, या विचाराच्या अगदीं विरुद्ध अशी ही बाजू आहे कीं ब्रिटिशांच्या खऱ्या चांगल्या गोष्टींचें अनुकरण झालेंच नाहीं. भारतीय जनतेने जो व्यक्तिवादी विचार आत्मसात् केला, त्या विचारांतहि ह्या वस्तुस्थितीमुळे अनेक वैगुण्यें शिरलीं आहेत. त्यांचें विवेचन पुढें येणार आहेच. ब्रिटिश राजवटीने आणलेल्या बुद्धिवादाचा स्वीकार यापुढे अधिक कटाक्षानें व्हावयास हवा. सामाजिक जीवनाची ती महत्त्वाची निष्ठा व्हावयास हवी. 'स्वकीय', 'परकीय' ह्या भेदाच्या पलीकडे जाऊन तिचा अंगीकार करावयास हवा. ब्रिटिश राजवटींत ती रुजली नाहीं; आणि विविध अनुकरणाच्या कक्षेंत ती येऊं शकली नाहीं, हें नमूद करून ठेवणें आवश्यक आहे.

उलट दृष्टीने पाहतां, ज्या अनुकरणाचा एवढा बाऊ केला जात होता, तें अनुकरण खरोखर केवळ बाह्यांगाचें होतें असें प्रत्ययास येईल. यापेक्षा अधिक मूलग्राही दृष्टीने विचारांचें अवलंबन वा परीक्षण व्हावयास हवें होतें तितकें तें झालें नाहीं व त्यामुळें ब्रिटिश विचारांचें खरें आत्मसातीकरण आपणाकडून झालेंच नाहीं असें म्हणतां येतें. मिल्लसारख्या विचारवंतांच्या विचारांतील गाभा आगरकरांनीं नीट हेरून मांडला; पण पुढे समाजवादी विचारापर्यंत जी वैचारिक प्रगति ब्रिटिश समाजाने केली, ती समाजवादी विचार इकडे येईपर्यंत समाजाच्या लक्षांत आलीच नाहीं. ब्रिटिश वैचारिक जीवनांतील उदारवाद (लिबरॅलिझम्) या एकाच विचारधारेचें मोठेंपण राज्यकर्ते अधिकृतरीत्या पुरस्कारीत होते. त्याचाच शिक्षणांत इ. अवलंब

केला जात होता. त्यामुळे बहुसंख्य विद्यापीठीय पंडित हे उदारमतवादीच राहिले. भारतीय घटनेवर या विचाराचा पडसाद उमटला आहे याचें कारण ती घटना याच लोकांनीं तयार केली आहे.

अशा उपेक्षेचें एक ठळठळीत उदाहरण म्हणजे बुद्धिवादाबाबतची उदासीनता. आधुनिक वैज्ञानिकच नव्हे, तर राजकीय, सामाजिक विचार हे बुद्धिवादावर आधारलेले असतात. बुद्धिवाद ही एक अत्यंत महत्त्वाची प्रणाली आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांनीं ती भारतीय जीवनांत आणली, पण तिचा पाठपुरावा केला नाहीं. राज्यकर्त्यांच्या परकेपणाने त्यांना याबाबत आग्रह धरावासा वाटला नाहीं. ब्रिटिशांचें अनुकरण केवळ वरपांगी होतें याचें हें एक उत्कृष्ट गमक आहे. ब्रिटिश राज्य आलें नि गेलें, पण बुद्धिवाद ही भारतीय समाजाची विचारनिष्ठा अद्यापहि झालेली नाहीं. ती तशी होण्यास अद्याप कित्येकांचा विरोध दिसतो. या ठिकाणीं बुद्धिवादाचें महत्त्व पटवावयाचें नाहीं. पण ब्रिटिश राजवटींत व नंतरहि त्या प्रवृत्तीकडे दुर्लक्ष झालें आहे. अनुकरणशीलतेच्या कक्षेंतहि ती प्रवृत्ति आली नाहीं, ह्या वस्तुस्थितीकडे अंगुलिनिर्देश करावयाचा होता.

त्याप्रमाणे राष्ट्रवादी विचारांची पण चिकित्सक पाहणी थोड्याशा अपवादात्मक रीतीने झाली. समाजवादी विचारधारा आल्यानंतर राष्ट्रवादाकडे त्या विचारसरणीला अभिप्रेत असणाऱ्या दृष्टिकोणांतूनच पाहिले गेलें. समाजवादी विचाराने समाजाच्या सर्व अंगांकडे चिकित्सेनें पाहण्याचा प्रयत्न केला. पण आताच्या विवेचनाधारें असें म्हणतां येतें कीं, समाजवादाचा स्वीकार हा वरवरचाच आहे. त्यांत वैचारिक एकनिष्ठतेचा (conviction) भाग अल्प आहे. ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या सर्वच गोष्टींच्या अनुकरणाची प्रवृत्ति प्रबल असती तर असें झालें असतें असें म्हणतां येत नाहीं. तेव्हा ब्रिटिश राजवटींत परविचार आले ते परिस्थित्यनुरूप आले हें खरें. पण अधिक बारकाईने पाहतांना विचार न येतां विचारांचीं फोलपटें तेवढीं आलीं. गाभा आला आहे असें वाटत नाही.

श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी आपल्या 'अभिरुचि' * च्या अंकांतील लेखांत म्हणतात तें या दृष्टीनें फार अन्वर्थक आहे. 'गेल्या शतकांत इंग्रजी राज्यांतील सुधारणेच्या प्रयत्नाने धार्मिक व सामाजिक विचारांची व आचारांची दिशा बदलली. परंतु ही सुधारणेची प्रवृत्ति अत्यंत उथळ आहे. हिंदी समाजाच्या खोल अंतरंगाचा ठाव हिने घेतला आहे असें दिसत नाही... पांढरपेशे लोक वरून सुधारलेले दिसतात, परंतु त्यांच्या गृहसंस्थेंत शिरल्याबरोबर त्यांच्यांतील पुरातन रूढीच्या काळ्या व वृद्ध पुरुषांचें स्वरूप निर्माण होऊन एकदम भय निर्माण होतें...हिंदी समाजाला व हिंदु समाजाला भविष्यकाळावर विजय मिळवून देणाऱ्या शुभ, उदार व मानव्यपूर्ण भावनांची विशाल संपदा अजून लाभली नाही. इंग्रजी राज्य व त्यांतील सुधारकांची परंपरा यांनी फार थोडे दिलें आहे...विशाल व सामर्थ्यशाली वैचारिक क्रांति घडविणारें नेतृत्व अजून निर्माण व्हावयाचें आहे.' एका बाजूने अनुकरणशील प्रवृत्तीचा आरोप केला जातो तो किती अयोग्य आहे व त्याच्या अगदीं उलट परिस्थिति कशी प्रत्यक्षांत आहे हें वरील उताऱ्यावरून स्पष्ट दिसून येईल. इंग्रजी लोकशाहीचा आत्मा आम्हीं मान्य केला नाही. इंग्रजांच्या समाजपद्धतींतील कांही अंगांचें बाह्यानुकरण आम्हीं केलें. पण अंतरंग रितेंच आहे. समाजवादी विचार आपल्या पद्धतीनें समाजाच्या गळीं उतरविणारी 'फेबिअन सोसायटी' इंग्लंडांत झाली. उलटपक्षीं, त्या विचाराचा प्रसार येथे राजकीय चळवळीच्या पुरस्कर्त्यांनीं केला आहे. तो अर्थात् अगदी वरवरचा आहे. त्याचा अद्याप अधिक चिकित्सापूर्वक अंगीकार व्हावयाचा आहे.

उलटपक्षीं, नव्या विचारांकडे साशंकतेनें पाहण्याची प्रवृत्ति मात्र बरीच प्रबल आहे. उद्धारकवादी विचारांच्या लोकांनीं जुन्या विचारांस उलट आपल्या 'शास्त्रीयते'ने नवे अधिष्ठान दिले. डॉ. केतकर, इतिहासाचार्य

* 'अभिरुचि' १९४८ चा दिवाळी अंक, 'गोऱ्यांच्या सावलींतील महाराष्ट्र' अंक, लक्ष्मणशास्त्री जोशी, पृ. ४०२.

राजवाडे यांच्या विचारांचा परिणाम हा अशी उदासीनवृत्ति पोसण्यांत मात्र झाला आहे.

साहित्यांतहि तसेंच आहे. अत्र्यांची निर्मला, रांगणेकरांची भानुमति ह्या अशा अर्धवट स्वीकाराच्याच प्रतिनिधि आहेत. परकीय संस्कृतीचें खरें मोठेंपण अद्याप आकलनाच्या बाहेरच आहे.

अशा प्रकारें स्त्रियांच्या जीविताशीं संबंधित असलेल्या प्रश्नांतील 'भारतीयता' व 'अभारतीयता' यांचें प्रमाण काय या प्रश्नाचा विचार करूं लागलों असतां असें आढळून येईल की, त्रि. राजवटीने व्यक्तिस्वातंत्र्यादि जीं चार पांच मूल्यें दिलीं तीं परकीय आहेत. पण तीं सर्व समाजास स्वीकार्य आहेत. समाजाने तीं स्वीकारली तशीं स्त्रियांनी व स्त्रियांच्या कैवाऱ्यांनीहि तीं स्वीकारलीं आहेत. त्यांत अयोग्य असें कांहीहि नाही. पण त्या मूल्यांचें जें अवलंबन (ॲप्लिकेशन) झालें आहे तें मात्र येथील परिस्थितीला पोषक व ती विचारांत घेऊनच झालेलें आहे. त्यांत केवळ अनुकरणाचा भाग एकंदरीने कमी आहे व तो विशेष महत्त्वाचाहि नाही.

: ४ :

आतापर्यंत ह्या समालोचनांत प्रबंधांतील विवेचनाच्या दृष्टीने जे महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले होते, त्यांची चिकित्सा केली. त्याप्रमाणेंच स्त्री-जीवनविषयक जे विविध प्रश्न कालप्रवाहाबरोबर निर्माण झाले त्यांचें पण विहंगमावलोकन केलें. आतां या ठिकाणीं सबंध प्रबंधाचा समारोप करावयाचा.

हा समारोप करतांना एका गोष्टीचा पुनरुल्लेख करावा लागणार आहे. या प्रबंधांत या परकीय राजवटीच्या कालखंडांत महाराष्ट्रीय (वा भारतीय) स्त्रीने व्यक्तिवादाचा स्वीकार केला, ही गोष्ट विविध उल्लेखांनी विशद केली आहे. व्यक्तिवादाचा स्वीकार ही एक प्रक्रिया आहे. तिची बौद्धिक, आंत-

रिक, नैतिक इ. विविध अंगें आहेत. या सर्व अंगांचा साहित्याशी निकटवर्ति संबंध आहे, व म्हणून साहित्यांतल्या चित्रणांतल्या वा चर्चेच्या आधारें ही प्रक्रिया कशी घडत होती ह्या गोष्टीची पाहणी करावयाची होती, व ती येथे यथानुशक्ति केली आहे.

व्यक्तित्वाच्या भावनेचा स्वीकार ही स्त्रीजीवनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची घटना आहे. परकीय राजवटींत ती घडली तरी ती परकीय अतएव त्याज्य आहे असें समजण्याचें कारण नाही. भारतीय राज्यघटनेप्रमाणे समान संधि (equality of opportunity) व समत्वाधिकार (rights of equality) ह्या दोन गोष्टी 'हक्कांत' मान्य केलेल्या आहेत. याचा अर्थ स्त्रीस स्त्री म्हणून यापुढे कोणत्याहि क्षेत्रांत मज्जाव नाही. पण अद्याप आर्थिक व नैतिक क्षेत्रांत ही समत्वभावना प्रस्थापित व्हावयाची आहे. कार्यक्षेत्रें व ध्येयें हीं स्त्री-पुरुष यांस समान झालीं ही फार मोठी गोष्ट या राजवटींत पार पडली.

व्यक्तीविषयीं थोडा खुलासा करणें आवश्यक आहे. या ठिकाणीं जें व्यक्तित्व अध्याहृत धरलें आहे तें आत्माभिमुख व्यक्तित्व नाही, तर समाजाभिमुख व्यक्तित्व होय. मानवतेच्या ध्येयाप्रत जाण्याची व्यक्तित्व जाणीव ही एक महत्त्वाची पायरी आहे. व्यक्तित्वजाणीवशून्य असें कांही सामाजिक साकल्य असेल असें मानणें चूक आहे. समाजाचें कल्याण हें महत्त्वाचें असलें तरी तें व्यक्तित्व जाणीव असणाऱ्या व्यक्तींनीच करावयाचें आहे; गुलामांनी नव्हे. व्यक्तित्व जाणीव नसेल तर समाजाची मानवतेप्रत उडीच जाणार नाही. भारतीय धर्मनीति कल्पनांनी व्यक्तीला कर्तव्यतत्परतेचें महत्त्व पटविलें आहे. पण तें व्यक्तित्वशून्य आहे. व्यक्तित्वाधिष्ठित तें हवें. हें व्यक्तित्व निर्माण होण्याची जी प्रक्रिया लेखकाला विचार दृष्ट्या दृग्गोचर झाली ती येथे स्पष्ट केली आहे.

यापुढे स्त्रीचें कार्यक्षेत्र व्यापक झालें पाहिजे. याचा अर्थ कौटुंबिक जीवनांत तिला स्थान राहाणार नाही; वा आहे तें कमी होणार असें नव्हे.

यापुढचें कुटुंब वा 'घर' हें एकट्या स्त्रीचें राहणार नाही. तें स्त्री व पुरुष या दोघांचें राहणार आहे. व्यक्तिगत कर्तव्यांत कौटुंबिक कर्तव्यांचा समावेश होणार आहे.

स्त्रीच्या दृष्टीने महत्त्वाची भावना म्हणजे मातृत्वाची, व त्या घटनेच्या अनुषंगाने आलेल्या इतर जबाबदाऱ्या या बाबतींत स्त्रीची प्राथमिक जबाबदारी मान्य केली तरी तिच्या मदतीसाठी राज्यसंस्थेने या बाबतींत अधिकाधिक पुढें यावयास हवें. प्रसूति, संगोपन व शिशुशिक्षण हीं राष्ट्रीय महत्त्वाचीं कार्यें आहेत. त्या बाबतींत भांडवली देशांत राज्यसंस्था सामान्यतः दुर्लक्ष करते; पण तसें होऊं देतां उपयोगी नाही.

मुलांवरचे खरे संस्कार यापुढे कुटुंबाचे नाहीत, तर राष्ट्राचे व मानवतेचे. आदर्श माता अत्यंत तत्परतेने तें काम करूं शकेल. आजपर्यंत तिची जबाबदारी व कक्षा स्वतःच्या कुटुंबापुरतीच होती. यापुढे ती कक्षा राष्ट्र व मानवता या क्षेत्रांइतकी व्यापक झाली आहे. अशा प्रकारे स्त्री व पुरुष यांस एकमेकांच्या आशा, आकांक्षा, ध्येयें, व्यक्तित्व इत्यादींची पूर्ण ओळख असणें, व त्या ओळखीच्या आधारावर उभारलेलें व समाजाभिमुख असणारें सहकार्य हें यापुढें खरें महत्त्वाचें सहकार्य ठरणार आहे.

साहित्यिकांनीहि इतक्या व्यापक दृष्टीने स्त्री व पुरुष यांचीं जीवनें हेरून त्यांच्यांतलें मानव्य फुलेल, जागृत होईल व मानव्याची खरी समृद्धता निर्माण करील अशा दृष्टीने तीं रंगवावींत. स्वातंत्र्याच्या पवित्र व उज्ज्वल वातावरणांत नव्या दृष्टीचा लाभ झालेल्या साहित्यिकांना त्यांत अशक्य तें काय आहे?

व्यक्तित्वाची जाणीव ही समाजजीवनाची व व्यक्तिजीवनाची प्रेरणा आहे. यापुढच्या काळांतलें मानवी कर्तृत्व हें त्या भावनेवरच आधारलें जाणार आहे. भारतीय जीवनांत ही व्यक्तिभावना ब्रिटिश राज्यकर्त्यांनी प्रविष्ट केली. ब्रिटिश कालांत सांस्कृतिक वा नैतिक विचारक्षेत्रांत व्यक्ति-

भावनेकडे संकुचितपणाने पाहिलें जात असे. किंबहुना तिचें अस्तित्व ध्यानांतच घेतलें जात नसे. व्यक्तीने आपल्या व्यक्तिगत भावनाविचारांस असा घाट द्यावा की स्वतः समाजविचाराशीं एकरूप व्हावें. व्यक्तिभावनेची कदर बाळगूं नये. हा विचार पुढे पुढे फारच प्रबळ होत गेला. त्याचा परिणाम असा झाला की, समाजाच्या व व्यक्तीच्या कर्तृत्वास आवाहनच पोचेनासें झालें. ब्रि. राज्यकर्त्यांनी जी लोकशाही पद्धति विचारदृष्ट्या आपल्या कारकीर्दीत लोकांपुढे मांडली ती अशा प्रकारें व्यक्तित्वाधिष्ठित होती. त्यांतल्या त्यांत पुरुषापेक्षा स्त्रीच्या ठायीं व्यक्तित्वाची जाणीव निर्माण होण्याची क्रिया अधिक गुंतागुंतीची अवघड होती. ब्रि. राजवटीच्या शेवटीं अगदीं अल्प प्रमाणांत भारतीय स्त्रीच्या ठायीं ती निर्माण झाली. पण किती प्रमाणांत झाली ह्यापेक्षा ती झाली हाच विचार महत्त्वाचा आहे. ती जाणीव कसकशी होत होती ह्याचें विवेचन ह्या प्रबंधांत प्रामुख्याने करावयाचें होतें.

या व्यक्तित्वाच्या जाणीवेबाबत आणखीहि थोडें इशारेवजा लिहिणें आवश्यक आहे. व्यक्तित्व जाणीवशून्य असें जीवन यापुढील कालांत महत्त्वाचें गणलें जाणार नाहीं. तथापि, व्यक्तित्वाची जाणीव ही एक जीवनसाफल्याची (व्यक्तिगत अगर सामाजिक) एक महत्त्वाची पायरी आहे हें विसरतां कामा नये. ब्रिटिश राजवटींत झालेल्या व्यक्तिजाणीवेचें जर कोणतें मोठें वैगुण्य असेल तर तें हेंच कीं, या व्यक्तिजाणीवेला जें प्रगमनशील वळण लावावयास हवें होतें तें लावण्यांत परकीय राज्यकर्ते पूर्णपणें अयशस्वी ठरले. खरें कारण म्हणजे ते या बाबतींत पूर्णतया उदासीनच होते. तेंच (उदासीनतेचें) धोरण त्यांना योग्य वाटल्यास नवल नाही. पण ब्रिटिश राजवटीच्या समाप्तीनंतर त्या राजवटीने भारतीय जीवनांत हें जें नवें मूल्य आणून प्रविष्ट केलें, व भारतीय जनतेने त्याचा अंगीकार करून आपलें यापुढचें जीवन त्या मूल्यावर आधारण्याचा संकल्प सोडला असें दिसतें, त्या मूल्याची विचिकित्सक पाहणी करून त्याचा स्वीकार करणें योग्य होईल. त्याची पाहणी करतांना आजच्या साहित्यांतील प्रमुख प्रवृत्तींचा पण त्यायोगें उलगडा होईल.

नवजागृत व्यक्तित्वापुढे कोणतेंहि ध्येय ठसठशीतपणें ब्रिटिश राजवटींत ठेविलें गेलें नाहीं. त्या योगें या व्यक्तित्वजाणीवेच्या समाजाच्या वैचारिक जीवनावर तीनचार प्रकारच्या प्रतिक्रिया झाल्या आहेत. आज त्यांचें स्वरूप अधिक स्पष्टतया दृग्गोचर होत आहे. या प्रतिक्रियांपैकी सामाजिक वा व्यक्तिगत दृष्ट्या कोणती इष्ट, अनिष्ट याचा पण उलगडा होईल.

ह्या प्रतिक्रियांपैकी अगदी पहिली व सर्वांत असामाजिक अशी प्रतिक्रिया म्हणजे सुखवादाचा अंगीकार ही होय. व्यक्तीला स्वतःच्या व्यक्तिवैशिष्ट्यान्ची जाणीव झाल्यानंतर व्यक्ति ही स्वतःकडे अतीव आत्मीयतेच्या भावनेने पाहते. त्याचा एक परिपाक म्हणजे ती सुखवादाचा अंगीकार करते. आजच्या समाजांत ही सुखवादी प्रवृत्ति ही प्रभावीपणें दृग्गोचर होते. त्या प्रवृत्तीचें साहित्यांतहि प्रतिबिंब पडलें आहे. प्रमुख लोकप्रिय लेखक व कादंबरीकार प्रो. ना. सी. फडके हे एक सुखवादी प्रवृत्तीचे प्रातिनिधिक असे कादंबरीकार आहेत. त्यांचा सुखवाद हा पूर्णपणें स्वैराचारवाद नसेल, पण तो फारसा समाजाभिमुख नाही. प्रो. फडक्यांचें जें समाजजीवन व साहित्य यांचा परस्परसंबंध कसा आहे याबाबतचें दिग्दर्शन मधून मधून होतें, त्यांत समाजजीवनापासून साहित्याला वेगळें काढण्याचा उपक्रम होतो. त्याच्या मुळाशीं जी प्रवृत्ति आहे ती सुखवादाकडे झुकणारी अशी आहे.

आज जें कामविषयक उत्तान भावना चेतविणारें असें लिखाण अधिक प्रमाणांत प्रसृत होत आहे, तें अतिशय लोकप्रियहि आहे असें म्हणतात. ती लोकप्रियता या सुखवादाच्या स्वीकाराची निदर्शक आहे. ही अत्यंत असामाजिक अशी प्रवृत्ति आहे. सुखवाद व त्याच्यावर आधारलेला स्वैराचार हा कोणत्याहि परिस्थितींत समर्थनकारक असेल असें वाटत नाही. या प्रवृत्तीच्या आधारें चित्रिलेलें स्त्रीजीवन हें अतिशय विद्रूप असतें. त्यांत केवळ भोगपरतेला आवाहन केलेलें असतें. व्यक्तिवादाच्या अर्धवट स्वीकाराची एक निदर्शक अशी ही प्रवृत्ति आहे. ती असामाजिक आहे. तिच्या अंगीकाराने जीवनाच्या अगर कलेच्या कोणत्याहि क्षेत्रांत विधायक असें कर्तृत्व वाढीला

लागणार नाही. यासाठी लेखकांनी ह्या प्रतिक्रियेचा विचार करावयास हवा, परित्याग करावयास हवा.

व्यक्तिवादाच्या स्वीकाराची–अर्धवट स्वीकाराची–आणखी एक प्रतिक्रिया म्हणजे स्वप्नाळू वृत्ति. वास्तविक ही स्वप्नाळू वृत्ति हा वरच्या सुखवादी प्रवृत्तीचाच एक अविभाज्य घटक आहे. सुखवादी प्रवृत्तीचा अंगीकार करणारी व्यक्ति ही जीवनाच्या वास्तव अंगांकडे–विशेषतः दुःखांकडे–जाणून बुजून दुर्लक्ष करते. ह्या दुर्लक्षामुळे पुढे पुढे जीवनाचें वास्तवदर्शन घेण्याची कुवतच तिच्यांत राहात नाही. अशी व्यक्ति स्वप्नाळू बनते. इतिहास वा पुराण कालांतील स्वप्नमय जीवनाचें तिला आकर्षण वाटतें. वास्तवाचा नांवाला आधार घेऊन अतृप्त लालसा अद्‌भुतरम्यतेच्या नांवाखालीं पूर्ण करून घेणें हें चालू असतें. मराठींत अशा प्रवृत्तीचे प्रमुख प्रातिनिधिक लेखक म्हणजे माडखोलकर हे होत. त्यांच्या वाङ्मयांत संस्कृत साहित्याला शोभतील असे जे प्रसंग आहेत त्यांचें मूळ ह्या प्रवृत्तींत आहे. ही स्वप्नाळू प्रवृत्ति अर्थातच व्यक्तिवादाच्या अर्धवट स्वीकाराचें प्रतीक होय. सुखवादी प्रवृत्ति व व्यक्तिवादी प्रवृत्ति यांच्या सामाजिक परिणामांत विशेषसा फरक नाही. कित्येकांना आपल्या स्वभावधर्माप्रमाणे या प्रवृत्तीला सौंदर्याभिमुखतेचें आवरण देतां येतें. सौंदर्यवादाचा अतिरिक्त अंगीकार ही एक जीवनविन्मुखतेची खूण आहे.

व्यक्तिवादाच्या अर्धवट अंगीकाराच्या ह्या दोन असामाजिक अशा प्रतिक्रिया होत. ब्रि. राजवर्टींत आपण जो व्यक्तित्वाचा जाणतां व अजाणतां स्वीकार केला त्याचा एक परिणाम म्हणून ह्या प्रवृत्तिसुद्धा आपल्या जीवनांत व वाङ्मयांत प्रभावी आहेत. त्यांचा उत्कर्ष होतो का अपकर्ष होतो यावर यापुढे आपण व्यक्तिवादाचा स्वीकार कसा केला तें ठरणार आहे.

व्यक्तित्वाच्या स्वीकाराची अधिक सूक्ष्म दिसणारी प्रतिक्रिया म्हणजे आत्मकेंद्रित्वाची प्रवृत्ति होय. अर्थात् ही प्रवृत्ति अधिक गूढ अशी आहे. व्यक्ति ही आपणांस समाजाच्या वा विश्वाच्या केंद्रस्थानीं कल्पिते व त्या

भूमिकेंतून जगाकडे पाहून आपल्या प्रतिक्रियांची नोंद करते. रविकिरण मंडळाचे प्रमुख कवि, आजच्या कवयित्रींपैकीं इंदिरा संत यांचा या संबंधांत उल्लेख करतां येईल. ही प्रवृत्ति पहिल्या दोन प्रवृत्तींपेक्षा अधिक जीवनान्वेषी अशी असते. तिच्यांत आत्मकेंद्रित्व असेल, पण तें आत्मकेंद्रित्व हें असामाजिक असतें असें नाही. कवि वा लेखक हा समाजमनाकडे पूर्णतया दुर्लक्ष करतो असें नाही. समाजजीवनाच्या आपल्या मनावर ज्या प्रतिक्रिया होतात त्यांचें आविष्करण आत्मलक्षी भूमिकेवरून हा कलावंत करतो.

अशाप्रकारचें आत्मलक्षित्व हें साहित्याला वा कलेला परिपोषक आहे किंवा नाहीं हा अत्यंत विवाद्य असा प्रश्न आहे. वामनराव जोशांनी आपल्या या विषयावरच्या 'विचारसौंदर्या' तील लेखांत आत्मलक्षित्वाच्या बाजूने कौल दिलेला आहे. ह्या ठिकाणीं ह्या प्रश्नाचें अधिक खोलांत शिरून विवेचन करावयाचें नाही. व्यक्तित्वाच्या स्वीकाराच्या ज्या विविध प्रतिक्रिया आहेत त्यांचें विवेचन करावयाचें आहे.

कलाकृतीचा जन्मच मुळीं आत्माविष्काराच्या रूपाने होतो; आणि कलाकृति म्हणजे कलावंताच्या व्यक्तित्वाचा आविष्कार होय. ह्या दृष्टीने पाहतां ह्या प्रतिक्रियेला तत्त्वतः विरोध करतां येईल असें वाटत नाहीं. तथापि आत्मकेंद्रित्वाचें स्वरूप व्यक्तिप्रवृत्तीप्रमाणे भिन्न असणार, आणि म्हणूनच या प्रवृत्तीच्या आविष्काराची प्रतिक्रिया सुखवादापासून तों तत्त्वज्ञानात्मक गूढवादापर्यंत अशी अनेकविध राहणार. याच कारणामुळे ती नेहमी समर्थनीय नसणार. दुसरें असें कीं, व्यक्ति एकदा आत्मकेंद्रित होऊं लागली की तिला सामाजिक समस्यांचें अवधान रहात नाहीं. आणि त्या दृष्टीने तिच्या कृतीचें सामाजिक महत्त्व कमी होत असणार. त्याप्रमाणे आत्मलक्षित व्यक्तीच्या समाजजीवनावरील या प्रतिक्रिया अत्यंत व्यक्तिगत अशाच राहणार. सामाजिक मार्गदर्शनाला त्यांचा फारसा उपयोग नाहीं.

आजचे बहुसंख्य लेखक–व विशेषतः लेखिका—ह्या वृत्तीचा स्वीकार केलेल्या अशा आहेत. व्यक्तिवादाच्या अंगीकारांतली एक महत्त्वाची पायरी

म्हणून या प्रवृत्तीकडे सहानुभूतीने पाहणें शक्य असलें तरी, साहित्याच्या समाजजीवनाबरोबरच्या विकासाच्या दृष्टीने ही प्रवृत्ति फारशी परिपोषक आहे असें म्हणतां येणार नाही.

या आत्मकेंद्रित्वाचा आणखी एक पर्याय ध्यानांत घेण्यासारखा आहे. व्यक्तिस्वातंत्र्याच्या विचाराच्या पोटीं व्यक्तित्वाची जी जाणीव झाली तिची ही प्रतिक्रिया एक प्रकारच्या सामाजिक संघर्षाचा परिपाक आहे. त्या योगें ही प्रतिक्रिया जरी आत्मलक्षी स्वरूपाची असली, तरी तिचें मूळ हें सामाजिक परिस्थितींत आहे हें लक्षांत धरणें आवश्यक आहे. या प्रतिक्रियेचें दिग्दर्शन म्हणजे वैफल्यवादाचा स्वीकार होय. वैफल्यवादी प्रवृत्ति ही आजच्या सामाजिक व साहित्यक्षेत्रीय प्रवृत्तींपैकी एक महत्त्वाची प्रवृत्ति आहे. वैफल्यतेचें मूळ वास्तविक अपेक्षाभंगांत आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीच्या अपेक्षांची परिपूर्ति होत नाही तेव्हा त्या असफलतेचा परिणाम अशा प्रकारची विफलतावादी वृत्ति निर्माण होण्यांत होतो. ह्या विफलतावादी वृत्तीचीं कारणें मात्र बहुविध आहेत. पहिलें आणि सर्वांत मोठें सामाजिक कारण म्हणजे महायुद्धें होत. आधुनिक कालांत भांडवलशाहीचें युगमान सुरू झालें तेव्हा समता-स्वातंत्र्यादि मूल्यांचा उदय झाला. मध्यम वर्गाने हीं मूल्यें प्रमाण मानलीं. कांही काल असा आभास निर्माण झाला की, मानवी जीवनांत ह्या मूल्यांची कदर केली जाणार व एकंदरीने मानवी जीविताची नैतिक पातळी उंचावणार. ही अपेक्षा म्हणजे व्यक्तिवादाच्या स्वीकाराच्या पोटीं आलेल्या स्वप्नाळूपणाचें द्योतक होय. मध्यम वर्ग तिचा स्वीकार करतो तसा सर्वत्र त्याने स्वीकार केला. पण दोन महायुद्धांच्या योगाने असा भयानक अनुभव आला की, मानवी जीवनाचीं उच्चतर मूल्यें धुळीस मिळालीं आहेत. अर्थात् विशिष्ट मनोवृत्तींच्या लोकांची दारुण निराशा झाली. त्यांची ही अपेक्षा एक प्रकारच्या स्वप्नाळूपणावर आधारलेली होती, हा उल्लेख आलेलाच आहे. साहजिकपणें या वृत्तीचा स्वीकार करणारांजवळ जगांतील भयानक वास्तवतेकडे डोळे उघडे ठेवून पाहण्याचें धैर्य नव्हतें. अशा परि-

स्थितींत या सर्व लोकांनी विफलतावादाचा स्वीकार केला. एकदां त्यांचा असा मनोभंग झाल्याबरोबर त्यांनी जगाविषयींच्या सर्व अपेक्षा सोडून दिल्या. बहुसंख्य नवकवि व नवलेखक यांच्या मनोवृत्तीवर अशा प्रकारें विफलतावादाची दाट छाया पसरलेली आहे. हा विफलतावाद म्हणजे आत्मकेंद्रित मनाला आलेला निराशेचा झटका होय. अशा लेखकांना सारें जीवन विद्रूप दिसावें वा जीवनांतील विद्रूपता तेवढीच दिसून यावी हें साहजिक होय. नवकाव्यांत वा नवकथेंत प्रतीत होणारी विफलतावादाची पार्श्वभूमि ही अशी आहे. व्यक्तित्वाच्या जाणीवेच्या प्रक्रियेंतील ती एक अवस्था आहे. आज ती प्रामुख्याने दृग्गोचर होत आहे.

ह्या वैफल्यवादी वृत्तीकडे समालोचनात्मक दृष्टीनें पाहण्यापूर्वी या वैफल्यवादाची आणखी एक कारणपरंपरा लक्षांत घेणें आवश्यक आहे. ज्याप्रमाणे आत्मलक्षी व्यक्तीच्या वाट्यास दारुण निराशा येते, त्याप्रमाणेच कधी कधी अत्यंत महान् अशा ध्येयवादाच्या वाट्यासहि ती येते. त्यामुळेहि त्या व्यक्तीच्या मनावर किंचित् काल कां होईना, नैराश्याचा वा वैफल्याचा पगडा पडतो. अशी विफलतावृत्ति ही काव्य-कला यांचा विषय होते. जगांतील प्रसिद्ध दुःखांतिका या अशा प्रकारच्या महान् व्यक्तीला—कलावंताला—आलेल्या निराशाजनक अनुभवांतून जन्म पावल्या आहेत. अशा प्रकारच्या वैफल्यवादी वृत्तीचें मराठींतील सर्वश्रेष्ठ उदाहरण म्हणजे केशवसुतांची 'हरपलें श्रेय' ही कविता होय. या कवितेंत जरी वैफल्याचें गायन असलें तरी ह्या वैफल्याने जो अपेक्षाभंग आहे तो एका फार मोठ्या नैतिक संघर्षाचा परिपाक आहे. म्हणजे कलावंताने आपापल्या परी जगाची नैतिक पातळी उंच व्हावी म्हणून फार साक्षेपाने प्रयत्न केलेला असतो. पण त्याच्या पदरीं शेवटीं दारुण निराशा येते. अर्थात् त्याला संपूर्ण अपयश येतें असें नव्हे, तर यश येतें; पण त्याने दिलेल्या मोलाच्या मानाने तें अल्प असतें व म्हणून 'दिलें हिरण्मय, हातीं मृण्मय। हा हत विनिमय। (हरपलें श्रेय) अशी रुखरुख त्याला टोंचीत असते. उलटपक्षी, पहिल्या प्रकारच्या कलावंताने

जगासंबंधी फक्त अपेक्षाच केलेल्या असतात व त्या भंग पावल्याबरोबर तो जगावर रुष्ट होतो, विफलतावादाचा स्वीकार करतो. ह्या वैफल्याचें स्वरूप अर्थातच रडव्या प्रकारचें असतें. आधुनिक काव्यांत वा साहित्यांत ह्या दोनहि प्रकारची विफलता आहे; व म्हणूनच जें सारें विफलतावादी वाङ्मय आहे तें सारें तिरस्करणीय म्हणतां येत नाही. अधिक बारकाईने पाहूनच त्याची प्रत ठरवावी लागेल.

व्यक्तिवादाच्या स्वीकाराची आणखी एक प्रतिक्रिया या ठिकाणीं उद्धृत करणें आवश्यक आहे. ही प्रतिक्रिया मात्र आत्मकेंद्रित्वाने आलेली नाही. कांही कलावंत हे प्रवृत्तीने आत्मकेंद्री नसतात पण त्यांच्या ठिकाणीं व्यक्तित्वजाणीव निर्माण झाल्यावर त्यांना आपलें व्यक्तित्व कशांत तरी विलीन करावें, कोठे तरी समर्पित करावें असें त्यांना वाटत असतें. त्यांची प्रवृत्ति समाजाभिमुख असल्याने आपल्या प्रकृतिनुरूप ते सामाजिक ध्येय-प्रणालीचें विश्लेषण करतात. त्यांच्या मनोवृत्तींत कुठे तरी स्वप्नाळूपणाचा भाग असतो तो प्रभावी होतो; व असले कलावंत हे भूतकालावर, भूत-कालीन समाजरचना, ध्येय, जीवन यांच्यावर प्रेम करतात. यांचें गुणगान साहित्यांत सुरू होतें. अशा आधुनिक कलावंतांत सावरकर हे श्रेष्ठ आहेत. ही प्रवृत्ति म्हणजे व्यक्तिवादाच्या आविष्काराची एक प्रतिक्रियाच होय. प्रारंभीं ही प्रवृत्ति पोषकहि ठरते. पण पुढे पुढे या प्रवृत्तींत एक प्रकारचा स्वप्नाळूपणाचा भाग येतो. साहजिकपणें स्वप्नवादी प्रवृत्तीचे सारे गुणदोष या कलावंतांच्या कलाकृतींत दिसून येतात. इतर प्रतिक्रियांत आणि या प्रतिक्रियेंत महत्त्वाचा असा फरक असतो की, इतर प्रतिक्रिया या आत्म-केंद्रित्वांतून उद्भूत होतात. या प्रवृत्तींत आत्मकेंद्रित्व अल्प असतें.

शेवटीं, व्यक्तिवादाच्या सर्वांत महत्त्वाच्या अशा प्रतिक्रियेचा उल्लेख या ठिकाणीं करणें आवश्यक आहे. व्यक्तित्वजाणीवेला या पुढील कालांत या दिशेने वळण लागणें आवश्यक आहे. ही प्रतिक्रिया कांही लेखकांत पूर्वीपासून दृग्गोचर होत आहे. आजच तिचा उद्भव झाला आहे असे नव्हे.

व्यक्तित्वजाणीवेची ही प्रतिक्रिया म्हणजे मानवतावदाचा स्वीकार ही होय. ब्रि. राजवटींत नवजागृत व्यक्तित्वापुढे उच्चतम ध्येय ठेवण्याचा अधिकृत प्रयत्न झाला नसला, तरी राष्ट्रवादी चळवळ आपल्या विविध अवस्थांमधून हें मानवतावादाचें ध्येय पुढे ठेवीत आली आहे. परकीय राजवट संपल्याबरोबर या देशांत जें धर्मभेदातीत असें राज्य स्थापन झालें तें ह्या मानवतावादी वृत्तीच्या स्वीकाराचें निदर्शक आहे. आजच्या सांस्कृतिक जीवनांत ही एक अतिशय महत्त्वाची अशी प्रवृत्ति आहे. या एकाच प्रवृत्तीला यापुढच्या कालांत महत्त्वाचें स्थान राहणार आहे तीच कांही विधायक स्वरूपाचें कार्य करीत राहणार आहे. अखिल भारतीय क्षेत्रांतील नेहरू व गांधीजी हे तिचे प्रमुख प्रणेते होत.

महाराष्ट्रीय जीवनांत ह्या वृत्तीचा अधिक पद्धतशीर स्वीकार करण्याचा प्रयत्न समाजवादी विचारधारेने केला. समाजवाद मानवता हें अंतिम मूल्य मानतो. मराठी लेखकांपैकी वामनराव जोशी, साने गुरुजी, आचार्य जावडेकर, खांडेकर इ. लेखक; अनिल, बोरकर, कुसुमाग्रज इ. कवि हे या प्रवृत्तीचे प्रतिनिधि होत. ही प्रवृत्ति व्यक्तित्वापुढे एक उज्ज्वल असें ध्येय ठेविते. (तें ध्येय म्हणजे मानवता.) साहजिकपणें जीवनाच्या विधायक अंगांकडे लक्ष जाऊन विधायक कर्तृत्वशक्ति वाढीला लागते. याच दृष्टीने याच प्रवृत्तीला भविष्यकाळ आहे असें येथे म्हटलें.

मानवतेच्या स्वीकारांत मानवी समता, सामाजिक न्यायाची प्रस्थापना व मानव्याची प्रतिष्ठा, ह्या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. आतापर्यंत मानवता म्हणजे भूतदया असा पर्याय सर्वप्रसृत झाला आहे. पण त्यापलीकडे नजर टाकली असतां हे विशेष दृग्गोचर होतात. ब्रि. राजवटींत जागृत झालेलें व वाढीला लागलेलें व्यक्तित्व हें यापुढे मानवतेच्या दिशेने वाटचाल करणार आहे. तसेंच होणें इष्ट आहे. पण त्या दृष्टीने साहित्यिकांकडून अधिक साक्षेपी यत्न होणें आवश्यक आहे.

व्यक्तित्वाच्या जाणीवेच्या ज्या विविध प्रतिक्रियांचा आतांपर्यंत उल्लेख केला त्यांतून एक प्रकारची प्रक्रिया दृग्गोचर होते. या प्रवृत्ति वा प्रतिक्रिया म्हणजे व्यक्तित्वजाणीवेचे विविध टप्पे किंवा अवस्था होत. अगदी पहिल्या पायरीवर संस्कृतिप्रेमावर आधारलेला अभ्युत्थानवाद आहे, तर अगदी शेवटच्या पायरीवर मानवतावाद आहे. अभ्युत्थानवाद १९२० पर्यंत प्रभावी होता. त्यानंतर आत्मलक्षी प्रवृत्ति, सौंदर्यवादी प्रवृत्ति, सुखवादी प्रवृत्ति, विफलतावादी प्रवृत्ति इ. प्रवृत्तींचा क्रम लागूं शकेल. १९३५ नंतर शेवटच्या तीनहि प्रवृत्ति जोराने वाढलेल्या दिसतात. आजहि त्या प्रभावी नाहीत असें नाही. तथापि, यापुढील काळांत एका मानवतावादी प्रवृत्तीशिवाय अन्य प्रवृत्तीला स्थान नाही हें लक्षांत घेऊन त्या दृष्टीने त्या विचारधारेचा अवलंब व्हावयास हवा.

साहित्यांतील स्त्रीजीवनाच्या आविष्करणांतहि ह्या सर्व प्रवृत्ति महत्त्वाच्या आहेत. बहुतेक लेखकांच्या स्त्रीजीवनविषयक चित्रणाची पाहणी यापूर्वी केली आहेच. आताच उल्लेखिलेल्या विविध प्रवृत्तींपैकी विशिष्ट प्रवृत्तीचा स्वीकार करण्यावर स्त्रीजीवनाच्या आविष्करणाची प्रत ठरणार आहे.

ह्या प्रबंधांत व्यक्तित्वाची जाणीव स्त्रीच्या ठिकाणीं कशी निर्माण झाली हें प्रामुख्याने पाहावयाचें होतें. त्या जाणीवेच्या अनुषंगानेच विविध सामाजिक प्रश्नांचा वा स्त्रीविषयक प्रश्नांचा ऊहापोह संभवतो. हा व्यक्तिवाद आत्मसात् करण्याची प्रक्रिया कशी घडत होती, लेखकांच्या व विचारवंतांच्या मनावर तिचे पडसाद कसे उमटत होते, त्याच्या प्रतिक्रिया कशा विविधस्वरूपी होत्या, पण त्यांमधून एक इतिहाससिद्ध अशी प्रक्रिया कशी दृग्गोचर होते, तें स्पष्ट होईल. ब्रि. राजवटीने कोठे आणून सोडलें व पुढे आपणांस कोठे जावयाचें याबाबतचें विवेचन अस्वीकार्य वाटणार नाही, अशी आशा आहे. तथापि अद्यापपर्यंत सुखवादी व आत्मकेंद्रित्ववादी प्रवृत्ति ह्या अतिशय प्रबल आहेत असें दिसतें. साहित्याच्या व वैचारिक जीवनाच्या क्षेत्रांत तो फार मोठा धोका आहे हें या ठिकाणीं नमूद करणें आवश्यक आहे असें वाटतें.

: ५ :

आणखी एका प्रश्नाचें विवेचन करणें आवश्यक आहे. हा प्रश्न म्हणजे मराठी वाङ्मयांत स्त्रीजीवनाचें जें प्रतिबिंब उमटलें आहे तें कितपत वास्तव आहे ह्याची पहाणी करणें हा होय. आतापर्यंत स्त्रीजीवनविषयक विविध समस्या कालदृष्ट्या कशा निर्माण झाल्या व त्यांचे साहित्यांत कसे पडसाद उमटले याचें विवेचन आलें आहे. त्या विवेचनांत सामान्यतः साहित्याची जीवन-निष्ठता अभिप्रेत धरली आहे. जीवनाचें साहित्यांत वास्तव प्रतिबिंब पडलें आहे असें गृहीत धरलें आहे व तें सामान्यतः स्वीकार्य मानावयास हरकत नाही. पण या ठिकाणीं थोड्या चिकित्सकपूर्वक पाहणी करावयाची आहे. जीवनाचें साहित्यांत जें प्रतिबिंब उमटलें तें लेखकाच्या दृष्टीला ज्याप्रकारचें जीवन दृग्गोचर होत असेल, त्या प्रकारावर अवलंबून असतें. लेखकाची दृष्टि ही त्या त्या काळांतील विचारप्रणाली, जीवननिष्ठा इ. च्या आधारें निश्चित होत असते. ह्या विशिष्ट जीवननिष्ठा व विचारप्रणाली ह्यांचा उल्लेख, तसेंच त्यांचा त्या त्या लेखकाच्या दृष्टिकोनावर कोणता परिणाम झाला आहे ह्याचें विवेचन त्या त्या ठिकाणीं (त्या त्या लेखकांच्या कृतींचा विचार करतांना) आलें आहे. त्यावरून साहित्यांतील जीवनाच्या चित्रणाची कल्पना यावयास प्रत्यवाय नसावा.

वास्तवचित्रणाच्या दृष्टीने पाहतां हरिभाऊ आपट्यांच्या कादंबऱ्यांत वा कथांत स्त्रीजीवनाचें अधिकाधिक वास्तव प्रतिबिंब उमटलें आहे, असें सामान्यतः मान्य केलें जातें, व त्यांत अन्वर्थकताहि आहे. त्यापूर्वीच्या (अव्वल इंग्रजी) कालखंडांतील साहित्यांत तें तसें आढळत नाही. त्यांत एका बाजूने (विशेषतः कादंबऱ्यांतून) कल्पनारम्यतेवर अधिक भर आहे, तर दुसऱ्या बाजूने (नाटकांतून) प्रचारकपणाला अधिक प्राधान्य मिळालें आहे. समालोचनात्मक दृष्टीने पाहतां तें चित्रण विशिष्ट अर्थाने वास्तवपूर्ण असें नसलें, तरी सामाजिक वा सांस्कृतिक अवस्थेच्या दृष्टीने तें प्रातिनिधिक

आहे, असें म्हणतां येईल. हरिभाऊ आपटे यांचें वाङ्मय हाच जर वास्तवतेचा निकष मानला तर तें चित्रण अर्थातच वास्तव म्हणतां येणार नाही.

हरिभाऊंच्या कादंबरी, कथा-वाङ्मयांतून जें प्रतिबिंब पडलें त्याला समाजाची सांस्कृतिक अवस्था, भारतीय (महाराष्ट्रांतील) स्त्री-पुरुषांच्या जाग्रतीचा विशिष्ट टप्पा, समाजांतील विचारप्रवाह इ. विविध गोष्टी जबाबदार आहेत. अर्थात् हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवन वास्तवदर्शी आहे असें जें सामान्यतः मानलें जातें त्याबाबत मतभेद व्यक्त करण्याचें कारण नाही.

तथापि, हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतहि ध्येयवादाची छटा आहे हें विसरून चालणार नाही. सुंदरीच्या द्वारें हरिभाऊंनी जी महाराष्ट्रीय स्त्री उभी केली आहे ती वास्तवदृष्टीने तत्कालीन महाराष्ट्रीय स्त्रीची वा स्त्रीजीवनाची प्रातिनिधिक आहे, असें म्हणतां येणार नाही. यावरून वास्तववादी चित्रणासाठी प्रसिद्ध असलेल्या हरिभाऊंसारख्या श्रेष्ठ लेखकाच्या लेखनांतहि वास्तवतेशी दूरत्वाने संबंध पोंचेल अशीं चित्रें आढळतात, असें म्हणतां येईल.

वाङ्मयेतिहासांत असें आढळून येतें की, विशिष्ट युग हें विशिष्ट वाङ्मयीन वैशिष्ट्याकरितां प्रसिद्ध असतें. हरिभाऊंच्या पूर्वकालीन युग हें या दृष्टीने अद्भुतरम्यतेचें युग म्हणतां येईल. हरिभाऊंच्या युगास वास्तववादी युग असें म्हणणें योग्य होईल. नंतरच्या काळांत वाङ्मयांत वास्तववादाऐवजी ध्येयवादावर, वा कल्पना वा सौंदर्यवादावर अधिक भर दिला गेला आहे असें आढळून येईल. त्या दृष्टीने त्या त्या कृतींचा व वाङ्मयप्रकारांचा विचार करतांना, क्लासिसिझम् (अभिजातवाद), रोमँटिसिझम् (स्वच्छंदवाद) इ. चा उल्लेख करावा लागतो. या विविध कृतींना वास्तववादी असें म्हणतां येणार नाही. तथापि त्यांतून जें जीवन, जे विचार, जीं ध्येयें, मूल्यें इ. चें अभिव्यक्तिकरण झालें आहे तें महाराष्ट्रीय समाजाचेंच म्हणजे वास्तव होय.

शिवाय, १९३० नंतरच्या काळांत वाङ्मयीन टीका व वाङ्मयीन चर्चा मोठ्या प्रमाणांत होऊं लागली. साहित्यक्षेत्रास येत असलेल्या महत्त्वाची

ती द्योतक होती. त्या चर्चेंत वास्तववादाच्या स्वरूपाबाबत बराच ऊहापोह झाला, आणि वास्तववादाचे निरनिराळे पर्याय पुढे येऊं लागले. त्या त्या दृष्टींनी त्या त्या कृतींना वास्तववादी कृति म्हणून संबोधिलें जाऊं लागलें. वरेरकरांनी आपलीं नाटकें व कादंबऱ्या ह्या वास्तववादाचा अवलंब करून लिहिल्या आहेत. (असें त्यांचें स्वतःचें म्हणणें आहे.) त्यांच्या ह्या वास्तववादाचा विचार त्या त्या वेळीं मागे या प्रबंधांत आलेला आहेच.

वस्तुस्थिति अशी आहे की, आजकाल समाजजीवनाचें स्वरूप इतकें बहुविध, संमिश्र झालेलें आहे, वाङ्मयाचें लोणहि समाजाच्या सर्वच थरांपर्यंत पोंचलें आहे की, त्या अनुषंगाने वाङ्मयांत विविध प्रकारांची विविधता येणें हें अपरिहार्य आहे. समाजाचे सर्वच थर कमीअधिक प्रमाणांत जागृत झाले आहेत. त्यांच्या जागृतीची प्रक्रिया १९२० नंतरच या देशांत सुरू झाली; व तेव्हापासूनच वाङ्मयांत विविधता येण्यास सुरुवात झाली. समाजाच्या थरापर्यंत वाङ्मयाचें लोण येण्यास या वर्षानंतरचीं १५-१६ वर्षें लागलीं. त्यानंतर तर दलितवर्गाच्या जीवनाचें चित्रण म्हणजे वास्तववादी चित्रण असा संकेत रूढ होऊं लागला. त्या दृष्टीने लेखकांचे प्रयत्न होऊं लागले. अशा प्रकारें वास्तववादाबाबतच्या समजुती बदलूं लागल्या. तथापि त्रि. राजवटीच्या कालमानांत लेखकवर्ग हा प्रामुख्याने मध्यमवर्गीयांचाच होता. त्यांचे आचार, विचार इ. हे या वर्गाला अभिप्रेत असणारे असेच होते. त्यांचें आविष्करण त्यांच्या साहित्यांतून होत होतें. एकंदर जीवनाच्या व लेखकांच्या भोंवतालच्या परिस्थितीच्या परकीय राजवटीच्या कालांतल्या मर्यादा लक्षांत घेतल्या तर तत्कालीन साहित्याची प्रातिनिधिकता सामान्यतः मान्य करावयास हरकत नाही.

स्त्रीजीवनाच्या चित्रणाच्या दृष्टीने पाहतांहि या कालांतले प्रश्न वा साहित्यांतील जीवन हें मध्यमवर्गीय स्त्रियांपुरतेंच मर्यादित आहे असा आक्षेप घेतां येईल. अगदी वास्तववादी लिखाणासाठी प्रसिद्ध असलेल्या हरिभाऊंच्या साहित्यावरहि तोच आक्षेप घेतां येईल. त्या दृष्टीने पाहतां साहित्यांतील

चित्रणावर अवास्तवतेचा आक्षेपहि घेतां येईल. यापुढे जाऊन कित्येक असेंहि म्हणूं शकतील (व शकतातहि) की, हें जीवनचित्रण केवळ राज्यकर्त्यांच्या साहित्याच्या अनुकरणाने आलेलें आहे. त्यांत अनुभूति नाही. या आक्षेपांतील स्वकीय-परकीय विचारांचा ऊहापोह या प्रकरणांतच ह्यापूर्वी आलेला आहे. त्या दृष्टीने पाहतां सर्व साहित्य हें जीवनाशी संपूर्णतया अप्रामाणिक आहे, असा निष्कर्ष काढणें धाष्टर्याचें ठरेल.

शेवटीं, ह्या कालखंडांतील साहित्यांतील स्त्रीजीवन हें केवळ मध्यमवर्गीय स्त्रीपुरतेंच मर्यादित आहे असें विधान करून त्या दृष्टीने त्याचा जो अधिक्षेप करण्याचा प्रयत्न केला जातो वा जाणें शक्य आहे, त्याबद्दल थोडें विवेचन करणें आवश्यक आहे. ब्रिटिशांच्या राजवटीचा ऐतिहासिक कार्यभाग (role) म्हणजे या देशांत विशिष्ट जीवनमूल्यांवर निष्ठा असणारा असा एक वर्ग (मध्यम वर्ग) तयार करणें हा होता. ही प्रक्रिया राज्यकर्त्यांच्या परकेपणामुळे, व साम्राज्यवादी धोरणामुळे बरीच गुंतागुंतीची झाली. ही प्रक्रिया अजिबात थांबूं नये अशी एकच गोष्ट राज्यकर्त्यांनी केली, व ती म्हणजे ज्याला सहिष्णुतावादी (liberal) म्हणतां येईल असें शिक्षण देणें, त्या शिक्षणासाठी विशिष्ट यंत्रणा तयार करणें ही होय. ही सहिष्णुतावादी वृत्ति राज्यकर्त्यांच्या धोरणान्वयें व्यक्तिवादावर आधारलेली होती. त्याचा परिणाम या राजवटींत देशाच्या सांस्कृतिक जीवनास व्यक्तिवादी वाट येण्यांत झाला. हीच गोष्ट गृहीत धरून भारतीय स्त्रीने या नव्या विचाराचा अंगीकार कसा केला हें पाहणें हें या प्रबंधांतील विवेचनाचें मुख्य सूत्र ठरविलें. सामाजिक बदलाच्या दृष्टीने पाहतां असें आढळून येईल की, पूर्वीची जातिवर्णप्रधान समाजरचना जाऊन त्या ठिकाणीं नव्या संस्कृति-अवस्थेस असणारी वर्ग (त्रि) प्रधान समाजरचना यावयाची होती. ब्रि. राजवट संपतांच तशी ती तत्त्वतः आली. या नव्या रचनेंत कर्तृत्वाचें पुढारीपण मध्यम वर्गाकडे अभिप्रेत असतें तसेंच येथें आले आहे. म्हणजे ऐतिहासिक दृष्ट्या पाहतां भारतीय स्त्रीवर्गांत मध्यमवर्गीय ध्येयांचा उद्भव व्हाव-

याचा, व त्यांच्या ठायीं त्या द्वारें व्यक्तित्वाची निर्मिति व्हावयाची ही एक ऐतिहासिक क्रिया होती. ती ब्रि. राजवटींत पार पडली. समाजांतली जुनी व्यवस्था जाऊन ही नवी व्यवस्था आली. त्या योगें वास्तविक पाहातां समाजांत ऐक्यभावनेचा, आत्मीयतेचा (Solidarity) विकास व्हावयास हवा होता. पण राज्यकर्त्यांच्या परकेपणामुळे ते या बाबतींत उदासीन राहिले. तथापि एका एतद्देशीय वर्गाने (त्यांत स्त्रीहि आली) हा नवा व्यक्तिवादी विचार वा ही जीवननिष्ठा आत्मसात् केली. ती प्रगतिशील निष्ठा आहे. तिची व्याप्ति यापुढच्या स्वातंत्र्याच्या कालांत समाजाच्या सर्व थरांपर्यंत जावयाची आहे. समाजाच्या ठायीं जी आत्मीयता निर्माण होणें आवश्यक आहे, तिच्या योगें हें कार्य होणार आहे. म्हणून ब्रि. राजवटीचें हें ऐतिहासिक, वैचारिक वैशिष्ट्य हेरून त्या दृष्टीने स्त्रीजीवनाची साहित्यक्षेत्रीय उल्लेखांच्या आधारें ही पाहणी केली. ह्या दृष्टिकोनामुळे विशुद्ध वाङ्मयीन असा वास्तवतेचा निकष साहित्यास लावण्याची आवश्यकता भासली नाही. तथापि, त्या गोष्टीकडे दुर्लक्ष झालें; असें होऊं नये म्हणून या ठिकाणीं समालोचनांत हा ऊहापोह केला. मध्यमवर्गीय स्त्रीच्या ठायीं आत्मभावना जागृत होण्याच्या दृष्टीने ज्या ज्या विचारांचा, कल्पनांचा ऊहापोह वा खल व्हावयास हवा होता तो तसा झालेला आहे, असें म्हणावयास हरकत नाही.

साहित्यांतील स्त्रीजीवनाचें चित्रण कसें वास्तव आहे हें आणखी एका दृष्टीने साहित्यांतील चित्रणाकडे दृष्टिक्षेप टाकला असतां स्पष्ट होईल. स्त्रीजीवनविषयक कोणते प्रश्न निर्माण झाले, त्याचप्रमाणे साहित्यांतील निरनिराळ्या प्रकारांतून विवक्षित कालांतलें चित्रण कसें झालें याचें अवलोकन केलें. आतां या ठिकाणीं स्त्रियांचे जे विशिष्ट वर्ग आहेत त्यांच्या जीवनचित्रणाची प्रत ठरविणें व प्रारंभापासून आतापर्यंत याबाबत कशी प्रगति झाली, हें पाहणें आवश्यक आहे.

या विशिष्ट वर्गांत पहिला क्रम कोणाचा असेल तर तो प्रौढ कुमारिकांचा होय. आजच्या जीवनांतला हा अत्यंत अभागी असा वर्ग आहे.

आगरकर, रानडे, आपटे यांनी विवाहाची वयोमर्यादा वाढली जावी म्हणून किती नेकीने प्रयत्न केले. पण आज हा जो नवा विराट स्त्रीजीवनविषयक प्रश्न उभा राहिला त्याचें स्वरूप ह्या पूर्वकालीन सुधारकांच्या सुधारणांच्या इतकें विरोधी आहे की, त्या योगानेच कित्येकजण तत्कालीन सुधारणांच्या विचाराचा आजहि उपहास करतात. त्या वेळीं रानडे, आगरकर, फुले यांना स्त्रीशिक्षणासाठी फार मेहनत घ्यावी लागली आणि आजची कुमारिका ही चांगली शिक्षित आहे, पदवीधरहि आहे, पण तिच्या विवाहाचा प्रश्न सुटत नसल्याने तिला पूर्वीच्या अशिक्षित अडाणी स्त्रीच्या 'भाग्याचाहि' हेवा वाटत आहे. त्या स्त्रिया फार सुखी होत्या असें तिला वाटत आहे. तिच्या मतें वैधव्यावस्थेतलें दुःख व परित्यक्तावस्थेतील दुःखेंहि ह्या सक्तीच्या कौमार्यापेक्षा फार बरीं होतीं. विभावरी वाढ्मयाच्या वेळेपासून हा प्रश्न पुढे येत आहे. विभावरी वाढ्मयाच्या वेळीं सुशिक्षित स्त्रीकडे पाहण्याची दृष्टि कलुषित होती. आज ती किंचित् निवळली असें दिसतें. पण हें दिसणें वरवरचें आहे. अशा प्रकारें शिक्षण मिळालेलें, परंतु समाजजीवनांत मात्र स्थान नाही, असा चमत्कारिक अनुभव ह्या वर्गास येत आहे. या मुली शिकतात तें केवळ लग्न लवकर होत नाही म्हणून. पुढेहि कांही दिवस वाट पाहून पुन्हा नोकरीला लागतात. आजच्या सर्वच प्रमुख कथा, कादंबरी, नाटकांतून अशा व्यवसायिनींचीं चित्रें आलीं आहेत. अशा प्रकारें निरनिराळ्या कारणांनी व निरनिराळ्या उद्देशांनी नोकरी करणारी, स्वतःच्या भवितव्याविषयीं सांशक व निराश झालेली, या सर्व अनुभवांनी पुरुषांवर चिडणारी अशी आजची प्रौढ कुमारिका आहे. फडक्यांच्या 'अखेरच्या बंडां'त ती अगदी वेगळ्या स्वरूपांत आविष्कृत झाली आहे. तिच्या ठिकाणची कर्तव्यतत्परता (वडिलांच्या पश्चात् भावंडांचें शिक्षण करण्याचें कर्तव्य ती पार पाडते.) फडक्यांनी दिद्दर्शित केली आहे. मधून मधून लघुकथेंत ती आढळते. पण समाजाचें लक्ष निरनिराळ्या गोष्टींत केंद्रित झालें असल्याने तिच्याकडे त्याचें दुर्लक्ष झालें आहे. या दृष्टीने 'कळ्यांचे निःश्वास' आजहि ऐकूं यावयास हवेत.

ह्याच कुमारिकेचें जीवन आणखी एका स्वरूपांत सर्वत्र आलेलें आहे. ही 'प्रौढ कुमारिका' होण्यापूर्वी आशावादी असते, त्या स्वरूपांत बहुसंख्य कथा-कादंबऱ्यांची ती प्रणयिनी झाली आहे. तिच्या प्रणयाच्या अनुषंगाने प्रेमाचे त्रिकोण कित्येक लेखकांच्या परिचयाचे झाले आहेत. ह्या अवस्थेंत ती स्वप्नाळू आहे. त्यागासाठी आतुरहि आहे. वामनरावांच्या उत्तरेपासून तों माडखोलकरांच्या चंदनपर्यंतच्या नायिका पाहूं लागलों तर आपणांस आधुनिक कुमारिकांचे विविध नमुने पाहावयास सांपडतील. ह्या आधुनिक शिक्षणाने व्यक्तित्वाभिमानी (Self-conscious) अशा आहेत. त्या क्वचित् प्रसंगीं ध्येयवादिनीहि आहेत. प्रियकर वा पति यांवर त्यांचें एकनिष्ठ प्रेम आहे. त्या कर्तव्यतत्पर आहेत. १८९९ त झालेल्या देवलांच्या शारदेशी तुलना करतां या कुमारिकांची किती प्रगति झाली आहे तें कळून येईल.

ह्या कुमारिकांचा प्रश्न ठसठशीतपणें मांडणारी कादंबरी क्वचितच लिहिली गेली आहे. लघुकथा बऱ्याच लिहिल्या जात आहेत. हा प्रश्न निर्माण होण्याचें खरें कारण म्हणजे समाजांत स्त्री व पुरुष एकत्र येण्याची व्यवस्थाच कांही नाही. व्यवसायाच्या निमित्ताने स्त्रिया घराच्या बाहेर पडल्याहि आहेत. पण त्यांच्याकडे पाहण्याचा पुरुषाचा दृष्टिकोन विशेष निवळला आहे असें वाटत नाही. एकंदरीने पाहतां कुमारिकांचा प्रश्न साहित्यांतून मांडला जातो, पण त्यांत साक्षेप कमी आहे.

कुमारिकांच्या नंतरचा वर्ग म्हणजे विवाहितांचा होय. ह्या गृहिणीचें जीवन तिच्यावरील संकटें तिच्या व्यक्तिमत्वाची होणारी गळचेपी, इ. गोष्टींकडे कादंबरीकारांचें व लघुकथा-लेखकांचें लक्ष गेलें आहे, जात आहे. ह्या विवाहितांच्या जीवनाचे प्रश्न विविध प्रकारचे आहेत. कांही वर्षांपूर्वी गाजलेला सर्वांत मोठा प्रश्न म्हणजे कुमारिकांचें ह्यांच्या जीवनावर होणारें आक्रमण हा होय. कुमारिकांचा समाजांतील विवाहित पुरुषांशींच संबंध (व्यवहारांतील विविध प्रसंगांच्या अनुरोधाने) येतो. त्या वेळीं दोघांत प्रणय-

भावनेचा उद्भवहि होणें शक्य आहे. अशा प्रश्नावर बऱ्याच कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. विशेष म्हणजे बहुसंख्य लेखकांची ह्या प्रकारास मुक्त संमति दिसते. जितक्या भेदकपणें हा प्रश्न मांडला जावयास हवा होता तितक्या भेदकतेने तो कुठेच मांडला गेला नाही. बहुसंख्य लेखकांनी पाश्चात्यांच्या अनुकरणाच्या नादांत या प्रसंगांचा केवळ 'प्रेमाचा त्रिकोण' म्हणून उपयोग केला आहे. अशा प्रकारें विवाहितेच्या जीवनाचें हें अंग कथा कादंबरी-नाटक-कारांच्या परिचयाचें झालें आहे.

आधुनिक कादंबरींत प्रामुख्याने वैवाहिक जीवनांतील नीतिविषयक समस्यांना वाव मिळाला आहे हा उल्लेख मागे आलेलाच आहे. वैवाहिक जीवनांतील प्रेमसाफल्याबाबतचें असमाधान हा बहुसंख्य कादंबरीकारांचा विषय दिसतो. सामान्यतः ह्या असमाधानाला मानसशास्त्रीय अधिष्ठान देण्याचा उपक्रम झाला आहे. अशा प्रकारें वैवाहिक जीवनाचें प्रतिबिंब वाङ्मयांत पडलें आहे.

या वैवाहिक जीवनांतला एक संघर्षबिंदु नाटककारांच्या ध्यानांत आलेला दिसतो; व तो म्हणजे 'स्वतःचें घर' म्हणून मानणारी गृह-स्वामिनी वा गृहिणी ही प्रत्यक्षांत त्या गृहाची केवळ दासी आहे; ह्या वस्तुस्थितीच्या निदर्शनाने त्या जागृत स्त्रीच्या जीवनांत निर्माण झालेला संघर्ष हा नाटकांचा प्रामुख्याने विषय आहे. अर्थात्, हा सर्व इब्सेनच्या विचाराचा परिणाम आहे. पण त्याचीं बीजें येथल्या परिस्थितींत नाहीत असें म्हणतां येणार नाही. विवाहिता स्त्रीला आपल्या आर्थिक परदास्याची जाणीवहि झालेली आहे. तें स्वातंत्र्य मिळविण्याची तिची खटपट चालू आहे. विवाहित स्त्री नोकरी करते. तिला वेगळाच अनुभव येतो. तिचे प्रश्न हे बरेच वेगळे झाले आहेत.

वैवाहिक जीवनांतल्या अन्यायापासून मुक्त करून घेण्याचा मार्ग म्हणजे घटस्फोटाची सवलत हा होय. ह्या सवलतीचा पुरस्कार करणाऱ्या कादंबऱ्यांचा उल्लेख यापूर्वीच झाला आहे. नोकरीसाठी बाहेर पडलेली वा

न पडलेली स्त्री असो, तिच्या जीवनांत ' चूल वा मूल ' ह्या गोष्टींना बरेंच स्थान आहे. तिच्या जीवनशक्ति प्रामुख्याने ह्याच कार्यात खर्ची पडत आहेत.

अर्धवट जागृत झालेली, व समाजपरिस्थितीच्या जाचांनी हैराण, हताश झालेली स्त्री स्वप्नवादी झाली असल्यास नवल नाही. अशी स्वप्नाळू स्त्री आपणास अनेक कथा-कादंबऱ्यांतून आढळते. स्वप्नवादाचा एक पर्याय म्हणून ती सुखवादाकडेसुद्धा वळली आहे. आधुनिक स्त्रींतील ही सुखवादी प्रवृत्ति प्रायः माडखोलकरांच्या कादंबऱ्यांतून व्यक्त होते. त्यांच्या कादंबऱ्यांतील स्त्रीजीवनचित्रणाचा विचार यापूर्वीच केला आहे. त्यांचे समर्थक भेंडे आपले युग हें अश्लील (Vulgar) झालें आहे. असें म्हणतात. त्याची चिकित्सा यापूर्वी केली आहे. विशिष्ट संदर्भात आजच्या मध्यम वर्गाची प्रवृत्ति भोगवादाच्याकडे वळत आहे असा त्याचा अर्थ घेतला तर हें विधान मर्यादित अर्थाने खरें आहे. भोगवाद हा आत्मसंतुष्ट वृत्तीचा एक पर्याय होय. ही प्रवृत्ति व्यक्तित्वाच्या जाणीवेचा एक टप्पा होय. असो; अशा प्रकारें विवाहितेचें जीवन थोड्याफार वास्तव प्रमाणांत आज चित्रित होत आहे.

विवाहित स्त्रीच्या जीवनचित्रणाकडे ऐतिहासिक दृष्टीने थोडा दृष्टिक्षेप टाकला तर परिस्थिति कशी मूलतः बदलली आहे ह्याची कल्पना येईल. हरिभाऊंच्या कादंबऱ्यांतील विवाहित स्त्रियांच्या जीवनाशी तुलना केली तर फरक स्पष्ट होईल. त्यांच्या कालांत विवाहित स्त्रीला प्रसूति व गरोदरपण याविना जीवनच नव्हतें. त्या मानाने तिचें जीवन आज खूप बदललें आहे. तिच्या जीवनाचे प्रश्न अधिक संमिश्र झाले आहेत. आजच्या स्त्रीच्या पुढल्या परिस्थितीचें विवेचन कृष्णाबाई मोटे यांच्या ' मीनाक्षीच्या जीवनां 'त आलें आहे, तें या प्रबंधांत मागे उद्धृत केलें आहे. महाराष्ट्रीय स्त्रीची सामाजिक प्रगति पाहण्याच्या दृष्टीने तें अन्वर्थक आहे असें म्हणतां येईल.

हरिभाऊंच्याच कादंबरी जीवनांतील प्रसंगाची तुलना करतांना एक गोष्ट आज स्पष्ट होते; व ती म्हणजे समाजांत विधवांचा प्रश्न नाही. विधवांचें अस्तित्व अधिक प्रमाणांत असण्याचें कारण बालविवाह हें होतें.

तो प्रश्न निकालांत निघतांच त्या प्रश्नाचें महत्त्व ओसरणें साहजिक आहे. एखाद्या कथेंत जर एखादी विधवा आलीच तर ती कारुण्याचा विषय होते. पण धीरगंभीरपणें–अगदी पुरुषाच्या धीरगंभीरपणाने-ती आपलें जीवन कंठते (उ. बस नंबर बारा).

अशा प्रकारें स्त्रीवर्गाचे जे विविध प्रतिनिधि आहेत त्यांच्या जीवनाचें चित्रण आजच्या वाङ्मयांत झालें आहे तें सामान्यतः वास्तवपूर्ण आहे.

शेवटीं एका अगदी वेगळ्याच वर्गाचें दिग्दर्शन करावयास हवें. हा वर्ग सामाजिक दृष्ट्या पाहिलें असतांना दिसणारा नव्हे, तर वैचारिक दृष्ट्या पाहिलें असतां दिसणारा. हा वर्ग म्हणजे ध्येयवादिनींचा होय. मराठी साहित्यांत आतापर्यंत जर कोणत्या विशिष्ट वर्गाचें चित्रण झालें असेल तर तो वर्ग म्हणजे हा होय. मराठी वाङ्मयांतील ह्या ध्येयवादिनी स्त्रिया अमर आहेत. यांच्या ध्येयांकडे दृष्टिक्षेप टाकला तर, मराठी समाजाची प्रगति कोणत्या दिशेने होत आहे ह्याची कल्पना येऊं शकेल.

या स्त्रियांच्या मालिकेंतलें पहिलें नांव हरिभाऊंच्या ताईचें येतें. ही भावानंदाची बहीण आहे. भावाच्या आश्रमाच्या कार्याला तिने वाहून घेतलें आहे. समाजाच्या व स्त्रियांच्या उन्नतीसाठी प्रयत्न करण्याचें या आश्रमाचें ध्येय आहे. ताईला सुंदरीचें साहाय्य होत आहे. ताईला मदत करण्यास लिली (कर्मयोग) आली आहे. दोन पिढ्यांचें अंतर, लिली धीट आहे; पण ताईचें जीवितकार्य तेंच आपलें जीवितकार्य असें मानीत आहे. ताईनंतरच्या ती पाहा वामनरावांनी निर्माण केलेली ध्येयवादिनी स्त्रियांची परंपरा. ती पाहा मराठी कादंबरींतली पहिली, हिंदु सफ्रेजेट, उत्तरा. तिचे वादाविवाद किती भिन्न भिन्न विषयांवर चालू आहेत. किती व्यापक झाली तिची दृष्टि. तिची मैत्रीण रागिणी, आपल्या युक्तिवादापेक्षा धीमेपणाने व प्रेमळपणाने मनें जिंकणारी ही रागिणी मराठी साहित्यांत अमर आहे. पण वामनरावांची खरी लाडकी ध्येयवादिनी सुशीला, ती पाहा विश्वकुटुंबी संस्थेचें कार्य चालवीत आहे. ही विश्वकुटुंबी संस्था म्हणजे भावानंदांच्या

आश्रमाचेंच नवें स्वरूप दिसतें. जीवनांत किती विविध प्रकारचे अनुभव तिने घेतले, पण किती आशावादी पहा. तथापि वामनरावांची खरी ध्येयवादिनी वेगळीच आहे. ती पाहा सरला भोळे. ती किती धीमेपणाने विनायकरावांचें कार्य पुढे चालवीत आहे. 'लौकिक दृष्ट्या दुःखमय जीवित जगणारी पण लौकिक दृष्टीहून उच्चतर दृष्टीने पाहिलें असतां ज्यांत सात्त्विक आनंद भरलेला आहे,' असें जीवन जगणारी ही सरला भोळे ही मराठी कादंबरींतली अमर ध्येयवादिनी नाही काय ?

त्यानंतर त्या पाहा डॉ. केतकरांच्या मानसकन्या. ती पहा कालिंदी, वैजनाथशास्त्र्यांशी विवाद करणारी ती शारदा, कलावतीचें जीवन ध्येयनिष्ठेने जगणारी ती पाहा रंजिता वेरेंकर. समाजाच्या अवहेलनेचा विषय झालेल्या वर्गांत जन्मलेल्या त्या पाहा दोघी तरुण मुली मंजुळा, कपिला त्या विवाहित जीवन जगण्याची धडपड करीत आहेत.

त्यानंतर ही फडक्यांची नायिकासृष्टि, किती सुंदर हीं स्त्रीरत्नें ! किती कलाचतुर, मनमिळाऊ आणि गोड मुली या ! आपल्या प्रियकरांवर किती प्रेम करतात. पण यांत ध्येयवादिनी कोण बरं ? ठरवण मोठं कठिण आहे. पाहा त्या तिघी जणी. ती पाहा परित्यक्ता पण राजाभाऊवर प्रेम करणारी उमा लाटीमारांत बळी पडली आहे. 'बस नंबर बारा'मधील ती आधुनिक विधवा स्त्रीचें जीवन जगणारी. पण त्यापेक्षा जिच्या जीवनांत खरोखरच मोठी समस्या निर्माण झालेली आहे अशी, ती पाहा 'शाकुंतल' मधील शकुंतला. बाकीच्या सर्वच प्रणयिनी तशा ध्येयवादिनी आहेत, पण ठसठशीतपणा त्यांत कमी आहे.

माडखोलकरांच्या स्त्री सृष्टीतील त्या पहा दोघी ध्येयवादिनी. ती प्रमद्वरा, बघा पतीकडून देशसेवेत साहाय्य करण्याचें वचन घेत आहे. आणि ती पाहा निष्पाप चंदन.

वामनरावनंतर खऱ्या ध्येयवादी दृष्टीने कादंबरीलेखन करणारे खांडेकर, त्यांच्या ध्येयवादिनी पाहा. तो पाहा वत्सला. किती तेजस्वी मुलगी

आहे ! खांडेकर स्वतः तक्रार करतात, 'अहो ! ती बोलत नाही ! करूं द्या त्यांना तशी तक्रार. तें पित्याचें हृदय आहे. पण ध्येयासाठी पतीचा त्याग करणारी व प्रणयाच्याहि भानगडींत न पडणारी ही वत्सला नव्या स्त्रीची पाऊलवाट दाखवीत नाही काय ? तसेंच ती पहा उल्का. आपल्या इस्टेटीचा ट्रस्ट करून ठेवला आहे तिने. आणि ती प्रमिला. पण तिचें कर्तृत्व अद्याप प्रकट व्हायचें आहे. प्रमिलेचें व वत्सलेचें ध्येय हें आजच्या मानवाचें ध्येय आहे.

पण खरी कर्तृत्ववान व ध्येयवादिनी स्त्रियांची मालिका निर्माण करणारे ते पाहा महाराष्ट्राचे नाटककार-कादंबरीकार वरेरकर. ती पाहा परदेशांतून मान-मरातब मिळवून आलेली विधवाकुमारी मथुरा. पतीच्या बरोबरीने कोर्टात चमकणारी व अत्यंत कर्तृत्वशालिनी स्त्री पाहा गोदू गोखले. स्वतंत्र धंदा काढून पुढे येणाऱ्या त्या पाहा तीन मैत्रिणी माणक, गंगू व वेणू. ती पाहा वेणू वेलणकर; आणि गोदू गोखलेच्या मार्गदर्शनाखाली वाढलेली ती पाहा बाबी गोखले. ह्या स्त्रिया कर्तृत्ववती आणि ध्येय-वादिनी आहेत.

ही ध्येयवादिनींची परंपरा यापुढेहि चालू राहणार आहे. पण आतां जरा स्त्री-लेखिकांकडे नजर टाकूं या. यांच्यांतली पहिली विभावरीबाईंची अचला आहे. पण ही अद्याप भांबावलेली आहे. तिच्या अंतरंगांत फार कल्लोळ उठला आहे. त्यानंतर ती पाहा कृष्णाबाईंची मीनाक्षी. अत्यंत कर्तृत्ववती स्त्री पाहा कशी नवें क्षेत्र आपल्या कर्तृत्वासाठी उघडते आहे. पण यापेक्षा अगदी नवा मार्ग स्वीकारणारी ती पहा प्रेमाबाई कंटकांची विंधा. गांधीजींचा कडकडीत कर्मयोग तिला झेपला नाही, पण नंतर मुकुंदच्या आश्रयास ती आली आहे. सामाजिक कार्य करण्याचा हा तिसरा आश्रम होय. हरिभाऊंचा भावानंदांचा आश्रम, वामनरावांची विश्वकुटुंबी संस्था, प्रेमाबाईंचा हा सेवाश्रम. पहिले दोन काल्पनिक असतील, पण ही मात्र खऱ्याची प्रतिकृति दिसत आहे. ही अशी परंपरा पुढे चालू राहाणार आहे.

पण येथे थांबूं या जरा. स्वातंत्र्य प्राप्त झालें आहे. आपल्या ध्येयांची दिशा बदलली आहे. नवीं ध्येयें लेखकांना जरा हेरूं द्या. अद्याप त्यांना त्यांचें दर्शन नीट झालें नाही. तें त्यांना लौकरच होईल. ते लवकरच अशी नवी मालिका निर्मितील, त्यावेळीं त्यांना दाखवूं या ही परंपरा, आणि विनवूं या,—हीं पाहा उज्वल ध्येयवादिनींची मराठी साहित्यांतील परंपरा; या परंपरेला असं कांही रंगवा—चित्रित करा—महाराष्ट्रीय स्त्री कोठपर्यंत आली हें नीट न्याहाळून घ्या, मग पुढे जाऊं या.

मराठी साहित्यांतील स्त्रीजीवनाची पाहणी आतांपर्यंत केली. ब्रिटिश राजवटीचें वैचारिक वैशिष्ट्य ध्यानांत घेऊन ती केली आहे. उद्याच्या समाजांत स्त्रीला समानतेचे हक्क मिळाले आहेत; निदान सर्व बाबतींत समानतेच्या ध्येयाप्रत तिची वाटचाल झालेली आहे. उद्याची महाराष्ट्रीय स्त्री स्वतःचें भवितव्य स्वतःच ठरविणार आहे. तें तिने तसें ठरवावें अशी वैचारिक बैठक ब्रि. राजवटींत तयार होत होती. ब्रि. राजवटीपूर्वी पुरुषवर्गाच्या कित्येक शतकें मागे असलेली स्त्री ती राजवट संपण्याचे वेळी पुरुषवर्गाच्या खांद्याशी खांदा लावून पुढे येण्यास सावरली आहे. हें जें चित्र आज आपल्या मनःचक्षूंसमोर उभें राहिलें आहे, त्याची सजावट ज्यांनी केली त्यांना कृतज्ञतापूर्वक मानवंदना करणें आवश्यक आहे. ह्या श्रेष्ठ महापुरुष व स्त्रियांच्या प्रयत्नांनी आणि पराक्रमांनीच हा मोठा थोरला पल्ला गांठला गेलेला आहे.

स्त्रीजीवनविषयक जी जागृति झाली आहे ती होत असतांना विविध प्रकारची चर्चा-चिकित्सा होऊन झालेली आहे. सामान्यतः प्रगतीचा ओघ स्पष्टपणें दृग्गोचर होत असला, तरी स्त्रीसुधारणाविषयक उपाययोजनांना विशिष्ट समाजगटाचा तीव्र विरोध होत आलेला आहे. आजहि तो नष्ट झाला आहे असें नव्हे, पण ज्या महाभाग लेखक-सुधारकांनी आपली शक्ति, वाणी ही सुधारणाविषयक प्रश्नांच्या कार्यी लावली त्यांच्या पुण्याईने स्त्रीजीवनविषयक सुधारणावाद्यांचा पक्ष हा प्रबल झालेला आहे, असें म्हणतां

येतें. इतर राज्यांत काय वस्तुस्थिति असेल ती असो; पण महाराष्ट्रांत तरी स्त्री-पुरुष समतेच्या विचाराची मुहूर्तमेढ पक्की रोवलेली आहे असें दिसून येतें. ब्रि. राजवटीच्या कालमानांत महाराष्ट्रीय स्त्रीजीवनाची जी सुधारणा झालेली आहे, त्या सुधारणेच्या यशाचे विविध वाटेकरी आहेत. एका बाजूला प्रारंभापासून बाह्यतः तटस्थ धोरण आहे असें दाखविणारे पण आंतून स्त्रियांबाबत सहानुभूति असणारे राज्यकर्ते आहेत, तर दुसऱ्या बाजूस स्वतःच्या धर्माचा प्रसार व्हावा अशा मनीषेने प्रेरित झालेले, व त्या दृष्टीने स्त्रीविषयक सहानुभूतीचा प्रवाह चालू ठेवणारे 'परकीय' गणले जाणारे ख्रिस्ती धर्मोपदेशकहि आहेत. विशेषतः आजहि या वर्गाकडून जी स्त्री-जीवनाची सेवा होत आहे ती लक्षांत घेण्याइतकी स्पष्ट आहे.

तथापि राष्ट्रीय वृत्तीच्या प्रसाराच्या काळांत हे दोन पक्ष प्रतिस्पर्धी म्हणून गणले गेले. पण समालोचनात्मक दृष्टीने पाहतां त्यांच्या साहाय्याचें महत्त्व कमी लेखतां येत नाही.

आधुनिक भारतीय स्त्री-उद्धारकांत प्रथम राजा राममोहनराय यांचा उल्लेख करावयास हवा. राममोहनांनी सतीच्या विरुद्ध जे प्रयत्न केले त्याबद्दल आधुनिक स्त्रीजागृतीच्या इतिहासांत पहिलें नांव त्यांचें घ्यावें लागेल. त्यानंतर होऊन गेलेल्या सुधारकांत लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडित, न्या. मू. रानडे यांचा उल्लेख करावा लागेल. या सर्वांच्या बरोबरीने महात्मा ज्योतिराव फुले यांचे नांव घ्यावें लागतें. स्त्रीशिक्षण, स्त्रीवर होत असलेल्या विविध अन्यायांविरुद्ध लोकमत तयार करणें, स्त्रीकडे अधिक सहानुभूतीने पाहाण्याची वृत्ति तयार करण्याचें कार्य ह्या महाभाग सुधारकाग्रणींनी केलेलें आहे. कोणी केवळ सहानुभूतीस आवाहन केलें आहे, कोणी जुने शास्त्राधार आधारास घेऊन स्वमताचा पुरस्कार केला आहे, तर संतापातिरेक होऊन स्वजनांचें वाक्ताडन करण्यापर्यंतहि कोणाची मजल गेली आहे. पण साऱ्यांच्या अंतरंगांत स्त्रीला दिल्या जात असलेल्या वागणुकीबद्दल तीव्र असंतोष निर्माण झाला होता, त्याच्याच ह्या विविध प्रतिक्रिया होत.

त्यानंतर सुधारकांचे आचार्य गोपाळराव आगरकर यांचा उल्लेख करावयास हवा. आगरकरांचे भारतीय आधुनिक स्त्रीवर इतके उपकार आहेत की, स्त्रीसुधारणा म्हणजे आगरकर, असें एक समीकरणच अव्यक्तपणें तयार झालेलें आहे. आगरकरांनी आपल्या युक्तिवादाने स्त्रीजीवनविषयक सुधारणेच्या चलवळीस वेगळेंच अधिष्ठान व निराळीच कलाटणी देऊन प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. स्त्री व पुरुष यांच्यांत सर्व बाबतींत समता प्रस्थापित व्हावयास हवी, असा आग्रह आगरकरांनीच प्रथम धरलेला आहे. त्याला अखिल भारतांत कोठे तोड मिळेल की नाही याची शंकाच आहे. आगरकरांनी स्त्रियांच्या चळवळीला व्यक्तिवादी अधिष्ठान दिलें. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्रांत सुधारणेचा व स्त्रीसुधारणेचा पक्ष प्रबळ झाला. आतापर्यंत तो तसाच राहिला आहे. आगरकरांनंतर देशाच्या इतिहासाचें एक नवें पर्व सुरू झालें. स्त्रीविषयक प्रश्न मागे पडले, पण आगरकरांची विचारसरणी सुशिक्षित समाजाच्या अंतरंगांत मूळ धरीत होती. हें सुशिक्षित समाजाच्या अंतरंगापर्यंत आगरकरांची विचारधारा नेण्याचें कार्य महाराष्ट्राचे धुरंधर कादंबरीकार हरिभाऊ आपटे यांनी केलेलें आहे. आधुनिक महाराष्ट्रीय स्त्री प्रथम आपट्यांनीच चित्रित केली, बोलकी केली.

केशवसुतांनी व त्यांच्या परंपरेतील कविश्रेष्ठांनी तिला 'भूपृष्ठास्थित आद्यदैवत' केलें. महायुद्धानंतरच्या कालांत स्त्रीजीवनविषयक प्रश्नास बरीच व्यापकता आली. आगरकरांपासून संचेतना घेऊन त्या कार्यास वाहून घेणारे व त्या कार्यांत महिला विद्यापीठाच्या प्रस्थापनेने यशस्वी होणारे, डॉ. अण्णासाहेब कर्वे व त्यांच्या सहकारी साहाय्यकांचा एक मार्ग, आगरकरांच्या व्यक्तिवादास तशा शिक्षणाची जोड मिळण्याच्या दृष्टीने हा प्रयत्न महत्त्वाचा आहे. दुसरी धारा म्हणजे का. र. मित्र व त्यांचें 'मासिक मनोरंजन' ह्याने सुरू केलेल्या कार्याची होय. पहिल्या महायुद्धापूर्वी व नंतरच्या काळांत 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते।' हें ब्रीदवाक्य शिरोधारण करणारें 'मनोरंजन' हें स्त्रीसुधारणाविषयक प्रश्नांचें चर्चाकेंद्र झालें होतें. कृष्णाजी केशव गोखले यांचें

"हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा" हें युगप्रवर्तक पुस्तक ह्या कार्याचें मोठेंपण सिद्ध करून देतें. त्याशिवाय या कालांत इतर अनेक लेखक, कवि, कादंबरीकार, नाटककार यांनी महनीय कामगिरी केली आहे. सुशिक्षित स्त्रीचें अंतरंग व्यक्त करविणारे वा. म. जोशी, तिच्या मनांतील प्रणय व इतर भावनांचें आविष्करण करणारे माधव ज्युलियन, तांबे, गडकरी आदि कवि ह्यांचा उल्लेख करावा लागेल. आपल्या क्रांतिकारक विचारांनी स्त्री-समाजालाहि विचारप्रवण करणारे डॉ. केतकर यांचेंहि स्थान ह्या महान् लेखकांत आहे.

या अनेक सुधारक लेखकांप्रमाणे कांही श्रेष्ठ स्त्रीभगिनीहि पुढे आलेल्या आहेत. आधुनिक कालांत अमेरिकेंतून श्रेष्ठ पदवी मिळवून आलेल्या डॉ. आनंदीबाई जोशी ह्यांचें नांव प्रथम पुढें येतें. त्यानंतर आपल्या समाजाला संभ्रमित करणाऱ्या पंडिता रमाबाई यांचा आदरपूर्वक उल्लेख करावा लागेल. रमाबाई रानडे, काशीबाई हिर्लेकर, काशीबाई कनीटकर, लक्ष्मीबाई टिळक ह्यांनी आधुनिक महाराष्ट्राची स्त्री-लेखिका परंपरा निर्माण केली आहे. ह्या असामान्य स्त्री-भगिनींच्या कर्तृत्वाने स्त्रीसुधारणेचा मार्ग उजळला आहे.

अगदी आधुनिक काळांतले स्त्रियांचे खरे कैवारी आणि उद्धारक म्हणजे महात्मा गांधी व पं नेहरू हेच होत. गांधीजींनी भारतीय स्त्रीच्या कर्तृत्वास नवेंच आवाहन केलें, तर पंडितजी स्त्री-पुरुष समतेचे कट्टे पुरस्कर्ते आहेत. सर्वच क्षेत्रांत स्त्रियांनी पुढे यावयास हवें ही पंडितजींची मनीषा सर्वप्रसिद्ध आहे. लोकसभांच्या सभासदांत निम्म्या तरी स्त्रीसभासद हव्यात ही पंडितजींची इच्छा त्यांच्या मनांतील स्त्रीसहानुभूतीचें दिग्दर्शन करविते. (त्याचप्रमाणें स्त्रियांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्यांनी सेंट्रल सोशल वेल्फेअर बोर्डाचीहि स्थापना केली आहे.) आगरकरांच्या नंतरचे स्त्रियांचे खरे कैवारी पंडित जवाहरलालजीच होत. या सर्वश्रेष्ठ स्त्री-पुरुषांना अभिवादन करणें आवश्यक आहे.

ब्रि. राजवटींच्या प्रारंभीं समाजसुधारणेचें केंद्र स्त्री हीच होती. मध्यंतरी, राष्ट्रीय लढ्याच्या झंझावातांत तिच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाल्यासारखें वाटलें. पण आज स्वातंत्र्याच्या कालमानांतहि समाजसुधारणेचें केंद्र स्त्री हीच आहे असें आढळून येईल. अर्थात् आजच्या जीवनाचीं ध्येयें हीं समतेवर आधारलेलीं व दोलीं आहेत. पण सामान्यतः स्त्रीजीवनविषयक सुधारणांचा अग्रहक्क मान्य करावयास हरकत नाही. ब्रि. राजवटींत स्त्रीजीवनाच्या कोणत्या सुधारणांवर भर दिला गेला, कोणत्या गोष्टींकडे दुर्लक्ष झालें ह्या बाबींचा ऊहापोह यापूर्वी आलाच आहे. सामान्यतः या प्रबंधांतील विवेचनाच्या अनुषंगाने आधुनिक स्त्रीच्या अंतरंगात कोणत्या विचारांना प्राधान्य मिळालें आहे हें स्पष्ट होण्यास हरकत नाही. आधुनिक स्वातंत्र्यवादिनी स्त्रीची पुरुषाजवळ काय मागणी आहे, हें कविवर्य यशवंत यांच्या शब्दांत सांगून या प्रबंधाचा शेवट करणें युक्त होईल. आधुनिक स्त्रीचें म्हणणें आहे:—

झगडाया कष्टांशी पदर मला खोवूं या ।
विघ्नांच्या नजरेशी नजर मला भिडवूं द्या
व्याकरुनी मज तुमच्या इतुकी बल गुणशाली
मज पांगुळगाड्याविण चालूं द्या निजचाली
हा प्रपंच दोघांचा समायीक ही शेती
दो हातीं का मग हो ! पिकवूं या चौ हातीं
मज अपुल्यासारखीच करुनी द्या श्रमजीवी
गेह नव्हे देव्हारा; गृहिणी मी, नच देवी ॥

मराठी कवींनाहि हें अंतरंग कळलेलें नाही असे नाही. कवि यशवंतांच्या ओळींचाहि उल्लेख या संदर्भात करतां येईल.

* * *



मराठी-स्त्री

प्रमुख साधनग्रंथ

Engels F.	Origin of Family.
White E. M.	Woman and Civilization.
Durant W.	Story of civilization.
Westermark	History of Marriage.
Altekar Dr. A. S.	Position of Woman in Hindu Civilization.
Holtby	Women and changing Civilization.
Klein Viola	Feminine character.
Nehru J.	Glimpses of World History.
Randall	Creative centuries.
Wells H. G.	Outline of History.
Choksi G. M. (Ed.)	Women in Modern India. (Fifteen Papers by Women writers.)
Mason O. T.	Woman's share in Primitive Culture
Altekar Dr. A. S.	Education in Ancient India.
Mill J.	Subjection of Women.
Quayle	Family; its Sociological Aspect.
Harding M. E.	The way of all Women.
Gandhi M. K.	Woman and Social Injustice.
Curle R.	Women; an analytical study.
Russell B.	Marriage and Morals.
Wolstoneralt	: Vindication of Rights of Women,

प्रमुख साधनग्रंथ 29202 दि. १९ ११
क्रमांक ....9063.... नों. दि. २५

काणेकर अनंत	:	रसेल नीति
चापेकर ना. ग.	:	गच्चीवरील गप्पा
गोखले कु. के.	:	हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा
जोशी वा. वि.	:	स्त्रियांचे हक्क व सुधारणा
सांकृत्यायन रा.	:	होल्गा ते गंगा
किर्लोस्कर वा. का.	:	विवाहसंस्थेचा इतिहास
दाते य. रा.	:	पिता-पुत्र संबंध
थत्ते मनोरमा	:	आदर्श स्त्रीजीवन
टिळक कमलाबाई	:	स्त्रीजीवनविषयक कांही प्रश्न
वैद्य चिं. वि.	:	अवलोनति लेखमाला
गांधी मो. के.	:	स्त्रियांशी हितगुज
,,	:	तेजस्वी तरुणी
,,	:	स्त्रिया व सामाजिक अन्याय
निमकर दा. म.	:	हिंदु लग्नसंस्था
पेंडसे डॉ. शं. दा.	:	महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास
खरे व केळकर	:	स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा
पटवर्धन वसुंधरा	:	आमचें स्त्रीजीवन
फडके ना. सी.	:	साहित्य आणि संसार, वाङ्मयविहार
जावडेकर शं. द.	:	'साहित्य आणि संस्कृति' प्रस्तावना
'महाराष्ट्रीय'	:	रामायण समालोचना
वैद्य चिं. वि.	:	महाभारताचा उपसंहार
करंदीकर ज. स.	:	'रामायण समालोचना' प्रस्तावना
गजेंद्रगडकर के. बा.	:	हिंदु कायद्यांत स्त्रियांचें स्थान
वाटवे के. ना.	:	संस्कृत काव्याचे पंचप्राण
आगरकर गो. ग.	:	संपूर्ण आगरकर, भाग १, २, ३.
सरदार गं. बा.	:	संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुति

सुखठणकर वा. रं. : संतमंडळाचें ऐतिहासिक कार्य
सुवर्ण-महोत्सव ग्रंथ–(रामदास), सुमनहार १, २, ३.
पेंडसे लालजी : साहित्य आणि समाजजीवन
देशपांडे पु. य. : नवीं मूल्यें
आळतेकर मा. दा. : कालिदासाची सृष्टि
केतकर डॉ. श्री. व्यं. : महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण
केळकर न. चिं. : टिळक चरित्र १, २, मराठे व इंग्रज
फाटक न. र. : न्यायमूर्ति रानडे चरित्र
,, : भारतीय राष्ट्रवादाचा विकास
,, : आधुनिक महाराष्ट्रांतील सहा थोर पुरुष
सरदार गं. बा. : अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका
,, : महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी
जावडेकर आचार्य शं. द. : आधुनिक भारत, आधुनिक राज्यमीमांसा
पाध्ये व टिकेकर : आजकालचा महाराष्ट्र
लोकहितवादी : शतपत्रें
आळतेकर मा. दा. : आगरकर
देवगिरीकर व्यं. र. : वासुकाका जोशी व त्यांचा काल
खानोलकर गं. दे. : अर्वाचीन मराठी, वाङ्मयसेवक खंड १, २, ३.
प्रियोळकर अ. का. : दादोबा पांडुरंग, पंचारती प्रस्तावना
नाईक व नुरुल्ला : भारतीय शिक्षणाचा इतिहास
परांजपे मा. रा. : A Sourcebook of Indian Edcation
ठाकरे के. सी. : पंडिता रमाबाई
चाफेकर ना. गो. : पेशवाईच्या सावलींत
केळकर ग. ह. : लोकहितवादी
क्षीरसागर श्री. के. : लो. हि. वा. व्यक्ति व वाङ्मय

फडके स. कृ. : राजा राममोहनराय, केशवचंद्रसेन, इ.
नेने (सं.) : अर्वाचीन मराठी साहित्य
पोतदार द. वा. : मराठी गद्याचा इंग्रजी अवतार, विविध दर्शन
सरदेसाई गो. स. : ब्रिटिश रियासत्
राजारामशास्त्री भागवत : लेखसंग्रह
कर्वे डॉ. धों. के. : आत्मवृत्त
कर्वे डॉ. इरावती : परिपूर्ति, मराठी लोकांची संस्कृति
सहस्रबुद्धे डॉ. पु. ग. : ' स्वभाव-लेखन '
पानसे वेणूबाई : ह. ना. आपटे चरित्र
वैद्य चिं. वि. : अवलोनति लेखमाला
परांजपे शि. म. : काळांतील निवडक निबंध, १, ५
केसरींतील निवडक निबंध मा. १, २, (सं. आगरकर)
,, ,, ,, ,, १ ते ४ (सं. टिळक)
गोळे म. शि. : हिंदुधर्म आणि सुधारणा
कानिटकर गो. वा. : स्त्रियांची परवशता
कट्टी रं. : विधवावपन अनाचार
कानिटकर काशी. (सं.) : हरिभाऊंचीं पत्रें, आनंदीबाई जोशी चरित्र
आंबेकर वि. वा : परामर्श
दाते शं. गो. : ग्रंथसूचि १, २
केळकर का. न व खरे बाळूताई : स्त्रियांच्या हक्कांची सुधारणा
नासिक ग्रंथालय (सं) : प्रदक्षिणा
कुलकर्णी वा. ल. : वामन मल्हार वाङ्मयदर्शन
खांडेकर वि. स. : वा. म. जोशी व्यक्ति व वाङ्मय, धुंधुर्मास, वनभोजन
खांडेकर वि. स. : तीन संमेलनें, सहा भाषणें
अत्रे आचार्य प्र. के. : ललित वाङ्मय

काणेकर अनंत	:	हिरवे कंदील
विभावरीचे टीकाकार	:	
जोशी वा. म.	:	विचारसौंदर्य, विचारलहरी, विचारविहार,
	:	स्मृतिलहरी, विचारविलास
केतकर डॉ. श्री. व्यं.	:	माझें बारा वर्षांचें कार्य
,,	:	भारतीय समाजशास्त्र
देशपांडे मा. का.	:	प्रो. फडके : व्यक्ति आणि वाङ्मय
	:	खांडेकर ,, ,, ,,
माडखोलकर ग. व्यं.	:	दोन तपें, अवशेष, वाङ्मयविलास, माझे आवडते लेखक, परामर्श, स्वैर विचार
वाळिंबे रा. शं.	:	मुक्तात्म्यापासून प्रमद्वरेपर्यंत, साहित्याचा ध्रुवतारा
वरेरकर भा. वि.	:	माझा नाटकी संसार, आघात
दांडेकर वि. पां.	:	सामाजिक नाटकें
या शिवाय	:	विविधज्ञानविस्तार, सह्याद्रि, साहित्य, 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' लोकशिक्षण, नवभारत, स्त्री, भगिनी, श्रमिक महिला, अभिरुची सत्यकथा इ. अनेक नवीं व जुनीं नियतकालिकें.

मराठा [illegible] संग्रालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ... ... वि. ...o...o...
क्रमांक ..... नों: दि: .....

शुद्धिपत्र

[लेखक एका गांवीं व छापखाने दुसऱ्या गांवीं असल्याने मुद्रण-शुद्धीबाबत थोडी गैरसोय झाली. केलेल्या दुरुस्त्या परत पाहतां आल्या नाहीत; कांहीं फॉर्म्सची मुद्रितें लेखाकडे न येतां परस्पर मजकूर छापला गेला; इ. कारणांनी कांही चुका राहून गेल्या आहेत. त्याबद्दल लेखक दिलगीर आहें. कांही चुका तांत्रिक स्वरूपाच्या आहेत. उ. कांही पृष्ठांवरील मथळे चुकीचे पडले आहेत. प्रकरणाचें नांव सर्व प्रकरणभर उजव्या पानावर हवें ह्या संकेतास त्यायोगें बाध आलेला आहे. किरकोळ चुका सहज लक्षांत येतीलच. अर्थदृष्ट्या महत्त्वाचे मुद्रणदोष या ठिकाणीं उल्लेखिलेले आहेत. मुद्रणदोषांबद्दल मी वाचकांची क्षमा मागतों. —लेखक]

खंड १ ला

पृष्ठ	ओळ	असें आहे	दुरुस्ती
१३	६	इंस्टिंग्टिव्ह	इन्स्टिंक्टिव्ह
१७	३	एकटेपणा	एकलेपणा
२९	९	उभी	उणी
३४	१५	झगडा आहे	झगडा झाला
४३		तळटीपांतील आकडे १, २ असे छापले ते उलटे हवेत.	
१००	५	बुढा	बुळा
१०१	१६	सती	सता
१०८	२५	अपत्यागम	(हा शब्द गाळणें)
१२६	७	धर्मपीठादि	धर्मपीठस्थ
१४३	२०	मत	मन
१५३	९	स्तित्वाच्या	अस्तित्वाच्या
२०५	७	मुलांची	मुलींची
२३३	२०	१९४२	१९३२
२३५	१९	होो	होतें
२४१	१०	जाणार	गेली
२५४	२३	गांधीइतका	(हा शब्द गाळणें)

शुद्धिपत्र

खंड २ रा

पृष्ठ	ओळ	असें आहे	दुरुस्ती
४ खालून	२	चित्तसागरांतू	चित्रसागरांतून
४५ वरून	९	समत्ववादाची	समन्वयवादाची
८१ ,,	९	प्रेमाळ	प्रेमळ
,, ,,	१६	वाबनरावांना	वामनरावांना
१२१ ,,	१४	पुरूषांचा	स्त्री-पुरुषांचा
१३१ ,,	५	मणासाने	माणसाने
१९७ खालून	३	लक्षणीय आहेत इ.	इ. लक्षणीय आहेत
२७५ वरून	७	समवादात्मक	समवायात्मक
३४६ ,,	९	स्त्रीभगिनीहि	भगिनीहि
३४७ ,,	१४	खोवूं	खोवूं द्या
३४७ ,,	१६	घ्याकरुनी	घ्या करुनी


REFBK-0009272

* आमचीं कांहीं पुस्तकें *

रसग्रहण–कला व स्वरूप : प्रा. गो. म कुलकर्णी	३॥ रु.
विशाखा– (चवथी आवृत्ति) : कवि कुसुमाग्रज	२॥ ,,
मनाचे संकल्प– : प्रा. म. ना. अदवंत	२॥ ,,
प्राची– (काव्य) : प्रा. गो. म. कुलकर्णी	१॥ ,,
कलानीतिवाद– : प्रा. संत व प्रा. गाडगीळ	२ ,,
माझें वाङ्मयीन जीवन– : कवि काव्यविहारी	२॥ ,,
साहित्याचें मूलधन– : आचार्य काका कालेलकर	१। ,,
साहित्य आणि संस्कृति– : प्रा. दु. का. संत	३ ,,
कोंदणें– (लेखसंग्रह) : प्रा. ना. सी. फडके	३ ,,
तुषार– (टीकासंग्रह) : प्रा. द. सी. पंगु	२॥ ,,
वाङ्मयविलास– (लेखसंग्रह) : ग. त्र्यं. माडखोलकर	२ ,,
गोकर्णीचीं फुलें– (लेखसंग्रह) : वि. स. खांडेकर	२॥ ,,
शृंगार– (कथासंग्रह) : सुमनबन्धु	३ ,,
आराधना– (,,) : वि. वा. पत्की	३ ,,
पालखा– (,,) : प्रा. चिं. वि. जोशी	२ ,,
साहित्य आणि संसार– : प्रा. ना. सी. फडके	१॥। ,,
भरतकामाच्या आदर्श कलाकृती भाग १ व २ चित्रकार : गं. वि. वडेर (जी. डी. आर्ट)	२। ,,
आशीर्वाद– (बालकथासंग्रह) : ल. रा. गोडबोले	१ ,,
अस्मिता– (काव्य) : शि. अ. लुकतुके	२ ,,
प्राचीन मराठी वाङ्मयाचें स्वरूप : प्रा. ह. श्री. शेणोलीकर	२॥ ,,
मेघदूत– (काव्य) : ग. नी. कात्रे	१॥ ,,

* स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर. *

नवीन प्रकाशन

हरिभाऊ : डॉ. ल. म. भिंगारे, एम्. ए., पीएच्. डी.

मराठींतील श्रेष्ठ आणि ज्येष्ठ कादंबरीकार **हरि नारायण आपटे** यांच्या सर्व वाङ्मयाचा परामर्ष घेणारा टीकाग्रंथ. **हरिभाऊंच्या** वाङ्मयाचा हा कालानुक्रमी अभ्यास प्रथमत:च केलेला असून हरिभाऊंच्या लेखनांतील प्रयोगकाल, आत्माविष्कार, कथाविष्कार आणि विश्लेषण या चार अवस्थांचे स्वरूप व उलगडा करण्यांत आलेला आहे. 'केसरी', 'सकाळ' इत्यादींचे उत्कृष्ट अभिप्राय. **डेमी आकाराचीं पृष्ठें ४६४ किंमत १० रु.**

शृंगार : श्री. सुमनबंधु

वीररसानें विलोभनीय झालेल्या वीरांच्या चरित्रांतील शृंगाररसाची बहार मराठींत नव्यानेच प्रसृत करणाऱ्या श्री. सुमनबंधु यांच्या पांच ऐतिहासिक प्रणय-कथांचा मनोहारी संग्रह. नवविवाहित वधु-वरांना भेट देण्यास सर्वथैव योग्य पुस्तक. **पृष्ठें १४४ किंमत ३ रु.**

हॅम्लेट : प्रा. स. रा. गाडगीळ, एम्. ए.

जगत् श्रेष्ठ नाटककार व कवि शेक्सपीअर यांच्या **हॅम्लेट** या महान् कलाकृतीचें रुपांतर मराठी भाषेंत ७०।७५ वर्षांपूर्वीच प्रो. गोपाळ गणेश आगरकर यांनीं **विकारविलसित** या नांवानें केलें. या नाटकांमध्यें शेक्सपीअरच्या प्रतिभेची अत्युच्च भरारी पाहावयास मिळत असल्यानें मोठ-मोठाले कवि, टीकाकार तत्त्ववेत्ते, मानसशास्त्रज्ञ यांसारख्या विविध क्षेत्रांतील विचारवंतांनीं या नाटकाचें रहस्य उलगडून दाखविण्याचा जो प्रयत्न केला आहे त्याचा विस्तृत परामर्ष या प्रबंधांत प्रा. गाडगीळ यांनीं घेतला आहे. सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. **वि. स. खांडेकर** यांची प्रस्तावना.

पृष्ठें १२५ किंमत २ रु.

स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर.

डॉ. दु. का. संत
यांचें लेखन

- **साहित्य आणि संस्कृति**
  [मुंबई विद्यापीठाचें १९५० चें तर्खडकर प्रबंध–पारितोषिक मिळालेलें पुस्तक]

- **कलानीतिवाद** *

- **केशवसुत : काव्यदर्शन** *
  [दुसरें मुद्रण १९५६]

- **मुक्तेश्वर सभापर्व** *
  [एक विवेचक अभ्यास]

- **नरेंद्रकृत रुक्मिणीस्वयंवर** *
  [एक विवेचक अभ्यास]

---

* हीं पुस्तकें सहकार्यानें लिहिलीं आहेत.